॥ अथ श्रीभक्त लीलामृत ॥

ॐ

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुवे नमः ॥

संपादकीय

भक्तिभावाने ओथंबलेल्या सुमारे चाळीस हजार ओव्या लिहून ' संत चरित्रकार ' कविवर्य महिपतिबोवा ताहराबादकर यांनी मराठी भाषेत खरोखरच एक अमोल कामगिरी केली आहे. त्यांचे ' श्रीभक्तविजय ' ' श्रीसंतलीलामृत ' ' श्रीभक्तलीलामृत ', यासारखे रसाळ ग्रंथ मराठी भाषेचे अमोल लेणे ठरले आहेत. आपल्या काव्य गंगेने त्यांनी लक्षावधी मराठी वाचकांना खरोखरच पावन करून टाकले आहे !

ईश्वरी प्रसादाने जन्म

महिपति बोवांचा जन्म इ. स. १७१५ (शके १६३७) मधला. मोगलाईतील ताहराबाद हे त्यांचे जन्मस्थान. त्यांचे संपूर्ण नाव महिपती दादोपंत कांबळे. हे ऋग्वेदी वसिष्ठ गोत्री ब्राह्मण.

त्यांचे वडिल दादोपंत हे ताहराबाद येथे स्नानसंध्या, देवतार्चन आणि ध्यानधारणा करून मोठ्या आनंदाने कालक्रमण करीत असत. पंढरीचा पांडुरंग हेच सर्वस्व मानून त्यांनी तनमनधनाने त्याचीच उपासना केली. दर महिन्याच्या शुद्ध एकादशीची त्यांची पंढरपूरची वारी चोवीस वर्षांत कधी चुकली नाही.

परंतु पुढे वयाची साठ वर्षे झाली. शरीरयंत्र थकून गेले. त्यामुळे दर शुद्ध एकादशीला पंढरीस जाऊन पांडुरंगाच्या सावळ्या, गोजिऱ्या मूर्तीचे दर्शन घेणे त्यांना अवघड वाटू लागले.

तरीही एकदा ते पंढरीस गेले. शरीरास थकवा जाणवतच होता. लाडक्या पांडुरंगाची साजिरी मूर्ती डोळ्यात साठवून घेऊन ते भरल्या डोळ्यांनी म्हणाले, ' हे देवाधिदेवा, कदाचित् .... हेच तुझे अखेरचे दर्शन असेल. विठ्ठला मायबापा ऽ आता शरीर साथ देत नाही. इतक्या दूर तुझ्या दर्शनासाठी आता नाही रे येववत ! सावळ्या पांडुरंगा, मनीमानसी एकच इच्छा होती .... ही पंढरीची वारी पुढच्याही पिढीत अशीच चालू रहावी. परंतु .... माझ्या सारख्या निपुत्रिकाची ही इच्छा कशी पूर्ण होणार ... ?

... दादोपंतांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. त्यांचा गळा दाटून आला होता... होता ... पंढरीनाथाला त्यांनी साष्टांग नमस्कार घातला आणि रात्रीच्या वेळी ते बाहेरच्या ओवरीत येऊन झोपले.

—आणि त्याच रात्री एक नवल घडले !

स्वप्नात साक्षात पांडुरंगाने दर्शन देऊन एक पेढा त्यांच्या हातावर ठेवला आणि प्रसन्न हास्य करीत ते म्हणाले, ' वत्सा, दुःख करू नकोस. हा पेढा तुझ्या पत्नीला खावयास दे, म्हणजे तुझी इच्छा पूर्ण होईल. '

त्या विलक्षण स्वप्नामुळे दादोपंत खडबडून जागे झाले. त्या स्वप्नाच्या आठवणी-मुळे त्यांचे अष्टसात्विक भाव जागृत झाले. विलक्षण आश्चर्याची गोष्ट म्हणजे पांडुरंगाने स्वप्नात दिलेला पेढा प्रत्यक्षच त्यांच्या हातात होता.... ! !

—ताहराबादेस आल्यावर त्यांनी तो अमूल्य प्रसाद आपल्या पत्नीस खावयास दिला. आणि लवकरच तिला गर्भ राहिला अन् नवमास पूर्ण होताच तिने एका तेजस्वी गोंडस पुत्ररत्नाला जन्म दिला.

हेच आमचे चरित्रनायक कविवर्य महिपतीबोवा !

पांडुरंगाचा एकनिष्ठ भक्त

अशा प्रकारे बोवांचा जन्म ईश्वरी कृपाप्रसादाने झालेला असल्याने बालपणापासूनच त्यांच्या ठायी पांडुरंगाच्या भजनपूजनाची आवड निर्माण झाली घरापासून दूर एकांतस्थळी जावे आणि दगडांच्या चिपळ्या करून भक्तिभावाने पांडुरंगाचे भजन करावे, त्या भजनात देहभान विसरून जावे, असा त्यांचा नित्यक्रम सुरू झाला. वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी त्यांनी पंढरीच्या वारीस जाण्याचा हट्ट वडिलांजवळ धरला. आणि वडिलांनीही तो मोठ्या प्रेमाने पूर्ण केला. अशा प्रकारे दरमहा पंढरीची वारी करण्याचा दादोपंतांचा क्रम त्यांच्या पुढच्या पिढीतही चालू राहिला !

नोकरी न करण्याची शपथ

बोवा लहानपणापासूनच ज्ञानोपासक होते. त्यांची बुद्धि अतिशय तल्लख होती. संस्कृत, मराठी, गुजराती, कानडी अशा चार भाषा त्यांना उत्तम प्रकारे अवगत होत्या. ज्ञानेश्वरी व तुकोबाची गाथा या ग्रंथांचा त्यांनी फार बारकाईने अभ्यास केला होता.

वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच ते वंश परंपरेने चालत आलेले ताहराबादचे कुळकर्णपद व जोसपण सांभाळू लागले. परंतु त्यांचे चित्त मात्र सदैव भगवंताकडेच लागलेले असे. यम नियमांची जपणूक करून ईश्वरार्चन करण्यातच त्यांचा काल व्यतीत होत असे.

नोकरीला रामराम !

पुढे थोड्याच दिवसात त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा एक विलक्षण प्रसंग घडून आला.

ताहराबादचा जहागीरदार एक मुसलमान गृहस्थ होता. आपल्या कुळकर्णपणाच्या कामानिमित्त बोवांना त्या मुसलमानाच्या कचेरीत नेहमीच जाव लागे.

एकदा बोवा स्नान संध्या वगैरे उरकून नेहमीप्रमाणे पांडुरंगाच्या पूजेत मग्न होते. तेवढ्यात जहागिरदाराचा एक यवन शिपाई बोवांना कचेरीत बोलावण्यास आला. परंतु बोवांचे चित्त पांडुरंगाच्या पूजेत रंगून गेले होते. एका पांडुरंगाशिवाय त्यांच्या मनात दुसरा कसलाच विचार नव्हता. त्यामुळे शिपायाकडे न पहाता ते म्हणाले, पूजा आटोपल्यावर येऊं. ते ऐकून यवन शिपाई चरफरडत परत गेला. परंतु जहागीदाराने त्याला तोच निरोप देऊन पुन्हा पाठविले. असे दोन वेळा झाले. परंतु बोवांची पूजा अजून संपली नव्हती. ते आपल्याच तंद्रीत ब्रह्मरस चाखीत होते ! परंतु शिपायाला त्याचे काय ! तो बोवांना उद्देशून अधिक उणे बोलू लागला. ते ऐकून बोवा भानावर आले. एका यःकश्चित शिपायाने असे उपमर्दकारक भाषण आपल्याला उद्देशून करावे याचे त्यांना विलक्षण दुःख झाले. त्यानंतर पूजा आटोपून ते लगबगीने कचेरीत गेले व तेथले काम आटोपून घरी परत झाले. आणि त्याच क्षणी त्यांनी कानावरची लेखणी पांडुरंगाच्या पायावर ठेवून शपथ घेतली की, आजपासून गावकामासाठी लेखणी हातात धरणार नाही..... '

अशाप्रकारे बोवा नोकरीतून मुक्त झाले. तरिपण त्यांना, ' आता पुढे काय ? ' असा प्रश्न पडण्याचे कारण नव्हते. कारण हरिभजनात त्यांचा काल उत्तम प्रकारे व्यतीत होऊन सार्थकी लागत होता !

तुकोबांचा स्वप्नदृष्टांत

अशा प्रकारे पांडुरंगाची निस्सीम सेवा करीत असतानाच त्यांना एके दिवशी रात्री प्रत्यक्ष तुकोबांनी स्वप्नात दृष्टान्त दिला. आपला वरदहस्त बोवांच्या मस्तकावर ठेवून ते म्हणाले, ' बोवा, नामदेवांच्या शतकोटी अभंगांचा संकल्प पांडुरंगाच्या कृपेने माझ्या हातून पूर्ण झाला आता संत चरित्राचे कार्य तुमच्या हातून व्हावे. '

एवढे सांगून तुकोबा स्वप्नातच अंतर्धान पावले आणि त्याच दिवसापासून बोवांना सुंदर काव्य स्फुरू लागले आणि बोवा तुकोबांनाच आपले परमार्थ गुरु मानू लागले.

या संदर्भात त्यांच्या ग्रंथातून अनेक ओव्या आढळून येतात. उदाहरणार्थ—

जो भक्तिज्ञान वैराग्य पुतळा । ज्याचे अंगी अनंत कळा ।
तो सद्गुरु तुकाराम आम्हासी जोडला । स्वप्नीं दिधला उपदेश ।।

—भक्तलीलामृत १।४०

किंवा

बाळपणीं मेर माता । मग प्रतिपाळी पिता ।। १ ।।
तैशापरी सांभाळिले । ब्रीद आपुलें साच केलें ।। २ ।।
यात्रा नेली पंढरीसी । ध्यान ठेविलें पायांसी ।। ३ ।।
हृदयीं प्रकटोनी बुद्धि । भक्तविजय नेला सिद्धी ।। ४ ।।
स्वप्नीं येऊनि तुकाराम । आपुलें सांगितलें नाम ।। ५ ।। इ.

महिपतीबोवांचे समकालीन कविश्रेष्ठ मोरोपंत यांनीही आपल्या ' महिपती स्तुति ' मध्ये पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आढळते—

' सत्य तुकारामाचा, या महिपतिवरि वरप्रसाद असे ।
सद्नुग्रहाविणें हें निघतिल उद्गार सार काय असे ।। '

असो. बोवांचा जन्म झाला त्यावेळी श्रीतुकाराम महाराजांचे महानिर्वाण होऊन अर्धशतकाचा काळ लोटला होता. याचाच अर्थ, बोवांना संत तुकाराममहाराजांचा प्रत्यक्ष उपदेश होणे शक्य नव्हते. परंतु महिपतिबोवांकडून प्रत्यक्ष पांडुरंगालाच भक्त चरित्र लेखनाचे महत्कार्य करवून घ्यावयाचे होते नि म्हणूनच भगवंतानेच ही लीला रचिली होती असेच म्हटले पाहिजे !

तथापि एवढी मोठी कृपा होऊनही बोवा मुळातच अतिशय नम्र असल्यामुळे या घटनेविषयी आपल्या ' भक्तलीलामृत ' ग्रंथात ते लिहितात —

' मी तरी सर्वांविषयी हीन । ऐसे साक्ष देतसे मन ।
परी कृपा केली कवण्यागुणे । त्याचे कारण तो जाणे ' ।। १–२१

संताचीच चरित्रे का लिहिली ?

बोवांनी आपल्या ग्रंथातून संतांचीच चरित्रे प्रामुख्याने का लिहिली याचे आणखी एक कारण म्हणजे बोवा स्वतः महान ईश्वरभक्त होते. आणि संतांविषयी त्यांच्या मनात अपार भक्तिभाव होता. संत ही प्रत्यक्ष ईश्वराचीच चालती बोलती ' रूपडी ' आहेत असें ते समजत.

ते एके ठिकाणी म्हणतात—

तुम्ही संतमूर्ती । ऐसा निश्चय दृढ चित्तीं ।
म्हणोनिया महिपती । नमन करी सद्भावे ।।

संतांविषयी हाच आदरभाव बाळगून त्या काळच्या बहुतेक कवींनी आपल्या काव्यातून संत चरित्रांचे गायन केले आहे. कारण त्या काळात काव्य हे उपजीविकेचे साधन नव्हते तर श्रीहरीशी व संतांशी नाते जोडण्याचा तो एक उत्तम मार्ग होता !

माऊलींनीं देखील भावार्थ दीपिकेच्या अठराव्या अध्यायात असेच म्हटले आहे की—

हारपले आपण पात्रे । ते संताते पाहता गिवसावे ।
म्हणौनि वानावे ऐकावे । तेचि सदा ।। (ज्ञाने. १८ । ३९ ३९७)

बोवांनी यासाठीच आपल्या चाळीस हजाराहून अधिक ओव्यात महाराष्ट्रातील १६८ व महाराष्ट्राबाहेरील ११६ संत पुरुषांची चरित्रे लिहून एक अभूतपूर्व विक्रमच जणू केला आहे ! बोवांचा हा प्रचण्ड व्याप पाहून त्यांच्या समोर आपले मस्तक आदराने लवल्याशिवय राहत नाही !

बोवांची ग्रंथ संपत्ति

बोवांनी निर्माण केलेल्या काव्य संपत्तीचा तपशीलच सांगावयाचा तर तो पुढील-प्रमाणे सांगता येईल —

ग्रंथाचे नांव	अध्याय	ओव्या	रचना शक
(१) श्रीभक्तविजय	५७	९९१६	१६८४
(२) श्रीकथासारामृत	१२	७२००	१६८७
(३) श्रीसंतलीलामृत	३५	५२५९	१६८९
(४) श्रीभक्तलीमृत	५१	१०७९४	१६९६
(५) श्रीसंतविजय	२६ (अपूर्ण)	४६२८	१६९६
(६) श्रीपंढरी महात्म्य	१२	——	——

ग्रंथाचे नांव	अध्यांय	ओव्या	रचना शक
(७) श्रीअनंत व्रतकथा	—	१८६	——
(८) श्रीदत्तात्रेय जन्म	—	११२	——
(९) श्रीतुलसी महात्म्य	५	७६३	——
(१०) श्रीगणेपुराण (अपूर्ण)	४	३०४	——
(११) श्रीपांडुरंग स्तोत्र	—	१०८	——
(१२) श्रीमुक्ताभरणव्रत	—	१०१	——
(१३) श्रीऋषीपंचमी व्रत	—	१४२	——
(१४) अपराध निवेदन स्तोत्र	—	१०१	——
(१५) स्फुट अभंग व पदे	—	——	——

या एकंदर ग्रंथाची ओवीं संख्या चाळीस हजाराचे आसपास आहे.

याशिवाय ' महाराष्ट्र कवि चरित्रकार ' श्री. ज. र. आजगावकर यांनी लिहिल्या-प्रमाणें बोवांनी काही नामांकित संतांची चरित्रें अभंगवृत्तातही गाइली आहेत. ती पुढील-प्रमाणे—

श्री नामदेव चरित्र	अभंग	६२	श्री जगमित्र नागा चरित्र	अभंग	६३
श्री हरिपाळ चरित्र	,,	५८	श्री माणकोजी बोधले चरित्र	,,	६७
श्री कमाल चरित्र	,,	६७	श्री संतोबा पवार चरित्र	,,	१०२
श्री नरसी मेहता चरित्र	,,	५२	श्री चोखामेळा चरित्र	,,	४७
श्री राका कुंभार चरित्र	,,	४७			

एकदा ओवी वृत्तात विस्ताराने वर्णिलेली काही संत चरित्रें त्यांनी पुन्हा अभंग वृत्तातही वर्णिली आहेत, यावरूनच बोवांचे संत विषयक प्रेम उत्तम रितीने व्यक्त होते.

बोवांचा श्रीभक्तलीलामृत

ओवी संख्येचा विचार करता ' श्री भक्तलीलामृत ' हा बोवांचा सर्वांत मोठा ग्रंथ. या ग्रंथात ५१ अध्याय असून ओवीं संख्या १०७९४ एवढी मोठी आहे.

प्रस्तुतच्या अवीट गोडीच्यां ग्रंथलेखनांचे कार्य बोवांनी जयनाम सवत्सरी शके सोळाशे शहाण्णवमध्ये फाल्गुन कृष्ण चतुर्थीस (म्हणजे इ. स. १७७४ मध्ये) ताहराबाद मुक्कामी पूर्ण केले. या ग्रंथात श्रीचांगदेव, श्रीज्ञानेश्वर, श्रीनरसिंह सरस्वती, श्रीतुकाराम, श्रीएकनाथ, श्रीभानुदास, संतोबा पवार, विठ्ठल पुरंदर, माणकोजी बोधला, इत्यादी संत सत्पुरुषांची चरित्रे बोवांनी आपल्या प्रासादिक भाषेत रंगविली आहेत. ती वाचताना त्यांच्या आयुष्यातील ते ते प्रसंग त्यांनी नेमक्या भाषेत वाचकांच्या डोळ्यासमोर साकार केले आहेत. ते वाचल्यावर या संत पुरुषांच्या जीवनातील कित्येक नव्या हकिकती वाचकाला समजतात व त्याचे औत्सुक्य कायम राहते नि हे वाचता वाचताच त्याला भक्तिमार्गाची न कळत गोडी लागून भगवंताच्या प्राप्तीचे रहस्यही समजून जाते.

प्रस्तुतचा अवीट गोडीचा ग्रंथ बावांनी आपल्या वयाच्या एकूणसाठाव्या वर्षी ताहराबाद या ठिकाणी लिहून पूर्ण केला. बोवांचा जन्मच जणू संत चरित्रे लिहिण्यासाठीच झाला होता.

आपल्या ग्रंथलेखनाच्या अखेरच्या ओव्यातही त्यांनी संत चरित्र लिहिण्याची इच्छाच श्रीहरीजवळ प्रगट केली आहे.

ते लिहितात—

न लगे भुक्ति न लगे मुक्ती ।
मागत नाही धनसंपत्ती ।
तुझ्या दासांची वर्णीत कीर्ति ।
ऐसे श्रीपती करावे ॥ ५१–२२७

ते पुढे असेही लिहितात—

नावडेचि तुझे ब्रह्मज्ञान ।
न लगे तुझे योगसाधन ।
रूप दृष्टीसी पाहीण सगुण ।
यावीण मागणे आन नसे ॥ ५१–३३०

ग्रंथाचे नांव	अध्यांय	ओव्या	रचना शक
(७) श्रीअनंत व्रतकथा	—	१८६	——
(८) श्रीदत्तात्रेय जन्म	—	११२	——
(९) श्रीतुलसी महात्म्य	५	७६३	——
(१०) श्रीगणेपुराण (अपूर्ण)	४	३०४	——
(११) श्रीपांडुरंग स्तोत्र	—	१०८	——
(१२) श्रीमुक्ताभरणव्रत	—	१०१	——
(१३) श्रीऋषीपंचमी व्रत	—	१४२	——
(१४) अपराध निवेदन स्तोत्र	—	१०१	——
(१५) स्फुट अभंग व पदे	—	——	——

या एकंदर ग्रंथाची ओवीं संख्या चाळीस हजाराचे आसपास आहे.

याशिवाय ' महाराष्ट्र कवि चरित्रकार ' श्री. ज. र. आजगावकर यांनी लिहिल्या-प्रमाणें बोवांनी काही नामांकित संतांची चरित्रें अभंगवृत्तातही गाइली आहेत. ती पुढील-प्रमागे—

श्री नामदेव चरित्र	अभंग	६२	श्री जगमित्र नागा चरित्र	अभंग	६३
श्री हरिपाळ चरित्र	,,	५८	श्री माणकोजी बोधले चरित्र	,,	६७
श्री कमाल चरित्र	,,	६७	श्री संतोबा पवार चरित्र	,,	१०२
श्री नरसी मेहता चरित्र	,,	५२	श्री चोखामेळा चरित्र	,,	४७
श्री राका कुंभार चरित्र	,,	४७			

एकदा ओवी वृत्तात विस्ताराने वर्णिलेली काही संत चरित्रें त्यांनी पुन्हा अभंग वृत्तातही वर्णिली आहेत, यावरूनच बोवांचे संत विषयक प्रेम उत्तम रितीने व्यक्त होते.

बोवांचा श्रीभक्तलीलामृत

ओवी संख्येचा विचार करता ' श्री भक्तलीलामृत ' हा बोवांचा सर्वात मोठा ग्रंथ. या ग्रंथात ५१ अध्याय असून ओवीं संख्या १०७९४ एवढी मोठी आहे.

प्रस्तुतच्या अवीट गोडीच्यां ग्रंथलेखनांचे कार्य बोवांनी जयनाम सवत्सरी शके सोळाशे शहाण्णवमध्ये फाल्गुन कृष्ण चतुर्थीस (म्हणजे इ. स. १७७४ मध्ये) ताहराबाद मुक्कामी पूर्ण केले. या ग्रंथात श्रीचांगदेव, श्रीज्ञानेश्वर, श्रीनरसिंह सरस्वती, श्रीतुकाराम, श्रीएकनाथ, श्रीभानुदास, संतोबा पवार, विठ्ठल पुरंदर, माणकोजी बोधला, इत्यादी संत सत्पुरुषांची चरित्रे बोवांनी आपल्या प्रासादिक भाषेत रंगविली आहेत. ती वाचताना त्यांच्या आयुष्यातील ते ते प्रसंग त्यांनी नेमक्या भाषेत वाचकांच्या डोळ्यासमोर साकार केले आहेत. ते वाचल्यावर या संत पुरुषांच्या जीवनातील कित्येक नव्या हकिकती वाचकाला समजतात व त्याचे औत्सुक्य कायम राहते नि हे वाचता वाचताच त्याला भक्तिमार्गाची न कळत गोडी लागून भगवंताच्या प्राप्तीचे रहस्यही समजून जाते.

प्रस्तुतचा अवीट गोडीचा ग्रंथ बावांनी आपल्या वयाच्या एकूणसाठाव्या वर्षी ताहराबाद या ठिकाणी लिहून पूर्ण केला. बोवांचा जन्मच जणू संत चरित्रे लिहिण्यासाठीच झाला होता.

आपल्या ग्रंथलेखनाच्या अखेरच्या ओव्यातही त्यांनी संत चरित्र लिहिण्याची इच्छाच श्रीहरीजवळ प्रगट केली आहे.

ते लिहितात—

न लगे भुक्ति न लगे मुक्ती ।
मागत नाही धनसंपत्ती ।
तुझ्या दासांची वर्णीत कीर्ति ।
ऐसे श्रीपती करावे ॥ ५१–२२७

ते पुढे असेही लिहितात—

नावडेचि तुझे ब्रह्मज्ञान ।
न लगे तुझे योगसाधन ।
रूप दृष्टीसी पाहीण सगुण ।
यावीण मागणे आन नसे ॥ ५१–३३०

अशा प्रकारे संतांशी आणि संत चरित्रांशी बोवा पूर्णपणे एकरूप झाले होते व 'आपणा सारिखे करिती तात्काळ। नाही काळ वेळ तया लागी' असा संतांचा स्वभाव असल्याने त्यांच्याशी एकरूप झालेल्याला ते आपल्यासारखेच करून टाकतात ! अशा प्रकारे बोवाही संत संगतीने स्वतः संत बनले !

बोवांची भाषा, आमृताहुनि गोड आहे. त्यांनी वर्णन केलेले प्रसंग हृदयाला स्पर्शून जाणारे नि म्हणूनच जिवंत आहेत. उदाहरणार्थ, त्यांनी लिहिलेले तुकोबांचे चरित्र पहा. सर्व चरित्रांत या तुकोबांचे चरित्रात बोवा ज्यास्त रंगून गेले आहेत असे वाटते.

त्यांच्या सर्वच ग्रंथात दृष्टांत, उपमा यांचा वापर जागोजाग आढळतो. सुभाषितवजा वाक्ये तर किती दाखवावीत ?

परंतु या ग्रंथाचे खरे यश त्याच्या वाचकावर होणाऱ्या परिणामात आहे. बोवांनी हा ग्रंथ वाचकांचे ईश्वरावरील, संतांवरील प्रेम वाढीस लागावे व ते सन्मार्गाला लागावेत, आपल्या मनुष्य जन्माचा हेतू कोणता याचा बोध त्यांना व्हावा यासाठी लिहिला आहे आणि हा ग्रंथ वाचल्यावर हा परिणाम वाचकांच्या मनावर निश्चित होतो यात तिळमात्र शंका नाही !

हा परिणाम साधण्याचे महत्त्वाचे कारण आम्हाला, असे वाटते की, 'आधी केले मग सांगितले' या म्हणीनुसार बोवांनी स्वतः अनेक सद्‌गुण अंगी बाणविले होते. अहिंसा, भूतदया, वसुधैव कुटुंबकत्व इ. दैवी गुण त्यांच्या ठायी पूर्णत्वाने वास करीत होते.

या संदर्भात एकच उदाहरण पुरेसे आहे

असे सांगतात की, बोवांच्या काळी महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला. त्यालाच 'करंड्याचे साल' असे म्हणतात. त्यावेळी हजारो लोक क्षुधा तृपेने व्याकुळ झाले. त्यांची ती स्थिती पाहून 'आत्मवत् सर्वभूतेषु' अशा वृत्तीच्या बोवांचे हृदय द्रवले. आणि त्यांनी आपले संपूर्ण घर गरिबांकडून लुटविले ! ही विलक्षण हकिकत गावच्या जहागिरदारास कळताच त्याने गाडीभर सामान, धान्य वगैरे वस्तू बोवांकडे पाठविल्या. परंतु बोवांनी तुकोबांप्रमाणेच त्या आभारपूर्वक परत पाठविले व चरितार्थ भिक्षेवर चालविला.

अशाप्रकारे बोवा हे खरोखरच संतपदवीला प्राप्त झाले होते. त्यांच्यावर ईश्वराची पूर्ण कृपा होती ही गोष्ट त्यांच्या हातून सहज घडलेला चमत्कारांवरूनही सिद्ध होते.

बोवांचा संसार व समाधि

बोवांचा विवाह झाला होता. त्यांच्या पत्नीचे नाव सरस्वतीबाई. तिच्यापासून त्यांना विठ्ठल व नारायण असे दोघे पुत्र झाले. बोवांनी अखेरपर्यंत पांडुरंगाची सेवा केली व श्रावण वद्य १२ शके १७१२ (इ. स. १७९०) मध्ये वयाच्या ७५ व्या वर्षी ते पांडुरंग चरणी विलीन झाले. ताहराबाद येथे बोवांचे राहते घर अजून उभे आहे. तेथेच त्यांचे विठ्ठल मंदिरही आहे. तेथून जवळच त्यांच्या समाधीचे वृंदावनही आहे.

बोवांच्या वंशजांकडे केशव नायक शिष्याने काढलेले बोवांचे चित्र आहे. (प्रस्तुत चित्र पोथीवर मुद्दाम प्रकाशित केले आहे.) बोवांच्या पादुका, त्यांचा चौरंग आणि लाकडी फ्रेममधे बनविलेला चष्मा या वस्तूही त्यांच्या वंशजांकडे काळजीपूर्वक जतन करून ठेवलेल्या आढळतात.

फलश्रुति

प्रत्येक कवि आपल्या ग्रंथाच्या वाचनाची फलश्रुति ग्रंथाअखेर लिहित असतो. कवि परमार्थ मार्गात अधिकार संपन्न असेल तर वाचकाला त्या फलश्रुतीनुसार फलेही प्राप्त होताना दिसून येते. 'श्रीभक्तलीलामृत' या प्रस्तुतच्या ग्रंथातही महिपती बोवांनी ग्रंथ वाचनाची फलश्रुती पुढीलप्रमाणे दिलेली आढळते. ते लिहितात—

या ग्रंथामाजी इतुकाचि अर्थ। की भक्तासि पावला भगवंत। श्रोतयां वक्त्यांचे मनोरथ। रुक्मिणीकांत पुरवील॥ ग्रंथ संग्रह करितां घरी। तरी त्याची विघ्ने पळती दुरी। सुदर्शन घरटी करी। निश्चय अंतरी असों द्या॥ संत चरित्रें वाचिता आधी। तत्काळ होईल चित्तशुद्धी। कदापि न राहे द्वेषबुद्धी। तेणेंचि भवाब्धी पार होय॥ ५१—२१७—१९

बोवा हे परमार्थ मार्गात फार उच्च श्रेणीस पोचलेले होते. त्यामुळे त्यांच्या वाचेला सिद्धी होती. नि म्हणूनच हा ग्रंथ जो भक्ति व एकाग्रतेने वाचील त्याला या फलश्रुतीचा अनुभव आल्याशिवाय खाचित राहाणार नाही.

आणि धन्यवाद !


प्रस्तुतचा ग्रंथ गेली सुमारे पन्नास वर्षे बाजारात उपलब्ध नव्हता. भाविकजनांची ही अडचण लक्षात घेऊन तो आज अधिक नेटक्या व आकर्षक स्वरूपात, चित्रांनी सालंकृत करून वाचकांपुढे ठेवीत आहोत. तो जास्तीत जास्त शुद्ध स्वरूपात ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. तथापि एखाद्या ठिकाणी अशुद्ध छपाई आढळल्यास ती नजरचूक समजून वाचकांनी आम्हाला उदार मनाने क्षमा करावी. काही अवघड शब्दांचे अर्थ स्पष्ट होण्यासाठी आवश्यक तेथे तळटीपाही आम्ही टाकल्या आहेत.

१९७२ सालापासून जुने दुर्मिळ ग्रंथ पुनर्प्रकाशित करून भाविक वाचकांना सवलतीत उपलब्ध करून देण्याचे व्रत यशवंत प्रकाशनाचे श्री. अनंत सदाशिव वैद्य यांनी मोठ्या निष्ठेने चालविले आहे व आजवर असे सात दुर्मिळ ग्रंथ त्यांनी प्रकाशित केले आहेत. वरील सर्व ग्रंथांचे संपादन करण्याची संधि त्यांनी मला दिली याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

ग्रंथातील आकर्षक छायाचित्रे आमचे चित्रकार मित्र श्री. रवींद्र बंगाळे यांची आहेत. तर नेटक्या, सुरेख छपाईचे श्रेय इंदिरा प्रेसचे कुशल संचालक श्री. जोरी बंधु व त्यांचा कामगार वर्ग यांच्याकडे जाते. ग्रंथाची जुनी प्रत पुण्याच्या 'मातृस्मृति' ग्रंथालयाने उपलब्ध करून दिली. तर सुरुवातीला छापलेले बोवांचे व त्यांच्या समाधीचे चित्र त्यांचेच वंशज श्री. कांबळे यांनी आम्हाला उपलब्ध करून दिले. या सर्व मित्रांच्या अमोल सहकार्यामुळेच हा ग्रंथ इतक्या आकर्षक स्वरूपात आज वाचकांपुढे येत आहे, नि म्हणूनच या सर्व सान्मित्रांना मनःपूर्वक धन्यवाद ! !

१८०६ सदाशिव पेठ,
देशमुख वाडी, पुणे ३०.
आषाढ शुद्ध ११ शके १९१०

—विश्वनाथ केशव फडके


अध्याय १

(मंगलाचरण)

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः ॥ श्रीगुरुभ्योनमः ॥ श्रीकुलदेवतायैनमः ॥ श्रीमातापितृभ्यांनमः ॥ जय जय पांडुरंग रुक्मिणीवरा । अचळ अढळ निर्विकारा । लीलाविग्रही करुणाकरा । सर्वेश्वरा आदिपुरुषा ॥१॥ जयजयाजी करुणामूर्ती । अनंत अपार तुझी कीर्ती । अनंतलीला नाना रीतीं । वर्णितां श्रुती कुंठित ॥ २ ॥ तुवां निज भक्तांच्या कैवारें । घेतले दहा अवतार । दुष्टदैत्य मारुनि दुर्धर । रक्षिलें साचार निज दासां ॥ ३ ॥ आतां कलियुगामाजी साचार । वसविलें पुंडलीकाचें द्वार । जघनीं ठेवूनि दोन्ही कर । उभा इटेवर असरी ॥ ४ ॥ नासाग्रीं ठेवूनियां दृष्टी । भक्तांसि पाहसी कृपादृष्टीं । भाविक जनांसि देऊनि भेटी । भवसंकटीं रक्षिसी ॥ ५ ॥ तूंचि झालासि लंबोदर । चौदा विद्यांचा गुणसागर । तूंचि चतुर्भुज परशुधर । सर्वांगीं सिंदूर चर्चिला ॥ ६ ॥ स्वानंद रसाचे मोदक । निज भक्तांसि देशी भातुकें । त्या महाप्रसादाचेनि हरिखें । सप्रेम सुखें डुलती ॥ ७ ॥ तुझें नृत्य पाहूनि गणपती । आनंदें डोले कैलसपती । चौसष्ट कळा उभ्या राहती । घेऊनि हातीं टाळ-विणे ॥८ ॥ तूं कीर्तनीं उभा जये वेळ । विबुध एकाग्र बैसती सकळ । मान तुकावी आखंडळ । घागऱ्या मंजुळ ऐकुनी ॥ ९ ॥ ऐसा तूं गौरीकुमार । सकळ विद्यांचा गुणसागर । आतां मज देऊनि अभयवर । संतचरित्रें वदवावीं ॥ १० ॥ आतां नमूं हंसवाहिनी । जे कां सरस्वती ब्रह्मनंदिनी । सकळ चातुर्य जियेपासुनी । होय स्वामिनी नांवरूपां ॥ ११ ॥ शुभ्रवस्त्र नेसली सोज्ज्वळ । आरक्त कुंकुमें शोभे निढळ । मस्तकीं केश असती कुरळ । कंचुकीवर पुष्पमाळ शोभती ॥ १२ ॥ हातीं घेउनि ब्रह्मविणा । सदा वर्णीत भगवद्गुणां । जिच्या कृपेनें कवि नाना । काव्य रचना बोलती ॥ १३ ॥ आतां सद्गुरु तुकाराम समर्थ । तयासि माझा प्रणिपात । ज्याणें अवतार घेऊनि मृत्युलोकांत । दाविला भक्तिपंथ साधकां ॥१४॥ योगयाग आणि व्रत । कलियुगीं नव्हेचि यथास्थित । नाम संकीर्तनीं तरतील बहुत । वचन व्यासोक्तें भागवती ॥ १५ ॥ त्याचा अर्थ सखोल परम । जड मूढांसि नकळेचि वर्म । यास्तव अवतार तुकाराम । साधकांसि नेम लावावया ॥ १६ ॥ ज्याणें नामसंकीर्तन करूनियां । निरसिली सकळ प्रपंचमाया । सद्भावें आळवूनि पंढरीराया । केली काया ब्रह्मरूप ॥१७॥ मग प्रसन्न होऊनि रुक्मिणीकांत । चुकविला काळाचा आघात । वैकुंठभुवनीं देहासहित । नेलें तुकयातें कलियुगीं ॥१८॥ ज्यांचे अभंग निषेधूनि समस्त । द्विजांनी बुडविले उदकांत । परी तेरा दिवस पंढरीनाथें । कोरडे ग्रंथ रक्षिले ॥१९॥ जो भक्ति-ज्ञान-वैराग्य पुतळा । ज्यांचे अंगीं अनंत कळा । तो सद्गुरु आम्हांसि जोडला । स्वप्नीं दीधला उपदेश ॥२०॥ मी तरी सर्वांविषयीं हीन । ऐसें साक्ष देतसे मन । परी कृपा केली कवण्यागुणें । त्याचें कारण तो जाणे ॥ २१ ॥ आंधारानें कोंदलें अंबर । त्यासि प्रकाशमान करी दिनकर । कां परीस लोहासि लागतां सत्वर । कालिमा अणुमात्र न राहे ॥२२॥ कां अमंगळ पाणी एकवट । त्यावरी आला गंगेचा लोट । तें पवित्रपणें होय गोमटें । मग महामुनि श्रेष्ठ वंदिती ॥२३॥ तेवीं सद्गुरुकृपेचेनि वैभव । ज्ञान अज्ञान गेलें सर्व । मग जाणपणाचा

१. कपाल २. व्यासमुनींचे ३. पाण्यात ४. भरले ५. आकाश ६. सूर्य.

अहंभाव । त्याचाही ठाव पूसिला ॥२४॥ जैसें समुद्रासि मिळतां गंगेचें आप । तत्काळ निरसे नांवरूप । कां अग्नि इंधन जाळीतसे कोपें। मग आपुल्या स्वरूपें विझे जैसा ॥२५॥ तैसेंचि केलें सद्गुरुनाथें । अज्ञान ज्ञान निरसिलें समस्त । सर्वदा राहोनि हृदयस्थ । स्वयें वदवीत भक्तकथा ॥ २६ ॥ आतां महा कवि पुरातन । ग्रंथारंभीं तयासि नमन । ज्यांची काव्यरचना गीर्वाण । संस्कृत पुराणें निर्मिलीं ॥ २७ ॥ भवाब्धि हा दुस्तर सहज । त्यांत श्रीरामकथा निर्मिलें जाहाज । तो वाल्मीकि मुनिमहाराजे । साधिलें काज बहुतांचें ॥२८॥ नमतां श्रीराम अवतार पूर्ण । आधींच भविष्य कथिलें तेणें । शतकोटि ग्रंथ केला जेणें । त्याचे चरण वंदिले ॥२९॥ वेदशास्त्राचें करोनि मंथन । महाभारत निर्मिलें जाण । तो सत्यवतीहृदयरत्न । द्वैपायनं नमस्कारूं ॥३०॥ उपजलों जयाचे गोत्रीं जाण । तया वसिष्ठासि साष्टांग नमन । तिहीं आपुले कृपें करून । ग्रंथ संपूर्ण सिद्धि न्यावा ॥ ३१ ॥ आतां प्राकृत कवि महासंत । जे ईश्वरी अवतार साक्षात । जग विख्यात ज्यांचे ग्रंथ । तयांसि प्रणिपातें करितसें ॥ ३२ ॥ साक्षात विष्णूचा अवतार । ज्ञानदेव योगेश्वर। गीतेचा अर्थ सखोल थोर । प्राकृत साचार तो केला ॥ ३३ ॥ प्रतिष्ठानीं ब्राह्मणीं छळितां निश्चिती । वेद बोलविले रेड्या हातीं । आणि चांगदेव व्याघ्रावरी बैसोनि येती । मग चालविली भिंती प्रतापें ॥३४॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपानेश्वर । जीवनमुक्त मुक्ताबाई सुंदर । ग्रंथारंभीं नमस्कार । वारंवार तयांसी ॥३५॥ जो उद्धवाचा अवतार साक्षात । नामदेव कलियुगांत । शतकोटि अभंग वदला प्राकृत । तयांसि दंडवत सद्भावें ॥ ३६ ॥ एकनाथ पूर्णज्ञानी । अवतार जाहला प्रतिष्ठानीं । ज्याणें विष्णुअर्चन ब्राह्मणपूजनीं । सेवा करूनि ऋणी देव केला ॥ ३७ ॥ ज्याची भक्ति देखोनि चोखडी । श्रीकृष्णें खांदा घेतली कावडी । पाणी वाहत लवडसवडी । सप्रेम गोडी भक्तीची ॥ ३८ ॥ विवेकसिंधु अध्यात्मग्रंथ । श्रीमुकुंदराज विरचित । दत्तअनुग्रही दासोपंत । सद्भावें प्रणिपात तयासी ॥ ३९ ॥ जो मारुति अवतार साक्षात । रामदास मूर्तिमंत । ज्यांनीं दासबोध रचोनि ग्रंथ । संप्रदाय बहुत वाढविला ॥ ४० ॥ जो सकळ चातुर्याची खाणी । मुक्तेश्वर कवि प्रसिद्ध जनीं । भारतीं टीका केली त्यांणीं । ऐकतां श्रवणीं सुख वाटे ॥ ४१ ॥ वामनस्वामी चतुर पंडित । ज्याची श्लोकरचना अनुपम दिसत । त्यांणीं दशमस्कंध भागवत । केले प्राकृत निजप्रीतीं ॥ ४२ ॥ हरिविजय रामविजय अद्भुत । पांडवप्रताप केले ग्रंथ । ते नाझरेकर श्रीधरसमर्थ । राहिले पंढरींत निजप्रीतीं ॥ ४३ ॥ ऐसे संत प्रसिद्ध जनीं । वरदी ग्रंथ स्थापिले ज्यांणीं । वारंवार लोटांगणी । तयांचे चरणीं मी असें ॥ ४४ ॥ इहीं साह्य होऊनि मातें । सिद्धीसि न्यावा संपूर्ण ग्रंथ । जैसे दुर्बळा गृहीं मांडिलें कृत्य । साहित्य श्रीमंत पुरविती ॥ ४५ ॥ तैसाचि मी मतिहीन । नेणें कवित्वकळालक्षण । ग्रंथ प्रारंभ केला जाण । भरंवसा धरून संतांचा ॥ ४६ ॥ एक एक अक्षराची भीक । कृपा करूनि द्याल सकळिक । तरीच वाढेल माझा लौकिक । सप्रेम सुख श्रोतयां ॥ ४७ ॥ जैसी पाकसिद्धीची खटपटी । अज्ञान बाळक न पाहे दृष्टीं ।

१. पाणी २. संसारसागर ३. कठीण ४. व्यासमुनी ५. नमस्कार.

परी माता लोभ धरोनि पोटीं । कवळ होंटीं लावी त्याच्या ॥ ४८ ॥ तैशाचि परी केलें संतीं । आयतीच ओवी आठवूनि देती । मज मूढाहातीं लिहविती । माझी प्रचीती मी जाणें ॥ ४९ ॥ आतां नमूं श्रोते सज्जन । जे कां श्रवणार्थीं बहुत निपुण । तिहीं एकाग्र करूनि मन । अनुसंधान परिसिजे ॥ ५० ॥ जरी श्रोतयाचें चित्त चंचळ । श्रवणार्थीं न बैसे निश्चळ । तरी कवीचें लाघव सकळ । सप्रेम वितळते ठायीं ॥ ५१ ॥ षंढापासी सुंदर कामिन । कां ज्वरितासि वाढविलें मिष्टान्न । बधिरापुढें करितां गायन । सुखसंपन्न नव्हे वक्ता ॥ ५२ ॥ आंधळयास आरसा दाखविला कोडें । तरी तो न पाहेचि तयाकडे । ज्यासि श्रवणाची नाहीं चाड । पाषाणहृदय तैसा तो ॥ ५३ ॥ तैसे न व्हां तुम्ही सज्जन । जाणा वक्त्याचें अंतःकरण । अर्थान्वयीं असोनि निपुण । नेणतपण धरीतसां ॥ ५४ ॥ माझी योग्यता पाहाल जरी । तरी मूढमति सर्वप्रकारीं । अक्षरवटिका बरोबरी । नेणें साचार मेळवूं ॥ ५५ ॥ सद्भावें महाकवीचे चरण । धुवोनि केलें तीर्थप्राशन । तयाचिया कृपागुणें । प्रसादवचन बोलतों ॥ ५६ ॥ जैसी भवति भिक्षा करोनि नगरीं । विद्यार्थी मागत माधूकरी । त्याची क्षुधा हरण होय परी । चूल घरीं न पेटे ॥ ५७ ॥ तैसें माझें वक्तृत्व बरें । पदरींचें नाहीं एक अक्षर । हिंडूनि संतांच्या दारोदार । पोटभर जेवीतसें ॥ ५८ ॥ परी भिक्षेचें अन्न परमपवित्र । शास्त्रीं निर्णय केला थोर । साधक जनीं सेविलें जर । तरी बुद्धि विस्तारे तयाची ॥ ५९ ॥ ज्यांसि श्रीहरीची प्राप्ति व्हावी । ऐसी आस्था असेल कांहीं । तिहीं होऊनि जीवीं । चरित्रें ऐकावीं संतांचीं ॥ ६० ॥ ज्यासि श्रीहरीची गीत । एकादशांत वदले श्रीकृष्णनाथ । तया लक्षणाचें पुरत । अवतरले संत कलियुगीं ॥ ६१ ॥ कीं गीतेमाजी द्वादशांत निश्चितीं । श्रीभक्तांचीं लक्षणें सांगे श्रीपती । तैसीच करोनि दावावया स्थिती । अवतार संतीं धेतला ॥ ६२ ॥ जनांमध्येंचि असती संत । विश्वमीत्रासही दिसत । परी विकल्पें करूनि नाडि बहुत । अवगुण लक्षिती दृष्टीसीं ॥ ६३ ॥ संतांपासीं अवगुण । दिसावया काय कारण । येविषयीं आशंकित मन । तरीं तेंही कारण अवधारा ॥ ६४ ॥ मातेसि आवडी बाळकांची मोठी । वस्त्रें भूषणें लेववी गोमटीं । परी झणी कोणाची होईल दृष्टी । मग मैसें बोटीं लावीत मुखा ॥ ६५ ॥ तेवीं भक्ति ज्ञान वैराग्य निश्चित । भक्तां शृंगारी वैकुंठनाथ । परी लोकनिंदा व्हावया निश्चित । अवगुण ठेवीत एक तयां ॥ ६६ ॥ बाळकाच्या मुखास दिसतें काळें । परी माता म्हणे म्यांच लाविलें । तेवीं आपुल्या दासाचे दीनदयाळें । गुणदोष सर्वकाळ न पाहे ॥ ६७ ॥ येचिविषयीं तुम्हीं समस्त । पुराणप्रसिद्ध ऐका भक्त । नारदमुनि वैष्णवसंत । परी कळिलावा म्हणत तयालागीं ॥ ६८ ॥ श्रीरामभक्त परम मारुती । त्यासि क्षणभरी न विसंबे रघुपती । परी वानरचेष्टा त्या असती । त्या न जातीच सर्वथा ॥ ६९ ॥ गरुड विष्णूचें वाहन । सर्वदा सन्निध असे जाण । परी सर्प भक्षितो म्हणवून । त्यासि जगज्जीवन नुपेक्षी ॥ ७० ॥ निंदक सद्गुण नाठवूनि कांहीं । स्वाभाविक अवगुण धरिती जीवीं । जैसी चाळणी पीठ

१. भूक २ काजळ.

गाळूनि सर्वही । फुलकट ठेवी आपणांत ॥ ७१ ॥ असो आतां हें भाषण । वाग्देवीस होईल शीण । जनांत अवतरले संतसज्जन । ते इतरांसमान न म्हणावे ॥ ७२ ॥ सरिता नव्हे भागीरथी । श्रीविष्णुचरणीं तिची वस्ती । दर्शनें पापताप नासती । तैशाचि मूर्ती संतांच्या ॥ ७६ ॥ पाषाणं म्हणों नये परिसा । विष्णु अवतार नव्हे मासा । वराह इतर डुकरा ऐसा । लेखों सहसा नयेची ॥ ७४ ॥ स्तंभांत प्रगटला हरी । तयासि म्हणों नये केसरी । जरी तो ब्राह्मणाचा वेषधारी । परी वामन भिकारी न म्हणावा ॥ ७५ ॥ इतर ब्राह्मण रागीट बहुत । तैसा नव्हे रेणुकासुत । भूपति म्हणों नये रघुनाथ । नामेंचि तारित विश्वातें ॥ ७६ ॥ श्रीकृष्ण परब्रह्म अवतार-लीला । तयासि म्हणों नये गोवळा । तैसे संत दिसती डोळां । परी मनुष्य त्यांजला म्हणों नये ॥ ७७ ॥ धनवरी गावे श्रीहरीचे गुण । आणि जगदुद्धार करावा पूर्ण । यास्तव अवतरले संतसज्जन । आणिक कारण नसे कीं ॥७८॥ त्यांचीं चरित्रें व्हावया प्रख्यात । युक्ति केली पंढरीनाथें । मज पुढें करूनि निमित्त । श्रीभक्तविजय ग्रंथ वदविला ॥ ७९ ॥ दुसरा संतलीलामृतसार । त्यांतही चरित्रें वर्णिलीं फार । परी आणिक कथा राहिल्या अपार । मग रुक्मिणीवरें आज्ञापिलें ॥ ८० ॥ म्हणोनि भक्तलीलामृत जाण । ग्रंथ आरंभिला दुसऱ्यानें । तंव श्रोते आशंकित होऊनि मनें । करिती प्रश्न वक्तया ॥ ८१ ॥ संतचरित्रें तीं ठायीं । वर्णावयासि कारण कायी । हाचि संशय आमुच्या जीवीं । एकचि ग्रंथ का न केला ॥ ८२ ॥ तरी येचिविषयीं ऐका सादर । देवभक्तांचीं चरित्रें फार । जैसा का अफाट समीर । नायके उत्तर कोणाचें ॥ ८३ ॥ ऐसा जो का प्रभंजन । कैसा होय आपुल्या स्वाधीन । मग विंझणा करोनि निर्माण । हालवि त्या आधीन होय वारा ॥ ८४ ॥ तैसीं श्रीहरीचीं चरित्रें बहुत । बहुतां ऋषींचें बहुमत । मग श्रीव्यासें करूनि युक्त । पुराणें निर्मित अठरा ॥८५॥ तरी धन नपुरेचि जाण । नाकळती अनंताचे गुण । मग आणिकही उपपुराणें । द्वैपायन करीतसे ॥ ८६ ॥ एकचि वेद असता थोर । तरी ब्राह्मण पढते कोठवर । म्हणोनि शाखापरत्वें सार । केले भाग चार तयाचे ॥ ८७ ॥ कां एकचि असतें रामायण । तरी संपूर्ण ग्रंथ न होता श्रवण । म्हणोनि सप्त कांडें पूर्ण । वाल्मीकि मुनिनें विभागिलीं ॥ ८८ ॥ कां अवघ्या भारतीं तत्वता । वर्णिल्या कौरव पांडवांच्या कथा । इतुका ग्रंथ एकचि असता । तरी तो नाकळता कोणाहि ॥ ८९ ॥ मग व्यास नारायणें निजांगें । त्याचे केले अठरा भाग । एकचि पर्व ऐकतां चांग । तरी सकळ जग उद्धरे ॥ ९० ॥ कलियुगीं भक्त शिरोमणी । बहुत झाले सत्वगुणी । ज्यांनीं सत्वासि न करोनि हानी । चक्रपाणी वश्य केला ॥ ९१ ॥ त्यांचीं चरित्रें संपूर्ण । एकदाचि बुद्धी नाकळती जाण । जेव्हां जी झाली आठवण । तीं चरित्रें लिहून ठेविलीं ॥ ९२ ॥ यास्तव संतचरित्रें पाहीं । विभागिलीं तिहीं ठायीं । ऐसा दृष्टांत देतांचि कवि । श्रोते सर्वही संतोषले ॥ ९३ ॥ म्हणती मागील महाकवींचें मत । आम्हांसि निवेदिलें समस्त । तेणेंचि निःसंशय जाहलें चित्त । प्रेमभरित

१. दगड. २. सिंह. ३ परशुराम ४. गवळी.

जाहलों ॥ ९४ ॥ आतां सोडूनि सकळ स्तवन ॥ अनुसंधानीं लाविजे मन । ऐसी आज्ञा करितां सज्जन । महीपति चरण वंदितसे ॥ ९५ ॥ म्हणे ऐकावें देवोनि चित्त । कलियुगीं धर्म लोपले समस्त । तरणोपाय नसे किंचित । मग आज्ञा करीत जगदात्मा ॥ ९६ ॥ निजभक्तांसि वैकुंठपती । म्हणे तुम्हीं अवतार घ्यावें क्षितीं । गावोनि माझी सद्गुणकीर्ति । सगुणभक्ति स्थापिजे ॥९७॥ नामस्मरणाविण कांहीं । कलियुगीं तरणोपाय नाहीं । ऐसें सांगतांचि शेषशायी । निजभक्त पायीं लागले ॥ ९८ ॥ म्हणती तुवां जगज्जीवनें । मागें दशअवतार घेऊनि । दुष्ट दैत्यांसि मारोनी । धर्मस्थापन पैं केलें ॥ ९९ ॥ आतां आम्हां आधीन हेंचि कृत्य । षड्वैरी जिंकोनि समस्त । जनासि दाखवूनि भक्तिपंथ । सेवूं नामामृत धरणीवरी ॥ १०० ॥ ऐसें बोलोनियां उत्तर । मग नमस्कारिला इंदिरावर । संतीं घेतले अवतार । विश्वोद्धार करावया ॥ १ ॥ त्यांचीं चरित्रें श्रीव्यासमुनी । बोलिले भविष्योत्तरपुराणीं । परी तो ग्रंथ पिनाकपाणी[1] । कैलास भुवनीं ठेवितसे ॥ २ ॥ जैसें श्रीरामचरित्र वाल्मीकीनें । आधींच भविष्य कथिलें जाण । शतकोटि ग्रंथ ठेविला लिहून । पुढें आलें घडोन तैशाच रीतीं ॥ ३ ॥ तैसें भविष्योत्तर पुराणांत । कलियुगींचे वर्णिले भक्त । परी तो कैलासीं राहिला ग्रंथ । नाहीं समस्त या लोकीं ॥ ४ ॥ तरी संतचरित्रें अति गहन । प्रख्यात जाहलीं कोठून । ऐसी आशंका धराल मनें । तेही कारण अवधारा ॥ ५ ॥ तो हिंदुस्थान देशांत पूर्ण । नाभाजी नामें वैष्णव जन । संतचरित्रें वर्णिलीं त्याणें । ग्वाल्हेर भाषेनें निश्चित ॥ ६ ॥ तयाच्या आधारें निश्चित । वदतसें भक्तलीलामृत । तंव श्रोते होऊनि आशंकित । प्रश्न करीत वक्तया ॥ ७ ॥ म्हणती नाभाजी यातील कोण । काय आचरला अनुष्ठान । संतलीला वर्णिली तेणें । कोणाच्या कृपेनें सांग पां ॥ ८ ॥ तरी त्याची गुरुपरंपरा ऐसी ॥ रामानंदस्वामी संन्यासी ॥ त्याचें वास्तव्य वाराणसीं ॥ महासमर्थ तापसी जे ॥ ९ ॥ भक्तिज्ञानवैराग्य निश्चित । हें त्याचे देहीं मूर्तिमंत । आनंदानंदस्वामी निश्चित । शरण येत त्या लागीं ॥ ११० ॥ तया आनंदानंदाचा शिष्य जाण । पोहरीदास नामाभिधान । अग्रजी किलजी दोघेजण । शिष्य निपुण तयाचे ॥११॥ वडील अग्रजी ज्याची स्थित । सदासर्वदा असे विरक्त । श्रीविष्णु भजनीं सावचित्त । सप्रेम गात गुणनामां ॥ १२ ॥ जो शांतिक्षमेचें निजबीज । अध्यात्मज्ञानीं तेजःपुंज । ज्याणें भक्तिभावें करूनि सहज । गरुडध्वज आराधिला ॥ १३ ॥ ज्याच्या वक्तृत्वाची मती । उपमेसि जैसा बृहस्पति । लीनता तरी सर्वांभूतीं । अंगीं महंति असेना ॥ १४ ॥ आत्मत्वें सर्वत्र जाणें जीव । चित्तीं नसेचि द्वैतभाव । मान्यत्वें तरी थोरथोर राव । चरण सद्भावें वंदिती ॥ १५ ॥ शिष्य प्रबोधिनी पद्महस्ती । बहुतां जनांसि लाविलें भक्तीं । स्नानसंध्या शुचिर्भूत चित्तीं । सबाह्य स्थितीं सारखा ॥ १६ ॥ श्रवण कीर्तन आणि स्मरण । पादसेवन अर्चन वंदन । दास्य सख्य आत्मनिवेदन । हें नवविध भजन हरीचें ॥ १७ ॥ एक एक भक्ती केली बहुती । परी सर्वत्र कोणासि न घडतीं । ते मागील ग्रंथीं बोलिजेती । पुराणी गर्जती पवाडे ॥ १८ ॥ परी

1. शंकर.

स्मरणेंकरूनि कलियुगांत । जडजीव तरले असंख्यात । यास्तव अग्रजी भजन करीत । अहोरात्र निजप्रेमें ॥ १९ ॥ त्याचा प्रेमा देखोनि थोर । देवें दीधला साक्षात्कार । मग सगुणरूपें रुक्मिणीवर । निरंतर भेटती ॥ १२० ॥ अग्रदास जेव्हां गमन करिती । मागें येतसे कृष्णमूर्ती । भावाचा भुकेला वैकुंठपती । आणिक चित्तीं नावडेचि त्यां ॥ २१ ॥ जप तप व्रतें अनुष्ठान । येथें भावचि मुख्य कारण । भावावांचूनि केलें अर्चन । तें दांभिक जाण व्यर्थची ॥ २२ ॥ भक्ती वांचूनि योगसाधन । करितां सिद्धि न पावे जाण । तयासि इंद्रादिक गण । सिद्धीची विघ्नें पाठविती ॥२३॥ वेदशास्त्रें पुराणें सकळ । भक्तीवांचूनि अवघें निष्फळ । तो तीर्थें हिंडला जरी सकळ । तरी भक्तिविण फळ नयेचि ॥ २४ ॥ भक्तीवांचूनि केलें कीर्तन । तें जैसें गोरियाचें गायन । कवित्वकळा भक्तीवीण । तरी प्रख्यात होणें अघटित ॥२५॥ जरी निपुण झाला सिद्धांतग्रंथीं । अध्यात्मज्ञान उदंड कथी । चित्तीं नसे प्रेमळ भक्ती । तरी व्यर्थ व्युत्पत्ती ते गेली ॥२६॥ असोत हीं भाषणें सकळ । अग्रदास वैष्णव प्रेमळ । ज्याणें भक्तीभावें करूनि सकळ । वैकुंठपाळ वश केला ॥ २७ ॥ भक्तीज्ञानवैराग्य लक्षण । हें त्याचें अंगीं झालें भूषण । म्हणोनि साक्षात दर्शन । जगज्जीवन दे तया ॥ २८ ॥ तंव कोणे एके अवसरीं । तद्देशीं दुष्काळ पडिला भारी । अन्न न मिळेचि पोटभरी । माता अव्हेरी बाळकातें ॥२९॥ भाकर मागतें म्हणवून । गंगातीरासि आली त्वरेनें । खेळावयासि गुंतलें तान्हें । मग चुकावून ते गेली ॥ १३० ॥ हरिणी गेली टाकूनि पाडसा । मग तें विलोकित दाही दिशा । तैसीच तया पातली दशा । क्षुधेनें वळसा मांडिला ॥ ३१ ॥ मातेच्या नांवें नानापरी । रुदन[1] करीत ते अवसरीं । तों अग्रदास स्नानासि सत्वरी । गंगातीरीं पातले ॥ ३२ ॥ तों तेथें क्षुधित अन्नावीण । बालक रडतसे किलवाणें । वैष्णवदास कळवळिला मनें । तयासि वर्तमान पुसतसे ॥ ३३ ॥ तया समीपें जाऊनि निश्चित । म्हणे कशास्तव रडसी येथें । हें मज सांगावें त्वरित । ऐसें पुसत तयासी ॥ ३४ ॥ तो म्हणे मी अन्न मागतां । मज चुकावूनि गेली माता । ऐसी देखोनि त्याची अवस्था । कृपा चित्ता उपजली ॥ ३५ ॥ म्हणे सर्वथा भय न धरीं मनें । म्हणोनि दीधलें आश्वासन । यास्तव नाभाजी नामाभिधान । वैष्णवजन ठेविती ॥ ३६ ॥ मग स्नान करोनि गंगातीरीं । नित्य नेम सारिला सत्वरी । मुलासि घेऊनि बरोबरी । मठाभीतरीं प्रवेशले ॥ ३७ ॥ अग्रजी वैष्णव महंत थोर । अन्नशांति करितसे फार । कोणी प्राणी क्षुधातुर । येऊनि पोटभर जेवितसे ॥ ३८ ॥ वैष्णव वैरागी महापुरुष । नित्य जेविती पंक्तीस । त्याचें उच्छिष्टं उरतसे । तें अग्रजी मुलास देववीतसे ॥ ३९ ॥ म्हणती दुष्काळीं मरतां उपवासी । माता टाकूनि गेली यासी । तें आम्हीं आणिलें मठासीं । संरक्षण जीवासी व्हावया ॥ १४० ॥ रांडकीचा[2] मूल म्हणवितो जाण । नेणो यातींचा आहे कोण । मठांत आणिता त्याजकारण । संकोच मन होतसे ॥ ४१ ॥ यास्तव कोपट अंगणांत । बांधूनि दीधलें असे त्यातें । संतांचे उछिष्ट प्रसाद उरत । तो

१. रडणे २. उटे

नेऊनि देत त्यालागीं ॥ ४२ ॥ श्रीविष्णुमूर्तीचें अर्चन । षोडशोपचारें होतसे जाण । नाभाजी बाहेर उभा राहून । रूपगुण पाहतसे
॥ ४३ ॥ घरासि येतां वैष्णवजन । तयांसि करी साष्टांग नमन । उच्छिष्ट प्रसाद सेवितसे जाण । याविण साधन श्रेष्ठ नसे ॥ ४४ ॥
सत्समागमाचेनि गुणें । नित्य होतसें भागवतश्रवण । तेणे महादुरितांचें जाहलें दहन । अद्भुत ज्ञान प्रगटलें ॥४५॥ जीवमात्राचें मनोगत ।
तें न सांगतां सर्व कळत । जाणे भूतभविष्य वृत्तांत । परी सर्वथा मात न बोले ॥ ४६ ॥ समुद्रापलीकडे होतें काय । तेंही नाभाजीसि
श्रुत होय । स्वर्गीचा शब्द ऐकत आहे । परी कोणासि नये प्रत्ययां ॥ ४७ ॥ तंव कोणे एके दिवसीं जाण । अग्रजी करूनि गंगास्नान ।
करीत बैसले देवतार्चन । एकाग्रमन होऊनी ॥ ४८ ॥ विष्णु अर्चन झालिया निश्चित । मग बोंबाळिला लक्ष्मीकांत । साष्टांग घालोनि
दंडवत । केला प्रणिपात सद्भावें ॥४९॥ मग धावळीचा घुंगुट घेऊनि बोजा । अग्रजी करीत मानस पूजा । ध्यानासि आणितां गरुडध्वजा ।
एकाग्र बोजा बैसले ॥ १५० ॥ कवाड आडकोनि ते अवसरीं । नाभाजीस बैसविलें द्वारीं । म्हणे कोणासि येऊं न द्यावें भीतरीं । आज्ञा
करी त्याजला ॥ ५१ ॥ ऐसें सांगतां सद्गुरुनाथ । नाभाजी द्वारीं बैसे त्वरित । अग्रजी एकाग्र करोनि चित्त । श्रीकृष्णनाथ आठवित
॥ ५२ ॥ परी ध्यानासि नये जगज्जीवन । म्हणे कोठें गुंतला रुक्मिणीरमण । कैसें करावें मानसपूजन । विचार मनीं करीतसे ॥ ५३ ॥
नाभाजी होता बाहेर द्वारीं । तो अग्रजीस म्हणे ते अवसरीं । एक जाहाज बुडताहे समुद्रीं । सौदागर अंतरीं चिंतावला ॥ ५४ ॥
त्याणें नवसिला द्वारकापती । जरी मज पावसी सत्वर गती । तरी पांचवा वांटा अग्रजीप्रती । देईन निश्चिती जाणयां ॥ ५५ ॥ त्याचे
जाहाज काढावया निश्चित । समुद्रीं गुंतले वैकुंठनाथ । त्यास्तव नयेचि ध्यानांत । क्षण एक निवांत बैसावें ॥५६॥ जाहाज काढिलें
तत्काळ । आतां येतील दीनदयाळ । तुम्हीं मागुतीं होऊनि निश्चळ । रूप सांवळे विलोका ॥ ५७ ॥ ऐकोनि नाभाजीचें उत्तर ।
अग्रजीस आश्चर्य वाटलें थोर । ध्यानीं पाहतां सारंगधर । तों उदकें पीतांवर भिजलासे ॥ ५८ ॥ सर्वोपचारें पूजोनि तेव्हां । अग्रजी
म्हणे रे माधवा । कोठें गुंतला होतासि देवा । वृत्तांत सांगावा मजपासीं ॥ ५९ ॥ ऐसें पुसतां भक्त प्रेमळ । हांसोनि बोले दीनदयाळ ।
जाहाजा बुडवितां समुद्र जळ । आम्हीं तत्काळ काढिले ॥ १६० ॥ सावकारें नवस केला सहज । कीं पांचवा विभाग
देईन तुज । मग मी जाऊनि गरुडध्वज । साधिलें काज तयाचें ॥ ६१ ॥ तुझे पदरीं खर्च बहुत । अखंड जेविता
साधुसंत । सावकार हुंडी पाठवील येथ । ऐसें बोलत जगदात्मा ॥ ६२ ॥ मानसपूजा होतां निश्चित । मग नाभाजीस
बोलाविलें आंत । म्हणे तुज देवाजींचें मनोगत । कैसा वृत्तांत श्रुत झाला ॥ ६३ ॥ त्याणें चित्तीं धरूनि प्रेमा । म्हणे हा
संतांचा प्रसाद महिमा । तुम्हीं सद्गुरु जोडलेती आम्हां । सोडवा भवभ्रमा पासूनी ॥ ६४ ॥ सच्छिष्य सांगतां ऐशारीतीं । अग्रजी

१. अनुभवास.

तयासि आज्ञा करिती । भव तरावया उपाव निश्चिती । वर्णावी कीर्ती श्रीहरीची ॥६५॥ भगवद्‌गुण तों वर्णिलें बहुतीं । महाऋषीं आणि सभाग्य संतीं । तरी आतां वर्णावी संतांची कीर्ती । तरणोपाय निश्चिती अन्य नसे ॥ ६६ ॥ दोहरा ॥ गुरु अगर देव आगे कोनही । भवतरनेकूं नहि उपाव । नाभा हरि भक्तनके जस गावे मनभाव ॥ १ ॥ तेचि आज्ञा वंदोनि निश्चित । नाभाजी ग्रंथासि प्रारंभ करिती । चहूं युगांत झाले भक्त । ते वर्णिले निश्चित तयानें ॥ ६७ ॥ ग्वालेर देश भाषा जाण । छपया केल्या असती त्यानें । तयाच्या आधारें करून । प्राकृत भाषण वदतसें ॥ ६८ ॥ आणिक स्वदेशामाजी निश्चित । प्रख्यात जाहले महासंत । त्यांच्या वंशी सज्ञान महंत । त्यांचे वचनार्थ पाहिले ॥ ६९ ॥ आपुल्याची मतें वदलों जर । तरी सर्वज्ञ न मानिती उत्तर । यासी साक्ष रुक्मिणीवर । जाणें अंतर सकळांचें ॥ १७० ॥ ज्यांणीं संतांसि वर्णिलें तत्त्वतां । प्रथम लागली त्याची कथा । ऐसी आशंका धराल चित्ता । तरी पुरातन वार्ता ऐकावी ॥ ७१ ॥ आधीं वाल्मीकीची उत्पत्ति जाण । त्यावरी जाहले रामायण । द्वैपायना वांचूनि पूर्ण । भारत निर्माण कोण करी ॥ ७२ ॥ म्हणोनि संतांच्या दासाचें । आधींच वर्णिलें साचें । ऐसें मत ऐकूनि कवीचें । प्रेम श्रोतयाचें दुणावलें ॥ ७३ ॥ म्हणती तुझीं दृष्टांत उत्तरें । ऐकोनि तोषलों साचार । आतां पाल्हाळ टाकोनि सत्वर । संत चरित्रें वदावीं ॥ ७४ ॥ देखोनि श्रोतयांचें आर्ती । चरण नमस्कारी महीपती । म्हणे ग्रंथ वदविता रुक्मिणीपती । मी तों मंदमती अज्ञान ॥ ७५ ॥ तो दीनदयाळ कैवल्यदानी । जैसी वदवील प्राकृत वाणी । ते सादर होऊनि संतसज्जनीं । ऐकिजे कर्णी निजप्रेमें ॥ ७६ ॥ अन्नापरिस क्षुधाचि गोड । म्हणवोनि आर्तीचें पुरे कोड । आणि आकर्णनीं नसली जरी चाड । तरी न लगती गोड भक्तकथा ॥ ७७ ॥ एक प्रेमाचें आर्त्त असतां मनीं ॥ आणि उदंड कथा ऐकिल्या श्रवणीं । परी एकही स्मरण न धरे मनीं । ते संसार कर्दमीं गुंतलें ॥ ७८ ॥ तैसे नव्हां तुम्ही सज्जन । ग्रंथशोधक अति निपुण । न्यून तें पूर्ण करोनि घेणें । सात्विक लक्षण हें अंगीं ॥ ७९ ॥ पुढिले अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीरुक्मिणीकांत । महीपति त्याचा मुद्रांकित । बोल बोलत शिकविले ॥१८०॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । प्रथम अध्याय रसाळ हा ॥ अध्याय ॥ १ ॥ ओव्या ॥ १८१ ॥ दोहरा ॥ १ ॥ एवंसंख्या ॥ १८२ ॥

अध्याय २



(भक्त-चांगदेव)

श्रीगणेशाय नमः । जय देवाधिदेवा रुक्मिणीरमणा । अनाथबंधु करुणाघना । मी मूढमती नारायणा । सकळ अज्ञानां माजि श्रेष्ठ ॥ १ ॥ भावहीन भक्तिहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । अर्चन पूजन न घडेचि जाण । पतित संपूर्ण सर्वांगीं ॥२॥ शास्त्रश्रवण न कळेचि कांहीं । गीर्वाण भाषेंत गम्य नाहीं । अंतरसाक्ष तूं विठाबाई । जीवींचें सर्वही जाणसी ॥ ३ ॥ ऐसें असतां चक्रपाणी । वायांचि धिंवसा उपजला मनीं । मांडिली ग्रंथाची उभारणी । आश्रय मानूनी एक तुझा ॥ ४ ॥ एकवीस स्वर्ग मेरुवर । कीं नक्षत्रांसी आधार वायुचक्र । तेवी माझे बुद्धींसी निरंतर । आश्रय साचार तूं देवा ॥ ५ ॥ कीं चक्षुश्रव्यावरीं साचार । उर्वीचा संपूर्ण असे भार । कीं जहाजें फिरती सागरावर । दुसरा थार नसेचि त्यां ॥ ६ ॥ वेद वचनाच्या आधारें । सत्कर्म आचरती ऋषीश्वर । तेवी मी वदतों संतचरित्र । तुझ्या आधारें पांडुरंगा ॥ ७ ॥ जैसें तृणाचें बुझावणें । हालत असे वायुगुणें । त्याचें अंगीं कर्तेपण । स्वतंत्र कोठोन असेल ॥ ८ ॥ तेवीं तूं अंतरसाक्ष चैतन्यघन । बुद्धिप्रेरक जगज्जीवन । हृदयीं निरंतर बैसोन । देई आठवण मज देवा ॥ ९ ॥ जैसें वाजविणारा फुंकितां वारें । तैसेंच वाजे वाजंतरें । तेवीं मी बोलिलो उणेंपुरें । तें निमित्त सारें तुजवरी ॥१०॥ मी तो मंदमती निश्चितीं । ऐसी साक्ष येतसे चित्तीं । परी तुझा वरदायक महीपती । लोक बोलती प्रख्यात ॥११॥ हा अभिमान धरोनि चित्तांत । हृदयी बैसावें सदोदित । श्रीभक्तलीलामृत आरंभिला ग्रंथ । तरी शेवटाशी त्वरीत पाववी ॥ १२ ॥ आतां ऐका संतसज्जन ॥ स्वर्गी असतां पाकशासन[2] । सन्निध होता मरुद्गण । तयासी कारण सांगितले ॥ १३ ॥ स्वामीनें कार्य आज्ञापितां । परी तो गण असावध होता । इंद्रें मग कोप धरोनि चित्ता । होय शापिता तयाशी ॥१४॥ म्हणेरे तूं उन्मत्त थोर । स्वामीसेवेसि नससी तत्पर । तरी पतन पावून सत्वर । होशील नर मृत्युलोकीं ॥ १५ ॥ ऐसें शापितां आखंडळ । अनुतापें द्रवला तत्काळ ॥ मरुद्गण जोडोनि करकमळ । स्तुति रसाळ मांडिली ॥१६ ॥ म्हणे जय जय शचीवरा । तूं मुगुटमणी सकळ सुरां ॥ तुझे आज्ञेने सत्वरा । मेघ वसुंधरा निववीतसे ॥ १७ ॥ तुमच्या संकटास्तव जाण ॥ महाविष्णु जाहला वामन । बळी पाताळी घालून । निजपद निर्विघ्न राखिले ॥१८॥ आतां कृपादृष्टीं विलोकून मातें । उःशाप द्यावाजी त्वरित । जेणें जीव पावे उद्धारगत । तो उपाय त्वरित सांग देवा ॥ १९ ॥ ऐसी स्तुति ऐकोनि कानीं । संतुष्ट जाहले वज्रपाणी । जैसी बाळकावरी आधी कोपे जननी ॥ मग बुझाओनी संबोधित ॥ २० ॥ की कुळगुरूपासी असतां पोर । चुकतां शिक्षा करी सत्वर । मागुती आपुल्या कृपावरें । शिकवीत अक्षरें पडताळोनी ॥ २१ ॥ तैशाच परी अमरपती ॥ आधीं कोप धरिला चितीं ॥ मग मरुद्गण करितां ग्लांती । उःशाप बोलती तेधवां ॥ २२ ॥ म्हणे करावया जगदुद्धार । ब्रह्मा विष्णु आणि हर । कलियुगामाजी साचार । घेतील अवतार अंशरूपें ।

१. गवताचे २. इंद्र. ३ इंद्रा. ४ पृथ्वी ५. इंद्र

॥ २३ ॥ योगमाया जें आदिशक्ती । मुक्तारूपें अवतरेल क्षितीं । निवृत्ति राज तो मृडानीपती । ज्ञानदेव होती महाविष्णु ॥ २४ ॥ ब्रह्मयाचा अवतार पूर्ण । त्यासि नांव ठेविलें सोपान । तूं अनन्य भावें करून । जासील शरण त्यालागीं ॥२५॥ सत्समागमाचेनि गुणें । अध्यात्मविद्येंत होशील प्रवीण । विश्वरूप भासतील अवघे जन । होईल निरसन द्वैताचें ॥ २६ ॥ सद्गुरुचें कृपेनें साचार । तुज होईल साक्षात्कार । अवघें विश्व चराचर । ब्रह्मरूपपर भासेल कीं ॥ २७ ॥ साक्षात परब्रह्म विटेवरी । श्रीपांडुरंग मूर्ति भीमातीरीं । त्याची उपासना धरितां अंतरीं । मग संकटीं श्रीहरी तुज पावेल ॥ २८ ॥ गृहस्थाश्रम करूनि जाण । संतति करिशील उत्पन्न । मृत्युलोकीं वंश ठेवून । मग समाधिधन पावसी ॥ २९ ॥ तेव्हां पूर्ववत् स्वर्गस्थान । प्राप्त होईल तुज कारण । सर्वथा असत्य नव्हें वचन । सत्य प्रमाण हे वाचा ॥ ३० ॥ ऐसें बोलतां पुरंदर । मरुद्गणाचें संतोषें अंतर । शापविमोचन ऐकूनि सत्वर । करी नमस्कार इंद्रातें ॥ ३१ ॥ स्वर्गींहून देदीप्य मूर्ती । उतरत तेव्हां सहज स्थिती । नभांत पडे प्रकाशदीप्ती । तेणें निशापती लोपला ॥३२॥ उपदेव मरुद्गण अवतार । येतसे कर्म भूमीवर[1] । तेज न माय अंगावर । सुकृत थोर म्हणोनियां ॥ ३३ ॥ कोणीही प्राविण्याचे पदरीं । सात्विक पुण्य असेल जरी । तरी उत्तम शरीर लाधेल सत्वरीं । चौऱ्यांसी फेरी हिंडतां ॥ ३४ ॥ नानापरीचे विषयभोग । लाधती सुकृताचेनि योगें । कधीं न होय मनोभंग । सकळ जग मानी त्या ॥ ३५ ॥ निजपुण्यें करूनि सत्वरी । सुकृत अधिक वाढेल पदरीं । बुद्धि सर्वथा नव्हे अधुरी । निश्चय अंतरीं ठसावें ॥ ३६ ॥ पुण्यवंत जें जें करूं म्हणे । तें तें तत्काळ होऊनि येतसे जाण । सर्वथा अडथळा नकरी कोण । श्रीनारायण साह्य ज्यासी ॥ ३७ ॥ मृत्युलोकीं पुण्यवंत नर । तयासी सर्वत्र म्हणती बरें । मोक्षपदाही गेलियावर । परी सत्कीर्ति उरे माघारी ॥ ३८ ॥ असो आतां बहुत भाषण । पुरंदर[3] शापाचेनि गुणें । क्षितीं उतरला मरुद्गण । परी स्वरूपलावण्य तयाचें ॥ ३९ ॥ तपती पयोष्णी संगमीं जाण । दाट लागलें कर्दळीवन । आणिकही वृक्ष असती सघन । रमतसे मन ते ठायीं ॥ ४० ॥ जाईजुई पारिजातक पाडळी । चांपे[4] सेवंती[5] फुलल्या सकळी । बटमोगरे आणि बकुळी । भ्रमर निराळीं गुंजती ॥ ४१ ॥ खानदेशांत तये वेळ । तपती संगमीं रमणीय स्थळ । मरुद्गण उतरोनि त्या जवळ । स्नान तत्काळ सारितसे ॥ ४२ ॥ मग चर्मचक्षु झांकूनियां प्रीतीं । अनुष्ठान करीत तयेक्षितीं । सर्वथा न बोले कोणाप्रती । अंध दिसती जनलोकां ॥४३॥ परस्परें बोलती जन । तपती संगमीं कर्दळी वन । तेथें अंधऋषि करीत अनुष्ठान । आला कोठून कळेना ॥ ४४ ॥ परम सुंदर त्याचें शरीर । तेज न मायेचि मुखावर । मृत्युलोकींचा ऐसा नर । नाहीं साचार देखिला ॥ ४५ ॥ स्वरूप चांगलें संपूर्ण । म्हणोनि चांगदेव नामाभिधान । आपुलें मतीनें ठेवूनि जन । येती दर्शन घ्यावया ॥ ४६ ॥ तों वरुण गांवींचे दोघे विप्र । उभयतां बंधु सहोदर । चांगदेवाची कीर्ती ऐकूनि थोर । आले सत्वर त्या ठायीं..

१. पृथ्वीवर. २ शंकर. ३ इंद्र. ४ चाफा. ५ शेवंती.

॥ ४७ ॥ चित्तीं धरूनि कामानिक भक्ती । एकमेकासीं विचार करिती । तापसी अनुष्ठान करितो प्रीतीं । तरी भेटूं निश्चितीं तयासी ॥ ४८ ॥ तुळसी मंजुऱ्या सुमनहार । बुका खजूर घेऊनि सत्वर । चांगदेव अनुष्ठान करितो तीव्र । तयासि नमस्कार घातला ॥ ४९ ॥ लावण्य रूप देखोनि दृष्टीं । परम आश्चर्य वाटलें पोटीं । म्हणती धन्य धन्य त्यां परमेष्टी । निर्मिला सृष्टीं नर ऐसा ॥ ५० ॥ दृष्टीसीं पाहतां तयाप्रती । उभयतां बंधु तटस्थ होती । म्हणती मनुष्य न म्हणावें याजप्रती । उतरली मूर्ति स्वर्गींहुनी ॥ ५१ ॥ लोक म्हणती चांगदेव ।[1] तो प्रत्यय आला पाहतां अनुभव । बत्तीस लक्षणें असती सर्व । पाहतांचि जीव निवाला ॥ ५२ ॥ हात जोडोनियां जाण । सन्मुख राहिले दोघेजण । म्हणती धन्य धन्य आजिचा सुदिन । जाहलें दर्शन संतांचें ॥ ५३ ॥ विश्वोद्धार करावया निश्चितीं । यास्तव अवतार धरिला क्षितीं । दर्शन स्पर्शन उद्धारगती । पुण्यसंपत्ती विस्तारे ॥ ५४ ॥ संतभाषण यथार्थ । जरी सद्भावें घडे अकस्मात । तरी नष्ट संदेह जो मनांत । तो दूर होत तेच क्षणीं ॥५५॥ जेथें संतांचे लागती चरण । ते मस्तकीं वंदितां रजःकण । तरी कोटि कुळें उद्धरतील तेणें । सायुज्य सदन भोगिती ॥५६॥ ऐसी करूनियां स्तुती । उभयतां बंधु तेथें राहती । चांगदेवाची सेवा करिती । मनोरथ चित्तीं धरूनियां ॥ ५७ ॥ भक्ष्य भोज्य इच्छितां कांहीं । तत्काळ आणोनि घालिती ठायीं । अर्चन पूजा साहित्य सर्वही । आणूनि लवलाही ते देती ॥५८॥ शौचास जातां ते वेळें । ठेविती मृत्तिका जवळ । घरीं जावयाची नाहीं तळमळ । राहिले निश्चळ ते ठायीं ॥ ५९ ॥ चांगदेव निद्रित होतांचि ते रातीं । उभयता बंधु चरण चोळिती । एक मास लोटतां ऐशा रीतीं । मग विनविती स्वामीतें ॥ ६० ॥ आतां कृपा करोनि आम्हांवर । अनुग्रह द्यावा जी साचार । तेणेंचि सफळ हा संसार । होईल उद्धार जीवाचा ॥ ६१ ॥ ऐसी ऐकूनियां ग्लांती । चांगदेव तयासि उत्तर देती । अनुग्रहाची कैसी रीती । ते मजप्रती कळेना ॥ ६२ ॥ आंधळा ब्राह्मण एकटा वनीं । पडिलों असे ये ठिकाणीं । मंत्र तंत्र उभारणी । ते मज लागोनि कळेना ॥ ६३ ॥ ठाव ठिकाण माता पिता । तें मी न जाणेचि सर्वथा । नाहीं पुत्र कलत्र तत्त्वता । जगीं मान्यता तेही नसे ॥ ६४ ॥ तुम्हीं सत्पुरुष पाहोनि थोर । तयासि शरण जावें सत्वर । आम्हांसि नावडे जो जार । ऐसें उत्तर बोलिले ॥६५॥ शिष्य म्हणती तये समयीं । आमुचा निश्चय तुमचे पायीं । अनुग्रह घेतल्यावीण कांहीं । जाणेंचि नाहीं सर्वथा ॥ ६६ ॥ स्वामींची व्हावी कृपादृष्टी । ऐसा हेत धरिला पोटीं । केली असे जीवाची साटी । बोलती गोष्टी वरवर ॥ ६७ ॥ चित्तीं कामना धरूनि थोर । जे सद्गुरुसेवा करिती नर । त्याचें वैराग्य लटिके तोंवर । धन धान्य जोंवर ये हातां ॥ ६८ ॥ अज्ञानी करिती भक्ती । चित्तीं धरोनि धनसंपत्ती । तरी देव नावडे तयांच्या मती । पुढें ठाकती मनकामना ॥ ६९ ॥ अज्ञानी भक्ताची जे पूजा । ते सर्वथा नावडे गरुडध्वजा । निष्काम भक्ताचिया काजा । वैकुंठ राजा धांवतसे

1. हेत

॥७०॥ कामनिकाची व्यर्थ भक्ति । कामनिकाची व्यर्थ कीर्ती । कामनिकाची पुण्य संपत्ती । सरोनि जाती काळांतरें ॥ ७१ ॥ वस्त्रें भूषणें टाकोनि समग्र । कामानिक हिंडे दिगंबर । तरीं तयापासून देव दूर । श्रम थोर व्यर्थ गेले ॥ ७२ ॥ निष्काम भक्त घराचारी । सप्रेमभावें भजन करी । त्याच्या मागें पुढें राहूनि श्रीहरी । नाना परी रक्षितसे ॥ ७३ ॥ असोत हीं भाषणें बहुत रीतीं । धनकामना धरूनि चितीं । दोघे ब्राह्मण करोनि ग्लांती । अनुग्रह मागती चांगदेवा ॥ ७४ ॥ सद्भाव देखोनियां वर । ग्लांती करिती वारंवार । आह्मांसि अनुग्रह द्यावा जी सत्वर । निज कृपावर आपुला ॥ ७५ ॥ ऐसें म्हणोनि लवलाहे । मग स्वामीचे धरिले पाय । जाणोनि तयांचा अतिभाव । सद्गुरु अभय देतसे ॥ ७६ ॥ मस्तकीं ठेवूनियां पाणी । अनुग्रह दीधला तये क्षणीं । उपासना मंत्र सांगोनि कानीं । नामस्मरणीं लाविले ॥ ७७ ॥ आवडी धरूनि चित्तास । सेवेसि तिष्ठती रात्रंदिवस । ऐसे लोटतां सात मास । मग एकांतीं स्वामीस बोलती ॥ ७८ ॥ आम्हीं संसारीं आलिया सदा । जन्मवरी भोगितों आपदा । पोटभरी अन्न न मिळेचि कदा । करितों धंदा बहुसाल ॥ ७९ ॥ खोटें आमुचें प्राक्तन । निवडूनि आलें असे संपूर्ण । उदीम करितां न फिटेचि ऋण । मनुष्यांसि अन्न मिळेना ॥ ८० ॥ यास्तव संसारीं त्रासलें मन । धरोनि बैसलों स्वामींचें चरण । ऐसें वर्तमान सांगतां ब्राह्मण । द्रवलें मन सद्गुरूचें ॥ ८१ ॥ चांगदेव पुसती त्यांज कारण । संसारीं उदीम करीतसां कवण । ते म्हणती भांडवल काढोनि ऋण । चाटेपण करीतसों ॥ ८२ ॥ ऐसें सांगतां तयांतें । प्रसन्न जाहलें सद्गुरुनाथ । म्हणती तुम्हीं बाजारासि जाल जेथें । आम्हांसि सांगातें घेऊनि जा ॥ ८३ ॥ ऐकूनि चांगदेवाची मात । शिष्य पुढती पायीं लागत । म्हणती कुटुंब आहे बहुत । उपवासी मरत सर्वदा ॥ ८४ ॥ आठा दिवसां सोमवार । संगमी भरतसे बाजार । तेथें जातसें निरंतर । परी कांहींच नुरे भक्षावया ॥ ८५ ॥ ऐसे बोलतां उत्तर । तों सवेंचि पातला सोमवार । स्वामीसि बैसवूनि अश्वावर । खांद्यावर दिंड घेती ॥ ८६ ॥ पाल देऊनियां सत्वरीं । स्वामीस बैसविती आसनावरी । ऋद्धिसिद्धि बरोबरी । निरंतरी सर्वदा ॥ ८७ ॥ संत जाती जयाचे घरीं । दुःख दारिद्र्य पळतसे दुरी । आपदा न होय संसारीं । धरितां अंतरीं विश्वास ॥ ८८ ॥ चांगदेव सन्निध बैसतांचि देख । तेथेंचि पातले गिऱ्हाइक । सांगितलें मोल देती लोक । वाटे कौतुक शिष्यास ॥ ८९ ॥ जितुकें कापड आणिलें त्यांनीं । तितुकेंही विकिलें त्या ठिकाणीं । हिशेब पहातां तयेक्षणीं । तो नफा द्विगुणीं देखिला ॥ ९० ॥ ऐसा चित्तास येतां प्रत्यय । विस्मित मन तयांचें होय । म्हणती ऊर्जितकाळ आला आहे । धरिती पाय सद्गुरूचे ॥ ९१ ॥ ऐसें बोलोनि परस्पर । करिती चांगदेवासि नमस्कार ॥ म्हणती आपुला लाधतां कृपावर । द्रव्य फार मिळाले ॥ ९२ ॥ सद्गुरु देती प्रत्युत्तर । तुमची भक्ती देखूनि

१. नागवा २. हात ३. संकटें

फार । प्रसन्न जाहला गिरिजावर । अन्य विचार नसेची ॥ ९३ ॥ सामर्थ्य असोनि आपुल्यांत । परी अहंता न धरी चित्तांत । देवावरी घाली निमित्त । तरी तोचि संत जाणावा ॥ ९४ ॥ सर्वसिद्धि असती पायीं । परी आपुल्या अंगीं कर्तृत्व नाहीं । अहंब्रह्म हें नयेचि जीवीं । तरी तोचि सर्वी सर्वात्मक ॥९५॥ योगबळें आसन उडविती । नाना सिद्धींचे सोहळे दाविती । विषयासाठी लोलुप स्थिती । तयासी विश्रांती असेना ॥ ९६ ॥ स्वमुखें सांगे लोकां करणें । आम्हीं ब्रह्मनिष्ठ परिपूर्ण । चित्तीं आठविती दोषगुण । तेचि अज्ञान म्हणावें ॥९७॥ उदंड आत्मज्ञानी जाहला आहे । परी उत्पत्ति स्थिति आणि प्रळय । याचे इच्छेने सर्वथा नव्हे । तें सत्ता आहे वेगळीच ॥ ९८ ॥ तैसी चांगयाची नव्हे स्थिती । सर्वसिद्धि अनुकूल असती । परी स्वमुखे सांगे शिष्यांप्रती । कैलासपती तुष्टला ॥९९॥ असो ते संप्रदायी दोघेजण । पाकसिद्धि करिती जाण । मग चांगदेव मृत्तिकेचे लिंग करून । करितसे अर्चन शिवाचें ॥१००॥ धूप दीप प्रदक्षिणा । महानैवेद्य अर्पिला जाणा। स्तुतिस्तोत्रें करूनि नाना । कैलासराणा तोषीवला ॥१॥ मग चांगदेवाचिये पंक्ती । उभयतां बंधु भोजन करितां । स्वानंदरसीं जाहलिया तृप्ती । मग तांबुल देती सद्गुरूतें ॥२॥ मृदु आंथरुण घालूनि सहज । त्यावरी निजविला योगिराज। उभयतां सेवक करिती द्विज । संसार काज साधावया ॥ ३ ॥ असो यापरी क्रमिली रात । तों उदयासि पावला आदित्य[3] । चांगदेव उठोनि त्वरीत । गेले वनांत कर्दळीच्या ॥ ४ ॥ सद्गुरूसि स्वस्थानीं बैसवूनि पाहीं । घरासि गेले व्यवसायी । सेवेसि येती लवलाहीं । अंतर कांहीं पडेना ॥ ५ ॥ तो दुसरा हाट येतां निश्चिती । सद्गुरूसि बाजारा घेऊनि जाती । आणिक कापड घेऊनि विकिती । लाभ पावती चौगुणा ॥ ६ ॥ सद्गुसेवा करितांचि जाण । जाहलें दारिद्र्य विछिन्न । फिटलें सावकाराचें ऋण । सुखसंपन्न संसारीं ॥ ७ ॥ एक संवत्सर साचार । चांगयासि नेती बरोबर । लक्षाधिपती सावकार । जाहले द्विजवर ते दोघे ॥ ८ ॥ द्रव्य खर्चोनिया बहुत । मंदिर बांधिले नगरांत । अलंकार भूषणे कुटुंबांत । रमले चित्त संसारीं ॥ ९ ॥ जगीं प्रशंसा जाहली फार । सोयरे केले थोर थोर । संपत्ति येता इष्टमित्र । करिती आदर तयांचा । ॥ ११० ॥ तेणें बुद्धिभ्रंश होऊनि समस्त । संसाराकडे रमलें चित्त । स्वामिसेवेसि अंतर पडत । पहिलें आर्त राहिलें ॥ ११ ॥ दोघांतून एक निश्चितीं । एक वेळ समाचार घेती । ऐशी त्यांची पालटतां चित्तवृत्ती । समजले चित्तीं चांगदेवा ॥ १२ ॥ कनक आणि कांता जाण । साधकासि दोन महा विघ्न । अवाचित प्राप्त होतांचि पूर्ण । मग परधर्म साधन घडेना ॥ १३ ॥ जैसें मातेपासूनि शरीर निश्चित । परी कुपूत नायकेचि मात । कांतेचिया वचनें वर्तत । विषयासक्त होऊनी । ॥ १४ ॥ तेवीं सद्गुरू निश्चितीं । शिष्यासि आली धनसंपत्ती । मग स्वामीस विसरोनि दुर्मती । जाहले रत संसारीं ॥ १५ ॥ अग्नीपासूनि होय जीवन । तें पाणीच विझवीतसे कृशान । ज्याचे मंत्र त्याजकरण । फिरती संपूर्ण या रीतीं ॥ १६ ॥ दरिद्री ब्राह्मण होतें आधीं । मग सद्गुरूनें दिधली महासिद्धी ।

---

१. शंकर. २ अहंकार ३. सूर्य.


तेव्हां संपत्ति येतांचि त्रिशुद्धी । त्यासि मंदबुद्धी विसरले ॥ १७ ॥ पूजेचें साहित्य न देतीच कोणी । क्षणक्षणां संताप वाटे मनीं । याकरितां साधु निस्पृह होउनी । एकटे वनीं बैसती ॥ १८ ॥ बहुतांच्या प्रकृति बहुत । सर्वथा न मिळे एकचित्त । यालागीं कोणासी नसावें आसक्त । साधणें परमार्थ ज्यालागीं ॥ १९ ॥ मनीं असतां विषयासक्ती । कुसंगाची होय प्राप्ती । कामना पूर्ण न होतां निश्चितीं । क्रोध चित्तीं येतसे ॥ १२० ॥ क्रोध गेलिया निघोनी । मग मोह संचरे अंतःकरणी । स्मृतिभ्रंश तेव्हां प्राणी । चौऱ्यांसी योनी भोगिती ॥२१॥ तंव कोणे एके दिवशीं । चांगदेव बैसले अर्चनासी । मृत्तिका आणविली पार्थिवासी ॥ तों संसारकार्यासी गुंतले ॥२२॥ सद्गुरु म्हणती आणा माती । मळून द्यावी सत्वरगती । शिष्य भयभीत जाहले चित्तीं । मग कृत्रिमयुक्ती करिताती ॥ २३ ॥ संगमासि जाऊनि सत्वरगती । मग सिवन्तेची साळोंखा करिती । त्यावरी वाटी घातली पालथी । मग हांसोन बोलती परस्परें ॥२४॥ स्वामी तों आहेत नेत्रहीन । सर्वथा न दिसे त्यांजकारण । हें स्थावरलिंग असें जाण । ऐसें सांगणें तयांसी ॥ २५ ॥ अर्चन झालिया उठाउठी । आपण काढून घेऊं वाटी । ऐसा कृत्रिम भाव पोटीं । मग सद्गुरुसी गोष्टी बोलती ॥ २६ ॥ पार्थिवासि मृत्तिका नाहीं स्वामी । आयतेंच लिंग आहे संगमीं । आतांचि पाहोनि आलों आम्हीं । तरी तें नित्यनेमीं पूजावें ॥२७॥ जाणोनि तयांचा अंतर्भाव । मग उत्तर देती चांगदेव । लिंगाकार पृथ्वी सर्व । न दिसे ठाव एकरिता ॥ २८ ॥ निजभक्तांचें जाणोनि अंतर । लहान थोर होतसे पार्वतीवर । येऱ्हवीं तो विराटस्वरूप ईश्वर । अंतपार नसे त्याचा ॥२९॥ पिंडीब्रह्मांडी सकळ सृष्टी । अवघा एकचि धूर्जटी । पार्थिव आणि स्थावरपोटीं । त्याजवीण दृष्टीं दिसेना ॥ १३० ॥ स्थावरलिंग कोठें आहे । तें मज दाखवा लवलाहें । ऐसें बोलतो सद्गुरुराय । करिती काय शिष्य तेव्हां ॥ ३१ ॥ अग्रोदक पूजा घेऊनि हातीं । संगमी चांगयासी घेऊनि जाती । वाळूवर वाटी घातली पालथी । ते होतें दाखविती तयासी ॥३२॥ हरहर शब्दें घेऊनिं नांव । तेथेंचि सप्रेम धरिला भाव । पूजेसि बैसला चांगदेव । तो कौतुक पहा हो एक झालें ॥३३॥ ॐहर म्हणतां सत्वर गती । साक्षात् पातले कैलासपती । वाटी घातली होती पालथी । ते अक्षयी स्थापिती मंत्रोक्तें ॥ ३४॥ अर्चनासि बैसती सद्गुरुप्रीतीं । शिष्य सत्वर आश्रमा जाती । स्वामीसाठी पाक निष्पत्तीं । स्वहस्ते करिती उभयतां ॥३५॥ इकडे तपती संगमीं चांगयानें । अक्षयलिंग स्थापिलें जाण । एकादशिनी अभिषेक करून । निजप्रीतीनें सारिलें ॥३६॥ गंधाक्षता सुमनहार । तीळ तांदूळ बिल्वपत्र । धूपदीप नीरांजन कर्पूर । सर्वोपचार अर्पिलें ॥३७॥ तों नैवद्य वाढोनि पात्रावर । शिष्य घेऊनि आले सत्वर । तो शिष्यासि दावूनि निजकरें । भावें नमस्कार घातला ॥३८॥ म्हणे मी मंत्रहीन क्रियाहीन । भावहीन भक्तिहीन । अर्चापूजा करूं नेणें । तूं पार्वती रमण जाणसी ॥३९॥ ऐसें बोलती करुणा वचन । संतोषला पार्वती रमण । म्हणे यथासांग केले पूजन । संतोष मनी मी झालों ॥१४०॥ मग सेवकाचा धरूनियां कर ।

१. शंकर.

चांगदेव आश्रमासि आले सत्वर । तों अन्न वाढिलें पात्रावर । मग शिष्यांसी उत्तर बोलती ॥४१॥ आज्य करावया निश्चित । आपुली वाटी आणा त्वरित । शिष्य धांवोनि संगमीं जात । कौतुक अद्भुत देखिले ॥ ४२ ॥ वाटी उचलोनि घेतां वळे । तंव ते न हाले तयेवेळें । म्हणती हें तों अघटित झाले ॥ बळ वेंचले सर्वही ॥ ४३ ॥ परी वाटी न निघेचि निश्चित । सिकता मिळाली पाषाणवत । उकरोनि पाहतांचि न कळे अंत । चिंताक्रांत जाहले ॥ ४४ ॥ म्हणता आपुली कृत्रिमबुद्धी । जरी सद्गुरुसि कळली ये संधी । तरी शाप देऊनि आधी । वंशत्रिशुद्धि बुडवील ॥४५॥ देऊनि पाय शेंपटावर । भुजंग जागविला साचार । तैसाचि जाहला प्रकार । कैसा विचार करावा ॥ ४६ ॥ जाणतां केलें विष भक्षण । महा व्याघ्रासी संघटण । तापसियाचें केले छळण । दैवहीन म्हणोनियां ॥ ४७ ॥ वंशमुळी वाढतां सत्वर । कृशानु पेटविला तिजवर । तैसाचि दिसतसे प्रकार । कोणता विचार योजावा ॥ ४८ ॥ ज्याच्या वचनें करोनि पाहे । वाटीचा ईश्वर तत्काळ होय । तरी तो कोपल्या बरें नव्हे । म्हणोनि भय उपजलें ॥ ४९ ॥ ऐशा रीतीं बोलोनि मात । थरथरां दोघे बंधु कांपत । चांगयापासीं येऊनि त्वरित । साष्टांग दंडवत घातलें ॥ १५० ॥ मग जोडोनियां दोन्ही कर । उभे ठाकले समोर । म्हणती अपराध घडला थोर । सांगतों सादर ऐकिजे ॥ ५१ ॥ माती न मिळे म्हणोनि देखा । सिकतेची केली साळोंखा । भुललों या प्रपंचसुखा । परमार्थ निका दवडिला ॥५२॥ आळस धरोनियां चित्तीं । वाळुची साळुंखा केली निगुती । त्यावरी वाटी घालोनि पालथी । तुम्हांप्रती दाखविलें ॥ ५३ ॥ स्वामींनीं त्याचें पूजन केलें । तें अक्षयीलिंग तत्काळ जाहलें । सर्वथा न हाले कांहीं केलें । बळ वेंचलें सर्वही ॥ ५४ ॥ वाळू विरजोनि एके ठायी । पाषाणवत झाली पाही । वाटी न निघे सर्वथाही । अंत नाहीं उकरितां ॥ ५५ ॥ ऐसी ऐकतांचि मात । चांगदेव जाहले सद्गदित । नेत्रीं वाहती अश्रुपात । रोमांचित अंग झालें ॥५६॥ म्हणे मी पतित आहे साचा । हें तो सत्यसत्य त्रीवाचा । कवण्या गुणें करोनि साचा । स्वामी गौरीचा प्रगटला ॥ ५७ ॥ नेणें भक्ति नेणें भाव । नेणें मंत्रविद्या गौरव । स्वयें प्रगटला महादेव । वटेश्वर नांव तयाचें ॥ ५८ ॥ ऐशा रीतीं वदोनि तेव्हां ॥ हर हर शब्द म्हणे देवा । आतां मज घडो तुझी सेवा । मागणें शिवा हेंचि असे ॥ ५९ ॥ अनंत लिंगें तुझीं निश्चितीं । पृथ्वीवर बहुत असती । परी माझी वाढवावया सत्कीर्ती । वटेश्वर प्रीतीं जाहलासी ॥ १६० ॥ ऐशा रीतीं करोनि स्तवन । नेत्र उघडिले चांगयानें । तों दिव्यचक्षु देखोन । विस्मित मन तयाचें ॥६१॥ मग आज्ञा देतसे शिष्यांसी । आतां जा आपुल्या गृहासी । त्यांचा अपराध नेणोनि मानसीं । शांति सुखासी भोगितसे ॥ ६२ ॥ आणिक तापसी योगेश्वर । तामसगुणी असती फार ॥ अपराध होता अणुमात्र । शापोत्तर बोलती ॥ ६३ ॥ त्यांचेंही वचन यथार्थ होत । पदरींचें नासोनि जाय सुकृत[1] । तैसे नव्हेति साधुसंत । शांति भरित सागर जे ॥ ६४ ॥ अकस्मात भेटतां शिष्यासी । परी

१. पुण्य

देवासमान मानिजे त्यासी। पूज्यपूजक भावना ऐसी। नये दृष्टीसी सर्वथा ॥ ६५ ॥ ऐसा सद्गुरु तोचि थोर। जो साक्षात जाणावा ईश्वर। त्याचा अनुग्रह धेता साचार। साक्षात्कार येतसे ॥ ६६ ॥ चांगदेवाचे शिष्य आळसी। ऐसें कळतांही चित्तासी। सर्वथा शाप नेदीच त्यांसी। क्षमा मानसीं सर्वदा ॥६७॥ शिष्यांसि सांगे त्या अवसरा। तुम्ही जावें आपुल्या घरां। आम्हांसि राहणें तापीतीरा। श्रीवटेश्वरा पूजावया ॥ ६८ ॥ मग नमस्कार करूनि योगेश्वरा। शिष्य गेले आपुल्या घरा। चित्तीं संतोष वाटला बरा। म्हणती चुकला बरा अनर्थ ॥ ६९ ॥ चित्तीं भय होतें बहुत। कीं अन्याय आचरलों यथार्थ। शाप देतील सद्गुरुनाथ। तोही अपघात चूकला ॥ १७० ॥ ऐसा संतोष मानूनि सदा। करिती आपला संसार धंदा। सत्य मानूनि विषयस्वादा। प्रपंच वादा निमग्न ॥ ७१ ॥ असो इकडे चांगदेवासाठीं। वाटींत प्रगटले धूर्जटी। जगीं सत्कीर्ति प्रगटली मोठी। येतसे भेटी जनयात्रा ॥ ७२ ॥ देशोदेशींचे सावकार। दुर्बल भाविक अज्ञान नर। ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र। येती समग्र यात्रेकरू ॥ ७३ ॥ नानापरीचे नवस करिती। त्यांचे मनोरथ पूर्ण होती। कोणी सावकार वेंचूनि संपत्ति। मठ बांधिती ते ठायीं ॥ ७४ ॥ जये ठायीं देवभक्त। वसती तेथें सिद्धि राबत। अन्न शांतीसी नाहीं गणित। महिमा अद्भुत वाढला ॥ ७५ ॥ पुढिले अध्यायीं कथा लाघव। चौदा विद्या आति अपूर्व। अभ्यास करितील चांगदेव। ते ऐका सर्व भाविकहो ॥७६॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ संपूर्ण। हेंचि कोमळ तुळसीचें वन। येथें लीलाविग्रही रुक्मिणीरमण। निज प्रीतीनें क्रीडतसे ॥ ७७ ॥ जेथें आला वैकुंठपती। तेथें वैष्णव भक्त सहजाचि येती। जैसा वनस्थळीं बैसतां नृपती। तरी मंत्रीही राहती त्या ठायां ॥ ७८ ॥ म्हणोनि भक्तलीलामृत ग्रंथ प्रेमळ। हें देवभक्तांचें आवडतें स्थळ। महीपति त्याचा लडिवाळ। ओव्या प्रांजल गातसे ॥ ७९ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ। श्रवणेंचि पूरती मनोरथ। प्रेमळ परिसोत भाविक भक्त। द्वितीयाध्याय रसाळ हा ॥ १८० ॥


अध्याय ३

श्रीगणेशायनमः । निजभक्त कथा करितां श्रवण । तरी सकळ तीर्थांचें घडे स्नान । तेथें पर्वकाळही संपूर्ण । कर जोडून तिष्ठति ॥ १ ॥ सत्पात्रीं दानें बोललीं पाहीं । श्रवणमात्रें घडती तींही । नाना उपचारें शेषशायी । सर्व वैभवीं पूजिला ॥ २ ॥ जे भक्त कथा ऐकती भावें । तयांसि सत्कर्मे घडलीं सवें । योग तपें यांचेचि नांवें । श्रवणीं बैसावें एकनिष्ठ ॥ ३ ॥ श्रवण झालिया होय मनन । मनना पाठीं निदिध्यासन । मग साक्षात्कारासि येऊन । होय विज्ञान साधकां ॥ ४ ॥ नवविधा श्रीहरीची भक्ती । परी श्रवण वरिष्ठ सर्वांत म्हणती । शुकमुखें भागवत ऐकतां प्रीतीं । तरला परीक्षिती नृपराज ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथा गोमटी । चांगदेवाचे शिष्य कपटी । त्यांनीं वाळूवर पालथी घातली वाटी । झाला धूर्जटी साक्षात ॥ ६ ॥ चांगयाचे भक्तीस्तव पाहे । वाटीचा ईश्वर जाहला आहे । मग चांगावटेश्वर नांव पावलाहे । दर्शनेंचि होय मुक्त प्राणी ॥ ७ ॥ आसनीं शयनीं साचार । ध्यानीं मनी वटेश्वर । स्वप्न सुषुप्ति जागर । विसर क्षणभर असेना ॥ ८ ॥ विधियुक्त अर्चन निश्चित । त्रिकाळ करी यथास्थित । यात्रा येतसे नित्यानित्य । दर्शन घेती शिवाचें ॥ ९ ॥ यावरी चांगदेवाचें मनीं । हेत उपजला तयेक्षणीं । चौदा विद्या अभ्यास करूनी । चमत्कार नयनीं पाहावा ॥ १० ॥ जो का योगभ्रष्ट स्वर्गवासी । शापें उतरला भूलोकासी । तयासि अभ्यास करावयासी । कष्ट सायासीं न लागती ॥ ११ ॥ निमित्तमात्र व्हावया कारण । जो ग्रंथ पाहे विलोकून । तो मुखोद्गत होय संपूर्ण । वरदें करून शिवाच्या ॥ १२ ॥ त्या चौदा विद्या कोणकोण । ऐसें आशंकित होईल मन । तरीं हें ऐकावया संपूर्ण । गजानन मूळ ज्याचें ॥ १३ ॥ प्रथम विद्या सुभाष्ययुक्त । श्रुति अभ्यास केला समस्त । चाऱ्ही वेद मुखोद्गत । अंगिरा सुत ज्या परी ॥ १४ ॥ दुसरी सारविद्या ते कवण । न्याय आणि व्याकरण । षट्शास्त्रेंही चांगयानें । निज प्रीतिनें अभ्यासिलीं ॥ १५ ॥ तिसरी विद्या म्हणजे गणक । भूगोळ उतरावा तात्काळिक । भूत भविष्य सांगतां कवतुक । तें ज्योतिष लटिकें न होय ॥ १६ ॥ चौथी विद्या रसक्रिया थोर । ज्यालागीं धन्वंतरि अवतार । महारोग परिहार । चिकित्सासार त्यातें म्हणती ॥ १७ ॥ पांचवें म्हणजे नाडी ज्ञान । रोगाची परीक्षा कळे त्याणें । धातुपुष्ट किंवा क्षीण । पाहोनि देणें औषध ॥ १८ ॥ साहावी धनुर्विद्या निर्धारीं । बोलिली असे शास्त्राधारीं । अस्त्रें अस्त्रनिवारण करी । निवडोनि वैरी मारावे ॥ १९ ॥ आठवें तें कामशास्त्र जाण । अवलोकिलें चांगयानें । त्याचा अनुभव सकळां कारणें । नलगे सांगणें सर्वथा ॥ २० ॥ नृत्य कला संगीत सकळ । अवसान दावितां न चुकेचि ताल । घागऱ्या वाजवोनि दावणें मंजुळ । तेंही सकळ अभ्यासी ॥ २१ ॥ साहा राग छत्तीस भार्या । एकवीस मूर्छनांचिया क्रिया । ही दाहावी विद्या अभ्यासुनियां । गायन चांगया करीतसे ॥ २२ ॥ जैसे क्षितीवर चालती नर । तैसेंचि वागावें उदकावर । हेदमविद्या अकरावी थोर । तीही सत्वर अभ्यासिली ॥ २३ ॥ परकाया प्रवेश करणें । त्याचाही अभ्यास केला पूर्ण ।

वस्तु मात्राची परीक्षा घेणें । मनींची खूण जाणावी ॥ २४ ॥ ह्या तेरा विद्या अभ्यासोनि थोर । निजांगे पाहिला चमत्कार । तेणें जनांत प्रशंसा वाढली फार । परोपकार दाखवितां ॥ २५ ॥ चौदा विद्या दाविते वज्रासन । योग अभ्यासीं लाविजे मन । त्याचाही अभ्यास करून । षटचक्रें जाण भेदिलीं ॥ २६ ॥ योग संपूर्ण झालिया त्यासी । मग अष्टसिद्धि वोळंगल्या दासी । जे जे इच्छा धरितां मानसी । ते ते अनायासीं होऊनि ये ॥ २७ ॥ ह्या चौदा विद्या चौसष्ट कळा । अवगत असल्या जरी सकळा । परी चित्तीं नसली एक प्रेम कळा । तरी त्या विकळा अवघ्याची ॥ २८ ॥ सकळ औषधी परिकर । अभ्यासें जोडतील सत्वर । परी दुर्लभ अमृत तुषार । प्रेतासि साचार जीववीजो ॥ २९ ॥ तैशाचि कळा चौसष्ट । अभ्यासितां जोडती स्पष्ट । परी भक्ति प्रेमायां वरिष्ठ । जेणें वैकुंठपीठ वश्य होय ॥ ३० ॥ त्या सकळ विद्या चांगयानें । अभ्यासिल्या नीज प्रीतीनें । परी एकल्या आत्मज्ञानेंविण । निष्फळ शून्य अवघेंची ॥ ३१ ॥ पुढें ज्ञानदेवाची होतां भेटी । ते कळा साधेल गोमटी । परी प्रस्तुत आतां जी वर्तली गोष्टी । तो कर्णपुटीं ऐकावी ॥ ३२ ॥ सिद्धाई प्रख्यात होतां जाण । यात्रेस येती बहुत जन । म्हणती शिवाचा अवतार पूर्ण । चांगदेव निधान मृत्युलोकीं ॥ ३३ ॥ ज्याचे भक्तीस्तव साचार । वाटींत प्रगटला ईश्वर । छप्पन्न देशी साचार । कीर्ति सत्वर प्रगटली ॥ ३४ ॥ तपती चांगदेवाची क्षिती । लोक दुरून यात्रेस येती । जो जे कामना धरी चित्तीं । ती पूर्ण होई तात्काळ ॥ ३५ ॥ ज्याची जैसी भावना चित्तीं । ते दर्शनें मनोरथ पूर्ण होती । अंधास नेत्र तत्काळ येंतीं । बधिर ऐकती कर्णद्वारें ॥ ३६ ॥ गलित कुष्ट कोणाप्रती । त्याचीही होय सुंदर कांती । वांझ स्त्रिया दर्शनासि येती । त्या पुत्र लाधती तत्काळ ॥३७॥ वटेश्वराच्या दर्शनें साचार । दुर्बळ होती सावकार । म्हणती ऐसा सिद्धपुरुष थोर । नाही साचार मृत्युलोकी ॥ ३८ ॥ भाविक लोक असती कोणी । चांगदेव जपताती निशिदिनीं । महादोषाची होतसे धुणी । सबंधपळोनि जाय मग ॥ ३९ ॥ चांगा वाटेश्वर प्रगटला सिद्ध । यात्रा भरतसे नानाविध । देव ऋषिमुनि प्रसिद्ध । येती स्वछंदें दर्शना ॥ ४० ॥ ब्राह्मण शूद्र नाना याति । वैश्य क्षत्रिय दर्शना येती । अठरा वर्ण तेही मिळती । विस्तारें किती सांगावें ॥ ४१ ॥ आणि पृथ्वीपती मांडलिक । सर्व साहित्य घेऊनि देख । येऊनि वटेश्वरा सम्यक । पाहती कौतुक दृष्टीसी ॥ ४२ ॥ पहा सिद्धीचा कामनिक महिमा । आणि द्यावया नाहीं उपमा । विषयी जनांचा लागला प्रेमा । आपुलाल्या प्रेमा एक येती ॥ ४३ ॥ टाळ विणे मृदंग घोष । दिंड्या पताका बहुवस । कीर्तन करिती हरीचे दास । नाद ब्रह्ममुखें आणूनिया ॥ ४४ ॥ शतएक वर्षे पाही । ऐसी वाढली सिद्धायी । तों देहास काळ आलिया पाही । ज्ञानदृष्टी तिही जाणीतले ॥ ४५ ॥ मग चांगदेवें मांडिली युक्त । आत्मा ब्रह्मांडासि नेला त्वरित । शरीर दिसतसे काष्टवत । हें लोक समस्त पाहती ॥ ४६ ॥ दशमद्वारीं नेऊनि समीरें । ते ठायीं केला स्थिर । अचेतन देह सर्वत्र । श्वास

१ बनल्या. २ वायु.

अणुमात्र तो नये ॥४७॥ नव दिवस ऐशारीती। लोटूनि गेल्या तितुक्याच राती। काळाची धंडी निघूनि जाती। तो काळ मागुती फिरविला ॥ ४८ ॥ शिष्य संप्रदायिक बहुवंस। शरीर रक्षितां रात्रंदिवस। तो अकस्मात श्वासोछ्वास। येताच उल्हास तयासी ॥ ४९ ॥ निद्रिस्त जैसा होय जागृत। तैसाचि चांगल्या देहावर येत। ऐसें कौतुक देखोनि तेथ। आश्चर्य करीत लोक तेव्हां ॥५० ॥ मग पूर्ववत जैशा रीतीं। सिद्धायींची वर्ते स्थिती। तैसाच दाखवीतसे पुढती। आश्चर्य करिती लोक तेव्हां ॥५१॥ शतायुष्य पुरुषाकारणें। कलियुगामाजी असे जाण। ऐसें वेदवचन प्रमाण। तें असत्य जाण होऊं नेदी ॥ ५२ ॥ शत वर्षे होतांचि निश्चित। चांगदेव दुसरे स्थळी राहत। तेथेंही यात्रा असे भरत। दर्शना येत जनलोक ॥ ५३ ॥ एक संवत्सर लोटल्यावरी। मागुतीं येतसे तापींतीरीं। तेथें वटेश्वराची सर्वोपचारीं। पूजा करी एकनिष्ठ ॥५४॥ शतवर्षे भरतां जाणा। पुढती करी काळवंचना। पुनरपि आणूनि देहभाना। कौतुकें नाना दाखवी ॥ ५५ ॥ एकसहस्र चारशतेंवरी। चांगदेव वाचले याचपरी। कीर्ति प्रगटली देशांतरीं। उपमा दुसरी असेना ॥ ५६ ॥ चौदाशें वर्षांत साचार। एक एक संवत्सर। चौदा स्थळीं योगेश्वर। सहपरिवारें राहतसे ॥५७॥ मागुतीं परतोनि सत्वरीं। येत असे तापीतीरीं। वटेश्वराची पूजा करी। नानाउपचारें करोनिया ॥ ५८ ॥ चौदाशें वर्षांत साचार। चौदाशें वर्षे क्रमिलीं बाहेर। तितुकीं हीं स्थळें भिन्नाकार। पृथ्वीवर असती ॥५९॥ नव्याण्णव वर्षेवरी। चांगदेव राहती वटेश्वरी। सकळ सिद्धि राबती घरीं। हें चराचरीं विख्यात ॥६०॥ तों प्रतिष्ठानींचा[1] द्विजवर[2]। पंथ क्रमीत जात सत्वर। तों यात्रा भरली वाटेवर। पुसतसे द्विजवर त्यांलागीं ॥ ६१ ॥ कोठूनि झालें जी आगमन। कोठपर्यंत असे जाणें। यात्रेकरी सांगती वर्तमान। ऐकतसे ब्राह्मण निजप्रीतीं ॥ ६२ ॥ तापीं संगमीं साचार। चांगदेव सिद्ध पुरुष थोर। याणें चौदाशें वर्षेवर। कलेवर रक्षिलें ॥ ६३ ॥ त्याचें दर्शन घेतांचि जाणा। पुरतसे चित्ताची कामना। ऐकूनि यात्रेकरीयांच्या वचना। उल्हास ब्राह्मणा वाटला ॥६४॥ म्हणे ऐसा जो कां योगेश्वर। त्याचें दर्शन घ्यावें सत्वर। याहूनि लाभ नसे थोर। केला विचार मानसीं ॥६५॥ सद्भाव धरूनि अंतरीं। ब्राह्मण येतसे वटेश्वरीं। तों असंख्यात यात्रा तापीतीरीं। मग नवल करी देखोनियां ॥६६॥ चांगयापासी येऊनि सत्वर। घातला साष्टांग नमस्कार। स्वरूप पाहे दृष्टीभर। तों शिवाकार दिसतसे ॥६७॥ सर्वांगीं विभूति लेपन। आणि रुद्राक्ष माळांची भूषणें। व्याघ्रांबर केलें परिधान। जैसा कैलासरमण[4] दूसरा ॥ ६८ ॥ ज्या दैवतांची करितां भक्ती। तरी तदाकार होतसे वृत्ती। ध्यानींमनीं स्वप्नीं जागृती। वटेश्वर चित्ती बैसला ॥६९॥ ऐसी देखोनि त्याची स्थित। ब्राह्मण जाहला संतोषयुक्त। पुढती घालूनि दंडवत। सन्निध बैसत तेधवा ॥ ७० ॥ म्हणे धन्य आजिचा सुदिन। जाहले स्वामींचें दर्शन। पाप तापाचें निरसन। दुःख दैन्य तें गेलें ॥ ७१ ॥ आजि पूर्व पुण्य उदयासि आलें। कीं सकळ तीर्थांसि स्नान घडलें। कीं योगयोग सुफळ जाहले।

१ पुष्कळ. २ पैठण शहरातील. ३ ब्राह्मण. ४ शंकर.

देखिलीं पाउलें संताची ॥ ७२ ॥ ऐसी ऐकूनि स्तुती । चांगदेव संतुष्ट होती । मग स्वमुखें करूनि पुसती । ब्राह्मणाप्रती तेधवां ॥ ७३ ॥ कोण तुमचा असे देश । कोणते क्षेत्रीं करितां वास । चालला कोणत्या व्यामंगास । हें माकल्य आम्हांस सांगावें ॥ ७४ ॥ तुमचे देशींचा भूपती । प्रजा पाळितो कवणे रीती । कांहीं अपूर्व देखिलें असेल क्षितीं । तें आम्हांप्रती सांगावें ॥ ७५ ॥ ऐसें पुसतांचि योगेश्वर । उत्तर देतसे द्विजवर । प्रतिष्ठान गंगातीर । ब्रह्मक्षेत्र म्हणती जें ॥ ७६ ॥ तये ठायीं वास्तव्य पूर्ण ॥ आणिक व्यामंग नेणेंचि जाण ॥ गांवांत करूनि भिक्षाटण ॥ कुटुंब रक्षण करीतसे ॥ ७७ ॥ तेथें या संवत्सरीं निश्चित ॥ एक अपूर्व वर्तली मात । जें मागें झालेंच नाही सत्य । पुढेंही न होत सर्वथा ॥ ७८ ॥ संन्याशाच्या पोटीचीं जाण । चार मुलें जाहलीं लहान । त्यांनीं रेडियाच्या मुखें करून । ऋग्वेद संपूर्ण बोलविला ॥ ७९ ॥ हें आपुल्या दृष्टीं देखिलें जाण ॥ तें स्वामीस केलें निवेदन । चांगदेवें ऐकूनि वचन । आश्चर्य मनीं करीतसे ॥ ८० ॥ स्वमुखें पुसतसे ब्राह्मणासी । कांता त्यागी तो संन्यासी ॥ तयासि मुलें जाहलीं कैसी । हें साकल्य आम्हांसी निवेदी ॥ ८१ ॥ ऐसें पुसतां योगेश्वर । उत्तर देतसे द्विजवर । म्यां चरित्र ऐकिलें होतें समग्र । तें ऐका साचार स्वामिया ॥ ८२ ॥ एक आपेगांव गंगातीर । तेथील वृत्तिवंत द्विजवर । पुण्यशील परमपवित्र । असे साचार त्याठायीं ॥ ८३ ॥ गोविंदपंत नाम निश्चिती ॥ निरूबाई त्याची शक्ती । परम सुशीळ पुण्यमूर्ती । असतसे प्रीती उभयतां ॥ ८४ ॥ गैनीनाथ जो सिद्ध पुरुष । घेतला तयाचा उपदेश । तो मूर्तिमंत वैराग्य डोळस । आले उदरास तयाच्या ॥ ८५ ॥ नवमास भरतांच पाही । प्रसूत जाहली निरूबाई । पुत्रमुख पाहतां ते समयीं । उल्हास जीवीं उभयतां ॥ ८६ ॥ बारा दिवस लोटतांचि जाण । विठोबा ठेविलें नामाभिधान । निजपुत्राचे सद्गुण । सुखी देखोनि संपन्न उभयतां ॥ ८७ ॥ तो दिवसें दिवस थोर झाला । आठवे वर्षीं व्रतबंध केला । अध्ययन सांगताचि त्याला । वेदशास्त्रीं जाहला निपुण ॥ ८८ ॥ मग माता पितयांसि पुसोनि जाणा ॥ विठोबा चालिला तीर्थाटणा ॥ अनुताप धरुनियां मना । सचैल स्नान करीतसे ॥ ८९ ॥ रामकृष्ण नारायण । अच्युत अनंत जनार्दन । जिव्हेसि अखंड नामस्मरण । सप्रेम मन सर्वदा ॥ ९० ॥ मग प्रथम द्वारकेसि जाऊन । गोमती तीरीं केलें स्नान । घेऊनि श्रीविष्णु दर्शन । तेथुनि गमन करितसे ॥ ९१ ॥ पश्चिम तीर्थे जीं समस्त । पुराण प्रसिद्ध नामांकित । तीहीं पाहुनि विधियुक्त । भीमाशंकरीं त्वरीत पावला ॥ ९२ ॥ यावरी इंद्रायणीचें तीरीं ॥ विठोबा आला अळंकापुरीं । स्नान करूनि सत्वरीं । अर्चन करी विष्णूचें ॥ ९३ ॥ तों तेथील कुळकर्णी सिदोपंत । स्नानासि आले होते त्वरित । त्यांणीं मंदिरासि नेऊनि विठोबातें । भोजन घालीत निज प्रीतीं ॥ ९४ ॥ साकल्य वर्तमान पुसोनि । निद्रा करविली वृंदावनीं । तों पांडुरंग मुर्ती येऊनि स्वप्नीं । तया लागुनी बोलतसे ॥ ९५ ॥ तुझी कन्या उपवर । ती या ब्राह्मणासि दे सत्वर । मूर्तीमंत चार

१ संपूर्ण. २ पृथ्वीवर. ३ आळंदी.

अवतार । उदरीं येणार ययाच्या ॥ ९६ ॥ ऐसें सांगतां पंढरीनाथ । सिदोपंत झाले जागृत । मग ज्योतिषी बोलावूनि त्वरित । पुसतां घटितार्थ येतसे ॥ ९७ ॥ उभयपक्षीं साहित्य करून । सिदोपंतीं केलें कन्यादान । चारी दिवस यथा विधीनें । सोहळे पूर्ण सारिले ॥ ९८ ॥ मग कुटुंबासहित त्या अवसरा । सिदोपंत चालिले पंढरपुरा । कन्या जामात घेऊनि वोहरा । श्रीरुक्मिणीवरा भेटवीत ॥ ९९ ॥ उत्साह झालिया दिवस चार । सिदोपंत चालिले सत्वर । परी जामाताचें ऐसें अंतर[1] । कीं रामेश्वर पहावा ॥ १०० ॥ तयाचें अंतर जाणोनिया । आज्ञा दिधली तीर्था जावया । सिदोपंत कन्येसि घेऊनियां । आपुल्या ठायाते आले ॥ १ ॥ विठोबा गमन करूनि त्वरित । दक्षिण तीर्थे पाहिलीं समस्त । पूर्ण करूनि आपुला हेत । अळंकापुरींत पावला ॥ २ ॥ सिदोपंतासि भेटता जाण । चित्तास वाटलें समाधान । म्हणे माता पितयाचें घ्यावें दर्शन । आज्ञा देणें मज आतां ॥ ३ ॥ जाणोनि तयाचें अंतर । सिदोपंत चालिले सत्वर । कन्येस घेऊनि बरोबर । गंगातीर पावले ॥ ४ ॥ गोविंदपंताची घेऊनि भेटी । वस्त्रें भूषणें दीधलीं गोमटीं । आद्यंत सांगतांचि गोष्टी । आनंद पोटीं त्यासि झाला ॥ ५ ॥ पुत्र सून देखूनि नयनीं । निरूबाई संतोषली मनीं । मग सिदोपंत आज्ञा घेऊनी । आपुले स्थानीं तो गेला ॥ ६ ॥ कांहीं दिवस लोटतां जाण । मातापिता मेलीं दोन । हें सिदोपंतासि वर्तमान । कोणी येऊन सांगितलें ॥ ७ ॥ त्याचा परामर्श घ्यावया पाहीं । सिदोपंत आले आपेगांवीं । तों विठोबासि संसार चिंता नाहीं । वैराग्य देहीं सर्वदा ॥ ८ ॥ मग म्हणे जामातासी । तुम्हीं चलावें आम्हांपासीं । नानापरीं प्रार्थूनि त्यासी । अलंकावतीसी पातले ॥ ९ ॥ म्हणे पुत्र संतती होय जोंवर । तों पर्यंत असावें स्थिर । मग चित्तासि येईल साचार । तैसा विचार करावा ॥ ११० ॥ मानूनि तयाच्या वचनासी । विठोबा राहिला क्षेत्रवासी । आषाढी कार्तिकी पंढरीसी । वारी नेमेंसीं चालवी ॥ ११ ॥ विष्णु अर्चन हरीकीर्तन । सर्वदा करी नामस्मरण । ऐसें लोटता बहु दिन । परी पोटीं संतान न होय ॥ १२ ॥ मग एकदां पुसे कांतप्रती । उदास झाली माझी वृत्ती । तरी संन्यास घ्यावया निश्चितीं । आज्ञा मज प्रती देईं कां ॥ १३ ॥ रखुमाबाई न बोलेचि वचन । पितयासि सांगे वर्तमान । म्हणती पुत्र जाहल्यावीण । आज्ञा न देणें सर्वथा ॥ १४ ॥ तों रखुमाबाई दुश्चित असतां अंतरा । विठोबा पुसे त्या अवसरा । मी स्नानासि जातों गंगातीरा । जावें सत्वरा म्हणतसे ॥ १५ ॥ निरोप लाहोनिया निमित्त । वाराणसीस गेला त्वरित । स्नान करूनि अनुताप युक्त । पुराण ऐकत बैसला ॥ १६ ॥ तेथें गीता व्याख्यान करितां थोर । संन्यास महिमा ऐकिला फार । मग म्हणे पुरे हा संसार । अनंत अपार दुःख राशी ॥ १७ ॥ श्रीपादाश्रमी संन्यासी । सद्भावें शरण गेला त्यांसी । म्हणे दीक्षा अनुग्रह देऊनि मजसी । आपुले सेवेसी लावावें ॥ १८ ॥ पूर्व अनुसंधान पुसतां त्यास । म्हणे मी एकला एकट असें । दारा पुत्र

1 जांवई. 2 पांडुरंगास. 3 इच्छा. 4 उत्तम. 5 पत्नी.

नाहीं पाश । मग अनुग्रह तयास दीधला ॥ १९ ॥ विठ्ठले संन्यास घेतल्यावरी । देशींचे आले यात्रेकरी । त्याणी वृत्तांत सांगता सत्वरी । सिदोपंत अंतरीं उद्विग्न ॥ १२० ॥ रखुमाबाई चिंतातुर तेव्हां । म्हणे आतां कोणता उपाय करावा । मग अश्वत्याची मांडिली सेवा । सप्रेम भाव धरूनी ॥ २१ ॥ उग्र अनुष्ठान करिता थोर । तिसीं पावला लक्ष्मीवर । श्रीपाद संन्यासी पारावर । बैसले सत्वर येऊनी ॥२२॥ रखुमाई देखोनि यतीश्वर । सद्भावें केला नमस्कार । पुत्रवती होई सत्वर । इतुकें उत्तर बोलिले ॥ २३ ॥ रखुमाई हांसे तयेक्षणीं । श्रीपाद पुसती तिज लागुनी । माते कां हांसलीस ये क्षणीं । हें मज लागोन सांगावें ॥२४॥ म्हणे भ्रतार[1] जावोनि वाराणसी । तो तंव जाहला संन्यासी । तुम्ही आशिर्वाद दीधला मजसी । सत्य वचनासी केविं होय ॥२५॥ तरुण स्त्री संतानहीन । ऐसियासि संन्यास दीधला ज्याणें । तरी गुरुशिष्य उभयतां कारणें । दंड करणें शास्त्ररीतीं ॥ २६ ॥ खाणाखुण पुसतां निवाडे । तो शब्द येतसे आपणाकडे । म्हणे पुसावयासी गेलों कोडें । तों वेहरण मजकडे आलें कीं ॥२७॥ रखुमाईस पुसिलें ते क्षणी । तुझीं आप्तें[2] आहेत कोणी । ते म्हणे सर्व आहेत याठिकाणीं । मग पितयासि घेउनी ती आली ॥ २८ ॥ सिदोपंती करूनि नमस्कार । घरासि नेला यतीश्वर । अर्घ्य पाद्य करूनि उपचार । भोजन सत्वर सारिलें ॥२९॥ श्रीपाद म्हणती ते अवसरी । आमुचा मठ काशीपुरीं । हेत धरूनि रामेश्वरीं । अळंकापुरीं पातलों ॥१३०॥ तों तुमचे आत्मजेनें येथ । साकल्य सांगीतला वृत्तांत । आतां वाराणसीस[3] फिरोनि त्वरित । जाणें लागत आम्हांसी ॥ ३१ ॥ तुम्ही रखुमाईस बरोबर । घेऊनि चलावें सत्वर । इच्या दोषें साचार । सुकृतँ[4] हरे आमुचें ॥ ३२ ॥ ऐसें बोलितां संन्यासी । सिदोपंत संतोषे मानसीं । सवें घेऊनि निज कन्येसी । आनंद वनासीं पातले ॥ ३३ ॥ विठोबास दीधला संन्यास । तेव्हां चैतन्य नाम ठेविलें त्यास । बाहेर बैसवोनि सिदोपंतास । सद्गुरु पुसतसे त्या लागीं ॥ ३४॥ तुझीं कोणी होतीं घरीं । हें सत्यचि सांग ये अवसरी । चैतन्य भयभीत अंतरीं । मधुरोत्तरीं बोलत ॥ ३५ ॥ चरणीं ठेवूनियां माथा । म्हणे स्वामी त्यागूनि आलों कांता । मग रखुमाईस बोलावूनि तत्वता । म्हणे अंगीकार आतां करी इचा ॥ ३६ ॥ अविधि कर्माचें भय मानसीं । सर्वथा न धरी चित्तासी । आमुची आज्ञा प्रमाण तुजसी । हृषीकेशी साह्य असे ॥ ३७ ॥ ऐसें सद्गुरूंनीं सांगतां । चैतन्यें चरणीं ठेविला माथा । मग हातीं धरूनि निजकांता । जाहला निघता तेथुनी ॥ ३८ ॥ मग येऊनि अळंकापुरीं । गृहस्थाश्रम अंगीकारी । स्वयाती निंदिती नाना परी ॥ वाळीत सत्वरीं घातलें ॥ ३९ ॥ जन निंदेचे येतां लोट । शांति सागरीं भरितसे घोंट । काम क्रोधांची मोडली वाट । करणी अचाट निरुपम ॥ १४० ॥ भिक्षा मागोनि नगरांत । अन्न मेळवी पोटा पुरतें ॥ कोपटं[5] बांधूनि अरण्यांत । कांतेसहित राहिला ॥४१॥ बारा वर्षें लोटतां ऐसीं । तिघे पुत्र जाहले त्यासी । एक कन्या गुणराशी । तिच्या उपमेसी असेना ॥ ४२ ॥ प्रथम अवतार मृडानी

१ पति. २ नातलग. ३ काशीस. ४ पुण्य. ५ झोपडी.

पती । त्याचें नाम ठेविलें निवृत्ति । विष्णु अवतार जन्माला क्षितीं । तयासि म्हणती ज्ञानदेव ॥४३॥ विरंचि[2] अवतार सोपान । आदिमाय मुक्ताई जाण । ऐसें होतांचि संतान । संतोष मन रखुमाईचें ॥ ४४ ॥ मग भ्रतारासी बोले उत्तर । मुलें तों जाहलीं उपवर । तरी ब्राह्मण मेळवूनियां थोर । व्रतबंध विचार पुसावा ॥४५॥ मग ब्रह्मसभा करूनिया थोर । तयांसि केला नमस्कार । म्हणे धर्मशास्त्र पाहूनि सत्वर । आम्हांसि विचार सांगावा ॥ ४६ ॥ सांगाल जैसें प्रायश्चित्त । तें माहीजण करूं निश्चित । ऐसी ऐकूनियां मात । शास्त्र पंडित बोलती ॥ ४७ ॥ तुवां संन्यास घेतल्यावर । केला कांतेचा अंगीकार । तरी देहांत प्रायश्चित बोलिलें थोर । आणखी विचार असेना ॥ ४८ ॥ ऐसी ऐकूनियां वाणी ॥ अनुताप जाहला तये क्षणीं । दारापुत्र सर्व टाकूनी । आनंद वनीं चालिला ॥४९॥ मग एकमेकासीं विप्र बोलत । अनुताप हेंचि प्रायश्चित्त । गुरुकृपेनें अकस्मात । शुचिर्भूत झाला कीं ॥१५०॥ मग ब्राह्मणांसि म्हणतसे निवृत्ती । माता पिता गेलीं निश्चिती । आम्हां चौघां कोण गती । ते समस्तीं सांगिजे ॥५१॥ ऐकोनि म्हणती द्विजवर । तुम्ही प्रतिष्ठानासि जावें सत्वर । तेथील न्याय करितील विप्र । तें प्रमाणपत्र आम्ही मानूं ॥ ५२ ॥ ब्राह्मण श्रेष्ठ होते थोर । त्यांणीं पैठणकरांसि दीधलें पत्र । हें संन्यासि याचें पोटिचे पुत्र । प्रायश्चित्त साचार सांगावें ॥ ५३ ॥ पत्र घेऊनि आपुलें हातीं । ब्राह्मणासि नमस्कार केला प्रीती । गोदातीरासि सत्वर येती । चाऱ्ही मूर्ती निजभावें ॥ ५४ ॥ गंगा उतरूनियां त्वरित । स्नान करिती अनुतापयुक्त । म्हणती दीन पतित अनाथ । उद्धरी माते आम्हांसी ॥ ५५ ॥ स्नान करूनि ऐशा रीतीं । क्षेत्रामाजी प्रवेशती । मग ब्राह्मणांसि नमस्कार करूनि प्रीती । वृत्तांत सांगती तेधवां ॥ ५६ ॥ पत्र वाचोनियां सत्वर । समस्तांसि कळला विचार । हे तो संन्यासियाचे पुत्र । शास्त्रीं विचार पाहती ॥५७॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई गुणनिधान । चौघे उभे कर जोडून । बैसले ब्राह्मण त्यांपुढें ॥ ५८ ॥ ग्रंथाभाष्या पाहोनि त्वरित । ब्राह्मण तयांसि उत्तर देत । शास्त्र पाहतां प्रायश्चित्त । नाहीं दीसत तुह्मांसी ॥ ५९ ॥ परी तरणोपाय व्हावया जाण । एक आहे सिद्धांत खूण । तुह्मी श्रीहरीसि जाऊनि शरण । अनुतापें भजन करावें ॥ १६० ॥ ब्रह्मभाव धरूनि चित्तीं । भावें वंदाव्या सकळ याती । अंत्यजही देखिल्या क्षितीं । दंडवत प्रीतीं घालावें ॥ ६१ ॥ गोखर अजा आणि श्वान । ये स्थळीं सारिखें चैतन्य घन । म्हणोनि वंदावे निज प्रीतीनें । अभेदपणें मानसी ॥ ६२ ॥ आणिक श्रीहरीचे गुणानुवाद । गावे ऐकावे सप्रेम छंद । तेणें चित्तासि होऊनि बोध । निर्वाणपद पावती ॥ ६३ ॥ ऐसी ऐकूनि विप्रवाणी । निवृत्तिराज संतोषे मनीं । ज्ञानदेव सोपान तये क्षणीं । म्हणती उत्तम स्वामीनीं सांगीतलें ॥ ६४ ॥ ऐसें ऐकूनि नामाभिधान । काय म्हणती ब्राह्मण । ज्ञानदेव तुमचें नामाभिधान । काय पाहोन ठेविलें ॥ ६५ ॥ श्रुतीचा अभ्यास केला प्रीतीं । किंवा शिकला पुराण व्युत्पत्ती । म्हणूनि ज्ञानदेव तुह्मांसि म्हणती । ऐसें बोलती धरामर ॥ ६६ ॥ मग

१ पृथ्वीवर. २ ब्रह्मदेव. ३ ब्राह्मण.

परस्परें बोलती उत्तर । काय प्रमाण नामावर । अमुत्रा रेडा येतसे थोर । पखाल त्यावर घातली ॥ ६७ ॥ त्याचेंही ज्ञान नामाभिधान । ऐसें बोलतांचि ब्राह्मण । मग ज्ञानदेव बोलती वचन । आत्मा परिपूर्ण तो माझा ॥ ६८ ॥ रेडिया आणि अम्हांत कांहीं । भेद पाहतां किंचित् नाहीं । तों विप्र बोलती ते समयीं । तरी चमत्कार कांहीं दाखवा ॥६९॥ रेडिया तुम्हांत नाहीं भेद । तरी याच्या मुखें बोलवा वेद । ऐकोनि द्विजवरांचे शब्द । भक्त अभेद काय करिती ॥ १७० ॥ रेडियाचे मस्तकीं ठेऊनि हात । म्हणती वेद बोलावे त्वरित । तों कौतुक वर्तलें अद्भुत । ब्राह्मण समस्त ऐकती ॥ ७१ ॥ वेदाचा आरंभ ते अवसरीं । स्वमुखें पशु करितसे सत्वरीं । विधि उपन्यास वदे वैखरी । आश्चर्य अंतरीं करिताती ॥ ७२ ॥ चाऱ्ही वेद बोलोनि मुखीं । सकळ द्विजां केलें सुखी । ऐसें कौतुक मृत्युलोकीं । न देखों शेखीं सर्वथा ॥७३॥ आम्ही उपनिषद्भाग समस्त । पढिंनलों असें वेदांत । परी आंगी ऐसें सामर्थ्य । नाहीं किंचित सर्वथा ॥७४॥ हे परलोकींचे तारू सत्य । देवत्रय मूर्तिमंत । यांसि कासया प्रायश्चित्त । जगदुद्धारार्थ अवतरले ॥७५॥ आम्ही आणिकासी सांगो फार । परी आपण नाचरों अणुमात्र ॥ प्रतीष्ठा मानसीं साचार । इच्छितां समग्र जन्म गेला ॥ ७६ ॥ ऐसा अनुताप धरूनि मनीं । विप्र येती लोटांगणीं । मग ज्ञानदेव उठवी तयांलागुनी । मिठी चरणीं घालीतसे ॥ ७७ ॥ सप्रेम भाव धरोनि प्रेमा । म्हणे स्वामींच्या पायांचा महिमा । सामर्थ्य सर्वथा नसेचि आम्हां ॥ श्रीआत्मारामा विदित ॥ ७८ ॥ ऐका सभाग्य श्रोतेजन । आठवा मागील अनुसंधान । प्रतिष्ठानीचा जो ब्राह्मण । चांगदेवासि निरूपण सांगतसे ॥ ७९ ॥ विप्र म्हणतसे तये वेळां । ऐसी तयाची अगाध लीला । म्यां साक्षात कौतुक पाहिलें डोळां । तें तुम्हां जवळां सांगीतलें ॥ १८० ॥ ऐसी ऐकोनियां कथनी । चांगदेव आश्चर्य करिती मनीं । सप्रेम अश्रु लोटती नयनीं । अघटित करणी ऐकोनियां ॥ ८१ ॥ म्हणे आम्हींही अभ्यास केला बहुत । चौदा विद्या मुखोद्गत । चौसष्ट कळा ही अवगत । परी हें सामर्थ्य असेना ॥ ८२ ॥ काळ वंचना करोनि निश्चित । वांचलों वर्षे चौदा शत । सिद्धाई दाखविली बहुत । परी हें सामर्थ्य असेना ॥ ८३ ॥ ब्राह्मण म्हणे चांगया कारणें । आणिक चरित्र वर्तलें गहन । तें यथार्थ सांगतों तुम्हा कारणें । सादर श्रवण करावें ॥ ८४ ॥ निवृत्ति ज्ञानदेव पाहीं । सोपान आणि मुक्ताबाई । एक्या ब्राह्मणाचे गृहीं । राहिले सर्वही सुखरूप ॥ ८५ ॥ तो गृहस्थ भाविक होता थोर । उदार आणि सत्ववीर । जाणोनि ईश्वरी अवतार । करीतसे आदर तयांचा ॥८६॥ भोजन आणि उपहार । घालीतसे नाना प्रकार । रात्रीं होतसे कीर्तन गजर । लोक समग्र ऐकती ॥ ८७ ॥ एक मास लोटतां त्याचे घरीं ॥ तों पितृतीथ आली सत्वरीं । साहित्य करूनि बरव्या परी । गेला घरीं ब्राह्मणाच्या ॥८८॥ म्हणे आजि वडिलांची पुण्यतीथ । तुम्ही भोजनासि यावें निश्चित । ऐसें विनवितांचि गृहस्थ । उपाध्ये बोलत काय त्यासीं ॥ ८९ ॥ संन्यासियाचीं मुलें पाहीं । तुवां ठेविलीं आपुले गृहीं । कर्म मार्गी

बुडविला तिहीं । ऐकतां सर्वही हरि कथा ॥ १९० ॥ यास्तव तुझिया गृहासीं । आम्ही न येवों आजि भोजनासीं । ऐसें बोलतां ब्राह्मणासीं । गृहस्थ मानसीं चिंतातुर ॥ ९१ ॥ मग येऊनि आपुलें सदनीं । उगाचि निवांत बैसला शंकोनी । ज्ञानराज पुसती त्या लागोनी । चिंता मनीं किमर्थ ॥ ९२ ॥ म्हणे आजि वडिलांचीं पुण्यतीथ । ब्राह्मण भोजनासि नाही येत । यास्तव होऊनि चिंताक्रांत । उगाचि निवांत बैसलों ॥९३॥ ज्ञानदेव विष्णूची साक्षात । जाणती सर्वांचें मनोगत । म्हणती आमुचें वास्तव्य आहे येथें । घातलें वाळी तयासाठीं ॥९४॥ तुम्ही उद्वेग न धरोनि चित्तीं । घरीं करावी पाकनिष्पत्ती । साक्षातपितर भोजनासि येती । श्रीसद्गुरु निवृत्ती प्रसादें ॥९५॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती । गृहस्थ हर्षयुक्त चित्तीं । स्वयंपाक करोनि नाना रीतीं । पूजा आयती सिद्ध केली ॥ ९६ ॥ तिळदर्भ तुळसी सुमन । यव अक्षता गोपीचंदन । धोत्रजोडे दक्षिणा सुवर्ण । साहित्य संपूर्ण आणिलें ॥ ९७ ॥ घरधनी करोनि स्नान । पितरासि मांडिले आसन । कुतुपकाल होतांचि पूर्ण । जाहलें विंदान अघटित ॥ ९८ ॥ आगत म्हणतां ज्ञानदेव । कौतुक वर्तलें अभिनव । साक्षात पितर उतरले सर्व । सप्रेम भाव तयांचा ॥ ९९ ॥ पितर स्वरूपी जनार्दन । आसनावरी बैसती येऊन । विधियुक्त मंत्र म्हणोन । गृहस्थ पूजन करीतसे ॥ २०० ॥ वेदघोषाची उमटतां ध्वनी । गांवींचे ब्राह्मण विस्मित मनीं । माड्या माळवदीं उभे राहोनी । मग विलोकूनी पाहती ॥ १ ॥ तो देह धरोनि साक्षात । पितर जेवीत बैसले तेथ । म्हणती ज्ञानदेव परब्रह्म मूर्तिमंत । करणी विचित्र पें त्याची ॥ २ ॥ पशुमुखें वदविल्या श्रुती । साक्षात पितर आणिले [१]क्षीतीं । विश्वोद्धार करावया प्रांती । अवतार संतीं घेतला ॥३॥ आपण धरोनि कर्माभिमान । वायांचि टाकिलें आमंत्रण । तों आंगेंचि येऊनि पितृगण । दक्षिणा घेऊन गेले की ॥ ४ ॥ असो इकडे गृहस्थानें । पितर पूजिले यथाविधीनें । जें जें रुचे तें तें सेविती अन्न । ऐसें महिमान संतांचें ॥ ५ ॥ सकळांसी तृप्ति झालिया जाणा । दीधली कर शुद्धि तांबूल दक्षिणा । स्वस्थाने वास बोलतां वचना । आपुल्या स्थाना ते गेले ॥ ६ ॥ सकळ पैठणीचे द्विजवर । स्तव करिती वारंवार । म्हणती ज्ञानदेवा तुझा पार । विरंचि[२] हर नेणती ॥ ७ ॥ दोन मास पैठणीं राहून । करिती वेदांत व्याख्याने । रात्रीं करिती हरि कीर्तन । सप्रेम जन वेधले ॥ ८ ॥ रेडा स्वमुखें वदला श्रुती । तो मागून घेतला ब्राह्मणां प्रती । मग सकळांसि पुसो निश्चितीं । आळंदीसि जाती चौघेजण ॥ ९ ॥ ब्राह्मण म्हणे चांगयास । या गोष्टीस लोटला एक मास । मी साक्षात पाहूनी दृष्टीस । तुमचे भेटीस पातलो ॥ २१० ॥ ऐसी ऐकूनि विप्रवाणी । चांगदेव विस्मित झाले मनीं । म्हणती अघटित ईश्वराची करणी । एकाहूनी एक विशेष ॥ ११ ॥ माझें गायन रसाळ पूर्ण । हा नारदासि चढला अभिमान । मग अस्वला मुखें श्रीकृष्ण । राग संपूर्ण आळविले ॥ १२ ॥ कां माझें पात्र बहु थोर । ऐसें बोलिला रत्नाकर । मग त्याचे अगस्ति मुनिवरें । आचमन सत्वर केलें कीं ॥ १३ ॥ मीच

१ पृथ्वीवर. २ ब्रह्मदेव.

एक सृष्टीचा कर्ता। ऐसें बोलिला विधाता। मग विश्वामित्रें आपुल्या सत्ता। सकळ पदार्थ निर्मिलें ॥ १४ ॥ माझें रूप सुंदर म्हणोनी। सत्यभामेसि अहंता मनीं। मग जानकीचें रूप धरितां रुक्मिणी ॥ बैसली होउनी गर्व रहित ॥१५॥ तेवीं आम्हीं सिद्धाई केली बहुत। वर्षे वांचलों चौदा शत। परी ज्ञानदेवाची करणी अघटित। ऐकोनि चित्त मुरालें ॥ १६ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ पूर्ण। वदवित श्रीरुक्मिणी रमण। महीपति त्याचा बंदिजन। गातसे सद्गुण कीर्तनीं ॥ २१७ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ। श्रवणेंचि पुरती मनोरथ। प्रेमळ परिसोत भाविक भक्त। तृतीयाध्याय गोड हा ॥ २१८ ॥ ॥ अध्याय तृतीय संपूर्ण ॥ अ० ॥ ३ ॥ ओ० ॥ २१८ ॥ ॥ ६ ॥

अध्याय ४



श्रीगणेशायनमः ॥ विस्तीर्ण मेळवूनि पारडें । पृथ्वीचें वचन होईल कोडें । परी भगवद्भक्तांचे पंवाडे । वर्णिले कोरडे न जाती ॥ १ ॥ समुद्राची गर्जना मोठी । तयालही सांगवतील गोष्टी । परी भगवज्जनांची कीर्ति मोठी । वर्णितां हिंपुटी कवि होती ॥ २ ॥ समोर चंचळ असे बहुत । तो ही कोंडवेल पिंजरियात । परि विष्णुदासांची अनुपम स्थित । वर्णितां कुंठित होय वाणी ॥ ३ ॥ आकाशासि देववेल आधार । अस्तासि जातां धरवेल भास्कैर । परी भगवद्भक्तांचें सारें चरित्र । ग्रंथीं साचारें लेहवेना ॥ ४ ॥ पृथ्वीवरील तृणांकुर जाणा । याचीही टीप देववेल कोणा । परी देवभक्तांची चरित्रें नाना । यांची गणना न होय ॥ ५ ॥ ऐसी अपार ज्याची कीर्ती । तेथें महाकवींची कुंठित मती । तेथें वल्गना करीं मी मूढमती । हा अपराध संतां क्षमा कीजे ॥ ६ ॥ जैसें माते पुढें लाडकें डिंगर । भलतींचें बोले अवाक्षर । तयासि कौतुक वाटे फार । लोभा पर मग होय ती ॥ ७ ॥ सांगीतलें काम करी चाकर । तोचि स्वामीसि आवडतो फार । शहाणा वाद घालितो थोर । तो दृष्टी समोर आवडेना ॥ ८ ॥ तैसें माझें अज्ञानपण । जाणोन तुष्टला रुक्मिणी रमण । संत चरित्रें गुप्त ठेवण । ते दीधलें धन मज हातीं ॥ ९ ॥ तो हृदयस्थ राहोनि निरंतर । जितका करी बुद्धीचा प्रेमर । तोचि ग्रंथीं लिहितों अक्षर । आणिक विचार असेना ॥ १० ॥ मागिले अध्यायीं कथा कोण । प्रतिष्ठान क्षेत्रांचा जो ब्राह्मण । ज्ञानदेवाचें चरित्र बोलेन । केलें निवेदन चांगदेवा ॥११॥ वेद बोलविले रेड्या हातीं । आणि पितृलोक उतरविला क्षितीं । ऐसी ऐकूनि सत्कीर्ती । मग विस्मित चित्तीं मरुद्गण ॥१२॥ सत्य असत्य म्हणवोनि । ऐसा संशय वाढला मनीं । मग प्राणायाम करूनि त्यांनीं । एकाग्र मनीं बैसले ॥ १३ ॥ ब्रह्मांड भुवनीं झालें काय । हें योगेश्वर विचारूनि पाहे । तों तिन्ही देवाचे अवतार होय । आला प्रत्यय मनासीं ॥ १४ ॥ रेडिया हातीं प्रतिष्ठानीं । वेद बोलविले ज्ञानेश्वरांनीं । आणि पितर साक्षात आणिलें मेदिनीं । हेही करणी साच दिसे ॥ १५ ॥ ऐसा विश्वीं विश्वरूप होऊनि सत्वर । ध्यानांत पाहे योगेश्वर । अंतरीं प्रत्यय येतांचि सत्वर । स्वदेहावर मग आले ॥ १६ ॥ शिष्यसंप्रदायी योगेश्वर ॥ आणिक यात्रा मिळाली अपार ॥ चांगदेव टाकूनि अहंकार ॥ तयांसी उत्तर बोलतसे ॥ १७ ॥ म्हणे ऐका सकळ लावूनि प्रीती ॥ आमुची मागील कर्मगती ॥ इंद्रें शापिलें आम्हांप्रती । अपराध चित्तीं जाणोनियां ॥ १८ ॥ पुढती तुष्टोनि पुरंदरें ॥ उश्शाप दीधला मज सत्वर ॥ तिन्हीं देवाचें अवतार ॥ होतील साचार क्षितीवरी ॥ १९ ॥ तूं त्यांसि शरण जातां देख ॥ मग मुक्त होशील तात्काळिक ॥ आपुला पावोनि स्वर्ग-लोक ॥ पूर्ववत सुख भोगिसी ॥ २० ॥ ऐसें बोले पुरंदर ॥ मग आम्ही उतरलों क्षितीवर ॥ येथें योगसाधन करोनि थोर ॥ सिद्धाई फार दाखविली ॥ २१ ॥ ज्ञानदेवाचे पहावया पाय ॥ चौदाशें वर्षे वांचविला देह ॥ तयाचा अवतार जहाला आहे ॥ तरी जावें लवलाहें भेटीसी ॥ २२ ॥ ऐकोनि चांगयाचें उत्तर ॥ शिष्य जाहले चिंतातुर ॥ म्हणती स्वामीसी भेटतां ज्ञानेश्वर ॥ जातील सत्वर मोक्षपदा

१ वारा. २ सूर्य. ३ पृथ्वीवर. ४ इंद्र.

॥ २३ ॥ यांतें पंक्तीस येतसे मुक्ती ¹। नानापरीचे पदार्थ मिळती । म्हणोनि चांगदेवासी बोलती प्रीतीं । अडखळा घालिती जावया ॥ २४ ॥ जैसा बळी वामनासि रिघतां शरण । तों शुक्र चिंताक्रांत मनें । म्हणे मोक्षपदा नेल्या याजकारणें । मग कुटुंब पोषण कोण करी ॥ २५ ॥ म्हणोनि संकल्प घालितां त्याजला । कवि घालीतसे अडखळा । तैसा सेवकांनी चांगयाला । उपाय रचिला तो ऐका ॥२६॥ म्हणती दुसऱ्याची कीर्ति ऐकोनि पाहे । स्थान भ्रष्ट सर्वथा होऊं नये । तेणें महत्वासि हानि होये । हीनत्व येता हे आपणासी ॥२७॥ सिद्धाईच्या प्रकार रीती । अनेक योग्यांच्या भिन्न असती । याजकरितां सांगतों युक्ती । ती स्वामी ऐकती तरी बरें ॥२८॥ आधीं ज्ञानदेवासि सत्वर । आपल्या हातें लिहावें पत्र । त्याचें उत्तर आलियावर । मग सत्वर बीजें कीजे ॥ २९ ॥ ऐशा ऐकूनि वचनोक्ति । योगेश्वरासि मानलें चित्तीं । मग दौत लेखणी आणोनि प्रीती । विचार करीती मनांत ॥ ३० ॥ हातीं घेवोनियां पत्र । लेखनार्थ करी विचार । म्हणे श्रेष्ठत्वें यासि ल्याहावे जर । तरी बाळत्वें साचार वय त्याचें ॥ ३१ ॥ कनिष्ठ लेखावें आपणाहुनि । तरी असाध्य करणी दाखविली जनीं । लहान म्हणों नये अग्नी । लाधतां इंधनी थोर होय ॥ ३२ ॥ आवरोंनि वसुंधरा धरिली पाहे । त्या वासुकीस किरडूं म्हणों नये । इतर गाई समान पाहे । तैसी नव्हे कामधेनु ॥ ३३ ॥ उगमीं गंगेचें लहान पात्र । परी तिच्या उदकें समुद्र । पक्षिया ऐसा दिसे खगेंद्र । तरी वागवी पाठीवर विष्णूतें ॥ ३४ ॥ दशरथाचा बाळ रामराणा । त्यानें शिक्षा केली दशानना । श्रीकृष्ण यशोदेचा तान्हा । परी नखीं गोवर्धना उचालिलें ॥ ३५ ॥ परब्रह्म अणुरेणूहूनि सान । परी तयाचे रोमरंध्रीं त्रिभुवन । तैसें ज्ञानदेवाचें वय लहान ॥ परी अघटित विंदानें दाखविलें ॥३६॥ म्हणोनि विचार पडला चित्तीं । पत्र ल्याहावें कैशा रीतीं । मग दोघां शिष्यांहातीं । कोराची पाठविती कागद ॥ ३७ ॥ म्हणे ज्ञानदेवासि ल्याहावया पत्र । बुद्धि न सुचे अणुमात्र । तटस्थ राहिले घटका चार । मग कोरेंच पत्र दिधलें ॥ ३८ ॥ स्वमुखें सांगतसे शिष्यांसी । तुम्हीं जावें आळंदीसीं । त्या चौघा जणांची स्थिती कैसी । तेही ध्यानासी आणावी ॥३९॥ कोण उपासना कैसी भक्ती । स्नान संध्या कैसी करिती । कैसा साक्षात्कार तयांप्रती । ऐसें चित्तीं ओळखावें ॥ ४० ॥ कोणतें शास्त्र केलें पठण ॥ कैसें करिती अध्ययन । कोणतें पुराण श्रवण मनन । हेंही संपूर्ण पहावें ॥ ४१ ॥ कैशा रीतीं भूतदया । कैसी पाहाती वैष्णवी माया ॥ कोणत्या योगें दमिती इंद्रियां ॥ तपश्चर्या ते कोणती ॥ ४२ ॥ कैसी जनांत दाखविती स्थिती । योगक्षेम चालले कोणे रीतीं ॥ कोणत्या त्याणीं साधिल्या युक्ती । ऐसें चित्तीं समजावें ॥४३॥ कोणत्या विद्या कोणत्या कळा ॥ कैसी त्यांची दिसती लीला । कोणत्या सिद्धीचा सोहळा । जनांच्या डोळां दाखविती ॥४४॥ ऐसें सांगोनी नानापरी । पत्र दीधलें त्याचे करीं । म्हणे सत्वर जाऊनि अळंकापुरी । उत्तर माघारीं घेऊनि या ॥४५॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान। अवतारी पुरुष तिघे जण । मुक्ताबाई समवेत पूर्ण । आमुचें नमन त्यांसि सांगा

१ अडथळा आणणे. २ जाता. ३ गरुड. ४ चमत्कार.

॥४६॥ ऐसे सांगोनि योगेश्वर । त्याचे मस्तकीं ठेविला कर । करूनि साष्टांग नमस्कार । निघाले सत्वर उभयतां ॥४७॥ चित्तीं धरूनियां प्रेम ॥ स्मरती चांगयाचे नाम । तेणें पूर्ण होती सकळ काम । जीवासि आराम वाटतसे ॥ ४८ ॥ आसनीं शयनीं आणि भोजनीं । जागृतीं आणि सुषुप्तीं स्वप्नीं । या अवस्था विसर न पडोनि । सद्गुरु वांचोनि सर्वथा ॥ ४९ ॥ प्रयाणासि घटका एक झाली । तों चांगदेवें कांहीं कळा केली । एकाएकींच आळंदी लागली । परी नाहीं वोळखिली सर्वथा ॥५०॥ गांवींच्या लोकांसि पुसती ब्राह्मण । काय क्षेत्राचें नामाभिधान । पुढें नदी वाहतसे कोण । हें आम्हां कारणें सांगिजे ॥ ५१ ॥ मग ग्रामवासी देती उत्तर याचें नाम अळंकापुर । पुढें इंद्रायणी तीर्थ थोर । महिमा अपार येथिंचा ॥ ५२ ॥ मग विस्मित होवोनियां चित्तीं । ग्रामवासी लोकांस पुसती । तपती चांगदेव येथोनि किती । हें आम्हांप्रती सांगावें ॥ ५३ ॥ ग्रामवासी बोलती जन । तपती चांगदेव अडतीस योजन । आम्हींही गेलों होतो जाण । चांगदेव दर्शन घ्यावया ॥ ५४ ॥ घटिकेंत दीडशें कोस पंथ क्रमिला । याचा विस्मयो कासयाला । स्वामींचे आंगीं ऐसीच कळा । आम्हीं प्रत्यक्ष डोळां देखिली ॥ ५५ ॥ ऐसें क्षेत्रवासी जन । सांप्रदायांसी बोलती वचन । मग ते दोघे ब्राह्मण । करिती स्नान इंद्रायणीं ॥ ५६ ॥ नित्यनेम सारोनि बरवा । गांवांत प्रवेश करिती तेव्हां । ज्ञानदेवाचें दर्शन होईल केव्हां । आवडी जीवा हे बहु ॥ ५७ ॥ तों एक विष्णुस्वरूपी द्विजवर । भेटला तयांसि वाटेवर । तयासि पुसती ज्ञानेश्वर । राहती तें घर सांगावें ॥ ५८ ॥ खाणाखुणा पुसोनि चोहटा । सत्वर चालिले त्यांच्या मठा । तों तेथे चमत्कार देखिला मोठा । तो कर्ण संपुटा ऐकिजे ॥ ५९ ॥ चांगयाचे शिष्य दृष्टीसीं । देखतांचि कळलें ज्ञानियासीं । मग सहज बोलती निवृत्तिसीं । द्यावें मजसीं अवधान ॥ ६० ॥ मृत्युलोकीं अवतार पूर्ण । जया लागीं धरिला आपण । त्या चांगदेवाचें दर्शन । होईल दिसोन येतसे ॥ ६१ ॥ वटेश्वर सिद्ध महापुरुष । त्यानें पाठविले दोघे शिष्य । पत्रही धाडिलें आपणास । परी कोरेंचि असे अद्यापि ॥ ६२ ॥ ऐसें बोलतां ज्ञानेश्वर । तों तेही आले सन्निध सत्वर । जवळ ठाकोनि दोघे विप्र । साष्टांग नमस्कार घालिती ॥ ६३ ॥ ज्ञानराज म्हणती त्याजकारणें । तुम्ही आलेती तपतीहून । कोरेंच पत्र आम्हां कारण । चांगदेवानीं पाठविलें ॥६४॥ ऐसें म्हणतांचि ते वेळे । ब्राह्मण तेव्हां विस्मित झाले[1] । म्हणती तुम्ही परब्रह्म पुतळे । जीवींचें सकळ जाणतसां ॥ ६५ ॥ आम्हीं न सांगता आणुमात्र । तुम्हांसि कळला समाचार । तिन्ही देवांचे अवतार । जगदुद्धार करावया ॥ ६६ ॥ जैसी ऐकिली सत्कीर्ति । त्याहूनि विशेष तुमची स्थिती । मग कोरा कागद घेऊनि प्रीतीं । पुढें ठेविती तेधवां ॥ ६७ ॥ तो ज्ञानदेवें घेऊन सत्वरा । मागें पुढें दिसतसे कोरा । मग निवृत्ति राजासी बोलती उत्तरा । यावरी अक्षर एक नाहीं ॥ ६८ ॥ हा पाठवावयासि कारण काय । स्वामी सांगि जे लवलाहें[2] । ऐसें ऐकूनि निवृत्तिराय । उत्तर काय ते देती ॥ ६९ ॥ म्हणती मरुद्गणाचा

१ आश्चर्यचकित. २ लक्ष.

अवतार । तो हा चांगा वटेश्वर । उतरला कर्मभूमीवर । ऐका चरित्र तयाचें ॥ ७० ॥ चौदा विद्या अभ्यासून । चौसष्टी कलेंत झाला प्रवीण । अष्टांग योग साधिले त्याणें । सिद्धि पूर्ण वश केल्या ॥ ७१ ॥ काळाचीच पेट लगतां त्यांसी । आत्मा नेतसे ब्रह्मांडासी । चौदाशें वर्षे वंचना ऐसी । स्वदेहासी रक्षिलें ॥७२॥ ऐसा चांगदेव सिद्ध थोर । त्याचा ब्रह्मादिकां नकळे पार । जाणे जीव मात्राचे अंतर । स्वर्गीचे उत्तर तें ऐके ॥ ७३ ॥ चौदाशें वर्षे श्रम केला । काळापासून नरदेह रक्षिला । आंगी सिद्धाईचा ताठा भरला । सबाह्य वेष्टिला अहंकारें ॥७४॥ परंतु ब्रह्मज्ञानाची कळा । स्वप्नींहीं नये त्याच्या डोळा । ये विषयीं तो असे आंधळा । म्हणोनि अवकळा अवघ्याची ॥७५॥ जैसी विधवा कुंकुमें विण । अलंकार ल्लेत संपूर्ण । परी कंठीं गळसरी नसतां जाण । ते अश्लाघ्य वाणें जगांत ॥ ७६ ॥ सकळ नक्षत्रें गगनीं असती । परी उगवला नाहीं निशापती । तरी शोभा न दिसे राती । तैसीच गती चांगयाची ॥ ७७ ॥ हत्ती घोडे रहंवर । सेना शिपाई असती फार । परी एकला नाहीं नृपवर । तरी शोभा अणुमात्र असेना ॥ ७८ ॥ कमळ पत्रा ऐसे नेत्र । दृष्टीसी पाहती सर्वत्र । परी तयासि न दिसे अणुमात्र । तैसा विचार चांगयाचा ॥ ७९ ॥ शरीर गोरें आणि तरुण । आंगीं संपूर्ण वर्त्तीस लक्षण । परी एकला आंत नसतां प्राण । तरी ठेवील कोण त्या लागीं ॥ ८० ॥ तैसाचि वटेश्वर योगिया । सकळ सिद्धी अनुकूळ तया । परी एक आत्मज्ञानें वीण वायां । व्यर्थचि काया वांचविली ॥८१॥ बाह्यज्ञान असे बरवर । त्यासही लागला असे अहंकार । जैसी गाई दुग्धे भरली घागर । त्यांत लवण अणुमात्र पडियेलें ॥ ८२ ॥ कां पक्वान्न जेवितांना नारसीं । तो त्यांत नकळतां पडली माशी । तरी ते सर्वथा न जिरे त्यासी । तैसा ज्ञानासीं अहंकार ॥ ८३ ॥ चांगदेव मोठा योगेश्वर । परी त्यासि सिद्धाईचा फुंद थोर । मग तुमची कीर्ति ऐकूनि साचार । चटपट थोर लागली त्या ॥ ८४ ॥ मग पत्र ल्याहावया तुम्हांप्रती । चांगयानें लेखणी धरिली हातीं । परी श्रेष्ठ कनिष्ठ भाव चित्तीं । या लागीं मती न चाले ॥ ८५ ॥ ऐसा संदेह पडिला थोर । मग तेणें कोरें दिधलें पत्र । ये अर्थीचा विचार । ऐका साचार सांगतों ॥८६॥ सर्व सिद्धाईत असे पुरा । परी ब्रह्मज्ञाना विषयीं असे कोरा । तैसेंच पत्र दीधलें असे सत्वरा । आमुच्या विचारा हें आलें ॥ ८७ ॥ तरी ज्ञानसागरा ऐक सत्वर । तूं तरी सिद्धांत वक्ता चतुर । चांगदेवासि ऐसें ल्याहावें पत्र । जेणें बोधेल अंतर तयाचें ॥ ८८ ॥ ऐकूनि सद्गुरूचें उत्तर । ज्ञानदेवें केला नमस्कार । मग लिखित पांसष्टी[१] ग्रंथ सत्वर । आपुल्या निजकरें लिहिला ॥ ८९ ॥ त्याचा अर्थ सखोल गहन । सिद्धांत ज्ञानाची वोळखण । ते संकळित सांगतों यथा मतीनें । ऐका सज्जन निजप्रीतीं ॥ ९० ॥ स्वस्ति श्रीवटेश्वर चांगया अवधारी । परब्रह्म असे चराचरीं । त्याज वांचूनि दुसरी परी । द्वैताची वारी स्वप्नीं नसे ॥ ९१ ॥ शरीर हें कवणाचें पाहीं । कवण नांदतसे देहीं । तूं आपणातें विचारूनि पाहीं । सकळ जीवीं एक चित्तें ॥ ९२ ॥ साधलिया योग साधन । याचे तों वहुत कष्ट जाण ।

१ चांगदेव पासष्टी.

ऋद्धिसिद्धि प्राप्त तेणें । परी सच्चिद्‌घन न पविजे ॥ ९३ ॥ इंद्रियांत मन चंचळ बहुत । तें धांवून जाय जेथ जेथ । तेथें पाहिजे आपणांत । चित्तीं द्वैत न धरितां ॥ ९४ ॥ लिखित पांसष्टी ओव्यासार । वाचोनि पाहिजे सविस्तर । अर्थ अन्वयीं विवरावें अंतर । ओव्या प्रकारें करूनियां ॥ ९५ ॥ हें वेदशास्त्रांचे मथन । सूक्ष्मदृष्टी विचारून । अनुभवासि आणूनि वचन । जीवीं ठेवणे उपपत्ती ह्या ॥ ९६ ॥ ऐसें पत्र ज्ञानेश्वरें । लिहिलें तेव्हां आपुल्या करें । तें शिष्यापासीं दीधलें त्वरें । म्हणे सांगा नमस्कार ज्ञानदेवाचा ॥ ९७ ॥ सांगा चौदाशें वर्षेंवर । तुम्हीं रक्षिलें कलेवर । त्याचें सार्थक तेव्हांच खरें । अनुभवासि उत्तर आणावें ॥ ९८ ॥ ऐसें सांगतां ज्ञानेश्वर । मग तें करिती नमस्कार । सवें घेऊनि लिखित पत्र । मग ते सत्वर निघाले ॥ ९९ ॥ मग तपती संगमीं येऊनि सत्वर । सद्गुरूसि घालिती नमस्कार । ज्ञानराजें दिधले पत्र । तें पुढें सत्वर ठेविलें ॥ १०० ॥ स्वमुखें निरोप सांगितला । तोही सविस्तर निवेदन केला । चौदाशें वर्षें देह रक्षिला । योग साधिला अष्टांग ॥ १ ॥ त्याचें सार्थक तेव्हांचि खरें । पाहिजे पत्राचें अर्थांतर । अनुभवोनि आपुले अंतर । साक्षात्कार जाणावा ॥ २ ॥ ऐसें मुखवचन उत्तर । सांगूनि दिधलें तुम्हांसि पत्र । त्याची स्थिती आर्ष फार । दांभिक अनुमात्र असेना ॥ ३ ॥ चार्‍ही मुलें असती लहान । सारिखेचि मान अपमान । सातावर्षांचें निवृत्ति निधान । सातवर्षांचा पूर्ण ज्ञानदेव ॥ ४ ॥ पांच वर्षांचा सोपान विदेही । आणि चौवर्षांची मुक्ताबायी । सामर्थ्य असोनि अभिमान नाहीं । हेचि नवायी अगाध ॥५॥ जैसें परब्रह्मीचे कोंभ निश्चितीं । तैसींच दिसे त्यांची स्थिती । आणि भक्ति प्रेमा बहुत चित्तीं । उपासना मूर्ती पांडुरंग ॥ ६ ॥ त्याणीं सद्भावें साचार । तुम्हांसि सांगीतला नमस्कार । तों चांगदेवें घेऊनि पत्र । मस्तकावर वंदिले ॥ ७ ॥ पहिली ओवी वाचूनि पाहात । चित्तीं कल्पना योजिल्या बहुत । तों त्यामाजी लागतीं नाना अर्थ । मति कुंठित जाहली ॥८॥ बहुत प्रकारीं शोधून पाहातां । परी अर्थ ध्यानांत नये सर्वथा । म्हणती काय करावे आतां । लज्जा चिंता वाटतसे ॥९॥ चांगदेवासि वाटले विषम । म्हणती याचें नकळेंचि वर्म । सकळ कळा साधिल्या परम । जीवासि श्रम करोनियां ॥ ११० ॥ परी ज्ञानदेवाचें वचन प्राकृत । त्याचा अनुमात्र कळेना अर्थ । सकळ ग्रंथांत मुकुट वेदांत । त्याहूनि बहुत अवघड हें ॥११॥ तरी आपण समारंभें करून जाऊन । घ्यावें त्याचें दर्शन । अर्थ पत्राचा विचारून । निश्चय पूर्ण दृढ केला ॥ १२ ॥ मग शिष्य संप्रदायी मेळवूनि फार । तयांसि म्हणे योगेश्वर । तिन्ही देवांचे अवतार । जाहले साचार भूमंडळीं ॥ १३ ॥ तरी आपण आतां समुदायेंसी । जाऊं तयांचे भेटीसी । त्याची चर्या आहे कैसी । तेही ध्यानासि येईल ॥ १४ ॥ मोहन स्तंभन वशीकरण । या विद्येचें केलें स्मरण । शिष्यांसहित मरुद्गण । व्याघ्रारूढ होऊन चालिले ॥ १५ ॥ व्याघ्राचे वहनीं सकळिक । तयांसि सर्पाचे केले चाबुक । ऐसें देखोनि कवतुक । आश्चर्य लोक करितातीं ॥ १६ ॥ समोंवते संप्रदायी समस्त । मध्यें चांगदेव विराजित ।

जैसा सैन्यामाजी नृपनाथ । आश्चर्यें शोभत आगळा ॥ १७ ॥ नाना शास्त्रें आहेत बहुत । त्या माजी मुख्य वेदांत । तैसा चांगदेव विराजित । सामर्थ्य अद्भुत ज्यापाशीं ॥ १८ ॥ कां अठरा भार वनस्पती । मध्यें कल्पतरु जया रीतीं । तैसाचि दिसे सिद्धमूर्ती । संप्रदायी असती सभोंवते ॥ १९ ॥ नातरी नक्षत्रांमाजी रोहिणी कांत । पूर्ण कळेनें सुशोभित । तैसा चांगदेव जनासि भासत । सिद्धि समस्त जयापासीं ॥ १२० ॥ मार्गी ज्या ज्या गांवावरून । सहज जातसे मरुद्गण । क्षेत्रवासी जे संपूर्ण । पूजा घेऊन येती ॥ २१ ॥ जे जे कामना नवस कल्पिती । त्यांची तत्काळ पुरतसे आर्ती । जनांत वाढली सत्कीर्ती । सर्वत्र जाणती चांगदेवा ॥ २२ ॥ देखोनि सिद्धीचा चमत्कार । लोक दर्शना येती फार । जाणोनि तयाचें अंतर । घटिका चार स्थिर होती ॥ २३ ॥ ऐशा संभ्रमें योगेश्वर । दक्षिण पंथें चालिले सत्वर । तों समीप उरलें अळंकापुर । भीमा तीर पंचक्रोशी ॥ २४ ॥ पिंपळगांव नामाभिधान । तेथें भीमा तीर पुण्यवान । तेथूनि अळंकावती एक योजन । सभाग्यसधन ते लोक ॥ २५ ॥ पुराण प्रसिद्ध भीमरथी । हें चांगदेवें जाणोनि निश्चितीं । चार घटिका स्थित राहती । नित्य नेम सारिती सकळिक ॥ २६ ॥ मग शिष्यासी बोलावूनी । आज्ञा करिती त्या लागुनी । तुवां सत्वर पुढें जावोनी । वृत्तांत श्रवणीं सांग त्यांच्या ॥ २७ ॥ निवृत्तिराज ज्ञानदेव पाहीं । सोपान आणि मुक्ताबायी । नमस्कार करोनि त्यांचे पायीं । वृत्तांत सर्वही सांगावा ॥ २८ ॥ आमुचाही नमस्कार सांग त्यांसी । सत्वर येतसे भेटीसी । चांगदेवें आज्ञा करितां ऐसी । शिष्य त्वरेसी निघाला ॥ २९ ॥ व्याघ्रारूढ होऊनि सत्वर । मग तो पावला अळंकापुर । तों तिन्ही देवांचे अवतार । भिंतीवर बैसती ॥१३०॥ तंव ज्ञानदेवासि म्हणे निवृत्ती । तुम्हींच चांगदेवासि लिखित पाठविलें प्रीतीं । त्याचा अर्थ न समजे चित्तीं । म्हणोनि येती भेटावया ॥३१॥ आपुली सिद्धाई दाखवणें। यास्तव व्याघ्राचें केलें वहन । ऐसी परस्पर बोलतां खूण । तों आला ब्राह्मण सन्निध ॥ ३२ ॥ व्याघ्राखालीं उतरोनि सत्वर । घातला साष्टांग नमस्कार । कांहीं सांगावें जों उत्तर । तों सोपानेश्वर बोलती ॥ ३३ ॥ चौदाशें वर्षांचे भले । स्वर्गींचे मरुद्गण वांचलें । योगाभ्यासें काळा तें वंचिलें । ते भेटीसी आले आपुलिया ॥३४॥ तंव निवृत्ति म्हणे ज्ञानेश्वरा । संत आले आपुल्या घरा । तरी तयांसि जावें सामोरा । आमुच्या विचारा आलें हें ॥ ३५ ॥ ऐसें आज्ञापितां निवृत्तिराया । ज्ञानदेवें अघटित मांडिली चर्या । भिंतीसि म्हणती लवलाह्या । चाल चांगया सामोरीं ॥३६॥ ऐसीं मुखांतूनि अक्षरें । वदतांचि श्रीज्ञानेश्वरें । तों अघटित चरित्र वर्तलें खरें । तें ऐका सादरें भाविक हो ॥ ३७ ॥ तुरंग धांवे जैशा रीतीं । तैसीच सत्वर चालिली भिंती । आंत पाहतां दगड माती । आश्चर्य करिती जनलोक ॥ ३८ ॥ ज्ञानदेव सोपान निवृत्ती । वरी बैसल्या तिन्ही मूर्ती । नाव चालतसे जैशा रीती । तैसीच भिंती चालतसे ॥ ३९ ॥ क्षेत्रवासी नारीनर । तयांसि कौतुक वाटे फार । अवघे मिळोनि लहान थोर ।

१ घोडा.

मागें सत्वर धांवती ॥ १४० ॥ तों इकडे चांगा वटेश्वर । चौदाशें शिष्य बरोबर । बैसोनि येती व्याघ्रावर । धांवत समीर ज्या रीतीं ॥ ४१ ॥ जैसे गरुड आणि मारुती भक्त । उभयतांची मिळणी होत । कीं मित्र आणि रोहिणीकांत । गगनीं भेटत अवचित ॥ ४२ ॥ कां भूत पिशाच कूश्मांडगण । या वेष्टित येतसे त्रिलोचन । तों षड्गुण ऐश्वर्य संपन्न । आले धांवोन महाविष्णु ॥ ४३ ॥ जैसें ऋद्धि सिद्धीचें वैभव । शिष्य संप्रदायी गौरव । व्याघ्रावरी बैसोनि सर्व । भेटीस चांगदेव पातले ॥ ४४ ॥ इकडे भक्ति ज्ञान वैराग्य कळा । घेऊनि येतसे परब्रह्म पुतळा । निर्जीव भिंतीस जीव आणिला । नवल चांगयाला वाटलें ॥ ४५ ॥ म्हणे याचें कर्तृत्व अघटित जाणा । निश्चित कळलें आमुच्या मना । निर्जीवासि आणिली चेतना । सामर्थ्य कोणा हें नव्हे ॥ ४६ ॥ आणि सजीव व्याघ्राचे बैसोनि पाठीं । आम्हीं काय जातो तयाचे भेटी । ऐसा निराभिमान होऊनि पोटीं । मग तळवटी उतरला ॥ ४७ ॥ चांगदेवाची देखोनि स्थिती । सकळ शिष्य वहनें त्यागिती । सर्पांचे चाबूक सोडूनि देती । मग ते प्रवेशती वारुळीं ॥४८॥ सिद्धीचा खेळ मायिक समस्त । व्याघ्रही गेले काननांत । जैसे मेघ दिसती गगनांत । ते नाहींसे होत क्षणमात्रें ॥ २९ ॥ असो शिष्यां समावेत तये क्षणीं । चांगदेव चालिले लोटांगणीं । सिद्धाईचा अभिमान होता मनीं । गेला निरसोनी सर्व तो ॥ १५० ॥ जैसा वासरमणी उदयास येत । प्रभायमान बिंब आरक्त । मग चंद्राच्या कळा लोपून जात । तेज अद्भुत म्हणवोनि ॥ ५१ ॥ का पराक्रम दाखविता मारुती । मग शक्तिहीन जाहला खगपती । तैशीच चांगदेवाची अहंता होती । चालता भिंती ते नासे ॥५२॥ चतुर्दश विद्याभ्यास केला । चौसष्टि संपूर्ण साधिल्या कळा । चौदाशें वर्षे देह राखिला । जिंकिलें काळा प्रतापें ॥ ५३ ॥ हें अवघेचि सामर्थ्य पूर्ण । लोपलें ज्ञानदेवाच्या दर्शनें । अरुणोदय होतांचि जाण । आकाशीं उडुगण न दिसती ॥५४॥ कां धीट पाठ कविता असतां । तो आपुलें चित्तीं मानी श्लाघ्यता । मग देखूनि प्रसादिक संतां । लज्जित चित्ता होतसे ॥ ५५ ॥ नातरी महासिद्धांता पासीं निश्चितीं । शब्देंसि मौन धरितां श्रुती । दृष्टीसी देखूनि अगस्ती । मग आपांपती न गर्जे ॥ ५६ ॥ अमृतसिद्धि भेटतां सहज । मग लज्जित होतसे वैद्यराज । तेथें औषधाचे काय काज । चमत्कार चोज देखतां ॥ ५७ ॥ तैसें ज्ञानदेवाचें कर्तृत्व निश्चिती । निर्जीव दगडाची चाले भिंती । आळंदी पासोन अर्ध कोस येती । मग चांगदेव चित्तीं लज्जित ॥ ५८ ॥ व्याघ्राखालीं उतरोनि देख । सोडिले सर्पाचे चाबूक । सप्रेम भावाचें कौतुक । लोटांगण हरिखें घालिती ॥५९॥ निवृत्ती ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई गुण निधान । यांनींही चांगदेव देखोन । मग खालीं आपण उतरले ॥ १६० ॥ सन्निध येतां योगेश्वर । चौघेंही घालिती नमस्कार । चांगदेव उठविती निजकरें । मग चरणांवर लोटले ॥ ६१ ॥ परस्परें होतां भेटी । मग आलिंगनें पडली मिठी । सप्रेम सुखाची होतसे वृष्टी । पाहताती दृष्टीं सुरवर ॥ ६२ ॥ विमानीं बैसोनि वृंदारक । पुष्प वर्षाव करिती देख ।

१ शंकर. २ ज्ञानदेव. ३ अरण्यात. ४ सूर्य. ५ तांबडे.

म्हणती ज्ञानदेवाच्या दर्शनें अनेक । तरती लोक भूमंडळी ॥ ६३ ॥ ऐसे म्हणोनि इंद्रादिगण । पावले आपुलें स्वर्ग स्थान । श्रीविठ्ठल नाम संकीर्तन । लोक संपूर्ण गर्जती ॥ ६४ ॥ परस्परें बोलती त्या अवसरा । चांगदेव भेटले ज्ञानेश्वरा । जैसा शुक्र अभिमानाचा पुरा । तो बृहस्पतीच्या घरां आला कीं ॥ ६५ ॥ कां क्षीरसागराचें ऐश्वर्य थोर । त्या माजी पहुडला लक्ष्मीवर । म्हणोनि तयासि रत्नाकर । सप्रेम आदरें भेटेतसे ॥ ६६ ॥ नातरी वसिष्ठाचें सामर्थ्य देखोनी । मग तयासि भेटे विश्वामित्र मुनी । कीं हरिहरांची जाहली मिळणी । मज लागोनी तेविं वाटे ॥ ६७ ॥ परस्परें झालिया भेटी । तेथें आनंद सुखाची होतसे वृष्टी । ज्ञानदेव चांगयासि धरोनि मनगटीं । मग विश्रांत वटीं ते आले ॥ ६८ ॥ तया वृक्षछायेचे तळीं । बैसली सकळ संत मंडळीं । विठ्ठल नामें तये वेळीं । घोष निराळीं कोंदला ॥ ६९ ॥ ज्ञानदेव निवृत्ति सोपान । मुक्ताबाई गुण निधान । यांसि परिपूर्ण असोनि आत्मज्ञान । परी सगुण भजन करिताती ॥ १७० ॥ एकीं घालूनि वज्रासन । आत्मा ब्रह्मांडासि नेला जाण । ते स्वरूपीं समरस होऊन । गेले विरोन देहभान ॥ ७१ ॥ जो का निर्गुण निराकार । त्यासीच पाहती निरंतर । ते सायुज्य मुक्ति पावोनि साचार । तदाकार जाहले कीं ॥७२॥ हे योगियांची स्थिति जाण । विराट स्वरूपीं जाहले लीन । परीं भक्तिसुख अंतरलें तेणें । ब्रह्मादि सुरगण इच्छिती ॥ ७३ ॥ निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर । तैसे नव्हेती साचार । करावया विश्वोद्धार । आले साचार मृत्युलोका ॥७४॥ हे अंतरी ब्रह्मनिष्ठ पूर्णज्ञानी । असोनि तत्पर भगवद्भजनीं । मग सगुण स्वरूपें चक्रपाणी । तयां लागोनी भेटती ॥ ७५ ॥ अद्वैत बोळखोनी अंतरी । जो साकार मूर्तीसीं प्रेम धरी । तरी ते दुर्लभ चराचरीं । धुंडितां धरित्री नाढळती ॥७६॥ स्वरूपें सुंदर लावण्य सरिता । त्याही वरी महा पतिव्रता । तरी विरळा दृष्टीसीं धुंडूनि पाहातां । नसती बहुता या रीतीं ॥ ७७ ॥ जैसें सोज्ज्वळ सोनें बावनकस । आणि सुंगध जोडला तयास । दृष्टीस पडतां सावकास । तरी मोलचि नसे तया ॥ ७८ ॥ श्रुतिशास्त्रीं निपुण पाहीं । आणि शांति क्षमा आली हृदयीं । मी एक सर्वत्र अहंता नाहीं । तो धुंडितां ठायीं दुर्लभ ॥ ७९ ॥ उत्तम व्यवहारीं जोडिले धन । आणि निष्काम सत्पात्रीं करितां दान । शोधूनि पाहतां विचक्षण । तरी बहुत जन नाढळती ॥ १८० ॥ यथा विधि करी सत्कर्म । महा यज्ञादिक हवन । आणि निष्कामें करी कृष्णार्पण । हे बहुत जन नसती कीं ॥ ८१ ॥ सागर गंभीर आहे जनीं । परी क्षार लागे तयाचे पाणी । तैसेच योगी आत्मज्ञानी । परी विमुख सगुणीं प्रेमसुखा ॥ ८२ ॥ निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर । तैसे नव्हती साचार । ब्रह्मनिष्ठ योगेश्वर । आणि सगुणीं तत्पर भजनासी ॥ ८३ ॥ विठ्ठल नामाचा करूनि घोष । बैसले विश्रांति वटच्छायेस । तंव चांगदेवें पुसिलें त्यांस । कैसे निर्जीवासि चालविलें ॥ ८४ ॥ आम्ही आपुले सिद्धईचेनी बळें । व्याघ्र सर्प प्रांजळ केले । परी आपण निर्जीवासी चालविलें । हे तों अकळकळा दिसों आली ॥ ८५ ॥ ऐसें चांगदेव


१ समुद्र. २ आकाशात. ३ पृथ्वीवर.

म्हणती ज्ञानदेवाच्या दर्शनें अनेक । तरती लोक भूमंडळी ॥ ६३ ॥ ऐसे म्हणोनि इंद्रादिगण । पावले आपुलें स्वर्ग स्थान । श्रीविठ्ठल नाम संकीर्तन । लोक संपूर्ण गर्जती ॥ ६४ ॥ परस्परें बोलती त्या अवसरा । चांगदेव भेटले ज्ञानेश्वरा । जैसा शुक्र अभिमानाचा पुरा । तो बृहस्पतीच्या घरां आला कीं ॥ ६५ ॥ कां क्षीरसागराचें ऐश्वर्य थोर । त्या माजी पहुडला लक्ष्मीवर । म्हणोनि तयासि रत्नाकर । सप्रेम आदरें भेटेतसे ॥ ६६ ॥ नातरी वसिष्ठाचें सामर्थ्य देखोनी । मग तयासि भेटे विश्वामित्र मुनी । कीं हरिहरांची जाहली मिळणी । मज लागोनी तेविं वाटे ॥ ६७ ॥ परस्परें झालिया भेटी । तेथें आनंद सुखाची होतसे वृष्टी । ज्ञानदेव चांगयासि धरोनि मनगटीं । मग विश्रांत वटीं ते आले ॥ ६८ ॥ तया वृक्षछायेचे तळीं । बैसली सकळ संत मंडळीं । विठ्ठल नामें तये वेळीं । घोष निरोळीं कोंदला ॥ ६९ ॥ ज्ञानदेव निवृत्ति सोपान । मुक्ताबाई गुण निधान । यांसि परिपूर्ण असोनि आत्मज्ञान । परी सगुण भजन करिताती ॥ १७० ॥ एकीं घालूनि वज्रासन । आत्मा ब्रह्मांडासि नेला जाण । ते स्वरूपीं समरस होऊन । गेले विरोन देहभान ॥ ७१ ॥ जो का निर्गुण निराकार । त्यासीच पाहती निरंतर । ते सायुज्य मुक्ति पावोनि साचार । तदाकार जाहले कीं ॥७२॥ हे योगियांची स्थिति जाण । विराट स्वरूपीं जाहले लीन । परीं भक्तिसुख अंतरलें तेणें । ब्रह्मादि सुरगण इच्छिती ॥ ७३ ॥ निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर । तैसे नव्हेती साचार । करावया विश्वोद्धार । आले साचार मृत्युलोका ॥७४॥ हे अंतरी ब्रह्मनिष्ठि पूर्णज्ञानी । असोनि तत्पर भगवद्भजनीं । मग सगुण स्वरूपें चक्रपाणी । तयां लागोनी भेटती ॥ ७५ ॥ अद्वैत वोळखोनी अंतरी । जो साकार मूर्तीसीं प्रेम धरी । तरी ते दुर्लभ चराचरीं । धुंडितां धरित्री नाढळती ॥७६॥ स्वरूपें सुंदर लावण्य सरिता । त्याही वरी महा पतिव्रता । तरी विरळा दृष्टीसीं धुंडूनि पाहातां । नसती बहुता या रीतीं ॥ ७७ ॥ जैसें सोज्ज्वळ सोनें बावनकस । आणि सुंगध जोडला तयास । दृष्टीस पडतां सावकास । तरी मोलचि नसे तया ॥ ७८ ॥ श्रुतिशास्त्रीं निपुण पहीं । आणि शांति क्षमा आली हृदयीं । मी एक सर्वत्र अहंता नाहीं । तो धुंडितां ठायीं दुर्लभ ॥ ७९ ॥ उत्तम व्यवहारीं जोडिले धन । आणि निष्काम सत्पात्रीं करितां दान । शोधूनि पाहतां विचक्षण । तरी बहुत जन नाढळती ॥ १८० ॥ यथा विधि करी सत्कर्म । महा यज्ञादिक हवन । आणि निष्कामें करी कृष्णार्पण । हे बहुत जन नसती कीं ॥ ८१ ॥ सागर गंभीर आहे जनीं । परी क्षार लागे तयाचे पाणी । तैसेच योगी आत्मज्ञानी । परी विमुख सगुणीं प्रेमसुखा ॥ ८२ ॥ निवृत्ति सोपान ज्ञानेश्वर । तैसे नव्हती साचार । ब्रह्मनिष्ठ योगेश्वर । आणि सगुणीं तत्पर भजनासी ॥ ८३ ॥ विठ्ठल नामाचा करूनि घोष । बैसले विश्रांति वटच्छायेस । तंव चांगदेवें पुसिलें त्यांस । कैसे निर्जीवासि चालविलें ॥ ८४ ॥ आम्ही आपुले सिद्धईचेनी बळें । व्याघ्र सर्प प्रांजळ केले । परी आपण निर्जीवासी चालविलें । हे तों अकळकळा दिसों आली ॥ ८५ ॥ ऐसें चांगदेव

१ समुद्र. २ आकाशात. ३ पृथ्वीवर.

पुसतांचि देख। ज्ञानदेवचरणीं ठेवी मस्तक। मग स्वमुखें अभंग बोलीला एक। तो सकळिक जाणतसां ॥ ८६ ॥ परी त्याचा अर्थ सांगतों किंचित। तो श्रवण करा भाविक भक्त। संतांची वचनें असती प्राकृत। परी गर्भ बहुत त्यां माजी ॥ ८७ ॥ देव करी तरी एक नव्हे। सागरीं तारली दगडाची नाव। त्यावरी चालोनि वानर सर्व। लंका वैभव पाहिलें ॥ ८८ ॥ सूर्य किरणांचियावरी। राहतील मुंगिया निरंतरी। पंकि होय अभि पाठारीं। एक श्रीहरी सत्तेनें ॥ ८९ ॥ तो चराचर नटला श्रीपती। पदार्थ मात्र त्याची प्रकृती। त्यानें आपुल्या प्रतापें निश्चिती। चालविली भिंती कौतुकें ॥ १९० ॥ महाभूतें पांच सार। परस्परें यांमाजी असे वैर। परी सख्यत्वें नांदवी श्रीधर। त्यांमाजी संचार करोनियां ॥ ९१ ॥ शून्याचें मनीं हाचि भावो। आकाशाचा पुसी न ठावो। निराळ म्हणतसे हा वायो। भक्षीन पहा हो क्षणमात्रें ॥ ९२ ॥ समीर म्हणतसे हा अग्न। मीं विझवीन नलगतां क्षण। तंव वन्ही म्हणे हें जीवन। निजांगें शोषीन मी आतां ॥ ९३ ॥ तंव पाणी म्हणतसे ही मही। मी निजांगे नासीन सर्वही। हें पंच भूतांत वैर सर्वदाही। मग शेषशायी करी काय ॥ ९४ ॥ पंचतत्वांत लक्ष्मीवर। निजांगें करोनि संचार। त्यांसीं सख्यत्व करोनि फार। मित्रत्वे साचार नांदवी ॥ ९५ ॥ त्याणेंचि तुमची पुरवावया आर्ती। आपुल्या सत्तेनें चालविली भिंती। हें आमुचें सामर्थ्य नसे निश्चिती। श्रीरुक्मिणीपती तो जाणें ॥ ९६ ॥ ऐसी ज्ञानदेवाची वाणी। ऐकोनि चांगदेव लागे चरणीं। पुढिल अध्यायीं रसाळ बोलणीं। तरी सादर सज्जनीं परिसावीं ॥ ९७ ॥ तो दीनदयाळ कैवल्य दानी। आठवण देतसे मजलागुनी। महीपती त्याच्या आश्रयें करोनी। संत स्तवनी सादर ॥ ९८ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृतग्रंथ। श्रवणेंचि पुरवी मनोरथ। चतुर्थाध्याय प्रेमळ परिसोत भाविक भक्त। चतुर्थाध्याय रसाळ हा ॥ १९९ ॥ ॥ अ० ४ ॥

अध्याय ५



श्रीगणेशायनमः । अगाध लीला तुझी श्रीहरी । चरित्रें दाखविलीं नानापरी । भक्तांच्या अभयकर ठेऊनि शिरीं । भवसागरीं तारिलें त्यां ॥ १ ॥ सप्रेम भक्तीचें देखोनि बळ । सदा तिष्ठसी तयां जवळ । न विचारिसी याती कुळ । दीन दयाळ म्हणोनी ॥ २ ॥ नामा जन्मला शिंपीयाचे पोटीं । त्याची भक्ती देखोनि गोमटी । तो त्वां आलिंगूनि धरिला पोटीं । मग जेविलासी ताटीं सांगातें ॥ ३ ॥ चोखामेळा जातीचा माहार । त्याचा अडणगुण होतांचि फार । तूं मागें खोवूनि पीतांबर । वोढिलीं ढोरें विठोबा ॥ ४ ॥ दामाजीपंत ब्राह्मण भोळा । धान्य लुटविलें जये वेळां । तूं विठो नाक झालासी ते वेळां । चरित्रें गोपाळा हीं तुझीं ॥ ५ ॥ मिराबाईसी नृपवरें । विष पाजितां अति दुर्धर । तें तूं प्यालासि शार्ङ्गधर । तेणें हिरवें समग्र अंग झालें ॥ ६ ॥ कान्होपात्रा स्वरूपें गोमटी । तिसीं अविंध राजा छळितां कपटी । मग तुझा धांवा करितां संकटीं । उठाउठीं पावलासी ॥ ७ ॥ तिचें चैतन्य काढोनि त्वरित । तुवा मेळविलें आपणांत । देहाचा तरटि वृक्ष होत । अद्यापि देखत जनयात्रा ॥८॥ कबीर अविंध वैष्णवभक्त । तो श्रीराम भजनीं झाला रत । त्याचे शेले विणिसी हाते । ऐसी निजप्रीत भक्तांची ॥ ९ ॥ ज्ञानदेव सोपान निवृत्ती । मुक्ताबाई आदिशक्ती । यांचीं जनता वाढवावया कीर्ती । चालविली भिंती कवतुकें ॥१०॥ ऐसा तूं भक्ताभिमानी केवळ । अनाथ बंधु दीनदयाळ । मज अभय देऊनि ये वेळ । वदवीं रसाळ निरूपण ॥११॥ मागिले अध्यायीं कथा गोमटी । ज्ञानदेव चांगयांसी जाहली भेटी । मग विश्रांत वटाच्या तळवटीं । बोलत गोष्टी बैसले ॥१२॥ निवृत्ती ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई सांगती खूण । आतां चांगयासि उपदेश करून । आत्मज्ञान सांगावें ॥१३॥ चौदाशें वर्षांचें पत्र । अद्यापि राहिलें असे कोरें । आतां त्यावरी लिहावें अक्षर । करिती विचार एकमेकां ॥ १४ ॥ त्या उभयतांचा संवाद निश्चिती । जाहला असे सहज स्थिति । ते साक्षात अभंग लिहितों ग्रंथीं । तरी सादर संतीं परिसिजे ॥ १५ ॥ संतमुखींचीं असतां अक्षरें । मग कासंया पाहिजे टीकाकार । साक्षात् असतां अवतार । मग भिंती वरील चित्र कां करूं ॥ १६ ॥ गगनीं दिसतां वासरमणी[1]। मग प्रतिबिंब कां पहावें नयनीं । भागीरथी संन्निध असोनी । मग चंबूंत पाणी कां ठेवूं ॥ १७ ॥ मुखीं असोनि प्रसाद उत्तर । मग कासया करावें पाठांतर । राहावया असतां दिव्य मंदिर । मग कोंपटं[2] थोर बांधूं नये ॥ १८ ॥ सन्निध असतां अमृतसिद्धी । तरी कां मेळवावी औषधी । म्हणोनि चांगयाचा अभंग त्रिशुद्धी । लिहितो पदसंधी यास्तव ॥१९॥

॥ अभंग ॥ विश्रांत तळवटीं चांगदेवा भेटीं । परस्परें कसवटी अनुभवाची ॥१॥ निवृत्ती ज्ञानेश्वर म्हणती तुम्ही थोर । सर्वज्ञ उदार आम्हालागीं ॥ २ ॥ भेदून षट्चक्रें साधिलें योगासीं । ऋद्धिसिद्धि दासी स्वयें केल्या ॥३॥ ऐकोनि उत्तर जोडी दोन्हीं कर । केला नमस्कार दीर्घदंडें ॥ ४ ॥ संतांच्या दर्शनें शुद्ध झालें मन । गेला अभिमान विरोनियां ॥ ५ ॥ काळवंचनेनें वांचविलें शरीर । पाहावे योगीश्वर तुम्हां ऐसे ॥ ६॥ वटेश्वर चांगा करीत विनंती । तोडा माझी गुंती संसाराची ॥७॥ ओव्या ॥ विश्रांत वटाखालीं जाण । निवृत्ती ज्ञानदेव सोपान ।

---

१ सूर्य २ खोपट

मुक्ताबाई गुणनिधान। चांगया कारणें भेटती ॥ २० ॥ मग परस्परें कमवटी। अनुभवसिद्ध बोलती गोष्टी। तेणें ब्रह्मानंद समाय पोटीं। होत सुखवृष्टी अनिवार ॥ २१ ॥ निवृत्ती आणि ज्ञानेश्वर। चांगयासि म्हणती तुम्ही थोर। आम्हांलागी व्हावया उद्धार। मरुद्गण अवतार या लागीं ॥ २२ ॥ षटचक्रें भेदूनि ऐसीं। सिद्धीस नेलें महा योगासीं। ऋद्धिसिद्धि करोनि दासी। कौतुक जनांसी दाखविलें ॥२३॥ ऐसी स्तुति ऐकोनि कानीं। दीर्घ दंडवत घातलें धरणीं। मग दोन्ही कर जोडोनी। अमृत वचनीं विनवित ॥ २४ ॥ म्हणे धन्य आजिचा सुदिन। जाहलें संतांचें दर्शन। विरोनि गेला अभिमान। शुद्ध मन पूर्ण झालें ॥२५॥ काळवंचना करूनि फार। यास्तव रक्षिलें शरीर। जें तुम्हां ऐसें योगेश्वर। दृष्टीसीं साचार पहावे ॥ २६ ॥ ते मनोरथ फळले निश्चितीं। दृष्टीसीं देखिल्या संतमूर्ती। चांगा वटेश्वर करीतसे विनंती। संसार गुंती उगवावी ॥ २७ ॥ ऐसें ऐकोनियां स्तवन। निवृत्ती ज्ञानदेव सोपान। मुक्ताबाई सांगती खूण। उपदेश कारणें चांगयासी ॥ २८ ॥ आधींच कनकाचें शुद्ध पात्र जाण। वरी प्रक्षाळिलें वैराग्य जीवन। तरी ज्ञानामृत सांठवून। ठेवितां जतन होय येथें ॥ २९ ॥ कां उत्तम भूमि असतां सहज। त्यावरी वर्षला मेघराज। तरी तेथें स्वहस्तें पेरितां बीज। तेणेंचि साधिलें काज बहुतांचें ॥ ३० ॥ जो अनिंदक अवंचक मती। अत्यंत भावें लावी प्रीती। ऐसा मित्र जोडिल्या निश्चितीं। तरी गोप्य त्याप्रती सांगिजे ॥३१॥ नातरी सुपुत्र सुलक्षणिक। विद्या वयें आगळा देख। त्यासि गुप्त ठेवणें सकळिक। पिता कवतुकें सांगतसे ॥ ३२ ॥ याज कारणें मुक्ताबायी। ऐसें ऐकूनी ते समयी। चांगयासि गुज सांगा कांहीं। बोलतसे कायीं आदिमाया ॥ ३३ ॥ ॥ अभंग ॥ हे मी हे मी प्रचित पाही। अनुभव आलिया भेदाचि नाहीं ॥ १ ॥ सोहंकार मनन संडी साच। मीपण नाहीं तेथें तूंपण कैचें ॥ २ ॥ अहं ते मी सोहं ते गुज। मुक्ता म्हणे चांगया बुझ ॥ ३ ॥ ॥ ओव्या ॥ मुक्ताई म्हणे चांगया प्रती। मी कोण ऐसें वोळखे चित्तीं। आपण आपली सोडूनि भ्रांती। स्वरूपीं स्थिती समरसें ॥ ३४ ॥ ज्ञान वैराग्य सकळिक। त्रिगुणात्मक असे देख। त्या विरहित निष्कलंक। पाहे सुख आपुलें तूं ॥ ३५ ॥ मुक्ताबाई म्हणे चांगया। सावध हो तूं लवलाह्या। आत्मबोधाची सकळ क्रिया। ते तुज सखया निरोपूं ॥ ३६ ॥ तूं जें जें देखसील दृष्टीं। तें आत्मवत मानी सकळसृष्टी। अनुभवें खूण येतां पोटीं। मग भेददृष्टी दिसेना ॥ ३७ ॥ सोहंकार मन सर्व करी। मीपण चित्तीं न ठेवी उरीं। तेव्हां तूंपणही होईल दुरी। न राहे उरी दोघांची ॥ ३८ ॥ अहंभाव तो मीपण जाण। सोहंतेची निजगुज पूर्ण। मुक्ताबाई चांगयासि म्हणे। खूण समजणें अंतरीं ॥ ३९ ॥ ऐसीं ऐकूनि वचनामृतें। चांगदेव घाली दंडवतें। म्हणे चौदाशें वर्षेपर्यंत। भूमिगत[१] धन होतें ॥ ४० ॥ दंभधर्म दाखवावया जनीं। बैसलों व्याघ्राचे वहनीं। सर्पाचा चाबूक करोनी। भेटीं लागोनी पातलों ॥ ४१ ॥ जैसे आसुरी संपत्तीचे कुजन। तैसेचि होतें माझें मन। ऋद्धिसिद्धि वश करून।

१ जमिनीवर.

मानीं थोरपण आपणासीं ॥ ४२ ॥ आतां तुमचें दर्शन होतां सांग । त्याचा मनांतून केला त्याग । तुम्हीं महेशा समान चोघे । तरी निववा निजांगें मज आतां ॥४३॥ ऐशा रीतीं चांगयानें । ग्लानी केली निरभिमानें । मग ज्ञानदेव बोलती वचनें । निजकृपेनें आपुल्या ॥ ४४ ॥ तुझी तुज लागतां शुद्धी । तेणें अखंड घडे समाधी । दंभधर्म उगी उपाधी । ही तो मंदबुद्धी सांडिजे राया ॥ ४५ ॥ तुझी माझी झाली भेटी । हे कर्पूर अग्नी पडली गांठी । क्षण एक लोटतां शेवटीं । दोन्ही दृष्टी न पडती ॥ ४६ ॥ सिद्धींचा अभिमान आंगीं धरीसी । तेणें सर्वस्वें नाडलासी । भ्रम लोभें लौकिकासीं । कासया भुललासी वाउगा ॥ ४७ ॥ ज्ञानदेव म्हणे वटेश्वरा । आतांच लपां निजघरा । तेणें सुख होय तुझ्या अंतरा । आणिक वेरझारा चुकतील ॥ ४८ ॥ योगसाधन परम कठिण । साधितां ऋद्धिसिद्धि करिती विघ्न । आत्मसुख न पाविजे तेणें । नाशवंत जाण अशाश्वत ॥ ४९ ॥ याचिलागीं सुगम सांगतों तुज । परिस माझ्या अंतरींचें गुज । इंद्रियें मन आंवरितां सहज । ब्रह्मज्ञान आज लाधसी तूं ॥ ५० ॥ जेथें मन धांवोनि जाये । तरी तेथें तूं आपणासीच पाहे । ज्ञानदेव म्हणे चांगया हे । आत्मपद होय निर्गुण जे ॥ ५१ ॥ रजोगुण तूं सांडी सकळ । तमाचेंही खांडावें मूळ । शुद्ध सत्व मांडोनि केवळ । पाहे निश्चळ आपणा तें ॥ ५२ ॥ तूं काळाचा चोरटा संसारी । शरीर रक्षिलें आजिवरी । परी आत्मज्ञान न कळे अंतरीं । ठेविली उरी अहंतेची ॥ ५३ ॥ परी हें तों कर्म निश्चित दिसे । योगियांची खूण वेगळी असे । आम्हीं तेव्हांच संत म्हणों तुम्हांस । तमो गुणाचा नाश होय जेव्हां ॥ ५४ ॥ शब्दज्ञानाचे चाळे । उदंड करिताती कुचाळे । परी परब्रह्म तें असे वेगळें । बोलतां न कळे कोणासी ॥ ५५ ॥ सहा शास्त्रें अठरा पुराणें । चारी वेद आणि व्याकरण । मुखोद्गत केलिया संपूर्ण । परी ते निज खूण वेगळीच ॥ ५६ ॥ निराळीं म्हणों तरी त्यांतच असे । समजावें आप आपणास । मग जाहलिया आत्मप्रकाश । उरी मीपणास असेना ॥ ५७ ॥ ऐसें वटवृक्षाचें छायेसीं । ज्ञानदेव चांगयातें उपदेशी । येरू निवाला निज मानसीं । सद्भावें चरणासीं लागत ॥ ५८ ॥ इतका संवाद तये क्षणीं । होतां मध्यान्हासि आला तरणी । मग ज्ञानदेव म्हणे निवृत्ति लागुनी । आश्रमासि घेऊनि यासि जावें ॥ ५९ ॥ ऐसें ऐकोनियां वचन । मंडळी सहित अवघे जन । आळंदी क्षेत्रीं प्रवेशोन । मठाश्रमा पातले ॥६०॥ तृणासनें मांडूनि ते समयीं । चांगयासि बैसविती ते ठायीं । ज्ञानदेव म्हणे मुक्तावायी । पाकसिद्धी कांहीं करावी ॥ ६१ ॥ ऐसें सांगतां ज्ञानराया । अवश्य म्हणे आदिमाया । मग मृत्तिकापात्र घेवोनियां । गेली लवलाह्या परसांत ॥ ६२ ॥ तों लघुशंका करावयांसि पाहीं । चांगदेव आले तये ठायीं । नग्न देखोनि मुक्तावायी । नेत्र लवलाही झांकिलें ॥ ६३ ॥ माघारें फिरतांचि त्वरेंसी । तंव मुक्तावाई म्हणे त्यासीं । मेल्या निगुऱ्या परतोनि जासी । संदेह तुजसीं किमर्थ ॥ ६४ ॥ विषयवासना असे तुजसीं । आत्मज्ञानीं दक्ष नव्हेसी । स्त्री-पुरुष हा भास पाहसी । म्हणोनि जासी

माघारा ॥ ६५ ॥ आत्मा आहे तुज आंत । आत्मा माझ्या शरीरांत । ऐसाचि भाम पडिला तूतें । विकार चित्तांत मग आला ॥६६॥ वरी सोडूनि देहाचें कवच । आत्मरूप एक पाहे साच । अलंकार नानाप्रकारचे । एकच कनकाचे जेविं होती ॥ ६७ ॥ कापद्याळ्या बुगड्या जाण । हीं स्त्री पुरुष नामें दोन । सूक्ष्म दृष्टीं पाहतांचि पूर्ण । तंव कांचन एकची ॥ ६८ ॥ कां एक मृत्तिकेचे जाण । केले घागरी रांजण । परी ते मृत्तिका नव्हेचि भिन्न । आत्मवत तैसें जाण जग हें ॥ ६९ ॥ कां एक्याचि तंतूची पूर्ण । साडी शेला विणिला भिन्न । ती ही स्त्री-पुरुष नामें दोन । परी सूत तें जाण एकची ॥७०॥ तैसें स्त्री-पुरुष देह दिसतें वरी । परी आत्मा एक चराचरी । त्यासीच ओळखतां अंतरीं । तरी विषयविकारीं मन नये ॥ ७१ ॥ आपणचि व्यापक त्रिजगतीं । ऐसी जरी वाणली स्थिती । तरी कोणे ठायीं नव्हेचि आर्ती । सहज वृत्ति परिपूर्ण ॥ ७२ ॥ कुतरी मांजरी आणि गाय । हे वस्त्र नेसत असती काय । त्या पशु ऐसीच मीहीं आहें । तुज कां न ये प्रत्यय ॥ ७३ ॥ ऐसें मुक्ताबाईचें वचन । ऐकोनि चांगदेव कुंठित मन । म्हणे याचे तों अबाधित ज्ञान । म्हणोनि चरण धरितसे ॥ ७४ ॥ मग सत्वर मठांत येऊनि । स्वस्थ बैसले तृणासनीं । तों आणिक कौतुक दाखविलें नयनीं । तें सज्जनीं परिसावें ॥ ७५ ॥ एक शिष्य येऊनि लवलाहें । चांगदेवा म्हणे काय । स्वामी क्षुधा लागली आहे । काय उपाय करावा ॥ ७६ ॥ मग जोंधळे आणोनिया त्वरित । ग्रंथि का वस्त्रांत बांधित । त्याच्या मस्तकीं आपुल्या हातें । चांगदेव ठेवित तेधवां ॥ ७७ ॥ तों अघटित दिसोन येतसे चर्या । तडतडा फुटती त्याच्या लाह्या । जैसा भुजारी भटी पेटवूनियां । भाजोनि लवलाह्या देतसे ॥ ७८ ॥ मग निवृत्ति आणि सोपानेश्वरा । ज्ञानदेव म्हणती त्या अवसरा । अझून सिद्धिच्या वागवीत घोरा । विरक्ति अंतरायासि नाहीं ॥७९॥ तंव निवृत्तिदेव म्हणती तेव्हां । आतां संतसंग जोडला बरवा । अनुग्रह होतांचि चांगदेवा । होईल विसांवा जिवासी ॥ ८० ॥ पंचाग्नि चेतवावयाची पाहीं । आपुल्या पासीं हातवटी नाहीं । ऐसें भासलें याचे जीवीं । ते कळा दाखवी यासाठीं ॥ ८१ ॥ तरी कांहीं दाखवूनि चमत्कार । करावा गर्वाचा परिहार । ऐसें ऐकूनि ज्ञानेश्वर । मुक्ताबाईस उत्तर बोलती ॥ ८२ ॥ आजि तों चांगा वटेश्वर । आपुल्या आश्रमीं आले सत्वर । यांसि करावा पाहुणेर । सार्थक बरें तरीच ॥ ८३ ॥ ऐकूनि मुक्ता बोले सहज । खापर आणोनि द्यावें मज । यावरी म्हणे ज्ञानराज । करील काज सोपान हें ॥ ८४ ॥ मग साहित्य आणोनि सत्वर । मांडे लाटिले अरुवार । चुलींत सर्वथा न निघे धूर । पाहुणे बाहेर भुकेले ॥ ८५ ॥ ज्ञानदेव म्हणे करा स्नान । चांगदेव पाहे विलोकून । तों चुलीमाजीं नसेची अग्न । आश्चर्य मनीं करीतसे ॥८६॥ मंडळीसहित करोनि स्नान । पात्रावरी बैसले येऊन । तों ज्वाळा निघती मुखांतून । सोपानें पंचाग्नि चेतविला ॥ ८७ ॥ जैसे तप्त कांचन लखलखीत । तैसी पाठी झाली आरक्त । त्यावरी मुक्ताबाई मांडे करीत । चांगदेव पाहात दृष्टीसीं ॥ ८८ ॥ म्हणे हा तों यांचा

अघटित खेळ । केवळ परब्रह्मीचे पुतळे । योगाभ्यास जे बोलिले । ते सर्व जाहले यांपासुनी ॥८९॥ स्वात्मबोधाचिया ताटीं । त्यांत नवरस पक्कानें वाढिली गोमटीं । भूत कृपेची साकर मोठी । चवी गोमटी तिचेनीं ॥९०॥ सद्गुरुकृपेचें आज्य सत्वर । वाढीत मुक्ताबाई आपुल्या करें । ऐसीं वाढितां संपूर्ण पात्रें । नामघोष गजरें डुल्लती ॥ ९१ ॥ सर्व भूतीं भोक्ता श्रीहरी । संकल्य सोडिला ते अवसरीं । आपोशण करोनि सत्वरीं । ग्रास निजकरीं मग घेती ॥९२॥ जें जें जयासि रुचे जैसें । पात्रीं आणूनि वाढिती तैसें । तृप्ति जाहलिया सर्वांस । कर शुद्धीस मग घेती ॥ ९३ ॥ मुखशुद्धीस तुळसी पानें । सोपान देतसे सकळांकारणें । ऐशा रीतीं झालीं भोजनें । मग स्वस्थ मनें बैसले ॥९४॥ तंव ज्ञानदेव बोलत वाचा । धन्य दिवस सुदिन आजिचा । समागम जोडला संतांचा । लाभ दर्शनाचा दीधला ॥९५॥ तों प्रसाद घेऊनि लवलाहीं । बाहेर आली मुक्ताबाई । सप्रेम भाव धरोनि जीवीं । लागतसे पायीं निवृत्तीच्या ॥९६॥ ऐशा रीतीं संतपूजन । झालीं सकळांची भोजनें । तंव चांगदेव सन्निध येऊन । मुक्ताबाई नमन करीतसे ॥ ९७ ॥ हात जोडूनि ते वेळे । उभा राहिला चौघां जवळ । म्हणे पत्रिकेचा अर्थ नकळे । तो मज सकळ सांगावा ॥ ९८ ॥ सकळ साधनांमाजी श्रेष्ठ । संत समागम दिसे वरिष्ठ । ऐसें मुनि वदले स्पष्ट । ते आजि गोष्ट मज फावली ॥९९॥ ऐसें पुसतां योगेश्वर । काय म्हणती ज्ञानेश्वर । बळी द्यावया पत्रिकेवर । एक शिष्य सत्वर तुम्हीं द्यावा ॥१००॥ तेव्हांचि अर्थ पत्रिकेचा । तुमचें चित्तीं बिंबेल साचा । शब्द ऐकूनि ज्ञानदेवाचा । अवश्य इंद्राचा गण म्हणे ॥१॥ चौदाशें शिष्य मंडळी । त्यांतून एक देऊं बळी । विचार करून रात्री काळीं । मग सकाळीं सांगूं तुम्हां ॥२॥ ऐकून सद्गुरूचें उत्तर । तों शिष्य जाहले चिंतातुर । म्हणती कोणाच्या जीवावर । झाले उदार कळेना ॥ ३ ॥ ऐसें बोलोनि ते समयीं । मग कुसमुसिती आपुले जीवीं । चैन न पडे कोणासही । देह लोभ पाहीं अनिवार ॥ ४ ॥ ऐसा विचार करिती एका । ऊठ बैस करिती देखा । वर्षा येवढी लोटे घटिका । करिती टीका मागें पुढें ॥ ५ ॥ पंक्तिसि जेवलों आजवर । भोगिले नाना उपचार । त्याचें वोढें निघालें सत्वर । ऐसें परस्पर बोलती ॥ ६ ॥ स्वामींनीं अभय ठेविला शिरीं । संतती संपत्ती आली घरीं । त्याचेंच वोढें निघाले त्वरीं । उत्तम परी दिसेना ॥ ७ ॥ एक म्हणती संचिती जैसें । तें घडोनि आलें अनायासें । स्वामींनीं फुकट घेतला वेश । मोहनी सर्वांस घालूनी ॥ ८ ॥ नानापरीचे सावरी मंत्र । शिकवूनि बुडविलें आमचें घर । आतां गोष्ट आली जिवावर । उत्तम विचार दिसेना ॥ ९ ॥ चौदाशें शिष्य ऐशा रीतीं । नानापरीच्या कल्पना करिती । तों अस्तमानासि गेला गभस्ती । मग संध्या करिती चांगदेव ॥११०॥ नित्य नेम हरिकीर्तन । करिती ज्ञानदेव सोपान । निवृत्ति चांगदेव बैसोनि । ऐकती गुण श्रीहरींचे ॥ ११ ॥ नामा येवढे साधन आणिक । कलियुगीं सर्वथा नाहीं देख । ऐसें भागवतीं बोलले शुक । विश्वोद्धारक जगद्गुरु ॥ १२ ॥ कर्मारंभीं उच्चारण । म्हणती केशव नारायण । शेवटीं करिती विष्णुस्मरण । न्यून ते पूर्ण

होय नामे ॥ १३ ॥ अजामिळ वृषलीसीं रत । तेणें पातक जाहलें अद्भुत । तों पुत्र मिसें नाम जपत । मग वैकुंठनाथ पावला ॥१४॥ विमानी वैसवूनि अवचिता । मुक्ति दीधली सायुज्यता । आणि शुकमिसें राघव म्हणतां । कुंटिणी सर्वथा उद्धरली ॥ १५ ॥ योग मार्ग बहुत कठिण । विरळा साधी लक्षांतून । भाळ्याभोळ्यां सकळां कारणें । नामचि पावन करीतसे ॥ १६ ॥ हरिहर सर्वदा म्हणती पाहीं । चारी मुक्ती लागती पायीं । महादोषासि ठाव नाहीं । त्रैलोक्य सर्वही उद्धरे ॥ १७ ॥ व्हावया जडमूढ उद्धार । पुंडलीकें केला उपकार । साक्षात परब्रह्म विटेवर । दर्शनेंच उद्धार सकळांसी ॥ १८ ॥ श्रीज्ञानदेवें ऐशा रीतीं । कीर्तनीं स्थापिली सगुणमूर्ती । मग उजळूनि मंगळ आरती । रुक्मिणी पती वोवाळिला ॥१९॥ खिरापती वांटूनि सकळां कारणें । मग निवृत्ति देवासि केलें नमन । घालूनियां तृणासन । निद्रेसि मान ते देती ॥ १२० ॥ चांगदेव जावोनि एकांतीं । शयन करीत मध्यरात्रीं । शिष्य संप्रदायीं जवळ येती । सेवा करिती निज हस्तें ॥ २१ ॥ तयांसि एकांतीं योगेश्वर । स्वमुखें पुसतसे विचार । ज्ञानदेवें आम्हांसि लिहिलें पत्र । परी सखोल फार अर्थ त्याचा ॥२२॥ तो विचारूनि घ्यावया प्रांजळ । एका पुरुषाची पाहिजे बळ । तरी तुम्हीं विचार करूनि सकळ । पुरवा तत्काळ आर्त माझें ॥ २३ ॥ ऐसें पुसतां सद्गुरु मूर्ती । शिष्य तयासि उत्तर देती । शरीर अर्पिलें तुम्हांप्रती । आतां कळेल युक्ती ते करावी ॥ २४ ॥ देहाचा लोभ धरूनि चित्तीं । वरदळ वैराग्य दाविती । तयांस ऐहिक परत्र निश्चितीं । नाहीं गतीं सर्वथा ॥ २५ ॥ जैसें कडू वृंदावन देख । दिसे जैसें मोहरवाळुक । चिरोनि पहाता अंतरीं विख । तैसे मायिक शिष्य त्याचे ॥२६॥ नातरीं मुलामियाची मोहर । साजिरी दिसतसे वरवर । मुलाखोनि पाहतां साचार । तों पोटीं ताम्र भरियेलें ॥ २७ ॥ कां फांसा घालावया निश्चित । वैष्णव वेष मैंद घेत । बाह्याकारें भाव दावित । जळो संगत तयाची ॥ २८ ॥ तैसी कामनिकांची भक्ती । चित्तीं इच्छिती धनसंपत्ती । पूर्ण होतां आपुली आर्ती । मग उपेक्षिती सद्गुरूतें ॥ २९ ॥ तैसे चांगयाचे शिष्य निश्चित । वरिवरि लटिकाचि भाव दावित । मग स्वामीस निद्रा लागतां बहुत । विचार करिती एकमेकां ॥ १३० ॥ आपण राहिलों या जवळी । यास्तव मनुष्याचा मागती बळी । दिवस उगवतां सकळीं । मरण तत्काळीं पातलें ॥ ३१ ॥ स्वामीस शिष्य बहुत देख । परी ज्याचा जीव तयासि एक । आतां विचार करोनि सकळीक । निघा सत्वर येथूनियां ॥ ३२ ॥ स्वामी तों शिष्य करितील आणिक । परी आपुल्या वायकोस आपण एक । गोसीचा पाय मोडला देख । तरी अमती आणिक तिजलागीं ॥ ३३ ॥ गुरु रूढ मिथ्या विचारु । आम्हांसि आवडे संसारु । ऐसें बोलोनि परस्परु । पळाले सत्वरु अवघेची ॥ ३४ ॥ चौदाशतें संप्रदायी । परी एकही त्यांतून राहिला नाहीं । हे ज्ञानदेवें युक्ति केली पाहीं । पाश सर्वही तोडिले ॥ ३५ ॥ गृहस्थाश्रमा परीस जाण । मठाश्रम परम कठिण । त्याचा त्याग कोणा कारणें । नव्हेचि जाण सर्वथा

१ बरवर २ फलंक

॥ ३६ ॥ जरी कृपा करील श्रीहरी । तरीच महंती होईल दुरी । नाहीं तरी माझे अंतरी । उत्तम परी दिसेना ॥ ३७ ॥ असो ज्ञानदेव करूनियां युक्त । शिष्य पळोनि गेले समस्त । तों चांगदेव जाहले जागृत । हाक मारित शिष्यांतें ॥ ३८ ॥ परी सन्निध न दिसे एकही नयनीं । जावही परतोनि न देच कोणी । जैसा नृप पडतां रणीं । देह लोभी पळोनी जाती ॥ ३९ ॥ चांगयाचे शिष्य चौदां शेतें । परी एकही राहिला नाहीं त्यांत । मग आपुल्या हातें उदक घेत । आचमन करित निजहस्तें ॥ १४० ॥ प्रातःस्मरण कांकड आरती । चांगदेव म्हणतसे निजप्रीतीं । तों ज्ञानदेव दर्शनास येती । नमस्कार करिती परस्परें ॥ ४१ ॥ चांगयाप्रती बोलती वचन । आजि उत्तम मुहूर्त असे सुदिन । पत्रार्थ व्हावया श्रवण । बळिदानास कोण शिष्य देतां ॥४२॥ हाक मारितां लवलाही । परी कोणीच उत्तर न देती पाहीं । पळाले जाणोनि ते समयीं । पश्चात्ताप जीवीं वाटला ॥४३॥ म्हणे सिद्धाईचा घालूनि प्रसर । उगाचि श्रमलों आजवर । अंतीं अवघेचि गेले दूर । जीवावर गोष्ट येतां ॥४४॥ बहुत संप्रदायीं करून । कोणीच प्रसंगीं नाहीं जाण । जेव्हां ऐसें तें महंतपण । नाशवंत जाण सर्वस्वें ॥४५॥ चौदा विद्या चौसष्टीकळा । अभ्यासून म्यां श्रम केला । सिद्धींचा सोहाळा जनासि दाखविला । योग साधिला अष्टांग ॥४६॥ इतुका श्रम केला बरवा । परी जीवासि नाहीं विसांवा । आतां राहूनि संताच्या गांवा । करावी सेवा निरंतर ॥४७॥ ऐसा अनुताप धरोनि मनीं । ज्ञानदेवासि म्हणे तये क्षणीं । आतां माझा देह बाळि देऊनी । अर्थ कानीं सांगावा ॥ ४८ ॥ जीवाचें भय धरूनि मनीं । शिष्य गेले असती पळोनी । एकला उरलों ये ठिकाणीं । आतां कळेल करणी तैसी करा ॥४९॥ तनुमन आणि सिद्धींचें धन । यांसहित आलों शरण । असत्य असेल हें वचन । तरी अंतःकरण जाणतसां ॥ १५० ॥ ऐसी चांगयाची वचनोक्ती । ऐकोनि ज्ञानदेव संतोपले चित्तीं । मग निवृत्तीसीं वृत्तांत सांगती । चांगयाची गुंती उगवली ॥ ५१ ॥ दांभिक उपाधि होती जवळ । ते शिष्य पळोनि गेले सकळ । सद्गुरु म्हणती हा तुझाचि खेळ । मागीतली वळ मनुष्याची ॥ ५२ ॥ त्याच्या भयें करोनि निश्चितीं । शिष्य पळोनि गेले रातीं । ऐसें बोलतां श्रीनिवृत्ती । मुक्ताई हांसती गदगदां ॥ ५३ ॥ मग निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई सांगती खुण । चांगदेवासीं उपदेश देणें । निजकृपेनें आपुल्या ॥ ५४ ॥ आधींच शुद्धपात्र देखूनि भलें । त्यावरी वैराग्य ठसवले । स्नान करोनि नित्य नेम सारिले । सन्निध बैसविलें चांगयासीं ॥ ५५ ॥ मग स्वमुखें एक अभंग पाही । उपदेश करीत मुक्ताबायी । तो ग्रंथीं लिहितों ये समयीं । ऐका सर्वही भाविकहो ॥ ५६ ॥ अभंग ॥ मी कोण हें वोळखावें । आपण आपणा पाहावें । स्वरूपीं समरसावें रात्रंदिवस ॥१॥ त्रिगुणावरुतें ज्ञान पैं निश्चित । तथा पैं निरुतें धेई बापा ॥ २ ॥ मुक्ताबाई म्हणे होईं तूं सावध । सांगीतल्या बोध पुढील तो ॥ ३ ॥ ओव्या ॥ ऐशा रीतीं ते समयीं । अनुग्रह करीत मुक्ताबायी । पूर्ण बोध ठसावला देहीं । मग चांगया पायीं लागला ॥ ५७ ॥ दृष्टीसि

१ राजा २ चौदाशे

दिसतें चराचर । तो अवघाचि भासे विश्वंभर । आपणासहित त्यामाजीं विरे । द्वैत अणुमात्र असेना ॥ ५८ ॥ चौदाविद्या चौसष्टी-कळांचा । अभिमान गळाला सिद्धीचा । बोध होतांचि मुक्ताईचा । विसर देहाचा पडियेला ॥ ५९ ॥ चराचर जें जें दिसे । तो अवघा पांडुरंग एक भासे । जागृती स्वप्नीं तोचि दिसे । गेलें काळ घसें अविद्येचें ॥ १६० ॥ ब्रह्मरूप अवघे जन । सर्वत्र चैतन्य व्यापक पूर्ण । सद्गुरु कृपें जाहलें ज्ञान । नाहीं खंडण तयासी ॥ ६१ ॥ सद्गुरु कृपेवीण कांहीं । आत्मज्ञान सर्वथा होणेचि नाहीं । ऐसें श्रुतिवाक्य असे पाहीं । सिद्धांत ग्वाही याचि रीती ॥ ६२ ॥ ज्ञानदेवाचे संगतीस । रात्रीं ऐकती कीर्तन घोष । श्रवण मनन रात्रंदिवस । ऐसा एकमास लोटला ॥ ६३ ॥ संत संगें श्रवण मनन । अनुभवें निदिध्यास लागला पूर्ण । तेणें साक्षात्कारासि येऊन । वृत्ति संपूर्ण मुराली ॥ ६४ ॥ तंव ज्ञानराज म्हणे चांगयाप्रती । एक मास लोटला आमुचे संगती । पत्राचा अर्थ बाणला चित्तीं । हें मजप्रती सांगावे ॥६५॥ ऐसें पुसतांचि उत्तर । सद्भावें लोटत चरणावर । मग चांगदेव बोलिले अभंग सत्वर । तो ऐका सादर निजकर्णीं ॥ ६६ ॥ अभंग ॥ वळेनावरसेंवरव पूर आला । तेथें जन बुडाला बाईयानों । बुडाला बुडाला परी म्हणती । बुडाल्याची शुद्धी कोणी न घेती ॥ २ ॥ ऐल बुडाला पैल बुडाला । कोरड्याच डोही जन बुडाला ॥ ३ ॥ ज्ञानदेव सांगडी मुक्ताबाई तारू । चांगा पैल पारू पावविला ॥ ४ ॥ ओव्या । ऐसे म्हणोनि ते अवसरीं । चौघा जणांसि नमस्कारी । म्हणे तुमचे कृपेनें सत्वर । बोध अंतरीं ठसावला ॥ ६७ ॥ पत्राचें उत्तर ऐकोनि कानीं । ज्ञानदेव संतोषले मनीं । म्हणे तुम्हीं जन्मास येउनी । आपणालागीं रक्षिलें ॥ ६८ ॥ तंव मुक्ताबाई बोले उत्तर । चौदाशे वर्षांचें शरीर । जाहलें असे तुझें अमर । आतां सांगेन विचार तो ऐका ॥ ६९ ॥ हा देह सांडूनि[२] पाहीं । दुसरा जन्म सत्वरी घेयी । मग विष्णु उपासना धरोनि जीवीं । सप्रेम भावी अर्चिजे ॥ १७० ॥ श्रीपांडुरंगाच्या भक्तीविण । सर्वथा नव्हे सात्त्विक गुण । सगुण मूर्तीचें उपासन । निज प्रीतीनें करावें ॥ ७१ ॥ श्रीरामकृष्णादि चरित्रें थोर । कीर्तनीं गावीं परमादर । तेणेंचि होईल जगदुद्धार । पुण्यासि पार असेना ॥ ७२ ॥ कीर्तनाहूनि आणिक साधन । कलियुगीं वरिष्ठ नसेचि जाण । तरी आतां पंढरीस जाऊन । रुक्मिणीरमण वोळखावा ॥ ७३ ॥ ऐसें सांगतां सद्गुरुमाय । मग चांगदेवें धरिलें पाय । म्हणे तुमची आज्ञा प्रमाण होय । नुलंघीं पाहे अणुमात्र ॥ ७४ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं । चौघाजणांसि नमस्कारी । साष्टांग नमस्कार धरणीवरी । चांगदेव करी तेधवां ॥ ७५ ॥ सद्गुरुपूजा करीन आतां । ऐसें आर्त धरितसे चित्तां । जेणें भवपार पावविलें आतां । त्यासि उत्तीर्णता कैसेनी ॥ ७६ ॥ मग यथा विधी वेदोक्त मंत्रें । पूजा केली षोडशोपचारें । चंदन पुष्पें उपचार । तुळसी हार समर्पिले ॥ ७७ ॥ धूप दीप पंचारती । वोवाळीली सद्गुरुमूर्ती । नैवेद्य दक्षिणा अर्पूनि प्रीतीं । खिरापती वांटिल्या ॥ ७८ ॥ श्रीविठ्ठल नामाचा करूनि गजर । घालीत

१ अज्ञानाचे २ सोडून

साष्टांग नमस्कार । म्हणे धन्य निवृत्ति योगेश्वर । अवतरला शंकर भूमंडळीं ॥ ७९ ॥ धन्य ज्ञानदेव सद्गुरुमूर्ती । विष्णु अवतार जन्मला क्षितीं । याच्या दर्शनमात्रें निश्चिती । जीव उद्धरती असंख्य ॥ १८० ॥ सोपानेश्वर हा प्रजापती । मुक्ताबाई आदिशक्ति । हे नाममात्रें जगासि तारिती । केली स्तुती चांगदेवें ॥ ८१ ॥ पुष्पांजळी मंत्र घोषें । भावें नमस्कार घालीतसे । चांगदेव आज्ञा मागतसे । वटेश्वरास जावया ॥ ८२ ॥ चांगदेवाचा तये वेळां । सद्गदित दाटलासे गळा । आनंदाश्रु वाहती डोळां । म्हणे धन्य सोहळा देखिला ॥ ८३ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई गुणनिधान । बोळवीत चालिले चौघेजण । निजप्रीतीनें आपुल्या ॥ ८४ ॥ चांगदेवें त्यांचे वंदोनि पाय । मग निघता झाला लवलाहें । क्षणक्षणा मागें परतोनि पाहें । प्रेम न समाये अंतरीं ॥ ८५ ॥ बोळवूनि चांगदेवा कारणें । मठासि आले चौघेजण । ध्यानींमनीं जगज्जीवन । आणिक कारण असेना ॥ ८६ ॥ जागृतीं स्वप्नीं सुषुप्तीं । चित्तीं भरली पांडुरंगमूर्ती । कीर्तन घोष रात्रीं करिती । श्रवणीं ऐकती क्षेत्रवासी ॥ ८७ ॥ दिवसां वेदांत ज्ञानेश्वरी । नित्य वाचिती सहपरिवारीं । धन्य क्षेत्र अलंकापुरी । जैसी पंढरी वैकुंठ ॥ ८८ ॥ धन्य धन्य ते पंचक्रोशी । ज्ञानदेव सन्निध त्यासी । धन्य वैष्णव क्षेत्रवासी । सान्निध्य त्यासी देवाचें ॥ ८९ ॥ धन्य तें इंद्रायणी तीर । जें सकळ तीर्थांचें माहेर । मध्यान्हीं सकळ सुरवर । येती सत्वर स्नानासीं ॥ १९० ॥ तिहीं लोकींचीं तीर्थें पाहीं । सदा वसती संतांचे गांवीं । मग पुनीत होऊन लवलाहीं । जन सर्वही उद्धरती ॥ ९१ ॥ जेथें अवतरलें वैष्णव वीर । तें गांव साक्षात वैकुंठपुर । तेथें सर्वदा होय कीर्तन गजर । यम किंकर पळताती ॥ ९२ ॥ संत वसती जे गांवीं । तेथें कळिकाळासी रीघ नाहीं । चतुर्भुज लोक होती सर्वही । हेचि नवायी अगाध ॥ ९३ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथसार । हेचि पंढरी पावन क्षेत्र । सद्भाव पुंडलीक वैष्णव वीर । तेथें निरंतर राहिला ॥ ९४ ॥ मुक्ती वरील चौथी भक्ती । तेचि चंद्रभागा भीमरथी । जिच्या दर्शनमात्रें निश्चितीं । जीव उद्धरती असंख्य ॥ ९५ ॥ पूर्ण सुखाचा ब्रह्मानंद । तोचि जाणावा वेणुनाद । तेथें मुरली वाजवीत नानाछंदें । उभा गोविंद राहिला ॥ ९६ ॥ करद्वय ठेवूनि कटीं । विटेवरी उभा जगजेठी । भाविक भक्तांसि देऊनि भेटी । हृदय संपुटीं धरीतसे ॥ ९७ ॥ तो हा सांवळा जगज्जीवन । नासाग्रीं ठेवितसे ध्यान । महीपति त्याचीं पाउलें सेवून । निजप्रीतीनें आठवी ॥ ९८ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । सदा परिसोत भाविकभक्त । पंचमाध्याय रसाळ हा ॥ १९९ ॥ अभंग व ओंव्या मिळून संख्या ॥ २०२ ॥ ॥ अ० ॥ ॥ ५ ॥

१ देव २ पवित्र ३ दूत ४ कमरेवर

अध्याय ६

श्रीगणेशायनमः । मनुष्यदेह लाधतां पूर्ण । न ऐके जरी श्रीहरीचे गुण । जे संसारांत जाहले निमग्न । तरी पशु समान ते नर ॥ १ ॥ आहार निद्रा मैथुन पाहीं । हे जीवासि प्राप्त सकळ देहीं । तेथेंचि रमतां मनुष्यांहीं । तरी सद्भाक्ति कांहीं घडेना ॥ २ ॥ दैवें नरदेह लाधला पाहीं । त्याचें सार्थक करावें सर्वांहीं । तीर्थयात्रा कराव्या कांहीं । अनुताप जीवीं धरोनियां ॥ ३ ॥ आर्ते अर्चावी विष्णुमूर्ती । देहें दंडवत घालावें प्रीतीं । नेत्रांनीं पहाव्या संतमूर्ती । श्रवणीं सत्कीर्ती ऐकावी ॥ ४ ॥ सुखें करावा संसार । त्यांत घडो द्यावा परोपकार । तृषाक्रांतासि पाजावें नीरें । आणि अन्न व्यवहार क्षुधितासी ॥५॥ प्राणांत वोडवल्याही जाण । असत्य न बोलावें वचन । जिव्हेसि सर्वदा नामस्मरण । श्रीरामकृष्ण गोविंद ॥ ६ ॥ या वेगळें माझीया जीवीं । आणिक साधन नावडे कांहीं । महीपति लागतसे पायीं । तरी उचित देयी पांडुरंगा ॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा सुरस । चांगदेवासि जाहला उपदेश । मग आज्ञा मागोनि ज्ञानदेवास । वटेश्वरास पातले ॥ ८ ॥ मुक्ताबाईची आज्ञा शिरीं । कीं दुसरा देह सत्वर धरीं । श्रीपांडुरंगाची उपासना करी । तो आठव अंतरीं जडलासे ॥ ९ ॥ मग चांगदेवें येवोनि वटेश्वरीं । कर्पूरगौरासि नमस्कारी । पूजाकरोनि सर्वोपचारी । तेथोनि सत्वर निघतसे ॥ १० ॥ मग तपती तीराहूनि निघत । तोरण माळासि गेले त्वरीत । तेथें विष्णु अवतार साक्षात । श्रीगोरक्षनाथ असती ॥ ११ ॥ ज्याणी जगदुद्धार करावयालागीं । अवतार घेतला कलियुगीं । सर्व सामर्थ्य असोनि अंगीं । फिरे वीतरागी उदास ॥ १२ ॥ आदेश करोनि ते अवसरीं । चांगदेव गोरक्षासि नमस्कारी । पूजा केली सर्वोपचारीं । निजप्रीति अंतरीं धरोनियां ॥ १३ ॥ गोरक्ष गुरूची परंपरा । म्हणोनि पूजित त्या अवसरा । त्यांनींही आदर केला बरा । म्हणती पातले घरां सिद्धपुरुष ॥ १४ ॥ ऐसा उल्हास धरूनि चित्तीं । चांगदेवाची मांडिली स्तुती । म्हणे तुमची देखोनि सप्रेम भक्ती । कैलासपती प्रगटला ॥ १५ ॥ वाटीचा[1] जाहला वटेश्वर । ही सत्कीर्ति कानीं ऐकिली थोर । आणिकहि सिद्धीचा प्रकार । दाविला साचार मृत्युलोकीं ॥ १६ ॥ ऐशापरी करोनि स्तुती । चांगदेवासी गोरक्ष म्हणती । काय अपेक्षा असे चित्तीं । ते मजप्रती सांगावी ॥ १७ ॥ कवण्या कार्यालागीं येथें । विजें केलें असे त्वरित । तें मज सांगा यथास्थित । चित्तीं द्वैत न धरितां ॥१८॥ गोरक्षनाथें ऐसें पुसतां । चांगदेवें चरणीं ठेविला माथा । म्हणे विज्ञापना एक समर्था । सांगतों आतां ऐकावी ॥ १९ ॥ मागें वटेश्वरी साचार । होता सिद्धाईचा भर । यात्रा दर्शनासि येतसे फार । कामनि[2] संसार करती जे ॥ २० ॥ तेथें स्त्री पुरुष दोघे जण । पुत्रकामना मनीं धरून । तीव्र मांडिलें अनुष्ठान । सर्वथा अन्न न सेविती ॥२१॥ त्यांचा निग्रह देखोनि फार । संतुष्ट जाहला वटेश्वर । मग मज सांगीतलें श्रीशंकरें[3] । यांचें आर्त्त पुरतें करीं ॥२२॥ ऐसा दृष्टांत देखोनि स्वप्नीं । मग मी बोलिलों त्यांज लागोनी । काय इच्छा तुमचें मनीं । ते सत्वर ये क्षणीं सांगीजे ॥ २३ ॥ आजि आज्ञा केली वृषभध्वजें । म्हणोनि संकट पडिलें मज ।

१ कळवळून, मनापासून २ पाणी ३ श्रीशंकरांनीं

चित्तीं चिंता असेल सहज । तरी ते मज सांगावी ॥ २४ ॥ कोणते स्थळीं तुमची वस्ती । काय व्यवसाय कोणती वृत्ती । इच्छितां संतति किंवा संपत्ती । हें मजप्रती सांगावें ॥ २५ ॥ ऐसें ऐकोनि आमुचें उत्तर । मग बोलता झाला द्विजवर । म्हणे माझा भाव निरंतर । चरणावर स्वामीच्या ॥ २६ ॥ बाळक अघटित घेतसे आळें । जननी पुरवी तयाचे लळे । तैसेचि तुम्ही संत कृपाळ । दीन दयाळ सर्वदा ॥ २७ ॥ आम्हां उभयतांचा हेतु थोर । कीं तुम्हां ऐसा असावा पुत्र । मग कुळाचा सकळ उद्धार । होईल साचार तेणेंची ॥ २८ ॥ ऐसी ग्लांती करोनियां फार । उभयतां करिती नमस्कार । मग मी प्रसन्न होऊनि सत्वर । दीधला वर त्यांलागीं ॥२९॥ साक्षात विष्णूचा अवतार । गोरक्षनाथ योगेश्वर । विचरत असती पृथ्वीवर । जगदुद्धार करावया ॥ ३० ॥ कोणी एके अवसरीं । ते भिक्षेसि येतील तुमचे घरीं । पुंगी वाजवितां सत्वरीं । नादा भीतरी प्रगटेना ॥ ३१ ॥ तों पर्यंत सावध चित्तीं । कोणी विमुख दवडूं नये अतिथी । ऐसें सांगतां त्यांजप्रती । ब्राह्मण विनंती करितसे ॥३२॥ म्हणे मज दीधलें अभयदान । त्याचा नियम असे कोण । बारा वर्षांनीं येईन लहान होऊन । म्हणून वचन त्यास दीधलें ॥ ३३ ॥ ऐसा घेऊनि आमुचा वर । मग घरासि गेला तो द्विजवर । तें पासून निदिध्यास थोर । लागला साचार आमुचा ॥ ३४ ॥ नियम केला असे त्यासी । अकरा वर्षे लोटली ऐसी । षण्मास उरले अवधीसी । यास्तव स्वामीसी निवेदिलें ॥ ३५ ॥ श्रावणमास उत्तम पूर्ण । नागपंचमी बहुत सुदिन । स्वामींनीं अगत्य तेथें जाणें । मग प्रगटेन नादीं तेथें ॥ ३६ ॥ ऐसें ऐकोनि गोरक्षनाथें । अवश्य म्हणे चांगदेवातें । आम्ही येऊनि त्या ठायातें । त्याचे मनोरथ पूर्ण करूं ॥ ३७ ॥ ऐसें बोलिले योगेश्वर । तयांसि पुसोनि निघे सत्वर । मग पावोनि तापी तीर । श्रीवटेश्वर नमियेला ॥ ३८ ॥ मग तेथूनि षण्मासापर्यंत । चांगदेवें देह केला गुप्त । योगेश्वराची अघटित स्थित । लीला दाखवित जनातें ॥ ३९ ॥ नगरापासूनि समीप देख । नारायण डोहो क्षेत्र एक । तेथील मुधोपंत गृहस्थ देख । ग्राम लेखक वृत्ति असे ॥४०॥ यजुर्वेद शाखा निश्चित । ब्राह्मण सुशील असे बहुत । पंच महायज्ञ नित्य होत । अन्नदान देत भूतमात्रीं ॥ ४१ ॥ धर्मपत्नी पतिव्रता जाण । नामाभिधान असे रुक्मिण । चांगदेवाचें लागलें ध्यान । दोघा कारणे सर्वदा ॥४२॥ धंदा करितां दिवसनिशीं । जागृति स्वप्न सुषुप्तीसी । चांगदेव दिसे मानसीं । विसर दोघांसी पडेना ॥ ४३ ॥ म्हणती आम्हांसी दीधलें वचन । कीं तुमचा पुत्र मी होईन । तें कदापि असत्य नव्हेचि जाण । भरंवसा पूर्ण मानसीं ॥ ४४ ॥ नियम केला जो आम्हांप्रती । ते सान्निध दिवस आले निश्चितीं । कान फडियाची वाट पाहती । म्हणती भिक्षेसी येती कधीं ॥ ४५ ॥ ऐसा लोटतां बहुतकाळ । तों नागपंचमी आली जवळ । म्हणवोनि जपती सर्वकाळ । तयाचें फळ पाहावया ॥ ४६ ॥ चार दिवस लोटतां त्यासीं । तों गोरक्ष पातले भिक्षेसी । अलख म्हणवोनि द्वारापासीं । साद अनायासीं घातला ॥ ४७ ॥ सुवर्णा ऐसी सुंदर कांती । त्यावरी चर्चिली

१ हट्ट २ फिरत ३ अहमदनगर

शुभ्र विभूती । दिव्य मुद्रा कार्नीं तळपती । नयन शोभती आकर्ण ॥ ४८ ॥ ऐसें रूप देखोनियां नयनीं । गृह स्वामीण विस्मित मनीं । गृहांत जाऊनि ते क्षणीं । भिक्षा आणोनी घालितसे ॥ ४९ ॥ तों पूर्वीलें आठव झाला सत्वर । जो चांगदेवें दीधला वर । मग शुद्ध करोनि अंतर । केला नमस्कार गोरक्षा ॥ ५० ॥ मग संतुष्ट होऊनि योगेश्वर । म्हणे तुझा मनोरथ तत्काळ पुरे । मग पुंगी घेऊनि आपुल्या करें । नाद सत्वर फुंकिला ॥ ५१ ॥ नादब्रह्म मंजुळ ध्वनी । रखुमाई ऐके प्रीती करोनी । तों नवल वर्तलें तये क्षणीं । तें सादर श्रवणीं ऐकिजे ॥ ५२ ॥ नादासरीसां बाळक । अंगणीं प्रगट जाहला देख । बत्तीस लक्षणी सुलक्षणिक । वाटे कौतुक देखतां ॥ ५३ ॥ क्षण एक पातली विदेह स्थिती । तों अदृश्य झाले गोरक्षनाथ । मुधोपंत बाहेरून येत । कळला वृत्तांत तयासी ॥ ५४ ॥ रखुमाई सांगे त्याज लागुनी । एक अतीत आला होता अंगणीं । पुंगी नाद ऐकिला श्रवणीं । तों बाळक नयनीं देखिले ॥ ५५ ॥ मागील आठव झाला सत्वर । म्हणती प्रसन्न झाला वटेश्वर । चांगदेवें आपणासि दीधला वर । मी होईन पुत्र तुमचा ॥५६॥ तें आज सत्य केलें आपुलें वचन । बाळक घेई उचलोन । रखुमाई वोसंगा घेतां जाण । समाधान वाटलें ॥ ५७ ॥ आनंद उत्साह मांडिला घरीं । मंगळ वाद्यें वाजती गजरीं । सुंठोडे वांटिती घरोघरीं । नवल अंतरीं लोक करिती ॥ ५८ ॥ बाळक न्हाणोनिया जाणा । आडवा घेतला असतां तान्हा । तों रखुमाई स्तनीं दाटला पान्हा । अद्भुत रचना ईश्वराची ॥ ५९ ॥ बाळक सुंदर सभाग्य लक्षण । पाहतांचि डोळ्या होय पारणें । पुन्हा अवतरला मरुद्गण । ऐसेंचि जन बोलती ॥ ६० ॥ गणक बोलावूनि ज्योतिषी । जातक पाहिलें तिये दिवसीं । दानें वाटिलीं याचकांसी । उल्हास मानसीं धरोनियां ॥ ६१ ॥ नगरवासी घरोघर । आनंद उत्सव करितीं थोर । म्हणती आमुचें गांवीं साचार । योगेश्वर अवतरला ॥ ६२ ॥ बारावे दिवसीं करोनि बारसें । पाळण्यांत घातलें निज पुत्रास । चांगदेव नाम ठेविलें त्यास । घुगऱ्या सर्वांस वांटिल्या ॥ ६३ ॥ चांगा वटेश्वरीं अनुष्ठान । करितां लाधले पुत्र निधान । म्हणोनि तेंच ठेविलें नामाभिधान । निज प्रीतीनें आळविती ॥ ६४ ॥ दिवस मास संवत्सर । लोटतां थोर वाढला पुत्र । चालूं बोलूं शिके सत्वर । स्वरूपीं सुंदर गुणनिधी ॥ ६५ ॥ पांचवे वर्षीं व्रतबंध केला । गायत्री मंत्र अनुग्रह जाहला । मुधोपंतासि आनंद वाटला । उत्साह केला चार दिवस ॥ ६६ ॥ भोजन दक्षिणा देऊनि फार । तृप्त केले वैदिक द्विजवर । मुलाची प्रज्ञा बहुत थोर । वेदाक्षर पढविती ॥ ६७ ॥ सांगतां कुळगुरूसि नलगती कष्ट । अवतार लीला योगभ्रष्ट । चार वेदही केले पाठ । शास्त्रें यथेष्ट घोकिलीं ॥ ६८ ॥ काव्य व्याकरणीं झाला निपुण । देखूनि आश्चर्य करिती जन । थोरथोर विद्वान ब्राह्मण । दर्शना लागोन ते येती ॥ ६९ ॥ म्हणती आमुची फेडावया भ्रांती । साक्षात अवतरला प्रजापती । मुखोद्गत केल्या सकळ श्रुती । झाला भागवतीं प्रवीण ॥ ७० ॥ एक म्हणती द्वैपायनें । पुन्हा अवतार घेतला

१ पूर्वीची आठवण २ भिक्षेकरी ३ बुद्धी ४ व्यासमुनी

जाण । ऐसे थोरथोर पंडित येऊन । करिती स्तवन चांगयाचें ॥ ७१ ॥ जाणोनिया अवतार मूर्ती । मोहरा होन पुढें ठेविती । एक वस्त्रें अळंकार लेवविती । आनंद चित्तीं मायबापां ॥ ७२ ॥ मुधोपंतें वटेश्वराकारणें । बांधिलें असे सेवा करून । तें फेडीत असे पुत्रपणें । संपत्तिवान तो झाला ॥ ७३ ॥ चौदा विद्या आणि कळा समस्त । पहिलाचि अभ्यास अवगत । एकदा अवलोकितां समस्त । मुखोद्गत ते जाहले ॥ ७४ ॥ ऐसा देखोनि सद्गुण । अमर्याद आणूनि देती धन । चांगयाचा बहुत सन्मान । म्हणती कन्यादान यासि करा ॥ ७५ ॥ सुवर्ण मुद्रा सहस्र जाणा । देऊनि गृहस्थ वरदक्षिणा । लग्न तिथि नेमितां जाणां । परम उल्हास मना वाटला ॥ ७६ ॥ देवक प्रतिष्ठा ब्राह्मण भोजन । केलें निर्विघ्नांचें[1] पूजन । अंतरपाट धरोनियां जाण । बोलती ब्राह्मण अष्टकें ॥ ७७ ॥ ओंपुण्याह म्हणती सत्वर । लागले वाद्यांचे गजर । यथाविधीनें सोहळा फार । दिवस चार जाहला ॥७८॥ वधूवरें घेऊनि त्या अवसरा । मुधोपंत पातले घरां । बहुत आंदण दीधलें वरा । देखोनी अंतरीं उल्हास ॥ ७९ ॥ पूर्वजन्मीं सुकृत केलें थोर । पोटासीं आला योगेश्वर । त्याच्या योगें साचार । संपदा फार पातली ॥८०॥ त्रिकाळ स्नान संध्या निश्चित । यथाविधि नित्य करीत । घरीं स्मार्ताग्नि सिद्ध होता । अतिथी पूजित प्रीतीने ॥८१॥ घरीं घातले अन्नसत्र । सिद्धि राबती सर्वत्र । उणें न पडेचि अणुमात्र । नसे परतंत्र एकही ॥ ८२ ॥ चौवीस वर्षे पर्यंत । गृहस्थाश्रम यथास्थित । चांगदेव वडिलांची सेवा करित । सौख्य अद्भुत देखिलें त्यांनीं ॥ ८३ ॥ आणिक पुत्र पोटासि येती । माय बापांची छळणा करिती । थोर वाढतां वेगळे राहती । ऐकोनि वचनोक्ती कांतेची ॥ ८४ ॥ जंतु पडतो पोटांतून । कुपुत्र तेही त्यासमान । न घडतां वडिलांचे सेवन । ते सूकराहून[2] नीच प्राणी ॥ ८५ ॥ पहातां पुंडलीक द्विजवर । पितृभक्तीसि जाहला तत्पर । त्याच्या पुण्याचा नकळे पार । हें नारदें सत्वर जाणीतलें ॥८६॥ मग दृष्टीस पाहोनि त्याची स्थिति । ब्रह्मसुत संतोषला चित्तीं । द्वारकेसि जाऊनि सत्वरगतीं । श्रीकृष्णाप्रती सांगितलें ॥ ८७ ॥ म्हणे रुक्मिणीकांता देवाधिदेवा । पुंडलीक करितो पितृसेवा । त्याचें दर्शन घेशील जेव्हां । तरी विश्रांति जीवा मग होय ॥ ८८ ॥ ऐसें ऐकूनि श्रीहरी । पातले पुंडलीकाचे द्वारीं । पाय जोडूनि विटेवरी । निरंतरी राहिले ॥ ८९ ॥ माय बापांची करितां सेवा । त्याचा उपकार न फिटेचि देवा । भुलोनि त्याच्या भक्तीभावा । द्वारीं बरवा तिष्ठतसे ॥ ९० ॥ ठाण साजिरें सुकुमार । जघनीं[3] ठेविलें दोन्ही कर । भाविक भक्त येती फार । दर्शन साचार दे तयां ॥ ९१ ॥ जयासि व्हावी भगवत्प्राप्ती । त्याणें करावी पितृभक्ती । त्याच्या पुण्यें करूनि निश्चितीं । भुक्तिमुक्ति प्राप्त तया ॥ ९२ ॥ स्नानसंध्या यज्ञहवन । जपतप तीर्थाटण । वेदशास्त्रें आणि पुराणें । पितृभक्तिवीण व्यर्थची ॥ ९३ ॥ ऐसें जाणोनि साचार । चांगदेव महा योगेश्वरें । वडिलांसि सौख्य दीधलें फार । आज्ञा अणुमात्र नुलंधी ॥ ९४ ॥ चोवीस वर्षे लोटतां सकळ । मुधोपंतासि आला अंतकाळ । सत्पुत्र चांगदेव असतां जवळ । प्रायश्चित्त तत्काळ

१ श्रीगणेशाचें २ डुकराहून ३ कमरेवर

दीधलें ॥ ९५ ॥ देह सांडूनि तये क्षणीं । पिता चालिला वैकुंठ भुवनीं । रखुमाई उदास होऊनि मनीं । सहगमनीं निघाली ॥ ९६ ॥ उत्तर कार्य यथास्थित । झालीयावरी श्राद्ध करित । मग महायात्रेसि जाऊनि त्वरित । जाहले सुस्नात अनुतापें ॥ ९७ ॥ बहुत द्रव्य खर्चोनि तेणें । केलें पितयाचें गयावर्जन । होऊनि वडिलांचे उत्तीर्ण । आले परतोन स्वस्थानासी ॥९८॥ मग नारायण डोहासि येऊनि । चांगदेव प्रवेशले आपुलें सदनीं । वडिलांचें द्रव्य देखोनि नयनीं । तें ब्राह्मणा लागोनि वांटिलें ॥ ९९ ॥ सर्वस्वें उदार होऊन । मग पितृव्यासि दीधलें गांवींचें वतन । पूर्वानुसंधान स्मरोन । सावधपणें विचारी ॥ १०० ॥ म्हणे मुक्ताबाई माय । तिनें आज्ञा दीधली आहे । कीं पंढरीस जाऊन लवलाहें । पाहावे पाय विठोबाचे ॥ १ ॥ संतांचें माहेरघर पंढरी । भूवैकुंठ महीवरी । तेथें पुंडलीकाचें द्वारीं । उभा हरी राहीला ॥ २ ॥ दर्शनमात्रें साचार । करित जडजीवांचा उद्धार । खळांसि तेथें सुटती पाझर । प्रेमभरें करोनियां ॥ ३ ॥ ऐसा हेतं[2] धरोनि अंतरा । चांगदेव चालिले पंढरपुरा । परम उल्हास होय अंतरा । म्हणे रुक्मिणीवरा भेटावें ॥ ४ ॥ दिंड्या पताका बरोबर । आणिक यात्रा मिळाली फार । मृदंग विणे वाजती सुस्वर । नादें अंबर दुमदुमिलें ॥ ५ ॥ चांगदेव सप्रेम गजरीं । कीर्तन करीत ते अवसरीं । सत्वर पावले क्षेत्रपंढरी । नामघोष गजरीं डुल्लती ॥ ६ ॥ जयजयकारें पिटोनी टाळी । आनंदली भक्त मंडळी । मार्ग क्रमितां तये वेळीं । पातले जवळी पंढरीच्या ॥ ७ ॥ दुरून क्षेत्र दृष्टीस पाहत । तों चमत्कार देखिला अति अद्भुत । सकळांचा अभिमान झाला गलित । घालिती दंडवत एकमेकां ॥ ८ ॥ वर्णाभिमान कुळाभिमान । टाकूनि अहंता मीतूंपण । सकळ यातीसि लोटांगण । घालिती ब्राह्मण निजप्रेमें ॥९॥ हें चांगदेव देखोनि नयनीं । परम आश्चर्य करितसे मनीं । मग आपण महंती टाकोनि । लोटांगणीं जातसे ॥१०॥ संत महंत वैष्णव वीर । तयांसि घालिती नमस्कार । मग भेटोनियां परस्पर । मार्ग सत्वर क्रमिती ॥११॥ कीर्तन करीतसे ते अवसरीं । मग पावले क्षेत्रपंढरी । स्नान करोनि भीमातीरीं । नित्य नेम सारी तेधवां ॥ १२ ॥ घेऊनि पुंडलीकाचें दर्शन । षोडशोपचारें केलें पूजन । मग क्षेत्र प्रदक्षिणा करून । दर्शना लागून चालिले ॥ १३ ॥ दंडप्राय दंडवत । महाद्वारीं देवासि घालित । नेत्रीं आले अश्रुपात । प्रेम भरीत तेधवां ॥ १४ ॥ म्हणे जन्मा आलियाचें सार्थक थोर । हे दृष्टीसीं देखिलें पंढरपूर । आजि त्रिताप समस्त झाले दूर । स्वानंद निर्भर मी झालों ॥ १५ ॥ ऐसा आनंद मानूनि चित्तीं । मग नमितसे गरुड मारुती । तेव्हां सभामंडपीं सत्वर गतीं । दंडवत प्रीतीं घातलें ॥१६॥ अंतर गाभारा पाहतां जाण । तों परब्रह्मरूप दिसे सगुण । विटेवरी जोडिले समचरण । सुकुमार ठाण साजिरें ॥१७॥ कँसेसि[4] दिव्य पितांबर । जघनीं ठेविले दोन्ही कर । श्रीमुख दिसतसे मनोहर । पाहतांचि विरे देहभान ॥१८॥ सर्वांगीं बुका उधळला । गळा कोमळ तुळसीच्या माळा । चांगदेव देखोनि ते वेळां । मग मिठी गळां घातली ॥१९॥ परमानंद धरोनि चित्तीं । मग

१ दुष्ट २ हेतू ३ पांडुरंग ४ कमरेला

चांगदेवें मांडिली स्तुती । जय देवाधिदेवा रुक्मिणीपती । व्यापक त्रिजगतीं तूं एक ॥ २० ॥ चैतन्य स्वरूप पंढरीराया । अवतरलासि
भवाब्धि तारावया । दर्शनमात्रें करोनियां । निरसिसी माया भक्तांची ॥ २१ ॥ तुझी होतांचि कृपादृष्टी । मग तुटे भवबंध फांसाटी ।
बैसोनि भक्ताच्या हृदयसंपुटीं । गुजगोष्टी बोलसी त्या ॥२२॥ नाम मात्रें करोनि जाण । महादोषांसि करी दहन । जे तुझ्या भजनीं
विनटले पूर्ण । योग निर्विघ्न होय त्यांचा ॥ २३ ॥ तुझा दासानुदास चांगया । शरण आला पंढरीराया । आतां कृपादृष्टी विलोकूनियां ।
प्रपंचमाया निरसावी ॥ २४ ॥ ऐसें स्तवन करोनि फार । नेत्रीं चालिली अश्रुधारा । मग चांगदेव सप्रेम गजर । चरणावर लोटला
॥ २५ ॥ देवाचें रूप आणोनि ध्यानीं । तेंचि सांठविलें हृदयभुवनीं । मग सत्यभामा राईरुक्मिणी । तयालागोनी भेटती ॥ २६ ॥ तेव्हां
महाद्वारासि येऊनि सत्वर । कीर्तनीं मांडिला सप्रेम गजर । भक्त गर्जती जयजयकार । नादें अंबरं कोंदलें ॥ २७ ॥ कृष्णा विष्णु
हरी गोविंदा । अच्युता अनंता मुकुंदा । परमपुरुषा सच्चिदानंदा । आनंदकंदा श्रीविठ्ठला ॥ २८ ॥ भक्तवत्सला राजीवनयना । पीतांबरधारी
जगज्जीवना । विधिजनका दानवमर्दना । भक्तभूषणा जगद्गुरु ॥ २९ ॥ जड मूढ तारावया शेवटीं । आलासि पुंडलीकाचें भेटीं । करद्वय
ठेवूनियां कटीं । भीमा तटीं उभा अससी ॥ १३० ॥ नानापातकी चोरी जार । ब्रह्मद्वेषी जीवहत्याकर । दर्शन मात्रेंचि साचार ।
करिसी उद्धार तयांचा ॥ ३१ ॥ ऐसी कीर्तनीं करूनि स्तुती । मग गायिली मंगळ आरती । ओवाळूनि श्रीरुक्मिणीपती । दंडवत
घालिती साष्टांग ॥ ३२ ॥ ऐसा उत्साह थोर झाला । पौर्णिमेस पाहिला गोपाळकाला । चांगदेवासि आनंद वाटला । अद्भुत सोहळा
देखोनि ॥ ३३ ॥ फुटतां यात्रेचा समुदाय । मग चांगदेव करिती काय । तीर्थमूर्ती भिंवरेंत आहे । ते कोणासि न ये प्रत्यया ॥ ३४ ॥
जो दीनदयाळ कैवल्यदानी । तो दृष्टीसीं साक्षात् पाहावा नयनीं । ऐसीं इच्छा धरूनि मनीं । मग अनुष्ठानीं बैसले ॥ ३५ ॥ तीन
दिवसपर्यंत जाण । एकाग्र करोनि बैसले मन । न घे फळ मूळ अथवा जीवन । तीर्थमूर्तीचें ध्यान करीतसे ॥ ३६ ॥ तंव श्रोते आशंकित
होऊनि चित्तीं । वक्तयालागीं प्रश्न करिती । म्हणसी चंद्रभागेंत दुसरी मूर्ती । कैशा रीती तें सांगा ॥ ३७ ॥ तरी येचि विषयीं ऐका
सुरस । पांडुरंग महात्म्यीं कथा असे । स्वमुखें बोलिला श्रीव्यास । तीर्थरूप पंढरसि जगदात्मा ॥ ३८ ॥ मूर्तिमंत साक्षात् विटेवर ।
क्षेत्ररूप तेची वैष्णव वीर । तीर्थस्वरूपें चंद्रभागा तीर । तेथें गुप्त श्रीधर असे कीं ॥ ३९ ॥ दिव्यदेही पुंडलीक मुनी । तया सन्निध चक्रपाणी ।
साक्षात आहेत ते ठिकाणीं । वाहतसे वरूनी भीमरथी ॥ १४० ॥ तें दिव्य स्वरूप पाहावया नयनीं । चांगदेव बैसले अनुष्ठानीं । म्हणे
देवाधिदेवा कैवल्यदानी । दर्शना लागोनी भुकेलों ॥ ४१ ॥ तीन दिवसपर्यंत साचार । अनुष्ठान करिती योगेश्वर । देखोनि तयाचें
अंतर । करूणाकर प्रगटले ॥ ४२ ॥ चांगयाची एकविधा भक्ती । हृदयीं बिंबली पांडुरंगमूर्ती । जैसे ध्यान वर्णिलें भक्तीं । योगियांसि
विश्रांती ते ठायीं ॥ ४३ ॥ समचरणी विटेवर । कटीं ठेविले दोन्ही कर । श्रीमुख अति सुंदर मनोहर । पाहातांचि विरे देहभान

१ संसारसागर २ आकाश ३ दाटले ४ सुंदरनेत्र असलेला ५ जीवांची हत्या करणारे ६ पाणी


॥ ४४ ॥ किरीट कुंडलें वैजयंती । कासेसि पीतांबराची दीप्ती । श्रीवत्सकौस्तुभ विराजती । मकराकृती कुंडलें ॥ ४५ ॥ ऐसें रूप प्रगटोनि श्रीहरी । चांगयासि म्हणे ते अवसरीं । आतां सावध होऊनि निजअंतरीं । नेत्रद्वारें मज पाहें ॥ ४६ ॥ चांगदेव विस्मित अंतरीं । म्हणे मी एकटा भीमातीरीं । झाली असे कीं मध्यरात्रीं । वदे वैखरी कोण येथें ॥ ४७ ॥ मग नेत्र उघडोनी पाहातां देख । तों अद्भुत देखिलें कौतुक । जें ध्यान इच्छिती ब्रह्मादिक । कवि अनेक वर्णिती ॥ ४८ ॥ असंभाव्य फांकली प्रभादीप्ती । जैसे उगवले कोटि गभस्ती । ऐसी सुकुमार साजिरी मूर्ती । देखोनि विश्रांती पावला ॥ ४९ ॥ श्रीविष्णुमूर्ति देखोनि नयनीं । चित्त वेधलें तये क्षणीं । साष्टांग नमस्कारीतसे धरणीं । प्रेम मनीं न समाये ॥ १५० ॥ म्हणे देवा त्राहित्राही । कृपादृष्टीनें मज पाहीं । भवाब्धी[३] पासूनि त्वलाही । सोडी माय मजलागीं ॥ ५१ ॥ ऐसें म्हणोनियां देख । सद्भावें चरणीं ठेविला मस्तक । म्हणे दीनोद्धारक तूं वैकुंठ नायक । विश्वतारक जगद्गुरू ॥ ५२ ॥ मी तरी लडिवाळ देखा तुमचें । शरणागत म्हणवितों साचें । सार्थक होईल या देहाचें । तें वैभव कृपेचें मज देई ॥ ५३ ॥ ऐशारीतीं भाकोनि ग्लांती । मग सप्रेमभावें मांडिली स्तुती । जय जयाजी आत्ममूर्ती । व्यापक त्रिजगतीं तूं एक ॥ ५४ ॥ जयजयाजी पयोब्धीवासा । जयजयाजी वैकुंठाधीशा । जयजयाजी भक्तपरेशा । अद्वैतवेषा पांडुरंगा ॥ ५५ ॥ जय मत्स्यरूपा शंखासुरमर्दना । जय कूर्मरूपा समुद्रमंथना । जय वराहवेषा दानवमर्दना । विश्वभूषणा विश्वपती ॥ ५६ ॥ जय प्रल्हादरक्षका नरहरी । तूं त्रिविक्रम रूपा बळीचे द्वारीं । जय परशुधरा क्षत्रियसंहारी । झालासि कैवारी ब्राह्मणांचा ॥ ५७ ॥ जय विबुध कैवारी रावणांतका । जय नंद नंदना कंसच्छेदका । जय भक्तरक्षका पांडवसखा । धर्मस्थापका श्रीकृष्णा ॥ ५८ ॥ जय बौद्धअवतारा जगज्जीवना । जयं कल्किरूपा म्लेंच्छमर्दना । दावूनि बहुत अवतार रचना । करिसी स्थापना धर्माची ॥ ५९ ॥ जय पुंडलीक वरदा रुक्मिणीपती । अनंत अपार तुझी कीर्ती । म्यां निजमुखें तुझी करावी स्तुती । तरी कुंठित[४] मती शास्त्रांच्या ॥१६०॥ मी सेवाहीन भक्तीहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । परी शरणागत म्हणवितों दीन । कृपेचें पोषण तुमच्या ॥ ६१ ॥ ऐकूनि चांगदेवाची स्तुती । प्रसन्न जाहला रुक्मिणीपती । म्हणे कांहीं इच्छा असेल चित्तीं । ते सत्वरगतीं मज सांग ॥ ६२ ॥ तुझे मनींचे मनोरथ । ते मी पुरवितो जाण निश्चित । सांडून सर्व कल्पनाद्वैत । वदे त्वरित ये समयीं ॥ ६३ ॥ ऐसें वदतां करुणामूर्ती । चांगदेव संतोष पावले चित्तीं । म्हणे अनुग्रह करावा मजप्रती । जीवा विश्रांती होय जेणें ॥ ६४ ॥ जो कानीं पडतांचि मंत्र । भुक्ति मुक्ति लाधती सत्वर । मजही घडेल परोपकार । ऐसा वर मागतसे ॥ ६५ ॥ ऐसी ऐकूनियां मात । काय करिती पंढरीनाथ । चांगयाचा धरोनि हात । मग जळांत प्रवेशले ॥ ६६ ॥ बुडी देतांचि तयेक्षणीं । तो अद्भुत चोज देखिलें नयनीं । कांचनाचा[५] मंडप ते ठिकाणीं । रत्न कोंदणीं विराजित ॥ ६७ ॥ जें कां न दिसे मानवी

१ वेळी २ रक्षण कर ३ संसारसागर ४ कमाला ठार करणारा ५ सोन्याचा

लोका । भूमीमाजी गुप्त असे देखा । चांगया वैष्णव प्रेमळ निका । दाखवीत भक्तसखा त्यालागीं ॥ ६८ ॥ तेथें पुंडलीक ऋषीश्वर । दिव्य देही असे साचार । देवाधिदेव रुक्मिणीवर । तया समोर तिष्ठतसे ॥६९॥ तये ठायीं अनुपम जाणा । असे वैकुंठीची रचना । तेथें प्राकृत मतीनें शाहणा । करूं वल्गना कोठवरी ॥१७०॥ चांगदेवाचें भाग्य विशेष । म्हणूनि नेला त्या स्थळास । कृपा करोनि जगन्निवास । देती उपदेश त्यालागीं ॥ ७१ ॥ जो सनकादिकांच्या मस्तकावरी । अभयकर ठेविला शिरीं । षडक्षरी मंत्र सत्वरी । देतसे श्रीहरी त्याजला ॥ ७२ ॥ नाममंत्र अमृत संजीवनी । चांगयासि सांगे चक्रपाणी । जे साक्षात्कारासि येऊनी । प्रेतवत प्राणी जिवंत ॥ ७३ ॥ इतुकें सांगोनि रुक्मिणीपती । चांगयासि आश्वासिती निजप्रीती । म्हणे अभय माझें तुजप्रती । आनंद चित्तीं असो दे ॥ ७४ ॥ ऐसें म्हणोनि वत्सलें । मागुती घातलें माया जाळ । चांगया उघडोनि पाहात डोळे । तों पूर्ववत सकळ क्षेत्र दिसे ॥ ७५ ॥ योगमायेचें आवरण । स्वयें घालितांचि जगज्जीवन । चांगया निघे जाळांतून । मग आश्चर्य मन करितसे ॥ ७६ ॥ म्हणे कृपा करोनि रुक्मिणीवर । मज भेटले साक्षात्कार । षडक्षरी दीधला मंत्र । आठवितांचि स्मरें अंतरी ॥ ७७ ॥ परम उल्हास जाहला चित्तीं । म्हणे माझ्या भाग्याचि नाहीं मिती । मग क्षेत्रां जाऊनि त्वरित गतीं । पांडूरंगमूर्ती पूजितसे ॥ ७८ ॥ षोडशोपचार करूनि पूजन । वोवाळिला[1] रुक्मिणीरमण । साष्टांग करोनियां नमन । हृदयीं ध्यान सांठवी ॥ ७९ ॥ म्हणे विठाबाई करुणाकर । आतां गांवासि जातों सत्वर । लोभ असों दे मजवर । नेत्रीं नीर वाहतसे ॥ १८० ॥ देवासि पुसोनि ते अवसरीं । सव्यें घातली सर्व पंढरी । मग पुंडलीकासि पुसोनि सत्वरी । सहपरिवारीं चालिले ॥ ८१ ॥ मार्ग क्रमितां साचार । चित्तीं आठवे पंढरपुर । परतोनि पाहे वारंवार । सप्रेम पाझर लोचनीं ॥८२॥ विठ्ठल नाम गातसे गीतीं । कीर्तनीं सांगतसे सत्कीर्ती । बहुतां जनांसि लाविलें भक्तीं । सत्संगती दुर्लभ ॥ ८३ ॥ जयांसि देवाची प्राप्ति व्हावी । ऐसी चाड असेल जीवीं । तिहीं सत्संगती धरावी॥ उपाय कांहीं आज नसे ॥८४॥ असो चांगयाचे संगतीनें । भक्तीस लागले बहुत जन । गाती ऐकती श्रीहरीचे गुण । निज प्रीतीनें आपुल्या ॥८५॥ ऐशा रीतीं वैष्णव वीर । नारायण डोहासी येत सत्वर । ग्रामवासी लोक समोर । येऊनी नमस्कार घालती ॥ ८६ ॥ चांगयासि भेटोनि सकळ लोक । चित्तीं पावले सप्रेमसुख । टाळ विणे मृदंग अनेक । लावूनि सकळिक गाताती ॥ ८७ ॥ दिंड्या पताका नानारीती । मंगळ वाद्यें पुढें वाजती । नाना परिमळ[2] बुका उधळिती । पुष्पहार घालिती गळ्यांत ॥ ८८ ॥ ऐशा रीतीं आनंद गजरीं । चांगदेव प्रवेशे निजमंदिरीं । मग पंचारती घेऊनि करीं । भावें श्रीहरी वोवाळिला ॥ ८९ ॥ दंडवत घालूनियां प्रीती । प्रसाद दीधला सकळांप्रतीं । धन्य आजिचा सुदिन म्हणती । लोक बोलती परस्परें ॥ १९० ॥ पुढले अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीरुक्मीणीकांत । महीपतीसि देऊनि अभय हस्त । स्वयें यथार्थ आपण वदे ॥९१॥ स्वस्ति श्रीभक्तिलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भक्त । षष्ठाध्याय रसाळ हा ॥ १९२ ॥

१ उजवीकडून प्रदक्षिणा २ सुवास

अध्याय ७



श्रीगणेशायनमः । ऐका श्रोतेहो भाविक.प्रेमळ । कृपेनें विलोकितां दीनदयाळ । मुके होऊनि वाचाळ । वदतसे सकळ शास्त्रार्थ ॥ १ ॥ श्रीहरिचेनि कृपाबळें । महापर्वत उल्लंघी पांगुळ । बरड गोटे जे केवळ । परीस तत्काळ ते होती ॥ २ ॥ खैर बाभुळीचा तरु[1] । तोही होईल कल्पतरु । जरी कृपा करिती जगद्गुरू । होईल संसारु सुखाचा ॥ ३ ॥ महाविष प्राशितांच जाण । तें होईल अमृतासमान । खडे होतील चिंतामण । करुणाघन तुष्टल्या ॥ ४ ॥ मारिता वैरी जो दुर्धर । तोही होईल लोभापर । पळोनि जातील यमकिंकरें[2] । शार्ङगधर रक्षी जया ॥ ५ ॥ उदकांत बुडतां सत्वरी । तरी कूर्मरूपें रक्षिल श्रीहरी । तयासि घेऊन पृथ्वीवरी । पैलतीरीं काढिल ॥ ६ ॥ त्याच्या कृपेनें निश्चित । न होय तेंचि घडोनि येत । ऐसी मज आली प्राचितें[3] । अनुभवें वृत्तांत अवधारा ॥ ७ ॥ बुद्धिहीन मतिहीन निश्चितीं । ऐसें सर्वत्र लोक जाणती । आणि ग्रंथ वदवितो मूढा हातीं । लाघवी श्रीपती म्हणोनिया ॥ ८ ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । चांगदेवें पाहिलें पंढरपुर । मग प्रसन्न होऊनि रुक्मिणीवर । दीधला मंत्र षडक्षरी ॥ ९ ॥ देवासि पुसोनि ते अवसरीं । कुटुंबासहित आले घरीं । जागृती सुषुप्तीं स्वप्नांतरीं । भरला अंतरीं पांडुरंग ॥ १० ॥ श्रवण मनन हरिकीर्तन । नित्य होतसे वेदांत श्रवण । ऐकावयासि येती जन । निज प्रीतीनें आपुल्या ॥ ११ ॥ चारा ध्यावया विहंगमें[4] याती । स्वइच्छेनें आपुल्या जाती । कीं शर्करेपासीं निज प्रीतीं । मुंगिया मिळती अनेक ॥ १२ ॥ ना तरीं उगवतां रोहिणीकांतें[5] । चकोर आदरें तयासि लक्षित । कीं उदयासि येतां आदित्यें[6] । विकास पावत कमळिणी[7] ॥ १३ ॥ कां नृपवर बैसतां जये क्षितीं । तेथेंचि मिळे सैन्य संपत्ती । कीं दातयापासीं याचक येती । कामना चित्तीं धरूनियां ॥ १४ ॥ तैशाच रीतीं भाविक प्रेमळ । सर्वदा वसती चांगया जवळ । श्रवण मनन सर्वकाळ । करितां वेळ कंठिती ॥ १५ ॥ कांहीं एक लोटतां दिवस । तों चरित्र वर्तलें अति सुरस । चांगदेव पूजा करितां मानस । तों पंढरीनिवास पातले ॥ १६ ॥ साक्षात् परब्रह्म गुणमूर्ती । पुढें देखतसे अवचितीं । शंख चक्रें आयुधें हातीं । मकराकृती कुंडलें ॥ १७ ॥ कांसेसि दिव्य पीतांबर । श्रीमुख साजिरें मनोहर । चरणीं नेपुरें वांकी तोडर । ठाण सुकुमार साजिरें ॥ १८ ॥ ऐसें परब्रह्म घन सांवळें । रूप प्रगटलें तये वेळें । चांगया पाहत उघडोनि डोळे । चरणकमळें लक्षोनियां ॥ १९ ॥ सर्वोपचारें पूजिला हरी । संतोष जाहला निज अंतरीं । तों पांडुरंग म्हणती ते अवसरीं । तूं गोदातीरीं राहे आतां ॥ २० ॥ चांगदेव म्हणतसे अधोक्षजा । म्यां नित्य करावी कोणाची पूजा । जेथें सप्रेम भाव बैसेल माझा । गरुडध्वजा तें सांग ॥ २१ ॥ ऐसें पुसतांचि भक्त प्रेमळ । मग प्रसन्न झाले घननीळ । मूर्ति केशवाची गंडकी शीळ । प्रगट तत्काळ ते झाली ॥ २२ ॥ तों पांडुरंग बोले ते अवसरीं । या मूर्ति संचरलों मी हरी । तरी तुवां राहोनि । सर्वोपचारीं पूजावें ॥ २३ ॥ ऐशा रीतीं बोलोनि वचन । देव पावले अंतर्धान । कीं चांगयाचें हृदयभुवन । तेथें लपोन राहिला ॥ २४ ॥ मग सकळ ग्रामवासी नरा । चांगदेव पुसती त्या अवसरा । आम्ही घेऊन सहपरिवारा । गोदातीरा वास करूं

१ झाड २ यमदूत ३ अनुभव ४ पक्षी ५ चंद्र ६ सूर्य ७ कमरेला

॥ २५ ॥ ऐसें पुसतां योगेश्वर । क्षेत्रवासी चिंतातुर ।म्हणती आम्हांसी टाकूनि जातां सत्वर । तरी नाहीं आधार संसारी ॥ २६ ॥ ऐशी ऐकोनियां ग्लांती । मग चांगदेव तयांसि अभय देती । म्हणती तुम्हीं इच्छा धराल जे चित्तीं । ते मनोरथ पुरती तत्काळ ॥ २७ ॥ मग आपुल्या हस्तें साचार । तेथें स्थापिला प्रस्तर । जे जैसा नवस कल्पिती नर । तो मनोरथ पुरे तयांचा ॥ २८ ॥ ऐसा हा चमत्कार पाहीं । अद्यापि असें तथा ठायीं । जैसा ज्याचा भाव पाहीं । तैसा घडोनि सर्वही ये तयां ॥ २९ ॥ यापरी जे क्षेत्रवासी जन । केलें तयांचें समाधान । मग कुटुंबासह वर्तमान । चांगदेव तेथोन निघाले ॥ ३० ॥ बोळवावयासि योगेश्वर । सकल निघाले लाहान थोर । रुदंन करिती नारीनर । सप्रेम अंतर जयांचें ॥३१॥ म्हणती स्वामी जाताति येथून । आम्ही झालों भाग्यहिन । गोदातीरींचे सभाग्य जन । उघडलें प्राक्तनैं तयांचें ॥३२॥ ऐशा रीती वदोनि गोष्टी । ग्रामवासी होताति कष्टी । जैसा मथुरेसि जातां जगजेठी। गोकुळ हिंपुटी होतसे ॥ ३३ ॥ जैसा देव तैसा भक्त । सर्वथा अंतर नसे यांत । जैसें पुष्प नामें मकरंद तद्वत । एकमेकांत असती ॥ ३४ ॥ हाटक आणि त्याची कांती । नामें दोन परी एकचि असती । कां मुक्ताफळ आणि ढाळ निश्चितीं । द्वैत त्यांजप्रती असेना ॥ ३५ ॥ भास्कर आणि त्याचें किरण । एकचि परी नामें दोन । अमृत आणि स्वाद जाण । नामाभिधानें दोन जैसीं ॥ ३६ ॥ चंद्रमंडळीं अमृत निश्चित । कीं समुद्रामाजीं कंल्लोळ भासत । कीं गाईचे पोटीं दूध राहत । तैसे देवभक्त समरस पैं ॥ ३७ ॥ भक्तीं वाढवितां देवाचा महिमा । देवें दासासि दीधला प्रेमा । तेणें सुकाळ झाला तुम्हां आम्हां । चरित्र नामा ऐकावया ॥ ३८ ॥ असो नारायण डोहींच्या नारी-नरां । चांगयाचा वियोग न साहे अंतरा ॥ समस्तीं बोळवोनि त्या अवसरा । परतोनि घरांते आले ॥ ३९ ॥ प्रस्तर स्थापितां योगेश्वरें । तेथें सद्भाव धरितां नरें । त्याचा मनोरथ तत्काळ पुरे । थोर चमत्कार ते ठायीं ॥ ४० ॥ इकडे सवें घेऊनि केशव मूर्ती । चांगदेव पथ क्रमिती । ध्यानीं मनीं रुक्मिणीपती । वेधली वृत्ती सर्वदा ॥ ४१ ॥ कुटुंबासह वर्तमान । पुण्यस्तंभासि आले त्वरेन । होता गोदेचें दर्शन । साष्टांग नमन पैं केलें ॥ ४२ ॥ परम अनुताप धरोनि चित्तीं । स्नान केलें पुण्य सरितीं । म्हणे भवपाश तोडूनि सत्वर गतीं । सायुज्य मुक्ती दे माते ॥ ४३ ॥ श्रीविष्णुचरणा पासोनि जाण । तुझा उगम झाला पूर्ण । म्हणोनि मस्तकीं कैलासरमण । निज प्रीतीनें धरीतसे ॥ ४४ ॥ गौतम मुनि श्रेष्ठ थोर । त्याणें प्रसन्न केला श्रीशंकर । मृत्यु लोकासि आणिलें सत्वर । जगदुद्धार करावया ॥ ४५ ॥ तुझें दृष्टीसि पडतां नीर । शत जन्मांचें दुरित हरे । स्नान करितां जन्म सहस्र । होतसे नर शुद्ध तेव्हां ॥ ४६ ॥ ऐशी गोदा जगदुद्धारिणी । दैवें करोनि देखिला नयनीं । मज कृपादृष्टीं विलोकुनी । आपुले उगमीं ठाव द्यावा ॥ ४७ ॥ ऐशा परी करोनि स्तुती । स्नान सारिलें सत्वर गतीं । नित्य नेम सारोनि निश्चितीं । दर्शना जाती शिवाच्या ॥ ४८ ॥

१ दगड, खडक २ रडणे ३ नशिब ४ श्रीकृष्ण ५ हिरमुसले ६ नदींत ७ संसारपाश ८ शंकर

सोमतीर्थीं करोनि स्नान । घेतलें रामेश्वराचें दर्शन । षोडशोपचारें केलें पूजन । निज प्रीतीनें आपुल्या ॥ ४९ ॥ बिल्वपत्रांची लाखोली । वाहोनि अर्चिलो चंद्रमौळी । मग वाहोनियां पुष्पांजळी । संप्रदाय मेळीं बैसले ॥ ५० ॥ तों पाकसिद्धि झाली समस्त । मग पंचमहा यज्ञ करीत । पंक्तीसि घेऊनि ब्राह्मण अतीत । भोजन सारित मग तेव्हां ॥ ५१ ॥ श्रीपांडुरंग आज्ञा वंदोनि शिरीं । मठ बांधिला गोदातीरीं । श्रीकेशवराजाची मूर्ति साजिरी । स्थापन करी ते ठायीं ॥ ५२ ॥ ब्राह्मण बोलावुनि थोर थोर । अभिषेक केला वेदमंत्रें । पंचामृत नाना उपचारें । वैकुंठ विहार न्हाणिला ॥ ५३ ॥ दिव्य वस्त्रें परिधान । लेवविले अळंकार भूषण । गंधाक्षता सुमन चंदन । धूपदीप नीरांजन वोंवाळिती ॥ ५४ ॥ दिव्य मिष्टान्नें निर्मोनि नाना । महा नैवेद्य समर्पिला जाणा । ठेवोनि विडे सुवर्ण दक्षिणा । मग प्रदक्षिणा करिताती ॥ ५५ ॥ ऐसा पूजोनि वैकुंठनाथ । चांगया घाली दंडवत । म्हणे सेवाहीन मी शरणागत । उद्धरीं पतित केशवा ॥ ५६ ॥ मूर्ति स्थापिली तो सुदिन । केलें ब्राह्मण संतर्पण । नाना परींचीं मिष्टान्नें । द्विजां कारणें वाढिलीं ॥ ५७ ॥ विडे दक्षिणा देऊनि सत्वर । संतुष्ट केले द्विजवर । चांगयाचा कीर्तिघोष थोर । लोक सर्वत्र ऐकती ॥५८॥ सत्कीर्ति ऐकोनि निश्चित । देशोदेशींची यात्रा येत । दुर्बळ आणि धनवंत । तयांचे आर्त पुरती तेथें ॥ ५९ ॥ पहिला आराधिला होता शिव । तेव्हां अभंगीं बोलिलें अपूर्व । चांगा वटेश्वर घातलें नांव । भक्त वणैष्व जाणती तें ॥ ६० ॥ आतां पुण्यस्तंभीं गोदातीरीं । केशवाची मूर्ति स्थापिली यावरी । चांगा केशवदास निर्धारीं । कवित्वांतरीं बोलिले ॥ ६१ ॥ श्रीपांडुरंग होऊनि प्रसन्न । षडक्षरी मंत्र दीधला जाण । तेंचि करिती अनुष्ठान । साक्षात्कार तेणें येतसे ॥ ६२ ॥ लोक बोलती सर्वत्र । मागुतीं प्रगटला वटेश्वर । त्यासि प्रसन्न होऊनि रुक्मिणीवर । संजीवनी मंत्र दीधला ॥ ६३ ॥ त्याच्या आशास्तव निश्चितीं । कामनिक लोक दुरूनि येती । त्यांचे मनोरथ पूर्ण होती । यास्तव महंती वाढली ॥ ६४ ॥ ऐशा स्थितीनें तत्वता । देशोदेशीं फांकली वार्ता । तों रामराजा देवगिरीं होता । त्यानें ही कथा ऐकिली ॥ ६५ ॥ मग परम सद्भाव धरोनि अंतरीं । दर्शनासि आला ते अवसरीं । स्तुति करोनि नानापरी । नमस्कार करी साष्टांग ॥ ६६ ॥ कांहीं चमत्कार पाहावा नयनीं । ऐसी इच्छा तयाच्या मनीं । मग कर जोडोनि तयेक्षणीं । स्वरूप नयनीं लक्षीतसे ॥ ६७ ॥ तंव चांगदेव म्हणती तयाकारणें । सैन्य समुदाय घेऊनि येणें । ऐसी ऐकूनि सिद्धाची वचनें । पत्र लिहुन पाठवित ॥ ६८ ॥ राजा आज्ञापितां निश्चित । मंत्री सैन्य घेऊनि येत । चांगदेव दाखवावया प्रचीत । आमंत्रण देत त्यालागीं ॥ ६९ ॥ पाकनिष्पत्ति न करितां घरीं । पंक्ति बैसविल्या त्या अवसरीं । तों षड्रस अन्नें पात्रावरी । दिसती बरी घवघवित ॥७०॥ सहस्त्रावरी बैसल्या पंक्ती । तितुक्यांची एकदांचि जाहली तृप्ती । जें जें रुचे तेचि सेविती । आश्चर्य करिती मनांत ॥ ७१ ॥ मग करशुद्धि घेतांचि सकळांनीं । विडे दीधले त्रयोदश गुणी । रामराजा

१ वेल २ पूजिला ३ इच्छा ४ वेळी

परम कौतुक मानी । मृदु वचनीं बोलतसे ॥ ७२ ॥ म्हणे धन्य आजिचा सुदिन । जाहले स्वामीचें दर्शन । आपण ईश्वर अंश पूर्ण । जगदुद्धरण व्हावया ॥ ७३ ॥ जैसी देवाची अघटित लीला । तैसीच संतांचे आंगीं कळा । भिन्न भाव नसेचि यांजला । अनुभव पाहिला बहुतांनी ॥ ७४ ॥ मग हात जोडोनि नृपवर । विनंति करितसे साचार । आतां उपवनीं राहावें सत्वर । येथूनि गोदातीर सन्निध असे ॥ ७५ ॥ ऐसी विज्ञप्ति करितां जाण । मान दीधला तयाच्या वचना । लोक कौतुक पाहताती नाना । आश्चर्य मना वाटतसे ॥ ७६ ॥ मग कुटुंबासह वर्तमान । बागांत राहिले येऊनि । सोमतीर्थीं करोनि स्नान । देवार्चन करिताती ॥ ७७ ॥ राजा करोनि नमस्कार । आपुल्या स्थळासि गेला सत्वर । तों अद्भुत वर्तलें चरित्र । तें ऐका सादर भाविकहो ॥ ७८ ॥ पुण्य स्तंभीं राहतां त्यांसी । द्वादश वर्षे लोटलीं ऐसीं । आषाढी कार्तिकी पंढरीसी । नित्य नेमेसी जाताती ॥ ७९ ॥ तंव कोणे एके दिवसी । मेळवूनि सकळ संतऋषी । केशवदास म्हणतसे त्यासी । आम्हीं समाधीसी बैसतों ॥ ८० ॥ जाणोनि सिद्धाचें मनोगत । संप्रदायी साहित्य करित । ब्राह्मण संतर्पण नित्य होत । सुदिन मुहूर्त पाहिला ॥ ८१ ॥ मिळोनियां वैष्णव भक्त । कीर्तन समारंभ होत । दिंड्या पताका घेऊनि तेथें । हरिदास गर्जत नाम घोषे ॥ ८२ ॥ चांगदेव बैसले दिव्यासनीं । पूजा होतसे प्रतिदिनीं । नानापरीची पूजा घेऊनी । दर्शना लागोनी लोक येती ॥ ८३ ॥ समाधिस्थ होतसे योगेश्वर । मात प्रगटली दुरचादुर । पाहावयासि यात्रा मिळाली फार । तों अघटित चरित्र वर्तलें ॥ ८४ ॥ तों कल्याण कलबुर्गी साचार । शंकर नामें एक द्विजवर । तयापासी धन होतें फार । परी पोटीं पुत्र नसेचि ॥ ८५ ॥ पोटीं न होतां पुत्रसंतान । मग तो पावला मृत्युसदन । तरुण स्त्रियेसि आलें न्हाण । दुःख दारुण मातेसी ॥ ८६ ॥ धर्म पुत्र घालोनि निश्चितीं । उत्तर कार्य संपादिती । निजपुत्राच्या घेऊनि अस्थी । शोके निघती महायात्रे ॥८७॥ सासू सुना दोघी जणी । निघत्या जाहल्या तये क्षणीं । खर्चीस हुंडी करोनि त्यांनीं । अश्व वहनी चालिल्या ॥८८॥ पंथ क्रमितां त्यांजकारणें । पुण्य स्तंभा आल्या जाण । ब्राह्मणचे घरीं बिऱ्हाड घेऊन । राहिल्या त्रिदिन त्याठायीं ॥ ८९ ॥ तों नारळ बुका फुलें तुळसी । लोक पूजा घेऊनि ऐसी । चांगदेव बैसतसे समाधीसी । जाती दर्शनासी तयाच्या ॥ ९० ॥ तों सासू सुना दोघीजणी । उतरल्या होत्या एके सदनीं । सोनिका निघे तये क्षणीं । दर्शना लागुनी स्वामींच्या ॥ ९१ ॥ तों सुन सासूसि बोले उत्तर । मी येतें तुम्हा बरोबर । वडिल म्हणे योगेश्वर । कोपेल तुजवर अवाचिता ॥ ९२ ॥ तुझे उतरले नाहींत केश । नमस्कार करितां होईल स्पर्श । तेव्हां कोपेल महापुरुष । तरी मग कैसे करावे ॥९३॥ ऐसे शिकवितां नानापरी । परी ते नाइकेचि निर्द्धारीं । गेली सासूच्या बरोबरी । समज अंतरीं असेना ॥ ९४ ॥ दर्शनास येती नारीनर । गेल्या तयांच्या बरोबर । दाटीत जावोनि सत्वर । योगेश्वर नमियेला ॥ ९५ ॥ यात्रेकरिणीचे सुनेप्रती । चांगदेव आशीर्वाद

१ घोड्यावर बसून

देती । माते तूं होय पुत्रवंती । ऐकोनि हांसती ब्राह्मण ॥९६॥ म्हणती खडकीं वर्षला मेघराज । की अग्निकुंडीं पडिले बीज। तैसें स्वामी अनुचित बोलिले आज । नाहीं काज विचारलें ॥ ९७ ॥ इंधन नसतां अग्नि फुंकिला । कीं स्नेहावीण दीप सरसाविला । तेवीं स्वामींचा आशीर्वाद व्यर्थ गेला । ऐसें आम्हांला वाटतें ॥ ९८ ॥ मग सोनिकेसि पुसती योगेश्वर । हें काय म्हणती द्विजवर ॥ तो सांगावा आद्यंत विचार । इतुकें उत्तर बोलिले ॥ ९९ ॥ ऐसें पुसतांचि वचन । दोघीजणीं करिती रुदन । गहिंवरें कंठ दाटला पूर्ण । भरले नयन अश्रुपातें ॥ १०० ॥ सोनाई सांगे तये क्षणी । कल्याण कलबुर्गा ते ठिकाणीं । आम्ही होतों बहुतादिनीं । तों गेला मरोनि सुपुत्र तेथें ॥ १ ॥ संसारीं येऊनि साचार । पाहिलें दुःखाचें डोंगर । पुत्राचे पोटीं नसेचि पोर । संतान समग्र बुडालें ॥ २ ॥ मग सासू सुना दोघीजणी । सत्वर निघालों तेथूनीं । जोगाईचे अंबे म्हणती जनी । तये स्थानीं राहिलों ॥ ३ ॥ तेथेंही चैन न पडेचि चित्तां । मग महायात्रेसि चालिलों आतां । ऐसी जन्मांतरींची कथा । स्वामीसि आतां निवेदिली ॥ ४ ॥ यजुर्वेद शाखा आमुची निश्चित्तीं । सवें घेतल्या पुत्राच्या अस्थी । गया वर्जन करावया प्रीतीं । हेत चित्तीं उपजला ॥ ५ ॥ काशीपुरासि जातां सत्वर । वाटेसि लागलें गोदातीर । तेथें राहोनि तीन रात्र । तीर्थविधि साचार करावा ॥ ६ ॥ स्वामींची सत्कीर्ति ऐकून । दर्शनासि आलें मी येथें । तेव्हां सुनेसि वर्जिले बहुत । परी नाइकेचि मात सर्वथा ॥ ७ ॥ येथें येऊनि साचार । तुम्हांसि केला नमस्कार । तो मुखांतुनि निघालें अक्षर । होईल पुत्र तुजलागीं ॥ ८ ॥ तें घडेल कैसे निश्चितीं । विधवेसि केवि होईल संतती । वृत्तांत सांगोनि ऐशा रीतीं । अश्रु वाहती नेत्रांतूनीं ॥ ९ ॥ ऐकूनि सोनाईचें उत्तर । दयेनें द्रवला योगेश्वर । म्हणे मी नेणतां दीधला वर । हें असत्य उत्तर न होय ॥ ११० ॥ म्हणे पंढरीशा रुक्मिणीपती । तूं साच करी वचनोक्ती । ऐसी देवासि भाकोनि ग्लांती । ब्राह्मणीसी बोलती काय तेव्हां ॥ ११ ॥ पुत्राच्या अस्थि बरोबर । त्या तूं घेऊनि येईं सत्वर । ऐसें म्हणोनि योगेश्वर । अघटित चरित्र आरंभिले ॥ १२ ॥ विद्वान् पंडित शास्त्री निपुण । क्षेत्रवासी मेळविले ब्राह्मण । त्यांसि सांगती अशीर्वचन । नेणतपणें बोलिलों मी ॥१३॥ तें सत्य केल्यावीण निश्चित । होता नये समाधिस्थ । म्हणवोनि साक्ष ठेवूनि तुम्हांतें । वरद पुत्र ईतें देतसों ॥१४॥ मग उदकांत अस्थि प्रक्षाळुनी । मंत्र बोलिले संजीवनी । विधवेसि पाजिलें तयेक्षणीं । पाहती नयनी जनलोक ॥१५॥ सत्पुरुषाची अघटित चर्या । तत्काळ पातली गर्भच्छाया । म्हणे देवाधिदेवा पंढरीराया । करावी दया इजवरी ॥ १६ ॥ ऐसी बोलतां वचनोक्ती । विधवा दिसे सौभाग्यवती । मुखग्लांती आगोदर होती । ते पालटली वृत्ती तत्काळ ॥ १७ ॥ ऐसें देखोनि सकळ चरित्र । मग घरासि गेले द्विजवर । मागे बोलती निंद्य उत्तर । आतां वर्णसंकर मांडिला ॥ १८ ॥ चांगदेवे अघटित केली युक्ती । विधवा दिसते सौभाग्यवती । विठ्ठल सुवासिनी तीस म्हणती । अद्यापि वदती हे

१ तेलावांचून.

असे ॥ १९ ॥ तंव एक म्हणे टाणी टोणी । हा जाण तो मंत्र मोहिनी । नाना साबरी मंत्र शिकोनी । अघटित करणी दाखवितो ॥ १२० ॥ कोणी कुटिळ म्हणे दुर्मती । गर्भ संभवे त्याचे हातीं । परी स्वयातींत सरेल कैशा रीतीं । बरवे चित्तीं विचारा ॥ २१ ॥ ऐसें क्षेत्रवासी ब्राह्मण । मागें पुढें निंदिती जाण । परी संमुखं न बोलवे वचन । घुवडा प्रमाणें ते नर ॥ २२ ॥ आंधारीं बोटें मोडी जो नर । त्यावरी सर्वथा न जाय शूर । तैसें द्विजांचें जाणोनि अंतर । योगेश्वर न बोले ॥ २३ ॥ म्हणती बाळकाची वाट धरोनि आधीं । मग आपण बैसावें समाधीं । नाहीं तरी हे दुर्बुद्धी । नानापवादीं पाडतील ॥ २४ ॥ भजनीं तरले वैष्णव जन । काळ मृत्यु तयां आधीन । जयांसि नाहीं जन्ममरण । परी लोकाकारणें भासत ॥ २५ ॥ मग सासू सुना दोघीजणी । पुण्यस्तंभी राहाविल्या त्यांणी । गर्भांसि नवमास भरतां ते क्षणीं । तो सुलक्षणी पुत्र जन्मला ॥ २६ ॥ पांडुरंगाचा वरद पुत्र । जाहला ऐकूनि योगेश्वर । महा उत्साह केला थोर । दानें द्विजवर तोषविले ॥ २७ ॥ बारावें दिवसीं करोनि बारसें । विठ्ठल नाम ठेविलें त्यास । थोर झाला दिवसेंदिवस । आनंद मातेस वाटला ॥ २८ ॥ गर्भ संभवल्या पासून विधवेस । आपुले मठीं ठेविले होतें तीस । परोपकारी महापुरुष । म्हणोनि तीस प्रतिपाळी ॥ २९ ॥ श्रीपांडुरंग कृपेचेनि बळें । पांचा वर्षांत आला बाळ । आतां व्रतबंध करावा तत्काळ । भक्त प्रेमळ बोलतसे ॥ १३० ॥ रांडकीचे पोटीं जाहला पुत्र । ऐसें जाणती सर्वत्र । म्हणती समर्थें केला अंगीकार । न चले विचार कोणाचा ॥ ३१ ॥ परी व्रतबंध करावया कारण । विप्र सर्वथा न घालिती मन । अंतर साक्ष चांगदेव पूर्ण । मनोगत जाणे सकळांचें ॥ ३२ ॥ म्हणती घेऊनि सहपरिवारा । आपण जावें पंढरपुरा । पांडुरंग दीनाचा सोयरा । वृत्तांत बरा त्यासि सांगूं ॥३३॥ मग टाळ विणे मृदंग सुस्वरीं । कीर्तन करीत सप्रेम गजरीं । चांगदेव आपुले सहपरिवारीं । क्षेत्र पंढरीं पावले ॥३४॥ चंद्रभागेचें करोनि स्नान । घेतलें पुंडलीकाचें दर्शन । मग क्षेत्र प्रदक्षिणा करून । राउळीं त्वरेनें प्रवेशले ॥ ३५ ॥ गरुडा पारीं लोटांगण । चांगया घालीत प्रेमें करून । मग अंतर गाभारा रिघोनें । रूप सगुण पाहतसे ॥३६॥ ठाण सुकुमार साजिरें । श्रीमुख दिसतें सुंदर । कटीं ठेविले दोन्ही कर । कांसे पीतांबर वेष्टिला ॥३७॥ समपाय विटेवरी धनसांवळा । गळा वैजयंती माळा ॥ सर्वांगीं बुका उधळला । मुगुटीं रत्नकळा फांकती ॥३८॥ ऐसें परब्रह्म रूप सगुण । चांगया आलिंगीत निज प्रीतीनें । समूळ विसरोनि देहभान । सद्भावें चरण वंदिले ॥३९॥ मग पुसतसे दिनदयाळ । वर्तमान आहे की कुशळ । चांगया म्हणे तये वेळे । कृपेचेनि बळें आपुल्या ॥१४०॥ विधवेसि दीधला वरदपुत्र । तो घातला विठोबाच्या पायांवर । म्हणे कृपा असों द्या याजवर । मग रुक्मिणीवर अवश्य म्हणे ॥४१॥ तुझा भरंवसा धरोनि श्रीहरी । इसीं वर दीधला ऐशापरी । लोकापवादावीण संसारीं । पुत्रापौत्र घरीं पहाशील ॥ ४२ ॥ ऐकूनि म्हणे करुणाधन । मी तुझें वचन सिद्धीस नेईन । तुमच्या वचनास्तव जाण । अवतार घेणें मजलागीं

१ दुष्ट, कुटिल. २ समोर. ३ मुंज. ४ देवळांत. ५ जाऊन.

॥ ४३ ॥ मत्स्य कच्छ आणि सूकर । जाहलों भक्तांचेनि कैवारें । प्रल्हादें आठव करितां साचार । खांबांत सत्वर प्रगटलों ॥ ४४ ॥ मज आठवितां आखंडल । त्रिविक्रम जाहलों घननीळ । बळीस दान मागोनि सकळ । द्वारपाळ जाहलों मी ॥ ४५ ॥ जमदग्नीच्या वचनांसाठी । माता मारिली उठाउठी । एकवीस वेळां निःक्षत्रिय सृष्टी । करीं जगजेठी निजांगें ॥४६॥ राम अवतारीं दशानन[1] । मारोनि स्थापिला बिभीषण । तयासि देऊनि लंकाभुवन । चिरंजीव जाण तो केला ॥४७॥ मग श्रीकृष्ण अवतार घेऊनि पाही । निजांगें नंदाच्या राखिल्या गायी । पांडवांसि संकट पडतां कांहीं । नाना उपायीं राखिलें त्यां ॥ ४८ ॥ आतां पुंडलीकाची निष्ठा मोठी । पाहोनि आलों त्याच्या भेटी । पाय जोडोनि विटे नेहटी । भीमातटीं उभा असें ॥ ४९ ॥ नामा शिंपी भक्त प्रेमळ । संकटीं पडतां तात्काळ । ओढंया[2] नागनाथीं फिरलें देऊळ । पुरविले लळे तयाचे ॥ १५० ॥ ज्ञानदेवाच्या वचनासाठीं । भिंत चालविली उठाउठी । हे तरी तुवां ऐकिली गोष्टी । कर्णसंपुटीं चांगया ॥५१॥ तैशा रीतीं मी घननीळ । वरद पुत्राचें पुरवीन लळे । तूं चिंता नको करूं अळुमाळ[3] । दीनदयाळ म्हणतसे ॥ ५२ ॥ ऐसें बोलतां रुक्मिणीपती । चांगदेव सद्गदीत झाले चित्तीं । आनंदाश्रु नेत्रीं वाहती । संतोष चित्तीं न समाये ॥ ५३ ॥ मग मस्तक ठेऊनि चरणावर । देऊळा बाहेर आले सत्वर । वाळवंटीं उतरले साचार । कीर्तन गजर होतसे ॥५४॥ प्रातःकाळ होतांचि निश्चितीं । चंद्रभागेसि स्नान करिती । नित्य नेम सारोनि सहज स्थितीं । काय करिती मग तेव्हां ॥ ५५ ॥ क्षेत्रवासी धरामर[4] । तें बोलावूनियां समग्र । तयांसि पुसती विचार । मधुरोत्तरें करूनियां ॥ ५६ ॥ आम्हीं विधवेसि दीधलें आशीर्वचन । वरद पुत्र जाहला तेणें । याचा व्रतबंध तुम्हीं करणें । वचनासि मान देवूनियां ॥ ५७ ॥ ऐसी सिद्धाची वचनोक्ती । ऐकोनि ब्राह्मण धिक्कारिती । विधवेपोटीं जाहली संतती । कैसा स्वयातीं सरेल ॥ ५८ ॥ अविधि कर्माचें परम दूषण । सर्वथा नव्हे आमुच्यानें । ऐसें बोलोनि ते ब्राह्मण । गेले उठोनि सकळिक ॥ ५९ ॥ एक म्हणती भोगिलें खळा[5] । तेणेंचि गर्भ संभवला । एक म्हणती सिद्धाची कळा । अघटित लीला नेणवे ॥ १६० ॥ एक म्हणती चांगा वैष्णव वीर । जाहला मरुद्गणाचा अवतार । त्यानें मांडिला वर्णसंकर । ऐसें साचार वाटतें ॥ ६१ ॥ एक म्हणती गोदातीरीं । यासी वाळित घातलें द्विजवरीं । भाळ्याभोळ्यांची क्षेत्र पंढरी । मग आले सत्वरि या ठायीं ॥ ६२ ॥ ऐसें म्हणोनि ते ब्राह्मण । गेले उठोनि सकळ जन । पुत्राची माता करी रुदंन[6] । पाहोनि वदंन[7] चांगयाचे ॥ ६३ ॥ तिजला आश्वासित योगेश्वर । चिंता न करावी अणुमात्र । शिरीं असतां रुक्मिणीवर । अरिष्ट दुर्धर निरसील तो ॥ ६४ ॥ तूं लोकापवादा विरहित होउनी । पुत्रपौत्र देखसील नयनीं । ऐसी वदतां वरदवाणी । संतोष मनीं तीस झाला ॥ ६५ ॥ चांगदेव म्हणे ते अवसरीं । शत ब्राह्मणांचा स्वयंपाक करी । आजि भोजनासि येतील श्रीहरी । निश्चय अंतरीं

१ रावण. २ आवंढ्या नागनाथ. ३ मुळींसुद्धा. ४ ब्राह्मण. ५ दुष्ट. ६ रडणें. ७ तोण्ड.

असों दे ॥६६॥ ऐसें तिजला सांगोनि निश्चित । मग आपण गेले राउळांत । कीर्तन करोनि प्रेम भरित । मग रुक्मिणीकांत आळविला ॥ ६७ ॥ म्हणे देवाधिदेवा जगजेठी । आजि भोजनासि चलावें वाळवंटीं । वरद पुत्रासि कृपादृष्टीं । पाहें संकटीं जगदीशा ॥६८॥ तूं अनाथनाथ भक्तकैवारी । ऐसें बोलती चराचरीं । तें वचन आतां सांचें करीं । ऐकोनि श्रीहरी अवश्य म्हणे ॥ ६९ ॥ इकडे वरदपुत्राची माता सत्वरी । चांगयाची आज्ञा वंदोनि शिरीं । पाकनिष्पत्ति सारोनि बरी । ब्राह्मण पाचारी भोजनां ॥ १७० ॥ ऐकोनि धरामर बोलती पाहे । तुज तों वाळींत पाडिलें आहे । कासया अन्न रांधिलें आहे । कोणी न खाय या लागीं ॥ ७१ ॥ भ्रतार गेलिया मृत्युसदनीं । पुत्र प्रसवलीस कैसेनी । तो तूं दाखवितां जना लागोनी । लज्जा मनीं तुज न ये ॥ ७२ ॥ खळांचे शब्द ऐकोनि कानीं । लज्जित जाहली ते ब्राह्मणी । चांगयाचे पाय आठवितां मनीं । म्हणे सद्गुरू धांवोनि ये आतां ॥ ७३ ॥ ऐसें चिंतितां मनांत । तों केशवदास चांगया येत । म्हणे भोजनासि आले पंढरीनाथ । करा साहित्य लवलाहीं ॥ ७४ ॥ चांगदेवाचा भक्तिभाव । राउळांतून आले देव । दर्शनासि जाति भक्तवैष्णव । तों देवाधिदेव तेथें नाहीं ॥ ७५ ॥ एक म्हणती पळोनिया गेला । एक म्हणती चांगयानें नेला । देखोनि त्याची सप्रेम कळा । वाळवंटीं गेला जेवावया ॥ ७६ ॥ जयासि नाहीं भावभक्ती । म्हणती कैसी चालेल पाषाण मूर्ती । वाळवंटीं येउनि पाहती । तों तेथेंहीं त्यांजप्रतीं दिसेना ॥ ७७ ॥ क्षेत्रवासी ब्राह्मण मिळोन पाहे । म्हणती विठोबा जाहला काय । आतां आम्हांसि कोण आहे । म्हणोनि धाय मोकलिती ॥ ७८ ॥ जैसें प्राणावांचुनि शरीर । तैसें राउळ दिसे भयंकर । सिंहासनीं नाहीं रुक्मिणीवर । कैसा विचार करावा ॥ ७९ ॥ पुंडलिकाचें देखोनि प्रेम । पंढरीस आले पुरुषोत्तम । तेणेंचि आपुला योगक्षेम । चालतसे परम साजिरा ॥ १८० ॥ ऐशापरी ते विप्रमंडळी । चिंताक्रांत तये वेळीं । मग सकळ उठोनि तत्काळीं । चांगया जवळीं पातले ॥ ८१ ॥ स्वमुखें पुसती ते समयीं । राउळीं मूर्ति दिसत नाहीं । तुम्हीं विचित्र करणी केली कांहीं । हें लवलाहीं सांगावें ॥८२॥ ऐकोनि म्हणे प्रेमळ भक्त । तुम्हीं विधवेसि घातलें वाळित । म्हणोनि जेवावया लागीं येथ । रुक्मिणीकांत आले कीं ॥ ८३ ॥ ब्राह्मण म्हणतीं प्रमाण कांहीं । आम्हांसी तो येथें दिसत नाहीं । एक भक्तिभावाविण कांहीं । शेषशायी नाढळे ॥ ८४ ॥ चांगयाच्या भक्तिभावा पोटीं । तयासि मूर्ति दिसे गोमटी । इतर जनांचिये दृष्टीं । तो जगजेठी पडेना ॥ ८५ ॥ य.सी असत्य म्हणावें जरी । तरी मूर्ति नाहीं राउळांतरीं । संदेह पडिला ते अवसरीं । म्हणोनि अंतरीं चिंतावले ॥ ८६ ॥ चांगयासि म्हणती धरामर । येथें आला रुक्मिणीवर । आम्हां प्रमाण वाटे तर । जरी हें अन्न पुरे सकळांसी ॥८७॥ ऐसी ऐकूनि विप्रवाणी । चांगदेव म्हणती तये क्षणीं । तुम्हीं यावें स्नान करोनी । करील पुरवणी विठोबा ॥८८॥ ऐसें

१ सत्य. २ बोलविलें. ३ ब्राह्मण.

बोलतां योगेश्वर । पंक्तीं बैसतीं धरामर । पात्रें मांडिलीं दोन सहस्र । तरी द्विजवर न सरती ॥ ८९ ॥ क्षेत्रवासी इतर याती । तेही वाळवंटीं प्रसादासी येती । ब्राह्मण चांगदेवासि बोलती । करावी तृप्ती इतुक्यांची ॥१९०॥ शिजलें अन्न सकळांसि पुरे । तरी सांचचि आला रुक्मिणीवर । विधवेसि जाहला वर पुत्र । व्रतबंध सत्वर करूं याचा ॥ ९१ ॥ धरामर बोलतां ऐसें । अवश्य म्हणे केशवदास । मातापुत्र वाढितील तुम्हांस । अन्न सर्वांस पुरेल हें ॥ ९२ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं । उदक प्रोक्षिलें अन्नावरी । मातापुत्रांसि सांगे सत्वरीं । भात पात्रावरी लवंडित जा ॥ ९३ ॥ उकरोनि काढितांचि ओदन । पात्र पालथें न करणें । पांडुरंगाच्या कृपें करून । पुरेल अन्न सकळांसी ॥ ९४ ॥ ऐसें सांगतांचि सिद्धमूर्ती । माता पुत्र तैसेंच करिती । भात वाढितांचि न सरे निश्चितीं । आश्चर्य करिती ब्राह्मण ते ॥९५॥ म्हणती विठ्ठल सुवासिनी हे तत्त्वता । ऐसा अनुभव जाहला चित्तां । इच्या हातें करूनि जेवितां । अनुमान सर्वथा न करावा ॥ ९६ ॥ भाविक क्षेत्रवासी नर । तयांसि कळतां समाचार । प्रसाद घ्यावया साचार । येऊनि पात्रावर बैसती ॥ ९७ ॥ म्हणती चांगयाची प्रेमळ भक्ती । साक्षात परब्रह्म पांडुरंग मूर्ती । जेवावया आलीसे प्रीतीं । आतां अनुमान चित्तीं कायसा ॥ ९८ ॥ ऐसें क्षेत्रवासी नर । बोलोनि बैसती पात्रावर । भोक्ता पांडुरंग रुक्मिणीवर । संकल्प सत्वर सोडिला ॥ ९९ ॥ जें जें जयासि रुचे जैसें । तें तें पात्रीं सिद्धची असे । आश्चर्य वाटलें सकळांस । म्हणती धन्य दिवस सुदिन हा ॥ २०० ॥ समुद्र येऊन बैसला रांजणीं । तरी त्रैलोक्यासि पुरे पाणी । इंदिरा जाहली घरचारिणी । पदार्थासि वाण नसे कीं ॥ १ ॥ कां भास्करें दिवटी धरिली हातीं । तरी अंधकार न पडेचि क्षितीं । चंद्रमा विंजणा वारी हातीं । तरी उबारा निश्चितीं मग कैंचा ॥ २ ॥ कां दुर्बळाच्या प्रयोजनीं । सार्वभौम आला प्रीतीकरोनी । तेथें सर्व साहित्य घडोनी । येतसे होऊनि अनायासें ॥ ३ ॥ ज्या क्षेत्रीं बैसला पाकशासन । तेथें पर्जन्यासि नसे वाण । कमळोद्भवाच्या यज्ञांत जाण । मंत्र संपूर्ण विधियुक्त ॥ ४ ॥ तैसीं चांगदेवाच्या समाराधनीं । निजांगें पावलें कैवल्यदानी । तेथें अतृप्त न राहेची कोणी । करिती पुरवणी महासिद्धी ॥ ५ ॥ विनोदें ब्राह्मण बोलती वचन । भातलवंड्या वाढी ओदन । तें पासूनि उपनाम जाण ॥ त्याजकारणें हेंची म्हणती ॥६॥ अतृप्त जीव ते समयीं । क्षेत्रांत एकही राहिला नाहीं । चांगयासी स्तविती सर्वही । धन्य नवायी अगाध ॥७॥ अल्प अन्न वाढितां तेची । तृप्ति जाहली सकळांची । आणि स्वयंपाक राहिला तैसाची । पूर्ण विठ्ठलाची कृपा असे ॥८॥ ऐसें बोलोनि धरामर । मंत्र अक्षता देती सत्वर । चांगदेवें पुढें वरद पुत्र । करोनि त्याजवर टाकिल्या ॥ ९ ॥ विडे दक्षिणा देऊनि जाण । संतुष्ट केले ब्राह्मण । मग देउळांत पाहती जाऊन । तों मूर्ति सगुण दिसतसे ॥ २१० ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । आजि आम्ही जेविलों तुझें पंक्ती । देखोनि विधवेचि सप्रेम भक्ती । गेला श्रीपती ते ठायीं ॥११॥ ऐसें म्हणोनि धरामर । सद्भावें लोटले चरणावर । म्हणती चांगा वैष्णव वीर ।

१ खराच. २ पृथ्वीवर. ३ इंद्र. ४ ब्रह्मदेव. ५ पंखा.

अद्भुत चरित्र दाखविलें ॥ १२ ॥ दुसरें दिवसीं सकळ मंडळी । येऊनि चांगदेवा जवळीं । माघ मासीं तये वेळीं । तिथि नेमिली मुंजीची ॥ १३ ॥ यथा विधीनें साचार । व्रतबंध करिती धरामर । उपदेशोनि गायत्री मंत्र । सोहळा थोर पै केला ॥ १४ ॥ चार दिवसपर्यंत जाण । केलें ब्राह्मण संतर्पण । दक्षिणा देतां उदार मन । आशीर्वचन ते देती ॥ १५ ॥ देवासि पुसोनि ते अवसरीं । चांगदेव निघाले सत्वरीं । वरद पुत्राचिये घरीं । अति सत्वर चालिले ॥ १६ ॥ कल्याण कलबुर्ग्यांत सदन । माता पुत्र दोघे जण । चांगदेवासहित जाण । निज प्रीतीनें प्रवेशले ॥ १७ ॥ सोयरे आप्त विपर्यी गोत्रज नर । तयांसि सांगीतला समाचार । चांगदेवें दीधला वरद पुत्र । मग आश्चर्य थोर ते करिती ॥१८॥ सुहृद इष्टमित्र ऐकोनियां । ते सत्वर येती भेटावया । मुलाचीं लक्षणें पाहोनियां । समाधान तयां वाटत ॥१९॥ एक गृहस्थ थोर होता जाण । चांगयासि विनंति केली त्यानें । कीं तुमच्या वरदपुत्रा कारणें । कन्यादान करावें ॥२२०॥ ऐसें पुसतां गृहस्थ । चांगदेव अवश्य म्हणत । उभयपक्षीं साहित्य । करी धनवंत ते समयीं ॥ २१ ॥ लग्न तिथि नेमूनि जाण । ॐपुण्याह म्हणती ब्राह्मण । मंगळ वाद्यांचा ध्वनि गर्जून । पाणिग्रहण पैं केले ॥ २२ ॥ वस्त्रें अलंकार भूषणें । वधूवरांसि केली त्यानें । चार दिवस सोहळा संपूर्ण । यथा विधिनें जाहला ॥२३॥ चांगदेव पुसती त्या कारणें । आम्ही द्वारकेसि जातों जाण । क्षेत्रवासी लोक संपूर्ण । म्हणती दुर्लभ दर्शन यावरी ॥ २४ ॥ विठोबाची माता जाण । चांगयासि विनवी कर जोडून । पुत्रासि पायांवर घालून । काय वरदान मागतसे ॥ २५ ॥ याची वंश परंपरा निश्चित । तुजवीण नसावें कुळदैवत । जो अन्यथा करील या वचनांत । तरी दरिद्र तयाते येईल ॥ २६ ॥ ऐसें विनवितां तिज कारणें । योगेश्वर अवश्य म्हणे । यांनीं पांडुरंगाविण दैवत आन । त्याचें आराधन न करावें ॥ २७ ॥ त्या विठोबाचे वंशीं निश्चितीं । कार्तिकमासीं पंढरीस येती । लंवडोनि ब्राह्मणांसि भात वाढिती । व्रत चालविती वडिलांचें ॥ २८ ॥ असो तयांसि पुसोनि सत्वर । चांगदेव निघे त्या अवसरीं । बोळवीत येती नरनारी । सद्गदीत अंतरीं होऊनियां ॥ २९ ॥ मग नमस्कारोनि योगेश्वरा । परतोनि जाती आपुल्या घरां । संप्रदायी समुदाय घेऊनि वरा । चांगदेव त्वरा निघालें ॥ २३० ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ संपूर्ण । हेंचि कोमळ तुळसीचें वन । येथें देवाधिदेव रुक्मिणी रमण । निजप्रीतीनें राहिला ॥३१॥ जो अच्युतानंत श्रीहरी । स्वेच्छेनें अघटित करी । तो महीमतीचे बैसोनि वैखरी । आठव अंतरी देतसे ॥ ३२ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । सप्तमाध्याय रसाळ हा ॥ २३३ ॥ अ० ७ ॥ ओ० ॥ २३३ ॥

अध्याय ८



श्रीगणेशायनमः । जय जय अनंत कल्याणदायका । जगद्गुरु श्रीवैकुंठनायका । दीनबंधु अनाथरक्षका । सौख्यकारका श्रीपांडुरंगा ॥ १ ॥ अनंत जड जीव विठाबायी । तुवां मागे तारिले पाही । माझी चिंता असोदे कांहीं । आठव जीवीं धरोनिया ॥ २ ॥ सकळ दुरितांचा करोनि मेळा । त्याचा मी निर्माण जाहलों पुतळा । पतित पावन भक्तवत्सला । निवेदन तुजला असों दे ॥ ३ ॥ मी जन्मासि येऊनि श्रीहरी । दुरितें आचरलों नानापरी। हे साक्ष येत असे निजअंतरीं । भवसागरीं बुडतसें ॥ ४ ॥ प्रारब्ध संचित क्रियमाण । उत्तम दिसोनि नयेचि जाण । म्हणोनि करुणा तुजकारणें । निज प्रीतीनें भाकितसे ॥ ५ ॥ कल्पनेच्या वोढी नाना । सर्वथा नावरती जगज्जीवना । जागृतीं सुषुप्तीं आणि स्वप्ना । निश्चळत्व मना नयेची ॥ ६ ॥ तूं कृपा करिशील जरी श्रीहरी । तरी तरेन भवसागरीं । इतर उपाय नानापरी । ते फळात्कारीं न येती ॥ ७ ॥ जैसें सखोल भूमींत पेरिले कण । परि त्यावरी वर्षला नाहीं धन । तैसें तुझें कृपेविण । व्यर्थ साधनें दिसताती ॥ ८ ॥ तुवा ज्याचा अंगीकार रुक्मिणीपती । केला असेल सहजस्थिती । त्याची प्रख्यात जाहली कीर्ती । पुराणीं गर्जती पंवाडे ॥ ९ ॥ त्या संताचीं चरित्रें सविस्तर । आठवण द्यावी राजीव नेत्र । मी तो मंदमति अपवित्र । निमित्तमात्र दिसतसे ॥ १० ॥ मागिल अध्यायीं निरूपण । भात लवंडितां पुरलें अन्न । मग वरदपुत्राचें करोनि लग्न । चांगदेव तेथूनि निघाले ॥ ११ ॥ बहुत हेत उपजला चित्तीं । द्वारकेसि जावें सत्वर गतीं । स्नान करोनि तीर्थ गोमती । श्रीकृष्ण मूर्ती पाहावी ॥ १२ ॥ ऐसें बोलतां योगेश्वर । सवें यात्रा निघाली फार । सत्समागमाचा महिमा थोर । ऐसें सर्वत्र बोलती ॥ १३ ॥ तों धारूरचा देशपांड्या जाण । यादवपंत नामें ब्राह्मण । चांगदेवाच्या संगतीनें । यात्रेस गमन करीतसे ॥ १४ ॥ गरोदर पत्नी ते अवसरीं । तेही सर्वथा न राहेचि घरीं । बहुती वर्जिले नानापरी । परी नायकेचि निर्द्धारीं कवणाचें ॥१५॥ म्हणती चांगयाच्या संगतीनें । इसीं रक्षील श्रीकृष्ण । ऐसा निश्चय करोनि मन । उभयतां जाण निघालीं ॥ १६ ॥ एक विकल्प घालिती ऐसा । भ्रतार इचा देवपिसा । पुढें प्रांत होईल कैसा । हें तों सहसा कळेना ॥ १७ ॥ पोरसवदा हे सुकुमार । असें पहिल्यानें गरोदर । द्वारकेचा पंथ दूर । उत्तम विचार दिसेना ॥ १८ ॥ एक म्हणती साहवा मास । भरला इच्या गर्भास । आतां पायीं चालावयास । शक्ति नसे सर्वथा ॥ १९ ॥ तिचे आप्तविषयी होते कोणी । ते म्हणती आणावी परतोनी । ऐसें म्हणोनि तये क्षणीं । येती धांवोनी सन्निध ॥ २० ॥ नानापरी तये वेळ । घालूं पाहती मायाजाळ । परी तिची वृत्ति वेधली सकळ । करील घननीळ तें करो ॥ २१ ॥ भ्रतार आधींच देवलसी । जरी मी सोडोनि राहिलें त्यासी । अवचट जाहलिया संन्यासि । तरी गति कैसी मग होय ॥ २२ ॥ ब्राह्मण जन्म कठिण फार । कैसा करूं मग संसार । ऐकूनि कन्येचा विचार । मानलें उत्तर वडिलांसी ॥ २३ ॥ चांगदेवाच्या समुदायांत । यादवराव गेले त्वरित । मागून

कांता हळुहळू येत । चालत पंथ सर्वथा ॥ २४ ॥ कोणी रोड दुर्बळ म्हातारीं । मागूनि निघालीं ते अवसरीं । यादवाची पत्नी सत्वरी । जात बरोबरी तयांच्या ॥ २५ ॥ अस्तमानासि जातां तरणी । यात्रा उरली ज्या ठिकाणीं । प्रहर रात्रीं ते भामिनी । गेली चालोनी ते ठायीं ॥ २६ ॥ भ्रताराच्या सन्निध जात । तो म्हणे कासया आलीस येथ । आम्हांस उपाधि नाहीं लागत । परतोन त्वरीत जाय आतां ॥ २७ ॥ टाकली सांड देतांचि पती । रुदन करी ते गुणवती । यात्रेकरी तिजला शिकविती । याची संगती सोडूं नको ॥ २८ ॥ चांगदेवासि अनन्य शरण । यादव जात निजप्रीतीनें । त्याचा अनुग्रह घेऊन । समाधान पावला ॥ २९ ॥ मिथ्या प्रपंच लटकी माया । ऐसा निश्चय बाणला तया । आगीं ब्रह्मींची पडली छाया । विदेही काया दिसतसे ॥ ३० ॥ निद्रा आणि जागृती । दिसे चांगदेव सद्गुरुमूर्ती । स्वप्नीं आणि सुषुप्तीं । सहज स्थिती बाणली असे ॥ ३१ ॥ असो यादवाची ऐशी स्थिती । निरसिली सकळ प्रपंच भ्रांती । कांता आली की नाहीं निश्चितीं । हा भाव चित्तीं असेना ॥ ३२ ॥ नाना चराचरीं सर्व भूतें । एक आत्मवत जग भासतें । आपणही समरस जाहला त्यातें । कल्पना द्वैत असेना ॥ ३३ ॥ गात नाचत प्रेमभरित । क्रमीतसे द्वारकेचा पंथ । मागें कांता धांवत येत । पायीं चालत गर्भिणी ॥ ३४ ॥ दिवस तों भरले नवमास । कोणी मायबहीण जवळीं नसे । ऐसी पातली महीतीरास । वोसाड असे अरण्य तें ॥ ३५ ॥ चांगदेव महा योगेश्वर । संप्रदायांसहित गेला दूर । यादवही त्याच्या बरोबर । न पाहे माघारे सर्वथा ॥ ३६ ॥ एकली एकट नसे कोणी । निढळ पडली असे वनीं । पोट दुखतें म्हणउनी । ठिकाणींहुनी न चालवे ॥ ३७ ॥ म्हणे मायबापें तों राहिलीं दुरीं । भ्रतार टाकूनि मला निर्धारीं । हे गति नाहीं झाली बरी । काय श्रीहरी करूं आतां ॥ ३८ ॥ पोटाच्या कळा जाहल्या फार । यात्राही सांडूनि गेली दूर । सन्निध कोणीच नसे नर । उत्तम विचार दिसेना ॥ ३९ ॥ ऐसें संकट जाणोनि तेव्हां । मग चांगदेवाचा करीतसे धांवा । म्हणे सद्गुरु तूं अवतार बरवा । देईं विसांवा जीवासी ॥ ४० ॥ चौदाशें वर्षें साचार । तुवां काळ जिंकिला दुर्धर । विधवेसि दीधला वरदपुत्र । ते कीर्ति साचार ऐकिली म्यां ॥ ४१ ॥ म्हणोनियां तुज सांगातें । मी द्वारकेसि चालिलें निश्चित । भ्रताराची तों विदेह स्थित । टाकिलें अरण्यांत मजलागीं ॥ ४२ ॥ मी परदेशीं अज्ञान बाळ । कैसा नेणवे प्रसूतिकाळ । कोणी मायबहीण नाहीं जवळ । म्हणवोनि तळमळ करीतसें ॥४३॥ भक्तवत्सल कैवल्यदानी । मजलागीं पावावें ये निदानीं । ऐसा धांवा करितां भामिनी । देवाचे कानीं शब्द पडियेला ॥४४॥ अनाथ बंधु करुणाकर । भक्तवत्सल कृपासागर । घ्यावया भक्तांचा कैवार । नाना अवतार धरितसे ॥४५॥ मत्स्य कच्छ वराह होणें । नृसिंह वामन भार्गव पूर्ण । श्रीराम दाशरथी कृष्ण । बौद्ध कल्की होणें तयास ॥ ४६ ॥ एकाच्या कैवारें वोढणें भिंती । एकीं जेवविली पाषाण मूर्ती । एकाच्या कैवारें निश्चितीं । पाडेवार श्रीपती जाहला ॥ ४७ ॥ एकाच्या घरीं श्रीखंड्या कृष्ण । पाणी

वाहतसे आवडीनें । दासी जनीचें सारितां दळण । संकोच मन नव्हेची ॥४८॥ चोखियाच्या संगें रुक्मिणीवर । निजांगें वोढूं लागतसे ढोर । गौळणी उखळासि बांधितां दोर । तें शार्ङ्गधर सोशीतसे ॥ ४९ ॥ सेनियाचे[1] भक्तीसाठीं । नापीत[2] होतसे जगजेठी । भक्तांसि पडतां महासंकटीं । मग उठाउठी पावतसे ॥ ५० ॥ ना विचारीच काळ वेळ । सगुण होतसे दीनदयाळ । त्याणें माहेरवणीचा धांवा ते वेळे । श्रवणीं तत्काळ ऐकिला ॥ ५१ ॥ लगबग जाहली जगज्जीवना । सर्वथा धीर न धरवेचि मना । दयेनें द्रवला यादव राणा । कौतुकें नाना दाखवी ॥ ५२ ॥ यादवाच्या स्त्रीचे ठायीं । तेथें प्रकटले शेषशायी । स्त्रीचें रूप लवलाहीं । घेतसे ते समयीं जगदात्मा ॥ ५३ ॥ पांढरें पातळ शुभ्र चोळी । निजांगें लेतसे वनमाळी । कर्णीं ताटंके झळाळी । कुंकुम भाळीं लाविलें ॥ ५४ ॥ जो वैकुंठवासी इंदिरावर । ज्यासि हृदयीं धरीतसे पिनाकधर[3] । तो कां कणेल्याला हातभर । नवल साचार मज वाटे ॥ ५५ ॥ ऐसें रूप तें माहेरवणी । देखोनि विस्मित जाहली मनीं । म्हणे कोठून आलीस वो साजणी । मज लागोनी सांगावें ॥ ५६ ॥ ऐसें पुसतां ते समयीं । काय म्हणतसे शेषशायी । मज चांगदेवें[4] पाठविलें पाहीं । कृष्णाबाई नाम माझें ॥ ५७ ॥ तुज पातला प्रसूति समय । यास्तव पातलें लवलाहें । आतां चित्तीं न धरीं भय । तुझी सोय करितें मी ॥ ५८ ॥ ऐसें म्हणोनि रुक्मिणीरमण । योगमायेचें केलें चिंतन । मायेचें नगर निर्माण । स्वइच्छेनें करीतसे ॥ ५९ ॥ तिजला धरूनि मणगटीं । मंदिरांत नेली उठाउठी । म्हणे मज सांगतां जीवींची गोष्टी । संकोच पोटीं न धरावा ॥ ६० ॥ परदेशीं एकट तूं निढळ । कोणी माय बहिण नसे जवळ । समीप जाणोनि प्रसूति काळ । आलें तत्काळ मी धांवोनी ॥ ६१ ॥ ऐसें बोलतां कृष्णाबाई । संतोष वाटला तिचे जीवीं । म्हणे तुझें उत्तीर्ण व्हावें कायी । तरी पदार्थ नाहीं मजपासी ॥ ६२ ॥ ऐसें बोलूनियां उत्तर । मस्तक टेकिला पायांवर । तो प्रसूति समय येतां सत्वर । जाहला पुत्र सुलक्षणी ॥ ६३ ॥ संतोष मानी घनसांवळा[5] । म्हणोनि निजांगें वाजवी थाळा । आपुल्या दासाचा पुरवितां लळा । आळस गोपाळा न ये कीं ॥ ६४ ॥ ज्याची मूर्ति हृदयसंपुटीं । एकांतीं पूजितसे धूर्जटी । तो नाळ खांडित आपुले मुठीं । उल्हास पोटीं धरूनियां ॥ ६५ ॥ बाळंतीण म्हणे कृष्णाबायी । एकलीच कष्ट करितेसि कायी । दुसरी सुईण घातली नाहीं । मग उत्तर कायी बोलतसे ॥ ६६ ॥ तुझा दों जीवे निवाडा झाला । इतुकेनी संतोष वाटे मजला । कष्टाचा उबग नाहीं आला । निश्चित बोला या मानी ॥ ६७ ॥ ज्याच्या चरणांगुष्ठापासून । पवित्र गंगा निघाली जाण । तो पाणी तावोनि जगज्जीवन । न्हाणी तान्हें बाळंतिणी ॥ ६८ ॥ निज प्रीतीनें ते अवसरीं । कातबोळ वाटिला घरोघरीं । औषधें वाटोनि नानापरी । देत सत्वरी जगदात्मा ॥ ६९ ॥ शेगडी बाज ते समयीं । निजांगें घालीत कृष्णाबायी । पथ्य करोनि लवलाहीं । बाळंतिणीस जेववी ॥ ७० ॥ विडा करोनि आपुले हातें । तिसीं देत

१ सेना न्हावी. २ न्हावी. ३ शंकर. ४ पांडुरंग. ५ शंकर.

रुक्मिणीकांत । दीपक लावोनि अहोरात । वैसे जागत तिज पाशीं ॥ ७१ ॥ पाकशासनांसहित सकळ सुरं । जयासि अर्चिती निरंतर । तो सत्वीस पूजोनि आपुल्या करें । साहित्य समग्र मेळवूनियां ॥७२॥ नाडापुडी आणि शेंदूर । उदफुलें नानाप्रकार । मुरड कानवल्या पाट्यावर । ठेवीत निजकरें आपुल्या ॥ ७३ ॥ पांचवी पूजोनि ऐशा रीतीं । अहोरात्र करी जागृती । दाहावे दिवसीं तिजप्रती । न्हाणी श्रीपती निजांगें ॥ ७४ ॥ ऐशा रीतीं बाळंतपण । एक मास केलें जगज्जीवनें । सर्वथा उबग न धरी मनीं । लाघवी श्रीकृष्ण कृपाळु ॥ ७५ ॥ जो पदार्थ लागे बाळंतिणी । तितुकेही पुरवीत चक्रपाणी । औषध पथ्य सर्व करोनि । वैसवीत भोजनीं निज लोभें ॥ ७६ ॥ कतिचा करोनियां त्याग । यादव गेला चांगया संगे । मागें तो सांभाळ निजांगें । करितसे श्रीरंग कृपाळु ॥ ७७ ॥ परी हें चरित्र ते समयीं । कोणासि सर्वथा विदित नाहीं । श्रीहरीची अघटित लीला पाहीं । ब्रह्मादि कांहीं नेणवे ॥ ७८ ॥ एक मास लोटतां सत्वरा । चांगदेव गेले द्वारकापुरा । स्नान करोनि गोमती तीरा । राउळांत प्रवेशला ॥ ७९ ॥ महाद्वारीं दंडवत । घातलें तेव्हां प्रेमयुक्त । मग श्रीकृष्ण मूर्ति ध्यानास आणित । रुक्मिणी सहित ते वेळीं ॥ ८० ॥ तों मूर्तीत नसे श्रीकरधर । विस्मित जाहलें निज अंतर । मग विश्वीं विलोकीत योगेश्वर । तों अद्भुत चरित्र देखिलें ॥ ८१ ॥ यादवाची पत्नी साचार । महीतीरीं राहिली दूर । प्रसूति समयीं इंदिरावर । गेला सत्वर त्या ठायां ॥ ८२ ॥ कृष्णाबाईचें रूप धरून । तिचे करितसे बाळंतपण । ऐसें ध्यानांत चांगयानें । चरित्र संपूर्ण पाहिले ॥ ८३ ॥ तंव रुक्मिणी म्हणे केशवदासा । तुवां कष्टविलें द्वारकाधीशा । बाळंतपणा धाडिला कैसा । केली निराशा आमुची ॥ ८४ ॥ एक मास लोटला पाहीं । येथें न येती शेषशायी । निजांगें जाहले कृष्णाबायी । आम्हीं तळमळ जिवीं करितसों ॥ ८५ ॥ आम्हांसहित अहर्निशीं । अष्टसिद्धि तिष्ठती दासी । जरी आज्ञा करिती हृषीकेसी । तरी महाकार्यासी संपादितो ॥८६॥ इतुके ऐश्वर्य अंगीं असोन । आणि निजांगें करितो बाळंतपण । ऐसें देवाचें कुलक्षण । मज कारणें नावडे ॥८७॥ ऐसें बोलता रुक्मिणीस । काय म्हणतसे केशवदास । निजांगें करावें भक्त कार्यास । हा स्वभावचि असे तयाचा ॥ ८८ ॥ मागील चरित्रें पाहिली सर्वही । माते तुज काय विदित नाहीं । धर्माचे घरीं शेषशायी । उच्छिष्ट सर्वही सावडीतसे ॥ ८९ ॥ यादव सैन्य छपन्न कोटी । सेवेसि तिष्ठती घडीघडी । तो अर्जुनाची निजांगे धूतसे घोडी । सत्कीर्ती चोखडी हे त्याची ॥ ९० ॥ महर्षिस सद्भावें करिती हवन । तेथेंचि न घे जो अवदान । तो गोपाळांचे उच्छिष्ट श्रीकृष्ण । निज प्रीतीनें खातसे ॥ ९१ ॥ हटयोगी ब्रह्मज्ञानी । जो सर्वथा नये त्यांचें ध्यानीं । त्यासि दाव्यानें बांधिती गौळणी । विचित्र करणी मज दिसे ॥ ९२ ॥ अष्टसिद्धि असोनि दासी । परी सर्वथा कार्य न सांगे त्यांसी । तो दळूं लागतसे जनीसी । सप्रेम भक्तीसी भुलोनियां ॥ ९३ ॥ तैशाच रीती जगज्जीवन । करीत वैसले बाळंतपण । हें त्याच्या स्वभावाचें लक्षण ।

१ इंद्र. २ देव. ३ देवळांत. ४ संत जनाबाई.

उपाय कोण करावा ॥ ९४ ॥ ऐसी चांगयाची वचनोक्ती । ऐकोनि रुक्मिणी विस्मित चित्तीं । म्हणे आतां कळेल तैसी युक्ती । करूनि वैकुंठपती आणावा ॥ ९५ ॥ मीही तीरासि लवलाहीं । परतोन जाय ये समयीं । श्रीहरि झाला असे कृष्णाबायी । घेऊन येयी त्याजला ॥ ९६ ॥ ऐकोनि रुक्मिणीचें वचन । चांगदेव अवश्य म्हणे । विश्वमातेसि करूनि नमन । निघे तेथून सत्वर ॥ ९७ ॥ ब्रह्मारण्य महीतीर । तेथें पातले योगेश्वर । तों तेथून नूतन मायेचें नगर । देखिलें साचार दृष्टीसीं ॥ ९८ ॥ चांगया विस्मित ते वेळां । म्हणे श्रीहरीची अघटित लीला । नाना चरित्रें दाखवी डोळां । सप्रेम कळा देखोनियां ॥ ९९ ॥ लोकांसि पुसोनि ते समयीं । कोठें राहतसे कृष्णाबायी । दुरूनि मंदिर दाखविल्या पाहीं । मग ते गृहीं प्रवेशत ॥१००॥ तों कृष्णाबाई आंगणांत । चांगयासि देखोनि नमस्कारित । जो माया लाघवी श्रीभगवंत । वोळखून देत आपणांसी ॥ १ ॥ चांगया ऐसा योगी भला । चौदाशे वर्षें जिंकिलें काळा । तयासि न कळे श्रीहरीची लीला । ते प्राकृतासि डोळां केविं दिसे ॥ २ ॥ रूपें नटोनि नाना रीतीं । देव उघडाचि वर्ते क्षितीं । परि मायेची पडळें डोळ्यांवरती । म्हणूनि श्रीपती दिसेना ॥ ३ ॥ इतर जीवांची कायसी परी । जन्म घेतला यशोदे उदरीं । तिसीं विश्वरूप दाखविलें परी । लेकरूं श्रीहरी म्हणे माझें ॥ ४ ॥ असो आतां ते समयीं । चांगदेवें देखिली कृष्णाबायी । परी होय न होय संशय जीवीं । नमस्कार तोहि न केला ॥ ५ ॥ तों माया लाघवी श्रीकृष्णनाथ । अदृश्य होय तेथील तेथें । चांगदेव मंदिरीं प्रवेशत । तों बाळंतीण येत उठोनियां ॥ ६ ॥ योगेश्वराच्या पायांवर । स्वहस्तें घाली आपुला कुमर[1] । वृत्तांत सांगितला सविस्तर । आद्यंत चरित्र जें झालें ॥७॥ म्हणे भ्रतार टाकुनि गेले या वनीं । मी एकटी राहिलें ये स्थानीं । प्रसुति समय तये क्षणीं । निढळ वाणी बैसलें ॥ ८ ॥ तंव स्वामिनी कृपा करोनि पाहीं । येथें पाठविली कृष्णाबायी । तिणें बाळंतपण करूनि सर्वही । मज ये ठायीं रक्षिलें ॥ ९ ॥ चांगदेव पुसे पाहीं । कोठें दाखवी कृष्णाबाई । ते म्हणे आतांचि ये समयीं । बाहेर लवलाहीं ते गेली ॥ ११० ॥ तुम्ही आलां मंदिराप्रती । तेव्हां बाहेर उभी होती । चांगदेव समजलें आपुलें चित्तीं । म्हणे श्रीपती कष्टविला ॥ ११ ॥ आम्ही यादव सर्व आणिला नसता । तरी श्रीहरी बाळंतपण कामया करिता । ऐसी क्षीतें[2] मानीत चित्ता । म्हणे द्वारकानाथ कष्टविलें ॥ १२ ॥ योगयाग तपेंव्रतें । ज्याच्या प्राप्तीस्तव करिताति वहुतें । तो भक्तकार्यासि वैकुंठनाथ । थोरपण नाठवीत सर्वदा ॥ १३ ॥ तव बाळंतिणीनें जोडूनि कर । लेकरूं घातलें पायांवर । म्हणे हा शिष्य तुमचा निर्द्धार । सेवेसि निरंतर लाविजे ॥ १४ ॥ ऐसें ऐकोनि विनीत वचन । सद्गुरु तिजला अवश्य म्हणे । मातेसहित घेउनि तान्हे । आले परतोन द्वारकेसी ॥ १५ ॥ मग जाऊनि राउळाप्रती । दृष्टीसीं देखिली श्रीकृष्णमूर्ती । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । विचित्र गती पैं तुझी ॥ १६ ॥ निजांगें स्त्रीचें रूप धरून । तुवां सारिलें बाळंतपण । अनाथ बंधु करुणाघन । हें

१ पुत्र. २ दुःख.

नामाभिधान तुज मांजे ॥ १७ ॥ ऐशापरी करोनि स्तुती । मग पूजिली श्रीकृष्णमूर्ती । उजळूनियां मंगळ आरती । दंडवत प्रीतीं घातलें ॥ १८ ॥ मग यादवासि बोलावूनि सत्वर । त्यासि भेटविलीं पत्नी कुमरं । म्हणती इचा त्याग न करीं माचार । देतसें वर तुजलागीं ॥ १९ ॥ या पुत्राच्या वंशीं परात्पर । हरिभक्त निर्माण होतील थोर । तेणें सकळ कुळाचा उद्धार । यासि अंतर असेना ॥१२०॥ ऐसें सांगतां सद्गुरुमूर्ती । यादवें नमस्कार घातले प्रीतीं । हातीं धरूनि कांतिप्रती । बिन्हाडासि निश्चितीं तो गेला ॥ २१ ॥ चांगदेवें करूनि मिष्टान्न । वैष्णव मंडळीस घातलें भोजन । चतुर्मास तेथें राहून । मग स्वदेशासि जाण परतले ॥ २२ ॥ देवासि पुसोनि ते अवसरीं । चांगदेव निघती सहपरिवारीं । यात्रेचा समुदाय घेऊनि भारी । गोदातीरीं मग आले ॥२३॥ येऊनि पुण्यस्तंभ क्षेत्रांत । भेटती इष्टमित्र सर्वांतें । चरित्र वर्तलें जें अद्भुत । तें जाहलें श्रुत सकळांसी ॥ २४ ॥ चांगदेव होते द्वारकापुरीं । तें कीर्ति प्रगटली देशांतरीं । म्हणती हा अवतार पृथ्वीवरी । विश्वोद्धारी जन्मला ॥ २५ ॥ जया समागमे असतां गभस्ती । तों नभमंडळीं फांके किरणदीप्ती । कां चंपके सुमनें दूर असती । तों येतसे घ्राणातें सुवास ॥ २६ ॥ कां रोहिणीकांत उदयाचळीं । तों शीतलत्व धांवे नभमंडळीं । कां श्रीराम न येतां कौसल्या उदरीं । तों चरित्र सत्वरीं प्रगटलें ॥ २७ ॥ तैसी भगवद्भक्ताची कीर्ती । विश्वमुखीं होय वार्ता । धन्य योगेश्वर चांगया म्हणती । रुक्मिणीपती साह्य जया ॥ २८ ॥ गोदातीरासि आलिया निश्चित । दिवस लोटले असतां सात । तों पंढरीचा विपरीत वृत्तांत । वार्तिक सांगती येऊनियां ॥ २९ ॥ बेदरीं राजा अविंध कुमती । क्षेत्रांसि आला सत्वर गती । ब्राह्मणांसि छळिलें नाना रीतीं । केली विपत्ती बहुत तयां ॥ १३० ॥ हिंदुधर्म वर्जिला सकळ । वैष्णवांसि घालूं न देतीच माळ । कीर्तन कथा वर्जुनि सकळ । दंडिले सुशीळ विप्र त्याणें ॥ ३१ ॥ पंढरी क्षेत्र लुटूनि त्याणें । मागुतीं यवनाचें बैसविलें ठाणें । बडव्यांनीं समापत्र करून । विठोबा लपवून ठेविला ॥ ३२ ॥ तळघरीं आच्छादून पांडुरंग मूर्ती । तयाचें नाम कोणी न घेती । जरी हरिकीर्तन वैष्णव करिती । तयांसि दंडिति तत्काळ ॥ ३३ ॥ देवाचें महाघर मोडूनि सकळ । मसीद केली त्या महा खळें । भले लोक पळाले तत्काळ । यवनाचें बळ देखूनियां ॥ ३४ ॥ ऐसि या गोष्टीसी निश्चित । महिने लोटून गेले सात । चांगदेव ऐकूनि मात । नेत्रीं अश्रुपात वाहती ॥ ३५ ॥ अंग जाहलें रोमांचित । कंठीं बाष्प पैं दाटत । म्हणे कलीच्या भयानें रुक्मिणीकांत । पळोनि बैसत तळघरीं ॥ ३६ ॥ परी पुंडलीकासि दीधला वर । कीं जड मूढ उद्धरीन दर्शनमात्र । तें असत्य केलें काय उत्तर । ऐसें साचार दिसतसे ॥ ३७ ॥ मग म्हणे जी करुणाकरा । महाप्रताप धीर गंभीरा । तुझी सत्कीर्ति माझ्या अंतरां । रुक्मिणीवरा आठवतसे ॥ ३८ ॥ शिव ब्रह्मा इंद्रादि गण । शंखासुरें जिंतिले संपूर्ण । तों तुवां मत्स्यावतार धरून । टाकिला निवटून क्षणमात्रें ॥ ३९ ॥ कच्छरूप धरूनि एक वेळ ।

---

१ नांव. २ शोभते. ३ मुलगा. ४ सूर्य.


पृष्ठीवरी धरिला मंदराचळ । रत्नें काढूनि तत्काळ । विबुध सकळ तोषविले ॥ १४० ॥ हिरण्याक्ष पृथ्वीची करितां घडी । तुवां वराह वेष घेतला तांतडी । दैत्य मारिला लवड सवडी । हे सत्कीर्ति चोखडी पुराणीं ॥ ४१ ॥ हिरण्यकशिपें प्रल्हाद भक्त । गांजितां प्रगटलासि स्तंभांत । नखावरी विदारूनि त्यातें । आपुल्या दासातें रक्षिसी ॥ ४२ ॥ दानाभिमानें फुगला बळी । तयासि घातलें पाताळीं । ऐसा प्रतापी तूं वनमाळी । सामर्थ्य ये काळीं लोपलें ॥ ४३ ॥ रेणुकेसि गांजिलें सहस्रार्जुनें । तेव्हां परशु हातीं घेतला त्वरेनें । एकलेनि पृथ्वी निःक्षत्रिय करून । राज्यीं ब्राह्मण बैसविलें ॥ ४४ ॥ कपटी रावणें सकळ सुरें । बंदिखानीं रक्षिले समग्र । तुवां अवतार घेऊनि रघुवीर । दशानन सत्वर मारिला ॥ ४५ ॥ मग वसुदेव देवकीचें उदरीं । अवतार घेतला श्रीहरी । कंस चाणूर निवटूनियां अरीं । सुखी धरित्री केली असे ॥४६॥ ऐसा तुझा प्रताप असतां । अवघाची हरपोनि गेला आतां । आतां आम्हांसि कोण रक्षिता । न दिसे तत्त्वतां भू-मंडळीं ॥ ४७ ॥ ऐसा धांवा ते क्षणीं । चांगदेव करितसे आपुलें मनीं । म्हणे देवाधिदेवा कैवल्यदानी । सत्वर येऊनी भेट मज ॥ ४८ ॥ तुझा प्रताप वर्णितां जाण । चक्षुःश्रवा शीणला पूर्ण । तो तूं कळिकाळासि देऊनि मान । लपलासि भयानें यवनाच्या ॥ ४९ ॥ ऐसें चांगयाचें करुणाउत्तर । ऐकूनि द्रवला रुक्मिणीवर । मग ध्यानांत होऊनि प्रगट सत्वर । अभय कर देतसे ॥१५०॥ म्हणे प्रेमळ भक्ता ऐक वचन । मी अचळ अढळ अविनाश पूर्ण । परी तुमचे इच्छेस्तव जाण । साकार सगुण रूप धरिलें ॥ ५१ ॥ माझे इच्छेने निश्चिती । अनंत रूपें होती जाती । तेथें यवन बापुडे ते किति । कासया खंती करितोसी ॥ ५२ ॥ कृत त्रेता द्वापारांत । तेव्हां म्यां पराक्रम केले बहुत । कलियुगीं आपुलें यश समस्त । तुम्हां भक्तांतें दीधलें ॥ ५३ ॥ तुम्ही जरी अघटित कराल गोष्टी । तरी मीं सिद्धीस नेईन उठाउठी । मी साहय असतां जगजेठी । चिंताक्रांत पोटीं न व्हावें ॥ ५४ ॥ आतां सोडूनि गोदातीर । बेदर नगरास जाय सत्वर । तेथें अघटित होईल चरित्र । तें लोक समग्र पाहती ॥ ५५ ॥ ऐसें सांगोनि रुक्मिणीकांत । राहिले चांगयाच्या हृदयांत । मग केशवदास नेत्र उघडित । होय विस्मित मानसीं ॥ ५६ ॥ म्हणे माझी पुरवावया आर्ती । साक्षात भेटली पांडुरंग मूर्ती । स्वयें आज्ञा करीत श्रीपती । कीं बेदराप्रती तूं जाईं ॥ ५७ ॥ आपुलें शिरीं असतां घननीळ । काय करील अविंधखळ[1] । कळिकाळीचें न चले बल । दीन दयाळ साहय असतां ॥ ५८ ॥ दैत्य दानव निवटीत श्रीहरी । आपण जिंतावे षड्वैरी[2] । वोस पाडूनि वैवस्वतपुरी[3] । वैकुंठ पुरी वसवावी ॥ ५९ ॥ रावण आणि कुंभकर्ण । मारूनि विजयी रघुनंदन । संतीं काम क्रोध दोघेजण । शुरत्वें परि पूर्ण जिंतिले ॥ १६० ॥ कृष्णें मारिले कंस चाणूर । संतीं त्रासिले मदमत्सर । तेणेंचि विजयी वैष्णव वीर । सत्कीर्ति अपार तयांची ॥ ६१ ॥ वक्रदंत शिशुपाळां कारणें । मारूनि यशस्वी जाहला कृष्ण । संतीं दंभ

१ देव. २ शत्रू. ३ यमाची नगरी.

अहंकार निवटून । शांति भूषण ते ल्याले ॥ ६२ ॥ श्रीरामें ताटिका[1] मारिली पाहीं । संतीं त्रासिली निंदा देवी । तत्समान पुरुषार्थ दोहींचाही । भिन्न भेद नाहीं सर्वथा ॥ ६३ ॥ असोत आतां दृष्टांत निके । देव भक्त समान सारिखे । एकमेकांचें आंगें देख । सप्रेम सुख भोगिती ॥ ६४ ॥ क्षेत्र क्षेत्रज्ञ जया रीतीं । एकमेकांत समरसें असती । गभस्ती आणि तेज निश्चिती । वेगळीं न होती सर्वथा ॥ ६५ ॥ जैसें कर्ण आणि अवधान । कां नेत्र आणि देखण । तैसे देव भक्त दोघेजण । एकत्रपण दोहींचें ॥ ६६ ॥ नातरी नाक आणि सुगंध घेता । रसना आणि चवी जाणता । तेवीं भक्तासीं नाहीं भिन्नता । एकात्मता दोहींची ॥ ६७ ॥ तेवीं चांगदेव आणि रुक्मिणीपती । एकमेकांचें अंतर जाणती । जड मूढ उद्धरावया निश्चिती । अवतार क्षितीं घेतले ॥ ६८ ॥ पुढिले अध्यायी कथा रसाळ । देवें भक्ताचे पुरविले लळे । महीपती त्यांची चरित्रें रसाळें । ओव्या प्रांजळ गातसे ॥ ६९ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । अष्टमाध्याय रसाळ हा ॥ १७० ॥ अ० ॥ ८ ॥ ओव्या ॥ १७० ॥ ६ ॥

१ त्राटिका राक्षसी.

अध्याय १



श्रीगोपालकृष्णाय नमः । जय जय जगद्गुरु पंढरीनाथा । चराचरीं एक तुझी सत्ता । जयाची कां जैसी आस्था । ते तूं अनंता पुरविसी ॥१॥ बैसोनि सुरतरु तळवटीं । जैसी कल्पना आणिजे पोटीं । मग विलंब न लागतां उठाउठी । तैंचि फळ दृष्टीं दिसतसे ॥ २ ॥ कां पुरुष नटोनि साचार । दर्पणांत पाहे मुखचंद्र । रूप दिसतें तदाकार । आणखी विचार असेना ॥३॥ कां अरोळी मारितां पर्वता वरूनी । दरीं कंदरीं तैसीच उमटे ध्वनी । का पाषाणाच्या देउळांतुनी । पडसाद परतोनी तैसाचि ये ॥ ४ ॥ तैशाच रीतीं करुणाधना । तुज जो जैसी धरी भावना । तैसींच फळें जगज्जीवना । दीनोद्धारणा त्यां देसी ॥५॥ अभक्त तुज नाहीच भाविती । तरी त्यांच्या दृष्टीं न पडसी श्रीपती । भाविकांची देखूनि अनन्यप्रीती । सगुणरूपें निश्चितीं भेटसी त्यां ॥ ६ ॥ घ्यावया भक्तांचा कैवार । घेतले नाना अवतार । असुर दैत्य मारूनि दुर्धर । चरित्रें अपार दाखविलीं ॥७॥ आतां बौद्धरूपहृषीकेश । सर्वथा बोलसी कवणास । परी निज भक्तांसि देशील यश । सत्कीर्ति घोष वाढविसी ॥ ८ ॥ मागिले अध्यायीं कथा गहन । कृष्णाबाई होऊनि श्रीकृष्ण । यात्रेकरिणीचे बाळंतपण । निजप्रीतीनें सारिलें ॥ ९ ॥ तें चांगदेवें देखोनि दृष्टीं । विस्मित जाहले आपुलें पोटीं । तिच्या भ्रताराची करोनि भेटी । मग उठाउठी परतले ॥ १० ॥ पुण्यस्तंभासि येतां जाण । तों ऐकिलें पंढरीचें वर्तमान । कीं अविंध[१] राजा क्षेत्रासि येऊन । ब्राह्मण संपूर्ण नागविले ॥ ११ ॥ बडवे मिळोनि एकांती । लपविली श्रीपांडुरंग मूर्ती । देउळाची मसीद निश्चितीं । अविंध करिती दुरात्मे ॥ १२ ॥ ऐसा वृत्तांत ऐकोनि कानीं । सद्गदित जाहले तये क्षणीं । म्हणे आम्ही मृत्युलोकासि येऊनी । सत्कीर्ति जनीं न केली ॥ १३ ॥ अविंधें देउळ मोडिलें जाण । तरी जीर्णोद्धार करावा आपण । इतुका हव्यास धरूनि मनें । म्हणे सत्वर गमन करावें ॥ १४ ॥ ऐसें म्हणवोनि ते समयीं । बोलाविले शिष्य संप्रदायी । म्हणे वेदरासि चलावें लवलाहीं । चरित्र कांहीं पाहावया ॥ १५ ॥ आज्ञा करितांचि तये वेळे । सिद्ध जाहले साधक सकळ । आणिकही इतर लोकपाल । चालती तत्काळ समागमे ॥१६॥ गरुड टके निशाण भेरी । माहिमोर्तब पताका भरजरी । टाळ मृदंगांचे गजरीं । नाद अंबरीं[२] कोंदला ॥ १७ ॥ विठ्ठलनामाचा करोनि घोष । कीर्तन करिती वैष्णवदास । नादब्रह्मचि आलें मुसे । त्या सुखास पार नाहीं ॥ १८ ॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । चांगदेव निघाले तत्काळीं । खेळीमेळीं वैष्णवांच्या ॥ १९ ॥ मार्गीं चालतां निजप्रितीं । ब्रह्मानंदें कीर्तन करिती । गांवोगांवींचे लोक ऐकती । तरी उद्धारगती त्यां होय ॥२०॥ चांगदेव सिद्धयोगी पूर्ण । ऐसें जाणती सर्वत्र जन । सन्निध आलिया ऐकून । सामोरे धांवून लोक येती ॥२१॥ पूजा पुरस्कार नानारीतीं । शिधा साहित्य समर्पिती । जे जे मनीं नवस कल्पिती । तरी मनोरथ पुरती तयांचें ॥ २२ ॥ जैसी गंगा समुद्रासि जाती । तीरींचे गांव ते उद्धरती । स्नानें दानें जीवन सेविती । तरी पावन होती अनासायें ॥२३॥ तेवीं अविंधासि दाखवावया प्रचीत ।

१ मुसलमान. २ आकाशांत.

बेदरासि चालिले वैष्णव भक्त । मार्गींचे लोक दर्शनासि येत । भुक्ति मुक्ति लाधत त्यांलागीं ॥ २४ ॥ संतीं वसविले जे गांव । त्या क्षेत्रासि वैकुंठ नांव । तेथिंचे पाषाण गोटे सर्व । तेही देव म्हणावे ॥२५॥ श्रोतयांसि विनवी महीपती । सादर असोत श्रवणार्थी । जे गांवीं वस्ती केली भक्तीं । विख्यात त्रिजगतीं ते झाले ॥ २६ ॥ लोहदंड क्षेत्रामाजी जाण । पुंडलीक नसता जरी निर्माण । तरी पंढरीस वैकुंठ म्हणते कोण । विचारोन पहा पां ॥ २७ ॥ कुग्राम वस्ती अळंकापूर । तेथें अवतरलें श्रीज्ञानेश्वर । म्हणवोनि कार्तिक मासीं साचार । यात्रा फार भरते तेथें ॥ २८ ॥ पुण्यस्तंभ गोदातीर निश्चित । चांगदेवें वस्ती धरिली तेथें । म्हणवोनि आषाढ शुद्ध एकदशीतें । समुदाय मिळत ते ठायीं ॥२९॥ देहुग्राम दिसतें लहान । ते स्थळीं तुकयाचा अवतार जाण । म्हणवोनि पंधरा दिवसां हरिदिनी[१] कारणें । वैष्णव जन तेथें येती ॥३०॥ बोधला कुणबी वैष्णव निर्द्धारीं । अवतरला जो धरणीवरी । त्याणें धामणगांवाची केली पंढरी । चराचरीं हे वार्ता ॥ ३१ ॥ म्हणवोनि संतीं वसविले जे गांव । तयांसीच वैकुंठ ऐसें नांव । हें भाविक जाणती अनुभव । इतरांसि ठाव पडेना ॥ ३२ ॥ कलियुगीं महा तीर्थें सर्वही । लोकांच्या दुरितें भयभीत जीवीं । मागुती वैष्णवाचें गांवीं । वस्ती बरवी केली असे ॥ ३३ ॥ सरिता वोहळ वापीजीवनीं । कूप अथवा टांक्याचें पाणी । संत राहतील ज्या ठिकाणीं । तीर्थांसि अनुदिनीं तो ठाव ॥ ३४ ॥ संतांपासी विघ्न नये । आलें तरी निरसोनि जाय । सुदर्शन घेऊनि लवलाहें । रक्षी तो ठाय श्रीहरी ॥ ३५ ॥ ऐसा अनुपम त्यांचा महिमा । निरुपमासि कैंची उपमा । जिहीं चित्तीं धरोनि भक्ति प्रेमा । पुरुषोत्तमा वश्य केलें ॥ ३६ ॥ भक्तासि संकट पडतांचि जाण । निर्गुण देव तो होतसे सगुण । तत्काळ अरिष्ट निरसोन । रक्षी निर्विघ्न दासासी ॥३७॥ यास्तव देव भक्त एकचित्तें । समरस असती आपुल्या मतें । या देवाच्या आज्ञेनें निश्चित । चांगदेव जात बेदरा ॥३८॥ कानीं ऐकूनियां सत्कीर्ती । दर्शनासि मार्गींचे लोक येती । नमस्कार करोनियां प्रीती । पूजा समर्पिती सद्भावें ॥ ३९ ॥ शिधा साहित्य संतोष मनें । देऊनि ऐकती हरि कीर्तनें । भक्तीसी लाविले सकळ जन । खेळ तेही लीन होताती ॥ ४० ॥ जो जे कामना धरींत चित्तीं । त्याचे मनोरथ पूर्ण होती । पंथ क्रमितां ऐशा रीती । तों चरित्र ख्याती काय झाली ॥ ४१ ॥ मार्गीं चालतां साचार । वाटेसि होते एक नगर । सकळ जंगमांचा महंत थोर । वसे निरंतर ते ठायीं ॥ ४२ ॥ तो नाना साबरी मंत्र शिकोन । कपट विद्येंत जाहला निपुण । ज्याच्या गुरूनें आसन भारून । त्या कारणें दीधलें ॥ ४३ ॥ कोणी सत्पुरुष घरासि आलिया । बैसावयासि देतसे तया । आसन अवचित उलटूनियां । उपरांडूनियां पाडीतसे ॥ ४४ ॥ शिष्यां साहित आपण ते वेळीं । हांसोनि करीत एकदा आरोळी । ऐसी बहुतांची छळणा केली । मग चंद्रमौळी[४] कोपला ॥ ४५ ॥ जैसा शिववरें[३] मातला रावण । मग उन्मत्तपणें करी सीताहरण । मग मारुतीच्या रूपें

१ पुणतांबे गांव. २ एकादशीचे दिवशीं, ३ दुष्ट. ४ शंकर.

कैलास रमण । दशानन विटंबिला ॥ ४६ ॥ मल्लिकार्जुन जंगम देख । असे शिवाचा उपासक । परी कपट विद्येचेनि सुखें । छळिले अनेक संत साधु ॥ ४७ ॥ हें चांगदेवें जाणोनि साचार । त्याच मार्गे चालिले सत्वर । म्हणती त्याचा गर्वाचा परिहार । श्रीविश्वंभर करील कीं ॥ ४८ ॥ चांगदेवाची सत्कीर्ति श्रवणीं । जंगमासि येऊनि सांगती कोणी । म्हणती साधूनि अमृत संजवनी । विष्णुदास जनीं फिरतसे ॥४९॥ शिष्य संप्रदायी घेऊनि बहुत । बेदर नगरासि जाती त्वरीत । जंगमानें ऐकूनि हे मात । मग संतापत मानसीं ॥५०॥ उदयासि येतां रोहिणीकांत¹ । तस्करं² जळती मनांत । कां धर्माची कीर्ति ऐकूनि बहुत । कपट योजित दुर्योधन ॥५१॥ तेवीं चांगयाची सत्कीर्ति ऐकोन । चित्तीं संतापला तो दुर्जन । तयाचे मठीं होता श्वान । त्याचें नामाभिधान पालटी ॥५२॥ चांगदेव म्हणवोनि कुतऱ्याप्रती । बोलावितसे दुर्मती । हें योगेश्वर जाणोनि चित्तीं । येत मठाप्रती तयाच्या ॥ ५३ ॥ टाळ मृदंग विणे सुस्वर । दिंड्या पताकांचे भार । कीर्तन करित वैष्णव वीर । नादें अंबरं³ कोंदलें ॥ ५४ ॥ तो घोष कानीं ऐकूनियां । चित्तीं संतापत असे अय्या । जेवीं विष्णुस्मरण कानीं पडिलिया । पिशाच भयाभीत होतीं ॥ ५५ ॥ गारुडियाची विद्या नाहीं बहुत । परी विरुदें सर्वांगीं वागवित । विंचवाचे आंगीं विष किंचित । परी नांगी धरित खांद्यावरी ॥ ५६ ॥ तेवीं सावरी मंत्रांचेनि बळें । जंगम फुगला तये वेळे । चांगदेव आलियाही जवळ । नमन खळें⁴ तो करीना ॥ ५७ ॥ आदरें मारावा तो दुर्जन । ऐसे जाणती वैष्णव जन । चांगदेव अय्यासि म्हणे शरण । अहंता दुर्गुण टाकूनियां ॥ ५८ ॥ ऐसें जाणोनि दुराचारी । आसन देतसे निज करीं । स्वमुखें म्हणे ते अवसरीं । बैसा यावरी सत्वर ॥ ५९ ॥ चांगदेव उमजले मानसीं । म्हणती याणें अपमानिलें बहुतांसी । आसन देऊनि बैसावयासी । तोंडघसीं पाडीतसे ॥ ६० ॥ आम्ही पांडुरंगाचे म्हणवितों भक्त । कळिकाळ तेही झाले अंकीत । कांहीं चमत्कार⁵ दाखऊनि यातें । गर्वरहित करावा ॥ ६१ ॥ ऐसें कल्पोनि ते अवसरीं । विभूति फुंकिली आसनावरी । तंव तें आकाशामाजी अधांत्री । वरिच्या वरी जळतसे ॥ ६२ ॥ हें जंगमा देखूनि नयनीं । गडबडां लोळों लागला धरणीं । म्हणे आसनाचेनि बळें करूनी । महत्त्व जनीं भोगीतसे ॥६३॥ तें जळोनि जातां ये अवसरीं । पोट भरेल कैशापरी । मग चांगदेवासि नमस्कारी । मधुरोत्तरीं बोलतसे ॥ ६४ ॥ म्हणे हें गुरुप्रसादाचें आसन । दैवें लाधलें मजकारणें । सर्वथा यासि न लावी अग्न । म्हणवोनि चरण धरियेले ॥ ६५ ॥ जैसा खदिरांगार निर्धारीं । आरक्त दिसतसे आंधारीं । सूर्यकिरण पडतांचि वरी । कोळशाचेपरी होतसे ॥ ६६ ॥ तेवीं कृत्रिम विद्येचा अभिमान । जल्पत होता मल्लिकार्जुन । चांगयाचें सामर्थ्य देखोन । झालासे लीन तत्काळ ॥ ६७ ॥ योगेश्वराचे धरोनि चरण । म्हणे सर्वथा जाळूं नको आसन । ऐसी त्याची ग्लानि ऐकोन । करिती विंदान काय तेव्हां ॥६८॥ विभूति फुंकोनि ते वेळीं । आसन पाडिलें

१ चंद्र. २ चोर. ३ आकाश. ४ दुष्ट. ५ चमत्कार.

भूमंडळीं । अग्नि विझाविला तत्काळीं । होचि नव्हाळी अनुपम ॥६९॥ तंव अय्या म्हणतसे योगेश्वरा । माझा आश्रम पवित्र करा । स्वयंपाक करूनि ये अवसरा । भोजन सारा मठांत ॥७०॥ जाणोनि पुढिला कार्यार्थ । अवश्य म्हणे विष्णुभक्त । जंगमें संप्रदायासि सांगोनि तेथ । शिधा साहित्य देवविलें ॥७१॥ चांगदेव म्हणोनि नामाभिधान । ज्या श्वानासि वाहत होता दुर्जन । मग शिष्यांसि लवलाही सांगोन । ठेवीत लपवोन तळघरीं ॥७२॥ म्हणे यासि कळता लवलाहीं । आणिक विंदान करील कांहीं । ऐसें भय पावोनि जीवीं । श्वान ते समयीं लपविले ॥७३॥ चांगदे[1] म्हणती आय्यातें । तुम्हीही स्वयंपाक करावा त्वरित । एका पंक्तीस यावें येथें । अवश्य म्हणता मल्लिकार्जुन ॥७४॥ दोहोंकडील पाक निष्पत्ती । सिद्ध होतां यथास्थिती । चांगदेव नैवेद्य वैश्वदेव करिती । पात्रें वाढिती आचारी ॥ ७५ ॥ पंचै[2] शतैं जंगम लिंगाईत । अय्याचे पंक्तीस भोजना येत । चांगयाच्या समागमे सहस्रावर । यात्रा निश्चित पैं असे ॥७६॥ स्वयंपाक होतांचि दोहींकडे । पंक्ती बैसल्या निज निवाडे । जीव मात्रासि वाढितील कोडें । पशुपक्ष्यांसि ठेविलें अन्न तेव्हां ॥७७॥ चांगदेव अय्यासि बोलत वाचा । नैवेद्य वैश्वदेव जाहला आमुचा । आतां शिव सोडूनि दंडींचा । प्रारंभ पूजेचा तुम्ही करा ॥७८॥ अवश्य म्हणोनि लिंगाईत । वस्त्रें सोडूनि पाहती समस्त । तों एकाचेंही लिंग नाहीं तेथें । आश्चर्य करिती मग तेव्हां ॥७९॥ मग मल्लिकार्जुन गुरूसि त्वरित । येऊनि सांगती वृत्तांत । म्हणती आम्हांवर क्षोभोनि निश्चित । कैलासनाथ पळाला ॥ ८० ॥ मूर्ति बैसल्या पांच शत । परी लिंग नसेचि कोणांत । हा तों अघटित वृत्तांत । सद्गुरु समर्थ सांगिजे ॥ ८१ ॥ मल्लिकार्जुन म्हणे गेलिया शिव । तुम्हीं कासया ठेवीला जीव । शास्त्री ऐसाचि असे भाव । तरी प्राण सर्वीं द्यावा आतां ॥ ८२ ॥ शिष्य म्हणती सद्गुरुनाथा । आम्हांसि शास्त्र निर्णय सांगतां । तुम्हीं आपुलें लिंग पाहा आतां । वल्गना वृथा न करावी ॥ ८३ ॥ दुसऱ्यासि सांगोनि ब्रह्मज्ञान । जो आड मार्ग चाले आपण । तो ऐहिक परत्रांसि मुकोन । रौरवं पूर्ण भोगीतसे ॥८४॥ मल्लिकार्जुन वस्त्र सोडून पहात । तों लिंग दिसे रुमालांत । मग मनीं होऊनि परम लज्जित । विनंती करीत चांगदेव ॥ ८५ ॥ त्या मंडळी सहित आपण । सत्वर करावें भोजन । आम्हांवरी क्षोभोनि पार्वतीरमण । कैलासभुवन पावला ॥ ८६ ॥ ऐकोनि म्हणती योगेश्वर । तुम्हां पासूनि पडिलें अंतर । मठांतील कोणी जीव मात्र । क्षुधातुर ठेऊं नये ॥८७॥ चांगया श्वान तुमचें घरीं । अखंड बैसत होता द्वारीं । तयासि लपविलें तळघरीं । यास्तव स्मरारी कोपला ॥८८॥ लिंग रूप धरित्री हे समस्त । शिव रूप हें विश्व दिसत । तरी लपवोनि ठेवितां श्वानातें । कारण कोणतें मज सांगावें ॥८९॥ चांगया श्वान चोरटा थोर । त्याणेंचि गिळिलीं लिंगें समग्र । तयासी काढावें बाहेर । इतुकें उत्तर बोलिले ॥ ९० ॥ ऐकोनि चांगदेवाचे वाणी । लिंगाईत विस्मित झाले मनीं । म्हणती अंतरसाक्ष हा वैष्णवमुनी । चक्रपाणी अवतरला ॥९१॥ मग तळघरांतून सत्वर । श्वानासि आणिती बाहेर । केशवदास येऊनि सत्वर । त्यासी उत्तर बोलती ॥९२॥

१ . २ पाचशे. ३ नर क.

शिष्यासहित हा महंत । जाहला असे लिंगारहित । तीं तुवां गिळलीं असती निश्चित । चांगया त्वरित ती देईं ॥ ९३ ॥ ऐसी ऐकतांचि मात । कौतुक वर्तलें अद्भुत । श्वानानें मुख करूनि वरुतें । लिंगें समस्त वोकिला ॥ ९४ ॥ हें कौतुक देखोनि अत्यद्भुत । लिंगाईत अवघे झाले लज्जित । मग ते आपुलालीं लिंगें ओळखुनि घेत । नमस्कारित चांगदेवा ॥ ९५ ॥ म्हणती लीला अवतारी तूं वैष्णव पूर्ण । आमुचें केलें गर्वहरण । लिंगें गिळोनि वोकिली श्वानें । अत्यद्भुत विंदानें दाखविलें ॥ ९६ ॥ ऐशापरी करोनि स्तुती । मग शिवपूजा जंगम करिती । आधींच पात्रें वाढिली होतीं । मग नैवेद्य दाखविती सकळिक ॥ ९७ ॥ ध्यानांत आणूनि पांडुरंग मूर्ती । चांगदेव संकल्प सोडती । भोक्ता विश्वंभर वैकुंठपती । प्राणाहुती घेतलिया ॥ ९८ ॥ जें जें जयासि रुचे जैसें । पात्रीं वाढून आणिती तैसें । पशु पक्षि पिपीलिकांस । अन्न सर्वांस वाढिलें ॥ ९९ ॥ उभयतां महंत एके पंक्तीं । मंडळी साहित तृप्त होती । कर शुद्धी घेतां समस्तीं । आसनीं बैसती चांगदेव ॥ १०० ॥ जंगमें विडे आणूनि सत्वर । सकळांसि देतसे आपुल्या करें । बुका तुळसी घालूनि हार । योगेश्वर पूजिला ॥ १ ॥ चांगदेव म्हणती मल्लिकार्जुना । आम्हांसि जाणें बेदर पट्टणा । आतां सावध होऊनि आपुल्या मना । कोणाची छळणा न करावी ॥ २ ॥ आपुलें आंगीं महंतपण । आलिया सर्वांसि लीन होणें । एकात्मता भूतीं पाहणें । तरीच धन्य संसारीं ॥ ३ ॥ भूत मात्रीं अन्नदान । देऊनि करावें क्षुधाहरण । मी दाता हा गर्व वाहणें । तरीच धन्य संसारीं ॥ ४ ॥ शिष्य करिती आपुलें सेवन । परी तयांसि मानिजे देवा समान । पूज्य पूजक नसावी आठवण । तरीच धन्य संसारीं ॥ ५ ॥ संसारिक पाळिती आपुलें वचन । तरी आशीर्वाद द्यावें त्यां लागुन । सर्वथा शापोत्तर न बोलणें । तरीच धन्य संसारीं ॥ ६ ॥ ऐसी चांगयाची वचनोक्ती । ऐकोनि अय्या संतोष चित्तीं । म्हणे स्वामींनीं सांगीतली जैसी रीती । तैसेची स्थितीं वर्तेन मी ॥ ७ ॥ परी मजवर असावा कृपाकर । ऐसेंच इच्छितों निरंतर । ऐसें बोलोनियां उत्तर । मग चरणांवर लोटला ॥ ८ ॥ चांगदेव उठोनि लवलाहीं । उचलूनि मल्लिकार्जुन धरिला हृदयीं । निरोप मागोनि ते समयीं । बेदरासि सर्वही चालिले ॥ ९ ॥ सत्समागमाचा महिमा । खळासि तत्काळ येतसे प्रेमा । निरुपमासि कैचीं उपमा । जिहीं पुरुषोत्तमा वश केले ॥ ११० ॥ संत तेचि देव जाण । दोघांत नाहीं भेदभाव । सावध करावयासि जन । झाले सगुण अवतारी ॥ ११ ॥ राज्यमदें अविंध खळ । उन्मत्त जाहला अज्ञान बाळ । विध्वंसिलें पंढरीचें देउळ । मसीद तत्काळ ते केली ॥ १२ ॥ त्याचा गर्व हरावयासि पाहीं । चांगदेव चालिले तये ठायीं । बेदरासि आले मध्यान्ह समयीं । तेथें सरोवराचे ठायीं उतरले ॥ १३ ॥ स्नान संध्या करोनि तेथें । नित्य नेम सारिले समस्त । उपहार करोनि किंचित । मग प्रारंभ करीत कीर्तनासी ॥ १४ ॥ दिंड्या पताका उभारोनि सत्वरी । टाळ विणे मृदंग मेळविती सुस्वरी । कीर्तन मांडिलें ते अवसरीं । सप्रेम गजरीं नामाच्या ॥ १५ ॥ कृष्ण विष्णु

१ ओकला. २ कौतुक. ३ मुंग्या.

हरि गोविंदा । अच्युतानंत आनंदकंदा । परम पुरुष सच्चिदानंदा । श्रीमुकुंदा जगद्गुरू ॥ १६ ॥ ऐशा रीतीं करोनि स्तुति । गुण चरित्रें वैष्णव गातीं । ब्रह्मानंद सोहाळा ते क्षितीं । लोक मिळती ऐकावया ॥ १७ ॥ चांगयाच्या समागमें फार । यात्रा असे सहस्रावर । आणिक नगरवासी भाविक नर । मिळाले समग्र ते ठायीं ॥ १८ ॥ टाळ विणे मृदंग घोष । नादब्रह्म कोंदला रस । कीर्तन ऐकतां श्रोतयांस । प्रेम उल्हास अंतरीं ॥ १९ ॥ तों राजद्वारींचा जोशी सज्ञान । परम भाविक वैष्णव जन । अकस्मात तेथें येऊन । केलें नमन चांगदेवा ॥ १२० ॥ कीर्तन जाहलें एक प्रहर । तोंवरी तेथें बैसला स्थिर । मग आरती म्हणोनि वैष्णवीरें । रुक्मिणीरमण वोवाळिला ॥ २१ ॥ प्रसाद वाटोनि खिरापति । चांगदेव आसनीं स्वस्थ बैसती । तंव जोशी म्हणतसे तयाप्रती । माझी विनंति अवधारा ॥ २२ ॥ अविंध[१] राजा बेदर पट्टणीं । अति उन्मत्त कुलक्षणी । त्याणें देवस्थानें बहुत मोडूनी । मसीदी रचोनी ठेविल्या ॥ २३ ॥ श्रीहरि कथा पुराण श्रवण । देखोनि वैष्णवासी करी दंडण । हिंदुधर्म सकळ मोडून । अपसव्य तेणें स्थापिला ॥ २४ ॥ श्रीपांडुरंगाचेंही देऊळ । मोडूनि मसीद बांधिली खळें । तेथें कोणाचेंचि न चले बळ । मग देव तत्काळ लपविला ॥ २५ ॥ हा तुम्हांसि वृत्तांत असेल विदित । तरी या स्थळीं यावयाचें नाहीं उचित । राजयासि कळतां वृत्तांत । विटंबना बहुत करील तो ॥ २६ ॥ यवनाचें आज्ञेनें ये ठिकाणीं । मृदंग ढोल न वाजविती कोणी । आणि तुमचें दंभ देखता नयनीं । संताप मनीं वाटेल ॥ २७ ॥ बेदराचिया सन्निध येतां । तुम्हांसि उपद्रव केला असतां । परी रायासि दुःख जाहलें तत्वता । यास्तव चिंताक्रांत मनीं ॥ २८ ॥ वार्ता ऐकोनि ऐसी । चांगदेव पुसती जोशियासी । काय दुःख जाहलें रायासी । तें साकल्य आम्हांसी सांगावें ॥ २९ ॥ ब्राह्मण म्हणे ते अवसरीं । रायाची आवडती कांता सुंदरी । तीस सर्प डसलियावरी । उदंड धन्वंतरी आणिले ॥ १३० ॥ परी कोणाचा उपाय नचले निश्चित । प्राण जाऊन पडलें प्रेत । मग पोट चिरोनि त्वरित । सुगंध द्रव्यें आंत भरियेली ॥ ३१ ॥ डोलींत प्रेत घालूनि सत्वर । उदईक रोजास[२] पाठविणार । यास्तव राजा चिंतातुर । गेलें प्रीतिपात्र तयाचें ॥३२॥ ऐसा वृत्तांत ऐकोनि श्रवणीं । चांगदेव म्हणती तये क्षणीं । तुम्ही रायासि सांगा जाऊनि । प्रेत उठवून मी देतों ॥ ३३ ॥ जो पांडुरंग कैवल्यदानी । षड्गुण ऐश्वर्याची खाणी । त्याणें मज प्रसन्न होऊनी । संजीवनी मंत्र दीधला ॥ ३४ ॥ त्याच्या सामर्थ्यें करूनि निश्चित । मृत प्रेतही होईल जिवंत । तुम्हीं रायासि सांगीजे वृत्तांत । कीं आला विष्णुभक्त ये ठायीं ॥३५॥ ऐसें वदतांचि योगेश्वर । संतोषला तो द्विजवर । मग राजद्वारासि जाऊनि सत्वर । सकळ समाचार सांगतसे ॥ ३६ ॥ म्हणे भाग्य तुझें अति विशेष । म्हणोनि पातला सिद्ध पुरुष । चौदाशें वर्षें जाहली त्यास । परी तो काळास नागवे ॥ ३७ ॥ आजि दैवयोगें अकस्मात जाण । ये स्थळीं तयासि झालें येणें । मृत प्रेत उठवितों म्हणोन । मजसी वचन बोलला

[१] मुसलमान. [२] दिवशी.

॥ ३८ ॥ राजा म्हणे ब्राह्मणासी । त्याजला आणावें आम्हांपासीं । जरी माझी स्त्री उठवितां त्यांसी । तरी मागेल तें त्यासी देऊं ॥ ३९ ॥ ऐसें सांगताचि नृपवर । तेथूनि निघाला द्विजवर । चांगयापासीं येऊनि सत्वर । करीत नमस्कार सद्भावें ॥ १४० ॥ वृत्तांत सांगोनि सत्वरी । म्हणे स्वामी चलावें तेथवरी । चांगदेव निघाले सहपरिवारीं । कीर्तन गजरीं डुल्लती ॥ ४१ ॥ टाळ विणे मृदंग सुस्वरें । वैष्णव गाती विष्णु चरित्रें । नाद घोषें कोंदलें अंबर । जयजयकार करिताती ॥४२॥ ऐशा रीतीं ते अवसरीं । चांगदेव पातले राजद्वारीं । रायें सन्मान केला नानापरी । नमस्कार न करी सर्वथा ॥४३॥ म्हणे हा तों हिंदु फकीर निश्चित । दांभिक ढोंग दिसतें बहुत । कैसें उठवील मृत प्रेत । संशय वाटत मानसीं ॥ ४४ ॥ ऐसें जाणोनि चांगदेव । म्हणे आम्ही निधडे भक्त वैष्णव । आणि नमस्कार न करितां राव । तरी कैसा देव यासि पावे ॥४५॥ सर्वोपचारें पुजिला ईश्वर । आणि शेवटीं न केला नमस्कार । तरी संतुष्ट न होय रुक्मिणीवर । शास्त्री विचार हा असे ॥४६॥ योगयाग पूजा अर्चन । कांहींच न घडे ज्या कारणें । आणि एक सद्भावें केलें नमन । तरीं अवघींच पुण्यें त्यांत आलीं ॥४७॥ स्नान संध्या आणि तर्पण । वेदाध्ययन पुराण श्रवण । न घडतां करी देवासि नमन । तरी अवघींच पुण्यें त्यांत आलीं ॥४८॥ तीर्थें व्रतें सत्पात्रीं दान । अनुकूळ नव्हेचि आपणा कारणें । आणि अहंता टाकूनि करितां नमन । तरी अवघींच पुण्यें त्यांत आलीं ॥४९॥ नमन हेंचि साधन अपूर्व । नमनें कळो येतसे भाव । नमन हाचि सुगम उपाय । देवाधिदेव प्राप्तीसी ॥ १५० ॥ नमनासी कांहींच खर्च नसे । दुर्बळा अनाथा अनुकूळ असे । नमना येव्हडें पुण्यचि नसे । करितसे नाश अहंतेचा[1] ॥ ५१ ॥ सद्गुरु उपदेश घेतां जाण । अर्पिजें तनु मन आणि धन । शेवटीं न करितां साष्टांग नमन । तरी व्यर्थचि साधन तें जाय ॥५२॥ नमनावीण न जोडे भक्ती । नमनावीण न घडेचि मुक्ती । ऐसें असतां यवन दुर्मती । अहंता चित्तीं धरीतसे ॥ ५३ ॥ तरी याचा भाव बैसेल जेणें । आणि वैष्णव मंडळीस करील नमन । ऐसें दाखवावे विंदान । तरीच कल्याण होय यासी ॥ ५४ ॥ ऐसें म्हणोनि योगिनाथ । अधांत्रींच घातला हात । मूठभर घेऊनि विभूत । आपले मंडळींस लावितसें ॥ ५५ ॥ तों कौतुक वर्तले ते अवसरीं । तें सादर ऐकिजे भक्त चतुरीं । भस्म उधळितां सर्वांवरी । तों रूप सत्वरीं पालटलें ॥ ५६ ॥ चांगदेव मंडळीसह परिवार । हिंदूसि दिसती वैष्णव वीर । आणि यवन राजाच्या दृष्टी समोर । पीर पैगंबर भासती ॥ ५७ ॥ जैसा लीलावतारी श्रीकृष्ण । यशोदेसि वाटे बालक तान्हे । आणि राधेसि दिसे पुरुष तरुण । जैसा कां मदन या रीतीं ॥ ५८ ॥ नातरीं परब्रह्म म्हणितले वेदांतीं । ते भक्तासि दिसे सगुण मूर्ती । ज्ञानियांसि निर्गुण भासे चित्तीं । द्विविध आकृती होतसे ॥ ५९ ॥ तैशाच रीतीं चांगदेव । हिंदूंसि भासती वैष्णव । आणि यवनासि दिसती पैगंबर सर्व । हेंचि अपूर्व मज वाटे ॥१६०॥ मग राजा अनुतापोनि[2] चित्तांत । म्हणे हें आमुचें कुळदैवत । म्हणोनि साष्टांग दंडवत । चांगयासि घालित निजप्रीतीं ॥ ६१ ॥ मग


१ अहंकाराचा. २ पश्चात्ताप पावून.

रायासि म्हणती तये क्षणीं । प्रसन्न जाहलों लागुनी । काय इच्छा असेल मनीं । ते यात्र क्षणीं सांगावी ॥६२॥ परोकारार्थ निश्चितीं । मी विष्णुभक्त अवतरलों क्षितीं[1] । काय कामना असेल चित्तीं । ते सत्वरगती सांग पा ॥६३॥ ऐसें पुसतां योगेश्वर । राजा विनवीत जोडूनि कर । माझी कांता पावली परत्रें[2] । ते उठवीं सत्वर स्वामिया ॥६४॥ आवडती ज्येष्ठ पत्नी निश्चित । सर्प डसतां पावली मृत्य । आंतडी काढोनि झांकिलें प्रेत । सुगंध पोटांत भरोनियां ॥६५॥ तेव्हडी जिववाल ये अवसरीं । तरी मी सुखसंपन्न संसारीं । ऐसे म्हणोनि चरण धरी । ग्लांती करी नृपनाथा ॥६६॥ मागें प्रसन्न होऊनि रुक्मिणीवर । संजीवनी दीधला मंत्र । तो उच्चारूनि योगेश्वर । विभूति सत्वर दे राया ॥६७॥ म्हणे हें भस्म प्रेताचें भाळीं । लावोनि सर्वांगासि चोळी । श्रीहरि कृपेनें ये वेळीं । उठोनि तत्काळीं बैसेल ॥ ६८ ॥ राजा उठोनि लवलाहीं । सत्वर गेला अंतर गृहीं । प्रेताच्या सर्वांगासि लावी । तों अपूर्व कांहीं वर्तलें ॥ ६९ ॥ एकाएकीं हाक देऊनी । उठोनि बैसे राजपत्नी । यवन बुझावीत तिज लागुनी । परी भ्रमिष्ट मनीं न बोले ॥ १७० ॥ जिवंत जाहली हें समाधान । भ्रमिष्ट म्हणोनि उद्विग्न मन । ऐसा दुश्चित्त तो यवन । चांगयासि येवोन सांगतसे ॥ ७१ ॥ म्हणे प्रेतांत संचारला प्राण । परी सर्वथा नसे देहभान । यासि उपाय करावा कवण । कृपा करून मज सांगा ॥ ७२ ॥ मग चांगदेव रायासि बोलती वचन । तिजला पुसा ऐसें जाऊन । कीं इच्छित मागावें वरदान । तें मी पुरवीन निश्चित ॥७३॥ ऐसें सांगतां योगेश्वर । राजा पुढती जाय मंदिरां । मंचकावरी बैसली दारा[3] । तिसी सत्वर पुसतसे ॥७४॥ म्हणे काय इच्छा असेल मनीं । ते मी पुरवीन येच क्षणीं । भ्रताराचें वचन ऐकूनि कानीं । सावध होऊनी बोलतसे ॥ ७५ ॥ म्हणे माझे जेणें परतविले प्राण । त्यासी अनन्यभावें जाईन शरण । ते जें मागतील तें सत्वर देणें । तरी वाचेन मी आतां ॥ ७६ ॥ कांतेचें वचन ऐकूनि देख । रायें तत्काळ दीधली भाक । मग येवोनि चांगदेवा सम्यक । नमस्कार सुखें घालीतसे ॥ ७७ ॥ म्हणें पूर्ववत सावध झाली कांता । जे इच्छा असेल तें मागिजे आतां । तुम्हीं ईश्वरी अंश तत्वता । ऐसें समर्था मज कळले ॥ ७८ ॥ हिरे मुक्ताफळ रत्नें कांहीं । द्रव्य राशीही पुढें ठेवी । तव चांगदेव हांसोनि ते समयी । रायासि कायी बोलत ॥ ७९ ॥ आम्ही निरपेक्ष वैष्णव जन । द्रव्यराशी मृत्तिके समान । सर्व सिद्धी अनुकूळ पूर्ण । कांहींच उणें असेना ॥ १८० ॥ राजा म्हणे ये समयीं । आणिक आज्ञा करावी कांहीं । ऐकूनि वटेश्वर ते समयीं । उत्तर कायी करीतसे ॥ ८१ ॥ पुरातन क्षेत्र पंढरपूर । तेथें साक्षात असे इंदिरावर । बडवे तयाचे भुजावर । त्यांसी नानाप्रकारें छळिलें त्वां ॥ ८२ ॥ देवालय मोडोनि सत्वरी । मसीद बांधली महाद्वारीं । हिंदु धर्म वर्जूनि सत्वरी । अधर्म भारी वाढविला ॥ ८३ ॥ तुमचा तिकडील ठाणेदार । त्यासि आपुल्या हातें लिहावें पत्र । कीं मशीद मोडूनियां सत्वर । बांधिजे शिखर देवाचें ॥ ८४ ॥ ऐसें सांगतां विष्णु भक्त । लेखका हातीं पत्र लिहवित । आपुल्या मुद्रा करित । घालूनि

१ पृथ्वीवर. २ परलोक. ३ स्त्री, पत्नी.

शपत तया माजी ॥ ८५ ॥ आणिक पुढें यवन दुर्मती । क्षेत्रासि उपद्रव न करिती । ऐसे पत्रीं आपण लिहितां दुर्मती । लखोटा घेती चांगदेव ॥ ८६ ॥ बेदरींचे कारेगार चार शत । घेऊनि अघटित केली युक्त । सर्वांचे कपाळीं लावूनि विभूत । मग विहंगम पंथें चालिले ॥ ८७ ॥ दोन प्रहरां येतांचि दिनकर । पावले क्षेत्र पंढरपुर । विठ्ठल नामें गर्जोनि सत्वर । जयजयकार करिताती ॥ ८८ ॥ क्षेत्रींचे लोक ठायींठायीं । चिंतातुर होते आपुले जीवीं । तों अकस्मात भक्तविजयी । आला सर्वांही ऐकिलें ॥८९॥ म्हणती चांगदेवें दाखवूनि चमत्कार । यवना पासोनि आणिलें पत्र । कीं मसीद मोडोनि साचार । देवालय सत्वर करावें ॥ १९० ॥ ऐसी मात ऐकूनि कानीं । क्षेत्रवासी आनंदले मनीं । चांगयासि भेटती येऊनी । आनंद मनीं न समाय ॥ ९१ ॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । म्हणती चांगदेव महापुरुषार्थी बळी । जिंकिला कळिकाळ येणें ॥ ९२ ॥ पुढिले अध्यायीं कथासार । वदविता श्रीरुक्मिणीवर । महीपति ग्रंथाधारें । प्रमाद उत्तर लिहितसे ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृतग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । नवमोध्याय रसाळ हा ॥ १९४ ॥ अ० ॥ ९ ॥ ओव्या ॥ १९४ ॥ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥

अध्याय १०



श्रीगणेशाय नमः । श्रीपांडुरंगाय नमः । शोधीं वसुधा रसाचें निर्मळ । दिसे हरींचें मुखकमळ । सांवळी तनु अति निर्मळ । त्यावरी माळ वैजयंती ॥ १ ॥ गुरु शुक्र नक्षत्रें गगनीं । तैसी कुंडलें तळपती कानीं । पीतांबर दीप्तीं न समाय गगनीं । जेवीं सौदामिनी चमकत ॥ २ ॥ सुरेख भंवया विराजमान । कमळदळा ऐसे दिसती नयन । मंदस्मित जगज्जीवन । नासाग्रीं ध्यान ठेविलें ॥ ३ ॥ कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं । आजानुबाहु जगजेठी । वीर कंकणें मणगटीं । पाहतांचि दृष्टी निवतसे ॥ ४ ॥ सकळ ऐश्वर्याचें निधान । हृदयीं श्रीवत्सलांछन । त्रिवळीं पाहोनि विराजमान । भुलतसे मन इंदिरेचें ॥ ५ ॥ कटि सूत्रमाळा गांठीं । करकमळ तें शोभतें कटीं । ऐसें ध्यान पाहोनि दृष्टीं । चित्तीं धूर्जटी निवाला ॥६॥ ठाण साजिरें सुकुमार । सम पदें शोभती विटेवर । ते स्थळीं मन निरंतर । राहे साचार निजप्रीती ॥ ७॥ मागिले अध्यायीं कथा साजिरी । चांगदेव गेले होते बेदरीं । मृत प्रेत उठवुनि सत्वरीं । पंढरपुरीं मग आले ॥८॥ क्षेत्रवासी वृत्तांत कानीं । ऐकोनि संतोषले मनीं । मग चांगयासि भेटती येऊनी । प्रीती करोनि तेधवां ॥ ९ ॥ म्हणती तुम्हीं वैष्णववीर । दुष्टासि दाखवुनि चमत्कार । भक्तिपंथासि जीर्णोद्धार । करावया साचार अवतरले ॥१०॥ बेदराहुनि आणिलें पत्र । तें ग्रामाधिकारियांसि दाखविलें सत्वर । मग कामासि लावूनि बेलदार । मसीद सत्वर पाडिली ॥ ११ ॥ कारेगार लावूनि सत्वरीं । देवालय मांडिलें यंत्राकारीं । विळभर एक्या मनुष्यास मजुरी । होन मूठभरी देतसे ॥ १२ ॥ ऐकोनि आशंका धरली पोटीं । इतुकें द्रव्य कोठूनि वांटी । तरी सकळ सिद्धि तया निकटीं । सन्निध तिष्ठती तयाच्या ॥१३॥ ज्याणें कळिकाळासि ठकवूनि भलें । मेलें मनुष्य जिवंत केलें । त्याणें इतुकें द्रव्य कोठूनि वांटिलें । हे आशंका फोल न धरावी ॥१४॥ लघु शंका करिती गोरक्षनाथ । तेव्हां सोन्याचाच जाहला पर्वत । त्याणें पुंगी वाजवितांचि अकस्मात । चांगदेव तेथें निपजले ॥ १५ ॥ म्हणोनि सकळ सिद्धीचा रावो । तो हा वटेश्वर चांगदेवो । ज्याणें भक्ति भावें करूनि पहा हो । देवाधिदेवो वश्य केला ॥१६॥ सिद्धि लोलिंगता पाही । सर्वथा नावडे त्याचे जीवीं । परी देवकार्य साधावया पाहीं । अंगीकार तिहीं केला असे ॥ १७ ॥ श्रीविष्णुसहस्रनामांत जाण । भयकृत आणि भयनाशन । श्रीहरींचे नामाभिधान । द्वैपायन ठेविलें ॥१८॥ तें सत्य करावया निश्चितीं । देऊळ मोडाविलें अविंधा हातीं । मग चमत्कार दावूनि नानारीतीं । भक्ताप्रती यश दिधलें ॥१९॥ पुढील कार्यार्थ सर्व जाणोनी । चांगयासि भेटले कैवल्यदानी । मंत्र सांगितला संजीवनी । मग उठविली राणी रायाची ॥ २० ॥ तेणें संतोषोनि नृपवर । चांगदेवासि दीधलें पत्र । तेव्हां देउळासि कामाला लाविलें सत्वर । मसीद सत्वर पाडोनियां ॥ २१ ॥ दोन सहस्र मनुष्यें निश्चितीं । देऊळाच्या कामासि नित्य राबती । मग मावळोनि गेलिया गभस्ती । होन वांटिती चांगदेव ॥ २२ ॥ एक संवत्सर पर्यंत निर्धारीं । स्वतः राहिले पंढरपुरीं । देऊळ कळसासि गेलिया वरी । मुहूर्त विचारि ब्राह्मणां ॥ २३ ॥ म्हणती सुदिन पाहोनि सत्वर ।

१ वीज. २ सूर्य.

सिंहासनीं बैसवा रुक्मिणीवर । करील जड मूढांचा उद्धार । दर्शनमात्रें करूनियां ॥ २४ ॥ ऐकूनि ब्राह्मण काय बोलत । आजि कार्तिक दशमी सुदिन मुहूर्त । मूर्ति स्थापावी देऊळांत । ऐसें मनोगत सकळांचें ॥ २५ ॥ मग वडवे पुजारी समवेत । चांगदेव जाती तळघरांत । श्रीपांडुरंगमूर्ति देखोनि तेथ । साष्टांग प्रणिपात घालिती ॥ २६ ॥ दोन वर्षपर्यंत । अर्चन पूजा नसेचि तेथ । डोईस टोपी जीर्ण बहुत । धुळीनें माखत सर्वांग ॥२७॥ ठाण साजिरें सुकुमार । जघनीं ठेविले दोनी कर । कांसेसि वेष्टिलें एक धोतर । समपद विटेवर जगदात्मा ॥ २८ ॥ मजला भासे ऐशा रीतीं । योगी कैसे समाधि घेती । तो अनुभव पहावया निश्चितीं । भुयारांत श्रीपती बैसला ॥ २९ ॥ हें चांगदेवें देखोनि नयनीं । काय बोलिले तये क्षणीं । तूं देवाधिदेव कैवल्यदानी । सत्कीर्ति पुराणीं विख्यात ॥ ३० ॥ ऐसें असतां पंढरीराया । तळघरीं लपोनि बैससी कासया । पहावया निजभक्तांची चर्या । दाविसी माया ओडंवर ॥ ३१ ॥ समुद्रजळीं होऊनि मासा । शंखासुरासि घातला फांसा । तो तूं तळघरांत लपलासि कैसा । पंढरीशा नवल हें ॥३२॥ कांसव होऊनि जगजेठी । तुवां मंदराचळ धरिला पृष्ठीं । तो तूं यवनाचें भय वागवोनि पोटीं । लपतोसि संकटीं नवल हें ॥३३॥ वराह होऊनी एके अवसरीं[1] । दांतावरी धरिली वसुंधरा[2] । तो तूं भुयारांत लपालासि बरा । नवल अंतरा मज वाटे ॥३४॥ प्रल्हादें आठव करितां अंतरीं । स्तंभांत प्रगटलासि नरकेसरी । आतां कां लपालासि तळघरीं । नवल अंतरीं मज वाटे ॥ ३५ ॥ त्रिविक्रम होवोनि वनमाळी । बळीस घातलें पाताळीं । त्याहूनि बलिष्ठ दिसे कळी । नवल ये वेळीं मज वाटे ॥३६॥ तूं एकांग वीर परशुधरा । निःक्षत्रिय केली वसुंधरा । आतां यवनाच्या भयें लपालासि बरा । जगदुद्धारा नवल हें ॥ ३७ ॥ श्रीराम अवतार घेऊनि जाण । मारिलें रावण कुंभकर्ण । आतां तो प्रताप विसरोन । बैससी लपोन ये ठायीं ॥ ३८ ॥ होऊनि श्रीकृष्ण लीलावतारी । दैत्यदुष्ट मारिले भारी । आतां कलियुगा माझारीं । लपोनि तळघरीं बैसलासि कां ॥ ३९ ॥ तूं कळिकाळाचा शास्ता पूर्ण । हें पुराणप्रसिद्ध वचन । तें सामर्थ्य ठेविलें कोणा कारणें । हे जीवींची खुण सांगिजे ॥४०॥ ऐकोनि चांगयाची वचनोक्ती । हांसोनि बोले पांडुरंगमूर्ती । तुम्हां भक्तांची वाढवावया कीर्ती । केली असे युक्ती जाण पां ॥४१॥ पुढील भविष्य जाणोनियां । मी तुज भेटलों प्राणसखया । संजीवनी मंत्र सांगोनियां । केली असे छाया कृपेची ॥ ४२ ॥ मी कर्ता करविता जगन्निवास । हें तंव वचन साचाचि असे । दुर्बुद्धि देऊनि यवनास । अन्याय तयास घडविला ॥ ४३ ॥ मग सर्परूप धरोनियां निर्धारीं । डंखोनि मारिली त्याची नारी । तेथें तूं येतांचि धन्वंतरी । यश सत्वरी दीधलें ॥ ४४ ॥ मी तें निर्गुण निराकार । निष्कर्म निरुपचार । परी तुमची सत्कीर्ती व्हावया थोर । लपालों साचार ये ठायीं ॥ ४५ ॥ ऐसें बोलतां करुणामूर्ती । चांगयासि अनुभवें आली प्रतीती । आनंदाश्रु नेत्रीं वाहती । प्रेम चित्तीं कोंदलें[6] ॥ ४६ ॥

१ कमरेला. २ डुकर. ३ वेळी. ४ पृथ्वी. ५ खरे. ६ दाटलें.

मग मस्तक ठेवूनि चरणकमळीं । मूर्ति उचालिली तयेवेळीं । जयजयकारें पिटोनि टाळी । भक्त मंडळी गर्जतसे ॥ ४७ ॥ बाहेर मूर्ति आणिली जेव्हां । क्षेत्रवासी आनंदले तेव्हां । दर्शनाचा धरोनि हेवा । देवाधिदेवा विलोकिती ॥ ४८ ॥ सिंहासनीं बैसतां रुक्मिणीवर। बोभाट गेला दुरिच्या दुर । यात्रा मिळाली असे फार । करिती गजर नामघोषें ॥ ४९ ॥ चांगदेव म्हणती ते अवसरीं । मूर्ति नेऊनि भीमातीरीं । देवासि स्नान घाला सत्वरी । मानलें अंतरीं सर्वांच्या ॥ ५० ॥ सुखासनीं घालोनि मग । चंद्रभागेसि आणिला पांडुरंग । टाळविणे घेऊनि मृदंग । गाती अनुरागें हरिदास ॥ ५१ ॥ गरुड टके निशाण भेरी । वाद्यें वाजती मंगळतुरी । पताका फडकती नानापरी । नाद [1]अंबरीं कोंदला ॥ ५२ ॥ पुंडलीकापासीं नेऊनि मूर्ती । वेदोक्त मंत्रे स्नान घालिती । तों तीर्थें पुनीत व्हावयासि येती । चमत्कार देखती जनलोक ॥ ५३ ॥ एकाएकींच तये क्षणीं । चढलें चंद्रभागेसि पाणी । सागरीं लाट जाय निघोनी । तैसेंच ते क्षणीं वर्तलें ॥५४॥ वाळवंटीं यात्रा मिळाली जाण । तयांसि जाहलें सचैल स्नान । म्हणती धन्य आजिचा सुदिन । दुरितें संपूर्ण नासलीं ॥५५॥ देवासि स्नान घालूनि देखा । मग सव्य[2] घेतलें पुंडलीका । जो प्रेमळाचा प्रियोत्तम सखा । मिरवत निका मग नेती ॥ ५६ ॥ गुप्त रूपें अमरपती । विमानारूढ होऊनि येती । म्हणती पुण्यपावन हे क्षिती । येथें वैकुंठपती स्वयें आला ॥ ५७ ॥ ऐसें म्हणोनि वृंदारक । पुष्प वर्षाव करिती देख । कीर्तन मेळीं वैष्णव लोक । सप्रेम सुख भोगिती ॥ ५८ ॥ भेरी ठोकिती वाजंतरे । तेणें नादें कोंदलें अंबर । तंतवितंतघन सुस्वरें । हरिदास आदरें गाताती ॥ ५९ ॥ नटवे नृत्य करितां संगीत । तयां मार्गें मिरवतसे रथ । मंडप घसणी लोकांसि होत । परब्रह्म पाहती न्याहाळुनी ॥६०॥ म्हणती बाहेर आहे मोकळा जोंवर । दृष्टी भरोन पाहों तोंवर । सिंहासनी बैसलियावर । प्रयत्न फार मग लागे ॥ ६१ ॥ ऐसें म्हणोनि तये क्षणीं । फेडिती डोळ्यांचीं पारणीं । दृष्टीसीं देखोनि कैवल्यदानी । संतोष मनीं जनलोक ॥६२॥ महाद्वारासि ऐशारीतीं । मिरवत आणिला रुक्मिणापती । मग मूर्ती उचलोनि हातोहातीं । देउळाप्रती नेली असे ॥६३॥ सिंहासनी बैसवोनि जगज्जीवन । घालिती पंचामृत स्नान । दधिदुग्धांच्या कावडी भरून । उदंड जन आणिती ॥ ६४ ॥ तेणें शोभला हृषीकेशी । तरी त्याची उपमा देतसे त्यासी । श्रीहरि जागर पंढरीसी । कार्तिकमासीं होतसे ॥ ६५ ॥ आश्विनमासापासूनि जाण । कार्तिक दशमीपर्यंत पूर्ण । दुग्धें न्हाणिती जगज्जीवन । शोभायमान दिसे कैसा ॥ ६६ ॥ आकाशासि नीळिमा आंगिचा असे । त्यावरी शुभ्र चांदणें शोभतसे । दधि वोतितां जगन्निवास । तैसाचि दिसे मजलागीं ॥ ६७ ॥ असो आतां ते अवसरीं । अभिषेक करोनि देवावरी । वस्त्रें भूषणें नानापरी । लेवविती पुजारी निजांगें ॥६८॥ कासेसि दिव्य पीतांबर । रत्नखचित दिसे मुकुट सुंदर । कानीं कुंडलें मकराकर । शोभती हार पुष्पांचे ॥६९॥ भाळीं रेखिला केशरी टिळा । सर्वांगीं बुका उधळिला । गळां कमळ तुळसीच्या माळा । घनसांवळा लेतसे ॥७०॥ धूपदीप

१ आकाशांत. २ पायें. ३ उजवीकडे.

कापूर आरती । पक्कान्न नैवेद्य दाखविती । ब्राह्मण मंत्रघोष बोलती । पुष्पांजळी अर्पिती सद्भावें ॥ ७१ ॥ सत्यभामा राही रुक्मिण । त्यांचेंही ऐसेंच केलें पूजन । महाद्वारीं वैष्णव जन । आनंद कीर्तन करिताती ॥ ७२ ॥ तों गरुडपारीं सकळ ब्राह्मण । सोंवळ्यांत करोनि आले स्नान । मिष्टान्नें वाढिलीं त्यांजकारणें । जाहलीं भोजनें सकळांचीं ॥ ७३ ॥ विडे दक्षिणा सत्वर । चांगदेव देती आपुल्या करें । आणिक आपुल्या घरोघर । उत्सव थोर करिताती ॥ ७४ ॥ हळदी कुंकुमें वांटून । सुवासिनी देती वायनें । पंचारत्या करीं घेऊन । मूर्ति सगुण वोवाळिती ॥ ७५ ॥ स्थानभ्रष्ट होतां रामचंद्र । अयोध्येसि लोक चिंतातुर । मग विजयी होऊनि येतां रघुवीर । आनंद थोर त्यांसि झाला ॥ ७६ ॥ तेवीं सिंहासनीं बैसतां रुक्मिणीपती । क्षेत्रवासियां आनंद चित्तीं । घरोघरीं गुढियां उभारिती । साकरा वांटिती निजहस्तें ॥७७॥ अमावास्या प्रतिपदा साचार । निःशेष न दिसे रोहिणीवरें । मग द्वितीयेस निघतां किंचित कोर । त्यासि सर्वत्र लक्षिती ॥७८॥ तेवीं दोन संवत्सरें पर्यंत । पांडुरंग मूर्ति होती गुप्त। यास्तव लोकांसि आर्त बहुत । दर्शना येती निजप्रीतीं ॥७९॥ यावरी चांगदेवें साचार। क्षेत्रांत केला जीर्णोद्धार। म्हणती धन्य वैष्णव वीर। जगदुद्धारक अवतरला ॥ ८० ॥ एकदा रांउळांत जाऊनियां। सद्भावें नमिलें पंढरिराया। म्हणे आम्हांसि समाधि घ्यावया। कोणत्या ठायीं योजिलें॥ ८१ ॥ ऐकोनि म्हणे रुक्मिणीकांत । गोदातीर उत्तम बहुत । तेथें पुण्यस्तंभ क्षेत्रांत । समाधीस्थ तूं होसी ॥ ८२ ॥ आषाढ शुद्ध एकादशी । प्रतिवर्षी येईन त्या स्थळासी । ऐसें स्वमुखें हृषीकेशी । वर चांगयासि देत असे ॥ ८३ ॥ आणि तुझे संप्रदायी वंशीक होती । त्यांजला ऐसीच लावीं पद्धती । दिंड्या पताका घेऊनि हातीं । कार्तिकीस निश्चितीं येथें यावें ॥ ८४ ॥ आणि आषाढी दशमी माझारी । तेथें यात्रेसि येती नरनारी । आम्ही येऊं गोदातीरीं । तयांसि पंढरी घडेल ॥ ८५ ॥ ऐसा वर देतां श्रीपती । चांगया संतोषला चित्तीं ॥ मग दोघे शिष्य बोलावूनि प्रीतीं । किर्तन त्यां हातीं करविलें ॥ ८६ ॥ वरद पुत्र लवंड्यां प्रती । सद्गुरु स्वयें आज्ञा करिती । तुम्हीं कार्तिक शुद्ध एकादशीप्रती । अन्न शांती करावी ॥ ८७ ॥ सद्गुरु आज्ञा होतांचि निश्चित । अद्यापि तेंचि चालविती व्रत । जो गाईच्या अंबियांत निश्चित। वंशी राहत तयाचे ॥ ८८॥ देवालयाच्या वोवऱ्या सिद्ध होत । तोंवरी चांगदेव राहिले तेथ । तैंपासूनि कार्तिकीस तेथ । यात्रा भरत बहु साल ॥ ८९ ॥ मस्तक ठेवूनि विठ्ठलचरणीं । आज्ञा मागती तये क्षणीं । प्रेमाश्रु वाहती लोचनीं । सद्गद होऊनी बोलत ॥ ९० ॥ म्हणे देवाधिदेवा पंढरीनाथा । मजवर लोभ असों दे आतां । तुज वांचोनि रुक्मिणीकांता । मजवर ममता कोण करी ॥ ९१ ॥ पांडुरंग म्हणे ते समयीं । मी सर्वकाळ असे तुझे हृदयीं । परी आणिक गोष्ट सांगतों कांहीं । तरी चित्त देईं त्या बोला ॥ ९२ ॥ तुज षडक्षरी मंत्र सांगितला बरा । तो उपदेश करी आपुल्या पुत्रा । चालवी वंशपरंपरा । परोपकारा कारणें ॥ ९३ ॥ संजीवनी मंत्र दीधला जाणा । तो तुजवांचून फळेचि ना

१ वाणें. २ गुढ्या. ३ साखर. ४ चंद्र. ५ वर्षे. ६ देवळांत. ७ डोळ्यांत.

कोणा । ऐसें सांगतां पंढरीराणा । चांगया चरणा लागतसे ॥ ९४ ॥ मग म्हणे हृषीकेशी । आषाढ शुद्ध एकादशी । मी येऊनि तया स्थळासी । तुझे समाधीसी पूजीन ॥९५॥ तुझे यात्रेसी येतील भक्त । पंढरीचा महिमा घडेल त्यांतें । हे त्रिवाचा मी भाक[1] देत । निश्चय चित्तांत असों दे ॥९६॥ दशमीस दिंडी मिरवणें । एकदशीस हरि कीर्तन । द्वादशीस खिरापती वाटणें । आज्ञा प्रमाण हे माझी ॥९७॥ ऐसा वर दीधला निश्चित । आतां आपुल्या स्थळासि जाय त्वरित । ऐसी ऐकूनिया मात । चरणीं लोळत चांगया ॥९८॥ म्हणे अनाथनाथा श्रीहरी । लोभ असों दे मजवरी । मग राही रुक्मिणीस सत्वरी । पुसिलें यापरी चांगयानें ॥९९॥ आज्ञा मागोनि वैकुंठ नायका । चंद्रभागेसि येतसे देखा । मग भेटोनियां पुंडलीका । संतां सकळिकां नमस्कारी ॥१००॥ सव्य[2] घेऊनियां पंढरपुर । चांगदेव चालिले सत्वर । बोळवावयासि शार्ङ्गधर । येती साचार लगवगें ॥१०१॥ चंद्रभागेपर्यंत देखा । बोळंविला निजभक्त सखा । हृदयीं धरोनी एकमेका । सप्रेम सुखा भोगिती ॥२॥ मग मस्तक ठेवूनियां चरणावरी । देवासि म्हणे ते अवसरीं । मज समाधि द्यावया गोदातीरीं । यावें श्रीहरी ते ठायीं ॥३॥ ऐसें विनवितां योगेश्वर । अवश्य म्हणे सर्वेश्वर । उतरोनि भीमा पैलतीर । पाहे सत्वर माघारें ॥ ४ ॥ जैसी कन्या सासऱ्या जाय । क्षण क्षणा मागें परतोनि पाहे । तैसेंच चांगयासि झालें आहे । वियोग न साहे मानसीं ॥ ५ ॥ बोळवूनियां निजभक्तासी । राउळीं आले हृषीकेशी । चांगदेव आपुले समुदायेंसी । पुण्यस्तंभासी पातले ॥६॥ क्षेत्रासमीप येतां जाण । सामोरे येती गांवींचे जन । योगेश्वरासि करोनि नमन । निज प्रीतीनें भेटती ॥७॥ मग निज मंदिरीं प्रवेशोन । केशव मूर्तीस केलें नमन । चांगयासि पुत्र दोघेजण । नामाभिधान तें ऐका ॥८॥ ज्येष्ठ पुत्र तो केशव जाण । कनिष्ठासि विठोबा नामाभिधान । मग वडिलासि सन्निध बोलावून । म्हणे अनुग्रह घेणें आमुचा ॥९॥ पूजा उपचार सर्व करोनि । त्याचे मस्तकीं ठेविला पाणी[3] । षडक्षरी मंत्र तये क्षणीं । त्याज लागोनी सांगीतला ॥ ११० ॥ आम्ही समाधिस्थ झालियावरी । मग तूं विठोबासि अनुग्रह करी । कार्तिकीसि पंढरीची वारी । निज निर्धारीं चालविजे ॥ ११ ॥ आणि केशवराजाची मूर्ति सगुण । इचें निरंतर करी पूजन । आषाढी दशमीस दिंडी मिरवणें । पद्धति संपूर्ण सांगीतली ॥ १२ ॥ ऐशा रीतीं बोधोनि पुत्रास । समाधीस मुहूर्त नेमिला दिवस । शके बाराशें सत्तेचाळीस । आणि सवंत्सर असे क्रोधन ॥ १३ ॥ ज्येष्ठ शुद्ध सप्तमी भानुवासर[4] । आणि सिद्धियोग पुष्य नक्षत्र । भानु सप्तमीचें पर्व थोर । नेमित योगेश्वर समाधी ॥ १४ ॥ मग केशव राजाचे मूर्ती लागुन । षोडशोपचारें पूजिती प्रीतीनें । मग करूनियां साष्टांग नमन । देवासि पुसोन चालिला ॥ १५ ॥ टाळ विणे मृदंग घेऊनि । कीर्तन करिती वैष्णव जन । पंडित वैदिक सकळ ब्राह्मण । चालिले संपूर्ण क्षेत्रवासी ॥ १६ ॥ समाधि घेतसे योगेश्वर । ऐकोनि यात्रा मिळाली फार । विठ्ठल नामाचा करूनि गजर । पूजा पुरस्कार समर्पिती ॥ १७ ॥ दिंड्या पताका

१ वचन. २ निरोप दिला. ३ हात. ४ रविवार.

नानापरी । वाद्यें वाजती मंगळतुरी । ऐशा समारंभें ते अवसरीं । सोम तीर्थासि सत्वरी पातले ॥ १८ ॥ गोदातीरीं करोनि स्नान । मग सोमेश्वरासि केलें नमन । जनीं भरला जनार्दन । निश्चय पूर्ण बाणला ॥ १९ ॥ म्हणोनि चांगदेव सकळांकारणें । नमस्कार घालीत निज प्रीतीनें । म्हणती मजवर कृपा असों देणें । इतुकें वचन बोलिले ॥ १२० ॥ ऐसें देखोनि सकळ जन । चांगयासि घालिती लोटांगण । अश्रुपातें सजळ नयन । म्हणती पुन्हा दर्शन न होय कीं ॥२१॥ मग अश्वत्थाचे तळवटीं जाण ।चांगदेवें घातलें पद्मासन । आठवितां पांडुरंगाचे चरण । तों मूर्ती सगुण प्रगटली ॥ २२ ॥ मग मानस पूजनीं सायासीं । पूजिले तेव्हां वैकुंठवासी । आत्मा नेऊनि ब्रह्मांडासी । स्वदेहासी विसरले ॥ २३ ॥ नामघोषें जयजयकारी । वैष्णव गर्जती ते अवसरीं । कीर्तन करोनि सप्रेम गजरीं । भावें[1] श्री-हरी वोवाळिला ॥ २४ ॥ मग करोनि समाधि पूजन । घरासि गेले सर्वजण । नित्य यात्रा येतसे दुरून । विशेष महिमान वाढलें ॥ २५ ॥ नित्यानित्य साचार । ते स्थळीं होय जागर । पुराणें सांगती विप्रें[2] । आणि आषाढीसि थोर भरे यात्रा ॥ २६ ॥ समाधि घेतल्या निश्चितीं । बारा वर्षे लोटोन जाती । तों अद्भुत चरित्र वर्तलें क्षितीं[3] । तें सादर श्रोतीं परिसिजे ॥ २७ ॥ चांगयाच्या ज्येष्ठ पुत्रास । कनिष्ठ बंधूचा उपजला द्वेष । महंती असावी आपणास । ऐसें मानस तयाचें ॥ २८ ॥ वडिलीं शिकविली धर्मनीति । कीं उपदेश देई कनिष्ठाप्रती । परी तें नावडे त्याचें चित्तीं । प्रापंचिक स्थितीं तयाची ॥ २९ ॥ द्वादश वर्षें लोटल्यावरी । विठोबा म्हणे ते अवसरीं । स्वामींनी आज्ञा सांगीतली बरी । तरी उपदेश सत्वरी मज द्यावा ॥ १३० ॥ ऐशापरी करीतसे ग्लांती । परी तो नायकोचि दुर्मती । होणाराची विचित्र गती । नेणों संचितीं काय असे ॥ ३१ ॥ म्हणे षडक्षरी द्यावया मंत्र । तुज सर्वथा नसोचि अधिकार । मी वडील बैसलों पटावर । खावोनि भाकर राहे सुखी ॥३२॥ ऐसें निर्भर्त्सोनि त्याजकारण । विठोबाचें चिंतातुर जाहलें मन । उपदेश नेदी मजकारणें । म्हणे उपाय काय करावा ॥ ३३ ॥ नानाप्रकारें करोनि जाण । करीतसे बंधूचें छळण । दृष्टींसी देखतांचि दुरून । तरी वैरिया समान लेखीतसे ॥३४॥ घेऊनि पूजा पुरस्कार । लोकांसि बोले नम्रोत्तर । परी सुहृदांचा द्वेष फार । तेणें अंतर विटाळलें ॥ ३५ ॥ ऐसी देखूनि त्याची स्थिती । विठोबा उदास झाला चित्तीं । चांगदेव जेथें समाधिस्थ असती । जावोनि ते क्षितीं बैसला ॥ ३६ ॥ न घे फळ मूळ अथवा अन्न । मांडिलें बहुत निर्वाण । म्हणे स्वामी एकदा चरण । मज कारणें दाखवा ॥ ३७ ॥ ऐसे तीन दिवसपर्यंत निश्चितीं । बैसला तेथें अहोरात्री । तों चांगदेव येवोनी अवचितीं । दर्शन त्याजप्रती दीधलें ॥३८॥ वेतकुंचा घेऊनि करें । प्रगट दिसती योगेश्वर । सावध करोनि निजपुत्र । म्हणे इच्छित वर मज मागें ॥ ३९ ॥ ऐसें स्वरूप देखोनि त्याणें । मग साष्टांग घातलें लोटांगण । म्हणे स्वामी अनुग्रह देणें । म्हणोनि चरण धरियेले ॥१४०॥ ऐसें विनवितां निजकुमरें । अवश्य म्हणे योगेश्वर । तुवां न व्हावें चिंतातुर । जाय

१ भक्तिभावानें. २ ब्राह्मण. ३ पृथ्वीवर.

सत्वर गृहासी ॥४१॥ तुज अनुग्रह देऊनि निश्चित। सांगूनि देऊं संप्रदाय पद्धत। मग मागुतीं होऊं समाधिस्थ। चिंताक्रांत न व्हावें ॥४२॥ ऐसें सांगतांचि योगेश्वरा। विठोबा सत्वर पातला घरा। मग उदयासि येतां दिनकरा। समारंभ बरा मेळवीतसे ॥ ४३ ॥ दिंड्या पताका दशमीचे दिवसीं। घेऊनि आले समाधीपासीं। तों चांगदेव देखिले दृष्टीसीं। आश्चर्य सकळांसी वाटलें ॥४४॥ म्हणती समाधि घेतली ज्या अवसरा। त्यासि वर्षे लोटलीं बारा। पुढती देखिलें योगेश्वरा। म्हणोनि अंतरीं सुख वाटलें ॥ ४५ ॥ क्षेत्रांत वृत्तांत कोणी सांगती। कीं चांगदेव प्रगट जाहले पुढती। दर्शनासि लोक संपूर्ण येती। नमस्कार करिती सद्भावें ॥४६॥ मग दिंडी मिरवत मिरवत। विठोबा आणीतसे गांवांत। कीर्तन करिती विष्णुभक्त। चांगदेवही येत तयासवें ॥ ४७ ॥ मग मंदिरास येऊनि सत्वरा। क्रोधें शापिलें ज्येष्ठ कुमरा। म्हणे माझी आज्ञा भंगिसी पामरा। तरी निर्वंश खरा करीन मी ॥ ४८ ॥ निजकृपेनें विठोबासि पाहीं। अनुग्रह दिधला ते समयीं। पुढील भविष्य विचारूनि जीवीं। तेंच सर्वही सांगतीं ॥ ४९ ॥ मग म्हणतसे विठोबासी। तुझी वंशपरंपरा वाढेल ऐसी। भगवद्भक्त येऊनि पोटासी। आमुच्या व्रतासी चालविती ॥ १५० ॥ साहा पुरुषपर्यंत। येथें यात्रा मिळेल बहुत। महिमा वाढेल अद्भुत। निश्चय चित्तांत असों दे ॥ ५१ ॥ मग सातवे पुरुषीं हें व्रत। लोपोनि जाईल कीं निश्चित। ऐसें ज्ञानदृष्टीनें भासत। तोही चरितार्थ अवधारी ॥ ५२ ॥ सातवा पुरुष भक्तपूर्ण। न करील केशवाचें पूजन। यवनाच्या उपद्रवें करून। समाधि छिन्नभिन्न होईल कीं ॥ ५३ ॥ लोक कनिष्ठ होवोनियां। यात्रेसि न येती या ठायां। मागुती पुढें जीर्णोद्धार करावया। मी अवतरेन चांगया तुझे वंशीं। ॥ ५४ ॥ ऐसें भविष्य सांगोनि त्यातें। मागुती झाले समाधिस्थ। हें कौतुक देखोनि लोक समस्त। आश्चर्य करिती मानसीं ॥५५॥ म्हणती धन्य योगेश्वराची लीला। द्वादश वर्षां देखिलें डोळां। निज पुत्रासि उपदेश केला। दर्शन सकळां देउनी ॥ ५६ ॥ त्या विठोबासि पुत्र झाला असे। चांगदेव नाम ठेविलें त्यास। त्याणेंही वाढवोनि सत्कीर्ति घोष। महिमा विशेष वाढविला ॥ ५७ ॥ त्या चांगयाचा पुत्र पाहीं। त्याचें नांव पिलाजी गोसावी। वडिलांचें व्रत चालवूनि तिहीं। सत्कीर्ती बरवी पावली ॥५८॥ त्याचें पोटीं चिद्रत्न। नरहरि गोसांवी नामाभिधान। नरहरीचा पुत्र सगुण। जनार्दन नाम तयाचें ॥ ५९ ॥ मग जनार्दनाचिये उदरीं। सात पुत्र झाले निर्धारीं। पुढें वंशाची कैसी परी। तरी चतुरीं ऐकिजे ॥ ६० ॥ तया सात पुत्रांमाजी देख। मुधोजी नाम होता एक। तयासि पांच पुत्र झाले आणिक। संसार सुखें ते करिती ॥ ६१ ॥ तयां पांचां माजी केवळ। ज्येष्ठ पुत्र तो गोपाळ। त्याचे वेळेस तत्काळ। धर्म सकळ लोपले ॥ ६२ ॥ योगेश्वरें भविष्य केलें। तेंच सर्वांच्या प्रत्यया आलें। मग पुन्हा चांगदेव अवतरले। कोनेरी ठेविलें नाम त्याचें ॥ ६३ ॥ आपुलें सद्वंशीं[1] साचार। पुन्हा घेतला अवतार। तो शतायुषी पुण्यवंत नर। भक्तीसि जीर्णोद्धार तिहीं केला ॥ ६४ ॥ चांगया समाधि

१ मनाला.

स्थापन । अश्वत्थ वृक्ष लाविले त्याणें । तं स्थळीं बांधोनि वृंदावन । मठ संपूर्ण सिद्ध केला ॥ ६५ ॥ आषाढ शुद्ध एकादशीप्रती । यात्रेसि पुन्हा जनलोक येती । गोदातीरीं स्नान करिती । कीर्तन ऐकती सकळिक ॥ ६६ ॥ मग दिंडी घेऊनि महपरिवारीं । कार्तिकीसी जाती पंढरपुरीं । परब्रह्म सगुण विटेवरी । पाहोनि अंतरीं निवतसे ॥ ६७ ॥ तो भक्तिज्ञान वैराग्य पुतळा । ग्यांही प्रत्यक्ष देखिलें डोळां । धन्य संतांची अगाधलीला । भागवत धर्माला अधिकारी ॥६८॥ कोनेर गोसावी नाम तया । परी तो प्रत्यक्ष जाण चांगया । जड मूढांसि उद्धरावया । मनुष्य काया धरियेली ॥ ६९ ॥ शामजी गोसावी त्याचा पुत्र । हें चरित्र वदला सविस्तर । त्याचीं पदें पाहोनि साचार । आर्ष उत्तरें लिहिलीं ग्रंथीं ॥ ७० ॥ जैसी तैसी अबद्धवाणी । संत सादर ऐकती श्रवणीं । जैसें दुग्धमाजी धारवणी । घर चारिणी मेळविती ॥ ७१ ॥ निरसें दुग्ध ठेविलें जर । तरीं सकळ कुटुंबासि न पुरे । जैसें अज्ञापित रुक्मिणीवर । तितुकींच अक्षरें लिहिलीं ग्रंथीं ॥७२॥ न सोडोनि मुळींचा आधार । दृष्टांत मात्र दीधले चार । तेणेंचि ग्रंथ वाढला थोर । सज्ञान चतुर जाणती ॥७३॥ याचकासि आधार दातयाचा । कीं अंधासि आश्रय डोळसाचा । तेवीं भक्तलीलामृत बोलतां वाचा । मज संतांचा आधार ॥७४॥ जो दीनदयाळ कैवल्यदानी । पुढें वदवील रसाळ वाणी । महीपति त्याचा आश्रय करोनी । सप्रेम मनीं सर्वदा ॥ ७५ ॥ स्वस्ति श्रीभक्त-लीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । दशमाध्याय रसाळ हा ॥ १७६ ॥ अ० १० ॥ ओव्या १७६ ॥ ६ ॥

अध्याय ११





श्रीगणेशाय नमः । जो अनंत लावण्याची खाणी । सकळ सौंदर्य ज्यापासुनी । जो पांडुरंग कैवल्यदानी । करद्वय जघनीं ठेविलें ॥ १ ॥ ज्याचे सत्तेनें सकळ । प्रकाशे चंद्र आदित्य मंडळ । तो सगुण रूप धरोनि सांवळें । उभा घननीळ पंढरीसी ॥ २ ॥ चक्षुःश्रवा ज्याचा तल्पक । जो शेषशायी रमानायक । तो विटेवरी उभा राहोनि देख । सप्रेम सुख भोगीतसे ॥ ३ ॥ ज्याचें ध्यान हृदयसंपुटीं । एकांतीं करीतसे धूर्जटी । तो पुंडलीकाच्या भेटीसाठीं । भीमातटीं वास करितसे ॥ ४ ॥ अष्टांगयोग साधितां नाना । जो न येचि योगियांच्या ध्याना । ज्याच्या इच्छेनें विश्व रचना । नासोनि पुनः पुन्हाः होतसे ॥ ५ ॥ विधाता बाळ होऊनि पोटिंचा । सर्वथा पार नेणे ज्याचा । तो अंकित जाहला भाविकांचा । पुंडलिकाचा वरदानी ॥ ६ ॥ ज्याच्या आज्ञेनें निश्चित । भक्तलीलामृत होत । तो आपल्या दासाची रुक्मिणीकांत । सत्कीर्ति प्रख्यात करितसे ॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा अद्भुत । चांगदेव जाहले समाधिस्थ । द्वादश वर्षे लोटतां तयातें । मागुतीं पुत्रा तें भेटले ॥ ८ ॥ आतां पंजाब देशामध्यें जाण । परमज्ञानी नानक सुजाण । वैराग्य होतांचि त्याजकारणें । तों आडवें विघ्न एक दिसे ॥९॥ तें म्हणाल जरी कवणे रीतीं । तरी पदरीं बहुत धन संपत्ति । ते खर्चेल आतांचि कवणे रीतीं । मग विचार चित्तीं करीतसे ॥ १० ॥ द्रव्यापासीं अति अनर्थ । द्रव्यापासीं प्राणघात । द्रव्य मिळतांचि विरक्त । तरी विषयासक्त तो होय ॥ ११ ॥ द्रव्य आशा धरिली जरि । तरी सखे बंधु होती वैरी । द्रव्यें मित्र होतसे दुरी । विकल्प अंतरीं शिरतसे ॥ १२ ॥ द्रव्यापासीं होतसे कुबुद्धी । द्रव्यें भ्रंशे साधकाची बुद्धी । द्रव्यासि चोर जपती आधीं । प्राणांत संधी ते करिती ॥ १३ ॥ द्रव्यासि परचक्राचें भय । द्रव्यवानासि राजा नागविताहे । द्रव्यवान संसारिक आहे । तरी दरवडा येत यावरी ॥१४॥ द्रव्य आशा धरितां मनें । तरी विरक्तासि निंदिता जन । द्रव्य प्रतिग्रह घेतांचि जाण । तरी पदरींचें पुण्य तें वेंचे ॥ १५ ॥ बहुत काय विस्तार । भाविक प्रेमळ वैष्णव वीर । त्यांसि द्रव्य मिळतां साचार । पडतसे विसर देवाचा ॥ १६ ॥ द्रव्यवानासि चित्तीं तळमळ । द्रव्य जतन व्हावयाची हळहळ । द्रव्यवान अतृप्त सर्वकाळ । विघ्नदायक सबळ द्रव्यचि कीं ॥ १७ ॥ ऐसें म्हणोनि नानक सधन । म्हणे कैसें खर्चेल धन । तेव्हां उपाधि विरहित होऊन । श्रीहरि भजन करावें ॥१८॥ ऐसें चित्तीं विचारूनी । मग देवालयासि काम लाविलें त्यांनीं । हे अविंधें राजें देखोनि नयनीं । द्वेष त्या मनीं उपजला ॥ १९ ॥ कळिकाळ हा दुर्धर केवळ । यवन राजा दुर्बुद्धि खळ । देउळें पाडुनी सकळ । न चलेचि बळ कोणाचें ॥ २० ॥ ब्राह्मण वैरागी विष्णुभक्त । तयांसि उपद्रव करिती बहुत । नानकाच्या कानासि आली मात । कीं देउळें समस्त विध्वंसिली ॥ २१ ॥ ऐकोनि विक्षेप पावलें मन । म्हणे यासि उपाय करावा कवण । नानापरींचें त्रिविध जन । प्रकृति भिन्न सकळांच्या ॥ २२ ॥ सृष्टींत अनंत जडजीव किती । त्यांचे स्वभाव नाना रीतीं । मनुष्य विष्ठेची चिळस घेती । ते पशु भक्षिती प्रीतीनें ॥ २३ ॥ बचनाग

१ कमरेवर. २ शंकर. ३ मुसलमान. ४ दुष्ट. ५ किळस.

खातां जिवें मरती । हे तो सकळांस असे प्रतीती । तरी त्या माजीं जे किडे निपजती । ते कैसे वांचती सुरवाडे ॥ २४ ॥ कोणाचा आहार असे पवन । कोणी प्रीतीनें सेविती अन्न । कोणी खावोनि वांचलें तृण । जळापासोन एक होती ॥ २५ ॥ जीव मारोनि सायासें । तमोगुणी ते भक्षिती मांसें । जीव जीवाचा आहार असे । संशय नसे यांत कांहीं ॥ २६ ॥ चैतन्य विंवलें सर्व देहीं । हा सिद्धांतीं निर्णय केला पाहीं । परी प्रकृति भिन्नाकार दावी । हेचि नवायी अगाध ॥ २७ ॥ मोहरी कांदा ऊंस सत्वर । एक्याच वाफ्यांत पेरिती नर । परी त्याज ऐसें होऊनि नीर । उठे अंकुर बीज ऐसा ॥२८॥ तैशाच परी चैतन्यनाथ। प्रकृति ऐसा देहीं दिसत । ज्याचा तया सारिखा होत । आग्रह किंचित करीना ॥ २९ ॥ ज्याचा स्वभाव जैशा रीतीं । आपणहीं धरावी तैसीच स्थिति । ऐसा निश्चय करोनि चित्तीं । मग नानक पुसती लोकांतें ॥ ३० ॥ अविंधासि देऊळ नावडे पाहे । द्वेष मनीं उपजत आहे । तरी त्याच्या चित्तासि आवड काये । हेंचि लवलाहें सांगावें ॥ ३१ ॥ लोक म्हणती तये संधीं । यवनासि आवडे मसीदी । तरी ते आपण नेईजे सिद्धि । आग्रह बुद्धी कासया ॥ ३२ ॥ हिंदूसि आवडती सगुण मूर्ती । अविंध निर्गुण मसीदी स्थापिती । तरी आपण कोणती करावी गती । नानक चित्तीं विचारित ॥ ३३ ॥ म्हणे देउळें रचितां मोडिती खळ[३] । आणि मसीदी राहती चिरकाळ । तरी यवनाच्या मनींचा भाव केवळ । तेंचि तत्काळ करावें ॥ ३४ ॥ ऐसा विचार करूनि बरा । बोलाविलें पाथरट कारेगरां[४] । म्हणे आतां मसीदी सिद्ध करा । आज्ञा सत्वरा केली असे ॥ ३५ ॥ मसीदीसि काम लाविल्यावर । यवन चित्तीं हर्षले थोर । म्हणे नानक द्रव्य वेंचूनि समग्र । होईल फकीर आमुचा ॥ ३६ ॥ आपुला संप्रदाय भला साचा । प्रारंभ मांडिला मसीदीचा । ऐसेंच खळ बोलती वाचा । भाव अंतरींचा नकळती ॥ ३७ ॥ स्वयातीचे लोक निंदिती देख । म्हणती भ्रष्टला नानक । देउळें मोडोनि सकळिक । मसीदी अनेक बांधितो ॥ ३८ ॥ किंकन्यासि बैसतां दोन धाय । तैसेंचि जीवासि वाटताहे । म्हणे आतां उभयतां बैसेल सोय । तैसाचि उपाय रचावा ॥ ३९ ॥ मग देउळें मसीदी मोडून । बहुत बांधिले सेतखाने । ऐसी युक्त देखोनि जनें । मग सकळ जन हांसती ॥ ४० ॥ हिंदु मुसलमान मिळोनि पाहे । नानकासि म्हणती केलें काय । म्हणे उभयतांची होईल सोय । तोचि उपाय म्यां केला ॥४१॥ ज्ञानी निर्गुण लक्षिती कोडें । भक्तांसि आवडे सगुण रूपडें । स्वमतें उभयतां करिती बडबड । परी सर्वथा न निवडे वाद यांचा ॥ ४२ ॥ एक म्हणती थोर शंकर । त्यासि उपासि जे निरंतर। एक म्हणती मिथ्या विचार। रचिलें चराचर ब्रह्मयानें॥४३॥ विधातयाची सृष्टि आवघी। हे तों पुराणीं येतसे गाही। त्या ब्रह्मयासि ध्यातांचि पाहीं । मनोरथ सर्वही पूर्ण होती ॥ ४४ ॥ तंव वैष्णव म्हणती सप्रेम बळें । विधाता विष्णूच्या पोटिंचें बाळ । तो देवाधिदेव घननीळ । सर्वकाळ भजावा ॥४५॥ सौर म्हणती सूर्यचि थोर । प्रकाश पाडितो जगावर । हा नसता तरी साचार । अंधकार सर्वदा

१ वायु. २ गवत. ३ दुष्ट. ४ कारागीर.

॥४६॥ याज्ञिक म्हणती तयें क्षणीं । वासव श्रेष्ठ सर्वांहुनी । तयाच्या आज्ञे करोनी । मेघ धरणी निववीतसे ॥४७॥ मेघापासूनि अन्न निपजत । अन्नापासोनि निपजती भूतें । कर्म कांडाचेनि मतें । याज्ञिक घालिती वाद ऐसा ॥ ४८ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । विभागित वेदो नारायण । तीन कांडेंही महर्षी मिळोन । वेगळीं निवडोन काढिती ॥४९॥ जें कां जयाच्या मुखोद्गत । तोंचि साच तयासि भासत । न पाहतांचि सिद्धांत । वाद घालीत परस्परें ॥५०॥ ऐसा त्रिविध जनाचा विचार । बोलों जातां आयुष्य न पुरे । आतां सकळ धर्म टाकोनि सत्वर । चित्तीं ईश्वर भजावा ॥ ५१ ॥ द्रव्याची उपाधि होती पाहे । तेथेंचि गुंतोनि मन राहे । म्हणोनि देवालयाची रचिली सोय । परी ते मनासि न ये यवनाच्या ॥५२॥ त्याच्या मनोगतास्तव साचें । काम लाविलें मसीदीचें । तव चित्त क्षोभोनि स्वयातींचें । निंदिती वाचें आम्हांसी ॥५३॥ इकडे आड इकडे विहिर । मग आणिक विचार योजिला सार । तुम्हां उभयतांसि साचार । सेतखाने फार बांधिले ॥ ५४ ॥ तुम्हां उभयतांच्या उपयोगी पडे । तैसेंचि आम्ही पुरविलें कोडें । सेतखाने बांधिलें उदंड । निज निवाडे त्यांत हगा ॥ ५५ ॥ नानक बोलतां ऐशा रीतीं । हिंदु मुसलमान दोघे हांसती । आश्चर्य करोनियां चित्तीं । मग घरासि जाती आपुल्या ॥ ५६ ॥ शुद्ध सात्विक वैराग्य बळ । नानकें षड्वैरी जिंकिले सकळ । शांति क्षमा होवोनि अचळ । वेष तत्काळ पालटला ॥५७॥ औभरणें ऐसीं लेतसे आंगीं । नव्हे फकीर ना बैरागी । दोहींच्या समान मध्यभागीं । ऐसाचि जगीं वेष दावी ॥ ५८ ॥ अविनाश भक्ति जे निर्गुण । तेचि स्थापिली असे त्यानें । आपणचि स्वरूप होऊन । सकळ देहभान सांडिलें ॥ ५९ ॥ आठरा वर्णांचे शेष निश्चिती । सद्भावे कोणी शरण येती । कांहीं अनुमान न करितां चित्तीं । अनुग्रहचि देती तयासी ॥ ६० ॥ देखोनि निंदिती जनलोक । म्हणती आपला धर्म टाकिला सकळिक । या वेगळा वेष आणिक । घेवोनि सुखें वर्तत असे ॥ ६१ ॥ एक म्हणती मंत्रें चळला । म्हणोनि ऐसा विदेही झाला । सत्कर्मी पैका नाहीं लाविला । सेतखाने त्याला आवडती ॥६२॥ उदंड झाले भाग्यवान । हिंदु आणि मुसलमान । परी नगरांत सेतखाने बांधिले कोणें । यांजवांचोन सर्वथा ॥ ६३ ॥ तंव कोणी एक उत्तर देती । व्यर्थ का निंदितां तयाप्रती । हगावयाची अडचण होती । उत्तम युक्ति केली यानें ॥६४॥ बाया बापुडया शौचासि जाती । कोणी न उठवी तयांप्रती । तेव्हां नानकासि आशिर्वाद देती । ऐसें दुर्मती एक म्हणे ॥ ६५ ॥ संतांचा अघटित विचार । कोणासि न घडेचि साचार । ऐसें न जाणोनि पामर । मग दुरुत्तरें बोलती ॥ ६६ ॥ परी नानकासि त्याचें सुख दुःख नाहीं । अलक्षीं लक्ष सर्वदाही । म्हणोनि देहींच असतां विदेहीं । जनापवाद कांहीं न गणी तो ॥ ६७ ॥ वारणं जातां बिदींतून । मागें पुढें भुंकती श्वान । परी तो तेथेंच न घाली मन । स्थिर गमन चालतसे ॥ ६८ ॥ कां आगस्त मुनीसि देखून । समुद्र अट्टहास्यें करी गर्जन । परी तो चित्तीं धरोनि मौन । करीत अनुष्ठान निज निष्ठे ॥ ६९ ॥ तेवीं जननिंदेचें येती लोट । शांतिसागरीचें भरिती घोंट ।

---

१ पृथ्वी. २ वस्त्रे. ३ हत्ती.

काम क्रोधांचीं मोडली वाट । करणी अचाट तयाची ॥ ७० ॥ असो आतां तये वेळ । स्वयातीचे लोक सकळ । अविंध राजा दुष्ट खळ । गेला तत्काळ त्यापासीं ॥ ७१ ॥ म्हणती हिंदु धर्म टाकोनि देख। आणिकाचि पंथ धरिला नानकें । तरी तयासि सांगोनि तात्कालिक । स्वधर्म अनेक आचरावें ॥७२॥ ऐसें सांगतां खळ दुर्जन । क्रोधें कांपतसे तो यवन। मग मठासि सांगोनि पाठविलें त्यानें । स्वधर्म आपुला चालवी ॥ ७३ ॥ नानक रायाचें नायके वचन । साकी पाठविली एक लिहून। तेचि ऐका संत सज्जन । सिद्धांत कथन त्यामाजी ॥७४॥ साकी । एक मट्टीके भांडे । वासे कवण शुद्ध कवण पांडे । कव कवीरा पढो गायत्री । कव रोहिदास पुराण। । कवण वेदसो नामा उद्धरे । जीनो आतमाराम पच्छना ॥१॥ धनपति अवर धना जाट । सेना जातको न्हाई महा पातकी अजामेळ उद्धरो । जिणें पुत्र सोहेत लगाई ॥२॥ झूटे करम करे सो झूटा। हरि सुमरे सो साचा। नानक सवनीच सोनीचा। हरि सुमरण सो साचा॥३॥ ॥ ओवी ॥ एक माती पासोन जाण । घागरी वेंळण्या आणि रांजण। त्यांत दृष्टि पाहतां उघडोन। तों मृत्तिकेवांचोन अन्य नसे ॥७५॥ तैसे ब्राह्मण क्षत्रिय वैश्य याती । शूद्रादिक अठरा वर्ण होती । नामें भिन्न परी एक चैतन्य मूर्ती । द्वैत चित्तीं न भासे ॥७६॥ मुकुट कुंडलें कर कंकण। ही वेगळाली नामाभिधानें । अंतर दृष्टीनें पाहतांचि जाण । तंव ते सुवर्ण एकचि ॥७७॥ कां वटबीज तो अल्प लहान । परी त्याज पासोनि शाखा[3] पल्लव[4] जाण । खोलीं व दृष्टीं विचारोनि धेणें । तरी ब्रह्मरूपपणें विश्व सर्व ॥७८॥ सर्व विष्णुमयं जगत् । हें श्रुति वाक्य असे निश्चित । ते मज अनुभवा आली प्रचीत । कल्पना द्वैत नसेची ॥ ७९ ॥ श्रीहरीसि रिघतां शरणागत । सकळ स्वधर्म आले त्यांत । नामस्मरण करोनि निश्चित । अनंत भक्त उद्धरिले ॥८०॥ कवीर तो जातीचा यवन । गायत्री मंत्र सर्वथा नेणे । करितां श्रीरामाचें भजन । ब्रह्मरूप पूर्ण तो जाहला ॥८१॥ रोहिदास तो चर्मक[5] निश्चितीं । शिकला नाहीं पुराण व्युत्पती । करूनि श्रीकृष्ण प्राप्ती । तरला क्षिती वैष्णव तो ॥८२॥ नामा तो शिंपी जातीचा पाही । तयासि वेदाचा अधिकार नाहीं । हरि कीर्तनेंचि तरला तोही । माया वैष्णवी अनिवार ॥८३॥ धना जाटाचें शेत आलें । न पेरीतांचि उगवलें । तेणें हरि स्मरणावीण साधन भलें । नाहीं केले सर्वथा ॥ ८४ ॥ सेना न्हावी जातीचा नीच । तयासि संकट पडतां साच । श्रीहरीनें रूप धरूनि त्याचें । दासत्व रायाचें केलें कीं ॥ ८५ ॥ महा पातकी अजामिळ । त्यांचा मांडिला अंतकाळ । नारायण स्मरतांचि बाळ । तोही तत्काळ उद्धरिला ॥ ८६ ॥ खोटें कर्म करितसे जनीं । तोचि लटका सर्वांहूनी । श्रीहरीस स्मरे निशिदिनीं । तरी श्रेष्ठ त्याहोनी अन्य नसे ॥ ८७ ॥ पत्र पाहतां यवन भूपती[6] । परम संतोपला चित्तीं । परी कांहीं पहावी करामती । म्हणोनि मागुतीं क्रोधावला ॥ ८८ ॥ म्हणे मी सार्वभौम नृपनाथ । आमुचें वचन नायके सत्य । मग सहस्र पठाण पाठविलें तेथें । म्हणे तयाते धरोनि आणा ॥ ८९ ॥ ऐसी आज्ञा होतांचि सत्वरी । मग शस्त्रें अस्त्रें धेवोनि करीं । रायाचें सैन्य ते अवसरीं । मठा वाहेरी पातलें ॥ ९० ॥ आंत

१ राजाचें. २ एक काव्य प्रकार. ३ फांद्या. ४ पानें. ५ चांभार. ६ राजा.

प्रवेशावया निश्चितीं । पठाण चित्तीं विचार करिती । हें नानकासि समजलें चित्तीं । मग काय युक्ती करीतसे ॥ ९१ ॥ वैष्णवी मायेचें करितां चिंतन । तो अघटित जाहले विंदान । प्रगटलें दहा सहस्र सैन्य । शस्त्रें आभरणें घेवोनियां ॥ ९२ ॥ उल्हट यंत्राचे भडिमार । असंख्यात सोडिती शर । रायाचे आले परचक्र । तें भिऊनि सत्वर पळाले ॥ ९३ ॥ यवनापासीं पठाण समस्त । जावोनि सांगती वृत्तांत । दहा सहस्र सैन्य तेथ । अकस्मात प्रगटले ॥ ९४ ॥ नानकाच्या मठा बाहेर । येऊनि आम्हांसि दीधला मार । ऐसा देखोनि चमत्कार । मग आलो सत्वरा पळोनि ॥ ९५ ॥ ऐसें ऐकोनि भूपती । परम अनुतापला चित्तीं । म्हणे दुर्जनाची ऐकोनि कुमती । सिद्धपुरुषा प्रतीं छळिलें म्यां ॥ ९६ ॥ इतुके म्हणवोनि राजा यवन । हात बांधोनि रुमालानें । नानकाच्या मठासि येऊन । केलें नमन सद्भावे ॥ ९७ ॥ म्हणे मी अपराधींच पुरा । तुम्हांसि छळिले या अवसरा । ते क्षमा करोनि योगेश्वरा । अभय सत्वरा मज द्यावें ॥ ९८ ॥ तुम्ही तिसरा स्थापिला पंथ । तो सुखें करावा संप्रदाय युक्त । ऐसें म्हणवोनि नृपनाथ । मंदिरा त्वरित तो गेला ॥९९॥ इतुकी सिद्धाई दाखवितांचि त्यांनीं । बहुत सत्कीर्ति प्रगटली जनीं । सकळ वर्णयाती येऊनि । अनुग्रह कानीं संपादिती ॥ १०० ॥ कोणी धनवंत सावकार । त्यांनीं मठ बांधोनि दीधला थोर । अन्न शांति होतसे फार । पदार्थ भरपूर ते ठायीं ॥ १ ॥ शिष्य संप्रदायी बहुत जन । परीं प्रपंच्याकडे त्यांचें मन । त्यांमाजी निधडे निवडले दोन । नामाभिधान तें ऐका ॥२॥ एकाचें नाम असे सुत्रा । मर्दाना शिष्य तो दुसरा । चित्तीं अनुताप धरोनि बरा । सर्व संसारा त्यागिलें ॥३॥ तन मन आणि सकळ धन । केलें सद्गुरूसि अर्पण । प्रपंच्याकडे न वळेचि मन । निश्चय परिपूर्ण तयांचा ॥४॥ जाणोनि स्वामींचें मनोगत । सेवेसि तिष्ठती दिवस रात । इच्छिला पदार्थ आणोनि देत । कृपा बहुत संपादिली ॥५॥ कांहीं दिवस लोटतांचि जाण । नानक जाहले उदासीन । म्हणे थोर उपाधि वाढली गहन । तरी त्याग करणे सत्वर ॥ ६ ॥ घराश्रम परिस निश्चित । मठाश्रम दुर्घट बहुत । उपाधि टाकितां अधिक वाढत । फळ संचित देतसे ॥ ७ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं । मग तेथोनि निघाले सत्वरी । सुत्रासि ठेविलें मठाभीतरीं । मर्दाना बरोबरी घेतला ॥ ८ ॥ नानक म्हणतसे आपुलें चित्तीं । मक्केंत[1] आहे श्रीविष्णुमूर्ती । ती यवनानें घातली पालथी । वार्ता बोलती जनलोक ॥९॥ तरी आपण जाऊनियां तेथ । दृष्टीनें पाहावा वैकुंठनाथ । ऐसें म्हणवोनी चित्तांत । पंथ क्रमित लवलाहें ॥११०॥ गुरू शिष्य मार्गी चालतां । तों वाटेवर लागली एक सरिता[2] । नदी तुंबळ भरोनि जातां । मर्दाना चिंताक्रांत मनी ॥ ११ ॥ अलख निरंजन बोलोनि उत्तर । नानक चालती उदकावर । शिष्य मागेंचि राहिला दूर । मग जोडोनि कर विनवीतसे ॥ १२ ॥ म्हणे मज तरणोपाय कांहीं । स्वामी सांगिजे लवलाहीं । परम भय वाटतें जीवीं । तरेन केवी जळांत ॥ १३ ॥ ऐकोनि सच्छिष्याची ग्लांती । सरिते माजी उभे राहती । म्हणे सद्गुरूस्मरण करावें चित्तीं । मग उदक निश्चितीं बुडविना ॥ १४ ॥ ऐकोनि नानकाचे

१ आश्चर्य. २ नदी.

बोल । सद्गुरूस्मरण करीत चाले । मांड्या इतुकें निर जाहलें । मध्यभागी गेले सरितेच्या ॥ १५ ॥ अलख निरंजन म्हणवोनि । नानक बोलिले तये क्षणीं । तयासि घोट्या इतुकें पाणी । शिष्य देखोनि विस्मित ॥१६॥ म्हणे मज साधारण मंत्र सांगोन । आणिकांचि स्मरण करिती आपण । मग सद्गुरूचें स्मरण टाकोन । अलख निरंजन म्हणतसे ॥१७॥ तों एकाएकीं तये क्षणीं । कंठा इतुकें जाहलें पाणी । बुडालों बुडालों म्हणवोनि । सद्गुरूलागोनी हांक मारी ॥ १८ ॥ नानक पाहती परतोन । म्हणती करावें सद्गुरु भजन । आम्हीं करूं तें तुज कारणें । नये होवोनि सर्वथा ॥ १९ ॥ मग गुरुगुरु म्हणवोनि सत्वरा । मर्दाना गेला पैलतीरा । स्वामीनें संकेत सांगितला खरा । विश्वोद्धारा लागोनी ॥१२०॥ सद्गुरु सांगती तें करावें । परी त्याज ऐसें आपण न करावें । सर्वेंचि फळ येतसे बरवें । जीवें भावें अनुसरतां ॥ २१ ॥ असो आतां ते अवसरीं । गुरु शिष्य गेले पैलतीरीं । म्हणे स्वामींनीं सांगितली बरी । युक्ति थोरी मजलागीं ॥ २२ ॥ समुद्र जीवनीं याच युक्तीं । बेटावरी जावोनि उभयतां बैसती । तों मक्केंत अविंधें विष्णुची मूर्ती । घातली पालथी कलियुगीं ॥ २३ ॥ पुढें मसीद करोनि थोर । तेथें ठेविले मुजावर । तेथें गेलिया हिंदु फकीर । तरी जीव सत्वर ते घेती ॥ २४ ॥ वेगळी करूनि यवन यातं । जरी तेथें गेला विष्णुभक्त । तरी श्रीविष्णु मूर्ति उठेल निश्चित । जाऊं न देत यासाठीं ॥ २५ ॥ अटके पासोनि पुढें जाण । विकों न देती हिरवें अन्न । गुरांच्या अस्थि मेळवून । विहिरी बांधोन काढिल्या ॥ २६ ॥ वोहोळ नदींच्या तीरीं पाहीं । हडकें रोवलीं ठायीं ठायीं । सिजल्या अन्नावीण पाही । विकत कांही मिळेना ॥२७॥ ऐसें यवनांचें प्राबल्य बहुत । तरी नानक कैसे पातले तेथ । हे आशंका वाटेल चित्तांत । तोहीं वृत्तांत अवधारा ॥ २८ ॥ सिद्ध पुरुषाची अकळलीला[2] । अदृश्य जातां न दिसती डोळां । यास्तव मक्केंत प्रवेश झाला । गुप्त रूपें प्रगटला ते ठायीं ॥ २९ ॥ मसीदींत मुजावरी ठेविले यवनें । तों नानकासि देखतां आश्चर्य मन । म्हणती तुम्ही कोठील कवण । आम्हां कारणें सांगिजे ॥ १३० ॥ नानक म्हणतसे तयांप्रतीं । ज्यांपासोनि प्रळय उत्पत्ति स्थिती । त्या सर्वांचें कारण मीच निश्चितीं । प्रकाश ज्योती अवतरलों ॥ ३१ ॥ जो सर्व करोनि अकर्ता । त्रिगुणती तमा ये परता । तोचि मी जाण तत्वतां । येथें अवचिता प्रगटलों ॥ ३२ ॥ अक्षर तें व्यापक सर्वांत । अक्षर वेगळें मायातीत । तोचि मी लोकांच्या हितार्थ । मृत्युलोकांत अवतरलों ॥३३॥ जो निर्गुण निराकार जाण । अवतार धरि भक्ताकरणें । तो लीला विग्रही जगज्जीवन । अद्वैतपणें मी असें ॥ ३४ ॥ ऐकोनि म्हणती मुजावर । गोष्टी बोलतां थोर थोर । आम्हांसि अजमत[1] दाखवाल जर । तरी सत्य उत्तर हें मानूं ॥ ३५ ॥ हिंदूंचें दैवतचि विष्णू मूर्ती । ये स्थळीं होती जाण निश्चितीं । ती यवन राये घालूनि पालथी । मसीद भिंती रचियेल्या ॥ ३६ ॥ सर्वांचें कारण म्हणतां आपण । तरी मूर्ति उलटी करून दावणें । तरीच सत्य मानूं बोलणें । ऐसें तें वचन बोलिले ॥ ३७ ॥ हें नानकें ऐकोनि

१ जात. २ लीला कळत नाहीं.


वचनोक्ति । मग विष्णुमूर्तींची करितसे स्तुती । जय क्षीराब्धिवासा श्रीलक्ष्मीपती । व्यापक त्रिजगतीं तूं एक ॥ ३८ ॥ जय जय हरिहरेश्वरा । विधिजनका दीनोद्धारा । तुज वांचोनि चराचरा । वस्तीस थारा नमेची ॥३९॥ रोमरंध्रीं अनंत ब्रह्मांडें । येव्हडें विराट स्वरूप गाढें । तो तूं निजभक्तांचे पुरवावया कोडें । सगुण रूपडें होतोसी ॥ १४० ॥ उत्पत्ति स्थिति निदानें । हीं होत असती तुझीया सत्तेनें । तो तूं कळिकाळासि देऊनि मान । लपतोसि भेणें यवनांच्या ॥४१॥ तूं अभक्तांसि देखोनि दीनोद्धारा । होत अससी पाठमोरा । आतां आमुची करूणा ऐकोनि सत्वरा । दीनोद्धारा भेट वेगीं ॥४२॥ ऐसी नानकाची एकोनि स्तुती । उठोनि बैसे श्रीविष्णु मूर्ती । सांवळा सुकुमार श्रीपती । शंक चक्र हातीं मंडित ॥ ४३ ॥ मानस पूजनीं ते अवसरीं । सर्वोपचारि श्रीहरी । दर्शन घेऊनि ऐशा परी । तेथूनि सत्वर निघाले ॥ ४४ ॥ ऐसा चमत्कार देखोनियां । मुजावर नानकाच्या पडती पायां । म्हणती हा वृत्तांत कळतांचि राया । तरी प्राणा आमुचिया घेईल तो ॥ ४५ ॥ म्हणेल हिंदु मनुष्य आलें कोणी । यास्तव मूर्ती बैसली उठोनी । आमुच्या जीवासि करितील जांचणी । लागती म्हणोनी पायास ॥ ४६ ॥ तूं सर्वात्मक ईश्वर जाण । मनुष्य रूपें अवतार पूर्ण । हें सत्यचि भासलें आम्हां कारणें । परी विनंति परिसणें एक आतां ॥४७॥ पहिल्या सारिखी मूर्ति करावी । म्हणजे आम्हासि यातना नव्हे कांहीं । ऐसे म्हणवोनि ते समयीं । मुजावर पायीं लागले ॥ ४८ ॥ नानक किंचित आग्रह न करी । म्हणे ईश्वर इच्छा प्रमाण खरी । मग देवास म्हणे ते अवसरी । पूर्ववत् सत्वरी होय आतां ॥ ४९ ॥ पुढें म्लेंछ मर्दना कारणें । कल्कि अवतार तुम्हांसि घेणें । करोनि धर्माचें संस्थापन । भक्तजन रक्षावे ॥ १५० ॥ आतां अभक्त यवनासि पाठमोरा । पूर्ववत होई दीनोद्धारा । नानकाच्या ऐकोनि उत्तरा । विष्णुमूर्ति सत्वरा निजतसे ॥ ५१ ॥ इतुकें चरित्र करोनि सत्वर । तेथोनि निघे योगेश्वर । बोट उल्लंघोनि सत्वर । समुद्र नीर उल्लंधिलें ॥ ५२ ॥ मार्गीं चालतां वाटेवर । संरितेसि आला अपार पूर । तेथें सैन्यासहित साचार । कोंडला नृपवर ते ठायीं ॥ ५३ ॥ नानक स्वामीसि देखोनि त्यानें । सद्भावें दृढ धरिले चरण । मग कागदाची नौका करून । त्याज कारणें उतरिलें ॥५४॥ सैन्यासहित भूपती । ऐलतीरीं आला सत्वरगती । मग नानकासि करि विनंती । देव मजप्रती भेटवा ॥ ५५ ॥ तयासि म्हणे योगेश्वर । जो कां निर्गुण निराकार । त्रिगुण रहित सर्वेश्वर । पाहे साचार नृपनाथा ॥ ५६ ॥ परब्रह्म गोरें ना काळें । सांवळें ना पिवळें । आरक्त ना नव्हे ढवळें । सप्तरंगा वेगळें निरायम ॥ ५७ ॥ ज्याच्या सत्तेनें साचार । व्यापार करिती चरणकर । अचेतन चेतवी निरंतर । तोचि श्रीधर ओळखावा ॥ ५८ ॥ आत्मसत्तेनें नेत्र पाहती । आत्मसत्तेनें श्रवण ऐकती । तोचि ओळखे आपुल्या चित्तीं । कासया खंती करतोसी ॥ ५९ ॥ घ्राणासि ज्याचेनि सुगंध कळे । जिव्हा जाणेचि रसाळ । तो देवाधिदेव घननीळ । देहींच तत्काळ ओळखावा ॥१६०॥ पिंड ब्रह्मांडीं सकळ ठायीं । त्याजवीण सत्ता आणिकाचि

१ नदीस. २ राजा. ३ पांढरे. ४ नाकास.

नाहीं । आपआपणातें समजोनि घेयीं । उपदेश नाहीं या परता ॥६१॥ ऐकोनि नानकाची वचनोक्ती । सद्भावें नमस्कार करी भूपती । ह्मणती स्वामीची वचनोक्ती निश्चितीं । बिंबली मजप्रती मनांत ॥ ६२ ॥ ऐसें ह्मणवोनि त्या अवसरा । राजा गेला आपुल्या नगरा । नानक मर्दानासि घेउनि सत्वरा । पंथ वरा क्रमती ॥ ६३ ॥ तों योगियांचा मुगुटमणी । विष्णु अवतार बोलती जनीं । तो गोरक्षनाथ तये क्षणीं । अकस्मात नयनीं देखिला ॥ ६४ ॥ नानक तयासि आदेश करीत । नानकासि म्हणतसे मत्स्येंद्रसूत । तुम्हीं जनांत सिद्धाई दाखविली बहुत । आतां सांगतों कार्यार्थ तो करा ॥ ६५ ॥ चार लक्ष यात्रा या अवसरीं । मिळाली असें हरिद्वारीं । तितुकीयांसी भोजन दे सत्वरी । योगेश्वर तरी तूं साच ॥ ६६ ॥ ऐकोनि गोरक्षाची मात । नानक तयासि अवश्य म्हणत । पुढें जावोनि त्वरित । आमंत्रणें सकळातें द्या तुम्ही ॥६७॥ सामर्थ्य पाहावया तेथ । हरिद्वारासि गोरक्ष जात । तो नानकें कवतुक केलें अद्भुत । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥ ६८ ॥ चार लक्ष यात्रा ते अवसरीं । मिळाली असे हरिद्वारीं । नानक गुप्त रूपें जावोनि सत्वरी । तृप्ती करी सकळांची ॥ ६९ ॥ सर्व सिद्धी अनुकूळ असत । इच्छा भोजन सकळांसि देत । तों मागुति येवोनि गोरक्षनाथ । आमंत्रण देत तयांसी ॥१७०॥ लोक म्हणती गोरक्षनाथा । नानक सिद्ध येवोनि आतां । इच्छाभोजन दीधलें समस्तां । गेला मागुता तीर्थासी ॥ ७१ ॥ ऐसी आयिकतांचि मात । आश्चर्य करी मत्स्येंद्रसुत । तों नानकही तेथें प्रगट होत । नमस्कार करित गोरक्षा ॥७२॥ परस्परें भेटोनि प्रीतीं । गोरक्ष बहुत करी स्तुती । म्हणे तुज ऐसा सिद्ध मूर्ती । त्रिजगतीं दिसेना ॥ ७३ ॥ स्वरूप प्राप्तीचें लक्षण । योगेश्वराची जितुकीं चिन्हें । तीं तुझ्या अंगीं बाणलीं लेणें । निश्चय पूर्ण कळों आला ॥ ७४ ॥ ऐसी गोरक्षें करुनि स्तुती । गगनें पंथें उडोनि जाती । नानक शिष्यासमवेत सत्वर गती । मठासि येती आपुल्या ॥ ७५ ॥ जैसी ईश्वराची लीला । तैशाच योगियांच्या आंगीं कळा । दाखवोनि नाना सिद्धींचा सोहळा । दंडन खळां तिहीं केलें ॥ ७४ ॥ भक्त अथवा योगेश्वर । ज्यानें दाखविला चमत्कार । त्याची सत्कीर्ति वाढे थोर । संप्रदाय इतर चालविती ॥ ७७ ॥ नानक पंथी बैरागी निश्चितीं । तद्देशीं अद्यापि उदंड असती । उपदेश देवोनि जनाप्रती । स्मरणीं लाविती जड मूढां ॥ ७८ ॥ संत चरित्र ऐकतां कांनीं । महादोषांची होतसे धुणी । तयासि तुष्टोनि कैवल्यदानि । वैकुंठभुवनीं ठेवितसे ॥ ७९॥ जो दीनदयाळ करुणाकर । अक्षय अभंग रुक्मिणीवर । तो महीमतीचें वसवोनि अंतर । वदवीत चरित्र संतांचें ॥ १८० ॥ स्वति श्रीभक्तिलीलामृत ग्रंथ । श्रवणेचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । एकादशाध्याय गोड हा ॥ १८१ ॥ अध्याय ॥ ११ ॥ ओव्या ॥ १८१ ॥

१ राजा. २ आज्ञा. ३ गोरक्षनाथ. ४ आकाश मार्गानें.

अध्याय १२



श्रीगणेशाय नमः । जो सच्चिदानंदघन अनंत । त्याच्या विभूति असंख्यात । चक्षुःश्रव्यासि न कळे अंत । तेथें मी प्राकृत काय वाणूं ॥ १ ॥ जैसा मेघ वर्षतां क्षितीं[1] । त्याच्या धारा न गणवती । कीं भूमीतूनि तृणांकूर निघती । ते न मोजवती सर्वथा ॥ २ ॥ नातरी सागरीच्या अनंत लहरी । येती जाती दिवस रात्रीं । त्यांची संख्या कोण करी । ऐसा धरित्री दिसेना ॥ ३ ॥ किती अंगुळें गगन निश्चित । मोजितां कोणाचा न पुरेची हात । तेवी ईश्वराच्या विभूति बहुत । संख्या रहित असती ॥ ४ ॥ भावें अथवा वैरें निश्चितीं । जयासि घडली सत्संगती । त्याची ही जाहली सात्विक वृत्ती । सायुज्य मुक्ती पावले ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथा निश्चितीं । नानक मक्केसि गेले प्रीतीं । तेथें पाहोनि श्रीविष्णुमूर्ती । मग गोरक्षाप्रती भेटले ॥६॥ आणिक चरित्र रसाळ पूर्ण । ऐका सार भाविक जन । रोहिदास वैष्णव पूर्ण । विष्णु उपासना करीतसे ॥७॥ ध्यानांत आणून वैकुंठपती । चर्मांचीच निर्मिली मूर्ती । सांवळा चतुर्भुज श्रीपती । शंख चक्र हातीं मंडित ॥ ८ ॥ सुहास्यवदन मनोहर । दृष्टीसी देखतां देहभान विरे । ऐसी भोगमूर्ती निरंतर । सर्वोपचारे अर्चितसे ॥ ९ ॥ त्या गोपाळमूर्ती पुढें निश्चितीं । शाळग्राम पंचायतन असती । गणपति शिव ब्रह्म भास्कर शक्ती । रोहिदासें प्रीतीं मांडिलीं ॥ १० ॥ त्या पंचायतनाचें करी पूजन । परी कृष्ण उपासक म्हणवीत पूर्ण । ऐसें त्याचें वैष्णव धर्म जाण । जाहले श्रवण कबीरासी ॥ ११ ॥ तो राम उपासक भक्त प्रेमळ । सत्वधीर वैराग्यशीळ । इंद्रियें स्वाधीन केली सकळ । अनुताप बळें करोनियां ॥ १२ ॥ चातक न घेचि भूमीचें जीवन । कीं माते वांचुनि न समजे तान्हें । चकोरासि चंद्र प्रमाण । नेणती आन सर्वथा ॥ १३ ॥ तेवीं कबीराचिया मना । आवडे श्रीराम उपासना । इतर दैवतें आहेत नाना । दृष्टीसीं पाहे ना त्यांकडे ॥१४॥ ऐसा कबीर पूर्ण ज्ञानी । रोहिदास भक्त ऐकोनि कानीं । अकस्मात एके दिनीं । भेटीलागोनी पातला ॥१५॥ आणिक वैरागी वैष्णवभक्त । दोघे असती संगातें । तें पाहोनि गोपाळ मूर्तीतें । केला प्रणिपात सद्भावें ॥ १६ ॥ कबीर भक्त तये वेळीं । अर्चनें पाहे नेत्र कमळी । उगाचि जावोनि बैसे जवळी । हृदय कमळीं विस्मित ॥ १७ ॥ हें रोहिदासें देखोनि नयनीं । स्वमुखें बोले तये क्षणीं । म्हणे हरिमंदिरासि येऊनि नयनीं । अहंता मनीं कासया ॥ १८ ॥ भक्तवत्सल वैकुंठ विहार । सगुण मूर्ति साकार । यासि न केला नमस्कार । आणि वैष्णव वीर म्हणावितसां ॥ १९ ॥ कबीर बोले प्रती वचन । श्रीरामावांचूनि दैवत आन । आम्हीं न घेवों त्याचें दर्शन । आज्ञा प्रमाण गुरूची ॥ २० ॥ तुवां चर्मांची मूर्ति करोनि वरी । कापूस भरला त्या भीतरीं । यासी नमस्कार प्रिती । कैशापरी करावा ॥ २१ ॥ ऐकोनि कबीराचें वचन । रोहिदास म्हणे त्याजकारण । चामां[3] वांचोनि पदार्थ कोण । तुम्हां कारणें दिसतसे ॥ २२ ॥ शरीर पंचमहाभूतांचें । हें चामें करूनि वेष्टिलें साचें । आणि गोपाळ मूर्ति निंदितां वाचें । मत तुमचें उलटें कीं ॥ २३ ॥ अंडज जारज

१ पृथ्वीवर. २ पूजा. ३ चामडें.

उद्भिज प्राणी । चामें वेष्टिल्या तिन्हीं खाणी । यांत चैतन्यनाथ चक्रपाणी । असे व्यापोनि निराळा ॥२४॥ काहाला ढोल मृदंग निश्चितीं। चर्मे वेष्टित वाद्यें असती । नादब्रह्म बहुता रीतीं । शास्त्र संमती बोलिले ॥ २५ ॥ चामाचा हस्ती शोभिवंत । वस्त्राभरणीं लखलखित । त्यावरी चामाचा नृपनाथ । चामानें पाहत सभोंवतें ॥ २६ ॥ चामाची गाय कपिला कृती । तिचें दूध पवित्र म्हणती । चामाचे दोहणार पयें सेविती । चामाच्या जिव्हें करूनी ॥ २७ ॥ तुम्ही सर्वगत वैष्णव जन । बरें पहा विचारून । चाम मंदिरीं गोपाळ कृष्ण । असे व्यापून निराळा ॥ २८ ॥ ऐकोनि रोहिदासाचें वचन । कबीर बोले धिक्कारून । म्हणे श्रीराम जगाचें जीवन । ऐसीं पुराणें गर्जती ॥ २९ ॥ तुझा कृष्ण द्वापारींचा । खिल्लारी नंदाच्या घरचा ॥ गौळणींनी बांधिला साचा । पराक्रम त्याच्या वाणिसी ॥ ३० ॥ माझा राम सूर्यवंशी । जन्मला दशरथाच्या कुशीं । जो सार्वभौम अयोध्यावासी । सनकादिकांसी प्रिय जो ॥३१॥ रोहिदास बोले प्रतिवचनीं । रामाची किर्ति ऐकिली श्रवणीं । मायामृगापाठीं धांवोनी । सीते लागोनी हरविले ॥ ३२ ॥ कांतेच्या वियोग बाणें । रुदन करीत रानोरान । कवळी वृक्ष पाषाण । तो रघुनंदन तुझा कीं ॥ ३३ ॥ तंव कबीर म्हणे तें वेळीं । तुझा कृष्ण बांधिला उखळी । स्फुंदस्फुंदो रडे वनमाळी । माते जवळी तेधवां ॥ ३४ ॥ आणि श्रीराम माझा परब्रह्म मूर्ती । सीतेची देखोनि सप्रेम भक्ती । धुंडीत गेला वनाप्रती । जगीं सत्कीर्ती व्हावया ॥३५॥ रोहिदास म्हणे रे मोमिना । सार्वभौम म्हणसी रघुनंदना । तरी कां मेळविली वानरसेना । रानोरान हिंडावया ॥ ३६ ॥ श्रीकृष्ण माझा परब्रह्म मूर्ती । यशोदेची देखोनि सप्रेम भक्ती । बांधोनि घेतसे श्रीपती । अवतार स्थिती दावावया ॥ ३७ ॥ जो कळिकाळासि नियंता । त्याजवरी पाकशासने मेघ रिचविता । गोवर्धन धरोनि नखावरुता । व्रजवासी समस्तां रक्षिलें ॥ ३८ ॥ यावरी कबीर उत्तर देत । कृष्ण कळिकाळासि नाहीं भीत । तरी काळयवना पुढें निश्चित । होता पळत कासया ॥ ३९ ॥ वाल्मीक प्राय गोवर्धनास । स्वयें उचलितां मिरविसी यश । श्रीरामाचा कीर्ति घोष । श्रवण सायासें करी कां ॥ ४० ॥ वानरां हातीं महा पर्वत । आणोनि रघुनाथें बांधिला सेत । आणि स्वतां गोवर्धन कृष्ण उचलित । त्याची सत्कीर्त काय गासी ॥ ४१ ॥ ऐसा उभयतांचा संवाद तेथ । विबुध येऊनि ऐकती समस्त । विमानें दाटलीं आकाशांत । गंधर्व गर्जत नामघोषें ॥ ४२ ॥ भक्तिज्ञान वैराग्य पूर्ण । उभयतांसी तत्समान । एकनिष्ठ उपासना । अणुमात्र मन फांकेना ॥ ४३ ॥ जैसे शशि मित्र निश्चितीं । नभ मंडळीं एकवट होतीं । कां हरिहरांची भिन्न आकृती । दोघेजण दिसती सारिखे ॥४४॥ चंद्राचे आंगीं शीतळता । उष्णपणें मिरवे सविता । शिवा आंगीं वैराग्य तत्वतां । विलास भोगिता श्रीहरी ॥ ४५ ॥ यांच्या वृत्ती सकळ जनां । भिन्नाकार दिसती जाण । तेंवीं रोहिदासाची उपासना । कबीराच्या मना न ये कीं ॥ ४६ ॥ असो मागील अनुसंधान । सादर ऐका भाविकजन । रोहिदासासि कबीर म्हणे । श्रेष्ठ रघुनंदन पै

१ चामडे. २ मानव, प्राणी आणि वृक्ष. ३ हत्ती. ४ दूध. ५ जिभेनें. ६ नियंत्रण ठेवणारा. ७ इंद्र. ८ सेतू (पूल) ९ चंद्र. १० सूर्य. ११ सूर्य.

माझा ॥ ४७ ॥ हालाहल घेतलें जाश्वनीळें । तेव्हां सर्वांग पोळों लागलें । राम नाम जपतां ते वेळे । जाहला शीतळ धूर्जटी[1] ॥ ४८ ॥ महा पातकी वाल्हा परम । मरामरा म्हणतां जाहला उत्तम । त्याची सत्कीर्ति जाहली सुगम । त्रिजगतीं प्रेम न समाये ॥ ४९ ॥ आणिक अनंत जड जीव किती । रामनामें उद्धरले क्षितीं । ऐकोनि रोहिदास तयाप्रती । काय वचनोक्ति बोलत ॥५०॥ वनवासा जातां रघुनाथ । शोक करितां निमालों दशरथ । तेणें पावला अधोगत[2] । जन बोलत हे वार्ता ॥ ५१ ॥ ज्याणें पितयासि दुःख दीधलें पाहीं । तो आणिकाचा शेवट करील कायी । ऐकोनि कबीर संतप्त होयी । उणीव न साहे सर्वथा ॥५२॥ म्हणे रे चर्मका[3] अज्ञाना । उणीव आणितोसि रघुनंदना । तूं करितोसि ज्याची उपासना । त्या कपटी कृष्णा जाणतसें ॥ ५३ ॥ देवकीचें उदरीं जाण । आठवा अवतार होईल कृष्ण । तो दैत्यांचे करील निधन । अशरीर वाणी वदोन गेली कीं ॥ ५४ ॥ कंसे ऐकोन हे वार्ता । भय उपजलें त्याचिया चित्तां । मग वसुदेव देवकी उभयतां । घाला घालिता बंदिखानीं ॥ ५५ ॥ तुझ्या कृष्णाचे योगें पाहीं । वसुदेव देवकी कारागृहीं । माता पितयांसि सौख्य कांहीं । दीधलें नाहीं सर्वथा ॥ ५६ ॥ माता बंदिखानीं । असतां जन्मला चक्रपाणी । कंसाचें भय धरोनि मनीं । गेला पळोनी गोकुळीं ॥ ५७ ॥ पायींच्या वाळ्यापासून । चोर जार तुझा कृष्ण । पूतना करवितां स्तनपान । घेतले प्राण पैं तिचे ॥ ५८ ॥ पूर्ण अवतार म्हणवितो जनीं । आणि स्त्रीहत्या केली बाळपणीं । त्याची श्लाध्यता सांगतां जनीं । लज्जा मनीं तुज न ये ॥ ५९ ॥ रोहिदास म्हणे रघुनंदनें । शूर्पणखा विटंबिली जाण । आणि ताटका वधी स्वयें आपण । ते कां आठवण न करिसी ॥ ६० ॥ राम जन्मला सूर्यवंशी । आणि त्यानें स्त्रीहत्या केली कैसी । ऐकोनि रोहिदासाच्या वचनासी । कबीर तयासी बोलत ॥ ६१ ॥ म्हणे रे चर्मका ऐक वचन । चोर जार तुझा कृष्ण । धाकुटपणा पासूनि त्यानें । गोकुळ संपूर्ण चोंढाळिलें ॥६२॥ रिघोनि गोपिकांच्या सदनीं । दधि दुग्ध भक्षिले चोरुनी । त्यासि गौळणी टाकिती बांधोनी । मग मातेसि गाऱ्हाणीं सांगती ॥ ६३ ॥ तुझा कृष्ण साचार । निलाजिरा फजीतखोर । धेवोनि श्रीकृष्ण अवतार । वर्णसंकर केला कीं ॥ ६४ ॥ राम अवतारी रघुनंदन । त्याचे वाल्मिकें वर्णिले गुण । एकपत्नी व्रत पूर्ण । एकचि बाण त्यापासीं ॥ ६५ ॥ जरा मृत्यु दारिद्र्य कैसें । ज्याच्या राज्यांत कोठेंचि नसे । तिन्हीं भुवनीं न माय यश । जो अयोध्याधीश राम माझा ॥ ६६ ॥ ऐसे म्हणोनि कबीर भक्त । उगाच राहिला मग निवांत । सवेंचि म्हणे रोहिदासांतें । उत्तर मातें देयीं कां ॥ ६७ ॥ तुझा माझा प्रतिवाद होत । कां उगाच बैसलासि निवांत । ऐसें जाणोनि वैकुंठनाथ । गजवदनातें अज्ञापी ॥ ६८ ॥ म्हणे गणपती ऐक मात । कबीर रोहिदास माझे भक्त । उपासनाभिमान धरोनि निश्चित । दोघेही भांडत परस्परें ॥ ६९ ॥ तरी तुवां जाऊनि लवलाहें । उभयतांचा करी न्याय । सख्य करोनियां पाहे । सत्वर गतीं ये मजपाशीं ॥ ७० ॥

१ शंकरानें. २ मरण पावला. ३ चांभारा.

आज्ञापितां वैकुंठनाथ । अवश्य म्हणे पार्वतीसुत । रोहिदासाच्या मंदिरा त्वरित । प्रगट साक्षातरूप दाखवी ॥७१॥ गजवदनं लंबोदरं । चतुर्भुज उंदिरावर । एकचि दंत दिसे शुभ्र । सर्वांगीं शेंदूर चर्चिला ॥ ७२ ॥ ऐसें रूप प्रगटोनि जाण । उभयतांचें ऐके भांडण । मग रोहिदासाचा पक्ष धरोन । गजवदन बोलतसे ॥ ७३ ॥ म्हणे कृष्णाची उपासना जाण । यथार्थ भासे मज कारण । तंव कबीर बोले धिक्कारून । म्हणे पुसतें कोण तुजलागीं ॥७४॥ ढेरपोट्या उंदिरावर । बैसोनि सत्वर जाय दूर । आम्ही निधडे वैष्णववीर । तुझें उत्तर नायकों ॥ ७५ ॥ व्यभिचारी रोहिदास निश्चयेंसी । पंचायतनीं पूजितो तुजसी । म्हणवोनि गोष्टी तया ऐसी । या समयासी सांगीतली ॥ ७६ ॥ लांचासाठीं देतोसि गाही । तरी हा न्याय यथार्थ नाहीं । आल्या वाटे परतोनि जायी । मोदक नाहीं मजपासी ॥ ७७ ॥ ऐकोनि कबीराचें वचन । निवांत राहे गजवदन । म्हणे यासीं बोलतां पुरवेल कोण । पातळ उणें काढितो ॥७८॥ हें जाणोनि वैकुंठविहारी । वासरमणीसि आज्ञा करी । म्हणे तुवां जावोनि सत्वरी । न्याय विचारी दोघांचा ॥७९॥ आज्ञापितांचि लक्ष्मीधरें । विप्रवेषें प्रगटे भास्कर । म्हणे रोहिदासाची उपासना थोर । मज साचार वाटत ॥८०॥ कबीर म्हणे सहस्रकरा । तूं कां आलासि या अवसरा । द्वैत भेद तुझ्या अंतरा । जाय माघारा परतोनि ॥ ८१ ॥ सारिखा प्रकाश सर्वांवर । पाडिसी तूं निरंतर । परी कपटी बहुत तुझें अंतर । जाणवलें साचार मज अंतरीं ॥ ८२ ॥ चंद्र शीतळ भासतो खरा । परी कलंक आहे त्याच्या शरीरा । तेवीं निर्मळ प्रकाश पाडिसी दिनकरा । परी द्वैत अंतरा वसतें कीं ॥८३॥ तुझ्याचि वंशीं जाण गभस्ती । अवतरला माझा रघुपती । आणि उच्छेदोनि त्याची भक्ती । सांगसी सत्कीर्ती गौळियाची ॥८४॥ ऐकोनि कबिराची वाणी । निवांत राहे वासरमणी । उत्तर द्यावया परतोनी । कांहींच मनीं सुचेना ॥८५॥ मग वैकुंठीहून लक्ष्मीपती । देवीस आज्ञा करी पुढती । म्हणे तुवां जावोनि सत्वर गतीं । दोघांप्रतीं समजावी ॥ ८६ ॥ मग सिंहावरी बैसोनि जाण । अंबा प्रगटली आपण । रोहिदासाच्या सदना येऊन । संवाद तिने ऐकिला ॥ ८७ ॥ कृष्णभक्ताचा धरोनि पक्ष । देवी स्वमुखें देतसे साक्ष । म्हणे रोहिदास हा परमदक्ष । लाविलें लक्ष परब्रह्मीं ॥ ८८ ॥ ऐकोनि मायेचें उत्तर । कबीर म्हणे परतीसर । आम्ही निधडे वैष्णववीर । तुझें उत्तर नायकों ॥ ८९ ॥ सेंदूर शेरण्या इच्छिसी बळी । हें तों न चले मज जवळी । पशु बोकडासी घेसी बळी । ऐसें काळीं जाणवो ॥९०॥ ऐसें वदतां श्रीरामभक्त । देवी राहिली मग निवांत । परतोनि उत्तर द्यावया निश्चित । कांहींच तीयें सुचेना ॥ ९१ ॥ ऐसें जाणोनि देवाधिदेव । मग मध्यस्थ पाठविला शिव । म्हणे कबीर आणि रोहिदास वैष्णव । भांडती अपूर्व मज वाटे ॥९२॥ एक रामभक्त असे पूर्ण । कृष्ण उपासक एक जाण । निकरें होय त्यांचें भांडण । तरी समजावोन येणें सत्वर ॥९३॥ अवश्य म्हणवोनि शूळपाणी । पातले रोहिदासाचें सदनीं । दशभुजा पंचवदनी । प्रगट नयनीं दीसत ॥ ९४ ॥ तों कबीर म्हणे थोर

१ गणपती. २ सूर्यास.

रघुपती । रोहिदास अर्चित गोपाळमूर्ती । हें देखोनि कैलासपती । काय बोलती तेधवां ॥९५॥ म्हणे वैकुंठवासी नारायण । येथें पाठवी मजलागुन । कीं उभयतांचें तोडोनि भांडण । सख्य करणें निश्चित ॥ ९६ ॥ तो वृत्तांत ध्यानासि आणितां प्रीतीं । मजला भासे ऐशा रीतीं । कीं सत्य रोहिदासाची भक्ती । कैलासपती म्हणतसे ॥९७॥ ऐकोनि कबीर सक्रोध । मग उत्तर बोलत असे रागें । म्हणे शंकरा तुवां घेतला जोग । यथेष्ट भांग भक्षावया ॥ ९८ ॥ धत्तूर खावोनि दिवसनिशीं । स्मशानामाजी क्रीडतोसी । उपासना भक्ती कैसी । ते सर्वथा तुजसी नेणवे ॥ ९९ ॥ त्वां पूर्वी घेतलें हालाहल । तेव्हां रामनामें झालासि शीतळ । तो आठव नसेचि अळुमाळ । आणि भलतेंच बरळ बोलसी ॥१००॥ पंचायतन मांडोनि पाहीं । रोहिदास पूजितो आपलें गृहीं । त्या लांचास्तव ये समयीं । दीधली ग्वाही शंकरा ॥१॥ ऐसें वदतां भक्त कबीर । विमानीं बैसोनि ऐकती सुर[1] । गदगदां हांसती सर्वत्र । जयजयकार करोनि ॥२॥ ऐकोनि कबीराची वाणी । निवांत राहे पिनाकपाणी । म्हणे आम्हांसि उत्तर द्यावया कोणी । नव्हता त्रिभुवनीं धुंडितां ॥ ३ ॥ मीही श्रीराम उपासक पाहीं । ऐसें चित्त देतसे ग्वाही । परी बोलत ये समयीं । बरळलों कायी कळेना ॥४॥ तें वर्म धरोनि कबीर भक्तें । शब्द शस्त्रें ताडिलें मातें । नाहीं सुचत ये समयीं ॥ ५ ॥ ऐसें म्हणोनि धूर्जटी । निवांत राहे आपुलें पोटीं । कबीर रोहिदास बोलती गोष्टी । ते कर्णसंपुटीं ऐकत ॥६॥ एक म्हणे श्रीराम थोर । तयासि भजे निरंतर । एक म्हणे कृष्ण अवतार । तयासि भजे सर्वदा ॥ ७ ॥ दोघेही हट्टी वैष्णव वीर । एक मेरु एक मंदर । कां एक शशी एक मित्र । भासती साचार या रीतीं ॥ ८ ॥ कां एक वासुकी दिसतो खरा । आंवरोनि धरिली वसुंधरा । एक चक्षुःश्रवा वरा । पृथ्वीच्या भारा वाहावया ॥९॥ कां एक शुक्र एक गुरु जाण । देवा दैत्यांसि पूज्य मान । दोहींचा सारिखा अभिमान । सद्विद्येनें सम जैसें ॥ ११० ॥ भक्ती ज्ञान वैराग्यें तैसे । समान कबीर रोहिदास । परी उपासना भिन्न दिसे । हे संवादासी कारण ॥ ११ ॥ कां एक नारद एक तुंबर । कीर्तननिष्ठ परिकर । कां एक खगपती एक साचार । महा वानर मारुती ॥ १२ ॥ उभयतांचें मन जाणा । नये एकमेकांच्या मना । संकट पडिलें जगज्जीवना । मनमोहना श्रीहरी ॥१३॥ म्हणे मध्यस्थ पाठविले थोर थोर । परी कार्य नव्हे आणुमात्र । आतां आपण जावोनि तेथवर । चित्त एकत्र करावें ॥ १४ ॥ कुऱ्हाड कातर कुमाणुस । मध्यस्थ पडिले ज्या ठायास । तरी तत्काळ तेथें होय नाश । अनर्थास हें मूळ ॥ १५ ॥ सुईसुहागी सुमासपाहीं । मध्यस्थ पडिलीं जिये ठायीं । तेथें द्वैत नसेचि कांहीं । एकत्र ठायीं मेळविती ॥ १६ ॥ मी विश्वात्मा जगज्जीवन । जाहलों असे भक्ताधीन । तैसें दर्शन त्यांसि देऊन । सख्य करीन निश्चित ॥ १७॥ ऐसें म्हणोनि शार्ङ्गधर । गरुडारूढ जाहले सत्वर । सांवळा सुकुमार राजीवनेत्र । मुख मनोहर जयाचें ॥ १८ ॥ चतुर्भुज सांवळी मूर्ती । शंख चक्र आयुधें हातीं । दिव्य कुंडलें कानीं तळपती । मकराकृती सुढाळ ॥ १९ ॥ ऐशा

१ शंकर. २ मुळींसुद्धा. ३ देव. ४ शंकर. ५ सूर्य. ६ पृथ्वी.

रीतीं चक्रपाणी । पातले रोहिदासाचें सदनीं । नीलोत्पल पुष्पें तये क्षणीं । सुरवर वरूनी टाकिती ॥ १२० ॥ कवीराचा रक्षावया मान। स्वयेंचि जाहले रघुनंदन । हातीं घेतले धनुष्यबाण । सुकुमार ठाण साजिरें ॥२१॥ कवीर उघडी नेत्रपातीं । तों पुढें देखिली आराध्य मूर्ती। अष्टही भावो दाटे निश्चिती । मग सीतापती आलिंगिला ॥२२॥ श्रीरामाचें चरणकमळ । लक्षोनि त्यावरी कवीर लोळे । म्हणे माझे मनोरथ जाहले सुफळ । धन्य काळ सुदिन हा ॥ २३ ॥ विलोकितां श्रीरामातें । नेत्रीं न लागे पात्यासीं पातें । तों नवल वर्तलें देखत देखत । ते ऐका निजभक्त भाविकहो ॥२४॥ देखत देखत कवीरातें । स्वरूप पालटलें श्रीरघुनाथें । धनुष्यबाण जाहले गुप्त । मुरली हातें वाजवी ॥ २५ ॥ मुगुट लोपला सत्वरी । मयूर पिच्छें दिसती शिरीं । देहुडा पाउली वाजवी मोहरी । कवीर नेत्रीं पाहतसे ॥ २६ ॥ हें रूप देखतां रोहिदास । येवोनि लागला चरणास । म्हणे धन्य आजिचा दिवस । हृषीकेश भेटला ॥ २७ ॥ कवीर रोहिदास ते वेळीं । दोघेही धरिले हृदयकमळीं । म्हणे द्वैत कल्पना टाकोनि सकळीं । खेळीमेळी असावें ॥ २८ ॥ रामकृष्ण नामाभिधान । अवतार लीला दाखविल्या दोन । परी निज तत्त्व तें एकचि पूर्ण । नाहीं भिन्न सर्वथा ॥ २९ ॥ अपर्णा आणि पार्वती । नीळकंठ आणि कैलासपती । तेवीं रघुपती आणि कृष्ण मूर्ती । एकत्र चित्तीं आणिजे ॥१३०॥ गरुड आणि खगेश्वर । कां समुद्र रत्नाकर[1] । तेवीं गोपती आणि रामचंद्र । चित्तीं एकत्र जाणिजे ॥ ३१ ॥ इंद्र आणि आखंडल । तीर्थ मिश्रित असे जळ । तेवीं रामचंद्र आणि गोपाळ । स्वरूप केवळ एकची ॥ ३२ ॥ ऐसें वदतां शेषशायी । कवीर रोहिदास लागले पायीं । द्वैतभेद होता देहीं । निरसोनि सर्वही तो गेला ॥ ३३ ॥ इतुकें कौतुक देखोनि पाहीं । सुरवर गेले आपुल्या ठायीं । अदृश्य जाहले शेषशायी । भक्ताचें हृदयीं तेधवां ॥ ३४ ॥ भक्ताचें हृदयीं जगन्निवास । करितसे अक्षयीवास । कवीर आणि रोहिदास । म्हणे धन्य दिवस आजिचा ॥ ३५ ॥ स्वामींनीं येथवर केलें येणे । जाहलें संवादासि कारण । म्हणवोनि साद्यंत दर्शन । जगज्जीवनें दीधलें ॥ ३६ ॥ ऐसें म्हणवोनि ते समयीं । रोहिदास लागला पायीं । कवीरें तयासि लवलाहीं । उठोनि हृदयीं धरियेलें ॥ ३७ ॥ मग पाक निष्पत्ति करोनि जाण । संतांसि घातलें भोजन । मुखशुद्धीसि तुळसी पान । निज प्रीतीनें देतसे ॥ ३८ ॥ आज्ञा मागोनि रोहिदासासी । कवीर चालिले वाराणसीं । रामरूप धरोनि मानसीं । सप्रेम सुस्वामी पावले ॥३९॥ जाते समयीं कवीरभक्त । रोहिदासासि काय सांगत । चाऱ्ही दैवतें शाळग्रामांत । न पूजी निश्चित सर्वथा ॥४०॥ नर्मद्या बाण शक्ति कोडें । सूर्यकांत दैवत गाढें । यांच्या पूजनीं न धरी चाड । संप्रदाय पुढें चालेल कीं ॥ ४१ ॥ एक विष्णू वांचूनि दैवत पूजिती । तरी तेचि जाणावी व्यभिचार भक्ती । ही परस्पर आम्हीं ऐकिली कीर्ती । मग सत्वर गती पातलों ॥ ४२ ॥ तरी आतां सावध होऊनि मनीं । विष्णुवीण दैवत न पूजी कोणी । अवश्य म्हणोनि तये क्षणीं । रोहिदास चरणीं लागला

---

[1] कासीस.

॥ ४३ ॥ तद्देशीं अद्यापवरी जाण । शाळग्राम पुजिती वैष्णवजन । एकनिष्ठ उपासन । न फांके मन आनाठायीं ॥ ४४ ॥ असो कबीर गेला वाराणसीं । रोहिदास पातले घरासी । श्रीविष्णुमूर्ति अहर्निशीं । वसे मानसीं सर्वदा ॥ ४५ ॥ तंव श्रोते आशंकित होवोनियां । आदरें प्रश्न करिती वक्तया । म्हणती चर्मकासि साक्षात्कार व्हावया । तपश्चर्या ते कोणती ॥ ४६ ॥ त्याचें सकळ जन्मांतर । आम्हांसि निवेदी साचार । नीच योनींत वैष्णववीर । कशास्तव साचार जन्मला ॥ ४७ ॥ ऐकोनि सज्जनांचें प्रश्नोत्तर । वक्ता आनंदें देतसे उत्तर । रामानंद स्वामी साचार । यतिराज थोर पैं होते ॥ ४८ ॥ त्यांनीं एक ब्राह्मण ब्रह्मचारी । संप्रदायी केला ते अवसरीं । तयासि सांगितली चाकरी । पीठ घरोघरीं मागावें ॥ ४९ ॥ भिक्षेचें अन्न अपवित्र निश्चितीं । धर्मशास्त्रीं बोलिली पद्धती । तें पोटभर सेवितां ही प्रीतीं । तरी निश्चक्र म्हणती साधक ॥ १५० ॥ एकानेंच साहित्य दीधलें जरी । तरी तें न ध्यावें आपुलें पदरीं । सद्गुरूनें पद्धती लाविली बरी । तैसेंचि करी ब्राह्मण तो ॥ ५१ ॥ भिक्षा मागोनि पीठ चुकटी । पाक सिद्धि करितसे मठीं । रामानंद क्षुधित होतांचि पोटीं । ध्यानांत जगजेठी आणितसे ॥ ५२ ॥ मानसपूजा करूनि तेव्हां । मग नैवेद्य समर्पी देवा । उरला प्रसाद आपण ध्यावा । संतोष जीवां मग होय ॥ ५३ ॥ ऐसे लोटतां दिवस बहुत । तों विघ्न ओढवलें अकस्मात । ब्रह्मचारी नगरांत भिक्षेसि जात । तों पर्जन्य बहुत लागला ॥ ५४ ॥ एका वाणियाच्या दुकानापासी । उभा राहिला वळचणीसी । जातां नयेचि भिक्षेसी । चिंता मानसीं उद्भवली ॥ ५५ ॥ वाणी म्हणे हा द्विजवर । उभा राहिला घटका चार । मग दोघांचें साहित्य सत्वर । देतसे साचार ते समयीं ॥ ५६ ॥ ते घेवोनियां ब्रह्मचारी । मठासि आला मग सत्वरी । पाक निष्पत्ति करोनि बरी । नैवेद्य पात्रीं वाढिला ॥ ५७ ॥ रामानंद मानसपूजा करी । परी नैवेद्य सर्वथा न जेवीच श्रीहरी । शिष्यांसि पुसतां ते अवसरीं । कृत्रिम परी त्वां केली ॥ ५८ ॥ अपवित्र अन्न मेळविलें आंत । यास्तव न जेवी वैकुंठनाथ । ब्रह्मचारी होऊनि भयभीत । साकल्य वृत्तांत सांगितला ॥ ५९ ॥ आज पर्जन्य वर्षला[1] भारी । मागतां नयेचि घरोघरीं । मग एका व्यवसायानें सत्वरीं । शिधा पदरीं बांधिला ॥१६०॥ त्याची करोनि पाक निष्पत्त । नैवेद्य वाढिला आहे सत्य । ब्रह्मचारियाची ऐकोन मात । रामानंद शापित तयासी ॥ ६१ ॥ म्हणे आम्हांसि न सांगतां जाण । व्यवसायाचें घेतलें अन्न । तरी चर्मक योनि भोगिसी पूर्ण । सत्य प्रमाण हे वाचा ॥ ६२ ॥ ब्रह्मचारी लागतसे पायीं । उःशाप बोलावा जी कांहीं । सद्गुरु म्हणती ते समयीं । विष्णुभक्त पाहीं तूं होसी ॥ ६३ ॥ तुझिया भक्तिस्तव साचार । श्रीहरि देईल साक्षात्कार । भक्तिमार्गासि जीर्णोद्धार । तुझ्यानें साचार होईल ॥ ६४ ॥ रामानंद बोलतां ऐसें । ब्रह्मचारी लागला पायांस । कांहीं लोटतां दिवस । तों नवज्वर देहास जाहला ॥६५॥ तों चरण संपुष्ट तये क्षणीं । नूतन आणूनि दिधलें कोणी । ते कोनाड्यांत समोरे ठेउनी । पाहातसे

1. पाऊस.

नयनीं सर्वदा ॥ ६६ ॥ चित्तीं हेत गुंतला जाण । म्हणे मी त्यालों नाहीं पायतन । व्याकुळ होतां सोडिले प्राण । श्रीहरि स्मरण करितांची ॥ ६७ ॥ निजकर्माची विचित्र परी । पुढें गेला चर्मक उदरीं । नवमास भरतांचि सत्वरी । गर्भा बाहेरी पडियेला ॥ ६८ ॥ माता संबोधितां आपण । परी कदापि न करी स्तनपान । तंव रामानंदासि वर्तमान । शिष्य येवोन सांगती ॥ ६९ ॥ म्हणती तुम्ही शापिला ब्रह्मचारी । तो अवतरला चर्मकाचें उदरीं । परी स्तनपान न करीच निर्धारीं । तरी आपण तेथवरी चलावें ॥ १७० ॥ मग चर्मकाच्या वाडिया बाहेर । उभे ठाकले यतीश्वर । लेकरूं आणोनि समोर । तयासि उत्तर बोलती ॥ १७ ॥ आपुल्या निज कर्मगती करूनी । जे प्राप्त जाहली असे योनी । तोचि जन्म उत्तम मानुनी । श्रीहरि स्मरणीं लागिजे ॥ ७२ ॥ ऐसी आज्ञा होतांचि जाण । बाळकें केलें हास्यवदन । आडवें घेतांचि मातेनें । घेतलें स्तन मुखांत ॥ ७३ ॥ ऐशा रीतीं तो योगभ्रष्ट जाहला । दिवसें दिवस वाढिन्नला । आपुलें कसब करूं लागला । परी अमंगळ त्याला नावडे ॥ ७४ ॥ वेगळेंचि खोपट बांधोनी । शुचिर्भूत केलें सारवूनी । तुळसी वृंदावन अंगणीं । सडासंमार्जनीं लखलखित ॥ ७५ ॥ नित्य स्नान केल्यावांचोण । सर्वथा न सेवीच जीवन । मुखीं अखंड नामस्मरण । संत सज्जनां पूजितसे ॥ ७६ ॥ वैष्णव मंदिरासि आलिया । शिधा साहित्य देतसे तयां । पाक पात्रें देवोनियां । आपुल्या ठायां जेववीत ॥ ७७ ॥ रंगीत चर्म घेऊनि आयतें । यात्रेकऱ्यांची पायतनें सांधित । कोणासि नूतन जोडे देत । परोपकारार्थ तेधवां ॥ ७८ ॥ ऐशी असतां उदास परी । तों यात्रा जातसे काशीपुरीं ।त्यांतील बैरागी वैष्णव कोणीतरी । रोहिदासाचें मंदिरीं पातला ॥ ७९ ॥ म्हणे अधेला घेऊन त्वरेनें । सांधोनि देयीं पायतनें । रोहिदास कांहींच न घे जाण । म्हणे कृपादान इच्छितसें ॥ १८० ॥ तुम्ही काशीस जातां सत्वर । तरी भागीरथीसि सांगा नमस्कार । एक अधेला घेऊनि साचार । वैष्णव वीर देतसे ॥ ८१ ॥ म्हणे सकळ तीर्थांचि स्वामिनी । जिचा उगम श्रीविष्णु चरणीं । तिसि हें तुळसीदळ अर्पूनी । प्रसाद घेऊनी या कांहीं ॥८२॥ अवश्य म्हणे रोहिदासासी । मग यात्रेकरू गेले काशीसी । स्नान करितां भागीरथीसी । तों स्मरण मानसीं जाहलें ॥ ८३ ॥ अधेला सोडिला त्वरित । तों विष्णु कन्येनें काढिला हात । आवडीने घेऊनि मुठींत । प्रसाद देत कांकणं[1] ॥ ८४ ॥ म्हणे रोहिदास भक्त विष्णुस्मरणी । तयासि द्यावें हें नेउनी । ऐसी उदकांतून निघतां ध्वनी । यात्रेकरी मनीं विस्मित ॥ ८५ ॥ रत्नजडित सुवर्ण कंकण । जैसें निर्मिलें चतुराननें[3] । तें घेऊनि यात्रेकऱ्यानें । दीधलें म्हणोन रोहिदासा ॥ ८६ ॥ म्हणे तुझा भाव पाहोनि निश्चितीं । प्रसन्न जाहली भागीरथी । अधेला घेवोनियां प्रीतीं । प्रसाद मज हातीं पाठविला ॥ ८७ ॥ ते रोहिदासें पाहोनी त्वरित । म्हणे उपाधि कासया धाडिली मातें । मी तुझ्या जळें करोनि तृप्त । मग देव्हारीं पूजित कांकण ॥ ८८ ॥ रात्रीं उजेड दीपकाचा । तैसाचि प्रकाश पडे त्याचा । परी रोहिदास

१ ओंडे. २ कंकण. ३ ब्रह्मदेवानें

अभिलाष न धरी साचा । तो मेळा वैष्णवांचा पातला ॥ ८९ ॥ शिधा साहित्य द्यावयासि पाहीं । मंदिरीं ऐवज नसे कांहीं । मग कांकण घेऊनि ते समयीं । नेत लवलाहीं मोडावया ॥१९०॥ सकळ याती माजी साचा । ठक तो सोनार जातीचा । काया आणि मनें वाचा । विश्वास त्याचा धरूं नये ॥ ९१ ॥ रोहिदास भोळा वैष्णव जाण । सोनारासि अमोल दिधलें कंकण । संतांसि पाहिजे जितुकें अन्न । तितुकेंचि जाण मोल मागे ॥ ९२ ॥ तृप्त झालिया वैष्णवजन । चित्तीं पावला समाधान । म्हणे प्रसाद पाठविला मातेनें । तो सत्कारणीं पूर्ण वेंचला ॥ ९३ ॥ ऐसें म्हणतां तये संधीं । तो सोनार अति दुर्बुद्धी । त्याणें राजद्वारासि जाऊनि आधीं । करीत उपाधी काय तेव्हां ॥ ९४ ॥ तेथील अधिकारी यवन[1] । तयासि दाखवी तो दुर्जन । म्हणे रोहिदासें वोपिलें मजलागुन । तरी दुसरें मागून घ्यावें तुम्हीं ॥ ९५ ॥ ऐसी कुबुद्धी ऐकूनि कानीं । यवनें संतापला तो मनीं । मग रोहिदासासि बोलावुनी । म्हणे जोडा आणुनी दे याचा ॥ ९६ ॥ विष्णुदास म्हणे तयाप्रती । तीर्थांत श्रेष्ठ भागीरथी । तिणें यात्रेकऱ्याचे हातीं । प्रसाद मजप्रती धाडिला ॥ ९७ ॥ साधु संत आलिया जाण । घरीं नव्हतें धन धान्य । मग सोनारासि विकिलें कांकण । सत्य प्रमाण हे वाचा ॥ ९८ ॥ दुसरें कांकण असतें घरीं । तरी तुम्हांसि देतों ये अवसरीं । सांगीतले नानापरी । परी विश्वास अंतरीं न ये त्याच्या ॥९९॥ म्हणे याचा जोडा दे आणून । नाहींतरी शिक्षा पावसी जाण । संकटीं पडला वैष्णव जन । मग रायासि वचन बोलतसे ॥ २०० ॥ म्हणे कृपा करोनि मजप्रती । मंदिरासि चलावें सत्वरगती । तेथें प्रार्थूनि भागीरथी । कंकण निश्चितीं दाखवीन ॥ १ ॥ जोड्यास जोडा मिळाला तर । तुम्ही काढोनि घ्यावा सत्वर । आणि हेंच भागीरथी नेलें जर । तरी मजवर शब्द नाहीं ॥२॥ अवश्य म्हणोनि ते अवसरीं । राजा सत्वर पातला घरीं । मग रोहिदासें विष्णुकुमरी । नानापरी स्तवियेली ॥ ३ ॥ म्हणे सकळ तीर्थांची स्वामिनी । माय मज दर्शन दे लवलाहे । ऐसें म्हणोनि मोकली धाय । तों कौतुक काय वर्तलें ॥ ४ ॥ श्रीविष्णुचे पाय आठवितां चित्तीं । तो काथवटींत प्रगटली भागीरथी । शुभ्र उदका पाहतां भूपती । आश्चर्य चित्तीं करितसे ॥५॥ तया जाळांतून निश्चित । कंकण मंडित निघाला हात । राजा दुसरें कांकण लावोनि पहात । तो चरित्र अघटित जाहलें ॥ ६ ॥ रायाचे हातींचें कांकण निश्चितीं । आपेआप उघडोनि सत्वरगती । बैसले भागीरथीचे हातीं टकमक पाहाती तोंडाकडे ॥ ७ ॥ इतुकें कौतुक दाखवोनि जाणा । आदृश्य जाहली तितुकी रचना । राजा धांवोनि धरी चरणा । म्हणे व्यर्थ छळणा म्यां केली ॥ ८ ॥ जैसी तैसी आर्ष वचनें । संतीं सादर केलीं श्रवणें । न्यूनाधिक कायते नेणें । जाणे रुक्मिणीरमण श्रीहरी ॥ ९ ॥ बुद्धिवृत्तीस उल्लेख लहरी । तुम्ही देतसां सर्वोपरी । महीपतीसि करोनि निमित्तधारी । ग्रंथ विस्तारी वाढविला ॥२१०॥ स्वस्ति श्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ भाविक परिसोत भक्त । द्वादशाध्याय रसाळ हा ॥२११॥ ओव्या ॥२११ ॥ अध्याय १२ वा संपूर्णमस्तु ॥

१ मुसलमान.

अध्याय १३



श्रीगणेशायनमः ॥ जय जय अनाथबंधु रुक्मिणीवरा । भक्तवत्सला कृपासागरा । करुणासिंधु दीनोद्धारा । सर्वेश्वरा पांडुरंगा ॥१॥ सकळ मंगळ मंगळाधीशा । अंमगळातीत हृषीकेशा । विश्वोद्धारा पूर्णपरेशा । अभंगवेषा जगद्गुरु ॥२॥ जय चित्तचालका चैतन्यघना । अंतर्ज्योती मधुसूदना । मायातीता गुणनिधाना । निर्गुणसगुणा सुखाब्धी ॥ ३ ॥ भक्तकार्याची आवड मोठी । निजांगें पावसी संकटीं । लाघव दाविसी जनदृष्टीं । सत्कीर्ति गोमटी ते होय ॥ ४ ॥ तुझा भरंवसा धरोनि चित्तांत । आरंभिलें भक्तलीलामृत । सिद्धीस न्यावा संपूर्ण ग्रंथ । नाना आघात चुकवोनी ॥ ५ ॥ तरी बुद्धिहीन मंदमती । अर्थ अन्वय नकळे चित्तीं । कैसीं अक्षरें ल्याहवीं ग्रंथीं । हें मजप्रती कळेना ॥ ६ ॥ समर्थे हातीं धरीलियावर । मग कोण करी याचा अव्हेर । कां लोहासि परीस लागलियावर । तरी मोल फार होय त्याचें ॥ ७ ॥ तेवीं तुझ्या कृपेनें रुक्मिणीपती । आर्ष वचनें होतील सरती । येऱ्हवीं मी पामर मूढमती । लोक जाणती सर्वत्र ॥ ८ ॥ तुझा तूं सूत्रधारी खरा । ऐसें पूर्ण कळों येतसे अंतरा । आतां मज देऊनि अभयवरा । भक्तचरित्र वदवावें ॥९॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । रामउपासक भक्त कबीर । आणि कृष्ण उपासक रोहिदास थोर । संवाद साचार त्यांसीं जाहला ॥ १० ॥ आतां श्रीएकनाथ प्रतिष्ठानीं । विष्णु अवतार प्रगटला जनीं । त्याचें चरित्र रसाळ वाणी । सादर सज्जनीं परिसिजे ॥ ११ ॥ श्रीभानुदास भक्त शिरोमणी ॥ पांडुरंग मूर्ती आणिली त्यांणी । त्याचा पुत्र सुलक्षणी । चक्रपाणी नांव त्याचें ॥ १२ ॥ त्याचा पुत्र सूर्यनारायण । जो ज्ञानप्रकाशें देदीप्ययान । त्याची कांता सुलक्षण । नाम रुक्मिणी तिजलागीं ॥ १३ ॥ त्या रुक्मिणीचें उदरीं निश्चित । परब्रह्मरूप एकनाथ । जो जगद्गुरु मूर्तिमंत । विश्वहितार्थ कलियुगीं ॥१४॥ त्या एकनाथाची बाळपणीं । मातापिता क्रमिलीं[1] दोन्ही । परी पितामह चक्रपाणी । तया लागोनी प्रतिपाळी ॥ १५ ॥ आजा आजी असतां देख । तेच करिती कोड कौतुक । बाळ बहुत सुलक्षणिक । देखोनि सुख उभयतां ॥ १६ ॥ बाळपणीचे खेळ निश्चितीं । एकनाथासि नावडती । गोटे मांडोनि देव करिती । पुष्पें वाहती त्यांलागीं ॥१७॥ खांद्यावरी पळी[2] घेवोनि जाणा । त्याचा करितसे ब्रह्मविणा । बोबड्या शब्दे करोनि जाणा । वैकुंठ राणा आळवित ॥१८॥ कोणी हरिदास गाती कीर्तनीं । त्याचे शब्द ऐकोनि कानीं । तेच म्हणतसे पडताळुनी । सप्रेम होउनी नाचत ॥ १९ ॥ देखोनि तयाचा आर्षभाव । खड्यामध्येंच प्रगटे देव । भक्तीचा भुकेला रमाधव । वस्तीसि ठाव तो केला ॥ २० ॥ रामकृष्ण हरिगोविंदा । अच्युतानंत आनंदकंदा । हीं नामें उच्चारित सदा । श्रीगोविंदा जगद्गुरु ॥ २१ ॥ कांडुक घेऊनियां करीं । जीर्ण वस्त्राची पताका करी । ते खांद्यावरी घेऊनि सत्वरी । म्हणे पंढरीसि सत्वरी मी जातों ॥ २२ ॥ ऐसीं बाळपणींचीं सगुण चिन्हें । देखोनि वडिलांसि समाधान । रामराम सर्वदा उच्चारण । एकही क्षण न राहे ॥ २३ ॥ इतर लेंकरें जैशा रीतीं । नसतीच आळ सर्वदा घेती । एकनाथाची तैसी

१ मरण पावली. २ काठी.

स्थिती । नसे निश्चितीं सर्वथा ॥२४॥ जेव्हां जें जैसें भातुकें देती । तितक्यानें संतोष मानी चित्तीं । जैशी पुढील होणार रीती । चिन्हें दिसती तैसीच ॥२५॥ चक्रपाणी म्हणे कांतेप्रती । भानुदास आमुचा पिता निश्चितीं । त्याणें आराधिली पांडुरंगमूर्ती । मग प्रसन्न श्रीपती त्यासि झाला ॥२६॥ विठोबा म्हणे ते समयीं । भानुदासा वर माग कांहीं । म्हणे तूं माझ्यावंशीं अवतार घेयी । इच्छा नाहीं आणिक मज ॥२७॥ ऐसी ऐकोनियां मात । अवश्य म्हणे रुक्मिणीकांत । तोचि हा अवतरला एकनाथ । मजला भासत ऐशा रीतीं ॥२८॥ कांता म्हणे यथार्थ वचन । मानवी नव्हे हा बाळ सगुण । मातापिता असती जाण । तरी निवती लोचन देखतां ॥२९॥ ऐसें म्हणवोनि ते वेळां । निज पुत्राचा आठव जाहला । सद्गदित होवोनियां गळां । आसुवें डोळा वाहती ॥३०॥ सवेंचि धीर धरी सुंदर । म्हणे येव्हढा झीड वांचला जर । होईल वंशासि उद्धार । पावतील परत्र आपणांसि ॥ ३१ ॥ ऐसें करोनियां समाधान । करी पौत्राचें लालन । साहवे वर्षीं व्रतबंधन । निजप्रीतीनें ते करिती ॥३२॥ जैसी कुळगुरु आज्ञा करीत । तैसाचि वर्ते एकनाथ । त्रिकाळ संध्या असे करित । विधियुक्त सर्वदा ॥३३॥ शौचासि जावोनि आपण । मृत्तिकापाद प्रक्षाळण । स्नानाविरहित न सेवी जीवन[1] । न बोले वचन जेवितां ॥३४॥ अध्ययन कांहीं ब्राह्मण सांगत । पवमानाची घेतसे सांत । पाठांतर व्हावया निश्चित । क्लेश न लागत तयासी ॥ ३५ ॥ पितामह आपुलें गृहीं । पिशाच लीपे[2] सांगतसे पाहीं । तेही विद्या आली सर्वही । आयासें[3] कांहीं न करितां ॥ ३६ ॥ एकनाथाची अघटित चर्या । प्रपंच मात नावडेचि तया । वैष्णव कुळीं जन्मोजया । तैशीच क्रिया आचरे ॥३७॥ सद्वंशींच उपजे सुशीळ । तयासि वंदिती सकळ । वंद्य तयासि अनुकूळ काळ । स्वप्नींही हळहळ[4] असेना ॥ ३८ ॥ हळहळ न करी जो चित्तांत । तोचि जाणावा विष्णुभक्त । भक्ति तेथेंचि रावत । सिद्धि समस्त आंदण्या ॥ ३९ ॥ असोत हीं भाषणें निश्चितीं । एकनाथाची अनुपम स्थिती । श्रीराम भजनीं लागली प्रीतीं । आश्चर्य करिती जन लोक ॥ ४० ॥ म्हणती वय तों याचें असे लहान । परी सर्वदा विरक्त असे मन । हास्य विनोद नायिकेची जाण । पुराण श्रवण करितसे ॥ ४१ ॥ श्लोक बोलतां अर्थांतर । सांगतां कांहीं न पडे अंतर । तरी आपण सांगती तया सत्वर । ऐकतां द्विजवर सुखावती ॥४२॥ म्हणती हा योगभ्रष्ट जाण । वेदांतज्ञानी असे निपुण । जगदुद्धार करावया पूर्ण । मनुष्यपणें अवतरला ॥ ४३ ॥ एकनाथ एकांत समयीं जाण । पंडितासि कांहीं पुसे प्रश्न । ऐकोनि कुंठित होय ब्राह्मण । म्हणे शिकविलें ज्ञान आमचें ॥ ४४ ॥ उदर निमित्तार्थ निश्चितीं । आम्हीं शिकलों पुराण व्युत्पत्ती । हे अनुभवाचे उद्गार नव्हेती । तुझी प्रश्नोक्ती अनुपम ॥४५॥ थिल्लरें[6] तोंवरी दिसतें थोर । जों देखिला नाहीं रत्नाकर[5] । तेवीं आमुचें ज्ञान तुझ्या समोर । गौण साचार एकनाथा ॥ ४६ ॥ दीपका पुढें खद्योतें[7] तेज । सत्वर लपोनि जाय सहज । तेवी तुझा प्रश्न ऐकोनि मज । चित्तीं उमज न पडेची ॥ ४७ ॥ तोंवरीच उडूगण

---

१ पाणी. २ लीपी. ३ प्रयत्न. ४ डचकें. ५ समुद्र. ६ थिटें. ७ काजव्याचें.

शोभिवंत । जंव उदयासि न ये रोहिणीकांत । तेवी तुझिया प्रश्नापुढें निश्चित । न चले स्फूर्त आमुची ॥४८॥ कां ओपधींचा चमत्कार आगळा पाहीं । जंव सुधारस दृष्टीसि देखिला नाहीं । तेवीं तुझा प्रश्न ऐकतांचि कांहीं । युक्ति सर्वही कुंठित ॥ ४९ ॥ नातरी उदयासि येतां भास्करें । जेव्हां अभ्रासारिखा दिसतो चंद्र । तैशीच तुझ्या ज्ञाना समोर । आमुचीं उत्तरें दीसती ॥ ५० ॥ ऐसी पुराणिकें करितां स्तुत । मग एकनाथ नमस्कारी त्यातें । म्हणे मज बाळकाचें वचन निश्चित । राग चित्तांत न धरावा ॥ ५१ ॥ पुराणिकें सत्वर उठोन । हात उतरी मुखावरून । म्हणे तुझ्या गुणांवरून । निंब लोण करावें ॥ ५२ ॥ दिससी परब्रह्मींचा पुतळा । आणि आग्रहांसि दाविसी बाळलीला । दैवें करोनि देखिलासि डोळां । सफळ जाहला संसार ॥ ५३ ॥ एकनाथ म्हणती ते अवसरीं । कांहीं संशय वाटला जरी । तरी कोणासि पुसावें निर्धारीं । हें मज सत्वर सांगिजे ॥ ५४ ॥ पंडित सांगे ते अवसरा । संसारी सद्गुरु असावा सोयरा । तरीच भवपाश तुटेल खरा । जन्म मृत्यु वेरझारा चूकती ॥ ५५ ॥ ऐसें ऐकतांचि वचन । एकनाथाचें वेधलें मन । म्हणे आतां अनन्यभावें करून । जावें शरण सद्गुरूसी ॥ ५६ ॥ गुरु तों व्यापक ब्रह्मांडभुवनीं । रितें स्थळ न दिसे त्याजवांचोनी । परी सगुण स्वरूप पाहोनि नयनीं । सेवा निशिदिनीं करावीं ॥ ५७ ॥ ऐसा हेतें धरिला पोटीं । परी स्वामी कधीं पडती दृष्टी । रात्रंदिवस चिंता मोठी । आणिक गोष्टी नावडे ॥ ५८ ॥ तंव एके दिवसीं एकनाथ । गेले असती शिवालयांत । प्रहर रात्रीं एकांत । भजन करीत निजप्रेमें ॥ ५९ ॥ दृष्टीस पडावे सद्गुरुनाथ । ऐसा चित्तीं पूर्ण हेत । तों देववाणी प्रगटोनि तेथ । काय सांगत तयासी ॥ ६० ॥ देवगिरि गडावरी जाण । जनार्दनपंत नामाभिधान । श्रीदत्त अनुग्रह त्याजकारण । तरी त्याचें दर्शन तूं घेईं ॥ ६१ ॥ ऐसी अशरीरिणी उमटतां । मग संतोष जाहला एकनाथा । आजा आजीसि न पुसतां । होय निघता एकटा ॥ ६२ ॥ जैसा उष्णकाळीं तृषाक्रांत । धुंडीत जातसे जीवनांत । तेवीं सद्गुरु भेटीचें लागलें आर्त । देहभान किंचित असेना ॥ ६३ ॥ नातरी बाळक क्षुधित होतां । तें धुंडीत जाय आपुली माता । तैसेंचि आर्त एकनाथा । म्हणे जनार्दनपंता भेटावें ॥ ६४ ॥ पैठणींहूनि देवगिरी । पांच योजनें असे दुरी । तितुका पंथ क्रमोनि सत्वरी । पातले घरीं सद्गुरुच्या ॥ ६५ ॥ परी द्वारपाळ तेथें अडथळा करिती । भीतरीं जाऊं न देती । जनार्दनासि जावोनि सांगती । शागिर्द म्हणती एक आला ॥ ६६ ॥ तो तुमचें दर्शन इच्छितो जाण । एकोबा त्याचें नामाभिधान । जनार्दनासि कळली खूण । म्हणती उत्तम शकुन आज होती ॥ ६७ ॥ आजि आमुचा उजवा लवतो नयन । घडिघडी बाहु करी स्फुरण । भेटीसि कोण सज्जन । यास्तव त्वरेनें ऊठिले ॥ ६८ ॥ द्वारापासीं येतांची सत्वर । तों दृष्टीसि देखिला वैष्णववीर । आंग टाकिलें खांदियावर । सजळ नेत्र जाहले ॥ ६९ ॥ सद्गुरूसि देखतां सत्वर । साष्टांग घातला नमस्कार । म्हणे सेवेसि असों द्या निरंतर । अभय वर देवोनियां ॥ ७० ॥

१ चंद्र. २ सूर्य. ३ हेतू.

हात जोडोनि काय म्हणे । तूं सद्गुरु चैतन्यघन । विरुदावळी करी जतन । अनन्य शरण मी आलों ॥ ७१ ॥ आशा तृष्णा कल्पना फार । देहीं वाढल्या अनिवार । षड्वैरीयांणीं गांजिलें फार । करी उद्धार जीवाचा ॥ ७२ ॥ अनुतापयुक्त वोळखूनि चिन्ह । सद्गुरुचें संतोष पावलें मन । एकनाथासि हृदयीं धरून । प्रीती करून भेटले ॥ ७३ ॥ म्हणे तुमच्या संगती करोनि देख । देहाचें होईल सार्थक । एकनाथासि वाटला हरीखं । सप्रेम सुख पावला ॥ ७४ ॥ जैसा ध्रुव बालक रुसोनि । एकटा फिरत होता वनीं । तयासि भेटतां नारदमुनी । संतोष मनीं पातला ॥ ७५ ॥ श्री जनार्दनाची भेट होतां । तैसेचि जाहले एकनाथा । सांडोनि देह गेहं ममता । आनंद चित्तां होतसे ॥ ७६ ॥ मग सद्गुरुनें धरूनि करीं । धेवोनि गेले निजमंदिरीं । एकनाथासि ते अवसरीं । भोजन सत्वरी घातलें ॥ ७७ ॥ जनार्दन म्हणती चित्तांत । हा ईश्वरी अवतार साक्षात । मानवी नव्हे हा एकनाथ । भाग्य अद्भुत पें माझें ॥ ७८ ॥ सद्गुरु सेवेची धरोनि आर्त । सेवा करीत एकनाथ । उच्चनीच कार्य करी समस्त । न्यून किंचित पडेना ॥ ७९ ॥ आत्मदृष्टि चराचरभूतीं । ऐसी तयाची जाहली स्थिती । सद्गुरुसेवेची वर्तणूक दाविती । कैशारीतीं ते ऐका ॥ ८० ॥ चार घटीका उरतां यामिनी । तेव्हां उठती प्रातःस्मरणीं । शौच आचमन सर्व करोनि । वास्तुपूजनीं प्रारंभ ॥ ८१ ॥ केरसुणी घेऊनियां करें सत्वर । अपुल्या हातें झाडीत मंदीर । केर भरोनि टाकिती दूर । उल्हास थोर धरोनी ॥ ८२ ॥ दास दासी निद्रित असती । तों सडा संमार्जन करोनि निश्चित । उपकरण पात्रें उठोनि ठेविती । सोज्वळ करिती स्वहस्तें ॥ ८३ ॥ जनार्दन जाहलिल्या जागृत । शौचासि पाणी नेवोनि ठेवित । पादप्रक्षाळण करीती जेथें । तेथें पाट ठेवित आणोनियां ॥ ८४ ॥ मृत्तिका आणि दांतवणें । उष्ण पाणी करोनि देणें । शीतलोदक आचमना घालणें । किंचित उणें पडेना ॥८५॥ देवपूजेचें साहित्य । पुष्प तुळसी आणोनि ठेवित । मग आम्ही स्नान करोनि त्वरीत । धोत्रें चुणित स्वहस्तें ॥८६॥ मग जनार्दनपंतां लागोनी । एकनाथ स्नानासि देतसे पाणी । धोत्रें अंगवस्त्रें हातीं घेऊनी । संन्निध ते क्षणीं तिष्ठत ॥ ८७ ॥ आंग पुसावयासि वस्त्रें । पिळोनि देतसे निजकरें । पादुका पुढें ठेवित त्वरें । प्रीति पडिभारें आपुल्या ॥८८॥ सद्गुरुसि उदंड असती सेवक । परी आपणासि म्हणवी एकलता एक । कार्य सारीतसे सकळिक । सप्रेम हरिखें करोनियां ॥८९॥ विष्णुपूजनासि स्वामी बैसती । तेव्हां गंध उगाळूनि देतसे प्रीतीं । नैवेद्य धूप दीपां पंचारती । आणोनि ठेविती संन्निध ॥ ९० ॥ ध्यानस्थ सद्गुरु बैसतां पाहें । इकडे सच्छिष्य करितसे काय । स्वहस्तें झाडोनि निद्रेचा ठाय । मंचक लवलाहें घालीतसे॥९१॥ सेजे पसरोनियां निगुती। विडा करोनि तबकीं ठेविती । पिकदाणी धुवोनि प्रीतीं । सन्नीध मांडिती ते ठायीं ॥९२॥ सद्गुरु भोजनासि बैसती जोंवर । मक्षिका उडविती निजकरें । मग आपण उच्छिष्ट पात्रावर । प्रीति पडिभारें जेवितसे ॥ ९३ ॥ म्हणे

१ हर्ष. २ घर, ३ रात्र. ४ गादी.

फार अन्न भक्षिलें जर । तरी सुस्त होईल कीं शरीर । मग स्वामी सेवेंत पडेल अंतर । यास्तव आहार अल्प करी ॥ ९४ ॥ मग स्वहस्तें स्वामीस विडा देऊन । सन्निध तिष्ठे कर जोडुन । त्याणीं मंचकीं करितां शयन । मग चरण संवाहन करावें ॥ ९५ ॥ ठायीं ठायीं असें सादर । कोणे विषयीं न पडे अंतर । मास अयनें लोटतां फार । परी उबगें साचार न मानी ॥ ९६ ॥ एकनाथाच्या उल्हास अंतरीं । सद्गुरु सेवेचा मी अधिकारी । कोणीच नसावा वांटेकरी । जन्मवरी साचार ॥९७॥ घरिचा हिशोब लिहित दफ्तर । कोण्या विषयींच न पडे अंतर । वय तो लहान साचार । परी प्रज्ञा थोर तयाची ॥ ९८ ॥ विनटोनि सद्गुरु सेवेला । प्रपंच परमार्थ एक केला । पूज्य पूजकत्वें आपण जाहला । भेद उडाला निःशेष ॥ ९९ ॥ तंव जनार्दन पुसती तयासी । टाकोनि माता पितयांसी । येथें राहिलासि आम्हांपासीं । तरी गति कैसी तयांची ॥ १०० ॥ एकनाथ म्हणतसे तये क्षणीं । माता पिता क्रमिलीं तीं दोन्ही । आजा आजी आहेत पैठणीं । तयांसि टाकोनि मी आलों ॥ १ ॥ स्वामीचे सेवेपरता कांहीं । आणिक धर्म विशेष नाहीं । मागील आठवण न करीच जीवीं । सप्रेमभावें विनटला ॥ २ ॥ सद्गुरुसेवा तोचि जप । सद्गुरुसेवा तेंची तप । येथें विकल्प वाढला अमूप । तरी तेंचि पाप जाणावें ॥ ३ ॥ एकनाथ प्रेमळ भक्त । सद्गुरु प्रसादाचें आर्त । जनार्दन कफ पीक जें[2] थुंकित । तें नित्य सेवित प्रीतीनें ॥ ४ ॥ सद्गुरुचा तांबूल सेवुनि । ब्रह्म रसही गौण मानी । परी जीवींची खूण तये क्षणीं । कोणालागोन सांगती ॥ ५ ॥ अमृतानुभव ज्ञानेश्वरी जाण । जनार्दन करिती पारायण । नाथजी आवडीनें करिती श्रवण । एकाग्र मन करोनियां ॥ ६ ॥ ऐसा नित्य नेम सारोनि जाणा । जनार्दन जाती राजदर्शना । काम करभार करोनि नाना । मागुती सदना येतसे ॥ ७ ॥ तंव एके दिवशीं साचार । दिवस आला घटिका चार । तों देवगिरी घ्यावया सत्वर । परचक्र थोर पातलें ॥ ८ ॥ यजमानाचा शत्रु कोणी । तो पातला सैन्य घेउनी । वार्तिकें[3] सांगती येउनि । भयभीत मनीं ते झाले ॥ ९ ॥ तों जनार्दनपंताचिये घरीं । वेत्रपाणी आले सत्वरी । म्हणती परचक्र आलेंसे भारी । या अवसरीं चलावें ॥११०॥ स्नान संध्या करोनि जाण । ध्यानस्थ बैसले जनार्दन । तयांसि सांगतां वर्तमान । अमर्यादा तेणें होतसे ॥११॥ एकनाथ लीलावतारी । लाघव करीत ते अवसरीं । आपण जनार्दनाचें रूप धरी । परी न कळे बाहेरी कोणातें ॥१२॥ स्वामिचीं वस्त्रें लेऊनि सत्वर । रूप नटले तदाकार । हातीं घेवोनि कटार[1] । शिबिकेंत साचार बैसले ॥१३॥ बोलणें चालणें तया ऐसें । भिन्नभेद कांहींच न दिसे । मग जावोनि राजसभेस । वृत्तांत ध्यानांत आणिला ॥ १४ ॥ यजमान जाहला चिंतातुर । म्हणे परचक्र पातलें थोर । आतां कोण करावा विचार । ऐकोनि उत्तर बोलती ॥ १५ ॥ तुमच्या पुण्यप्रतापें करून । शत्रूसि जिंतीन न लगतां क्षण । मग सैनिकांसि आज्ञा केली त्याणें । आतां सिद्ध होणें सत्वर ॥ १६ ॥ ऐसें वदतांचि सत्वरी । त्याणीं तत्काळ ठोकिल्या भेरी । रणतुरें वाजती नाना परी ।

१ कंटाळा. २ थुंकी. ३ वार्ताहर.

नगरा बाहेरी चालिले ॥१७॥ लीलावतारी एकनाथ । लाघव दाखवितसे शत्रूतें । थोडेंच सैन्य याचें होतें । परी दिमतें बहुत त्यालागीं ॥ १८ ॥ बाण सुटती सणसणा । शस्त्रें वाजती खणखणा । वीररस माजला जाणा । युद्ध कंदना मिसळले ॥ १९ ॥ धुंद जाहलें घटिका चार । धुळीनें कोंदून गेलें अंबर । तरी नाटोपेचि वैष्णववीर । परसैन्य समग्र पळालें ॥१२०॥ शत्रुसि भय उपजलें पोटीं । म्हणे आतां उत्तम न दिसे गोष्टी । मग शिष्टाईस दिवाण पाठवी संकटीं । म्हणतसे येतों भेटी तुमच्या ॥ २१ ॥ ऐसी त्याणीं लाविता बोली । तों सद्गुरु भक्तांसि कृपा आली । निग्रह न करिती कदाकाळीं । खेळीमेळी भेटतसे ॥ २२ ॥ शत्रूसि आणोनि नगरांत । यजमानासि भेटवित । वस्त्रें भूषणें देवोनि त्यातें । म्हणे स्वस्थानातें जा आतां ॥ २३ ॥ ऐसें यश तये क्षणीं । घेऊनि एकनाथ आले सदनीं । पुढती रूप पालटोनी । सेवे लागोनी सादर ॥ २४ ॥ जनार्दन एकांतींचे अवसरीं । ध्यानस्थ असतां देवघरीं । मानसपूजा होतां सत्वरी देहावरी मग आले ॥ २५ ॥ बाहेर जाहला जो वृत्तांत । तो तरी सर्वथा नसेचि श्रुत । नैवेद्य वैश्वदेव करूनि त्वरित । भोजना सारित मग तेव्हां ॥ २६ ॥ निद्रा करूनि घटिका चार । मग शिबिका आणविली सत्वर । जनार्दनपंत साचार । सदरेसि त्वरें येतसे ॥ २७ ॥ दृष्टीसीं देखोनि यजमान । प्रीतीनें देतसे अभ्युत्थान । आपल्या समीप बैसवून । बोलतसे वचन काय तेव्हां ॥ २८ ॥ आज परचक्र आलें होतें थोर । आपण गेलें तयावर । शत्रूसि जिंतूनि साचार । यश बरें संपादिलें ॥ २९ ॥ यजमान नावाजितांचि देख । तैसेंचि बोलती सभानायक । मग नूतन वस्त्रें आणिक । तात्काळिक आणविलीं ॥ १३० ॥ तेव्हां आपुल्या हातें करूनी । जनार्दनपंतासि देतसे धनी । म्हणती थोडेचि सैन्य सर्वे नेउनी । यश घेवोनी आलेती ॥ ३१ ॥ धन्यधन्य लोक बोलती समस्त । आणि भाटही बिरुदावळी पढत । जनार्दन विस्मित चित्तांत । नवल वाटत तयासी ॥ ३२ ॥ आम्ही तों ध्यानस्थ होतों मंदिरीं । हे वर्तणूक जाहली कैशापरी । मग सर्वेचि समजले चित्तांतरीं । म्हणे लीलावतारी एकनाथ ॥ ३३ ॥ आमुचें रूप धरोनि तत्त्वतां । त्यानेंच कार्य साधिलें आतां । परी प्रगट बोलों नये वार्ता । जधन्य आतां होईल ॥ ३४ ॥ ऐसें समजोनि आपुल्या मनीं । मग जनार्दनपंत आले सदनीं । एकनाथासि एकांतीं नेवोनी । प्रेमें करोनी भेटले ॥ ३५ ॥ पाठीवरोनि उतरोनि हात । म्हणती धन्य तूं सद्गुरुभक्त । चरित्र दाखविलें अत्यद्भुत । हें समजलें चित्तांत आमुच्या ॥ ३६ ॥ ऐसें ऐकतांचि अमृतवाणी । एकनाथ सद्भावें लागे चरणीं । म्हणे स्वामी सूत्रधारी असती जनीं । करणी माझेनी न होय ॥ ३७ ॥ ऐसे दिवस लोटतां पाहे । तों जनार्दन आज्ञा करीतसे काय । त्वां हिशोब दफ्तरीं लिहिला आहे । तो आणोनि त्वलाहें दाखवी ॥ ३८ ॥ अवश्य म्हणवोनि सद्गुरुभक्त । एकांतीं जावोनि ताळा पाहत । तंव एक अधेला चुकला त्यांत । काळजी चित्तांत लागली ॥ ३९ ॥ मग दिव्यासि भरणं घालोनी । अवघाचि हिशोब ध्यानासि आणी । अडीच प्रहर लोटली यामिनी ।

१ तेल.

निद्रा जिंतोनी सावध ॥ १४० ॥ गुरूचें न व्हावें अहित । यास्तव अधेला शोधोनि पाहत । तों अकस्मात कागदीं ताळा पडत । मग संतोष चित्तांत वाटला ॥ ४१ ॥ तेव्हां करूनि हास्यवदन । आपली मांडी पिटीत आपण । तों जनार्दन मागुती पाहती येऊन । म्हणती लाभ कोण देखिला ॥ ४२ ॥ कशाचा आनंद वाटला मनीं । यास्तव हांसिलासि ये क्षणीं । ऐकोनि सद्गुरूची वाणी । मस्तक चरणीं ठेविला ॥ ४३ ॥ म्हणे हिशोब पाहतांचि समस्त । तों एक अधेला चुकला त्यांत । तो सांपडतांचि निश्चित । आनंद चित्तांत वाटला ॥ ४४ ॥ मग जनार्दन तेव्हां आज्ञा करित । ऐसेंचि कृष्णीं लावावें चित्त । तरीच संसारीं होईल स्वहित । इतुका वचनार्थ बोलिले ॥ ४५ ॥ मग सद्गुरुपायीं ठेवोनि लेखणी । म्हणे हेंचि इच्छिलें होतें मनीं । आतां आज्ञापिलें स्वामींनीं । तरी वाउगी वाणी न वेंचीं ॥ ४६ ॥ तेव्हां स्वमुखें अभंग बोलिले एक । तोही ऐका भक्त भाविक । अनुभवाचे शब्द रसिक । लिहितसें सुखें या ग्रंथीं ॥ ४७ ॥ अभंग ॥ त्रैलोक्याचा स्वामी जनार्दन । व्यापार झाला त्यापासुन ॥ १ ॥ मोठा लागला व्यापार । रामनामीं निरंतर ॥ २ ॥ सोहं खुद खत दीधलें । तें म्यां मस्तकीं वंदिले ॥ ३ ॥ प्रेमाची लुगडी दीधलीं । निजमुक्तीचीं पानें प्राप्त झालीं ॥ ४ ॥ कैवल्य पुरीं बांधिलीं त्वरेनें । चैतन्य हुडा बैसलों जाऊन ॥ ५ ॥ स्वानुभवाची तहसील करून । रसद स्वामीस पाठवीन ॥ ६ ॥ संतसंगें वसूल बाकी । भक्ति हुजत नेटकी ॥ ७ ॥ ऐसा व्यापार पूर्वपुण्यें लाधला । एका जनार्दनी पूर्ण धाला ॥ ८ ॥ ऐसें बोलोनि ते अवसरीं । पिशाच लीप ठेविली दुरी । परी सद्भावें गुरूची सेवा करी । कैशापरी ते ऐका ॥ ४८ ॥ जनार्दन शौचासि बैसती जेथें । निजांगें स्थळ शुद्ध करी तें । सडासंमार्जन करोनि तेथें । रांगोळी घालीत ते ठायीं ॥ ४९ ॥ कांहीं दिवस लोटोनि जात । मग सद्गुरु पुसती तयातें । शेतखान्यांत कोण झाडित । हें त्वरित मज सांगिजे ॥ १५० ॥ संमार्जन करोनि ते ठायीं । नित्य रांगोळी होतसे पाही । हें हरामखोर तो न करी कांहीं । संशय जीवीं मज वाटे ॥ ५१ ॥ एकनाथ देती उत्तर । मी काय आहे हरामखोर । स्वामिकार्यासि अर्पिलें शरीर । सेवागार सर्वस्वें ॥ ५२ ॥ ऐसें ऐकोनि ते समयीं । जनार्दनपंत विस्मित जीवीं । म्हणती आजपासूनि सेवा न घ्यावी । नव्हे मानवी एकनाथ ॥ ५३ ॥ श्रीजगद्गुरु दत्तात्रेय जाण । त्याचे यासि करावें दर्शन । कैसी प्रज्ञा पहातील आपण । विचार मनें हा केला ॥ ५४ ॥ जनार्दनाचा यजमान नृपती । आज्ञापी सकळ लेखकाप्रती । भृगु वासरीं आमुच्या दर्शनाप्रती । तुम्ही समतीं न यावें ॥ ५५ ॥ राजयाच्या आज्ञे करोनी । सदरेसी न जाती तयेदिनीं । ऐसी पद्धती घातली त्यांनी । महत्कार्य जाणोनी आपलें ॥ ५६ ॥ पर्वताच्या मस्तकीं साचार । असे एक विशाळ सरोवर । बहुत निर्मळ तेथिचें नीर[1] । दुजयाचा पायरव तेथें नसे ॥ ५७ ॥ पुष्पी फळीं शोभायमान । वृक्ष लागले असती सघन । देखतीं विश्रांति पावे मन । न जावें उठोन हे वाटे ॥ ५८ ॥ तये प्रांतीं धुंडितां सकळ । ऐसें रमणीय नसेचि

[1] पाणी.

स्थळ । स्वच्छ निर्मळ पाहतां जळ । विश्रांति तत्काळ होय जीवां ॥ ५९ ॥ श्रीदत्तात्रेयाचें आगमन । तये स्थळीं होतसे जाण । जरी पुण्यवंत करी अनुष्ठान । होतसे दर्शन त्यालागीं ॥ १६० ॥ जनार्दनपंत भृगुवासरीं । जातसे तया पर्वतावरी । स्नान सारोनी सरोवरीं । नित्यनेम करी आपुला ॥ ६१ ॥ पार्थिव लिंगें सहस्र करोन । यथाविधि करिती अर्चन । पूजा विसर्जन झालिया पूर्ण । श्रीदत्त दर्शन त्यासि देती ॥ ६२ ॥ परस्परें झालिया भेटी । उभयतांसि संतोष पोटीं । आत्मसुखाच्या बोलती गोष्टी । आनंद वृष्टी होतसे ॥ ६३ ॥ एके दिवसीं जनार्दनपंत । विचार करिती मनांत । म्हणती एकनाथ हा सद्गुरु भक्त । सेवा बहुत करितसे ॥ ६४ ॥ श्रीदत्तात्रेयाचें दर्शन । आतां यासि करावें आपण । त्याची प्रज्ञा ध्यानासि आणून । मग देतील वरदान निजकृपें ॥ ६५ ॥ ऐसा विचार करोनि चित्तीं । भृगवारीं पर्वतासि जाती । नाथासि बोलिले वचनोक्ती । आमुच्या संगतीं चाल आतां ॥ ६६ ॥ आज्ञा होतांचि तये वेळे । हर्षे वंदिलें चरण कमळ । आसन गंवाळें घेऊनि जवळ । एकनाथ तत्काळ निघतसे ॥६७॥ जैसा पिता भोजनासि जाय सत्वर । तो बाळकासि बोलावीत बरोबर । परम उल्हासें त्याचें अंतर । तैसाचि विचार तो झाला ॥ ६८ ॥ श्रीजनार्दन धरोनि हातीं । पर्वतावरी तयासि नेती । एकांतीं तयासि शिकवण देती । श्रीदत्त येती या ठायां ॥ ६९ ॥ मायावेष धरूनि प्रीतीं । भलत्याचि रूपें दर्शन देती । तरी तुवां देखोनि तया प्रती । विकल्प चित्तीं न धरावा ॥१७०॥ तया वांचोनि साचार । आणिक कोणी मानवी नर । आतां न ये या पर्वतावर । इतुकें उत्तर बोलिले ॥७१॥ मग सरोवराच्या उदकीं जाण । जनार्दनपंतीं केलें स्नान । नित्य नेम संध्या तर्पण । सारोनि लिंगार्चन मांडिलें ॥ ७२ ॥ मृत्तिका मेळवूनि एकनाथ । तयापासी आणोनि देत । सहस्र लिंगें करोनि पूजित । विधियुक्त ते समयीं ॥ ७३ ॥ पूजा विसर्जन करोनि समस्त । मग जगद्गुरू तें ध्यानासि आणित । तंव तेथें पातले अनुसूया सुत । परी वेष दिसत मलंगाचा ॥७४॥ चर्में सर्वांग वेष्टिलें जाण । विशाळ आरक्त दिसती नयन । स्वहस्तें तसबी फिरवून । करिती ध्यान निर्गुणाचें ॥७५॥ कामधेनु घेतली बरोबरी । ती दृष्टी पुढें दिसती कुतरी । हें जनार्दना कळलें अंतरीं । मग नमस्कार करी सद्भावें ॥ ७६ ॥ जैसें कां सगुण निर्गुण । दोहोंत नाहीं भेदभान । तैसें दत्तात्रेय आणि जनार्दन । निजप्रीतीनें भेटले ॥ ७७ ॥ नातरी तेज आणि गंभस्ति । एकमेकांत संलग्न असती । कां पुष्प मकरंद भिन्न नसती । तैसीच प्रीती दोघांची ॥ ७८ ॥ नातरी वाद्य आणि नाद । यांत सर्वथा नसेचि भेद । अमृत आणि त्याचा स्वाद । असे अभेद ज्या परी ॥ ७८ ॥ कां क्षेत्र क्षेत्रज्ञ निश्चित । एकमेकांची प्रीति बहुत । तेंवीं जनार्दन आणि अवधूत । जाहले एकत्र ते समयीं ॥१८०॥ मग बैसोनि उभयतां निकटीं । आत्मसुखाच्या बोलती गोष्टी । एकनाथ ऐकोनि कर्णसंपुटी । संतोष पोटीं मानित ॥ ८१ ॥ मग मृत्तिका पात्र काढोनि पाहें । जनार्दनासि आज्ञापी दत्तात्रेय ।

---

१ रविवारीं. २ फकिराचा. ३ सूर्य. ४ भुंगा.


पैल ती कुतरी बैसली आहे । तरी दुग्ध लवलाहें काढावें ॥ ८२ ॥ ऐसी आज्ञा होतांचि निश्चितीं । जनाईनें साहनक घेतली हातीं । कुतरी दोहोनि सत्वर गती । दुग्ध काढिती पात्रभर ॥८३॥ स्वस्थानीं बैसले अवधूत । तयांपुढें आणोनि ठेवित । वाळले कुटके काढोनि त्वरित । त्यामाजी चुरित स्वहस्तें ॥ ८४ ॥ तें तरी दिव्य अन्न निर्धारीं । परी दृष्टीसि दिसती शिळ्या भाकरी । जेवीं कां हिंडोनि घरोघरीं । मांधोकरी मेळविली ॥ ८५ ॥ भक्ताचा भाव पहावयासी । कौतुक दाखविलें दृष्टीसी । परी हें समजलें एकनाथासी । तया मानसीं विकल्प ॥ ८६ ॥ तंव अवधूत म्हणती जनार्दना । आमच्या सवें बैस भोजना । ऐसी आज्ञा होतांचि जाणा । उल्हास मना येतसे ॥ ८७ ॥ जनार्दन आणि दत्तात्रेयमूर्ती । उभयतां एके पात्रीं जेविती । स्वानंद रसीं जाहली तृप्ती । कर शुद्धी करिती तेधवां ॥ ८८ ॥ मृत्तिका पात्रांत धुवोनि हात । मुख प्रक्षाळीत स्वहस्तें । मुख शुद्धि विडे घेवोनि त्वरित । स्वस्थानीं बैसत तेधवां ॥ ८९ ॥ मग एकनाथासि आज्ञापित । तुवां सरोवरीं जावोनि निश्चित । पात्र धुवोनि आणि त्वरित । अवश्य म्हणत तयासि ॥ १९० ॥ मग सरोवराच्या पाळीं आपण । बैसोनि विचार करी मनें । महाप्रसाद लावला पूर्ण । तरी करावा प्राशन निजप्रीतीं ॥ ९१ ॥ सद्गुरुचें उच्छिष्ट निश्चितीं । तरी हेंचि गंगाभागीरथी । सकळ साधनें यांत येती । उद्धारगती होय जीवा ॥ ९२ ॥ ऐसें कल्पोनि तये क्षणीं । मृत्तिका पात्र लाविलें वदनीं । म्हणे मज ऐसा सभाग्य कोणी । त्रिभुवनीही असेना ॥ ९३ ॥ ऐसी चर्या देखोनियां । जनार्दन विनविती दत्तात्रेया । या सेवकासि जवळ बोलावोनियां । दर्शन तयासी द्या स्वामी ॥ ९४ ॥ मंगल रूप धरिलें आपण । यास्तव केलें नाहीं नमन । तरी आपुलें निजरूप प्रगट दावणें । म्हणवोनि चरण धरियेले ॥ ९५ ॥ तेव्हां दत्तात्रेय बोलती उत्तर । तयासि म्हणों नये किशोर । झाला विठ्ठलाचा अवतार । विश्वोद्धार करावया ॥ ९६ ॥ याचें कीर्तन ऐकतां जाण । भक्तीसि लागती बहुत जन । वाग्विलास कवित्व लेखन । प्रासादिक वचन बोलेल हा ॥ ९७ ॥ वेद शास्त्राचें निज मथित । व्यासें केलें श्रीभागवत । त्याचा अर्थ प्रांजळ बहुत । वदेल निश्चित स्वमुखें ॥ ९८ ॥ वाल्मीकिकृत रामायण । त्यावरी करी प्राकृत लेखन । त्याची कविता वाचिता पूर्ण । साक्षात्कार तेणें होय जीवां ॥ ९९ ॥ आणि कीर्तनामाजी साचार । पदपदांतरें वदेल फार । यावच्चंद्र दिवाकर । सत्कीर्ति तोंवर असे याची ॥ २०० ॥ ऐसी बोलोनि वरदवाणी । स्वरूप पालटलें तये क्षणीं । जवळीं निजली होती शुनी । ती कामधेनु नयनीं देखिली ॥ १ ॥ मलंग वेष टाकोनि आपण । रूप धरिलें सांवळें सगुण । षड्भुजा आकर्ण नयन । श्रीमुखमंडन विश्वाचें ॥ २ ॥ ऐसें रूप प्रगटोनि तत्वतां । जवळी बोलाविलें एकनाथा । येरीं चरणीं ठेविला माथा । होय भेटता निजप्रीतीं ॥ ३ ॥ साही भुजा पसरोनि जाण । नाथासि दीधलें आलिंगन । हात उतरीत मुखावरून । मग अंतर्धान पावले ॥ ४ ॥ जनार्दनाच्या कृपेकरून । जाहलें श्रीदत्त दर्शन । मग नाथासि

१ मधुकरी (भिक्षा). २ तोंडाला.

स्वकरें धरूनि जाण । आले परतोन गृहासी ॥ ५ ॥ पुढील कथा रसिक पूर्ण । सादर ऐका भाविकजन । जैसा कृपण मोजितां धन । अणुमात्र मन न फांके ॥ ६ ॥ जो दीन दयाळ रुक्मिणीपती । आठव देतसे ग्रंथार्थी । येऱ्हवीं महीपति मूढमती । एकचि अमती रास नांवें ॥ ७ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृतग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । त्रयोदशाध्याय रसाळ हा ॥ २०८ ॥ ॥ अ० १३ ॥ ६ ॥ ६ ॥

१ कंजुष मनुष्य. २ आठवण.

अध्याय १४



श्रीगणेशाय नमः ॥ । भगवत्प्राप्ति व्हावया कारण । ऐसें इच्छिती साधक जन । ऐसें श्रेष्ठ कोणतें साधन । तरी सत्संगत तेणें धरावी ॥ १ ॥ लहान थोर सकळ तीर्थे । पुराण प्रसिद्ध नामांकित । तीं संतापासीं अवघीं राहत । पर्वकाळ समवेत सर्वदा ॥ २ ॥ योग यज्ञव्रत उद्यापन । कलियुगीं न होय साधन । न करवे महाविष्णूचें ध्यान । चंचळ मन हें आवरेना ॥ ३ ॥ भवसिंधु तरावया स्वभावें । नामनौका करोनि ठेविली देवें । आणिक श्रेष्ठ नसेचि उपाय । सज्ञान वैष्णव जाणती ॥ ४ ॥ नामें करोनि परमपद प्राप्ती । ऐसें श्रीकृष्ण बोलिले भागवतीं । श्रुतीचें वाक्य विष्णुसूक्तीं । ऐसें निश्चितीं यापरी ॥ ५ ॥ नामीं विश्वास बैसावया कारणें । ऐसी इच्छा वाटली मनें । तरी सत्संगति धरावी तेणें । मग बोधतसे मन सहजची ॥ ६ ॥ साधु संगति करितां पाहे । तरी सहजची श्रवण घडता हे । श्रवणापासीं मनन होय । मग निदिध्यास लाहे तत्काळीं ॥ ७ ॥ मागिल अध्यायीं कथा गोमटी । एकनाथासि पाहोनि कृपादृष्टीं । जनार्दनें श्रीदत्ताची करोनि भेटी । हें कौतुकें दृष्टी दाखविले ॥ ८ ॥ सद्गुरु होऊनि लोभापर । एकनाथाचा धरोनि कर । मग पातलिया निजमंदिर । तों पुढें चरित्र काय झालें ॥ ९ ॥ स्वामीचे कृपेनें साचार । पूर्ण बोधें निवालें अंतर । आणि दत्तात्रेय याचा लाधिला वर । परी सेवा आणुमात्र न सांडी ॥ १० ॥ पहिल्या परीस वाढविती नेमा । विशेष स्वामि कार्याचा प्रेमा । निरसोनि सकळ मोहभ्रमा । श्री पुरुषोत्तमा भजतसे ॥ ११ ॥ जेवीं ब्रह्मांडीं व्यापला प्रभंजन[1] । परी न सांडीच चंचळपण । कां गंगा समुद्रासि मिळाली आपण । परी मागील धांवणें न राहे ॥ १२ ॥ नातरी श्रीहरीस न करितां निश्चित । तदाकारचि जाहले भक्त । परी मर्यादा न सांडितीच सत्य । तैसीच स्थित एकनाथाची ॥ १३ ॥ आत्मबोधें निघालें अंतर । आणि सद्गुरूचा लाधला वर । परी सेवेसि तिष्ठे निरंतर । आळस अणुमात्र असेना ॥ १४ ॥ तों जनार्दन मनीं विचारित । म्हणे याजऐसा सद्गुरुभक्त । त्रिभुवनीं नसे सत्यसत्य । प्रेम अद्भुत पैं याचें ॥ १५ ॥ करावया जगदुद्धार । श्रीपांडुरंगें घेतला अवतार । यासि सेवेसि ठेवितां साचार । मर्यादा अणुमात्र न राहे ॥ १६ ॥ ऐसा विचार करोनि चित्तीं । मग एकनाथासि घरांत पाहती । तंव तो बैसोनि एकांतीं । श्रीदत्तकीर्ती गातसे ॥ १७ ॥ जनार्दन दृष्टीस देखोन । उठोनि सद्भावें केलें नमन । तेव्हां सद्गुरु स्वस्थानीं बैसोन । देतां शिकवण एकनाथा ॥ १८ ॥ सद्गुरु कृपेनें निश्चितीं । जाहलिया आत्मज्ञान प्राप्ती । तरी न सांडावी सगुणभक्ती । ही आठवण चित्तीं असोंदे ॥ १९ ॥ करोनि सकळ इंद्रियदमन । विषय विसरती योगीजन । परी तयासि नव्हेचि सगुण दर्शन । भक्ति वांचोन सर्वथा ॥ २० ॥ योगबळें आसन उडविती । नाना सिद्धींचे सोहळे दाविती । परी तयांसि न भेटेचि श्रीपती । सप्रेम भक्ती वांचोनियां ॥ २१ ॥ आत्मवत मानील विश्वजन । आपणही विसरेल देह भान । परी सगुण मूर्तीचें न होय दर्शन । हें दुर्लभ जाण एकनाथा ॥ २२ ॥ आपुला देह असे निश्चित । तोंवरी सगुणी असावी प्रीत ।

[1] वायू.

आतां तुजला सांगतों युक्त । ते देवोनि चित्त अवधारी ॥ २३ ॥ देवगिरि पृष्ट प्रांत निश्चित । सुलभ नांवें असे एक पर्वत । सूर्यकुंड तीर्थ असे तेथ[1] स्थळ एकांत रमणीय तें ॥ २४ ॥ ते स्थळीं जावोनि साधक जन । करित अमती अनुष्ठान । तयांसि साक्षात्कार येतसे पूर्ण । पुण्य पावन ते भूमी ॥ २५ ॥ तरी आतां ऐकता प्राण सखया । ते स्थळीं जाय लवलाह्या । सूर्यकुंडीं स्नान करोनियां । श्रीपंढरीराया आठवी ॥ २६ ॥ एकाग्र करोनियां मन । महाविष्णूचें करावें ध्यान । कोणासि न बोलावें वचन । आज्ञा प्रमाण आमुची ॥ २७ ॥ आणि अवचित मिळेल जरी कांहीं । तरी ते सुखें भक्षित जायीं । आमुची खंती न करावी कांहीं । सन्निध ते ठायीं मी असें ॥ २८ ॥ तें मार्कंडेय ऋषीचें असे स्थान । ऐसें पुराण प्रसिद्ध वचन । तरी तेथें करावें श्रीकृष्ण ध्यान । सप्रेम मनें होवोनियां ॥ २९ ॥ कांहीं अपूर्व पडतां दृष्टी । मग परतोनि यावें आमुच्या भेटी । ऐकोनि सद्गुरूची गोष्टी । आनंद पोटीं वाटला ॥ ३० ॥ आधींच सच्छिष्य प्रेमळ जाणा । आणि गुरूंनी सांगीतली उपासना । मग परमसंतोष वाटला मना । वंदोनि चरणां निघतसे ॥ ३१ ॥ वरकड गुरु ज्ञान सांगतीं । आणि सगुणभक्तांसि उच्छेदिती । जनार्दनाची तैसी स्थिती । नव्हे निश्चितीं सर्वथा ॥ ३२ ॥ भक्तिवीण जें कां ज्ञान । तें वाष्कळाचें जैसें भाषण । याचे विषयीं ऐका सज्जन । स्वामींचें वचन एक असे ॥ ३३ ॥ अभंग ॥ ॥ ॥ भक्तीचें उदरीं जन्मलें हें ज्ञान । ज्ञानासी महिमान भक्तिचेनी ॥ १ ॥ भक्तीनें ज्ञानासी दीधलें महिमान । भक्ति मूळज्ञान वैराग्यातें ॥ २ ॥ भक्तिवीण गवसती गाढें । मूळचि नाहीं जोडे फळ कैसें ॥ ३ ॥ एका जनार्दनी भक्तीयुक्त क्रिया । ब्रह्मज्ञान पायां लागे त्याच्या ॥ ४ ॥ ओवी । याजकरिता ऐका सज्जन । भक्ति उच्छेदोनि सांगतां ज्ञान । जो खंडितसे देव भक्तपण । अधम त्याहून श्रेष्ठ नसे ॥ ३४ ॥ धन्य सद्गुरु जनार्दन भला । कीं जनार्दनचि सगुण जाहला । जगदुद्धार करावया आला । ऐसे मजला भासतसे ॥ ३५ ॥ असो गुरुभक्तांची स्थिती सांगतां । मध्येंच लागली आडकथा । म्हणवोनि उबग मानिजे श्रोता । नावेक दृष्टांतां बोलिलों ॥ ३६ ॥ मग सद्गुरु आज्ञा होतांचि सत्वर । एकनाथें केला नमस्कार । जावोनि सुलभ पर्वतावर । वैष्णव वीर काय करी ॥ ३७ ॥ तें रमणीय स्थळ विलोकून । परम विश्रांति पावलें मन । मग सूर्यकुंडीं करोनि स्नान । नित्यनेम तेणें सारिला ॥ ३८ ॥ पूर्वाभिमुख बैसोनि तेथ । एकाग्र मन केलें निश्चित । पांडुरंगमूर्ति ध्यानासि आणित । सप्रेमयुक्त होवोनी ॥ ३९ ॥ आठवण करितांचि साचार । ध्यानीं प्रगटला इंदिरावर । वृत्ति जाहली तदाकार । भान अणुमात्र असेना ॥ ४० ॥ तंव तया पर्वतावर निश्चित । महाभुजंग होता राहत । ध्यानस्थ देखोनि श्रीनाथ । धांवला त्वरित डसावया ॥ ४१ ॥ आंगासि वेढे घालतांचि तेणें । तो दुर्बुद्धि गेली देहांतून । अति लोभापर होऊन । करित संरक्षण कैशापरी ॥ ४२ ॥ शीत उष्ण बाधील त्यासी । यास्तव वेष्टित सर्वांगासी । पुच्छ ठेवोनि नाभीसी ।

[1] पाहून.

मस्तकी फणा उभारित ॥ ४३ ॥ टाकोनियां तामसगुण । भुजंग धरी सात्विक लक्षण । बुद्धीचा पालट जाहला पूर्ण । होतांचि स्पर्श-न संतांचें ॥४४॥ एकनाथ येतांचि देहावर । अंग हालतसे अणुमात्र । तों भुजंग निघोनि जाय सत्वर । न पडे साचार दृष्टीसी ॥४५॥ नामरूपीं जडतसे चित्त । यास्तव श्रीनाथ देहातीत । सर्व वेष्टित हें विदित । नाहीं निश्चित तयासी ॥ ४६ ॥ तंव त्या पर्वता तळवटीं देख । कुग्राम वाडी होती एक । तेथें वैष्णव राहतसे देख । कृषीवळ भाविक तो असे ॥४७॥ तो पूर्वजन्मींचा योगभ्रष्ट जाण । यास्तव करीतसे शुद्ध आचरण । द्वारीं तुळसी वृंदावन । सडा संमार्जन नित्य होय ॥ ४८ ॥ वस्त्रें पात्रें शुचिर्भूत जाण । स्नाना वांचोनि न सेवी अन्न । प्रपंच धंदा सारीत आपण । नामस्मरण करीतसे ॥४९॥ कांताही परम पतिव्रता । तया ऐसीच वर्ते तत्वतां । जाणोनि पतीच्या मनोगता । साधुसंता भजतसे ॥ ५० ॥ क्षुधातुरासि घालिती अन्न । तृषाकांतासि पाजी जीवन । परोपकारी त्याचें मन । असत्य वचन न बोलती ॥ ५१ ॥ सुलभ पर्वतीं अनुष्ठानी । कोणी तपस्वी देखिला नयनीं । तयासि दूध पाजीतसे नेउनी । प्रीती करोनि आपुल्या ॥ ५२ ॥ पर्वता तळवटीं समीप जाण । शेत पेरिलें असे त्याणें । तेथें पीक आलें सधन । यास्तव राखण बैसला ॥ ५३ ॥ श्रीनाथ जातां अनुष्ठानीं । तेव्हां त्याणें देखिलें नयनीं । मग निरसें दूध घरीं तापवोनी । गेला घेऊनि त्या ठायां ॥ ५४ ॥ तों ध्यान विसर्जन करोनि प्रीतीं । बैसले असती सहज स्थिती । कृषीवळें दंडवत करोनि तयाप्रती । मग काय विनंती करितसे ॥ ५५ ॥ दूध आणिलें असे तापवून । याचें स्वामीनीं करावें सेवन । अंतरींचा सद्भाव देखोन । करिती मान्य तयाचें ॥५६॥ भोक्ता श्रीकृष्ण म्हणवोनी । स्वहस्तें पात्र लावीत वदनीं । कृषीवळ संतोष पावोनि मनीं । आपुल्या स्थानीं तो गेला ॥ ५६ ॥ कांतेसि आज्ञा केली निश्चिती । ते नित्य दूध आणीतसे शेतीं । तें आधीं देवोनि नाथाप्रती । मग अन्न सेविती आपण ॥५८॥ जरी पूर्व पुण्या असेल ठेवा । तरीच संताची घडेल सेवा । तयाचा आभार पडतसे देवा । सोडवी भवार्णवीं पासोनी ॥५९॥ संत सेवा करिती प्रीतीनें । तेणें संतोषे जगज्जीवन । याहोनि अधिक श्रेष्ठ साधन । नसेचि जाण सर्वथा ॥ ६० ॥ कुणबी तो सभाग्य दैवाथिला । यास्तव सद्बुद्धि उमजे त्याला । प्रपंच करोनि परमार्थ साधिला । त्याच्या पुण्याला पार नाहीं ॥ ६१ ॥ एके दिवशीं त्याची जाया । अर्धरात्रीं उठली दळावया । देवावरी गावोनि ओव्या । दळण लवलाह्या सारिलें ॥ ६२ ॥ चंद्राचा प्रकाश पडतां निश्चित । तिला वाटे जाहली प्रभात । म्हणोनि स्वहस्तें गाई दुहितें । वेगळ्या यात्रांत दुध ठेवी ॥ ६३ ॥ समय होतां साचार । दूधही निघाले बहुत फार । पितळेंचे पात्रीं तावितां सुंदर । घातला गोवर त्यावरी ॥ ६४ ॥ मग सडा संमार्जन करोनि सत्वरी । शीळोदकें स्नान करी । पाक निष्पत्ति सारिली बरी । तों उदयासि तमारी पावला ॥ ६५ ॥ म्हणे दळावयासि उठलें सत्वर । तेव्हां रात्र होती फार । शेती जावयासि लागला उशीर ।

---

१ शेतकरी. २ भार. ३ संसार सागर. ४ दूध काढणे. ५ सूर्य.

तरी निवेल साचार अन्न आतां ॥६६॥ ऐसें म्हणवोनि ते सुंदरी । भाकरीची पाटी घेतली शिरीं । स्वहस्तें दुग्धाचें पात्र धरी । मग जात सत्वरी लगबगें ॥६७॥ शेतीचे पाळीस येता कामिनी । तों निजपतीनें देखिली नयनीं । हातिचें पात्र सत्वर घेऊनी । मग स्नानालागोनी तो गेला ॥६८॥ नित्यनेम नामस्मरण । करोनि कांतेसि बोले वचन । आजि सकाळ वेळीं आणिलें अन्न । याचें कारण मज सांग ॥६९॥ क्षुधा लागली नाहीं मजसी । नाहीं पर्वकाळ द्वादशी । अनुष्ठानीं बैसलासे तापसी । त्याजविण अन्नासि भक्षूं नये ॥ ७० ॥ कांता म्हणे मी जाहलें जागृत । तेव्हां बहुत होती रात । अन्न निवोनि जाईल निश्चित । यास्तव त्वरित पातलें ॥ ७१ ॥ तरी तुम्ही जावोनि पर्वतासी । दुग्ध पाजावें ब्राह्मणासी । मग करावें भोजनासी । ऐसें तयासी बोलिली ॥ ७२ ॥ मग पात्र घेऊनि निजकरी । गेला तेव्हां पर्वतावरी । तों अद्भुत चरित्र देखिलें नेत्रीं । तें सादर चतुरीं परिसिजे ॥७३॥ स्नानसंध्या करोनि समस्त । अनुष्ठानीं बैसले एकनाथ । श्रीकृष्ण ध्यानीं जडलें चित्त । देहभान किंचित असेना ॥ ७४ ॥ महा भुजंग येऊनि आपण । सकळ शरीर वेष्टिलें जाण । नाभिस्थानीं पुच्छ ठेऊन । मस्तकीं फणा धरितसे ॥७५॥ हें कुणबियानें देखोनि नयनीं । परम भय उपजलें मनीं । म्हणे हा ब्राह्मण अनुष्ठानी । सर्पे वेष्टुनी धरियेला ॥ ७६ ॥ धांव सत्वरी पंढरीनाथा । तूं तरी यासि वांचवीं आतां । माझा उपाय न चाले सर्वथा । बळ बुद्धी वृथा ते गेली ॥ ७७ ॥ तापसियाचें शरीर न चळे । बहुतेक डंखिला आहे काळें । माझें सेवाफळ निष्फळ गेलें । म्हणोनि तळमळ बहुत करी ॥ ७८ ॥ हांका आरोळ्या मारिल्या फार । परी सर्प सर्वथा न जाय दूर । मेला मेला रे द्विजवर । ऐसें उत्तर बोलतसे ॥ ७९ ॥ पर्वतावरी एकांत स्थान । नाहीं मनुष्याचें आगमन । याचा शब्द ऐकतो कोण । परी प्राण पोषण करीतसे ॥ ८० ॥ निदान जाणोनि तये क्षणीं । मग स्वमुखें करितसे शंखध्वनी । म्हणे अनाथनाथा चक्रपाणी । त्वरें करोनि पाव आतां ॥८१॥ ऐसा गलबला बहुत करितां । शब्द जाणवे एकनाथा । मग शरीरासि चळण होतां । भुजंग पळतां होय वेगीं ॥८२॥ मग सावध होऊनियां भलें । स्वहस्तें नेत्रासि उदक लाविलें । कुणबियासि म्हणती काय जाहलें । तें सत्वर वहिलें सांग मज ॥ ८३ ॥ दृष्टीसि देखिला होता सर्प । म्हणोनि शरीरीं सुटला कंप । मग सावध होऊनि आपोआप । पातला समीप ते समयीं ॥ ८४ ॥ सद्भावें करोनि नमस्कार । बोलत असे प्रति उत्तर । म्हणे आजि महाभुजंगें साचार । वेष्टिलें शरीर तुमचें ॥ ८५ ॥ तो दृष्टिसि देखोनि साचार । चित्तीं भय उपजलें फार । मग शंखनाद केला थोर । यास्तव विखार पळाला ॥ ८६ ॥ स्वामींचा निश्चय देवा पायीं । यास्तव वांचला तये समयीं । काळ आला परी वेळ नाहीं। ऐसेंचि जीवीं वाटतें ॥ ८७ ॥ ऐसें कृषीवळाचें वचन । ऐकोनि अभंग बोलिले आपण । तो ग्रंथीं लिहितों निजप्रीती करून । तरी करावा श्रवण भाविक हो ॥ ८८ ॥ ॥ अभंग ॥ आम्हां डंखू आला काळ ॥ तोचि जाहला कृपाळ ॥१॥ भली ओळखी झाली आत्तां

१ ब्राह्मण.

चित्त मीनलेसे चिंत्ता ॥ २ ॥ देही फिटला देह भावो । तेथें काळत्रि झाला वावो ॥ ३ ॥ एका जनार्दनाचें पायीं । जिण्या मरणा सौरस नाहीं ॥ ४ ॥ ॥ ओव्या ॥ । इतुकें वचन बोलोनि प्रीतीं । लाविलीं दोन्ही नेत्र पातीं । हृदयीं चिंतिली पांडुरंग मूर्ती । सप्रेम चित्तीं होऊनियां ॥ ८९ ॥ म्हणे क्षीराब्धीवासा शेषशयना । इंदिरावरा मनमोहना । अंतरसाक्षा चैतन्यघना । जगज्जीवना श्रीहरी ॥ ९० ॥ जयजयाजी वैकुंठपती । अनंत अपार तुझी कीर्ती । महिमा वर्णितां क्षीणल्या श्रुतीं । कुंठित मती सकलांच्या ॥९११॥ तूं तरी अजअजित अव्यय । मायातीत निरामय । शहाणपण धरितां पाहे । तरी तुझा ठाव न पविजे ॥९२॥ ऐसा तूं देवाधिदेव । नाम जपतां निवाला शिव । तुवांच विश्व व्यापिलें सर्व । परी धरावयासि ठाव असेना ॥९३॥ परी निजभक्ताच्या कैवारें साचार । घेतला चतुर्भुज अवतार । ते देखावयालागीं सत्वर । माझे नेत्र भुकेले ॥९४॥ ऐसी ऐकोनियां स्तुती । तेथें प्रगटले रुक्मिणीपती । चतुर्भुज सांवळी मूर्ती । शंख चक्र हातीं मंडित॥ ९५॥ श्रीमुख साजिरें मनोहर । कानीं कुंडलें मकराकार । कंठीं कौस्तुभ झळके सुंदर । दिव्य पीतांबर झळकतसे ॥९६॥ सोनसळा वैजयंती । हृदयीं त्रिवळी विराजती । क्षुद्र घंटिका डोल देती । पाहतां विश्रांती होय जीवां ॥ ९७ ॥ सर्वांगी चर्चिला चंदन । केशरी टिळक रेखिला पूर्ण । कोमळ तुळसी विराजमान । श्रीवत्सलांछन तें हृदयीं ॥९८॥ दिव्य तेज तये वेळें । उणे दिसतें रवि मंडळ । श्रीनाथ पहातां उघडोनि डोळे । तो परब्रह्म सांवळे पुढें असे ॥९९॥ सप्रेम भाव धरोनि पोटीं । चरणीं सद्भावें घातली मिठी । आलिंगनि देवोनि जगजेठी । नाथासि पोटीं धरियेलें ॥ १०० ॥ मग आसनी बैसवोनि देवराया । मानसोपचारें पूजिलें तया । म्हणे निजकृपेची करोनि छाया । मनोरथा माझिया पुरविलें ॥ १ ॥ देवभक्तांच्या झाल्या भेटी । हे कृषीवळानें सांग पाहिले दृष्टीं । परमानंद वाटला पोटीं । म्हणे मी एक सृष्टीं दैवाचा ॥ २ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । वारंवार नमस्कार करी । तो एकनाथासी पुसोनी सत्वरीं । अंतर्धान श्रीहरी पावले ॥ ३ ॥ निजभक्तांचें हृदय भुवन । तेथें सुखावलें जगज्जीवन । ऐसें देखोनि कुणवियानें । सद्भावे नमन करितसे ॥ ४ ॥ म्हणे स्वामीच्या या संगतीनें निश्चितीं । म्यां दृष्टी देखिलें वैकुंठपती । येऱ्हवी तरी मी हीन याती । मूढमती पैं असें ॥ ५ ॥ करावया जगदुद्धार । संतीं घेतला अवतार । हा मज आला चमत्कार । वारंवार स्तुति करी ॥ ६ ॥ मग दुग्धाचें पात्र घेवोनि हातीं । श्रीनाथासि करीतसे ग्लांती । याचे सेवन सद्गुरुमूर्ती । माझी आर्ती हे असे ॥७॥ शुद्ध भावार्थ देखोनि जाण । त्याचें दुग्ध केलें प्राशन । नेत्र संकेतें सांगती खुण । घरासि जाणे सत्वर पैं ॥ ८ ॥ कृषीवळे प्रदक्षिणा करोनि । साष्टांग नमस्कार घातला धरणीं । परम लाभ मानोनि मनीं । आपुल्या स्थानीं तो गेला ॥ ९ ॥ श्रीनाथ हाचि परब्रह्म मूर्ती । ऐसा निश्चय बानला चित्तीं । चरित्र जाहले तो निश्चिती । कांते प्रती निवादिलें ॥ ११० ॥ इकडे दोन प्रहर आला दिनकर । यास्तव उष्णं जाहलें तीव्र । मग वटच्छायेसि सत्वर ।

१ शेतकरी. २ सूर्य. ३ ऊन्ह. ४ वटवृक्षाच्या छायेत.

घटिका चार बैसले ॥ ११ ॥ उष्ण टाळिले ते ठिकाणीं । तो जनार्दन आज्ञा आठवली मनीं । कीं कांही अपूर्व देखिलें नयनीं । तरी यावें परतोनी मजपासीं ॥१२॥ सद्गुरुकृपेने साचार । जाहला सगुण साक्षात्कार । तरी याहूनि नवल नसेचि दूसरे । लाभ थोर घडला कीं ॥ १३ ॥ ऐसें समजोनियां चित्तीं । नमन केलें सत्वरगतीं । मग येऊनि देवगिरी प्रती । सद्गुरु मूर्तीप्रती भेटले ॥ १४ ॥ करोनियां साष्टांग नमन । प्रीतीनें दीधलें आलिंगन । जनार्दनासि कळली खुण । म्हणे पालटलें चिन्ह दिसताहें ॥ १५ ॥ सद्गुरु पुसता वृत्तांत । सांगितला सकळ गुह्यार्थ । म्हणे स्वामीकृपेनें निश्चित । अप्राप्य प्राप्त तें झालें ॥१६॥ तंव एके दिवशीं जनार्दन । एकनाथासि बोलती वचन । मज चित्तीं हेत उपजला पूर्ण । कीं गंगास्नान करावें ॥१७॥ नासिक आणि पंचवटी । श्रीत्र्यंबकराज पाहावा दृष्टीं । ऐकोनि सद्गुरुची गोष्टी । उल्हास पोटीं धरियेला ॥ १८ ॥ सुमुहूर्तें पाहोनि एके दिनीं । जनार्दन चालिले तीर्थाटणीं । नाथासि बैसावया अश्विनी[1] । दिधली नेमूनी एक तेव्हां ॥ १९ ॥ अश्व एक पडताळासी । एक वहन आपणासी । आचारी ब्राह्मण नेमणूक ऐसी । घेवोनि त्वरेंसी निघालें ॥ २० ॥ जेथें रमणीय स्थळ निश्चितीं । तये ठायीं वस्तीस राहती । आत्मचर्चा संतोष युक्ती । संवाद करिती परस्परें ॥ २१ ॥ जये ठायीं साधुसंत । त्या ठायीं बहुतचि प्रीत । तेथें संतोषें क्रमिती रात । धन्य म्हणत सुदिन हा ॥ २२ ॥ ऐसा पंथ क्रमिती फार । तंव एक ग्राम लागलें थोर । ते स्थळीं चंद्रभट द्विजवर । वैष्णव वीर पैं होता ॥ २३ ॥ त्याची सत्कीर्ति ऐकोनि श्रवणी । गुरु शिष्य संतोषयुक्त मनीं । मग अस्तमानासि जातां तैरणीं[2] । उतरले सदनीं तयाचें ॥ २४ ॥ चंद्रभटे देखोनि वैष्णववीर । केला तयाचा सन्मान आदर । नमन करोनि परस्पर । भेटले सत्वर तेधवां ॥ २५ ॥ चंद्रभट नामा विरक्त ब्राह्मण । कुटुंबी असोनि निराश मन । अयाचित वृत्ति करोन । योग निर्विघ्न चालवी ॥ २६ ॥ कायिक वाचिक मानसिक केवळ । तपें आचरें सर्वकाळ । ज्याच्या वाचेसि असत्य मळ । याचा विटाळ स्पर्शेना ॥ २७ ॥ स्नान संध्या देवतार्चन । परोपकारी वेंचितसे प्राण । आत्मवत मानीं अवघे जन । दया संपूर्ण सर्वांभूतीं ॥ २८ ॥ संसार पाश तुटावया निश्चितीं । सर्वदा इच्छित सत्संगती । म्हणे कधी आतां उगवेल गुंती । चित्तीं विरक्ति वाणली ॥ २९ ॥ ऐसा तो चंद्रभट ब्राह्मण । निराश उदासीन विरक्त मन । तयासि एकनाथ जनार्दन । निजप्रीतीनें भेटले ॥ ३० ॥ सायंकाळ संध्या करोनि सत्वर । मग ते करिती उपहार । तों एकांती बैसोनि द्विजवर । पुस्तक सत्वर सोडिलें ॥३१॥ चतुःश्लोकि भागवत निर्धारीं । ब्रह्मयासि उपदेशित श्रीहरी । चंद्रभट त्याची व्याख्या करी । अर्थांतरीं विवरोनियां ॥ ३२ ॥ मग एकनाथ आणि जनार्दन । तया समीप बैसती येऊन । म्हणती धन्य आजिचा सुदिन । जाहले दर्शन संताचे ॥ ३३ ॥ प्रेमळ श्रोते सर्वज्ञ निपुण । मिळतां उल्हासे त्याचें मन । अर्थ सांगतसे प्रांजळ करून । ऐकतांचि मन वेधतसे ॥ ३४ ॥ अनुभवा घ्या

१ घोडी. २ सूर्य.

गोष्टी सांगत । कंठ होतसे सद्गदित । प्रेमे नेत्रीं अश्रु वाहत । विदेह स्थित तिघांची ॥ ३५ ॥ मजला वाटतसे साचार । कीं ब्रह्मा विष्णु महेश्वर । तिन्ही मिळाले एकत्र । तैसा विचार तो झाला ॥ ३६ ॥ नातरी गंगा यमुना सरस्वती । एकत्र होवोनि जैशा वाहती । तैसीच तिघांची जलडी प्रीती । स्वानंदें रात्री क्रमितसे ॥ ३७ ॥ पुस्तक समाप्त झालीया पाहीं । मग निद्रेसि मान देती कांहीं । यांची संगती सर्वदा असावी । हा हेत जीवीं उभयतां ॥ ३८ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । तिहीं शास्त्री असे निपुण । ऐसे एकनाथ जनार्दन । बोलती वचन परस्परें ॥३९॥ असो या परी क्रमीली राती । सकाळ उठोनि प्रयाण करिती । तो चंद्रभट येऊनि करितसे ग्लांती । म्हणे माझी विनंती अवधारा ॥ ४० ॥ स्नान संध्या संपादून । माझा आश्रम पवित्र करणें । ऐसा सद्भाव देखोनि पूर्ण । मग जनार्दन अवश्य म्हणे ॥ ४१ ॥ मंदिरी करूनियां पाक निष्पत्ती । मग नित्यनेम अवघा सारिती । नैवेद्य वैश्वदेव करोनि प्रीतीं । भोजना प्रती बैसले ॥ ४२ ॥ एकनाथ आणि जनार्दन । आणि चंद्रभट गृहस्वामी पूर्ण । एके पंक्तीस भोजन करून । मग मनुष्यांसि अन्न देवविलें ॥४३॥ मुखशुद्धि तांबूल देऊनी । विनंति करितसे तये क्षणी । तुमची संगती असावी निशिदिनी । ऐसा हेत मनीं उपजला ॥४४॥ तंव जनार्दन देती प्रत्युत्तर । ऐसेंचि आमुचे चित्तांतर । कांहीं संकोच न करोनि अंतर । बरोबर चलावें ॥४५॥ चंद्रभटासि आनंद चित्तीं । म्हणे बरी लाधला सत्संगती । शांति विरक्ती समवेत ॥४६॥ भजन करीतसे प्रेमयुक्ती । स्वच्छेनें पंथ क्रमिती। चतुःश्लोकांचा अर्थ करिती । स्वानंद होतसे चित्तीं ॥ ४७ ॥ साधुसंत योगेश्वर । कोणी भेटती मार्गावर । त्यांचे ठायी प्रीत थोर । आध्यात्म उत्तर बोलती ॥ ४८ ॥ ऐशा रीतीं क्रमितां पंथ । पंचवटीस आले त्वरित । रामकुंडी स्नान करित । अनुताप युक्त ते समयी ॥ ४९ ॥ तीर्थविधि यथास्थितीं । करोनियां विन्हाडीं येती । श्रीरामचंद्राच्या दर्शना जातीं । अनन्य प्रीती करोनियां ॥ १५० ॥ पूजा करोनि यथोपचार । स्तुतिस्तोत्रें बोलती फार । आन्न शांती करोनि साचार । धरामरें तोषविले ॥५१॥ तंव जनार्दन म्हणती एकनाथा । सांगतो वचन ऐक आतां । श्रीदत्त वरद तुझीया माथा । लाधला अवचितां निजभाग्यें ॥ ५२ ॥ चतुःश्लोकी जे भागवत । चंद्रभाटें आणिलेसे सांगाते । याजवरी टीका करी प्राकृत । प्रांजळ वहुत ये स्थानीं ॥ ५३ ॥ ऐकोनि सद्गुरूची वचनोक्ति । परमसंतोष जाहला चित्तीं । ते हां ग्रंथासि आरंभ करिती । सप्रेम गती करोनियां ॥५४॥ आधी श्लोक लिहूनि साचार । अर्थ बोलती तयावर । ग्रंथ सिद्धीसि गेलियावर । श्रीगुरूसि सत्वर दाखविला ॥ ५५ ॥ चंद्रभट आणि जनार्दन । आणिक क्षेत्रवासी थोर ब्राह्मण । ऐकोनि ग्रंथाचें पारायण । समाधान पावले ॥ ५६ ॥ ग्रंथाप्रारंभीं एकनाथ । चतुःश्लोकी जे भागवत । त्यावरी टीका केली प्राकृत । मग सद्गुरु बोलत काय तेव्हां ॥ ५७ ॥ श्रीएकादश स्कंधावरी जाण । तुझेनि मुखें प्राकृत लेण । साह्य होऊनियां श्रीकृष्ण । अर्थ संपूर्ण बोलविल ॥ ५८ ॥ ऐसे वदतां जनार्दन । एकनाथ करितसे

१ ब्राह्मण.

नमन । मग चतुःश्लोकीची टीका देऊन । करितसे पारायण चंद्रभट ॥ ५९ ॥ कर्म उपासना आणि ज्ञान । त्याचे आंगीं असे चिन्ह । परी श्रीनाथें केलें प्राकृत लेण । त्याच्या नित्य नेम जाण धरियेला ॥१६०॥ चंद्रभटाचा सद्भाव थोर । म्हणे हे गुरुशिष्य साचार । करावया जगदुद्धार । हरिशंकर अवतरले ॥६१॥ जनार्दन हा कैलासपति । एकनाथ साक्षात विष्णुमूर्ती । ऐसा सद्भाव धरोनि चित्तीं । करितसे स्तुति सर्वदा ॥ ६२ ॥ ऐकोनि क्षेत्रवासी ब्राह्मण । अवघेचि म्हणती धन्य धन्य । पुढें त्र्यंबकेश्वरी जाउन । केली स्नानें कुशावर्तीं ॥६३॥ सव्य घालोनि ब्रह्मगिरी । मग पाहिला त्रिपुरारी । ऐसा तीर्थ विधि करोनि सत्वरी । ते स्थळीं त्रिरात्री राहिले ॥ ६४ ॥ इतुकी यात्रा करूनि जाण । मग देवगिरीस चालिले परतोन । परी चंद्रभटाचें उदास मन । गृह आशा तेणे सोडिली ॥६५॥ कांता पुत्र गृह वित्त । आधींच कंठाळलें होतें चित्त । म्हणवोनि न सोडी संगत । मग देवगिरीस येत समागमें ॥६६॥ जनार्दनपंत पातले सदनीं । संतर्पण केलें दुसरें दिनीं । जिव्हा रंगली नामस्मरणीं । सप्रेम मनीं सर्वदा ॥ ६७ ॥ चंद्रभटाच्या सद्भाव चित्तीं । म्हणे एकनाथ हा अवतार मुर्ती । वय लहान याची आकृति । परी विशाळ मती ववतृत्वें ॥ ६८ ॥ याची संगतीं साचार । न सोडावीं जन्मवर । ऐसा निश्चय करोनि थोर । राहे निरंतर तें ठायी ॥ ६९ ॥ बहुत दिवस लोटती तेथ । मग तो पावला विदेह स्थित । जनार्दन रूपें विश्व भासत । आपणंही तयांत समावे ॥ १७० ॥ मी माझें देह निश्चितीं । तैसी मनांत नाठवे स्फूर्ती । सत्कर्म राहिलें सहज स्थिती । आत्मवत जगत भासे तया ॥ ७१ ॥ पूर्ण बोध ठसावला जाण । यास्तव पालटे नामाभिधान । चांद बोधला त्याजकारणें । सर्वत्र जन बोलती ॥७२॥ कांहीं दिवस लोटतां ऐसे । मग जनार्दनासि स्वमुखें पुसे । आता हेत उपजला असे । कीं समाधीस बैसावें ॥ ७३ ॥ त्याचे मनोगत जाणोनि पाहीं । समाधीस बैसविला विदेही । परी यवन उपद्रव करतील कांहीं । मग एक युक्ति तिहीं योजिली ॥७४॥ जैसें अविंधाची मदारे[1] जाण । तसैच वर रचिलें स्थान । हिंदु आणि ते यवन । समाधान पावले ॥ ७५ ॥ देवगिरीच्या पर्वतावर । तें स्थापन आहे अद्यापवर । होतसे नाना चमत्कार । देखती सर्व दृष्टीसीं ॥७६॥ तों जनार्दनपंत एके दिनीं । विचार करिती आपुलें मनीं । एकोवासि धाडावें तीर्थाटणीं । तेणें होईल अवनी पवित्र हे ॥ ७७ ॥ मग नाथास समीप बोलावून । एकांतीं म्हणती एक वचन । तेव्हां विनय मस्तक चरणीं ठेवून । स्वमूखें स्तवन करीतसे ॥७८॥ म्हणे जय जयाजी जनार्दना । मायातीता निष्कलंक निर्गुणा । मी तरी लडिवाळ तुझा तान्हा । अद्भुत महिमा काय जाणों ॥ ७९ ॥ श्रुति शास्त्रें तुज वर्णिती । तयांच्या कुंठित जाहल्या मती । खुंटल्या सकळ पुराण व्युत्पत्ती । परी तुझी सत्कीर्ती पूर्ण नव्हे ॥१८०॥ तुझा स्तवें[2] करितां देवाधिदेवा । कुंठित जाहला चक्षुःश्रवा[3] । दुखंड जाहल्या त्याच्या जिव्हा । आमुचा हेवा तो किती ॥८१॥ ऐसा जो कां भोगि नायक । होऊनि राहे तुझा कल्पक । तुज आंगावरी निजवोनी कौतुक ।

१ कबर. २ स्तवन, धांवा. ३ ब्रह्मदेव.


तुझे स्तवन

सप्रेम सुख भोगितसे ॥ ८२ ॥ सृष्टिकर्ता जो चतुराननं । तुझा महिमा नेणोनि त्यानें । मग स्वयें केलें वत्सा हरण । तेव्हां अद्भुत विंदानं दाविलें ॥ ८३ ॥ गाई गोपाळ वत्सें निर्धारी । तुवा निर्माण केली दुसरी । मग चतुर्मुखें ब्रह्मा स्तवन करी । शरण निर्धारी तुज आला ॥ ८४ ॥ तुझिया सत्तेनें निर्धारी । इंद्रियें राहाटती निज शरीरी । उत्तीर्ण व्हावें कैशा परी । पदार्थ पदरी एक न दिसे ॥८५॥ चराचर जे दृष्टीस भासत । मी तुजचि देखें तयात । इतुकेनि हे मन निश्चित । पावलें विश्रांत सर्वदा ॥ ८६ ॥ ऐसे स्तवन करोनि पाहीं । सद्भावें मस्तक ठेविला पायीं । म्हणे आज्ञा कराल तीये समयीं । धरीन जीवीं सर्वस्वें ॥८७॥ एकनाथाची अमृत वचनें । ऐकोनि जनार्दन संतोष मनें । म्हणती पृथ्वीचीं तीर्थें संपूर्ण । येई पाहोन एकदां ॥ ८८ ॥ कोठें रहावें त्रिरात्र । वचनें कोठें असावें पंचरात्र । दृष्टीसि देखिल्या भगवत्पर । तयांसि नमस्कार करावा ॥ ८९ ॥ तीर्थाटणाच्या मिषें करून । होईल संतांचें दर्शन । तुझा योगक्षेम जाण । स्वयें श्रीकृष्ण चालवील ॥१९०॥ बदरीनाथपर्यंत जाऊनी । उत्तरमानस पाहावें नयनीं । दक्षिणरामेश्वर विलोकुनी । येई परतोनी मजपासी ॥ ९१ ॥ ऐकोनि सद्गुरूची वचनोक्ति । सरसी उद्भवली हर्षखंती । ते म्हणाल जरी कैशा रीतीं । तरी तेही रीती अवधारा ॥९२॥ होतील संतांचीं दर्शनें । यास्तव हर्ष वाटला मनें । परी सद्गुरूची सगुण दर्शनें । अंतरली म्हणोन खंतावे ॥ ९३ ॥ मग घरीं निपजोनि पक्वान्न । एके पंक्तीस केलें भोजन । मुख शुद्धि विडे घेऊन । समाधान पावले ॥९४॥ श्रीनाथ जेव्हां तीर्थांसि जात । जनार्दन चालिले बोळवित । जैसी अबला सासऱ्यासी जात । ते होय सद्गदित ते समयीं ॥९५॥ मार्गीं अरण्यांत जावोनि पाहीं । मस्तक ठेविलें सद्गुरुपायी । म्हणे आतां कृपा असों द्यावी । घातली डोई पोटांत ॥९६॥ कंठ जाहला सद्गदित । सप्रेम नेत्रीं अश्रु वाहत । सद्गुरूसि ऐसी अवस्था होत । प्रेम नावरत सर्वथा॥९७॥ जनार्दन म्हणती ते समयीं । मी तर सर्व काळ तुझें हृदयीं । तुझा माझा वियोग नाहीं । हा आठव जिवीं धरावा ॥९८॥ तूं तरी माझा आत्माचि जाण । आतां सांडोनि द्वैतभान । वियोगें शीण न धरावा ॥९९॥ मन आपुल्या शीरींची कोचकी । घातली नाथाचे मस्तकीं । महाप्रसाद येतांचि कौतुकी । सप्रेम हरिखें बोसंडे ॥२००॥ मग श्रीनाथ विनंती करीत सहज । पुन्हा दर्शन द्यावें मज । जाणोनि अंतरीचे गुज । सद्गुरुराज अवश्य म्हणे ॥ १ ॥ मग जनार्दनासि प्रदक्षिणा करून । नमस्कार घालीत प्रीतीं करून । सगुण स्वरूप आठवोनि ध्यान । त्वरें करून चालिले ॥ २ ॥ मार्गीं चालती लवलाहें । क्षणक्षणां परतोनि पाहे । पुन्हां पुन्हां दंडवत घालीत आहे । दिसो राहे तों वरी ॥ ३ ॥ जयजय जनार्दन म्हणवोनी । पुढें चालिले त्वरें करूनी ॥ यापरी नाथासि बोलवोनी । सद्गुरु सदनीं मग आले ॥ ४ ॥ श्रीनाथाचें सद्गुण लक्षण । घडीघडी आठवीतसे मन । सद्गुरूसि खंती वाटतसे पूर्ण । न पडे चैन सर्वथा ॥ ५ ॥ संत ते साक्षात पांडुरंगमूर्तीं । त्याची कवणा वदवेल स्थिती । तेथें वल्गना करीं मी मूढमती । हा

१ ब्रह्मदेव. २ कौतुक.

अपराध निश्चित दिसतसे ॥ ६ ॥ परी आवडीचे नियोगें साचार । वेडीं वांकुडी वदतो अक्षरें । याचा कर्ता श्रीरुक्मिणीवर । भीमातीर विहारी जो ॥ ७ ॥ तो पांडुरंग माया लाघवी । आपुलीं चरित्रें आपण वदवी । महीपतीवरी निमित्त ठेवी । नव्हेचि कवी ग्रंथकर्ता ॥ ८ ॥ स्वस्ति श्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त ॥ चतुर्दशाध्याय रसाळ हा ॥२०९॥ अ० ॥ १४ ॥ ओ० ॥ २०९ ॥ अभंग ॥ १७ ॥ एकुण ओव्या ॥ २२६ ॥ ॥ ६ ॥

अध्याय १५



श्रीगणेशाय नमः ॥ अपरार्चीं अनंत कीर्ती ॥ थोरथोरांच्या खुंटल्या युक्ती । तेथें आपली प्राकृतमती । कैसी मरती होईल ॥ १ ॥ जैसा समुद्र जीवनीं बहुत सांठ । जाहाजें फिरती पैलकोट । तयामाजी फुटकें पट । जाईल कोठें पैलतीरा ॥ २ ॥ नातरी उदयासि येतां दिनकरें । नक्षत्रासहित लोपे चंद्र । तयापुढे खद्योतें तेज थोर । हा तों विचार घडेना ॥ ३ ॥ पृथ्वीचें वजन करावें कोडें । ऐसें विस्तीर्ण नाहीं पारडें । आकाशासि स्वहस्तें गवसणीं पडे । हे तों रोकडें घडेना ॥४॥ वैश्वानराचे अवयव संपूर्ण । पहावें ऐसें तेज कोण । तेवी महाविष्णूचे वर्णितां गुण । बुद्धि सहित मन वेडावे ॥५॥ जेवीं मातेस देखोनि तान्हें बाळ । अवाच्य शब्द भलतेचि बरळे । परी तें आपुले मोहाचेनि बळे । कौतुक लळे पुरवीतसे ॥६॥ तैसे कौतुक मानूनि संतीं । आर्ष वचनें करावीं सरतीं । अज्ञान बाळक महीपती । ऐसें चित्तीं समजोनियां ॥७॥ मागिले अध्यायीं कथा अद्भुत । तीर्थासि गेलिया एकनाथ । मागे जनार्दनासी वाटेतसे खंत । गुण आठवत सर्वदा ॥ ८ ॥ असो इकडे प्रतिष्ठान क्षेत्रीं । आजाआजी होती घरीं । तयांसि न पुसत सत्वरी । आले देवगिरीं एकनाथ ॥ ९ ॥ सद्गुरु सेवेसि गुंतोनि पाहीं । मागील परत केली नाहीं । तेणें वृद्धांसि चिंता जीवीं । घरोघरीं तिहीं धुंडीलें ॥ १० ॥ जयातया पुसती मात । दृष्टी देखिला एकनाथ । ते म्हणती आम्हांसि नाहीं विदित । मग रुदन करित उभयतां ॥११॥ दोघे क्षेत्रामाजी फिरती । घरोघरीं लोकांसि पुसती । चैन न पडेचि दिवसराती । वेधली वृत्ती श्रीनाथें ॥१२॥ गोड न लागेचि अन्नपाणी । वर्षा येव्हडी वाटे यामिनी । बाळकाचे गुण आठवोनि मनीं । परी शुद्धि कोणीं सांगेना ॥ १३ ॥ बाळपणीं मेलीं मातापिता । येव्हडाचि झीड वांचला होता । त्याच्या आश्रयें तत्वता । आम्ही उभयतां काळ कंठू ॥ १४ ॥ आतां आंधळ्याची काठी । ते अडकलीसे कवण वेटी । आतां तो कधी पडेल दृष्टीं । म्हणवोनि कष्टी होताती ॥ १५ ॥ गावींचे त्रिविध लोक पाहीं । नाना कुतर्क करिती जीवीं । लेंकुरासि निष्ठुर बोलिलें कांहीं । यास्तव लवलाहीं तें गेलें ॥ १६ ॥ आजाआजी आहेत तत्पर । त्यांसि मायबापांची नये सर । ज्याचा जार त्यासीच भार । आणिकांसि जो जार तयाचा ॥ १७ ॥ एक म्हणती मिथ्या विचार । यांनीं चळला पाळिला फार । पोर पोरटें निष्ठुर । गेले दूर टाकोनियां ॥ १८ ॥ लहानपणापासोंनि जाण । त्याचा पाहतों पायगुण । मातापिता गेलीं निमोन । दरिद्र त्वरेनें त्यांसि आले ॥ १९ ॥ आजा आजी आहेत दोन्हीं । त्यांच्या जीवासि लाविली कांचणी । आतां तयांसि वृद्धपणीं । द्यावयासि पाणी कोणीच नसे ॥ २० ॥ असो यावरी त्रिविध जन । नानापरींची बोलती वचनें । परी त्या उभयांसि न पडे चैन । करिती प्रयत्न बहुसाल ॥२१॥ तीर्थवासी जे पांथस्थ । व्यवसायी आणि कापडीं हिंडत । तयांसि जावोनि पुसती मात । देखिला एकनाथ दृष्टीसी ॥ २२ ॥ कागरावे साळोंखियांसि पुसत । तुम्हीं पाहिला एकनाथ । मग वाळवंटीसी जावोनि त्वरित । गंगेसि दंडवत घातले ॥२३॥ म्हणती आमुचें वाळवंट

१ परमात्मा. २ सूर्य. ३ काजवा. ४ सूर्य. ५ पैठण. ६ खोटा. ७ मरण पावली.

दिसे नयनीं । तरी तुवा बुडविलें आपुले जीवनीं । ते शुद्ध सांगा त्वरें करूनी । गंगेसि विनवणी नित्य करिती ॥ २४ ॥ एकनाथ सद्गुरु भेटीसी जातां । चिंतार्णवात ते उभयतां । नेत्रासि आली निझुरता । शोक करितां दिवस निशीं ॥२५॥ आप्त विपयी सोयरे पिशुन । इष्ट मित्र आणि सज्जन । घरीं येवोनि सकळ जन । समाधान मग करिती ॥ २६ ॥ म्हणती वय लहान । परी लक्षणें आहेत सगुण । ईश्वर भजनीं सर्वदा मन । पुराण श्रवण नित्य करी ॥२७॥ साधुसंत वैष्णववीर । यांचे ठायीं आस्था थोर । श्रीराम भजन निरंतर । स्वमुखें साचार करितसे ॥ २८ ॥ त्याची प्रज्ञा देखोनि सुख । आम्हांस वाटे परम कौतुक । तयासि रक्षिता वैकुंठनायक । आतां सर्वथा शोक न करावा ॥२९॥ अध्यात्म ग्रंथ श्रवणार्थी । तयासि बहुत आस्था होती । कोठें धरोनि सत्संगती । बैसला निश्चिती वाटतें ॥३०॥ एक म्हणती पुराण ऐकावयासी । एकनाथ बैसे पंडितापांसी । त्याणें चाळवोनि मुलासी । स्वयें कटकासी तो गेला ॥३१॥ ऐसा तर्क करितां कोणी । समस्तांसि मानलें तये क्षणीं । कीं लेंकुरासी विद्यार्थी करोनी । गेला घेउनी पुराणिक ॥३२॥ मग त्या वडिला दोघांप्रती । हर्ष शोक उपजे चित्तीं । त्याच्या घरासि जावोनि पुसती । कैशारीतीं तें ऐका ॥३३॥ कटकासि गेले पुराणिक । सवें चाळवोनि नेलें बाळक । आम्हांसि बहुत जाहलें दुःख । करितों शोक निशिदिनीं ॥ ३४ ॥ घरिचीं म्हणती ते समयीं । सैन्यास गेले घरगोसांवी । परी मुलास नेलें किंवा नाहीं । हें विदित कांहीं असेना ॥ ३५ ॥ परी लोक तर्क करिती सत्य । त्या सवेंचि गेला एकनाथ । आजा आजी चिंताक्रांत । वाट पाहात राहिलीं ॥ ३६ ॥ पुराणिक आलिया सत्वर । मुलासि आणीला बरोबर । वाट पाहतां दिवस रात्र । वर्षे चार लोटली ॥ ३७ ॥ तो कटक परतलें सत्वरा । ऐकोनि गेलीं त्याच्या घरां । म्हणती फिताऊनि नेलें आमुच्या कुमरा । धीट हा खरा पुराणिक ॥ ३८ ॥ लेंकुरासि चाळवोनि नानापरी । विद्यार्थी करोनि नेला दुरीं । तयासि सांभाळोनि न आणिलें जरी । तरी प्राण दारीं आम्हीं देऊं ॥ ३९ ॥ हें घरच्या मनुष्यांनीं ऐकोनि देखा । पत्र पाठविलें पुराणिका । कीं तुम्हीं चाळवोनि नेला एका । कीं अभिशाप लटिका हा आला ॥ ४० ॥ घरच्या मनुष्याचें येतां पत्र । ब्राह्मण जाहला चिंतातुर । म्हणे अन्याय न करितां साचार । अभिशाप मजवर आला कीं ॥ ४१ ॥ मग यजमानासि सांगोनि वृत्तांत । वेतन घेवोनि निघाला पंडित । म्हणे कोठें गेला एकनाथ । मजवरी निमित हें आलें ॥ ४२ ॥ मागें श्रीनाथें त्याज कारण । सांगितली होती जीवींचीं खूण । कीं देवगिरी समज आहे जाणें । श्रीगुरु जनार्दन भेटीसी ॥ ४३ ॥ तें अवचित स्मरण जाहले मनीं । म्हणे शोध घ्यावा तेथें जाऊनी । जरी एकनाथ असेल त्या ठिकाणीं । तरी जावें घेउनी तयासी ॥ ४४ ॥ ऐसा विचार करोनि मानसीं । पुराणीक आला देवगिरीसी । मग भेटोनि जनार्दनपंतांसी । वृत्तांत तयासी सांगीतला ॥४५॥ सद्गुरु म्हणती तये क्षणीं । तो आजवर होता या ठिकाणीं । बहुतचि सेवा करोनि । आम्हां लागोनि तोषविलें ॥४६॥ आतां

१ जंगलात. २ ठाऊक. ३ सैन्य.

मज आज्ञेने साचार । तीर्थाटणासि गेला दूर । तयासि चिंता नसेचि अणुमात्र । वडिलांसि पत्र पाठविलें ॥४७॥ मग पुराणीक जावोनि प्रतिष्ठानीं । गेले एकनाथाचें सदनीं । वृद्धें बैसली होती दोन्हीं । तया लागोनि सांगितलें ॥ ४८ ॥ कीं तुमचा नाथ देवगिरीसी । गेला जनार्दनाचे भेटीसी । त्याचें हातची पत्रिका ऐसी । तेही तयांसी दाखविली ॥ ४९ ॥ चुकल्या पुत्राची शुद्धिवार्ता । एकोनि संतोष वाटला चित्तां । म्हणती प्राण परतले जात जातां । आम्हां अनाथा कोणी नसे ॥५०॥ उत्तर पुसती पडताळोनी । ऐकतां श्रवणासि न पुरे धनी । साकर[1] आणोनि तये क्षणीं । घातली वदनीं तयाचें ॥५१॥ पुराणीक पुढती उत्तर देत । माझा विश्वास नसेल तुम्हांप्रत । तरी देवगिरीसी जावोनि त्वरित । जनार्दनातें पुसा की ॥५२॥ इतुकें बोलोनि ते अवसरी । ब्राह्मण गेला तेव्हां घरीं । वृद्धें चिंता करिताति अंतरीं । कैसी परी करावी ॥५३॥ जरी मनुष्य पाठवावें देवगिरीसी । तरी द्रव्य नाहीं द्यावयासी । तरी आपणचि जावोनि त्या स्थळासी । जनार्दनासी भेटावें ॥५४॥ ऐसा विचार करोनि चित्तांत । शनैःशनैः उरकीत पंथ । देवगिरीसि जावोनि त्वरित । जनार्दनातें भेटले ॥५५॥ सांगितले आद्यंत वर्तमान । अश्रुपातें भरिलें लोचनी । म्हणती आम्हांसि नाथें दिधलें टाकून । न ये परतोनि घरासि ॥ ५६ ॥ जनार्दनें देवोनि अभ्युत्थान । उभयतांसि भेटले प्रीतीनें । स्वमुखें सांगे नाथाचे गुण । निज प्रीतीनें त्यासी ॥५७॥ करावया विश्वोद्धार । श्रीविष्णुनें धरिला अवतार । धन्य तुमचें कुळ पवित्र । जाहला उद्धार वंशाचा ॥ ५८ ॥ तो तुम्हांसि बाळ भासतो चित्तीं । परी तो साक्षात् पांडुरंग मूर्ती । त्याचें चरित्रें देखाल पुढतीं । मग संशय निवृत्ती होईल ॥ ५९ ॥ ऐकोनि जनार्दनाचें वचन । तयासी वाटलें समाधान । म्हणती आणिक षण्मास लोटतां पूर्ण । नाथ परतोनि येईल घरां ॥६०॥ मग एक महिना पाहीं । जनार्दनें त्यांसि राहविलें गृहीं । पक्कान्नें करोनि नित्य नवीं । तयांसि जेववी प्रीतीनें ॥६१॥ वस्त्रें भूषणें अलंकार । द्रव्य खर्चीस दिधलें फार । मग स्वहस्तें लेहून पत्र । नाथासि सत्वर दीधलें ॥ ६२ ॥ त्यामाजि इतुकाचि भाव पूर्ण । तुजला होताचि पत्र दर्शन । तेव्हां सांडोनि तीर्थ भ्रमण । वसतीस्थान तेचि कीजे ॥ ६३ ॥ ऐसीं स्वहस्तें लेहूनि अक्षरें । सद्गुरूनें दीधलें पत्र । अश्व मनुष्य बरोबर । देऊनि सत्वर बोळविले ॥ ६४ ॥ जनार्दन सांगतीं त्याजकारण । उत्तम मानस तीर्थे करोन । नाथ पैठणासि येईल जाण । तुम्हीं शोधार्थ असणें सावध ॥ ६५ ॥ आमुचें पत्र दीधल्या पाहीं । मग सर्वथा पुढें जाणार नाहीं । तुम्हीं चिंता न करावी जीवीं । ऐसें शिकवी तयांसी ॥ ६६ ॥ ऐसें जनार्दनें सांगतां । संतोष उभयतांच्या चित्ता । मग पैठणासि येऊनि तत्वतां । वृत्तांत समस्तां सांगती ॥ ६७ ॥ जनार्दन पंताचें भलेपण । सकळांसि करिती निवेदन । पत्र ठेविती करोनि जतन । मग समस्तां कारणें सांगती ॥ ६८ ॥ साहा महिन्यांत साचार । येथें नाथ अकस्मात आला जर । तरी तुम्हीं ओळखोनि सत्वर । राहे तो विचार करावा ॥ ६९ ॥ इकडे सद्गुरूच्या आज्ञे-

[1] साखर.

करोनी । एकनाथ गेले तीर्थाटणीं । जनार्दन भरला ध्यानीं मनीं । चराचर त्रिभुवनीं तोचि दिसे ॥ ७० ॥ लोकसंग्रह साचार । तीर्थे दैवतें पाहती फार । जेथें चित्त होतसें स्थिर । ते ठायीं त्रिरात्र राहती ॥ ७१ ॥ कोठे देखोनि सत्संगती । तेथे क्रमिता पंच रात्री । कोठें वंदन कोठें स्नान करिती । मग स्वइच्छा चालतो तेथुनी ॥ ७२ ॥ पूर्ण पयोष्णी साचार । तपती नर्मदा तीर्थ थोर । अवंतीसि महाकाळेश्वर । पहातांचि अंतर निवालें ॥७३॥ मथुरा गोकुळ वृंदावन । ये स्थलीं येती प्रीतीं करोन । जेथें वैष्णव प्रेमळ जन । नाम स्मरणें डुलती ॥ ७४ ॥ तें स्थळीं असती भाविक भक्त । अर्चन विष्णुचें यथास्थित । दृष्टीसी देखोनि एकनाथ । रमलें चित्त तें ठायीं ॥७५॥ म्हणे धन्य धन्य हे पुण्यधरणी । ये स्थळीं क्रिडले चक्रपाणी । क्षेत्रवासी वैष्णव पाहोनी । संतोष मनीं वाटला ॥ ७६ ॥ रास उत्साह हरिकीर्तन । भजनशीळ अवघे जन । ध्यानीं मनीं तयांच्या कृष्ण । वेधले मन सर्वदा ॥ ७७ ॥ त्या विष्णुक्षेत्रामाजी साचार । श्रीनाथे दिवस क्रमिले फार । मग देवासि करोनि नमस्कार । तेथोनि सत्वर चालिले ॥ ७८ ॥ महाक्षेत्र वाराणसी । ते स्थळीं पातले वेगेसी । स्नान करोनि मणिकर्णिकेसी । श्रीविश्वेश्वरासी भेटले ॥ ७९ ॥ पंचरात्र राहोनि तेथ । पुढें गमन केलें त्वरित । पुन्हा आगमन होईल तेथ । श्रीजनार्दन सत्ते करोनियां ॥ ८० ॥ मग प्रयाग तीर्थासी येऊन । त्रिवेणी संगमी केलें स्नान । घेऊनियां माधव दर्शन । समाधान पावले ॥ ८१ ॥ पुढें जावोनि गयेप्रती । श्रीविष्णुपदासि वंदिलें प्रीती । सद्भावें पूजन करोनि निश्चिती । संतोष चित्ती मानित ॥८२॥ काया वाचा आणि मन । जे विष्णु चरणीं अनन्य शरण । तरी तयांसि घडले गया वर्जन । अगणित पुण्य कोण गणी ॥ ८३ ॥ जे श्रीहरि चरणीं जाहले रत । तयांसि सत्कर्मं घडलीं समस्त । तयांचे पाय लागतां निश्चित । तीर्थें पुनीत पैं होती ॥ ८४ ॥ यमुना गोदा भागीरथी । कृष्णा वेण्या सरस्वती । नर्मदा तापी भीमरथी । आगमन इच्छिती संतांचें ॥ ८५ ॥ जाणोनि तयांचें मनोगत । जनार्दनाचें द्रवलें चित्त । मग एकनाथासि आज्ञापित । कीं तीर्थें समस्त पहावीं ॥ ८६ ॥ जनीं भरलासे जनार्दन । ऐसा निश्चय बाणला पूर्ण । श्रीनाथ हिंडती तीर्थाटण । तीं मुख्य स्थानें सांगितली ॥ ८७ ॥ गया प्रयाग आणि काशी । करोनि चालिले अयोध्येसी । तेथिचे लोक क्षेत्रवासी । श्रीराम नामासी निवटले ॥ ८८ ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । या मूर्तीचे घेवोनि दर्शन । समाधान पावले ॥ ८९ ॥ विष्णु क्षेत्राचे ठायीं निश्चिती । नाथासि परम वाटतसे आर्ती । तेथें प्रेमळ वैष्णव राहती । कीर्तनीं डुलती निजप्रेमें ॥ ९० ॥ अयोध्या क्षेत्र पाहोनि जाण । मग बदरीनाथासि केलें गमन । आदि पुष्कर तीर्थ पाहोन । केलें स्नान ते ठायीं ॥ ९१ ॥ पुष्कर तीर्थाचें दर्शनें । तत्काळ होय कलिमल नाशन । तेंहीं स्थान जाहलें पावन । होतां आगमन नाथाचें ॥ ९२ ॥ मग हिमाचल पर्वतीं साचार । भागीरथीचें वाहे नीर । तेथें कडा तुटलासे थोर ॥ दृष्टांत न ठरे पाहतां ॥ ९३ ॥ शिंक्यांत बैसोनि

साचार । ते स्थळीं व्हावें पैलपार । नाथासि अभय अणुमात्र । न ठावे साचार ते ठायीं ॥ ९४ ॥ परम उल्हास धरोनि मनें । दृष्टीसी पाहिलें तें स्थान । देखोनि बदरीनारायण । साष्टांग नमन करीतसे ॥ ९५ ॥ जैसे कां नरनारायण । सर्वथा नगे भेदभान । तैसे देवभक्त होऊनि आपण । आपुलें महिमानें वाढविती ॥ ९६ ॥ तेथील क्षेत्रवासी जे समस्त । सप्रेम श्रीहरीची लीला वर्णित । उद्धव धाडिला बदरिकाश्रमांत । त्याणे हे रीत लाविली ॥ ९७ ॥ जैसी देख दाखविती संत । भाविकजन तैसेचि वर्तत ॥ तेणेंचि ते होती जीवनन्मुक्त । कल्पना समस्त निरसोनी ॥ ९८ ॥ मग बदरीनाथासि पुसोनि त्वरित । द्वारकेसि तेव्हां गमन करित । अरण्यामाजी पाहोनि एकांत । भजन करित श्रीहरीचें ॥ ९९ ॥ नामरूपी जडलें चित्त । यास्तव देहभान नसे किंचित । जनार्दनरूप विश्व भासत । आपणही तयांत समावे ॥१००॥ ऐशा स्थितीनें ते अवसरी। सत्वर गेले द्वारकापुरी। स्नान करोनी गोमती तीरीं। संतोष अंतरीं वाटला ॥१॥ मग देउळासि जावोनि सत्वर गती । साष्टांग नमस्कार घातला प्रीतीं । दृष्टीसीं देखोनि श्रीकृष्ण मूर्ती । संतोष चित्तीं जाहला ॥२॥ ते स्थळीं एकमास पर्यंत । वास्तव्य करितसे नाथ । अर्चनपूजा त्रिकाळ पाहत । श्रवणीं ऐकत सत्कीर्ती ॥ ३ ॥ आतां दक्षिणतीर्थे पाहावी नयनीं। यास्तव परतले तेथूनी । मग नरसी मेहेताचें येवोनि स्थानीं । जुनागड नयनीं पाहिला ॥४॥ निज भक्ताची देखोनि प्रीती । द्वारकेची पुरातन मूर्ती । डांकुरासि[1] आले निजप्रीती । तें स्थान निश्चिती अवलोकिलें ॥ ५ ॥ ऐसी उत्तरतीर्थें करोनि सांग ॥ पाहिली पृथ्वीची जोतिर्लिंगें । सप्तपुऱ्या देखोनि अंगें । सप्रेम रंगें डुल्लती ॥६॥ ऐसा पंथ क्रमिता सत्वर । पातले तेव्हां प्रतिष्ठानं[2] क्षेत्रा । स्नान करोनि गोदा-तीरा । मग पिंपळेश्वरा नमस्कारिलें ॥ ७ ॥ गांवींचे लोक ओळखोनि कोणी ॥ गोळा करितील ये ठिकाणीं । यास्तव प्रातःकाळापासोनी ॥ राहिले लपोनी देवळांत ॥७॥ मध्यान्ह समयी पाहिजे अन्न। यास्तव क्षेत्रांत चालिले आपण । जैसें जे समयीं मिळेल भोजन । ते समाधानें भक्षिती ॥९॥ रसनां जिंतोनि इंद्रियदमन । धडगोड हे तों सर्वथा नेण । सारिखेचि तया मानापमान । शत्रु मित्र जनार्दन भासती ॥११०॥ ऐशा स्थितीनें एकनाथ । तीर्थें करीत पातले तेथें । गांवांत प्रवेशतांचि तयातें । तों वडिलीं अकस्मात देखिलें ॥११॥ श्रीनाथे वोळखोनि ते अवसरीं । मग मनोमयाचि नमस्कार करी । म्हणती वोळख द्यावी यांसि जरी । तरी गोवितील संसारीं मज आतां ॥ १२ ॥ परम दुर्धट हा संसार । सद्गुरु आज्ञेंत पडेल अंतर । दक्षिण मानस राहिलें समग्र । तरी गमन सत्वर करावें ॥१३॥ ऐसें कल्पोनि चित्तांत । वोळखी न देच तयातें । आजाआजी न्याहाळोनि पाहत । तों चिन्हें समस्त दिसती ॥ १४ ॥ बाळपणीं टाकोनि गेला असे । तयासि जाहले फार दिवस । प्रौढपण आलें शरीरास । संदेह चित्तास वाटतो ॥ १५ ॥ तर्केचि उभयतां बोलती वचन । बापा त्वां टाकिलें आम्हां कारणें । कैसें निष्ठुर केलें मन । भरले लोचन अश्रुपातें ॥ १६ ॥ आजा आजी ते अवसरी । बुझावित असती नानापरी । बहुत

[1] माहात्म्य. [2] पैठण.

मिळाल्या नरनारी । म्हणती निर्धारीं हाचि नाथ ॥ १७ ॥ एक म्हणती हाचि स्पष्ट । एक म्हणती संदेह वाटे । वृद्धांचें प्राक्तन दिसतें खोटें । कैसें अदृष्ट कळेना ॥ १८ ॥ मीच होय अथवा नाहीं । ऐसें उत्तर न करीच कांहीं । उठोनि जातां ते समयीं । धांवोनि वडिलांहीं धरियेला ॥ १९ ॥ श्रीजनार्दनाचें हस्ताक्षर । लेहोन घेतलें आज्ञापत्र । तें आणोनियां मग सत्वर । नाथासमोर दाखविती ॥ १२० ॥ श्रीनाथें वोळखोनि तये क्षणीं । मस्तकीं वंदीत प्रीती करोनी । त्याचा अर्थ ध्यानासि आणुनी । मग त्याच स्थानीं बैसले ॥ २१ ॥ अगस्तीची आज्ञा वंदोनि शिरीं । विंध्याचळ पडे पृथ्वीवरी । तेवी जनार्दनाचें देखतां नेत्रीं । मग तेचि धरित्रीवरी बैसले ॥ २२ ॥ वस्तीही नसेचि ते ठायीं । लोक म्हणती चलावें गृहीं । परी कोणाचें नायकेचि विदेही । मौनेंच कांहीं न बोले ॥ २३ ॥ चराचर दिसतें माया । तें जनार्दनचि भासे तया । म्हणवोनि शीत उष्ण नेणेचि काया । देहींच या विदेह ते ॥२४॥ कोणी होते भाविक नर । ते स्वमुखें सांगती विचार । तेणेंचि आणोनि उपहार । द्यावा सत्वर यालागीं ॥ २५ ॥ सर्वज्ञ सांगतां ऐशा रीतीं । तैसीच वडिली ऐकिली युक्ती । ते स्थळीं अन्न वाढोनि आणिती । तें श्रीनाथें प्रीती भक्षिलें ॥ २६ ॥ तीन दिवस पर्यंत । तेथूनि न उठेचि निश्चित । आजा आजीही आलीं तेथ । निग्रह बहुत देखोनिया ॥ २७ ॥ शीत उष्ण आणि वारें । यांसि कांहींच नसे आधार । कोणी गांवींचे भाविक नर । त्यांनीं बांधोनि छप्पर एक दिलें ॥ २८ ॥ तये स्थळीं एकनाथ । भजन करीत प्रेमयुक्त । सात्विक लक्षणें अळंकृत । देखोनि विस्मित लोक होती ॥ २९ ॥ म्हणती तारुण्य वयांत साचार । इतुका आंगीं वैराग्यभर । यासि न म्हणावें मानवी नर । ईश्वरी अवतार दिसतसे ॥ १३० ॥ ऐशा परी करोनि स्तुती । त्रिकाळ कोणी दर्शनासि येती । देखोनि तयांची सप्रेम भक्ती । कीर्तन करिती श्रीनाथ ॥३१॥ मागील नसतां पाठांतर । प्रासादिक बोलती उत्तर । पदें रचोनि वरच्यावर । श्रीहरीचीं चरित्रें वर्णीतसे ॥ ३२ ॥ मागें धृपदी नसे कोणी । पांडुरंगासि चिंता उपजली मनीं । मग आपण ब्राह्मणाचें रूप धरोनी । साहित्य कीर्तनीं करितसे ॥ ३३ ॥ मुखांतूनि निघती अक्षरें । मागून झेलीत वरच्यावर । टाळ धरोनिया निजकरें । मंजूळ स्वर देत मागें ॥ ३४ ॥ सकळ रंगाचें दैवत । जो देवाधिदेव रुक्मिणीकांत । तोचि एकनाथाच्या हृदयांत । बैसोन देत आठवण ॥ ३५ ॥ आणि बाह्यात्कारें श्रीहरी । निजांगें आपण ध्रुपद धरी । परी कोणासि न कळेचि निर्धारीं । प्रत्यक्ष नेत्री देखतां ॥ ३६ ॥ एकनाथाचें कीर्तन ऐकतां । श्रोतयांसि होतसे विदेह अवस्था । जरी खळाचे कानी शब्द पडतां । तरी येत सात्विकता तयासी ॥३७॥ क्षेत्रवासी नारीनर । परस्परें बोलती उत्तर । म्हणती श्रीनाथ जाहला अवतार । जगदुद्धार करावया ॥ ३८ ॥ याज ऐसें प्रेमळ गायन । कीर्तन नयेची कोणाकारणें । श्रवणेंचि वेधें सकळाचें मन । यापरी स्तवन लोक करितां साचार । गावांत मानिती थोर थोर । मग बांधोनि देती थोर मंदिर । द्रव्य फार खर्चोनिया ॥ १४० ॥ आवार

१ ठामपणे.


घर चौक साधूनी । एकनाथासि दीधलें त्याणी । तृप्ति ब्राह्मण संतर्पणीं । घर निघवणी ते झाली ॥४१॥ आजा आजी दोघेजण । चित्तीं पावलीं समाधान । मग घेऊनि आपलें देवार्चन । तें स्थळ येवोन राहती ॥ ४२ ॥ अन्नवस्त्राची निश्चिती । स्व इच्छेनें भाविक करिती । ज्याचा सखा वैकुंठपती । तेथें सिद्धी राबती सर्वत्र ॥४३॥ एकादशीस हरिजागर । कीर्तन होतसे चार प्रहर । श्रवणासि लोक येती फार । नामउच्चार करावया ॥ ४४ ॥ तों श्रीनाथ एकदां काय बोलती । श्रावण मासीं कृष्ण जयंती । आपण उत्सव करावा प्रीती । समस्तांसि वचनोक्ती मानली ॥४५॥ कोणी धनवंत सावकार । त्याणीं साहित्य आणिलें फार । सारवोनि श्रृंगारिलें मंदिर । देवासि मखर निर्मिलें ॥ ४६ ॥ कोणी ब्राह्मण देवगिरी प्रती । जावोनि जनार्दनासि भेटती । नाथाचा वृत्तांत सकळ सांगती । ऐकोनि चित्तीं संतोपले ॥४७॥ जैसा पुत्राचा विजय ऐकोनि कानीं । पिता संतोषे आपुलें मनीं । कीं बाळकाचे कोड देखोनि नयनी । मातेसि निजमनी उल्हास ॥४८॥ तैशाव रीती सद्गुरूसी । ब्रह्मानंद न माये मानसी । मग भेटावया एकनाथासी । परिवारेसी चालिले ॥ ४९ ॥ कृष्णजयंतीस साहित्य । घरीं केलें होतें बहुत । तितुकें सर्व घेऊनि त्वरित । जनार्दनपंत निघाले ॥१५०॥ दिंड्या पताका बरोबर । गरुड टकियांचे भार । वाद्यें वाजती अतिगजरें । चालिले थोर संभ्रमे ॥ ५१ ॥ संतर्पण करावया थोर । सामग्री घेतली बरोबर । गोण्या घालोनि बैलावर । पुढें सत्वर पाठविल्या ॥ ५२ ॥ मग जनार्दन येवोनि प्रतिष्ठानीं । चालिले एकनाथाचें सदनीं । द्वारापासी येतांचि त्यांणीं । तो कौतुक नयनीं देखिले ॥५३॥ द्वारपाळाचे रूपें निर्धारीं । श्रीदत्तात्रेय उभे महाद्वारीं । त्रिशुळ घेतलासे निजकरी । जैसा त्रिपुरारी दिसत ॥५४॥ हें जनार्दने देखोनि नयनी । त्या जगद्गुरूसि ओळखिले तये क्षणी । मग साष्टांग नमस्कार घालोनी । प्रीती करोनी भेटले ॥ ५५ ॥ मग श्रीदत्त जनार्दनासि बोलती । एकनाथ साक्षात पांडुरंग मुर्ति । यास्तव आम्हीं निजप्रीती । धरिली वस्ती महाद्वारीं ॥ ५६ ॥ ऐसी बोलोनी त्यासी मात । काय लाघव करितसे दत्त । मनुष्यरूप धरोनि त्वरीत । नाथासि सांगत काय तेव्हां ॥ ५७ ॥ सहपरिवारे जनार्दन । भेटिसि आले देवगिरीहून । ऐसें ऐकताची वचन । उल्हास मना वाटला ॥ ५८ ॥ सद्गुरु आगमन ऐकतांच श्रवणीं । एकनाथ चालिले लोटांगणीं । आलिंगन देत प्रीती करोनी । मग मिठी चरणी घातली ॥ ५९ ॥ तेव्हां जनार्दनासि धरोनि हातीं । एकनाथ सदनी प्रवेशती । आसनी बैसवोनि सद्गुरु मूर्ती । मग चरण प्रक्षाळिती स्वहस्तें ॥ १६० ॥ तें तीर्थ प्राशन करितां । ब्रह्मानंद वाटला चित्तां । पूजेचें साहित्य आणोनी तत्वतां । सद्गुरुनाथा अर्चिले[1] ॥ ६१ ॥ चंदन चर्चोनि निगुती । पुष्पहार गळा घालिती । धूपदीप पंचारती । सद्गुरुमूर्ति ओवाळिली ॥ ६२ ॥ ऐशा रीतीं करोनि पूजन । सांगितलें आद्यंत वर्तमान । अंतर साक्ष तो जनार्दन । परी प्रीतीचें लक्षण दाखवी ॥ ६३ ॥ श्रीकृष्णजयंती उत्साह घरीं । वाद्यें वाजती मंगळतुरी ।

१ पूजा केली.

अभिषेक पूजा करोनी सत्वरी । मूर्ति मखरी स्थापिल्या ॥६४॥ क्षेत्रवासी लोक समग्र । दर्शनासि येती निरन्तर । पक्वान्नें निर्मूनि प्रकार । घालिती उपाहार ब्राह्मणांसी ॥ ६५ ॥ श्रीजनार्दन संमुख आसनावरी । एकनाथ त्यांजपुढे कीर्तन करी । त्या आनंदाची वर्णिता थोरी । कुंठित वैखरी होतसे ॥ ६६ ॥ रूप धरोनि ब्राह्मणाचें । पांडुरंग धृपद धरीतसे त्यांचें । पायां घागऱ्या बांधोनि नाचे । प्रेम भक्ताचे बहु देवा ॥ ६७ ॥ एकनाथाची प्रसाद उत्तरें । मुखांतूनि निघतांचि अक्षरें । मागून झेलित वरच्यावर । पाठांतर जैशा रीती ॥ ६८ ॥ क्षेत्रवासी नारी नर । ऐकोनि आश्चर्य करिती फार । म्हणती मागील धृपदी द्विजवर । तो कथा समग्र ओढितसे ॥ ६९ ॥ एकत्रि पिंड दोघांचा । ऋणानुबंध जन्मांतरीचा । परम भाग्योदय आमुचा । संयोग दोघांचा यासाठी ॥ १७० ॥ दिवसां ब्राह्मण संतर्पण । रात्री होतसे हरिकीर्तन । पैठणीचें भाविक जन । वेधलें मन तयांचें ॥७१॥ नवमीसि मिष्टान्न करोनि फार । समुदाय केला असे थोर । मग पारणें सोडित वैष्णववीर । सप्रेम अंतर सर्वदा ॥ ७२ ॥ बाळक्रीडा वर्णोनि समस्त । गोपाळकाला आरंभीला तेथें । वडजें वांकुडे पेंधे होते । सोंग दावि नानापरी ॥ ७३ ॥ झोंबी लाठी हा मामा हुंबरी । लपंडाव खेळती नानापरी । श्रीनाथ यशोदा होवोनि घुसळण करी । लोणी श्रीहरी भक्षितसे ॥ ७४ ॥ चेंडू कुमडी पिंगा खेळती । हाव भाव नानारिती । जे लिला वर्णिली श्रीभागवती । तैशाच रीती ते होय ॥ ७५ ॥ मग ललित करिती एकनाथ । नानापरिची सोंगें आणित । प्रासादिक कविता तेथें बोलत । रंग अद्भुत वोढवे ॥ ७६ ॥ ध्रुपदी होवोनी चक्रपाणी । स्वमुखें करित संपादणी । श्रोतयासी आश्चर्य वाटत मनीं । गदगदोनी हांसती ॥ ७७ ॥ सहा दर्शनें बहुवस । आणि छत्तीस पाखंडे विशेष । सिद्धांत अर्थ लावोनि त्यांस । संपादणी बोलिले ॥ ७८ ॥ धादांत अर्थ बाहेरी दीसे । अज्ञान जन तेणें रिझतसे । सज्ञानासी सिद्धांत भासे । प्रासादिक रस बोलती ॥७९॥ ललित करोनि ऐशा रीतीं । मंचकी निजविल्या श्रीकृष्ण मूर्ती । मग करोनि मंगळ आरती । खिरापती वांटिल्या ॥ १८० ॥ मग नाथासि पुसती जनार्दन । मागें ध्रुपद धरीत ब्राह्मण । तो तरी कोठील असे कवण । नामाभिधान पुसावे ॥ ८१ ॥ कीर्तनीं ध्रुपद धरितो अपूर्व । सोंग संपादणी नानागौरव । तुह्मां उभयतांचा एक जीव । आम्हांसि द्वैतभाव दिसेना ॥ ८२ ॥ तुझ्यापदरी पुण्य संपत्ती । यास्तव लाधली याची संगति । कीर्तनी रंग आणितसे प्रीति । ऐकतां विश्रांती श्रोतया ॥ ८३ ॥ तुझा याचा संयोग साचार । ऐसाचि असावा जन्मभर । तरी बहुत होईल जगदुद्धार । कीर्तन गजर ऐकता ॥ ८४ ॥ मग एकनाथ पुसती त्याजकारणें । तुम्हीं कोण कोठील असा ब्राह्मण । ठाव ठिकाण नामाभिधान । आम्हां कारणें सांगिजे ॥ ८५ ॥ ऐकोनि म्हणे रुक्मिणीपती । ठाव ठिकाण न धरीच वस्ती । प्रेमळ भाविक देखोनि निश्चिती । त्यांचे संगति काळ कंठीं ॥ ८६ ॥ विठोबा नांव या देहास । दारापुत्र नाहीं पाश । कीर्तनीं ध्रुपदें

धरितसे । आणिक अभ्यास तोही नाहीं ॥ ८७ ॥ मूठभर अन्न खावोनि निश्चिती । निरंतर असावें तुझे संगति । आणिक आशा नसे चित्तीं । खुण इतुकीं सांगितली ॥ ८८ ॥ हें जनार्दन ऐकोनि उत्तर । चित्तीं संतोष जाहला थोर । परी हा साक्षात् इंदिरावर । ऐसा विचार कळेना ॥ ८९ ॥ असो चवदा दिवसपर्यंत जाण । होतसे ब्राह्मण संतर्पण । सर्व सामग्री तेथें वेंचून । मग सद्गुरु जनार्दन काय म्हणती ॥ १९० ॥ देवगिरीसि जातो आतां । वृद्धांप्रती स्वमुखे पुसतां । त्याणीं चरणीं ठेवोनि माथा । म्हणती विनवणी समर्था एक असे ॥ ९१ ॥ श्रीभानुदासाचे वंशी निश्चित । इतुका मात्र वांचला नाथ । तुमच्या आज्ञेनें थांवला येथ । परी चित्तीं विरक्त सर्वदा ॥ ९२ ॥ गृहस्थाश्रम करावया पाहीं । हे तों इच्छा यासि नाहीं । तरी स्वामिनी आज्ञापिजे ये समयीं । म्हणवोनि पायीं लागती ॥९३॥ यांचे लग्न करालसांचे । तरी समाधान होईल आमूचें । पारणें फिटेल डोळींयांचे । नांव स्वामीचें होईल ॥९४॥ ऐसें वृद्धाचें करुणावचन । ऐकोनि द्रवला जनार्दन । मग एकनाथासि बोलावून । अमृत वचन बोलती ॥ ९५ ॥ जरी स्वइच्छेनें येतां वधू । तरी सुखें करावा लग्नसंबंधू । गृहस्थाश्रमें नसेचि बाधू । जन अपवाद चुकवावा ॥ ९६ ॥ सकळ आश्रमांमाजी परम । गृहस्थाश्रम अति उत्तम । येथें इंद्रियासि लावोनि नेम । सुखरूप स्वधर्म चालवी ॥ ९७ ॥ सर्वभूतीं दया पूर्ण । परोपकारी काया झिजवणें । ब्राह्मण आतिथि क्षुधितां लागोन । अन्नदान करावें ॥ ९८ ॥ यथा विधी विष्णूअर्चन । प्रेमयुक्त करावें कीर्तन । सर्वकाळ नामस्मरण । निजप्रीतीनें करावें ॥ ९९ ॥ ऐसी सद्गुरु आज्ञा करितां । चित्तीं मानली एकनाथा । मौनेंचि चरणीं ठेवी माथां । म्हणे प्रारब्धीं असतां तरी घडे ॥२००॥ मग जनार्दन आपूले परिवारेंसी । चालिलें तेव्हां देवगिरीसि । स्वये आज्ञापी एकनाथासी । सौख्य वडिलांसी त्वां द्यावें ॥ १ ॥ सद्गुरूसि बोळवोनि ते अवसरीं । ध्यान ठेविलें हृदयमंदिरीं । वियोग नसेचि क्षणभरी । सबाह्यअभ्यंतरीं गुरुरूप ॥ २ ॥ स्नेह लोभ निजप्रीतीसीं । सद्गुरु ठेविती नाथापासीं । मग आपण आपले परिवारेंसी । देवगिरीसी पावले ॥३॥ पुढिले अध्यायीं रस उत्पत्ती । वदविता श्रीरुक्मिणी-पती । निमित्तासि आधार महीपती । सज्ञान जाणती अनुभवें ॥ ४ ॥ इति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । पंचदशाध्याय रसाळ हा ॥ २०५ ॥ अध्याय १५ ॥ ओव्या २०५ ॥

अध्याय १६



श्रीगणेशायनमः ॥ । जय अनंतशायी अपरिमिता । अपारा अनामा त्रिगुणरहिता । अनंग दहनाच्या आराध्य दैवता । अनन्या भक्ता रक्षिसी तूं ॥ १ ॥ पन्नागरि स्वामी क्लेशनाशना । पयोब्धि तनयेच्या प्राण जीवना । पयोनिधिवासा शेषशयना । पतित पावना करुणाब्धी ॥ २ ॥ वैकुंठवासी अति उदारा । ब्रह्मांड भुवनीं तुझा थारा । ब्रह्मनामा तूं परमेश्वरा । ब्रह्म तूं वरा सदोदित ॥ ३ ॥ गोवर्धनधरा तूं गोपती । गोपीवल्लभा मदन मूर्ती । गोइंद्रियांत तुझी वस्ती । गोसावी म्हणती यास्तव तूतें ॥ ४ ॥ आतां हृदयीं बैसोनि सदोदित । चित्तीं आठव देईजे मातें । वदवी श्रीभक्तलीलामृत । तेणें प्रेम उचंबळत श्रोतयां ॥ ५ ॥ मागिले अध्यायाच्या शेवटीं कथा । जनार्दनें शिकविलें एकनाथा । गृहस्थाश्रम करोनि आतां । सुखें भक्तिपंथा प्रतिपादी ॥६॥ इतुकें सांगोनि त्याजकारण । आपण देवगिरीसि केलें गमन । पुढें चरित्र केलें गहन । ते ऐका सज्जन भाविक हो ॥७॥ आजाआजी वृद्ध उभयतां । रात्रंदिवस करिती चिंता । म्हणती वधू जरी मिळती एकनाथा । तरी आम्हां देखतां लग्न होतें ॥८॥ ऐसें बोलतां परस्पर । तंव भाविक बोलती उत्तर । तुमच्या कार्यासि साह्य ईश्वर । चिंता अणुमात्र न करावी ॥ ९ ॥ श्रीनाथ सर्वदा विरक्त चित्तीं । लग्न करिती कीं न करिती । ऐसीं चिंता आम्हासि होती । ते पुरविली आर्ती पांडुरंगें ॥१०॥ जनार्दनाचें वचन निश्चित । सर्वथा नुल्लंघी एकनाथ । लग्नाचे दिवस येतां निश्चित । यत्न वहुत करूं आम्ही ॥११॥ ऐसें भाविकांचें अभयवचन । ऐकोनि वडिलांसि समाधान । कांहीं दिवस लोटतांचि जाण । तों निघती लग्नें दिवस आले ॥ १२ ॥ तंव एक गांवींचा द्विजवर[1] । त्याची कन्या उपवर । तो मुलीस पाहतसे भ्रतार । परी घटित विचार कोठें नये ॥ १३ ॥ तो मनीं होऊनि चिंताक्रांत । निद्रित जाहला यामिनींत[2] । तों स्वप्नीं येऊनि पंढरीनाथ । दृष्टांत सांगत काय त्यासी ॥ १४ ॥ गंगातीरीं प्रतिष्ठानांत । विष्णुभक्त सुशील एकनाथ । तरी तुवां जाऊनि त्या स्थळांत । कन्या साळंकृत दे त्यासी ॥ १५ ॥ ऐसा दृष्टांत रुक्मिणीकांतें । रात्रीं दाखविला द्विजातें । ब्राह्मण तत्काळ होऊनि जागृत । आश्चर्य करीत मानसीं ॥ १६ ॥ कांतेसि सांगोनि दृष्टांत । मग प्रतिष्ठांनि स्वयें येत । लोकांसि स्वमुखें पुसत । कोठे एकनाथ मज सांगा ॥१७॥ त्यांणीं दाखवितां निजमंदिर । येऊनि भेटला तो द्विजवर । दृष्टांत दाखविला रुक्मिणीवरें । तोही सत्वर सांगीतला ॥ १८ ॥ आजा आजी दोघेजण । तयांसि सद्भावें करी नमन । म्हणे तुमच्या पौत्राकारण । कन्यादान करितों मी ॥ १९ ॥ ऐसें विनवितांचि तयांसि । वचन मानलें वडिलांसी[3] । मग बोलावूनि गणकजोशी । जन्मपत्रिकेसी दीधले ॥२०॥ राशि नक्षत्र पाहतां जाण । घटित लाधलें छत्तीस गुण । लग्नतिथि नेम करून । समाधान उभयतां ॥ २१ ॥ सुपारी देऊनि वरबापासी । म्हणे मी लागतों साहित्यासी । कन्या कुटुंब परिवारेंसी । प्रतिष्ठानासी येईन ॥ २२ ॥ साळंकृत कन्यादान । ये स्थळीं करितां विशेष पुण्य । ऐसें वधूबाप बोलोन । गेला परतोन स्वगृहा ॥२३॥ आपल्या कांतेसि

१ ब्राह्मण. २ रात्री. ३ मुलाच्या वडिलांना.

बोले उत्तर । कन्येसि अपूर्व मिळाला वर । परम भाविक वैष्णववीर । ईश्वरी अवतार दिसतसे ॥ २४ ॥ ऐसा संतोष मानूनि अंतरी । साहित्य करितसे आपुलें घरीं । असो इकडे प्रतिष्ठान नगरी। वर्तली परी ते आयिका ॥ २५ ॥ चक्रपाणीचे वंशीं देव । अवतार नाथ कुळदीप । त्याचा वाढतां थोर लौकिक । वाटे कौतुक वडिलांसी ॥ २६ ॥ मग आजा–आजी बैसोनि घरीं । विचार करिती चित्तांतरीं । घरीं कृत्य निघालें परी । गोत्रज दुरीं राहिले ॥ २७ ॥ विजयांपुर प्रांत साचार । सत्रा योजनें असे दूर । ते स्थळीं सोइरे इष्ट मित्र । तयांसि पत्र पाठवावें ॥ २८ ॥ वंधूचा पुत्र जों उद्धव । तो परम भाविक होता वैष्णव । पत्रिका लिहिली त्याच्या नांवें । लग्नासि यावें म्हणवोनी ॥ २९ ॥ आणिक इष्टमित्र आप्तविषयी देखा । त्यांच्याही नांवें लिहिल्या पत्रिका । कुंकूममंडित सुरेखा । अर्थही निका त्यांमाजी ॥३०॥ आमुची वृद्ध अवस्था निर्धारीं । शेवटी लग्नेंवें मांडिला घरीं । तुम्हीं यावें सहपरिवारीं । वाट निर्धारीं पाहातसों ॥३१॥ मनुष्य करोनि महिनदार । तया हातीं दीधलें पत्र । प्रतिष्ठानींचे भाविक नर । साहित्यासि फार झोंबती ॥३२॥ जयासि सखा जोडला श्रीहरि । तरी विश्व त्यावरी कृपा करी। पत्रिका ऐकतां निश्चितीं। सर्व सिद्धि रावती घरीं । न्यून संसारीं पडेना ॥३३॥ गोत्रज सोइरे विजापुर प्रांतीं । मूळ पाठविलें तया प्रती । संतोष चित्तीं त्यांसि झाला ॥ ३४ ॥ उद्धव शहाणा वैष्णवपूर्ण । सर्व साहित्य घेतलें त्याणें । मग कुटुंबासह वर्तमान । प्रतिष्ठान पावला ॥ ३५ ॥ वडील वृद्धांसि भेटोनियां । परम संतोष वाटला तया । उद्धवनाथाच्या लागोनि पायां । भेटी सबाह्या उभारित ॥ ३६ ॥ क्षेम आलिंगन देताचि प्रीतीं । चित्तीं वाटली परम विश्रांती । सजळ नेत्र तयांचे होती । अद्भुतस्थिती देखोनियां ॥ ३७ ॥ इकडे वधूचा बाप होता दूर । त्याणें अन्न सामग्री केली फार। गोण्या घालोनि बैलावर । पुढें सत्वर पाठविल्या ॥३८॥ उभयपक्षी साचार । करोनि वस्त्रें अलंकार । लग्न घेऊनि बरोबर । प्रतिष्ठान क्षेत्र पावला ॥३९॥ विस्तीर्ण वाडा पाहोनि त्वरित । कुटुंबासहित राहिला तेथ। उदईक आहे लग्न तिथ। अक्षत नगरांत दीधली॥४०॥ देव प्रतिष्ठा ब्राह्मणभोजन। आहेर वोपिती सोइरे पिशुन । मंगल वाद्यें वाजती जाण । हळदी उटणें वधूवरां ॥४१॥ दिव्य पक्वान्नें नानारीतीं । उभय मंडपीं स्वयंपाक होती । ब्राह्मण भोजनें यथास्थिती । अन्नशांती बहु केली ॥ ४२ ॥ वरबापाकडे निर्द्धारीं । उद्धव मुख्य कारभारी । सर्व साहित्य आंगें करी । उल्हास अंतरीं धरोनियां ॥ ४३ ॥ क्षेत्रवासी भाविकजन । त्याच्या वचनासि देती मान । उद्धवाची युक्ती ऐकोन । तैसीच वर्तणूक ते करिती ॥ ४४ ॥ सोईरे गृहस्थ द्विजवर । सर्व घेवोनि बरोबर । मंगळ वाद्यें वाजती गजरें । पूजावयासि वर चालिले ॥४५॥ रुखवताच्या पाट्या भरोनि । सर्वें चालिल्या वऱ्हाडणी । वस्त्रें भूषणें वरासि देउनी । मिरवत सदनी आणिल्या ॥४६॥ मधुपर्क करोनि पूजन । मग अंतःपट धरिती ब्राह्मण । म्हणती सावधान सावधान। श्रीकृष्ण चिंतन करावें ॥४७॥ ऐसीं अष्टकें म्हणोनी । लग्न

१ कार्य.

लाविलें ब्राह्मणीं । मंगळ वाद्याच्या लागल्या ध्वनी । घाव निशाणीं घातला ॥ ४८ ॥ प्रकृति पुरुषांची ऐक्यतां । होतांचि आनंद सकळांच्या चित्तां । लाजाहोम करोनि तत्त्वतां । दक्षिणा समस्तां वांटिली ॥ ४९ ॥ सन्मुख आणि तेलवण । ऐरणी पूजन धेडा नाचवणें । गृह प्रवेश लक्ष्मीपूजन । यथाविधीनें तें झालें ॥ ५० ॥ पांच दिवसपर्यंत निश्चित । लग्न जाहलें यथास्थित । अहेर वस्त्रें सकळांसि अर्पित । न्यून किंचित पडेना ॥ ५१ ॥ यापरी वोहबापें कन्यादाना । करोनि गेला आपुल्या स्थाना । नातसुनेसि देखोनि नयना । वडिलांच्या मना समाधान ॥ ५२ ॥ विजापूर प्रांतींहून जाणा । वऱ्हाडी आले होते लग्ना । परमसंतोष पावोनि मना । आपुल्या स्थाना ते गेले ॥ ५३ ॥ श्रीनाथ सेवेचें धरोनि आर्त । एकला उद्धव राहिला तेथ । काया वाचा मनें निश्चित । सन्निध तिष्ठत सर्वदा ॥५४॥ कार्याकार्य मनोगत । न सांगतां जाणोनि करित । नाथासि चिंता नसे किंचित । प्रेमभरित सर्वदा ॥ ५५ ॥ पत्नी परम सुलक्षण । गिरिजाबाई नामाभिधान । श्रीनाथाच्या सेवे लागोन । सादर अनुदिन ते असे ॥ ५६ ॥ वय लहान असे पोर । परी घरिंची रीत जाणे समग्र । वडिलांची मर्यादा निरंतर । सांगितलें उत्तर ऐकावें ॥५७॥ नात सुनेचे देखोनि सद्गुण । वडील वृद्धांसि समाधान । म्हणती जनार्दनाचे निजकृपेनें । फिटलें पारणें नेत्राचें ॥ ५८ ॥ अयाचित वृत्ति करोनि जाण । उदंड येतसे वस्त्रअन्न । होतसे ब्राह्मण संतर्पण । क्षुधितांसि भोजन तेथें मिळे ॥ ५९ ॥ अन्नदानाविषयीं जाण । न विचारिती यातिवर्ण । विश्वीं भरला जनार्दन । दया संपूर्ण सर्वांभूतीं ॥ ६० ॥ मागें भानुदासें निजप्रीतीं । देव्हारी स्थापिली पांडुरंग मूर्ती । निजांगें नाथ तयासि अर्चिती । सप्रेम भक्ती करोनियां ॥ ६१ ॥ दोन प्रहर होतांचि पूर्ण । होतसे ब्राह्मण संतर्पण । तृतीय प्रहरीं पुराण श्रवण । रात्रीं कीर्तन नित्य होय ॥ ६२ ॥ क्षेत्रवासी नारी नर । श्रवणासि येती प्रेमादरें । दिवसे दिवस अधिकोत्तर । महिमा थोर वाढला ॥ ६३ ॥ ऐसा सोहळा वडिलांनीं । बहुत दिवस देखिला नयनीं । देहाचें आयुष्य जातां सरोनी । मग वैकुंठ भुवनीं ते गेले ॥ ६४ ॥ श्रीनाथें स्वहस्तें करोनि क्रिया । सद्गतीसि लाविलें तयां । लोक संग्रहार्थ दाखवी चर्या । कर्माकर्म तया विरहित ॥ ६५ ॥ श्रीविठ्ठल विप्रवेष धरोनी । गाऊं लागतसे नित्य कीर्तनी ॥ जो ब्रह्मादिकांच्या नये ध्यानीं । तो ध्रुपदी होऊनी राहिलासे ॥ ६६ ॥ योगी करिती अष्टांग साधन । परी तयांसि नेदीच सगुण दर्शन । तो एकनाथाच्या भक्तीस्तव जाण । टाळ धरोन गाऊं लागे ॥६७॥ तों देवगिरीहून आले कोणी । नाथासि वार्ता जाणविली त्यांणीं । कीं जनार्दन स्वामी देह सांडुनी । वैकुंठ भुवनीं ते गेले ॥ ६८ ॥ सद्गुरु प्रयाण ऐकूनि मात । परी खेद न वाटे किंचित । जनी जनार्दन भरला निश्चित । अविनाश अव्यक्त परिपूर्ण जो ॥६९॥ मग उद्धवासि नेऊनि एकांतीं । निजमुखें तयासि आज्ञापिती । षष्ठीचा उत्सव करणें निश्चितीं । तरीं साहित्य निजप्रीतीं करावें ॥ ७० ॥ उद्धवें माथा ठेवूनि पायीं । नाथासि

१ जातधर्म.

पुसतसे ते समयीं । षष्ठीचा उत्सव करावयासि पाहीं । कारण कायी हें सांगा ॥ ७१ ॥ देखोनि तयाचा भावार्थ । मग स्वमुखें साकल्य सांगती मातें । श्रीजनार्दन स्वामींची जन्मतीथ[1] । षष्ठीच निश्चित उद्धवा ॥ ७२ ॥ फाल्गुन वद्य षष्ठीस जाण । जनार्दनासि दत्तात्रेय दर्शन[2] । त्याच तिथीस आम्हां कारणें । अनुग्रह[3] संपूर्ण दीधला ॥ ७३ ॥ आणि याच तिथीस जनार्दन । देह[4] लोपोनी झाले निर्गुण । हीं तों चार घडलीं कारणें । पुढील होणें देखसील ॥ ७४ ॥ तरी ब्राह्मण संतर्पणाचें फार । साहित्य करावें तुवां सत्वर । अवश्य म्हणोनि बोले उत्तर । केला नमस्कार उद्धवें ॥ ७५ ॥ कांहीं मिळाले अयाचित । कांहीं घेतली उचापत । रौप्यमुद्रा सात शतें । वाणियासि खत दीधलें ॥ ७६ ॥ एकनाथाचें लेहोनि नाव । रोखा लिहूनि देत उद्धव । वायदा मुदत बोलोनि सर्व । अंतर्भाव सांगितला ॥ ७७ ॥ साहित्य करोनि बरव्या रीतीं । षष्ठीस उत्सव मांडिला प्रीतीं । अवघ्या क्षेत्रासि आमंत्रण देती । पाकनिष्पत्ती करविली ॥ ७८ ॥ भाविक प्रेमळ जे का नर । निजांगें कष्ट करिती फार । कोणासि न वाटे जोजार । सप्रेम अंतर सकळांचें ॥ ७९ ॥ मग दिंडी घेऊनि बरोबरी । मिरवत नेली गंगातीरीं । टाळ विणे मृदंग सुस्वरीं । कीर्तन गजरीं होतसे ॥ ८० ॥ गरुड टके निशाणभेरी । वाद्यें वाजती मंगळतुरीं । वैष्णव गर्जती जयजयकारीं । नाद अंबरीं कोंदला ॥८१॥ दिंडी मिरवोनि ऐशा रीतीं । मध्यान्हसमयीं गृहासि येती । तों ब्राह्मण स्नानें करोनि समस्ती । देव्हड्या पंक्ती बैसल्या ॥ ८२ ॥ श्रीनाथें स्वयें आपण । केलें द्विजांचें चरण क्षाळण । तें तीर्थ करितांचि प्राशन । संतोष मन पावतसे ॥ ८३ ॥ ब्राह्मणभक्त एकनिष्ठ । नेत्रासि लावित अंगुष्ठ[5] । त्याहूनि दैवत नसेचि श्रेष्ठ । भाव वरिष्ठ तयाचा ॥ ८४ ॥ स्वहस्तें अंगासि चर्चुनि चंदन । तुळसीपत्र बुका सुमनें । यापरी द्विजांचें करोनि पूजन । पात्रीं मिष्टान्नें वाढिलीं ॥ ८५ ॥ घृत आदि करूनि निश्चिती । पात्रें सिद्ध वाढिली समस्तीं । भोक्ता जनार्दन सर्वांभूतीं । संकल्प प्रीतीं सोडिला ॥ ८६ ॥ मग अपोशनें करोनि सत्वर । भोजनासि बैसले द्विजवर । विठ्ठलनामें साचार । सर्वत्र गजर ते करिती ॥८७॥ जें जें जयासि रुचे जैसें । पात्रीं आणोनि वाढिती तैसें । श्रीनाथ प्रार्थना करितसे । भोजन सावकाशें करावें ॥ ८८ ॥ तृप्ति जाहलिया सकळांप्रती । मग करशुद्धीस उठिले प्रीती । विडे दक्षिणा सकळां देती । सदनाप्रती ते गेले ॥ ८९ ॥ विठ्ठल उद्धव एकनाथ । आणि साहित्य करणार गृहस्थ । मागिले पंक्तीसि जेविले समस्त । आनंद युक्त तेधवां ॥९०॥ श्रीनाथें रात्रीं केलें कीर्तन । श्रवणासि आले बहुत जन । प्रेमप्रभरित प्रसाद वचन । रंगासि उणें काय तेथें ॥९१॥ ऐशापरी क्रमिली निशी[6] । तैसाच उत्सव सप्तमीसी । गोपाळकाला अष्टमीसी । समारंभेसी मांडिला ॥ ९२ ॥ दिंडी मिरवतसे अवसरीं । पातले तेव्हां गंगातीरीं । यात्रेचा समुदाय मिळाला भारी । जयजयकारी नामघोषें ॥९३॥ यथाविधि करोनि काला । अवघ्यांसि प्रसाद वांटिला । मग ललितासि रात्रीं प्रारंभ केला । वेध लागला

१ हकिकत. २ सातशे. ३ अंगठा. ४ फूल. ५ तूप. ६ रात्र.

सर्वांसी ॥ ९४ ॥ सांग संपादणी यथास्थित । करूनि पहुडविला रुक्मिणीकांत । प्रातःकाळ होतांचि निश्चित । साधुसंत गौरविले ॥९५॥
यापरी षष्ठीचा उत्सव जाहला । सकळ जनांसि आनंद वाटला । म्हणती जगदुद्धारास्तव भला । येथें अवतरला श्रीनाथ ॥ ९६ ॥ प्रतिष्ठान
ब्रह्मक्षेत्र पूर्ण । कर्मठ तेथिंचे सकळ ब्राह्मण । यांसि भक्तिमार्ग दावावया पूर्ण । जाहला सगुण अवतार ॥ ९७ ॥ परी वाणियाची घेऊनि
उचापत । उद्धवें लेहूनि दीधलें खतं । त्याचा वायदा भरतां समस्त । मग तो मागत द्रव्यासी ॥ ९८ ॥ उद्धव म्हणे ते अवसरीं । हातांसि
लेख आलियावरी । आणूनि देऊं तुमच्या घरीं । विश्वास अंतरीं असों द्या ॥ ९९ ॥ ऐसें बोलिले नानापरी । परी तो नायकेचि दुराचारी ।
म्हणे अयाचित द्रव्य येतां पदरीं । संतर्पण घरीं करीतसां ॥१००॥ टाकूनि आपुला संसार । कीर्तनीं नाचतसां निर्भर । वेडे केले लोक समग्र ।
तें मज समोर चालेना ॥ १ ॥ ऐसें बोलोनि उद्धवाप्रती । घरासि आला तो दुर्मती । एकनाथ स्नान संध्या करिती । तयांसि दुरुक्ती
काय बोले ॥ २ ॥ माझा पैका[2] वारिल्याविण । तुम्ही भक्षाल जरी अन्न । तरी पांडुरंगाची शपथ पूर्ण । इतुकें वदोन तो गेला ॥३॥ नैवेद्य
वैश्वदेव एकनाथ । करोनि ब्राह्मणांसि भोजन घालित । आपण तेव्हां उपवासी राहात । घातली शपथ म्हणोनियां ॥ ४ ॥ उद्धव आणि
गिरीजासती[3] । हे उभयतां न जेविती । अस्तमानासि गेला गभस्ती[4] । द्रव्य तों निश्चिती मिळेना ॥ ५ ॥ उद्धवें प्रयत्न केला बहुत । परी
द्रव्य कोठें न मिळे निश्चित । एक प्रहर लोटली रात । तोंपर्यंत उपवासी ॥६॥ ऐसी तयांची देखोनि अवस्था । संकट पडलें पंढरीनाथा ।
अभेद भक्त उपवासी राहतां । तें रुक्मिणीकांता न साहवे ॥७॥ मग उद्धवाचें रूप धरोनि श्रीहरी । गेले तेव्हां वाणियाचें घरीं । हांका
मारीतसे द्वारीं । बाहेर सत्वरीं ये आतां ॥८॥ व्यवसायी कवाड[5] उघडोनियां । निजमंदिरीं बोलवी तया । म्हणे येव्हडे रात्रीं आमुच्या
ठायां । काय यावया कारण ॥९॥ उद्धव बोले प्रत्युत्तर । खत आणोनि द्यावें सत्वर । व्याजसुद्धां द्रव्य समग्र । घ्यावें सत्वर मोजुनी ॥११०॥
व्यवसायी उत्तर देत तयासी । रात्रीं पारख कळेल कैसी । वही आणि खत या समयासी । दुकानासी राहिलें ॥ ११ ॥ प्रातःकाळीं
येऊनि निश्चित । आपुलें घेऊनि जावें खत । यावरी बोले वैकुंठनाथ । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥ १२ ॥ इतुकी सांड तुम्हांकारण ।
तरी नाथासि कां घातली आण[6] । त्याच्या उपवासें मी व्याकुळ पूर्ण । होताति प्राण कासाविस ॥ १३ ॥ ऐसी ऐकतांचि वचनोक्ती ।
वाणियासि पश्चात्ताप जाहला चित्तीं । मग दुकानासि नेऊनि तयाप्रती । हिशेब निश्चितीं पाहिला ॥ १४ ॥ जितुकें द्रव्य जाहलें तत्त्वतां ।
तितुकेंची भरें मोजूनि घेतां । एकचि शिका सर्वांसि असतां । विस्मित चित्ता मग होय ॥ १५ ॥ खत देऊनिया सत्वरी । आपुल्या
हातें फाडीतसे श्री । मग घरासि येऊनि श्रीहरी । पुस्तका भीतरी बांधिती ॥ १६ ॥ तो वाणीयास चटपट लागली मनीं । निद्रा नयेची
त्याज लागोनि । म्हणे म्यां नाथासि आण घालोनि । घरीं येऊनी जेविलों ॥ १७ ॥ नाशवंताची आशा धरोन । सत्पुरुषाचें केलें

---

१ पत्र. २ पैसा. ३ एकनाथांची पत्नी. ४ सूर्य. ५ दार. ६ शपथ.


छळण । ऐसी तळमळ लागली पूर्ण । तों उदयासि अरुण पातला ॥ १८ ॥ मुख प्रक्षाळूनी त्वरित । गेला नाथाच्या वाडियांत । साष्टांग घालोनि दंडवत । म्हणे अपराधी निश्चित मी तुमचा ॥ १९ ॥ श्रीनाथ तयासि उत्तर देती । व्यवहाराची ऐसीच रीती । द्रव्य वारिल्यावीण निश्चितीं । अन्न सर्वथा न सेवूं ॥ १२० ॥ ऐसें ऐकोनि तये क्षणीं । वाणी विस्मित जाहला मनीं । उद्धवासि म्हणे द्रव्य देऊनी । रोखा घेऊनी आलासि तूं ॥ २१ ॥ तरी तें सांगिजे स्वामीसीं । अझूनि कां ठेविलें उपवासी । उद्धव म्हणे असत्यासी । सर्वथा तयासी न बोलें ॥ २२ ॥ वाणी तात्काळ वाहे शपथ । मग उद्धवनाथासि येऊनी सांगत । रोखा निघाला पुस्तकांत । कळला वृत्तांत मानसीं ॥ २३ ॥ उद्धव म्हणे वाणियाप्रती । धन्य तुझी सप्रेम भक्ती । नाथासी व्यवहार करितां निश्चितीं । तुज रुक्मिणीपती भेटला ॥ २४ ॥ आतां कोणापासीं निश्चित । सर्वथा न वदे हा गुह्यार्थ । व्यवसायी घालोनी दंडवत । गेला त्वरित घरासि ॥ २५ ॥ श्रीनाथाचें झालिया देवतार्चन[1] । ब्राह्मणपंक्तीसि करिती भोजन । गिरिजाबाई उद्धवा कारणें । जाहलें पारणें तेचि दिनीं ॥ २६ ॥ विप्रवेष धरोनि निजांगें । ध्रुपद धरीतसे पांडुरंगे । कीर्तनीं अद्भुत येतसे रंग । वेधलें जग श्रवणार्थी ॥ २७ ॥ वाढवावया एकनाथ माहिमा । ऐसें वाटलें पुरुषोत्तमा । मग ब्राह्मण वेषें तो जगदात्मा । कीर्तनीं प्रेमा वाढवित ॥ २८ ॥ द्वादश वर्षे लोटतां निश्चितीं । एक तप झालें ऐशा रीती । पुढे चरित्र वर्तलें कैशा रीतीं । तें सादर संतीं परिसिजे ॥ २९ ॥ पंढरीक्षेत्र वैष्णवभक्त । अनुष्ठानीं बैसला निश्चित । तो साक्षात पांडुरंग दर्शन इच्छित । ऐसे बहुत दिवस गेले ॥ १३० ॥ मुखें करी नामस्मरण । आणिक कामनीं नसेचि मन । तों रात्रींमाजी रुक्मिणीरमण । स्वप्नीं येऊन काय सांगें ॥ ३१ ॥ तूं दर्शन इच्छितोसि साक्षात । परी मी गुंतलों प्रतिष्ठानांत । तेथें एकनाथ अभेद भक्त । मत्कीर्तनीं रत सर्वदा ॥ ३२ ॥ तेथें विप्रवेष धेऊनि निजांगें । भी ध्रुपद धरीतसे पांडुरंग । त्यासि विठोबा नाम बोलती जग । जायी सवेग ते ठायीं ॥ ३३ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथाचें घरीं । माझें दर्शन घे सत्वरीं । ऐसा दृष्टांत देखोनि रात्रीं । विस्मित अंतरीं तो झाला ॥ ३४ ॥ तैसाचि धेऊनि प्रतिष्ठानासी । पातला एकनाथ गृहासी । पुसोनि विठोबा ब्राह्मणासी । धांवोनि तयासी भेटतसे ॥ ३५ ॥ साष्टांग नमस्कार घालितां त्याणें । तों रूप पालटी रुक्मिणी रमण । धरिलें चतुर्भुज रूप सगुण । मुगुटीं रत्नें लखलखती ॥ ३६ ॥ श्रीमुख मनोहर आकृती । दिव्य कुंडलें कानीं तळपती । कंठीं कौस्तुभ वैजयंती । पीतांबर दीक्षी[2] न समाये ॥ ३७ ॥ ठाण साजिरें सुकुमार । जंघनीं शोभती दोन्ही कर । समपदीं साजिरें रूप सुंदर । देखिलें साचार तयानें ॥ ३८ ॥ तयासवेंचि वैष्णवभक्त । आणिकही कोणी आले होते । तयांसही दर्शन साक्षात । जाहलें निश्चित ते समयीं ॥ ३९ ॥ ऐसें दर्शन त्यास देऊन । देव पावले अंतर्धान । जे कां आले पंढरीहून । ते करिती स्तवन नाथाचें ॥ १४० ॥ म्हणती धन्य तूं

१ देवपूजा. २ कमरेवर.

वैष्णवभक्त । विष्णु अवतार साक्षात । विप्रवेष धरूनि पंढरीनाथ । धरिलें धरूपद निजांगें ॥ ४१ ॥ विठोबा अदृश्य जाहला ब्राह्मण । मग एकनाथचें विस्मित मन । म्हणे मजस्तव शीणले जगज्जीवन । विरुदासि उणे येऊं नेदी ॥ ४२ ॥ प्रतिपाळ करावा दासाचा । ऐसा भावचि असे तयाचा । वेदासि पार नकळे ज्याचा । तो होय भक्तांचे साह्यकारी ॥ ४३ ॥ 'रीण वारिलें पंढरीनाथें । हेही जनांत जाहलें श्रुत । बारा वर्षे धरिलें धरूपद । हाही चरितार्थ प्रगटला ॥ ४४ ॥ पुष्पकळिकेंत मकरंद निश्चिती । त्याची प्रभंजनें सुटतां येतसे ह्रती । तैसीं संतांचि चरित्र ख्याती । भाविक सांगती परस्परें ॥४५॥ अमानित्व अदंभित्व लक्षणें । हीं त्याचें आंगीं अक्षयीं लेणें । सत्कीर्ति जगीं प्रगट तेणें । वर्णिती गुण महाकवी ॥ ४६ ॥ सकळ ग्रंथांमाजी श्रेष्ठ । संतचरित्र अति वरिष्ठ । दैत्राथिले जे असतील स्पष्ट । त्यांसीच गोष्ट हे रुचे ॥ ४७ ॥ विकल्पी द्वेषी जे सर्वदा । अविद्या तिमिरें वेष्टिले सदा । त्यासि रिकामपण नसेचि कदा । संसार धंदा करिताती ॥ ४८ ॥ तैसें न व्हा तुम्हीं सज्जन । अर्थअन्वयीं विवरितां मन । जैसीं तैसीं आर्ष वचनें । गोड करून ऐकता ॥४९॥ तुमचेनि आधारें साचार । प्रेमभरित माझें अंतर । येन्हवीं महीपती मूढ पामर । नसे साचार कविकर्ता ॥१५०॥ स्वतिश्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । षोडशोध्याय रसाळ हा ॥ १५१ ॥ अ० १६ ॥

१ कर्ज. २ सुवास. ३ वारा.

अध्याय १७



श्रीपांडुरंगाय नमः ॥ प्रेमळ श्रोता असलिया सादर । तेणें वक्तयासि उल्हास थोर । विकल्पसंशय राहोनि दूर । निघती उद्गार कथेचे ॥१॥ जैसा उगवतां वासरमणी[१] । सरोवरीं विकासती कमळिणी । तेवीं श्रोतया सन्मुख होऊनी । प्रेम मनीं उचंबळे ॥२॥ नातरी ऐकतां मेघगर्जना । मयूरें नृत्य करिती नाना । कां मातेसि सन्मुख देखोनि तान्हा । खेळतसे जाणा समोर ॥३॥ कां सन्मुख असतां मृडानीपती[२] । नृत्यकळा दाखवितसे गणपती । कां विरंचि जनकास देखोनि प्रीतीं । गायन सरस्वती करितसे ॥ ४ ॥ तैसेंच तुम्हां संतांसमोर । मी मलगीनें बोलतों आर्ष उत्तर । यामाजी उणें अथवा पुरें । श्रीरुक्मिणीवर तो जाणे ॥ ५ ॥ मागिले अध्यायाच्या शेवटीं निश्चित । विप्रवेष धरोनि पंढरीनाथ । एकनाथाचें धरिलें ध्रुपद । सप्रेमभरित होऊनियां ॥६॥ ऐसीं बारा वर्षें लोटतां पूर्ण । तों पंढरीहूनि आला ब्राह्मण । त्याणें बोळखिला रुक्मिणीरमण । मग सगुणदर्शन त्यासि दीधलें ॥ ७ ॥ जनविजन ओळखती नयनीं । उपाधि वाढेल प्रतिष्ठानीं । यास्तव अदृश्य कैवल्यदानी । तेंच क्षणीं जाहले ॥८॥ एकदा उद्धव सद्गुरुभक्त । श्रीनाथासि स्वमुखें विनवित । कीं तुमच्या मुखें ऐकावें भागवत । उपजला हेत निजमनीं ॥ ९ ॥ देखोनि तयाची सप्रेम आर्ती । महापुराणासि प्रारंभ करिती । भाविक श्रोते श्रवणासि येती । संसार गुंती उरकोनिया ॥ १० ॥ भोळे भोळे नारीनर । स्त्रिया शूद्र उदमी इतर । गृहस्थ नामांकितही थोर । येती सादर ऐकावया ॥ ११ ॥ यथा पद्धति बैसोनि जवळ । पुराण ऐकती भक्तप्रेमळ । अर्थ करोनि सांगता प्रांजळ । संशय जाळ तुटे जेणें ॥ १२ ॥ तों विप्र वेष धरोनि त्वरित । तेथें पातले पंढरीनाथ । एकनाथें देखोनि तयांतें । नमस्कारित सद्भावें ॥ १३ ॥ म्हणती कोठूनि केलेंजी आगमन । काय तुमचें नामाभिधान । ऐसा नाथाचा ऐकोनि प्रश्न । तो जगज्जीवन काय वदे ॥ १४ ॥ केशव माझें नामाभिधान । निस्पृह एकटा असे जाण । तुमच्या मुखें भागवत श्रवण । करावें म्हणोनि पातलों ॥ १५ ॥ स्वमुखें आश्वासन द्याल जर । तरी येथेंचि राहेन निरंतर । तुझी सत्कीर्ती ऐकूनि थोर । आलों सत्वर या ठायां ॥ १६ ॥ ऐकोनि म्हणती एकनाथ । आमुचाही ऐसाचि आहे हेत । कीं सर्वदा असावी तुमची संगत । तरी मनींचें आर्त पुरवावें ॥ १७ ॥ मजला भासे ऐशा रीतीं । बहुरूपी हा वैकुंठपती । रूपें नटतसे नानारीतीं । परी लाघव श्रीपती कळों नेदी ॥ १८ ॥ विप्रवेष करोनि सत्वरा । ध्रुपद धरिलें वर्षें बारा । तोचि केशवरूपें पातला घरा । परी कोणाच्या अंतरा न चोजवे ॥ १९ ॥ अभेद भक्ताचे निज संगतीं । काळ क्रमीतसे रुक्मिणीपती । भागवत श्रवणीं बहुत आर्ती । सन्मुख बैसती ऐकावया ॥ २० ॥ पद संधीं कांहीं राहतां अर्थ । आशंका घेऊनि मग पुसत । नाथ स्वमुखें संशय निवारित । रंग अद्भुत ये तेथें ॥ २१ ॥ उद्धव सखा भाविक पूर्ण । सन्मुख बैसोनि करी श्रवण । हे मुख्य श्रोते दोघेजण । इतर जन सभोंवते ॥ २२ ॥ क्षेत्रवासी जे श्रवणासि येती । तयांसि लागली श्रीविष्णुभक्ती । क्षमा दया शांति विरक्ती । देहीं वसती तयांच्या

१ सूर्य. २ शंकर.

॥ २३ ॥ एकनाथाच्या वचनें करोनी । असत्य व्यवहार टाकिला त्याणीं । धर्म वासना । धरिली मनीं । नामस्मरणीं प्रीत बहु ॥ २४ ॥ जैसा मैलागिरीचा वृक्ष थोर । त्याज शेजारीं बाभुळ खैर । त्यांच्याही काष्ठीं सुगंध संचरे । भिन्न भेद नुरे सर्वथा ॥ २५ ॥ तेवीं सत्समागमाचेनि गुणें । अज्ञान दशेचें पालटें चिन्ह । तत्काळ होय सिद्धांत ज्ञान । अनुभवें करून आपल्या ॥ २६ ॥ जेवीं द्वापारयुगांत निश्चित । लीला विग्रही श्रीकृष्णनाथ । त्यासि उद्धव प्रिय बहुत । तोच योग येथें घडला असे ॥ २७ ॥ नित्य नूतन प्रेमा निश्चिती । चढती वाढती या नांव भक्ती । श्रोतयांची वेधली वृत्ती । प्रपंच भ्रांति निरसली ॥ २८ ॥ तृतीय प्रहरी नित्यानित्य । श्रवणासि भाविक लोक येत । दाटी होतसे वाडियांत । प्रेमा अद्भुत वाढला ॥ २९ ॥ एकनाथाची स्थिती देखोनि । प्रेमळांसि संतोष वाटे मनीं । परी वैदिक पंडित विप्रांलागुनी । द्वेष निजमनीं उपजला ॥ ३० ॥ रिकामटेंकडीस बैसोनि बहुत । स्वमुखें नाथासि अवघे निंदित । म्हणती दुकान मांडोनि क्षेत्रांत । भाविक समस्त भोंदिले ॥ ३१ ॥ वक्तृत्वें तरी नसेचि थोर । परी कीर्तनीं जनाचें मोहीत अंतर । अक्षरें मेळवूनि वरिच्यावर । प्राकृत उत्तर बोलतसे ॥ ३२ ॥ आणिक पुराणें सोडूनि बहुत । निवडूनि काढिलें भागवत । त्याचा अर्थ प्रांजळ सांगत । तेणें वेधिसेलें चित्त सर्वांचें ॥ ३३ ॥ भागवतधर्म ऐकोनि श्रवणीं । अवघे चि निष्काम जाहले मनीं । कामनिक व्रतें नाचरती कोणी । सिद्धांत ज्ञानी निमग्न ॥३४॥ आमुचे यजमान समस्त । प्रपंच उपजीविका चालवीत होते। तितुकेही मोहिले एकनाथें । ग्रंथ प्राकृत वाचोनी ॥ ३५ ॥ श्रीधरी टीका कोणी सत्वरी । नित्य वाचितो ज्ञानेश्वरी । भरतीचा उत्कर्ष अर्थांतरीं । मधुरोत्तरी बोलतसे ॥ ३६ ॥ एकनाथाच्या ऐकूनि गोष्टी । स्वरूपीं मिळेल सकळ सृष्टी । मग काय करील परमेष्ठी । हे चिंता मोठी वाटतसे ॥३७॥ आम्ही वैदिक पंडित ब्राह्मण । चहूं शास्त्रीं अध्ययन । कोणी न पुसेचि आम्हां कारणें । वेधले जन एकनाथें ॥ ३८ ॥ याची विद्या तों केवळ प्राकृत । परी धनधान्य घरीं येतसे बहुत । शतानुशत ब्राह्मण जेवित । परी उणें किंचित पडेना ॥ ३९ ॥ आम्हीं सर्व शास्त्रीं निपुण बहुत । परी बैसल्या न चले सत्य । यजमानाची खुशामत । करणें लागत सर्वदा ॥ ४० ॥ लोक बोलती साचार । एकनाथ हा विष्णु अवतार । परी आम्हांसी वाटे दावेदार । कामनिक व्यवहार बुडविला ॥ ४१ ॥ आपले यजमान बहुत । संसार कृत्य चालवीत होते । नाथाची धरोनि संगत । प्राकृत ग्रंथ ऐकती ॥ ४२ ॥ ऐसे ते क्षेत्रवासी वैदिक पंडित । स्वमुखें नाथाची निंदा करित । म्हणती यानें सत्कर्म बुडवोनि समस्त । एक भक्तीपंथ स्थापिला ॥ ४३ ॥ इतर जनांची कायसी चर्चा । परी आम्हां भिक्षुक ब्राह्मणांच्या स्त्रिया । जाणोनि प्रपंच मिथ्या माया । श्रीनाथपायां लागती ॥४४॥ जैसें द्वापरीं कृष्णाकारणें । ऋषिपत्न्यांनीं नेलें अन्न । तैशाचि ह्या आम्हांसि चोरून । जाती कीर्तन ऐकावया ॥ ४५ ॥ भागवतधर्म सांगतो त्यांतें । यास्तव यजमान निष्काम होत

कोणी नाचरती सकाम व्रतें । आमुची मिळकळत बुडविली ॥ ४६ ॥ क्षेत्रवासी ब्राह्मण सदा । यापरी समस्त जल्पती निंदा । परी चित्तीं आठवूनिया गोविंदा । सप्रेम स्वानंदा न घेती ॥ ४७ ॥ परी ब्रह्मनिष्ठ श्रीएकनाथ । ब्रह्म भावना धरोनि मनांत । ब्राह्मणांची सेवा करित । सप्रेम भावार्थ धरोनिया ॥ ४८ ॥ निंदिती अथवा वंदिती कोणी । परी जनार्दनरूप सर्वांसि मानीं । मानापमान योजितां जनीं । परी सुखदुःख न मानी तयाचें ॥ ४९ ॥ जनीं भरलासे जनार्दन । तोचि करवी निंदा स्तवन । ऐशा निश्चयें बोधले मन । वृत्ति संपूर्ण मुराल्या ॥ ५० ॥ क्षेत्रवासी ब्राह्मण समस्त । नानापरीची छळणा करित । देखिली वस्तु तेचि मागत । परी न वंची नाथ तयांसी ॥ ५१ ॥ वस्त्र पात्र अपूर्व दिसत । ब्राह्मण मागतांचि उचलोनि देत । आगंतुक येतां तयासि सांगत । दाता एकनाथ येथें असे ॥ ५२ ॥ सहस्रावधी येतां अतिथी । तरी अन्न देऊनियां करितसे तृप्ती । तयासि सिद्धि अनुकूल असती । तरी सत्वर गतीं जा तेथें ॥ ५३ ॥ आपुले घरीं उदंड धन । परी कदा न करिती अन्नदान । दाखवोनि देती नाथाचें सदन । द्वेष बुद्धीनें सर्वदा ॥ ५४ ॥ तंव एके दिवशीं साचार । पर्जन्य लागला असे थोर । सात दिवस अहोरात्र । शिळंधार वर्षतसे ॥ ५५ ॥ मंदिरें भिजोनि सर्व गळती । कोरडी कोठे न दिसे क्षितीं । इंधन न मिळेचि कोणाप्रती । पाकनिष्पत्ती न होय ॥५६॥ घरीं धन धान्य असोनि फार । परी इंधन न मिळे अणुमात्र । तों रात्र लोटतां दोन प्रहर । ब्राह्मण चार पातले ॥ ५७ ॥ ते अन्न इच्छिती पोटभर । यास्तव हिंडती घरोघर । तों सांगतीं गांवींचे द्विजवर । एक सत्वधीर येथें असे ॥५८॥ तयाचें नांव एकनाथ । दुरोनि मंदिर दाखवित । वाटसरू जाउनि तेथ । काय बोलत नाथासी ॥ ५९ ॥ आम्ही क्षुधातुर चौघेजण । आलो ऐकोनि नामाभिधान । तरी आतां करावें क्षुधाहरण । पाक करून निज मंदिरीं ॥ ६० ॥ ऐकूनि त्यांची वचनोक्ती । नाथासि कळवळा आला चित्तीं । मग गिरजाबाईसी आज्ञापिती । पाकनिष्पत्ती करावी ॥ ६१ ॥ ते म्हणे इंधन किंचितही नाहीं । मग नाथ उत्तर देतसे कायी । काष्ठें वेष्टित मंदिर सर्वही । उद्धवासि तिही आज्ञा केली ॥ ६२ ॥ एक खण उखळोनि सत्वर । किलचा काढोनि द्यावा फार । उद्धव देतसे प्रतिउत्तर । उशीर फार होईल कीं ॥ ६३ ॥ मग नाथें उकलोनि नवार । माच वेगातें फोडोनि सत्वर । इंधन निर्मिलें याप्रकारें । स्वयंपाक साचार सिद्ध झाला ॥ ६४ ॥ ब्राह्मणांसि स्नानाकरणें । पाणी तापोनि दिधलें उष्ण । शीत वाजतें म्हणवून । संगडी पेटवून ठेविली ॥ ६५ ॥ गिरिजाबाई त्याज कारणें । स्वहतें पात्रीं वाढीत अन्न । तृप्त जाहली यति ब्राह्मण । आशीर्वचन बोलती ॥६६॥ श्रीपांडुरंग कृपेनें निश्चिती । तुझी सुशीळ असो वृत्ती । मग मुखशुद्धि देऊनियां तीतीं । म्हणती आतां विश्रांती करावी ॥ ६७ ॥ ऐसें कांहीं दिवस लोटले । तों वडिलांचें श्राद्ध आलें । ब्राह्मण भोजनासि सांगितले । पाक करविला निज मंदिरीं ॥ ६८ ॥ दिवस येताचि दीड प्रहर । स्नानासि पाठविले द्विजवर ।

---

१ पृथ्वी. २ शेगडी.

स्वयंपाक सिद्ध झाला पर । तयांसि उशीर लागला ॥ ६९ ॥ नित्यनेम सारोनि साचा । एकनाथ मार्ग लक्षिती त्यांचा । तों हेत झाला तिहीं देवांचा । म्हणती सद्भाव याचा पहावा ॥ ७० ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर । होऊनि आले मंगल फकीर । जमाल दाढी आरक्त नेत्र । चरणीं तोडर गारमणी ॥ ७१ ॥ हातीं तसर्वी घेऊनि तिघे । चर्मे वेष्टिलें सर्वांग । मस्तकीं जटाभार सोंग । दाखवोनि मग काय म्हणती ॥ ७२ ॥ एकनाथासि बोलती वचन । आम्हीं क्षुधित तिघेजण । पोट भरोनि इच्छितों अन्न । इतुकें वचन बोलिले ॥ ७३ ॥ श्रीनाथें शब्द ऐकोनि श्रवणीं । अवश्य म्हणती तये क्षणीं । अन्न निपजलें होतें सदनीं । तें पात्रीं वाढोनी आणिलें ॥ ७४ ॥ आपण सन्निध बैसोनि जाण । मलंगांसि घातलें भोजन । करशुद्धि होतांचि त्याज कारणें । मग विडे आणूनि दीधले ॥ ७५ ॥ सर्व भूतीं भगवद्भाव प्रीती । निश्चय कळला तयां प्रती । मग तिन्ही देव प्रगट होती । दर्शन देती एकनाथा ॥ ७६ ॥ दृष्टीसि देखोनि सगुण मूर्ती । म्हणे सनाथ केलें मज प्रती । मलंग वेष धरोनि पुढती । फकीर निघती तेथूनियां ॥ ७७ ॥ तों स्नानें करोनि धरामरें[2] । वाडियांत पातले सत्वर । तयासि देखोनि फकीर । तृप्तीचे ढेकर देताती ॥ ७८ ॥ यवन भाषे करोनि जाण । नाथासि देती आशीर्वचन । आम्हांसि पोटभर घातलें अन्न । ईश्वर कल्याण करील तुझें ॥७९॥ इतुकें बोलोनियां उत्तर । बाहेर गेले मलंग फकीर । ब्राह्मण बोलती परस्परें । वर्णसंकर माजला ॥ ८० ॥ एकनाथासि बोलती वचन । आजि तुझ्या वडिलांचें श्राद्ध जाण । आम्हां आधीं अनसुट अन्न । यवनांसि भोजन घातलें ॥ ८१ ॥ तंव एक म्हणती द्विजवर । यांच्या वडिलांचे सुकृतं[3] फार । यास्तव मध्यान्हीं आले फकीर क्षुधातुर होऊनियां ॥८२॥ श्राद्ध तो सांग जाहलें पाहीं । आता आपुलें काम येथें नाहीं । ऐसें बोलोनि ते समयीं । परतोनि सर्वही चालिले ॥८३॥ एकनाथ पुढें होऊनि सत्वर । तयांसि घालिती नमस्कार । म्हणे ते क्षुधातुर होते फकीर । यास्तव साचार जेवविले ॥ ८४ ॥ आणिक उदक अनसुट आणोनी । दुसरा स्वयंपाक करविला सदनीं । तरी अपराध क्षमा करोनि । श्राद्ध स्वामींनी करावें ॥ ८५ ॥ ऐसी ग्लांती करोनि फार । प्रार्थितसे वारंवार । परी ते नायकतीच द्विजवर । म्हणती भ्रष्टकार तूं करिसी ॥८६॥ मग धर्माधिकारी क्षेत्रवासी । जावोनि वृत्तांत सांगती त्यासी । कीं आधीं न करितां श्राद्धासी। त्याणें फकिरासी जेवविले ॥८७॥ तेव्हां धर्माधिकारी येतसे सत्वर । सर्वे ब्राह्मण थोर थोर । तो उपाध्याय नाथासि बोले उत्तर । हे आले बहिष्कार टाकावया ॥८८॥ तो विप्र बोलती नाथा कारणें । आजि तुझ्या वडिलांचीं तीथ जाण । ते काय जातीचे मुसलमान । यास्तव यवन जेवविले ॥८९॥ ऐसें नाना दुरुत्तर । बोलतां तेव्हां धरामर । परी श्रीनाथ शांतीचा पयोब्धि थोर । राग आणुमात्र नयेची ॥९०॥ जव निंदेचे येतां लोट । शांति सागरी भरीतसे घोंट । काम क्रोधाची मोडली वाट । करणीं अचाट निरुपम ॥ ९१ ॥ जनार्दन स्वरूप मानोनि विप्र । घातला साष्टांग नमस्कार । म्हणे कृपा करोनि नाथावर । श्राद्ध सत्वर करा स्वामी

१ फकिरास. २ ब्राह्मण (पृथ्वीवरील देव) ३ नशीब.

॥९२॥ धर्माधिकारी बोलती उत्तर । तुझें सुकृत दिसतें फार । आतां स्वर्गींचे येऊनि । पितर भोजन साचार करितील ॥ ९३ ॥ श्रीनाथ म्हणती नवल रोकडे । तुमचें वचन खालीं न पडे । अघटित गोष्टी तेही घडे । नव्हे मांकडे सर्वथा ॥ ९४ ॥ स्वामींच्या वचनें करोनि निश्चित । स्वाहा स्वधाकार जे होत । तेणेचि देव होती तृप्त । इंद्रासहित महायागीं ॥ ९५ ॥ विप्रवचनाचा नवलाव । पाषाणमूर्तीत प्रगटे देव । श्रीवत्स हृदयीं धरी माधव । तेथें रंक मानव ते किती ॥ ९६ ॥ यावरी म्हणती धरामर । श्रपणिका लावूं नको फार । येथें साक्षात न येतां पितर । तरी वाळीत आम्हीं घालूं ॥ ९७ ॥ ऐसें बोलोनि तये क्षणीं । तीन पाट मांडिले धरणीं । आगतनाथ बोलतां वाणी । तों पितर वरोनी उतरले ॥ ९८ ॥ परम तेजस्वी देदीप्यमान मूर्ती । ब्रह्मसूत्रें कंठीं विराजती । सुवर्ण पवित्रें हातीं असती । दृष्टीसीं पाहती धरामर ॥ ९९ ॥ पितर येऊनि बैसले आसनीं । वेदघोष मांडिला तये क्षणीं । हें सकळ ब्राह्मण देखोनि नयनीं । आश्चर्य मनीं ते करिती ॥१००॥ नाथाचें आश्चर्य जाणा । लज्जा उत्पन्न जाहली ब्राह्मणां । मग खालीं करोनियां माना । घातल्या घोणा सकळिकीं ॥१॥ मग धर्माधिकारी त्यासमवेत । मौनेंचि विप्र उठोनि जात । आंवतिले ब्राह्मण सोंवळ्यांत होते । तितुकेचि तेथें राहिले ॥ २ ॥ श्राद्धसंकल्प यथास्थित । सांगोनि जेविले पितरांसहित । विडेदक्षिणा घेऊनि त्वरित । पितर जात स्वर्गपंथा ॥ ३ ॥ ऐसें कौतुक देखोनि नयनीं । परम विस्मित जाहले मनीं । मग धर्माधिकाऱ्यापासीं येऊनी । मागील करणी सांगीतली ॥ ४ ॥ म्हणती पितर जेवूनि आम्हां देखत । स्वर्गासि गेले ऊर्ध्वपंथे । धर्माधिकारी जाहले लज्जित । म्हणती व्यर्थ जीवित आपुलें ॥ ५ ॥ छळणेचा प्रकार केला फार । परी एकनाथासि साह्य ईश्वर । अपयश आलें आम्हांवर । कैसा विचार करावा ॥ ६ ॥ दुर्वासें अंबरीष करितां कष्टी । तों चक्र लागलें त्याचे पाठीं । तैसीच आजिची चरित्र राहटी । लज्जा मोठी वाटतसे ॥ ७ ॥ ऐसें ब्राह्मण ते समयीं । परस्परें बोलती पाहीं । इकडे एकनाथाचे जीवीं । हर्ष शोक कांहीं उपजेना ॥ ८ ॥ ब्राह्मणीं बहुत केली छळणा । याचा खेद न करीच मना । स्वर्गस्थ पितर आले भोजना । हे आश्चर्य परिपूर्ण नाठवे ॥ ९ ॥ जनार्दनचि भरिला जनीं । ऐसा निश्चय बाणला मनीं । निंदास्तुती ऐकतां कानीं । समान मानी दोन्हीं तें ॥ ११० ॥ तृतीय प्रहरीं पुराण श्रवण । रात्रीं होतसे हरिकीर्तन । पैठणींचे भाविक जन । वेधलें मन तयांचें ॥ ११ ॥ नित्य दिवस आणि यामिनी । यात्रा भरतसे याचें सदनीं । ब्राह्मण ऐश्वर्य देखोनी । जळती मनीं सर्वदा ॥ १२ ॥ म्हणती एकनाथाचें ऐकूनि कीर्तन । पैठणींचे वेधले जन । सकळ करिती श्रीराम भजन । वैष्णव संपूर्ण लोक झाले ॥ १३ ॥ काम-निकव्रतें कोणी ना-चरती । उपजीविकेची बुडाली प्राप्ती । भागवत धर्में लोक वर्तती । ऐसें बोलती परस्परें ॥ १४ ॥ चंद्राचा प्रकाश पडतां वरा । देखोनि संताप वाटे तस्करां । तैसीं नाथाचा ऐश्वर्य पसारा । धरामरां तेविं झालें ॥ १५ ॥ उणें पाहतां दिवस यामिनीं ।

१ आश्चर्य, नवल. २ ब्राह्मण. ३ रात्र. ४ चोरांना.

तों एक क्षुद्र देखिलें त्यांणीं । एक कृष्णदास ब्राह्मण तें ठिकाणीं । त्याणें भवानी उपासिली ॥१६॥ अनुष्ठान देखोनियां तीव्र । देवी देतसे साक्षात्कार । मग कवित्वशक्तीचा मागोनि वर । ग्रंथ थोर आरंभीला ॥ १७ ॥ युद्धकांड जें रामायण । त्यावरी केलें प्राकृत लेखन । दृष्टांत रसिक बोलणें । देखोनि ब्राह्मण तोषिले ॥१८॥ म्हणती एकनाथ कविता करितो फार । परी त्याचीं सावडीं आर्ष उत्तरें । स्त्रिया शूद्र भाविक इतर । बोलणें सरे त्यापासी ॥ १९ ॥ शब्द बोलोनि ऐशा रीतीं । नाथा समीप येऊनि बैसती । मग कृष्णदासें लोळ्याची करिती स्तुती । कैशा रीतीं ते ऐका ॥ २० ॥ म्हणती एकनाथा ऐक वचन । कवित्व करिती उदंड जन । परी कृष्णदासें मांडिलें रामायण । रसिक बोलणें तें दिसे ॥ २१॥ तयासि प्रसन्न असे देवी । कडसणी वांचोनि नसे ओवी । भूतभविष्यीं ऐसा कवी । होणेंचि नाहीं सर्वथा ॥ २२ ॥ ऐकोनि कृष्णदासाची स्तुती । नाथासि आल्हाद वाटला चित्तीं । म्हणती ईश्वराच्या असंख्य विभूती । पार निश्चितीं कळेना ॥ २३ ॥ ब्राह्मणीं उपक्रम केला खरा । परी द्वेषभाव नयेचि अंतरा । विस्मयो जाहला धरामरां । मग आपुल्या घरां ते गेले ॥२४॥ असो इकडे अनुसंधान । कृष्णदास लिहीत रामायण । युद्धकांड संपूर्ण न होताचि जाण । तों दृष्टांत देवीनें दाखविला ॥२५॥ उदईक तृतीय प्रहरीं निश्चित । तुझा देहांत होईल सत्य । सावध असावें मनांत । ऐसें सांगत भवानी ॥ २६ ॥ मग पावोनि जागृत अवस्था । परम उद्वेग वाटला चित्ता । म्हणे ग्रंथ नाहीं झाला पुरता । तरी आतां कैसें करावें ॥२७॥ मग लिहिला ग्रंथ बरोबरी । घेऊनि पातलें एकनाथाचें घरीं । श्रीनाथे देखोनि नेत्रद्वारीं । उठोनि सामोरी येत पुढें ॥२८॥ कृष्णदासें धरोनि विनीतता[2] । चरणकमळीं ठेविला माथां । आसनीं बैसवूनि तत्त्वतां । म्हणे कृपा समर्था आजि केली ॥२९॥ कृष्णदासें प्रीती करून । सांगितलें आद्यंत वर्तमान । म्हणे उदईक आमुच्या देहासि मरण । तें न चुकेचि जाण सर्वथा ॥ १३० ॥ युद्धकांड रामायण । त्या वरी प्राकृत केलें टिपण । कांहीं शेष राहिलें जाण । ते आपण संपूर्ण करावें ॥ ३१ ॥ ऐसें बोलोनि वाडेकोडे । पुस्तक ठेविलें तयापुढें । श्रीनाथें चित्तीं धरोनि चाड । निज निवाडें लक्षिती ॥ ३२ ॥ एक अध्याय तेव्हां वाचोनि । परम संतोष पावले मनीं । म्हणती या शब्दाचीं पुरवणीं । नव्हे आमुचेनि सर्वथा ॥३३॥ तुम्हीं ग्रंथ आरंभिला बरा । हा आपुल्याच मुखें समाप्त करा । कृष्णदास म्हणती त्या अवसरा । काळाचा दरारा उदईक ॥ ३४ ॥ यावरी श्रीनाथ पुसती त्यास । ग्रंथासि लागती किती दिवस । तोवरी काळ तुम्हां संतांस । न करी स्पर्श सर्वथा ॥ ३५ ॥ ऐकोनि नाथाच्या वचनास । चित्तीं वाटला विश्वास । म्हणे येथेंचि बैसतां रात्रंदिवस । ग्रंथ सिद्धीस तरी जाय ॥ ३६ ॥ एकनाथ म्हणती त्या अवसरा । तुम्हीं जावें आपुल्या घरां । कांहीं काळाचा येतां वारा । भेटी सत्वरा आम्हीं येऊं ॥ ३७॥ ऐसें ऐकूनिया उत्तर । चित्तीं संतोष वाटला फार । मग सद्भावें करोनिया नमस्कार । निज मंदिरीं पावले ॥३८॥ श्रीनाथें दीधलें आश्वासन । तें स्वमुखें सांगे

१ मराठीत. २ नम्रता.

लोकांकारणें । एक रात्र लोटतांचि पूर्ण । तों उदयासि दिनकर पावला ॥ ३९ ॥ मग कृष्णदासें करोनि स्नान । नित्य नेम सारिला पूर्ण । अंत समय येतांचि त्वरेनें । होताति प्राण कासाविस ॥ १४० ॥ ते समयीं येऊनि श्रीनाथ । कृष्णदासासि आश्वासित । आंगावरूनि फिरविला हात । मग आज्ञा करीत काळासी ॥४१॥ आजिपासून अकरा दिवस । याच्या देहासि न करीं स्पर्श । ऐकोनि ऐसिया वचनास । आश्चर्य लोकांस वाटलें ॥ ४२ ॥ नाथाच्या वचनासि देऊनि मान । काळ फिरोन गेला त्वरेनें । कृष्णदास तेव्हां सावध होऊनि । लिहित रामायण बैसले ॥४३॥ ऐसी अघटित देखोनि करणी । लोक विस्मित जाहले मनीं । श्रेष्ठ ब्राह्मण प्रतिष्ठानीं । वार्ता त्यांनीं ऐकिली ॥४४॥ मग परस्परें बोलती उत्तर । अकरावे दिवशीं कृष्णदास मरे । तरी उत्तर मानूं खरें । नाहीं तरीं हें मिथ्या ॥ ४५ ॥ ऐसें म्हणोनि दुर्मती । चित्तीं क्षुद्र सर्वदा लक्षिती । तों दहावे दिवशीं निश्चिती । ग्रंथ समाप्त पावला ॥ ४६ ॥ युद्धकांड समाप्त होतांचि पूर्ण । केलें ब्राह्मण संतर्पण ।सरस्वतीचे करोनि पूजन । वर्णी महिमान नाथाचें ॥४७॥ अकरावे दिवशीं करोनि स्नान । श्रीकृष्णदासें नित्य नेम सारिला पूर्ण । तों प्रयाण समय जाणोन । केलें आगमन श्रीनाथें ॥४८॥ बुका सुमनें पुष्पहार । पूजोनि केला नमस्कार । कष्ट न होतांचि अणुमात्र । कृष्णदास परत्र पावले ॥ ४९ ॥ ब्राह्मण बोलती परस्परें । आम्हीं लोक्यासि वर्णिलें फार । परी शेवटीं अपयश आलें खरें । कैसा विचार करावा ॥ १५० ॥ जों जों अपाय योजिता मनीं । तों त्याची सत्कीर्ति प्रगटे जनीं । अघटित नाथाची करणी । छेप म्हणवोनी चालविती ॥ ५१ ॥ एक बोलती परस्परें त्याचें जन्मांतर असे थोर । यास्तव साह्य होऊनि ईश्वर । सत्कीर्ति फार वाढविली ॥ ५२ ॥ भोळा भाविकें पडती पायां । परी आम्हांसि नावडे त्याची क्रिया । ऐसी वैष्णवी योगमाया । उमज तयां पडों नेदी ॥ ५३ ॥ तो करनाटक प्रांतीं साचार । धनवंत गृहस्थ सावकार । श्रीपांडुरंग भक्ती असे तत्पर । धर्मिष्ठ उदार नामांकित पैं ॥ ५४ ॥ त्याणें चित्तीं धरोनि आर्ती । धातूची निर्मिलीविठ्ठलमूर्ती । ठाण मान सुहास्य आकृती । देखोनि विश्रांती होय जीवीं ॥ ५५ ॥ समचरण कटिकर । सुप्रसन्न मनोहर । जो पुंडलीकवरद रुक्मिणीवर । दावी चरित्र काय तेव्हां ॥ ५६ ॥ प्राणप्रतिष्ठा ब्राह्मणभोजन । व्हावया लागीं गृहस्थानें । सर्व साहित्य करून । सुमुहूर्त सुदिन पाहिला ॥ ५७ ॥ रात्रीं निद्रित होतांचि पूर्ण । तों दृष्टांती सांगत जगज्जीवन । गंगातीरीं क्षेत्र प्रतिष्ठान । तेथें एक जनार्दन राहतसे ॥ ५८ ॥ भक्तिज्ञान वैराग्यलक्षण । हें त्याचें आंगीं बाणले लेणें । तुवां मूर्ति निर्मिली सगुण । ते स्थळीं नेऊन हे द्यावी ॥ ५९ ॥ आज्ञा नायकोनि साचार । येथें स्थापना करिसील जर । तरी उपद्रव पावसील फार । भवरोग दुस्तर निरसेना ॥ १६० ॥ ऐसें स्वप्न देखतां रातीं । चटपट लागली बहु चित्तीं । निद्रा न लागे तयाप्रती । तो उदया गभस्ती पावला ॥ ६१ ॥ मग पंडित ब्राह्मण साधुसंत ।

१. सूर्य २. मरण पावले ३. सूर्य.

एका

तयांपाशीं दृष्टांत मागत । सर्वज्ञ अर्थ ध्यानासि आणित । संशय पडत मग तेव्हां ॥ ६२ ॥ पुराणिक उपाध्ये देत उत्तर । आणिक दोन दिवस धरावा धीर । दुसरा दृष्टांत जाहला जर । तरी मूर्ति सत्वर तेथें न्यावी ॥ ६३ ॥ ऐसें सर्वज्ञ सांगतांचि पूर्ण । मान्य केलें गृहस्थान । तीन दिवस ऐसेंचि । स्वप्न देखिलें तेणें निश्चित ॥ ६४ ॥ मग पांडुरंग मूर्ति घेऊन । प्रतिष्ठानासि आला ब्राह्मण । गंगातीरीं स्नानालागुन । उतरले आपण ते वेळीं ॥ ६५ ॥ वस्त्रें भुषणें आंगावर । अश्व मनुष्यें असती फार । देखोनि क्षेत्रवासी द्विजवर । आल्हाद थोर पावले ॥६६॥ आमुचा यजमान असेल निश्चिती । यास्तव वह्या घेऊनि येती । तुमचे उपाध्ये कोण म्हणती । मग गृहस्थ त्याप्रती काय बोले ॥६७॥ ये स्थळीं एकाजनार्दन । वैष्णवभक्त असे कोण । देवे आम्हांसि सांगितलें स्वप्न । मग भेटीलागोन पातलों ॥६८॥ ऐसी ऐकोनिया गोष्टी । परमचिंता उद्धवें पोटीं । म्हणतीं एकनाथें मोहिली सृष्टी । होताति कष्टी यास्तव ॥६९॥ गावींच्या लोकांसि घातलें मोहन । बाहेरल्यांसि दाखवितो स्वप्न । मग हस्तासि येईल दक्षिणा धन । तैसेंचि वचन बोलती ॥ १७० ॥ तुम्हांसि नाथाच्या भेटीची आर्ती । तरी तूं आमचा यजमान निश्चिती । स्नानकरितां प्रयोग सांगती । आशावंत चित्ती म्हणोनियां ॥७१॥ गृहस्थ देखोनि धनवंत । लुडबुड करिती सभोंवतें । कांहीं दक्षिणा देऊनि त्यातें । मग गांवांत तो प्रवेशला ॥ ७२ ॥ लोकांसि ठिकाण पुसोनि सत्वरीं । पातला गृहस्थ त्याचें घरीं । तों श्रीनाथ बैसले आसनावरी । उद्धव समोरी पै असे ॥ ७३ ॥ सद्भावें साष्टांग नमस्कार । घातला तेव्हां प्रेमादरें । एकनाथ उठोनि सत्वर । भेटले साचार तयासि ॥ ७४ ॥ कोठोनि झालें जी आगमन । साकल्य सांगिजे वर्तमान । कोणे देशीं ठावठिकाण । तरी ते निवेदन करावें ॥ ७५ ॥ गृहस्थ बोले स्वामीप्रती । आम्हीं निर्मिली श्रीविठ्ठलमूर्ती । प्राणप्रतिष्ठा करावी निगुती । तों स्वप्न रातीं[1] देखिलें ॥ ७६ ॥ प्रतिष्ठान क्षेत्रामाजी जाण । राहतसे एकाजनार्दन । ते स्थळीं मूर्ति न्यावी नेऊन । देखिलें स्वप्न तीन दिवस ॥ ७७ ॥ यास्तव आर्त धरोनि पोटीं । येथें पातलों स्वामीचे भेटीं । पदरीं पुण्याच्या होत्या गांठीं । घडोनि शेवटीं तें आलें ॥ ७८ ॥ गृहस्थें बोलोनि ऐशा रीतीं । पुढें ठेविली पांडुरंग मूर्ती । सहास्य वदन सौम्याकृती । देखतां विश्रांति पावला ॥ ७९ ॥ एकनाथमूर्ती उचलोनी । हृदयीं धरिली तेच क्षणीं । म्हणे विश्वचालक कैवल्यदानी । अघटित करणीं हें तुझी ॥ १८० ॥ मग उद्धवें पाहूनी मूर्तीचें ध्यान । चित्तीं वाटलें समाधान । नाथ आज्ञापित त्याजकारणें । साहित्यासी लागणें सत्वर ॥ ८० ॥ ज्योतिषी बोलावूनी त्वरित । प्राणप्रतिष्ठेसि नेमिला मुहूर्त । उद्धव निजांगें साहित्य करित । क्षेत्रांत मात जाणवली ॥ ८२ ॥ क्षेत्रवासी लोक बोलती । श्रीनाथाची देखोनि भक्ती । कर्नाटक देशांतून निश्चिती । विठ्ठल मूर्ती पातली ॥ ८३ ॥ तृतीय प्रहरीं पुराण श्रवण । रात्रीं होतसे हरिकीर्तन । गृहस्थ ऐकोनि निजप्रीतीनें । समाधान पावला॥ ८४ ॥ म्हणे याच्या वक्तृत्वें निश्चित । वेधूनि गेलें

---


१ रात्री.

सर्व चित्त । हाचि पांडुरंग साक्षात । विश्वोद्धारार्थ अवतरला ॥ ८५ ॥ साहित्य जाहलिया सकळिक । सुदिन सुमुहूर्त उदईक । प्रहर रात्र उरली एक । तों समुदायासि पांक करविला ॥८६॥ सुगरणी सुवासिनी भाविक । त्याचि निजांगें करिती पाक । नानापरींचे पदार्थ अनेक । निर्मिले देख ते समयीं ॥ ८७ ॥ प्रातःकाळ होतांचि जाण । मांडिलें मूर्तीचें अर्चन । वैदिक उपाध्ये येऊन । विधिविधान सांग करिती ॥ ८८ ॥ पंचामृतें न्हाणूनि मूर्ती । प्राणप्रतिष्ठा मंत्र बोलती । अभिषेक करोनि यथास्थिती । वस्त्रें लेवविती भरजरी ॥ ८९ ॥ मुक्ताफळें रत्नें माणिक । यांचें अळंकार घातलें देख । पुष्पें सुमनें तुळसी अनेक । जगन्नायक पूजिला ॥ १९० ॥ धूप दीप पंचारती । मंगळ वाद्यें द्वारीं वाजती । नाम घोषें वैष्णव गर्जती । मंगळ आरती मांडिली ॥ ९१ ॥ घृत पक्कें आणि मिष्टान्नें । नैवेद्य दाखविला निजप्रीतीनें । वेदोक्त मंत्रें करून । केलीं अर्पण पुष्पांजळी ॥९२॥ मग एकनाथें नवनीतांचा गोळा । आपुल्या तळहातावरी घेतला । श्रीमूर्तीच्या मुखासि लाविला । म्हणे भक्षीं विठ्ठला ये समयीं ॥ ९३ ॥ तुवां कृष्णाअवतारीं साचार । लोणी चोरूनी भक्षिलें फार । तें देखावया आमुचे नेत्र । क्षुधातुर ये समयीं ॥ ९४ ॥ अघटित कौतुक दाखवसील जर । तरी ये स्थळीं महिमा वाढेल फार । ऐकूनि एकनाथाचें उत्तर । मूर्ति सत्वर हांसिली ॥ ९५ ॥ जिव्हा बाहेर काढोनि त्वरित । हातिचें चाटिलें नवनीत । दृष्टीसी पाहतां वैष्णवभक्त । जयजयकार बहुत ते करिती ॥ ९६ ॥ मग प्रदक्षिणा करोनि निश्चितीं । साष्टांग नमस्कार घातलें प्रीतीं । तों दोन प्रहर येतां गभस्ती । ब्राह्मणपंक्ती बैसल्या ॥ ९७ ॥ तयांचें पूजन यथास्थित । श्रीनाथ निजांगें पाय धूत । चंदनादिक उपचार करोनि समस्त । धूप दीप दाखवित ब्राह्मणां ॥ ९८ ॥ नानापरींचीं मिष्टान्नें सत्वरीं । सम्मान वाढिली पात्रीं । भोक्ता जनार्दन सर्वांतरीं । संकल्प निर्धारीं सोडिला ॥ ९९ ॥ यापरी क्षेत्रवासी ब्राह्मण । तृप्त जाहले सकळ जन । विडे दक्षिणा सकळ घेऊन । समाधान पावले ॥ २०० ॥ गृहस्थें उत्सव पाहोनि बरा । संतोष जाहला त्याच्या अंतरा । म्हणे श्रीनाथ येतील आपुल्या घरा । ते युक्ती सत्वरा योजित ॥ १ ॥ मग नाथासि प्रणाम करोनि । स्वमुखें बोले तये क्षणीं । आतां आम्ही स्वदेशा जाऊनी । निर्मितों रुक्मिणी मूर्ती सुंदर ॥ २ ॥ स्वामींनीं सहपरिवारें करूनि जाणा । श्रीपांडुरंगाचें लावावें लग्ना । ऐसी करितांचि प्रार्थना । नाथाच्या मना संतोष ॥ ३ ॥ उद्धवासि पुसोनि आपण । तयाचें वचन केलें मान्य । गृहस्थें बहुत अर्पूनि धन । आज्ञा मागोन तो गेला ॥ ४ ॥ मग मंदिरा जाऊनि सत्वर गती । निर्मिली श्रीरुक्मिणीची मूर्ती । सर्व साहित्य करोनि प्रीतीं । लग्नतिथी नेमिली ॥ ५ ॥ कुंकुममंडित पत्रिका लेहुनी । श्रीनाथासि धाडिली पैठणीं । कीं नोवरा वरमाय वऱ्हाडी घेउनी । यावें स्वामींनीं सत्वर ॥६॥ यांसही अगोदर सूचना होती । सर्व साहित्यें केलीं आयतीं । मग आंधळीं पांगळीं दुबळीं असती । लग्नासि त्यांप्रती प्रार्थिलें ॥ ७ ॥ तयांसि देउनि नूतन वस्त्रें । प्रार्थूनि घेतले

१ जेवण. २ तूप. ३ लोण्याचा.

बरोबर । मंगळ वाद्यें होताति गजर । वऱ्हाड सत्वर चालिलें ॥८॥ शिविकेंत नोवरा विठ्ठलमूर्ती । गिरिजाबाई बैसली रथीं । अश्ववहनीं वरकड असती । यश वर्णिती नाथाचें ॥९॥ बोल बोलती गांवींचे नारीनर । देवभक्ताचा जाहला पुत्र । आतां नोवरा होऊनि साचार । जातसे दूर लग्नासि ॥२१०॥ असो यापरी एकनाथ । स्वइच्छेनें क्रमीत पंथ । मार्गींचे लोक दर्शनासि येत । महिमा अद्भुत देखोनी ॥ ११ ॥ गृहस्थाच्या गांवाबाहेर । वऱ्हाड येऊनि उतरलें समग्र । तयासि कळतां समाचार । सामोरा सत्वर येत पुढें ॥१२॥ नगरवासी लोक समस्त । घेऊनि सत्वर भेटीस येत । श्रीनाथचरणीं भावार्थ । मस्तक ठेवित निजप्रीतीं ॥ १३ ॥ उद्धवासहित सर्व लोकां । वऱ्हाडी भेटती एकमेकां । वस्त्रें भूषणें वरासि देखा । लेववितां हरिखा मानितसे ॥ १४ ॥ उपाध्यासि वस्त्रें देऊनि प्रीतीं । मग पूजिली श्रीपांडुरंगमूर्ती । संभ्रमेंसि मिरवत निश्चिती । जानवशाप्रती ते नेले ॥ १५ ॥ देवक प्रतिष्ठा ब्राह्मण-भोजन । विठ्ठल-रुक्मिणींचें होतसे लग्न । अंतःपट धरोनि ब्राह्मण । सावधान म्हणताती ॥ १६ ॥ ओं पुण्याह म्हणतां सत्वर । मंगळवाद्यांचा लागला गजर । भक्त गर्जती जयजयकार । सोहळा थोर ते दिवसीं ॥ १७ ॥ वरमायेचा मान पाहीं । तो सर्व घेतसे गिरिजाबायी । मग गृहस्थें माथा ठेवूनि पायीं । प्रार्थना कायी करितसे ॥ १८ ॥ आपुलें मुखींचें कीर्तन । आतां धनवरी करावें श्रवण । श्रीनाथें गोष्ट केली मान्य । साहित्य संपूर्ण असे कीं ॥१९॥ टाळ विणा मृदंग घोष । नादब्रह्मचि आलें मुसे । कीर्तनीं वोळंगला प्रेमरस । वेधलें मानस श्रोतयांचें ॥२२०॥ सगुण चरित्रें निजप्रीतीनें । गावोनि लावीत अनुसंधान । वेळोवेळां नामस्मरण । निजप्रीतीनें करवित ॥ २१ ॥ एक मास राहोनि निश्चिती । सकळासि लाविली विष्णुभक्ती । मग आज्ञा मागोनि गृहस्थाप्रती । स्वदेशा जाती सत्वर ॥ २२ ॥ गृहस्थ होऊनि संतोष-युक्त । वरासि आंदण दीधलें बहुत । वऱ्हाडियांसि वस्त्रें वांटित । खर्च बहुत तो केला ॥ २३ ॥ यापरी चरित्र करोनि जाणा । श्रीनाथ आले प्रतिष्ठाना । क्षेत्रवासी देखोनि नयना । सद्भावें चरणा लागती ॥२४॥ रात्रि समय होतांचि निश्चिती । मिरवत नेला रुक्मिणीपती । तेथें दासानुदास महीपती । सद्गुणकीर्ती वर्णीतसे ॥ २५ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृतग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । सप्तदशाध्याय रसाळ हा ॥ २२६ ॥ ॥ अध्याय ॥१७॥ ओव्या ॥ २२६ ॥ ६ ॥

अध्याय १८



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीरामकृष्णाय नमः ॥ ॥ ज्याची प्राप्ति व्हावया साचार । श्मशानीं बैसला मृडानीवर । तें हें परब्रह्म विटेवर । देखतांचि विरे देहभान ॥ १ ॥ धन्य ते क्षेत्रवासी जन । पंढरीस राहिले निजप्रीतीनें । साक्षात परब्रह्ममूर्ति सगुण । निजप्रीतीनें पाहती ॥ २ ॥ चंद्रभागा देखतां नयनीं । सकळ तीर्थें घडती त्यालागुनी । महा दुरितें जाती निरसोनी । महिमा पुराणीं बोलिला ॥ ३ ॥ जे परम आवडी धरोनि चित्तीं । पंढरीस जावें ऐसें म्हणती । तरी त्यांसि जन्म नाहीं पुनरावृत्ती । सायुज्यमुक्ती ये घरां ॥ ४ ॥ धन्य ते वैष्णव निर्धारीं । चालविती पंढरीची वारी । येथें पुंडलीकाचें द्वारीं । वैकुंठविहारी पातले ॥ ५ ॥ जैसें पंढरीचें महिमान । तैसेंचि क्षेत्र प्रतिष्ठान । तेथें श्रीनाथाच्या भक्तीस्तव पूर्ण । रुक्मिणीरमण पातले ॥ ६ ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । एकनाथासि छळिती द्विजवर । स्वर्गींहून साक्षात् आले पितर । तेव्हां चरित्र परिसिलें ॥७॥ आणिक कर्णाटकाहूनि निश्चिती । साक्षात् आली पांडुरंगमूर्ती । लग्नसोहळा करोनि प्रीतीं । मग परतोनि येती निजग्रामा ॥८॥ परम उल्हासें मिरवत । संभ्रमें आणिले पंढरीनाथ । ते दिवसीं समुहूर्त । सिंहासनीं बैसवित जगदात्मा ॥ ९ ॥ मग क्षेत्रवासी सकळ ब्राह्मण । तयांसि दीधलें आमंत्रण । नानापरीचें मिष्टान्न । तयांसि भोजन घातलें ॥ १० ॥ यावरी श्रीनाथ उद्धवाप्रती । निजगुज सांगती एकांतीं । आम्हीं सेवाहीन असतां निश्चितीं । पांडुरंगमूर्ती घरां येत ॥ ११ ॥ आजन्म परियंत पाहीं । अद्यापि पंढरीस गेलों नाहीं । सेवाचाकरी न घडतां कांहीं । शेषशायी घरी आला ॥ १२ ॥ जैसा चातक न पसरितां वदन । मेघ आकाशीं करीत गर्जन । कां चकोर अमावध असतां पूर्ण । रोहिणीरमण उगवे जैसा ॥ १३ ॥ नातरी स्मरण न करितांचि कमळिणी । आकाशीं प्रगटे वासरमणी । कां बाळक खेळत असतां अंगणीं । सांभाळीत जननी त्या लागीं ॥१४॥ तेवीं आम्ही पंढरीसि अद्यापि न जातां । कृपा उपजली रुक्मिणीकांता । कर्णाटक देशांतूनि तत्वतां । आले अवचितां निजगृहीं ॥ १५ ॥ आतां चित्तासि पातला उद्धार । कीं दृष्टीसीं पाहावें पंढरपुर । प्रत्यक्ष वैकुंठ महीवर । असे माहेर संतांचें ॥ १६ ॥ ऐसें बोलतांचि श्रीनाथ । उद्धवें केला प्रणिपात । पहिली यात्रा म्हणोनि निश्चित । सुदिन मुहूर्त नेमिला ॥ १७ ॥ दिंड्या पताका भरजरी । टाळ विणें मृदंग सुस्वरी । श्रीनाथाच्या बरोबरी । आणिक वारकरी निघाले ॥ १८ ॥ सत्संगाचे नियोगें देख । क्षेत्रवासी चालिले लोक । चित्तीं मानूनि परमहरिखें । करिती कौतुक नामघोषें ॥ १९ ॥ गात नाचत वैष्णव मंडळी । यात्रा निघाली तये वेळीं । जयजयकारें पिटोनि टाळी । नाद निराळीं कोंदला ॥ २० ॥ ऐशा रीतीं कीर्तन करित । श्रीनाथ तेव्हां पायीं चालत । नगरा बाहेर बोळवित । लोक बहुत पैं आले ॥ २१ ॥ उद्धवासि आज्ञापित ते अवसरीं । तुम्ही अधिष्ठान आवरावें घरीं । अवश्य म्हणोनि निर्धारीं । चरणावरी लोटला ॥ २२ ॥ श्रीनाथें केलिया प्रयाण । उद्धव घरीं येत फिरोन । ग्रामवासी सकळ जन ।

१ शंकर. २ पापें. ३ माहात्म्य. ४ चंद्र. ५ सूर्य. ६ नमस्कार. ७ आनंद. ८ आकाशांत.

आले परतोन नगरांत ॥ २३ ॥ श्रीनाथें जैसी लाविली रीत । तैसेंचि उद्धव आचरत । तृतीय प्रहरीं पुराण होत । कीर्तन करित निशाकाळीं ॥ २४ ॥ विष्णुअर्चन सदावर्त । तितुकेंही मागें चालवित । धन्य धन्य क्षेत्रवासी म्हणत । न्युन किंचित पडेना ॥ २५ ॥ इकडे यात्रा घेऊनि बहुत । पंढरीस चालिले एकनाथ । स्वच्छेनें पंथ क्रमित । कीर्तन होत पदोपदीं ॥ २६ ॥ श्रीनाथाच्या संगतीं करून । कोणासि न वाटे भागेशीण । स्वानंदें निर्भर अवधे जन । करिती स्मरण हरीचें ॥ २७ ॥ अशक्त अनाथ तयांप्रती । मागें पुढें सांभाळिती । क्षणक्षणां रुक्मिणीपती । गातसे गीतीं निजप्रेमें ॥२७॥ करावया जगदुद्धार । श्रीनाथ पांडुरंग अवतार । परी लोकसंग्रहार्थ साचार । मर्यादा अणुमात्र न सांडी ॥ २९ ॥ जैसी देख दाखविती संत । तैसेंच भाविक जन वर्तत । तेणेंचि ते पावन होत । भवबंध तयांतें असेना ॥ ३० ॥ दृष्टीसीं देखोनि वैष्णव वीर । तयासि करिती नमस्कार । अंगीं लीनता बहुत फार । महंती अणुमात्र असेना ॥३१॥ जैसा गगनीं उगवोनि दिनकर । प्रकाश पाडीतसे जगावर । परी चित्तीं न धरितां अहंकार । ऐश्वर्य थोर नाठवी ॥३२॥ सप्रेमभाव धरोनि बहुत । मार्गीं चालतां कीर्तन होत । सावडे वैष्णव गाऊं लागत । क्रमिती पंथ या रीतीं ॥ ३३ ॥ पंढरी समीप आली जेव्हां । कळस दृष्टीस देखिला तेव्हां । चित्तीं आनंद वाटला जीवां । सकळ देहभावा विसरले ॥३४॥ रात्रीचे समयीं पंढरीनाथ । पुजारियांसि स्वप्न दाखवित । कीं एकाजनार्दन अभेद भक्त । उदईक येत असे यात्रेसी ॥ ३५ ॥ तरी तुम्हीं दिंड्या पताका बरोबरी । घेऊनि त्यासि जावें सामोरी । आणि चतुर्दशीस महाद्वारीं । कीर्तन निर्धारीं करवावें ॥ ३६ ॥ ऐसा दाखविला दृष्टांत । हें सकळ क्षेत्रांत जाहलें श्रुत । समारंभें लोक समस्त । आले त्वरित चंद्रभागे ॥३७॥ संत महंत वैष्णव वीर । आनंदें करिती कीर्तन गजर । नामघोषें कोंदलें अंबर । जयजयकार करिताती ॥ ३८ ॥ इकडे श्रीनाथें देखोनि पंढरी । दंडवत घालिती क्षितीवरी । आनंदाश्रु वाहती नेत्रीं । भेटती सत्वरी एकमेकां ॥ ३९ ॥ म्हणती धन्य दिवस हा सार । दृष्टीसीं देखिलें पंढरपूर । प्रत्यक्ष वैकुंठ महीवर । जें निजमाहेर संतांचें ॥४०॥ ऐशा रीतीं वर्णूनि महिमा । मग वोवाळिलें पुरुषोत्तमा । अगाध गुण आत्मयारामा । कोणासि सीमा न करवे ॥४१॥ सकळ यात्रे समवेत निश्चिती । उतरोनि आले भीमरथी । तों संतमहंत सामोरे येती । प्रेमें भेटती एकमेकां ॥ ४२ ॥ म्हणती धन्य दिवस हा सुदिन । जाहलें नाथाचें दर्शन । मग चंद्रभागेसि करूनि स्नान । नित्य नेम संपूर्ण सारिला ॥ ४३ ॥ जो सकळ भक्तांचा अग्रणी । समाधिस्थ पुंडलीक मुनी । श्रीनाथें त्याचें दर्शन घेऊनी । प्रीती करोनी पूजिलें ॥ ४४ ॥ पुजारी म्हणती त्या अवसरा । आतां चलावें महाद्वारा । आधीं भेटोनि रुक्मिणीवरा । मग बिऱ्हाड धरा सुखरूप ॥ ४५ ॥ विप्रवाक्य तें जनार्दन । एकनाथासि विश्वास पूर्ण । मग दिंड्या पताका सर्व घेऊन । करीत कीर्तन चालिले ॥ ४६ ॥ गरुड पारीं लोटांगण । घालिती तेव्हां निजप्रीतीनें । संत महंत करिती कीर्तन ।

---

१ दमणूक.

त्याचे चरण वंदिले ॥ ४७ ॥ श्रीविष्णुमय पंढरी । भूवैकुंठ महीवरी । चतुर्भुज तेथिंच्या नरनारीं । भिन्न भेद निर्धारीं असेना ॥ ४८ ॥ आणिक तीर्थे बहुत फार । उदंड आहेत पृथ्वीवर । ते स्थळीं आतां साचार । अहंभाव भरे अधिकची ॥ ४९ ॥ तैसी नव्हे पंढरीमाता । दर्शनेंचि निरसी दुर्गुण अहंता । खळाच्या अनुताप आणूनि चित्ता । लावी परमार्थी तें समयीं ॥ ५० ॥ जन्ममरणाचें मूळ साचार । तोचि हा दुष्ट अहंकार । यासि जो निवटी सत्वर । तोचि योगेश्वर जाणावा ॥ ५१ ॥ योगी नासाग्रीं ठेविती दृष्टी । तैसा हा दिसे जगजेठी । उभा राहिला भीमातटीं । करद्वय कटीं ठेविलें ॥ ५२ ॥ योगी निरसिती आपुलें मीपण । तेणेंचि परमपद पावती जाण । तैसा नव्हे रुक्मिणीरमण । उद्धरीत संपूर्ण जडजीवां ॥५३॥ ऐसा देवाधिदेव कैवल्यदानी । एकनाथांनीं देखिला नयनीं । परम उल्हास वाटला मनीं । प्रीती करोनी भेटले ॥ ५४ ॥ ठाण साजिरें सुकुमार । जघनीं विराजती दोन्ही कर । श्रीमुख दिसतसे मनोहर । मकराकार कुंडलें ॥ ५५ ॥ कासेसि दिव्य पीतांबर । गळां तुळशी मंजुऱ्यांचे हार । समपद ठेविले विटेवर । पाहतां विरे देहभान ॥ ५६ ॥ सप्रेमभावें करूनि देख । नाथें चरणीं ठेविला मस्तक । स्तुति स्तोत्रें बोलोनि मुखें । वैकुंठनायक पूजिला ॥ ५७ ॥ सगुणरूप देखिलें नयनीं । तेंचि सांठविलें हृदयभुवनीं । मग सत्यभामा राही रुक्मिणी । तयां लागोनि भेटले ॥ ५८ ॥ क्षेत्र प्रदक्षिणा करितां सांग । गीतीं गायिला पांडुरंग । विऱ्हाडासि येऊनि मग । भक्त अंतरंग काय करी ॥ ५९ ॥ सकळ क्षेत्रवासी ब्राह्मण । तयांसि देऊनि आमंत्रण । स्वयंपाक करोनि मिष्टान्न । केलें पारणें दुसरे दिनीं ॥ ६० ॥ मग चतुर्दशीस रुक्मिणीकांत । सकळ संतांसि आज्ञापित । एकनाथाचें कीर्तन निश्चित । प्रेमें आवडत मजलागीं ॥ ६१ ॥ ऐसा पुजारियांसि दृष्टांत होतां । ते आदरें म्हणती एकनाथा । गरुडपारीं कीर्तन आतां । स्वामी समर्था करावें ॥६२॥ श्रीपांडुरंगाचें मनोगत । मान दीधलासे तुम्हांतें । वरप्रसाद ऐकतां तेथें । समारंभ बहुत मांडिला ॥ ६३ ॥ माहिमोर्तबा गरुड टके । सप्तरंगी पताका अनेक । टाळ-विणे मृदंग देख । साहित्य सकळिक तें झालें ॥ ६४ ॥ संत-महंत सिद्ध ऋषी । वैदिक-पंडित क्षेत्रवासी । आदरें बैसले श्रवणासी । उल्हास मानसीं धरोनियां ॥ ६५ ॥ एकनाथाचा सत्कीर्ती गजर । ऐकिला होता परस्परें । त्याचें वक्तृत्व ऐकावयां बरें । आस्था फार सकळांसि ॥ ६६ ॥ कीर्तनासि वारकरी आले फार । जे निधडे प्रेमळ वैष्णव वीर । आणिक यात्रा नारीनर । दाटी समग्र जाहली ॥ ६७ ॥ एकनाथें उठोनि आपण । प्रथमारंभीं मंगळाचरण । श्रोता वक्ता श्रीजनार्दन । म्हणोनि नमन करितसे ॥ ६८ ॥ ऐसें म्हणोनि ते वेळीं । विठ्ठलनामें पिटिली टाळी । कीर्तनाचेनि महा कल्लोळीं । नाद निराळीं कोंदला ॥ ६९ ॥ कृष्णाविष्णु हरिगोविंदा । अच्युतानंत आनंदकंदा । परमपुरुषा सच्चिदानंदा । श्रीमुकुंदा जगद्गुरू ॥ ७० ॥ केशव नारायण माधवा । भक्तवत्सला करुणार्णवा । गोपिकापति देवाधिदेवा । भव भ्रम अवघा निवारिसि

१ अहंकार. २ आकाशी.

॥ ७१ ॥ जडमूढ अज्ञान्यांसाठीं । उभा राहिलासि भीमातटीं । भाविक भक्तांसि देऊनी भेटी । कृपादृष्टी रक्षीसी त्यां ॥ ७२ ॥ ऐसें नामें प्रेमभरित । गावोनि नाचत कीर्तनांत । श्रोते देहभान विसरले समस्त । रंग अद्भुत वोडवला ॥ ७३ ॥ तंव कोणी प्रश्न करिती त्यांस । तुमचा पूर्वज भानुदास । त्याचें चरित्र अति सुरस । गावोनि आम्हांस ऐकवा ॥ ७४ ॥ ऐसा श्रोतयांचा प्रश्न ऐकोनि । श्रीनाथ संतोषले मनीं । म्हणती हेंचि होतें आमुचे मनीं । त्यावरी स्वामीनीं आज्ञापिलें ॥ ७५ ॥ रामराजा विद्या नगरीं । परिवारेंसी राज्य करी । तो एके दिवसीं करोनि स्वारी । क्षेत्रपंढरी पावला ॥ ७६ ॥ श्रीपांडुरंगमूर्ति पाहोनि सुंदर । चित्तीं आवड बैसली फार । म्हणे आपुलें गांव विद्यानगर । रुक्मिणीवर तेथें न्यावा ॥ ७७ ॥ ऐसी कल्पना आणोनि मानसीं । सात दिवस बैसले उपवासी । तंव स्वप्नीं येऊनि हृषीकेशी । आज्ञा तयासि करितसे ॥ ७८ ॥ आम्हीं पुंडलीकाची भक्ति विशेष । देखोनि पंढरीसी केला वास । भाक वचन देऊनि त्यास । भाविक जनांस भेटतसों ॥ ७९ ॥ ये स्थळीं चित्त रमतसे । ऐसी विश्रांति कोठें नसे । क्षीरसागरीं आमुचा वास । वैकुंठही दिसे उणेंची ॥ ८० ॥ येथें भाविक भक्त प्रेमळ । यात्रेसि येती सर्वकाळ । त्यांच्या संगतीनें मी घननीळ । सांडोनि तळमळ राहिलों ॥ ८१ ॥ ऐसें असतां रामराया[1] । तुवां निग्रह मांडिला वायां । आतां विद्या नगरासि न्यावया । सांगतों उपाया त्या करीं ॥८२॥ शुचिर्भूत सोवळे होऊन । ब्राह्मणीं उचलावें मज लागुन । मार्गांवरी खालीं न ठेवणें । तरीच येईन त्या ठायां ॥ ८३ ॥ ऐसें स्वप्न देखतां रातीं । राजा परम हर्षला चित्तीं । मग प्रधानासि पुसे एकांतीं । आतां युक्ति कोणती करूं सांग ॥८४॥ मंत्री देतसे प्रतिउत्तर । आपुले देशींचे द्विजवर । तयांसि दक्षिणा देऊनि फार । मार्गावर आणावे ॥ ८५ ॥ हातो हातीं उचलोनि मूर्ती । नगरासि आणू सत्वरगती । ऐसी ऐकोनि वचनोक्ति । चित्तीं भूपती संतोषला ॥८६॥ गांवोगांवींचे द्विजवर । तयांसि लेहूनि विनीतपत्र । ब्राह्मण समुदाय वाटेवर । आणवी सत्वर नृप तेव्हां ॥ ८७ ॥ उदक अन्नाची ठायीं ठायीं । स्वस्थता केली ते समयीं । देवकार्य म्हणोनि पाहीं । संतोष जीवीं ब्राह्मणां ॥८८॥ मग देवासि घालोनि नमस्कार । प्रार्थना करितसे नृपवर । आतां कृपा करोनि मजवर । चला सत्वर पांडुरंगा ॥ ८९ ॥ ऐसें विनवोनियां नृपती । मूर्ति चालवीत हातोहातीं । बडवे पुजारी तळमळती । परी नायके भूपती तयांचें ॥ ९० ॥ सत्ताधारी तो भूपाळ । कोणाचेंही न चले बळ । नरनारी पाहती सकळ । भरले डोळे अश्रुपातें ॥ ९१ ॥ मूर्ति काढितांचि नृपवर । वोस दिसतसे पंढरपूर । जैसें प्राणा वांचूनि शरीर । तैसा विचार तो झाला ॥ ९२ ॥ असो इकडे रामराय भूपती । मूर्ति चालवीत हातोहातीं । परम उल्हास मानोनि चित्तीं । नगराप्रती तो आला ॥ ९३ ॥ मेळवूनियां वैष्णववीर । कीर्तन करितसे नृपवर । दिंड्या पताकांचे भार । मंगळ तुरे लाविले ॥ ९४ ॥ पूजा अभिषेक करोनि प्रीतीं । सिंहासनीं स्थापीत पांडुरंगमूर्ती । महा उत्सव करीत भूपती । आनंद चित्तीं न

1 राजा.

समये ॥९५॥ वस्त्रें भूषणें देऊनि फार । रायें गौरविले वैष्णववीर । द्रव्य दक्षिणा वांटोनि थोर । सुखी द्विजवर ते केले ॥९६॥ रत्नजडित अलंकार । अमूल्य वस्त्रें मुक्ताहार । लेहोनि पूजिला रुक्मिणीवर । हर्षे अंतर कोंदलें ॥९७॥ मंदिरीं निद्रिस्त होता नृपती । तंव स्वप्नीं सांगत पांडुरंगमूर्ती । त्वां ये स्थळीं आणिलें मजप्रती । तरी सांगतों ते ऐका ॥९८॥ विचारूनियां न्यायनीत । धर्म राज्य करावें निश्चित । तुझा अन्याय होतां किंचित । मग मी येथ न राहे ॥९९॥ प्रेमळ भक्त आवडती मजसी । आणि त्वां निरपराधें छळिलें त्यांसी । तरी मी जाईन पंढरीसी । पूर्व स्थळासी आपुल्या ॥ १०० ॥ ऐसा दृष्टांत पंढरीनाथें । रात्रीं दाखविला असे त्यातें । राजा होऊनि भयभीत । असे सावचित्त सर्वदा ॥ १ ॥ पुजारी येऊनि निजप्रीती । प्रातःकाळीं अर्चन करिती । स्नान करोनि येतसे भूपती । पूजा आरती पहातसे ॥ २ ॥ देवावरी अमूल्य अलंकार । यास्तव तस्कराचें भय फार । कवाडासि कुलुपें अष्टही प्रहर । होय सायंकाळ तोंवरी ॥ ३ ॥ राजा देउळीं असल्यावीण । नगरवासी अवघेजण । कोणासि न होय दर्शन । केलें संरक्षण या रीतीं ॥ ४ ॥ षोडशोपचारें करोनि जाण । राजा करितसे नित्य पूजन । घृत पाचित पक्कान्नें । त्रिकाळ अर्पण होतसे ॥ ५ ॥ भोंवते कापूर दीपक । सर्वदा जळती सम्यक । पुष्पें कस्तुरी सुवासिक । उपचार अनेक वोळंगती ॥ ६ ॥ परी पंढरीच्या वियोगत्राणें । चैन न पडे देवाकारणें । म्हणे प्राप्त जाहले बंदीखानें । कधीं सुटेन येथोनियां ॥ ७ ॥ असो इकडे आषाढमासीं । यात्रा मिळाली पंढरीसी । संत महंत सिद्ध ऋषी । चिंता मानसीं करिताती ॥८॥ निधडे वैष्णव वारकरी निश्चित । तितुके मात्र आले तेथें । इतर प्रपंचीक लोक समस्त । म्हणती पंढरीनाथ दूर गेला ॥९॥ ऐसें समजोनि ते अवसरीं । राहती आपुलीया घरीं । संत महंत यानीं साजिरी । केली पंढरी तेधवां ॥ ११० ॥ जेवीं पृथ्वीवरी मेघ वर्षतां । आड वोहळांच्या भासती सरिता । उष्णकाळ येताचि तत्त्वतां । बुंद आतौता न थारे ॥ ११ ॥ घणघायीं टिकतां साचार । तेचि जाणवे अमूल्य हिरे । इतर गारांचा होतसे चूर । परीक्षा नर आणती ॥ १२ ॥ तावोनि काढीतां सोज्वळ दिसे । यालागी कांचन म्हणावें त्यास । पितळेसी कालिमा चढतसे । परीक्षा असे हे त्याची ॥ १३ ॥ कां मोहऱ्यांसि गुंडाळूनि सूत । टाकूनि पाहिजे अग्नी आंत । तंतू न जाळे तरी निश्चित । विष उतरत त्याचेनी ॥ १४ ॥ तेवी विषमकाळ जाहलिया प्राप्त । त्रितापांचे नाना आवर्त ॥१४॥ ज्याचा निश्चय न टळेचि सत्य । तरी तोचि संत म्हणावा ॥ १५ ॥ महा संकटीं न ढळेचि प्रेमा । निग्रहें चालवीत आपुल्या नेमा । तो भक्त आवडे पुरुषोत्तमा । जैसा जीवात्मा या रीती ॥१६॥ असोत हीं भाषणें बहुत । दृष्टांत देणें कवीचें मत । रामरायें नेतां पंढरीनाथ । तों पातले संत वारकरी ॥ १७ ॥ सिंहासनीं नसतां रुक्मिणीवर । वोस दिसतसे पंढरपुर । जैसें प्राणा वांचूनि शरीर । खुंटे व्यापार इंद्रियांचा ॥ १८ ॥ नृपा वांचूनि सैन्य संपत्ती । कां चंद्रावांचूनि जैसी राती । ईश्वरकृपेनें निश्चिती । कवित्व स्फूर्ती जेवीं होय ॥ १९ ॥

१ सोनें. २ राजा.

नातरीं घरधन्या वांचूनि घर । तैसें दिसे पंढरपुर । चिंता करिती निरंतर । परी उपाय अणुमात्र सुचेना ॥ १२० ॥ तंव निवृत्ति ज्ञानदेव सोपान । नामा सांवता वैष्णव जाण । मुक्ताबाई गुणनिधान । यात्रेसि संपूर्ण हे आले ॥ २१ ॥ कबीर आणि रोहिदास पाहीं । गोराकुंभार गोणाबायी । जनीदासी नामया पाहीं । आणि राजायी भक्तराज ॥ २२ ॥ इतुकी मंडळीं ते अवसरीं । बैसली असे गरुडपारीं । नामदेव तेथें कीर्तन करी । तों भानुदास सत्वरीं पातले ॥ २३ ॥ खांद्यावरी घेतला ब्रह्मविणा । आलापें गीते गातसे नाना । हृदयीं चिंतोनि रुक्मिणीरमणा । नामस्मरणा करीतसे ॥ २४ ॥ ऐशा स्थितीनें ते अवसरीं । भानुदास पातले गरुडपारीं । संतमहंता भेटोनि सत्वरीं । मग नमस्कार करिती सद्भावें ॥ २५ ॥ विद्यानगरासि रुक्मिणीवर । नेला म्हणवोनि वैष्णववीर । अवघेचि होऊनि चिंतातुर । करिती विचार एकमेकां ॥२६॥ रामरायाचा देखोनि भाव । पंढरीहूनी गेले देवाधिदेव । आपण इतुकें भक्तवैष्णव । तरी जावोनि केशव आणावा ॥ २७ ॥ ज्ञानराज बोलतां ऐसें । कोणीच उत्तर न देती त्यास । म्हणती ईश्वर इच्छेस । उपाय नसे आपुला ॥ २८ ॥ एक बोलती अद्वैतभाव । आपुलेच देहीं असे देव । चराचरीं भरला असे सर्व । याजवीण ठाव रिता नाहीं ॥ २९ ॥ एक म्हणती जातांचि तेथें । नृपवर कोपेल आम्हांतें । कोंडूनि ठेवील बंदिखान्यांत । मग कैसी मात करावी ॥१३०॥ हेंचि कार्य नव्हे आमुचेनें । ऐसें अधीर बोलती वचन । तों भानुदास साष्टांग नमन । संता कारणें करीतसे ॥ ३१ ॥ जरी आज्ञा द्याल मज आतां । तरी सत्वर आणितों पंढरीनाथा । तुम्ही सांडुनि सकळ चिंता । या स्थळीं तत्वता आसिजे ॥३२॥ ऐसें बोलोनि तयांस । तेथोनि निघे भानुदास । जेवीं मारुती जातां सीता शुद्धीस । तैसा उल्हास वाटला ॥ ३३ ॥ हृदयीं चिंतोनि पांडुरंगमूर्ती । मुखीं गातसे नामकीर्ती । स्मरण करितां दिवसरातीं । सप्रेम विश्रांती सर्वदा ॥३४॥ देवासि घेऊनि येईन कवतुकें । म्हणोनि चित्तीं वाटला हरिखें । विदेह स्थिति जाहली देख । तहान भूख विसरला ॥३५॥ अयाचित वृत्ती करून । कोणी अकस्मात दीधलें अन्न । स्वसंतोषें भक्षून । पुढती गमन करीतसे ॥ ३६ ॥ ऐशा रीतीं क्रमितां पंथ । विद्यानगरासि भानुदास येत । ये स्थळीं आणिला पंढरीनाथ । ऐसें पुसत लोकांसीं ॥ ३७ ॥ रायाच्या भयें करोनि जाण । कोणीच न बोलती वचन । तों एक सत्पुरुष भेटला ब्राह्मण । तो साकल्य निवेदन करीतसे ॥ ३८ ॥ म्हणे रामरायें आणूनियां पांडुरंगमूर्ती । देउळीं स्थापिली असे निश्चिती । परि दर्शन नव्हेचि कोणाप्रती । कुलुपें घालिती सर्वदा ॥३९॥ मग भानुदास विचारी मनांत । आपणासि पाहिजे एकांत । तरी शेजआरती झालिया निश्चित । जावें त्वरित त्या ठाया ॥४०॥ तये दिवसीं रात्रीं निश्चित । राउळासि आला नृपनाथ । शेजारती करोनि त्वरित । मग स्वस्थानासि जात आपल्या ॥ ४१ ॥ पुजारी असती बाहेर । तेही निद्रेनें व्यापिले फार । तेथें भानुदास वैष्णववीर । द्वारा समोर येत तेव्हां ॥ ४२ ॥ एकांत एक चार द्वारें । तितुक्यांस कुलुपें

१ हर्ष. २ देवळांत.


असती थोर। तों माव केली रुक्मिणीवरें। गळोणि सत्वर पडलीं तीं ॥ ४३ ॥ कपाटें मोकळी सर्वही। भानुदासासि आनंद वाटला जीवीं। म्हणे मनोरथ पुरले ये समयीं। मग आंत लवलाहीं प्रवेशला ॥ ४४ ॥ तों ठाण ठकारे जगजेठी। समपद जोडीले विटे नेहटी। दोन्ही कर ठेवूनि कटी। नासाग्रीं दृष्टी धरियेली ॥ ४५ ॥ साजिरें मुख देखतांचि नयनीं। भानुदासासि उल्हास मनीं। मग वाह्यात्कारें राग धरोनी। देवासि ते क्षणीं भांडतसे ॥ ४६ ॥ म्हणे रुक्मिणीपति पंढरी-राया। पायीं विरुद्ध बांधिले कासया। तुझी बोलण्यासारखी नसेच क्रीया। माझिया प्रत्यया हें आलें ॥ ४७ ॥ तुवां पुंडलीकासि दीधला वर। कीं तेथें असावे निरंतर। करावा जडमुढ उद्धार। तो आठव अणुमात्र तुज नाहीं ॥ ४८ ॥ राजमंदिरीं एकांत। वरा पाहोनि बैसलासि येथ। वस्त्रे अळंकार त्यालासि बहुत। नैवेद्यासि मिळत पक्वान्नें ॥ ४९ ॥ यास्तव सुरवाडें राहिलासि हरी। आमुचा विसर पडिला अंतरीं। मग स्वमुखे अभंग केला सत्वरीं। तो सादर चतुरीं परिसावा ॥१५०॥ अभंग ॥ चंद्रभागे तीरीं उभा विटेवरी। विठो राज्याकरी पंढरीये ॥ १ ॥ ऋद्धिसिद्धि वोळंगती परिवार। न लाहाती अवसर ब्रह्मादिकां ॥ २ ॥ सांडुनि इतुकें येथें बीजें केलें। कवणें चाळविलें कानडीया ॥ ३ ॥ शंख भेरी मृदंग वाजती काहळा। उपवडा राउळा होत असे ॥ ४ ॥ चांपेल मार्जन सुगंध चर्चन। भिंवरा चंदन पाट वाहे ॥५॥ रंभा तिलोत्तमा उर्वशी मेनीका। कामिनी अनेका येतीं सर्वे ॥६॥ कनकाचे पर्येळीं रत्नाचे दीपक। सुंदर श्रीमुख वोवाळिती ॥ ७ ॥ रखुमाई आई ते जाहली उदास। पुंडलिका कैसें पडिलें मौन ॥ ८ ॥ भक्त भागवत सकळपां रूसले। निःशब्दचि ठेले तुजवीण ॥ ९ ॥ धन्य पंढरपूर विश्वाचें माहेर। धन्य भीमातीर वाळुवंट ॥ १० ॥ भानुदास म्हणे चाले आम्हां सवें। वाचा ऋण देवें आठवावें ॥ ११ ॥ ओवी ॥ ऐसी करुणा वदोनियां। भानुदास लागतसे पायां। म्हणे कोणें चाळविलासि देवराया। सांग लवलाह्यां ये समयीं ॥ ५१ ॥ ऐसी करुणा ऐकोनि कानीं। सद्गदीत जाहले चक्रपाणी। भानुदासासि आलिंगुनी। हृदय भुवनीं धरियेलें ॥५२॥ मग काय बोलती पंढरीनाथ। मी बंदिखान्यांत पडलों येथ। तुम्हींही निष्ठुर करूनि चित्त। आमुची परतन केली ॥ ५३ ॥ मजला टाकोनि प्रेमळ भक्ता। सर्वथा जाऊं नको आतां। तुम्हां वांचोनि मज तत्वता। क्षणही निरुता न कंठे ॥ ५४ ॥ ऐसें म्हणोनि करुणामूर्ती। भानुदासासि प्रसाद देती। तुळसी सुमनांचा हार निगुती। गळां घालिती तयाचे ॥ ५५ ॥ म्हणे उदईक येऊनि सत्वर। मज नेयी आपुल्या बरोबर। ऐसें सांगता रुक्मिणीवर। हर्ष थोर वाटला ॥ ५६ ॥ पुष्प माळेच्या बरोबर। आला नवरत्नांचा हार। भानुदास नेणती साचार। आले सत्वर बाहेरी ॥ ५७ ॥ मागुतीं लाघवी जगज्जीवन। कवाड कुलुपांसि केलें बंधन। प्रातःकाळ होतांचि त्वरेनें। नृपनंदन पावला ॥ ५८ ॥ कांकड आरती करितां साचार। तों कंठीं

न दिसे नवरत्नहार । म्हणती येथें कोण आला चोर । कोपे नृपवर पूजाऱ्यांसि ॥ ५९ ॥ तस्करे¹ पहावयासि साचार । अष्ट दिशा धांवले हेर । तों भानुदास वैष्णववीर । त्याणीं सत्वर देखिला ॥ १६० ॥ गंगातीरीं करोनि स्नान । करीत येमला विठ्ठलस्मरण । कंठीं झळकती दिव्य रत्नें । सेवकजन देखती ॥६१॥ त्याणीं धरोनि वैष्णववीर । रायापासी आणिला सत्वर । म्हणती धरोनि आणिला चोर । रत्नहार दाखविला ॥ ६२ ॥ चित्तीं क्षोभला नृपवर । सक्रोध बोले तयासि उत्तर । धरोनि आणिला आहे तस्कर । तरी सुळावर त्यासि घाला ॥ ६३ ॥ विवेक नीतन विचारून । सेवकांसि आज्ञा केली त्याणें । होणार भविष्य सर्वथा नेणें । माया भ्रांतीनें वेष्टिला ॥ ६४ ॥ असो भानुदास वैष्णववीर । तयासि दंड केला फार । सूळ देऊन खांद्यावर । माथां सेंदूर घातला ॥ ६५ ॥ भानुदास सप्रेम चित्तीं । हृदयीं चिंतिली पांडुरंगमूर्ती । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । उत्तम युक्ती त्वां केली ॥६६॥ तुज न्यावयासि आलों साचार । यास्तव गळां घातला हार । आतां देववितोसि सुळावर । माया अणुमात्र तुज नाहीं ॥६७॥ आतां जैसें चित्तीं असेल जाण । तैसेंचि देहासि येईल मरण । परी सर्वथा न सोडी तुझें स्मरण । मग स्वमुखें वचन बोलिले ॥६८॥ ॥ अभंग ॥ आकाश कडकडोनियां पाहे । कीं ब्रह्मगोळा भंगला जय । वडवानळ त्रिभुवन खाय । तें तुझी वाट पाहे विठोबा ॥१॥ सप्तही समुद्र समरस होती । लय पावेल हे क्षिती । पंचभूतें प्रळय पावती । तें तूं माझा सांगाती विठोबा ॥२॥ भलतैसें पडो भारी । नाम न टळों निर्धारी । पतिव्रता प्राणेश्वरी । भानुदास म्हणे अवधारी विठोबा ॥३॥ ॥ ओव्या ॥ ऐसा निश्चय करोन तेथें । कंठ जाहला सद्गदित । तों तयासि पावले पंढरीनाथ । ते ऐका निजभक्त भाविकहो ॥ ६९ ॥ सूळ रोविला होता जेथ । त्यासि पल्लवशाखा फुटल्या बहुत । पुष्पीं फळीं सुशोभित । आश्चर्य वाटत सकळांसी ॥ १७० ॥ मूळ वृक्ष झाला म्हणवून । रायासि सांगती सेवक जन । ऐसें ऐकतांचि वचन । नृपनंदन दचकला ॥७१॥ राजा अनुताप धरोनियां । सत्वर चालिला पाहावया । तों भानुदास नेत्र झांकोनियां । पंढरीराया आठवित ॥७२॥ ऐसें देखोनि नृपवर । घालीत साष्टांग नमस्कार । म्हणे तूं निधडा वैष्णववीर । मी नेणोंचि पामर मूढमती ॥ ७३ ॥ भानुदास पाहे उघडोनि नेत्र । तों सूळाचा वृक्ष जाहला थोर । म्हणे मज पावला रुक्मिणीवर । अघटित विचार हा झाला ॥७४॥ भानुदासासि धरोनि हातीं । राउळासि घेऊनी येती भूपती । तों म्लानमुख पांडुरंगमूर्ती । अश्रु वाहती नेत्रांतूनी ॥ ७५ ॥ ऐसें देखोनि नृपवर । घातला साष्टांग नमस्कार । हात जोडोनि देवासमोर । मधुरोत्तरें विनवितसे ॥७६॥ म्हणे मी अपराधी नाना । तुझ्या भक्ताची केली छळणा । रामरायाची ऐकूनी करुणा । पंढरीराणा काय वदे ॥ ७७ ॥ आतां माझें रूप आठवूनि अंतरीं । सुखें राहावें आपुले नगरीं । आम्हीं भानुदासाच्या बरोबरी । जातों पंढरीं पाहावया ॥७८॥ यावरी आग्रह करिसील जर । तरी अनर्थ येथें होईल थोर । ऐसें वदता शार्ङ्गधर । निवांत नृपवर राहिला ॥ ७९ ॥ भानुदास म्हणे रुक्मिणीकांत । कैसा

१ चोर.

उपाय करावा आतां । माझी तों नाहीं राजसत्ता । मी मेळवूनी बहुतां तुज नेऊं ॥१८०॥ ऐसी ऐकूनि वचनोक्ती । लाघव करीत रुक्मिणीपती। तत्काळ लहान जाहली मूर्ती । विस्मित चित्तीं नृपनाथ ॥८१॥ भानुदास संतोष पावूनि मना। संवळीत घातला पंढरीराणा । जय श्रीविठ्ठल बोलोनि वचना । रुक्मिणी रमणा उचालिलें॥ ८२ ॥ संवळी आडोनि जगजेठी । भानुदासासी बोले गुजगोष्टी । आज परमानंदे भरिली सृष्टी । होतील भेटीं संतांच्या ॥ ८३ ॥ ऐशारीतीं क्रमितां पंथ । भानुदास आले पंढरीसि त्वरित । पद्मतीर्थीं वैष्णवभक्त । उतरे स्नानार्थ ते समयीं ॥८४॥ धोत्रें धुवोनि ते वेळीं । वाळूं घालीत सरोवरपाळी । संवळीत होते वनमाळी । ते थोर तत्काळीं वाढले ॥८५॥ वरील पूड मस्तकावरी । तळींचें पायीं जाहलें चुरी । भानुदास विस्मित अंतरीं । मग रुक्मिणीवर काय म्हणे ॥८६॥ संत-महंत गरुड पारीं । वाट पाहाती निरंतरीं । तयां जाऊनि सांग सत्वरीं । येतील सामोरी मज आतां ॥८७॥ ऐसें सांगतां जगज्जीवन । भानुदास संतोषला मनें । गरुडापारीं सत्वर येऊन । हास्यवदन बोलत ॥८८ ॥ पद्मतीर्थ विठ्ठलमूर्ती । घेऊनि आलों मी निश्चितीं । ऐसी ऐकतांचि वचनोक्ती । उल्हास चित्तीं सकळांच्या ॥८९॥ शिविका घेउनि सत्वर। चालिले सकळ सामोरे । दिंड्या पताकांचे भार । मंगळ तुरे वाजती ॥१९०॥ वैष्णव करिती हरिकिर्तन । गाती नाचती प्रीती करून । क्षेत्रवासी सकळ जन । थोर लहान चालिले ॥ ९१ ॥ म्हणती भानुदासाचा उपकार । आम्हीं फेडावा कोठवर । धन्य हा निधडा वैष्णववीर। सारंगधर आणिला॥९२॥ सकळ मंडळीसहि निश्चितीं । पद्मतीर्थी चालत येती। दृष्टीसि देखूनि पांडुरंमूर्ती। सप्रेम घालिती दंडवत ॥९३॥ भानुदासानें लावून हात । शिविकेंत घातला पंढरीनाथ । जयजयकारे गर्जती भक्त। बुक्का उधळित निज हस्तें ॥९४॥ ऐसा मिरवत रुक्मिणीपती । चंद्रभागेसि तेव्हां आणिती । स्नान घालोनि सत्वरगती । देउळाप्रति मग येत ॥९५॥ सुदिन मुहूर्त तये दिनीं । मूर्ति स्थापिली सिंहासनीं । तंव भानुदासासि कैवल्यदानीं । वरदवाणी बोलत ॥ ९६ ॥ न फिटे तुझा उपकार । दृष्टीसि दाविलें पंढरपुर । मी तुझे वंशीं अवतार । घेईन साचार निश्चिती ॥९७॥ ऐसें वदतां जगदुद्धार । भक्त गर्जती जयजयकार । क्षेत्रवासी नारी नर । आनंद थोर त्यासि जाहला ॥ ९८ ॥ अवर्षणीं पडला जैसा घन । कां शरीरांत आला मरणीं प्राण । तैसा उत्सव मानोनि मनें । लोक संतर्पण करिती ॥ ९९ ॥ आपुल्या मतें नरनारी । साकरा[1] वांटिती घरोघरीं । वैष्णव येऊनि गरुडपारीं । कीर्तन गजरीं डुलती ॥ २०० ॥ यापरी भानुदास आख्यान । गातसे ऐका जनार्दन । संतमहंत ऐकोनि कीर्तन । तटस्थ होऊन राहिले ॥ १ ॥ आपला पूर्वज भानुदास । त्याचें चरित्र गायिलें सुरस । नादब्रह्माचि आलें मुसें । कीर्तनीं घोष करिताती ॥२॥ मग उजळोनि मंगळ आरती । वोवाळिला श्रीरुक्मिणीपती । तेथें दासानुदास महिपती । खिरापती वांटितसे ॥ ३ ॥ स्वति श्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । अष्टादशाध्याय रसाळ हा ॥ २०४ ॥ अध्याय । १८ । अभंग । २ । ओव्या ॥ २०४ ॥

[1] साखर.


अध्याय ११
ब्राह्मण
एकनाथ
नंदी

श्रीगणेशाय नमः । जयजय अनंतशायी करुणाकरा । निजभक्त हृदयारविंद भ्रमरा । विश्वव्यापका गुणसमुद्रा । परात्परा जगदुद्धारका ॥ १ ॥ तूं आपल्या दासाचें सगुण चरित्र । स्वयें वदविता राजीव नेत्र । मी तरी वक्ता नव्हें स्वतंत्र । असें परतंत्र तुज अधीन ॥२॥ प्रभंजनाच्या योगें जाण । डोले तृणाचें बुझावण । तेवीं आमुचे बुद्धिसी होय स्फुरण । तें तुझे सत्तेनें पांडुरंगा ॥ ३ ॥ पांवा वाजत नानारीतीं । ऐसें अज्ञान जन बोलती । परी वाजिवणारासि नोळखती । अविवेक मती करोनियां ॥ ४ ॥ वृक्षासि उर्वीचा आधार । भूमी ऐसे उमटती अंकुर । तेवीं मी बोललों उणे पुरें । परी निमित्त समग्र तुजवरी ॥ ५ ॥ जये ठायीं उगवला तरू । तेथूनि सर्वथा नयेचि सरूं । तेवीं आदिअंतीं आह्मांसि आधारूं । शार्ङ्गधरू तूं एक ॥ ६ ॥ श्रोता वक्ता तूंचि एक सर्व । आणिक पाहतां नसेची ठाव । आतां कृपादृष्टीनें पाहोनि देवें । भवार्णव उतरावा ॥७॥ मागिलें अध्यायीं कथा अद्भुत । पंढरीसि जाऊनि एकनाथ । भानुदासाचें चरित्र अद्भुत । गायिलें कीर्तनांत निजप्रीतीं ॥ ८ ॥ संत-महंत भाविकजन । ऐकोनि संतोष पावलें मन । म्हणती धन्य क्षेत्र प्रतिष्ठान । श्रीनाथ दर्शन त्यालागीं ॥ ९ ॥ मानवी नव्हेचि एकनाथ । पांडुरंग अवतरला साक्षात । कानीं ऐकतांचि आत्मस्तुत । मग सत्वर उठत तेथुनी ॥ १० ॥ मग देउळीं जाऊनी निजप्रीतीनें । पांडुरंगासि भेटती आपण । करोनि ब्राह्मण संतर्पण । देवासि पुसोन चालिले ॥ ११ ॥ पंढरीचा महिमा अति विशेष । नाथासि आठवे रात्रंदिवस । सत्कीर्ति सांगती लोकांस । मग प्रतिष्ठानास पावले ॥ १२ ॥ नगरासमीप येतां जाण । उद्धवासि कळले वर्तमान । क्षेत्रवासी समस्त जन । सामोरे धांवोनि येतसे ॥ १३ ॥ चित्तीं भावोनि पांडुरंग-मूर्ती । श्रीनाथासि सद्भावें नमस्कार करिती । सप्रेम भावें आलिंगन देती । आनंद चित्तीं न समाये ॥ १४ ॥ दिंड्या पताका उभारूनि समस्त । कीर्तन करीत चालीले नाथ । मार्गीं मंडप घसणी होत । जन अद्भुत मिळाले ॥१५॥ ऐशा आनंद गजरें निश्चिती । एकनाथ मंदिरीं प्रवेशती । मग उजळोनि मंगळारती । रुक्मिणीपती वोवाळिला ॥ १६ ॥ ऐशारीतीं तये वेळे । पंढरीची यात्रा जाहली सुफळ । उद्धव सद्गुरुभक्त प्रेमळ । बैसला जवळ ते समयीं ॥ १७ ॥ विष्णु अर्चन पुराण श्रवण । सदावर्त हरिकीर्तन । हें सर्वदा चालतसे जाण । एकही न्यून पडेना ॥ १८ ॥ तों प्रतिष्ठान क्षेत्रांत साचार । एक श्रीपाद संन्यासि होता थोर । जिंतोनि षड्वैरि विकार । परमहंस सत्वर मग झाला ॥ १९ ॥ सर्वभूतीं भगवद्भावो । उणापुरा न दिसेचि ठावो । जयासि रंक आणि रावो । ठायांठाव दिसेना ॥ २० ॥ मशक आणि गज निश्चिती । श्वपच द्विपद सारिखे भासती । जे जे दृष्टीसि प्राणी पडती । दंडवत त्यांप्रती घालितसे ॥ २१ ॥ गांवींचे ब्राह्मण परस्परें । म्हणती श्रीपाद हा असतां थोर । महंती न धरीच अणुमात्र । करितो नमस्कार सर्वांसी ॥ २२ ॥ अंत्यज अथवा ब्राह्मण । धेनु मार्जार अथवा श्वान । सूकर पक्षीयांसि देखोन । सद्भावें नमन करीतसे ॥२३॥ उचनीच वर्ण यात । कांहीं नयेचि चित्तांत ।

मंत्र चळाला असेल सत्य । संचार निश्चित जाहला ॥२४॥ एक म्हणती ज्याचा तोचि जाण । आपुल्यासि काय प्रयोजन । परमहंसासि याति वर्ण । नलगे पाहणें सर्वथा ॥२५॥ क्षेत्रवासी ऐशा रीतीं । कोणी निंदिती कोणी स्तविती । परी सुखदुःख सर्वथा नयेचि चित्तीं । विदेहस्थिती तयाची ॥२६॥ परी एक नेम धरीला त्याणें । एकनाथाचें घ्यावें दर्शन । एकाग्र करोनि चित्त जाण । ऐकावें कीर्तन निजप्रीतीं ॥२७॥ सर्वभूतीं दंडवत करित । आणि श्रीनाथदर्शन घेत । सर्वकाळ संतोष चित्त । स्वानंद भरित मानसीं ॥ २८ ॥ ऐसे लोटतां दिवस बहुत । तों चरित्र वर्तलें एक अघटित । दंडवत स्वामी नमस्कारित । स्नानासि येत गंगातीरीं ॥२९॥ तो गंगेंत गाढव बुडालें जाण । तें वाहत आलें गतप्राण । पूर गेलिया वोहटून । पडिलें फुगोन वाळुवंटीं ॥ ३० ॥ तंव दंडवतस्वामीं येऊनि तेथें । गर्दभ प्रेतासि नमस्कारित । देखोनि ब्राह्मण हांसती समस्त । चैतन्य यांत नसे कीं ॥३१॥ तुम्हीं स्वामी सर्वज्ञ मूर्ती । नमस्कार केला कवणाप्रती । ऐकोनि द्विजांची वचनोक्ती । मग ते पाहती विलोकुनी ॥ ३२ ॥ तों सत्याचि मरोनि पडिलें प्रेत । पोट फुगलें असें बहुत । ब्राह्मण म्हणती जरी उठवाल प्रेत । तरी सत्वभावार्थ तुमचा ॥३३॥ तुम्ही आत्मवत मानूनि हे जगती । नमस्कार करितां सर्वांभूतीं । गर्दभ उठवाल निश्चिती । तरी सत्यप्रतीती हे मानूं ॥ ३४ ॥ द्विजाचे वचन ऐकोनि ऐसें । मग काय बोलत परमहंस । चराचरीं आत्मा व्यापक असे । प्रार्थिले तयास तये वेळीं ॥ ३५ ॥ म्हणे देवाधिदेवा पंढरीराया । तुम्ही सांडिलें याचीया ठाया । प्रेतरूप दिसे गदर्भाची काया । तरी दंडवत वाया गेलें कीं ॥ ३६ ॥ इतुकें वचन बोलतां तेथें । तों चरित्र वर्तलें एक अघटित । गर्दभाचें प्रेत पडिलें होतें । तें झालें जिवंत ते समयीं ॥ ३७ ॥ फुरफुरोनि झाडिले नाक कान । उभें ठाकलें न लगतां क्षण । देखोनि आश्चर्य करिती ब्राह्मण । म्हणती हें विंदानें अघटित ॥ ३८ ॥ अहंता टाकोनि द्विजवर । तयासि करिती नमस्कार । पहावया मिळाले लोक फार । भरलें समग्र वाळवंट ॥ ३९ ॥ दंडवत्याची सिद्धाई थोर । देखोनि विस्मित नारीनर । म्हणती याजऐसा सत्पुरुष थोर । पृथ्वीवर दिसेना ॥ ४० ॥ एकमेकासि ब्राह्मण बोलत । नाहीं तरी गांवींचा एकनाथ । नित्य कीर्तन प्राकृत । जन समस्त भोंदिले ॥ ४१ ॥ मृत प्रेत उठवावयासी । हें तों सामर्थ्य नसेचि त्यासी । कोरडेंच ज्ञान भाविकांसी । नित्य उपदेशी स्वमुखें ॥ ४२ ॥ ऐसी निंदा द्विज जल्पत । तों श्रीनाथ पातलें तेथ । ब्रह्मयज्ञ करावया निमित्त । सहज येत गोदातीरीं ॥ ४३ ॥ विप्र देखोनि त्यांजकारणें । कुटिळ शब्द बोलती पूर्ण । दंडवत्याचे करिती स्तवन । धन्य धन्य म्हणताती ॥ ४४ ॥ चमत्कारावीण निश्चित । सत्पुरुष म्हणवणें तें व्यर्थ । जिणें वागवितां जनांत । अश्लाघ्य निश्चित तें दिसें ॥४५॥ ऐसें बोलोनि द्विज समस्त । आपुल्या घरासि जात । तों दंडवतस्वामी येऊनि तेथ । लोटांगण घालित श्रीनाथा ॥ ४६ ॥ दृष्टीसि देखोनि यतीश्वर । सद्भावें करिती नमस्कार । मग एकनाथ तयासि बोलती उत्तर । आज उपाधि थोर वाढविली ॥४७॥ आधींच कलियुग अमंगळ

१ वाळवंटात. २ गाढव. ३ नवलपूर्ण. ४ नवल.

जाण । विकल्प द्वेषें भरलें जन । त्याहीवरी राजा यवन । योगासि विघ्न दिसताहे ॥ ४८ ॥ तुमची सिद्धाई ऐकोनि कानीं । मग तो रक्षील बंदिखानीं । घरचें मनुष्य मरतां कोणी । जिवंत क्षणीं ते करवील ॥ ४९ ॥ कामनिक जन हे सर्वत्र । भूत-भविष्य पुसतील फार । तेणें तुमच्या स्थिती पडेल अंतर । यासि विचार कोणता ॥ ५० ॥ ऐसें नाथाचें वचनामृत । दंडवत्यासि मानलें निश्चित । मग नाथासि विनवीत । समाधि त्वरित मज देई ॥५१॥ मग श्रीनाथ तयासि देती उत्तर । समाधि घेतां तरीच बरें । मग कामाठी बोलवूनि सत्वर । खाणविली गार त्यां हातीं ॥ ५२ ॥ त्यांत विदेही बैसतां निश्चिती । पूजा करोनि लोटिली माती । श्रीनाथें करोनि स्नान मागुतीं । स्वगृहाप्रती ते आले ॥ ५३ ॥ दंडवत जाहले समाधिस्त । हा क्षेत्रांत कळला वृत्तांत । ब्राह्मण मिळोनिया समस्त । काय बोलत परस्परें ॥ ५४ ॥ पंडित वैदिक धर्माधिकारी । नाथासि बोलाविती पिंपळेश्वरीं । म्हणती आम्हासि नेणतां निर्धारीं । अघटित परी त्वां केली ॥५५॥ गंगेमाजीं खाणोनि गार । जितची पुरिला यतीश्वर । कोण बोलिला तेथें मंत्र । अविधि साचार कर्म केलें ॥ ५६ ॥ वळेंचि समाधि घ्या म्हणतां । तो परमहंस पुरिला आतां । तरी तुजवरी निश्चित आली हत्या । बहिष्कार तत्वतां तुज आतां ॥ ५७ ॥ वळेंचि संन्यासी टाकावा पुरोन । हें कोणते शास्त्रीं लिहिलें वचन । तरी तें दाखवी आम्हाकारणें । सकळ ब्राह्मण बोलती ॥ ५८ ॥ त्याणें मृत गाढव उठविलें सहज । हें तों सिद्धाई न सोसवे तुज । म्हणोनि संन्यासी मारिला आज । हें अंतरगुज आम्हीं जाणों ॥ ५९ ॥ एक म्हणती धीट मोठा । भागवतधर्मीं अति गाढा । निषेधूनि सत्कर्म वाटा । सिद्धांत पेठा वसवितो ॥ ६० ॥ एक म्हणती टार्णीटोणीं । कांहीं जाणतो मंत्र मोहिनी । नुसतें कोरडें नाम गाउनी । भाविक भोंदुनी नागविले ॥ ६१ ॥ एक उद्धट बोलती स्पष्ट । हा तरी निश्चित कर्मभ्रष्ट । वेदाज्ञेची मोडूनि वाट । अकर्म अचाट करीतसे ॥ ६२ ॥ संन्यासी मारूनि केला खून । तरी उद्विग्न नव्हेचि याचें मन । आनंदयुक्त करितो भजन । कठीण पाषाण ज्यापरी ॥ ६३ ॥ आपुल्या आंगीं नसतां करणी । ज्ञान सांगतो लोकांलागुनी । दया उपजली नाहीं मनीं । संन्यासी मारुनि टाकिला ॥ ६४ ॥ ब्राह्मण म्हणती एकनाथा । ही हत्या पडिली तुझिया माथा । तरी चमत्कार दाखवूनि आतां । बहिष्कार परता निरसीं कां ॥ ६५ ॥ प्रत्यक्ष पाषाण नंदी तेथें । हा कडबा भक्षील तुझिया हातें । तरी तुज दोष नसे किंचित । घातलें वाळींत तें काढूं ॥ ६६ ॥ ऐकूनि द्विजवरांची वाणी । विनित माथा ठेविला चरणीं । म्हणे स्वामीच्या निघालें मुखांतुनी । ते असत्य करणी कदा नव्हे ॥ ६७ ॥ पूर्वीं वसिष्ठाचिया कृपादृष्टीं । सूर्यासमान तपलीकाठी । ब्राह्मणाची असत्य गोष्टी । कदापि जगजेठी करीना ॥ ६८ ॥ ब्राह्मण बोलती प्रत्युत्तर । लापणिका बोलतोसि फार । आम्हांसि दाखविसी चतमकार । तरी सत्य उत्तर हें मानूं ॥ ६९ ॥ एकनाथाच्या पुढें त्वरेने । कडब्याची पेंढी ठेविली आणुन । ऐसा ब्राह्मणांचा आग्रह देखोन । नंदीसि वचन

बोलती ॥ ७० ॥ आम्हीं आजी आपुल्या मतें । संन्यासी बैसविला समाधींत । याचा दोष नसला किंचित । तरी भक्षी त्वरित करवडें ॥ ७१ ॥ ऐसीं श्रीनाथमुखींचीं अक्षरें । निघतांचि कौतुक वर्तलें थोर । पाषाण नंदीनें सत्वर । जिव्हा बाहेर काढिली ॥ ७२ ॥ कडव्याची पेंढी उचलोनि होंटीं । तत्काळ भक्षिली उठाउठी । सकळ ब्राह्मण देखोनि दृष्टीं । आश्चर्य पोटीं करिताती ॥ ७३ ॥ मग काय बोलती नाथजीला । बहिष्कार घातला होता तुजला । तो आजिपासूनि मुक्त जाहला । चत्मकार दाखविला म्हणोनि ॥ ७४ ॥ ऐकोनि द्विजवरांचें उत्तर । घातला साष्टांग नमस्कार । म्हणे मी मूढमति साचार । वेद-शास्त्र विचार तो नाहीं ॥ ७५ ॥ सेवूनि तुमचे चरणतीर्थ । तेणेंचि होतों पुनीत । तुमचे पायीं तीर्थ व्रतें । सिद्धि समस्त असती ॥ ७६ ॥ ब्राह्मण म्हणती तये वेळां । हे अघटित नाथें दाखविली लीला । अभ्यासें न साधे हे कळा । नवल सोहळा भक्तीचा ॥ ७७ ॥ मागें गुरुदास्य संत सेवन । सप्रेम केलें श्रीहरि भजन । तेणें पांडुरंग जाहला सुप्रसन्न । रक्षितो क्षणक्षणां यालागीं ॥ ७८ ॥ ऐसें बोलोनि परस्परें । घरासि गेले अवघे द्विजवर । क्षेत्रांत कळतां समाचार । नवल साचार लोक करिती ॥ ७९ ॥ भाविक प्रेमळ जे निश्चितीं । ते एकनाथाची करिती स्तुति । म्हणती विश्वोद्धार करावयाप्रती । वैकुंठपती अवतरला ॥ ८० ॥ विकल्प द्वेषी जे कां नर । ते म्हणती असत्य उत्तर । क्षेत्रांत राहिले जे द्विजवर । ते आले सत्वर पिंपळेश्वरा ॥८१॥ नंदी पाहती विलोकून । तंव तो पूर्ववत पाषाण । म्हणतीं कैसा कडबा भक्षिला याणें । आम्हांकारणें न भासे ॥ ८२ ॥ मग एकनाथासि बोलावूनि त्यांणीं । म्हणती बहिष्कार असे तुजलागूनी । चरित्र दाखविले कालचे दिनीं । तें आम्हीं सर्वांनीं न पाहिलें ॥ ८३ ॥ तूं प्रत्यक्ष असतां येथें निश्चितीं । आम्हीं नायको लोक म्हणती । मग पेंढीं आणोनि पुढें ठेविती । म्हणती नंदीप्रती हे चारी ॥ ८४ ॥ हें आम्हासि न दाखवीसी जर । तरी वादासि प्रवर्ते शास्त्राधार । जीत संन्यासी पुरला खरें । तो अभिशाप निर्धारीं तुजवरी ॥ ८५ ॥ ऐकोनि द्विजांची वचनोक्ती । नाथासि संकट पडलें चित्तीं । मग नंदीस प्रार्थना तेव्हां करिती । ते सादर श्रोतीं ऐकिजे ॥ ८६ ॥ आतां नित्य साचार । तूं कडबा भक्षिसी कोठवर । आणिक क्षेत्रवासी धरामरं । गावांत फार राहिले ॥ ८७ ॥ तरी तेहि उदईक येऊनि तेथें । यांजऐसेंचि म्हणतील मातें । तरी सकळांचा संशय निवृत्त । होय तो उपाय त्वरित योजावा ॥८८॥ ऐसीं नाथमुखींचीं उत्तरें । निघतांचि चरित्र वर्तलें थोर । दृष्टीसि पाहती धरामर। आणिकही इतर नरनारी ॥ ८९ ॥ पाषाण नंदी ते तमयीं । उठोनि चालिला लवलाहीं । उडी टाकिली गंगेचे डोहीं । अद्यापि ते ठायीं तो असे ॥ ९० ॥ पूर्वी ऐसें कौतुक देखोनि थोर । आश्चर्य करिती धरामर। म्हणती याचा महिमा अगोचर । मानवी चरित्र हे नव्हे ॥ ९१ ॥ पूर्वी आमच्या वडिलींसाचार । तेथें देखिला ज्ञानेश्वर । त्याणें रेड्या हातीं सविस्तर । श्रुति समग्र वदविल्या ॥ ९२ ॥ आणि चांगदेवसिद्ध भेटीसि

१ ब्राह्मण.

येत । तेव्हां निर्जीव चालविली भिंत । तैसेंच केलें एकनाथें । चरित्र अद्भुत ये समयीं ॥ ९३ ॥ ऐसें बोलोनि परस्परें । एकनाथासि बोलती उत्तर । आतां तुज नसेचि बहिष्कार । जावें सत्वर निज मंदिरीं ॥९४॥ धन्य तुझा सप्रेमभाव । पाषाण नंदीसि आणिला जीव । तुजसी प्रसन्न देवाधिदेव । हा कळला अभिप्राव आम्हांसी ॥९५॥ ऐसी ऐकोनि त्यांची स्तुती । श्रीनाथ सद्भावें चरणीं लागत । म्हणे हें तो तुमच्या कृपेचें सामर्थ्य । मी शरणागत सर्वांत ॥९६॥ ऐसे एका जनार्दन। बोलतां द्विजांसि समाधान । पैठणींचे लोक थोर लहान । नंदी येऊन पाहती ॥९७॥ अद्यापि ते स्थळीं नंदी आहे । जेव्हां सिकता निघोनि जाय । तेव्हां प्रत्यक्ष दिसताहे । चित्तीं संशय न धरावा ॥९८॥ श्रीनाथ घरासि गेलियावर । भाविकांसि संतोष वाटला फार । दिवसंदिवस अधिकोत्तर । सत्कीर्ति थोर प्रगटली ॥९९॥ तंव कोणे एके अवसरीं । श्रीनाथ चालिले अळंकापुरीं । सच्छिष्य उद्धव ठेविला घरीं । मग सहपरिवारीं निघाले ॥१००॥ सत्संगतीचेनि आधारें । सवें यात्रा निघाली फार । सप्रेम ऐकोनि कीर्तन गजर । मार्गे साचार क्रमिती ॥१॥ श्रीनाथ येऊनि अळंकापुरीं । उतरले इंद्रायणीचे तीरीं । तों ज्ञानदेव येवोनि स्वप्नांतरीं । काय रात्रीं सांगीतले ॥ २ ॥ अजान वृक्षाची मुळी निश्चित । आली असे कंठपर्यंत । तरी एक सवें लाविजे तीतें । समाधि त्वरित उकरोनी ॥ ३ ॥ मग श्रीनाथें तैसेंचि केलें । तो ज्ञानदेवाचें दर्शन जाहलें । साष्टांग प्रणाम करोनि भले । मुळीसि लाविलें एकीकडे ॥ ४ ॥ मग समाधीसि बुजावोनि सत्वर । ते स्थळीं केला कीर्तनगजर । एकादशी हरि जागर । यात्रा समग्र करीतसे ॥ ५ ॥ तेव्हां अळंकापुरी उजाड बहुत । शिधासाहित्य न मिळे तेथें । मग कौतुक केलें पंढरीनाथें । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥ ६ ॥ दीनदयाळ रुक्मिणीकांत । होतसे कानडा लिंगाईत । पाल देऊनि बैसले तेथ । सर्व साहित्य घेऊनियां ॥ ७ ॥ यात्रेकऱ्यांसि म्हणे ते समयीं । सर्व सामग्री घेऊनि जावी । द्रव्य आतांचि मागत नाहीं । जाणतसों पाहा एकनाथा ॥८॥ ऐसें म्हणोनि रुक्मिणीकांत । सर्व साहित्य मोजूनि देत । कणीक कडाळ तांदूळ घृत । शाकेसहित लवंगातें ॥९॥ ऐसे चार दिवस लोटतां निश्चित । अदृश्य जाहले जेथील तेथ । आपुल्या दासाचें कृपावंत । न्यून किंचित पडों नेदी ॥ ११० ॥ मग एकनाथापासी येउनि । यात्रेकरी सांगती तयेक्षणीं । उचापत आणिली तों वाणी । आजि ये ठिकाणी दिसेना ॥ ११ ॥ ऐसें तयांनी पुसतां सहज । नाथासि कळलें अंतरगुज । म्हणे हें काय केलें गरुडध्वजें । जो राखितसे लाज भक्ताची ॥ १२ ॥ ऐशारीतीं त्या अवसरा । यात्रा करोनि चालिले घरा । समीप येतां प्रतिष्ठान क्षेत्रा । उद्धव सामोरा येतसे ॥ १३ ॥ क्षेत्रवासी नारीनर । भाविक लोक येऊनि फार । श्रीनाथासि करिती नमस्कार । सप्रेमभरें करोनियां ॥ १४ ॥ गरुड टक्याचें भार । दिंड्या-पताका उभारूनि समग्र । करीत चालिले कीर्तन गजर । ज्ञानदेव चरित्र वर्णिताती ॥ १५ ॥ टाळवीणे मृदंग घोष । नादब्रह्माचि आले मुसे । आनंदें नाचती हरीचे दास ।

१ स्तुति. २ तूप. ३ भाज्या. ४ मीठ.

धन्य दिवस सुदिन तो ॥ १६ ॥ ऐशारीती ते अवसरी । कीर्तन करीत आले घरीं । मग आरती गावोनि बरी । भावें श्रीहरी वोवाळिला ॥ १७ ॥ दुसरे दिवशीं जाण । केलें ब्राह्मण संतर्पण । नानापरी पक्वान्न भोजनें । द्विजांकारणें दीधली ॥ १८ ॥ विडे दक्षिणा सकळां कारणें । देतांचि पावले समाधान । मग अळंकापुरीचें महिमान । स्वमुखें आपण सांगतीं ॥ १९ ॥ एके दिवसी श्रीनाथ आपण । आनंद युक्त बैसोनि जाण । ज्ञानेश्वरी ग्रंथाचें शोधन । निजप्रीतीनें आरंभिलें ॥ १२० ॥ प्रीतीनें प्रत उतरितां लोकी । लेखकापासूनि पडतां चुकी । अर्थ अन्वय न कळतां शेखीं । प्रसिद्ध लोकी नोहे ग्रंथ ॥ २१ ॥ या कार्यास्तव श्रीज्ञानेश्वर । प्रतिष्ठानी घेतला अवतार । एकनाथ रूपें साचार । ग्रंथ सविस्तर शोधिला ॥ २२ ॥ मग उद्धवासि पाहूनि कृपादृष्टी । श्रीनाथ सांगता गुजगोष्टी । ज्ञानेश्वराची सखोल दृष्टी । गीता मऱ्हाटी पैं केली ॥ २३ ॥ जनार्दनकृपें करोन । ग्रंथ शोधूनि ठेविला जाण। याचें करावें पारायण । भाविक जन मेळवूनियां ॥ २४ ॥ ऐकोनि नाथमुखीचें उत्तर । उद्धवासि हर्ष वाटला थोर । केशवरूपें श्रीरुक्मिणीवर । श्रोता चतुर तो एक ॥२५॥ उभयतां संमुख निरंतरी । श्रीनाथ वाचिती ज्ञानेश्वरी । आणिक कांहीं भाविक नरनारी । येती सत्वरी ऐकावया ॥२६॥ ज्ञानेश्वरीचा सखोल अर्थ । श्रीनाथ मुखें प्रांजळ होत । आबाळ वृद्धांसि सर्व कळत । संशय किंचित न राहे॥२७॥ तृतीय प्रहरी नित्यनित्य। वाचिती ज्ञानेश्वराचें कृत्य । केशव उद्धव उभयतां श्रोते । रंग बहुत ये तेथें ॥ २८ ॥ समाप्त ग्रंथ झालिया निश्चिती । मग ते पूजिती सरस्वती । उजळूनियां मंगळारतीं । खिरापतीं वांटिल्या ॥ २९ ॥ केशवरूप धरोनि निश्चित । ते स्थळीं होते पंढरीनाथ । समाप्त झालिया ज्ञानेश्वरी ग्रंथ । मग आज्ञा मागत एकनाथा ॥१३०॥ तुझ्या संगतीच्या सुखें निश्चित। द्वादश वर्षे क्रमिलीं येथ। आतां उदास जाहलें चित्त। तरी आज्ञा त्वरित मज द्यावी ॥३१॥ ऐसें पुसतां जगज्जीवनें । एकनाथ तयासि अवश्य म्हणे । मागुती पुनरपि द्यावें दर्शन । स्वइच्छेनें आपुल्या ॥३२॥ इतुकें वचन ऐकूनि प्रीतीं । अदृश्य जाहली केशवमूर्ती । मनांत म्हणे वैकुंठपती । यावे पुढती या ठायां ॥३३॥ हेत उपजला कमळाधवा । याची तो बहुत जाहली सेवा । तरी कृतोपकार कांहीं करावा । आवडी देवा हे बहू ॥ ३४ ॥ ऐसे वदोनि द्वारकानाथ। अंतर्धान पावले त्वरित ।नाथासि सांगे उद्धव भक्त । सदोदित जवळी पैं ॥३५॥ कीर्तन करितां सप्रेम रंगें । ध्रुपद धरितसे मागें । ताल अवसान सांभाळीत आंगें। अद्भुत रंग येतसे ॥३६॥ आबाळ वृद्ध नारीनर । नित्य ऐकती कीर्तन गजर । तंव त्या क्षेत्रांत भाविक थोर । अंत्यज नर एक होता ॥३७॥ तो योगभ्रष्ट जन्मांतर । पूर्वीचा होता वैष्णववीर । कांहीं दोषास्तव साचार । जाहला महार हीनयाती॥३८॥ त्याची कांता परम सती । तीस आवडे श्रीविष्णुमूर्ती । उभयतांही नामस्मरण करिती । सप्रेमगती करोनियां ॥ ३९ ॥ तों श्रीनाथ रात्रीं कीर्तन करिती । उभयतां येऊनि बाहेर बैसती । एकाग्र चित्तें श्रवण करिती । देहभाव विसरती ते समयीं ॥१४०॥ समाप्त झालिया हरिकीर्तन ।

लोक निघती वाड्यांतून । मग एकनाथासि करूनि नमन । स्वगृहा तेथून मग जाती ॥ ४१ ॥ एकनाथ सेवा निश्चिती । त्यांणी केली कैशा रीतीं । गंगातीरीं स्नानासि जाती । तों मार्ग झाडिती नित्यकाळीं ॥ ४२ ॥ श्रीनाथ करावयासि येती स्नान । तेव्हांचि नित्यनेमें घेती दर्शन । साष्टांग नमस्कार घालिती दुरोन । साक्षात्‌ देखोन विष्णुमूर्ती ॥ ४३ ॥ तंव एके दिवर्सी हरिदिनींत । एकनाथ आनंदें कीर्तन करीत । विश्वरूप दर्शन अर्जुनातें । श्रीकृष्णनाथें दीधलें ॥ ४४ ॥ तेंचि अनुसंधान साचार । सप्रेम गातसे वैष्णव वीर । जेंही केली ज्ञानेश्वरें । त्या ओव्या सुंदर म्हणताती ॥ ४५ ॥ राण्या महार अवसरीं । नाथासि स्वमुखें प्रश्न करी । जेव्हां विश्वरूप नटला श्रीहरी । चराचरीं व्यापक जो ॥ ४६ ॥ ते समयीं मी जातीचा हीन । कवणे स्थळीं होतों जाण । श्रीनाथ बोलती वचन । होता सलग्न कृष्णरूपीं ॥ ४७ ॥ ऐसें नाथमुखींचें वचनामृत । ऐकोनि जाहला समाधिस्थ । भेदाभेद निरसले समस्त । कल्पनाद्वैत मावळलें ॥४८॥ चराचर जें जें दिसे । त्यामाजी जाहला समरस । वर्णियाति भेद निःशेष । त्याच्या चित्तास नाठवे ॥४९॥ एकनाथ परब्रह्ममूर्ती । ऐसा तयाचा निश्चय चित्तीं । मग उगवोनि सर्वघराची गुंती । कासन्यांत राहती उभयतां ॥ १५० ॥ लक्ष्मी तीर्थासि स्नानास । श्रीनाथ येती त्या स्थळास । त्यांचें दर्शन अनायासें । होईल मानस तयाचें ॥५१॥ म्हणोनि तें स्थळ टाकूनि तत्त्वतां । गंगातीरीं राहिलीं उभयतां । एकदा अनामिकाची कांता । प्राणनाथा काय म्हणे ॥ ५२ ॥ एकनाथ पांडुरंग साक्षात । विश्वोद्धारार्थ सगुण होत । परी माझें चित्तीं उपजला हेत । भोजनास येथ आणावा ॥ ५३ ॥ तुम्ही जाऊनि स्वामीकारणें । पुमाल तरी साहित्य करीन । राण्या महार ऐकोनि वचन । अवश्य क्षणे कांतेप्रती ॥ ५४ ॥ एकांतीं सांपडोनि श्रीनाथ । सांगीतला जीवींचा गुह्यार्थ । कांतेचें मनीं उपजला हेत । भोजन स्वामींतें घालावें ॥ ५५ ॥ जरीं आज्ञा द्याल ये अवसरी । तरी साहित्य करीन आपुलें घरीं । त्याचा सद्भाव देखोनि अंतरीं । अवमान न करी श्रीनाथ ॥ ५६ ॥ म्हणती जनार्दनाचे कृपेंकरून । तुझे मनोरथ होतील पूर्ण । ऐसें ऐकतां अभयवचन । समाधान पावला ॥ ५७ ॥ श्रीनाथें दीधलें आश्वासन । कांतेसि सांगितलें वर्तमान । दुर्बळ संसार बहुतांगुणें । साहित्य मेळवून ठेविती ॥ ५८ ॥ द्वारीं तुळसीवृंदावन । वस्त्रें पात्रें शुचिर्भूत जाण । नित्य नेमें उभयतां करिती स्नान । नामस्मरण सर्वदा ॥५९॥ कणीक डाळ तांदुळ घृतें । शाखापत्रें मेळवूनि समस्त । हरिदिनीसि उभयतां भोजन न करीत । कीर्तन ऐकत एकनाथाचें ॥ १६० ॥ चारही प्रहर हरिजागर झाला । कीर्तन श्रवणें काळ क्रमिला । प्रभात समय होतांचि वेळा । आलीं तत्काळ मंदिरासी ॥ ६१ ॥ अनामिकाची निजकांता । परम भाविक पतिव्रता । म्हणे स्वामीसि आमंत्रण द्यावें आतां । प्राणनाथा म्हणतसे ॥ ६२ ॥ मी पाकनिष्पत्ति करितें घरीं । तुम्ही सत्वर ये अवसरीं । नाथाची प्रतिक्षा करीत बरी । गंगातीरीं बैसावें ॥६३॥ स्वामी स्नानासि येतील त्वरित । ते समयीं पाहूनि एकांत ।

१ तूप. २ एकादशीस.

तयांसि आमंत्रण द्यावें निश्चितें । बहुत विनीत होऊनियां ॥ ६४ ॥ अवश्य म्हणोनि ते अवसरीं । येऊनि बैसला गंगातीरीं । श्रीनाथ पावले सत्वरी । मग नमस्कार करी सद्भावें ॥ ६५ ॥ देखोनि तयाची सप्रेम भक्ति । क्षणएक बैसले सहजस्थिती । तों अनामिक बोले निजप्रीतीं । म्हणे माझी विनंति एक असे ॥ ६६ ॥ परी हीन याति अधिकार नाहीं । यास्तव संकोच वाटतो जीवीं । भोजनासि यावें माझ्या गृहीं । म्हणोनि पायीं लागला ॥ ६७ ॥ यावरी श्रीनाथ काय बोलत । तूं तरी प्रेमळ वैष्णवभक्त । तुझा भावार्थ देखोनि निश्चित । श्रीकृष्णनाथ तुष्टला ॥ ६८ ॥ वेदशास्त्रीं निपुण ब्राह्मण । श्रीहरी भक्तीसि विमुख जाण । द्वादशगुणें अळंकृत पूर्ण । तरी अंत्यज वरिष्ठ त्याहूनि कीं ॥ ६९ ॥ यातीचा हीन असोनि निश्चित । परी तो देवासि मान्य बहुत । तो श्लोक बोलिले एकनाथ । महा भागवत जे म्हणती ॥१७०॥ श्लोक ॥ विप्राद्द्विषड्गुणयुतादरविंदनाभपादारविंद विमुखाश्वपचं वरिष्टं । मन्येत दर्पिमतनोवचने हितार्थ प्राणं पुनाति सततं नतुभूरिमानः ॥ १ ॥ ओव्या ॥ अनामिकासीं निश्चित । इतुका श्लोक बोलिला तेथ । तों सन्निध ब्राह्मण कोणी होते । क्रोधयुक्त ते झाले ॥ ७१ ॥ मग अवघे ब्राह्मण तये वेळीं । आले एकनाथाच्या जवळीं । गवगवा करोनि सकळीं । भक्तप्रेमळ वेष्टिला ॥ ७२ ॥ नाथासि द्विजवर काय बोलती । भागवत नव्हे हे केवळ श्रुती । त्यांतील श्लोक अनामिकाप्रती । कैशारीतीं सांगितला ॥ ७३ ॥ जें सिद्धांत ज्ञान अमोघ पाहीं । अंत्यजासि अधिकार नाहीं । ऐसें असतां ये समयीं । अनुचित कायी हें केलें ॥ ७४ ॥ आजि श्वानासि क्षिप्र वाढिलीजाण । गर्दभा आंगीं चर्चिला चंदन । कीं अंधळ्यासि दाविला दर्पण[२] । तैसेंचि कारण हें दिसे ॥ ७५ ॥ ब्राह्मण म्हणती एकनाथा । अंत्यजासि ज्ञान बोलिलासि आतां । हा महादोष पडिला तुझिया माथा । तरी प्रायश्चित आतां तुज होय ॥ ७६ ॥ ऐकोनि द्विजांचें उत्तर । श्रीनाथें जोडिले दोन्ही कर । ब्राह्मणांसि घालोनि नमस्कार । मधुरोत्तर बोलती ॥ ७७ ॥ म्हणती राण्यामहार वैष्णवभक्त । श्रीहरि भजनीं जाहला रत । षड्वैरी जिंतिले समस्त । तरी अंत्यज यातें म्हणो नये ॥ ७८ ॥ अनामिकाचें लक्षण पाहोनीं । एकही न दिसे याचे देहीं । भागवत धर्म बोलिले सर्वही । ते याचे ठायीं असती ॥ ७९ ॥ हा सिद्धांतज्ञानाचा अधिकारी । ऐसा निश्चय मज अंतरी । परब्रह्मरूप साक्षात्कारी । भक्तिभावें श्रीहरी वश्य केला ॥ १८० ॥ याचें आर्त देखोनि बहुत । किंचित् अन्वय बोलिलों येथें । हा अपराध क्षमा कीजे समर्थे । मग पुढती दंडवत घातलें ॥ ८१ ॥ यावरी ब्राह्मण काय बोलत । मोठा धीट तूं गळघट । अनधिकारियासि उपदेशिलें स्पष्ट । सत्कर्मीं भ्रष्ट होऊनी ॥ ८२ ॥ व्हावया दोषाचा परिहार । तूं प्रायश्चित्त न घेसील जर । तरी तुज घालूं बहिष्कार । सकळ द्विजवर बोलती ॥ ८३ ॥ श्रीनाथ परब्रह्म मूर्तिमंत । आग्रह न करीच किंचित । ब्राह्मण वचनासि मान देत । द्यावें प्रायश्चित म्हणतसे ॥ ८४ ॥ मग गंगेच्या डोहांत जावोनी । उभे राहिले तयेक्षणीं । गोमय भस्म आणोनि

१ विनम्र. २ आरसा.

ब्राह्मणीं । मंत्रोक्त वाणी बोलती ॥ ८५ ॥ हें अनामिकें देखिलें त्या अवसरा । मौनेंचि गेला आपुल्या घरां । स्वयंपाक करीत होती दारा । पतीसि सत्वरा ते पुसतसे ॥ ८६ ॥ श्रीनाथासि दीधलें आमंत्रण । ऐसें बोलता तिजकारणें । येरू देतसे प्रतिवचन । फुटकें प्राक्तन आपुलें ॥ ८७ ॥ मजसी बोलिले एकनाथ । यास्तव ब्राह्मण क्षोभले समस्त । गंगेत उभा करोनिया नाथ । तयासि प्रायश्चित्त देताती ॥८८॥ आपुला पूर्व जन्मींचा ठेवा । कोठोनि घडेल संतसेवा । कांता सद्गदित होऊनि तेव्हां । प्राण द्यावा म्हणतसे ॥८९॥ ऐसें म्हणोनि तयेक्षणीं । अंग टाकोनि दीधलें धरणीं । ढळढळां अश्रु वाहती नयनीं । भिजतसे मेदिनी त्या उदकें ॥१९०॥ ऐसी अवस्था देखोनि सत्वर । भ्रतार संबोखी निजकरें । म्हणे एकनाथ कृपेचा सागर । न करील अव्हेर दीनाचा ॥ ९१ ॥ मी एकदा तेथवर जाऊन । तयासि देतों आमंत्रण । न येतील जरी कासया जिणें । मग देऊं प्राण आपुला ॥ ९२ ॥ ऐसा निश्चय करोनि अंतरीं । मग सत्वर आला गंगातीरीं । नाथासि साष्टांग नमस्कार करी । म्हणे भोजनासि घरीं आजि यावें ॥ ९३ ॥ देखोनि तयाचा भावार्थ । लीला विग्रही एकनाथ । ब्राह्मण सन्निध असतां तेथ । अवश्य म्हणती त्यालागीं ॥ ९४ ॥ पाकनिष्पत्ति झालिया पाहीं । आम्हीं येऊं मध्यान्ह समयीं । अनामिक संतोष मानूनि जीवीं । आपुलें गृहीं तो आला ॥ ९५ ॥ ब्राह्मण बोलती परस्परें । यानें मांडिला भ्रष्टाकार । याचेनि योगे वर्णसंकर । होईल साचार आतांचि ॥ ९६ ॥ अनामिकांसि बोलतां मात । यास्तव दीधलें प्रायश्चित । आतां आमंत्रण घेऊनि भोजनासि जात । तरी कैसी मात करावी ॥ ९७ ॥ मग एकांतीं जाऊनि धरामर । परस्परें करिती विचार । आतां पाळती लावूनि साचार । समयावर धरावा ॥ ९८ ॥ तेव्हां विप्र मंडळी मिळोनि सर्वही । जपत बैसले ठायीं ठायीं । एकनाथाचें स्वरूप हृदयीं । अध्ययन तेहीं आरंभिलें ॥९९॥ कोणी विदींत उभे असती । कोणीं द्वारापासीं बैसती । कृतिम भाव धरोनि चित्तीं । गोष्टी बोलतीं परस्परें ॥२००॥ कोणी जप माळा धरोनि करी । जप करीत बैसले गंगातीरीं । कोणी अनामिकाचें घरीं । जाऊनि दारीं लपाले ॥ १ ॥ घरचें कामकाज टाकोनि सहज । त्या नादासि अवघे प्रवर्तले द्विज । परि हा विष्णु अवतार महाराज । चित्तीं उमज न पडेची ॥२॥ एकमेकांसि बोलती ब्राह्मण । नाथासि कळों न द्यावी खूण । अनामिक नेईल बोलावून । करितां भोजन धरावा ॥ ३ ॥ इकडे एकनाथ मंदिरीं । देवार्चन सांग जाहलियावरी । पुराण सांगती आपुलें घरीं । तों मध्यान्हासि तमारी पातला ॥ ४॥ ब्राह्मण अतीत अभ्यागत । उद्धव तयांचें पूजन करीत । तीर्थगंध करोनि समस्त । पात्रें विप्रासी वाढिलीं ॥ ५ ॥ इकडे अनामिकाचिये घरीं । पाक निष्पत्ति जाहलियावरी । कांता तयासी आज्ञा करी । नाथासि सत्वरी घेऊनिया ॥ ६ ॥ योगभ्रष्ट तो वैष्णव वीर । सारवोनि सोज्वळ केलें मंदिर । रांगोळी घालोनि ठेवितां सुंदर । आपुल्या निजकरें तेथवां ॥ ७ ॥ गंध अक्षता सुमनहार । साहित्य पूजा उपचार । चित्तीं उल्हास मानोनि थोर । वाट


१. पत्नी २ ब्राह्मण. ३ सूर्य.

सत्वर पाहतसे ॥ ८ ॥ इकडे अनामिक द्वारापासीं । येऊनि विनवी नाथासी । स्वामी चलावें भोजनासी । मग उत्तर तयासी काय देती ॥ ९ ॥ तुवां पुढें व्हावें सत्वर । आम्हीं मागोनि येतसों त्वरें । तों नेत्रकटाक्षें द्विजवर । खुणाविती एकमेकां ॥ २१० ॥ तों पांडुरंगें काय केलें । एकनाथाचें रूप धरिलें । अनामिकाचें घरीं प्रगटले । नवल वाटलें तयासी ॥ ११ ॥ कांतेसि म्हणे ते अवसरीं । श्रीनाथ आले घरीं । येरी संतोष मानूनि अंतरीं । नमस्कार करी सद्भावें ॥ १२ ॥ आयुष्यही नासि अमृतपान । तैसेंचि वाटलें तिजकारणें । बैसावयासि पाट देऊन । चरण प्रीतीनें धूतसे ॥ १३ ॥ सप्रेमभावें उठाउठी । अंगुष्ठ लाविले नेत्र संपुटीं । स्वहस्तें देऊनि चन्दनउटी । तुळसिहार कंठीं घातले ॥ १४ ॥ ललाटीं तिलक रेखिला सुंदर । बुका लाविला तयावर । तों ब्राह्मण बैसले होते हेर । त्यांणीं साचार देखिलें ॥ १५ ॥ कोणी बैसले त्या ठिकाणीं । कोणी धांवत आले सदनीं । मार्गींचे म्हणती कोणीकडोनी । चुकवोनी तो गेला ॥ १६ ॥ तों एक म्हणती द्विजवर । वेष पालटोनियां सत्वर । चुकवोनि गेला तस्कर । आम्हांसि विचार न कळतां ॥ १७ ॥ एक म्हणती दृष्टीबंधन । आपुल्या नेत्रांसि केलें त्याणें । प्रातःकाळापासोनि जाण । मार्ग रोधोनं बैसले ॥ १८ ॥ असो महारवाडियांत होते कोणी । ते गेले एकनाथाचें सदनीं । तो श्रीनाथ तेथें बैसले आसनीं । हातीं स्मरणी घेऊनियां ॥ १९ ॥ ऐसें देखोनि विपरीत । ब्राह्मण चित्तीं जाहले विस्मित । कोणी घरीं बैसले होते । तयांसि वृत्तांत जाणविला ॥ २२० ॥ म्हणती अघटित भ्रष्टाची नवायी । येथें तेथें दोहीं ठायीं । मग महारवाडियांत जाऊनि पाहीं । धांवत लवलाहीं एक गेले ॥ २१ ॥ तों तेथेंही बैसले पाटावर । घवघवीत पूजा उपचार । येरझारा करिती द्विजवर । तों दिसे साचार दों ठायीं ॥ २२ ॥ जैसें बिंब प्रतिबिंब दिसे । दोघांत भेद किंचित नसे । पांडुरंग आणि एकनाथास । द्वैत नसेचि सर्वथा ॥ २३ ॥ तीर्थ जळ नामें दोन । परी ऐक्यतेसि नसती भिन्न । कीं वासरमणी आणि प्रकाश जाण । निवडील कोण तयासी ॥ २४ ॥ नभीं नीळिमा जया रीतीं । पुष्पमकरंद एक असती । तेवीं एकनाथ आणि पांडुरंगमूर्ती । एकाचि आकृती जाणिजे ॥ २५ ॥ म्हणती येथें तेथें एकेसमयीं । कैसा दिसतो दों ठायीं । तृतीय प्रहरपर्यंत पाहीं । केल्यातीहीं येरझारा ॥ २६ ॥ परी उणापुरा कोठेंचि नसे । दोंठायीं बैसला असे । अनामिकें पूजूनि नाथास । पात्रीं अन्नास विस्तारिलें ॥ २७ ॥ नानापरीचीं पक्वान्नें । कांतां वाढीत निजप्रीतीनें । भोक्ता जनार्दन म्हणोन । अपोशन मग केलें ॥ २८ ॥ भावाचा भुकेला श्रीहरी । तृप्तीनें धाला ते अवसरीं । जें जें रुचे चित्तांतरीं । तें मागोनि पात्रीं घेतसे ॥ २९ ॥ असो यापरी जाहलें भोजन । मग करशुद्धि घालिती प्रीतीनें । विडा दीधला स्वहस्तें करून । मग समाधान वाटलें तयाला ॥ २३० ॥ प्रदक्षिणा करूनि उभयतां । साष्टांग नमस्कार घालिती नाथा । म्हणती आमुच्या पुरविलें आर्ता । धन्य समर्था जगद्गुरु ॥ ३१ ॥ आम्हीं भावहीन भक्तिहीन । मतिहीन

१ अडवून. २ सूर्य. ३ मधु. ४ स्त्री. ५ तृप्त झाला.

यातिहीन । आमुचें आर्त पुरवोनि जाण । केलें पावन संसारीं ॥ ३२ ॥ तयासि आश्वासूनि श्रीनाथें । मग अंतर्धान पावले त्वरित । उच्छिष्ट पात्रीं जें राहिलें होतें । स्त्रीपुरुष घेती प्रसाद तो ॥३३॥ ब्राह्मण विस्मित होऊनि अंतरीं । स्नानासि गेले गंगातीरीं । पुढती नाथाचें जाऊनि घरीं । नेत्रद्वारीं विलोकिती ॥ ३४ ॥ तों उद्धवासहित एकनाथा । भोजन करोनि बैसले तेथ । म्हणती या कर्मभ्रष्टाचा अंत । नकळे निश्चित आम्हांसी ॥ ३५ ॥ येरझारा करितां क्षीणलों पाहीं । परी एकाचि जाहला दोंठायीं । एक कुतर्क करूनि जीवीं । बोलती कायी ते आइका ॥ ३६ ॥ नाना सावरीमंत्रे शिकोन । झोटिंग वेताळ केला प्रसन्न । महद्भुतमध्यें उभे करून । अघटित विंदानं दाखविलें ॥ ३७ ॥ ऐसें बोलोनि त्या अवसरा । ब्राह्मण गेले आपुल्या घरां । महीपति संतांचा भाट खरा । सत्कीर्ति डांगोरा पिटितसे ॥ २३८ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । एकोणिसावा अध्याय गोड हा ॥ २३९ ॥ अध्याय । १८ ओ० ॥ २३९ ॥ श्लोक ॥ १ ॥

१ शाबरी मंत्र. २ चमत्कार.


अध्याय २०
श्रीखंड्या
एकनाथ
चोर

श्रीगणेशाय नमः । जय अनंतशायी श्रीहरी । मी याचकपणें तुझें द्वारीं । इच्छा धरिली अंतरीं । तें सांगतों अवधारी पांडुरंगा ॥ १ ॥ तुझे निज भक्त रुक्मिणीपती । त्यांची सर्वदा असावी संगती । हेचि आशा धरिली चित्तीं । तरी मनोरथ श्रीपती पुरवीं कां ॥ २ ॥ जे पंढरीस जाती वारकरी । मी पशु होईन त्यांच्या घरीं । मग पाठीवरी वाहोनि शिदोरी । तुझें द्वारीं आणितील ॥ ३ ॥ पंढरी क्षेत्रामाजी जाण । होईना सांडवा पाषाण । मग लागतील संताचें चरण । पवित्रपणें हो काय ॥ ४ ॥ जरी मग घालिसी मनुष्य देहीं । तरी पिसेंपण करूनि ठेवीं । तेणेंचि निर्विघ्न सर्वदाही । चरण जीवीं आठवीन ॥ ५ ॥ नको ज्ञान व्युत्पन्नता । नको लोकीं देऊं मान्यता । तुझे ठायीं वाटेल ममता । हें पंढरीनाथा मज द्यावें ॥ ६ ॥ अभेद भक्त जे प्रिय तुज । त्यांचीं चरित्रें आवडती मज । तरी आठवण देऊनि गरुडध्वज । चित्तीं उमज पाडावा ॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा लाघव । अनामिकाचा सप्रेम भाव । त्याचें घरीं जेविला देव । परी विप्रांसी मात्र कळेना ॥ ८ ॥ एकनाथ लीलावतारी । चरित्रें दाखवीत नानापरी । आणि ब्राह्मणीं कुर्तक काढिला अंतरीं । म्हणती मंत्र सावरी शीकला ॥ ९ ॥ महाद्भुत प्रसन्न करोनि त्याणे । एका रूपाची दाखविलीं दोन । आम्हांसि लटिके पाडिले त्याणें । धरावया ठिकाण एक नाहीं ॥ १० ॥ यावरी प्रतिष्ठान नगरांत जाण । एक गृहस्थ भाविक पूर्ण । स्नानसंध्या सूचिर्भूत जाण । सत्कर्माचरण करीतसे ॥ ११ ॥ पूर्व प्रारब्धें करोनि त्यास । सांपडला होता एक परीस । तेणें संतोष होऊनि मानस । सर्व संपत्ती भोगीतसे ॥ १२ ॥ सर्व साहित्य अनुकूल सुखी । ऐसा न दिसेचि ये लोकीं । एकमेकांचे देखो देखीं । सावध विवेकी होतसे ॥ १३ ॥ कित्येक दिवस लोटतां जाण । तो पुत्र कांता गेलीं मरोन । तेणें उदास जाहलें मन । न पडे चैन सर्वथा ॥ १४ ॥ जेथें खावया नसे अन्न । ते स्थळीं बहु संतान । एकीं नवस करितां प्रयत्न । रोगिष्टतान्हें मग होय ॥ १५ ॥ कांता सुंदर मिळाली जर । तरी भ्रतार होतसे हिणवर । कोणी तरुण पुरुष थोर । तरी पत्नी मरे तयाची ॥ १६ ॥ पुत्र कांता संपत्ति धन । तरी शरीरीं रोग वाढे दारुण । उदारापासी न मिळे धन । संपत्तिवान कृपण बहू ॥ १७ ॥ शरीर सुंदर लाधले जर । तरी अल्पायुषी असे तो नर । स्वधर्मी राजा तो साचार । दिवस फार वांचेना ॥ १८ ॥ दान द्यावयाची इच्छा मानसीं । तरी सत्पात्र सुशील नाढळेचि त्यासी । कर्माची गति विचित्र ऐसी । अनुभव सर्वांसी विदित ॥ १९ ॥ द्वैत प्रारब्धें करोनि निश्चितीं । परीस लाधला गृहस्थाप्रती । तो कांता परिवार निमोनि जाती । खेद चित्तीं बहु जाहला ॥ २० ॥ देखोनि संसार विटंबना । उदास वाटले त्याच्या मना । म्हणे आतां जावें तीर्थाटणा । ऐसी वासना धरियेली ॥ २१ ॥ मग चित्तीं विचार करीतसे पाहीं ॥ परीस ठेवावा कवणे ठायीं । विश्वासुक कोणी दिसत नाहीं । मग नाथाचें गृहीं तो आला ॥ २२ ॥ एकांतसमय पाहोनि जाण । सद्भावें साष्टांग केलें नमन । म्हणे महायात्रेसि जावया कारणें । हेत निज मनीं धरियेला ॥ २३ ॥ अमूल्य वस्तु मजपाशीं । जतन

कोण करील तिसीं । तुम्ही सद्भक्त तपोराशी । एक विश्वासी दिसतसां ॥ २४ ॥ ऐसें वचन ऐकोनि पाहे । श्रीनाथ उत्तर देत काय । जे स्थळीं विश्वास तुमचा आहे । तेथेंचि लवलाहें ठेविजे ॥ २५ ॥ ऐसें अभय होतांचि निश्चितीं । गृहस्थें परीस दीधला हातीं । देखूनि आश्चर्य वाटलें चित्तीं । मग काय बोलती त्याजलागीं ॥ २६ ॥ हा तरी पाषाण दिसताहे । आणि अमूल्य वस्तु म्हणता हे । या माजी सद्गुण असे काय । तरी तो लवलाहें सांगिजे ॥ २७ ॥ गृहस्थें लोखंड घेऊनि हातीं । तत्काळ लाविलें तया प्रती । तंव ते कांचनं जाहलें सत्वरगती । म्हणे परीस निश्चितीं हा असे ॥ २८ ॥ महायात्रेहूनि आलिया सहज । मागुतीं द्यावा माझा मज । तुम्हां प्रसन्न गरुडध्वज । नसेचि कार्ज पैं याचें ॥ २९ ॥ मग सिंहासनाखालीं निश्चित । श्रीनाथें परीस टाकिला हातें । मग नमस्कार करूनि निश्चित । गेला त्वरित यात्रेसी ॥ ३० ॥ अमुल्य परीस ठेवावा जतन । हें एकनाथासि नाहीं स्मरण । जैसा सागरावरी वर्षला घन । तरी चाड कोण तयासि ॥ ३१ ॥ ना तरीं सतेज परिपूर्ण गभस्ती । तो दृष्टीस न पाहे दीपकज्योती । जयासि अमृत लाधलें हातीं । मग तो वनस्पति न पाहे ॥ ३२ ॥ तेवीं प्राप्त पुरुष एकनाथ जाण । तयासि सारिखें सोनें शेण । परीस ठेवावा करूनि जतन । चित्तीं स्मरण हें नसे ॥ ३३ ॥ एक संवत्सरें लोटतां जाण । गृहस्थ आला यात्रा करून । आधीं श्रीनाथासि करूनि नमन । निज प्रीतीनें भेटला ॥ ३४ ॥ यात्रा जाहली यथास्थित । पुसिला सकळ वृत्तांत । न भागता देतील वस्तूतें । ऐसें चित्तांत तयाच्या ॥ ३५ ॥ ऐसें संकल्पोनि द्विजवर । निवांत बैसला घटिका चार । परी श्रीनाथासि अणुमात्र । स्मरण साचार नसेची ॥ ३६ ॥ गृहस्थ म्हणे आपुलें मनीं । प्रथम भेट आजिचे दिनीं । यास्तव अनमान केला यांनीं । तरी उदयीक येऊन पाहावें ॥ ३७ ॥ ऐसें म्हणोनि त्या अवसरा । ब्राह्मण गेला आपुल्या घरां । परी चैन न पडे त्याचिया अंतरां । म्हणे परिणाम बरा दिसेना ॥ ३८ ॥ निष्काम वीतरागी देखोनियां । वास्तव वस्तु दीधली तया । परतोनि माझी मज द्यावया । अनमान कासया करितसे ॥ ३९ ॥ ऐसी कल्पना आणोनि चित्तीं । तळमळ करीत अहोरात्रीं । मग उदया येतांचि गभस्ती । प्रातःस्नान निश्चितीं सारिलें ॥ ४० ॥ श्रीनाथ करितां देवतार्चन । येऊनि तयांसि केलें नमन । पुसिलें तयासि आद्यंत वर्तमान । तितुकें निवेदन करितसे ॥ ४१ ॥ परी परीस द्यावा ऐसी मात । कदापि न करी एकनाथ । गृहस्थ निर्भीड होऊनि त्वरित । आठव तयां दीधला ॥ ४२ ॥ तेव्हां श्रीनाथासि जाहलें स्मरण । पुसती ठेविला तो ठिकाण । सिंहासना खालीं म्हणवून । स्वहस्तें करून दाखवी ॥ ४३ ॥ उभयतां धुंडिती सायासें । परी परिस गोटा तेथें नसे । निर्माल्य सांचविती पंधरा दिवस । मग हरिदिनीस टाकिती ॥ ४४ ॥ एकनाथ म्हणती ब्राह्मणास । निर्माल्य सारितां गेला परीस । ऐकोनि नाथाच्या वचनास । धकधक चित्तांस लागली ॥ ४५ ॥ म्हणे परीसाची आशा धरोनि जाण । घरासि मी आलों परतोन ।

१ सोनें. २ काम. ३ ईश्वराची प्राप्ती झालेला. ४ वर्ष.

दारापुत्र नव्हतें बंधन । व्याकुळ मन होतसे ॥ ४६ ॥ तयासवें घेऊनि त्वरित । श्रीनाथ गेले गंगेत । परीस पडिला असेल तेथें । चला त्वरित पाहूं आतां ॥ ४७ ॥ श्रीनाथ तयासि आश्वासित । म्हणती निर्माल्य टाकिला गंगेंत । मग उभे ठाकूनि उदकांत । खडे पांच सात उचलिले ॥ ४८ ॥ गृहस्थासि म्हणती ते समयीं । आपुला परीस वोळखूनि घेयी । लोहाचे कुटके त्याचे संग्रहीं । ते लावूनि ते समयीं पाहतसे ॥ ४९ ॥ तो तितुके गोटे जाहले परीस । विस्मय वाटला मनास । इतुकेही असावे आपणास । चित्तीं अभिलाष वरियेला ॥ ५० ॥ श्रीनाथ आज्ञापिती तयास । वोळखून एक घेई परीस । वरकड अर्पितों गंगेस । जतन होतसे तया ठायीं ॥ ५१ ॥ गृहस्थें एक घेतला त्यांतून । वरकड गंगेंत दीधले टाकून । मग नाथें करोनि स्नान । आले परतोन मंदिरां ॥ ५२ ॥ श्रीनाथ ऐश्वर्य वाणितां प्रीती । कुंठित होतसे कवीची मती । तेथें श्रुति वदल्या नेति नेती । मशक महीपती काय तेथें ॥५३॥ करावयासि विश्वोद्धार । श्रीविष्णूनें घेतला अवतार । लोक संग्रहार्थ साचार । सत्कर्म आचरे निजनिष्ठा ॥ ५४ ॥ पंचपंच उषःकाळीं उठोनि जाण । शौच विधि मुखमार्जन । मग गंगातीरी करोनि स्नान । देत अर्घ्यदान सूर्यासी ॥ ५५ ॥ नित्य नेम सारोनि निश्चित्तीं । अर्चनीं पूजीत पांडुरंग मूर्ती । धूपदीप एकारती । मंगळ आरती होतसे ॥५६॥ यावरी पुराण श्रवण । अर्थ अन्वयार्थ बोलणें । गंगेंसि जाऊनि पितृतर्पण । निजप्रीतीनें करितसे ॥ ५७ ॥ घरीं सदावर्त असे निश्चित । ब्राह्मण पूजनीं अत्यंत प्रीत । आवडीनें तीर्थ प्राशन करीत । संतोष चित्तीं मग होय ॥ ५८ ॥ ब्राह्मण भोजन झालिया जाण । युक्त आहार सेविती आपण । भागवतीं टीका श्रीधरी जाण । चतुर्थ प्रहरीं आपण वाचिती ॥ ५९ ॥ अस्तमानासि जातां गभस्ती । मग गंगेसि जाऊनि संध्या करिती । मग येऊनि सदनाप्रती । धूपारती होतसे ॥६०॥ टाळविणे मृदंग सुस्वर । रात्रीं होतसे कीर्तन गजर । भाविक लोक येऊनि फार । श्रवणासि सादर बैसती ॥ ६१ ॥ रामकृष्णादि चरित्रें अनेक । स्वमुखें वर्णीतसे प्रेमसुख । आबालवृद्ध जे कां भाविक । स्वानंद सुखें डोलती ॥ ६२ ॥ यथाविधि अर्चन पूजन । रात्रीं होतसे हरि कीर्तन । सर्वकाळ नामस्मरण । तेणें जगज्जीवन संतुष्टला ॥ ६३ ॥ एकनाथाची देखोनि सेवा । अतिभार पडला देवाधिदेवा । म्हणे याचें उत्तीर्ण होई न केव्हां । आवडी केशवा हे बहू ॥ ६४ ॥ मग ब्राह्मणाचें रूप धरोनि कृष्ण । सत्वर चालिला द्वारकेहून । मग पावले प्रतिष्ठान । केलें स्नान गंगातीरीं ॥ ६५ ॥ मग एका जनार्दनाचें घरीं । जाऊनि राहिले उभे हरी । सद्भावें तयासि नमस्कारी । म्हणे सेवेसि निर्धारीं मी आलों ॥ ६६ ॥ विष्णुअर्चन ब्राह्मणसेवा । तूं करितोसि भक्ति वैष्णवा । तुझा समागम अखंड व्हावा । आवडी जीवा हे बहुत ॥ ६७ ॥ मी संतांचें दास्यत्व जन्मापासून । करीत असे निज प्रीतीनें । कांहीं न मागेंचि वेतन । पोटभर अन्न इच्छितसें ॥ ६८ ॥ घोंगडें वस्त्र उदर प्रवृत्ती । यावीण इच्छा नसे चित्तीं । सर्वकाळ असावी सत्संगती । ऐसें श्रीपती बोलिले ॥ ६९ ॥ परी

ईश्वरीं माया अनिवार । एकनाथ नोळखे इंदिरावर । म्हणती तुमचें कोणतें नगर । कुटुंब परिवार काय असे ॥ ७० ॥ कोणती शाखा तुमची जाण । काय देहासि नामाभिधान । एकानाथाचा ऐकोनि प्रश्न । जगज्जीवन काय म्हणे ॥ ७१ ॥ माझा मीच एकला असें । दारापुत्रं नाहींच पाश । कृष्ण श्रीखंड्यानाम देहास । सर्वत्र देश धुंडितों ॥ ७२ ॥ ऋग्वेदी ब्राह्मण मी निश्चिती । चित्त रमलें तेथेंचि वस्ती । तुझे सेवेची धरिली आर्ती । रुक्मिणीपती म्हणतसे ॥७३॥ यावरी एकनाथ काय बोलत । तुमचे सेवेची नसेचि आर्त । अन्नवस्त्र सेवूनि येथ । सुखें परमार्थ साधावा ॥ ७४ ॥ ऐकूनि नाथाची अमृतवाणी । काय म्हणतसे कैवल्यदानी । कष्टार्जित अन्न सेवूनी । तुमचें सदनीं राहतों ॥ ७५ ॥ तुमचे कृपेनें निश्चित । शरीरीं आहे बहुत शक्त[2] । संतसेवा घडावी आम्हांतें । ऐसा हेत चित्तांतरीं ॥ ७६ ॥ उगाचि बैसोनि जेविलों जर । तें हें देह नश्वर । कांहीं घडावा परोपकार । सार्थक थोर होय तेणें ॥ ७७ ॥ ऐसें म्हणोनि लवड सवडी । खांद्यावरी घेतली कावडी । गंगोदक भरोनि तांतडी । रांजण वाढी जगदात्मा ॥ ७८ ॥ जो कां ब्रह्मादिकांसि पूज्यमान । शिवादिक वंदिती ज्याचे चरण । तो लीला नाटकी जगज्जीवन । ब्राह्मण जन झाला कीं ॥ ७९ ॥ ज्याची कीर्ति वर्णितां चोखडी । श्रुति पुराणें जाहलीं वेडीं । तो ब्राह्मणांचीं उच्छिष्टें सावडी । अभिनव गोडी सेवेची ॥ ८० ॥ क्षीरसागरीं प्रभाकर बेट । तेथें शेषशयनी वैकुंठपेठ । तो प्रातःकाळ होतांचि उठे । देहासि कष्ट न मानितां ॥ ८१ ॥ अष्टांग योग साधूनि जाण । योगी शिणती जया कारणें । तों देवपूजेचीं उपकरणें । सोज्ज्वळ उठोन ठेवीतसे ॥ ८२ ॥ सांवळा सुकुमार रुक्मिणीकांत । सायुज्यदानी जगविख्यात । तो पडलें काम निजांगें करित । आनंदयुक्त ते समयीं ॥८३॥ ज्याच्या चरणापासूनि निश्चिती । प्रगट झाली भागीरथी । तो देवपूजेसि अग्रोदक प्रीतीं । भरोनि श्रीपती ठेवितसे ॥ ८४ ॥ अठ्यायशीं सहस्र ऋषिजाण । सद्भावें ज्याचें करिती अर्चन । तो साहणेवरी उगाळीत चंदन । संपुष्ट भरोन ठेवितसे ॥ ८५ ॥ लक्ष्मीसहित अहर्निशी । अष्टसिद्धी ज्याच्या दासी । तो हार गुंफोनि हृषीकेशी । देवपूजेसी ठेवितसे ॥ ८६ ॥ चंद्र सूर्य नक्षत्रराज । ज्याच्यायोगें तेजःपुंज । तो दीपक सरसावी अधोक्षज । परी मनांत न लाजे सर्वथा ॥ ८७ ॥ कृष्णा म्हणोनि हाका मारितां । पुढें सादर दिसे अवचितां । कोठेंही अंतर न पडे सर्वथा । सावधानता सर्वकाळ ॥ ८८ ॥ चंदन देत उगाळून । यास्तव म्हणती श्रीखंड्या ब्राह्मण । नगरवासी सकळजन । आश्चर्य मनें करिताती ॥ ८९ ॥ म्हणती एकनाथाचें घरीं । एक ब्राह्मण करितो चाकरी । कांहीं वेतन न घेतां पदरीं । अवघी भराभरी करीतसे ॥ ९० ॥ एकनाथासि न कळत । मंदिरांत जाती द्वारकानाथ । कांतेसि धंदा करूं लागत । उल्हासयुक्त निजप्रीतीं ॥ ९१ ॥ भक्तिभावें भुलला घननीळ । आपुलें ऐश्वर्य विसरोनि सकळ । एकनाथाच्या संमुख जवळ । दीनदयाळ तिष्ठतसे ॥ ९२ ॥ ऐशी रीतीं जगन्नाथें । द्वादश वर्षे क्रमिलीं तेथें । तो नवल वर्तलें

१ स्त्री पुत्र. २ शक्ती.

अद्भुत । तें परिसा निजभक्त भाविकहो ॥ ९३ ॥ द्वारकेमाजी एक ब्राह्मण । अनुष्ठानीं बैसला निज प्रीतीनें । सर्वदा करीत नाम स्मरण । साक्षात् दर्शन व्हावया ॥ ९४ ॥ द्वादश वर्षें लोटलीं ऐसीं । परी साक्षात्कार नव्हेचि त्यासी । मग काय करित एके दिवसीं । निर्वाण उपवासी राहिला ॥ ९५ ॥ मग स्वप्नीं येऊनि माता रुक्मिणी । तयासि सांगे वर्तमान । तुवां व्रत मांडिलें निर्वाण । परी नसेचि कृष्ण याठायीं ॥ ९६ ॥ प्रतिष्ठान नगरांत निश्चित । एकनाथनामें अभेद भक्त । ते स्थळीं जाऊनि वैकुंठनाथ । सेवा करित तयाची ॥ ९७ ॥ कृष्ण श्रीखंड्या चक्रपाणी । होऊनि कावडीनें वाहातसे पाणी । गंधही देतसे उगाळूनी । ब्राह्मण सेवनीं सादर ॥ ९८ ॥ तरी तुवां प्रतिष्ठानासि जावें त्वरित । तेथें भेटेल श्रीकृष्णनाथ । ऐसा देखोनि दृष्टांत । ब्राह्मण जागृत जाहला ॥९९॥ चित्तीं विचारोनि आपण । म्हणे रखुमाईनें सांगीतली खूण । मग प्रतिष्ठानासि येऊनि त्वरेनें । गंगास्नान पै केलें ॥१००॥ तों कावडी धेऊनि खांद्यावरी । श्रीखंड्या पातला गोदातीरीं । त्याणें ब्राह्मणासि वोळखिलें सत्वरी । म्हणे हा ऋणकरी कां आला ॥१॥ मी आपणा योग्य योजूनि स्थळ । सुखें कंठीत होतों काळ । रुक्मिणीनें बोभाट केला सकळ । यासि तत्काळ पाठविलें ॥ २ ॥ ऐसें म्हणोनि द्वारकापती । परम संकोचलें चित्तीं । मग घागरी भरोनि सत्वरगती । सदनाप्रती गेले ॥३॥ जावोनियां देवघरांत । बैसले गंध उगाळित । तों ब्राह्मण घर पुसत पुसत । आला वाडियांत नाथाच्या ॥ ४ ॥ श्रीनाथें देखोनि द्विजवर । सद्भावें केला नमस्कार । आलिंगन देवोनि परस्परें । भेटले साचार ते समयीं ॥ ५ ॥ बैसावयासि देऊनि आसन । नाथें पुसिलें वर्तमान । कोठूनि जाहलें जी आगमन । उद्योग कोण तो सांगा ॥ ६ ॥ ब्राह्मणें नमस्कार करोनि प्रीतीं । वृत्तांत निवेदीत तयाप्रती । म्हणे मी द्वारकेसि जाऊनि निश्चिती । श्रीकृष्ण मूर्ती आराधिली ॥ ७ ॥ साक्षात व्हावें सगुण दर्शन । यास्तव ते स्थळीं केलें अनुष्ठान । तों रुक्मिणीनें दाखविलें स्वप्न । कीं गेला श्रीकृष्ण पैठणीं ॥ ८ ॥ तेथें एकनाथ प्रेमळ भक्त । त्याचें घरीं सेवा करीत । ऐसा देखोनि दृष्टांत । आलों त्वरित या ठायीं ॥ ९ ॥ त्याचें दर्शन करावें सत्वर । म्हणोनि लोटला चरणावर । श्रीनाथाचें विस्मित अंतर । मग काय उत्तर बोलती ॥११०॥ अणुरेणुपर्यंत जाण । सदोदित व्यापक असे कृष्ण । रितें स्थळ त्याज वांचोन । असे कोण तें सांग ॥११॥ ब्राह्मण म्हणे एकनाथा । ब्रह्मज्ञान नावडे सर्वथा । कृष्ण श्रीखंड्या ब्राह्मण तत्वतां । मजला आता दाखवीं ॥ १२ ॥ तुझा प्रेमा भक्त वैष्णवा । जाणोनि अतिभार पडिला देवा । बारा वरुषें करितसे सेवा । पार दैवा नसेची ॥ १३ ॥ ऐकोनि ब्राह्मणाचें वचन । एकनाथाचें विस्मित मन । मग उद्धवासि म्हणती प्रीतीनें । कृष्ण ब्राह्मणा पाचारीं ॥ १४ ॥ हांका मारितां ते अवसरीं । होते देवाघरांत होते श्रीहरी । तत्काळ चतुर्भुज रूप धरीं । शंखचक्र करीं मंडित ॥ १५ ॥ देदीप्यमान मुगुट घातला जाणा । तेजासि भास्कर[1] दिसे उणा । सावळा सुंदर वैकुंठराणा । पाहतांचि मना विश्रांतीं

१ सूर्य.

॥ १६ ॥ दिव्य कुंडलें कानीं तळपती । कंठीं कौस्तुभ वैजयंती । पीतांबराची सतेज दीप्ती । पाहतां झांकती नेत्रपाती ॥ १७॥ पायीं नेपुरें वांकी तोडर । गंधानें माखलें असती दोन्हीं कर । देवद्वारीं उभा जगदीश्वर । देखतांचि द्विजवर धावला ॥१८॥ तत्वर मिठी घालूनि पायीं । प्रेमें भेटला लवलाहीं । एकनाथासि अनुताप जीवीं । म्हणे शेषशायीं कष्टविला ॥१९॥ देवासि देऊनि आलिंगन । म्हणे श्रीहरि हें उचित कोण । निजांगे होऊनि ब्राह्मण ॥ कष्ट संपूर्ण त्वां केलें ॥१२०॥ तुझा महिमा वर्णितां देवा । निजांगे श्रमला चक्षुःश्रवा । ठक पडिले कमळोद्भवा । अमुचा केवा तो किती ॥ २१ ॥ तूं पतितपावन पाहीं । तोडर वांधिला असे पायीं । तें असत्य न व्हावें कल्पांतीही । अनुभव जीवीं मज आला ॥२२॥ ऐसी एकनानाथें करोनि स्तुति । नमस्कारित पुढतपुढती । तंव नाथासि म्हणे रुक्मिणीपती । धन्य सद्भक्ती पैं तुझी ॥ २३ ॥ मागे विठ्ठलरूप धरोनि निश्चित । द्वादश वर्षे धरिले ध्रुपद । मग केशवरूपें श्रवण भागवत । केलें समस्त तुझीया मुखें ॥ २४ ॥ ऐसीं चोवीस वर्षे निश्चित । आम्हीं मागे कंठिली येथ । परी तें तुजला नव्हते श्रुत । ऐसे बोलत जगदात्मा ॥ २५ ॥ एकनाथ म्हणे जगज्जीवना । विश्वव्यापका भक्तभूषणा । तुझें कर्तृत्व मनमोहना । विरंचीसि[१] खुणा न कळती ॥२६॥ इतुका संवाद होतां सत्वरी । अंतर्धान पावले श्रीहरी । ब्राह्मण नाथाचे चरण धरी । म्हणे धन्य संसारीं तूं एक ॥ २७ ॥ तों नाथा म्हणती विप्राकारणें । जवळ साक्षात असतां कृष्ण । आम्हीं नोळखूं त्याजलागून । आजि साक्षात दर्शन त्वां केलें ॥ २८ ॥ तपस्वी आनंदयुक्त मनें । नाथपंक्तीसि करी भोजन । कित्येक दिवस तेथें । श्रीहरि कीर्तन ऐकतसे ॥ २९ ॥ विष्णु अर्चन पुराण श्रवण । नित्य घडतसे गंगास्नान । श्रीनाथ साक्षात कृष्ण । सद्भावपूर्ण वाणला ॥ १३० ॥ आणिक चरित्र रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । एकदां करितां कीर्तन । श्रोते सज्जन पातले ॥३१॥ बहुत मिळाले नारीनर । वाडियांत दाटी जाहली फार । नामस्मरणें करिताति गजर । नादें अंबर कोंदले ॥ ३२ ॥ जयजयकारें पिटिली टाळी । आनंदली भक्त मंडळी । गुप्तरूपें तये केलीं । सुरवर निराळीं पातले ॥ ३३ ॥ कृष्णा विष्णु मेघश्यामा । अच्युता अनंता पुरुषोत्तमा । बळि बंधना त्रिविक्रमा । विजयी राम रघुपती ॥ ३४ ॥ ऐसी नामें प्रेमभरीत । एकनाथ कीर्तनीं उच्चारित । वायुरूपीं जडलें चित्त । देहभान किंचित असेना ॥ ३५ ॥ ऐशा कीर्तनीं साचार । येऊनि बैसले चौघे तस्कर[२] । म्हणती मनुष्य उठोंनि गेलियावर । मग आपुला व्यवहार करावा ॥ ३६ ॥ ऐसी त्यांची कृत्रिम बुद्धी । कोणासि नकळेचि त्रिशुद्धी । कीर्तन समाप्तीची अवधी । तेव्हां दुर्बुद्धी लपालें ॥ ३७ ॥ तेव्हां उजळोनि मंगळ आरती । ओवाळिला श्रीरुक्मीणीपती । श्रोतयांसि वांटिल्या खिरापती । मग ते जाती स्वगृहा ॥ ३८ ॥ भिंतीआड लपोनि तस्करं । उगेचि बैसले घटिका चार । उद्धवें आडकोनि महाद्वार । निद्रा सत्वर मग केली ॥ ३९ ॥ श्रीनाथ बैसोनि सहजासनीं । हातीं धेतली असे स्मरणी । निद्रा आळस नयेचि


१ ब्रह्मदेवास. २ चोर.

मनी । स्वानंद जीवनी तृप्त सदा ॥ १४० ॥ उद्धव आणि गिरिजाबायी । निद्रित जाहलीं ते समयीं । तस्कर शिरोनि मजगृही । वस्तु लवलाही विलोकिती ॥४१॥ कौतुक करी पंढरीनाथ । श्रोते परिसोत भाग्यवंत । तस्कर आंधळे जाहलें समस्त । नेत्रीं किंचित दिसेना ॥ ४२ ॥ दीपक जळतो मंदिरांत । परी तयासि अणुमात्र न दिसे तेथें । एकमेकांसि गुजगुज करित । कैसी परी आतां करावी ॥ ४३ ॥ द्वार उंबरा न कळे पायरी । खाट आदळती मस्तकावरी । म्हणती हे विपरीत जाहली परी । क्षोभ ईश्वरी दिसतसे ॥ ४४ ॥ पश्चात्ताप जाहला चित्तांत । म्हणती एकनाथ हा विष्णुभक्त । येथें चोरीस आलों निश्चित । यास्तव घात जाहला ॥ ४५ ॥ संसार व्यर्थ नेत्राविण । आतां तत्काळ द्यावा प्राण । विष्णुदासाचें करिता छळण । रुक्मिणीरमण क्षोभला ॥ ४६ ॥ ऐसें बोलोनि परस्परें । वाडियात फिरत असती चोर । तों अकस्मात लागले देवघर । नाथासमोर मग आले ॥ ४७ ॥ तेव्हांही जाहला चमत्कार । तस्करांचे आले मागुती नेत्र । पश्चात्ताप जाहला थोर । सद्भावें नमस्कार घालिती ॥ ४८ ॥ श्रीनाथदर्शनाचेनि गुणें । दुर्बुद्धि गेलीं देहांतून । मग हात जोडुनि चौघेजण । करिती स्तवन निजप्रीतीं ॥ ४९ ॥ तूं साक्षात पांडुरंग मूर्ती । ऐसें नेणोनि आम्ही दुर्मती । छळणेसि पातलों सत्वर गती । हा अपराध संगती क्षमा कीजे ॥१५०॥ एकनाथ म्हणती तुम्ही कोण । कशास्तव करितां स्तवन । कोणती इच्छा असेल मनें । तेंही कारण सांगिजे ॥ ५१ ॥ ते म्हणती आम्ही तस्कर[1] । चोरीस पातलों साचार । वस्तु धुंडूनि पाहतां सत्वर । तो नेत्रीं अणुमात्र दिसेना ॥ ५२ ॥ वेडे होऊनियां समस्त । फिरलों अवघिया वाडियांत । महादोष घडला निश्चित । म्हणोनि प्रचीत हे आली ॥ ५३ ॥ ऐशा रीतीं वदतां तस्कर । ऐकोनि शांति दयासागर । द्रवलें नाथाचें निज अंतर । म्हणती श्रम थोर तुम्हां झाले ॥ ५४ ॥ आशावंत होऊनि मनीं । येथें आलेति आमुचें सदनीं । विमुख न जावें ये क्षणीं । म्हणवोनि विनवणी करीतसे ॥५५॥ मग भांडारगृहीं नेऊनियां । सकळ वस्तु दाखविल्या तयां । म्हणे जें मानेल चित्तां तुमचिया । तेंचि लवलाह्या नेयिजे ॥ ५६ ॥ आपुलें सत्कर्म आचरतां पाहीं । तुम्हांसि दोष सर्वथा नाहीं । शांति क्षमा धरोनि जीवीं । हें विहित सर्वही आमुचें ॥ ५७ ॥ देखोनि श्रीनाथाची शांती । तस्करांसि बोध ठसावा चित्तीं । वस्तूंसि अभिलाष न करिती । प्रसाद इच्छिती उदरार्थ ॥ ५८ ॥ मग उद्धव आणि गिरिजाबायी । जागृत केलीं ते समयीं । म्हणती पाक निष्पत्ति लवलाहीं । येचि समयीं करा आतां ॥५९॥ आज्ञा करितांचि एकनाथ । स्वयंपाक करिती अति त्वरित । तस्करांसि वाढोनि आपुल्या हातें । आवडीं जेवविंत निजप्रीतीं ॥ १६० ॥ जैसे संसारिक लोक पाहीं । आदरें पूजिती व्याही जांवयी । तैसेंचि तस्कर मानूनि जीवीं । आग्रहें तिहीं जेवविले ॥ ६१ ॥ विडे करोनि हातें आपुल्या । तयासि दीधले एकनाथें । मग तयांसि बोळविलें त्वरित । सन्मानीत हातें आपुल्या ॥६२॥ चोरी कर्म तें पासुनी । टाकूनि दीधलें तस्करांनीं ।

[1] चोर.

परम सद्भाव धरोनि मनीं । श्रीहरि भजनीं लागले ॥ ६३ ॥ श्रीनाथाची ऐसी स्थित । विश्वचि मानी आत्मवत । शत्रु मित्र समसमान भावित । करणी अद्भुत निरुपम ॥ ६४ ॥ जो बोलण्यासारिखें चाले नर । तो साक्षात् ईश्वरी अवतार । त्याचेनि दर्शनें साचार । होय उद्धार जीवासी ॥ ६५ ॥ श्रवणीं ऐकतां सत्कीर्ती । महा दोष विलया जाती । तयासि होय सायुज्य मुक्ती । पुनरावृत्ती असेना ॥ ६६ ॥ धन्य प्रतिष्ठान क्षेत्र निश्चित । जे स्थळीं अवतार घेतला एकनाथें । सभाग्य लोक तेथ निश्चित । चरित्रें पाहतीं दृष्टीसीं ॥ ६७ ॥ कोणीएक अत्यंज निर्द्धारीं । उदरार्थ करीत होता चोरी । बहुत दिवस लोटलियावरी । एक्या अवसरीं धरियेला ॥ ६८ ॥ घरधणीयानें बोडूनि त्वरित । तयासि नेलें दिवाणात । मारहाण करोनि बहुत । मग तो खोड्यांत घातला ॥ ६९ ॥ द्रव्य देऊनि नागवण । तयासि सोडविता नसे आन । कित्येक दिवस लोटले जाण । खावयासि अन्न मिळेना ॥ १७० ॥ यास्तव शरीर जाहलें क्षिण । काष्ठवत दिसे लोकांकारणें । दों चौ दिवसा जाईल प्राण । यास्तव बंदिवान सोडिला ॥ ७१ ॥ खीळ काढूनि सुतारा हातीं । तयासि मुक्त केलें निश्चिती । पळोनि जावया नाहीं शक्ती । कोणी न रक्षिती यास्तव ॥ ७२ ॥ तंव रात्रि समयाच्या अवसरीं । अनामिक चित्तीं विचार करी । खोडा तुटला आहे जोंवरी । तों जावें लवकरी येथूनियां ॥ ७३ ॥ शरीरीं चालावया शक्ती नाहीं । कैसें पळावें ये समयीं । देवाचें स्मरण आठविलें जीवीं । म्हणे येथूनि सोडवीं दयाळा ॥ ७४ ॥ मी अनाथ अपराधी केवळ । बंदी पडिलों बहुतकाळ । तूं आपले कृपेनें घननीळ । काढीं तत्काळ येथूनियां ॥ ७५ ॥ ऐसेंचि चिंतन करितां मनीं । तो कीर्तन गजराची ऐकिली ध्वनी । मग खुरडत चालिला तये क्षणीं । भय वागवोनि जीवाचें ॥ ७६ ॥ हरि कीर्तनाचा ऐकोनि गजर । लोटत जातसे त्या सुमारें । तों एकनाथाचें मुक्तद्वार । देखिलें साचार दृष्टीसीं ॥ ७७ ॥ मग वाडियांत प्रवेशोनि तेव्हां । निवांत बैसला एकेसरा । कीर्तन घोष ऐकूनि बरवा । समाधान जीवा वाटलें ॥ ७८ ॥ वक्तृत्व ऐकतां नाथाचें । तनु मन वेधलें श्रोतयांचें । धन्य धन्य म्हणती अवघे वाचे । विश्रांतिचें स्थळ हेंची ॥ ७९ ॥ दोनप्रहर लोटतां राती । मग उजळली मंगळ आरती । जयजयकारें भक्त गर्जती । नमस्कार करिती श्रीनाथा ॥ १८० ॥ प्रसाद घेऊनि खिरापत । लोक घरासि गेले समस्त । उद्धवें दारवटा आडकिला हातें । अनामिकातें न देखतां ॥ ८१ ॥ सच्छिष्य साधक गिरिजाबायी । निद्रित जाहली ते समयीं । नाथ आसनीं बैसोनि पाहीं । सहज ते ठायीं विलोकिती ॥ ८२ ॥ सन्निध येऊनि जंव पाहत । तों प्रेतवत प्राणी परी जिवंत । शरीरीं किंचित नसेचि शक्त । ऐसा अंगणांत देखिला ॥ ८३ ॥ दयेनें द्रवला करुणाकर । तयासि पुसतां न बोले उत्तर । मग हात नेऊनि मुखावर । खुणेनें सत्वर सांगीतलें ॥ ८४ ॥ श्रीनाथासि कळलें अंतर । म्हणे हा प्राणी क्षुधातुर । घरांत जावोनि सत्वर । पत्नीसि साचार उठविलें ॥ ८५ ॥ गिरिजाबायी

ते समयीं । सद्भावें मस्तक ठेवी पायीं । म्हणे काय आज्ञा ते सांगावी । ऐकोनि विदेही काय म्हणे ॥ ८६ ॥ व्याधिस्थ प्राणी क्षुधातुर एक । आपुले अंगणीं बैसला देख । तरी पदार्थ होईल तत्काळिक । तोचि सम्यक करी आतां ॥ ८७ ॥ आज्ञा होतांचि ते समयीं । चूल पेटविली लवलाहीं । बोटवे गहुले होते कांहीं । सिद्ध ते ठायी मग केले ॥ ८८ ॥ दूध साकर तयांत । कालवोनि आली अंगणांत । श्रीनाथे तेव्हां आपुल्या हातें । पात्रीं तयातें वाढिलें ॥ ८९ ॥ बहुत दिवसांचा क्षुधित जाण । बहुत भक्षितां पावेल मरण । यास्तव परिमित घातले भोजन । निज प्रीतीनें आपल्या ॥१९०॥ मृत्तीका पात्री देऊनि जीवन । तयासि करवी प्राशन । अन्नमय त्याचे परतले प्राण ॥ मग तो बंदिवान काय म्हणे ॥९१॥ दीनदयाळा अनाथ सखया । धन्य धन्य देखिली तुझी सत्क्रीया । मज अनाथासि आपंगोनिया । श्रम लवलाह्या हरिला की ॥९२॥ मी अंत्यज यातीचा महार । पोटा निमित जाहलों तस्कर । मग दिवाणांत कळतां साचार । दीधला मार बहु तेव्हां ॥९३॥ शरीर बहुत जाहलें क्षिण । मग त्यांणी काढिलें खोड्यातून । तुझें ऐकतां हरिकीर्तन । आलों पळोन या ठाया ॥ ९४ ॥ ऐकोनि अनामिकाचें उत्तर । श्रीनाथ अश्वासित सत्वर । शरीरीं शक्ति येईल जोंवर । येथें तोंवर असावें ॥९५॥ मग तयालागीं वस्त्रें देऊनी । निद्रा करविली असे गोठणीं । श्रीनाथ जावोनि आपुलें सदनीं । नामस्मरणा बैसले ॥९६॥ निद्रेसि मान देऊनि किंचित । प्रातःकाळीं जाहले जागृत । गंगेसि स्नान करोनि येत । नित्य नेम समस्त सारिला ॥९७॥ ग्रामाधिकारीयासि सत्वरी । सांगोनि पाठविलें ते अवसरीं । कीं तुमचा बंदिवान आमुचें घरीं । आलासे रात्रीं आजिच्या ॥ ९८ ॥ अधिकारी देतसे प्रतिवचन । समयें अंगिकार केलिया जाण । आम्हांसि न करवें त्याचें दंडण । इतुकें सांगोन पाठवित ॥९९॥ ब्राह्मण भोजन जाहलिया निश्चित । श्रीनाथ तयासि वाढोनि देती । रात्रीं कीर्तन ऐकतसे प्रीतीं । शरीरीं शक्ती बहुत आली ॥ २०० ॥ श्रीनाथाचें भक्षिलें अन्न । दुर्बुद्धि गेली देहांतून । करूं लागला श्रीहरि भजन । निज प्रीतीनें आपुल्या ॥१॥ पुढिलें अध्यायी कथा सुंदर । वदविता श्रीरुक्मिणीवर । महीपति त्याचा अभयकर । प्रसाद उत्तर लिहिलें ग्रंथीं ॥ २ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । विंशतितम अध्याय रसाळ हा ॥२०३ ॥ अ० ॥२०॥ ओ० २०३ ॥


अध्याय २१
एकनाथ
वामन
श्रीभागवत

श्रीगणेशायनमः । याचकासि आधार दातयाचा । कां अंधास आश्रय डोळसाचा । तेवी पांडुरंग प्रकाशबुद्धीचा । आश्रय आणिकांचा मज नाहीं ॥ १ ॥ त्यासि भक्त चरित्रें लागती गोड । यास्तव निमित्त दाखविलें पुढें । आपण हृदयस्थ राहूनि कोडें । बुद्धीसि मांकडे पडों नेदी ॥ २ ॥ निद्रित होतां जागृत करी । आठव देतसे स्वप्नांतरीं । संतचरित्रें आवडती श्रीहरी । निश्चय अंतरीं बाणला ॥ ३ ॥ जगदुद्धारक करावया निश्चित । आपणचि जाहला देवभक्त । जेणें सत्कीर्ति प्रगटे जनांत । पंढरीनाथ तेंचि करी ॥४॥ तो मायालाघवी जगज्जीवन । होय भयकृत भयनाशन । विष्णु सहस्र नामांत जाण । द्वैपायनें[1] बोलिले ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथागमिक । नाथें आपंगिला अनामिक । त्याचें दयालुत्व वाणिती लोक । निष्काम भाविक प्रेमळजे ॥ ६ ॥ थोर थोर पंडित ब्राह्मण । धर्माधिकारी शास्त्री निपुण । मागें पुढें बोलती वचन । अनुचित नाथानें पैं केलें ॥ ७ ॥ अनामिक तस्कर वाडियांत । ठेविला असे दिवस बहुत । येणेंचि भ्रष्टाकार होत । विटाळ निश्चित कालविला ॥ ८ ॥ परोपकाराचें कारण आहे । तरी आनयाती नमती काय । तस्करासि पोसूनि काय । दुरितलाहे अधिकची ॥ ९ ॥ विंचुवाचें कुरवाळिलें आंग । तरी तो न टाकी आपुला रंग । सर्पासि दुध पाजिलें आगें । तरी डंखिना मग न राहे ॥ १० ॥ तैसाचि तस्कर पोसिला घरीं । तरी पुढें अधिकचि करील चोरी । मागें पुढें धर्माधिकारी । ऐशा परी बोलती ॥ ११ ॥ मागील चरित्र आठवोनि मनी । सन्निध येवोनि बोलती कोणी । तों अद्भुत चरित्र वर्तलें जनीं । तें सज्जनीं परिसावें ॥१२॥ श्रीनाथ एकदां स्नानासि जातां । मार्गावरी अश्वत्थ वृक्ष होता । त्यांतूनि ब्रह्म राक्षस तत्वतां । निघे अवचिता ते समयीं ॥१३॥ श्रीनाथ स्नानासि होते जात । तों संमुख ठाकला जोडोनि हात । म्हणे तुझ्या दर्शनेची निश्चित । उद्धरलो पतित मी आतां ॥ १४ ॥ ब्रह्मद्वेष करूनि सहज । हे योनी प्राप्त झाली मज । आणिक नसे मजला काज । तरी मागणे तुज एक आहे ॥ १५ ॥ बहुत दिवस ब्राह्मण भोजन । घडलें आहे तुज कारणें । आणि बंदिवानासि रात्रीं घातलें भोजन । हीं दोन पुण्यें तुझे पदरीं ॥ १६ ॥ या दोहींतूनि एके साचार । माझे हातीं घालिसील नीर । तरी तत्काळ होईल उद्धार । ऐसें उत्तर बोलिला ॥ १७ ॥ जगदुद्धारार्थ निश्चित । तुवा अवतार घेतला येथ । ऐसी ग्लांती ऐकोनि नाथ । काय बोलत ते समयीं ॥ १८ ॥ पाप पुण्य सर्वथा न दिसे मज । जें तुज आवडेल तें माग आज । ब्रह्मराक्षस धरोनि उमज । मागतसे सहज निजप्रीतीं ॥ १९ ॥ बंदीवानाचें संरक्षण । केलें तें मज अर्पी पुण्य । श्रीनाथें हातीं उदक घेऊन । करितसे अर्पण त्या लागीं ॥ २० ॥ उदक हातीं पडतांचि निश्चिती । पिशाच पावला उद्धारगती । क्षेत्रवासी ब्राह्मण पाहती । आश्चर्य चित्तीं त्यां झालें ॥ २१ ॥ दिव्य देह पावोन त्वरित । पिशाच गेला स्वर्ग पंथ । हरिनामे अवघे लोक गर्जत । महिमा वर्णित नाथाचा ॥ २२ ॥ मागें पुढें जल्पत होते । तेही मनीं झालें कुंठित । धन्य धन्य तेव्हां लोक म्हणत । चरित्र अद्भुत देखोनी

[1] श्रीमहर्षि व्यास.

॥ २३ ॥ परोपकाराचें अद्भुत पुण्य । अनुभव आलां सकळां कारणें । अनामिकांचे केलें पाळण । तो करितसे भजन निजप्रीतीं ॥२४॥ शरीरीं शक्ति आलियावरी । मग तो गेला आपुलें घरीं । ऐसा नाथ परोपकारी । विश्वोद्धारी अवतरला ॥२५॥ आषाढ मासीं पंढरीसी । जात असती यात्रेसी । स्नान करोनि चंद्रभागेसी । श्रीपांडुरंगासी भेटावें ॥ २६ ॥ श्रीनाथाच्या संगतीनें । यात्रा बहुत निघतसे जाण । प्रेमें ऐकती हरिकीर्तन । निजप्रीतीनें आपुल्या ॥ २७ ॥ पंढरीची वारी निश्चिती । भानुदासांनीं लाविली रीती । त्यांचा नेम तो चालविती । अंतर निश्चिती पडेना ॥ २८ ॥ प्रतिष्ठान क्षेत्रींचे जे जन । नित्य ऐकती हरिकीर्तन । प्रासादिक नाथाचें वचन । दृष्टांत देणें अश्रुत ॥ २९ ॥ संस्कृतावरी टीका जाण ॥ श्रीनाथें ग्रंथ केलें कोण । परि तयांची नामाभिधानें । सभाग्य जन निजप्रीतीं ॥ ३० ॥ चतुःश्लोकी जें भागवत । त्याचाही परम गुह्यार्थ । तें प्रथम प्रांजळ केलें बहुत । श्रीसद्गुरुनाथ आज्ञेनें ॥ ३१ ॥ आणखी पद पदांतरें फार । अभंगी लीला वर्णिली थोर । आणि हस्तामलकाची टीका थोर । प्राकृत साचार तें केलें ॥ ३२ ॥ आणि शुकाष्टक असे एक । त्यावरी केलें स्वात्मसुख । अनुभवाचे उद्गार कौतुकें । ऐकतां भाविक संतोषती ॥ ३३ ॥ यावरी संतसज्जन भाविक निश्चिती । नाथासि सद्भावें विनविती । भक्तिरहस्य बहुत भागवतीं । त्यावरी टीका निरुती करावी ॥ ३४ ॥ पुराणीं श्रेष्ठ भागवत । याही वरी उद्धवगीत । जरी तुमच्या मुखें प्राकृत होत । तरी उपयोगीं पडते बहुतांच्या ॥ ३५ ॥ ऐसें श्रोतयाचें आर्त देखा । देखोनि संतोष वाटला निका । मग एकादशावरी अनाथ सखा । प्राकृत टीका आरंभित ॥ ३६ ॥ थोडक्याच दिवसांत साचार । दोन अध्याय झाले सत्वर । तेथें एक गृहस्थ द्विजवर । पाहतांचि थोर सुखावला ॥ ३७ ॥ त्याचा उतार करूनि जाण । नित्य नेमें वाचित ब्राह्मण । मग महायात्रेसि जावया कारणें । इच्छा तेणें धरियेली ॥ ३८ ॥ सुमुहुर्त पाहुनियां त्याणें । कुटुंब सहित निघे आपण । श्रीनाथाची आज्ञा घेऊन । सत्वर गमन करीतसे ॥३९॥ यात्रेसहित क्रमिता पंथ । पावला महाक्षेत्रांत । स्नान करूनि भागीरथींत । विश्वेश्वरातें पूजिलें ॥ ४० ॥ तीर्थविधि यथास्थित । करोनि चतुर्मास राहिला तेथ । दोन अध्याय भागवत नाथकृत । तें असे वाचित निज प्रेमें ॥ ४१ ॥ मणिकर्णिकेचें तीरीं जाण । स्नान करूनि घातलें आसन । द्वादश टिळे गोपीचंदन । तुळसी भूषणें त्याला असे ॥ ४२ ॥ दोन अध्याय जवळीं भागवत । तें निजप्रीतींनें असे वाचित । तों विक्षेप व्हावयाचें कारण तेथ । आलें अकस्मात ते ऐका ॥ ४३ ॥ तये घाटीं थोर संन्यासी । शास्त्रीं अध्ययन असे त्यासी । त्याचे दोघे विद्यार्थी स्नानासि । त्या समयासीं पातले ॥ ४४ ॥ तो प्रतिष्ठानकर गृहस्थ । जाण । बैसला असे घालोनि आसन । त्याणीं भव्य पुरुष दृष्टीं देखोन । म्हणती पंडित ब्राह्मण हा असे ॥४५॥ कोण शास्त्र कोण ग्रंथ । वाचितसे पाहावें त्वरित । ऐसें म्हणोनि चित्तांत । समीप बैसतीं येवोनी ॥४६॥

गीर्वाण शब्द करोनि जाण । तयासि करिती संभाषण । कोणतें शास्त्र करितां पठण । आम्हां कारणें सांगिजे ॥ ४७ ॥ गृहस्थ तयांसि प्रत्युत्तर देत । हें एकादश स्कंध भागवत । त्यावरी टीका केली प्राकृत । तें पठण नित्य करितसें ॥४८॥ मग पंडित म्हणती तयातें । स्पष्ट वाचोनि दावा आम्हांतें । ऐकोनि गृहस्थ हर्षयुक्त । प्रेमभरित वाचितसे ॥ ४९ ॥ आर्थीच नाथाचें बोलणें रसिक । आणि कंठही तयाचा अमोलिक । अर्थ अन्वयीं न्यून अधिक । नसेच देख ते ठायीं ॥ ५० ॥ पंडित म्हणती ये क्षणीं । धन्य त्या सत्पुरुषाची वाणी । हा ग्रंथ प्रख्यात झालिया जनीं । मग संस्कृत कोणी न वाचिती ॥ ५१ ॥ गीर्वाण भाषणें तत्वतां । ऐसें बोलती ते उभयतां । तरी स्वामीपाशीं सांगोनि आतां । निषेध परता करावा ॥ ५२ ॥ एकमेकासि खुणावून । एक बैसला तेथें संरक्षण । एक मठांत सत्वर जाऊन । स्वामीस वर्तमान सांगत ॥ ५३ ॥ म्हणे मणिकर्णिकेचे घाटीं निश्चित । एक ब्राह्मण बैसला गृहस्थ । भागवतावरी टीका प्राकृत । असे वाचित निज प्रीतीं ॥ ५४ ॥ स्वामी समर्थ क्षेत्रवासी । तरी आपण शिक्षा करावी त्यासी । प्राकृत मानले सर्वत्रांसि । मग पुराणिकासी कोण पुसे ॥ ५५ ॥ विद्यार्थियाचें ऐकोनि वचन । संन्यासि होय क्रोधायमान । म्हणे तयासि येथें घेवोनि येणें । मग शिक्षा करणें तें करूं ॥ ५६ ॥ ऐसी आज्ञा होतांचि त्वरित । विद्यार्थी धांवले पांच सात । पुस्तक वाचित बैसला गृहस्थ । सक्रोध बोलत त्या लागीं ॥ ५७ ॥ म्हणती पुस्तक घेऊनि सांगातें । स्वामींच्या मठासि चला त्वरित । गृहस्थ जाहला भयभीत । मग स्मरण आठवीत नाथाचें ॥ ५८ ॥ पुस्तक गुंडाळोनि आसनीं । लगबगा चाले तये क्षणीं । मग स्वामींच्या मठांत प्रवेशोनी । नमन करोनि उभा ठाके ॥ ५९ ॥ नेत्र संकेतें संन्यासी । बैसा म्हणतसे तयासी । पंडित गीर्वाण बोलती त्यासी । परी कांहीं चित्तासी समजेना ॥ ६० ॥ हा मुर्ख जाणोनि साचार । मग बोलती प्राकृत उत्तर । या ग्रंथींचा टीकाकार । कोठें कवीश्वर तो आहे ॥ ६१ ॥ किंवा तुवाच स्वमतीनें । केलें असे प्राकृत लेणें । हें यथार्थ सांग आम्हांकारणें । संकोच मनीं न धरितां ॥ ६२ ॥ गृहस्थ देतसे प्रत्युत्तर । प्रतिष्ठान क्षेत्र गंगातीर । तेथें एकनाथ नामें साचार । सत्पुरुष थोर एक असे ॥ ६३ ॥ विष्णु अर्चन हरि कीर्तन । नित्य करीत संतर्पण । ब्राह्मण पूजित निज प्रीतीनें । तीर्थ प्राशन करीतसे ॥ ६४ ॥ श्रीगुरुवरदें करोनि निश्चिती । तयासि जाहली कवित्व स्फूर्ती । प्राकृत टीका एकादशावरती । त्यानी निज प्रीतीनें आरंभिली ॥ ६५ ॥ दोन अध्याय सिद्ध झाले होते । ते म्यां लिहूनि घेतले त्वरित । अज्ञान गृहस्थ मीं भावार्थे । तेंचि वाचितो पडताळोनी ॥ ६६ ॥ संन्यासी स्वमुखें म्हणतसे । याजकडे हा नसेचि दोष । तरी येथें बोलावोनि एकनाथास । शिक्षा तयास करावी ॥ ६७ ॥ प्रतिष्ठान क्षेत्र गोदातीरी । तेथें पंडित असतील धर्माधिकारी । त्यांणीं प्राकृत टीका भागवतावरी । कैशा परी होऊं दिली ॥ ६८ ॥ ऐसें म्हणवोनि संन्यासी । आज्ञा करितसे

विद्यार्थियासी । प्रतिष्ठानी ब्राह्मणांसी । पत्र तयासी त्याहावें ॥ ६९ ॥ कीं वेदशास्त्रांचें निज मथित । त्यामें काढिलें श्रीभागवत । त्याही वरी उद्धव गीत । उपनिषदर्थ केवळ हा ॥ ७० ॥ एकनाथ नामें साचार । तुमचे गांवी कवीश्वर । त्याणें प्राकृत टीका मांडिली वर । अनुचित फार हें दिसे ॥ ७१ ॥ तुम्ही सर्वज्ञ श्रेष्ठ ब्राह्मण । एकचित्त अवघे होऊन । तयासि शिक्षा करोनि जाण । येथें पाठवणें सत्वर ॥ ७२ ॥ आम्ही विद्यार्थी पाठविले दोन । यांचे पाठिसी तुम्ही असणें । वाद प्रतिवाद करून । तयासि जिंकणें सत्वर ॥ ७३ ॥ धर्माधिकारी यांसि साचार । ऐशा रीतीं लिहिलें पत्र । तुमचे गांवींचा टीकाकार । येथें सत्वर पाठवावा ॥७४॥ आणिक नाथासि पत्र एक । कीं येथें यावें तात्काळिक । भागतावरी प्राकृत लेख । घेऊनि सम्यक ये आतां ॥ ७५ ॥ दोन पत्रें लिहोनि ऐसी । आज्ञा करीत विद्यार्थियांसी । तुम्हीं जावोनि दक्षिणेसी । घेऊनि तयासि या आतां ॥ ७६ ॥ दोन अध्याय गृहस्था जवळीं । ते हिरोनि घेतले तत्काळीं । विद्यार्थि चालत खेळी मेळीं । पैठणा जवळी मग आले ॥ ७७ ॥ स्नान संध्या करोनि सांग। धर्माधिकारियासि भेटलें मग । ब्राह्मण मेळवोनि सवेग । वृत्तांत सांग निवेदिला ॥ ७८ ॥ धर्माधिकारी यांचे हातीं । विद्यार्थी तेव्हां पत्र देती । वाचितां तेव्हां अवघे ब्राह्मण ऐकती । मग बोलती परस्परें ॥ ७९ ॥ म्हणती क्षेत्रांत राहोनि भ्रष्ट । कर्मे करितसे अचाट । येथील अधिकारी जो वरिष्ट । वंदितसे स्पष्ट तयासि ॥ ८० ॥ आणि क्षेत्रींचे गृहस्थ सावकार । आणिकही भाविकयाती इतर । एकनाथें मोहनें घातलें सत्वर । आज्ञाधार ते केले ॥ ८१ ॥ यातस्व आमुचे नच कांहीं । तरी तुम्ही जिंकावा लवलाहीं । आम्ही क्षेत्रवासी सर्वही । साह्य येसमयीं असों तुम्हां ॥८२॥ एक म्हणती बोलावुनि नाथा । वादप्रतिवादी जिंकिजे आतां । एक म्हणती तीर्थासि न जातां । मुंडन सर्वथा न होय ॥८३॥ आपुली प्रतिष्ठा व्हावया निश्चित । प्राकृत आरंभिले भागवत । आतां महाक्षेत्रांत होईल फजित। हा निश्चितार्थ पै असे ॥८४॥ वाराणसीचे विद्यार्थी । हांव धरूनि बहुत रीतीं । म्हणती आम्हींच जिंतूं तयाप्रती । कैसा दुर्मती तो आहे ॥ ८५ ॥ गांवींच्या ब्राह्मणां समवेत । आले नाथाच्या वाडियांत । तयांसि देखतां अभ्युत्थानं देत । नमस्कार करित तेधवां ॥ ८६ ॥ परस्परें भेटती निश्चिती । आसन देवोनि बैसविलें प्रीतीं । म्हणती कवण क्षेत्रीं तुम्हां वस्ती । कृपामूर्ती सांगावें ॥ ८७ ॥ संन्यासियाचें विद्यार्थी । पत्र देत नाथाचिया हातीं । मस्तकीं वंदोनि निजप्रीती । स्पष्ट वाचिती तेधवां ॥ ८८ ॥ श्रीनाथ तेव्हां आनंदयुक्त । विप्रांकडे पाहोनि बोलत । स्मरण जाहलें विश्वेश्वरातें । यास्तव भेटींत पाचारिलें ॥ ८९ ॥ वाराणसीसि जावें त्वरित । ऐसा निश्चय केला तेथ । उद्धवासि बोलावूनि सांगत । हें अधिष्ठान समस्त आवरावें ॥ ९० ॥ विष्णु अर्चन आणि पुराण । सदावर्त ब्राह्मण पूजन । रात्रीं करावें हरिकीर्तन । तुम्हा स्वाधीन हे गोष्टी ॥ ९१ ॥ अवश्य म्हणोनियां त्वरित । उद्धवें केला प्रणिपातें ।

१ संपूर्ण. २ मोहिनी. ३ उठून उभे राहणें. ४ नमस्कार.

श्रीनाथातें आनंद बहुत । महायात्रेंतें जावया ॥ ९२ ॥ संन्यासियाचे विद्यार्थी । तयांसि नाथ करितसे ग्लाती । भोजन करावें सत्वर गतीं । मार्गीं श्रमलेती बहुत दिवस ॥९३॥ आमुच्या निमित्त साचार । येथवरी घडली येरझार । ऐसें ऐकोनि द्विजवर । प्रतिउत्तर काय देती ॥ ९४ ॥ धर्माधिकारीयाचे घरीं जाण । आतांचि जाहली असतीं भोजनें । तृप्त जाहलों तुमच्या दर्शनें । ऐसे वचन बोलिले ॥९५॥ उद्धट बोलावे म्हणवूनी । आधीं जी हांव धरिली मनीं । नाथ दर्शन होतां ते क्षणीं । दुर्बुद्धि निघोनि गेली तेव्हां ॥ ९६ ॥ धन्य धन्य याची भक्ती । धन्य धन्य याची स्थिती । एकमेकांत विद्यार्थी । हळूच बोलती तेधवां ॥९७॥ धर्माधिकारियांचे गुप्त हेर । तें स्थळीं होते साचार । मग ते जावोनि सत्वर । वृत्तांत समग्र सांगती ॥९८॥ म्हणतीं एकनाथाच्या दर्शनें । काशीकर ब्राह्मण जाहले लीन । देखत देखत जाहले दीन । घातलें मोहन तयांसी ॥ ९९ ॥ ऐकोनि तयांची वचनोक्ती । धर्माधिकारी विस्मित होती । म्हणती आदरें वैरी मारावा निश्चिती । ही सांपडली युक्ती एकनाथा ॥ १०० ॥ भृगुची लत्ता साहोनि सबळ । विष्णुनें ऐश्वर्य घेतले सकळ । तीच नाथासि सापडली कळ । लीनता सर्वकाळ धरितसे ॥ १ ॥ जो जो येतसे छळावया । त्याच्या लागतो वारंवार पायां । मग क्रोध जातसे निघोनियां । करी दया तयावरी ॥ २ ॥ कांहीं अपाय रचितां पाहे । तोचि त्यासि होतो उपाय । अपकीर्ति करितां सत्कीर्ति होय । ईश्वरी साह्य आहे यासी ॥ ३ ॥ ऐसें क्षेत्रवासी तयेक्षणी । कुसुमुसिती आपुलें मनीं । पुढें चरित्र वर्तलें जनीं । तें सज्जनीं परिसावें ॥४॥ विद्यार्थी विप्र पाठविले होते । त्यां सवेंचि निघे एकनाथ । पंचाध्यायाचे टिपण होतें । तितुकें सांगतें घेतलें ॥ ५ ॥ अश्व पडताळ नसेचि जाण । एकाएकीं केलें प्रयाण । मागूनि उद्धवें दोघे ब्राह्मण । सेवे लागून पाठविले ॥ ६ ॥ काशीकरांच्या सवें निश्चित । स्वइच्छेनें क्रमिती पंथ । तों एके दिवसीं अकस्मात । आनंदवनाते पावले ॥ ७ ॥ स्नान करूनि भागीरथीं । श्रीनाथ बैसले सहज स्थिती । विद्यार्थी संन्यासि यापासीं जाती । नमस्कार घालिती सद्भावें ॥ ८ ॥ म्हणती आपुल्या प्रतापें साचार । प्रतिष्ठानासि जावोनि सत्वर । घेवोनि आलों टीकाकार । पुढें विचार कोणता ॥ ९ ॥ स्वामी म्हणती ते अवसरीं । आम्ही भिक्षेसि जातो सत्वरी । त्यासि बैसवा मठाभीतरीं । आज्ञा करिती स्वमुखें ॥ ११० ॥ ऐसें सांगोनि त्यांजकारणें । मग भिक्षेसि गेले आपण । सवें तीनशतें शिष्य घेऊन । केलें गमन सत्वर ॥ ११ ॥ विद्यार्थी गंगातीरासि जाती । एकनाथासि घेऊन येती । मठांत बैसावें म्हणती । स्वामी येती तोंवर ॥१२॥ अवश्य म्हणोनि तयांप्रती । श्रीनाथ बैसले सहज स्थिती । ज्याचे आंगीं हर्ष खंती । नये कल्पांतीं सर्वथा ॥ १३ ॥ इकडे मठ भिक्षा झालियावरी । महंत शिष्यांसि आज्ञा करी । तुम्ही जावोनि मठाभीतरीं । सांगतों निर्द्धारीं तें ऐका ॥ १४ ॥ कवीश्वर होता पैठणांत । प्राकृतं करितो भागवत । तो विद्यार्थीयांनीं आणिला येथ । तरी शिक्षा तयातें करावी ॥ १५ ॥ तुम्ही शिष्य तीन शतें । पांच पांच

---

१ लाथ. २ तीनशें. ३ मराठीत.

दंड मारा त्यातें । इतुकियावरी वांचला निश्चित । तरी आणूं ध्यानांत आपुल्या ॥ १६ ॥ सद्गुरु आज्ञा वंदोनि शिरीं । शिष्य चालिले सत्वरी । वाटेसि चालतां मार्गावरी । विचार अंतरीं आठवला ॥ १७ ॥ स्वामी तों समर्थ पूज्यमान । आपणासि आज्ञा केली जाण । दंड मारितां मेला ब्राह्मण । तरी प्रायश्चित्त दारुण होईल ॥ १८ ॥ कोणती रीती कोणती स्थिती । कोण उपासना कोणती भक्ती । कैसी झालीसे ज्ञानप्राप्ती । हें ध्यानासि निश्चित आणावें ॥ १९ ॥ ऐसें म्हणवोनि त्या अवसरीं । उभे राहिले मठाचें द्वारीं । म्हणती एक एक जाऊनि निर्द्वारीं । तयासि सत्वरी विलोका ॥ १२० ॥ ऐसा विचार करोनि निश्चित । एक एक संन्यासी मठांत जात । तों सहज स्थिती बैसले नाथ । ते कृष्णमूर्ति दिसती त्यांलागीं ॥ २१ ॥ सद्भावें करिती नमन । उभे तिष्ठती कर जोडून । म्हणती सच्चिदानंद-घनपूर्ण । तो हा सगुण अवतार ॥ २२ ॥ संन्यासी होते तीनशत । तितुके प्रगटले मठा आंत । म्हणती हे नारायण मूर्ति साक्षात । विश्वोद्धारार्थ प्रगटली ॥ २३ ॥ जनीं जनार्दन भरला जाण । तो हृदयस्थ झाला आम्हां कारणें । जरी स्वामींचें ऐकिलें असतें वचन । तरी अनर्थ पूर्ण पैं होता ॥ २४ ॥ ऐसें म्हणवोनियां ते यती । अवघेचि प्रणिपात नाथासि करिती । मग कर जोडोनि उभे राहती । म्हणती वैकुंठपती हा साक्षात ॥ २५ ॥ तंव एक विद्यार्थी जाऊन । स्वामीसि सांगे वर्तमान । तुम्हीं संन्यासी पाठविले त्वरेनें । कीं दंड मारणें एकनाथा ॥२६॥ त्याणीं आज्ञाभंग केला निश्चित । नाथासि करिती प्रणिपातें । अवघेचि कर जोडोनि तिष्ठत । हें अपूर्व वाटत मजलागीं ॥२७॥ ऐसी ऐकतांचि मात । क्रोधें तप्त जाहला महंत । जेवीं श्रीहरीसि शरण प्रल्हाद होत । हिरण्यकशिपु जल्पत मानसीं ॥२८॥ कीं रघुनाथाचा प्रताप देखोन । शरणागत जाहला बिभीषण । क्रोधें कांपत दशानन । करकरा दशन[3] चावितसे ॥२९॥ स्वामीस अवस्था तैशाच रीतीं । कीं आपुले संप्रदायी असतां यती । आज्ञा भंग करोनि निश्चिती । नाथाप्रती शरण गेले ॥ १३० ॥ कोणतें कौटाळ शिकला पूर्ण । दृष्टीसि पडतां घालितो मोहन । मग विद्यार्थियांसि आज्ञा केली त्यानें । सांगतों कारण तें ऐका ॥ ३१ ॥ आमुचें आसन असे जेथें । पडदे टाकोनि देइजे तेथें । त्याची दृष्टी न पडो मातें । जो प्राकृत ग्रंथातें योजितो ॥ ३२ ॥ स्वामीची आज्ञा होतांचि ऐसी । विद्यार्थी धांवला त्वरेंसी । पडदा लावीत आसनासी । दुसऱ्या द्वारेंसी मग आले ॥३३॥ कडासन मांडोनि ते अवसरीं । येवोनि बैसले आसनावरी । शिष्य तैसेचि उभे द्वारीं । स्वरूप नेत्रीं पाहताती ॥ ३४ ॥ दृष्टीसीं देखतां चतुर्भुज मूर्ती । तयांची उडाली देहभ्रांती । मी तूंपण नाठवे चित्तीं । तटस्थ पाहती सकळिक ॥ ३५ ॥ एकनाथ म्हणवोनी प्रीतीं । अवघे स्वमुखें करिती स्तुती । जयालागीं की जे तप संपत्ती । तो हा वैकुंठपती साक्षात ॥ ३६ ॥ स्वामींचा अनुग्रह घेतला जाण । यास्तव जाहलें सगुण दर्शन । जैसे शिशुपाळ वक्रदंत पूर्ण । द्वेष बुद्धीनें उद्धरिलें ॥ ३७ ॥ ऐकोनि शिष्यांची वचनोक्ती । स्वामी विस्मित होतसे चित्तीं । म्हणे मोहन

१ नमस्कार. २ रावण. ३ दांत.

घातलें समस्तांप्रती । कैशारीतीं कळेना ॥ ३८ ॥ मग निकटं आसन मांडिलें सत्वर । आडवा पडदा असोचि मात्र । मग संन्याश्यांचा महंत थोर । नाथासि उत्तर बोलतसे ॥ ३९ ॥ सकळ वादकांमाजी श्रेष्ठ । तो मी यती पातलों वरिष्ठ । तुझे ठायीं पाडोनि कपट । दंडीन स्पष्ट ये काळीं ॥ १४० ॥ अभिमान युक्त ऐकोनि उत्तर । श्रीनाथ शांती दयेचा सागर । विषम न वाटेचि अणुमात्र । मग मधुरोत्तर काय बोले ॥ ४१ ॥ अहो स्वामीश्रेष्ठ समर्था । सद्भावें चरणी ठेवीतसें माथा । कृपा करोनि मज अनाथा । दर्शन आतां देइजे ॥४२॥ मज बाळकाचा धरोनि हेत । दर्शनासि बोलाविलें येथ । क्रमोनि आलों दूर पंथ । पडदा किमर्थ टाकिला ॥४३॥ अपराध घडला असेल कांहीं । तो क्षमा करावा ये समयीं । माझी प्रज्ञा पाहाल कांहीं । तरी गम्य नाहीं संस्कृती ॥४४॥ भावहीन भक्तीहीन । ज्ञानहीन वैराग्यहीन । नाहीं केलें शास्त्र पठण । वेदाध्ययन तेंही नसे ॥ ४५ ॥ तुमच्या सेवेच्या गुणें निश्चिती । किंचित जाहली कवीत्व स्फूर्ती । यास्तव वदला नाथ यथामती । प्रारंभ भागवतीं मांडिला ॥४६॥ पंचाध्यायी एकादशांत । इतुकाच सिद्ध जाहला ग्रंथ । स्वामिनी पाहुनिया यथास्थित । अर्थ ध्यानांत आणिजे ॥ ४७ ॥ जितुकें जाहलें ग्रंथलेखन । यासि व्याख्यानीं लागतां दूषण । तरी मणिकर्णीकेंत बुडविजे आपण । नसेच कारण मग याचें ॥ ४८ ॥ तुम्ही साक्षात नारायण । महाक्षेत्रीं ज्ञान संपन्न । तुम्हांसि युक्ती जरी न माने । तरी मानील जन कैशा रीतीं ॥४९॥ आतां कृपा करूनि मजवर । कोप बुद्धी करावी दूर । अनाथासि मज साचार । दर्शन मात्रें उद्धरिजे ॥ १५० ॥ ऐसी नाथाची अमृतवाणी । संन्यासियानें ऐकोनि कानीं । तत्काळ क्रोध गेला निघोनी । सत्व गुण मनीं प्रगटला ॥ ५१ ॥ अविद्या रात्रीचा अंधार । तेंमें दाटलें होतें अंतर । ज्ञानार्थ भटकतां भास्कर । गेलें तिमिर निरसोनि ॥ ५२ ॥ ऐसी अवस्था वाणिली चित्तीं । मग संन्यासी विनविती । श्रीनाथ मानवी नव्हे म्हणती । परब्रह्ममूर्ती साक्षात ॥ ५३ ॥ वेदांतगर्भ जो परिपूर्ण । तो हा सच्चिदानंद घन । जो कां निर्गुण निर्विकार पूर्ण । प्रत्यक्ष नारायण दिसतसे ॥ ५४ ॥ जगदुद्धार करावयासी । तो हा अवतरला वैकुंठवासी । तो प्रत्यक्ष येवोनि मठासी । दर्शन अनायासी देतसे ॥ ५५ ॥ हा मानवी नव्हेचि साचार । लीलाविग्रही अवतार । आतां पडदा काढोनि सत्वर । पहावें चरित्र दृष्टीसीं ॥ ५६ ॥ ऐकोनि सच्छिष्याची वाणी । संन्यासी द्रवला अंतःकरणी । मग पडदा काढी तयेक्षणीं । तों श्रीकृष्ण नयनीं दिसतसे ॥ ५७ ॥ जें ध्यान वर्णिलें भागवतीं । महाकवि प्रेमळ भक्तीं । तैसी सगुण देखतांचि मूर्ती । अनुताप चित्तीं जाहला ॥ ५८ ॥ त्राहि त्राहि म्हणवोनि तेथें । अष्टही भावें वेसंडत । देहभाव नाठवितां किंचित । साष्टांग दंडवत घातलें ॥ ५९ ॥ तेव्हां मनुष्यरूप धरोनि मागुती । श्रीनाथ तयासि उठविती । जय जय शब्दें संन्यासी गर्जती । उद्धरलों म्हणती आजि आम्ही ॥ १६० ॥ ओं नमो नारायण म्हणोनि तेथ । तयासि नमस्कार करीतसे नाथ । म्हणे स्वामी हें दिसतें अनुचित ।

१ जवळ. २ अंधार. ३ सूर्य.

सकळ आश्रमांत श्रेष्ठ तुम्ही ॥ ६१ ॥ ऐकोनि एकनाथाची वाणी । संन्यासी विस्मीत अंतःकरणीं । म्हणे लीला विचित्र दाखवोनि नयनी । शास्त्र प्रतिपादनीं सादर ॥ ३२ ॥ परम अवस्था जिरवोनि अंतरीं । स्वामी बैसले आसनावरी । मग नाथांसि समीप बैसवोनि सत्वरीं । ग्रंथ निर्धारें सोडविला ॥ ६३ ॥ एका श्लोकाचें व्याख्यान । पंचाध्यायांत वाचिले जाण । म्हणती याचें अबाधित ज्ञान । जाहलें समाधान ऐकतां ॥ ६४ ॥ सद्गुरुसमवेत तये क्षणीं । विचार केला समस्तांनीं । नाथासि विनंती तये क्षणीं । कर जोडोनी करिताती ॥ ६५ ॥ पंचाध्याय भागवत । प्रारंभी वर्णिलें तुम्ही समस्त । एकादश स्कंध निश्चित । संपूर्ण येथ करावा ॥ ६६ ॥ टीका समस्त होय तोपर्यंत । आनंदयुक्त असावें येथ । ऐसें आमुचें मनोगत । संन्यासी विनवीत नाथासि ॥ ६७ ॥ अवश्य म्हणवोनि ते अवसरीं । श्रीनाथें आज्ञा वंदिली शिरीं । मागुती ग्रंथासी प्रारंभ करी । उल्हास अंतरीं धरोनियां ॥ ६८ ॥ जितुकी टीका नित्य होत । तितुकी संन्यासी वाचोनि पाहत । संस्कृत व्याख्यानें ध्यानासि आणित । परी न्यून किंचित असेना ॥ ६९ ॥ षण्मास लोटितां निश्चित । तेव्हां समाप्तीसि पावला ग्रंथ । परी भक्ति रहस्य अधिकोत्तर त्यांत । श्रोते समस्त सुखावती ॥ १७० ॥ अवघे बैसोनि मठपती । नित्य नित्य श्रवण करिती । सुख संतोष लोटतसे रातीं । स्वानंद चित्तीं सकळांच्या ॥ ७१ ॥ ऐसा ग्रंथ होतांचि समाप्त । मग चित्तीं विचार करिती महंत । आतां महा उत्साह करोनि मठांत । सरस्वतीते पूजावें ॥ ७२ ॥ ऐसें उल्हास धरोनि अंतरीं । साहित्य करविलें ते अवसरीं । आणिक पंडित होते क्षेत्रीं । त्यांसि सांगोनि सत्वरी धाडितसे ॥ ७३ ॥ एकनाथें एकादशावरी देखा । स्वमुखें केली प्राकृत टीका । त्याचा अर्थ पाहोनि निका । सप्रेम सुखा पावलों ॥ ७४ ॥ ग्रंथ समाप्त जाहला शेवटीं । उदयीक उत्साह होतसे मठीं । तुम्ही ब्राह्मण श्रेष्ठ श्रेष्ठीं । उठा उठी येइजे ॥ ७५ ॥ निरोप ऐकतां धरामरं[1] । निंदेसी प्रवर्तले समग्र । प्राकृत टीका भागवतावर । अघटित विचार हा झाला ॥ ७६ ॥ कलियुगा प्रारंभ निश्चित । पाखंड माजलेसे अद्भुत । स्वामीसि कैसी पडलीसे भ्रांत । उच्छेद त्वरित केला ॥ ७७ ॥ महाक्षेत्रीं प्रतिपाद्य पूर्ण । तेंचि मानिती प्राकृत वचन । हें वैष्णव मायेचें निदान । स्वामीसी मोहन पडियेलें ॥ ७८ ॥ तरी आपण जावोनि सत्वरगती । तयासि सांगाव्या शास्त्रनीती । ग्रंथ बुडावावा निश्चित । विचार पंडितीं दृढ केला ॥ ७९ ॥ वैदिक शास्त्रज्ञ पंडित ब्राह्मण । वेदांत वक्ते अवघे जन । स्वामीच्या मठासि येऊन जाण । साष्टांग नमन पैं केलें ॥ १८० ॥ मग एकांता नेऊनि यती । म्हणती स्वामी तुम्ही सर्व प्रभूतीं । आम्ही सकळ ब्राह्मण निश्चती । तुमचे विद्यार्थी सर्वस्वें ॥ ८१ ॥ सकळ विद्येचें मूळपीठ । तुम्ही सद्गुरु पूज्य वरिष्ठ । त्याही वरी चतुर्थाश्रम उत्कृष्ट । पूज्यत्वें श्रेष्ठ सर्वांसी ॥ ८२ ॥ आणि प्रतिष्ठानकरं[2] एकनाथ । त्यानें प्राकृत केलें भागवत । स्वामी मान्य करिताति त्यातें । तरी विपरीतार्थ हा दिसे ॥ ८३ ॥ जें वेदशास्त्रांचें निजमथित । तो ग्रंथ महाभागवत । त्याणें वरी टीका केली


१ ब्राह्मण. २ पैठण मधील.

प्राकृत । तरी माणिकर्णिकेंत बुडविजे ॥ ८४ ॥ जेवीं कां मागें जैमिनीनें ॥ भारत केलेसें निर्माण । मग तें बुडविलें द्वैपायनें । सत्कीर्ति तेणें मग झाली ॥ ८५ ॥ कीं जैन मताचे महाग्रंथ । आचार्यें निक्षेपिले उदकांत । तैसेंच प्राकृत हें भागवत । माणिकर्णिकेंत बुडवावें ॥ ८६ ॥ तेणें सकळ ब्राह्मणांसि होय सुख । वाढेल क्षेत्राचा लौकिक । ऐसें पंडित सकळिक । स्वामींसि देख विनविती ॥ ८७ ॥ मग संन्यासी देत प्रत्युत्तर । आम्हीं यासि छळिलें फार । परी हा नव्हेचि मानवीनर । साक्षात अवतार विष्णूचा ॥ ८८ ॥ याचा ग्रंथ तुम्हीं समस्तीं । मंत्र विधानें पूजावा निश्चितीं । ऐसें शिकविलें नाना रीतीं । परी पंडित नायकती सर्वथा ॥ ८९ ॥ श्रीनाथा पासोनि निश्चित । मागोनि घेतलें भागवत । पंडित उठोनि त्वरित । माणिकर्णिकेंत झोंकिती ॥ १९० ॥ तों अद्भुत चरित्र वर्तलें निश्चितीं । तें परिसिजे सभाग्य श्रोतीं । उभय हस्त काढूनि भागीरथी । हातीं धरीती पुस्तकातें ॥ ९१ ॥ करीं रत्नजडित असती कंकण । दिव्य मुद्रिका शोभायमान । हातीं पुस्तक घेऊनि तिणें । पाहतांचि जन विस्मित ॥९२॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । संन्यासी म्हणे तये वेळीं । मज चंद्रमौळी[1] पावला ॥ ९३ ॥ मग सकळ संन्यासियांचा नाथ । उडी टाकीत माणिकर्णिकेंत । पुस्तक घेऊनि आपुल्या हातें । मस्तकीं धरित निजप्रीतीं ॥ ९४ ॥ पंडितांपासीं ठेवितां आणून । तंव ते पाहती अधोवदन । संन्यासी म्हणे सावध होऊन । नाथासि शरण जा आतां ॥ ९५ ॥ ऐसें ऐकोनि ते समयीं । मस्तक ठेविती स्वामीचें पायीं । म्हणती आम्ही सर्वस्वें अन्यायी । ऐकिलें नाहीं आपुलें ॥ ९६ ॥ एकनाथ हा ईश्वर साक्षात । ऐसें आम्हांसि कळलें सत्य । मग मठांत येऊनि पंडित समस्त । सद्भावें भेटत एकनाथा ॥ ९७ ॥ त्या पुढें ग्रंथ ठेवोनि त्यांणीं । म्हणती हे तुझी प्रसाद वाणी । श्रीभागीरथी हात काढोनी । प्रीती करोनी रक्षिते ॥ ९८ ॥ श्रीनाथें पंडित संन्यासी । देखोनि नमस्कार घातला त्यांसी । मग स्वामी आज्ञापिती ब्राह्मणांसी । पूजावें नाथासी प्रीतीनें ॥ ९९ ॥ भवसागर तरावया पाहीं । साधुसेवन घडो द्यावें कांहीं । श्रीनाथ पंडितांचें लागे पायीं । म्हणे अनुचित कांहीं न करावें ॥२००॥ पुढिले अध्यायीं कथा रसिक । श्रवणेंचि विरक्त होती भाविक । महीपतीहि तेणें हरिखे । चरित्र कौतुकें निरोपी ॥ १ ॥ स्वस्ति श्रीभक्तिलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । एकविंश अध्याय रसाळ हा ॥ २०२ ॥ अध्याय ॥ २१ ॥ ओं० ॥ २०२ ॥

---

१ श्रीशंकर.

अध्याय २२



श्रीगणेशाय नमः । जय जगद्गुरु पंढरीराया । अपार तुझी वैष्णवी माया । ब्रह्मादिकासि नयेचि आया । येतसे प्रत्यया हे गोष्टी ॥ १ ॥ तुझा महिमा वर्णू जर । तरी श्रुति शास्त्रांसि नकळेचि पार । तेथें अल्प मति मी किंकर । दीन पामर मुढमति ॥ २ ॥ नाहीं अक्षरें बोलली शुद्ध । गीर्वाण भाषा नानाविध । नाहीं चित्तीं ठसावला बोध । बोलें अवद्ध भलतेंची ॥ ३ ॥ दीनदयाळा रुक्मिणीपती । ऐसी साक्ष येतसे चित्तीं । कैसीं वचनें होतील सरती । हें मजप्रती कळेना ॥ ४ ॥ तूं अंतरसाक्ष चैतन्यघन । चित्तीं देवोनि आठवण । आपुली चरित्रें गुप्त ठेवण । मज स्वाधीन तें करिसी ॥ ५ ॥ सकळ आज्ञानांमाजी श्रेष्ठ । तो मी मूढमति असें वरिष्ठ । आणि आपुलीं चरित्रें वदविसी स्पष्ट । हें नवल मोठें पांडुरंगा ॥ ६ ॥ मागें नारदाचा हरावया अभिमान । आस्वला हातीं करविलें गायन । अघटित येतसे घडोन । परी तुझ्या इच्छेनें श्रीहरी ॥ ७ ॥ मागिले आध्यायाचे शेवटीं निश्चित । श्रीनाथकृत जें भागवत । पंडिती टाकितांचि उदकांत । तें[१]उचलोनि घेत भागीरथी ॥ ८ ॥ मग श्रेष्ठ संन्यासी ते अवसरीं । गंगेंत प्रवेशोनि घेतलें करीं । समस्त येतां मठांतरीं । श्रीनाथ समोर ये तयां ॥ ९ ॥ संन्यासी आणि पंडित ब्राह्मण । तयांसि सद्भावें केलें नमन । स्वामी म्हणे लाजिरवाणें । बुडविलें थोरपणें आम्हांसी ॥ १० ॥ मग सर्व उपचार आणोनि त्वरित । पंडितांसि संन्यासी आज्ञापित । श्रीनाथ पूजावा यथास्थित । चित्तीं भावार्थ धरोनी ॥ ११ ॥ पंडितांसि तों अंतरभावत नाहीं । परी चमत्कार देखोनि लागती पायीं । एकनाथ विनवी ते समयीं । हें अनुचित कांहीं न करावें ॥ १२ ॥ मी ब्राह्मणांचा दासानुदास । निज कृपेची धरूनि आस । सद्भावें पुजावें या ग्रंथास । तेणें संतोष आम्हांसी ॥ १३ ॥ ऐकोनि नाथाची वचनोक्ती । मान्य जाहली सकळांप्रती । तो अंबारीसहित हत्ती । आणवीतसे यती ते समयीं ॥ १४ ॥ जाडित पाखरासे दूर-लेपन ॥ वरति भरजरी वस्त्रें भूषणें । ऐसा हत्ती शोभायमान । सत्वर घेऊन ते आले ॥ १५ ॥ संन्यासी नाथासि विनवित । अंबारीत वसा ग्रंथासहित । श्रीनाथ प्रति उत्तर देत । हें मी अनुचित करीन ॥ १६ ॥ ग्रंथ ठेवोनि अंबारीत । मिरवा हेचि असे उचित । मी सर्वस्वें शरणागत । रज इच्छित चरणाचें ॥ १७ ॥ धनवंत पंडित होते सात । तयासि संन्यासी आज्ञा करित । एक एक दिवस सर्व साहित्य । तुम्ही समस्त करावें ॥ १८ ॥ स्वामींचें वचन सर्वांसि मान्य । त्याची उपेक्षा करीसा कोण । वाराणसीचे सकळ ब्राह्मण । असती शरण तयासी ॥ १९ ॥ मग सर्वोपचारें पूजोनि ग्रंथ । अंबारींत मांडला निश्चित । समुदाय मेळवोनि बहुत । चालिले मिरवत संभ्रमें ॥ २० ॥ दिंड्या पताका बरोबर । टाळ मृदंग वाजती सुस्वर । वैष्णव गाती प्रेमादरें । जयजयकारें नाम घोष ॥ २१ ॥ ढोल दमामें वाजंतरें । कोंदलें असें अंबरें[२] । कौतुक पाहती नारीनर । दाटी समग्र जाहली ॥ २२ ॥ ऐसें मिरवतां झाली राती । मग नाना परीचीं यंत्रे सोडिती ॥ नळे आणि चंद्रजोती । ऐसी सोडिती पदोपदी ॥ २३ ॥ बुका सुमनें नाना परी । परिमळ[३] द्रव्य उधळती वरी ।

१ दास. २ आकाश. ३ सुवासिक.

महोत्सव काशीपुरी । ते अवसरी मांडिला ॥२४॥ जे स्थळीं छबीना मिरवत येत । तेंथ पंडित साहित्य करित । संन्यासी आणि ब्राह्मण जेवित । समुदाय बहुत होतसे ॥ २५ ॥ ऐसा सात दिवसापर्यंत । आनंद उत्साह होतसे तेथें । अहोरात्र ग्रंथ मिरवित । ऐश्वर्य वर्णित नाथाचें ॥ २६ ॥ आठ दिवस मिरवीत । आले पूर्व स्थळाप्रत । महा उत्साह केला तेथे । आनंद युक्त ते दिवशीं ॥ २७ ॥ पंडितासि संन्यासी आज्ञा करित । तुम्ही श्रेष्ठ ब्राह्मण मिळोनि समस्त । श्रीनाथ मुखींचें कीर्तन निश्चित । प्रेम भरित ऐकावें ॥२८॥ ऐसे सांगतां यतिराज । सकळासि संतोष जाहला सहज । ब्रह्मसभा करोनि आज । कीर्तन चोज ऐकावे ॥२९॥ सज्ञान पंडित वैष्णव भक्त । ब्राह्मण वैदिक संत महंत । नरनारी भाविक समस्त । सभा मठांत मिळाली ॥ ३० ॥ टाळ मृदुंग विणे घोषें । नाद ब्रह्मचि आलें मुसें । कीर्तन करितां एकनाथास । अति उल्हास मानसीं ॥ ३१ ॥ विलठ्ठनामें करोनि गजर । टाळ्या वाजविती निज करें । नादें कोंदोनि गेले अंबर । जयजयकार करिताती ॥ ३२ ॥ भक्तिपर जें चरित्र जाण । तेंचि लाविले अनुसंधान । त्यामाजी कांहीं आध्यात्म ज्ञान । भक्ति महिमान वाढविती ॥ ३३ ॥ कलियुगी नाम तारक निश्चिती । दृष्टांत भागवती सद्गुरु भक्ति । महिमा वर्णिती स्वमुखें ॥ ३४ ॥ श्रीनाथाचीं प्रसाद वचनें । ऐकतां तटस्थ सभाजन । पंडितांसि नाहीं देहभान । समाधिस्थ जाण ते होती ॥ ३५ ॥ मग परस्परें ब्राह्मण बोलत । हरिकीर्तन करिती बहुत । परी याज ऐसें प्रेम अद्भुत । नाहीं निश्चित कवणासी ॥ ३६ ॥ अध्यात्मज्ञान प्रासादिक कविता । त्याहीवरी बहु लीनता । धन्य याची मातापिता । नरनारी समस्ता बोलती ॥ ३७ ॥ कीर्तन उत्साह चार दिवस झाला । पांचवें दिवसीं गोपाळकाला । श्रीहरि लीलेचा भाव दाविला । प्रसाद वांटिला सकळांसी ॥ ३८ ॥ काशी क्षेत्रींचे द्विजवर । आबाळ वृद्ध लहान थोर । धन्य धन्य म्हणती सर्वत्र । ईश्वरी अवतार साक्षात हा ॥ ३९ ॥ संन्यासी म्हणती ते वेळां । श्रीकृष्ण अवतारींची जे लीला । ते आम्हीं पाहिली सर्व डोळां । धन्य सोहळा आजिचा ॥ ४० ॥ सकळ पंडितांसि म्हणतसे यती । एकनाथकृत एकादशग्रंथी । त्याची स्वहस्तें करावी प्रती । तुम्ही समस्ती मिळोनियां ॥ ४१ ॥ अवश्य म्हणोनि तयेक्षणी । एक एक अध्याय घेतला त्यांनीं । मग रुक्मिणी स्वयंवरासि नाथानीं । प्रारंभ तेक्षणीं केला असे ॥ ४२ ॥ बैसोनि मणिकर्णिकेचे तीरीं । एकाग्र होवोनि निज अंतरीं । रामजयंती माझारी । ग्रंथ निर्धारी पूर्ण झाला ॥ ४३ ॥ तों एकादश स्कंधाची प्रती । सिद्ध करोनि आणिली पंडितीं । ते स्वामी मठांत निजप्रीतीं । नित्य वाचिती सप्रेम ॥ ४४ ॥ यतीची आज्ञा घेऊनि त्वरित । स्वदेशासि चालिले एकनाथ । अवघे संन्यासी आणि पंडित । आले बोळवित ते समयीं ॥४५॥ श्रीनाथ क्षेत्रवासियां कारणें । सद्भावें करी साष्टांग नमन । परस्परें देवोनि आलिंगन । निज प्रीतीनें भेटले ॥४६॥ यावरी बोळवोनी नाथासी । नगरांत प्रवेशले क्षेत्रवासी । नाथाचे सद्गुण अहर्निशीं । आठविती निजमानसीं

सर्वदा ॥ ४७ ॥ इकडे पंथ क्रमितां एकनाथ । सर्वदा चित्तीं स्वानंद भरित । मार्गीं येतां दासोपंत । भेटले अकस्मात तयासी ॥ ४८ ॥ व्हावया श्रीदत्तात्रेय दर्शन । बाळपणीं हेत धरिला त्याणें । तीव्र मांडिलें अनुष्ठान । निज प्रीतीनें आपुल्या ॥ ४९ ॥ तें म्हणाल जरी कैशा रीतीं । तें परिसिजे सभाग्यश्रोतीं । सर्व परिवार टाकोनि निश्चिती । अरण्यांत एकांतीं जातसे ॥ ५० ॥ गळित पत्रें नित्य भक्षित । देहाची आस्था नसेचि किंचित । खडकावरी शयन करित । शीत उष्ण साहत निजांगे ॥ ५१ ॥ अवचित मनुष्य आले जर । तरी उठोनि पळतसे दूर । श्रीदत्तायेयाचे साचार । स्मरण निरंतर करितसे ॥ ५२ ॥ ऐसें अनुष्ठान करितां प्रीतीं । तयाची झाली विदेह स्थिती । खडकावरी लोळतां निश्चिती । क्षतें पडती सर्वांगा ॥ ५३ ॥ वीस वर्षे पर्यंत जाण । या रीतीं केलें अनुष्ठान । मग दत्तात्रेयांनीं त्याजकारणें । दीधलें दर्शन साक्षात ॥ ५४ ॥ आलिंगन देतांचि साचार । त्याचें झालें दिव्य शरीर । अनुग्रह दीधला तेणें वरें । कविता फार करीतसे ॥ ५५ ॥ सद्गुरु कृपेनें निश्चिती । प्रारब्धें आली धन संपत्ती । थोर थोर लोक मान्य करिती । विशाळ मती देखोनियां ॥ ५६ ॥ जोगाईच्या आंब्यत निश्चिती । दासोपंतांनीं केली वस्ती । श्रीएकनाथाची सत्कीर्ती । ऐकिली होती विश्वमुखें ॥ ५७ ॥ महायात्रेहोनि परतोनि येतां । भेट जाहाली अवचितां । परस्परें आलिंगन देतां । स्वानंद चित्तां होतसे ॥ ५८ ॥ उभयतां चरणीं घालोनि मिठी । स्वानंद सुखाच्या बोलती गोष्टी । दासोपंतासि आनंद पोटीं । म्हणे जाहली भेटी दैवयोगें ॥ ५९ ॥ नाथासि प्रार्थूनि नानापरी । घेऊनि गेले आपुलें घरीं । आनंद सुखाच्या उठती लहरीं । सद्भाव उपचारीं पूजिलें ॥ ६० ॥ नित्य करिती मिष्टान्न भोजन । त्याहीवरी भागवत श्रवण । रात्री हरि कीर्तन । वेधले जन ऐकतां ॥ ६१ ॥ एकमास लोटतांचि तेथ । आज्ञा मागती एकनाथ । विनंति करिती दासोपंत । अश्व द्रव्य खर्ची देवोनिया ॥ ६२ ॥ श्रीनाथ सर्वदा निराश चित्तीं । न घेचि कांहीं धन संपत्ती । मार्ग कठीण आहे म्हणती । अश्वही न घेती यास्तव ॥ ६३ ॥ दासोपंतासि ते अवसरीं । म्हणती कृष्णजयंती उत्साह घरीं । तरी तुम्ही अवकाश करूनि सत्वरी । प्रतिष्ठान क्षेत्रीं येईजे ॥ ६४ ॥ अवश्य म्हणोनि बोलती उत्तर । परस्परें करिती नमस्कार । श्रीनाथें प्रयाण केलें सत्वर । मग प्रतिष्ठान क्षेत्र पावले ॥ ६५ ॥ नगरासमीप येतां जाण । उद्धवासि कळलें वर्तमान । परम हर्ष त्याजकारणें । जेवीं अवर्षणीं पर्जन्य वोळला ॥ ६६ ॥ दिंड्या पताका बरोबर । टाळविणें मृदंग घेतले सत्वर । बुका तुळसी सुमनहार । सर्वोपचार आणवी ॥ ६७ ॥ क्षेत्रवासी नारीनर । भाविक प्रेमळ वैष्णव वीर । गात नाचत सप्रेम गजर । नाथासि सामोरे जाताती ॥ ६८ ॥ श्रीनाथ स्वरूप देखतांचि नयनीं । आनंद जाहला सकळां लागोनी । विठ्ठल नामें गर्जोनि । ध्वनी लोटांगणीं जन येती ॥ ६९ ॥ उद्धवें निजप्रीतीं पडिभारीं । मस्तक ठेविला चरणावरी । श्रीनाथें आलिंगिला दोहीं

करीं । प्रेम अंतरीं न समाये ॥ ७० ॥ ऐशाचपरी क्षेत्रवासी । प्रीतीनें भेटती नाथासी । उद्धवें वाहोनि बुका तुळसी । पुष्पहारासी घातलें ॥ ७१ ॥ विठ्ठलनामें करोनि घोष । आनंदें गाती वैष्णवदास । म्हणती धन्य आजिचा दिवस । जन येतसे भेटावया ॥ ७२ ॥ श्रीहरिगुण गात नाचत । श्रीनाथ प्रवेशले नगरांत । मंगळ वाद्यें पुढें वाजत । घोष नसे मात अंबरीं ॥ ७३ ॥ बुका सुमनें मुठी भरोनी । लोक उधळिती तयेक्षणीं । ऐशा रीती प्रवेशले सदनीं । तों पांडुरंग नयनीं देखिला ॥ ७४ ॥ श्रीनाथें देवा समोर । घातला साष्टांग नमस्कार । मग मंगळ आरती करोनि सत्वर । रुक्मिणीवर वोवाळिला ॥ ७५ ॥ सकळांसि प्रसाद खिरापती देतांचि तोष जाहला चित्तीं । कुशळ वृत्तांत पुसतां सांगती । आसनीं निजप्रीतीं बैसले ॥ ७६ ॥ घटिका रात्र जाहली चार । लोक घरासी गेले समग्र । गिरिजाबाई आपुल्या निजकरें । नाथासि उपाहार घालितसे ॥७७॥ रात्रीं कीर्तन करोनि मागुतीं । यावरी निद्रेसि मान देती । तों संन्निध आली कृष्णजयंती । तंव उद्धवें यथा पद्धति । साहित्य निश्चिती आरंभिलें ॥ ७९ ॥ संतर्पणाचि सामग्री घरीं । बहुत केली ते अवसरीं । भिंती सारवोनि आंत बाहेरी । चित्रें त्यावरी काढिलीं ॥ ८० ॥ तों पूर्णिमेचे दिवशीं अकस्मात । उत्सवासि आले दासोपंत । हें एकनाथासि नसतां श्रुत । आले अकस्मात महाद्वारीं ॥ ८१ ॥ तंव नवल देखिले तये वेळीं । श्रीदत्तें हातीं घेतला त्रिशूळ । उभे लक्षोनि असती स्थळ । द्वारपाळ या रीतीं ॥ ८२ ॥ दासोपंती देखोनि नयनीं । परम आश्चर्य वाटलें मनीं । मग उडी टाकिली शिबिकेंतुनी । साष्टांग धरणीं नमस्कारी ॥ ८३ ॥ दत्तासि देखोनि आलिंगन । म्हणे आपलें येथें किमर्थ येणें । हें ऐकोनि अनसुया नंदन । काय वचन बोलतसे ॥८४॥ एकनाथ नव्हे मानवी भक्त । श्रीपांडुरंग अवतार साक्षात । विश्वोद्धार करावया निश्चित । अवतार धेत कलियुगी ॥८५॥ पूर्व पुण्याचा वोल्हावा । असेल जरी कोणासि दैवा । तरीच याची घडेल सेवा । भाव जाणावा निश्चित ॥ ८६ ॥ आम्ही त्रिशूळ घेऊनि करीं । द्वार रक्षितों निर्धारीं । नाथासि जावोनि सांगतों सत्वरी । तुम्हीं भीतरी न यावें ॥ ८७ ॥ ऐसें बोलतांचि अवधूत । विस्मित चित्तीं दासोपंत । श्रीनाथाचें ऐश्वर्य वाणित । म्हणे महिमा अद्भुत मी नेणें ॥ ८८ ॥ श्रीदत्तें नाथासि जाणविली मात । कीं दर्शनासि आले दासोपंत । मग उद्धवासहित सामोरे येत । नमस्कार घालिती निजप्रीतीं ॥८९॥ परस्परें लागोनि पायीं । आलिंगन दीधलें ते समयीं । मग हातीं धरोनि लवलाहीं । नेलें स्वगृहीं तयासी ॥ ९० ॥ शिबिका अश्व वाहनें समस्त । उद्धवें लाविलीं यथास्थित । शिधा साहित्य मनुष्यांतें । न्यून किंचिन पडेना ॥ ९१ ॥ मागें श्रीकृष्ण अवतारीं निश्चित । उद्धवासि देवाचि होती प्रीत । सेवेचा पुरला नव्हता हेत । तें आर्त पुरवित आपुलें ॥ ९२ ॥ मागिले जन्मीं ऋणानुबंध होता । यास्तव संयोग घडला आतां । नाथ सेवेचा स्वार्थ चित्तां । आणिक ममता नसेची ॥ ९३ ॥ मग दासोपंतीं करूनि स्नान । नाथाचे

पंक्तिस सारिलें भोजन । रात्रीं ऐकतां हरिकीर्तन । तों उदयासि अरुण पातला ॥ ९४ ॥ पांडुरंग मूर्तीचें उद्वर्तन देख । करोनि केला आभिषेक उपचार पूजोनि अनेक । सप्रेम सुख भोगिती ॥ ९५ ॥ मंगळ वाद्यें द्वारीं वाजती । मग गायिली आरती । वेद घोष ब्राह्मण बोलती । मग अर्पिती पुष्पांजली ॥ ९६ ॥ दिवसां ब्राह्मण संतर्पण । रात्रीं होतसे हरिकीर्तन । प्रतिपदे पासोनि जाण । नवरात्र पूर्ण उत्साह ॥९७॥ गोपाळकाला दशमी आंत । ललित केलें यथास्थित । दृष्टीसीं देखोनि दासोपंत । आनंदयुक्त मानसीं ॥९८॥ श्रीनाथाची प्रसाद वाणी । साहित्य सोंग संपादणी । त्यामाजीं सिद्धांत ज्ञानखाणीं । हें अपूर्व नयनीं देखिलें ॥९९॥ मी दत्त उपासक साक्षात्कारी । ऐसें वाटत होतें अंतरीं । नाथाचें ऐश्वर्य देखतां नेत्रीं । निर्विकल्प गात्रीं होतसें ॥ १०० ॥ महोत्साह संपूर्ण झालिया तेथ । द्वादशींस पारणें केलें त्वरित । आज्ञा मागोनि दासोपंत । स्वस्थाना जात आपुल्या ॥ १ ॥ आणिक सत्पुरुष कोणी असती । ते भाविक जनासि देती मुक्ती । अभक्त द्वेषी या अधोगती । होतसे निश्चिती त्यांचेनीं ॥ २ ॥ श्रीएकनाथाचें लिलाचरित्र । तैसें नव्हे साचार । द्वेषी दुर्बुद्धि उद्धरलें फार । जगद्गुरु थोर या नावें ॥ ३ ॥ संन्यासी आणि पंडितजनीं । वाराणसीत तछाळिलें त्यांणीं । त्यांसि कौतुक दावोनी । भक्तीसि तें क्षणीं लाविलें ॥ ४ ॥ विद्या आणि विनय पाहीं । सर्वदा वसती याचे देहीं । करुणा भूतमात्राचे ठायीं । हेचि नवायी अगाध ॥ ५ ॥ भूतमात्री सदयता । ब्राह्मण चरणीं बहुत आस्था । हा भार पडिला श्रीकृष्णनाथा । सेवा ऋणी तत्वतां होय ॥ ६ ॥ ब्राह्मण होवोनि चक्रपाणी । गंगोदक कावडी भरोनि आणी । नेणें तयाची विचित्र करणी । कोणा लागोनी फळेना ॥ ७ ॥ आणिक चरित्रें रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । एकनाथ करोनि गंगास्नान । चालिले परतोन गृहासी । ॥ ८ ॥ तंव गांववेशींत निश्चित । एक यवन बैसला होता उन्मत्त । तो भूमीवरी थुंकतां अकस्मात । तों येतसे नाथ पंथे ॥ ९ ॥ गुळणी टाकितां भूमीवर । ते पडिली नाथाचे अंगावर । परी क्रोध नयेचि अणुमात्र । न दुखवे अंतर सर्वथा ॥ १० ॥ जेवीं पृथ्वीचे ठायीं क्षमा पूर्ण । तैशाच रीतीं श्रीनाथ लक्षण । कोणी भूमीचें करिती पूजन । मळ मूत्र टाकोन एक देती ॥ ११ ॥ परी सुखदुःख मानोनि अंतरीं । क्षमेसि करी जैसी धरित्री[2] । परी लोभ क्षोभ न करी कोणावरी । हा स्वभाव निर्धारीं असे तिचा ॥ १२ ॥ तैसेच नाथाचे अंगावरी । नेणत थुंकला अज्ञान नर । तेणें क्षोभे न पोळे अंतर । परी करुणा फार आली ॥ १३ ॥ म्हणती यासी दोष घडला निश्चिती । हा प्राणी जाईल अधोगती । आतां हा अनुताप धरील चित्तीं । तो उपाय निश्चिती योजावा ॥१४॥ ऐसी कल्पना आणोनि चित्तीं । गंगास्नान केलें मागुती । परतोनि जावोनि गृहाप्रती । अर्चन करति विष्णूचें ॥ १५ ॥ नैवेद्य वैश्वदेव करोनि जाण । द्विज पंक्तीसि सारिलें भोजन । मग दोघां मनुष्यांचें अन्न । पात्रीं वाढोनि घेतलें ॥ १६ ॥ अंगावर थुंकला होता यवन । त्याच्या घरासि

१ सूर्य. २ पृथ्वी.

गेलें घेऊन । मग सद्भावें केलें तया नमन । म्हणती प्रसाद सेवणें निजप्रीतीं ॥ १७ ॥ झांकण काढितांचि वरूनी । तों दिव्य अन्न देखिलें नयनीं । यवन अनुतापला मनीं । अन्याय आठवोनी आपुला ॥ १८ ॥ म्हणे मी उन्मत्त परम खळ । ब्रह्मद्वेषी अति चांडाळ । तुम्हांवरी थुंकलों सकाळीं । विचार अणुमात्र न केला ॥ १९ ॥ तुम्ही सत्पुरुष या नगरांत । मान्य असा कीं सर्वांत । हा अपराध क्षमा कीजे समर्थें । म्हणवोनि दंडवत घातलें ॥ १२० ॥ श्रीनाथें तयासि उचलोन । प्रीतीनें देतसे आलिंगन । म्हणती आम्हा पाहोनि केलें असतें वमन । तरी तुजला दूषण घडतें ॥ २१ ॥ न कळतां दोष अकस्मात । तुज हा लागला होता किंचित । आतां अनुताप जाहला चित्तांत । याहोनि प्रायश्चित्त आन नसे ॥ २२ ॥ आम्हांवरी थुंकल्याचा पाहीं । आतां सर्वथा तुज दोष नाही । ऐसें म्हणोनि ते समयीं । पातले गृहीं आपुल्या ॥ २३ ॥ एके दिवशीं एकनाथ । मध्यान्ह समयीं गंगेसि येत । ब्रह्मयज्ञ करोनि निश्चित । चालिले त्वरित घरासी ॥ २४ ॥ वैशाख मास उष्ण तीव्र । गंगेची वाळू तापली फार । तया माजी एक पोर । रडतसे थोर आक्रोशें ॥ २५ ॥ तें एकनाथें देखतांचि जाण । दयेनें द्रवलें अंतःकरण । म्हणे याचा तत्काल जाईल प्राण । मग कडिये उचलोन घेतलें ॥ २६ ॥ आंगवस्त्रें पुसोनि नेत्र । तयासि बुझावीत सत्वर । म्हणती कोणीकडे तुझें घर । सांग सत्वर येसमयीं ॥ २७ ॥ तान्हें बाळक बोलतां नये । हातें दाखवीत घराची सोये । कोपटासि येतांचि पाहे । तों पातली माय तयाची ॥ २८ ॥ बाळकें देखोनि ते अवसरीं । मातेच्या नांवें शब्द करी । नाथासि समजलें निज अंतरीं । म्हणे हे तों महारीण दिसतसे ॥ २९ ॥ खालीं ठेवितांचि बाळकासी । धांवत गेलें मातेपासीं । श्रीनाथ परतोनि गंगेसी । सचैल स्नानासी करितसे ॥ १३० ॥ धोत्रें वाळवोनि कृपामूर्ती । कपाळीं लावी द्वारावती । मग जावोनि सदनाप्रती । भोजन सारिती संतोषें ॥ ३१ ॥ माहारिणीचें पोर साचार । एकनाथें बैसविलें खांद्यावर । क्षेत्रवासी धरामर[4] । त्यांसि अणुमात्र विदित नसे ॥ ३२ ॥ श्रीपांडुरंगाची इच्छा निश्चिती । नाथाची प्रकट व्हावी कीर्ती । यास्तव देवें रचिली युक्ती । ते सादर श्रोतीं परिसिजे ॥ ३३ ॥ एक सज्ञान होता ब्राह्मण । गलित कुष्ट झाला त्याज कारणें । तेणें पश्चाताप धरोनि मनें । त्र्यंबकेश्वरी अनुष्ठान करीतसे ॥ ३४ ॥ महा पापाच्या योगें करून । शरीरीं रोग उद्भवला दारुण । मग देह आरोग्य व्हावया कारण । कामानिक अनुष्ठान करितसे ॥ ३५ ॥ अन्न त्यजूनि निःशेषें । कंदमूळ मात्र भक्षीतसे । यथाविधि अनुष्ठान ऐसें । द्वादश वर्षें पै केलें ॥ ३६ ॥ तों त्र्यंबकेश्वर येवोनि स्वप्नीं । काय सांगे तया लागुनी । गोदातीरीं प्रतिष्ठानीं । त्वरें करोनी जाय आतां ॥ ३७ ॥ तेथें एकनाथ वैष्णव-भक्त । ब्राह्मण सेवेसि असे रत । सर्वांभूतीं दयावंत । घडलें सुकृत[5] एक त्यासी ॥ ३८ ॥ एकदां पायपोळी जाहली फार । त्यांत अनामिकाचें पडिलें पोर । तें नाथांनीं समजावोनि सत्वर । खांद्यावरी घेतलें ॥ ३९ ॥ मग नेऊनि घातलें मातेपासि । तें महा सुकृत

१ ओकणे. २ पश्चात्ताप. ३ दुसरे. ४ ब्राह्मण. ५ पुण्य.

गेलें घेऊन । मग सद्भावें केलें तया नमन । म्हणती प्रसाद सेवणें निजप्रीतीं ॥ १७ ॥ झांकण काढितांचि वरूनी । तों दिव्य अन्न देखिलें नयनीं । यवन अनुतापला मनीं । अन्याय आठवोनी आपुला ॥ १८ ॥ म्हणे मी उन्मत्त परम खळ । ब्रह्मद्वेषी अति चांडाळ । तुम्हांवरी थुंकलों सकाळीं । विचार अणुमात्र न केला ॥ १९ ॥ तुम्ही सत्पुरुष या नगरांत । मान्य असा कीं सर्वांत । हा अपराध क्षमा कीजे समर्थें । म्हणवोनि दंडवत घातलें ॥ १२० ॥ श्रीनाथें तयासि उचलोन । प्रीतीनें देतसे आलिंगन । म्हणती आम्हा पाहोनि केलें असतें वमन । तरी तुजला दूषण घडतें ॥ २१ ॥ न कळतां दोष अकस्मात । तुज हा लागला होता किंचित । आतां अनुताप जाहला चित्तांत । याहोनि प्रायश्चित्त आन नसे ॥ २२ ॥ आम्हांवरी थुंकल्याचा पाहीं । आतां सर्वथा तुज दोष नाहीं । ऐसें म्हणोनि ते समयीं । पातले गृहीं आपुल्या ॥ २३ ॥ एके दिवशीं एकनाथ । मध्यान्ह समयीं गंगेसि येत । ब्रह्मयज्ञ करोनि निश्चित । चालिले त्वरित घरासी ॥ २४ ॥ वैशाख मास उष्ण तीव्र । गंगेची वाळू तापली फार । तया माजी एक पोर । रडतसे थोर आक्रोशें ॥ २५ ॥ तें एकनाथें देखतांचि जाण । दयेनें द्रवलें अंतःकरण । म्हणे याचा तत्काल जाईल प्राण । मग कडिये उचलोन घेतलें ॥२६॥ आंगवस्त्रें पुसोनि नेत्र । तयासि बुझावीत सत्वर । म्हणती कोणीकडे तुझें घर । सांग सत्वर येसमयीं ॥ २७ ॥ तान्हें बाळक बोलतां नये । हातें दाखवीत घराची सोये । कोपटासि येताचि पाहे । तों पातली माय तयाची ॥ २८ ॥ बाळकें देखोनि ते अवसरीं । मातेच्या नांवें शब्द करी । नाथासि समजलें निज अंतरीं । म्हणे हे तों महारीण दिसतसे ॥ २९ ॥ खालीं ठेवितांचि बाळकासी । धांवत गेलें मातेपासीं । श्रीनाथ परतोनि गंगेसी । सचैल स्नानासी करितसे ॥ १३० ॥ धोत्रें वाळवोनि कृपामूर्ती । कपाळीं लावी द्वारावती । मग जावोनि सदनाप्रती । भोजन सारिती संतोषें ॥ ३१ ॥ माहारिणीचें पोर साचार । एकनाथें बैसविलें खांद्यावर । क्षेत्रवासी धरामरें । त्यांसि अणुमात्र विदित नसे ॥ ३२ ॥ श्रीपांडुरंगाची इच्छा निश्चिती । नाथाची प्रकट व्हावी कीर्ती । यास्तव देवें रचिली युक्ती । ते सादर श्रोतीं परिसिजे ॥ ३३ ॥ एक सज्ञान होता ब्राह्मण । गलित कुष्ट झाला त्याज कारणें । तेणें पश्चाताप धरोनि मनें । त्र्यंबकेश्वरी अनुष्ठान करीतसे ॥ ३४ ॥ महा पापाच्या योगें करून । शरीरीं रोग उद्भवला दारुण । मग देह आरोग्य व्हावया कारण । कामानिक अनुष्ठान करितसे ॥ ३५ ॥ अन्न त्यजूनि निःशेषें । कंदमूळ मात्र भक्षीतसे । यथाविधि अनुष्ठान ऐसें । द्वादश वर्षें पैं केलें ॥ ३६ ॥ तों त्र्यंबकेश्वर येवोनि स्वप्नीं । काय सांगे तया लागुनी । गोदातीरीं प्रतिष्ठानीं । त्वरें करोनी जाय आतां ॥ ३७ ॥ तेथें एकनाथ वैष्णव-भक्त । ब्राह्मण सेवेसि असे रत । सर्वांभूतीं दयावंत । घडलें सुकृत एक त्यासी ॥ ३८ ॥ एकदां पायपोळी जाहली फार । त्यांत अनामिकाचें पडिलें पोर । तें नाथांनीं समजावोनि सत्वर । खांद्यावरी घेतलें ॥ ३९ ॥ मग नेऊनि घातलें मातेपासि । तें महा सुकृत


१ ओकणे. २ पश्चात्ताप. ३ दुसरे. ४ ब्राह्मण. ५ पुण्य.

घडलें त्यासी । तें पुण्य जरी देईल तुजसी । तरी अरोग होसी तत्काळीं ॥ ४० ॥ इतुका दृष्टांत देखोनि नयनीं । ब्राह्मण जागृत विस्मित मनीं । मग प्रतिष्ठानासि येऊनि । लोकां लागोनि पुसतसे ॥ ४१ ॥ येथें एकनाथ वैष्णव भक्त । कोणे ठिकाणीं असे निश्चित । तेव्हां स्नान करीत होते एकनाथ । लोक गंगेंत दाखविती ॥ ४२ ॥ मग जळांत प्रवेशोनि सत्वरी । वृत्तांत सांगे ते अवसरी । तुम्ही अनामिकाचें पोर खांद्यावरी । घेतलें तें पदरीं पुण्य असे ॥ ४३ ॥ श्रीत्र्यंबकराज उमाकांत । त्यांणीं निवेदिलें असें मातें । तेव्हां हास्यवदनें एकनाथ । काय बोलत तयासी ॥ ४४ ॥ आजन्मपर्यंत सुकृत । केलें असे तें देतों तूंतें । ब्राह्मण तयासि उत्तर देत । येव्हढें सामर्थ्य मज कैचें ॥ ४५ ॥ जे आज्ञा केली त्र्यंबकेश्वरें । तितुकेंचि द्यावें साचार । मग एकनाथें घेऊनि नीर । घातलें साचार हातीं त्याच्या ॥४६॥ गलित कुष्ट जावोनि सत्वर । सुंदर जाहलें त्याचें शरीर । तेव्हां तो करीत नमस्कार । लोक सर्वत्र पाहती ॥४७॥ क्षेत्रवासी नारीनर अवघे करिती नमस्कार । थोरथोर प्रतिष्ठित द्विजवर । बोलती उत्तर एकमेकां ॥४८॥ म्हणती नाथाची अघटीत रीत । दुरितांचें करितों सुकृत । ऐसें म्हणोनि द्वीज समस्त । जाहले विस्मित मानसीं ॥ ४९ ॥ एके दिवसीं भाविक भक्त । नाथासि विनविती उद्धवा सहित । एकादश स्कंध जे भागवत । केलें प्राकृत स्वामींनीं ॥ १५० ॥ आपल्या मुखें त्याचें श्रवण । करावें ऐसा हेत परिपूर्ण । श्रोतयांचें अंतर देखोन । अवश्य म्हणे श्रीनाथ ॥५१॥ सुमुहूर्त पाहोनि एके दिवसी । प्रारंभ केला भागवतासि । भाविक प्रेमळ क्षेत्रवासी । येती श्रवणासी सर्व तेव्हां ॥ ५२ ॥ तृतीय प्रहर दिवस राहे । तेव्हां पुराणासि प्रारंभ होय । नाथ मुखींची वाणी अक्षय । श्रोते तन्मय होताती ॥ ५३ ॥ आणिक कौतुक जाहलें थोर । तें सादर परिसा भाविक चतुर । स्त्रीचें रूप धरोनि सुंदर । गंगा सत्वरें येतसे ॥५४॥ लावण्य वेल्हाळ सुकुमार । वस्त्रें भूषणें अलंकार । तिज ऐसी कामिनी सुंदर । न दिसे साचार ते ठायीं ॥ ५५ ॥ ऐशारूपें ते विष्णु कुमारी । येवोनि बैसे नाथा समोरी । आणिकही स्त्रियां असती परी । इची सरी नये कोणा ॥५६॥ नाथ मुखाची रसाळ वचनें । एकाग्र चित्तीं करीत श्रवण । फाकों न देचि मन । विसरे देहभान ते समयीं ॥ ५७ ॥ जेव्हां भक्ति रहस्य कथा लागत । तेव्हां गंगेसि प्रेम येतसे बहुत । नेत्रीं ढाळती अश्रुपात । लोक समस्त पाहती ॥ ५८ ॥ श्रोतयांत दुर्बुद्धि होते कोणी । विकल्प पातला त्यांचे मनीं । म्हणे हे सुंदर कामिनी । आली कोठोनी कळेना ॥ ५९ ॥ प्रतिष्ठान क्षेत्रांत पाहीं । मागे देखिली नव्हती कधीही । नित्य नेमें येतसे समयीं । आस्था जीवी धरोनियां ॥ १६० ॥ स्त्रियांचा समुदाय टाकून । वेगळीच बैसे आसन घालून । सौभाग्यवति वय तारुण्य । बोले न वचन कोणासी ॥ ६१ ॥ नाथाकडे पाहोनि निश्चिती । अवधान देतसे निज प्रीती । ऐसा विकल्प आणितां दुर्मती । प्रगटली वदंती गांवांत ॥ ६२ ॥ कैसी आहे सुंदर कामिनी । ते पाहावी आपुले नयनीं । श्रवणाचें मिषें करोनी । आणिकही कोणी मग येती ॥ ६३ ॥ ऐसे लोटले बहुत दिवस । ग्रंथही आला समाप्तीस । तों कुटिळांचें ऐसें

१ निरोगी. २ पापांचे. ३ पुण्य. ४ ब्राह्मण. ५ निमित्त.

मानस । कीं ठिकाण असें कोठें इचा ॥ ६४ ॥ पुराण समाप्त झालिया त्वरेनें । इज मागेंच जावें आपण । कोठें आहे ठाव ठिकाण । हें ध्यानांत दुरोन आणावें ॥ ६५ ॥ आपुले घरिंची घरस्वामिण । कीं माहेरीं आहे कामिने । किंवा आहे सासुरवासिण । न पुसतां उठोन येतसे ॥ ६६ ॥ ऐसा निश्चय करितां दुर्मती । तों जाहलीसे पुराण समाप्ती । गंगेनें नाथासि नमस्कार प्रीतीं । सप्रेम युक्ती मग केला ॥ ६७ ॥ श्रीनाथ स्वरूप आणोनि ध्यानी । सत्वर निघाली तये क्षणीं । तंव कुटाळ चालिले मागोनी । डोळा घालोनी एकमेकां ॥ ६८ ॥ मागें पुढें चालती एक । ध्यानासि आणिती कौतुक । तों विष्णुकन्या सुलक्षणिक । पातली सुखें गंगातीरीं ॥ ६९ ॥ घोट्या-इतुकें गंगेचें नीरें । ते स्थळीं क्षण एक जाहली स्थिर । स्वहस्तें आचमन करोनि बरें । अदृश्य सत्वर मग होय ॥ १७० ॥ जैसी मेघमंडळी सौदामिनी दिसे । ते देखतां निमिषांत लोपतसे । तैसेंचि प्रगटोनि निज तेजास । जाहली अदृश्य ते ठायीं ॥ ७१ ॥ कुटिळ समजले आपले मनीं । म्हणती हे गोदा समुद्रगामिनी । स्त्रीचेंरूप प्रत्यक्ष धरोनी । भागवत श्रवणीं येतसे ॥ ७२ ॥ आपण मंद बुद्धि साचार । विकल्पें विटाळलें निज अंतर । श्रीनाथ विष्णूचा अवतार । मानवी साचार न म्हणावा ॥ ७३ ॥ कांच कुदिकेंत अमृत जाण । तें विषय ध्यानें पाहिलें दृष्टीनें । तयासि भासलें मद्यपान । तैसेंचि कारण घडलें कीं ॥ ७४ ॥ ऐसा पश्चात्ताप धरोनि मनें । मग ते करिती संध्या वंदन । आपुल्या घरासि गेले त्वरेनें । विस्मित मन होऊनियां ॥ ७५ ॥ दुसरे दिवसीं तृतीय प्रहरीं । श्रवणानि आले नाथाचें घरीं । स्वामीसि नमस्कार करोनि सत्वरी । आसनावरी बैसले ॥ ७६ ॥ मग पुस्तक सोडोनिया त्वरित । क्षण एक वाट पाहतसे नाथ । म्हणती आमुचा श्रोता नयेचि निश्चित । उशीर बहुत लागला ॥ ७७ ॥ विकल्प धरिला होता ज्यांनीं । ते येऊनि लागती नाथाचे चरणीं । मग पश्चात्ताप धरोनि मनीं । वृत्तांत तेक्षणीं सांगत ॥ ७८ ॥ स्वरूपें सुंदर लावण्यसरिता । येथें नित्य येतसे श्रवणार्था । आम्हीं विकल्प आणोनि चित्तां । मागें शोधार्थ मग गेलों ॥ ७९ ॥ तंव ते जावोनि गंगेंत । अदृश्य जाहली तेथील तेथें । तरी साक्षात गंगा होती निश्चित । समजलें वित्तांत आमुच्या ॥ १८० ॥ आम्हीं दुर्बुद्धि भाग्यहीन । यास्तव विकल्प धरिला मनें । महादुरित घडलें तेणें । परी क्षमा करणें अपराध ॥ ८१ ॥ श्रीनाथ चित्तीं आनंदघन । म्हणती तुमचे पदरीं सुकृतपुर्ण । साक्षात जाहलें गोदा दर्शन । तेणें दुरितें भस्म झालें कीं ॥ ८२ ॥ आतां संशय न धरोनि चित्तांत । श्रवण करावें भागवत । तुमचा महिमा न वर्णवेचि सत्य । चरित्र अद्भुत देखिलें ॥ ८३ ॥ ऐशा रीतीं समजावोनि त्याला । मग पुराणासि प्रारंभ केला । ऐसी देखोनि नाथाची लीला । आनंद सकळां वाटला ॥ ८४ ॥ ज्याच्या श्रवणाची धरोनि आर्ती । साक्षात गोदा श्रवणासि येती । त्याची सत्कीर्ति महीपती । लिहितसे ग्रंथीं निजप्रेमें ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत वैष्णव भक्त । बाविसावा अध्याय रसाळ हा ॥ १८६ ॥ अध्याय ॥ २२ ॥ ॥ ओव्या ॥ १८६ ॥

१ स्त्री. २ पाणी. ३ भांडे. ४ पाप.


अध्याय २३
संत एकनाथ
हरि पंडित

श्रीगणेशाय नमः ।। संत चरित्रें ऐकतां श्रवणीं । तेणें महादोषांची होय धुनी । धन्य ते जीवनमुक्त प्राणी । जे एकाग्र होऊनि बैसती ॥ १ ॥ निजभक्त कथा ऐकतां साचार । तयासि सुकृत घडतसे फार । भोग भोगिता नाना प्रकार । परी ते न विसरे कल्पांतीं ॥ २ ॥ कर्म कांडांचीं तपें व्रतें । तींहीं आचरतां पुण्य घडतें । परी सौख्य भोगितां तें निश्चित । सरोनि जात क्षणमात्रें ॥ ३ ॥ आवडीनें ऐकतां भागवत कथा । तें तरी सुकृत न सरेचि सर्वथा । तरी ते प्राणी अंतीं तत्वता । सायुज्यता भोगिती ॥ ४ ॥ संत कथेची आवडी मोठी । धरोनि ऐकती कर्णसंपुटी । तो पडिला जरी महासंकटीं । तरी स्वये जगजेठी रक्षी तया ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथा श्रवणीं । ऐकिली तुम्हीं सभाग्य जनीं । कीं गंगेनें स्त्रीचें रूप धरोनी । ऐकिलें कानीं भागवत ॥ ६ ॥ कीं विकल्प द्वेषी होते नर । त्यांसही दाखविला चमत्कार । अनुतापें द्रवलें त्यांचें अंतर । मग करिती नमस्कार एकनाथा ॥ ७ ॥[यावरी कथा ऐकिजे चतुरीं । एक उदमी[2] होता नाथाशेजारीं । तो अभाविक अनाचारी । नाथाचें घरीं कदा नये ॥ ८ ॥ कधींही कोठें नायके पुराण । श्रवण न करी हरि कीर्तन । संनिध गंगा असोनि जाण । करितसे स्नान उष्णोदकें ॥ ९ ॥ स्नान संध्या पितृतर्पण । हेंही नये त्याजकारणें । दोन वेळा करी भोजन । कुटुंब रक्षण करितसे ॥ १० ॥ श्रीनाथें देखोनि तयाची चर्या । चित्तीं बहुत उपजली दया । म्हणती हा नरदेह प्राणी लाधलिया । अधोगती वायां जाईल कीं ॥ ११ ॥ आमुचा शेजार लाधलियावरी । सद्वासना उपजे अंतरीं । कांहीं परमार्थ मोहोरे धरी । तो उपाय सत्वरी करावा ॥ १२ ॥ ऐसें म्हणोनि चित्तासी । मार्गीं जातां सांपडविलें त्यासी । स्वमुखें नमस्कार वाचेसी । म्हणोनि तयासी बोलत ॥ १३ ॥ नाथाच्या भिडेस्तव साचार । उभा राहिला क्षणभर । श्रीनाथ बोलती उत्तर । काय परिवार असे तुम्हां ॥ १४ ॥ काय व्यवसाय करता निश्चिती । कुटुंब रक्षण कवणे रीतीं । ऐकोनि गृहस्थ नाथाप्रती । काय वचनोक्ती बोलत ॥ १५ ॥ पुत्रकलत्र असती घरीं । राहतसों तुमचे शेजारी । एका व्यवसायाची करितो चाकरी । खिस्त निर्धारी घालितसे ॥ १६ ॥ मुशारा देतसे जें वेतन । काळ क्षेप करितसों तेणें । यावरी श्रीनाथ काय म्हणे । आतां एक मागणें असे तुम्हां ॥ १७ ॥ तो तरी विषयांध कृपण फार । चित्तीं भय उपजलें थोर । यास्तव न बोले प्रति उत्तर । जाणोनि अंतर नाथ वदती ॥ १८ ॥ तुम्हां पासोनि धनवित्त कांहीं । आम्हांसि प्राप्तीचीं इच्छा नाहीं । क्षणभर अवकाश करोनि पाहीं । कीर्तनास गृहीं येत जा ॥ १९ ॥ गृहस्थ म्हणे मज रिकामपण । नसेचि संसाराचिये भेणें । यावरी श्रीनाथ काय म्हणे । सांगतों वचन तें ऐका ॥२०॥ श्रीविष्णु सहस्रनामांतील जाण । एक श्लोक सांगतो तुम्हां कारणें । तितुका निज सुखें पाठ करणें । कृतकृत्य तेणें आम्हीं असो ॥२१॥ ऐकोनी श्रीनाथाची वाणी । तेव्हां भीड पडली त्याचें मनीं । मग पत्रावरी अक्षरें लेहुनी । तयाकडूनी वाचविती ॥ २२ ॥ पद्मकरें

१ ईश्वर. २ व्यापारी.

कुरवाळितां पाहीं । बुद्धि पालट ते समयीं । श्लोकार्णीं अक्षरें धरोनि जीवीं । पाठ लवलाहीं मग केला ॥ २३ ॥ मग दुसरे दिवशीं येवोन तत्त्वतां । दुसरा श्लोक पुसतसे नाथा । ऐसें कांहीं दिवस लोटितां । सहस्र नाम तत्वता पाठ केलें ॥ २४ ॥ श्रीनाथ सांगती तये क्षणीं । इतुका नेम धरावा मनीं । स्नान करोनि आसनीं । एकाग्र ध्यानीं बैसावें ॥ २५ ॥ तेव्हां कोणासि न बोलावें वचन । सहस्र नामाचा पाठ करणें । ऐकोनि गृहस्थ अवश्य म्हणे । तितुकें आचरण करितसे ॥ २६ ॥ तेणें बुद्धीचा पालट जाहला कांहीं । देव दर्शनासि येतसे गृहीं । नाथ चरण वंदोनि ते समयीं । मग कार्यासि लवलाहीं जात घरां ॥ २७ ॥ ऐसे लोटतां दिवस पार । तों तयासि जाहला नवज्वर । आयुष्य सरतां साचार । यमाकिंकर मग आले ॥ २८ ॥ आधीं वाचा खुंटली होती । यास्तव संबंधीं प्रायश्चित्त देती । स्नान घालितांचि तया प्रती । तों स्मरण चित्तीं जाहलें ॥ २९ ॥ विष्णु सहस्रनामाचा पाठ । करूं लागला धडधडाट । तेव्हां सकळ जाहले संतुष्ट । म्हणती अदृष्ट धन्य याचें ॥ ३० ॥ ऐकतां नामस्मरणाचा ध्वनी । यम दूत गेले पळोनी । मग विष्णु दूतीं सन्मान करूनी । वैकुंठ भुवनीं त्यासि नेलें ॥ ३१ ॥ जरी श्रीनाथें कृपा केली नसती । तरी तो जाता अधोगती । यास्तव कलियुगामाजी निश्चिती । अवतार संतीं घेतला ॥ ३२ ॥ करितां संताचा शेजार । तयासि घडे साक्षात्कार । क्षेत्रवासी जे नारीनर । ते परस्परें बोलती ॥ ३३ ॥ संत तेचि देवाधिदेव । सर्वथा नसती भिन्नभाव । नावेक वेष धरोनि मानव । लाघव अपूर्व दाविती ॥ ३४ ॥ अरोधें विरोधें श्रीएकनाथ । भक्तीसि जन लाविलें बहुत । छेदोनि सर्व पाखंडमत । वाढविला अद्भुत नाम महिमा ॥ ३५ ॥ गिरिजाबाई सुक्षेत्र जाण । प्रथम प्रसवली कन्या रत्न । गोदुबाई नामाभिधान । तिज कारणें ठेविलें ॥ ३६ ॥ तिचे पाठीवर पुत्र जाहला । हरि नाम ठेविलें तयाला । थोर होतांचि व्रतबंध केला । पढो लागला ब्रह्मशाळे ॥ ३७ ॥ तयाचे पाठीवर कन्या पाहीं । तिचें नाम गंगाबाई । दीधली असे कवणे ठायीं । वृत्तांत तोही अवधारा ॥ ३८ ॥ एक चिंतोपंत नामें निर्धारीं । गृहस्थ होता प्रतिष्ठान क्षेत्रीं । गोदुबाई ज्येष्ठ कुमरी । त्याचें घरीं दीधली ॥ ३९ ॥ आणि कर्णाटक देशांत । जुना सोयरा नांदे गृहस्थ । गंगाबाई त्याच्या पुत्रातें । देवोनि त्वरित लग्न केलें ॥ ४० ॥ गंगाबाईस पुत्र जाण । पुंडाजी त्याचें नामाभिधान । तोही करीत विष्णु भजन । निजप्रीतीनें आपुल्या ॥ ४१ ॥ असो हरिपुत्र एकनाथास । त्याची प्रज्ञा बहु विशेष । सकळ विद्यांचा अभ्यास । केला असे तयानें ॥ ४२ ॥ तो षट्शास्त्रीं जाहला निपुण । वरिष्ठ ब्राह्मण[1] करिताति मान । हरि पंडित नामाभिधान । त्याज कारणें बोलती ॥ ४३ ॥ प्रतिष्ठानींचे थोर थोर विप्र । तयासि स्तविती वारंवार । म्हणती पितया परीस साचार । प्रज्ञा थोर पैं याची ॥ ४४ ॥ एकनाथ सत्पुरुष होऊनि जनीं । महाराष्ट्र गातसे गाणी । तीं स्त्रीया शूद्र ऐकतां मनीं । तन्मय होउनी राहती ॥ ४५ ॥ प्राकृत वाणीं नाथ गावोन । भोंदिले अवघे भाविक जन । तेणें लोपली

१ ब्राह्मण.

होती संस्कृत पुराणें । तो जीर्णोद्धार याणें केला कीं ॥ ४६ ॥ मृत्तिके पासोनि होय सुवर्ण । त्याचें श्रीमंत करिती भूषण । तैसाचि हरी पंडित जाण । जाहला पित्याहोन विशेष ॥ ४७ ॥ कां पाषाणा पासोनि सत्वरा । निपजे जैसा दिव्य हिरा । तैसाचि हरि पंडित खरा । आमुच्या अंतरा विंवलें ॥ ४८ ॥ नातरी गांभीर्यें दिसतो सागर । परि पाणी असे वहुत क्षार । तयाचा पुत्र तेजस्वी चंद्र । अमृत तुषार त्या माजी ॥४९॥ तेवीं एकनाथाचें उदरीं जाण। हरि पंडित निपजलें रत्न । षट्शास्त्री निपुण ब्राह्मण । आम्हासि मान्य सर्वस्वें ॥५०॥ ऐशा परि ते द्विजवर । दृष्टांत देवोनि थोर थोर । नाथासि निंदिती वारंवार । स्तविती साचार पुत्रासी ॥ ५१ ॥ आधींच विद्याभिमान चित्तीं । त्याही वरी निंदकाची संगती । विकल्पें अंतर विटाळलें निश्चिती । म्हणे वारंवार कीति ऐकावें ॥ ५२ ॥ म्हणे मी षट्शास्त्री निपुण पंडित । आणि पिता ग्रंथ वाचितो प्राकृत । प्रतिष्ठित ब्राह्मण क्षेत्रांत । लज्जा तयांत मज वाटे ॥ ५३ ॥ ऐसें म्हणोनि निज अंतरीं । म्हणे देशत्याग करावा सत्वरीं । जावोनि राहावें काशीपुरीं । विचार निर्धारीं केला असे ॥ ५४ ॥ हरि पंडितासि तिघे पुत्र । दोघे घेतले वरोवर । कांतें सहित साचार । काशीपुर पावला ॥ ५५ ॥ धाकुटा पुत्र सुलक्षण । राघोवा तयासि नामाभिधान । नाथा जवळी राहीला जाण । निज प्रीतीनें आपुल्या ॥ ५६ ॥ मायवापाची न करी खंती । आज्या जवळी अहोरातीं । लहान काम करिता प्रीतीं । उल्हास चित्तीं तयाच्या ॥ ५७ ॥ कीर्तन करितां नाथाप्रती । टाळ घेतसे आपल्या हातीं । गाऊं लागतसे निजप्रीतीं । आश्चर्य करिती जन लोक ॥ ५८ ॥ गोपाळ कालियांत साचार । दावित हावभाव प्रकार । श्रीनाथाचें वचन निरंतर । पाठांतर करीतसे ॥५९॥ एकांत पाहोनि एके दिनीं । विनयें मस्तक ठेविला चरणीं । श्रीनाथांचा अनुग्रह कानीं । लहानपणीं संपादिला ॥ ६० ॥ सद्गुण देखोनि ऐशारीतीं । परस्परें लोक स्तविती । म्हणती श्रीनाथाची महंती । हाचि निश्चिती आवरील ॥ ६१ ॥ अधिष्ठान आवरावया योग्य जाण । उत्तम दिसती यांचीं लक्षणें । पिता आपुल्या विद्याभिमानें । पांडेतपण करीतसे ॥६२॥ ऐसे भाविक ते अवसरीं । वोलत असती आपुलें घरीं । इकडे हरी पंडित काशीपुरीं । सहपरिवारीं राहिला ॥ ६३ ॥ षट्शास्त्री वक्ता ब्राह्मण । यास्तव मिळालें वहुत धन । महाक्षेत्रांत वाडा वांधोन । काशीवास तेणें मग केला ॥ ६४ ॥ इकडे प्रतिष्ठान क्षेत्रीं एकनाथ । श्रीहरि कीर्तन नित्य करित । भक्तांसि लाविले जन समस्त । आज्ञा वंदित नाथाची ॥ ६५ ॥ एकदां एकांतीं वैसोनि आपण । विचार करिती निज मनें । सर्व क्षेत्रवासी जन । श्रीकृष्ण भजन करिताती ॥ ६६ ॥ परी कर्मठतेचा अभिमान वहुत । हरि पुत्रासि राहिला निश्चित । दीपका तळीं अंधार वहुत । तैसीच मात हे झाली ॥ ६७ ॥ तरी आपण निजांगें जावोनियां तेथें । तयासि घेऊनि यावें येथें । इतुकेन आपुलें अवतार कृत्य । करावें समाप्त निज निष्ठा ॥६८॥ पाणियांत कठीण राहिली गार । तैसाचि दिसतो हा विचार । तरी कांहीं दाखवोनि

चमत्कार । लाविजे निजपुत्र भक्तीसी ॥ ६९ ॥ ऐसा निश्चय करोनि अंतरीं । श्रीनाथ गेले काशी पुरीं । स्नान करोनि मणिकर्णिकातीरीं । मग विश्वेश्वरी भेटले ॥ ७० ॥ हरि पंडिताचें घरीं । चालोनि येतसे सामोरी । नमस्कार करोनि सत्वरीं । प्रीति पडिभारी भेटले ॥७१॥ आसन घालोनियां पाही । पितयासि बैसवी त्या ठायीं । पूजा उपचार करोनि सर्वही । संतोष जीवीं पावला ॥ ७२ ॥ पूसिले कुशळ वर्तमान । या वरी सारिलें भोजन । श्रीनाथ घरीं आले चालोन । जाहलें समाधान यास्तव ॥७३॥ तें स्थळीं क्रमिले दिवस फार । तोंवरी सेवेंत असे पुत्र । पूर्वीं भागवत करितां जाहलें चरित्र । तें लोक सर्व सांगती ॥ ७४ ॥ महंत संन्यासी मठांतरीं । तो हरि पंडितासि बोध करी । श्रीनाथ आज्ञेनें सत्वरी । तुम्हीं निरंतरी वर्तावे ॥ ७५ ॥ हा नव्हेचि जाण मानवी नर । साक्षात विष्णुचा अवतार । आम्हीं ही छळणा केली फार । परी लीला अपार पैं याची ॥ ७६ ॥ यावरी म्हणे तरी पंडित । मी काय आज्ञे विरहित । ऐसें म्हणोनि त्वरित । येत सदनांत आपुल्या ॥ ७७ ॥ बहुत दिवस लोटतां जाण । श्रीनाथ पुत्रासि एकांती म्हणे । आतां उत्तर वय आमुचें पूर्ण । संनिध प्रयाण पैं असे ॥ ७८ ॥ उरलें आयुष्य तुझे संगती । क्रमावें ऐसा हेत चित्तीं । तुजवीण न गमे येथें निश्चिती । वाटतसे खंती चित्तांत ॥ ७९ ॥ तूं तरी सत्पुत्र एकुलता एक । आम्हासि जोड नसेचि आणिक । आतां प्रतिष्ठानाशि येतां देख । वाढेल लौकिक बहुत तेणें ॥ ८० ॥ क्षेत्रीं घरवाडा बांधिला थोर । तरी तेथें ठेवावे दोघे पुत्र । तेथील अधिष्ठान साचार । तुवां निरंतर आवरावें ॥ ८१ ॥ श्रीनाथ वाणी ऐकोनि पाहे । मग हरि पंडित म्हणतसे काय । एक मागणे स्वामीस आहे । परी तें न होय तुमचेनी ॥ ८२ ॥ तुम्हीं न करावें परान्न भोजन । आणि प्राकृत न वाचिजे पुराण । ह्या दोन गोष्टी कराल मान्य । तरी होईल येणें आमुचें ॥ ८३ ॥ श्रीनाथ तों स्वसंतोष भरित । सर्वथा न करी आग्रह किंचित । म्हणती जैसें तुझें मनोगत । तैसेंच निश्चित आम्ही वर्तो ॥ ८४ ॥ निज पुत्रासि देतां वचन । तयासि जाहलें समाधान । उभयतां निघाले तेथून । निजप्रीतीनें आपुल्या ॥८५॥ स्वच्छंदेंचि क्रमितां पंथ । पावले प्रतिष्ठान क्षेत्रांत । लोकासि आनंद वाटला बहुत । सामोरे येत भेटावया ॥ ८६ ॥ श्रीनाथ आगमन नेत्र कमळीं । होतां भाविकांसि दिवाळी । नमस्कार करोनि तयेवेळीं । खेळीमेळी भेटले ॥ ८७ ॥ ऐसे प्रवेशले निज सदनीं । भाविकांसि आस्था असे मनीं । कीं कीर्तन होईल आजिच्या दिनीं । परी निवांत आसनीं बैसले ॥ ८८ ॥ दुसरे दिवसी हरि पंडित । पुराण सांगे संस्कृत । भाविक सज्ञानी मिळाले बहुत । प्रारंभ होत ते दिवसीं ॥ ८९ ॥ श्रीनाथ निवांत घालोनि आसन । श्रवण करितसे निजप्रीतीनें । परी नाथ मुखीचीं ऐकावीं वचनें । हा हेत पूर्ण अबाधियांचा[1] ॥ ९० ॥ परी हरि कीर्तन प्राकृत ग्रंथा । हें वर्जोनि आणिलें हरि पंडिता । परान्न सेवीत नाहीं आतां । फांकली वार्ता नगरांत ॥ ९१ ॥ परी भाविकांसि चिंता वाटे दारुण । म्हणती प्राक्तन आमुचें फुटकें हीन ।

१ नशिब.

म्हणोनि प्राकृत ग्रंथ नाथें वर्जोन । संस्कृत पुराण ऐकती ॥ ९२ ॥ स्त्रिया शूद्र इतर जाती । उमज न पडेचि तयांप्रती । पुराण होतां उठोनि जाती । नित्य नेम वर्जिती ते एक ॥९३॥ श्रीनाथ पुराण होते वाचित । तेव्हां वाडा भरोनि निघत । दाहा पांच राहती नित्य । भणभणीत दिसत स्थळ तेव्हां ॥ ९४ ॥ सकळांचें अंतर जाणे नाथ । म्हणती भक्तीसि पडिलें अंतर वहुत । तंव आणिक चरित्र वर्तलें तेथ । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥ ९५ ॥ प्रतिष्ठान क्षेत्रीं साचार । तेथें धनवंत होता एक द्विजवर । त्याच्या कांतेनें साचार । रुक्मिणीवर नवसिला ॥ ९६ ॥ कीं आम्हांसि पावसी जगज्जीवना । तरी मी घालीन सहस्र भोजना । ऐसा संकल्प करितांचि जाणा । तो वैकुंठराणा पावला ॥९७॥ पुढें पूर्वप्राक्तनें निश्चित । धन तों जाहलें वाताहत । भ्रतारही तिचा मरोनि जात । दरिद्रही येत तिजलागीं ॥९८॥ देह संरक्षणार्थ साचार । नित्य पावीजे अन्नवस्त्र । मग पाणी देवोनि घरोघर । पैसे चार मेळवीतसे ॥९९॥ ऐशा रीतीं ते ब्राह्मणी । काळक्षेप करीतसे प्रतिष्ठानीं । नाथाच्या घरीं नित्य येवोनी । पुराण कानीं ऐकतसे ॥१००॥ तों एक सज्ञान भाविक ब्राह्मण । तयासि सांगे जीवींची खूण । म्यां नवस केला मागें जाण । कीं सहस्र भोजन घालवें ॥ १ ॥ प्रारब्धाची विचित्र गती । वाताहत झाली सर्व संपत्ती । त्याहीवरी वैधव्य पातलें अंतीं । अन्न वस्त्र निश्चिती मिळेना ॥ २ ॥ घरोघरीं देवोनियां पाणी । काळक्षेप करीं ये ठिकाणी । परी देवाचें ऋण आठवे मनीं । तें कैसें घडोनि येईल ॥३॥ ऐसें ऐकोनि तिचें उत्तर । काय म्हणतसे तो द्विजवर । एक ब्रह्मनिष्ठ जेविला जर । तरी पुण्यासि पार असेना ॥४॥ ज्यासि वेदाक्षर नयेचि साचार । आणि नुसताचि शिकला गायत्री मंत्र । ऐसे ब्राह्मण जेविले शंभर ॥ आणि एक बरोवर वैदिक ॥ ५ ॥ असे ग्रंथत्रयांची ज्यासि आवृत्त । ऐसे ब्राह्मण जेविले शत । त्यांमाजी एक ग्रहपंडित । अर्थ वेदांत जाणता ॥ ६ ॥ वेदांत ज्ञानियाहोनि शत गुणी । जरी एक ठेविला अनुष्ठानी । जो बोलिला ऐसा आचरे कोणीं । त्याच्या दर्शनीं दोष जाय ॥ ७ ॥ तयाहोनि शत गुणी निश्चित । एक पूजितां इंद्रियाजित । जो शमदम साधनें आचरत । शुचिष्मंत सर्वदा ॥ ८ ॥ ऐसे इंद्रिय जित शत । घरीं जेवितां जें सुकृत । त्यांतल्या एक विष्णुभक्त । जो मत्सर रहित द्वेष न करी ॥ ९ ॥ जयासि शत्रूमित्र समान । जनार्दन रूप भासती जाण । त्या एकनाथासि घालितां भोजन । तरी लक्ष ब्राह्मण जेविले ॥ ११० ॥ ऐसें सांगता गृहस्थ प्रीती । ब्राह्मणीं संतोष पावली चित्तीं । मग तें जावोनि सदनाप्रती । साहित्य निश्चिती करीतसे ॥ ११ ॥ एकनाथ लीलावतारी । भोजनासि आणावा आपुलें घरीं । पक्वान्नें घालावी नानापरी । हेत अंतरीं धरियेला ॥१२॥ दुबळा संसार दुबळी ब्राह्मणी । धन धान्य कांहींच नसे सदनीं । मग लोकांचे वाहोनि पाणी । द्रव्य प्रतिदिनीं सांचवीतसे ॥१३॥ गहूं तांदुळ डाळ घृत[1] । घेऊन ठेवीत मंदिरांत । वडे पापडही स्वहस्तें । वळवटे बहुत ती केली ॥ १४ ॥ शाखा पत्रें गूळ जाण । साहित्य ठेवीत सर्व आणून । मग त्या गृहस्थासि सवे घेऊन । गेली आमंत्रण द्यावया

१ तूप.


॥ १५ ॥ तों हरिपंडित पुराण सांगत । श्रीनाथ सर्वे श्रवण करित । तें समाप्त होय तोंपर्यंत । बैसले निवांत ते समयीं ॥ १६ ॥ पुराण जाहलिया निश्चित । हरिबा उठोनि जात घरांत । गृहस्थ येऊनि ब्राह्मणी सहित । विनंति करित श्रीनाथा ॥ १७ ॥ सांगितलें साद्यंत वर्तमान । इथें राहिले सहस्त्र भोजन । तुम्हीं मूठभरी भक्षितां अन्न । तरी लक्ष ब्राह्मण जेविलें ॥ १८ ॥ देखोनि निजभावार्थ । श्रीनाथ स्वमुखें आज्ञा करित । हरिबा गेलासे मंदिरांत । जावोनि विचारा ॥१९॥ ऐसी ऐकोनिया मात । उभयतां गेलीं भीत भीत । घरांत बैसला हरिपंडित । तयासि वृत्तांत सांगीतला ॥१२०॥ मग क्रोधयुक्त होऊनि मनीं । ब्राह्मणीस झिडकरी तयेक्षणीं । महायात्रा केली त्याणीं । परान्न तैंहूनी वर्जिलें ॥२१ ॥ कठिण शब्द ऐकतां कानीं । निराशा वाटली तिचे मनीं । नाथापासी मागुतीं येऊनी । हात जोडोनी उभी असे ॥ २२ ॥ तयाच्या चित्तासि नाहीं येत । आणि माझी तों आर्त आहे बहुत । प्रेमें वाहती अश्रुपात । कंठ सद्गदित जाहला ॥ २३ ॥ श्रीनाथासि संकट बहुत । इचें तों प्रेमभरित आर्त । मग पुत्रापासी जावोनि त्वरित । म्हणती इचा हेत पूर्ण करी ॥ २४ ॥ हरिपंडित म्हणतसे ताता । दीधलें वचन सांभाळी आतां । मी जाणोनि तुमच्या मनोगता । आलों मागुता या क्षेत्रीं ॥ २५ ॥ श्रीनाथ वचन पुत्रासि बोलत । तूं स्वहस्तें करी पाक निष्पत्त । आपण उभयता जेवूं तेथ । तेणें पुरेल आर्त पैं इयेचें ॥२६॥ तुजसी दीधलें भाक वचन । तयासि अंतर न पडेचि येणें । आणि इचाहि नवस होईल पूर्ण । अनाथ दीन म्हातारी ॥ २७ ॥ नाथाच्या भिडेस्तव जाण । हरिपंडित अवश्य म्हणे । एकनाथ बाहेर बैसले येऊन । मग विनवित ब्राह्मणी काय तेव्हां ॥ २८ ॥ वडे पापड वळवटातें । केलें असे म्यां आपुल्या हातें । षण्मास जपत होतें निश्चित । ते सायास व्यर्थ गेले कीं ॥ २९ ॥ तूं भावाचा भुकेला साचार । लीलाविग्रही अवतार । आतां माझा जेणें हेत पुरे । तोचि विचार सांगा स्वामी ॥ १३० ॥ ऐसी तिची सप्रेम ग्लांती । देखोनि नाथ संतोष चित्तीं । म्हणती त्वां वळवट केलें प्रीतीं । तें आपुले हातें पाक करी ॥ ३१ ॥ आम्ही पंचप्राणाहुती घेतल्यावर । मग तूं आपले घरचे वाढी प्रकार । ऐकोनि श्रीनाथाचें उत्तर । मग आनंद थोर तिसी झाला ॥ ३२ ॥ एकनाथ म्हणतसे पडिपाडे । जैसी तुझी असेल आवड । तेंचि आम्हांसि लागे गोड । आणिक चाड असेना ॥ ३३ ॥ ऐसी ऐकतां अमृतवाणी । उल्हास जाहला तिचे मनीं । मग आपुल्या सदनासि जाऊनी । शाखा निसोनी ठेविल्या ॥ ३४ ॥ मग उषःकाळीं उठोनि जाण । केलें सडा संमार्जन । पात्रें धुवोनि ठेविलीं तिणें । मग केलें स्नान गंगातीरीं ॥ ३५ ॥ एकट दुर्बळ म्हातारी । पाणी वाहोनि ठेविलें घरीं । कवाड आडकोनि ते अवसरीं । गेली घरीं नाथाच्या ॥ ३६ ॥ हरिपंडितासि करोनि नमन । म्हणे सर्व साहित्य आलें करोन । आतां आपण तेथवर येऊन । मनोरथ पूर्ण करावा ॥ ३७ ॥ श्रीनाथ पुत्रासि आज्ञा करिती । तुवां करावी पाक निष्पत्ती । आम्ही मागूनी निश्चिती । सत्वर गती येतसों ॥ ३८ ॥ मग हरिपंडित सत्वर ।

जाय ब्राह्मणीच्या बरोबर । स्नान करोनियां सत्वर । स्वयंपाक साचार करीतसे ॥ ३९ ॥ जो जो पदार्थ स्वयें करणें । अवगत असे याजकारणें । तितुकें साहित्य देई आणोन । निजप्रीतीनें आपुल्या ॥ १४० ॥ सर्व अनुकूळ देवोनि त्यासी । मग आपण निघाली स्वयंपाकासी । अंतरभाव कळला नाथासी । म्हणती बोलवूं यावयासी कोणी नसे ॥ ४१ ॥ जैसा विदुराचिये घरीं । न बोलावितांचि जाय श्रीहरी । तैशाच परी ते अवसरीं । पातले घरीं एकनाथ ॥ ४२ ॥ तिणें स्नानासि दीधलें जीवनं । तों वैश्वदेव केला हरिपंडितानें । आपुले हातें करूनि त्याणें । पात्रें दोन वाढिलीं ॥ ४३ ॥ सद्यस्तप्त वाढितां घृत । ब्राह्मणीसी बोलावी श्रीनाथ । भोक्ता जनार्दन म्हणवूनि निश्चित । संकल्प तिज हातीं सोडविला ॥ ४४ ॥ मग ध्यानांत आणूनि पांडुरंग मूर्ती । नैवेद्य दाखविला निजप्रीतीं । श्रीनाथ आपोशन करितां निश्चिती । प्राणाहूती घेतल्या ॥४५॥ पित्रापुत्रा दोघेजण । जेवावयासि बैसले जाण । म्हातारी घरांत जावोनि आपण । पदार्थ घेऊन येतसे ॥ ४६ ॥ अन्न आणोनि परातभर । ठेविलें श्रीनाथासमोर । पुरणपोळिया अरुवार । वाढीत निजकरें आपुल्या॥४७॥ वडे तेल वरिया निर्द्धारीं । स्वहस्तें वाढिल्या नवक्षीरी । श्रीनाथ कांहींच अनमान न करी । जेवीत लवकरी लगबगे ॥ ४८ ॥ ऐसें कौतुक देखोनि थोर । तिसी संतोष जाहला फार । जेवी भिल्लणीचीं बोरें भक्षित रघुवीर । तैसाचि विचार हा झाला ॥ ४९ ॥ ऐसें कौतुक देखोनि तेथ । रागें भरला हरिपंडित । आरक्त नयन वटारीत । दांत खात करकरां ॥ १५० ॥ म्हातारी तेव्हां जोडोनि कर । उभी राहिली नाथासमोर । म्हणे कृपा करोनि अनाथावर । मनोरथ साचार पुरविला ॥ ५१ ॥ हरिपंडित म्हणे चित्तांत । ऐसेंच होतें मनोगत । तरी माझे कासया भाजविले हात । क्रोध निश्चित नावरे ॥ ५२ ॥ म्हातारीकडे पाहूनि निश्चित । आरक्त नयन वटारित । करकरांत अधरें असे चावित । अंग कांपत थरथरां ॥ ५३ ॥ देवासि भक्ताचें अन्न गोड । आणि भक्तासी प्रीति जडली दृढ । एकमेकाचें आर्त गोड । कोणी त्याज वाकडे न पाहे ॥५४॥ क्रोध हाचि उन्मत हस्ती । आवरितां नावरेचि निश्चित । मग विवेक अंकुश करोनि युक्ती । आकळिला पंडितीं ते वेळे ॥ ५५ ॥ म्हणे पितयाची अमर्यादा करितां तरी । महादोष पडतसे माथा । ऐसा आठव धरोनि चित्तां । होय जेविता निजप्रीतीं ॥ ५६ ॥ असो यापरी एकनाथ । स्वानंदरसीं होतसे तृप्त । मग गंगाजळ प्राशूनि त्वरित । तेथेंचि आंचवत संसारा ॥ ५७ ॥ बैसावयासि म्हातारीनें । आधींच घातलें होतें आसन । विडे करोनि ठेविले होते दोन । आणि तुळसीपत्र विष्णुतीर्थं ॥ ५८ ॥ मुखशुद्धि घेतलीया जाण । श्रीनाथ पुत्रासि काय म्हणे । आपुलीं उच्छिष्ट पात्रें दोन । काढी त्वरेनें ये समयीं ॥ ५९ ॥ म्हातारी एकली एकट असे । दुसरें तो येथें कोणी नसे । तिजला स्नान करावयास । होईल अट्टहास पुढती ॥१६०॥ श्रीनाथें सांगतांचि ऐसें । मान देत पितृवचनास । हरिपंडितें घालोनि कास । मग पत्रावळीस उचलित

१ पाणी. २ ओंठ. ३ हत्ती.

॥ ६१ ॥ नाथाचें पात्र उचलोनि सत्वरी । ठेविलें आपुलें पात्रावरीं । तों दुसरेंही आणिक दिसे नेत्रीं । आश्चर्य अंतरीं करितसे ॥ ६२ ॥ म्हणे म्हातारीनें घरांतून । स्वामीप्रती आणिलें अन्न । तें दुसरें पात्र असेल जाण । या करितां उचलोन ठेविलें ॥ ६३ ॥ तों तिसरेंही दिसे तया तळीं । एकसारिख्याची पत्रावळी । विस्मित जाहला हृदय कमळीं । उचली तत्काळ लगबगें ॥६४॥ ऐसीं सहस्रावधीं उचलीं पात्रें । परी तीं न सरती साचार । मग पश्चात्ताप जाहला थोर । घालती नमस्कार नाथासी ॥ ६५ ॥ जोडोनियां बद्धांजळी । उभा राहिला तयेवेळीं । अश्रु दाटले नेत्रकमळीं । अष्टभाव जवळी ते आले ॥ ६६ ॥ म्हणे जय जयाजी पुराण पुरुषा । अव्यक्त निरंजना अविनाशा । लीला अवतारी सर्वेशा । वैकुंठाधीशा जगद्गुरू ॥ ६७ ॥ तुझा महिमा नेणेंचि मी पामर । अमर्यादा घडली थोर । तूं साक्षात विष्णु अवतार । निश्चय अंतर पाझरलें ॥ ६८ ॥ लीलाचरित्र आवरोनि आतां । मजवरी कृपा करावी ताता । ऐसा अनुताप धरोनि चित्तां । मग चरणीं माथा ठेविला ॥ ६९ ॥ श्रीनाथ आपुल्या कृपावरें । तयासि आश्वासीत करें । म्हणे बापा श्रमलासि थोर । तरी आणीक पात्रें न निघती ॥ १७० ॥ ऐसें अभय देतां श्रीनाथें । उच्छिष्टें सावरिली हरि पंडितें । सहस्र पात्रें उचलोनि ठेवित । मग ब्राह्मणीसि बोलत काय तेव्हां ॥ ७१ ॥ तुझें भाग्य अघटित जाण । श्रीनाथासि दीधलें आमंत्रण । सत्य घडलें लक्ष भोजन । अनुभव परिपूर्ण मज आला ॥७२॥ मग अष्टभावें दाटोनि म्हातारी । नाथासि सद्भावें नमस्कारी । म्हणे कृपा करोनि अनाथावरी । पावंन[1] निर्धारीं त्वां केलें ॥७३॥ हरिपंडित पितयासि म्हणे । मी षट्शास्त्रीं जाहलों निपुण । त्या विद्येच्या अभिमानें करोन । तुमचें महिमान[2] नेणेंचि ॥ ७४ ॥ आतां कृपा करोनि स्वामी समर्थे । जेथें असेल शुद्ध भावार्थ । तेथें आपण भोजनासि जावें निश्चित । आणि प्राकृत ग्रंथही वाचावे ॥ ७५ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं । उभयतां गेले आपुलें घरीं । म्हातारी अन्न घेऊनि पात्रीं । भोजनासि सत्वरी बैसली ॥ ७६ ॥ धन्य धन्य तिची भक्ती । जेथें एकनाथ पावले तृप्ती । त्याचें उच्छिष्ट महीपती । सेवितसे प्रीतीं निजप्रेमें ॥ ७७ ॥ स्वस्ति श्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । तेविसावा अध्याय रसाळ हा ॥ १७८ ॥
॥ २३ ॥ ओव्या ॥ १७८ ॥

१ पावित्र. २ माहात्म्य.


अध्याय २४
एकनाथ
एकनाथ

श्रीगणेशाय नमः । जय लीलाविग्रही पुरुषोत्तमा । सगुण मेघश्यामा । श्रीजगद्गुरु आत्मायारामा । नेणवेचि महिमा पैं तुझा ॥ १ ॥ तुवां भानुदास वंशीं साचार । प्रतिष्ठानीं घेतला अवतार । प्रगट करोनि नाना चरित्र । खळांसि चमत्कार दाविला ॥ २ ॥ आपणचि होऊनि देवभक्त । नाममहिमा वाढविला अद्भुत । द्वेषें[1] अथवा निज भावार्थे । उद्धरिले बहुत जड जीव ॥ ३ ॥ तुझी अनुपम लीला निश्चिती । न वर्णवेचि वैकुंठपती । जेथें शेषाच्या जीवाचि रती । तेथें मी किती मशकें[2] ॥ ४ ॥ जैसी तैसीं आरुष उत्तरें । वदोनि ग्रंथीं लिहितो अक्षरें । हीं अंगीकारावीं करुणाकरें । निज कृपावरें आपुल्या ॥ ५ ॥ मी माझे वक्तृत्व म्हणतों आता । हाही अपराध पंढरीनाथा । बुद्धीचा चालक तूं तत्त्वतां । नसेचि सत्ता आणिकाची ॥ ६ ॥ किंचित चित्त होतां व्यग्र । तेव्हां न मिळेचि एक अक्षर । तूं आठवण देतोसि वारंवार । यास्तव विस्तार ग्रंथासी ॥ ७ ॥ मजवरी निमित्त देवोनि श्रीपती । तूं आपली प्रख्यात करवितोसि कीर्ती । ऐसा निश्चय वाणला चित्तीं । अन्यथा मति हे नसे ॥८॥ सकल वक्तयां माजी देख । मी नेणता असें एक । ऐसें जाणती सकळ लोक । तूं करिसी कौतुक पांडुरंगा ॥ ९ ॥ तान्हें बालक बोबडया वचनीं । बोलतां कौतुक मानित जननी । तैशाच रीतीं कैवल्यदानी । मज आश्वासुनी गौरवावें ॥ ११० ॥ मागिले अध्यायीं कथा अद्भुत । विद्याभिमानी हरीपंडित । श्रीनाथाचे पात्र काढित । तो सहस्रावत निघालीं ॥ ११ ॥ परमश्रमीं जाहला मग । धर्मे दाटलें सर्वांग । मग निरभिमानी होऊनि अंगें । घालीत साष्टांग नमस्कार ॥१२॥ नाथासि विनवी जोडोनि हात । म्हणे तुम्ही विष्णु अवतार साक्षात । जेथे असेल शुद्ध भावार्थ । भोजनासि तेथें जा स्वामी ॥ १३ ॥ आणि तुम्ही आपुले स्वमतें करूनी । प्राकृत ग्रंथ वदला वाणी । तें वाचित जावे प्रतिदिनीं । म्हणोनि चरणीं लागला ॥ १४ ॥ ऐसें बोलतां निज पुत्र । घरासि सत्वर पातले नाथ । दोघां वांचुनि तिसऱ्यासि निश्चित । चरित्र विदित[3] हें नसे ॥ १५ ॥ तों ब्राह्मणी जेविलीं निजमंदिरीं । मग उच्छिष्ट पात्रें सहस्रावरी । बांधोनि घेतसे आपुलें शिरीं । गंगातीरी मग आली ॥ १६ ॥ ते स्थळीं लोक प्रतीष्ठानवासी । चरित्र निवेदन केलें त्यांसी । मग गंगाप्रवाही पत्रावळीसी । निज करेंसी सोडित ॥ १७ ॥ भाविक भक्त जे त्याजकारणें । बहुत संतोष जाहला मनें । म्हणती आतां नाथाचें होईल पुराण । आणि ऐकावें कीर्तन धनवरीं ॥ १८ ॥ ऐसें परस्परें लोक बोलत । मात प्रगटलीं नगरांत । हरि पंडित धरोनि भावार्थ । स्वयें पितृभक्त तो होय ॥ १९ ॥ श्रीनाथमुखींचें पुराण । एकाग्र बैसोनि करीत श्रवण । बहुत मिळती भाविकजन । हरिकीर्तन ऐकावया ॥ २० ॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । हरिबाचे नेत्रकमळीं । अश्रु तेवेळी येताती ॥ २१ ॥ टाळ विणा मृदुंग घोषें । नादब्रह्माचि आलें मुसें । नाममहिमा वर्णिला विशेष । श्रवणेंचि मानस सुखावे ॥ २२ ॥ हरि पंडित म्हणतसे मनीं । मागें चरित्रें

१ दुष्टांना. २ मच्छर, माझी. ३ माहीत.

जाहलीं पैठणीं । तेव्हां अज्ञान होतों बाळपणीं । परि कृपा स्वामींनीं आज केली ॥ २३ ॥ श्रीनाथ ऐश्वर्य नेणोनि थोर । विद्याभिमानें भुलले फार । या जगद्‌गुरुसि टाकोनि साचार । काशीपुर वसविलें ॥२४॥ जैसा द्वापर युगीं अर्जुनभक्त । श्रीकृष्णासि सोयरा म्हणत । मग विश्वरूप दाखवितां त्यातें । चित्तीं भासत जगदात्मा ॥ २५ ॥ हरिपंतासि तैसेंचि झालें तत्त्वतां । कीर्तनीं बैसत धरोनि आस्था । जाणोनि नाथाच्या मनोगता । सेवा स्वहितार्था करीतसे ॥ २६ ॥ आणिक चरित्रें रसाळ गहन । तीं सादर ऐका भाविकजन । गंगातीरीं एक कुग्राम जाण । ते स्थळीं ब्राह्मण एक होता ॥२७॥ ग्रामलेखक त्याची वृत्ती । दुर्बळ असे सर्वार्थी । पोटीं उदंड जाहली संतती । परी भक्षावया प्रती अन्न नाहीं ॥ २८ ॥ शेवटीं कुमर जाहला देखा । तो तरी वेडा बागडा मुका । गावबा नाम ठेविती बायका । तरी चरित्र ऐका तयाचें ॥ २९ ॥ तो दिवसेंदिवस जाहला थोर । पोरांत खेळे निरंतर । आठा वर्षांत आला कुमर । परी स्पष्ट उत्तर बोलेना ॥ ३० ॥ निदान जाणोनि पितयानें । तेव्हां व्रतबंध केला जाण । न म्हणे केशव नारायण । गायत्री उच्चारण मग कैंचें ॥ ३१ ॥ म्हणती पूर्व प्राक्तन साचार । शेवटील मुका जाहला पुत्र । अन्न जेवितो पोटभर । परी एकही उत्तर न बोले ॥ ३२ ॥ पदरीं दुरिताच्या होत्या कोटी । यास्तव समंध उपजला पोटीं । यासि कोण पोशील शेवटीं । चिंता पोटीं मायबापां ॥ ३३ ॥ पूर्व पापाचेनि योगें देख । पोटीं पुत्र होतसे मूर्ख । त्याचेनि वडिलांसि कैंचें सुख । दुःखदायक तो येणें ॥ ३४ ॥ तो कोणे एके दिवसीं जाण । ब्राह्मणे घरीं केला सण । घरीं घालोनियां पुरण । पोट भरोन जेविला ॥ ३५ ॥ दुसरे दिवसीं तये वेळीं । गावजी मातेसी मागे पोळी । तिणें ठेविली होती शिळी । काहाडोनि तत्काळीं देतसे ॥ ३६ ॥ तेही रात्र लोटलीयावर । गावजी न खाय भाजी-भाकर । खुणावोनि दाखवीत करें । म्हणे पोळी सत्वर मज देयीं ॥ ३७ ॥ माता झाली क्रोधायमान । पुत्रासि स्वहस्तें करी ताडण । म्हणे करंट्या पोटासि येऊन । खावयासि मिष्टान्न मागतोसी ॥ ३८ ॥ गावजी रडत लोळे धरणीं । मागुती उठला तये क्षणीं । मग मातेपासीं सत्वर जाउनी । पोळी खुणावोनी मागतसे ॥ ३९ ॥ जननीसि करुणा आली पाहे । म्हणे याच्या छंदास करूं काये । बाळासि हातीं धरोनि पाहे । पैठणासि लवलाहें ते आली ॥४०॥ जावोनि एकनाथाचें घरीं । सद्भावें स्वामीस नमस्कार करी । गावजीस घातलें पायांवरी । म्हणे यासि अंगिकारी दयाळा ॥ ४१ ॥ हा नव वर्षांचा झाला पाहे । परी एकही शब्द बोलतां न ये । खावयासि मिष्टान्न मागताहे । कोणता उपाय करावा ॥ ४२ ॥ आम्ही दुर्बळ अनाथ ब्राह्मण । कुग्राम वस्तीसि राहतों जाण । येथें नित्य होतसे संतर्पण । मिष्टान्न ब्राह्मण जेविती ॥ ४३ ॥ तुझें दयाळुपण ऐकोनि श्रवणीं । येथें आलें यासि घेउनी । श्रीनाथ बोलती अमृतवाणी । असोंदे सदनीं आमुच्या ॥ ४४ ॥ मग गिरिजाबाईस एकनाथ । स्वमुखें तेव्हां आज्ञा करित । याचा प्रतिपाळ करावा नित्य । लोभ

---

१ पालक.

चित्तांत धरोनि ॥ ४५ ॥ श्रीनाथ आज्ञेनें निश्चिती । गावजांस उदक दिधलें स्नानाप्रती । पात्र वाढोनि प्रीतीं । भोजनाप्रती बैसविला ॥४६॥ गावजीची माता ते समयीं । परम संतोष मानित जीवीं । श्रीनाथ श्रीनामि पुसोनि लवलाहीं । मग आपुले गांवीं तें आली ॥४७॥ भ्रतारासि सांगतसे देखा । नाथासि निरवूनी आलें मुका । आतां आपण ममता टाकूनि ऐका । लोभ लटका न करावा ॥ ४८ ॥ त्याचे चांगलें जन्मांतर । यास्तव उत्तम लाधलें घर । ऐशापरी मातापितर । संतोष थोर मानिती ॥ ४९ ॥ इकडे गावजीस एकनाथें । वस्त्रें दिधलीं आपुल्या हातें । तो दोहीं सांज भोजन करित । आणि मुलांत खेळत सर्वदा ॥ ५० ॥ मायबापांचा न होय आठव । ये स्थळीं रमला त्याचा जीव । मिष्टान्न मिळतसे अपूर्व । यास्तव अवयव पोसले ॥ ५१ ॥ तंव एके दिवसीं एकनाथ । एकांतीं बैसले देवघरांत । गावजीस बोलावूनियां तेथ । जप सांगत रामाचा ॥ ५२ ॥ परी तो मुका मूढ फार । वदनीं एकही नये अक्षर । मग एकनाथ बोलती उत्तर । नाम साचार काय आमचें ॥ ५३ ॥ तों तत्काळ तयासि फुटली वाणी । एकनाथ ऐसें बोले वचनीं । तोचि जप सांगती त्याजलागोनी । कृपे करोनी आपुल्या ॥ ५४ ॥ मग सुतळी आणोनियां फार । तयासि गांठी दीधल्या करें । म्हणती हाचि जप त्वां साचार । निरंतर करावा ॥ ५५ ॥ गावजीस भेटला सद्गुरुसखा । तैंहूनि तयासि लागला चुटका । खेळ खेळूं विसरला देख । सप्रेम सुखा तो भोगी ॥ ५६ ॥ आणिक शद्ब न बोलेचि कांहीं । मुकाचि असे सर्वांविषयीं । परी एकनाथाचा त्यासि पाहीं । छंद जीवीं लागलासे ॥ ५७ ॥ रसनाविषय होता फार । तोही जिंतिला साचार । अल्पचि सेवोनियां आहार । दिवस रात्र भजन करीं ॥ ५८ ॥ ऐसी देखोनि त्याची स्थिती । गांवींचे लोक आश्चर्य करिती । म्हणती नाथकृपा होतांच निश्चिती । पालटली वृत्ती पें याची ॥५९॥ गावजीची मातापिता । एक वेळ समाचारासि येतां । परी त्यांची न धरीत्र लोभ-ममता । न पाहे सर्वथा त्यांजकडे ॥ ६० ॥ ऐसे दिवस लोटतां कांहीं । तों चरित्र वर्तलें ते समयीं । एकनाथ आपुले देवगृहीं । ध्यानस्थ पाहीं असती ॥ ६१ ॥ तों श्रीराम प्रगट होवोनि तेथें । नाथासि स्वहस्तें सावध करित । मन नेत्र उघडोनि जंव पाहत । तों जानकीकांत देखिला ॥ ६२ ॥ अष्टभावें वोसंडत । प्रेमें चरणीं मिठी घालित । हृदयीं आलिंगिला रघुनाथ । प्रेमभरित तेधवां ॥ ६३ ॥ मग आज्ञा करीत रघुनंदन । श्रीवाल्मीकिकृत रामायण । त्यावरी करी प्राकृत लेखन । स्वमुखें करून आपुल्या ॥ ६४ ॥ ऐसें सांगतां आयोध्यापती । एकनाथ तयासि करी विनंती । सप्तकांड तुमची सत्कीर्ती । माझिये मतीं आकळेना ॥ ६५ ॥ तथापि शब्द बोलीलों आर्ष । तरी आयुष्य अवधी थोडीच असे । कैसा ग्रंथ जाईल सिद्धीस । संशय चित्तास वाटतो ॥ ६६ ॥ यावरी बोले रघुनंदन । स्नानसंध्या नित्य नेम जाण । तावन्मात्र अल्पचि करून । ल्याहावें रामायण सर्वदा ॥ ६७ ॥ तुझा सद्भाव प्रेमा अद्भुत । तीं मज वचनें आवडती

सत्य । यास्तव भावार्थ रामायण त्यातें । नाम त्वरित ठेवावें ॥ ६८ ॥ तुझ्या हृदयीं बैसोनि घननीळ । आठवण देईन सर्वकाळ । तुझिये स्वाधीन कळिकाळ । चिंता अळुमाळ न करावी ॥ ६९ ॥ ऐसें म्हणताचि रघुनंदन । मग एकनाथें वंदिले चरण । म्हणे तुझी आज्ञा मज प्रमाण । जोडया विण आन नसे ॥७०॥ इतुकें सांगोनि आयोध्यापती । अंतर्धान पावलें सत्वरगती । कीं एकनाथाचें हृदयीं निश्चिती । धरिली वस्ती रामचंद्रे ॥ ७१ ॥ यावरी सुमुहूर्त पाहूनि भला । रामायणासि आरंभ केला । भक्त भाविक प्रेमळांला । आनंद वाटला चित्तांत ॥ ७२ ॥ जितुका ग्रंथ होतसे नित्य । तितुका प्रत्यही श्रवण करित । अमृताहोनि रस उपजत । ऐकतां विसरत देहभान ॥ ७३ ॥ वाल्मिकिकृत श्लोक ग्रंथीं । त्यावरीं महाराष्ट्र टीका लिहिती । ऐकतांचि श्रोते तन्मय चित्तीं । सप्रेम होती जड मूढ ॥ ७४ ॥ प्रथमारंभी बाळकांड निश्चित । तें समातें केलें एकनाथें । यावरी अयोध्याकांड आरंभित । तेही सिद्धितें पावविलें ॥ ७५ ॥ त्यावरी अरण्यकांड जाण । वनवासा गेले रघुनंदन । किष्किंधाकांड पूर्ण । ग्रंथ संपूर्ण तो झाला ॥७६॥ त्यावरी सुंदरकांड निश्चिती । हनुमंतें अद्भुत केली ख्याती । सीता शुद्धी आणोनि निश्चिती । मग गेले रघुपती लंकापुरा ॥ ७७ ॥ मग युद्धकांडासि प्रारंभ निश्चित । स्वये केला श्रीएकनाथें । त्याचे चव्वेचाळीस अध्याय समाप्त होत । तों प्रयाणसमय सन्निध ये तेव्हां ॥ ७८ ॥ म्हणे आमुचा प्रयाण समयो तत्वता । संनिध पातलासे आतां । ऐसें एकनाथें सांगतां । भाविकांसि चिंता उद्भवली ॥ ७९ ॥ म्हणे स्वामीं मुखें करोन जाण । संपूर्ण व्हावें रामायण । युद्धकांडाची समाप्ति पूर्ण । झाली अझून नसे कीं ॥ ८० ॥ यावरी उत्तरकांड राहिलें समूळ । यास्तव वाटते हळहळ । तरी ग्रंथ सिद्धीसि नेऊनि समूळ । मग प्रयाणकाळ नेमावा ॥ ८१ ॥ ऐसी सद्भक्त करितां विनंती । मग तयांसि श्रीनाथ उत्तर देती । जे देहीं काळें नेमिली वस्ती । तरी ते निश्चिती चुकेना ॥ ८२ ॥ तंव श्रोते देती प्रति वचन । कृष्णदास लोल्या येतां शरण । त्याचें अकरा दिवस तुम्हीं चुकवोनि मरण । युद्धकांड संपूर्ण करविलें ॥ ८३ ॥ तैशाच रीती थांबवूनि काळा । ग्रंथ सिद्धीची दाखविजे सोहळा । स्वामींची ऐकोनि प्रेमकळा । संतोष सकळां होईल ॥८४॥ श्रीनाथ म्हणती ऐका वचन । काळासि शिक्षा करोनि जाण । आपुलें कवित्व सिद्धीसि नेणें । हें अश्लाध्य वाणें दिसतसे ॥ ८५॥ युद्धकांडाची पूर्णता । आणि उत्तरकांड तत्त्वतां । गावजी सिद्धीसि नेईल आतां । यासि अन्यथा असेना ॥ ८६ ॥ ऐसी श्रीनाथाची वैखरी । वदतां लोकांस आश्चर्य अंतरीं । म्हणती गावजी तो मुका जन्मवरी । कोणासि उत्तर न बोले ॥ ८७ ॥ तो कैसा वदेल रामायण । हे असत्य वाटे[1] आम्हांकारणें । श्रीनाथें गावजीस बोलावून । कृपादान मग करिती ॥ ८८ ॥ मस्तकीं हस्त ठेवोनि प्रीतीं । आपुली लेखणी तयासि देती । म्हणती आमुचे देहीं कवित्वस्फूर्ती । ते तुजप्रती असो कीं ॥ ८९ ॥ ऐसा होतांचि कृपावर । त्याचे बुद्धीसि तत्काळ झाला विस्तार । गावजीनें

---

१ थोडं देखील.

हातीं घेऊनि पत्र । ग्रंथीं अक्षरें लिहितसे ॥ ९० ॥ जैसें श्रीनाथाच्या ओवीचें मांडणें । तैसेंचि असे त्याचें बोलणें । एक अध्याय सिद्ध होतांचि जाण । भाविक जन ऐकती ॥ ९१ ॥ म्हणती नाथकृपेनें तत्काळ । मुकाही जाहला वाचाळ । बोलणेंही वाटे अति रसाळ । तरी ग्रंथही सकळ करील हा ॥ ९२ ॥ एकनाथाच्या देखतां जाण । एक अध्याय केला असे त्याणें । वरकड ग्रंथ मागून । सिद्धीसि संपूर्ण तो नेला ॥ ९३ ॥ असो फाल्गुन वद्य पंचमीचे रातीं । श्रीनाथें कीर्तन केलें निगुती । मग लोकांसि वाटूनि खिरापती । म्हणती आमुची विनंती एक ऐका ॥ ९४ ॥ उदईक आमुचें प्रयाण । तुम्हीं समस्तीं यावें करोनि स्नान । गंगेपर्यंत बोळवून । मग पुढती येणें मंदिरांत ॥ ९५ ॥ ऐसी श्रीनाथाची वदंती । ऐकोनि भाविक खेद करिती । म्हणती अवतार होतसे समाप्ती । यास्तव चित्तीं उद्विग्न ॥ ९६ ॥ दुसरे दिवशीं प्रातःकाळीं । वाडियांत मिळाली सर्व मंडळी । श्रीनाथ व्याकुळ तये वेळीं । पडिले तत्काळीं मूर्च्छित ॥ ९७ ॥ ऐसी अवस्था देखोनि जाण । भाविकांसि खेद उपजला मनें । आसुवें भरलें त्यांचे नयन । श्रीनाथवदन विलोकिती ॥ ९८ ॥ निंदक कुटिळ ते दुर्मती । ते दुरुत्तर काय बोलती । म्हणती चरित्रें दाखविलीं नानारीतीं । परी मरण गती तों सारखींच ॥ ९९ ॥ मागें चमत्कार दाखविले फार । परी आतां प्राणांत ओढवला थोर । शेवटीं लोकांच्या खांद्यावर । नाथाचें शरीर जाईल कीं ॥ १०० ॥ ऐसी निंदकाची वदंती । ऐकोनि भाविकांस खेद चित्तीं । मग एकनाथाची चरित्र ख्याती । जीवीं आठविती आपुल्या ॥ १ ॥ म्हणती जगदुद्धार व्हावया कारणें । यास्तव तुझा अवतार सगुण । लोकां ऐसें तुज मरण । नसावें म्हणून हेत वाटे ॥ २ ॥ ऐसें भाविकांचें मनोगत । ऐकोनि श्रीनाथ सावध होत । जैसा निद्रिस्त उठोनि बैसत । तैसीच रीत ते झाली ॥ ३ ॥ ऐसें देखोनि ते वेळीं । जयजयकारें पिटिली टाळी । विठ्ठलनामें गर्जना केली । भाविक मंडळी उल्हासे ॥ ४ ॥ मग उद्धवासि आज्ञा करीत नाथ । स्नानासि उदक आणीं त्वरित । स्नान करोनि प्रयोगयुक्त । धौतें वस्त्रें नेसत स्वहस्तें ॥ ५ ॥ मग आसनीं बैसोनियां आपण । द्वादश टिळे गोपीचंदन । लावोनि गळां तुळसीभूषण । निज प्रीतीनें घातलें ॥ ६ ॥ जनार्दनाचें नामस्मरण । तारकमंत्र उच्चारण । मनोमय करिती आपण । मग विठ्ठलस्मरणें गर्जती ॥ ७ ॥ स्कंधीं विणा घेवोनि नाथ । श्रीहरीचे गुण वर्णित । नमस्कारोनि पांडुरंगातें । रूप ध्यानांत धरियेलें ॥ ८ ॥ नामस्मरणें गर्जोनि वाणी । वाडियांतूनि निघती तये क्षणीं । लोक पूजिती प्रीती करोनि । धन्य अवनी पवित्र ते ॥ ९ ॥ बुका सुमनें तुळसीहार । पदोपदीं पूजा उपचार । करीत असती नारीनर । आरत्या प्रकार नानाविध ॥ ११० ॥ श्रीनाथस्वरूप आणोनि ध्यानीं । आसुवें येती त्यांचे नयनीं । पुन्हां दर्शन दुर्लभ म्हणोनी । आले दुरोनी लोक फार ॥ ११ ॥ दिंड्या पताकांचे भार । क्षणक्षणां होत नामोच्चार । मार्गीं दाटी जाहलीसे फार । नादें अंबरें कोंदलें ॥ १२ ॥ गांवाबाहेर वाडेकोडें । मिरवत येती निज निवाडे । मनुष्य

१ पोचवून. २ धुतलेली. ३ पृथ्वी. ४ आकाश.

दाटी मार्गे पुढें । दर्शनासि वाट असेना ॥ १३ ॥ गंगेमाजीं लक्ष्मीतीर्थ । ते स्थळीं आले मिरवत । तंव देव विमानीं बैसोनि येत । पुष्पें वर्षत नाथावरी ॥ १४ ॥ नीलोत्पल पुष्पें ते वेळीं । असंख्यात पडलीं असती भूतळीं । तीं जन देखती नेत्रकमळीं । मग हरिनामें टाळीं वाजविती ॥ १५ ॥ धन्य ते समयींचें लोक । दृष्टीसी पाहती कौतुक । गुप्तरूपें वृंदारक । पाहती कौतुक नेत्रकमळीं ॥ १६ ॥ असो गंगेच्या वाळवंटी येतां जाण । श्रीनाथ आज्ञा करिती जनां । आतां स्वस्थ करूनियां मना । श्रीहरिगुणा ऐकिजे ॥ १७ ॥ ऐसें श्रीनाथाचें उत्तर । ऐकोन संतोष वाटला थोर । सकळ बैसती नारीनर । रूप समोर लक्षूनियां ॥ १८ ॥ विठ्ठलनामें करोनि गर्जना । आरंभिलें हरिकीर्तना । अद्भुत वर्णिलें भक्तिमाहिमाना । आणि स्मरणा प्रतिवादी ॥ १९ ॥ कलियुगीं तरणोपाय कांहीं । नामाविरहित आणिक नाहीं । सर्वांभूतीं दया असों द्यावी । हें वचन जीवीं धरा सर्व ॥१२०॥ तुमच्या हितास्तव जाण । मृत्युलोकीं आम्हांसि येणें । येऱ्हवीं मायातीत परिपूर्ण । चैतन्यघन मी असें ॥ २१ ॥ ऐसें श्रीनाथाचें कीर्तन । ऐकतां सज्जनीं केला प्रश्न । आणिक आतां पुढती अवतार घेणें । स्वामीकारणें घडेल ॥ २२ ॥ ऐसी आस्था सकळाप्रती । तरी तो सांगिजे करुणामूर्ती । ऐकोनि श्रोतयांची श्रोक्ती । मग अभंग बोलती श्रीनाथ ॥ २३ ॥ तो ग्रंथी लिहितों ये अवसरीं । सादर ऐकिजे भक्तचतुरीं । जीं प्रासादिक वचनें निर्धारीं । ऐकतांचि अंतरीं बोध होय ॥ २४ ॥ अभंग ॥ जैं धर्मांची वाट मोडे । अधर्मांची सीग चढे । तैं आम्हां येणें घडे । संसार स्थिती ॥ १ ॥ नाना मतें आणि पाखंडे । कर्मठता अति बंडें । त्याची ठेंचावीं तोंडें । हरि भजनें करूनियां ॥ २ ॥ जें जें हरिलीला चरित्र । तें तें माझेंचि स्वतंत्र । देव भक्त एकत्र । भेद नाहीं दोघांतें ॥ ३ ॥ जो जो अवतार हरी धरी । तो तो मीच अवधारी । हरिनामें करितों गजरी । जगदुद्धारा कारणें ॥ ४ ॥ सर्वांभूतीं भगवद्भावो । हा भक्तीचा निज निर्वाहो । धर्मांचा अनुग्रहो । वाढवावा यालागीं ॥ ५ ॥ सर्वांभूतीं दयाशांती । प्रतिपाळावी वेदोक्ती । हेंचि एक निश्चिती । करणें आम्हां लागतें ॥ ६ ॥ लीलाविग्रही भगवंत । तया म्हणती नित्य मुक्त । ते दावी काय तेथ । वेगळेंची असोपां ॥ ७ ॥ विश्वरूपीं सृष्टी । अर्जुना ते दावी दिठी । भिन्न भेदाची गोष्टी । बोलों नये सर्वदा ॥ ८ ॥ वत्साहरणीच चरित्र । वत्स गोवळे स्वतंत्र । पावे पायतन कटिसूत्र । आपणची जाहला ॥ ९ ॥ एकाजनार्दनी । विश्वरूप गोविंदमानी । भेद धरितो मनीं । निंद्याहुनी अति निंद्य ॥ १० ॥ ओव्या ॥ हा श्रीनाथाचा अभंग जाण । प्रयाण समयींचें प्रसाद वचन । उद्धवें हातीं पत्र धेऊन । ठेविला लेहून ते समयीं ॥ २५ ॥ मग विठ्ठलनामें हरिगजर मेळीं । सकळा हातीं वाजविलीं टाळी । आरती बोलिले तयेवेळीं । तेचि सकळीं ऐकिजे ॥ २६ ॥ आरती ॥ अवलोकितां जन दिसे जनार्दन । भिन्नभिन्न तेथें दावी अभिन्न । अनेक एकत्वें दिसे परिपूर्ण । ठकली मन बुद्धी तेथें कैंचे

गुणागुण ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय जनार्दना । परमार्थे आरती अभिनव भावना । ॥ ध्रुपद० ॥ ज्योतीची ही ज्योती उजळोनीयां दीप्ती । तेणें तेजें केली सतेज आरती । पाहतां पाहतेंपण पाहावया स्थिती । नुरेचि वेगळेपण देहभान स्फूर्ती ॥ २ ॥ उजळी ते उजळण उजळाया लागीं । वेगळेपण कैचें नुरेचि ते भोगी । अंगें अर्पिलें अंगीचे अंगीं । जीव शीवपण गेलें हरपोनि वेगीं ॥ ३ ॥ पाठी ना पोटीं अवघा निघोट । सर्वांचा देखणा सर्वावरिष्ठ । इष्ट न अनिष्ट गुप्त ना प्रकट । अहंमोहं सगत भरिला घोट ॥ ४ ॥ सर्वदा दिसे परी ना कळे मना । जें जें दिसे तें तें दर्शना जाणा । अभाव भावेंसीं गिळिली भावना । अभिनव आरती एकाजनार्दना ॥५॥ ओव्या ॥ ऐसी आरती तये क्षणीं । श्रीनाथें स्वयें गायिली वदनीं । नामघोषें गर्जोनि वाणी । नमस्कार धरणीं घातला ॥ २७ ॥ श्रीनाथें घालोनि दंडवत । लोकांसि विनवी जोडोनि हात । आतां कृपा असोंद्या समस्त । केला प्रणिपात मग पुन्हा ॥ २८ ॥ ऐसी ऐकतांचि वाणी । सकळांसि अश्रुपात आले नयनीं ॥ जयनाथ एकनाथ म्हणोनी । नमस्कार तें क्षणीं घालिती ॥ २९ ॥ मग गंगेच्या जळीं एकनाथ । गेले निजांगें चालत । नाभिस्थानीं जों उदक लागत । उभे तेथ राहिले ॥ १३० ॥ गिरागजरीं हरिस्मरण । सर्वांमुखीं करविलें जाण । मग कुडींतूनि सोडिले प्राण । देव सुमनें वर्षती ॥ ३१ ॥ जितुके पाहावया आले लोक । तेही निजप्रेमें करिती शोक । मग देहासि अग्नि दीधला देख । जैसा लौकिक या रीतीं ॥ ३२ ॥ ऐसें नाथाचें निर्वाण । पाहोनि घरासि गेले जन । शोकें करोनि विव्हळ जाण । ते समयीं सर्वत्र जायले ॥ ३३ ॥ पुत्रासहित दुसरे दिवसीं । पातले राखसावडावयासी । तों दहनांत उगवली कृष्ण तुळसी । आणि अश्वत्थरोपासी देखिलें ॥ ३४ ॥ कोंवळा लसलसित हिरवा पाला । देखोनि जनांसि आनंद झाला । म्हणती अश्वत्थरूपेंचि प्रगटला । श्रीनाथ अवतरला पुढती ॥ ३५ ॥ मग मध्यें अश्वत्थ राखोनि जाण । ते स्थळीं बांधलें वृंदावन । देउळीं श्रीनाथ पादुका स्थापून । अद्यापि स्थान जागृत असे ॥ ३६ ॥ नरनारी क्षेत्रवासी बहुत । ते स्थळीं सर्वदा सेवा करीत । तयांच्या मनींचे मनोरथ । पुरवीत श्रीनाथ कृपाळू ॥ ३७ ॥ जयाच्या चित्तीं जैसा भाव । तैसाचि होय देवाधिदेव । होतसे षष्ठीचा उत्सव । अति अपूर्व पैठणीं ॥ ३८ ॥ अश्वत्थरूपें श्रीएकनाथ । जनासि प्रत्यक्ष दर्शन देत । तेथें आणिक चमत्कार अद्भुत । तो ऐका निज भक्त भाविकहो ॥ ३९ ॥ भग्न होईल वृंदावन । यास्तव अश्वत्थ तितुकाचि लहान । श्रीनाथाचें लाघवपूर्ण । नेणवेचि जाण ब्रह्मादिकां ॥ १४० ॥ धन्य ते लोक क्षेत्रवासी । सर्वदा दर्शन होतसे त्यांसी । पादुका दर्शनें पतितांसि । असंख्य जीवासी उद्धार ॥ ४१ ॥ श्रीनाथ निर्याण ऐकतां जाणा । त्यासि अंतसमयीं न होती यातना । तयासि तुष्टोनि वैकुंठराणा । आपुल्या स्थाना पाववी ॥ ४२ ॥ श्रीपांडुरंग आज्ञेनें साचार । ग्रंथीं लिहिलीं अरुष उत्तरें । येऱ्हवी संत चरित्राचा पार । मी नेणेंचि पामर मूढमती ॥ ४३ ॥ पुढिले अध्यायीं कथा सुगम । वैष्णव भक्त तुकाराम ।

१ नमस्कार. २ फुले.

त्याचें चरित्र अति निःसीम । श्रोतीं संपूर्ण ऐकिजे ॥ ४४ ॥ जो दीनदयाळ रुक्मिणीवर । अनाथ बंधु कृपासागर । तो महीपतीसि देऊनि अभयवर । सद्गुण चरित्र वदवीतसे ॥ ४५ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । चोविसावा अध्याय रसाळ हा ॥ १४६ ॥ अ० २४ ॥ ओ० १४६ ॥ अभंग व आरती मिळून ॥ १६ ॥ एवं संख्या ॥१६२॥



2 4 9 1

3 | 8 3 | 2 |

श्रीगणेशाय नमः । जय पांडुरंगा रुक्मिणीवरा । अचळ अढळ निर्विकारा। लीलाविग्रही करुणाकरा। सर्वेश्वरा आदिपुरुषा॥१॥ मी अनाथ होवोनि सर्वोपरी । सद्भावें शरण आलों श्रीहरी । कृपाकटाक्षें भवसागरीं । पैलतीरीं उतरावें ॥ २ ॥ नेणें वेदशास्त्र पठण । जपतपकळा अनुष्ठान । नेणें संस्कृत निर्वाण । अध्यात्मज्ञान तें नाहीं ॥ ३ ॥ ऐसें असतां रुक्मिणीपति । चित्तीं धिवसा उपजली प्रीतीं । कीं तुझ्या दासांची वर्णावी कीर्ती । तरी मनोरथ पुरती तें करी ॥ ४ ॥ नव्हे चतुर कवि कुशळ । नाहीं विशाळ बुद्धीचे बळ । सर्व प्रकारें असें पांगुळ । हें तूं घननीळ जाणसी ॥ ५ ॥ दातयाच्या आश्रये साचार । याचक कंठिती संसार । कीं डोळसाचा धरोनि कर । आंधळे सत्वर चालती ॥ ६ ॥ तैशाचपरी पंढरीनाथा । सर्व भार तुझिया माथा । मज अभय देऊनियां अनाथा । वदवी भक्तकथा निरुपण ॥ ७ ॥ तुझ्या दासांची अद्भुत कीर्ती । भागवतधर्मी वैष्णव गाती । तें भक्तलीलामृत मज हातीं । रुक्मिणीपति वदवी तूं ॥ ८ ॥ प्रभंजन वाजे आकाश मेळें । तरुवर डोलती त्याच्या बळें । तेवीं बुद्धीचा दाता तूं घननीळ । स्वतंत्र बळ मज नाहीं ॥ ९ ॥ आतां चित्त देवोनि श्रोतीं । सादर आसिजे श्रवणार्थी । तुकारामाची सप्रेम भक्ती । वैकुंठपति वश्य केला ॥ १० ॥ त्याची आदि सविस्तर । सादर ऐका भक्त चतुर । जो जगद्गुरु वैष्णववीर । अवतरे साचार भूमंडळीं ॥ ११ ॥ शूद्र यातीमाजी निश्चित । जन्मला तुकाराम वैष्णवभक्त । जो जगद्गुरु मूर्तिमंत । विश्वोद्धारार्थ अवतरला ॥ १२ ॥ त्याच्या वंशी कुळदैवत । पूर्वापर पंढरीनाथ । मूर्ति आली साक्षात । प्रेम अद्भुत देखोनियां ॥ १३ ॥ तंव श्रोते आशंकित होवोनिया । आदरें प्रश्न करिती वक्तया । म्हणती तुकयाचें वडिली पंढरीराया । कोणे आणिलें सांग पां ॥ १४ ॥ ऐकोनि श्रोतयाचें प्रश्नोत्तर । वक्तयासि उल्हास जाहला थोर । म्हणे तुम्ही जे पुसिलें साचार । तरी तेंहीं चरित्र अवधारा ॥ १५ ॥ विश्वंभरबावा भक्तराज । होता तुकयाचा पूर्वज । ज्याच्या भक्तिस्तव गरुडध्वज । आले सहज निजप्रीतीं ॥ १६ ॥ त्या विश्वंभरें कैसी भक्ती । करूनि आराधिला रुक्मिणीपती । तें सविस्तर यथास्थिती । सादर संतीं परिसिजे ॥ १७ ॥ उत्तम व्यवहार करितां जाण । असत्य कदापि न बोले वचन । प्रारब्धें मिळेल धनधान्य । सत्कर्मी पूर्ण तें वेची ॥ १८ ॥ साधुसंत वैष्णव भक्त । तीर्थवासी ब्राह्मण अतीत । देखोनि आदरें गृहास नेत । सप्रेम पूजित त्यालागुनि ॥ १९ ॥ संसार धंदा करितां जाण । मुखें करितसे नामस्मरण । रात्रीं मेळवूनी भाविक जन । आनंदें कीर्तन करितसे ॥ २० ॥ टाळविणा मृदंग घोष । नादब्रह्मचि आलें मुसें । रामकृष्ण चरित्रें विशेष । गावोनि जनासी ऐकवी ॥ २१ ॥ सर्वाभूतीं दया पूर्ण । परोपकारी वेचितसे प्राण । ऐशा रीतीं करितां भजना । वृत्ति संपूर्ण मुराल्या ॥२२॥ विश्वंभराची माता जाण । पुत्रासि देतसे आठवण । आता पंढरीस जावयाकारणें । सिद्ध होणें सत्वर ॥ २३ ॥ तुझ्या वडिलावडिलीं निर्धारी । चालविली पंढरीची [1]वारी । त्यासि सर्वथा अंतर न करीं । तरीच संसारीं सुफळ

१ वारा.

॥ २४ ॥ आधींच विश्वंभर प्रेमळदास । त्यावरी मातेचा उपदेश । जेवीं सत्कर्मी ब्राह्मण विश्वास । श्रुतिवाक्यास प्रतिपादी ॥ २५ ॥ कां त्रितापें साधक पोळला अंगें । तयासि लाधला सत्संग वेगें । तें सिद्धांत वचन अमोघ । ऐकोनि मग निवतसे ॥ २६ ॥ कां आधींच सच्छिष्य भाविक जाणा । आणि सद्गुरूनें सांगितली उपासना । मग गातां ऐकतां श्रीहरिगुणां । आनंद मना तयाच्या ॥ २७ ॥ कीं मदालसेनें निज पुत्रासी । स्वमुखें अध्यात्म सांगतां त्यांसी । तत्काळ वैराग्य उपजलें मानसीं । विश्वंभरासी तेविं झालें ॥ २८ ॥ मग मातेप्रती बोले वचन । बरी मज दीधली शिकवण । जननीसि करूनि साष्टांग नमन । केले गमन यात्रेसी ॥ २९ ॥ मार्गी लागतां ते अवसरीं । दृष्टीसीं देखिले वारकरी । भजन करीत सत्वरी । क्षेत्रपंढरी पावला ॥ ३० ॥ अनुतापयुक्त करोनि मन । केलें चंद्रभागेसि स्नान । घेऊनि पुंडलिक दर्शन । सद्भावें पूजन पैं केलें ॥ ३१ ॥ क्षेत्र प्रदक्षिणा करोनि सत्वरी । ध्यानासि आणिली सर्व पंढरी । मग लोटांगण घालीत ते अवसरी । महाद्वारीं येतसे ॥३२॥ गरुड मारुतीसि नमन । केलें तेव्हां निजप्रीती करून । तेथें वैष्णव करिती कीर्तन । ऐकोनि मन संतोषले ॥३३॥ जें परब्रह्म सनातन । निजभक्तांचें हृदयरत्न । नासिकाग्रीं ठेविलें ध्यान । देखतांचि मन तन्मय ॥३४॥ ते सोहळा देखोनि दृष्टी । परमसंतोष वाटला पोटीं । तो विटेवरी उभा जगजेठी । करद्वय कटीं ठेवूनियां ॥ ३५ ॥ सर्वांगीं बुका उधळिला । कंठीं कोमळ तुलसीच्या माळा । विश्वंभरें देखोनि घनसांवळा । आनंद जाहला मानसीं ॥३६॥ जो कां भक्त करुणाकर । योगियांचा तात सुंदर । दृष्टीसीं पाहतां विश्वंभर । आलिंगन सत्वर देत तया ॥ ३७ ॥ देव भक्तांच्या ऐक्यपणा । वर्णितां नये चतुराननां[1] । तेथें प्राकृत मतीनें शाहणा । व्यर्थ वल्गना कां करूं ॥ ३८ ॥ सगुणरूप देखोनि दृष्टीं । तेंचि ठेविलें हृदय संपुटीं । ब्रह्मानंद सोहळा सृष्टीं । देखोनि पोटीं संतोष ॥ ३९ ॥ एवं पंचरात्रीं क्रमोनि तेथ । नामसंकीर्तनी जाहला तृप्त । देवासि आज्ञा मागोनि त्वरित । परतोनि येत निजग्रामा ॥ ४० ॥ विठ्ठलपायीं ठेवोनि मन । विश्वंभर पातला सदन । घरासि येऊनि निजप्रीतीनें । केलें नमन मातेसी ॥ ४१ ॥ समीप बैसोनि निवांत । मातेसि सांगितला वृत्तांत । म्हणे क्षेत्र महिमा अद्भुत । देखोनि चित्त वेधलें ॥ ४२ ॥ विश्वंभर राहिला घरीं । परी क्षणक्षणां आठवी पंढरी । पांडुरंग उभा विटेवरी । भिमातिरीं दिगंबर ॥ ४३ ॥ म्हणे धन्यधन्य क्षेत्र पंढरपूर । वेणुनादी मुरलीधर । पद्मतीर्थांचा माहिमा थोर । वारंवार आठवी ॥ ४४ ॥ चंद्रभागा माझी भगिनी । सखा बंधु पुंडलिक मुनी । राई सत्यभामा जननी । माता रुक्मिणी आठवित ॥ ४५ ॥ चित्तीं म्हणे विश्वंभर । कधीं भेटेल रुक्मिणीवर । नेत्रीं वाहतीं अश्रुधार । कंठ गंहिवरे तयाचा ॥ ४६ ॥ भक्तराज भाविक प्रेमळ । ज्यासवें खेळतो तो घननीळ । धन्य ते जीवजंतु सकळ । सर्वकाळ आठवी ॥ ४७ ॥ जैसी अबळा सासरीं राहे । परी चित्तीं सर्वदा आठवी माये । कीं वत्सासि दावें लाविलें आहे । तें जाऊं पाहे जननी पैं ॥ ४८ ॥ कीं बाजारांत हिंडे

१ ब्रह्मदेवाला.

कृपण । भूमीमाजी पुरलें धन । तयापासी जीवप्राण । सर्वदा मन तें ठायीं ॥ ४९ ॥ तैसें विश्वंभराचें चित्त । विठ्ठलचरणीं जाहलें रत । म्हणे पांडुरंगें कृपावंतें । वाटत खंत मज तुझी ॥ ५० ॥ एके दिवसीं नवमी तिथ । प्रातःकाळीं उठोनि त्वरित । पंढरपुरी वैष्णवभक्त । निघे निश्चित लगबगें ॥ ५१ ॥ अहोरात्र क्रमितां पंथ । पांडुरंग क्षेत्र पावला तेंथ । स्नान करूनि चंद्रभागेंत । दर्शना जाती विठोबाच्या ॥ ५२ ॥ समचरण विटे कटीं कर । ठाण साजिरें सुकुमार । ऐसें ध्यान दिगंबर । पाहतांचि विसर देहभान ॥ ५३ ॥ आलिंगन देवोनि बाही । सप्रेम मिठी घातली पायीं । तेणें त्रिताप निरसोनि सर्वही । जाहला विदेही विश्वंभर ॥ ५४ ॥ दशमी व्रत एक भुक्त साचार । एकादशी उपोषण हरिजागर । रात्री ऐकोनि कीर्तन गजर । सप्रेम अंतर तयांचें ॥ ५५ ॥ पंक्तीसि घेऊनि वैष्णव भक्त । द्वादशीस पारणें केलें त्वरित । संतापाशीं जगन्नाथ । सर्वदा वसत प्रीतीनें ॥ ५६ ॥ संत समागम सर्वकाळ । त्याकडे पाहूं न शके काळ । पद्मनाभ तिष्ठे त्याजवळ । सप्रेम कळवळ देखोनि ॥ ५७ ॥ देव भक्तांचे संगती । त्रिरात्र क्षेत्रीं केली वस्ती । मग विश्वंभर पांडुरंगाप्रती । आज्ञा मागती जावया ॥ ५८ ॥ निरोप देतां जगज्जीवन । अश्रुपातें भरलें लोचनं । म्हणे तुझा वियोग जाण । मजकारणें न साहे ॥ ५९ ॥ सद्गद होवोनि ते वेळे । अश्रुपातें सरले डोळे । म्हणे तुझ्या पायां वेगळे । वाटे तळमळ विठ्ठला ॥ ६० ॥ ऐकोनि विश्वंभराचें वचन । काय बोले जगज्जीवन । रिते स्थळ मज वांचोन । अणुमात्र जाण असेना ॥ ६१ ॥ आकाश जेव्हडे आहे थोर । त्यामाजी व्यापक समीर । तैसाचि मी शारंगधर । चराचर व्यापक असें ॥ ६२ ॥ कीं उर्वीचे ठायीं सहज । प्रकाशे बासरणमणींचे तेज । तैसाचि मी अधोक्षज । चित्तीं समज आपुल्या ॥ ६३ ॥ जैसे नाना अलंकार ठसे । परी ते सोनें एकचि असे । तेवीं आज्ञानासि जग भासे । परी हें मीच असें विश्वंभरा ॥ ६४ ॥ ते अलंकार आटिल्या पाहें । तरी तें सोनें नाशिलें काय । तैसा प्रळयांतीं मींच असे । अविनाश अक्षय सर्वदा ॥ ६५ ॥ हा माझा ऐश्वर्य योग जाण । वेदांतीं केलें विवरण । ह्या उपपत्ती चित्तीं धरून । देहूस जाणें सत्वर ॥ ६६ ॥ विश्वंभर म्हणे हृषिकेशी । हें ज्ञान असोंदे आपणापासीं । माझी प्रीती सगुण रूपासी । निश्चियेसी जडली असे ॥ ६७ ॥ निराकार जें विराट देख । तेथें वेदांचा न चले तर्क । मग मी काय करूं मशक । सगुण सुख कोठें पाहूं ॥ ६८ ॥ ऐश्वर्य सांगसी निर्गुण । तेथें कैसे तुझे गाउं गुण । समपदी साजिरे ठाण । देउं आलिंगन मग कोणा ॥ ६९ ॥ ज्या रूपासी नाहीं आर्ती । मग कैसी करूं तुझी भक्ती । कैशी श्रवणीं गुणकीर्ती । ऐकूं श्रीपती मज सांग ॥ ७० ॥ ऐकोनि विश्वंभराचें वचन । हांसों लागलें जगज्जीवन । म्हणे तुझ्या गुणांवरून । लिंब लोण करावें ॥ ७१ ॥ मग भक्तवत्सल दीननाथ । त्याच्या मस्तकीं ठेविला हात । म्हणे माझें नाम जपसी जेथ । मी निश्चित तें ठायीं ॥ ७२ ॥ ऐसें म्हणोनि रुक्मिणीवर । हरिनाम मंत्र उपदेशी सत्वर । देहूसि पाठविला विश्वंभर । परी

१ डोळे. २ वायु.

सगुणीं तत्पर प्रीति ज्याची ॥ ७३ ॥ मग पंधरा दिवसां एकादशी । जात असे पंढरीसी । नेमें वारी धरिली ऐसी । अनुपम सुखासी साकला तो ॥ ७४ ॥ कार्तिकमासा पासोनि जाणे । ज्येष्ठमासपर्यंत येणें । सोळा वेरझारा करून । रूप सगुण पाहिलें ॥ ७५ ॥ ऐसी विश्वंभराची स्थिति । देखोनि जन विस्मित होती । त्रिविध लोक नाना रीती । काय बोलती ते ऐका ॥ ७६ ॥ याणें टाकोनि संसार भान । लाविले विठोबासी ध्यान । पंधरा दिवसां येणें जाणें । वेरझारा करोन शिणतो कां ॥ ७७ ॥ जरी त्रासला असता संसारासी । तरी सुखें राहती पंढरीसी । दोहीं ठायीं प्रीति त्यासी । म्हणोनि घरासी येतसे ॥ ७८ ॥ एक म्हणती भाग्यवंत । वायां कां निंदा करितां व्यर्थ । त्याज ऐसा निष्ठावंत । नाही दिसत तये काळीं ॥ ७९ ॥ असो या परी त्रिविध जन । नानापरीची बोलती वचनें । परी विश्वंभरासि समसमान । मानापमान सारिखे ॥ ८० ॥ विश्वंभर प्रेमळ भक्त । सगुणीं जडलें त्याचें चित्त । तो नवल वर्तले अद्भुत । ऐका निज भक्त भाविक हो ॥ ८१ ॥ पंधरा दिवसां पंढरीसि जात । आठ मास लोटले त्वरित । सेवा ऋणी वैकुंठनाथ । जाहला निश्चित तेधवां ॥ ८२ ॥ नववे मासी अष्टमीचे रात्रीं । विश्वंभर निद्रित असती । तंव स्वप्नीं येऊनि रुक्मिणीपती । तयासि बोलतीं काय तेव्हां ॥ ८३ ॥ म्हणेरे विश्वंभरा सखया । मज त्वां केलें सेवाऋणिया । मी आतां आलों गांवा तुझिया । पंढरीसि यावया आज्ञा नाहीं ॥ ८४ ॥ तुझे उपकार जाहले बहुत । तें मज न फिटतीच सत्य । आतां राहावयासि आलो येथ । तुझी प्रीत देखोनियां ॥ ८५ ॥ ऐसें बोलोनियां चक्रपाणी । गेले आंबियाचें वनीं । निद्रित जाहले तये स्थ नीं । इतुकें स्वप्नीं देखिलें ॥ ८४ ॥ विश्वंभर होऊनी जागृती । हरिस्मरण करितसे प्रीतीं । म्हणे दैवाचि विचित्रगती । रुक्मिणीपती भेटले ॥ ८७ ॥ मजसी भेटोनि पंढरीनाथ । गेले आंबियाचें वनांत । निद्रा केली असे तेथ । पाहावें त्वरित जावोनिया ॥ ८८ ॥ ग्रामांत होते वैष्णवजन । तयांसि सांगे जीवींची खुण । ऐशा रीतीं देखिलें स्वप्न । पंढरीहून देव आले ॥ ८९ ॥ तरी आपण सत्वर जावोनि आतां । गांवांत आणूं रुक्मिणीकांता । ऐसी ऐकोनियां वार्ता । आश्चर्य चित्तां तें करिती ॥९०॥ आणिक लोक ग्रामवासी । समागमें घेतलें त्यांसी । अभक्त विकल्पी जे मानसी । सत्य तयांसी न भासे ॥ ९१ ॥ म्हणती विश्वंभरासि लागलें ध्यान । तेंचि देखिलें असेल स्वप्न । साक्षात मूर्ति दिलेल सगुण । अघटित विंदान केविं घडे ॥ ९२ ॥ एक म्हणती संशय कायसा । हातिच्या कांकणा कासया आरसा । याचा भाव आहे कैसा । तोही सहसा कळेल ॥ ९३ ॥ चित्तीं कल्पना आणोनि ऐसी । सवे चालिले ग्रामवासी । संतमेळीं विश्वंभरासी । चालत मानसीं आनंद ॥ ९४ ॥ कीर्तन करीत गात नाचत । आले आंबियाचे वनांत । तों तेथें नाहींत पंढरीनाथ । परी सुवास अद्भुत सुटला ॥ ९५ ॥ सुवासिक पुष्पें बुका तुळसी । कांहीं पडलीं त्या स्थळासी । हें कौतुक देखतां दृष्टीसीं । आश्चर्य सकळांसि वाटलें ॥ ९६ ॥ एक म्हणती पाहावो ।

१ आश्चर्य.

साचचि स्वप्नींचा प्रस्तावो ।परी आपुला नाहीं शुद्ध भावो । म्हणवोनि देव दिसेना ॥ ९७ ॥ विश्वंभर म्हणे तये क्षणीं । भूमींत पहा उकरोनी । तो आकाशी वदतसे वाणी । ऐकती कानीं सकळिक ॥ ९८ ॥ विश्वंभराचे भेटीसी । देह्रासि आले वैकुंठवासी । तरी शस्त्र लावितां भूमीसी । उकरा तयासी निजहस्तें ॥९९॥ पुढें याचें वंशीं थोर । अवतरेल वैष्णववीर । तयाचेनि कीर्तन गजरें । जगदुद्धार होईल ॥१००॥ ऐसें ऐकोनि ते वेळीं । आनंदली भक्त मंडळी । हरिनामें पिटोनि टाळी । कीर्तन कल्लोळीं गर्जती ॥ १ ॥ मग विश्वंभरे लावितां हात । भूमींत उकरिती वैष्णवभक्त । तों बुका तुळसी मृत्तिकेंत । निघती बहुत तेधवां ॥ २ ॥ पुढें पाहतां निज दृष्टीनें । तों पांडुरंग मूर्ति सांवळी सगुण । वामांगीं ते माता रुक्मिण । सुकुमार ठाण साजिरें ॥ ३ ॥ कासेसि दिव्य पीतांबर । गळां तुळसी मंजुऱ्याचे हार । ऐसी मूर्ति देखोनि सुंदर । जयजयकार मग करिती ॥ ४ ॥ विश्वंभरें उचलोनि मूर्ती । गांवा समीप चालिले प्रीतीं । विठ्ठलनामें लोक गर्जती । कीर्तनीं नाचती भक्त जन ॥ ५ ॥ क्षेत्रा सन्निध येउनी । मूर्ति स्थापिली तये स्थानीं । समीप वाहे इंद्रायणी । जीच्या दर्शनीं मुक्ति जीवां ॥ ६ ॥ सर्व साहित्य उपचार । बोलावोनि वैदिक विप्र । आभिषेकें पूजिला रुक्मिणीवर । वेदोक्त मंत्र म्हणोनियां ॥ ७ ॥ पयदधि आणि घृत[1] । मधु शर्करा गुड[2] संयुक्त । मूर्ति न्हाणोनियां पंचामृतें । अभिषेक करिती मग तेव्हां ॥ ८ ॥ अंगवस्त्रें पुसोनि देवा । पीतांबर धारण केला बरवा । कुंडलें मुगुट घालोनि तेव्हां । अळंकार केशवा लेवविले ॥ ९ ॥ पुष्पें तुळसी एकारती । निरांजन धूप दाखविला प्रीतीं । पक्वान्न नैवेद्य समर्पिती । विप्र बोलती मंत्रघोष ॥ ११० ॥ यथाशक्ति ब्राह्मण भोजन । वैष्णव करिती हरि कीर्तन । सकळ ग्रामवासी जन । करिती भजन अहर्निशीं ॥ ११ ॥ तंव रजनी[3] माजी एकांतीं । विश्वंभरें मांडिली स्तुती । जय जय करुणासागरा रुक्मिणीपती । व्यापक त्रिजगतीं तूं एक ॥ १२ ॥ आखंडला दुर्लभ तुझी भेटी । ध्यानांत आणी धूर्जटी[4] । तो इंद्रायणीचें तटीं । आलासि मजसाठीं विठ्ठला ॥ १३ ॥ मी सेवाहीन भक्तिहीन । अर्चन पूजा करूंच नेणें । परी तूं अनाथ बंधू करुणाघन । हें अनुभवें पूर्ण मज कळलें ॥ १४ ॥ ऐकोनि विश्वंभराची स्तुती । काय म्हणतसे रुक्मिणीपती । काय कामना असेल चित्तीं । ते मजप्रती निवेदीं ॥ १५ ॥ ऐकोनि म्हणे प्रेमळ भक्त । तुझ्या भजनीं असावी प्रीत । घडावी साधूंची संगत । जाणसी मनोरथ विठ्ठला ॥१६॥ पुढें वंशपरंपरा होती । तयासि असावी तुझी भक्ती । हेंचि मागणें रुक्मिणीपती । मनोरथ पुरती तें करी ॥ १७ ॥ येथें राहोनि कल्पवर । जड जीव तारावे दर्शनमात्रें । देहु ग्राम पुण्य क्षेत्र । राजीव नेत्रें वसवावें ॥ १८ ॥ ऐसें बोलतां प्रेमळ भक्त । हांसोनि बोले अनाथनाथ । तुवां जे धरिले मनोरथ । ते मी अनंत पुरविता ॥ १९ ॥ ऐसी भांक[5] देतां ते समयीं । विश्वंभर लागला पायीं । क्षेत्रवासी लोक तेही । भजनीं सर्वही लागले ॥ १२० ॥ दिवस लोटतां सप्रेम मेळ । तों पातला प्रयाणकाळ । वैकुंठींहुनि ते वेळे । पुष्पक जवळीं पैं आलें ॥ २१ ॥ विष्णुदूत

१ तूप. २ गूळ. ३ रात्री. ४ शंकर. ५ वचन.

म्हणती त्यासी । आतां चलावे वैकुंठासी । विश्वंभरें वार्ता ऐकोनि ऐसी । पांडुरंगासी विनवित ॥ २२ ॥ दोघे पुत्र कांता निर्धारीं । तुझे वोसंगीं आहेत श्रीहरी । मी तरी जातों वैकुंठपुरीं । निज निर्धारीं विठ्ठला ॥ २३ ॥ ऐसें बोलोनि तयेक्षणीं । हरीस्मरणें गर्जे वाणी । प्राण सोडिलें देहांतुनीं । दिव्य विमानीं बैसला ॥ २४ ॥ नामघोषें सप्रेम गर्जे । गंधर्व गाती मंजुळ स्वरें । ऐशारीतीं विश्वंभर । वैकुंठपुर पावला ॥ २५ ॥ निज सुकृताचें लाघव । विष्णु सन्निध लाधला ठाव । सायुज्य मुक्ति अपूर्व । भक्त वैष्णव भोगीतसे ॥२६॥ असो विश्वंभर पावला निजधामास । मागें चरित्र वर्तलें कैसें । तें अनुसंधान अतिसुरस । सज्जनीं सावकाश ऐकिजे ॥२७॥ विश्वंभराची स्त्री पाहीं । तिचें नाम अमावायी । भक्ति भावें करोनि तिनेंही । शेषशायी आराधिला ॥ २८ ॥ दोघे पुत्र असती जाण । हरि मुकुंद नामाभिधान । परी अमाई संसार उदास मनें । सप्रेम भजन करितसे ॥ २९ ॥ सर्वांभूतीं सारिखी दया । आपपर न विचारी माया । भक्तिभावें आठवोनि पायां । पंढरीराया वश्य केलें ॥ १३० ॥ सप्रेम भजनाची हातवटी । साक्षात्कार देत जगजेठी । स्वप्नीं येउनि उठाउठी । अमाईसीं गोष्टी बोलत ॥ ३१ ॥ तुझी भक्ति देखोनि सहज । मी प्रसन्न जाहलों गरुडध्वज । कांहीं इच्छित असेल काज । तरी तें मज सांगावें ॥ ३२ ॥ ऐसें पुसतां शारंगधर । अमाई देवासि दे प्रतिउत्तर । तुजवांण मज आणिक प्रकार । नावडे साचार श्रीहरी ॥ ३३ ॥ नलगे भुक्ति नलगे मुक्ति । नलगे कांहीं धन संपत्ती । तुझे भजनीं मागतें आर्ती । स्वरूपीं वृत्ती मुरो माझी ॥ ३४ ॥ यावीण इच्छा असेल किंचित । तरी मजला माय व्याली व्यर्थ । ऐसें बोलतां अमाईतें । रुक्मिणीकांत हांसले ॥ ३५ ॥ म्हणे धन्य माते तुझी बुद्धी । ऐसीच असो हे त्रिशुद्धी । मी तुष्टलों कृपानिधी । चरणारविंदीं ठेवीन ॥ ३६ ॥ अमाई बोले प्रेमसुखें । बुद्धिचा चाळक तूंचि एक । श्रुति शास्त्रें वर्णिती देख । कवि अनेक वदले कीं ॥ ३७ ॥ ऐसें बोलोनि ते समयीं । लोटांगण घालीत अमाई । मग संतोषोनी शेषशायी । उचलोनि हृदयीं धरियेली ॥३८॥ इतुकें स्वप्न देखोनि जाण । जागृत जाहली न लगतां क्षण । मग करोनियां हरिस्मरण । विस्मित मन होतसे ॥३९॥ अमाई निष्काम चित्तीं । न मागे धनसंपत्ती । परी ऋणी जाहला लक्ष्मीपती । म्हणोनि वोळंगती सर्व सिद्धी ॥१४०॥ प्रपंच हातवटी न करितां कांही । सर्व पदार्थ अनुकूल गृहीं । जें जें इच्छि तें समयीं प्राप्त सर्वही होतसे ॥४१॥ जेथें अनुकूळ जाहली सिद्धी । तरी साधकाची तत्काळ भ्रंशे बुद्धी । वाडतां प्रपंच उपाधी । देव त्रिशुद्धी अंतरे ॥ ४२ ॥ जेथें विषयाचा आरोप । तरी चित्तासि न ये अनुताप । अनुताप नसे तेथें पाप । आपेआप संचरे ॥४३॥ जैसा रात्रिचा समय येतांचि जाण । पिशाच उठली स्मशानांतून । कीं पुरुष देखोनि प्राक्तनहीन । दुःख दैन्य तेथेचि ये ॥४५॥ नातरी कुटिल नर येतां सभेसी । निंदा प्रगटे अपैसी । तेवीं विषयासक्त होतां मानसीं । दुरितें अनायासीं वोळंगती ॥ ४५ ॥ म्हणोनियां साधु-संत । उपाधिरहित होऊनि

१ विष्णू. २ कार्य.

असत । एकांतीं जावोनि अरण्यांत । भजन करित श्रीहरींचें ६॥ असोत आतां भापणें ऐसीं । सर्वसिद्धि वोळंगती मंदिरासी । अमाईच्या निज पुत्रांसी । विसर मानसीं हरीचा ॥४७॥ एकांतीं बैसोनि दोघेजण । विचार करिती नीज प्रीतीनें । सेना तुरंग शिविका आभरण आपणा कारणें असावी तरी ॥४८॥ भेटोनियां राजयाप्रती । त्याची सेवा करावी निश्चितीं । चालवोनियां क्षत्र वृत्ती । सर्व संपत्ती भोगणें ॥४९॥ उभयतां नमस्कारोनि मातेतें । सांगती चित्तींचें मनोगत । आम्हीं जावोनि राजदर्शनातें । क्षत्रवृत्तीतें चालवूं ॥ १५० ॥ अमाई म्हणे ते समयीं । काय उणें तुम्हांस गृहीं । योगक्षेम विठाबायी । चालवील सर्वही आपुला ॥ ५१ ॥ ऐसी जननी वदतां मात । परी ते नावडे पुत्रांतें । जाणोनि तयांचें मनोगत । आज्ञा देत पुत्रांसी ॥५२॥ हरिमुकुंद दोघेजण । मातेसि करूनि साष्टांग नमन । उभयतां सत्वर निघोन । राजदर्शन घेतलें ॥५३॥ शूरत्वीं दक्ष उभयतां । पाहोनि रायें दीधलीं संपदा । कुटुंबासहित आणावी माता । विचार चित्ता त्यांहीं केला ॥ ५४ ॥अमाईस लेहोनि पत्र । अश्व मनुष्य पाठविलें सत्वर । माता देखोनि चिंतातुर । म्हणे विठोबा दूर राहिला ॥५५॥ पांडुरंग मूर्तीसि करोनि नमन । अश्रुपातें भरले लोचन । म्हणे देवा तुझे चरण । मजकारणें अंतरले ॥५६॥ ऐसें म्हणोनि अमाबायी । सद्गदित जाहली ते समयीं । वस्तभाव घेवोनि सर्वही । मार्ग लवलाही क्रमित ॥५७॥ दोघी सुना घेऊनि जाण । निज पुत्रासि भेटे येऊन । परी देवापासी पंचप्राण । वेधलें मन निजप्रीतीं ॥ ५८ ॥ जैसा कृपण हिंडे बाजारासी । परी चित्त लागे ठेवण्यापासी । कीं वत्स बांधले दोरीसी । परी जनसीपासीं मन त्यांचें ॥५९॥ कां देहीं असोनि चकोर । सर्वदा लक्षिती रोहिणीवर । तैसें अमाईचें अंतर । रुक्मिणीवरें वेधिलें ॥१६०॥ दैव प्रारब्धें करोनि निश्चित । पुत्रांसि आली भाग्य संपत । तेणें मोहें रमलें चित्त । अनाथनाथ हें जाणें ॥६१॥ कांहीं काळ लोटतां पाहीं । निद्रित असतां अमाबायी । स्वप्न अवस्थेंत ते समयीं । विठाबायी प्रगटली ॥ ६२ ॥ घवघवीत सांवळी मूर्ती । पीतांबर प्रभा पडली दीसी । दिव्य कुंडलें कानीं तळपती । मकराकृती सुढाळे ॥६३॥ ऐसें रूप प्रगटोनि स्वप्नीं । अमाईस म्हणे चक्रपाणी । तूं पुत्र मोहें गुंतोनी । मजला टाकोनी दीधलें ॥६४॥ विश्वंभरें देवोनि भाक । देहु क्षेत्रीं बैसविले देख । ते तूं विसरोनि सकळिक । संसार सुख पाहसी ॥६५॥ टाकोनि लोभ धन-संपत । देहु क्षेत्रासि चाल त्वरित । ऐसें बोलतां पंढरीनाथ । जागृत अवस्था पातली ॥ ६६ ॥ अमायी विस्मित चित्तांत । हरी मुकुंदा बोलावी त्वरित । सांगितला स्वप्नींचा वृत्तांत । सद्गदित होऊनियां ॥६७॥ म्हणे बा तुमच्या वडिलांनी । भाकेसि गोंविला चक्रपाणी । मूर्ति स्थापोनि तये स्थानीं । वैकुंठ भुवनीं तो गेला ॥ ६८ ॥ आजि स्वप्नीं येवोनी जगजेठी । मजला साक्षात बोलिला गोष्टी । कीं देहु-इंद्रायणीचे तटीं । उठाउठी चाल तेथें ॥ ६९ ॥ ऐकोनि मातेची वचनोक्ति । पुत्र हांसोनि उत्तर देती । स्वप्नींची साच प्रतीती । केशा रीतीं मानावी ॥१७०॥ आम्हीं स्वामीचें सेवेसि आहों तत्पर । तेणें संतोषे रुक्मिणीवर । आपुले धर्मी जो सादर । तयासि

१ घोडे. २ कुंजुप मनुष्य. ३ चंद्र.

ईश्वर नुपेक्षी ॥७१॥ वचन ऐकोनि ते समयीं । निवांत राहिली अमाबायी । मोह ममता न सुटेचि पाहीं । नचले कांहीं त्यांपुढें ॥७२॥ चार दिवस लोटतां निश्चित । विनोदें पुत्र पुसती मातेतें । आजि काय बोलिले पंढरीनाथ । तरी तें आम्हांतें निवेदीं ॥७३॥ अमामाई म्हणे तें वेळे । आणिक दोन दृष्टांत जाहले । संतती संपत्ति सांडोनि सकळ । देहूसि तत्काळ चाल आतां ॥ ७४ ॥ ऐकोनि मातेची वचनोक्ती । सत्य न वाटे तयांप्रती । होणाराची विचित्र गती । भ्रंशली मती यास्तव ॥ ७५ ॥ ऐसियासि दिवस लोटतां चार । परम क्षोभला रुक्मिणीवर । अमाईस दृष्टांत दाखविला थोर । ऐका सादर भाविक हो ॥ ७६ ॥ स्वप्नीं येऊनि पंढरीनाथ । म्हणे तूं माझें नायकसी सत्य । तरी आजि दोंप्रहरां होईल घात । ऐक तें मात निजकर्णीं ॥ ७७ ॥ वाताहत संपत्ति धन । तुझे पुत्र जातील मरोन । ऐसें बोलतां जगजीवन । अमाई रुदन करीतसे ॥ ७८ ॥ पुत्र मरतील म्हणतोसि जाण । तरी मज सद्गतीसि लावील कोण । हरि म्हणे म्यां तुझें घेतलें ऋण । तें होईन उत्तीर्ण निश्चित ॥ ७९ ॥ स्वप्नअवस्था देखोनि ऐसी । अमाई आली जागृतीसी । पुत्र येवोनि पुसती तिसीं । रुदन करिसी कां माते ॥ १८० ॥ म्हणे म्यां मागें सांगितलें स्वप्न । तें असत्य मानलें तुम्हांकारणें । आजिचें दृष्टांतीं जगज्जीवन । कोपायमान जाहलें ॥ ८१ ॥ म्हणे आजि दोनप्रहर येतां दिन । तुझे पुत्र मरतील जाण । वाताहत संपत्ति धन । न लगतां क्षण होईल ॥८२॥ ऐसें सांगतां अमाबायी । पुत्रांसि सत्य न वाटे कांहीं । जेवीं संजयें भविष्य कथिलें सर्वही । परी धृतराष्ट्रासि नाहीं विश्वास ॥ ८३ ॥ कीं मंदोदरीच्या धर्मनीती । दशानना असत्य भासती । होणाराची विचित्र गती । काय संचितीं कळेना ॥८४॥ हरि मुकुंद उभयतां । म्हणती वार्धकदशा आली आतां । म्हणोनियां जाण माता । अशुभ वार्ता वदतसे ॥ ८५ ॥ पुत्र म्हणती वो जननी । आम्ही तरी मरतों आजिचे दिनीं । आतां आपुल्या हातें करूनीं । बैसवावें भोजनीं सत्वर ॥ ८६ ॥ सुनेसि आज्ञा करितां जाण । ताटें वाढोनि आणिली दोन । भोजनासि बैसले दोघेजण । पोट भरोनि जेविले ॥ ८७ ॥ तांबुल[1] घेतां बोलती काय । भूत भविष्य कळती माय । तों वार्तिक[2] येवोनि सांगती काय । तुम्हांसि रायें पाचारिलें ॥ ८८ ॥ परचक्र आलें असे थोर । तुम्हीं जावें तयावर । देखोनि स्वामीचें आज्ञापत्र । अति सत्वर निघाले ॥ ८९ ॥ सेना सत्य करोनि त्यांणीं । निघाले मातेसी पुसोनी । घाव घातला निशाणीं । त्वरें करोनि चालिले ॥ १९० ॥ तों परचक्र आडवें येतां सत्वर । युद्ध झालें घोरांदर । रणीं उभयतां पाडिले शूर । हाहाकार जाहला ॥ ९१ ॥ पराजय होतांचि ते क्षणीं । जय वाद्यें वाजविलीं त्यांणीं । सेना संपत्ति लुटूनी । तेच क्षणीं घेतलीं ॥ ९२ ॥ हरि मुकुंद पडतां विकळ । अनुताप जाहला ते वेळे । म्हणती मातेचें वचन न ऐकिलें । म्हणवोनि जाहलें ऐसें ॥ ९३ ॥ पश्चात्ताप होतांची तेव्हां । पांडुरंगाचा करिती धांवा । म्हणती पतितपावना देवाधिदेवा । भेटे केशवा लवलाहीं ॥ ९४ ॥ देवें करुणा ऐकोनि ऐसी ।

१ विडा. २ वार्ताहर.

तत्काळ दर्शन दीधलें त्यांसी । पुष्पकीं बैसवोनि दोघांसी । वैकुंठासी पैं नेलें ॥ ९५ ॥ कुळ तारावें सकाळिक । विश्वंभरें घेतली भाक । त्या वचनास्तव देख । वैकुंठनायक भेटले ॥ ९६ ॥ असो रणीं पडिले दोघे कुमर । अमाईस कळला समाचार । तेव्हां उसळला शोकसमुद्र । तों ग्रंथीं कोठवर त्याहावा ॥ ९७ ॥ जैसा कुळक्षय ऐकोनि गांधारी । मूर्च्छित पडे अवसरीं । आंग टाकीं धरणीवरी । अमाईस परी ते जाहली ॥ ९८ ॥ हें दुःख देखोनि नयनीं । धाकुट्या मुकुंदाची राणी । तत्काळ अग्नि प्रदीप्त करोनि । सहगमनीं निघाली ॥ ९९ ॥ देवें अंतीं देवोनि भेटी । तीस पोहोंचविलें वैकुंठीं । निज भ्रतार पडतां दृष्टीं । गुजगोष्टी बोलत ॥ २०० ॥ असो इकडे अनुसंधान । अमाईची ज्येष्ठ सून । ते गरोदर होती पूर्ण । राहिली म्हणोन यासाठीं ॥ १ ॥ वस्त्रें भूषणें संपत्ति-धन । परचक्री घेतले लुटून । अमाई सुनेसि घेऊन । चालिली पळोन तेधवां ॥ २ ॥ हरिस्मरण करितां ध्यानीं । पातली देहु पुण्य धरणीं । देउळीं जातां तये क्षणीं । कैवल्यदानी देखिला ॥ ३ ॥ सद्गदित होऊनि कंठीं । मूर्ति धरिली हृदय संपुटीं । मन पायीं घालोनि दृढ मिठी । काय गोष्टी बोलतसे ॥ ४ ॥ म्हणे रे संसार विटंबण्या । बरें द्वंद्व साधिलें धण्या । रणीं पाडिलें बाळकां तान्हया । अरे घरघेण्या श्रीहरी ॥ ५ ॥ तुझें भजनीं लागले दास । त्यांचा ऐसाचि मांडिसी नास । आपणां वेगळें तयांस । करिसी वोस दशदिशा ॥ ६ ॥ तुझें भजन करितो धूर्जटी[1] । तो नेऊनि बसविला मसणवटीं । वैराग्य दीधलें त्याचें पोटीं । विषय दृष्टी नावडे त्या ॥ ७ ॥ सनकादिक तुझें ध्यानीं । त्यांची गोष्टी ऐकिली श्रवणीं । ते देहींच विदेही करोनी । वैकुंठ भुवनीं बैसविलें ॥ ८ ॥ नारद वैष्णव जगजेठीं । त्याच्या विषयांसि मांडिली तुटी । ढुंगासि लावोनि लंगोटी । त्रैलोक्य सृष्टी हिंडवि त्या ॥ ९ ॥ रुक्मांगदासि निर्धारीं । हरिजागर एकादशी करी । वोस करोनि त्याची नगरी । वैकुंठपुरीं बैसविलें ॥ १२० ॥ तुझा निजभक्त विभीषण । त्याचा बंधु मारिला रावण । मग त्यासि देऊनि लंकादान । उदारपण दाखविसी ॥ ११ ॥ तुझें नाम स्मरतां जगजेठी । प्रल्हाद भक्त जाहला कष्टी । त्याचा बाप मारिला शेवटीं । अनुचित गोष्टी हे तुझी ॥ १२ ॥ असो दुसऱ्याची काय वार्ता । अनुभवें बोलतें मी आतां । माझे पुत्र मारिले अनंता । देखत देखतां ये समयीं ॥ १३ ॥ चक्र चालक वनमाळी । करोनि संसाराची धुळी । तान्हे बुडवोनियां समूळीं । आपणा जवळीं आणिलें त्वां ॥ १४ ॥ आतां माझी सेवा गत । कोण करील सांग त्वरित । ऐकोनि अमाईची मात । काय बोलत जगदात्मा ॥ १५ ॥ तिसी धरोनि हृदय संपुटी । म्हणे होणार तें झालें शेवटीं । आतां सर्वथा न व्हावें कष्टी । मी जगजेठी तुजपासीं ॥ १६ ॥ नानाप्रकारें करुणाकारें । समजाविली बोलूनि उत्तरें । पुढें काय वर्तलें चरित्र । तें सादर ऐका भाविक हो ॥ १७ ॥ संसारासि पाहिजे धन धान्य । प्रतिपाळ कर्ता नसे कोण । गरोदर अमाईची सून । माहेरासि जाण पाठविली ॥१८॥ आपण केला असे क्षेत्रवास । परी चैन न पडे चित्तास । तेणें अपकार जाहला


[1] शंकर.

नेत्रास । दृष्टीसी न दिसे सर्वथा ॥ १९ ॥ दारीं शेवग्याचा तरुवर[1] । त्या शोकें वाळला साचार । मग सगुण रुपें सारंगधर । अमाईस उत्तर काय बोले ॥ २० ॥ पांडुरंग म्हणे वो जननी । मी सन्निध असतां तुजलागुनी । कासया शोक करिसी मनीं । किती म्हणवोनी सांगावें ॥ २१ ॥ मी कृष्ण अवतारीं साचार । गुरूसि भेटविला मृत पुत्र । तैसेचि तुझे आणीन कुमर । सांगसी तरी ये समयीं ॥२२॥ आणि दिव्य नेत्र करितों पुढतीं । ऐसें वदतां रुक्मिणीपती । अमाई तयासि उत्तर देती । नलगे मजप्रती नाशवंत ॥ २३ ॥ म्यां मागें प्रतिज्ञा केली हरी । ते कां विसरलासि ये अवसरीं । कीं तुजवीण इच्छा आन न करीं । तो आठव अंतरीं असोंदे ॥ २४ ॥ न मागतां देशील अकस्मात । तरी मी तें सर्वथा नघेचि सत्य । ऐसें ऐकोनि रुक्मिणीकांत । काय बोलत तेधवां ॥ २५ ॥ आतां मीच तुझा निजपुत्र जाण । रुक्मिणी आहे आवडती सून । सेवा करील निजप्रीतीनें । किंचित उणें पडों नेदी ॥ २६ ॥ ऐसें बोलतां सारंगधर । अमाई देत प्रत्युतर । तूं विश्वपिता जगदुद्धार । कैसा कुमर होसी माझा ॥ २७ ॥ यावरी म्हणे धननीळ । सप्रेम भक्तीचेनि बळें । मी यशोदेचा जाहलो बाळ । तुज काय नकळे सर्वथा ॥ २८ ॥ ऐसें बोलतां चक्रपाणी । अमाई येतसे लोटांगणीं । म्हणे भक्तवत्सला कैवल्यदानी । तुझी करणी अघटित ॥ २९ ॥ सप्रेम भक्तीस्तव श्रीहरी । तिच्या पुत्राचें रूप धरी । तीस धरोनियां करीं । देऊळा भीतरी नेतसे ॥ २३० ॥ पूजेचें सर्व साहित्य । निजांगें देतसे जगन्नाथ । ताहान भूक सांभाळी नित्य । उणें किंचित पडेना ॥ ३१ ॥ धन्य अमाईची भक्ती । बौद्ध रूप असता श्रीपती । रूप नटोनि सहज स्थिती । सांभाळ करिती सर्वदा ॥ ३२ ॥ जो सनकादिकांचें ध्येय ध्यान । नीलग्रीवाचे देवतार्चन । तो निजदासाचें फेडावया ऋण । रूप सगुण धरितसे ॥ ३३ ॥ आदिमाया माता रुक्मिण । ते अमाईची जाहली सून । घरचा धंदा सारीतसे जाण । किंचित उणें पडेना ॥ ३४ ॥ जो परमात्मा शुद्ध चैतन्य । मायातीत आनंदघन । तो अमाई सन्निध बैसोन । करवी भोजन निजप्रीतीं ॥ ३५ ॥ अमाई तयासि वचन बोलत । विठो तूं जेवीं मज सांगातें । अवश्य म्हणोनि पंढरीनाथ । ग्रास घेतसे प्रीतीनें ॥ ३६ ॥ महर्षि याग करिती जाण । तेथें नघेचि जो अवदान । तो सप्रेम भक्ताचें उच्छिष्ट अन्न । अति प्रीतीनें जेवितसे ॥ ३७ ॥ भक्तिभावे भुलला हरी । याति कुळ न विचारी । जैसा ज्याचा भाव अंतरीं । तैसा मुरारी होतसे ॥ ३८ ॥ असो यापरी जाहलें भोजन । करशुद्धि देत जगज्जीवन । आपुल्या हातीं विडा करून । तिज कारण देतसे ॥ ३९ ॥ अमाईसि हातीं धरोनि सहज । हळूच चाले गरुडध्वज । रुक्मिणीनें घातली बाज[2] । तये शेजे निजविली ॥ २४० ॥ भक्ताच्या तनु त्यागीं निश्चित । परिचर्या करीं मीं अनंत । अष्टमाध्यायी बोलिलें गीतेंत । तैसाच करीत जगदात्मा ॥ ४१ ॥ सांडोनि महत्वाची थोरी । पांयत्याकडे बैसे श्रीहरी । स्वहस्तें तिचे चरण चुरी । नवल अंतरीं मज वाटे ॥ ४२ ॥ रुक्मिणी स्वहस्तें घालोनि

१ वृक्ष. २ पायाजवळ.

न्हाण । वेणीफणी करी आपण । पाठ रगडीत निजप्रीतीनें । इतुकेंचि कारण भक्तीचें ॥ ४३ ॥ ऐसे जाहले बहुत दिवस । परी गांवांत न कळे कोणास । म्हणती सेजारी कोणी असे । तो अमाई प्रतिपाळी ॥ ४४ ॥ हरीची लीला अघटित जाण । कोणासि रुक्मिणी दिसे सून । कोणासि भासे शेजारीण । एकही ठिकाण कळों नेदी ॥ ४५ ॥ ऐसा लोटतां कांहीं काळ । तों अंत समय आला जवळ । दिव्य विमान ते वेळ । आणवी घननीळ तेधवां ॥ ४६ ॥ श्रावण शुद्ध हरिदिनीं साचार । दिवस आला प्रथम प्रहर । उसा मांडी देवोनि सत्वर । सारंगधर काय करी ॥ ४७ ॥ अमाईचे आकर्षोनि प्राण । दिव्य देही केली न लगतां क्षण । विमानारूढ करोनि जाण । वैकुंठ भुवन पावली ॥ ४८ ॥ तिच्या पुत्राचें रूप धरोनि । आप्त ग्रामवासी मेळवूनी । अग्नि संस्कार देवोनी । पाजीतसे पाणी जगदात्मा ॥ ४९ ॥ उत्तर कार्य यथास्थित । स्वयें करी अनाथ नाथ । तेरावे दिवशीं स्वयात । भोजन त्यातें घातलें ॥२५०॥ तो नवलाख्याच्या उंबऱ्यांत निश्चिती । अमाईची सून होती। वृत्तांत कळतां तिजप्रती । खेद चित्तीं करितसे ॥५१॥ आधींच होती गरोदर। तो पुत्र जाहला असे थोर । तयासि घेवोनि बरोबर । देहूसि सत्वर ते आली ॥ ५२ ॥ लोकासि सखेद बोले मात । आमुचे लागले नाहींत हात । ते म्हणती तुम्हींच येथ । क्रिया समस्त केली कीं ॥ ५३ ॥ ऐसी ऐकोनियां वार्ता । विस्मित जाहली पुत्र माता । पुढिले अध्यायी रसाळ कथा । अवधान श्रोतीं मज द्यावें ॥ ५४ ॥ जो अनाथ बंधु करुणाकर । भीमातीरवासी रुक्मिणीवर । तो महीपतीचें बसवोनि अंतर । लेहवीत अक्षर ग्रंथार्थी ॥ ५५ ॥ स्वतिश्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । पंचविसावा अध्याय रसाळ हा ॥ २५६ ॥ ॥ अ० २५ ॥ ॥ ओ० २५३ ॥

अध्याय २६



॥२६॥

श्रीगणेशायनमः ॥ जयजय क्षिराब्धिवासा शेषशयना ॥ लक्ष्मीकांता मन मोहन । अनाथ बंधु करुणाधना ॥ जगज्जीवना श्रीविठ्ठला ॥ १ ॥ तुझी होताचि कृपादृष्टी । तुटे भवबंध फांसाटी । जैसा लोहासि परीस झगटे शेवटीं । मग कालिमा दृष्टीसीं दिसेना ॥ २ ॥ कां अंधाराच्या ठिकाणीं । अकस्मात प्रगटे वासरमणी[1] । मग तमाचाचि प्रकाश होउनी । दिशा उजळोनी लखलखिती ॥ ३ ॥ कां अमंगल नाला तयावर । अकस्मात आला गंगेचा पूर । मग तेंचि पाणि होय पवित्र । अना विचार असेना ॥ ४ ॥ तेवीं तुझ्या कृपावलोकनें । तत्काळ निरसे संसार भान । त्यांचे दोष न राहती जाण । जे अनन्य शरण तुज आले ॥ ५ ॥ अत्यंजादिक हीन याती । स्त्रिया शुद्र नाना रीतीं । वेदीं निंदिलें ज्याप्रती । ते त्वां श्रीपती उद्धरले ॥ ६ ॥ गजेंद्र पशु दुर्दुर मंडूक । संकटीं बाहाती तुज कौतुकें । तयासि पाहोनि वैकुंठ नायक । सायुज्य सुख भोगविसी ॥ ७ ॥ श्रुति शास्त्रांमाजी जे निंद्य जाण । आणि आवडीनें गाती तुझे गुण । उंचासि वंद्य होती जाण । ऐसें महिमान नामाचें ॥ ८ ॥ महाकवि वाल्मीक पवित्र । तेणें वर्णिलीं वानरांचीं चरित्रें । तुवां आपल्या कृपेनें राजीव नेत्रें । कुळ पवित्र तें केलें ॥ ९ ॥ ताक पिणार गौळी अमंगळ जाण । ते भागवतीं वर्णिलें द्वैपायनें । निंद्य तें होतीं वंद्य जाण । जे सद्भावें शरण तुज येती ॥ १० ॥ अनंत भक्त तारिले किती । त्यांची सर्वथा नव्हे गणती । म्हणोनियां महीपती । शरण निजप्रीतीं पातला ॥११॥ मागिले अध्यायीं कथा कैसी । अमाईस लाविले सद्गतीसी । सुने वार्ता ऐकोनि ऐसी । विस्मित मानसीं ते होय ॥ १२ ॥ विठोबा तिचा निज कुमर । माते प्रती बोले उत्तर । आपण न येतां साचार । कैसा विचार हा झाला ॥ १३ ॥ असत्य म्हणावें जरी कांहीं । तरी ग्रामवासी लोक सर्वही । जेविले खायिले ये ठायीं । ते सकळ गाही पुरतसे ॥ १४ ॥ ऐसें पुत्राचें स्पष्टोत्तर । ऐकोनि माता देत प्रत्युत्तर । हा द्वंद्वी आम्हांसि साचार । रुक्मिणीवर असें कीं ॥ १५ ॥ तुझा आजा विश्वंभर जाण । त्यानें आराधिला रुक्मिणी रमण । त्याचे भक्तीस्तव पूर्ण । मूर्ति सगुण आली कीं ॥ १६ ॥ हरि मुकुंद नामाभिधान । तयासि पुत्र दोघेजण । तिहीं करुनि राजसेवन । संपत्ति धन मेळविलें ॥ १७ ॥ आम्हीं जावा दोघीजणी । अमाई सासू सुलक्षणी । तीघीं होतों याठिकाणीं । मग नेलें पाठवूनी मूळ आम्हां ॥ १८ ॥ कांहीं दिवस राहतां तेथ । तंव स्वप्नीं येवोनी पंढरीनाथ । अमाईसी म्हणे घात । होईल निश्चित आजि तुझा ॥ १९ ॥ तिचें नायकतीच कोणी । मग उभयतां बंधु पडिले रणीं । आम्हीं सासू सुना दोन्ही । आलों पळोनि या ठायां ॥ २० ॥ अमाईनें करूनि रुदन । पांडुरंगासी केलें भांडण । मग देवें आपुलें रूप धरून । फेडिलें ऋण पैं तिचें ॥ २१ ॥ ऐकोनि मातेची वचनोक्ती । विठोबास क्रोध होऊनि चित्तीं । स्नान करोनि सत्वर गती । देउळाप्रती तो गेला ॥ २२ ॥ मग उभा राहोनियां समोर । देवाप्रती बोले उत्तर । तुवां आमुचा घात केला थोर । हें काय बरें विठ्ठला ॥ २३ ॥ आजा लागला तुझे आंगीं । बापही

[1] सूर्य.

मारविला समरंगीं । ऐसी आपकीर्ति केली जगीं । आतां तुजसंगीं न राहे ॥ २४ ॥ ऐसें बोलोनियां उत्तर । तत्काळ हातीं घेतलें शस्त्र । फाडूं पाहे आपुले उदर । तो सारंगधर हात धरीं ॥ २५ ॥ विठोबा म्हणे सोडी हरी । मी तरी नायके ये अवसरीं । तुझी कीर्ति चराचरीं । तें श्रवणद्वारीं ऐकिली म्यां ॥ २६ ॥ प्रल्हाद वैष्णव निजभक्त । प्रेमें तुझें भजन करित । त्याचा त्वां मारिला तात । प्रकट खांबांत होऊनियां ॥ २७ ॥ अंगदाचा पिता वाळी भला । निरपराधें तुवां मारिला । मग मोहन घालोनि त्यांजला । सेवक आपुला केला कीं ॥ २८ ॥ तैसा माझा तात निश्चिती । तुवां मारिला रुक्मिणीपती । आतां मी न राहें निश्चिती । नाहीं खंती जीवित्वाची ॥ २९ ॥ देखोनि त्याचें निर्वाण । दयेनें द्रवला करुणाघन । विठोबासि हातीं धरून । निजप्रीतीनें आलिंगीं ॥ ३० ॥ स्वहस्तें नेत्र पुसोनियां । म्हणे वृथा श्रम करिसी कासया । होणार तें गेलें होऊनियां । वैष्णवी माया ओडंबर ॥ ३१ ॥ विश्वंभरें गोवूनि भाकेसी । कुळऋणी केलें असे मजसीं । तें फेडावया निश्चयेंसी । देहुग्रामासी राहिलों ॥ ३२ ॥ मी भक्तकैवारी सारंगधर । तुवां द्वंद्वी नाम ठेविलें बरें ॥ जेवीं सुधारसासि म्हणती जहर । तैसा विचार त्वां केला ॥ ३३ ॥ कां वांसरमणी प्रगटतां पाहे ॥ तयासि राहू म्हणावें काये । क्षीरसागरासि देऊं नये । उपमा थिल्लर जीवनाची ॥ ३४ ॥ अश्वत्थ विष्णूचा अंश थोर । दर्शनेंचि दुरित संसार । तयासि नाम ठेविलें हिंवर । तैसाच विचार करिसी तूं ॥ ३५ ॥ सकळ योगियांचा नाथ । स्मशानवासी उमाकांत । तयासि नाम ठेविलें भूत । अज्ञान नेणत महिमेतें ॥ ३६ ॥ तेवीं मी भक्तकैवारी । गदा चक्र वागवितों करीं । आणि तूं द्वंद्वी म्हणतोसि ये अवसरीं । नवल अंतरीं मज वाटे ॥ ३७ ॥ मी तुझे कुळीचा सेवाऋणी । हे भाक घे आतां मजपासोनि । ऐसें बोलतां चक्रपाणी । विठोबा चरणीं लागला ॥ ३८ ॥ निजकृपेनें घननीळ । नवविधा मार्ग दाविले प्रांजळ । माता पुत्र जाहली प्रेमळ । भजन सर्वकाळ ते करिती ॥ ३९ ॥ मागील दुःख नाठवोनि अंतरीं । चालविती पंढरीची वारी । योगक्षेम तो निर्धारीं । चालवी श्रीहरी तयांचा ॥ ४० ॥ त्या विठोबाचा पुत्र जाण । पदाजी त्याचें नामाभिमानें । त्यानेंही करोनि सप्रेम भजन । रुक्मिणीरमण आराधिला ॥४१॥ पदाजीचा पुत्र शंकर । त्यानें पूजिला रुक्मिणीवर । कान्हया शंकराचा कुमर । बोल्होबा पुत्र तयाचा ॥ ४२ ॥ त्या बोल्होबाचें पोटीं परम । वैष्णव भक्त तुकाराम । ज्याचें चरित्र अनुक्रमें । ऐका सप्रेम भाविकहो ॥ ४३ ॥ बोल्होबा सकाम होऊनि चित्तीं । पांडुरंगाची करीतसे भक्ती । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । मनोरथ पुरती तें करीं ॥ ४४ ॥ म्हणाल कैसी भक्ती केली त्याणें । साक्षात्कार कोणत्या गुणें । तें सविस्तर यथामतीनें । करा श्रवण भाविक हो ॥ ४५ ॥ बोल्होबा सप्रेम होऊनि अंतरीं । एकांतीं नित्य भजन करी । आषाढी कार्तिकीसि निर्धारीं । चालविती वारी पंढरीची ॥ ४६ ॥ क्षुधार्थितासि घालीत अन्न । तृषाक्रांतासी देत जीवन । साधुसंत वैष्णव जन । त्यांचें पूजन करावें ॥ ४७ ॥ प्रपंच व्यवहार

१ बाप. २ वीप. ३ सूर्य. ४ डबक्यांतील पाणी. ५ नांव ६ पांडुरंग. ७ पाणी.

कांहीं करितां । तेथें न बोले असत्य वार्ता । सर्व भूमीं निजात्मता । द्वैत सर्वथा न देखे ॥ ४८ ॥ हें सात्विक तप करितसे जाण । परी चित्तीं वसे मनकामना । म्हणे रुक्मिणीकांता जगज्जीवना । करुणाघना श्रीविठ्ठला ॥ ४९ ॥ तुवां मागें अनाथनाथें । पुरविले भक्तांचे मनोरथ । ते कीर्ति त्रिभुवनांत । पुराणीं गर्जत पवाडे ॥ ५० ॥ ज्याची जैसी मनकामना । ते त्वां पुरविली जगज्जीवना । तुझी कीर्ति करुणाघना । माझिया मना आठवे ॥ ५१ ॥ उपमन्यु ब्राह्मण कुमर । दुग्ध मागतां वाटीभर । जाणोनि तयाचें निज अंतर । क्षीरसागरीं बैसविला ॥ ५२ ॥ ध्रुव बाळक अति अज्ञान । राज्यपद इच्छिलें त्याणें । देखोनि तयाचें निर्वाण । जाहलासि प्रसन्न श्रीहरी ॥ ५३ ॥ तयासि आश्वासूनि हातें । अढळपदीं बैसविलें निश्चित । शशीसूर्य तारागण समस्त । प्रदक्षिणा करित तयासीं ॥ ५४ ॥ तुझें उदारत्व श्रीहरि । वदूं न शके प्राकृत वैखरी । साचार शीणले मापारी । परी लेखा सत्वरी नोहे त्यां ॥ ५५ ॥ ऐशा रीतीं नित्य नित्य । बोल्होबा विनवीत रुक्मिणीकांत । हरिजागर एकादशी व्रत । असे करित निजप्रेमें ॥ ५६ ॥ चोवीस वर्षें ते अवसरीं । केली पंढरीची वारी । मग प्रसन्न जाहला श्रीहरी । कैशा परी तें ऐका ॥५७॥ बोल्होबाची निजकांता । परम भाविक पतिव्रता । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीकांता । आमुच्या आर्ता पुरवीं तूं ॥५८॥ ऐसीं दंपती दोघेजण । एकचित्तें असती जाण । तों तिन्हीं देव स्वप्नांत येऊन । दीधलें दर्शन त्यांलागीं ॥ ५९ ॥ ब्रह्मा विष्णु वृषभध्वज । म्हणती प्रसन्न जाहलों तुज । काय कामना असेल सहज । तरी तें आज निवेदीं ॥ ६० ॥ बोल्होबा सावध होऊनि अंतरीं । त्रिमूर्तीसि नमस्कार करी । म्हणे पुत्रकामना संसारीं । ये अवसरीं इच्छितसें ॥ ६१ ॥ शिव ब्रह्मा दोघे बोलती । तुझें मनोरथ पूर्ण होती । यावरी म्हणे वैकुंठपती । कैशा रीतीं पुत्र देऊं ॥ ६२ ॥ बोल्होबा बोले प्रतिवचन । विश्वोद्धारक वैष्णव जाण । कीर्तनीं गायील तुझे गुण । तें पुत्रनिधान मज देयी ॥६३॥ दामशेट गुणाबाईचा प्रेमा । पाहूनि पुत्र दीधला नामा । तैशाच रीतीं पुरुषोत्तमा । माझिया कामा पुरवीं तूं ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां निजप्रीतीं । अवश्य म्हणे रुक्मिणीपती । तुझें मनोरथ पूर्ण होती । निश्चय चित्तीं असोंदे ॥ ६५ ॥ सकळ संतांचा मुगुटमणी । पुत्रमिषें देखशील नयनीं । मग देवासि प्रदक्षिणा करोनि । लोटांगण घातलें ॥ ६६ ॥ ऐसा दृष्टांत होतां मानसीं । बोल्होबा आले जागृतीसी । मग सावध करोनि कनकाईसी । वृत्तांत तिजसी सांगितला ॥ ६७ ॥ स्वल्प काळें उभयतांनीं । पुत्र सोहळा देखिला नयनीं । कनकाई असतां गर्भिणी । प्रसूत जाहली तेधवां ॥ ६८ ॥ वरद पुत्र दीधला शिवें । सावजी ठेविलें त्याचें नांव । पुढें चरित्र वर्तलें अपूर्व । तें ऐसा वैष्णव निजप्रीतीं ॥ ६९ ॥ तंव कोणे एके अवसरीं । वैकुंठीं असतां श्रीहरी । भोंवतीं सकळ संतमंडळी बरी । आनंद मेळीं बैसले ॥ ७० ॥ ते जरी म्हणाल कोण कोण । तरी ऐका तयांची नामाभिधानें । श्रवण करितां मोहभ्रम जाण । जाय निरसोन तत्काळ ॥ ७१ ॥ सनकादिक नारद तुंबर ।

प्रल्हाद ध्रुव आणि अक्रूर । उद्धव अंबरीष वैष्णव वीर । शुक्र योगींद्र परीक्षिती ॥ ७२ ॥ भीष्म आणि रुक्मांगद जाण । पुंडलीक भक्त निधान । निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्तानिधान वैष्णवी ॥७३॥ नामा कबीर वैष्णव वीर। भानुदास चांगा वटेश्वर । सावता माळी नरहरी सोनार । विसोबा खेचर एकनाथ ॥ ७४ ॥ सेनान्हावी चोखामेळ । गोरा कुंभार भक्त प्रेमळ । ज्यांणीं भजन करोनि सर्वकाळ । वैकुंठपाळ वश केला ॥ ७५ ॥ बंका आणि बहिरा पिसा । जनक प्रेमळ भागवत परसा । तुळसीदास कमाल तैसा । वैकुंठाधीशा आवडती ॥ ७६ ॥ कान्हो पाठक सुरदास जाण । नामयाचे पुत्र चौघेजण । नरसीमेहता शिरोमण । वासरा तो खाण वैराग्याची ॥ ७७ ॥ रामदास रामानंद स्वामी यतीश्वर । जोगा रोहिदास वैष्णव वीर । सर्वसिद्धी नागनाथ थोर । आणि विश्वंभर भक्तराज ॥७८॥ चैतन्य राघव चैतन्य । अमाबायी गुण निधान । गोणायी राजायी गिराबाई पूर्ण । जनी कान्होपात्रा ते ॥ ७९ ॥ ऐसी सकळ भक्तमंडळीं । मध्यें बैसला वनमाळी । कैसा शोभला ते वेळीं । जैसा ग्रह मंडळीं चंद्रमा ॥ ८० ॥ तापसिया माजी पिनाकधर[1] । कीं पर्वतांमाजी मेरु थोर । सिद्धांमाजी अनसूया कुमरें[2] । वैकुंठ विहार तेवीं दिसे ॥ ८१ ॥ सकळ सौंदर्याची खाणी । चराचर जाहलें ज्या पासूनी । तयासि उपमा देतां कोणी । कवीची वाणी कुंठित ॥८२॥ ऐसा श्रीहरी निरुपम । जो भक्तकामकल्पद्रुम । सकळ भक्तांसि आत्माराम । बोले सप्रेम तेधवां ॥ ८३ ॥ या विश्वंभराच्या वंशीं देख । बोल्होबा भक्त प्रेमळ भाविक । त्यासि पुत्र देऊं केला एक । विश्व तारक जगद्गुरु ॥ ८४ ॥ तो कोणता द्यावा हा विचार । भक्तांसि पुसे सारंगधर । ऐसें ऐकोनि वैष्णव वीर । जयजयकार करिताती ॥ ८५॥ तों सकळ भक्तांत शिरोमण । संमुख नामा प्रेमळ पूर्ण । तयासि उठवोनि जगज्जीवन । एकांति नेऊन सांगत ॥ ८६ ॥ हरि म्हणे नामया कारणें । मज युगायुगीं अवतार घेणे । करावें धर्माचें संस्थापन । संहारून दुष्टांसी ॥ ८७ ॥ आणि तुम्ही अवतार घेऊनि क्षितीं[3] । सप्रेम करावी माझी भक्ती । दीन जन उद्धरती । तें भजन प्रीतीं सांगावें ॥ ८८ ॥ तरी ते आतां ऐकगा भक्त सखया । माझा सप्रेम विसांविया । तुवां अवतार घेऊनियां । भजन क्रिया सांगावी ॥८९॥ चहूं मुक्तीवरील भक्ती । बोलीलों गीता भागवती । ते करोनियां यथास्थिती । माझी कीर्ति वाखाणी ॥ ९० ॥ तूवां मागें घातला पण । कीं शतकोटि ग्रंथ मदर्पण । कांहीं शेष राहिलें जाण । तें तूं करणें मम आज्ञा ॥ ९१ ॥ शब्द ब्रह्म गूढार्थ थोर । ते तूं मथूनि काढी सविस्तर । सप्रेम क्षुधित जेवणार । तयांसि आदरें वाढीं कां ॥ ९२ ॥ भक्तिमार्गावरी साचार । हरिनाम पोही घाली सत्वर । सप्रेम भक्ती हेंचि नीरें[4] । देऊनि चराचर निववी तूं ॥ ९३ ॥ तुझ्या साह्यास ये अवसरीं । मोक्ष देतो बरोबरी । हा होऊनि आज्ञाधारी । धाडिसी तेथें जाईल कीं ॥ ९४ ॥ आणि मुक्तिचान्ही आंदण्या होती । तेथें ऋद्धि सिद्धि सहज येती । तुज तों नाहीं यांची प्रीतीं । परी उपयोगी पडती जनाच्या ॥ ९५ ॥ तरी आतां

१ शंकर. २ दत्तात्रेय. ३ पृथ्वीवर. ४ पाणी.

जावोनि मृत्युलोका । माझी कीर्ति ऐकवी लोकां । दशगुणे तुझा प्रेमा हो कां । सप्रेम सुखा पात्र जो ॥९६॥ ऐसा आशिर्वाद निजप्रीतीं । नामयासि देत लक्ष्मीपती । अवश्य म्हणोनि सप्रेम मूर्ती । काय वचनोक्ती बोलत ॥ ९७ ॥ म्हणे कलियुग खोटें साचार । त्यावरी तुझा बौद्ध अवतार । आम्हांसि संकट पडलें जर । तरी कोणासि उत्तर बोलावें ॥ ९८ ॥ ऐसें नामया बोलत । काय म्हणती वैकुंठनाथ । तुम्हांसि संकट पडतां निश्चित । मी निजांगें अनंत निवारीं ॥ ९९ ॥ सांडोनि बौद्ध अवतार पण । तत्काळ रूप धरीन सगुण । तुजसीं बोलेन अमृत वचन । निश्चय मन असों दे ॥ १०० ॥ ऐसें बोलतां शेषशायीं । सप्रेम नामा लोळत पायीं । मग उचलोनि चहूं बाहीं । आलिंगूनि हृदयीं धरियेला ॥ १०१ ॥ देवाच्या साम्यतेसि देखा । हृदयीं निजभक्त होता तुका । तो नामयाचें हृदयीं देखा । घालीत भक्तसखा श्रीहरी ॥२॥ कां नामयाच्या हृदय घटीं । प्रेमामृत सांठवी जगजेठी । कां षड्गुण ऐश्वर्य राहटी । घालितसे पोटीं जगदात्मा ॥ ३ ॥ नातरी अवतार शक्ति । उत्पत्ति प्रळय जिचेनि होती । कीं मोक्षावरी जे भक्ती । अर्पीत श्रीपती नामया ॥४॥ जो प्रकाशवीण प्रकाश जाण । निजभक्त तुका गुप्त ठेवण । विष्णूच्या हृदयीं ऐक्य होऊन । समरपणें मिसळला ॥ ५ ॥ तो आलिंगनाचे निमिषें देखा । नामयाच्या हृदयीं घातला तुका । म्हणे साह्य होऊनि एकमेकां । सप्रेम सुखा भोगिजे ॥ ६ ॥ ऐसें बोलतां सारंगधर । नामा विनवी जोडोनि कर । कोठें मी घेऊं अवतार । कुळ पवित्र तें सांगा ॥ ७ ॥ विष्णूची भक्ति ज्याच्या कुळीं । अखंड वाचेनि नामावळी । जेथें तुझी मूर्ति सांवळी । जन्म ते स्थळी दे देवा ॥८॥ ऐसें पुसतां नामयांसी । काय म्हणे वैकुंठवासी । ज्याणें भक्तिभावें गोंविले मजसी । तें स्थळ तुजसी सांगतों ॥ ९ ॥ हा माझा विश्वंभरदास । आतां वैकुंठीं केला वास । याणें भक्तिभावें सायास । गोंविलें आम्हास नामया ॥ ११० ॥ तें म्हणतील कैशापरी । तरी तेंही सांगतों अवधारी । कीर्तन करोनि सप्रेम गजरी । चालविली वारी पंढरीची ॥ ११ ॥ मग भक्तिभावें करोनि सहज । मी प्रसन्न जाहलों गरुडध्वज । आपुल्या गांवासि नेऊनि सहज । गोंविलें मज भाकेसी ॥ १२ ॥ याच्या वंशी बोल्होबा भक्त । त्याणें आराधिलें मातें । मग मी प्रसन्न जाहलों त्यातें । वर त्वरित माग म्हणें ॥ १३ ॥ मग तो वचन बोलिला मातें । पुत्र द्यावा कीं विष्णुभक्त । जो जगतारक मूर्तिमंत । विश्वहितार्थ जगद्गुरु ॥ १४ ॥ ऐसें बोलतां भक्तराया । मग आम्हीं प्रसन्न जाहलों तया । तें वचन सत्य करावया । अवतरे नामया ते ठायीं ॥ १५ ॥ अवश्य म्हणोनि वैष्णववीर । सद्भावें करूनि नमस्कार । मृत्युलोकीं उतरतां साचार । प्रकाशें अंबरें[2] कोंदलें ॥ १६ ॥ देखोनि लोक आश्चर्य करिती ॥ म्हणती नक्षत्र उदंड होती । परी आजि कां उतरला निशापती[3] । प्रभा दिसती असंभाव्य ॥ १७ ॥ का ते मुक्तीवरील चौथी भक्ती । तेचि महा नक्षत्र स्वाती । कनकाईचे उदरीं निश्चिती । अपांपती तोचि कीं ॥ १८ ॥ त्या उदरशुक्तिकेंत तत्काळ । नामयाचें प्रेम पडिलें जळ । त्यांत तुका जन्मला

१ श्रीविष्णू. २ आकाश. ३ चंद्र.

मुक्ताफळ । जो हरी प्रेमळ भक्त याचें ॥१९॥ नवविध भक्ति केली सायासें । तीच पूर्ण जाहले नवमास । कनकाईचें भाग्य विशेष । विष्णुभक्त उदरास आला कीं ॥१२०॥ डोहळे होती तयाचे ऐसे । संसाराचा येतसे त्रास । म्हणे एकांती जावोनि करावा वास । श्रीहरि भजनास बैसावें ॥२१॥ असो दिवस भरलिया निश्चित । कनकाई एकांतीं मंदिरांत । तों असंभाव्य प्रभा पडत । उगवे आदित्य ज्या रीतीं ॥ २२॥ कनकाई पुत्रमुख पाहत । तंव तेजोमय मूर्ति दिसत । तो शांतिसुखाचा कोंभ निश्चित । नातरीं मूर्तीमंत वैराग्याची ॥२३॥ कीं भक्तिनिधान प्रगटलें साचें । कीं सच्चिदानंद नामयाचें । कां तें भांडार प्रेमाचें । उघडलें साचे दिसताहे ॥२४॥ कनकाईचें विस्मित अंतर । तटस्थ घटिका राहिली चार । कांहीं न बोलवे उत्तर । तृष्णा अहंकार निरसले ॥२५॥ ते स्वानंद जळाच्या डोहीं । बुडोनि गेली ते समयीं । देहभावना किंचित नाहीं । हेचि नवायी अगाध ॥ २६ ॥ पुत्र प्रगटतां विष्णुभक्त । तत्काळ जाहला शक्तिपात । स्वरूपी तेज समरस होत । आनंदयुक्त मानसीं ॥ २७ ॥ वंद हृदयीं प्रगटोनि पांडुरंगमूर्ती । बाळकासि सांगे एकांतीं । म्हणे जैसी लौकिकस्थिती । तैशाच रीतीं वर्तावें ॥ २८॥ प्रपंचाची हातवटी । दाखवूनियां जनाच्या दृष्टीं । मग विवेक वैराग्य देखसी शेवटीं । प्रेम पोटीं भक्तीच्या ॥ २९ ॥ ऐसे सांगतां घननीळ । तत्काल भासलें मायाजाळ । कनकाई पाहे उघडोनिया डोळे । तों पुढें बाळ देखिला ॥१३०॥ मागील अवस्था आठवी मनीं । तों स्वप्नवत भासे तये क्षणीं । तत्काळ आल्या शेजारिणी । म्हणती कनकाई कोनी निघाली ॥ ३१ ॥ बोल्होबासि मात । कीं पुत्र जाहला तुम्हांतें । येरू म्हणे पंढरीनाथें । माझा मनोरथ पुरविला ॥३२॥ असो बारा दिवस लोटतां निश्चित । कनकाई जाहली शुचिर्भूत । मग राउळासि जाऊनि त्वरित । रुक्मिणीकांत नमियेला ॥३३॥ बालक उचलोनि ते समयीं । पांडुरंगाच्या घातले पायीं । हा दास तुझा शेषशायी । म्हणोनि लावी अंगारा ॥३४॥ ऐसें ऐकोनि वैकुंठनाथ । मग रुक्मिणीसी बोले मात । बालक उचलोनि आपल्या हातें । घाली वोसंगांत इयेच्या ॥३५॥ रुक्मिणीनें उचलोनि बाळ । स्वहस्ती घेतला तत्काळ । कनकाईच्या ओटींत बाळ । तये वेळे घातला ॥३६॥ कनकाई म्हणे ओ जननी । नांव ठेवावें आजिचे दिनीं । अवश्य म्हणोनि तये क्षणीं । माता रुक्मिणी चालिली ॥३७॥ बोल्होबाची सकाम भक्ती । प्रसन्न जाहले रुक्मिणीपती । म्हणोनि संतती आणि संपत्ती । जाहली येती आपेआप ॥३८॥ जेथें आला रुक्मिणी बाळा । तरी तेथें सर्व सिद्धि अनुकूळा । सुवासिनी मेळवूनि सकळा । घातलें बाळा पालखांत ॥ ३९ ॥ सुंदर स्त्रीचें रूप धरूनी । हळदीकुंकुमें लेववीत रुक्मिणी । मग बाळकासि तये क्षणीं । जो जो म्हणवोनी हालवित ॥ १४० ॥ जें का अक्षर अव्यक्त । असे नामरूपातीत । शब्देंवीण आनंदत । नीज तेथ निज बाळा ॥ ४१ ॥ जेथें अहंसोहं निश्चित । निमे द्वैत आणि अद्वैत । परादि वाचा कुंठित । नीज बाळा ॥ ४२ ॥ जेथें ज्ञेयज्ञाता ज्ञान निश्चित । ध्येय ध्यान ध्याता नाठवत । त्रिपुटी कारण नाहीं जेथ । नीज तेथ निज बाळा ॥४३॥

१ मंदिरात.

जें सिद्धांत ज्ञान बोलती संत । अहेतुक पद निश्चित । त्या निजसुखधामीं लावूनि प्रीत । नीज तेथ निज बाळा ॥ ४४ ॥ अव्यक्त नाकळे कोणातें । मग सगुण रूप धरी भक्तहेतें । त्या पांडुरंगचरणीं साक्षात । नीज नीज प्रीत लावुनी ॥ ४५ ॥ ऐशा रीतीं विश्वजननी । पाळणा गातसे तये क्षणीं । भोंवत्या सकळ सुवासिनी । जो जो म्हणोनि हालविती ॥ ४६ ॥ कनकाईसि पुसोनि देखा । बाळकाचें नांव ठेविलें तुका । ज्याचेनि नांवें सकळिका । जड जीव लोकां उद्धार ॥४७॥ सकळ लोकांसि वांटोनि पानें । सुवासिनींची भरलीं वाणें । घुगऱ्या वांटोनि निजप्रीतीनें । आली रुक्मिण राउळासी ॥ ४८ ॥ खेळत रांगत भक्त प्रेमळ । कांहींएक लोटला काळ । दिवसेंदिवसे ते वेळ । टाकीत पाउल चालावया ॥ ४९ ॥ मग तयाचे पाठीवर । कनकाई जाहली गरोदर । ब्रह्मवरदें जाहला पुत्र । कान्हया साचार नांव ठेविलें ॥ १५० ॥ सावजी तुका आणि कान्हया । तिघे पुत्र जाहले तया । बोल्होबा चमत्कार पाहोनिया । पंढरिराया भजतसे ॥ ५१ ॥ म्हणे तिन्हीं देवें स्वप्नांत । मज दाविला दृष्टांत । ते असत्य सर्वथा नव्हे मात । घडोनि यथार्थ आलें कीं ॥ ५२ ॥ धनधान्य पुत्रसंपदा सकळ । तयासि दीधली घननीळें । पूर्वतपाचें उत्तम फळ । सुखसोहळे पाहती ॥ ५३ ॥ तयाचें भाग्य वर्णावें जर । तरी सर्वथा नाहीं अंतपार । तिन्हीं देवांनीं दीधले पुत्र । जगदुद्धार करावया ॥५५॥ असो तिघे पुत्र ऐसे । थोर जाहले दिवसंदिवस । संतोष मातापित्यांस । पाहतां दृष्टीस त्यांलागीं ॥ ५६ ॥ धनसंपदा पाहोनि पुत्र । सोयरे जाहले थोर थोर । घटित सांगती द्विजवर । लग्न सत्वर नेमिलें ॥ ५७ ॥ द्रव्य खर्चोनिया बहुत । विवाह केला यथास्थित । कनकाई आपुल्या चित्तांत । आनंदयुक्त जाहली ॥५८॥ पुत्र सुना धन संपत्ती । भ्रतार युक्त सौभाग्यवती । पाहोनि आनंद स्त्रियांचे चित्तीं । नसे निश्चिती दूसरा ॥ ५९ ॥ सर्व साहित्य अनुकूल । उदीम करितां होय सुफळ । उणें पडों नेंदी अनुमाळ । दीनदयाळ तयांचें ॥ १६० ॥ संसार करोनि यथार्थ । त्याणी साधिला परमार्थ । मी कर्ता न स्फुरे जेथ । तोचि विरक्त म्हणावा ॥ ६१ ॥ संत लोक आणि इतर । उभयतां करिती संसार । परी दोहींचा अनुभव भिन्नाकार । ऐका तो विचार निजकर्णीं ॥ ६२ ॥ अज्ञान म्हणती प्रारब्ध पांगुळें । प्रयत्न करितां उदीम फळे । आम्हीं प्रपंचीं दक्ष सर्वकाळ । म्हणवोनि तळमळ न राहे ॥ ६३ ॥ परी प्रारब्ध घडवी अनयासीं । मीपणें बद्ध होतसे त्यासी । मग अंतरलें सायुज्य मुक्तीसी । योनी चौऱ्यांशीं हिंडती ॥ ६४ ॥ तेंचि सज्ञान असती संसारीं । ते म्हणती कर्ता एक श्रीहरी । हालवोनि प्राचीनाची दोरी । प्रारब्ध वरी भोगवत ॥ ६५ ॥ संचितीं असे तेंचि मिळतें । होणार ते न चुके सत्य । ऐशा रीतीनें सज्ञान वर्तत । ते जीवन्मुक्त म्हणावे ॥ ६६ ॥ बोल्होबाची ऐशी स्थिती । मी कर्ता हे न स्फुरे चित्तीं । म्हणवोनि प्रपंची परमार्थ रीतीं । रुक्मिणपिती जोडला ॥ ६७ ॥ जैसें पद्मपत्र जळीं असतां । परी उदकासी लिप्त नोहे सर्वथा । किं वासमरमणी घटीं

१ धंदा, व्यापार. २ कमळाचें पान. ३ सूर्य.

विंबतां । तों भिजला वृथा म्हणों नये ॥ ६८ ॥ नातरी विलासी मुख पाहतां सहसा । दर्पणीं उमटे त्याचा ठसा । परी तो तेथींचिया आभासा । न आवडे जैसा तयातें ॥ ६९ ॥ तैशा रीतीं वैष्णवभक्त । संसारीं असोनि मायातींत । प्रपंच धंदा सारितां समस्त । रुक्मिणीकांत आठविती ॥ १७० ॥ ऐशा रीती सारिता काळ । वार्धक्यदशा आली केवळ । मग सावजी पुत्र ते वेळ । आपणा जवळ बोलाविला ॥ ७१ ॥ म्हणे आतां आमुचें वार्धक्यपण । तूं वडील पुत्र सुजाण । तरी संसारांत घालोनि मन । देणें मागणें सांभाळीं ॥ ७२ ॥ पाहोनि खडी खतावणी । ऐवज सर्व ध्यानासि आणी । ऐकोनिया तयाची वाणी । सावजी चरणीं लागतसे ॥ ७३ ॥ मग म्हणतसे जी ताता । मी प्रपंचीं न गुंते सर्वथा । तीर्थाटणासि जावें आतां । वैराग्य चित्ता येतसे ॥ ७४ ॥ परी तुम्हीं माता पिता शिरीं । यास्तव गुंतोनि राहिलों घरीं । शास्त्रविरुद्ध जातां दुरीं । लोकाचारीं विपरीत ॥ ७५ ॥ देखोनि पुत्राची उदास स्थिती । बोल्होबा निवांत राहिला चित्तीं । म्हणे होणारची विचित्र गती । नकळें संचितीं काय आहे ॥ ७६ ॥ मागील स्मरण जाहलें सत्वर । म्हणे शंकरें दीधला हा वरदपुत्र । जैसा स्मशानवासी पिनाकधर । तैसाचि विचार पै याचा ॥७७॥ सत्व रज तमो गुणी निश्चिती । दैव तें साधकांसि प्रसन्न होती । तीं आपुल्या ऐसीच फळें देती । सत्य प्रतीत हे जाणा ॥७८॥ वासरमणीसि आराधितां । तो देत आपुली तीव्र उष्णता । कीं चंद्रबिंब उपासितां । देत शीतळता भक्तांसी ॥ ७९ ॥ तैशाच रीतीं वृषभध्वजें । वरदपुत्र दीधला सहज । तेणें नोहे संसार काज । समजलें मज अंतरीं ॥ १८० ॥ ऐसें समजोनि आपुलें चित्तीं । बोल्होबा राहे निवांत स्थितीं । मग तुकयासि बोलावुनि प्रीतीं । संसारवृत्ती निरविली । ॥ ८१ ॥ देणें घेणें उदीम हातवटी । तोट्यानफ्यांत असावी दृष्टी । जेणें स्वहित होईल शेवटीं । तैसी गोष्टी करावी ॥ ८२ ॥ ऐकोनि पितयाचें वचन । तुका तयासि अवश्य म्हणे । वैश्य व्यवसायांत जाण । दिससी निपुण सर्वार्थी ॥ ८३ ॥ सोयरे धायरे इष्टमित्र । म्हणती बोल्होजीचा दक्षपुत्र । त्याज देखतां संसार । आवरिला साचार तयानें ॥ ८४ ॥ पुत्र वर्ते पितृ आज्ञेनें । आणि स्त्री पतिव्रता सगुण । हें पूर्व तपाचें फळ जाण । येतें दिसोन अपैसें ॥ ८५ ॥ वडील पुत्र सावजी असे । तो तरी दिसतो महापुरुष । परी तुका दक्ष संसारिक दिसे । वयही नसे फार त्याचें ॥८६ ॥ ऐशा रीतीं सोयरे जन । मागें पुढें करिती स्तवन । ऐकोनि बोल्होबाचें मन । समाधान पावतसे ॥८७॥ जैसा प्रधानाचा ऐकोनि प्रताप । चित्तीं संतोषे नृप । कीं कन्येचे सद्गुण ऐकोनि मायबाप । आनंदरूप मानसीं ॥ ८८ ॥ कीं शिष्याची मति देखोनि बरी । सद्गुरूसि संतोष होय अंतरीं । तेवीं तुकयाची प्रज्ञा देखिलीयावरी । बोल्होबा अंतरीं संतोषे ॥ ८९ ॥ तुकयाचें लग्न केलें असतां । परी नोवरीसी धापेची होती व्यथा । मग विचार करिती मातापिता । लग्न आतां करावें ॥ १९० ॥ पुण्यांत अपाजी गुळव्या थोर । धनवंत होता सावकार । त्याची कन्या होती थोर । तें मागुनि दुसरें

१ आरज्ञात.

लग्न केलें ॥ ९१ ॥ ज्येष्ठ कनिष्ठ दोघी जाया । आणि संसारही आवरी तुकया । ऐसी स्थिती देखोनियां । मातापितयां संतोष ॥९२॥ मातापिता बंधु सज्जन । सर्व संपत्ति आणि धन । मान मान्यता तुकया कारणें । एकही उणें असेना ॥ ९३ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ जाण । हें पंढरी क्षेत्र पुरातन । सद्भाव हाचि पुंडलिक पूर्ण । वसेल क्षण या ठायीं ॥ ९४ शांति विरक्ति उदास । भीमा चंद्रभागा वाहती समरस । संत श्रोते प्रेमळ दास । त्यांसि क्षेत्रवास ये ठायीं ॥ ९५ ॥ सप्रेम आवडी जे अवीट । ते पुंडलीकें बैसावयासि दीधली वीट । त्यावर जघनीं कर ठेवूनि नीट । वैकुंठ पीठ उभा असे ॥ ९६ ॥ नासाग्रीं ठेवूनि ध्यान । देतो भाविकांसि आलिंगन । तेथें मी मूढमति अज्ञान । घ्यावया दर्शन आलों कीं ॥ ९७ ॥ प्रांजळ ओंव्या तुळसी कोमळ । हातीं घेऊनि प्रेमजळ । महिपति सदा तिष्ठे जवळ । चरणकमळ लक्षोनी ॥९८॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । सव्विसावा अध्याय रसाळ हा ॥ १९९ ॥ अध्याय ॥ २६ ॥ ॥ ओंव्या ॥ १९९ ॥



१ कमेरवर.



अध्याय २७
तुकाराम
ब्राह्मणरूपी विठ्ठल

श्रीगणेशाय नमः । जय जय सच्चिदानंद परब्रह्म मूर्ती । अपारिमित तुझी सत्कीर्ती । महिमा वर्णितां शिणल्या श्रुती । कुंठित मती शास्त्रांची ॥ १ ॥ तुझे पवाडे देवाधिदेवा । वदतां शिणला चक्षुःश्रवा । ठक पाडिलें कमलोद्भवा । आमुचा केवा तो किती ॥ २ ॥ बालक बोले बोबडें वचन । ऐकोनि मातेसी समाधान । शब्द पुसे पडताळून । निजप्रीतीनें आपुल्या ॥३॥ तैशाच परी रुक्मिणीपती । भक्त आर्ष करितां स्तुती । तें तुज वचनें गोड लागती । सप्रेम भक्तांचेनि बळें ॥ ४ ॥ शाहाणपणें वेद जाहला मुका । बांधितां गौळणी तुज भाविका । तयांसि भिऊनि वागसी निका । विश्वोद्धारका जगद्गुरु ॥ ५ ॥ तुझा व्हावया साक्षात्कार । महर्षि यजिती थोर थोर । तो तूं भिल्लीणीचीं उच्छिष्ट बोरें । खातोसि आदरें नवल कीं ॥ ६ ॥ तूं ब्रह्मयाचा तात[1] केवळ । आणि यशोदेचा म्हणविसी बाळ । अंकीं लोळसी सर्वकाळ । नसतीच आळ घेउनी ॥७॥ दुर्योधन सार्वभौम नृपवर । न घेसी त्याचा सन्मान आदर । आणि दासी-पुत्र भक्त विदुर । धुंडिसी घर तयाचें ॥८॥ सप्रेम भक्तीची देखोनि चट । खासी गोपाळांचीं उच्छिष्टें । लोटोनि पक्वान्नाचें ताट । मागसी देंठ भाजीचा ॥ ९ ॥ तैशाच रीतीं करुणाघनें । अंगीकारावी आर्ष वचनें । चित्तीं देऊनि आठवण । वदवीं गुण संतांचे ॥ १० ॥ मागिल्या अध्यायाचे शेवटीं । तुकयासि निरधिली संसार रहाटी । वैश्य व्यवसाय उघडतां दृष्टीं । संतोष पोटीं वडिलांतें[2] ॥ ११ ॥ माता पिता बंधु सज्जन । घरीं उदंड धन धान्य । शरीरीं आरोग्य लोकांत मान्य । एकही उणें असेना ॥ १२ ॥ ऐसें असतां तये वेळ । प्रपंचीं चित्त रमलें केवळ । तों पुढें विपरीत ओढवलें तत्काळ । तें ऐका प्रेमळ भाविकहो ॥ १३ ॥ सुखापुढें येतसें दुःख । हें अनादि सिद्ध भविष्य कारक । कीं हरिखापुढें सवेंचि शोक । देखती लोक दृष्टीसीं ॥ १४ ॥ जैसा मावळतां दिनकर । तितुकाचि पडे अहंकार । कीं आधीं धान्य पिके अपार । मग दुष्काळ थोर ये पुढें ॥ १५ ॥ नातरी अत्यंत मैत्रि की जेथें । सवेंचि विकल्प येतसे तेथें । बहुत सन्मान जाहला जेथें । तरी निंदाही तेथें उद्भवे ॥ १६ ॥ कीं देह श्लाघ्यता मानितां भोग । तंव शरीरीं उद्भवे रोग । अमृत मंथूनि काढितां मागें । विषही मग प्रगटलें ॥ १७ ॥ संसारीं सुख मानितां प्रीतीं । तैसेंचि जाहलें तुकया प्रती । पुढें त्रिताप उद्भवे चित्तीं । कैशा रीतीं ते ऐका ॥ १८ ॥ आयुष्य सरोनि गेलिया तत्वतां । वैकुंठासि गेलीं मातापिता । तेणें तुकयाच्या चित्ता । खेद सर्वथा नावरे ॥ १९ ॥ बंधु बहीण शोक करी । तेणें अधिकचि दुःख वाटे अंतरीं । म्हणे संसार ओझें आपुलें शिरीं । कैसी परी होईल ॥ २० ॥ ऐशा रीतीं चिंता करितां । सवेंचि धीर देतसे चित्ता । म्हणे होणार ते झालें आतां । नोहे अन्यथा माझेनी ॥ २१ ॥ ऐसा चित्तासि देतां धीर । तों वडिल सावजी सहोदर । त्याची स्त्री पावली परत्र । तेणेंही अंतर दुखवलें ॥ २२ ॥ सावजी आधींच होता उदास । मानीं संसाराचा त्रास । त्यावरी कांतेचा होता पाश । तोही अनायासें निरसला ॥ २३ ॥ परम अनुताप धरूनि मनीं । बंधु तो

[1] ब्रह्मदेव. [2] पिता.

गेला तीर्थाटणीं । मुखीं अमृत संजीवनी । नामस्मरणीं सर्वदा ॥ २४ ॥ सप्तपुऱ्या ज्योतिर्लिंगें बारा । दृष्टीसीं पाहिलीं त्या अवसरा । पुष्करादि तीर्थे करोनि सत्वरा । दुस्तर संसारा निवटिलें ॥ २५ ॥ कायिक वाचिक मानसिक । तपें आचरला स्वाभाविक । षड्वैरी जिंकोनि देख । शांति सुख पावला ॥ २६ ॥ सर्व तीर्थे करोनि जाणा । मागुती आला आनंदवना । संत समागम धरोनि नाना । आत्म साधना विचारी ॥ २७ ॥ आत्मस्थिति पावोनि पूर्ण । जाहलें स्वस्वरूपीं समाधान । असो इकडे अनुसंधान । ऐका सज्जन निजप्रीतीं ॥ २८ ॥ देहूसि तुका वैष्णव । खेद करित नित्य नित्य । म्हणे मातापिता क्रमिलीं निश्चित । बंधूची गत हे झाली ॥ २९ ॥ कांता जिवंत असती जरी । मग फिरोनि येता कधीं तरी । आधींच उदास होता अंतरीं । फावली बरी संधि आतां ॥ ३० ॥ म्हणे रुक्मिणीवरा पंढरीनाथा । जोंवरी होतीं मातापिता । तोंवरी मज नव्हती एकही चिंता । तरी कैसें आतां करावें ॥ ३१ ॥ पितयाचें धन होतें बहुत । तेंही जाहलें वाताहत । जैसा शीत काळ येतां अभ्रें समस्त । विलया जात आकाशीं ॥ ३२ ॥ कीं पृथ्वीवरी तृणांकुर असती । ते उष्णकालीं वाळोनि जाती । कीं अभ्रच्छायेच्या बैसतां वस्ती । ती नाहींच होतीं क्षणमात्रें ॥ ३३ ॥ कीं इंद्रधनुष्य दिसतां पाहे । परी क्षण लोटतां नाहींसें होय । ना तरी तरंगाचा स्वभाव काय । अक्षय आहे विचारा ॥ ३४ ॥ तैसें तुकयाचें धनधान्य समस्त । अटोनि गेलें जेथील तेथ । यास्तव होऊनि चिंताक्रांत । म्हणे कैसी मात करावी ॥ ३५ ॥ आपुलें द्रव्य दुसऱ्यावर । ते बोलों न देती साचार । उदीम न चले अणुमात्र । कैसा विचार करावा ॥३६॥ कुटुंबवत्सल खर्च पदरीं । म्हणोनि धांवे हटबाजारीं । द्रव्यासाठीं नानापरी । प्रयत्न करी बहु फार ॥३७॥ येणेंही नयेचि पुरवठा । मग दुकान मांडोनि बैसे चोहटा । वाचेसि हरिनामाचा फांटा । व्यापार खोटा न करवे ॥ ३८ ॥ म्हणे उणें द्यावें कोणास । तरी असत्य वर्ततां महादोष । गिऱ्हाईक मागतसे जैसें । धारणे विशेष तें द्यावें ॥ ३९ ॥ सर्वभूतीं दयापूर्ण । असत्य सर्वथा न बोले वचन । वाचेसि अखंड हरिस्मरण । एकही क्षण न विसंबे ॥ ४० ॥ ऐसी स्थिति देखोनि पाहें । देव कसवटी लाविताहे । याही व्यापारें पुरवठा नये । मग आणिक उपाय करितसे ॥ ४१ ॥ वैश्यव्यवसाय नानाविध करी । परी कोठेंही साह्य न होचि श्रीहरि । चित्तीं कष्टी होतसे भारी । आटती परी देखोनी ॥ ४२ ॥ आपण कष्टोनि रात्रंदिवस । ढोरावरी गोण्या वाहतसे । शीत उष्ण निद्रा आळस । कांहींच ध्यानास आणीना ॥ ४३ ॥ आणिक कर्ज घेऊनि फार । मागुती धंदा केला थोर । परी नफा न होय आणुमात्र । चिंतातुर यासाठीं ॥ ४४ ॥ आणिक ऋण घेऊनि पाहें । कांहीं हातवटी करूं जाय । तेणेंही न दिसेचि सोय । म्हणे करावें काय विठोबा ॥ ४५ ॥ बहुत कष्टी होऊनि चित्तीं । स्मरण करीत अहोरातीं । कांहीं ऋण घेऊनि मागुतीं । वस्तभाव होती तेहि मोडिली ॥ ४६ ॥ वजन करोनि हिशोब

१ ढग.

पाहत । घरीं वाणी मिळेल समस्त । तंव तें अधिकचि आलें आंत । कैसी मात करावी ॥ ४७ ॥ सोयरे पिशुन ते वेळे । म्हणती याचें तें निघालें दिवाळें । सावकार येऊनि द्वारीं बैसले । अश्रुपातें भरले नेत्र तेव्हां ॥ ४८ ॥ म्हणे देवाधिदेव रुक्मिणीकांता । कैसी विपरीत केली वार्ता । काय संसारासि करूं आतां । म्हणवोनि चिंताक्रांत मनीं ॥ ४९ ॥ तेव्हां इष्टमित्र आप्तसंबंधीं । रक्षिते जाहले तये संधीं । कोणी हवाले घेतले त्रिशुद्धी । आपणासि उपाधी लागावया ॥ ५० ॥ कोणीं आपली दाखवूनि पत । आणि कर्ज काढोनि देत । तुकयासि करोनि फजीत । काय सांगत तेधवा ॥ ५१ ॥ तूं तरी जाहलासि परमार्थी । नाम जपतोसि अहोराती । यास्तव संसारी जाहली फजीती । तरी विठ्ठल चित्तीं न धरावा ॥ ५२ ॥ विष्णुभक्ति करितां साचार । कोणाचे नाहीं जाहलें बरें । सांगत गेले आमुचें पितर । अनुभवें साचार तूं पाही ॥ ५३ ॥ संसारयुक्ति मुख्य हें नकळे । आणि नाम जपतोसि सर्वकाळ । तरी हें सात्र भविष्य केवळ । भिकेचे डोहळे तुज आले ॥ ५४ ॥ हितास्तव देतों शिकवण । यास्तव अंतरीं कोपाल झणें । आमुचें नायकोनि कराल भजन । तरीं अधिकचि ऋण होईल ॥ ५५ ॥ ऐसें शिकवोनि त्या अवसरा । वाणी गेले आपुल्या घरां । हळहळ करिती दारां । म्हणती संसारा काय करूं ॥ ५६ ॥ घरधनियास जैंपासून । विठोबाचें लागलें ध्यान । आम्हीं उठलों माणसांतून । खावयासि अन्न मिळेना ॥ ५७ ॥ घरी कांता ऐशा रीती । नानापरीचे अपशब्द बोलती । बाहेर पिशुन सर्व हांसती । परी निश्चय चित्तीं सोडीना ॥ ५८ ॥ सप्रेमभावे तये क्षणी । जिव्हा रंगली नामस्मरणी । घरीं हळहळ करिती राणी । गेलो म्हणोनि उदिमासी ॥ ५९ ॥ चार ढोरें होतीं जाण । रोग होतांचि गेलीं तीन । कसोनि पाहे रुक्मिणीरमण । टाकितो भजन काय माझें ॥ ६० ॥ परी अधिकोत्तर भजनांचा । सप्रेम टाहो करीत वाचा । सोबती म्हणती त्रास याचा । आला साचार आम्हांसी ॥ ६१ ॥ नेणेचि कांही काळवेळ । बडबड करितो सर्व काळ । निद्रा नयेचि आळमाळ । आमुचें कपाळ उठविते ॥ ६२ ॥ तुकयासि चुकवोनि निश्चित । सोबती पुढे गेले समस्त । मग आरण्यामाजी विष्णुभक्त । भोंवतें पाहत तेधवां ॥ ६३ ॥ कोणी दुसरें नाहीं आणिक । रात्र जाहली घटिका एक । बैलावरील गोणी देख । खाली पडली तेधवा ॥ ६४ ॥ तेव्हां चिंता उद्भवली जाण । म्हणे आतां उचलूं लागेल कोण । आकाशी मेघ करी गर्जत । वळला पर्जन्य सभोंवती ॥ ६५ ॥ अद्भुत सुटला प्रभंजन[३] । धुळीनें नेत्र झांकले जाण । गगनीं कडकडली सौदामिन तुषार पर्जन्य तेव्हां ॥ ६६ ॥ भयानक वन साचार । दिसती श्वापदांचे भार । अद्भुत पर्जन्य वर्षतो वर । तेणें दुखवे अंतर तुकयाचें ॥ ६७ ॥ मग म्हणे आपुले पोटीं । संसार चांडाळे घेतली पाठी । तेणें बहुत जाहलों कष्टी । कोणासि गोष्टी सांगावी ॥ ६८ ॥ मायबापें टाकूनि दीधलें मज । बंधु वैरागी जाहला सहज । दिवाळें निघालें माझें । तेणें वाटती लाज संसारीं

१ वायको. २ व्यापारासाठी. ३ वारा.

॥ ६९ ॥ मान करीत होते पिशुन । तेचि हांसती करोनि हेळणें[1] । वाताहत जाहलें धन । खावयासि अन्न घरीं नाहीं ॥ ७० ॥ सोबती गेले चुकवोनी । कोण उचलूं लागेल गोणी । म्हणे देवाधिदेवा चक्रपाणी । तुजवीण कोणी असेना ॥ ७१ ॥ मातापिता बंधु चुलता । तूंचि होसी पंढरीनाथा । प्राण सांडी होईल आतां । ये अनंता लवकरी ॥ ७२ ॥ इष्टमित्र सखा सज्जन । तुज वांचोनि नसेचि आन । जैसें अज्ञान बाळक तान्हें । तरी जननीवीण कोण त्यासी ॥ ७३ ॥ माझी बळबुद्धि खुंटली जाण । म्हणवोनि करितों तुझें चिंतन । जरी तूं नसेसि करुणा घन । तरी हांसती पिशुन सर्वत्र ॥७४॥ ऐसें म्हणवोनि प्रेमळ भक्त । नेत्रीं वाहती अश्रुपात । म्हणे विठाबाई अनाथनाथे । मज दिनातें सांभाळी ॥ ७५ ॥ ऐसा सप्रेम धांवा ऐकोनि कानीं । पांथस्थाचें रूप धरोनि । तत्काळ पावले चक्रपाणी । तुकया लागुनी पुसती ॥ ७६ ॥ येव्हढे रात्रींमध्यें जाण । वाट रोधूनि बैससी कोण । ऐसें पुसतां मधुसूदन । तयासि वचन बोलतसे ॥ ७७ ॥ म्हणे मी वाणी व्यवसायी । गोणी पडिली ये ठायीं । उचलावयासी कोणी नाहीं । सोबती सर्वही ते गेले ॥ ७८ ॥ ऐकोनि तुकयाचें उत्तर । काय करीत सारंगधर । हात लावोनि बैलावर । गोणी सत्वर घातली ॥ ७९ ॥ तेणें संतोषे वैष्णव वीर । परी मार्ग न दिसे अंधकार । वाटसरू बोले उत्तर । ये सत्वर मज मागें ॥ ८० ॥ निजभक्तासि पांडुरंग मूर्ती । वाट दावी सत्वर गतीं । परी वैष्णव मायेनें घातली भ्रांती । म्हणोनि चित्तीं समजेना ॥ ८१ ॥ असो पुढें वाट दाविता घननीळ । मागें येतसे भक्त प्रेमळ । आले इंद्रायणीच्या जवळ । तों पूर तुंबळ चालला ॥ ८२ ॥ तुकयासि चिंता उपजली मनीं । म्हणे कैसी उतरोनि न्यावी गोणी । मग म्हणे कैवल्यदानी । ठाव पाहोनि मी येतों ॥ ८३ ॥ लीला नाटकी जगज्जीवन । खालीं घातलें सुदर्शन । तुकयासि म्हणे मधुसूदन । गोणी उतरणें न लगेचि ॥ ८४ ॥ ऐसें म्हणवोनि रुक्मिणीवर । पुढें चालिले स्थिर स्थिर । गोणी तैसीच बैलावर । वैष्णव वीर उतरला ॥ ८५ ॥ तुकया विस्मित होतसे जीवीं । म्हणे आजि पांथस्थ धाडिला देवें । नाहींतरी नव्हतें बरवें । उतरायी व्हावे कैसेनी ॥ ८६ ॥ ऐसा विस्मित होता मनीं । तों नवल देखिलें तये क्षणीं । गगनीं चमके सौदामिनी[2] । त्या प्रकाशें करोनी पहात ॥ ८७ ॥ पांथस्थ जात होता पुढें । तेंचि चतुर्भुज जाहलें रूपडें । तुकयासि ब्रह्मानंद जोडे । निजनिवाडे पहातसे ॥ ८८ ॥ कांसेसी दिव्य पीतांबर । कंठीं कौस्तुभ झळके सुंदर । गळा वैजयंती हार । श्रीमुख मनोहर जयाचें ॥ ८९ ॥ श्याम तनु विराजमान । त्यावरी चर्चिला शोभे चंदन । श्रीवत्सांकित भूषणें । मुगुटीं रत्नें लखलखिती ॥ ९० ॥ दिव्य कुंडलें कानीं तळपती । वदनीं दशनं[3] हिरे झळकती । पायीं तोडरवांक्या वाजती । विस्मित चित्तीं होय तुका ॥ ९१ ॥ सौदामिनीच्या तेजें सत्वर । देखिला लावण्य सुखसागर । हें तुकयासि दाखविलें चरित्र । परी दृष्टांत न स्फुरे ये ठायीं ॥ ९२ ॥ दीपकाच्या प्रकाशेंकरोनी । कैसा पहावा वासरमणी । अमृतासि चव यावया लागुनी । साकर घालोनि पहावी ॥ ९३ ॥

१ अवहेलना. २ वीज. ३ दांत.

चक्षुःश्रवा भेटावया निश्चित । विरोळा घालिजे पुढाइत । कीं भूतांची धरोनि संगत । कैलासनाथ पहावा ॥ ९४ ॥ कीं अज्ञान भ्रांतीसी प्रतिपादून । कैसे साधकासि होईल ज्ञान । षड्वैरियांच्या संगतीनें । शांति–सुख दिसोन नये कीं ॥ ९५ ॥ तेवीं सौदामिनीच्या तेजें निश्चिती । सर्वदा न दिसे पांडुरंग मूर्ती । देखोनि याची सप्रेम भक्ती । स्वयें श्रीपती प्रगटला ॥९६॥ परी तुका ओळखोनि निजनिवाडे । प्रेमें भेटे येवोनि कोडें । यास्तव सौदामिनी तेज करोनि पुढें । दर्शन रोकडें देत असे ॥ ९७ ॥ सर्वेचि पाहें सावधपणें । तों पांथस्थ पुढें करी गमन । उभयतां घरासि येऊन । कोणी उतरोन ठेविली ॥ ९८ ॥ ढोराची खटपट करावयासी देखा । गुंतला तेव्हां वैष्णव तुका । संधी फावली वैकुंठनायका । गेला भक्तसखा तेथूनी ॥ ९९ ॥ असो प्रातःकाळ होतांचि जाण । गांवांत कळलें वर्तमान । कीं तुका आला वणजेहून । ढोरें मारून टाकिलीं ॥ १०० ॥ सावकार पिशुन आणि खळ । गृहासि पातले जैसे काळ । जैसें क्षत लक्षूनि तात्काळ । येती कावळे टोंचावया ॥ १ ॥ परमार्थ प्रपंचीं साचार । अखंडाकार चाले वैर । एक राजहंस ससाणे फार । तैसा विचार तो झाला ॥ २ ॥ कीं बोरबनामाजी साचें । एकचि झाड कर्दळीचें । तैशाच परी तुकयाचें । छळण वाचें तें करिती ॥ ३ ॥ चार ढोरें होतीं निश्चित । तीन मरोनि गेलीं त्यांत । हे श्रीभजनाची प्रचीत । आली निश्चित तुजलागीं ॥ ४ ॥ चित्तीं धरितां रुक्मिणीवर । सांग कवणाचें जाहलें बरें । हरिश्चंद्र राज सत्वधीर । क्लेश थोर त्या झाले ॥ ५ ॥ नळराजा आणि दमयंती । त्यांणीं चित्तीं धरितां रुक्मिणीपती । संसारांत झाली विपत्ती । सांगावी किती निजमुखें ॥ ६ ॥ एक म्हणती तुकयासि पाहीं । हृदयीं धरिला शेषशायी । लौकिक लाज किंचित नाहीं । जाहली सर्वही वाताहत ॥ ७ ॥ आम्ही शिकवितों परी हा नायके । तेणेंचि बहुत पावतो हा दुःख । कर्ज घेऊनि बुडविले लोक । परी लज्जा शोक यासि नाहीं ॥ ८ ॥ ऐसें बोलोनि त्या अवसरा । पिशुन गेले आपुल्या घरा । चिंता उद्भवली वैष्णव वीरा । म्हणे या संसारा काय करूं ॥ ९ ॥ परमार्थीं चित्त प्रपंचीं देह । दों ठायीं जीव वांटला आहे । कधीं सोडविसील विठ्ठलमाये । करुणा नये तुज कैसी ॥ ११० ॥ पर्जन्य गेला देशांतून । दुष्काळ आला पुढें कठिण । मुलें माणसें खाण्यावांचुन । होती हैराण सर्वदा ॥ ११ ॥ संसार टाकावा कोणावर । तरी आणिक साह्य नसे दुसरें । ऐसें म्हणोनि वैष्णव वीरें । चित्तीं विचार योजिला ॥ १२ ॥ कांहीं भांडवल उरलें होतें । त्याच्या मिरच्या घेतल्या तेथें । तीन गोण्या भरोनि निश्चित । जाय कोंकणांत तेधवां ॥ १३ ॥ मार्गीं चालतां तये क्षणीं । विठ्ठल नामाचा उमटे ध्वनी । सगुण रूप आणोनि ध्यानी । सप्रेम मनीं सर्वदा ॥ १४ ॥ संसाराचा यावा त्रास । म्हणोनि व्यवसाय करीतसे । मन विटवावें भलतैसें । धरिली आस यासाठी ॥ १५ ॥ नामरूपीं जडलें चित्त । देहभाव नाहीं किंचित । समुद्रतीरीं वैष्णवभक्त । गांवाबाहेर उतरला ॥ १६ ॥ तेथें शिवालय होतें थोर । पुढें वटापिंपळ

तरुवर । तेथें गोणी लोटोनि सत्वर । स्वहस्तें डोरें बांधिलीं ॥ १७ ॥ गोणी उसवोनियां हातीं । दुकान मांडिले तयेक्षितीं । चित्तीं बैसली पांडुरंगमूर्ती । देहाकृती नाठवे ॥ १८ ॥ नरनारी येऊनि जाण । तुकया प्रती बोलती वचन । विकावयासि आणिलें केण । याची धारणा सांगावी ॥ १९ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णव भक्त । तुम्हांसि नाहीं काय विदित । लागेल तें न्यावें त्वरित । संकोच चित्त न व्हावें ॥ १२० ॥ तंव एकें तांदूळ आणिले शेर । ते मोजूनि घेतले सत्वर । त्याच्या हिशोबें वैष्णववीर । देत सात्रार मोजूनी ॥ २१ ॥ वर द्या कांहीं बोलती वचन । ऐकोनि म्हणे वैष्णवजन । तुम्हीं आपुल्या स्वहस्तें घेणें । संकोच मनीं न धरितां ॥ २२ ॥ भीत भीत काढा घेती पाहे । म्हणती हातास झोंबेल काय । तंव तो तिकडे न पाहे । देहींच विदेही म्हणोनी ॥ २३ ॥ आणि कसा रुके घेऊनी देखा । आल्या तेथें दोघी बायका । तयांसि मोजूनि देतसे तुका । म्हणती आणिक दे वर कांहीं ॥ २४ ॥ येरू म्हणे आपुल्या हातें । घेऊनि जावें लागेल तें । एक हात घाली भीत भीत । दुसरी बोलत तिजलागीं ॥ २५ ॥ तुकाशेट वाणी भला फार । माप मोजूनि देतसे खरें । काढा घेतां दोन्हीं करें । हातासि आणुमात्र झोंबेना ॥ २६ ॥ शब्द बोलोनि ऐशा रीतीं । दोन्हीं हातें काढा बोढिती । परी कांहीं न वर्जी तयांप्रती । लोक पाहती सभोंवतें ॥ २७ ॥ गांवांत जावोनि सांगती कोणी । बाहेर आला तुकाशेट वाणी । तो परम भला सुलक्षणी । हरिभजनीं तत्पर ॥ २८ ॥ मोजणीपरीस साचार । दुप्पट गुणें देतो वर । हातासि न झोंबे अणुमात्र । पहा चरित्र दृष्टीसीं ॥ २९ ॥ गांवांत प्रगट जाहली मात । पाहावयासि लोक येत । म्हणती हा केवळ भोळा भक्त । कार्य त्वरित साधावें ॥ १३० ॥ पैका आणावयासि गेलों घरीं । तरी उडोनि जाती वरच्यावरी । तुकयासि म्हणती ते अवसरीं । आमुचें मंदिरीं खर्च बहू ॥ ३१ ॥ उधार द्याल जरी निश्चित । तरी पैका देऊं मागिल्या हातें । लागतील त्या त्या निश्चित । वैष्णव भक्त म्हणतसे ॥ ३२ ॥ मोजूनि देतो वैष्णव वीर । स्वहस्तें चौगुणे घेती वर । म्हणती राशीपरीस सर्वां फार । गोष्ट अपूर्व हे झाली ॥ ३३ ॥ देखोनि त्याचें भोळेपण । मागों लागलें अवघे जन । मग दुसरी गोणी उसवोन । स्वहस्तें घेणें म्हणतसे ॥ ३४ ॥ एकदांच मागतां सर्वत्र । एकला देऊं कोठवर । माझा विश्वास तुम्हांवर । आपुल्या करें घेऊनि जा ॥ ३५ ॥ ऐसें बोलतां वैष्णववीर । सर्वत्र एकदाच घालिती कर । जैसे उच्छिष्ट पात्रें देखोनि फार । श्वानें निकुरें भांडती ॥३६॥ प्रपंच स्वार्थ करोनि निश्चितीं । एकासी एक गुरगुरिती । परी पुढें कैसी होईल गती । विचार चित्तीं नाठवे ॥ ३७ ॥ कोणी होते जोरावर । त्यांणी घेतल्या मणभर । कोणी आदमण वोढिल्या करें । पांच शेर कोणाशी ॥ ३८ ॥ कोणी आदपाव दोन शेर । कोणासि आल्या वोटिभर । कोणी घेऊनि बचकभर । जाती सत्वर मंदिरां ॥ ३९ ॥ दोन गोण्या ऐशा रीती । मिरच्या लुटोनि नेल्या समस्तीं । तों एक महाखळ अवचित्तीं ।

तुकया प्रतीं बोलत ॥ १४० ॥ माझें घरीं खर्च थोर । मिरच्या पाहिजेत गोणीभर । तुम्हांसि असत्य वाटेल जर । पुसा सत्वर लोकांसी ॥ ४१ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । तुमचा विश्वास आहे निश्चित । वचन ऐकोनियां त्वरित । नष्ट उचित गोणीतें ॥४२॥ तयासि म्हणे प्रेमळ भक्त । गोणी आणूनि द्यावी त्वरित । तो म्हणे साठवण निश्चित । नसे घरांत माझिया ॥ ४३ ॥ तुम्ही मागुती याल परतोनी । मग रिती करोनी देईन गोणी । ऐशारीती खळ बोलोनी । गेला सदनीं आपुल्या ॥ ४ ॥ अंतरींचा कृत्रिम भाव । सर्वथा नेणे भक्त वैष्णव । याच विषयीं तुम्हीं सर्व । दृष्टांत अपूर्व अवधारा ॥ ४५ ॥ आज पर्जन्य वर्षेल घटिका । ऐसें जाणती पिपीलिका[1] । मग आंडीं काढोनियां देखा । ठिकाणीं आणिका त्या नेती ॥ ४६ ॥ आणि लध्वी करितां भूमीवर । त्याच मुंग्या वाहती पुरें । त्यांसि ब्रह्मांडींचा कळे विचार । परी मानवाचें अंतर न जाणती ॥ ४७ ॥ तैसें देवाचें मनोगत । तें जाणती प्रेमळभक्त । परी दुर्जनाचें कठिण चित्त । तें निश्चित कळेना ॥ ४८ ॥ कांहींन द्यावें यालागुनी । मिरच्यासहित नेली गोणी । परी तुकयासि त्याचा विश्वास मनीं । कपटखाणी कळेना ॥ ४९ ॥ परम संतोष जाहला अंतरा । म्हणे बरा सत्वर जाहला विकारा । स्नान करोनि ते अवसरा । रुक्मिणीवरा आठवीत ॥ १५० ॥ शेर तांदूळ सरुके सजगाणी । रोख इतुकीच जाहली बोहणी । तें देखोनियां नयनीं । संतोष मनीं तुकयाच्या ॥ ५१ ॥ म्हणे साहित्य तों आलें निश्चित । आतां करावी पाक निष्पत्त । पितळी तपेलें घेऊनि त्वरित । घातला भात शिजावया ॥ ५२ ॥ जनार्दनाचि भरला जनीं । ऐसा निश्चय दृढ मनीं । ध्यानांत आणूनि कैवल्यदानीं । नामस्मरणीं डुल्लत ॥५३॥ ऐसी जाणूनि तयाची स्थिती । काय म्हणतसे रुक्मिणीपती । याची तो ऐसी उदास वृत्ती । प्रपंच भ्रांती कळेना ॥५४॥ तीन गोण्या साचार । मिरच्या घेऊनि गेले चोर । घरीं आडवितील सावकार । मग काय उत्तर देईल त्यां ॥ ५५ ॥ ऐसें म्हणोनि भक्तकैवारी । मनुष्यवेष घेत सत्वरी । गांवांत जावोनि एके घरीं । मधुरोत्तरीं बोलत ॥ ५६ ॥ म्हणे उधार द्यावाजी सत्वर । आम्हांसि जावया जाहला उशीर । ते म्हणती तूं कोण साचार । कशाचा उधार मागसी ॥ ५७ ॥ ऐकोनि म्हणे सारंगधर । तुकशेट वाणी देहूकर । मी विठोजी त्याचा चाकर । आलों उधार मागावया ॥ ५८ ॥ यावरी म्हणती स्वार्थी जन । आम्हांसि येन्हवीं दीधल्या त्यानें । मोजूनि घेतल्या असतील जाण । तरी मागणें साजतें ॥५९॥ यावरी म्हणे वैकुंठपीठ । तो हात तुकेंचि देतो स्पष्ट । यास्तव त्यासी तुकशेट । नांव वरिष्ट बोलती ॥१६०॥ यावरी गांवींचे लोक बोलती । तरी मिरच्या आम्हीं आणिल्या किती । जैसें सांगती रुक्मिणीपती । तितुक्याच भरती मोजितां ॥६१॥ ऐसा देखोनि चमत्कार । पैसे आणोनि देती सत्वर । भक्तांसाठीं सारंगधर । घरोघर फिरतसे ॥६२॥ कोणी आले थोटाईसी । तरी गाळिप्रदानें देतसे त्यासी । कोणी परतोनि बोलतां यांसी । उगाच सोशी जगदात्मा ॥ ६३ ॥ ज्याचे आंगीं जितुकें लावित । तितुकेंचि वजन भरत

[1] मुंग्या.

तेथ । म्हणती तुकाशेट हें नांव सत्य । आश्चर्य करिती जन तेव्हां ॥ ६४ ॥ भक्तिभावें भुलला हरी । आपुलें महत्त्व न विचारी । रंक होऊनि ते अवसरीं । घरोघरीं फिरतसे ॥ ६५ ॥ स्वमुखें बोले बाजारांत । गावींचे लोक थोट बहुत । उधार मागतां बळासि येत । परी होतील फजीत या गुणें ॥ ६६ ॥ कोणी चमत्कार पाहोनी । द्रव्य देताति आणोनी । कोणी कज्जासि भिवोनी । देती आणोनी चोहाटी ॥ ६७ ॥ ऐशा रीतीं राजीवनेत्रें । उधार उकाळिलां सर्वत्र । परीं मिरच्या नेल्या गोणीभर । तो एक साचार राहिला ॥ ६८ ॥ मनांत म्हणे जगज्जीवन । त्याचे कैसें उगवेल धन । दिसतो खळ सर्वांहून । उपाय कोण करावा ॥ ६९ ॥ जैसा धान्यामाजी कुचर । न भिजे न शिजे आणुमात्र । तैसें खळाचें अंतर । न द्रवे साचार सर्वथा ॥ १७० ॥ संकट जाणोनि श्रीहरी । उभे राहिले त्याचे द्वारीं । सक्रोध होऊनि अंतरीं । कठिणोत्तरीं बोलत ॥ ७१ ॥ तुकशेट वाणी देहूकर । मी विठोजी त्याचा चाकर । मिरच्या आणिल्या गोणीभर । त्याचा उधार दे आतां ॥ ७२ ॥ भला माणूस दिसतो नयनीं । आणी घरीं आणोनि ठेविली गोणी । वाट पाहतो माझा धनी । आतां उधरणी देईजे ॥७३॥ ऐसें बोलतां घननीळ । काय उत्तर देतसे खळ । चाल तुझ्या धन्या जवळ । म्हणोनि बळें वोढिला ॥७४॥ तुकशेट माझा मित्र जाण । मजवरी केलें यहसान । त्याणें काय दीधल्या मोजूनि । आलासि म्हणोनि या ठायां ॥ ७५ ॥ ऐसें बोलतां दुर्जनासी । काय म्हणे वैकुंठवासी । मी तरी न जाय तयापासी । म्हणेल अपेशी चाकर हा ॥ ७६ ॥ तो म्हणे मीं नाहीं देत । कैसा धेतोसि पाहतों येथ । देखोनि तयाचें कठिण चित्त । वैकुंठनाथ काय करी ॥ ७७ ॥ चव्हांट सोडोनि जगन्निवासें । आपलें कंठीं बांधिला फांस । म्हणे प्राण देऊनि उदास । अवध्या गांवास बुडवीन ॥ ७८ ॥ निर्वाण देखोनि ते अवसरीं । वाडियांत मिळाल्या नरनारी । खळासि फजीत नानापरीं । गांवकरी करिताती ॥ ७९ ॥ गोणीभर मिरच्या कोणाकारणें । फुकट देईल ऐसा कोण । उगेंचि कां करितोसि भांडण । दे टाकून द्रव्य त्याचें ॥ १८० ॥ खळ तो म्हणे ये क्षणीं । घेऊनि जा भरली गोणी । मग म्हणे कैवल्यदानी । आधींच कां घेउनी आलासी ॥ ८१ ॥ ऐसें म्हणोनि सारंगधर । स्वहस्तें खांडासि लाविला दोर । गरगरां फिरवितसे नेत्र । लोक सर्वत्र पाहती ॥८२॥ जयाची मूर्ति हृदयसंपुटीं । एकांतीं ध्यातो धूर्जटी । तो तुकयाचे भक्तीसाठीं । पाश कंठी बांधित ॥ ८३ ॥ अष्टांगयोग साधिती हटी । परी कदापि न पडे त्यांच्या दृष्टीं । तो भक्तिपाश वागवी कंठीं । नवल पोटीं मज वाटे ॥८४॥ ज्याची प्राप्ति व्हावया कारणें । महर्षि करिती अनुष्ठानें । तो भक्तकार्यास्तव जाण । धेत बांधोन जगदात्मा ॥ ८५ ॥ जो कमलोद्भवाचा पिता होय । इंदिरा ज्याचे ध्यातसे पाय । जो नारदादिकांचे गेय । बांधला जाय भक्तीनें ॥ ८६ ॥ असो आतां अनुसंधान । सादर ऐका भाविक जन । गांवकरी भयभित होऊन । खळाकारणें ताडिती ॥ ८७ ॥ म्हणती यानें प्राण दीधला जर । तरी आमुचा गांव बुडेल समग्र । म्हणोनि लाताबुक्या

वर । मारिती सर्वत्र त्यालागीं ॥ ८८ ॥ जनीं जनार्दन भरला निश्चित । नानाप्रकारें केला फजीत । मिरच्या मोजूनी समस्त । द्रव्य देववित गांवकरी ॥ ८९ ॥ इतुकें कार्य करोनि जाण । बंधन सोडित जगज्जीवन । समस्त उधार एकत्र करून । आणिक विंदान काय करी ॥ १९० ॥ चौधरियाच्या रूपें त्वरित । तुकयासि म्हणे वैकुंठनाथ । आपुलें घ्याजी द्रव्य त्वरित । येरू म्हणत कशाचें ॥ ९१ ॥ मग म्हणे सारंगधर । मिरच्या गांवांत दीधल्या उधार । तें द्रव्य उकळोनि समग्र । आलों सत्वर या ठायां ॥ ९२ ॥ प्रेमळ भक्त म्हणे तया । म्यां येन्हवीं दीधल्या वांटावया । चौधरी म्हणे कासया । पाहिजे वायां तुमचें ॥ ९३ ॥ आम्ही गृहस्थ नामांकित थोर । काय उणें केलें ईश्वरें । मग द्रव्य गांठोडी समग्र । ठेविली सत्वर त्यापुढें ॥९४॥ स्वस्थानीं वैसतांचि जाण । प्रेमळ भक्त तयासि म्हणे । पैलते सारुके घेऊन । आणूनि देणें घृत आम्हां ॥ ९५ ॥ अवश्य म्हणोनि ते अवसरीं । तेथूनि निघाला चौधरी । घृत आणिलें तांब्याभरी । तुका अंतरीं विस्मित ॥ ९६ ॥ म्हणे आज्य बहु दिसताहे । ऐकोनि म्हणे पंढरीराय । घृत बहुत स्वस्त आहे । उणें काय या गांवीं ॥ ९७ ॥ चौधरियासि म्हणे ते अवसरीं । पाकनिष्पत्ति जाहली बरी । येथें भोजन कराल जरीं । संतोष अंतरीं मज होय ॥ ९८ ॥ देखोनि भक्ताचा शुद्धभाव । अवश्य म्हणे देवाधिदेव । तों अतीत रूप धरूनी अपूर्व । सदाशिव काय म्हणे ॥ ९९ ॥ शिवालयासमोर बैसोनि देखा । म्हणे मी अतीत बैसलों भुका । पंक्तीचा लाभ आम्हांसि देकां । ऐकोनि तुका संतोषे ॥ २०० ॥ चौधरी अतीत भक्त प्रेमळ । पंक्तीसि जेविले ते वेळ । मुखशुद्धि तुळसीदळ । देत तत्काळ त्यांलागीं ॥ २०१ ॥ तुकयाची भक्ति देखोनी । शिव--विष्णु जेविले दोन्ही । अतीत जातां त्यालागोनी । आशीर्वचनीं गौरवी ॥ २ ॥ सनाथ करोनि प्रेमळ भक्त । चौधरी तो जाहला गुप्त । तों गावींचे लोक मिळाले तेथ । देखोनि बोलत तुकयासी ॥३॥ तुकशेट तुम्ही भक्त वैष्णव । वाचेसि जपतां हरीचें नांव । आजि बुडविला होता आमुचा गांव । काय सांगावें ये स्थिती ॥ ४ ॥ एकासी एक बोलती वचन । आधीं साधुत्व दाविलें यानें । येन्हवीं वांटितों म्हणवून । गेले घेऊन गांवकरी ॥ ५ ॥ जैसा बकध्यान धरी निश्चित । मत्स्य येतांचि गिळी त्यांतें । तैसा तुकशेट साधु दिसत । तुम्हां सर्वांतें कळों द्या ॥ ६ ॥ ऐसें गांवींचे थोर लहान । परस्परें बोलती वचन । तुका विस्मित होऊनि मनें । एका कारणें पुसतसे ॥ ७ ॥ मग तों सांगे सविस्तर । विठोजी माणूस तुमचा चाकर । त्याणें फिरोनि घरोघर । भांडोनि उधार उकलिला ॥ ८ ॥ गोणीभर मिरच्या नेल्या ज्यानें । तो नेदीच कांहीं त्याजकारणें । मग तेथें तुमच्या चाकरानें । गळफांस जाण घेतला ॥ ९ ॥ गलवला ऐकोनि थोर । ग्रामवासी मिळाले समग्र । मग खळासि लाता बुक्यावर । तोंडावर हाणिती ॥ २१० ॥ तयासि फजीत करोनि बरवें । जाहला हिशोब देवविला सर्व । नाहीं तरीं तो देतां जीव । बुडतां गांव यासाठीं ॥ ११ ॥ ऐसा सांगतांचि वृत्तांत । विस्मित चित्तीं वैष्णव भक्त । म्हणे

१ तूप. २ अतिथी.

असत्य म्हणावी जरी मात । तरी उधार समस्त आला कीं ॥ १२ ॥ सत्य म्हणावें जरी कांहीं । तरी म्यां माणूस ठेविलें नाहीं । असो हरीची माया वैष्णवी । लीला दावी ते कळेना ॥ १३ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ सार । हाचि मानससरोवर । सभाग्य श्रोते प्रेमळ चतुर । ते महर्षि थोर ये ठायीं ॥ १४ ॥ यांसि पुजावें कवणे रीतीं । जेणे साधु संतुष्ट होती । ऐसे कवीचि ये मती । विचार चित्तीं आठवे ॥ १५ ॥ प्रांजळ ओव्या सुमनें बरीं । हार गुंफोनि नानापरी । महीपती होऊनि फुलारी । वैष्णव मेळीं तिष्ठत ॥२१६॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । सत्ताविसावा अध्याय रसाळ हा ॥ २१७ ॥

॥ अ० २७ ॥ ओव्या ॥ २१७ ॥



अध्याय २८



श्रीगणेशाय नमः ॥ न्नाहीं आंगीं चातुर्य बळ । नव्हे बुद्धिमंत कवि कुशळ । म्हणवी संतांचा लडिवाळ । चिंतनें काळ सारितो ॥ १ ॥ नाहीं अक्षर वळलें शुद्ध । छप्पन्न भाषा नानाविध । बोलतां नये गीर्वाण शब्द । बरळे अबद्ध हे वाचा ॥ २ ॥ क्षेत्रवासही नाहीं साचा । वस्तीकर कुग्रामींचा । आश्रय अचूक लेखकाचा । तोही साच नसेचि ॥ ३ ॥ शरीर आरोग्य नसेचि पाहें । क्षणक्षणा रोग उद्भवे । सर्व प्रकारें पांगुळ आहे । विठ्ठल माये जाणसी तूं ॥४॥ तुझा भरंवसा धरोनि मनें । ग्रंथासि प्रारंभ केला जाण । वागवोनी दीनाचा अभिमान । शेवट करणे श्रीहरी ॥ ५ ॥ प्रभंजनाच्या योगेंकरून । डोले तृणाचें बुझावणें । त्याचें अंगीं कर्तेपण । स्वतंत्र कोठोन असेल ॥ ६ ॥ कां कळसूत्री हालवोनि दोरी । बाहुलें नाचवी नानापरीं । तेवी बैसोनि हृदयमंदिरीं । आठवण श्रीहरी देशील ॥ ७ ॥ तुझी कृपा नसतां निश्चित । तरी हे शब्द न मानिती संत । जैसें सुगंधविण कस्तुरीतें । कोण पुसतें बाजारीं ॥ ८ ॥ मयूर पिच्छासि वेगळाले । सर्वांगासि असती डोळे । तेवीं तुझें कृपेविण सकळ । शब्द निष्फळ भासती ॥ ९ ॥ यालागीं आपुल्या कृपावरें । भक्त चरित्रें वदवीं सविस्तर । जेणें श्रोतयाचें अंतर । प्रेम पाझरें ऐकतां ॥ १० ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । सेवक होऊनि रुक्मिणीवर । हिंडोनिया घरोघर । उगविला उधार तुकयाचा ॥ ११ ॥ गांवकरियांची ऐकोनि मात । विस्मित होय प्रेमळ भक्त । म्हणे काय करितो पंढरीनाथ । हे मज निश्चित कळेना ॥१२॥ मग मूठ घालोनि बैलावर । तेथोनि निघे वैष्णव वीर । मार्गीं चालतां सप्रेमभर । करित गजर नामाचा ॥१३॥ नामरूपीं जाहलें चित्त । म्हणोनि जडला देहातींत । तो मार्गीं एक ठक आडवा येत । तुकयासि बोलत तेधवा ॥ १४॥ त्याणे पितळेचि कडी घडोनि बरी । सोन्याचा मुलामा केला वरीं । तुकयासि दावी ते अवसरीं । म्हणे घ्याल तरी मी देतो ॥ १५ ॥ ऐकोनि म्हणे भक्त प्रेमळ । इतुकें द्रव्य नाहीं जवळ । उधार उकाळिला होता सकळ । तो काढोनि तत्काळ दाखविला ॥१६॥ मग ठक बोले वचन । आहे तें माझे आंगीं लावणें । राहिलें ते हळूच घेईन । तुम्हां कारणें जाणतों मी ॥ ६७॥ वचन ऐकोनि देखा । मोजोनियां तयासि दीधला पैका । ठक गेला मार्गे आणिका । येतसे तुका घरासि ॥ १८ ॥ चित्तीं संतोष मानीत पाहीं । म्हणे सावकारासि द्यावें कांहीं । धान्यासि जाहाली महागायी । खर्चासि नाहीं तें आलें ॥ १९ ॥ कपट भाव कोणाचे मनीं । हें तो सर्वथा नेणे स्वप्नीं । जनार्दनाचि भरला जनीं । निश्चय मनीं दृढ केला ॥ २० ॥ जैसा धर्मराज कुंतीसुते । त्रिभुवन धुंडोनि पाहतां त्यांतें । एकही नष्ट न दिसे त्यांते । तैसीच स्थित तुकयाची ॥ २१ ॥ संतोष मानुनि निज अंतरीं । तुकाराम पातले घरीं । वृत्तांत कळतांच सत्वरी । आले घरीं लोक तेव्हां ॥ २२ ॥ दावणीसि बांधूनि ढोरें । तुका बैसे त्या समोर । काय आणिले दावी सत्वर । सावकार ऐसे बोलती ॥ २३ ॥ म्हणे द्रव्य देवोनि म्यां सत्वरी । विकत सोनें घेतलें घरीं । हें तुम्ही घ्या कर्जावारी । खर्चासि घरीं कांहीं द्या ॥ २४ ॥ ऐसें म्हणोनि भाविक भक्त । कडीं

१ वारा.

काढोनि त्यांसि दावित । देखोनियां परीक्षवंत । मग ते हांसत गदगदां ॥ २५ ॥ सुलाखूनिं दाविती ते वेळे । तों तयामाजी दिसे पितळ । सावकार पिटिती कपाळ । कांता हळहळ करी तेव्हां ॥ २६ ॥ म्हणती मरमर पापिया । चिरीं आठविसी पंढरीराया । त्याणें निरसिली तुझी माया । नको त्या निर्दया भजूं आतां ॥ २७ ॥ पंडित म्हणोनि मति मूढा । हातीं धरोनि आणिला वेडा । कां परीस देऊनि घेतला खडा । विवेक रोकडा तुज नाहीं ॥ २८ ॥ ठकाच्या विश्वासें साचार । आमुचें तुवां बुडविलेंस घर । कैसा चालविसी संसार । आम्हांसि साचार कळेना ॥ २९ ॥ ऐसें बोलोनि त्या अवसरा । पिशुन गेले आपुल्या घरा । मंदिरीं चिंता करिती दारा । आतां या संसारा काय करूं ॥ ३० ॥ दोघी कांता तुकयासि पाहीं । वडिलांचें नांव रखुमाबायी । धाकटीस म्हणती अवलायी । उपनांव जिजायी दुसरें ॥ ३१ ॥ धाकटी अवली साचार । जाणे तार्किक विचार । म्हणे कैसा चालेल संसार । चिंतातुर मानसीं ॥ ३२ ॥ भ्रतारासि लागलें पिसें । भजन करितो रात्रंदिवस । धंदा करितां नयेचि यश । आटता यास काळ आला ॥३३॥ तरी आपुल्या नांवें देऊनि खतं । भांडवल काढोनि द्यावें यातें । नफा मिळेल तो निश्चित । संसारातें लावीन मी ॥ ३४ ॥ ऐसें म्हणोनि ते अवसरीं । गेली सावकाराचें घरीं । म्हणे माझी पत असेल जरी । तरी द्रव्य पदरीं घालावें ॥३५॥ अवलायीचे बंधु धनवंत । यास्तव भीड पडली त्यांतें । वाणी म्हणे लागेल तें । न्यावें त्वरित जिजायी ॥ ३६ ॥ रौप्यमुद्रा दोन शत। घेऊनि तयासि दीधलें खत । जिजायी आली मंदिरांत। काय बोलत पतीतें ॥ ३७ ॥ म्यां तरी आपुल्या आंगावर । सावकाराचें फोडिलें घर । तुम्हीं व्यवसायांबरोबर । जावें दूर उदिमासी ॥ ३८ ॥ मीठ भरोनि तये क्षणीं । बालेघाट प्रांतीं चालिले वाणी । तुम्ही त्यांसवें जावोनी । आणा मेळवोनी द्रव्य कांहीं ॥ ३९ ॥ रौप्यमुद्रा दोन शत । तुकयापासीं तेव्हां देत । ते घेऊनि वैष्णवभक्त । निघे त्वरित त्यां सवें ॥ ४० ॥ अवली तुकयासि सांगे जातां । भांडवल जतन करा आतां । अभिशाप येईल माझिया माथा । असें सर्वथा न करावें ॥ ४१ ॥ तुम्हीं लागलां हरिस्मरणीं । यास्तव पाते जन धरी कोणी । मग म्यां आपुल्या नांवें खत देउनी । कर्ज काढोनी आणिलें ॥ ४२ ॥ याचकांसि वांटाल भांडवल हें । तरी माझा स्वभाव विदित आहे । ऐसें बोलोनियां पाहे । कांता जाय घरासी ॥ ४३ ॥ असो तुका ते अवसरीं । मीठ भरोनि वृषभांवरी । व्यवसायांच्या बरोबरी । गेला सत्वरी तेधवां ॥ ४४ ॥ बालेघाट प्रांतीं ते वेळे । मीठ विकोनि भरला गूळ । शहरासि चालिले वाणी सकळ । भक्त प्रेमळ तयांसवें ॥ ४५ ॥ धुळींत मुक्ताफळ पडिलें जाण । कोण ओळखे त्याजकारणें । नातरी पितळा माजी कांचन । परीक्षकाविण कळेना ॥ ४६ ॥ पाषाणांत परीस खरा । कोण जाणे चमत्कारा । गारांमाजी सांपडे हिरा । वैष्णव वीर तेविं झालें ॥४७॥ नातरी कोकशास्त्राच्या पुस्तकांत । बांधिलें जैसें वेदांत । काय वन-सभेंत महापंडित । महत्त्वा विरहित ज्या रीतीं ॥ ४८ ॥ क्रां अमित

१ वेड. २ पत्र. ३ व्यापारास. ४ बैलावर.

मिळाले तस्कर[1] । त्यांत धनवंत सावकार । नातरी जारिणींत[2] साचार । सांपडे सुंदर पतिव्रता ॥ ४९ ॥ वेडियांत योगी महापुरुष । कां मद्यामध्यें अमृत जैसें । निंदकामाजी प्रेमळ दिसे । मान्य तयास कोण करी ॥ ५० ॥ तेवीं असत्य व्यवसायांचा मेळा । त्यांत भक्तिज्ञान वैराग्य पुतळा । तुकयासि निंदिती वेळोवेळां । अनुताप कळा ज्यां नाहीं ॥ ५१ ॥ एकमेकासी बोलती देखा । आपुले संगतीसि आला तुका । व्यवहार करूंचि नेणे लटिका । मिळेल पैका कैशा रीतीं ॥ ५२ ॥ सांडोनि प्रपंच तळमळ । चित्तीं आठवे वैकुंठपाळ । भजन करितो सर्वकाळ । उठतें कपाळ आमुचें ॥ ५३ ॥ ऐशा रीतीं व्यवसायी । कुचीत करिती आपुले ठायीं । परी तुका तो देहींच विदेही । हर्ष शोक नाही आणुमात्र ॥५४॥ असो हें भाषण ये समयीं । शहरासि गेले व्यवसायी । तेथें गूळ विकूनि सर्वही । द्रव्य लवलाही घेतले ॥५५॥ तयांसवेंचि वैष्णवभक्त । आपुला माल विकिला तेथ । द्रव्य घेऊनियां समस्त । परतोनि त्वरित चालिले ॥५६॥ मार्गी चालतां ते अवसरीं । व्यवसायासी उतरले बाजारीं । चरित्र वर्तलें ते अवसरीं । ते सादर चतुरीं परिसावें ॥५७॥ काष्ठाचा नांगर गळ्यांत । खांडश्मश्रु वाढविली बहुत । ब्राह्मण आला माळें मागत । करा साहित्य म्हणतसे ॥ ५८ ॥ शेटे सावकार म्हणती तया । उदंड येती मागावया । आम्हांपासी नाहीं द्यावया । जाय लवलाह्यां येथुनी ॥ ५९ ॥ कृपण बोलती ऐशारीतीं । कोणी चवल-पावला देती । हें तुकयानें देखोनि निश्चित्ती । तयाप्रती पुसतसे ॥ ६० ॥ सांग आद्यंत वर्तमान । ऐकोनि बोले तो ब्राह्मण । पाटिलकीचें असतां वतन । टाइजीं हिरोन घेतले ॥ ६१ ॥ दिवाणांत लांच देऊनि सहज । बंदीखानीं घातलें मज । पंचाइतीं पाडिला उमज । त्यांणीं लाज जर रक्षिली ॥ ६२ ॥ राजा अविवेकी बहुत । मी ब्राह्मण दुबळ अनाथ । तीन शतें हरकी लाविली मातें । पन्नास तयातें दीधले ॥ ६३ ॥ बाकी राहिले यास्तव देख । कुटुंबासहित मागतों भीक । सवें प्यादा दीधला एक । हा तरी सुख पडो नेदीं ॥ ६४ ॥ विप्रवाणी ऐकोनि ऐसी । दया उपजली तुकयासी । मग अश्वासिले ब्राह्मणासि । चिंता मानसी करूं नका ॥ ६५ ॥ दोनशे पन्नास मुद्रा सत्वर । देऊनि तोषविला द्विजवर । पाहोनि अघटित विचार । वाणी सर्वत्र हासती ॥ ६६ ॥ म्हणे धडाचि कांब्यावरी घालिताहे । याच्या सोबतीसि राहूं नये । जिजायीस सांगतां पाहे । मोकलील धाय ते घरीं ॥६७॥ रांडा पोरांसि खावया नाहीं । धन वांटितो भलतेचि ठायीं ॥ ऐसें म्हणोनि व्यवसायी । जाती सर्वही तेधवां ॥६८॥ विप्र कार्याचे निमित्ते । तेथें राहिला वैष्णव भक्त । प्यादिया हातीं निश्चित । द्रव्य दिवाणांत पाठविलें ॥ ६९ ॥ नापिक[3] बोलावूनि विष्णुदासें । ब्राह्मणाचें तेथें उतरिलें केश । बोलावूनि त्याच्या कांतेस । स्वयंपाकास घातली ॥७०॥ पदरींची सामग्री देऊन । जेवविले दहा ब्राह्मण । उभयतां संतोष मनें । आशीर्वचन बोलती ॥ ७१ ॥ देवाधिदेव रुक्मिणीवर । तुज सांभाळो निरंतर । तूज ऐसा विष्णु भक्त उदार । पृथ्वीवर दिसेना ॥७२॥ बारा वर्षे माळें मागतां जाण । आम्हांसि न मिळे इतके धन ।

१ चोर. २ व्यभिचारिणी. ३ न्हावी.

तुझें ईश्वर करो कल्याण । ऐसें तो ब्राह्मण बोलिला ॥ ७३ ॥ तुका आनंदयुक्त मनें । सत्कर्मी लागलें धण । परीं घरीं अवलीयेचे भय दारुण । म्हणे काय जावोन सांगावे ॥७४॥ जाणोनि तुकयाचें अंतर । काय म्हणत सारंगधर । म्हणे नका मुद्दल साचार । यानें समग्र वेंचिलें ॥ ७५ ॥ व्यवसायी सांगतां जाऊन । अवली होईल क्रोधायमान । मग तुकयासि करील ताडण । सावकार ऋण मागतील ॥ ७६ ॥ याचा चुकवावया आघात । काय करितसे पंढरीनाथ । तुकयाचें रूप धरूनि त्वरित । रुपये देत सावकारा ॥ ७७ ॥ मुद्दल व्याज देऊनि त्वरित । मागोनि घेतलें खत । पांच होन अवलीतें । द्याजी म्हणत नेऊनी ॥ ७८ ॥ सावकार म्हणे ते अवसरीं । तुम्हीं नेऊनि द्यावें घरीं । देव म्हणे कोपेल मजवरी । भय अंतरीं वाटतें ॥ ७९ ॥ म्हणे बहुत दिवस जाऊनि पाहीं । कांहींच जोड केली नाहीं । रोखा आणि होन लवलाहीं । नेऊनि ये समयीं तुम्हीं द्या ॥ ८० ॥ ऐसें म्हणोनि तये क्षणीं । सत्वर गेला कैवल्यदानी । होन आणि खत घेऊनि वाणी । गेला सदनीं अवलीच्या ॥ ८१ ॥ सकळ वृत्तांत सांगीतला । ते म्हणे तो कोठें गेला । सवेंचि म्हणे असेल बैसला । चित्तीं विठ्ठला आठवोनि ॥ ८२ ॥ ऐसें विंदान केलें देवें । परी कोणासि न कळेचि लाघव । मायामोहें भ्रमला जीव । कोणासि देव दिसेना ॥ ८३ ॥ कित्येक दिवस लोटतांचि देखा । घरासि आला वैष्णव तुका । जाहला वृत्तांत सांगती बायका । विचार निका कळेना ॥ ८४ ॥ वाणी सांगती गार्‍हाणें । नफा मुद्दल तुकयानें । याणें द्रव्याचें देऊनि दान । बंदिवान सोडविला ॥ ८५ ॥ एक म्हणती देवें वरिलें ऋण । एक म्हणती सत्य वचन । ढोंग करोनि जिजाईनें । लौकिक जाण राखिला ॥ ८६ ॥ अवली म्हणे कपटी काळा । याची सर्वथा न कळे लीला । वेड लाविलें भ्रताराला । नाहीं राहिला लौकिक ॥ ८७ ॥ वाणियांनीं सांगीतला वृत्तांत । हें जघन्य जाहलें लोकांत । भांडवल पुढें न देती ते । मागील वृत्तांत जाणोनी ॥ ८८ ॥ तों पुढें वैरग पडलें कठिण । दो पायल्यांची जाहली धारण । पर्जन्य निःशेष गेला तेणें । चाऱ्याविण बैल मेले ॥ ८९ ॥ संसारदुःख बहुत जाण । पुढें देखिलें तुकयानें । तें श्रवण करितांचि प्रीतीनें । संकटें दारुण निरसती ॥ ९० ॥ वाताहत होतांचि धन । लौकिकीं दिसे भाग्यहीन । जे राखीत होते सन्मान । स्वमुखें हेळणे ते करिती ॥ ९१ ॥ कठीण काळ येतांचि खरा । जनांत उडाला पातेरा । कोणी येऊं न देती घरा । दुःख अंतरां होय तेणें ॥ ९२ ॥ घरीं अन्न किंचित नसे । पोरांसि पडती उपवास । उसने कोणीच न दे त्यास । दुष्काळ बहुत देखोनी ॥ ९३ ॥ त्याची विपत्ति देखोनियां । कोठें जातसे मागावया । तंव श्रोते आशंकित होऊनियां । प्रश्न वक्तयातें करिती ॥ ९४ ॥ तुकयासि विरक्ति बाणलियावरी । तरीं कां जातसे घरोघरीं । ऐसा प्रश्न केला चतुरीं । तरी तेचि परी अवधारा ॥ ९५ ॥ माशी भक्षिल्या होत वमन । परी पित्त उसळे क्षण क्षण । मग बोटें घालूनि काढितां जाण । अरोग तेणें होय काया ॥ ९६ ॥ तैशाच रीतीं साधक जन । संसारासि विटविती मन । लोकनिंदा

१ दुष्काळ. २ अवहेलना.

होय जेणें । तेचि कारण योजिती ॥९७॥ मागें एकदोन वेळां निश्चित । संकटीं रक्षिलें पंढरीनाथें । ते कीर्ति प्रगटतां जनांत । म्हणतील संत मजलागीं ॥ ९८ ॥ ते निरसावयालागीं जाण । लोक निंद्य व्हावे आपण । सर्व पदार्थी विटवावें मन । हिंडे म्हणोन घरोघरीं ॥ ९९ ॥ सोइरे धाइरे मित्र आप्त । तयांसि म्हणे वैष्णव भक्त । मुलें माणसें उपवासि मरत । उपाय त्वरित करावा ॥ १०० ॥ पिशुन म्हणती ते अवसरीं । दुष्काळ पडिला असे भारी । ऐसेंचि जाहलें घरोघरीं । किती विस्तारीं सांगावें ॥ १ ॥ सावकारापासी मागतां ऋण । ते म्हणती ऊठ येथून । आधीं घेतलें तें दे आणून । मग घेऊन जा पुढतीं ॥२॥ एक तुकयासि पाहती दृष्टी । कपाळासि घालिती आंठी । म्हणती आपल्या संसाराला लावोनि कांटी । आमुच्या पाठीं लागसी कां ॥ ३ ॥ ऊठ तेथूनि चांडाळा । आम्हासि आणिला कंटाळा । हातीं धरोनि ते वेळा । भक्त प्रेमळा भवंडिती ॥ ४ ॥ मग इष्ट मित्र सोइरे सज्जन । काकुळती येत त्यांजकारणें । कांहीं कर्ज काढोनि देणें । सत्वर वारीन तुमचें ॥ ५ ॥ दुष्काळीं वांचवाल आतां । तरी तुम्हींच आमची माता पिता । करुणा दाविली समस्तां । परी दया सर्वथा त्यांसि नये ॥ ६ ॥ ऐकोनि लोकांची दुरुत्तरें । लज्जित तुकयाचें अंतर । मग एकांति जाऊनि साचार । म्हणे कैसा विचार करूं आतां ॥ ७ ॥ पांडुरंग आणितां ध्यानांत । तों ऐवज आठवला मनांत । घरीं गोण्या ताट मूठ होतें । तें विकिलें त्वरित वाणियासी ॥ ८ ॥ त्याचें आठ शेर धान्य । आलें तेव्हां महा प्रयत्नें । करोनियां पातळ तरण । कुटुंब रक्षण करीतसे ॥ ९ ॥ तेंही धान्य तेव्हां सरलें । इष्टमित्रीं उपेक्षिलें । न जावेंचि ऐसें जाहलें । कोठें वहिलें सर्वथा ॥ ११० ॥ जातां धनवंतांच्या घरां । ते उठवोनि लाविती सत्वरा । लौकिकीं उडाला पातेरा । संसार मातेरा जाहला कीं ॥ ११ ॥ जनांत पावला अपमान । कंटाळले सोइरे सज्जन । महाकाळ पडिला पूर्ण । जाहली धारण शेराची ॥ १२ ॥ तेंही न मिळेचि कोणाप्रती । प्राणी मृत्यु-सदनासि जाती । बहुत आटिलें तुकयाप्रती । म्हणे कैसी गती करूं आतां ॥ १३ ॥ कलियुगीं अन्नमय प्राण । ऐसें बोलती सर्वत्र जन । दो चौंदिवशीं मिळे तरण । भाजीपान भक्षिती ॥ १४ ॥ तुकयाची ज्येष्ठ कांता । निवर्तली अन्न अन्न करितां । तेणें लज्जा वाटे चित्ता । म्हणे संसार वृथा गेला कीं ॥१५॥ सोयरे धायरे ग्रामवासी । काय बोलती तुकयासी । आतां सावध होऊनि मानसी । सांगतों तुजसी तें ऐक ॥१६॥ तूं सर्वकाळ विठ्ठलाचें । सप्रेम नाम जपतोसि वाचें । त्यास्तव निर्मूळ संसाराचें । होतसे साचे जाण पां ॥१७॥ आमुचें नायकसी साचार । म्हणवोनि घात जाहला थोर । पुढेंही देखसी चरित्र । दुष्टोत्तरें बोलती ॥ १८ ॥ जैसें खांडुक झालें हाडा-वर । त्यावरी फासण्याचे मार । परी तुका शांतीचा पूर्ण सागर । लोकांसी उत्तर बोलतसे ॥ १९ ॥ होणार तें न चुकेचि सर्वथा । व्यर्थ कासया वाणी वेंचितां । बरें जे न भजती पंढरीनाथा । ते काय मरतां वांचती ॥ १२० ॥ महादुष्काळीं अन्नाविण । प्राणी उदंड

पावले मरण । ते काय करिती हरिस्मरण । निमित्ताकारणें कोणत्या ॥२१॥ ऐशा रीतीं वैष्णववीर । तयांसि दीधलें प्रत्युत्तर । पुढें वर्तलें काय चरित्र । तें ऐका सादर निजकर्णीं ॥ २२ ॥ तुकयाचा ज्येष्ठ पुत्र जाण । संतोबा त्याचें नामाभिदान । त्याचे ठायीं प्रीति गहन । तो मृत्युसदन पावला ॥२३॥ प्रपंच दुःख महाभारी । ज्याचेनि धेत सुखारी । तो निमोनि गेलिया निर्द्धारीं । खेद अंतरीं बहु झाला ॥२४॥ कांता पुत्र जाहलीं शांत । तेणें दुःखित वैष्णवभक्त । म्हणे जळो या प्रपंचाची मात । त्याग समस्त करावा ॥२५॥ प्राणियासि संसारी बैसतां आंच । हें महामूळ अनुतापाचें । संत सज्जन ये विषयींचे । दृष्टांत साचे अवधारा ॥२६॥ हालाहल घेतांचि शंकराचें । दहन होय सर्वांगाचें । येव्हडी तयासि बैसतां आंच । मग श्रीरामाचें भजन करी ॥२७॥ त्रितापें प्राणी पोळला जरी । तरी अनुताप होय अंतरीं । पांडवां विपत्ति नानापरी । यास्तव श्रीहरि चित्तीं वसे ॥२८॥ हिरण्यकशिपें नानारीतीं । छळिलें जेव्हां प्रल्हादाप्रती । मग अनुतापें हांक मारितां निश्चिती । खांबांत श्रीपती प्रगटला ॥२९॥ असो हे दृष्टांत अनेक । प्राणी भोगिती त्रिविध नरक । मग पश्चात्तापें करूनि देख । मोक्षसुख पावती ॥१०४॥ तुकयासि जाहली तैसी गती । संसारीं पाहिली नाना विपत्ती । ते सकळित सांगतों यथामती । तरी सादर श्रोती परिसिजे ॥३१॥ तेरावें वर्षी पितयानें । संसार गळा घातला जाण । तेथें दक्षता येतां दिसोन । समाधान वडिलांसी ॥ ३२ ॥ सतरावे वर्षी तत्त्वतां । क्रमोनि गेलीं मातापिता । वडील बंधूची कांता । तेही अवचितां निमालीं ॥३३॥ अठरावे वर्षीं जाणा । सावजी गेला तीर्थाटणा । त्याच्या वियोगें करूनि जाणा । शोक निज मना वाटत ॥३४॥ विसाव्यांत पुत्रकांता स्वयमेव । देखोनि संसारीं धरिली हांव । येथूनि मन विटवावें । मग देवाधिदेवें काय केलें ॥ ३५ ॥ एकविसाव्यांत विपरीत काळ । तुकयासि पातला तत्काळ । तेव्हां निघतांचि दिवाळें । सोइरे सकळ हांसती ॥ ३६ ॥ अज्ञान प्रकृती ते स्त्री निश्चित । तेही निमाली अन्नअन्न करीत । महामोह पुत्र समस्त । लौकिकीं विपरीत हे वार्ता ॥ ३७ ॥ पूर्वार्ध संपलें ऐशा रीतीं । दुःखें देखिलीं नानारीतीं । संसाराची आस्था होती । तेही भ्रांती निरसली ॥ ३८ ॥ अविद्या रात्रीं सरोनि जातां । ज्ञानसूर्य प्रकटे अवचितां । आनंद सर्वथा न समाये ॥ ३९ ॥ समुद्र मंथितां तये वेळां । विबुधांसि श्रम जाहला । शेवटीं अमृतां पाहतां डोळां । आनंदला शचीनाथ ॥ १४० ॥ कीं करितां दधि कडसणी । कष्ट वाटती तये क्षणीं । शेवटीं नवनीत पाहतां नयनीं । घर चारिणी संतोषे ॥ ४१ ॥ नातरी कृषिकर्माची खटपट । ते तरी बहुताचि दिसती कष्ट । शेवटीं पीक येतां घनदाट । चित्तीं कुणबट संतोषती ॥ ४२ ॥ कां इक्षुदंड गाळितां साचार । तयासि आयासँ लागती फार । शेवटीं रूपासि येतां साकर । चवी खाणार जाणती ॥ ४३ ॥ तैसें प्रथमारंभीं साधकासि दुःख । परी परिणामीं तें अनुपम सुख । तें अनुभवें जाणती सम्यक । ज्यांणीं विवेक जागविला ॥४४॥ असोत आतां भाषणें बहुत । दृष्टांत देणें कविचे मत । आतां अनुसंधानीं लावूनि चित्त । ऐका निज भक्त भाविकहो


१ वीष. २ ऊंस. ३ कष्ट.

॥ ४५ ॥ दारा पुत्र हातांचि नास । अनुताप जाहला तुकयास । मग एकांतीं जाऊनि उदास । विचार मनास करितसे ॥ ४६ ॥ म्हणे संसाराची भरोवरि । करो पाहील आजवरी । तो अधिकचि दुःखाच्या परी । त्या कोठवरी आठवूं ॥ ४७ ॥ कोळसा उगाळितांचि निश्चित । तो अधिकचि काळें दिसे आंत । तेवीं संसारीं दुःखाचे पर्वत । अनुभवें प्रचीत आली कीं ॥ ४८ ॥ कीं ढेकणांचे वाजेवरी । निद्रा निवांत लागेल जरी । तरीच सौख्य या संसारीं । स्वप्नदृष्टीं देखिजे ॥ ४९ ॥ नातरी बचनागाचें महुरपणा । प्रथमारंभींच पाहोनि घेणें । परी परिणामीं न टळेचि मरण । सत्य जाण त्रिवाचा ॥ १५० ॥ संसारीं असतां देव जोडे । ऐसा निश्चय दृढ घडे । तरी शुकदेव कां होऊनि वेडे । बैसती कडेकपारीं ॥ ५१ ॥ माझें आयुष्य तो किती । तेही वेंचिलें संसार भ्रांती । आतां उरल्याकाळीं निश्चिंती । रुक्मिणीपती भजावा ॥ ५२ ॥ ऐसा निश्चय करोनि चित्तीं । जातसे भांबनाथ पर्वतीं । जेवीं पतिव्रता निघतां सती । त्याग करिती सर्वस्वे ॥५३॥ मायबाप पुत्र वित्त । नाठवी जैसे मनांत । भेटावया प्राणनाथ । उडी अग्नींत घालितसे ॥ ५४ ॥ तैशाच परी वैष्णव तुका । पर्वतावरी जावोनि देखा । अंतरीं आठवोनि वैकुंठनायका । करुणा अनेका भाकित ॥ ५५ ॥ ध्यानासि जाणोनि पांडुरंग मूर्ती । लाविलीं दोन्हीं नेत्र पातीं । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । माझी विनंती अवधारीं ॥ ५६ ॥ कैसें करावें तुझें ध्यान । हें मी सर्वथा कांहींच नेणें । कैसें पाहावें तुज कारणें । हें मज दाखवणें याचकासी ॥ ५७ ॥ कैसी करावी तुझी स्तुती । सेवा करूं निश्चिती । कोणत्या भावें रुक्मिणीपती । भेटसी मजप्रती सांग ॥ ५८ ॥ गीतीं गाऊं कैशा रीतीं । ध्यानासि कैसी आणावी मूर्ती । जनांत रहावें कवणें स्थितीं । हें मजप्रती सांग तूं ॥ ५९ ॥ तूं तरी अलक्ष्य अगोचर । तरी कैसा लक्षासि आणूं मी पामर । यमधर्म वरुण कुबेर । तयांसि पार नाकळे तुझा ॥ १६० ॥ चंद्र सूर्य तारागण निश्चिती । भ्रमणा करिती तुज भोंवतीं । इंद्रादि देव पार नेणती । तेथें मी किती मशक ॥ ६१ ॥ ब्रह्मा तुझें पोटींचें बाळ । शोधीत गेला नाभि कमळ । परी त्यासि सर्वथा अंत न कळे । मग स्तवीत तत्काळ तुज देवा ॥ ६२ ॥ तुझ्या दर्शनाची धरूनि आर्ती । स्मरण करिती शंकरपार्वती । तयांसि तूं दुर्लभ वैकुंठपती । तेथे माझी आर्ती केविं पुरे ॥ ६३ ॥ ऐशा कल्पना आणोनि चित्तीं । मनीं आठविली पांडुरंग मूर्ती । देखोनि त्याची सप्रेम भक्ती । करी श्रीपती काय तेव्हां ॥ ६४ ॥ सप्त दिवसापर्यंत जाण । नेत्र झांकिले एकाग्र मनें । नसेचि फळ अथवा जीवन । नामस्मरण करितसे ॥ ६५ ॥ शरिर वाचा एकाग्र मन । करुणा भाकी निजप्रीतीनें । तो कौतुक दावी रुक्मिणीरमण । तें परोसा सज्जन भाविकहो ॥ ६६ ॥ कृष्णवर्ण अति विशाळ । सर्परूप धरूनि घननीळ । तुकया भोंवता ते वेळ । महाकाळ फिरे जैसा ॥ ६७ ॥ विशाळ फडी उभारोनी । धुधुकार टाकी तये क्षणी । तुका भय न धरीच मनीं । नेत्र झांकोनी तटस्थ ॥ ६८ ॥ तो आकाशवाणी आकस्मात ।

तुकयासि बोले निज गुह्यार्थ । महासर्प होऊनियां येथ । रुक्मिणीकांत आले कीं ॥ ६९ ॥ तरी तूं नेत्र उघडोनि आतां । दृष्टीसीं पाहे प्रेमळ भक्ता । चित्तीं भय न धरीं सर्वथा । ऐसी वार्ता ऐकिली ॥ १७० ॥ ऐसी वार्ता ऐकोनि निश्चित । चित्तीं म्हणतसे प्रेमळ भक्त । सर्परूप धरिलें भगवंतें । मी न पाहें निश्चित त्या लागीं ॥ ७१ ॥ जनीं भरला जनार्दन । ऐसें बोलती श्रुति पुराण । विश्व देखती अवघे जन । ते कैसेनि तरले म्हणावे ॥ ७२ ॥ जळ अवघेंचि असे एक । परी चातक न घेती भूमीचें उदक । तेवीं मी पांडुरंग उपासक । रूपें अनेक न पाहें ॥ ७३ ॥ जें ध्यान वर्णिलें श्रुतींपुराणीं । संतीं साठविलें हृदय भुवनीं । तैसा होईल कैवल्यदानी । पाहेन नयनीं मग मी तया ॥ ७४ ॥ ऐसा अंतर्भाव तुकयाचा । जाणोनि नाथ वैकुंठींचा । बाहेर प्रगट होय साचा । प्रेम भक्तीचा बांधला जो ॥ ७५ ॥ तत्काळ चतुर्भुज घनःश्याम । शंख चक्र गदा पद्म । निज भक्ताचें देखोनि प्रेम । तो आत्माराज प्रगटला ॥ ७६ ॥ तुका उघडी नेत्र पातीं । तों पुढें उभा रुक्मिणीपती । दिव्य कुंडलें कानीं तळपती । मकराकृती सुढाळ ॥७७॥ तो देवाधिदेव पंढरीरायें । तुका उचलोनि घेतला कडिये । जैसी तान्हयापासीं निज माये । संबोखित आहे निज प्रीतीं ॥ ७८ ॥ म्हणे तूं माझा लडिवाळ । आतां उघडोनि पाहें डोळे । तुज न विसंबे सर्वकाळ । ऐसें घननीळ बोलिले ॥ ७९ ॥ तुकयाची विदेह स्थित । मागुतीं जाहला समाधिस्थ । मग सावध करि रुक्मिणीकांत । म्हणे पाहे निश्चित मजकडे ॥ १८० ॥ मग नेत्र उघडोनि ते समयीं । पाहे तों सगुण शेषशायी । पहिल्यापरी विशेष कांहीं । लाभ ये ठायीं देखिला ॥ ८१ ॥ अलक्ष्य चिंतित होता कोडें । त्याहूनि विशेष गुण रूपडें । तुका बैसोनि वाडें–कोडें । निज निवाडें पाहत ॥ ८२ ॥ ऐका मागील अनुसंधान । संसारी उदास होऊनि जाण । तुकयानें सेविलें अरण्य । न कळे ठिकाण कोणासी ॥ ८३ ॥ त्याचा धाकुटा सहोदर । कान्हया नाव त्या साचार । तो गिरिगव्हरें थोर । धुंडीत साचार अहर्निशीं ॥ ८४ ॥ चित्तीं निश्चय केला पूर्ण । होईल तुकयाचे दर्शन । तरीच सेवीन मी अन्न । निश्चय पूर्ण हा केला ॥ ८५ ॥ श्रीरामाच्या वियोगें करून । भरतें मांडिलें निर्वाण । तैसा कान्हयाचा निश्चय पूर्ण । मजकारणें भासत ॥ ८६ ॥ अघोर वन महापर्वत । धुंडिले सप्त दिवसपर्यंत । मग भांवनाथासि[१] अकस्मात । कान्हया येत तेधवां ॥ ८७ ॥ तों देव भक्त दोघेजण । पाहूनि जाहलें समाधान । देहींच विदेही होउन । तन्मय पूर्ण तो झाला ॥ ८८ ॥ आयासें न करितां साचार । दृष्टीसीं पाहीला रुक्मिणीवर । झळकत दिव्य पीतांबर । मकराकार कुंडलें ॥ ८९ ॥ मुगुटीं फांकती रत्न किरळा । तेणे वासरमणी[२] लोपोनि गेला । कौस्तुभ वैजयंती रुळे गळां । तुका घेतला कडियेवरी ॥ १९० ॥ देवभक्तांची जाहली मिळणी । कान्हया देखे नेत्र भरोनि । मग साष्टांग दंडवत घातलें धरणीं । वाहती नयनीं अश्रुपात ॥ ९१ ॥ तों तुकयासि म्हणे करुणाकर । इच्छा असेल तो माग वर । ऐकोनि म्हणे भक्त चतुर । तुमचा विसर न व्हावा ॥९२॥ माता न विसंबे तान्हयासी । कीं

१ प्रयत्न. २ सूर्य.

हरिणी जैसी पाडसासी । तैशाच रीतीं हृषीकेशी । मज दीनासी सांभाळी ॥ ९३ ॥ यावरी म्हणे जगज्जीवन । तूम्हांसाठीं मज रूपासि येणें । युगायुगीं अवतार घेणें । अन्य कारण काय असें ॥ ९४ ॥ मी पुंडलिकाचियेसाठीं । उभा राहिलों भीमातटीं । भाविक भक्तांसि देतसे भेटी । करद्वय कटीं ठेविलें ॥ ९५ ॥ तूझा पुर्वज विश्वंभर । त्याणें माझी भक्ति केली फार । मग तयासि देऊनि वर । देहूसि साचार राहिलों ॥ ९६ ॥ ऐसें बोलतां शेषशायी । तुका सत्वर लागला पायीं । कान्हया म्हणे ते समयीं । धन्य नवायी अगाध ॥ ९७ ॥ मग उजळोनि मंगळारती । ओवाळिला रुक्मिणीपती । पुढिले अध्यायीं रसोत्पत्ती । सादर संतीं परिसिजे ॥ ९८ ॥ ऐकतां संतांचें चरित्र । तयासि भेटेल राजीव नेत्र । सात्विक बुद्धि होऊनि पवित्र । आत्मवत जगत्र भासेल कीं ॥९९॥ तुकयाची संसार स्थिती । सप्रेम भावें गाती ऐकती । तयांसि तुष्टोनि रुक्मिणीपती । संसार विपत्ती होऊं नेदी ॥ २०० ॥ जैसी तैसी आर्षवाणी । संत सादर ऐकती श्रवणीं । जेवीं बाळक बोले बोबडे वचनी । तेंचि पडताळोनी पुसे माता ॥ १ ॥ तैशा रीतीं मी अज्ञान । न्युन अधिक कांहींच नेणें । परी तूम्हीं आपुल्या कृपादानें । सरतीं वचनें करावीं ॥ २ ॥ बुद्धीमतींसि उन्मेष लहरी । तूम्ही देतसां सर्वोपरी । महीपतीसि करूनि निमित्तधारी । ग्रंथ विस्तारीं वाढवितां ॥३॥ स्वस्तिश्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परीसोत वैष्णवभक्त । अठ्ठाविसावा अध्याय रसाळ हा ॥ २०४ ॥ ॥ अ० ॥ २८ ओव्या ॥ २०४ ॥



अध्याय २९



श्रीगणेशाय नमः । जय जय सच्चिदानंदा करुणामूर्ती । ब्रह्मांडीं तूझी न समाये कीर्ती । तो तूं प्रेमळाची धरितोसि आर्ती । रुक्मिणीपती विठ्ठला ॥ १ ॥ हटयोगी ब्रह्मज्ञान्यांसी । अवघड योग सांगीतला त्यांसी । भाळ्या भोळ्या निज भक्तासी । धर्म सांगसी भागवत ॥२॥ सनकादिकांचा प्रश्न अपूर्व । ऐकोनि कुंठित कमळोद्भव । मग त्याणें केला तूझा स्तव । सप्रेम भाव धरोनियां ॥३॥ ऐकोनि विधात्याची स्तूत । मग हंसरूपें आलासी तेथ । तेव्हां चतूःश्लोकी भागवत । सांगसी त्यातें निजकृपें ॥ ४ ॥ तूझीं ऐकोनि वचनामृतें । ब्रह्मा झाला स्वानंदभरित । मग त्याणें दशलक्षण भागवत । नारदातें सांगीतलें ॥ ५ ॥ तो प्रेमभरित होऊनि मानसीं । कीर्तनीं नाचे अहर्निशीं । तेव्हां द्वैपायन भेटोनि नारदासी । सद्भावेंसी पूसत ॥ ६ ॥ म्हणे स्वामी ऐका वचन । म्यां केलीं अठरा पुराणें । आणिक शास्त्रें इतिहास गहन । वदलों संपूर्ण हे कथा ॥ ७ ॥ परी मन स्थिर होवोनि पाहीं । चित्त संतोष होत नाहीं । यासि उपाय सांगावा कांहीं । व्यास पायीं लागला ॥ ८ ॥ ऐकोनि सच्छिष्याचा प्रश्न । चित्तीं संतोषे ब्रह्मानंदन । मग शत श्लोक भागवत करून । व्यासासि तेणें सांगितलें ॥ ९ ॥ सद्गुरु म्हणती पराशर सुता । हेंचि विस्तारूनि वदें आतां । तेणें चित्ताची होईल स्थिरता । आत्म–स्वहिता पावसी ॥ १० ॥ मग द्वैपायन प्रेमभरित । विस्तारें वदे श्रीभागवत । अठरा सहस्र जाहला ग्रंथ । उपनिषदर्थ केवळ जो ॥ ११ ॥ मग शुकयोगींद्रें पाहोनि प्रीतीं । त्याणें बोधिला परीक्षिती । आणिकही साधक तरले किती । त्यांची गणती नोहे कोणा ॥ १२ ॥ ऐशापरी वैकुंठनायका । तूं प्रेमळाचा प्रियोत्तम सखा । भागवत धर्म निर्मूनि नौका । भवपार लोकां करिसी तूं ॥ १३ ॥ त्या भागवताचा अर्थ निश्चिती । कलियुगीं न कळे सर्वांप्रती । यास्तव अवतार घेतला संतीं । प्राकृत मती वदावया ॥ १४ ॥ त्या संतांचीं नाना चरित्रें । तूंचि वदसी राजीवनेत्र । तरी पुढें निमित्तमात्र । बुद्धि स्वतंत्र असेना ॥१५॥ शिकविले बोल रांवा[2] बोलतां । त्याचा नवलाव तो कोणता । तेवीं मंदबुद्धीचा प्रकाशिता । नसे अनंता तूजविण ॥ १६ ॥ मागिले अध्यायाचे शेवटीं कथा । भांबनाथ पर्वती तुका असतां । कान्हया बंधु तेथें येतां । रुक्मिणीकांता देखिलें ॥१७॥ निजभक्तासि देखोनि जाण । देव पावले अंतर्धान । जेथें लागले देवाचें चरण । अद्यापि ते स्थान असेकीं ॥ १८ ॥ ते स्थळीं खिळा रचोनि देखा । कान्हयानें मांडिल्या पादुका । मन नमस्कारोनि बंधु तुका । सप्रेम सुखी पावला तो ॥१९॥ उभयतां भाऊ ते समयी । सत्वर चालिले देहू गांवी । मग येऊनि इंद्रायणीच्या डोही । तुका ते ठायीं बैसला ॥२०॥ साता दिसाचे निर्वाण । उभयतांसि होते जाण । सूर्योदयीं करूनि स्नान । सोडिले पारण ते स्थळीं ॥२१॥ मग कान्हयापासोनि वैष्णव भक्त[1] । मंदिरींहूनि आणाविलीं खतें । लोकांवरीं वडिलांचें द्रव्य होतें । तेव्हां बोलत कान्हयासी ॥ २२ ॥ अनुभव नसतांचि जाण । व्यर्थचि पुस्तकींचें ज्ञान । तैसेंचि परहस्तींचें धन । दुश्चित मन सर्वदा ॥ २२ ॥ आमुचें देईल किंवा नाहीं । ऐसी दुराशा आठवे जीवी ।

१ संसारातूत मुक्त, २ पोपट.

यास्तव इंद्रायणीच्या डोहीं । खतें ये समयीं बुडवितों ॥ २४ ॥ ऐसें पुसतां भक्त प्रेमळे । कान्हया बोले ते वेळे । तुम्हीं ते विरक्त
जाहलां केवळ । प्रपंच सकळ मजमार्गें ॥ २५ ॥ आम्हींही वडिलांसि सांगू नये । पुढें लेंकरें करितील काय । जाणोनि कान्हयाचा
मनोदय । योजिली सोय तुकयानें ॥ २६ ॥ दोन विभाग करूनि निश्चित । कागद बुडविले उदकांत । अर्ध विभाग कान्हयातें । देऊनि
बोलत काय तया ॥ २७ ॥ आजपासोनि आम्हांकारणें । कंथा शीत निवारणें । भिक्षा मागोनि सेविजे अन्न । निर्विघ्न येणें योग
चाले ॥ २८ ॥ आणि तुम्हांसि उदमी हातवटी । करणें लागेल प्रपंच राहटी । दोंहींची कैसी पडेल गांठी । ऐका ते गोष्टी सांगतों
॥ २९ ॥ भिक्षा आणि व्यवसाय । याचा काला करूं नये । ऐसा ऋषी मुखें पाहें । झाला आहे निवाडा ॥ ३० ॥ ऐसें ऐकोनि ते
अवसरीं । कान्हया वेगळा संसार धरी । आतां निर्वाणत्याग तुकया करी । कैशा परी तें ऐका ॥ ३१ ॥ लज्जा लौकिक टाकोनि
मानसीं । चित्त लाविलें चिंतनासी । विरक्तीचेनि बळें फांसीं । इंद्रियें नेमेंसीं आकळिली ॥ ३२ ॥ अल्प आहार सेविता जाण । तेणें
इंद्रियें जाहली क्षीण । निद्रा आळस नयेचि त्यानें । अनुतापें भजन करीतसे ॥ ३३ ॥ स्नान करूनि प्रातःकाळीं । जाय पाडुरंगाचे
देवळीं । पूजाअर्चन करूनि सकळीं । मग वनस्थळीं जातसे ॥ ३४ ॥ देहूपासूनि पश्चिमेस । भांडार–पर्वत तीन कोस । तुका जाऊनि
त्या स्थळास । एकांत बैसे निश्चिती ॥ ३५ ॥ तंव श्रोते आशंकित होऊनि चित्तीं । वक्त्या प्रश्न करिती । कीं तुकयासि भेटला
रुक्मिणीपती । सगुणमूर्ती साक्षात ॥ ३६ ॥ देवाची भेट जाहली असतां । तरी इंद्रियांसि नेम कासया वृथा । ऐसा सज्जनीं प्रश्न करितां ।
तरी तेंचि आतां परिसिजे ॥ ३७ ॥ वासरमणी उगवतां पाहे । सकळ जीवांसि दर्शन होय । परी तो कोणाच्या स्वाधीन नोहे । उभा न
राहे क्षणभरी ॥ ३८ ॥ तेवीं दैवयोगें करूनि साचार । एकदां भेटला इंदिरावर । तो जवळीं असावा निरंतर । ऐसें अंतर तुकयाचें
॥ ३९ ॥ भक्तांसि जाहलिया भगवत्प्राप्ती । तरी ते सप्रेम भजन करिती । गंगेसि भेटला अपांपती । परी मागुती धांवे चपळत्वें
॥ ४० ॥ प्रभंजन ब्रह्मांडीं भेदला पाहे । सर्वाठायीं व्यापक आहे । परी तो चंचळपण सांडितो काय । निश्चळ न राहे क्षणभरी ॥४१॥
तैशाच रीतीं भगवज्जन । स्वरूपीं मिळाले अभिन्नपणें । परी एकाचे विभाग दोन करून । करिती भजन अहर्निशीं ॥४२॥ चक्षुःश्रव्याच्या
आंगावरी जाण । पहुडला लक्ष्मीनारायण । उभयतांचा एकांतपूर्ण । त्याजकारणें विदित ॥४३॥ शेजारती झालिया निश्चित । आपापुल्या
स्थानीं जाती भक्त । परी शेषासीं वियोग नाहीं किंचित । परी सप्रेम भजत श्रीहरीतें ॥ ४४ ॥ तैसाच तुका वैष्णववीर । अविट आवडी
त्याची थोर । एकांत जावोनि पर्वतावर । भजन साचार करीतसे ॥ ४५ ॥ अहंतां टाकोनि सर्वस्वें । जनविजन समान भासे । मीपणाचें
नांव कैसें । तेही स्वप्नास न ये कीं ॥ ४६ ॥ मुळींहूनि अहंता त्यागितां पाहे । तरी सहजचि निरसलें संसारभय । तैसा निर्मोनि गेला

१ व्यापारात. २ कला. ३ अभिमान. ४ नष्ट होणे.

देह । मग रोग होय कोणासी ॥ ४७ ॥ तैशाच रीतीं तुकयानें तत्वतां । संसार मूळ त्यजिली अहंता । मग नित्य जावोनि एकांतां । रुक्मिणीकांता आठवी ॥ ४८ ॥ नामस्मरणावीण जाण । आणिक सर्वथा नाहीं साधन । ऐसा निश्चिय केला पूर्ण । करीत भजन अहर्निशीं ॥ ४९ ॥ ध्यानासि आणोनि पांडुरंगमूर्ती । लाविली दोन्हीं नेत्रपातीं । म्हणे तुझ्या नामावीण श्रीपती । आणिक विश्रांती मज नाहीं ॥ ५० ॥ नाम हेंचि माझें उग्रतप । नाम हेंचि माझा मंत्र-जप । नाम हेंचि माझें व्रत अमुप । नामेंचि निष्पाप होईन मी ॥ ५१ ॥ नाम हेंचि माझा कुळाचार । नाम हेंचि कुळधर्म थोर । नामावीण नाहीं आधार । हाचि निर्धार श्रीहरी ॥ ५२ ॥ नामावीण धनवित्त कांहीं । आणिक सांगावयासि येत नाहीं । आतां भवसागर विठोबायी । उतरोनि नेयी पैलतीरा ॥ ५३ ॥ ऐशाच रीतीं नित्य नित्य । एकांतीं तुका करुणा भाकित । सायंकाळीं गावांत येत । आनंदें नाचत देउळीं ॥ ५४ ॥ देखोनि लोक म्हणती त्यास । तुकयासि लागलें असे पिसें । नाम गातसे रात्रंदिवस । संसार आस सांडिली ॥ ५५ ॥ एक म्हणती व्यापार खोटा । उदीम करितां आला तोटा । म्हणवूनि मुखीं भरला फांटा । बडबडी चोहटा भलतेंची ॥ ५६ ॥ एक म्हणती इंद्रायणींत । तुकयानें अवघीं बुडविलीं खतें । प्रपंच टाकोनि निश्चित । धरिला परमार्थ तेंहुनी ॥ ५७ ॥ एक म्हणती विशेष पाहे । प्रपंच टाकितां लाभ काय । पोट कोणासि सुटलें आहे । न चलेचि देह अन्नाविण ॥ ५८ ॥ टाकूनियां मुलें लेंकुरें । जाऊनि बैसतो पर्वतावर । परी भिक्षा मागे घरोघर । क्षुधातुर होतांची ॥ ५९ ॥ एक म्हणती टाकोनि आपला धंदा । व्यर्थ कां करितां त्याची निंदा । संसारीं बहुतांची झाली आपदा । काय गोविंदा भजताती ॥ ६० ॥ ऐशाच रीती त्रिविध जन । नानापरीचीं बोलती वचनें । परी तुका आनंदयुक्त मनें । नाहीं देहभान सर्वथा ॥ ६१ ॥ राजबिदीं तूं निवारण । चालतां उदंड भुंकती श्वानें । परी त्यांचें भय न धरोनि मनें । स्थिर गमनें चालत असे ॥ ६२ ॥ ऐकोनि सागराची गर्जना । अगस्त्य भय न धरीच मना । तेवीं लोक दुरुक्ति बोलती नाना । परी विक्षेप मना न वाटे ॥ ६३ ॥ जन निंदेचे येतां लोट । शांति उदरीं भरितसे घोंट । काम-क्रोधांची मोडली वाट । करणी आचाट निरुपम ॥ ६४ ॥ आशा-तृष्णा मोह-माया । काम क्रोधांच्या मोडिलें ठाया । पुढें ब्रह्मचि करील काया । वैष्णव तुकया हेंचि साच ॥ ६५ ॥ सप्रेम भाव धरोनि चित्तीं । नित्य पूजित पांडुरंग मूर्ती । दिवसां अरण्यांत एकांतीं । भजन प्रीतीं करितसे ॥ ६६ ॥ एक इंद्रायणीच्या तीरीं निश्चित । करंजाया मावल्या असती तेथ । तये स्थळीं वैष्णवभक्त । भजन करीत बैसला ॥६७॥ तया समीप [1]कृषियानें । शेत पेरिलें होतें जाण । तें पिकासि आलें असे सघन । उमटले कण तयावरी ॥ ६८ ॥ शेत पाहुनि चहूंफेर । [2]कृषीवळ निघाला सत्वर । येऊनि तुकया समोर । काय उत्तर बोलिला ॥ ६९ ॥ म्हणे तुकशेट ऐका वचन । माझ्या शेतीं बैसा राखण । आदमण दाणे तुम्हांसि देईन । कुटुंब रक्षण करावया

१ शेतकन्याने. २ शेतकरी.

॥ ७० ॥ सहज रिकामें बैसला घरीं । संसार चालेल कैशापरी । तरी शेतीं बैसोनि निरंतरीं । येथेंचि हरि हरि भजावा ॥७१॥ ऐकोनि तयाचें उत्तर । अवश्य म्हणे वैष्णव वीर । तेथूनि उठिला सत्वर । जात बरोबर तयाच्या ॥७२॥ तुकयाची ऐशी स्थित । जों जें म्हणे ते ऐके मात । आग्रह न करीच किंचित । परोपकारार्थ जाणोनी ॥७३॥ तान्ह्या बाळाची जैसी स्थिती । बरें वाईट देतांचि हातीं । मुखीं घालीत सत्वर गती । अनमान चित्तीं न करितां ॥ ७४ ॥ नातरीं कां जैसें तोयें । साकर घालितां गुळचट होय । नातरी लवण मेळवितां पाहे । क्षारत्व लाहे तत्काळ ॥ ७५ ॥ तैशी तुकयाची स्थिति पाही । कवणें विशीं आग्रह नाहीं । जो जें म्हणेल जे समयीं । तेंचि सर्वही करितसे ॥ ७६ ॥ मग कृषियानें ते अवसरी । तुकयासि नेले बरोबरी । गोफण दिधली त्याचे करीं । म्हणे माळ्यावरी बैसे आतां ॥ ७७ ॥ तुझ्या स्वाधीन केले क्षेत्र । राखीत जाय दिवस रात्र । सवंगणीस येईल जोंवर । तोंवर करार असावा ॥ ७८ ॥ आदमण दाणे केले करार । ते मी देईन राशीवर । ऐसें बोलूनियां उत्तर । कुणबी सत्वर तो गेला ॥ ७९ ॥ स्वहस्त धारण जये देशीं । गेला खेप आणावयासी । शेतीं बैसविलें तुकयासी । घरीं मनुष्यांसी सांगितलें ॥ ८० ॥ इकडे तुका वैष्णव भक्त । माळ्यावरी जावोनि त्वरित । भोंवतें विलोकूनि पाहत । तों पक्षी बैसत शेतावरी ॥ ८१ ॥ म्हणे हे ईश्वराचे जीव । क्षुधातुर असती सर्व । आपण म्हणवितों भक्त वैष्णव । तरी न उडवावे सर्वथा ॥ ८२ ॥ मागें दुष्काळ बहुत होता । विश्वभाग्यें पिकलें आतां । आपण यासि उडवितां । तरी व्हावें दुरिता अधिकारी ॥ ८३ ॥ ऐसें म्हणोनि प्रेमळ भक्त । माळ्यावर उगाचि बैसत । जैसें बुजावणें मनुष्य दिसत । परी जीव किंचित त्या नाहीं ॥ ८४ ॥ दोन प्रहर येतांचि दिनकर । पक्षियांसी बोले मधुरोत्तरें । आतां पोट भरले असेल जर । तरी जावें सत्वर उदकासी ॥ ८५ ॥ ऐसें बोलोनि त्यांजकारणें । निवांत बैसे करीत भजन । हरीनामाची उमटे धुन । ऐकती दुरोन गांवकरी ॥ ८६ ॥ घरीं वाट पहातसे राणी । म्हणे घरासि नये अझुनी । कोठें बैसलासे जावोनी । कोणतें वनीं पहावें ॥ ८७ ॥ लज्जा अहंकार टाकोनी । उगाचि फिरतो जनीं वनीं । सोडिलें संसारासि पाणी । काय साजणी करूं आतां ॥ ८८ ॥ कन्येसि म्हणे बाहेर जाय । पिसा कोठें बैसला पाहे । मजला क्षुधा लागली आहे । जेविता न ये त्याजविण ॥ ८९ ॥ वडील कन्या काशीबाई । धांवत गेली लवलाही । तुकयास म्हणे ते समयीं । चाल गृहीं जेवावया ॥ ९० ॥ तिजला देतसे प्रति वचन । आम्हीं शेतीं बैसलों राखण । त्याणें देऊं केलें धान्य । घरीं जाऊन सांग आतां ॥ ९१ ॥ कन्या परतोनि आली त्वरित । मातेसि सांगितला वृत्तांत । अवली अन्न पाठवी तेथ । मग आपण जेवित तेधवां ॥ ९२ ॥ तुका भाकर खावोनि तेथ । विचार करितसे मनांत । म्हणे रात्रंदिवस रहावें येथ । वेरझार व्यर्थ कासया ॥ ९३ ॥ प्रातः स्नान करोनि निश्चिती । देउळीं पूजीत पांडुरंग मूर्ती । मग सत्वर येऊनियां शेती । भजन एकांतीं

१ पाणी. २ वेडा. ३ लगेच.

करितसे ॥ ९४ ॥ सायंकाळ होता एक वेळ । पक्षियांसि म्हणे उठा सकळ । बहुत पडतां अंधकार सबळ । मार्ग साचार न दिसे तुम्हां ॥ ९५ ॥ ऐसें म्हणवोनी वैष्णवभक्त । एकदा पक्षियांसि उडवित । म्हणे प्रातःकाळ होतांचि समस्त । यावें त्वरित या ठायां ॥ ९६ ॥ देखोनि पक्षियांची रीती । तुका विस्मित होय चित्तीं । म्हणे चार दाणे येथेंचि खाती । घरासि न नेती कांहींच ॥९७॥ यांज सारिखें माझिया जीवा । कधीं करिशील देवाधिदेवा । तुज वांचूनी आमुचा हेवा । कोण केशवा पुरवील ॥ ९८ ॥ माझें लपो असतेंपण । नामरूपासि पडो खंडण । आत्मवत देख अवघे जन । नसो देहभान किंचित ॥ ९९ ॥ सोइरे सज्जन संबंधी पाहे । यांणीं न धरावी माझी सोय । जीत कां मेला माझा देह । प्रत्यया नये तें करीं ॥ १०० ॥ प्रभंजनें उडे गळित पान । तैसें व्हावें माझें चालणें । स्वमुखें तुझे वर्णीन गुण । तें उचित दान मज देयीं ॥ १ ॥ पक्षी श्वापदें तरुवरं[1] जाण । ब्रह्मादि पिपीलिका[2] आदिकरून । सर्वत्र व्यापक एक चैतन्य । लेखीं समान तें करीं ॥ २ ॥ सोनें आणि दगड माती । माझ्या दृष्टीं सारखीं दिसती । दुराशा कदा नुपजो चित्तीं । ऐसें श्रीपती करावें ॥ ३ ॥ अपशब्द बोल कानीं पडती । अथवा केली कोणी स्तुती । तें समान वाटे मजप्रती । ऐसी स्थिती करी माझी ॥ ४ ॥ ऐशाच रीतीं तुका नित्य । चित्तीं कल्पीत मनोरथ । हृदयीं भरला पंढरीनाथ । स्वानंद भरित सर्वदा ॥५॥ गोवर घालोनि तये ठायीं । हुताशन[3] चेतवीत पाहीं । किंचित निद्रा येतांचि देहीं । जागृत लवलाहीं हे तसे ॥ ६ ॥ सकळ गांवींचे पक्षी निश्चित । तेथेंचि येत नित्य नित्य । कण खातांचि वैष्णव भक्त । संतोष पावत कैशा रीती ॥ ७ ॥ जैसा कनवाळु दाता निश्चिती । स्वगृहीं जेववीत द्विजपंक्ती । तुकयासि संतोष तैशाच रीतीं । पुरवीत आर्ती क्षुधितांची ॥ ८ ॥ एक मास लोटतां ऐशापरी । तों खेप करोनि आला शेतकरी । म्हणे धान्य पिकलें कैसें तरी । ये अवसरीं पाहावें ॥ ९ ॥ ऐसें म्हणोनि लवलाहीं । शेतासि आला ते समयीं । तों काळीं कणसें पिशा सर्वही । कण एकही दिसेना ॥ ११० ॥ परम संताप वाटला तेव्हां । अधर[4] खावोनि चावितसे जिव्हा । म्हणे तुकयानें साधिला दावा । न्याय सांगावा कवणासी ॥ ११ ॥ ऐसें म्हणवोनि चित्तांत । चाऱ्ही कोपरे हिंडोनि पाहात । त्याच्या भयें करोनि निश्चित । पक्षी समस्त उडाले ॥ १२ ॥ जैसें भोजन होतांचि पाहें । तयामाजी अंत्यज जाय । मग ब्राह्मण उठती लवलाहें । जेवितां ठाय टाकोनी ॥ १३ ॥ असो आतां शेतकरियानें । दशदिशा पाहिल्या हिंडोन । तों शेत भक्षिलें पक्षीयानें । एकही कण दिसेना ॥ १४ ॥ तों माळ्यावर बैसोनि । निश्चित प्रेमळ तुका भजन करित । नाना अपशब्द बोलत बोलत । कुणबी येत लवलाहीं ॥ १५ ॥ सक्रोध तुकयासि बोलत उत्तर । कैसें बुडविलें माझें घर । तूं सा पायल्यांचा चाकर । एक मासभर ठेविला म्यां ॥ १६ ॥ तुजवरी विश्वास ठेवुनियां । मी गेलों खेप आणावया । तुवां शेत चारिलें पक्षीयां । द्वंद्व तुकया साधिलें ॥ १७ ॥ ऐसें म्हणवोनि

१ वृक्ष. २ मुंग्या. ३ अग्नी. ४ ओंठ.

क्रोधदृष्टी । धरोनि वोढिला मणगटीं । म्हणे खपाव्यासी पडली गांठी । आतां नव्हेचि सुटी सर्वथा ॥ १८ ॥ एक दुर्जन एक संत । एक विषकंद एक अमृत । दैवयोगें गांठी पडत । तैसेंचि निश्चित हें झालें ॥ १९ ॥ कीं एक समुद्र एक अगस्ती । एक राहु एक निशापती । मिळणी होय प्रारब्धगती तैसीच गती हे झाली ॥१२०॥ की राजहंस आणि ससाणा एक । कीं एक श्रोत्रिय एक हिंसक । कीं जारिणी आणि पतिव्रतेसि देखा । गांठी नावेक पडियेली ॥ २१ ॥ कीं एक निंदक खळ कुटिल । एक वैष्णवभक्त प्रेमळ । एक शुचिर्भुत एक अमंगळ । मिळणी मिळे अवचिता ॥ २२ ॥ तैशाच रीतीं तुकयाकारणें । वोढोनि चालविलें कुणबियानें । पाटील कुळकर्णी बैसले जाण । आला घेऊनि त्या ठायां ॥२३॥ पिटीत तोंड वक्षस्थळ । आबावें मांडिलें तये वेळ । देवदत्त कुणबी मत न कळे । अहाणा सकळ बोलती ॥२४॥ ऐसें देखुनि लवलाहें । ग्रामस्थ पुसती झालें काय । मग आद्यंत वृत्तांत सांगताहे । करावें काय म्यां आतां ॥२५॥ तुकयासि पुसती ते वेळे । मग सत्य सांगे भक्त प्रेमळ । ज्याच्या वाचेसि असत्य मळ । अनुमात्र विटाळ स्पर्शेना ॥ २६ ॥ म्हणे हा मज बोलिला वचन । धान्य देईन आदमण । माझ्या शेतीं राखण । तें म्यां मान्य मग केलें ॥२७॥ मजसीं इतुकें बोलिला उत्तर । माळ्यावर बैसोनि राखीं पांखरें । तीं म्यां उडविलीं असतीं जर । तरी मरतीं साचार अवचितां ॥ २८ ॥ पक्षी मिळोनियां समस्त । चार चार दाणे खातां नित्य । घरासि नव्हते कांहीं नेत । मग म्यां निश्चित कां वर्जावें ॥२९॥ पक्षी रक्षावें हें वचन । म्हणोनि केलें त्याचें पाळण । ऐकोनि तुकयाचें बोलणें । सकळ जन हांसती ॥१३०॥ ऐसी ऐकोनियां वार्ता । संताप शेतकरियाच्या चित्ता । म्हणे पाटी बांधोनि जातों आतां । आपुल्या शेता सांभाळा ॥ ३१ ॥ ग्रामस्थ म्हणती त्या अवसरा । देणें लागतो दिवाण सारा । कुणबी पळोनि गेलिया खरा । विचार बरा मग नाहीं ॥ ३२ ॥ शेतकरियासि पुसती सहज । धान्य कितीक होतसे तुज । तें यथार्थचि सांग आज । सत्य उमज धरोनियां ॥ ३३ ॥ कुणबी सांगे तये दिवसीं । दोन खंड्या धान्य होतसे मजसीं । सत्य सांगतों तुम्हांपासीं । साक्षी गोष्टीसी उदंड ॥ ३४ ॥ ग्रामस्थ तुकयासि बोलत । तुम्हीं स्वमुखें सांगतां खादलें शेत । घरीं तों ऐवज नाहीं दिसत । तरी द्यावें खत लेहूनियां ॥ ३५ ॥ नायकाल जरी आमुचें वचन । तरी आतांचि जाईल पळोन । असामी याची भरील कोण । मग दंडील दिवाण आम्हांसि ॥ ३६ ॥ या लागीं सांगतों तुम्हांसी । रोखा लेहून द्यावा यासी । शेती पिशा राहिल्या त्यांसी । आपुल्या घरासी तुम्हीं न्या ॥ ३७ ॥ अवश्य म्हणतां वैष्णवभक्त । गाहीसुद्धां लिहिलें खत । कुणबियाच्या हातीं देत । संतोषयुक्त तो झाला ॥ ३८ ॥ पाहोनि कागदींचें धन । मूर्खासि जाहलें समाधान । निजस्वहितासि नाडला तेणें । विष्णु महिमा न कळेना ॥ ३९ ॥ ग्रामस्थीं करोनि पंचाइती । कब्जा तोडिला ऐशा रीतीं । म्हणती शेत खादलें तें सत्वरगती । पाहावें निश्चित जावोनियां ॥ १४० ॥ गांवाच्या पांड्या समवेत । पाहावया चालिले शेत । तों कौतुक करी पंढरीनाथ । तें ऐका निजभक्त


1 दुष्ट.

भाविकहो ॥ ४१ ॥ पहिल्या परीस दशगुणें विशेष । कण दाटोनि भरलीं कणसें । आणिक कथा बहुत असे । ग्रामस्थ दृष्टीस पाहती ॥ ४२ ॥ पक्षीयांचा दंश पाही । कोठे न दिसें एके ठायी । देखोनि विस्मित जाहले ते सर्वही । म्हणती नवायी अगाध हे ॥ ४३ ॥ मागें सांगत होता कजिया । तो शेतकरी म्हणतसे तया । खत फिरोनि द्यावें तुकया । शेत माझिया स्वाधीन करावें ॥४४॥ ग्रामस्थ म्हणती तये क्षणीं । पंचाईत फिरेल कैसेनी । आम्हांसी शब्द ठेवील कोणी । ऐसी करणी न करावी ॥ ४५ ॥ पिशाच कणसें जाहली साचीं । हे तो करणी विठोबाची । देवासि चिंता तुकयाची । प्रचीत त्याची आली कीं ॥ ४६ ॥ तूजला लेहोनि दीधलें याणें । तोचि सकरार न टळे जाण । राशीवर देईल तूझें धान्य । उरेल तें घेऊन जाईल ॥ ४७ ॥ ग्रामस्थ म्हणती तूकयाकारणें । आपल्या शेतीं बैं राखण । ऐकोनि म्हणे वैष्णव जन । हें नये होऊन सर्वथा ॥ ४८ ॥ आम्हीं कांहीं घेतलें नसतां । तों येव्हडा अभिशाप आला होता । म्यां सगळें शेत अंगीकरितां । पुढें दंड कोणता कळेना ॥ ४९ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णवभक्त । सप्रेमभावें भजन करित । मग एक मोलकरी करोनि ग्रामस्थ । राखण तेथें बैसविती ॥ १५० ॥ मजूर लावोनि वेटाळिलें शेत । रास झालिया मोजूनि पहात । तों सतरा खंड्यांची आली गणित । विस्मित चित्त सकळांचें ॥ ५१ ॥ म्हणती इतकें पीक जाणा । गावांत जाहलें नाहीं कवणा । अघटित ईश्वराची रचना । कौतुकें नाना दाखवी ॥ ५२ ॥ एक म्हणती तुकयाचें घरीं । दुष्काळ उपवास पडले भारी । ते पारणें व्हावयासि सत्वरी । त्यासि श्रीहरी पावला ॥ ५३ ॥ एक म्हणती असत्य उत्तर । त्या कुणबियाचें दैव थोर । तुकशेट वाणी दिवाळखोर । दाणे जन्मवर न देता ॥ ५४ ॥ एक म्हणती पक्षियांनी खादले कण । त्याचें बहुत जाहलें पुण्य । त्याचें फळ देखिलें पूर्ण । पीक सधन आलें कीं ॥ ५५ ॥ असो त्रिविध जन नानारीतीं । आपुल्या कल्पना बोलती । वैष्णवी मायेची अनिवार भ्रांती । सर्वां मतीं अनावर ॥ ५६ ॥ मग दोन खंड्या धान्य । त्यातूनि पहिल्या शेतकरियासि दीधलें मण । खत दिधले होतें लेहून । तेंही मागून घेतलें ॥ ५७ ॥ तुकयासि म्हणती गांवकरी । हें धान्य नेऊनि सांठवी घरीं । तूं तरी उदास अंतरीं । यास्तव श्रीहरी पावला ॥ ५८ ॥ ऐसी ग्रामस्थ सांगती मात । परी ते न ऐकेचि प्रेमळभक्त । दुराशा नयेचि मनांत । औदास्ययुक्त सर्वदा ॥ ५९ ॥ निरपेक्ष मुख्य वैराग्यलक्षण । निरपेक्षासीच म्हणावे सज्ञान । निरपेक्ष साधक त्यासींच पूर्ण । भक्ति सगुण ठसावे ॥१६०॥ निरपेक्ष तेथें वसे शांती । निरपेक्ष त्यासीच बाणे विरक्ती । निरपेक्षापासीच उपरती । संतोष चित्तीं सर्वदा ॥ ६१ ॥ निरपेक्षाचा साचा विवेक । निरपेक्ष त्यासीचा मानिती लोक । निरपेक्षापासी सकाळिक । सिद्धि अनेक तिष्ठती ॥ ६२ ॥ इतर स्थितीची कायसी गोष्टी । निरपेक्ष भक्ति निवडे शेवटीं । तयासीच पावे जगजेठी । इतर गोष्टी दांभिक ॥६३॥ ऐशा स्थितीचीं सकळ लक्षणें । तुकयाचे आंगीं बाणलीं चिन्हें । यास्तव नाना चमत्कार-

पूर्ण । रुक्मिणीरमण दाखवी ॥६४॥ असो मागील गोष्ट ऐका । धान्य देतांचि न घे तुका । संकट पडलें गांवींच्या लोकां । विचार निका सुचेना ॥ ६५ ॥ तेथील पांडया भाविक पूर्ण । महादाजीपंत नामाभिधान । त्याणें आपलें घरीं जाण । धान्य नेऊन सांठविलें ॥ ६६ ॥ म्हणे देवाच्या इच्छेनें पिकलें जाण । तें सत्कर्मी चालावें पूर्ण । पुढिले अध्यायी निरूपण । ऐकतां सज्जन संतोषती ॥ ६७ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ । निश्चित हेचि जाणावें परमामृत । वैष्णवजन जे भाग्यवंत । तेचि सेविती, निजप्रीती ॥ ६८ ॥ जे षड्वैरी जिंतोनि निश्चित । जनीं वर्तती द्वेषरहित । त्यांसीच आवडी लागेल येथ । अधिकार इतरातें असेना ॥६९॥ ज्यासि भगवत्प्राप्तीची चाड । श्रवणी भक्ति लागे गोड । त्यांसिच हें चरित्र आवडे । इतरांसि गोड लागेना ॥ १७० ॥ यास्तव तुम्हां संतांसी जाण । सलगीं करूनि धीटपणें । आर्ष नम्र बोलें वचन । नेणतपणे उद्धट ॥७१॥ श्रीमंताने आपुले बोटी । घातली पितळेचि आंगोठी । तयासि लोक देखोनि दृष्टीं । कांचन दृष्टीं भावितलि ॥ ७२ ॥ तैशाच परी तुम्ही संतीं । अवधान देतां मजप्रती । तरी महीपतीचा विश्रामती । प्रख्यात म्हणती जनलोक ॥ ७३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । एकुणतिसावा अध्याय रसाळ हा ॥ १७४ ॥ अध्याय ॥ २९ ॥ ओव्या ॥ १७४ ॥ ६ ॥ ॥ ६ ॥



अध्याय ३०



श्रीगणेशाय नमः । आजि अनंत जन्मींचें दैव साचें । उदयासि आलें श्रोतयांचें । म्हणोनि उद्गार येती वाचे । चरित्र संतांचें वर्णावया ॥ १ ॥ प्रजेच्या भाग्यें करोनि निश्चिती । अंबुधर अपार वर्षे क्षिती । विबुधांच्या दैवयोग रीतीं । रत्नें निघती सागरांत ॥ २ ॥ कीं राजहंसाचें थोर कपाळ । यास्तव निपजती मुक्ताफळें । कीं सुंदरासि व्हावया अलंकार तत्काळ । निपजे सोज्जळ कांचन ॥ ३ ॥ कीं प्रकाशमान व्हावया क्षिती । नभमंडळीं प्रगटे गभस्ती[1] । कीं शोभायमान दिसावया राती । रोहिणीपती[2] अवतरला ॥ ४ ॥ नातरी सगुण मूर्तीचें व्हावया पूजन । विधीनें निर्मिली दिव्य सुमनें । तैसीं संतचरित्रें जाहलीं निर्माण । श्रवणासि भूषणें श्रोत्यांच्या ॥ ५ ॥ श्रवण झालिया मनन होय । पुढें निदिध्यास लागता हे । मग साधकासि साक्षातकार होय । अनुभवें प्रत्यय पाहावा ॥ ६ ॥ मागिलें अध्यायीं कथा निश्चित । पक्षियां खादलें शेत । कौतुक केलें पंढरीनाथें । पीक अद्भुत आलें कीं ॥ ७ ॥ ते तुकयानें धान्य टाकूनि सकळ । भजन करी सर्वकाळ । सांडूनि प्रपंच तळमळ । करि निश्चळ हरिभजन ॥ ८ ॥ घरीं कांता हळहळ करीत । म्हणे आलें धान्य न घेचि सत्य । संसार घातला पाण्यांत । खतेंही समस्त बुडविलीं ॥९॥ लोक म्हणती पीक आलें । घरीं तों उपवासी मरती मुलें । देवें दीधलें कर्मे नेलें । तैसेंचि झालें आम्हांसी ॥ १० ॥ असो कांता ऐशापरी । नित्य हळहळ करीतसे घरीं । तुका आनंदयुक्त अंतरीं । विचार करीत तेधवां ॥ ११ ॥ पांडुरंगाचें देवालय जाण । भंगले होतें पुरातन । तें नीट करावें उकलोन । होईल जागरण हरिकथा ॥ १२ ॥ श्रवण झालिया होय मनन । मननपाठीं निदिध्यासन । मग साक्षात्कारासि येऊनि आपण । होय विज्ञान साधका ॥ १३ ॥ ऐसा संकल्प करोनि मनीं । देवालय उकलिलें तये क्षणीं । आपुल्या हातीं कुदळी घेउनी । चिखलपाणी करीतसे ॥ १४ ॥ एकला एकटा करील काय । कैसें होईल देवालय । ऐसें जाणूनि पंढरीराय । होतसे साह्य कवणे रीतीं ॥ १५ ॥ महादाजी-पंतासि दाखविलें स्वप्न । धान्य ठेविलें त्वां सांठवून । तें देवालयाच्या कामासि लावणें । अवंचकपणें सर्वथा ॥ १६ ॥ तेचि आज्ञा वंदोनि शिरीं । मग ग्रामस्थांसी विचार करी । म्यां स्वप्न देखिलें ऐशापरी । समाचार सत्वरी घेऊ आतां ॥ १७ ॥ आश्चर्य करोनि आपुलें चित्तीं । देवालयासि पाहावया येती । तों तुका उकरीतसे भिंती । कुदळी हातीं घेऊनियां ॥ १८ ॥ म्हणती दृष्टांत जाहला साच । आतां साह्य करावें याचें । मग मजूर माणसें ठेविलीं पांच । कारेगर त्याचे आणविले ॥ १९ ॥ विटी दुदांड्या घेऊनि विकत । विष्णुआलियासि काम लावित । देऊळ सिद्ध जाहलें त्वरित । धान्य समस्त वेचलें ॥ २० ॥ पुढें उद्यापन राहिलें पाहीं । ब्राह्मण भोजनासि धान्य नाहीं । यासि उपाय करावा कायी । तुका देहीं चिंत्रातुर ॥ २१ ॥ ऐसें जाणूनी रुक्मिणीपती । कौतुक केलें कैशा रीतीं । महादाजीपंतासि एकांतीं । दृष्टांत रात्रीं दाखविला ॥ २२ ॥ म्हणे तुम्ही ग्रामवासी समस्त । पंच महापातकी दिसत । कैसी केली पंचाईत । न्याय

1 सूर्य. 2 चंद्र.

ध्यानांत न आणितां ॥ २३ ॥ शेतकरीयासी पीक भरून । तुकयापासूनि देवविलें जाण । आणि राखणावळीचा आदमण । तो का ठेवोन घेतला ॥ २४ ॥ आतां तरी सावधपणें । तयासि चावडीये बोलावणें । वाढीसुद्धां धान्य घेणें । तरीच कल्याण सर्वांसी ॥ २५ ॥ ऐसा दृष्टांत होतांचि पाहे । महादाजीपंत विस्मित होय । सकाळी चावडीस जाऊनि पाहे । स्वप्न लवलाहें सांगितले ॥ २६ ॥ ग्रामस्थ आश्चर्य करिती थोर । म्हणती यथार्थचि पडिलें अंतर । वेहरण आलें आम्हांवर । रुक्मिणीवर क्षोभविला ॥ २७ ॥ मग त्या कुणब्यासि बोलावून । ग्रामस्थ बोलती अवघे जण । पीक घेतलें त्वां भरोन । दाणे आदमण ठेविले कां ॥ २८ ॥ मग तो बोले तयांप्रती । म्यां दृष्टांत देखिला रातीं । नेदींच तरी पांडुरंगमूर्ती । क्षोभेल मजप्रती निश्चित ॥ २९ ॥ वाढीसुद्धां धान्य ते अवसरीं । त्याणें आणूनि दीधलें सत्वरी । आणिकही साहित्य जाहलें बहुतापरी । चमत्कार भारी देखोनियां ॥ ३० ॥ कोणी कणीक कोणी तांदुळ । कोणी घृत कोणी गूळ । कोणी शाखा आणि डाळ । साहित्य सकळ हें झालें ॥ ३१ ॥ सुदिन पाहोनि एके दिनीं । मूर्ति स्थापिली सिंहासनीं । मंत्रोक्त पंचामृतें करोनि । चक्रपाणी न्हाणिला ॥ ३२ ॥ ब्राह्मण वैदिक स्वहस्तें देख । देवासि करिती अभिषेक । वस्त्रें लेववोनियां सुरेख । उपचार अनेक ते केले ॥ ३३ ॥ गंधाक्षता सुमनमाळा । तुळसी बुका[1] त्यावरी शोभला । धूपदीप नैवेद्य अर्पिला । नमस्कार घातला साष्टांग ॥३४॥ प्रेम भरित होऊनि साचें । तुका सभामंडपीं नाचे । अद्भुत प्रेम त्या समयींचें । नये वाचे वर्णितां ॥३५॥ ऐशा रीतीं उपचार जाणा । देवासि केल्या प्रदक्षिणा । मग ब्राह्मण बैसले भोजना । विडे दक्षिणा त्यासि दिलीं ॥ ३६ ॥ देऊळ उद्यापन ऐशा रीतीं । होतां तुकयांसि संतोष चित्तीं । नित्य पूजितो सगुण–मूर्ती । आवडी चित्तीं नित्य नवी ॥ ३७ ॥ निजांगें करावें कीर्तन । ऐसी इच्छा धरिली मनें । संत बोलिले पुरातन । त्यांचीं वचनें पाठ केलीं ॥ ३८ ॥ पहिला अभ्यास कांहीं नव्हता । आवडी आतां उपजली चित्ता । प्राकृत अभंग शतकोटि कर्ता । नामदेव वार्ता बोलिले कीं ॥ ३९ ॥ त्या नामयाचे अभंग निश्चित । पाठ करोनि गात नाचत । हरिदिनीसी उपास करित । संतां समवेत जागरण ॥ ४० ॥ द्वादशी साधूनि करी पारणें । यथाशक्ति ब्राह्मणांसि देत अन्न । दिंडी पताका मिरवणें । वैष्णव चिन्हें बाणलीं ॥ ४१ ॥ आणिक संतांचे पाहिले ग्रंथ । कबीर भक्त यवन विख्यात । तयांचीं जीं वचनामृतें । तीं पाठ करित प्रीतीनें ॥ ४२ ॥ आणिक अध्यात्म ग्रंथ थोर । स्वमुखें वदले ज्ञानेश्वर । त्यांचीं शुद्ध प्रती साचार । वैष्णव वीरें मिळविली ॥ ४३ ॥ श्री विष्णु अवतार एकनाथ देखा । त्यांणीं भागवतावरी केली टिका । त्याचा प्रयत्न करोनि निका । ग्रंथ नेटका मिळविला ॥ ४४ ॥ त्या ग्रंथांचें करावया मनन । एकांत स्थळ योजिलें कोण । रमणीय भांडार पर्वत जाण । ते स्थळीं जाऊन बैसतसे ॥ ४५ ॥ ग्रंथांचें पारायण करोनि । अर्थ अन्वय ध्यानासि आणी । पूर्वाभ्यासी जो शिरोमणी । कैवल्यदानीं साह्य जया ॥४६॥

[1] तूप.

ग्रंथ व्हावया पाठांतर । तुकयासि श्रम न लागती फार । मनन करितां अहोरात्र । मुखीं अक्षरें बैसती ॥ ४७ ॥ प्रासादिक एकनाथाचीं वचनें । जें कां भावार्थ रामायण । त्याचेंही पाठांतर पूर्ण । निजप्रीतीनें करितसे ॥ ४८ ॥ श्री भागवतीच्या कथा सुरस । स्वमुखें वदले महापुरुष । त्याही पाहिल्या सायासें । लीला विशेष श्रीहरीची ॥ ४९ ॥ योगवासिष्ठ अमृतानुभव पूर्ण । श्रीज्ञानेश्वर बोलिले वचन । त्याही ग्रंथाचें करोनि मनन । अर्थ शोधून ठेविला ॥५०॥ आणिक पुराणें ऐकती फार । परी मनन करिती साचार । तेणेंचि त्यांचा पडे विसर । संसार घोर वागविती ॥ ५१ ॥ चित्त शुद्धि नसली जाणा । आणि एकांतीं बैसला देवार्चना । तरी पुढें आठवे मनकामना । ते रानोराना हिंडवी ॥ ५२ ॥ तैसी तुकयाची नव्हे बुद्धी । आधीं करोनि चित्त शुद्धी । मग जाऊनि एकांत संधी । अर्थ शोधी ग्रंथाचा ॥ ५३ ॥ भांडार पर्वतीं बैसे जाऊन । परी तेथें सर्वथा नसे जीवन । हेंही जाहलें असे निर्माण । निमित्त कारण तें ऐका ॥ ५४ ॥ तुकयाची कांता होती कठीण । ऐसें बोलती सर्वत्र जन । परी तिचें स्वामीकाजीं मन । त्याजविण अन्न न सेवी ॥ ५५ ॥ भाकर पाणी घेऊनि नित्य । पर्वतावरी नेऊनि देत । दीड योजन वेरझार नित्य । करितां बहुत निर्बुजली ॥ ५६ ॥ पंच प्राण भ्रतारापासी । परी विरोध चालवी देवासी । दर्शना न जाय देउळासी । म्हणे काळा दृष्टींसी न पडावा ॥ ५७ ॥ म्हणे आमुचा पूर्वज विश्वंभर । त्यानेंच आणिला दावेदार । कुळीं संबंध लागला थोर । माझा भ्रतार[1] वेडा केला ॥ ५८ ॥ मुलें लेंकुरें कुटुंब फार । यांसि मिळेना अन्न वस्त्र । मजवरी टाकूनि संसार । पर्वतावर बैसला ॥ ५९ ॥ चार घटिका लोटतां रात । हाळूच येतो देउळांत । काळ्या पुढें नृत्य करीत । आगड धुत मेळवूनियां ॥ ६० ॥ प्रातःकाळीं करोनि स्नान । त्या मेल्याचें करितो पूजन । कोणते जन्मीं घेतलें ऋण । तेंचि उसनें फेडितो ॥ ६१ ॥ जवळ गावांत राहतां जरी । वोली कोरडी देतें भाकरी । वेरझारा करूं कितीतरी । हें निर्धारीं उमजेना ॥ ६२ ॥ ऐसी तुकयाची कांता । आपुल्या घरीं करीतसे चिंता । मग करुणा आली पंढरीनाथा । अनाथनाथा विठोबासी ॥ ६३ ॥ म्हणे तुका जावोनि बैसे डोंगरीं । हे मज गांजिती नानापरी । आतां इची वेरझार होईल दूरी । तें चरित्र निर्धारीं दाखवूं ॥ ६४ ॥ ऐसें म्हणवोनि चक्रपाणी । कौतुक केलें तये दिनीं । एक भाकर भोंपळाभर पाणी । अवली घेऊनी जात होती ॥ ६५ ॥ उष्ण तीव्र जाहलें थोर । दिवस आला दोन प्रहर । तों कौतुक केलें सारंगधरें । तें ऐका सादर भाविक हो ॥ ६६ ॥ पंथ क्रमितां साचार । अवलीची दृष्टी डोंगरावर । म्हणे आतां कितीक उरलें दूर । उष्ण तीव्र लागतसे ॥ ६७ ॥ पायी पायतन नसेचि पाहीं । खडे रुतती ते समयीं । तेणें कासावीस होतसे जीवीं । तो विघ्न आणिकही ओडवले ॥ ६८ ॥ करवंदीचा कांटा थोर । मध्येंच होता वाटेवर । पाय पडतांचि तयावर । फुटोनि साचार वर आला ॥ ६९ ॥ तेणें कासावीस होवोनि मनीं । मूर्छा

[1] पती.

येऊनि पडली धरणीं । भोंपळाभर होतें पाणी । तें उलंडोनी सांडलें ॥ ७० ॥ नेत्र उघडोनि पाहातसे पाय । तों त्यांतूनि रुधिरें वाहत आहे । म्हणे म्यां आतां करावें काय । म्हणोनि धाय मोकलित ॥ ७१ ॥ जन्मांतरींचें होतें वैर । तेंचि साधिलें साचार । पाठीं बैसला दावेदार । जाहलीं मरमर संसारीं ॥ ७२ ॥ माझ्या कंठीं बांधूनि मणी । फुकटची झाला असे धनी । दूर बैसतो जाऊनी । एकांत स्थानीं पर्वतीं ॥ ७३ ॥ ऐशा रीतीं करूनि रुदन । कांटा पाहातसे उपटोन । परी तो सर्वथा न निघेची जाण । म्हणे उपाय कोण करूं आतां ॥ ७४ ॥ माझ्या प्राक्तनाची विचित्र गती । विधिनें लिहिलें संचिती । तें न चुकेचि कल्पांतीं । म्हणोनि विपत्ती भोगीतसे ॥ ७५ ॥ बहुत खर्चोनियां धन । पितयानें केलें थोर लग्न । पिशाचे पदरीं बांधिले जाण । शेवटीं प्राक्तन निवडलें ॥ ७६ ॥ आणि कोणेरी बंधूनें सहज । महायात्रेसी नेलें मज । तें पुण्य उभे न ठाके आज । गेली लाज संसारीं ॥ ७७ ॥ बहुत द्रव्य खर्चोनि जाण । माझीही तुळा केली त्याणें । तेथें पोटभरी न मिळेची अन्न । गेलें पुण्य ते वायां ॥ ७८ ॥ ऐशा रीतीं ते राणी । अवली शोक करीतसे मनीं । परी देवा म्हणवोनि न बोले वदनीं । म्हणे वैरी धांवोनि येईल तो ॥ ७९ ॥ माझा द्वंद्वी रुक्मिणीवर । त्यासि न कळो हा समाचार । येथें अकस्मात आला जर । तरी हांसेल साचार मजलागीं ॥ ८० ॥ म्हणे शिव्या देत रात्रंदिवस । म्हणवोनि कांटा मोडला असे । मग संतोष वाटेल तयास । तरी न हो ऐसें ये काळी ॥ ८१ ॥ विषम काळें घेतली धांव । तें दुःख सोसि जे आपुल्या जीवें । परी वैरिवासि तें न सांगावें । तरीच जन्मावें संसारीं ॥ ८२ ॥ जीवीं विषय वाटे गोमटा । परी निंदा करिती लोक चोहटा । तरी मायबापांचिया पोटा । व्यर्थ करंटा तो आला ॥८३॥ वर्म सांपडलें वैरिया हातीं । तयासि न यावें काकुळती । प्राणांत वोढवल्या निश्चिती । शरण त्या प्रती न जावें ॥ ८४ ॥ ऐसा निश्चय करोनि मनें । अवली हळूच करी रुदन । कांटा न निघेचि प्रयत्नें । उपाय कोण करावा ॥ ८५ ॥ हें जाणोनि वैकुंठविहारी । म्हणे तुका बैसला उपवासी डोंगरीं । इची तों ऐशी जाहली परी । यास्तव श्रीहरी पावला ॥ ८६ ॥ सांवळा सुकुमार राजीवनयन । दिव्य पीतांबर नेसला जाण । मुगुटीं झळकती नाना रत्नें । भास्करासि उणें आणिती ॥ ८७ ॥ दिव्य कुंडलें कानीं तळपती । गळा कौस्तुभ वैजयंती । पायीं नेपुरें वांक्या वाजती । दृष्टीं अवचितीं देखिला ॥ ८८ ॥ अवली म्हणतसे ते वेळा । हा कां येथें पातला मेला । भ्रतार माझा वेडा केला । संसारीं अवकळा याचेनी ॥ ८९ ॥ माझी अवस्था विपरीत । देखोनि हांसें येईल यातें । म्हणवोनि मुखचंद्र पश्चिमेस । केला त्वरित ते समयीं ॥ ९० ॥ तों लीलानाटकी जगदीश । तिकडेही तैसाचि सन्मुख दिसे । अष्टदिशा भोंवतें चुकवीतसे । परी न्यून नसे कोठेंही ॥९१॥ तों श्रोते आशंकित होऊनि चित्तीं । वक्त्यालागीं प्रश्न करिती । अवलीची नसतां सप्रेम भक्ती । द्वेषें निंदिती सर्वदा ॥ ९२ ॥ ऐसें असतां तिजकारणें । देव कां देतो बळेंच दर्शन । हाचि संशय वाटतो पूर्ण ।

१ रक्त.

तरी तो निरसन करीं कां ॥ ९३ ॥ ऐसा रुक्मिणी प्रश्न करितां । उल्हासें उत्तर देतसे वक्ता । द्वेषें करूनि देव भेटला बहुतां । हें तो वार्ता पुराणीं ॥ ९४ ॥ भक्तिभावें पाहतां साचार । ध्यानासि नयेचि रामचंद्र । द्वेष भावें लंका नगर । रावणासि सर्वत्र राम भासे ॥ ९५ ॥ तैसाचि कंस द्वेष करी । म्हणे कृष्ण केवळ माझा वैरी । याच्या दृष्टीपासूनि दुरी । न होय श्रीहरी सर्वथा ॥ ९६ ॥ तैसीच तुकयाची कांता । म्हणे दृष्टीसि काळा न पाहे आतां । म्हणोनि आयास न करितां । तिच्या भोंवता फिरतसे ॥९७॥ जैसीं भिंगाचिया सदनीं । विष्णुमूर्ति स्थापिली कोणी । जिकडे पाहे तिकडे नयनीं । चक्रपाणी दिसतसे ॥ ९८ ॥ हाही दृष्टांत न सरेचि येथ । अवलीचें कंटाळलें चित । मग नेत्र झांकोनि निवांत राहत । तों आंतही दिसे जगदात्मा ॥ ९९ ॥ म्हणे कांहीं इच्छा न धरितां पोटीं । वैरी कां उगाच पडतो दृष्टीं । कशास्तव घेतली माझी पाठी । यास्तव पोटीं जल्पतसे ॥१००॥ ऐसी देखोनि तिची स्थिती । काय म्हणतसे वैकुंठपती । जेणें आम्हांसि लावीली प्रीती । तेचि युक्ति करूं आतां ॥१॥ मग प्रगट होऊनि पंढरीनाथ । अवलीस निजकरें आश्वासित । म्हणे कन्या माझी तूं निश्चित । चित्तीं द्वैत न धरावें ॥२॥ तूं मज म्हणसी दावेदार । तरी त्यां कोणते साधिलें वैर । विदेही केला माझा भ्रतार । हे व्यर्थचि उत्तर बोलसी ॥३॥ मुळींच फळ देठीं सुटलें । मग वारा लागतां खालीं पडलें । तेवी तुकयाचें निमित्त भलें । तैसें आले मजवरी ॥४॥ नामरूपी लावूनि चित्त । जाऊनि बैसती अरण्यांत । तुजचि ऐसें जाहलें मातें । हिंडततें नित्य त्या मागें ॥५॥ तुम्हांसि खावया नाहीं अन्न । यास्तव पीक आणिलें सधन । परी तुका सर्वथा न घेचि धान्य । अन्याय यात कोण माझा ॥ ६ ॥ ऐसें म्हणोनि पंढरीरायें । मांडीवर घेतला तिचा पाय । कांटा काढोनि टाकिला पाहे । दुःख नोहे अनुमात्र ॥७॥ कृपादृष्टीं पाहतांचि देव । मागील क्लेश विसरली सर्व । तो माया लाघवी देवाधिदेव । न कळे भाव ब्रह्मादिकां ॥ ८ ॥ अवली म्हणत ते अवसरी । मजला उशीर लागला भारी । पिसा बैसला असे डोंगरीं । जावें सत्वरी त्या ठायीं ॥९॥ ऐसें बोलोनियां उत्तर । कुरकुली घातली डोईवर । जिजाई चालिली सत्वर । सारंगधर तिज मागें ॥१०॥ पर्वतीं येतांचि लवलाहें । तुका नेत्र उघडोनि पाहे । परमचित्तीं विस्मित होय । म्हणे अपूर्व आहे हे गोष्टी ॥११॥ आणि रजनी आणि गभस्ती । एके ठायी धरिली वस्ती । कीं समुद्र आणि आगस्ती । एकयासि येती नवल हें ॥ १२ ॥ पंडित आणि अजापाळक । सरस्वती जाहले एक । विष अमृत मिळाले देख । होंचि कौतुक वाटतें ॥ १३ ॥ कां ससाणा आणि राजहंस पाहीं । सख्यत्वें मिळाले एकेठायीं । तेवीं अवली सहित शेषशायी । हेचि नवाई अगाध ॥ १४ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णव । वीर चित्तीं संतोष मानिला थोर । म्हणे उभयतांचें होते वैर तें । झालें दूर ये समयीं ॥१५॥ घरकलह वाईट जाणा । विक्षेप वाटे क्षण क्षणा । अवलीस भेटे वैकुंठराणा । तरी आमुचा मना संतोष ॥ १६ ॥ ऐशा रीती भक्त प्रेमळ । हर्षें वोसंडे तये वेळ । तों अवली आणि घननीळ । आली जवळ उभयतां ॥ १७ ॥ तुका

उठोनि लवलाहें । श्रीहरीचे धरिले पाय । मग अष्टमायें धरूनि पाहे । सद्गदित होय तेधवां ॥ १८ ॥ तुका अवली जगज्जीवन । स्वस्थ बैसलीं तिघेजण । मग प्रेमळ भक्त कांतेसि म्हणे । विठोबासि भोजन घालीं कां ॥१९॥ ऐसि ऐकतांची मात । अवली लज्जीत चित्तांत । म्हणे एक भाकर आहे आंत । कैसी दोघांतें पुरेल हे ॥ १२० ॥ मनांत परम होतसे कष्टी । म्हणे येथेंही काळ्यानें घेतली पाठी । धष्टपुष्ट दिसतो माझें दृष्टी । कैसी गोष्टीं करूं आतां ॥ २१ ॥ ऐसें मनांत बोलोनि उत्तर । देवाच्या पात्रीं वाढिली भाकर । वंचिलें नाहीं अणुमात्र । मग सारंगधर तुष्टला ॥ २२ ॥ अवंचक भक्ति देखोनि हरी । अन्नें निर्मिली नानापरी । कुरकुलें भरोनि आलेंवरी । वस्त्र त्यावरी झांकिलें ॥ २३ ॥ मागें क्षुधित होतां श्रीकृष्ण । मग द्रौपदीनें दीधलें भाजीपान । कांहींच वंचिलें नसतां जाण । मग निर्मिलीं अन्नें नानापरी ॥ २४ ॥ तैसा अवलीचा भक्तिभाव नाहीं । परी विरोधेंचि तुष्टले शेषशायी । मग अवलीसी म्हणे ते समयीं । तुक्यासि लवलाहीं वाढीं कां ॥ २५ ॥ ऐसें बोलत रुक्मिणीकांत । जिजाई लज्जित मनांत । वस्त्र काढोनि जंव पाहत । तों भरलीं तयांत पक्वानें ॥ २६ ॥ परम विस्मित जाहली मनीं । म्हणे मज पावली कुळस्वामिणी । भैरव खंडेराव कीं भवानी । त्याही येऊनि रक्षिलें ॥ २७ ॥ कोणाचें कर्तृत्व हे नेणावे जाण । ज्याणें रक्षिला माझा मान । तयासि मी सर्वभावें शरण । जीवें प्राणें असें कीं ॥ २८ ॥ जाणोनि अवलीचें मनोगत । काय बोलत रुक्मिणीकांत । तूं जयासि शरण निश्चित । तोचि मी अनंत नोळखसी ॥ २९ ॥ अन्नें निर्मिलीं देखत देखत । हें माझेंचि कर्तृत्व जाण सत्य । ऐसें सांगतां वैकुंठनाथ । परी असत्य वाटत तिजलागीं ॥ ३० ॥ म्हणे इतुकें सामर्थ्य असतें तयां । तरी विदुराच्या कण्या खाता कासया । द्रौपदीस हात वोडवोनियां । देंठ लवलाह्या भक्षीतसे ॥३१॥ बहुत वराडियाचें लक्षण । कीर्तनीं लोक ऐकती गाणें । भिल्लनीचीं खाय उच्छिष्ट बोरें जाण । चित्तीं अनमान न करितां ॥३२॥ इतुकें सामर्थ्य असतें यया । तरी महाराचें घर निघता कासया । चोरव्याचीं ढोरें वोढोनियां । तयासि खावया मागतसे ॥३३॥ ऐशा कल्पना नानारीती । अवली आणितसे चित्तीं । अन्न घेउनि आपुल्या हातीं । दोघांप्रती वाढिलें ॥३४॥ जेव्हां कांटा मोडला पायीं । भोंपळा लवंडला तये ठायीं । पर्वतावरी जीवन पाही । जवळ नाहीं सर्वथा ॥३५॥ अवलीस संकट जाहलें फार । म्हणे कैसा करावा विचार । जाणूनि तिचें निज अंतर । सारंगधर काय म्हणे ॥३६॥ पैलते खोंगळी माजीं साचा । जिव्हाळा दिसतसे पाणियाचा । तेथें झरा लागेल उदकाचा । सत्य त्रिवाचा हे माझी ॥३७॥ अवलीस सत्य न वाटेचि मात । मग चीप उचलोनि पाहे हातें । तों निर्मळ झरा आंतूनि येत । आश्चर्य वाटत तिजलागीं ॥३८॥ म्हणे निर्जळ वनीं लाविलें पाणी । हे तों अघटित याची करणी । अन्नें निर्मिता ये ठिकाणीं । याजवीण कोणीं असेना ॥३९॥ नाना सावरी मंत्र शिकोन । कपटविद्येंत जाहला निपुण । माझ्या भ्रतारासि घालोनि मोहन । वेडा करोन बैसविला ॥ १४० ॥ ऐशा कल्पना आणूनि फार । भोंपळा भरोनि

१ विट्ठल.

घेतलें नीरें । आपुल्या हातें वाढीत पात्रें । मग रुक्मिणीवर जेवितसे ॥ ४१ ॥ विबुध बैसोनि विमानांत । कौतुक पहावयासि आले तेथ । म्हणती धन्य भक्तमहिमा अद्भुत । पुष्पें वर्षत ते वेळीं ॥ ४२ ॥ तुकयासि म्हणे जगज्जीवन । माझा प्रसाद जेवी प्रीतीनें । कांहीं उद्वेग न करीं मनें । मी सिद्धी नेईन योग तुझा ॥ ४३ ॥ ऐसें म्हणवोनि भगवंतें । ग्रास घालीत आपुल्या हातें । अवली सहित जेविले तेथें । न धरीत द्वैत जगदात्मा ॥ ४४ ॥ तो ब्रह्मरस सेवितां प्रीतीं । तुकयासि जाहली सुखप्राप्ती । मग करशुद्धि देऊनि प्रीतीं । बोले श्रीपती काय तेव्हां ॥ ४५ ॥ म्हणेरे तुकया ऐक वचन । मी जनीं जनार्दन भरलों जाण । चराचर मद्रुप पाहणें । जैसें सुवर्ण अलंकारीं ॥ ४६ ॥ कीं पटें पाहतां विचारून । तरी काय त्यांत तंतुवाचोन । तेवीं विश्व नाहीं मजवीण । अनुभवें करून तूं पाहे ॥ ४७ ॥ तरी आजपासोनि या पर्वतीं । नित्य न यावें एकांतीं । अवलीसि कष्ट बहु होती । ऐक वचनोक्ती हे माझी ॥ ४८ ॥ ऐसें सांगतां दीनदयाळ । तुका तत्काळ चरणीं लोळे । म्हणे मी तुमचा लडिवाळ । यास्तव कळवळ करितसां ॥ ४९ ॥ नेणें जपतप शास्त्र पठण । नेणें अष्टांग योगसाधन । न कळे अध्यात्म ब्रह्मज्ञान । पतित संपूर्ण सर्वांगीं ॥ १५० ॥ तुम्ही दीनबंधु अनाथनाथ । हे बिरुदावळी जगविख्यात । कीर्तनीं गाती प्रेमळभक्त । ते केली सत्य पांडुरंगा ॥ ५१ ॥ ऐकोनि तुकयाचें सप्रेम वचन । राहे म्हणतसे करुणाघन । माता बाळकाचें करि रक्षण । हा स्वाभाविक गुण तिचा कीं ॥ ५२ ॥ तेंवीं तूं माझें निपटणें । वृद्धपणींचें आहेसि तान्हें । ऐसें बोलोनि मधुसूदनें । दीधलें आलिंगन तुकयासी ॥ ५३ ॥ आपुल्या हृदयींची सुखविश्रांती । ज्ञानियांसि न सांगतां गुप्त होती । ते तुकयासि देतसे श्रीपती । सप्रेम भक्ती देखोनियां ॥ ५४ ॥ तये अवस्थे माजी देख । देवभक्त जाहले एक । कोण कोणासि नाहीं आर्तिक । मग वैकुंठनायक उमजले ॥ ५५ ॥ म्हणे तुका मिळाला ऐक्यासनीं । द्वैतभावासि घातलें पाणी । जैसें दुग्धांत मिळे धारवणी[1] । तें न दिसे परतोनी सर्वथा ॥५६॥ शरीरांत सुरवाडला प्राण । कीं आकाशीं संचला पवन[3] । कीं सुवर्ण कळिकेंत मकरंद पूर्ण । राहे लपोन ज्या रीतीं ॥ ५७ ॥ घंटेमाजी लोपला नाद । कीं शर्करेमाजी जैसा स्वाद । तैसा तुकया जाहलिया अभेद । मग सप्रेम बोध खुंटला ॥ ५८ ॥ आश्चर्य कांहीं वाटलें पोटीं । ते कोणासीं बोलूं गुजगोष्टी । कोणासि आलिंगूनि धरूं कंठीं । म्हणोनि जगजेठी चिंतावला ॥ ५९ ॥ तुका ऐक्यासि आला जाण । तरी माझा धांवा करील कोण । मग मी कोणाचें करूं धावणें । वर्णील कोण गुण माझे ॥ १६० ॥ ऐसें जाणुनि दीनदयाळ । तुकयासि म्हणे तये वेळ । तूं कीर्तनीं नाचतोसि जे वेळ । तेथें मी घननीळ तिष्ठतसे ॥ ६१ ॥ ऐसें बोलतसे भक्त सखा । नेत्र उघडोनि पाहे तुका । प्रश्नाचें मीस करोनि देखा । देवभक्ति सुखा प्रतिपादी ॥ ६२ ॥ ऐसीं देवभक्तांचीं उत्तरें । विमानीं बैसूनि ऐकसी सुर । म्हणती तुका वैष्णववीर । करी उद्धार बहुतांचा ॥ ६३ ॥ इंद्रपद घेऊं निश्चिती । आम्हीं ठकलों बहुतारीतीं । प्रेमसुख लुटोनि भक्तीं ।

१ पाणी. २ कापड. ३ वायु.

केला श्रीपती स्वाधीन ॥ ६४ ॥ धन्य धन्य हा मृत्युलोक । याचा महीमा दिसतो अधिक । येथेंचि सामग्री असतां देख । स्वर्गपदीं सुख भोगिती ॥ ६५ ॥ धन्य धन्य हा भांडार पर्वतजाण । यासि पांडुरंगाचे लागले चरण । धन्य देहू पुण्यक्षेत्र पूर्ण । जेथें वैष्णवजन अवतरला ॥ ६६ ॥ धन्य पंचक्रोशी साचार । धन्य हे पाषाण मृतिकासार । या स्थळीं हिंडला इंदिरावर । महिमा अपार न वदवे ॥ ६७ ॥ वासवें करोनि ऐशी स्तुति । स्वर्गासि तेव्हां विबुध जाती । मग तुकयासि पुसोनि निजप्रीतीं । अंतर्धान श्रीपती पावले ॥ ६८ ॥ मजला ऐसें भासतसें जाण । तुकयाचें हृदयकमळ पूर्ण । त्यांत श्रीहरी मिलिंद होऊन । निजप्रीतीनें राहिला ॥ ६९ ॥ कीं भक्तांचें हृदयसागर । त्यांत मत्स्य तळपे इंदिरावर । अहंभाव हाचि शंखासुर । निवटिला साचार निजहस्तें ॥ १७० ॥ प्रसादिक वाक्य निश्चिती । तुका बोलिला सप्रेम भक्ती । त्याच जाणाव्या निघाल्या श्रुती । अन्यथा मती हे नव्हे ॥ ७१ ॥ तेंचि विश्वासें गाति आदरें । हेच महर्षि जाणावे थोर । त्या वचनाचा धरोनि आधार । संप्रदाय थोर वाढविती ॥ ७२ ॥ असो तयाचा अपार महिमा । निरुपमासि नसेचि उपमा । अद्भुत घालोनि भक्तिप्रेम । पुरुषोत्तमा वश्य केलें ॥ ७३ ॥ कलियुगीं बौद्ध अवतार जाण । हें तों पुराणप्रसिद्ध वचन । परी तुकयाचा मनोरथ व्हावया पूर्ण । देव सगुण होतसे ॥ ७४ ॥ जैसें कामधेनूचें तान्हें जाण । सांज वेळ न होतां चोंखी स्तन । ते पान्हा घालीत निजप्रीतीनें । काळ वेळ न म्हणे सर्वथा ॥ ७५ ॥ का कल्पतरुखालीं साचार । अघटित कामना धरिली थोर । तो न विचारतांचि जन्मांतर । मनोरथ साचार पुरवीतसे ॥ ७६ ॥ तैशाच रीतीं दिनदयाळ । अवतार ध्यावयाची नसतां वेळ । सगुणरूप धरोनि निर्मळ । भक्तासी तत्काळ भेटत ॥७७॥ असो हे दृष्टांत जाहले फार । उबग मानितील श्रोते चतुर । तुकयासि भेटोनि सारंगधर । वैकुंठपुर पावले ॥ ७८ ॥ मग अवलीच्या समागमें देखा । गांवांत आला वैष्णव तुका । पुढिले अध्यायीं रसाळ ऐका । वदवील सखा प्रेमळाचा ॥ ७९ ॥ प्रभंजनाच्या योगें करून । डोले तृणाचे बुजावणें । परी लोकांसि भासतसे जाण । बैसला राखण शेतकरी ॥८०॥ तेंवीं ह्याच दृष्टीनें पाहतां सर्व । तयासि भासे कवीचें लाघव । सुज्ञान म्हणती तैसें नव्हें । पंढरीराव वदविता ॥ ८१ ॥ किंगरी वाजे नाना लीळा । ऐकूं येतसे लोकां सकळां । परी वाजविणारा असे वेगळा । सज्ञान त्याजला पाहती ॥ ८२ ॥ तैसा पांडुरंग मायालाघवी । तों भक्त चरित्रें स्वयें वदवी । महीपती हें निमित्त दावी । पोसणा कवी संतांचा ॥८३॥ स्वस्ति श्रीभक्तिलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । तिसावा अध्याय गोड हा ॥ १८४ ॥ ॥ अ० ३० ॥

1 वारा.


अध्याय ३१
तुकाराम
म्हातारी
ब्राह्मण
तुकारामरूपी विठ्ठल
जिजाबाई

श्रीगणेशाय नमः । तुझ्या नामावांचोनि निश्चिती । आणिक साधन नेणें श्रीपती । जप तप अनुष्ठान नानारीतीं । कांहींच मजप्रती कळेना ॥ १ ॥ व्रत करावें यथा विधीनें । तरी अन्नावांचोनि व्याकूळ प्राण । जरी हिंडावें तीर्थाटण । तरी शक्तिहीन शरीर कीं ॥ २ ॥ तुझी प्राप्ति व्हावया श्रीहरी । सत्पात्रीं दानें द्यावीं जरी । तरी धन नाहीं बहुत पदरीं । कैशापरी हें घडे ॥ ३ ॥ चराचर जें दिसतें कांहीं । तेथें तुजसि पहावें सर्वांठायीं । तरी गुणदोष दिसतो सर्वही । समता नाहीं चित्तांत ॥ ४ ॥ श्रुति अभ्यास करावा तत्वतां । तरी बाळ बुद्धि नसेचि आतां । अध्याय ग्रंथ पाहूं म्हणतां । तरी तेथें आस्था न बैसे ॥ ५ ॥ तुझ्या भक्तकथेची सांगड मोठी । सप्रेमभावें बांधिली पाठी । आतां पाहोनि कृपादृष्टी । पाववी जगजेठी पैलतीरा ॥६॥ मागिले अध्यायीं कथासार । अवलीस कांटा मोडला थोर । तो काढोनिया रुक्मिणीवर । तुकयासि सत्वर भेटले ॥ ७ ॥ गांवांत येऊनि वैष्णव भक्त । संतसेवेसि जाहला रत । तयांसि आदर करोनि बहुत । चरण प्रक्षाळित स्वहस्तें ॥ ८ ॥ तें तीर्थ घालितांचि वदनीं । ब्रह्मरस त्याहूनि गौण मानीं । सकळ तीर्थे संतांच्या चरणीं । निश्चिय मनीं दृढ केला ॥ ९ ॥ तुळसी माळ सुमन हार । घालोनि पूजीत वैष्णववीर । तैसेंचि ब्राह्मण द्विजवर । तद्भावें आदर करी त्यांचा ॥१०॥ क्षुधित वैष्णव अथवा विप्र । तुकयासि समाचार । तयांसि प्रयत्न करोनि फार । भोजन आदरें घालीतसे ॥११॥ संतसेवे परतें कांहीं । आणिक साधन सर्वथा नाहीं । त्यांच्या वचनासि या ठायीं । विश्वास जीवीं धरियेला ॥ १२ ॥ संत गाती कीर्तनांत । त्याच्यामागें ध्रुपद धरित । तेणें सहजचि श्रवण होत । मग मननहीं करीत एकांतीं ॥ १३ ॥ तुकयासि भेटला रुक्मिणीवर । तरी करितसे परोपकार । खडे झाडितसे आपल्या करें । जेथें वैष्णव वीर नाचती ॥ १४ ॥ प्रसंग पाहोनियां देखा । कीर्तनांत धरितसे दिवटी तुका । न धरोनि लौकिकाची शंका । हरिनामें देखा जागवितसे ॥ १५ ॥ कीर्तनीं बैसती संतजन । त्यांचे पायतन करितसे जतन । जाते समयी पुढें ठेवून । करितसे नमन सद्भावें ॥ १६ ॥ कीर्तनीं ध्रुपद धरितसे जेथे । अद्भुत रंग येतसे तेथें । प्रेमें कंठ होय सद्गदित । नेत्रीं अश्रुपात वाहती ॥ १७ ॥ हरिनामें गर्जोनि देखा । सप्रेमभावें सांगे लोकां । माया मेली उरला तुका । विठोबा सखयाचि नामें ॥ १८ ॥ उत्तम भक्ताचें लक्षण । श्रीभागवती बोलिले जाण । तुकयाच्या आंगीचें चिन्ह । एकही न्यून असेना ॥१९॥ देखोनि लोक म्हणती त्यास । तुकयासि लागलें प्रेमपिसें । भलतीच बडबड करीतसे । उसंत नसे निशिदिनीं ॥ २० ॥ सत्यवादी परोपकारी । भूतदया वसे अंतरी । काम सांगती नरनारी । तें सत्वर करी निजांगें ॥ २१ ॥ आर्त भूत पदार्थ इच्छी मानसीं । जवळी असतां देतसे त्यासी । काया वाचा आणि मनेंसी । न वंची कोणासी सर्वथा ॥ २२ ॥ स्वमुखें लोकांसि सांगे ज्ञान । अहं ब्रह्मचि परिपूर्ण । परी कवडीसाठीं देती प्राण । तरी व्यर्थचि बोलणें तें गेलें ॥ २३ ॥ तैसी तुकयाची नव्हे करणी । बोलिल्यासारिखें

वर्ते जनी । आत्मवत अवघें विश्व मानी । द्वैत स्वप्नीं दिसेना ॥ २४ ॥ आपुलें आणि घराचे तान्हे । रडतां देखोनि
निज दृष्टीनें । दोहींची कळवळ तत्समान । हेंचि लक्षण संताचें ॥ २५ ॥ आपुली धन संपत्ति निश्चित । तस्करीं हरिली एकोनि
मात । चित्तीं खेद न आणी किंचित । त्यासीच संत म्हणावें ॥२६॥ रायें दीधले हिरे-रत्न । आणि रंकें आणिलें भाजी-पान । दोहींचें
वाटे तत्समान । हेंचि लक्षण संताचें ॥ २७ ॥ कीं नानाप्रकारें केली स्तुती । कोणी दुरुत्तरें बोलती । परी हर्ष शोक नुपजे चित्तीं ।
ऐसीच स्थिती तुकयाची ॥ २८ ॥ तंव कोणे एके दिवसीं जाण । तुकयाची कांता करीत स्नान । एकचि वस्त्र होतें आड जुनें । तें
ठेविलें चुणोन भिंतीवरी ॥ २९ ॥ बाहेर बैसला वैष्णववीर । भजन करीत प्रेमादरें । विश्वीं भरला रुक्मिणीवर । त्याजविण दुसरें आन
नाहीं ॥ ३० ॥ तों एक दुर्बळ ब्राह्मणी येऊनि तेथें । तुकयासी काकुळती येत । एक वस्त्र देशील मातें । तरी पुण्य अगणित होईल
कीं ॥ ३१ ॥ ब्राह्मण संसार कठीण फार । दुसरें पडदणीसि नाहीं वस्त्र । जुनें पानें असलें जर । तरी द्यावें सत्वर मज आतां ॥३२॥
ऐसें बोलतां ते ब्राह्मणी । दया उपजली तुकयाचें मनीं । खुणें दाखवी तिज लागुनी । वस्त्र घेउनि जा ह्मणे ॥ ३३ ॥ अवली परसांत
स्नान करी । वस्त्र ठेविलें भिंतीवरी । ब्राह्मणी येऊनि ते अवसरीं । ओढोनि सत्वरी तें नेलें ॥ ३४ ॥ ब्राह्मणी संतोषली चित्तीं । ह्मणे
सत्वशील याची वृत्ती । आशीर्वाद देतसे प्रीती । म्हणे रुक्मिणीपती तुज पावो ॥ ३५ ॥ तुका खुणावीत लवलाहें । बोलूं नको
सत्वर जाय । ऐसीं सांगोनियां सोय । आपणही जाय सत्वर ॥ ३६ ॥ मग बैसोनि इंद्रायणीचे तीरीं । भजन करीत सप्रेम गजरी ।
इकडे मंदिरीं कैसी वर्तली परी । ते सादर चतुरीं परिसिजे ॥ ३७ ॥ स्नान करोनि जिजावायी । वस्त्र पाहतसे ते समयीं । तों ठेविल्या
जागीं दिसत नाहीं । विस्मित जीवी ते होय ॥ ३८ ॥ म्हणे माझें कर्म विपरीत । पुढें ओढवलें बळवंत । वस्त्र नेलें देखत देखत ।
कल्पना मनांत आणितसे ॥ ३९ ॥ बुवायी दासी नाहीं घरीं । शेणी आणावयासि गेली दुरी । गंगा तान्ही खेळे बाहेरी । विस्मित
अंतरीं होतसे ॥ ४० ॥ महादेव स्नानासि गेला जाण । सवें विठोबासि घेऊन । वडिलांचें लक्षण धरिलें त्यानें । वाढ वेळ
जाऊन बैसला ॥ ४१ ॥ कोब्याचें कोठीन होय निश्चिती । पांच डाग तरी आंगीं दिसती । म्हणोनि खाण तैसी माती ।
आहाणा बोलती जनांत ॥ ४२ ॥ काशी भागीरथी शाहण्या दोन्ही । सासुऱ्या गेल्या जैंपासुनी । घरीं रक्षण नसेचि कोणी ।
देतसे उचलोनि भलत्यासी ॥ ४३ ॥ दादुला बैसला होता सदनीं । वस्त्र मागत होती ब्राह्मणी । तिचा आहांच शब्दध्वनी । म्यांही श्रवणीं
ऐकिला ॥ ४४ ॥ पिशानें चव सांडिली बरी । धडाचि घातलें कांब्यावरी । एकचि वस्त्र होतें घरीं । तें देऊनि त्वरीत पळाला ॥ ४५ ॥
मेला काळतोंडा साजणी । यास्तव गेला चुकवोनि । जैसा वृश्चिकें[1] अन्याय करोनि । बैसे लपोनि आड कोठें ॥ ४६ ॥ येऱ्हवीं बाहेर

१ विंचू.

जातांचि देखा । काळ्याच्या नांवें मारितो हांबरा । यास्तव आज राहिला मुका । अन्याय निका आठवोनि ॥ ४७ ॥ चोरटा खाणोरी साचार । पाठीं बसोनि साधिलें वैर । पती नोहे हा दावेदार । पूर्वील जन्मांतर साधिलें ॥ ४८ ॥ कैंची रांड आली ब्राह्मणी । वस्त्र दीधलें तिज लागोनि । मजसी न बोलतां गेला रानीं । चुकवोनी बैसला ॥ ४९ ॥ माझ्या पित्या आपाजीनें । वस्त्र घेतलें होतें जाण । याच्या जोडीचें कधीं अन्न । खादलेंचि नेणें सर्वथा ॥ ५० ॥ कंठीं बांधोनि काळे मणी । फुकटचि मेला जाहला धणी । ठाउकी आहे त्याची करणी । दिवाळें काढोनि बैसला ॥ ५१ ॥ अन्न अन्न करितां देख । दुष्काळीं बाईल मेली एक । त्याची लाज न धरी विवेक । जनासि मुख दाखवितो ॥ ५२ ॥ रखुमाईच्या सुकृत होतें पदरीं । गेली माझ्या अगोदरी । माझी विपत्ति होणार भारी । यास्तव संसारीं वांचलें ॥ ५३ ॥ आतां घरांत जावें देख । तरी समोर वागती गांवींचें लोक । उपाय कांहीं न सुचे आणिक । करीतसे शोक यासाठीं ॥ ५४ ॥ तों शरीरसंबंधी आणि व्याही । मिळोनि लग्नासि जाती पाहीं । ते बोलावावयासि आले सर्वही । म्हणती जिजायी बाहेर या ॥ ५५ ॥ ऐसें बोलोनियां वचन । घरांत प्रवेशले अवघे जन । अवली शिळेवरी बैसली नग्न । लज्जित मन होऊनियां ॥ ५६ ॥ म्हणे आतां दावेदार असता घरीं । तरीच डकणा मारितें मुखावरी । काय करावें ये अवसरीं । उपाय अंतरीं सुचेना ॥ ५७ ॥ पिशुन सन्निध पातले त्वरित । तेणें भयाग्नि पेटत । शोक स्नेह त्यावरी पडत । धडकला बहुत त्याचेनी ॥ ५८ ॥ प्रीतीच्या इंधनें प्रदीप्त जाहला । मोहाच्या वातें खवळला । लज्जेच्या आंगीं लागती ज्वाळा । चित्तीं व्याकुळ होतसे ॥ ५९ ॥ त्रितापें अग्नि जाळितसे पाहीं । अवली म्हणे मी करूं कायी । तों सत्वर धांवोनि विठाबायी । कौतुक कायी तें केलें ॥ ६० ॥ मागें प्रावरणाचा पीतांबर । सत्वर टाकिला तिजवर । लज्जा रक्षी रुक्मिणीवर । करुणाकर दासाचा ॥ ६१ ॥ मजला भासे ऐशारीतीं । त्रितापें अवली जळत होती । तिजवरी मेघ रुक्मिणीपती । सत्वर गती वोळला ॥ ६२ ॥ दिव्य वस्त्र देखोनि नयनीं । विस्मित जाहली आपुलें मनीं । म्हणे हे काळ्याची दिसते करणी । त्याजवीण कोणी करीना ॥ ६३ ॥ दाखवितो नाना चमत्कार । तरी मज काय त्याचा उपकार । वेडा केला निजभ्रतार । म्हणोनि वारंवार सांभाळी ॥ ६४ ॥ दिव्य वस्त्र सत्वर नेसून । घरांत गेली नलगतां क्षण । मंदिरीं प्रकाश पडे तेणें । आश्चर्य पिशुन ते करिती ॥ ६५ ॥ म्हणती महावस्त्रें देखिली फार । परी ऐसें पाहिलें नाहीं अंबरें[1] । तुकयानें बुडवोनि कोणाचें घर । कांतेसि पीतांबर घेतला ॥ ६६ ॥ घरांत घरकूल करोनि देखा । बाहेर आवावें दाखवी लोकां । आतां बकध्यान धरिलें देखा । दिसतो तुका वैरागी ॥ ६७ ॥ पीतांबराची पाहतां दीप्ती[2] । तेणें आमुचे नेत्र झांकती । परिमळ न समाये मंदिराप्रती । विस्मित चित्तीं ते झाले ॥ ६८ ॥ एक म्हणती पेटारीत । हें वस्त्र आजवरी ठेविलें गुप्त । आतां नेसावया काढी त्वरित । न कळेचि अंत तुकयाचा ॥ ६९ ॥ ऐसें बोलोनि

---

१ वस्त्र. २ तेज.

येरयेरां । जिजायीस म्हणती त्या अवसरा । तुमचा वृत्तांत आहे कीं बरा । लग्नासि त्वरा चलावें ॥ ७० ॥ अवली म्हणतसे ते समयीं । आमुचा वृत्तांत विदित नाहीं । संसार आशा टाकूनि सर्वही । भ्रतार विदेही जाहला कीं ॥ ७१ ॥ ऐसें सांगतां जिजावायी । पिशुन म्हणती ते समयीं । लग्नासि याल किंवा नाहीं । हें लवलाहीं सांगावें ॥ ७२ ॥ जाणोनि दुर्बल संसार । म्हणती हे कोठोनि आणील अहेर । आशाबद्ध पिशुन सर्वत्र । वरिवरी आदर करिताती ॥७३॥ जैसी अभ्रच्छाया अशाश्वत । क्षण लोटतां नाहीच होत । कीं उष्णता लागतां किंचित । पतंगी उडत रंग जैसा ॥ ७४ ॥ नातरी बकाचें ध्यान निश्चित । एकनिष्ठ दुरोनि दिसत । कीं नटाची जाया सुंदर होत । तिजसी एकांत करूं नये ॥ ७५ ॥ कीं पुंगळ वेलीचें सुमन । नेत्रासि साजिरे दुरून । नाकासि लावितां दुर्गंधि घाण । कंटाळे मन ज्यारीती ॥७६॥ नातरी मुलाम्याची मोहर । आंत अवघेचि भरलें ताम्र । तैसा पिशुनाचा आदर । वरिच्यावर जाणावा ॥ ७७ ॥ परम अनास्था जाणोनि चित्तीं । अवली तयांसि उत्तर देती । अनुकूल पडलें संसार हातीं । तरी मानून निश्चिती येईन मी ॥७८॥ टाकणें टाकूनि ऐशापरी । पिशून गेलें ते अवसरीं । पुढें चरित्र वर्तले ते परी । सादर चतुरी परिसिजे ॥७९॥ ब्राह्मणांसि चोरोनि दीधलें वस्त्र । अवली बोले दुरुत्तर । यास्तव तुका वैष्णववीर । गेला सत्वर वनांत ॥८०॥ बैसोनियां सहज स्थिती । ध्यानांत आणुनि पांडुरंग मूर्ती । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । माझी विनंती अवधारीं ॥ ८१ ॥ सकळ दुरितांचा करोनि मेळा । त्याचा निर्माण जाहलों पुतळा । पतित पावना दीनदयाळा । निवेदन तुजला असों दे ॥ ८२ ॥ मी सकळ पातकांची राशी । परी सेवा चोर पायांपासीं । परी मानखंडणा होईल जैसी । तो दंड मजसी करीं देवा ॥ ८३ ॥ मी तुमचा म्हणवितों वरवर । धूळ माती केला संसार । परी तुका दोहींकडे चोर । जाणसी अंतर विठोबा ॥ ८४ ॥ ऐसा अनुताप धरोनि चित्तीं । भजन करीत प्रेमगती । मग चार घटिका लोटतां राती । देउळाप्रती येतसे ॥८५॥ हातीं दगडाचा घेऊनि टाळ । सप्रेम नाचे तये वेळ । सन्निध घर होतें जवळ । अवली सकळे म्हणे आला ॥ ८६ ॥ देवें नेसविला पीतांबर । यास्तव राग केला दूर । मग लेंकीहातीं भाजी भाकर । तुकयासि सत्वर पाठविली ॥ ८७ ॥ तो स्वल्प आहार सेवोनि प्रीतीं । कीर्तनीं उभा सप्रेम युक्ती । कोणी भाविक लोक येती । गाती ऐकती हरिकथा ॥ ८८ ॥ दोन प्रहरपर्यंत जाण । तुकयानें देउळीं केलें कीर्तन । तोंपर्यंत होते जन । मग गेले उठोन घरासी ॥ ८९ ॥ परी तुका न निजे निश्चितीं । देउळीं बैसला एकांतीं । संतवाक्य म्हणतसे प्रीतीं । पाठांतर असती अभंग जे ॥ ९० ॥ दिवसां सेवितसे वनांतर । रात्रीं कीर्तन दोन प्रहर । डुकली येतसे वारंवार । परी चोळोनि नेत्र उघडीतसे ॥ ९१ ॥ साधक टाकूनि अहंकार । पावले आत्म साक्षात्कार । परी देह स्वभावासि न पडे अंतर । मागिल्या भरें चालतसे ॥ ९२ ॥ जैसा कापूर जळालियावरी । मागें सुगंध राहे क्षणभरी । तैसी देह अहंता गेल्यावरी । इंद्रियें व्यापारीं राहाटती ॥ ९३ ॥ नातरी चक्र भवंडीत

कुंभार । तो दंड काढोनि घेतल्या सत्वर । परी मागील आंगीं असतां वारें । तें चक्र फिरे गरगरां ॥ ९४ ॥ कींवा हदुळी राहिल्या साचार । परी क्षणभरी डोलती तरुवर । मेघ वोसरल्या दिवस चार । बोल थोर त्या मागें ॥ ९५ ॥ वासरमणीं मावळल्या पाहे । चार घटिका प्रकाश राहे । तो एकाएकींच जाईल काय । देहस्वभाव तयाचा ॥ ९६ ॥ म्हणवोनि तुकयासि साचार । निद्रा येतसे वारंवार । तीस जिंतावया सत्वर । वैष्णव वीर काय करी ॥ ९७ ॥ शेंडीसी वांधोनियां दोरी । आपुल्या हातें टांगी वरी । म्हणे मानेसि आसडा बैसल्यावरी । मग निद्रा दुरी पळेल हे ॥ ९८ ॥ चार दिवस करितां ऐसें । निद्रा जिंतिली निःशेषें । सर्वथा चित्तीं नये आळस । केलें तयास देशधडी ॥ ९९ ॥ न ऐकावें तें नायकती कान । न पहावें तें न देखती नयन । न बोलावें तें जिव्हेसि ज्ञान । स्वभाव गुण तुकयाचे ॥ १०० ॥ शाश्वतीं स्थिर नव्हेचि मन । हातासि न मिळे विष्णुअर्चन । परोपकारीं धांवती चरण । अगणित पुण्य म्हणोनियां ॥ १ ॥ परोपकारीं जो कां नर । शुद्ध असेल जन्मांतर । तरी पुढें अरोग होय शरीर । ते नाना उपचार भोगिती ॥ २ ॥ तुकयाची तो निष्काम वृत्ती । प्राप्त व्हावया रुक्मिणीपती । परोपकारीं वेंचितसे शक्ती । कैशा रीतीं तें ऐका ॥ ३ ॥ कोणी पांथस्थ वाटेवरी । अकस्मात गांठ पडली जरी । त्याचें ओझें घेऊनि शिरीं । विसांवा क्षणभरी त्यास द्यावा ॥ ४ ॥ पर्जन्य मार्गीं लागतां सबळ । पांथस्थ गांवांत पाहती स्थळ । तयांसि दाखवी चावडी देऊळ । नातरीं तत्काळ ने घरां ॥ ५ ॥ पंथ क्रमितांचि लवलाहें । यात्रेकऱ्याचे सुजले पाय । मग उष्ण पाणी करोनि पाहे । रगडित देह निजांगें ॥ ६ ॥ गायी वृषभांसि निर्बळपणी । मोकलोनि देती निर्दय धनी । तयांसि हातें कुरवाळोनि । चारा-पाणी घालीतसे ॥ ७ ॥ मैदा साकर आणि घृत । एके जागीं करोनि ठेवित । मुंगियांच्या घांवीं घालित । ईश्वर प्रीत्यर्थ नित्यकाळीं ॥ ८ ॥ अणुरेणु पर्यंत जाणा । भूतमात्रीं धरितसे करुणा । हिंसा घडे तें कर्म जाणा । सहसाही मना नावडे ॥ ९ ॥ परी चातां हालतां दिसे जवळी । ते रगडेल अवचित पापातळीं । यास्तव जीव कळवळी । जैसी मासोळी उदकावीण ॥ १० ॥ उष्णकाळीं झालिया उवारा । कीर्तनामाजी घालितसे वारा । अन्न न मिळतां क्षुधातुरा । प्रयत्ने मेळवुन दे त्यासी ॥ ११ ॥ उष्णकाळीं जीवन वाटेवर । नसतां उपाय करितसे थोर । घागर भरोनि सत्वर । मार्गावर नें तेथें ॥ १२ ॥ वाचा तप हेंचि थोर । असत्य न बोले सर्वथा उत्तर । परोपकारीं वेंची शरीर । आळस अणुमात्र असेना ॥ १३ ॥ पांथस्थासि व्याधी मार्गी होत । जवळीं नसतां सुहृद आप्त । तयासि राहवोनि देऊळांत । औषध पथ्य करवीतसे ॥ १४ ॥ जडभरत वर्णिला भागवतीं । तैसी तुकयाची जाहली स्थिती । संसारिक काबाड काम सांगती । तें सत्वरगती करीतसे ॥ १५ ॥ ममता लोभ सांडोनि त्वरित । सांगील तें सत्वर करित । एक इंद्रायणीच्या तटांत । भजन करित बैसला ॥ १६ ॥ तों नवलाख्याच्या उंचवाऱ्यांत । बाजारा व्यवसायी जात होते । तें विनोदें म्हणती तुकयातें ।

आम्हां सांगातें चाल आतां ॥ १७ ॥ अवश्य म्हणवोनि भक्तवैष्णव । सत्वर जातसे तयांसवें । भजन करीत सप्रेमभावें । उगें नसावें
क्षणभरी ॥ १८ ॥ तों एक दुर्बळ म्हातारी ब्राह्मणीन । शरीर जाहलें भक्तिहीन । बाजारासि जातसे जाण । काठी टेंकून हळूहळू
॥ १९ ॥ तें तुकयानें देखोनि दृष्टीसी । दया उपजली चित्तासी । म्हणे माते तूं बहु श्रमलीसी । तरी माझे पाठीसी बैस आतां
॥ १२० ॥ ऐकोनि तुकयाची वाणी । काय म्हणतसे ब्राह्मणी । माझें तेल देशील आणुनी । तरी परतोनि मी जातें ॥ २१ ॥ अवश्य
म्हणतां प्रेमळभक्त । संतोषलें तिचें चित्त । तुकया स्वाधीन पैसे करीत । पात्रही देत बरोबरी ॥ २२ ॥ म्हातारी परतोनि गेली घरां ।
सुख जाहलें तिच्या अंतरा । तुका जातसे बाजारा । परोपकारा कारणें ॥२३॥ तेथें व्यवसायी काम सांगती । तें करूं लागे तयांप्रती ।
आणि भजन करी सप्रेम युक्ती । सात्विक युक्ती बाणली ॥ २४ ॥ तेल घेऊनि दुसरें दिवसीं । आणूनि दीधलें ब्राह्मणीसी । ते म्हणे
उपकार फेडावयासी । कांहींच मजपासीं असेना ॥ २५ ॥ कांहीं दिवस लोटतां जाण । मग ते स्वमुखें सांगे जना । एक नवल वाटतें
माझ्या मना । सांगावें कोणा निज मुखें ॥ २६ ॥ आठ दिवसांचें तेल निश्चित । तुकया हातें आणविलें होतें । परी तें गेलें दिवस
बहुत । नवल वाटतें मजलागीं ॥२७॥ ऐसे बोलतां ते ब्राह्मणी । मात फांकली कानोकानीं । म्हणे तुका तेल देतो आणुनी । तें बहुत
दिवस जातसे ॥ २८ ॥ एक म्हणती सदैव खरा । घरीं खावया न मिळे पोरां । अन्नावीण मेली दारा । परी त्याच्या अंतर लाज नाहीं
॥ २९ ॥ कोणी चमत्कार पाहती । तुकया हातीं तेल आणविती । तें बहुत दिवस गेलें म्हणती । आश्चर्य चित्तीं वाटलें त्यां ॥१३१॥
आशाबद्ध जन त्या अवसरा । म्हणती तुकशेट जाउनि बाजारा । तेल आणोनि द्यावें घरा । तुमचा उपकारा न विसरों ॥ ३१ ॥ बरें
मायबाप बोले उत्तर । नळे आणूनि दीधले फार । गळ्यांत पिशवी बांधिला दोर । त्यांत पैसे सर्वत्र टाकिती ॥३२॥ मार्गावरील गांव
कोणी । वृत्तांत कळतां त्यालागुनी । पात्र पैसे देती आणोनि । परी तूकयासि मनीं संतोष ॥३३॥ कांहीं नळे घेतले हातीं । कोणी गळ्यांत
आडकाविती । परी तुकयासि उबग नये चित्तीं । विदेह स्थिती जाहला ॥ ३४ ॥ मग बाजारीं सत्वर जाऊन । तेलियाचे पाहिलें दुकान ।
नळे पैसे त्याच्या स्वाधीन । करीत संपूर्ण तेधवां ॥ ३५ ॥ तेली पुसे तुकयाप्रती । कोणते पात्रीं घालूं किती । तुका म्हणे हें न कळे
मजप्रती । कळेल युक्ती ते करीं ॥ ३६ ॥ ऐसें तयासि वचन बोलत । तों आणिक व्यवसायी हांक मारित । तुक्या पालें देऊं लाग
त्वरित । उशीर बहुत जाहला ॥ ३७ ॥ परम हरिखें[1] ते अवसरीं । त्यांची ओझीं वाहतसे शिरीं । हातीं खडे झाडितसे सत्वरी । पालें
बाजारीं देऊं लागे ॥ ३८ ॥ जो जें जैसें काम सांगत । तितुकें करी वैष्णवभक्त । चारा-पाणी आणोनि देत । पाठाळें बांधित निजांगें
॥३९॥ भूतमात्रीं पाहूनि देवा । अश्वाचीही करीत सेवा । तुका आवडे सर्वत्र जीवा । कोणासि न व्हावा हें नाहीं ॥ १४० ॥ रात्रि

1 आनंदाने.

समय होतांचि जाण । देउ॒ळांत जाऊनि करी कीर्तन । भाविक सप्रेम करीत श्रवण । अनुताप मना होय त्यांच्या ॥ ४१ ॥ प्रातःकाळ होतांचि देखा । तों व्यवसायी मारिती हांका । तयांचा शब्द ऐकोनि निका । येतसे तुका धांवोनि ॥ ४२ ॥ सप्रेम नामस्मरण करीत । ऐको जातसे गांवांत । म्हणे हरिस्मरणावांचून सत्य । संसार व्यर्थ दवडूं नका ॥४३॥ ओझी बांधोनि सत्वरगती । उचलूं लागे सकळांप्रती । काम सांगता नानारीती । उबग चित्तीं मानीना ॥ ४४ ॥ मग तेलियापासीं जातां सत्वर । तो म्हणे स्नेह घातलें बरोबर । आवश्य म्हणे वैष्णववीर । घेऊनि सत्वर चालिला ॥४५॥ मार्गींचे लोक जपत बैसती । आपुलाली पात्रें ओळखूनि नेती । परी कौतुक करितसे रुक्मिणीपती । ते सादर श्रोतीं परिसावें ॥ ४६ ॥ नळ्यांत तेल घातले समान । हें तुका सर्वथा वाटूं नेणे । परी जितुकें ज्याचें द्रव्यजाण । त्याच्या धारणें त्यासि दिसे ॥ ४७ ॥ जैसे अनंत प्राणी येथें मरती । त्या देहांची एकवट होय माती । परी पुढिले जन्मी नानारीतीं । संचितें निवडती वेगळाली ॥ ४८ ॥ त्या पृथ्वी ऐसीच समता पाहीं । बाणली तुकयाचे ठायी । अधिक उणेंचि न दिसे कांहीं । परी शेषशायी निवडित ॥ ४९ ॥ संताचा तों समान भाव । सारिता तयासि रंगराव । परी प्रारब्ध नेमूनि देवाधिदेव । दरिद्र वैभव भोगवी ॥ १५० ॥ आतां असो वैष्णवभक्त । प्रवेशतां देहू गांवांत । मग राउळासि जाऊनि त्वरित घाली दंडवत सद्भावे ॥ ५१ ॥ सांवळा श्रीरंग पाहोनि नयनीं । परमानंद वाटे मनीं । जैसी तान्हयासि भेटतां जननी । उल्हास मनीं तियेच्या ॥ ५२ ॥ मग लोक येऊनि सत्वरगती । आपुलाले नळे ओळखोनि नेती । ते अवलीने देखोनि निश्चिती । अपशब्द काय तेव्हां ॥ ५३ ॥ म्हणे हे मेले लोक दुर्मती । वेडा जाहलासे माझा पती । त्या पिशाचा हातीं कोलित देती । काम सांगती आपुलें ॥ ५४ ॥ एका वृषभाचें[2] ओझें निश्चिती । मनुष्या हातीं हे आणविती । मरोनि गेलिया माझा पती । संतोष पावती मग तेव्हां ॥५५॥ अवली भांडतां ऐशारीतीं । कोणी तिजला उत्तर देती । लोकांचें न ऐकतां तुझा पती । तरी ते सांगती कासया ॥ ५६ ॥ ज्याचा कां सद्गुण विशेष । तेणेंचि बंधन होतसे त्यास । वनगायीचें पुच्छ शुभ्र दिसे । यास्तव तयास तोडिती ॥ ५७ ॥ रावा शिकविलिया नायके मात । तरी पिंजरियांत बंधन कासया होतें । ज्याचा सद्गुण त्यास बाधित । समज चित्तांत आपुल्या ॥ ५८ ॥ दर्वेशानें सांगतां साचार । सलाम लोकांसि करी वानर । यास्तव बंधन पावोनि थोर । घरोघरीं हिंडविती ॥५९॥ म्हणोनि ऐके जिजाबायी । तुझा भ्रतार जाहला विदेही । सांगीतलें ऐके लवलाही । तरी लोकासि कायी बोल आतां ॥ १६० ॥ याच्या हातें पुरतें तेल साचार । हा बहुतांसि आला चमत्कार । म्हणवूनि नळे देऊनि फार । तेल वारंवार आणविती ॥ ३१ ॥ तुका विदेही दिसतो वेडा । आणि आम्हांसि बोल कां येवढा । आपुला असतां दाम कुडा । मग पराव्यासि झगडा कासया ॥ ६२ ॥ ऐसी ऐकोनियां दृष्टांत मात । अवली राहिली मग

१ देवळांत. २ बैलाचें.


निवांत । म्हणे खोटें आहे माझें संचित । जाहली जनांत फजीती ॥ ६३ ॥ तुकयाची तों ऐसी स्थिती । स्त्रीजात मानी प्रकृती । पुरुष ते पांडुरंग भासती । करुणा मूर्ती यास्तव ॥ ६४ ॥ प्रातःकाळीं उठोनि जाण । ब्राह्मणांचे घरीं वाहे जीवनें[1] । आंगण ओसरी झाडून । सडासंमार्जन घालितसे ॥ ६५ ॥ हिंसक पक्षी धरिती फार । तुकयाचे दृष्टीसि पडले जर । तयांसि बोलोनि नम्र उत्तर । नाना प्रकारें सोडवी ॥ ६६ ॥ साधु संतांचा विक्रित दास । पायवणी प्रीतीनें घेत असे । त्यांच्या उच्छिष्टा पुढें दिसे । ब्रह्मरस उणाची ॥ ६७ ॥ श्रीभागवतामाजी जाण । बोलिलीं भक्तांचीं लक्षणें । तुकयाचे आंगीं तितुकीं चिन्हें । एकही उणें असेना ॥ ६८ ॥ अवली तों अविद्या साचार । तुका तिजपासूनि जाहला दूर । म्हणवोनि भांडे दिवसरात्र । कठिणोत्तरें बोलोनियां ॥६९॥ एके दिवशीं जिजाबायी निश्चित । तुकयाप्रती काय बोलत । आजि तुझ्या वडिलांची पुण्यतीथ । साहित्य किंचित असेना ॥ १७० ॥ ऐकोनि म्हणे वैष्णववीर । मी रानांत जावोनि सत्वर । भाजी आणोनि देतों फार । ते शिजवोनि पितर जेववी ॥ ७१ ॥ ऐसें म्हणोनि प्रेमळ तुका । विठ्ठलनामें मारितसे हांका । मग रानांत जाऊनियां देखा । वैकुंठनायका आठवी ॥७२॥ ध्यानांत आणोनि पांडुरंगमूर्ति । लाविलीं दोन्ही नेत्रपातीं । प्रेमभरित होऊनि चित्तीं । करुणा एकांतीं भाकीतसे ॥ ७३ ॥ म्हणे जयजयाजी रुक्मिणीवरा । भक्तवत्सला कृपासागरा । पतितपावना दीनोद्धारा । करुणाकरा श्रीविठ्ठला ॥ ७४ ॥ काया वाचा मनें निश्चित । मी तुझा जाहलों शरणागत । तूंचि माझा जिवलग आप्त । नाना घात चुकविती ॥ ७५ ॥ संसाराची भरोवरी । मागें केली बहुतापरी । तो अधिकचि दुःखांचियापरीं । नाना प्रकारीं देखिल्या ॥ ७६ ॥ नाशवंताची सांडोनि आस्था । तुज शरण मी रुक्मिणीकांता । सर्व भार तुझिया माथा । करिशील आतां तें करी ॥ ७७ ॥ ऐसें म्हणोनि ते वेळ । पुढें चालिला भक्त प्रेमळ । तों गहूं पिकला असे प्रबळ । मजूर सकळ संवंगिती ॥ ७८ ॥ ते तुकयासी विनोदें म्हणती पाहीं । गहूं उपडी कां लवलाहीं । ऐसें ऐकोनि ते समयीं । अवश्य विदेही म्हणतसे ॥ ७९ ॥ मजुरांच्या बरोबरी । आपण पाथ धरिली दुसरी । सप्रेम नामाचिया गजरीं । तुक्या करी संवंगणी ॥ १८० ॥ वरकड कामा करिती कुचर । परी त्यांजपुढें जात वैष्णववीर । तुकयाचें शुद्ध अंतर । अंग अणुमात्र न राखी ॥ ८१ ॥ परी भाजी आणावयासि आलों वनीं । घरीं वाट पाहील राणी । हा आठव तुकया लागोनी । सर्वथा मनीं न होय ॥ ८२ ॥ नामरूपीं जडलें चित्त । म्हणोनि जाहली विदेहि स्थित । प्रेमाचें भोजन नित्य करित । धष्टपुष्ट दिसतसे ॥ ८३ ॥ असो इकडे ते अवसरीं । कांता शिव्या देतसे घरीं । म्हणे मेला चोरटा खाणोरी । गेला बाहेरीं उठोनियां ॥ ८४ ॥ मी कोणाची बाईल होऊन । घरीं पुरवूं वस्त्र अन्न । घरीं पितर सांगितले जाण । आपण तों वन हिंडतसे ॥ ८५ ॥ लोकांचे कष्ट करायासी । बहुत बळ येतसे त्यासी । परी ऋणानुबंध नाहीं मजसी । आतां संसारासि काय करूं ॥ ८६ ॥ ऐशी

1 पाणी.

तुकयाची कांता । आपुले घरीं करितसे चिंता । करुणा आली पंढरीनाथा । म्हणे साहित्य आतां करावें ॥ ८७ ॥ निज भक्ताचें पडतां उणें । तरीं तें आपुल्यासि अश्लाध्य बाणें । दासांचे दासत्व लागे करणें । जें अनन्य भावें अनुसरले ॥ ८८ ॥ ऐसें म्हणोनियां चित्तीं । तुकयाचें रूप धरी श्रीपती । सामग्रीची मोट मस्तकावरती । सदना प्रती येतसे ॥ ८९ ॥ जें योगियांचें निज ध्यान । नीलग्रीवाचें देवतार्चन । तो निज भक्ताचें पडतां उणें । नाठवी थोरपणा सर्वथा ॥ १९० ॥ जों कां क्षीरसागर विहारी । लक्ष्मी ज्याचे चरण चुरी । तो सामग्रीची मोट शिरावरी । घेत श्रीहरी निजांगें ॥ ९१ ॥ ब्रह्मादिक महर्षि थोर । जयासि ध्याती दिवस रात्र । तो भक्त कैवारी राजीवनेत्र । थोरपणे अणुमात्र धरीना ॥ ९२ ॥ अष्टसिद्धि सहित देखा । इंदिरा ज्याची आज्ञाधारका । तो निजांगें कष्ट करी अनेक । वैकुंठनायक जगद्गुरू ॥ ९३ ॥ मोट उतरोनि ते अवसरीं । अवलीस म्हणतसे श्रीहरी । सामग्री काढोनि घे सत्वरी । स्वयंपाक करीं निजहस्तें ॥ ९४ ॥ आम्ही बाहेर जाऊनि सत्वर । भांडी मेळवोनि आणितों चार । ऐसें म्हणवोनि सारंगधर । उठतसे सत्वर तेधवां ॥ ९५ ॥ जिजाबाई बाहेर येत । मोट सोडोनि जंव पाहत । तों सर्व सामग्री आहे त्यांत । नवल वाटत तिजलागीं ॥ ९६ ॥ कणीक डाळ घृत तांदुळ । शर्करा शाखा आणि गूळ । जिरें सुंठ मिरें सकळ । देखे तत्काळ दृष्टीनें ॥ ९७ ॥ साहित्य घेऊनि ते समयीं । स्वयंपाकासि निघे जिजाबायी । तों भांडी मेळवोनि लवलाहीं । शेषशायी पातले ॥ ९८ ॥ मग गांवांत जावोनि घरोघर । आमंत्रण देत सारंगधर । आमुच्या घरीं आहेत पितर । यावें सत्वर भोजना ॥ ९९ ॥ ऐसें बोलतां जगज्जीवन । लोक आश्चर्य करिती जाण । म्हणती आज तुकयानें । घातलें मन संसारीं ॥ २०० ॥ एक म्हणती शाश्वत कायी । घरीं साहित्य किंचित नाहीं । तुका अविचारी विदेही । गांव सर्वही सांगितला ॥ असो यापरी त्रिविधजन । नानापरी बोलती वचन । म्हणती लटक्याचें आमंत्रण । जेविल्यावांचोन साच नाहीं ॥ २ ॥ तों दिवस आला दोन प्रहर । पाकनिष्पत्ति जाहली सत्वर । देवें हिंडोनि घरोघर । भोजनासि सर्वत्र पाचारिलें ॥ ३ ॥ इंद्रायणी तीरीं जावोंन । सर्व आले करोनि स्नान । देवें तयांसि देवोनि आसन । निजांगें पूजन करितसे ॥ ४ ॥ सर्व धर्म टाकोनि निश्चित । जे भक्त अनन्य शरण येत । त्यांची सत्कर्मे पूर्ण करित । रुक्मिणीकांत कृपाळू ॥ ५ ॥ पादपूजा बुका गंध तुळशी । निजांगें करीत हृषीकेशी । जिजाई वाढी तयांसी । उल्हास मानसीं धरूनियां ॥ ६ ॥ जे जे पदार्थ केले सर्वही । ते ते पात्रीं वाढिले लवलाहीं । घृत वाढोनि शेषशायी । संकल्प पाहीं सोडित ॥ ७ ॥ साहित्य करितां लक्ष्मीवर । तें अन्न लागे रुचिकर । लोक जेविती पोटभर । धावया नीर ठाव नाहीं ॥ ९ ॥ लीलानाटकी जगदुद्धार । प्रार्थना करीत वारंवार । जें जया रुचे तें सत्वर । अन्न ग्राह्य करावें ॥ ९ ॥ करशुद्धि घेताचि त्याणीं । विडे दीधले

त्रयोदश गुणी । लोक आश्चर्य करोनि मनीं । अवली लागूनी बोलती ॥ २१० ॥ म्हणती जिजाबाई आजपासुन । संसार चिंता न करणें । तुकयानें प्रपंचांत मन । घातलें दिसोन येतसे ॥ ११ ॥ ऐसें ऐकोनि ते समयीं । अवली म्हणे भरंवसा नाहीं । लोक घरासि गेले सर्वही । संतोष जीवीं मानोनियां ॥ १२ ॥ आणीक अन्नार्थी लोक बहुत । महारपोरें मागावयासि येत । तयांसि अन्नें काढिलीं बहुत । रुक्मिणीकांतें तेधवां ॥ १३ ॥ अवली म्हणे चित्तांत । अन्नासि बरकत आला बहुत । मग भांडीं गोळा करूनि समस्त । रुक्मिणीकांत काय म्हणे ॥ १४ ॥ पात्रें आणिलीं मागून । ती ज्यांची त्यास देतों नेऊन । मग निश्चितपणें करूं भोजन । उतावेळ मन न व्हावें ॥ १५ ॥ इंद्रायणीच्या जळांत । पात्रें प्रक्षाळूनि समस्त । ज्यांचीं त्यांस नेऊनि देत । अदृश्य होत जगदात्मा ॥ १६ ॥ इकडे तुका वैष्णववीर । निजांगें गहू उपडला फार । शेतकरीयाणें कृत उपकार । पेंढ्या चार दीधल्या ॥ १७ ॥ त्या घेऊनि मस्तकावरी । परतोनि येतसे घरी । तों मोहाळासि कुसळ लागतांवरी । त्या माशा सत्वरी ऊठल्या ॥ १८ ॥ शरीरीं झोंबल्या समस्त । परी तुका न उडवी कोणातें । म्हणे हा देह नाशवंत । परोपकारार्थ वेचावा ॥ १९ ॥ कीं आजि वडिलांची पुण्यतीथ । ते मक्षिकारूपें आले समस्त । म्हणवोनि वैष्णवभक्त । ब्रह्मार्पण सोडित देहाचें ॥२२०॥ ऐसा देखोनि निश्चय अंतरीं । तेथें गुप्तरूपें पातले श्रीहरी । माशा उडवोनि वरच्यावरी । सौख्य शरीरीं दीधलें॥२१॥ मग घरासि येऊनि प्रेमळभक्त । कांतेप्रती काय बोलत । याचा सांजा भरडोनि त्वरित । भोजन पितराते घाली कां ॥ २२ ॥ अवली तुकयासि बोलताहे । म्हणे वेड लागले काय । तुम्हींच करविले सकळ ठाय । मग स्वयंपाक लवलाहें दाखविला ॥ २३ ॥ सांगितलें आद्यंत वर्तमान । ऐकोनि तुकया विस्मित मन । अश्रुपातें भरले नयन । म्हणे जगज्जीवन कष्टविला ॥ २४ ॥ कंठ सद्गदित होऊनि पाहीं । म्हणे कृपावंत विठाबायी । जरी तूं न येशील ये समयीं । तरी मी न जेवीं सर्वथा ॥ २५ ॥ तुकयाची करुणा ऐकोनि सत्वरीं । तत्काळ आले पीतांबरधारी । दिव्य कुंडलें मकराकारी । शंख चक्र करीं मंडित ॥ २६ ॥ ऐसें रूप देखोनि पाहे । मग तुकयाने धरिले पाय । जिजाई पात्रीं वाढोनि ठाय । आणीत लवलाहें ते समयीं ॥ २७ ॥ मग शब्दाच्या उपचारें निश्चिती । तुकयानें पूजिला रुक्मिणीपती । देव आणि भक्त निजप्रीती । एके पंक्तीं जेविले ॥ २८ ॥ भावाच्या उपचारें जाण । तृप्त जाहला रुक्मिणीरमण । देव पावले अंतर्धान । विस्मित मन जिजाईचें ॥ २९ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ सुंदर । हाचि मानससरोवर । नाना चरित्रें साचार । त्या कमळणी थोर विकसती ॥ २३० ॥ आर्तवंत श्रोते चतुर । जे कां प्रेम आमोद सेवणार । तेचि येथें जाणावे भ्रमर । देती गुंजारव निजप्रीतीं ॥ ३१ ॥ पुढिले अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीरुक्मिणीकांत । महीपती त्याचा लडिवाळ आप्त । बोल बोलत शिकविले ॥ ३२ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत संतभक्त । एकतिसावा अध्याय गोड हा ॥ २३३ ॥ ॥ अध्याय ॥ ॥ ३१ ॥

अध्याय ३२



श्रीगणेशाय नमः । अज्ञान बाळक लडिवाळ साच । बोबडे बोल बोलतां वाचे । मायबापांसि कवतुक त्याचें । पुसती तेंच पडताळोनी ॥ १ ॥ श्रीमंतांचे घरीं जाण । पक्वान्नाची कायशी वाण । परी ते पालटासाठीं कदन्न । निजप्रीतीनें सेविती ॥ २ ॥ जेवीं क्षीराब्धि पुढें साचार । नैवेद्यासि ठेविलें वक्र । तैसीं माझीं आर्ष उत्तरें । संतां समोर दीसती ॥ ३ ॥ नातरी उजळोनि काडवाती । अर्चनीं ओवाळिजे गमस्ती । कीं शीतळ व्हावया निशापती । विंझणा[1] हातीं पालविजे ॥ ४ ॥ नातरी कनकाद्रीसि साचार । केले बेगडाचे अळंकार । तैसीं माझीं आर्ष उत्तरें । संतां समोर दिसती ॥ ५ ॥ मागील अध्यायाचे शेवटींल कथन । तुकयाच्या स्वरूपें जगज्जीवन । सर्व साहित्य घरीं आणून । पितर संपूर्ण जेवविले ॥ ६ ॥ मग घरासि येतां वैष्णवभक्त । कांतेनें सांगितला समस्त वृत्तांत । म्हणे आम्हां निमित्त रुक्मिणीकांत । श्रमला बहुत निजांगे ॥ ७ ॥ मग प्रातःकाळ होताचि जाण । इंद्रायणीसि केलें स्नान । श्री मूर्तीचें करोनि पूजन । सप्रेम स्तवन करीतसे ॥ ८ ॥ म्हणे कृपासागर पंढरीनाथा । तुवां मागें तारिलें शरणागतां । यातिकुळ न विचारितां । संकटीं अनंता रक्षिसी ॥ ९ ॥ नामयाचीं उपवासि भरतां पोरें । राजाई कष्टी होतसे थोर । तूं केशवशेट होऊनी सारंगधर । होन गोणीभर आणिले ॥ १० ॥ चोखामेळा जातीचा महार । त्याचीं निजांगे ओढिलीं ढोरें । देखोनि त्याची प्रीति थोर । त्याच्याबरोबर जेविसी ॥ ११ ॥ ज्ञानदेवाचिये प्रीती । तुवां निजांगें चालविली भिंती । तुझे पवाडे रुक्मिणीपती । वर्णिले संतीं बहु फार ॥ १२ ॥ दामाजीपंत भक्त उदार । त्यानें लुटविलें धान्य अपार । मग होऊनि विठ्यानामक महार । रसद सत्वर भरली त्वां ॥ १३ ॥ मिराबाईसाठीं निश्चित । तुवां विष घेतलें अनंतें । तिची लज्जा रक्षोनि तेथें । जगीं सत्कीर्तीतें वाढविलें ॥ १४ ॥ नरसीमेहता भक्तवैष्णव । त्याची हुंडी भरिली देवें । निजांगें होउनि सावळ साह । अपूर्व लाघव दाखविलें ॥ १५ ॥ ऐसे तूझे भक्त श्रीपती । वैष्णव गाती त्यांची कीर्ती । माझी तों अल्प मूढमती । प्रेम चित्तीं इच्छितसें ॥ १६ ॥ ऐसी स्तुति ऐकोनि कानीं । संतुष्ट जाहले चक्रपाणी । म्हणे तुका वदेल प्रसादवाणी । तें उचित देउनि गौरवू ॥ १७ ॥ कायिक वाचिक मानसिक जाण । तुकयासि तपें घडलीं तीन । परोपकाराचें महापुण्य । तेथें शक्ति संपूर्ण वेंचिली ॥ १८ ॥ आणि आषाढी कार्तिकी निर्धारीं । चालवीत पंढरीची वारी । जैसी सासुरवासीण जाते माहेरीं । उल्हास अंतरीं धरोनियां ॥ १९ ॥ अश्व वहनीं न बैसेचि देखा । आन्हवणी पंढरीसी जाय तुका । कीर्तन गजर ऐकोनि निका । सप्रेम सुखा भोगीतसे ॥ २० ॥ संतसेवा परोपकार । आन्हवणी यात्रा केल्या फार । हेंचि कायिक तप साचार । वैष्णववीर करितसे ॥ २१ ॥ आतां वाचिक तप कैशा रीती । असत्य न बोले वचनोक्ती । नामस्मरण अहोरातीं । विसर चित्तीं पडेना ॥ २२ ॥ आतां मानस तपाचें लक्षण । पांडुरंग चरणीं स्थिरावलें मन । जैसे कां चातक जीवन । मेघा वांचोन न घेती ॥ २३ ॥ कीं तान्हें बाळक रडतां पाहे । तें माते

[1] पंखा.

वांचोनि समजेल काय । तैसा तुकयाचा निश्चय । पंढरीराय उपासिला ॥ २४ ॥ ऐकोनि आशंका वाटेल भाविकां । पांडुरंगावीण नेणेचि तुका । तरी परोपकारी कां भजतसे लोकां । उत्तर ऐका येविषयीं ॥ २५ ॥ एक श्रीहरीच्या सत्तेनें । चराचरवर्ततसे जाण । त्याचे मनोगत रक्षावया पूर्ण । करीतसे नमन सर्वांभूतीं । जैसी सासुरवासिण प्रतिव्रता । तिच्या चित्तीं आवडे भर्ता । जाणोनि पतीच्या मनोगता । परिवारा समस्ता आर्जवी ॥ २७ ॥ सासू सासरा नणंदा दीर । हे बोलती नाना दुरुत्तर । तरी त्यांचे कष्ट करीतसे फार । जाणोनि अंतर पतीचें ॥ २८ ॥ तरी प्राणनाथावीण साचार । प्रीति नसेचि आणिकांवर । तैसें तुकयाचें मन स्थिर । पांडुरंगीं मुरे निजप्रीतीं ॥ २९ ॥ एक न धरितां उपासना । साधकें प्रयत्न केले नाना । तरी साक्षात्कार नव्हेचि जाणा । बहुतांचा पाहुणा उपवासी ॥ ३० ॥ तैसें तुकयाचें नव्हेचि मन । कर्म उपासना आणि ज्ञान । तिहीं कांडांत असें निपुण । दाखवी वरतून जनासि ॥ ३१ ॥ कायिक तप तें कर्मकांड जाण । वाचिक उपासना वर्णावे गुण । पांडुरंगावीण कांहींच नेणें । पूर्ण आत्मज्ञान नव्हेचि कीं ॥ ३२ ॥ हे तिन्ही तपांचे अलंकार जाण । तुकयाच्या अंगीं बाणले लेणें । देव तुकाशी येईल जेणें । तें सात्विक पुण्य जोडलें ॥३३॥ ऐसें जाणूनि पांडुरंगमूर्ती । विचार करीत आपुलें चित्तीं । म्हणे तुका वदेल माझी कीर्ती । ते कवित्व स्फूर्ति त्यासि द्यावी ॥ ३४ ॥ मग नामदेवाचा धरोनि हात । देहूसि आले पंढरीनाथ । तुका रात्रीं असतां निद्रित । दृष्टांत दाखवित जगदात्मा ॥ ३५ ॥ निजकरें थापटोनि पाठी । सावध करितसे जगजेठी । म्हणेरे तुक्या वेगीं उठी । सांगतो गोष्टी ते ऐक ॥ ३६ ॥ हा नामा माझा निजभक्त पूर्ण । मागें संकल्प केला यानें । कीं शतकोटि ग्रंथ प्राकृत करीन । इतुका पण बोलिला ॥ ३७ ॥ मग म्यां त्यासि दीधली स्फूर्ती । कवित्व लिहिलें आपुल्या हातीं । संख्या मोजितां झाली किती । हेही तुजप्रती सांगतो ॥ ३८ ॥ चाळीस लक्ष चवऱ्याणव कोटी । नव लक्ष ललित आलें शेवटीं । बाकी प्रेमा राहिला पोटीं । मग अशा वैकुंठीं स्वइच्छे ॥३९॥ एकावन्न लक्ष पांचकोटि जाण । शेष राहिलें याचें बोलणें । तें तूं वदे प्रसाद वचन । सप्रेम दान मी देतों ॥ ४० ॥ तुझेनी योगें करोनि साचा । उद्धार होईल जगताचा । आतां व्यर्थ वाउगी न वेंची वाचा । प्रारंभ कवित्वाचा करी कां ॥ ४१ ॥ इतुका दृष्टांत दाखवोनि जाण । देव पावले अंतर्धान । जागृतीं येऊनि वैष्णवजन । म्हणे चमत्कार पूर्ण दाखविला ॥ ४२ ॥ देवभक्त देखिलें स्वप्नीं । तें ध्यान सर्व आठवे मनीं । म्हणे प्रेमाचें उचित चक्रपाणी । गेले देऊनि मज आतां ॥ ४३ ॥ तुकयाचे अल्प संतोषी मन । पाठांतर इच्छित संतवचन । मग आज्ञा केली जगज्जीवनें । प्रासादिक वचनें बोलावीं ॥ ४४ ॥ मग तुकयासि आनंद चित्तीं । वाटला तेव्हां कैशा रीतीं । जैसा दिवटीचा प्रकाश इच्छितां रातीं । तों तेथें गभस्ती[१] उगवला ॥ ४५ ॥ कीं औषधवल्ली धुंडितां वनीं । तों अमृतकुंड देखिलें नयनीं । कां ध्रुवराज्य

१ सूर्य.

इच्छिता मनीं। तो अढळपदीं नेउनी बैसविला ॥४६॥ नातरी उपमन्यु ब्राह्मणकुमर। दूध मागतां वाटीभर । मग प्रसन्न होऊनि लक्ष्मीवर। क्षीरसागरी बैसविला ॥ ४७ ॥ तुकयासि उल्हास तैशाच रीती । जिव्हाग्री बैसली सरस्वती । कवित्वासि प्रारंभ केला प्रीती । सप्रेम मती आपुल्या ॥४८॥ बाळबद अक्षरें लिहावीं पाही । हा मागें अभ्यास नव्हता कांहीं । कोऱ्या कागदांची करोनि वही पाही। स्वमतीनें लिही आपुल्या ॥ ४९ ॥ वेद शास्त्रांचें निज मथित । व्यासें काढिलें श्रीभागवत । त्यांतही दशम हरिलीलामृत । गोकुळीं क्रीडत जगदात्मा ॥ ५० ॥ ते बाळक्रिडा तुकयानें आपुले मती । प्रथमारंभीं लिहिली ग्रंथीं । नउशें ओव्या त्याच्या असती । स्वानुभवें जाणती संतसाधु ॥ ५१ ॥ कीर्तनामाजी साचार । चरित्र नसलें पाठांतर । त्याचा अभंग वरच्यावर । वैष्णववीर करीतसें ॥५२॥ प्रासादिक कविता ऐकूनि कानीं। श्रोते आश्चर्य करिती मनीं । कीर्तनीं रंग येतसे चौगुणी। वरद वाणी म्हणोनियां ॥ ५३ ॥ जैसा मेघ वर्षतां साचार। अगणित उठती तृणांकुर । कां सागरीं तरंग येती अपार । संख्या न करवे तयांची ॥५४॥ तैशाच परी तुकयाप्रती । कीर्तनीं अनेक शब्द स्फूर्ती । संशय न राहे कोणाप्रती । खेळ तेही होती भाविक ॥५५॥ पांडुरंगाच्या देऊळीं नित्य । दोन प्रहर कीर्तन होत। जवळील गांवचे भाविक भक्त । श्रवणासि येत नित्यकाळीं ॥५६॥ एकादशीसि हरिजागर । कीर्तन होय चारी प्रहर । कीर्ति प्रगटली दुरिच्यादुर । प्रतिष्ठा थोर वाढली ॥५७॥ तो मंबाजी बाबा ब्राह्मण पाहीं । चिंचवडीं होता दिवस कांहीं । मग तो महापुरुष होऊनि गोसांवी। देहू गांवीं राहिला ॥५८॥ मठ बांधोनि ते ठायीं । कुटुंब आणिलें तेथें सर्वही । शिष्य शाखा असती कांहीं । योगक्षेम तेही चालविती ॥ ५९ ॥ तुकयाची प्रतिष्ठा वाढतां तेथ । त्याचे मनीं द्वेष उपजत । म्हणे एका मेण्यांत दोन सुऱ्या निश्चित । सामावत कैशापरी ॥ ६० ॥ यानें आम्हां देखतां साचार । वह्या केल्या पाठांतर । याची प्रतिष्ठा वाढली फार । विप्र नमस्कार करिताती ॥६१॥ तुका तो शुद्ध जातीचा वाणी । मी प्रतिष्ठित महंत ये ठिकाणीं। याची कीर्ति प्रगटली जनीं। मजला कोणी न पुसती ॥६२॥ जैसी निरपेक्षाची सांगतां स्थिती। आशाबद्ध ते मनीं जल्पती। कां सहदेव मतासि हेळसिती । ज्योतिषी जैसे निजद्वेषें ॥६३॥ केतु म्हणे हा वासरमणी । गांठ पडतां टाकीन वदनीं। कीं संपुर्ण चंद्र देखोनि नयनीं। राहु निजमनीं जल्पतसे ॥६४॥ तैशाच परी तुकयाचा। मंबाजी द्वेष करीतसे साचा। म्हणे एकदां अपमान करोनि याचा। सूड साचा घेईन मी ॥ ६५ ॥ इतुका द्वेष वागवीत मनीं। परी लौकिकार्थ येऊनि बैसे कीर्तनीं । तुकयासि तों शत्रु-मित्र मनीं। समसमान दोन्ही सारिखे ॥ ६६ ॥ देवालयामागें दक्षिणेसि जाण। झाडें लाविलीं असती त्याणें। त्यांजपासी सर्वदा मन । कूड रक्षण सभोंवता ॥ ६७ ॥ तों अवली तुकयाची निज कांता । अमाजी गुळव्या तिचा पिता । त्यानें लेकीची धरूनि ममता । म्हैस तत्वतां दीधली ॥ ६८ ॥ ते पाण्यावर सोडितां निश्चित । मंबाजीच्या बागांत शिरत । कूड रेटूनि गेली आंत । झाडें बहुत खादलीं ॥ ६९ ॥ हें

१ दुष्ट. २ सूर्य.

दृष्टीत देखोनि साचार । चित्तीं विक्षेप वाटला थोर । अपशब्द बोलोनि नाना प्रकार । मग निवांत स्थिर राहिला ॥ ७० ॥ कांहीं दिवस लोटतां यांसी । तों आली हरिदिनी एकादशी । यात्रा आली देवदर्शनासी । अस्तमानासी सूर्य जातां ॥ ७१ ॥ प्रदक्षिणेच्या वाटेवरी जाण । कांट्या रोंविल्या मंबाजीनें । त्या निजकरें उपडिल्या तुकयानें । मार्गा कारणें ते समयीं ॥७२॥ हें वेषधारियानें देखोनि नयनीं । क्रोधें पेटला जैसा वन्हीं । आधींच द्वेष होता मनी । त्यावरी पुरवणी ही झाली ॥ ७३ ॥ जैसा महा सर्प धरिला डाव । त्याच्या शेंपटीं पडिला पाय । तो धुधुक्कार टाकित धांवे । घ्यावया जीव तयाचा ॥ ७४ ॥ तैशापरी तो द्विजवर । अपशब्द बोलत नाना प्रकार । तुकयापासीं येऊनि सत्वर । कांटी निजकरें घेतली ॥ ७५ ॥ प्रेमळ तुकयाच्या आंगावरी । निकरें मारीत ते अवसरीं । परी क्षमा शांति धरोनि अंतरीं । प्रत्युत्तरीं न बोले ॥ ७६ ॥ निकरें मारितां सत्वर गती । कांटी पिंज होऊनि जाती । मग दुसरी उपटोनि घेतली हातीं । परी दया चित्तीं उपजेना ॥ ७७ ॥ निकरें मारितां साचार । दहा वीस कांट्या मोडल्यावर । परी तेथूनि न ढळेची वैष्णववीर । सप्रेम गजरें नाम जपे ॥ ७८ ॥ तुकयाची क्षमा वर्णितां साचार । तरी दुजा न दिसे पृथ्वीवर । दुसरा दृष्टांत योजितां न सरे । कुंठित अंतर कवीचें ॥ ७९ ॥ निर्दयासि नाहीं भूतदया । मांस खायित्यासीं कैंची माया । ब्राह्मणाची वर दिसतसे काया । परी अनामिक तया म्हणावें ॥ ८० ॥ जैसा कुणबी विरवड झोडित । तैसा मारिला वैष्णवभक्त । त्याचे हात दुखतां निश्चित । मग निवांत राहिला ॥८१॥ दुर्जन मठासि गेला तेव्हां । तुका देउळासि येतसे तेव्हां । गाऱ्हाणें सांगे रुक्मिणीधवा । मार बरवा देवविला ॥ ८२ ॥ आणि शिव्या-गाळ्यांसि नाहीं मिती । हें तुझेंचि कर्तृत्व लक्ष्मीपती । आतां नको दुर्जनाची संगती । विक्षेप चित्तीं होय तेणें॥८३॥ ऐशा रीतीं अभंग देख । निजमुखें तुका वदला एक । कांटे मोडिले जे सकळिक । ते पाहती लोक दृष्टीसीं ॥ ८४ ॥ सदयहृदयीं ज्यांच्या कळवळा । दृष्टीसीं तुकयाची देखिली अवकळा । आंसुवें आलीं त्यांच्या डोळां । म्हणती भक्त प्रेमळा गांजिलें ॥ ८५ ॥ मग अवलीनें नाचकंड घेऊनिक । कांटे उपटिले ते अवसरीं । म्हणे काळ्यानें पाठ घेतली बरी । केली संसारीं फजीती ॥ ८६ ॥ मग कृपादृष्टी पंढरीनाथें । तुकयाकडे पाहिलें त्वरित । तों कांट्यांचीं क्षतें मिळालीं समस्त । आराम वाटत शरीरासी ॥ ८७ ॥ एकादशीस हरिजागर । यात्रा मिळाली असे फार । कीर्तनीं बैसले लोक समग्र । मग वैष्णववीर काय म्हणे ॥८८॥ मंबाजी बावा महापुरुष । अखंड येताती कीर्तनास । आजि कां उशीर लागला त्यांस । मग बोलावयास पाठविलें ॥ ८९ ॥ त्यानें तुकयासि धाडिलें उत्तर । माझें अंग दुखतें फार । ऐसें ऐकोनि वैष्णववीर । जात सत्वर त्यापासी ॥ ९० ॥ साष्टांग दंडवत घालूनी जाण । आंग रगडीत बैसे आपण । म्हणे निजांगें झोडितां कांटवण । आला क्षीण स्वामीसी ॥ ९१ ॥ म्यां झाडांसि उपद्रव दीधला नसता । तरी तुमचा विक्षेप कायसा होता । हा अपराध क्षमा

१ अग्नी.

करूनि तत्त्वतां । कीर्तनासि आतां चलावें ॥ ९२ ॥ ऐसें म्हणोनि वैष्णववीर । रगडित बैसे घटिका चार । मंबाजीचें लजित अंतर । मग कीर्तनासि सत्वर चालला ॥ ९३ ॥ जैसा समुद्रें झांकिला वडवानळ । त्यातें वेष्टीत अवघेंचि जळ । परी तो न विझेचि अळुमाळ । शोकीन सकळ म्हणतसे ॥ ९४ ॥ तैसाचि तुका शांतिसागर । मंबाजी तयासि वैश्वानर । शीतळ दिसतो बाह्याकार । परी द्वेषें झुरे निज अंतरीं ॥ ९५ ॥ संतीं चमत्कार दाखविले फार । परी खळाचें शुद्ध नव्हेचि अंतर । यें विषयीं दृष्टांत सार । ऐका चतुर निजकर्णी ॥ ९६ ॥ घ्यावया पांडवांचा कैवार । देवें चरित्र दाखविलें फार । परी दुर्योधनाचें कपटीं अंतर । तें साचार पालटेना ॥ ९७ ॥ तैसा कुचर बैसला करीत श्रवण । परी दोषांवरी त्याचें मन । कीं तुकाचें शुद्ध ध्यान । कैंचें पुण्य तें ठायीं ॥ ९८ ॥ सर्प न खाय अन्नासी । तरी त्यासि काय घडली एकादशी । जरी चित्त शुद्ध नसतां मानसीं । तरी साधन तयासि घडेना ॥ ९९ ॥ दगड बोलत नाहीं कोणा । तरी तो काय योगी अबोलपणा । राखेंत गाढवें लोळती जाणा । परी अनुताप मना न होय ॥ १०० ॥ उंदीर बिळांत बैसला परी । तो सर्वदा आंत उकरी । तैसा कीर्तनीं बैसला कुचर जरी । परी द्रवेना अंतरीं सर्वथा ॥ १ ॥ परी तुकयाची समता जाण । शत्रु मित्र समसमान । चित्तीं सर्वथा न धरीच कुडेपण । सप्रेम कीर्तन करीतसे ॥ २ ॥ नामरूपीं जडलें चित्त । म्हणोनि जाहला देहातीत । कीर्तनामाजीं बैसले श्रोते संत । प्रेमभरीत ते झाले ॥ ३ ॥ कृष्ण-विष्णु हरि-गोविंदा । अच्युता माधवा आनंदकंदा । परम पुरुषा सच्चिदानंदा । सोडवी भवबंधनापासुनी ॥ ४ ॥ अनाथ रक्षका पांडुरंगा । मदनताता रुक्मिणीरंगा । कर्म कर्दम न लिंपे अंगा । ऐसें श्रीरंगा करावें ॥ ५ ॥ काळचक्रामाजीं निश्चिती । जीव भ्रमतो निजकर्म गतीं । येथूनी सोडवी सत्वर गती । रुक्मिणीपति श्री विठ्ठला ॥ ६ ॥ ऐसी करुणा भाकोनि फार । कीर्तना नाचे सप्रेम गजर । टाळा विणे वाजती सुस्वर । नादें अंबरे[१] कोंदलें ॥ ७ ॥ टाळ्या चुटक्याची घायी । निद्रा आळस कोणासी नाहीं । कीर्तनी श्रोते जाहले विदेही । हेचि नवायी अगाध ॥ ८ ॥ संतचरित्रें रसाळपूर्ण । हेंचि साधिलें अनुसंधान । श्रवण करिती भाविकजन । वेधलें मन तयाचें ॥ ९ ॥ असो तुका कीर्तन करित । कांता निद्रित मंदिरांत । तों दोघे तस्कर येऊनि तेथ । काय करित तें ऐका ॥ ११० ॥ दुभती म्हैस होती घरीं । ते सोडूनि नेली ते अवसरीं । पुढें एक मोहरकी धरी । मागुनि सत्वरी एक हाकी ॥ ११ ॥ ग्रामांपासोनि पश्चिमेस । बोडक्याची वाडी पाव कोस । तेथवरी जातां तस्करांस[२] । हें देवास श्रुत झालें ॥ १२ ॥ म्हणे तुका तों रत झाला असे कीर्तनीं । अवली निद्रित जाहलीं सदनीं । म्हैस नेली तस्करांनीं । ते सोडोनि आणावी ॥ १३ ॥ आम्हीं न जातां ये अवसरीं । तुकयासि गांजील नानापरी । ऐसें म्हणवोनि भक्तकैवारी । कौतुक काय करी तेधवां ॥१४॥ महाविक्राळ पुरुष श्रीपती । रूप नटला सहज स्थितीं । थोर टोणपा घेतला हातीं । तस्करांप्रती मारावया


१ आकाश. २ चोरांना.

॥१५॥ चोर पुढें जाती सत्वर । तों विक्राळ पुरुष वाटेवर । हातीं मुसळ घेतलें थोर । मस्तकावर मारावया ॥१६॥ एकमेकांसी बोलती उत्तर । थोर हा कोण पुरुष वाटेवर । नेणो महद्भुत दिसे थोर । कैसा विचार करावा ॥१७॥ गाऊल लागलें होतें हातीं । परी हे नाहीं आपुलें संचितीं । प्रारब्धाची विचित्र गती । नेणो संचितीं काय आहे ॥१८॥ ऐसें म्हणोनि ते तस्कर । दुसऱ्या पंथें चालिले सत्वर । तों तीकडेही टोणपा घेऊनि थोर । सारंगधर उभा असे ॥१९॥ परम भय वाटलें चित्तीं । म्हणती कैसी करावी गती । अष्टदिशा विलोकूनि पाहती । तों दिसे श्रीपती चहूंकडे ॥ १२० ॥ म्हणती काळपुरुष हा धटिंगण । आडवा येतो आम्हाकारणें । ब्रह्मराक्षस कीं पिशाच जाण । घ्यावया प्राण पातला ॥ २१ ॥ पहांटे जाहली उगवे दिन । मग भलताचि धरील आम्हांकारणे । आतां उपाय करावा कवण । उद्विग्न मन यासाठी ॥ २२ ॥ मग एकमेकांसी विचार करित । तुका विठोबाचा म्हणवितो भक्त । त्याची म्हैस नेतों निश्चित । यास्तव भूत पुढें आलें ॥ २३ ॥ नेणों देवाची माव अघटित । आपणासि अपराध पडला सत्य । आतां म्हैस बांधावी जेथील तेथ । तरीच आघात चुकेल हा ॥ २४ ॥ ऐसें म्हणवोनि ते तस्कर । गांवाकडे धरिली मोहर । मागूनि येतसे रुक्मिणीवर । टोणपा निज करें घेउनी ॥ २५ ॥ तस्कारांसि भय वाटे चित्ता । म्हणती मागूनि हाणील काय अवचितां । ऐशा रीतीं धाके घालितां । गांवांत तत्वतां प्रवेशले ॥२६॥ मग जावोनि तुकयाच्या वाडियांत । म्हैस बांधिली आपुल्या हातें । लगबगां गांवाबाहेर जात । तेथें जगन्नाथ उभा असे ॥ २७॥ विक्राळरूप भयानक । हातीं मुसळ घेतलें देख । तस्करीं मार्ग धरिला आणिक । तो वैकुंठनायक उभा तेथें ॥ २८ ॥ गांवांत खिंडी ठायीं ठायीं । निघों पाहती लवलाहीं । तो काळपुरुष सर्वांठायीं । एकही नाहीं स्थळ रितें ॥२९॥ तस्करांसि भय वाटलें फार । म्हणती तुका करितो कीर्तनगजर । तेथें जाऊनियां सत्वर । त्यासि हा विचार सांगावा ॥ १३० ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । कीर्तनामाजी आले सत्वरीं । लज्जा भय न धरोनि अंतरीं । मधुरोत्तरीं बोलती ॥३१॥ हात जोडूनि ते चोर । उभे तुकया समोर । म्हणती आम्ही दोघे तस्कर । अपराध थोर आचरलों ॥३२॥ तुमची म्हैस सोडोनि देख । नेत होतों तात्काळिक । तों वाटेस काळपुरुष एक । आडवा सम्यक देखिला ॥ ३३ ॥ टोणपा घेतलासे निजकरीं । जिकडे जातों तिकडे समोरी । तेव्हां म्हैस आणोनि सत्वरी । तुमचे घरीं बांधिली ॥३४॥ मग सत्वर पळोनि जातां पाहे । तों गांवद्वारीं बैसलाच आहे । जिकडे जातों तिकडेचि होय । यासि उपाय कोणता ॥ ३५॥ तूं विष्णुभक्त अद्वेष्टापूर्ण । शत्रु मित्र समसमान । आतां आमुची सुटका होईल जेणें । तो उपाय करणें समर्था ॥३६॥ ऐसी तस्करांची वाणी । सरळ लोक ऐकती श्रवणीं । ते विस्मित झाले आपुले मनीं । चरित्र ऐकोनि अद्भुत ॥ २७ ॥ तुकयासि आश्चर्य वाटलें चित्तीं । मग ध्यानांत आणी पांडुरंगमूर्ती । तों कीर्तनांत नाहीं रुक्मिणीपती । म्हणे यथार्थ सांगती तस्कर ॥ ३८ ॥ नेत्र झांकूनियां तेव्हां । पांडुरंगाचा मांडिला धांवा । म्हणे

पंढरीनाथा देवाधिदेवा । गेलासि केव्हां येथूनी ॥ ३९ ॥ आम्ही करितो हरिजागरण । तूं तरी फिरतोस रानोरान । ढोरें राखावयाची सवें जाण । पहिल्या पासोन लागली ॥ १४० ॥ आम्हीं सद्भावें वर्णितों गुण । येथें न रंजेचि तुझें मन । आणि वेडेंवांकडे रूप धरोन । देशी दर्शन तस्करांसी ॥ ४१ ॥ आतां प्रभात समय जाहला पाहीं । आरतीचे समयीं तरी येयीं । कृपासागर शेषशायी । उचित नाहीं हें तुज ॥ ४२ ॥ आमच्या नावडती सप्रेम गोष्टी । पळोनि गेलासि उठाउठी । हातीं घेऊनि थोर काठी । धांवसी पाठीं चोरांच्या ॥ ४३ ॥ तूं सखा नसतां प्रेमळांचा । कीर्तनीं रंग न भरे साचा । ऐकोनि धांवा तूकयाचा । आला देवांचा देव हरी ॥ ४४ ॥ तुका नाचतसे कीर्तनांत । तों मागुनि आले पंढरीनाथ । हातीं टोणपा घेतला निश्चित । लोक पहात सभोंवतें ॥४५॥ तस्करासि विक्राळ दिसे मोठा । इतर लोकांस साधारण गाठा । तुका तस्करांसि म्हणतसे उठा । आपुल्या वाटा क्रमावें ॥ ४६ ॥ म्हैस लागेल तुम्हांकारणें । तरी आतांचि सत्वर न्यावी सोडून । तस्कर म्हणती वांचला प्राण । हेंचि तुझें देणें आम्हांसी ॥ ४७ ॥ ऐसें म्हणवोनियां ते चोर । पळोनि गेले वरच्यावर । अद्भुत चरित्र देखोनि थोर । करिती गजर नामघोषें ॥ ४८ ॥ चरित्र देखिलें ऐकिलें कानीं । मंबाजी विस्मित झाला मनीं । म्हणे यांची प्रतिष्ठा वाढेल जनीं । ऐसी करणी दिसताहे ॥ ४९ ॥ ऐसें म्हणूनियां मानसीं । आपुल्या जागीं उगाच मुसमुसी । विष्णुभक्ताची महिमा कैसी । द्वेषबुद्धीसी कळेना ॥ १५० ॥ असो या अभक्ताची कथा । वारंवार येतसे दृष्टांता । तेणें वाग्देवी श्रमते वृथा । उबग श्रोता न मानिजे ॥ ५१ ॥ अभक्त निर्माण होतसे क्षितीं । यास्तव भक्ताची वाढली कीर्ती । जरी खोटीं नाणीं निर्मिलीं नसती । तरी खरें म्हणती मग कोणा ॥५२॥ जरी निर्मिली नसती यमपुरी । तरी स्वर्गाची आशा कोण धरी । हिंडणें नसतें चौऱ्यांयशी फेरी । तरी मोक्षाची धरी कोण आस्था ॥ ५३ ॥ साचच देहासि मरण नसतें । तरी मग अमृतासि कोण पुसतें । तेवीं अभक्ताच्या योगें निश्चित । भक्त प्रख्यात जाहले कीं ॥ ५४ ॥ महा अंधकार नसतां रात्रीं । तरी कैसी झळकती दीपक ज्योति । रावणाच्या योगें निश्चिती । श्रीराम सत्कीर्ती पावला ॥५५॥ असोत हीं भाषणें बहुवस । तस्करांनीं गेली नसती म्हैस । मग कैसा दाखविता जगन्निवास । चरित्र विशेष संताचें ॥ ५६ ॥ मग वैष्णव तुका ते अवसरीं । चरित्र गातसे नानापरी । म्हणे भक्तासि पावला श्रीहरी । कैशा परी तें ऐका ॥ ५७ ॥ विष्णूची कीर्ति नायके कानीं । म्हणोनि हिरण्यकशिपु जल्पे मनीं । प्रल्हादाचा धांवा ऐकोनि । खांबांत चक्रपाणी प्रगटला ॥ ५८ ॥ अपाय करितां निजभक्तास । अधिकचि वाढे कीर्ति घोष । दुर्योधनें गांजितां द्रौपदीस । तों चरित्र विशेष वाढलें ॥ ५९ ॥ निजभक्ताचें न साहे उणें । यास्तव धांवला श्रीकृष्ण । अनंत वस्त्रें नेसविलीं जाण । मग सकळ दुर्जन लाजले ॥ १६० ॥ पवित्र साधूंचा प्रतिपाळ । स्वधर्म स्थापावे निजांगे सकळ । म्हणोनि न पाहतां काळवेळ । अवतरे घननीळ निजांगें ॥ ६१ ॥ मजला

भासे ऐशा रीतीं । कलियुगाची तों अद्भुत ख्याती । भक्तासाठीं नाना विपत्ती । रुक्मिणीपती सोसीतसे ॥ ६२ ॥ सांवतामाळी भक्त प्रेमळ । त्याजपासी जाय घननीळ । लपावयासि मागतां स्थळ । उदर तत्काळ चिरियलें ॥ ६३ ॥ ज्याच्या रोमरंध्रीं सकळ सृष्टी । तो निज भक्ताच्या समावें पोटीं । सांवत्या पासी गुजगोष्ट । बोले जगजेठी प्रीतीनें ॥ ६४ ॥ तो नामा आला विलापत । तों सांवत्यानें गिळिला रुक्मिणीकांत । पीतांबराची दशी दिसत । मग ओढोनि काढित निजहस्त ॥ ६५ ॥ उदरांतूनि निघे घननीळ । तरी तो सांवत्याचा पोटिंचा बाळ । ऐसें तुकयानें ते वेळे । चरित्र प्रेमळ गाइले ॥६६॥ श्रोतयांसि म्हणे वैष्णवभक्त । संसार अवघा अशाश्वत । जो श्रीहरी भजनीं होईल रत । तरी कळिकाळ अंकित होय त्याच्या ॥ ६७ ॥ ऐसा उपदेश होतां कीर्तनीं । तों उदयासि पातला वासरमणी । जयजयकारें टाळ्या पिटोनी । विठ्ठल स्मरणीं गर्जती ॥ ६८ ॥ मग उजळोनी मंगळारती । ओवाळिला श्रीरुक्मिणीपती । पुढिलें अध्यायी रसोत्पत्ती । तरी सादर श्रोतीं परिसिजे ॥ ६९ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ सार । वदविता श्रीरुक्मिणीवर । महीपति निमित्तासि आधार । हें सर्वज्ञ चतुर जाणती ॥ १७० ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । बत्तिसावा अध्याय रसाळ हा ॥ १७१ ॥ अध्याय ॥ ३२ ॥ ओव्या ॥ १७१ ॥




अध्याय ३३
जिजाबाई
विठ्ठल
तुकाराम

श्रीगणेशायनमः ॥ जयजय करुणासिंधु जगजेठी । तूं भक्तासि पाहसी कृपा दृष्टीं । त्या संसाराची पाडोनि तुटी । तोडिसी फांसाटी
भवबंधा ॥ १ ॥ सगुण कांता देतां तयातें । तेथें भक्ताची बैसेल प्रीत । यास्तव कर्कशेची संगत । देशीं निश्चित त्यालागीं ॥ २ ॥
सत्पुत्र भक्तासि देतां । तरी संसारीं गुंतेल त्याची आस्था । म्हणोनि बापलेंकांत उभयतां । विघड अवचितां पाडिसी तूं ॥ ३ ॥ धन
धान्य भक्तासि देतां फार । तरी सुखें करितील ते संसार । मग माझ्या भजनीं पडेल कीं विसर । म्हणोनि थोडेंच अन्नवस्त्र दे त्यासी
॥ ४ ॥ तुझी करणी पंढरीराया । बरी चित्तीं बिंबली माझिया । कृपा दृष्टीनें पाहासी जया । त्याची माया निवारिसी ॥ ५ ॥ दुर्जनांसि
घालोनि आनिवार भ्रांति । भक्तांसि छळविसी तयां हातीं । मग आपलें चरित्र नाना रीतीं । श्रीरुक्मिणीपती दाविसी तूं ॥६॥ विष्णुसहस्र-
नामांत जाण । तुझें नाम ठेविलें द्वैपायनें । कीं तूं भयकृतद्भयनाशन । तें सत्यच दिसोन मज आलें ॥७॥ एवं तूंचि अवघा सत्ताधारी ।
हालविसी प्राचीनाची दोरी । निमित्त ठेवूनि मजवरी । जड मूढ वैखरी वदविसी ॥८॥ मागिले अध्यायीं चरित्र सुरस । तस्कर घेऊनि
जातां म्हैस । ते सोडवोनि हृषीकेशें । कौतुक जनास दाखविलें ॥९॥ काल हरिदिनीं व्रत थोर । चारी प्रहर जाहला जागर । मग ओवाळूनि
रुक्मिणीवर । वैष्णववीर काय करी ॥ १० ॥ इंद्रायणी तीरा जाऊन । केलें तुकयानें प्रातःस्नान । मग पांडुरंगाचें करीत अर्चन ।
निजप्रीतींनें आपुल्या ॥ ११ ॥ अवलीस सकळ लोक सांगती । तुझी म्हैस तस्करें नेली रातीं । मग विठोबानें दाखवोनि प्रतीति ।
आणविली मागुतीं माघारीं ॥ १२ ॥ ऐसा चमत्कार ऐकोनि तेथें । विस्मित जाहली आपुल्या चित्तें । तुकयासि बैसविलें भोजनातें ।
अति हर्षीतें मानूनियां ॥ १३ ॥ शिजविली होती भात भाकरी । तयासि भाजी वाढिली तिसरी । मग दूध आणिलें वाटीभरी । तेव्हां
आश्चर्य करी विष्णुदास ॥ १४ ॥ मग अवलीसि तुका बोले उत्तर । आपुलें शुद्ध करोनि अंतर । दूध देशील तांब्याभर ।
तरी देवासि सत्वर पाजीन मी ॥ १५ ॥ मग पितळेचें पात्र उठोनि हातें । दूध भरोनि दीधलें त्यांत । देउळीं जाऊनि प्रेमळभक्त ।
मूर्तीसि पाजित तेधवां ॥ १६ ॥ आतां पाषाण मूर्ति दिसती लोकां । तिसीं नित्य दूध पाजितसे तुका । जो वश्य नव्हेचि ब्रह्मादिकां ।
तो होतसे भाविकां स्वाधीन ॥ १७ ॥ ऐसें लोटतांचि दिवस फार । अवलीस विकल्प पातला थोर । म्हणे नित्य दूध नेतो
तांब्याभर । कैसा विचार कळेना ॥ १८ ॥ घरीं पोरवडा खावयासि साजणी । कैसें होईल ताकपाणी । संसार चालेल कैसेनी । निघतें
लोणी किंचित ॥ १९ ॥ मग तान्ही कन्या भागीरथी । देउळीं नित्य जात सांगातीं । जिजायी पुसे तीस एकांतीं । गोंजारूनि प्रीतीं
निज लोभ ॥ २० ॥ म्हणे दूध मागूनियां मजला । देउळी नेतो तुझा व्याला । तें सत्याचि पीत असतो काळा । ऐसें मजला सांगावें
॥ २१ ॥ ऐकोनि म्हणे भागीरथी । सत्याचि दूध पीतसे मूर्ती । उरलें शेष तें वडील घेती । मजही देती किंचित ॥ २२ ॥ ऐकोनि

लेंकुराची वाणी । आश्चर्य करीत आपुलें मनीं । मग तुकयासि म्हणे एके दिनीं । दूध पाजोनि मी येतें ॥ २३ ॥ अवश्य म्हणतां प्रेमळ भक्त । अवली जातसे देऊळांत । संकटीं पडिले पंढरीनाथ । म्हणे कैसी मात करावी ॥ २४ ॥ दूध प्यावें जरी ये समयीं । तरी सप्रेम इचा भावार्थ नाहीं । आणि चमत्कार न दाखवितां कांहीं । तुकयासि गृहीं गांजील हे ॥२५॥ ऐसें म्हणोनि रुक्मिणीकांत । उगेच राहिले मग निवांत । अवलीचें भय वाटलें बहुत । विरोध चपल वित म्हणोनि ॥२६॥ दूध प्यावें कीं न प्यावें येथें । ऐसे कल्पीत पंढरीनाथ । भक्तासाठीं सगुण होत । येऱ्हवीं गुणातीत जगदात्मा ॥ २७ ॥ जो क्षीराब्धिवासी देवाधिदेव । त्याचाही दुग्धांत पडिला जीव । तरी नायके आकळिला शिव । नवल अपूर्व मज वाटे ॥ २८ ॥ अंधारें कोंडिला वासरमणी । कीं चंद्रकांत तो हिवें करून । काळासि भय वाटलें मनीं । येतो ऐकोनि बागुल ॥ २९ ॥ प्रभंजन कोंडला पिंजऱ्यांत । आकाश आडकलें घागरींत । नक्षत्र जें आदित्य लोपत । हें तो अघटित दिसतसे ॥ ३० ॥ अविनाश निश्चळ परब्रह्म मूर्ती । ज्यासि योगी हृदयीं ध्याती । तो चिंताक्रांत जाहला चित्तीं । सप्रेम भक्तीचेनि बळें ॥ ३१ ॥ मग दूध घेवोनि तांब्याभर । अवली देउळासि आली सत्वर । चित्तीं नसेचि प्रेमादर । शुद्ध अंतर मग कैचें ॥ ३२ ॥ दूध उष्ण होतें फार । बैसोनि निववावें क्षणभर । हा आवलीस न कळेचि विचार । दावेदार म्हणे देवा ॥ ३३ ॥ म्हणे वेडा करोनि घरधनी । यानें लाविला आपुलें भजनीं । यास्तव विरोध चालवी मनीं । मग चक्रपाणी करी काय ॥ ३४ ॥ उष्ण तांब्या लाविला होटीं । तेणेंचि पोळला जगजेठी । मान वांकडी करितां दिठी । अवली पोटीं विस्मित ॥ ३५ ॥ म्हणे काळा पाषाण दिसतो नयनीं । परी जीव आहे या लागुनि । दूध पाजितो नित्य घरधनी । असत्य करणी हे नोहे ॥ ३६ ॥ अवली निहाळूनि पाहे कोडें । उगीच विलोकी देवाकडे । तों होंटासि आला असे फोड । म्हणे नवल रोकडें हे दिसे ॥ ३७ ॥ ऐसा चमत्कार देखोनि पाहीं । घरा आली जिजावायी । तों तुक्याचें ध्यानीं शेषशायी । येऊनि काय सांगतसे ॥ ३८ ॥ तुवां आळस धरोनि चित्तीं । दूध पाठविलें अवली हातीं । तिनें उष्ण तांब्या लाविला होंटीं । विचार पोटीं न केला ॥ ३९ ॥ तुवां टाकिला संसार । यास्तव मजसीं चालवी वैर । नांव ठेविलें दावेदार । माया अणुमात्र असेना ॥ ४० ॥ ऐसें सांगतां हृषीकेश । तुका जाहला कासाविस । कांतेसि म्हणे उष्ण कैसे । दूध देवास पाजिलें ॥४१॥ मग अवली बोले प्रतिवचन । तूं नित्य देउळीं गातोसि गाणें । कीं द्वादश गांवें गिळिला अग्न । तुझ्या श्रीकृष्णें गोकुळीं ॥ ४२ ॥ आणि माझें दूध किंचित उष्ण । यास्तव वांकडी केली मान । होटासि फोड आला तरतरोन । पाहे जाऊन देऊळीं ॥४३॥ जरी मागील सत्य असती लीला । तरी दूध पितां कैसा पोळला । ऐकोनि अवलीच्या बोला । तुका जाहला सद्गदित ॥४४॥ मग जावोनि धांवत धांवत । देउळीं जाऊनि मूर्ति पाहत । तों मान आंखडली पंढरीनाथें । फोड दिसत होंटासी ॥४५॥ मग तुकयाचें

सप्रेम मन । अश्रुपातें भरले लोचन । जैसें बाळक पोळतां देखोन । कांसाविस मन होय मातेचें ॥ ४६ ॥ तैशाच परी प्रेमळ तुकया। गंहिवरे कंठ दाटोनियां । म्हणे तूं पोळलासि पंढरीराया । अनाथ सखया जगद्गुरु ॥४७॥ स्तुति स्तोत्रें गातां पाहीं। फोड तो जिरला ते समयीं । परी मान वांकडी राहिली कांहीं । ते पाहती सर्वही अद्यापि ॥ ४८ ॥ पुढें पाहावया चमत्कार । साक्ष ठेवीत रुक्मिणीवर । आपुल्या दासाची कीर्ति थोर । करुणाकर वाढवीतसे ॥ ४९ ॥ एकदा चाकणाच्या रानांत । तुकया जातसे पंथें । तंव डांस येऊनि अगणित । झोंबले बहुत शरीरासी ॥ ५० ॥ हें देखोनियां वैष्णवभक्त । त्याचें दुःख न मानी किंचित । म्हणे परोपकारीं देह लागत । म्हणवोनि निवांत बैसला ॥ ५१ ॥ आपण शरीर रक्षावें जाण । तरी इतुक्या जीवांचें दुखावेल मन । नश्वर देह जाईल जाण । अनुतापें पूर्ण ओळखिलें ॥ ५२ ॥ डांस डसती नाना रीतीं । शरीरासि बहु यातना होती । परी तो दुःख न मानोनि चित्तीं । भजन प्रीतीं करीतसे ॥ ५३ ॥ तों वाटसऱ्याचें रूपें निश्चिती । सत्वर पावले रुक्मिणीपती । सिंदीचा फड घेतला हातीं । डांस झोंबती म्हणोनियां ॥ ५४ ॥ आणिकही पांतस्थ आले कोणी । त्यांनीं तुकयासि देखिलें नयनीं । परी आपल्या जिवाच्या भयें करोनि । नुढाविती कोणी सर्वथा ॥ ५५ ॥ तान्हयाचा कळवळा पाहें । माते वांचूनि कोणासि न नये । तैसी कृपाळु विठ्ठल माये । येतसे लवलाहे तुकया जवळी ॥ ५६ ॥ डांस उडवोनि आपुल्या करीं । निजकरें कुरवाळीत श्रीहरी । तेणेंचि सुख जाहलें शरीरीं । मग तुका सत्वर चालिला ॥ ५७ ॥ अस्तमानासि जातां दिनकर । तुका पावला देहू क्षेत्र । मग राउळासि जातां सत्वर । रुक्मिणीवर पाहिला ॥ ५८ ॥ जैसी दंड काठी पडे खालतीं । उठावें हें नेणे चित्तीं । दंडवत घातलें तयारीतीं । सप्रेम गती करोनी ॥ ५९ ॥ रात्री समय होतांचि सत्वरी । कीर्तन मांडिलें ते अवसरीं । जय पतीतपावना श्रीहरी । भवसागरीं तारावें ॥ ६० ॥ खावया न मिळो अन्न । पुढें न वाढो संतान । परी तुझी कृपा इच्छितो जाण । विचार आन नसे कीं ॥ ६१ ॥ शरीर विटंबो नानारीतीं । संसारीं होवोत कां विपत्ती । परी तुझी कृपा इच्छितों चित्तीं । नलगे श्रीपती आन कांहीं ॥ ६२ ॥ जैसी माझी वाचा मजसी । नित्य स्वमुखें उपदेशी । आणिक कोणी पुसती त्यासी । याची मार्गासी लावीन ॥ ६३ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णव भक्त । सप्रेम भावें भजन करित । रामकृष्णादि नामगात । ऐकवित जनासी ॥ ६४ ॥ तीन प्रहर लोटतां रात्रीं । मग उजळिली मंगळारती । ओवाळुनि श्रीरुक्मिणीपती । दंडवत प्रीतीं घातलें ॥ ६५ ॥ घरासि गेले श्रोते सज्जन । मग तुकयानें घातलें आसन । नामरूपीं लावोनि मन । सप्रेम भजन करितसे ॥६६॥ ऐसे लोटतां कांहीं दिवस । तोंच चरित्र वर्तलें अति सुरस । दोघे पुत्र असती तुकयासी । नामें तयांस कोणती ॥ ६७ ॥ वडील कुमर तो महादेव जाण । विठोबा धाकट्याचें नामाभिधान । तंव ज्येष्ठ पुत्रा कारणें । व्यथा दारुण जाहली ॥ ६८ ॥ मूत खडा लागला असे । तेणें होतसे

कासाविस । अवली उपाय बहुवस करीतसे तेधवां ॥ ६९ ॥ जें जें औषध सांगती कोणी । तें तें मेळवूनि आणीत नाना प्रयत्नीं । पथ्य करवीत तया कडोनी । झुरे निशिदिनीं पुत्र प्रलोभें ॥ ७० ॥ वैद्य वाणी केलें फार । परी गुण न येचि अणुमात्र । कुलदैवताचे अंगारे । आणुनि साचार लावितसे ॥ ७१ ॥ पंचाक्षरी काढिती समंधा । त्यांच्या घरासि जातसे सदा । ते म्हणती जाहली भूतबाधा । आमुच्या शब्दा सत्य मानी ॥ ७२ ॥ गंडे भालदोऱ्या आपुले हातीं । मुलांच्या गळ्यांत आणूनि बांधिती । सांडणीं टाकिलीं नाना रीतीं । ममता चित्तीं अनिवार ॥ ७३ ॥ ऐसे उपाय केले फार । परी गुण न येचि अणुमात्र । यास्तव अवली चिंतातुर । म्हणे कैसा विचार करूं आतां ॥ ७४ ॥ रोगें मुलास व्यापिलें फार । अन्न न खाय अणुमात्र । यास्तव अवली चिंतातुर । म्हणे बरवा विचार दिसेना ॥ ७५ ॥ भ्रतार जाहला देवपिसा । लेंकरासी तों ऐसी दशा । भरंवसा नाहीं वांचेल ऐसा । म्हणवोनि उसासा टाकीतसे ॥ ७६ ॥ मुलासि लघवी करितां देखा । सर्वांगासि उठती तिडका । तेणें उदास होऊनि तुका । एकांत सुखा जातसे ॥ ७७ ॥ अवली तळमळीतसे मनीं । पाणवटा सांगतसे गाऱ्हाणीं । लेंकरूं पीडिलें व्यथेनें । काय साजणी करूं आतां ॥ ७८ ॥ देवदेव्हारे केले बहुत । औषधासि तों नाहीं गणित । अंगारे वाहतां दिवस रात । जीव बहुत निबुंजला ॥ ७९ ॥ मुलाच्या सुखाची करोनि मोरी । ओखदें दीधलीं नानापरी । परी दिवसेंदिवस अधिकोत्तरी । व्यथा शरीरीं थोरावे ॥ ८० ॥ भ्रतार आधींच देवपिसा । त्यानें टाकिली संसार आशा । माझ्या जीवाचा होतो वळसा । विचार कैसा सुचेना ॥ ८१ ॥ ऐसें ऐकोनि शेजारिणी । घरीं पाहावयासि आल्या कोणी । मुलाची अवस्था देखोनी । अशुभ वाणी वदती त्या ॥ ८२ ॥ मुलासि दृष्टीनें जंव पाहत । तों हात पाय झाले काष्ठवत । म्हणती औषधें देऊनियां नित्य । कासया व्यर्थ शिणसी तूं ॥ ८३ ॥ तुझ्या भ्रतारानें निश्चितीं । हृदयीं धरिला रुक्मिणीपती । यास्तव विघ्नें नानारीतीं । अवचित उद्भवती संसारीं ॥ ८४ ॥ श्रीहरीचें भजन करितां । प्रथमाचि मेली पुत्रकांता । हृदयीं धरितां पंढरीनाथा । तैंहूनि अटता काळ आला ॥ ८५ ॥ ऐकोनि शेजारिणीचें वचन । हृदयीं धडकला क्रोधाग्न । मर्कटासि पाजिलें मदिरापान । वृश्चिकें ताडण मग केलें ॥ ८६ ॥ मग तें छंद नानारीतीं । करितां नाकळे कोणाप्रती । अवलीस जाहली तैसीच रीती । दांत खाती करकरा ॥ ८७ ॥ आधींच देवद्रोह होता मनीं । वरी साह्य झाल्या शेजारिणी । दुर्योधनासि जैसा शकुनी । कुबुद्धि कानीं सांगतसे ॥ ८८ ॥ हिरण्याक्षासि साह्य देखा । हिरण्यकशिपु पाठिराखा । प्रीति लावोनि एकमेकां । वैकुंठनायका निंदिती ॥८९॥ नातरी विष्णुद्रोही दशानन । तयासि साह्य कुंभकर्ण । बुद्धिभ्रंश होऊनि रावणें । सीताहरण पैं केलें ॥ ९० ॥ नातरी ताटिका राक्षसिणी । श्रीराम द्वेष वागवीत मनीं । तीस शूर्पणखा भेटली वनीं । दुर्बुद्धी कानीं सांगावया ॥९१॥ तैशाच रीतीं जिजाबायी । देवद्रोह वागवीतसे जीवीं । आणि शेजारिणी सांगतीं सर्वही । विठोबा जिवीं न धरावा ॥ ९२ ॥ त्याच्या भजनीं लागतां निश्चित । संसार जाहला

१ भूतास. २ औषधे. ३ माकडास. ४ विंचवाने. ५ रावण.

वाताहत। मुलासि व्यथा जाहली अद्भुत। हें नाहीं वांचत सर्वथा ॥९३॥ ऐसें बोलोनि ये क्षणीं। घरासि गेल्या शेजारिणी। अवली तळमळ करीतसे मनीं। दृष्टीसी पाहुनी पुत्रासी ॥ ९४ तों सायंकाळ होतांचि निश्चित। मुलाचें निःशेष कोंडलें मूत। मृदंगाऐसें पोट फुगत। न हलवित हातपाय ॥ ९५ ॥ मस्ता पुसतां न बोले उत्तर। हात पाय तों पडलें गार। अवली म्हणे न दिसे बरें। कैसा विचार करूं आतां ॥ ९६ ॥ म्हणे पोर तो मरतसे निर्धारीं। हें सर्वथा न चुके ये अवसरीं। तरी आतां देउळांत जाऊनि सत्वरी। काळ्यावरी आपटावें ॥ ९७ ॥ ज्याणें मोडोनि संसार। ध्यानि लाविला निज भ्रतार। तरी मरो घातला आहे कुमर। हा त्यावर आपटावा ॥९८॥ होणार तें न चुकें निर्धारीं। परी निमित्त घालावें तयावरी। ऐसें म्हणवोनि ते अवसरीं। महादेव करी ओढिला ॥ ९९ ॥ फरफरा ओढीत साचा। मार्ग धरी देउळाचा। मग एके हातीं धेतला मोचा। सूड देवाचा घेईन म्हणे ॥ १०० ॥ ऐसें बोलोनि जिजाबायी। देउळासि आली ते समयीं। हें जाणोनि शेषशाई। विस्मित जीवीं होतसे ॥ १ ॥ मनांत म्हणतसे रुक्मिणीपती। आतां कोणती करावी युक्ती। अवली मारितां मजप्रती। होईल अपकीर्ती जनांत ॥ २ ॥ ऐसें म्हणवोनि परब्रह्म रूपडें। पाहे रुक्मिणीच्या मुखाकडे। आतां हें कसें निरसेल सांकडें। तेंच रोकडें विचारी ॥ ३ ॥ ऐसें ऐकोनि आदिमाया। जी परब्रह्म आंगीची छाया। ते म्हणतसे जी पंढरीराया। चिंता कासया करीतसां ॥ ४ ॥ तुमच्या इच्छामात्रें निश्चिती। अनंत सृष्टि मोडती घडती। प्रकाशमान करावया क्षिति[1]। वृथा गभस्ती[2] चिंतातुर ॥ ५ ॥ अवर्षण पडिलें कीं तत्त्वतां। जीवन सर्वथा न मिळे आतां। हे उदधीसि कासया पाहिजे चिंता। अनाथनाथा श्रीविठ्ठला ॥६॥ उष्णकाळीं होतो उबारा। यास्तव पाहिजे विंजण वारा। ही चिंता कासया रोहिणीवरा। ऐसें विचार अंतरीं ॥ ७ ॥ तुम्हीं कृपादृष्टीं जयाकडे। पाहातसां निज निवाडें। तरी पाषाण गोटे आणि खडे। परीस रोकडे होतील कीं ॥८॥ तुझ्या दासाचें ऐसें सामर्थ्य। कीं मृतप्रेत होईल जिवंत। ऐसें रुक्मिणी बोलोनि मात। मग निवांत राहिली ॥ ९ ॥ तों इकडे अवलीनें फरफर। देउळीं ओढित आणिलें पोर। म्हणे यासि आपटोनि काळ्यावर। मग मोच्यावर मारीन मी ॥११०॥ ऐसा निकर धरूनि मानसीं। संमुख आली देवापासी। पोर उचलिलें आपटावयासी। तों रुक्मिणी तिजसी बोलत ॥ ११ ॥ दुसरें देउळी नसतांचि कोणी। मूर्ति आडोनि उमटली ध्वनी। आतां आरोग्य केलें याज लागोनी। जाय तूं सदनीं आपुलिया ॥ १२ ॥ अवलीं चित्तीं विस्मित होय। म्हणे पाषाणमूर्ती बोलती काय। सवेंचि लेंकुराकडे पाहे। तों मूत लवलाहें सूटलें ॥ १३ ॥ देउळांत चिखल होईल फार। मग लेंकरूं घेऊनि आली बाहेर। घागरीस चोंच पडली थोर। तैसा कुमर मुततसे ॥ १४ ॥ नाना कुपथ्य होतें उदरीं। ते बाहेर पाडिलें इंद्रियद्वारीं। मातेसि म्हणे ते अवसरीं। क्षुधा उदरीं मज वाटे ॥ १५ ॥ मग विस्मित होऊनि निज अंतरा। म्हणे

१ पृथ्वी. २ सूर्य.


भय वाटलें रुक्मिणीवरा । यास्तव आरोग्य केलें कुमरा । मग निज मंदिरांत ते गेली ॥ १६ ॥ मुलासि क्षुधा लागली बहुत । मग जेवावया बैसविलें त्यातें । हा तुकयासि कळतां वृत्तांत । म्हणे पंढरीनाथ शिणविला ॥ १७ ॥ प्राणांत व्यथा होती मुला । एकाएकींच अरोगी झाला । नकळे ईश्वराची लीला । त्याची कळा तो जाणे ॥ १८ ॥ मग भोजन करोनि वैष्णवभक्त । सत्वर जातसे देउळांत । चार घटिका लोटतां रात । प्रारंभ करीत कीर्तनासी ॥ १९ ॥ कीर्तन करितां वैष्णव जन । तुकयासि ध्रुपदी होते कोण । त्यांची ऐका नामाभिधानें । प्रेम जयांचेनी दुणावे ॥ १२० ॥ गंगाधर मवाळ साचार । कडुसांत होता द्विजवर । तो तुकयाचा लेखक निरंतर । प्रसादिक उत्तर लिहितसे ॥ २१ ॥ दुसरा संताजी तेली जाण । उपनांव जगनाडे याकारणें । चाकणांत होता बहुत दिन । तुकयासि शरण मग आला ॥ २२ ॥ ऐसे दोघे उभयतां । सद्भावें शरण वैष्णव भक्ता । सोडोनि संसाराची आस्था । लिहिती कविता निजांगें ॥ २३ ॥ हरि कीर्तन करितां नित्य । तुकया मागें धरिती धृपद । तेणें रंग ओढवे अद्भुत । सप्रेम नृत्य करिताती ॥ २४ ॥ दुराशा सांडोनि निश्चिती । धरिली त्यांणीं सत्संगती । कीर्तनामाजी धृपद धरिती । सप्रेम गती करोनियां ॥ २५ ॥ जैसी पांथस्थाची मनोवृत्ती । जाणोनि रथ चालवीत सारथी । कीं उपचार भोग इच्छितां पती । तेथें अनुकूळ असती पतिव्रता ॥ २६ ॥ कां हाडपी विडा देतसे राया । सेवेसि झिजवी आपुली काया । परी उपकार न दावीच तया । स्वहिता आपुलीया लागोनी ॥ २७ ॥ तैशाचपरी ते दोघे-जण । गंगाजी मवाळ ब्राह्मण । दुजा संताजी तेली जाण । जीवें प्राणें अनुसरले ॥ २८ ॥ टाळ विणा घेऊनि हातीं । कीर्तनामाजी धृवपद धरिती । मंजुळ स्वर मागूनि देती । सप्रेम गती करोनियां ॥ २९ ॥ असो चार घटिका लोटतां रात । कीर्तन आरंभीत वैष्णवभक्त । करुणारसें पंढरीनाथ । गीतीं आळवित निजप्रीतीं ॥ १३० ॥ ध्यानांत आणूनि रुक्मिणीवर । म्हणे कारिसी कीं न करिसी अंगिकार । हाचि मज पडिला विचार । दिवस रात्र झुरतसें ॥ ३१ ॥ पायांचें दर्शन देसी कीं नाहीं । यास्तव झुरतसे आपुले जीवीं । बोलसी कीं न बोलसी वचन कांहीं । तळमळ देहीं वाटतसे ॥ ३२ ॥ होईल कीं न होईल आठव माझा । हाच संदेह गरुडध्वजा । तूजवांचूनि केशवराजा । साह्य तो दुजा नसे कीं ॥ ३३ ॥ मीतरी कर्माचा हीन । यास्तव जीवीं वाटतो शीण । तूं अनाथबंधू करुणाघन । तें साच वचन करी आतां ॥ ३४ ॥ तुम्हां पडेल भीड फार । तरी मी नांवाचा नसें थोर । सर्वप्रकारें सेवाचोर । साक्ष अंतर मज माझें ॥ ३५ ॥ नाहीं याति शुद्ध कुळकर्म । नेणें ठायीं पडेल वर्म । सर्वथा नेणें भक्तिप्रेम । तूं पुरुषोत्तम जाणसी ॥ ३६ ॥ तपोनिधि दान धर्मशीळ । आंगीं नसे एकही बळ । भूमीभार मी जाहलों केवळ । हें तूं कृपाळु जाणसी ॥ ३७ ॥ ऐशी करुणा भाकोनि प्रीतीं । देहींच तुका विदेह स्थिती । हृदयीं आविर्भवली पांडुरंगमूर्ती । सप्रेम भक्तीचेनि बळें ॥ ३८ ॥ कीर्तनीं नाचे प्रेमें करून । क्षणक्षणां घाली लोटांगण ।

१ जातीने.

तुकयासि नाटवे भक्तपण । विसरला देवपण विठोबा ॥ ३९ ॥ हें जाणोनि सारंगधर । मनांत जाहले चिंतातुर । म्हणे तुका समरसीं मिळाला जर । तरी कोणासी उत्तर बोलावें ॥ १४० ॥ संकट पडतां आळवील कोण । मग मी कोणाचें करूं धावण । ब्रह्मरूप काया केली यानें । नामसंकीर्तन करूनियां ॥४१॥ ऐसें म्हणवोनियां देखा । आलिंगूनि हृदयीं धरिला तुका । मग देहभावासि येतां निका । करुणा अनेका भाकीतसे ॥४२॥ म्हणे दीनदयाळा पंढरीनाथा । तूंचि माझी मातापिता । बहीण बंधु इष्टमित्र चुलता। नसे अनंता तुजविण ॥ ४३ ॥ विठोबा तूंचि माझा सद्गुरु थोर । निजांगें उतरी भवसागर । नाम गायीन निरंतर । ऐसा वर मज देयी ॥४४॥ कीर्तन करोनि ऐशा रीतीं । मग उजळिली मंगळारती । ओंवाळूनि श्रीरुक्मिणीपती । दंडवत प्रीतीं घातलें ॥ ४५ ॥ यावरी म्हणे सारंगधर । तुका नामयाचा अवतार । सगुणीं प्रेमा याचा थोर । यास्तव साकार मी झालों ॥ ४६ ॥ अद्वैत शास्त्र नावडे यासी । यास्तव शरण जाय सद्गुरूसी । पुढें वाट पडेल ऐसी । गुरुभक्तीसी अवरोध ॥ ४७ ॥ एक श्रेष्ठ आचरला जैसें । जन पाहूनि वर्तती तैसें । तरी आपण धरूनि विप्रवेष । द्यावा तुकयास अनुग्रह ॥ ४८ ॥ तंव रुक्मिणी म्हणे पंढरीनाथा । माझी विनंति परिसा आतां । तुम्ही जयासि अनुग्रह देतां । तरी अमर तत्वतां तो होय ॥ ४९ ॥ याचविषयीं तुम्हाकारणें । गोष्टी सांगतें पुरातन । ब्रह्मशापें यादव संपूर्ण निमाले । तेथें उद्धव आपण रक्षिला ॥ १५० ॥ तुम्हीं अनुग्रह करितांचि पाहीं । ब्रह्मशापाचें न चले कांहीं । उद्धव वांचविला ते समयीं । भागवत सर्वही सांगोनी ॥ ५१ ॥ राम अवतारीं बिभीषणभक्त । दुसरा अंजनीसुत हनुमंत । ज्याच्या मस्तकीं ठेवितां हस्त । अमर होत देह त्याचा ॥ ५२ ॥ आतां तुकयाचें मस्तकीं ठेवितां कर । तरी याचें शरीर होईल अमर । ऐकूनि रुक्मिणीचें उत्तर । सारंगधर हांसले ॥ ५३ ॥ म्हणे यथार्थ बोलसी वाचा । तुका जिवलग प्राण आमुचा । यासि घात नलगे काळाचा । तो मंत्र साचा देईन मी ॥ ५४ ॥ ऐसें म्हणवोनि करुणाघन । शुभमुहूर्त पाहिला सुदिन । माघ शुद्ध दशमी जाण । गुरुवार पूर्ण ते दिवशीं ॥ ५५ ॥ ध्यानांत आणूनि पांडुरंगमूर्ती । तुका निद्रित असतां रातीं । स्वप्न देखिलें कैशा रीतीं । तें सादर संतीं परिसिजे ॥ ५६ ॥ इंद्रायणीसि करोनि स्नान । देउळासि जात वैष्णव जन । हातीं असती तुळसी पानें । तों मार्गी ब्राह्मण देखिला ॥५७॥ तुकयाची ऐसी असे रीत । ब्राह्मण देखिला अथवा संत । तयासि सांष्टांग दंडवत । सर्वथा घालित निजप्रेमें ॥५८॥ जैसा का जागृतीचा मोळा । तरी स्वप्नही तैसेंचि दिसे डोळा । हा तों अनुभव असे सकळां । वैष्णवी लीला मायेची ॥ ५९ ॥ असोत आतां हीं भाषणें । तुकयानें मार्गी देखतां ब्राह्मण । तयासि वाहोनि तुळसीपान । सांष्टांग नमन पैं केलें ॥ १६० ॥ मग संतुष्ट होऊनि द्विजवर । तुकयाचें मस्तकीं ठेविला कर । रामकृष्णनाम सांगीतला मंत्र । जगदुद्धार होय जेणें ॥ ६१ ॥ गुरुपरंपरा ते अवसरीं । निजमुखें सांगे तेव्हां श्रीहरी । ते सादर

होऊनि श्रवण द्वारीं । श्रोतीं चतुरीं परीसिजे ॥ ६२ ॥ राघव चैतन्य भक्त वैष्णव । तयासि शरण चैतन्य केशव । बाबा चैतन्य माझें नांव । तुकयासि देव बोलिले ॥६३॥ श्रीपांडुरंगाचें उपासन । नको सोडूं तयाचें चरण । मग तुका संतुष्ट होऊनि मनें । सद्गुरूकारणें विनवित ॥ ६४ ॥ स्वामी घरासि येऊनि सत्वर । माझा आश्रम करा पवित्र । स्वयंपाक करोनि आपुल्या करें । जेवा पोटभर त्या ठायीं ॥६५॥ ऐकोनि तयाची वचनोक्ती । काय म्हणतसे रुक्मिणीपती । पावशेर तूप देशी प्रीतीं । तरी सदनाप्रती मी येतों ॥ ६६ ॥ ऐकोनि द्विजवराची मात । अवश्य म्हणे वैष्णवभक्त । मग ब्राह्मणाचा धरोनि हात । तुका येत निज मंदिरीं ॥ ६७ ॥ मग कांतेसि म्हणे भक्तवैष्णव । आपुल्या मंदिरासि आले देव । यांसि साहित्य देऊनि सर्व । घृत द्यावें मागती तें ॥६८॥ ऐसें तुका बोलतां वचन । कांता जाहली क्रोधायमान । म्हणे कोठोनि आला मेला ब्राह्मण । पावशेर तूप कोठून देऊं ॥ ६९ ॥ कोणे जातीचा द्विजवर । घरीं आणितो निरंतर । भांडीं जाळोनि केलीं खापर । करूं संसार कैशापरी ॥ १७० ॥ ऐसा कलह वाढतां थोर । तो सद्गुरु तेथूनि गेले सत्वर । ऐसें स्वप्न वैष्णववीर । देखिलें साचार ते दिवशीं ॥ ७१ ॥ जागृत अवस्थे येऊनि देखा । चित्तीं पस्तावे वैष्णव तुका । म्हणे मज भेटोनि सद्गुरु सखा । भवसागर देख उतरिला ॥ ७२ ॥ भोजनासि तूप पावशेर । निजमुखें मागती साचार । घरीं कलह वाढला थोर । यास्तव सत्वर देव गेले ॥७३॥ केशव चैतन्य राघव चैतन्य । बाबाजी आपुलें सांगितलें नामाभिधान । रामकृष्ण हरिमंत्र जाण । मजकारणें सांगितला ॥७४॥ माघशुद्ध दशमी साचार । सुदिन पाहोनि गुरुवार । माझा करोनि अंगिकार । गेले सत्वर सद्गुरु ॥ ७५ ॥ ऐसे तीन अभंग सप्रेमें । निजमुखें वदले तुकाराम । ते सर्वदा गाईल जरी प्रेमें । त्यासि भवश्रम बाधीना ॥७६॥ सद्गुरुकृपा ऐशा रीतीं । तुकयासि स्वप्नीं झाली निश्चिती । भाविक प्रेमळ अनुभवें जाणती । चरित्र ऐकती हरिकीर्तनीं ॥ ७७ ॥ पुढें परंपरा ऐसी चालत । जयासि तुकयाची अत्यंत प्रीत । तयासि स्वप्नीं अनुग्रह देत । अद्यापि चालत चमत्कार हा ॥७८॥ पुढील अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीरुक्मिणीकांत । ते सादर ऐका प्रेमळभक्त । एकाग्र चित्त करोनियां ॥ ७९ ॥ आपुल्या दासाची सत्कीर्ति । प्रगट व्हावया जनांत । यास्तव भक्तलीलामृत । पंढरीनाथ वदवितो ॥ ८० ॥ लीलाविग्रही रुक्मिणीवर । त्याचे हातीं असे सूत्र । निमित्त दीधले मजवर । हाही विचार तो जाणें ॥ ८१ ॥ दोन्ही कर ठेवूनि जघनीं[1] । विटेवरी उभा चक्रपाणी । महिपति त्याचा वरदानी । सद्गुण कीर्तनीं गातसे ॥८२॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । तेहेतिसावा अध्याय रसाळ हा ॥१८३॥ ॥ ३३ अध्याय ॥ ॥ ओव्या १८३॥

1 कमरेवर.


अध्याय ३४
तुकाराम
श्री विठ्ठल
श्रीगणेश
चिंतामणि देव

श्रीगणेशाय नमः । मी अनाथ निराश्रय संसारीं । अपंगही असें सर्वांपरी । परी तुझा म्हणवितो श्रीहरी । अभिमान अंतरीं तुज असो ॥१॥ भक्तिहीन ज्ञानहीन । शक्तीहीन वैराग्य नेणें । ऐसा जड मी अज्ञान । कोण तुजविण अपंगिता ॥२॥ जैसें अमंगळ मोरींतील नीर । तें कूपामाजी संचरलें जर । तरी अडाचेंहीं नासेल साचार । त्यासि पवित्र न सेविती ॥३॥ ना तेंच अमंगळ पाणी । गंगेसि मिळे जये दिनीं । तरी पवित्र होय तेच क्षणीं । वंदिती मुनी सिद्धऋषी ॥ ४ ॥ तैसा सर्वांविषयीं पतित । आणि तुज भलत्या भावें शरण येत । तयासि अपंगी वैकुंठनाथ । गुणदोष किंचित न पाहतां ॥ ५ ॥ वेदीं निंदिलें अत्यंज याती । ते जरी सद्भावें तुज भजती । तरी तेही उंचासि वंद्य होती । नाम श्रीपती जपतां तुझें ॥ ६ ॥ ऐसा तूं पतितपावन खरा । जगद्गुरु होशील चराचरा । ऐसें जाणोनि निज अंतरा । रुक्मिणीवरा तुज शरण ॥ ७ ॥ आतां तूं आपुल्या निज उचितें । करीं घात अथवा हित । बिरुदावळी जगविख्यात । ते नव्हे असत्य सर्वथा ॥ ८ ॥ अनंत भक्त तारिले श्रीपती । पुराण प्रसिद्ध त्यांची कीर्ती । त्यांमाजी एक मी मूढमती । अपंगी महीपती आपुला ॥ ९ ॥ मागिले अध्यायीं कथा ऐसी । स्वप्नीं अनुग्रह तुकयांसी । मग येऊनि जागृतीसी । आश्चर्य मानसी करितसे ॥१०॥ एके दिवसीं प्रेमळभक्त । जाऊनि बैसे अरण्यांत । म्हणे कर्कशेची पडली संगत । जाहली जनांत फजीती ॥ ११ ॥ गृहस्थाश्रम यास्तव राखावा । कीं अतीत अभ्यागतांची घडावी सेवा । हें तों नावडे तिच्या जीवा । चालवी दावा परमार्थी ॥ १२ ॥ स्वप्नीं तेही मधुर वचन । सर्वथा न बोले मजकारणें । बरें देवें तोडिलें बंधन । न गुंतेचि मन कोठेंही ॥ १३ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णव भक्त । भजन करीत प्रेमयुक्त । चार घटिका लोटतां रात । मग देउळी येत कीर्तनास ॥ १४ ॥ नानापरीचे करुणारस । आळवोनि करीत कीर्तन घोष । श्रवणासि येती श्रोते बहुवस । प्रेमळ उल्हास भाविक जे ॥ १५ ॥ चारी प्रहर करोनि कीर्तन । मग इंद्रायणीसी करीतसे स्नान । पांडुरंगाचें करोनि पूजन । अरण्यांत जाऊन बैसावें ॥ १६ ॥ कोणी भाकर आणूनि देत । तरी स्वल्प आहार सेवितसे तेथ । परी घरासि न जाय वैष्णवभक्त । कर्कशा संगत म्हणवोनि ॥ १७ ॥ ऐसे दोन मास गेले लोटोनी । तुका सर्वथा न जाय सदनीं । कांता देतसे गाऱ्हाणीं । शेजारिणी मेळवोनियां ॥ १८ ॥ म्हणे पिसा गांवीं असोनि जाण । मजकडे न पाहे परतोन । माझी वाट केली कोण । त्याकारणें पुसावा ॥ १९ ॥ भजन करीत बैसतो रानीं । खावयासि आणूनि देती कोणी । रात्रीं देउळासि येऊनी । टाळ कुटोनि नाचतसे ॥२०॥ तंव एके दिवसीं वैष्णवभक्त । स्नान करोनि देउळासि जात । अवली उदक घेऊनि येत । तों गांठ अवचित पडियेली ॥ २१ ॥ मग धरोनि तुकयाचा पदर । उभा केला वाटेवर । मग काय बोले कठिणोत्तर । चावोनि अधर तेधवां ॥२२॥ तुकयासि म्हणे त्या अवसरा । तूं दोन महिने न येसी घरां । तरी मी कोणासी होऊं दारा । या संसारा चालवूं ॥ २३ ॥ यावरी बोलतसे काय । विठोबा रखुमाई

बापमाय । यांचे पाय आठवीत जाय । तरी आपदा न होय संसारीं ॥२४॥ अवली म्हणतसे त्या अवसरा । तुम्हीं आतां चलावें घरां । येरू म्हणे ऐकसी विचारा । तरी भाक सत्वर मज देयी ॥ २६ ॥ कांतेनें वचन देऊनि त्यासी । मग घरासि नेलें तुकयासी । द्वारीं वृंदावनीं होती तुळसी । तया स्थळासी बैसले ॥ २६ ॥ ते दिवसीं होती हरिदिनी[1] । श्रवण करावयासि येती कोणी । अवली तयासि देखोनि नयनीं । वसवसोनी पाठिं लागे ॥ २७ ॥ तुका म्हणतसे त्या अवसरा । कोण येत कोणाच्या घरा । भूषण नावडेचि तुझियां अंतरा । दांत करकरां कां खासी ॥ २८ ॥ देवासाठी जाण साचार । ब्रह्मांड जाहलें आमुचें सोयरें । त्यांसी कोवळें बोलतां उत्तर । जातो पदर काय तुझा ॥२९॥ आपुला धंदा टाकू जाण। माझ्या धरासि येती जन। हेंचि मानूनि न घेसी भूषण। आणि वसवसोन धांवसीं ॥ ३० ॥ ऐसें बोलतां वैष्णवभक्त । अवली राहिली मग निवांत। परी लोक न येती वाडियांत । भय बहुत वागविती ॥ ३१ ॥ तुका बैसोनि वृंदावनीं । कांतेसि म्हणे तये क्षणीं । आतां एकाग्र होऊनि मनीं । कीर्तन श्रवणीं बैसावें ॥ ३२ ॥ अवली म्हणे नायकावें जरी । तरी वचन देऊनि आणिला घरीं । यास्तव बैसोनि शेजारी । श्रवण करी तेधवां ॥ ३३ ॥ एकांत देखोनि वैष्णवभक्त । निज कांतेसि उपदेश करित । म्हणे देहु क्षेत्र जाण येथें । धरिलें उक्ते पैं आम्हीं ॥ ३४ ॥ ऐशीं टक्के दिवाणधारा । देणें लागतो याचा सारा । नाहीं तरी काळोजी हुलदार । दाखवी दरारा बहुसाल ॥ ३५ ॥ ऐशीं टक्के म्हणसील काय । हा चित्तीं वाटेल संदेह । तरी ऐंशीं तत्त्वें करोनि देह । वेष्टित होय उभारा ॥३६॥ इंद्रियें दमितां दिवसरात । दहा टक्के झाडले यांत । पंचविषयांची नाहीं आर्त । संतोष चित्त सर्वदा ॥३७॥ आणिक कर्मइंद्रियें पांच म्हणती जनीं । ती हीं लाविलीं देवाकारणीं। मी कर्ता नाठवे मनीं । तरी गेलीं झडोनि सहजचीं ॥ ३८ ॥ दहा टक्के तों ऐशा रीतीं । झडोनि गेले सहजस्थिती । सत्तर तत्वें देहीं असती । त्यांची झडती न देववे ॥ ३९ ॥ पांडुरंग चौधरी जाण येथिंचा । म्हणे झाडा करीं सकळ बाकीचा । हंडा भांडीं गुरें साचा । ऐवज घरचा मागतसे ॥ ४० ॥ यां पूर्वीच कुळवाडी केली नसती । तरी कां सांपडतों याचे हातीं । तरी तूं उदास होऊनि चित्तीं । सोडवी मजप्रती निजकांते ॥४१॥ उदयीक द्वादशी सोमवार । स्नान करोनि येई सत्वर । मग पाचारोनि द्विजवर । लुटवी घर त्यां हातीं ॥ ४२ ॥ अन्नवस्त्र यांची चिंता । मनांत नको करूं सर्वथा । पांडुरंग बाप शिरीं असतां । तो उणें तत्वतां पडों नेदि ॥४३॥ माझें ऐकशील जरी उत्तर । तरी जगीं कीर्ती वाढेल थोर । म्हणावें भांडीं नेलीं चोरें । मेली गुरें चाऱ्याविण ॥ ४४ ॥ आसनि रसोनियां जाण । वज्रा ऐसें करावें मन । लेंकुरें जाहलीं नाहींत म्हणोन । करी सोडवण आपुली ॥ ४५ ॥ बळकट घालोनियां कांस । सांडी नाशवंताची आस । देवद्विज अतीत यांस । पूजी मंदिरास आणोनि ॥४६॥ वैष्णवाची दासी होऊनि भावें । संतासि अनन्य शरण जावें। विठोबाचें नांव घ्यावें । प्रेमभावें करोनियां ॥४७॥

१ एकादशी.

अकरा अभंग ऐशारीतीं । कांतेसि उपदेश केला प्रीतीं । पूर्ण बोध ग्रंथ त्यासि म्हणती । ऐकतां विरक्ती होय जीवा ॥४८॥ तीं तुकयाचीं अनुपम वचनें । साधकीं करितां नित्य पठण । भक्ति ज्ञान वैराग्यपूर्ण । होईल तेणें निश्चयेंसी ॥ ४९ ॥ तीं येथें संकळित बोलिलों उत्तरें । नाहीं वाढविला विस्तार । मग तुका करीत हरिजागर । नाना चरित्रें गावोनियां ॥५०॥ उदयासि येतांचि गभस्ती । मग उजळिली मंगळारती । कांतेसि क्षणभर वाणली विरक्ती । बैसतां संगतीं तुकयाच्या ॥५१॥ मग प्रातःकाळीं करोनि स्नान । जिजाबाई पाचारी ब्राह्मण । तेव्हां गुरें वासरें धनधान्य । भांडीं संपूर्ण लुटविलीं ॥५२॥ तों चुलींत राख होती निश्चिती । तेही संन्यासी घेऊनि जाती । म्हणती आंगासि लावुं विभूती । उदास वृत्ती बैसोनी ॥ ५३ ॥ कणगी उखळ मुसळ जातें । रितीं मडकींही नेली समस्तें । जीर्ण वस्त्र कांतेसि होतें । तें वाळूं परसांत घातलें ॥ ५४ ॥ तों महारिणीच्या रूपें तत्त्वतां । तुकयासि म्हणे रुक्मिणी माता । कांहीं वस्त्र असेल आतां । तरी द्यावें समर्था मजलागीं ॥ ५५ ॥ तुका विचारी मनांत । म्हणे हे प्रहारीण विन्मुख जात । मग वाड्या मागें होऊनि त्वरित । वस्त्र हातें वोढितसे ॥ ५६ ॥ महारिणीसि वस्त्र देऊनि जाण । खुणावोनि सांगे तिजकारणें । म्हणे सत्वर जाय वो येथून । कोणासी वचन न बोलतां ॥ ५७ ॥ हें गांवींचीं मुलें देखोनि नयनी । अवलीसि सांगती ते क्षणीं । म्हणती वस्त्र मागतां महारिणी । दीधलें वोढोनी तिजलागीं ॥ ५८ ॥ ऐकोनि तयांची वचनोक्ती । प्रपंचाकडे मुरडली वृत्ती । म्हणे घरासि समजावोनि आणितां पती । म्हणोनि विपत्ती हे झाली ॥ ५९ ॥ म्यां दळणकांड करोनि घरीं । संसार केला आजवरी । त्याचें तों बाहेर परभारी । भिकेवरी चालतें ॥६०॥ ऐशा प्रकारें चालतां योग । मज तों कोठें आठवला भोग । वचन देऊनि आणितां मग । सर्व त्याग करविला ॥ ६१ ॥ काळ्याचे पाय आठवीत जाय । तोचि अन्न वस्त्र पुरवील पाहे । त्याचा विश्वास धरूनि माय । घर लवलाहें लुटविलें ॥ ६२ ॥ एके रात्रींतूनि निश्चिती । दोन वेळां आठविले पाय चित्तीं । त्याची तों तत्काळ आली प्रतीती । होती संपत्ती ते गेली ॥ ६३ ॥ मग पाषाण घेऊनि मस्तकावर । अवली देवळासि चालिली सत्वर । म्हणे काळ्याचे पाय करीन चूर । केलासे निकर मानसीं ॥ ६४ ॥ ऐसा निश्चय करोनि चित्तीं । देउळासि चालिली सत्वरगती । तों थरथरां कांपे पाडुरंगमूर्ती[1] । म्हणे कैसी गती करावी ॥ ६५ ॥ देउळा माजी येतां पाहे । तो रुक्मिणी म्हणे करितीस काय । येरी म्हणे फोडितें पाय । घातकी आहे वर तुझा ॥ ६६ ॥ माझ्या भ्रतारानें रातीं । उपदेश केला नानारीतीं । एकदा पाय आठविले चित्तीं । तो दरिद्र मजप्रती आलें कीं ॥ ६७ ॥ धनधान्य गुरें समग्र । तें घेऊनि गेले द्विजवर । एक आड जुनें होतें वस्त्र । वोढोनि सत्वर तें दिधलें ॥ ६८ ॥ वस्त्र अन्न नसेचि कांहीं । भ्रतार तो केला विदेही । यास्तव संताप वाटतो जीवीं । ऐकोनि रखुमायी बोलतसे ॥ ६९ ॥ योगक्षेमाची चिंता पाहीं । सर्वथा न करीं आपुले जीवीं । मग मूठभर होत ते

---

१. पांडुरंगाचे

समयीं । देत लवलाहीं आदिमाया ॥ ७० ॥ आणि साडी चोळी एक पाहीं । स्वहस्तें देतसे रखुमायी । ती नसोनि लवलही । बाहेर जिजायी येतसे ॥ ७१ ॥ तें तुकयानें देखोनि निश्चित । म्हणे उतावेळ केलें इनें चित्त । देवें होन दीधले होते । ते बोलावूनि द्विजाते वांटिले ॥ ७२ ॥ निराश होऊनि प्रेमळभक्त । भजन करीत प्रेमयुक्त । देशोदेशी प्रगटली कीर्त । दर्शनासि येत लोक तेव्हां ॥ ७३ ॥ चमत्कार देखोनि नानारीतीं । लोक परस्परें बोलती । कीं साक्षात येऊनि पांडुरंगमूर्ती । नित्य जेविती तुकयासवें ॥ ७४ ॥ हेंचि चवडी देवांसि जाहलें श्रुत । ऐकोनि विस्मित तयांचें चित्त । म्हणती तुकयासि पाचारोनि येथ । कांहीं प्रचीतें पाहावी ॥७५॥ मग चिंतामणि देवांनी ते समयीं । तुकयासि निरोप पाठविला पाहीं । कीं येथवर येऊनि ये समयीं । भेटूनि लवलाहीं मज जावें ॥ ७६ ॥ जाणोनि तयांचे मनोगत । चित्तीं विचारी प्रेमळभक्त । म्हणे देवांनी केला आपुला हेत । तरी जावें त्वरित भेटावया ॥७७॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । तेथूनि गमन केलें सत्वरी । तो मार्गीं चालतां वाटेवरी । भजन करी निजप्रेमें ॥ ७८ ॥ अर्ध पंथ क्रमितां त्वरित । तो मनुष्य वाटेसि निरोप सांगत । कीं देवांनी तुमचा धरोनि हेत । भेटिसी निश्चित पाचारिलें ॥ ७९ ॥ अवश्य म्हणे वैष्णव भक्त । आमुचेंही हेंचि मनोगत । मग चिंचवडासी येऊनि त्वरित । गजवदनातें नमस्कारी ॥ ८० ॥ चिंतामणि देव ते समयीं । स्नान संध्येसि बैसले पाही । परी तुकाराम पातले गृहीं । हे विदित नाही तयांसी ॥ ८१ ॥ देवगृहीं एकांती बैसोन । मानसपूजा करिती जाण । तों नावरेचि चंचळ मन । कैशा रीतीं ते ऐका ॥८२॥ उपवनामाजी देखा । लाविली होती पुष्प वाटिका । त्याचा आठव उपासका । जा[illegible]ला निका ते समयीं ॥८३॥ म्हणे झाडांची आबाळ झाली बहूत । केरकचरा पडला आंत । तरी वनकरासी बोलावूनि येथ । शिक्षा निश्चित करावी ॥८४॥ ऐसी कल्पना येतांचि जाण । सवेंचि एकाग्र केलें मन । गजवदनाचें करोनि ध्यान । सर्वोपचारें पूजीतसे ॥८५॥ मानसपूजा करोनि त्वरित । चिंतामणि देव बाहेर येत । त्यासि देखोनि वैष्णवभक्त । घातलें दंडवत साष्टांग ॥८६॥ चित्तीं विकल्प वाटला देवा । म्हणे शूद्रासि नमस्कार न करावा । मग स्वमुखें म्हणे लाभ हा बरवा । आलेत केव्हां हें सांगा ॥८७॥ ऐकोनि म्हणे प्रेमळ भक्त । तुम्ही मानसपूजा करितां निश्चित । मग गेलांत पुष्पवटिकेंत । मी आलों त्वरित ते समयीं ॥८८॥ ऐकोनि तुकयाची वचनोक्ती । देवांसि आश्चर्य वाटलें चित्तीं । म्हणे परचित परीक्षक निश्चित्तीं । हे सत्यचि बोलती जनवर्ता ॥८९॥ आतां एक संशय वाटतो जीवें । कीं विष्णुमूर्ति जेविती याच्यासवें । ऐसें जन बोलती सर्व । तरी तें पुसावें भोजनांतीं ॥९०॥ याची प्रशंसा वाढली फार । ब्राह्मणही करिती नमस्कार । कांहीं चमत्कार दाविला जर । तरी सन्मान आदर आम्हीं करूं ॥ ९१ ॥ भाविक असेल वरचावर । तरी शिक्षा करावयासि नाहीं उशीर । तरी भोजन जाहलिया सत्वर । मग तुकयासि विचार पुसावा ॥ ९२ ॥ आतां वैश्वदेव समयीं आला अतीत । तरी विष्णुसमान

१ बोलावून. २ अनुभव. ३ गणपतीस. ४ अतिथी.

मानिजे त्यातें । पात्र वाहाडविलें तुकयातें । विप्रपंक्तींत तें समर्थी ॥ ९३ ॥ब्राह्मणांपासोनी हात चार । पात्र मांडविलें इतुक्या अंतरें । तुकयानें आणिक दोन पात्रें । वाढविलीं साचार त्यां हातीं ॥ ९४ ॥ देव पुसती तये क्षणीं । पात्रें वाढविली कोणा लागुनी । आणिक जेवणार असती कोणी । त्यांजलागोनी पाचारा ॥९५॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । एके पात्रीं रुक्मिणीकांत । दुसरें वाढिलें गजवदनातें । बोलावा तयाते स्वामिया ॥ ९६ ॥ गायत्रीमंत्रें प्रोक्षोनि पात्रें । ध्यानांत आणिला लंबोदर । नैवेद्य दाखवि झांकोनि नेत्र । मग तुका उत्तर काय बोले ॥ ९७ ॥ समुद्रामाजी करितां स्नान । एक भक्त बुडतांजाण । त्यानें गजवदनाचें केलें चिंतन । करीं धांवणें म्हणवोनि ॥ ९८ ॥ तयासि काढावया निश्चित । समुद्रांत गेला गौरीसुत । हा वृत्तांत जाहला माते श्रुत । तुम्ही नैवेद्य कोणातें दाखवितां ॥९९॥ याचा संशय वाटेल चित्तीं । तरी क्षण एक बैसोनि पाहावी प्रतीती । ऐकोनि देव आश्चर्य करिती । म्हणती याची स्थिती अनुपम ॥१००॥ एक अर्धघटिका लोटतां जाण । तो तत्काळ आले गजवदन । पीतांबर पिळोनि पाहतां जाण । तों क्षार जीवन लागतसे ॥ १ ॥ मग तुका विनंति करितसे त्यांसी । आतां बोलावा गणपतीसी । साक्षात जेववावें त्यासी । चित्त संतोषी तें होय ॥ २ ॥ ऐकोनि देव म्हणती त्यासी । प्रत्यक्ष मूर्ति जेवील कैसी । नैवेद्य दाखावितां देवासी । सुवास तयासी जातसे ॥ ३ ॥ यावरी म्हणे वैष्णवभक्त । प्रत्यक्ष गणपती जेवावया येत । तेणेंचि समाधान पाविजे चित्त । नाहींतरी व्यर्थ उपासना ॥ ४ ॥ जैसें क्षेत्र पेरिलें गोमटें । त्यासि कणसें आली घनदाट । परी त्यावरी कण न फुटे । तरी व्यर्थचि कष्ट गेले कीं ॥ ५ ॥ कां गगनीं अभ्रें दाटलें फार । फार । परी वर्षावि न होय आणुमात्र । तेवी दैवत न देतां साक्षात्कार । उपासना मंत्र ते वायां ॥ ६ ॥ फळावांचोनि वृक्षलता । कां जळा वांचुनि भ्यासुर[१] सरिता । संतानेंवीण सुंदर कांता । शोभाहीन तत्त्वता ते दिसे ॥ ७ ॥ भ्रताराविण अलंकार । कां प्राणावांचोनि जैसें शरीर । नातरी दृष्टीवांचूनि विशाळ नेत्र । व्यर्थचि साचार दीसती ॥८॥ तेवीं साक्षात्कार नेदितांचि दैवत । भजन पूजन तें गेलें व्यर्थ । ऐकोनि तुकयाचा वचनार्थ । आश्चर्य करित चिंतामणी ॥ ९ ॥ मग काय म्हणतसे तयाप्रती । आम्ही उपासिला श्रीगणपती । परी साक्षात येऊनि जेवील मूर्ती । हें सामर्थ्य निश्चितीं असेना ॥ ११० ॥ तुम्हीं म्हणवितां वैष्णववीर । स्वाधीन केला रुक्मिणीवर । तैसाचि आणूनि लंबोदर । जेववा सत्वर ये समयीं ॥ ११ ॥ साक्षात न येतां गजवदन । तरी आम्हीं सर्वथा न करूं भोजन । देखोनि देवांचें निर्वाण । काय म्हणे विष्णुदास ॥ १२ ॥ मी तुमच्या कृपें करूनि निश्चिती । प्रत्यक्ष जेववीत गणपती । मग दोन अभंग केली स्तुती । सप्रेम गती करोनियां ॥ १३ ॥ जयजयाजी लंबोदरा । चौदा विद्या गुणसागरा । सकळ सिद्धींच्या दातारा । परशुधरा गजवदना ॥ १४ ॥ तूं घागऱ्या[२] बांधूनि पायीं । नृत्य करिती जे समयीं । नारद तुंबर तटस्थ

१ गणपति. २ ढग.

सर्वही । तुझी नवायी देखोनी ॥ १५ ॥ तूं जयासि पाहसी कृपादृष्टीं । विघ्नें पळती बारावाटीं । भक्तासि रक्षिसी महासंकटीं । भवबंध फांसाटी तोडोनियां ॥ १६ ॥ ऐशा प्रकारें केली स्तुती । परी सर्वथा नयेचि तेथें गणपती । तुका विनवितसे मागुतीं । संकोच चित्तीं न धरावा ॥ १७ ॥ तुवां चिंतामणीच्या भक्तीस्तव पाहीं । येथें दोहविल्या वांझ्यागायी । ऐसें मी तों मागत नाहीं । आइतेंच जेवीं अन्न आतां ॥ १८ ॥ ऐकोनि तुकयाचें करुणा उत्तर । संतुष्ट जाहले गौरीकुमर । मग सगुणरूपें लंबोदर । पात्रावर बैसले ॥ १९ ॥ चिंतामणि देव आराध्यमूर्ती । देखोनि संतुष्ट जाहले चित्तीं । साष्टांग नमस्कार घातला प्रीतीं । सप्रेम गती करोनियां ॥ १२० ॥ मग तुकयाप्रती म्हणतसे तेव्हां । आतां विठोबासि बोलावा । तेणेंचि आनंद आमुच्या जीवा । तेथें जेववा साक्षात ॥ २१ ॥ तुकयानें झांकोनि नेत्रपातीं । हृदयीं चिंतिली पांडुरंगमूर्ती । देखोनि याची सप्रेम भक्ती । रुक्मिणीपती पातले ॥२२॥ सांवळा सुकुमार श्रीपती । शंख चक्र आयुधें हातीं । मुगुटीं रत्न किरळा फांकती । तेणें गभस्ती लोपला ॥ २३ ॥ दिव्य कुंडलें मकराकार । कांसेसि झळके पीतांबर । श्रीमुख साजिरें मनोहर । चरणीं तोडर मिरवतसे ॥ २४ ॥ ऐसी मूर्ति भव्य वाणी । देखतसे देव चिंतामणी । साष्टांग नमस्कार घातला धरणीं । आनंद मनीं न समाय ॥ २५ ॥ एके पात्रीं लंबोदर । चतुर्भुजमूर्ति सुंदर । एकदंत दिसे शुभ्र । सर्वांगीं सिंदूर चर्चिला ॥ २६ ॥ निजभक्त तुका वैष्णव जाण । आणिक देव चिंतामण । उभयतांसि साक्षात दर्शन । मग इतरांकारणें न दिसती ॥ २७ ॥ पात्रीं अन्नें वाढिलीं प्रीतीं । तीं निजकरें जेविती दोन्हीं मूर्ती । सरतां अन्न ते ब्राह्मण देखती । विस्मित चित्तीं मग झाले ॥ २८ ॥ देव भक्ताचिये पंक्तीं । ब्राह्मण जेविती यथानिगुती । जें जयासि रुचे तें सेविती । जाहली तृप्ती सकळांसि ॥ २९ ॥ श्रीपांडुरंगमूर्ति आणि मोरया । तयांसि करशुद्धि घालीत तुकया । मग मुखशुद्धि विडे देऊनियां । लागतसे पायां निजप्रेमें ॥ १३० ॥ मग निजभक्तांसि पुसोनि निश्चिती । अंतर्धान पावल्या दोन्ही मूर्ती । देवें तुकयासि आलिंगूनि प्रीतीं । दंडवत घालिती तेधवां ॥३१॥ तुकयानें देखोनि लवलाहें । निजकरें उठवी धरोनि बाहे । म्हणे आम्हांसि पूज्य तुमचे पाय । अनुचित काय हें स्वामी ॥ ३२ ॥ माझा स्वामी पंढरीनाथ । भृगूची हृदयीं वागवितो लात । तीर्थेंही तुमच्या चरणीं समस्त । तेथें मी हीनयात काय आहें ॥ ३३ ॥ ऐकोनि तुकयाची वचनोक्ती । चिंतामणि देव उत्तर देती । विष्णुभक्त म्हणूं नये हीन यातीं । ऐसें भागवतीं बोलिलें ॥३४॥ पर्वतमाजी कनकाद्रि थोर । कीं धनुर्धरांत श्रीजानकीवर । कीं योगियामाजी श्रेष्ठ शंकर । वैष्णववीर तूं तैसा ॥ ३५ ॥ भागीरथी श्रेष्ठ तीर्थांत । कीं नामधारकांत नारदभक्त । कीं सिद्धांमाजी अनसूया सुत । तैसाचि भागवत तुकया तूं ॥ ३६ ॥ श्रीहरिकीर्तन करोनियां । पुढें ब्रह्मरूप करिशील काया । ऐसेंचि येतसे माझिया प्रत्यया । तुझी सत्क्रिया देखोनी ॥३७॥ देवें स्वमुखें ऐशा रीतीं । स्तविलें तेव्हां तुकयाप्रती ।

२ सूर्य.


म्हणे तुमच्या प्रसादें निश्चित । आजि देखिले श्रीपती साक्षात ॥ ३८ ॥ यावरी म्हणे प्रेमळभक्त । हा आपुल्या कृपेचा महिमा निश्चित । मग आज्ञा मागुनि तयातें । देहुग्रामें पातले ॥ ३९ ॥ तुकयाची निरपेक्ष स्थिती । द्रव्य देतां न घेचि हातीं । ऐकोनि श्रोते आशंकित होती । वक्तयासी पुसती तेधवां ॥ १४० ॥ गृहस्थाश्रमी वैष्णवभक्त । मुलें लेंकुरें होतीं निश्चित । तरी उजविली कोणत्या पंथें । हें आम्हांतें परिसवीं ॥ ४१ ॥ ऐसा प्रश्न करितां श्रोतयां । वक्ता उत्तर देतसे तयां । तिघी कन्या होत्या तुकया । उजविल्या तया कोणे रीतीं ॥ ४२ ॥ वडिलीचें नांव काशीबाई । दुसरी भागीरथी पाही । धाकुटीनें नांव गंगुबाई । सत्कुळाठायीं जन्मल्या ॥ ४३ ॥ उपवर होत्या तिघीजणी । अवली चिंताक्रांत मनीं । म्हणे मुली उजवाव्या कैसेनी । तुकया लागोनि पुसतसे ॥ ४४ ॥ ऐकोनि कांतेची वचनोक्ती । माहेर जातसे सत्वरगती । स्वयातीचीं मुलें खेळत होतीं । ती घराप्रती आणिली ॥४५॥ ते दिवसीं होती लग्नतिथ । मग विप्र बोलावूनि वैष्णवभक्त । हळदी लावोनि वधू वरातें । लग्न त्वरित लाविलें ॥४६॥ दुध भात करोनि धरांस । जेवूं घातलें पंचामृत । दुसरे दिवशीं वरबापातें । वर्तमान श्रुत झालें कीं ॥ ४७ ॥ मग वऱ्हाड घेऊनि तिघे सोइरे भले । देहू गांवासी मागूनि आले । तेव्हां भाविकांनीं साहित्य केलें । सोहळे जाहले चार दिवस ॥ ४८ ॥ ज्याने सखा केला श्रीहरी । तरी विश्व त्यावरी कृपा करी । निज दासासी वैकुंठविहारी । भवसागरीं बुडो नेदी ॥ ४९ ॥ मोसगाडे जांबुळकर । हे सोइरे करी वैष्णव वीर । परी प्रपंचीं न गुंते आणुमात्र । पडिला विसर देहाचा ॥५०॥ विश्व तारावयासि देखा । कलीमाजी अवतरला तुका । महिमा न कळे अज्ञान लोकां । परी तो विश्वसखा जगद्गुरु ॥ ५१ ॥ ज्यानें कीर्तन करोनि वैकुंठी सहज । देहासहित लाविला ध्वज । तो वैष्णवभक्त महाराज । उपदेशी मज निजकृपें ॥ ५२ ॥ तुकयाची सप्रेम कळा । आळंदीस जाय वेळोवेळां । पंढरीची वाट पहात डोळा । सद्गदित गळा होतसे ॥५३॥ आणिक चरित्र वर्तलें गहन । तें सादर ऐका भाविकजन । बीड परगण्याचा देशपांडिया ब्राह्मण । पंढरीस धरणें बैसला ॥ ५४ ॥ तामस अनुष्ठान मांडिलें त्यानें । उपवास करी न सेवी अन्न । पुराण व्युत्पत्ति मज कारण । व्हावी म्हणोन इच्छितसे ॥ ५५ ॥ दहा दिवस बैसतां तेथ । स्वप्नीं सांगती पंढरीनाथ । तुवां सत्वर जानोनि आळंदीत[1] । ज्ञानेश्वरातें आराधी ॥ ५६ ॥ ते सांगती जैसी युक्ती । ऐकतां मनोरथ पूर्ण होती । ऐसे सांगतां रुक्मिणीपती । आला जागृतीं ब्राह्मण ॥ ५७ ॥ स्वप्नींचा दृष्टांत आठवोनि चित्तीं । मग तो पातला अलंकावती । म्हणे मज व्हावी भुक्तिमुक्ती । आणि पुराण व्युत्पत्ती तत्काळ ॥ ५८ ॥ ऐसी कामना धरोनि मनें । ज्ञानदेवीं बैसला धरणें । सर्वथा न सेवीच अन्न । तेणे शरीर क्षीण जाहलें ॥ ५९ ॥ बारा दिवस लोटतां सत्वर । संकटीं पडले ज्ञानेश्वर । म्हणती प्राक्तनहीन हा द्विजवर । वायांच शरीर दंडितसे ॥ १६० ॥ मग म्हणे

1 आळंदीस.

तूं देहू गांवी जावें त्वरित । तेथें तुकाराम वैष्णवभक्त । जो नामयाचा अवतार साक्षात । जगदुद्धारार्थ अवतरला ॥६१॥ ते जो अनुग्रह करितील तुज । तेथें विश्वास धरितां होईल काज । ऐसें सांगतां ज्ञानराज । तों आला द्विज जागृतीसीं ॥ ६२ ॥ स्वप्नींचा वृत्तांत आठवितां मनीं । तो विकल्प पातला अंतःकरणीं । म्हणे तुका तो शूद्र जातीचा वाणी । ऐकतों कानीं परस्परें ॥ ६३ ॥ त्याजपाशीं जातां पाहे । कैसेनि मनोरथ पूर्ण होये । ऐसा विकल्प आणूनि पाहे । देहूसि लवलाहे चालिला ॥ ६४ ॥ मग येऊनि तुकयाजवळ । वृत्तांत सांगितला सकळ । ऐकोनि विस्मित भक्तप्रेमळ । भविष्य कळलें सर्वंही ॥ ६५ ॥ म्हणे ज्याच्या वरदहस्तें निश्चिती । रेडा स्वमुखें वदला श्रुती । चांगदेव प्रचीत पहावयासी येती । मग चालविली भिंती प्रतापें ॥६६॥ भुक्ति मुक्ति त्याचें द्वारीं । सदा तिष्ठती कामारी । सोन्याचा पिंपळ असे द्वारीं । तो काय एक न करी स्वामी माझा ॥ ६७॥ ऐसें असतां ज्ञानेश्वरी । येथें पाठविला धरणेकरी । काय उणें त्याचें घरी । तुका अंतरीं विस्मित ॥ ६८ ॥ मी तरी दास नव्हे खरा । परी जनांत केला डांगोरा । कां हे उपाधि पाठविली घरा । ज्ञानेश्वरा दीनबंधु ॥ ६९ ॥ मी तुमचा लडिवाळ जनीं । अक्षर जोडोनि सांगतां कानीं । जैसी माता बाळका लागोनी । मंथोनि लोणी चारितसे ॥ १७० ॥ तैसे तुम्ही दीधलें उचित । ती आयती वचनें बोले जनांत । समर्थापासी उणें होतें । म्हणोनि धरणें येथें पाठविलें ॥ ७१ ॥ यापरी विस्मित होउनि मन । मग अकरा अभंग लिहिले जाण । त्या ग्रंथासि उत्तम ज्ञान । म्हणती सज्ञान अनुभवी ॥ ७२ ॥ धरणेंकरी बैसला जवळ । त्यापासीं देत भक्त प्रेमळ । आणि प्रसाद दीधलें महाफळ । तें ब्राह्मणें तत्काळ टाकिलें ॥ ७३ ॥ म्हणे मी पुराण व्युत्पत्ति इच्छितों मनीं । आणि प्राकृतज त्या दीधल्या लेहोनि । तरी व्यर्थंचि आलों ये ठिकाणीं । ऐसें म्हणवोनी चालिला ॥ ७४ ॥ मग अळंकावतीस जाऊन । ज्ञानदेवी बैसला धरणें । म्हणे माझें मनोरथ करी पूर्ण । यास्तव निर्वाण करितसे ॥ ७५ ॥ मग तेरा अभंग सत्वर । ज्ञानेश्वरासि लिहिलें पत्र । तुम्ही जाणोनि त्याचें जन्मांतर । मग येथें द्विजवर पाठविला ॥ ७६ ॥ इच्छिली वस्तु नाही संचित्तीं । ऐसें जाणोनि आपुले चित्तीं । अपेश दीलें मजप्रती । केली युक्ती हे कळली ॥ ७७ ॥ जैसी लटकियाची गाही । ते निवाडिजे दुसरे ठायीं । मी तो सेवा समर्पोनि पायीं । जाहलों उतरायी ज्ञानदेवा ॥७८॥ तुमची आज्ञा नुल्लंघवे मजसी । मग एकादश अभंग दीधले त्यासी । एक महा फळ प्रसादासी । देऊनि तयासी गौरविलें ॥ ७९ ॥ परी त्याचे दैवींच नसे निश्चित । त्यागोनि गेला येथील येथें । यापरी तुका ज्ञानदेवातें । पत्र त्वरित पाठविल ॥ १८० ॥ मग ज्ञानराजें ते अवसरीं । पिटोनि लाविला धरणेकरी । निज कर्मांची ऐसी परी । विकल्प अंतरीं उद्भवला ॥ ८१ ॥ जेवीं कल्पतरूच्या तळवटीं । बैसोनि झोळीसि देताति गांठी । परी भोगणें लागे तेंच सृष्टीं । होतें अदृष्टीं तें झाले ॥ ८२ ॥ सुधा रसाचा घट जाण । अकस्मात

लाधला आयुष्यहीन । तें तया भासलें क्षारजीवन । यास्तव लवंडोन सांडिलें ॥ ८३ ॥ निधान सिद्धि देखिलीं डोळां । दैवहीन गेला त्या जवळा । तयासि भासती अग्नि ज्वाळा । काय कपाळा करावें ॥ ८४ ॥ नातरी दैवहीन करंटा । तयासि परीस लाधला गोमटा । चित्तीं भासला पाषाण गोटा । भिरकावूनि चोहटा देतसे ॥ ८५ ॥ तेवीं तुकयानें अभंग दीधले उचित । जे कां श्रुतिशास्त्रांचें मथित । परी धरणेकरीयासि भासले प्राकृत । कर्म विपरीत म्हणोनी ॥ ८६ ॥ आणि महाफळाचा त्याग करोनी । अळंदीसि गेला परतोनी । मग ज्ञानदेवें लाविला पिटोनी । हे कथा सज्जनीं परिसिलीं ॥ ८७ ॥ इकडे देहूसि तुका वैष्णवजन । अभंग पत्रावरील पाहोन । म्हणे हे निर्मिले कोणाकारणें । हें मी नेणें सर्वथा ॥ ८८ ॥ तों एक कोंडोबा नामाभिधान । धष्टपुष्ट टोणपा होता ब्राह्मण । सहज मार्गीं चालतां त्याणें । घेतलें दर्शन तुकयाचें ॥ ८९ ॥ अक्षर पढला नव्हता कांहीं । यास्तव अभिमान नसेचि जीवीं । सद्भावें नमस्कार ते समयीं । घालीत लवलाहीं तुकयासी ॥१९०॥ देखोनि तयाचा भावार्थ । प्रसन्न जाहला वैष्णवभक्त । अकरा अभंग लिहिले होते । ते कोंडोबातें दीधले ॥ ९१ ॥ आणि धरणेकरीयानें टाकिलें फळ । तोही दिधला नारळ । त्यानें फोडिला तत्काळ । तों आंत सुढाळ मुक्ताफळें ॥ ९२ ॥ अमदाबादेंत सावकार । त्यानें नवसिला होता ज्ञानेश्वर । कीं लक्ष रुपयाचें जवाहिर । समाधीवर वाहीन मी ॥ ९३ ॥ नवस पुरतांचि सत्वर । दर्शनासि आला सावकार । मग दृष्टांतीं सांगे ज्ञानेश्वर । तुकयासमोर हे ठेवी ॥ ९४ ॥ मग नारळ कोरोनि ते अवसरीं । ठेविले तुकयाचे समोरी । ते दिनींच आला धारणेकरी । तयासि सत्वरी दीधले ॥ ९५ ॥ मग दैवीं नसतां टाकिलें त्यानें । तें कोंडोबासि दीधलें धन । आणि अभंग वाचितां निज प्रीतीनें । भाषा गीर्वाण कळों येत ॥९६॥ शिवाजीराजापासीं पंडित जाण । नित्य सांगतसे पुराण । कोंडोबा तयाचा ब्राह्मण जन । तो आला शरण तुकयासी ॥ ९७ ॥ सहज कृपा केली संतीं । यास्तव लाधला भुक्ति मुक्ती । तत्काळ जाहली पुराण व्युत्पत्ती । अर्थ भागवतीं प्रवीण ॥ ९८ ॥ रायासि कळतां वर्तमान । कोंडोबासि दीधलीं वस्त्रें भूषणें । मग चित्तीं विचारी नृपनंदन । घ्यावें दर्शन तुकयाचें ॥९९॥ दिवसंदिवस अधिकोत्तर । जगीं प्रशंसा वाढली फार । भाविक करिती सन्मान आदर । कीर्तन गजर ऐकोनी ॥२००॥ एकदा आळंदीसि वैष्णवभक्त । महाद्वारीं कीर्तन करित । तेथें लोहगांवकर आले समस्त । सज्ञान विरक्त भाविक जे ॥ १ ॥ म्हणती तुकयासी विनीत होऊनि पायीं । एक वेळ न्यावें आपुलें गांवीं । ऐसा निश्चय करोनि जीवीं । सद्भावें पायीं लागले ॥ २ ॥ म्हणती स्वामी येऊनि तेथवर । आश्रम करावा पवित्र । देखोनि त्यांचा भावार्थ थोर । वैष्णव वीर अवश्य म्हणे ॥ ३ ॥ मग लोहगांवास दुसरे दिनीं । तुकोबासि नेलें बहुता प्रयत्नीं । दिव्य पक्वानें स्वयंपाक करोनि । ब्राह्मण भोजनीं तृप्त केले ॥ ४ ॥ मंडप कनाता देऊनि फार । स्थळ विस्तीर्ण केलें थोर । रात्रीं तुका वैष्णववीर । कीर्तन गजर करीतसे ॥ ५ ॥ टाळविणे मृदंग घोष । नादब्रह्मचि

आलें मुसें । कीर्तनीं बोळला प्रेमरस । ब्रह्मादिकांस दुर्लभ जो ॥ ६ ॥ प्रसादिक तुकयाची वाणी । भाविक लोक ऐकती श्रवणीं । प्रेम अश्रु वाहती लोचनीं । तटस्थ होऊनी राहिले ॥ ७ ॥ सप्रेम सेवितां कथारस । कोणासि निद्र न ये आळस । मग भास्कर येतां उदयास । पंढरीनिवास ओवाळिला ॥ ८ ॥ पुढिले अध्यायीं कथा अद्भुत । वदविता श्रीरुक्मिणीकांत । महीपती त्याचा मुद्रांकित । पवाडे वर्णित संतांचे ॥ ९ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । चवतिसावा अध्याय रसाळ हा । ॥ २१० ॥ ॥ अध्याय ॥ ॥ ३४ ॥ ओव्या ॥ २१० ॥



अध्याय ३५



३५॥

[२०४]

श्रीगणेशायनमः । अनाथबंधु नाम तुझें श्रीहरी । हे सत्याचि वाटे मज अंतरी । पाय जोडोनि विटेवरी । भीमातीरीं उभा आससी ॥१॥ ठाण साजिरें सुकुमार । जघनीं ठेविले दोन्ही कर । ऐसें ध्यान दिगंबर । पाहतांचि विरे देहभाव ॥ २ ॥ मूर्ति सुकुमार साजिरी । बुका उधाळिला असे वरी । दृष्टि ठेविली नासाग्रीं । टोपी शिरीं विराजत ॥ ३ ॥ भाविक भक्त येती भेटी । ते तुज सप्रेम धरिती पोटीं । तुळसीहार घालिती कंठीं । इतुके न संतुष्टी तूं देवा ॥४॥ नाना पातकी चोर । ब्रह्मद्वेषी गोहत्यार । त्यांचा दर्शनेंचि होय उद्धार । दीधला वर पुंडलिका ॥ ५ ॥ वैकुंठासि जावया निर्धारीं । साधका सायास पडती भारी । म्हणवोनि मृत्युलोकांवरी । क्षेत्र पंढरी वसविली ॥ ६ ॥ तिहीं लोकींचीं नाना तीर्थें । मध्यान्हीं चंद्रभागेसि येत । यास्तव विमानीं बैसोनि नित्य । विबुध येत स्नानासी ॥ ७ ॥ ऐसा अनुपम क्षेत्रमहिमा । आणिक द्यावयासि नाहीं उपमा । मज ग्रंथनिरूपणीं देईं प्रेमा । आत्मारामा जगद्गुरु ॥८॥ आयतीच घडोनियां ओवी । माझ्या हृदयीं ठेविसी बरवी । ते मी पत्रावरी लिहीं । अटक कांहीं पडेना ॥ ९ ॥ तूं आपल्या दासांचीं चरित्रें । स्वयें वदविसी राजीवनेत्र । निमित्तासि मज केलें पात्र । परी अवघें सूत्र तुझ्या हातीं ॥ १० ॥ मागिल्या अध्यायीं कथा कायी । तुकाराम गेले लोहगांवीं । कीर्तन करोनि ते ठायीं । लोक सर्वही वेधले ॥ ११ ॥ बहुत प्रयत्नें एक मास । राहविले त्यांनीं विष्णुदास । रात्रंदिवस कीर्तन–घोष । परी उबग कोणास न वाटे ॥ १२ ॥ तुका तो सर्वदा निराश चित्तीं । सारिखीं जयासि सोनें माती । ब्राह्मण संतर्पण लोक करिती । यथाशक्ती आपुलिया ॥ १३ ॥ धर्म स्थापना राखावया जगीं । संत अवतरले कलियुगीं । पाप पुण्य नलगेचि अंगीं । सप्रेम रंगी रंगले ॥ १४ ॥ तेथें एक विधवा म्हातारी ब्राह्मणीन । तुकोबासि विनवी कर जोडून । माझे घरीं करोनि भोजन । करावें कीर्तन ये ठायीं ॥ १५ ॥ देखोनि तिचा सप्रेम भाव । अवश्य म्हणे भक्त वैष्णव । ते म्हणे साहित्य करीन बरवें । मग ते दिनीं यावे निश्चित ॥ १६ ॥ मग तिणें करोनि मोलमजुरी । दाहा ब्राह्मणाचें साहित्य करी । तों विघ्न वोढवलें ते अवसरीं । तें सादर चतुरीं परिसावें ॥१७॥ शेजारियाचा वाडा निश्चित । तेथें बाहेर भींतीसीं खोपट होतें । पर्जन पडतांचि बहुत । जाहली भिंत पडावया ॥ १८ ॥ मग तुकयापासीं येऊनि ब्राह्मणी । रुदन करीत तये क्षणीं । म्हणे भिंत पडेल आजिचे दिनीं । कैसी करणी करूं आतां ॥१९॥ तुमच्या भोजना निमित्त । घरीं केलें सर्व साहित्य । तुका तिजला अभय देत । म्हणे चित्त स्वस्थ असों दे ॥ २० ॥ आम्ही जेविल्या वांचोन याहीं । भिंत सर्वथा पडत नाहीं । विघ्न निरसील विठाबायी । संदेह नाहीं सर्वथा ॥ २१ ॥ गांवींचें लोक पाहावयासि येत । भिंत लवंडली परी न पडे सत्य । देखोनियांते आश्चर्य करित । नवल अद्भुत देखोनी ॥ २२ ॥ चार दिवस लोटलिया करी । ब्राह्मणी स्वहस्तें स्वयंपाक करी । मग तुकयासि आणूनि मंदिरीं । सर्वोपचारी पूजिलें ॥ २३ ॥ ब्राह्मणां समवेत वैष्णवभक्त । सद्भावें जेऊनि जाहले

तृप्त । मग ब्राह्मणीसि तुका म्हणत । जेवुनि त्वरित घेयीं कां ॥ २५ ॥ तिचें भोजन झालियावरी । वास्तभाव काढविली
बाहेरी । मंदिरींहूनि निघतां सत्वरी । तों भिंत माघारीं रिचवत ॥ २५ ॥ मग गांवकरीयांस सांगोन । तीस दुसरें घर देवविलें
जाण । ते ठायीं रात्रीं केलें कीर्तन । प्रेमें करोन तेधवां ॥ २६ ॥ संत जाती ज्याचें घरीं । त्याची विघ्नें पळती दुरी । सुदर्शन घेऊनि
श्रीहरी । नानापरी रक्षीतसे ॥ २७ ॥ एक मास लोटतांचि तेथें । सत्वर निघे वैष्णवभक्त । जेथें मान्यता वाढली बहुत । तरी तेथें
विरक्त न राहती ॥ २८ ॥ तुकयाची सत्कीर्ति थोर । दिवसंदिवस वाढली फार । जैसा शुक्लपक्षीचा चंद्र । होतसे थोर तेजस्वी ॥२९॥
चांदणें देखोनि प्रकाशमान । संतुष्ट होती इतर जन । परी तस्कराचें संतापे मन । त्यांज कारणें असह्य ॥ ३० ॥ तैसी तुकयाची
सत्कीर्ती । ऐकोनि भाविकांसि विश्रांती । निंदक कुटिळ जे दुर्मती । ते संतापती मनांत ॥ ३१ ॥ विद्या वय रूप जाण । याति कुळाचा
अभिमान । त्यास नावडे संत वचन । जैसें पयःपान ज्वरितासी ॥ ३२ ॥ एक रामेश्वर भट ब्राह्मण । वाघोलींत असतसे जाण । त्यासि
चहूं शास्त्रांचें अध्ययन । राजमान्य असे तो ॥ ३३ ॥ त्याणें तुकयाची सत्कीर्ति पूर्ण । परस्परें केली श्रवण । ऐकोनि द्वेष उपजला मनें ।
म्हणे पाखंड पूर्ण माजविलें ॥ ३४ ॥ यासि उपाय योजावा निका । देशधडी करावा तुका । त्याचा अपमान होईल देखा ।
तैसेंच करूं कां ये समयीं ॥ ३५ ॥ ऐसें म्हणवोनियां मनांत । भीड खर्चिली दिवाणांत । म्हणे तुका शूद्र जातीचा निश्चित ।
आणि श्रुति माथितार्थ बोलतो ॥ ३६ ॥ हरि कीर्तन करोनि तेणें । भाविक लोकांसि घातलें मोहन । त्यासि नमस्कार करिती
ब्राह्मण । हें आम्हांकारणें अश्लाघ्य ॥ ३७ ॥ सकळ धर्म बुडवोनि निश्चित । नाममहिमा बोले अद्भुत । जनांत स्थापिला
भक्तिपंथ । पाखंड मत हे दिसे ॥ ३८ ॥ ऐसें सांगतां रामेश्वरीं । चित्तीं क्षोभला ग्रामाधिकारी । मग देहूच्या पाटिलासि
ताकीद करी । कीं तुक्यासि बाहेरी दवडावा ॥ ३९ ॥ चिठ्ठी देखोनि ग्रामवासी । दाखविते जाहले तुकयासी । मग एक
अभंग त्या समयासी । करुणारसीं बोलिले ॥ ४० ॥ आतां आम्हीं काय करावें । कवण्या देशांतरा जावें । गांवांत वस्तीसि राहावें ।
आश्रय देवें न दिला ॥ ४१ ॥ कोपले पाटील गांविचे लोक । आतां कोण आम्हांसि घालील भीक । यांच्या संगतीचें कायसें सुख ।
वैकुंठनायक शोधावा ॥ ४२ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णव वीर । विठ्ठल नामाचा करोनि गजर । म्हणे वाघोलीसि जावोनि सत्वर । रामेश्वर
पाहावा ॥ ४३ ॥ ऐसें म्हणवोनि प्रेमळ भक्त । तैसाचि निघे अति त्वरित । रामेश्वर बैसले स्नानसंध्येंत । तयांसि दंडवत घातलें
॥ ४४ ॥ सप्रेम नामाच्या गजरें जाण । ते स्थळीं मांडिलें हरिकीर्तन । कवित्व बोले प्रसाद वचन । संकोच मनीं न धरितां ॥ ४५ ॥
यावरी रामेश्वर काय बोलत । तूं तरी यातीचा शूद्र निश्चित । कवित्व बोलसी कीर्तनांत । त्यांत अर्थ उमटत श्रुतीचे ॥४६॥ अधिकार

नसतां बोलसी कैसें । शास्त्रविरुद्ध आम्हांसि दिसे । तरी वक्तया आणि श्रोतयांस । रौरवं असे यातना ॥ ४७ ॥ तरी आजपासूनि हे कविता । तुवां न बोलावी सर्वथा । ऐसी ऐकोनियां वार्ता । वैष्णवभक्ता संतोष ॥ ४८ ॥ मनांत म्हणे वैष्णवभक्त । मज आज्ञा केली पंढरीनाथें । म्हणोनि वल्गना केली बहुत । खर्चिली व्यर्थ हे वाणी ॥ ४९ ॥ मग रामेश्वरासि बोले पुढती । तुम्ही ब्राह्मण ईश्वर मूर्ती । आज्ञा केली जे मजप्रती । तरी न बोले पुढती सर्वथा ॥ ५० ॥ तुम्हीं आज्ञा केली जाण । तरी आतां कवित्व न करीं लेखन । परी मागें जाहलें जें निर्माण । तरी वाट कोण तयाची ॥ ५१ ॥ ऐसें पुसतां वैष्णवभक्त । मग रामेश्वर उत्तर देत । लिहिलें कवित्व आपुल्या हातें । बुडवीं उदकांत नेउनी ॥ ५२ ॥ अवश्य म्हणे ते अवसरीं । तुमची आज्ञा वंदिली शिरीं । मग देहूसि येऊनि सत्वरी । देउळा भीतरीं प्रवेशे ॥ ५३ ॥ पांडुरंग मूर्तीस देखोन । अश्रुपातें भरलें लोचन । साष्टांग घातलें लोटांगण । प्रेमें करून तेधवां ॥ ५४ ॥ मग जोडोनियां दोन्ही कर । उभा श्रीमूर्ती समोर । म्हणे सर्व कर्ता रुक्मिणीवर । मी तरी पामर मूढमती ॥५५॥ तुझ्या आज्ञेनें विठाबायी । अबद्ध वांकुडें वदलों कांहीं । आतां उदकांत बुडवावें तेंही । शेषशायी तुझी इच्छा ॥ ५६ ॥ ऐसें म्हणवोनि प्रेमळ भक्त । लिहिल्या वह्या घेतल्या समस्त । मग इंद्रायणीच्या डोहांत । नेऊन बुडवित स्वहस्तें ॥ ५७ ॥ वस्त्रांत गांठोडें बांधोनि जाण । त्यामाजीं घातले पाषाण । विठ्ठलनामें करूनि गर्जन । देतसे सोडोन उदकांत ॥ ५८ ॥ भाविक प्रेमळ जे निश्चितीं । परम हळहळ करिती चित्तीं । कुटिळ मान तुकविती । संतोष मानिती चित्तांत ॥ ५९ ॥ म्हणती कवितां करोनि जगीं । महंती आणिली आपुले आंगी । परी ते सर्वथा न टिकेचि जगीं । रंग पतंगी उडाला ॥ ६० ॥ विद्वान ब्राह्मण रामेश्वर खरा । जैसा अप सूर्यचि दुसरा । त्यानें असत्याचा मोडिला थारा । आमुच्या अंतरा सुख वाटे ॥ ६१ ॥ जैसें जैमिनीनें भारत केलें । तें द्वैपायनें संपूर्ण बुडविलें । कीं जैनमत उदकांत सोडिलें । शंकराचार्ये जैशा रीतीं ॥ ६२ ॥ जैमिनीनें कवित्वांत निश्चित । एक अश्वमेध राखिला ग्रंथ । आणि अमरकोश जैन मत । आचार्य ठेवित प्रीतीनें ॥ ६३ ॥ आणि तुकयाचें कांहींच राखिलें नाहीं । अवघ्याचि वह्या बुडविल्या डोही । ऐसें कुटिळ बोलती सर्वही । विष्णुमहिमा जीवीं न कळतां ॥ ६४ ॥ तुक्याचें तों संतोष चित्त । असे हर्ष शोकविरहित । म्हणे भगवत्सत्ता प्रमाण येथ । मी अतिशय व्यर्थ कां करूं ॥ ६५ ॥ ऐसे म्हणवोनि चित्तास । सप्रेम भजन करितसे । उदकांत वह्या बुडविल्या त्यास । पांच दिवस लोटले ॥ ६६ ॥ तंव कुटिळ ब्राह्मण आणिक याती । मिळोनि तुकयापासीं येती । नाना दुरुत्तर तयासि बोलती । तीं ऐकोनि भक्त भाविकहो ॥ ६७ ॥ तुकयासि म्हणती ते समयीं । तुवां मागें खतें घातलीं डोहीं । तेव्हां प्रपंच बुडविला सर्वही । अनुताप जीवीं धरोनिया ॥ ६८ ॥ मग कवित्व केलें परमार्थ लेखन । तेंहीं उदकीं बुडविलें जाण । आणिक

१ नरक.

असता तरी प्राण । ठेविता जाण सर्वथा ॥ ६९ ॥ प्रपंच बुडविले दोन्ही । आणि मुख दाखविसी लोकांलागोनी । ऐसी दुरुत्तरें बोलोनी । कुटिले सदनीं ते गेले ॥ ७० ॥ ते तीक्ष्ण शब्द लागतां पाहे । तुकयाचें दुखंड झालें हृदय । म्हणे प्राण घ्यावा जरी लवलाहे । तरी आत्महत्या होय संसारीं ॥ ७१ ॥ येऱ्हवीं आपसुखें तों न जाय प्राण । यासि उपाय करावा कवण । तरी आतां अन्नउदक वर्जोनि जाण । बैसावें धरणें देवद्वारीं ॥७२॥ देवालयाच्या द्वारासमोर । वृंदावनीं होती पाथर । वैष्णव तुका तिजवर । बैसे सत्वर जाऊनिया ॥ ७३ ॥ पस्तावा जाहला चित्तास । ते अभंग असती एकुणतीस । म्हणे माझे भक्तीचा जाहला कळस । वस्तीसि दोष आला कीं ॥ ७४ ॥ हरिकीर्तन एकादशी । जागरण केलें जें सायासीं । शेवटीं फळ आलें त्यासी । तळमळ चित्तासी लागली ॥ ७५ ॥ अहा सेवा केली सहज । त्याची साक्ष आली मज । लोकांत मुख दावितां मज । वाटती लाज ऐसें झालें ॥ ७६ ॥ जीवाचा त्याग केलाच नाहीं । तोवरी देवा बोल कायी । आतां तुझी जोड विठाबायी । किंवा नाहींच करी न जीवा ॥ ७७ ॥ मागें मनांत आलें ऐसें । एकांती जाऊनि वनांत बैसें । घडोन आलें अनायासें । वर्जावया नसे कोणी ॥ ७८ ॥ माझें खरें जाहलियावर । मग मी पुढें बोलेन उत्तर । आतां कवित्व करावें जर । तरी लज्जा साचार मज नाहीं ॥ ७९ ॥ निवाड्याचा दिवस शेवटला । तोचि अनायासें आतां आला । अनुभवावीण परिपाक भला । रित्या शब्दाला कोण पुसे ॥ ८० ॥ आतां मज न धरवे धीर । कैसे निजीव होईल स्थिर । तुम्हीं ऐकीले नाहींत बोल तर । व्यर्थचि भूसफोल उपणिलें ॥ ८१ ॥ सकळ उपाय त्वां विठ्ठलें । अवघे करावे ते केले । आतां वाट पहावया भलें । नाहीं उरलें सर्वथा ॥ ८२ ॥ आतां भाक्तिमार्गासि आला शेवट । पायांकडे मी जाहलों नीट । शब्दासि रुची न ये स्पष्ट । विश्वीं बोभाट हा झाला ॥ ८३ ॥ जात्यावरील लटक्या ओव्या । परी त्या खऱ्या मापें घ्याव्या । तैसी गती पंढरीराया । वाटे माझिया जीवासी ॥ ८४ ॥ आतां नेम झाला हाचि कळस । कासया व्यर्थ उपणूं भूस । लेखणी न धरीं अनायासें । निश्चय मानसीं हा केला ॥ ८५ ॥ आम्हीं बोलतों करुणा उत्तरें । तुम्ही जाहला पाठमोरे । अवघे फंद तुमचे खरे । निश्चय निर्धारें हा केला ॥ ८६ ॥ अनंत भक्त पांडुरंगे । तुवां रक्षिले असती मागें । आतां एक्या जीवाचा आला उबग । न करिसी भवभंग कां माझा । ॥ ८७ ॥ तुम्हीं चित्तापासोनि श्रीहरी । निकर धरिलासे मजवरी । आतां भक्तिचें दुकान न करीं । निश्चय अंतरीं हा केला ॥ ८८ ॥ करुणा भाकितां पांडुरंगा । तयावरी येतसां रागा । कठिणोत्तरें लागतसां मागां । ऐसा स्वभाव पैं गा तुझा असे ॥ ८९ ॥ तुमचा दास मी नव्हें कैसा । हे सांगावें पंढरीशा । कोणासाठी प्रपंच आशा । सांडोनि दुर्दशा हे केली ॥ ९० ॥ माता न पुरवितां आळ । देशधडी जाहलें बाळ । कीर्ति सांगावी कोणाजवळ । प्रेम सकळ विसरलें ॥ ९१ ॥ कैसी आतां करावी स्तुति । कैसी वाखाणूं सत्कीर्ति । मुख दाखवावें जनाप्रती ।

उरली रीती हें नाही ॥ ९२ ॥ आवघ्याच माझ्या वेंचल्या शक्ती । बळ बुद्धि कांहींच न चले युक्ती । आतां करिशील तें होईल निश्चिती । रुक्मिणीपती श्रीविठ्ठला ॥ ९३ ॥ ऐशा रीतीं करूनि स्तवन । नेत्र झांकिलें तुकयानें । सद्गुणरूपीं गोविलें लोचन । चरणीं मन स्थिर केलें ॥ ९४ ॥ देवळा समोर वृंदावन । तेथें शिळेवरी केलें शयन । न घे फळमूळ अथवा जीवन । समूळ देहभान सांडिलें ॥ ९५ ॥ लोकीं अपमान बहुत होतां । समाचार सर्वथा न घेचि कांता । अर्धांच परमार्थी द्वेष होता । त्यावरी कथा हे झाली ॥ ९६ ॥ वरदळ भावार्थी जे कां जन । ऐकत होते हरिकीर्तन । विकल्पें विटाळे त्याचें मन । विघ्न दारुण देखोनी ॥ ९७ ॥ जैसें पक्कदशेसि येतां फळ । त्यासि देंठ सोडी तत्काळ । तैसें स्नेह होतसे खुळ । कृपा कल्लोळें श्रीहरींच्या ॥ ९८ ॥ तुकयासि आग्रह वरच्यावर । येऊनि करिती भाविक नर । परी कोणासी न बोले प्रत्युत्तर । निश्चय न ढळे सर्वथा ॥९९॥ उपवास करितां जावा प्राण । यास्तव देवद्वारीं घेतले धरणें । मेला कीं जीत कोणाकारणे । निश्चय बाणे सर्वथा ॥ १०० ॥ असो इकडे श्रोते चतुर । वाघोलींत ब्राह्मण रामेश्वर । त्यासि भक्तद्रोह घडला थोर । म्हणवोनि ईश्वर क्षोभला ॥ १ ॥ रावण कुंभकर्ण श्रीराम द्वेषी । तेही नेले मोक्षपदासी । परी मुक्ती नाहीं भक्त द्वेषियांसी । जे रौरवांसी[1] अधिकारी ॥ २ ॥ भक्तांसि रक्षावया श्रीहरी । गदा चक्रे वागवीत करीं । बुद्धिचा प्रेरक होउनि अंतरीं । अपाय करी अभक्ता ॥ ३ ॥ भक्ताचा द्वेष करितां पाहे । तेणे निज पुण्याचा होतसे क्षय । तेथें सकळ दुरितांचा मेळा होय । वस्तीसि ठाय लक्षूनी ॥ ४ ॥ रामेश्वर तपस्वी ब्राह्मण । जैसा का सूर्यनारायण । चहूं शास्त्रीं अध्ययन । राजमान्य सर्वांपरी ॥ ५ ॥ परी विष्णुभक्ताचा करितां द्वेष । तेणेंचि निजपुण्याचा जाहला नाश । एके दिवसीं पुण्यास । आला दर्शनास शिवाच्या ॥ ६ ॥ नागनाथ म्हणवोनि दैवत पाही । जागृत असे तये ठायी । रामेश्वराची आस्था सर्वही । त्याच्या पायीं जडली असे ॥ ७ ॥ द्वादशी प्रदोष सोमवार । पर्वकाळ पाहोनि थोर । पुणियासि आले रामेश्वर । तों काय चरित्र वर्तले ॥ ८ ॥ तेथें अनगडशासिद्ध म्हणवोनि थोर । अनुष्ठानी होता फकीर । त्याच्या बागांत रामेश्वर । नेणतां सत्वर प्रवेशले ॥ ९ ॥ दोघे विद्यार्थी असती जवळ । प्रातः स्नानाची जाहली वेळ । स्वच्छ निर्मळ देखोनि जळ । आंत तत्काळ प्रवेशले ॥ ११० ॥ स्नान करितां रामेश्वर । आनगडशासिद्ध होता दूर । त्याने कानी ऐकतां प्रयोगमंत्र । मग शापोत्तर बोलतसे ॥ ११ ॥ म्हणे माझें निमाज करावयाचे जीवन । ते डव्हाळोनि टाकिले त्याने । त्याच्या देहाचे होईल अन्न । जळावांचोन सर्वदा ॥ १२ ॥ ऐसा शाप वदतां फकीर । उदकावांचोनि पोळे रामेश्वर । मग विद्यार्थियासि बोले उत्तर । म्हणे कैसा विचार करूं आतां ॥ १३ ॥ उदकांतूनि निघतांचि पाहे । अधिकचि देहाचा अग्न होय । त्यासि उपाय करावा काय । म्हणोनि धाय मोकलीत ॥ १४ ॥ मग विद्यार्थी बोलती पाहीं । फकीराने प्रयोग केला काहीं ।

[1] नरकाचे.

तयासि शरण लवलाहीं । येच समयीं चलावें ॥१५॥ मग म्हणतसे रामेश्वर । मी तों उत्तमयाति द्विजवर । आणि यवन हीन जातीचा फकीर । मी न जाय साचार त्यापासीं ॥ १६ ॥ अहंता धरोनि निज मनें । ऐसा निश्चय केला त्यानें । परी उदकांतूनि निघतांचि जाण । होतसे अग्न देहाचा ॥ १७ ॥ चार घटिका लोटलिया वरी । मग तैसाचि निघतसे बाहेरी । वोलीं धोत्रें आंगावरी । निथळत बरीं ठेवितसे ॥ १८ ॥ विद्यार्थी हातीं घेऊनि झारी । पाणी घालिती वरच्यावरी । म्हणे आतां परतोनि जावें घरीं । तरी व्यथा शरीरीं दारुण ॥ १९ ॥ याजपासोनि वांचे न आतां । ऐसें तंव न दिसे सर्वथा । विपत्तीचें मरण आलें तत्वतां । म्हणवोनि चिंताक्रांत मनीं ॥१२०॥ निजतां उठतां चालतां पाहे । सर्वदा अग्न जाळिताहे । केलें अनुष्ठान कामा न ये । जाहलें काय तें कळेना ॥२१॥ देखोनि रामेश्वराची विपत्ती । त्रिविध जन काय बोलती । फकीरें प्रयोग केला म्हणती । अन्यथा मती हे नव्हे ॥२२॥ सज्ञान बोलती प्रतिवचन । तुकयाचे अभंग बुडविलें यानें । यास्तव क्षोभला रुक्मिणीरमण । निमित्तास कारण अनगडशा ॥ २३ ॥ अंबरीष राजा विष्णुभक्त पूर्ण । दुर्वासें शापितां त्याजकारणें । मग पाठीसी लागे सुदर्शन । तैसेंच कारण हें झालें ॥ २४ ॥ ऐशा रीतीं बोलती सर्व । परी कोणासि न सुचे उपाय । म्हणती रामेश्वरा ऐसा भूदेव । पीडिला पाहाहो व्यथेनें ॥ २५ ॥ शरीरीं रोग होतां दारुण । नावडे घरदार पुत्र धन । मग आळंदीसि येऊनि त्यानें । धेतलें धरणें ज्ञानदेवीं ॥ २६ ॥ आजान वृक्षासि बांधोनि गळती । त्याजखालीं बैसे दिसराती । म्हणे देहासि आली महाविपत्ती । नकळे संचितीं काय आहे ॥ २७ ॥ भक्तद्वेषियासि जाहलें ऐसें । इकडे चरित्र वर्तलें कैसें । अन्न उदक त्यजितां तुकयास । मग पंढरीनिवास काय करी ॥ २८ ॥ बाळरूप धरोनि श्रीहरी । तुका आश्वासीत निजकरीं । म्हणे मी पाठिराखा कैवारी । असतां शिरीं काय चिंता ॥२९॥ माझें नाम जपतां निरंतरी । म्हणवोनि प्रल्हाद गांजिला नानापरी । हिरण्यकशिपु आमुचा वैरी । तो द्वेष निर्धारीं करी त्याचा ॥१३०॥ पर्वतीं लोटितां त्याजकारणें । म्यां अनंत हस्तें उचलिला जाण । बुडवूं न शके समुद्रजीवन । म्यां कासव होऊन उचलिला ॥ ३१ ॥ हिरण्यकशिपु महाखळ । अभींत[१] टाकिला प्रल्हाद बाळ । परी कृशानु[२] वाटे तया शीतळ । कृपा कल्लोळें माझिया ॥ ३२ ॥ महा वारण[३] जे उन्मत्त । दैत्यें सोडिले तयावरते । तयांसि प्रल्हाद सिंह दिसत । मग ते होत रानभरी ॥ ३३ ॥ मग सर्प डसवितां निश्चिती । तयांसि प्रल्हाद दिसे खगपती[४] । पोटीं पाय त्यांसि निघती । मग सत्वर शिरती वारुळीं ॥ ३४ ॥ माझ्या भक्तासि यावया मरण । महा विष पाजिलें त्यानें । प्रल्हाद करितां नामस्मरण । अमृतासमान तें होय ॥ ३५ ॥ त्यानें हांक मारितांचि सत्वरी । मी खांबांत प्रगटलों नरहरी । दैत्य विदारूनि नखावरी । दासासि सत्वरी रक्षिलें ॥ ३६ ॥ ऐसीं माझीं चरित्रें अद्भुत । गाईलीं ऐकिलीं तुवां बहुत । ते असत्य सर्वथा नव्हेचि मात । पुराणीं गर्जत पंवाडे ॥ ३७ ॥ तुझ्या वह्या

१ अति दुष्ट. २ अग्नि. ३ हत्ती. ४ गरुड.

धरोनि पोटीं । मी उदकांत बैसलों जगजेठी । तेंही चरित्र देखसी दृष्टीं । मग तुकयासि पोटीं धरियेला ॥ ३८ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । देव अंतर्धान पावले सत्वरी । कीं तुकयाच्या हृदयकमळा भीतरी । तो मिलिंद श्रीहरी गुंतला ॥ ३९ ॥ भाविक कोणी कुटिल नर । तुकयासि पाहती वारंवार । तों श्वासोछ्वास नयेचि फ.र । काष्ठवत शरीर पडियेलें ॥ १४० ॥ ज्या अंगावर केलें शयन । तेथोनि अंग हलोंचि नेणें । खिरपणीचें आलें मरण । निंदक जन बोलती ॥४१॥ एक म्हणती त्याची कांता । दुष्काळीं मेली अन्न अन्न करितां । तैसेंचि तुकयासि जाहलें आतां । क्षुधेनें मरतां प्राण जाती ॥ ४२ ॥ भाविक म्हणती ते अवसरीं । तुकयासि रक्षित आहे श्रीहरि । अन्न उदकावीण शरीरीं । तेज निर्धारीं दिसतसे ॥ ४३ ॥ जरी साह्य नसता जगजीवन । तरी मागेंच गेले असती प्राण । नामस्मरणाची उमटे ध्वनी जाण । ऐक जाऊन संनिध ॥ ४४ ॥ ऐशा रीतीं बोलती जन । परी तुका तो आनंदयुक्त मनें । बाहेर दिसे लोकांकारणें । घेतलें धरणें देवद्वारीं ॥ ४५ ॥ ऐसें लोटतां तेरा दिवस । काय करी जगन्निवास । रात्रीं दृष्टांत बहुतांस । दाखवितसे जगदात्मा ॥ ४६ ॥ म्हणे तुकयाचे अभंग निश्चित । म्यां कोरडेचि रक्षिले जळांत । आतां वह्या तरंगोनि वरत्या येत । तरी काढाव्या त्वरित जावोनी ॥ ४७ ॥ ऐसा दृष्टांत देखतां रातीं । प्रभातसमयीं लोक येती । तों उदकावरी वह्या दिसती । जेवीं तुंबे तरती जळांत ॥ ४८ ॥ मग नामघोषें पिटोनि टाळी । आनंदली भक्तमंडळी । म्हणती तुकयासि पावला वनमाळी । अनुपम नव्हाळी दिसत ॥ ४९॥ त्या माजीं कोणी पोहणारे होते । त्यांनीं उड्या टाकिल्या डोहांत । वह्या काढिल्या हातोहात । म्हणती पंढरीनाथ पावला ॥१५०॥ मग देउळासि येऊनि सकळ जन । तुकयासि सांगती वर्तमान । तुझा भक्तिभावार्थ पूर्ण । रुक्मिणीरमण पावला ॥ ५१ ॥ नेत्र उघडोनि प्रेमळ भक्त । पाहे तंव यथार्थ दिसत । मग सात अभंग केली स्तुत । करुणा बहुत त्यां माजी ॥ ५२ ॥ म्हणे रुक्मिणीकांता श्रीविठ्ठला । म्यां तरी थोर अन्याय केला । लागोनि जनाचिया बोला । श्रमविलें तुजला निश्चित ॥ ५३ ॥ तुझें तों चित्त दों ठायीं । वांटलें असें विठाबायी । माझा सांभाळ केला देहीं । आणि कागद डोहीं रक्षिले ॥ ५४ ॥ शरीर अन्न उदकाविण । तेरा दिवस वांचलें जाण । आणि कोरडे कागद उदकीं राहणें । हें अघटित विंदानें दाविलें ॥ ५५ ॥ अनाथनाथा विश्वंभरा । मी तरी पतितचि आहे खरा । महा अन्याय केला दुसरा । धरणें दारां बैसलों ॥ ५६ ॥ होणार तें होऊनि गेलें पाहे । ते गोष्टी सर्वथा परतोनि नये । आतां तुजवरी विठ्ठलमाये । भार न वाहे सर्वथा ॥५७॥ अवघे मिळोनि हे दुर्जन । कापितील जरी माझी मान । परी तुज होईल जेणें शीण । तें न करी कारण सर्वथा ॥ ५८ ॥ चुक पडली एक वेळा । म्यां तुज कष्टविलें घनसांवळा । अन्याय आठवोनि वेळोवेळां । सद्गदित गळा होतसे ॥ ५९ ॥ जळांत उभा राहोनि श्रीपती । कोरडया वह्या राखिल्या प्रीतीं । बिरुदावळी संत वर्णिती । सत्य प्रतीती त्वां केली ॥ १६० ॥ तुज

१ नवल.

संकट घालायासि पाहीं । मज सर्वथा अधिकार नाहीं । परी लौकिक रक्षावया देहीं । विचार जीवीं न केला ॥ ६१ ॥ किंचित अन्याय करितां पाहे । मारूं पाहती बापमायें । त्यांची उपमा देतांचि नये । सदय हृदय तूं एक ॥ ६२ ॥ पुरेपुरे हा संसार आतां । दुस्तर कर्म नावरे सर्वथा । करी चित्ताची स्थिरता । रुक्मिणीकांता जगद्गुरु ॥ ६३ ॥ अनंत बुद्धीचे तरंग फार । चित्तीं उठती वारंवार । याचा संग धरितां साचार । बद्ध अंतर होतसे ॥ ६४ ॥ आतांचि निवारूनि चिंता आस । माझें हृदयीं करी वास । सदा सेवीन सप्रेम रस । आणिक उद्देश कांहीं नको ॥ ६५ ॥ कोरडया वह्या निघतां निश्चित । तेव्हां सात अभंग केली स्तुत । तो सप्रेम रस अति अद्भुत । सेविती संत धरणीवरी ॥ ६६ ॥ तेरा दिवस बुडवितां शेखीं । कोरड्या वह्या निघाल्या उदकीं । त्या तरी लुटूनि नेल्या भाविकीं । प्रख्यात लोकीं व्हावया ॥ ६७ ॥ कोरडे कागद उदकांत । स्वयें राक्षिले रुक्मिणीकांतें । हे देशोदेशी प्रगटली मात । प्रीतीनें प्रत उतरिती ॥ ६८ ॥ जैसीं पुष्पें असती एके स्थळीं । परी सुवास धांवे नभमंडळीं । तैसी तुक्याची कीर्ति भूमंडळी । होय ते वेळीं प्रख्यात ॥ ६९ ॥ असो इकडे अनुसंधान । अळंकापुर क्षेत्र पावन । तेथें रामेश्वर भट्ट बैसलें धरणें । होतसे अग्न[१] देहाचा ॥ १७० ॥ अजान वृक्षासि लावोनि गळती । त्याखालीं बैसे दिवसराती । वोलींच वस्त्रें आंगावरती । सर्वदा असती तयाच्या ॥ ७१ ॥ चित्तीं कामना धरोनि थोर । आराधिला श्रीज्ञानेश्वर । म्हणे सिद्धाचा शाप होय दूर । ते कृपा सत्वर मज करी ॥ ७२ ॥ ह्या दुःखें करोनि निश्चित । मी तरीं पीडा पावलों बहुत । तूं विष्णु अवतार साक्षात । विश्वोद्धारार्थ कलियुगीं ॥ ७३ ॥ रामेश्वर भट्ट ऐशा रीतीं । ज्ञानेश्वराची करितसे स्तुती । तों त्यासि दृष्टांत दाखविला रातीं । तो सादर संतीं परिसिजे ॥ ७४ ॥ सकळ भक्तांत श्रेष्ठ थोर । प्रेमळ नामा वैष्णववीर । तुका तयाचा अवतार । आला जगदुद्धार करावया ॥ ७५ ॥ त्याची निंदा घडतां द्वेष । तेणें सुकृताचा जाहला नाश । पदरीं सांचले अविनाश दोष । देह दुःखास कारण हे ॥७६॥ आतां सद्भाव धरोनि अंतरीं । तयासि शरण जाशील जरी । तरी महारोग होऊनि दुरी । भवसागरीं तरशील ॥ ७७ ॥ विष्णुभक्ताचा द्वेष करितां । तें पाप न जाय तीर्थी न्हातां । तरी तुकयासि शरण जाय आतां । तरीच हे व्यथा निरसेल ॥ ७८ ॥ ज्ञानदेवें स्वप्न निश्चिती । दाखविलें रामेश्वराप्रती । मग सत्वर येऊनि जागृतीं । अनुताप चित्तीं धरियेला ॥ ७९ ॥ कांहीं न बैसतां आंच संसारताप । प्राणियासि नव्हेचि अनुताप । अनुतापेंवीण न जाय पाप । सत्य संकल्प हे वाणीं ॥ १८० ॥ शंकरें घेतलें हलाहल । तेणेंचि त्याचें सर्वांग जळे । मग श्रीराम भजन करितां निश्चळ । जाहला शीतळ धूर्जटी[२] ॥ ८१ ॥ असो आतां भाषण बहुत । दृष्टांत योजितां वाढेल ग्रंथ । रामेश्वरासि पश्चात्ताप सतत । जाहला दृष्टांत देखोनी ॥ ८२ ॥ मग एक पत्र दे लेहून । विद्यार्थियांपासीं दीधले त्यानें । म्हणे तुम्हीं देहूसि जाऊन । वृत्तांत सांगणें तुकयासी ॥८३॥ मनांत म्हणे रामेश्वर ।


१ आग आग, लाही. २ शंकर.

आतांचि दर्शना गेलों जर । तरी दुसरा अपाय करील ईश्वर । अन्याय थोर म्यां केला ॥८४॥ कोरडे कागद उदकांतुनी निघाले हे कीर्ति ऐकिली श्रवणीं । त्यावरी ज्ञानदेवें येउनी । दृष्टांत स्वप्नीं सांगितला ॥८५॥ हा चमत्कार देखोनि बहुत । पत्र लिहिलें भीतभीत । तुकयाची बहुत करूनि स्तुत । देहूसि त्वरित पाठविलें ॥८६॥ रामेश्वराचे विद्यार्थी । साकल्य वृत्तांत तुकयासि सांगती । अनगडशा सिद्धें शापिलें म्हणती । उपाय पुसती यासि काय ॥८७॥ रामेश्वराचा वृत्तांत । ऐकोनि तुकयासी करुणा येत । म्हणे सुशीळ ब्राह्मण पंडित । त्यासि हें विपरीत कां झालें ॥ ८८ ॥ शत्रुमित्र समान तुकया । मागील विरोध नाठवेचि तया । विश्वीं पाहे पंढरीराया । ब्रह्मरूप काया करील कीं ॥८९॥ रामेश्वराच्या करुणा वचनें । दयेनें द्रवला वैष्णव जन । मग एक अभंग दीधला लेहून । निज कृपेनें आपुल्या ॥१९०॥ ते विद्यार्थियांनीं घेऊनि हातीं । आळंदीसि आले सत्वर गती । मग सद्गुरूपासी पत्र देती । वृत्तांत सांगती निज मुखें ॥ ९१ ॥ तुक्यानें लिहिलें पत्र । तें वाचोनि पाहे रामेश्वर । त्याचा अर्थ संकळित साचार । तो ऐका चतुर भाविकहो ॥ ९२ ॥ आपुलें चित्त असतां शुद्ध निश्चिती । तरी शत्रु ते मित्र होती । व्याघ्र सर्प जवळी येती । परी ते न खाती सर्वथा ॥ ९३ ॥ विष घेतां होय अमृत । घात करितां होय हित । अपशब्द हेळणा कोणी बोलत । ते शब्द विनीत वाटती ॥९४॥ दुःख प्रयोग करितां सबळ । तें सर्व सुखाचें देईल फळ । अग्निज्वाळा होतील शीतळ । दीनदयाळ तुष्टतां ॥ ९५ ॥ एक भाव सकळां अंतरीं । प्राणियांसि आवडे जीवाचियें परी । तरी कृपाकटाक्षें लक्षी लहरी । अनुभव अंतरीं होय तेणें ॥ ९६ ॥ ऐशाच रीतीं अभंग एक । रामेश्वरें वाचितां देख । तों अद्भुत वर्तलें कौतुक । तें ऐका भाविक निजकर्णीं ॥ ९७ ॥ शीतळ होती अग्निज्वाळा । हे ओवी वाचितांचि त्याजला । अनगडशा सिद्धें शाप दीधला । तो अग्नि शमला तत्काळ ॥ ९८ ॥ सिद्धाच्या शापें रामेश्वर । पोळत होता निरंतर । तो दाह राहिला समग्र । प्रत्यय थोर हा आला ॥ ९९ ॥ मग अनुताप धरोनियां मनें । तुकयासि घाली लोटांगण । अश्रुपातें भरले लोचन । म्हणे धन्य माहिमान[1] संताचें ॥ २०० ॥ उपनिषद आणि वेदांत । आम्हीं पढिन्नलों समस्त । परी कोरडे कागद उदकांत । राखावया सामर्थ्य मज नाहीं ॥ १ ॥ ऐसा जो जगद्गुरु देखा । तोचि भवसागर तारी तुका । ऐसा भावार्थ धरोनि निका । सप्रेम सुखा भोगीतसे ॥ २ ॥ रामेश्वर येती दर्शनासी । हें अंतरीं कळलें तुकयासी । म्हणे आपण सामोरें जाऊनि त्यासी । द्विजवरासी भेटावें ॥ ३ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । मग तेथूनि निघाले सत्वरी । मार्गीं अर्ध वाटेवरी । परस्परें भेटती ॥ ४ ॥ तुकयासि म्हणे रामेश्वर । तुम्ही परमभक्त वैष्णववीर । हें मी नेणतां पामर । वह्या साचार बुडविल्या ॥ ५ ॥ जगदुद्धाराकारणें । मृत्युलोकीं अवतार घेणें । ऐसें नेणोनि महिमानें । केलें छळण व्यर्थ आम्हीं ॥ ६ ॥ ऐसें बोलतां रामेश्वर । काय म्हणे वैष्णववीर । मी तरी हीन यति पामर । कृपा निरंतर इच्छितसे ॥ ७ ॥ ऐसें

१ मोठेपण, माहात्म्य.

ऐकोनियां उत्तर । काय म्हणती रामेश्वर । तुम्ही अभंग लिहिला निजकरें । तो अनुग्रह सचार मज आला ॥ ८ ॥ आतां हा समागम सोडोनि पाहीं । परतोनि गृहासि जाणेंचि नाही । ऐसा निश्चय करोनि जीवीं । पुढती पायीं लागतसे ॥ ९ ॥ पुढीले अध्यायी रस अद्भुत । वदविता श्रीरुक्मिणीकांत । महीपतीसि देऊनि अभयहस्त । स्वयें ग्रंथार्थ आपण वदे ॥ २१० ॥ स्वस्ति श्रीभक्तीलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोति भाविक भक्त । पस्तिसावा अध्याय रसाळ हा ॥ २११॥ ॥ ॥ अ० ३५ ॥ ओव्या २११ ॥




अध्याय ३६
संत तुकाराम
छत्रपती शिवाजी

श्रीगणेशाय नमः । भवाब्धि तारावया कारणें । साधक करिती अनुष्ठान । मी निजभक्ताचे गुण वर्णिन । कांहींच नेणें या परते ॥ १ ॥ एकी देह आशा सोडोनि स्पष्ट । हिमाचळाची धरिली वाट । मी तरी संतांचा होऊनि भांट । पवाडे स्पष्ट गातसें ॥ २ ॥ कोणी बैसलें योगसाधनीं । कोणी भ्रमती तीर्थाटणीं । मज संतांच्या चरित्रा वांचोनी । कांहींच मनीं नावडे ॥ ३ ॥ कोणी आर्जवें मेळवूनियां धन । योगयाग करिती नाना प्रयत्नें । म्यां हेंचि इच्छा धरिली मनें । करावें स्तवन भक्ताचें ॥ ४ ॥ कोणी सत्कर्मीं धरोनि प्रीती । पंच महायज्ञ नित्य करिती । कोणी अध्यात्म ग्रंथ पाहती । मग अर्थ आणिती ध्यानांत ॥ ५ ॥ कोणी करोनि प्राणायाम । सर्वां भूतीं पाहती सम । कोणी मानसपूजेचा धरोनि नेम । लाविलें प्रेम तें ठायीं । ॥ ६ ॥ कोणी देहींच विदेहस्थित । कोणी बैसेल अरण्यांत । कोणी पढोनि अध्यात्म ग्रंथ । ज्ञान सांगत जनासी ॥७॥ कोणी करोनि सद्गुरु भक्ती । मग इच्छित सायुज्य मुक्ती । म्यां हेचि कामना धरिली चित्तीं । वर्णावी कीर्ति संतांची ॥ ८ ॥ याजविण कांहीं असेल हेवा । तरी अंतरसाक्ष तूं जाणासी देवा । केला पण तो सिद्धीसि न्यावा । आश्रय जीवां आमुच्या तूं ॥ ९ ॥ मागिल्या आध्यायी कथा सुंदर । तुकयासि छळिले रामेश्वरें । उदकांत वह्या बुडविल्या समग्र । त्या करुणाकरें रक्षिल्या ॥ १० ॥ सिद्धाच्या शापें रामेश्वर । देह दुःख पावलें फार । धरणें घेतांचि ज्ञानेश्वरें । स्वप्नीं सविस्तर सांगीतलें ॥११॥ मग परम अनुताप धरोनि पोटीं । देहूसि चालिले उठाउठी । अर्धमार्गावरी येतांचि शेवटीं । झाल्या भेटी परस्परें ॥ १२ ॥ पुढें आळंदीसि येऊनि तूका । दृष्टीसीं ज्ञानदेव पाहिला सखा । सत्कीर्ति कळतांचि सकळ लोकां । दर्शनासि देखा ते येती ॥ १३ ॥ कोरड्या वह्या उदकांत । देशोदेशीं प्रगटली मात । भाविक लोक दुरोनि येत । दर्शन घेत तुकयाचें ॥१४॥ मग ज्ञानदेवासि पुसोनि सत्वर । देहूसि येतसे वैष्णववीर । सर्व षट्शास्त्री रामेश्वर । तो नव्हेचि दूर सर्वथा ॥१५॥ विद्यारूप कुळाभिमान । पुत्र-कांता संपत्ति धन । मान्यता प्रतिष्ठा सांडोन । धरिले चरण सद्गुरूचे ॥ १६ ॥ हें अनगडशा बावासि वर्तमान । परस्परें कळलें जाण । कीं रामेश्वराचें शापमोचन । केलें तुकयानें निश्चित ॥ १७ ॥ म्हणे आम्हांसि न येतांचि शरण । आरोग्य केलें तुकयानें । तरी आतां जाऊनि घ्यावें दर्शन । चमत्कार पाहणें तो कैसा ॥ १८ ॥ ऐसें म्हणवोनि तो महंत । पुण्यातूनि निघाला त्वरित । मार्गीं चिंचवड ग्राम लागत । तेथें वसती भक्त गणपतीचे ॥ १९ ॥ देवाचेंद्वारीं जावोनि सत्वर । भिक्षा आणा म्हणतसे फकीर । साहनक घेतली निजकरें थोर । म्हणे भरोनि सत्वर हे द्यावी ॥ २० ॥ त्यांचे कारभारी कोठी होते । ते शिधा आणूनि घालिती बहुत । परी साहनक न भरेंच निश्चित । मग विस्मितचित्त सकळांचें ॥ २१ ॥ देवघरांत बैसले चिंतामणी । त्यांजवळ सांगती जाउनि । एक फकीर आलासे अंगणीं । साहनक घेउनी हातांत ॥ २२ ॥ उदंड शिधा घातला त्यांत । परी ते न भरेचि किंचित ।

१ स्तुती करणारा.

चिंतामणी तयांसि आज्ञा करित । विमुख अतीत दवडूं नका ॥ २३ ॥ जितुकें धान्य असेल घरीं । तितुकें घाला त्याचें पात्रीं । ऐसी आज्ञा होताचि सत्वरी । काय कारभारी करिताती ॥ २४ ॥ जितुकें साहित्य होतें घरीं । तितुकें घातलें त्याचें पात्रीं । परी साह न भरे ते अवसरीं । मग पेवें सत्वरी काढिती ॥ २५ ॥ खंडयाचखंडया वोतिल्या त्यांत । परी तें फकिराचे पात्रीं मात । चिंतामणी देव बाहेर येत । मग सिद्धी करीत उभ्या तेथें ॥ २६ ॥ त्यांनीं निजकरें भरिलें पात्र । मग तेथूनि निघत फकीर । देहुग्रामासि येऊनि सत्वर । प्रवेशे मंदिर तुकयाचें ॥ २७ ॥ अवली स्वयंपाक करी मंदिरीं । तों फकीर बाहेर हांका मारी । माझें पात्र भरोनि सत्वरी । पीठ लवकरी आण माते ॥ २८ ॥ अवली म्हणे ते अवसरीं । कोण मेला आला भिकारी । मग त्यांनीं पाठ घेतली बरी । धान्य तों घरीं असेना ॥ २९ ॥ गंगा तान्ही कन्या जाण । तिनें पीठ घेतलें मूठ भरोन । अवली हातासि झोंबतसे जाण । पाडिलें त्यांतून पीठ कांहीं ॥ ३० ॥ आधींच लेंकुराचा लहान हात । मातेनें हिरोनि घेतलें त्यांत । फकीर बाहेर उभा राहत । कौतुकें पहात दृष्टीसी ॥ ३१ ॥ गंगा कन्या बाहेर येत । किंचित पीठ तयासि घालीत । पात्र भरोनि आलें वरते । अगडशा विस्मित मानसीं ॥३२॥ आपुली करामत दाखवीत पाहीं । ते न चलें तये ठायी । मग परम आश्चर्य करोनि जीवी । मुलीस लवलाही पुसतसे ॥३३॥ तुकोबा नांव तुझेचि कायी । ऐकोनि म्हणे गंगाबायी । वेडियासारिखें बोलसी पाहीं । विदित नाहीं तुजलागीं ॥ ३४ ॥ प्रातःस्नान करोनि तत्त्वतां । देउळीं बैसला माझा पिता । अनगडें ऐकोनि हे वार्ता । म्हणे दर्शन आतां घेऊ त्याचें ॥ ३५ ॥ मग देऊळी येऊनि सत्वरगती । त्यानें पाहिली तुकयाची स्थिती । तों पूर्ण ब्रह्म सनातन मूर्ती । निष्काम चित्तीं सर्वदा ॥ ३६ ॥ अनगड होऊनि प्रेम भरित । घातलें साष्टांग दंडवत । दोन दिवस राहोनि तेथ । श्रवण करित हरिकथा ॥ ३७ ॥ कीर्तन होतां चारी प्रहर । तोंवरी तिष्ठे समोर । अनगडाचा सन्मान आदर । वैष्णववीर करीतसे ॥ ३८ ॥ तुकयाच्या ऐकोनि गोष्टी । फकीर संतोष पावला चित्तीं । तुकयासि पुसोनि आपुले मठीं । उठाउठी तो गेला ॥ ३९ ॥ नित्य देहूंत कीर्तन गजर । श्रवणासि यात्रा येतसे फार । तों एक परस्त्री सुंदर सुकुमार । कामातुर अंतरी ॥४०॥ कीर्तन होतांचि निश्चितीं । तुकयासि सांपडविलें एकांती । म्हणे माझ्या हेत उपजला चित्तीं । कीं तुम्हांसी रती करावी ॥४१॥ बहुत दिवस जपतां निश्चित । तों आजि फावला एकांत । ऐसें ऐकोनि विष्णुभक्त । थरथरां कांपत तेधवां ॥ ४२ ॥ जैसी रंभा देखोनि नयनीं । शुकयोगींद्र त्रासला मनीं । तैसेंच जाहलें तुकयालागोनी । बैसे उठोनी सत्वर ॥ ४३ ॥ मग दोन अभंग बोलोनि जाण । उपदेशिले तिजलागुन । परस्त्री मज मातेसमान । अन्यथा वचन हें नव्हे ॥ ४४ ॥ षड्वैरी जे कां असती देहीं । ते ठेविले विठोबाचे पायीं । महासिद्धि त्यजिल्या सर्वही । तेथें पाड काय प्रकृतीचा ॥ ४५ ॥ आतां सत्वर जाय वो माते । उगेच सायास

करिशील व्यर्थ । ऐसें बोलोनि वैष्णवभक्त । जावोनि बैसत एकांतीं ॥ ४६ ॥ सप्रेम भावें भजन करी । तो उदयासि पातला तमारी[1] । यात्रा मिळाली विष्णु मंदिरीं । जयजयकारी नामघोष ॥ ४७ ॥ तों लोहगांवकरी एके दिवसीं । तुकायासि आले न्यावयासी । बहुत प्रयत्नें प्रेमळासी । घेऊनि ग्रामासी ते गेले ॥ ४८ ॥ तुकयाच्या सवे वैष्णवजन । श्रेष्ठ निधडे असती कोण कोण । रामेश्वर पंडित थोर ब्राह्मण । जो न जाय परतोन गृहासी ॥ ४९ ॥ तुक्या धाकुटा सहोदर जाण । कान्होबा त्याचें नामाभिदान । गंगाजी मवाळ तिसरा ब्राह्मण । कीर्तन गायन करूं लागे ॥ ५० ॥ आणि संताजी तेली बहुत प्रेमळ । अभंग लिहित बैसे जवळ । धन्य त्याचें भाग्य सबळ । संग सर्वकाळ तुकयाचा ॥ ५१ ॥ हे प्रथम मुख्य चौघे असती । आणिकही पुढें बहुत मिळती । कीर्तनामाजी ध्रुपद धरिती । सप्रेमगती करोनिया ॥ ५२ ॥ असो आतां प्रेमळ भक्त । लोहगांवा समीप जात । नगरवासी सामोरे येत । घालिती दंडवत सद्भावें ॥ ५३ ॥ तुकयाचें कीर्तन ज्याचें घरीं । परम उल्हास त्याचें अंतरीं । दिव्यान्नें करोनि नानापरी । ब्राह्मण मंदिरीं जेवविती ॥ ५४ ॥ ज्याची जैसी शक्ति जाणा । तैसी घालिती समाराधना । धनवंत घालोनि सहस्र भोजना । मग तुकयाच्या कीर्तना ते करिती ॥ ५५ ॥ गांवांत भाविक जाहले सकळ । परी एक शिवाजी कांसार महाखळ । तो निंदक कुटिल कृपण[2] केवळ । याहीवरी दुर्बळ संसारीं ॥५६॥ तुका सांगतेस सकळ जनां । शिवाजी कीर्तनीं बोलावूनि आणा । परी तो सर्वथा नयेचि जाणा । अपशब्द हेळणा करितसे ॥ ५७ ॥ तंव एक ब्रह्मस्वासाठीं ब्राह्मण । अळंकापुरीं बैसला धरणें । दहा सहस्र कर्ज त्याजकारणें । त्यजिलें अन्न यासाठी ॥ ५८ ॥ षण्मास लोटतां साचार । दृष्टांतीं सांगे ज्ञानेश्वर । तूं तुकयापासीं जाय सत्वर । तो ब्रह्मस्व सत्वर वारील तुझें ॥ ५९ ॥ मग तो धुंडित द्विजवर । लोहगांवासि आला सत्वर । तुकयासि बोले उत्तर । मज ज्ञानेश्वरें पाठविलें ॥ ६० ॥ त्याचे मनींचा गुह्यार्थ । न सांगतां जाणे प्रेमळभक्त । मग गांविंच्या लोकांसि सांगत । देशावर यातें करून द्या ॥६१॥ शिवाजी कांसारापासूनि जाणा । भीड खर्चोनि कांहीं जाण । न मोडवे तुकयाच्या वचना । गेले सदना तयाच्या ॥६२॥ परम बळात्कारें त्यानें । ढबू पैसे दीधले दोन । मग तुकयानें खडा उचलोन । त्यांजकारणें घासिला ॥ ६३ ॥ तंव ते सुवर्ण तत्काळ झाले । धरणेकरीयाचे हातीं दीधले । तो म्हणे इतुके न वहिले । कर्ज फिटलें न जाय ॥६४॥ कांहीं तांबें असेल देकां । ऐसें बोलतां वैष्णव तुका । आश्चर्य वाटलें गांविंच्या लोकां । संसार सुखा भुललें जे ॥६५॥ मग गवाळ्यांतील उपकरण । तुकयासि दाखवित ब्राह्मण । सत्वर खडा लावोनि जाण । केलें कांचन[3] तयाचे ॥ ६६ ॥ मग संतोष पावोनि अंतरीं । आळंदिस गेला धरणेकरी । तुकयानें खडा उचलोनि सत्वरी । बरवे माझारी टाकिला ॥ ६७ ॥ शिवाजी कांसावर अभक्तखळ । आश्चर्य करी तये वेळ । म्हणे परीस आहे तुकयाजवळ । म्हणोनि भक्तीस तत्काळ लागला ॥ ६८ ॥ म्हणो याचे

१ सूर्य. २ कंजुष. ३ सोने.

सेवेसि लागोनि तत्वतां । दरिद्र विच्छिन्न करावें आतां । यास्तव ऐके कथावार्ता । परी चित्तीं आस्था आणिकची ॥ ६९ ॥ जैसें वृंदावन कडुवट अंतरी । परी मोहोर वाळुक दिसतें वरी । तैसा कामनिक अनुष्ठान तीव्र करी । परी फळाशेवरीं चित्त त्याचें ॥ ७० ॥ एक संवत्सरापर्यंत जाण । त्याणें ऐकिले हरिकीर्तन । तो प्रसन्न जाहला रुक्मिणीरमण । तेही कारण अवधारा ॥ ७१ ॥ कथील आणावया मुंबईतें । छत्तीस बैल धाडिले होते । गुमास्ते खेप भरोनि येत । तों रुपें समस्त ते झालें ॥ ७२ ॥ ज्याजपासी खरीद केले होतें । परतोनि बैल पाठविले तेथें । सावकार आपला हिशोब पाहात । म्हणे आमुचे निश्चित हें नोहे ॥ ७३ ॥ तैसेच बैल भरिले पाही। परतोनि आणिले लोहगांवी । शिवजीस आश्चर्य वाटले जीवीं । मग तुकयासि लवलाही पुसतसे ॥ ७४ ॥ सद्गुरु म्हणती तये क्षणीं । तुझ्या दैवें आलें घडोनी । तुज पावले चक्रपाणी । तरी सत्कारणीं लावी कां ॥ ७५ ॥ बारवत्याने बांधिली थोर । तिजला म्हणती कांसार विहीर । अन्नदानें केली फार । दानें द्विजवर तोषविले ॥ ७६ ॥ तैपासोनि तो कांसार । चित्तीं विरक्त जाहला फार । त्यजिलें घरदार आणि संसार । निरंतर तुकयापासी ॥ ७७ ॥ तयाची पत्नी साचार ॥ तुकायाचा द्वेष करितसे फार । म्हणे वेडा करोनि माझा भ्रतार । निरंतर बैसविला ॥ ७८ ॥ अहोरात्र कीर्तन करी । निजावयासी येऊं नेदी घरीं । तुकयासि मारावया निर्धारीं । उपाय अंतरी योजिला ॥७९॥ चार हंडे कढतपाणी । तावोनि तिने ठेविलें सदनी । घरी तुकयासि आडी घेउनी । कपटपाणी कळेना ॥८०॥ जोत्या खाली वैष्णववीर। तिने बैसविला पिढयावर । करूनि रिचविले कढत नीर । पोळले अंतर तुकयाचें ॥८१॥ मग म्हणे देवा धांवा देवाधिदेवा। माझ्या कायेसि लागला वणवा । एक अभंग बोलिले तेव्हां । तो आला विसावा भक्ताचा ॥ ८२ ॥ कढत पाणी होतें जळत । तेचि तुकयासि शीतळ लागत । स्नान जालिया फराळ घालित । परी सोमल आंत मेळविला ॥ ८३ ॥ निज भक्तासि सुखदुःखें होती । ती निजांगें सोशीत रुक्मिणीपती । तुकयाची तो विदेह स्थिती । विष त्याजप्रती बाधीना ॥ ८४ ॥ तेथूनि जातां प्रेमळभक्त । तिजवरी क्षोभला पंढरीनाथ । गळित कुष्ट जाहला त्वरित । प्राण होत कासाविस ॥ ८५ ॥ शिवाजी कांसार घरासि येतां । तों व्याकुळ पडली असे कांता । पुष्पहार मांडवासि घातला होता । ओळखे तत्वतां दृष्टीसीं ॥ ८६ ॥ म्हणे रात्रीं होतां कीर्तन गजर । तुकयाच्या गळां होता हार । इणें आणोनि वैष्णववीर । केला प्रकार छळणेचा ॥ ८७ ॥ मग रामेश्वर भट्टी सांगीतलें जाण । जेथें तुकयासि घातलें स्नान । तेथिंचा चिखल अंगासि लावणें । आरोग्य तेणें होईल ॥ ८८ ॥ सांगीतलें करिती धरोनि भाव । मग तीस सत्वर पावला देव। गळित कुष्ठ गेला सर्व । तेव्हां आराम जीव पावला ॥ ८९ ॥ त्या दिवसापासोनि पाही । तिचीही भक्ति जडली पायीं । कीर्तन ऐके सर्वदाही । द्वेष सर्वही टाकिला ॥ ९० ॥ असो तुकयाचीं चरित्रें फार । बहुतांसि आले साक्षात्कार । वह्या बुडविल्या रामेश्वरें । त्या

रुक्मिणीवरें रक्षिल्या ॥ ९१ ॥ ऐसी सत्कीर्ति ऐकोनि श्रवणीं । शिवाजी राजा विस्मित मनीं । म्हणे तुकयासि येथें बोलावूनी । कीर्तन कानीं ऐकावें ॥ ९२ ॥ मग छत्री घोडा कारकुन पाही । बोलावूं पाठवित लोहगांवीं । वैष्णवभक्तासि ते समयीं । निरोप सर्वही सांगीतला ॥ ९३ ॥ कीं तुमचे भेटीचा धरोनि हेतें । राजा बहुत आर्तभूत । तेथवर येऊनि निश्चित । करावें सनाथ त्यालागीं ॥ ९४ ॥ ऐसा निरोप ऐकोनियां । परम अनुताप जाहला तुकया । म्हणे देवाधिदेवा पंढरीराया । गोंविसी कासया मज येथें ॥९५॥ दंभ मान चेष्ठा पूर्ण । हे तों सूकरें विष्ठेसमान । तूं दयासागर चैतन्य घन । माझें सोडणें धाव आतां ॥ ९६ ॥ ऐशा रीतीं वैष्णवभक्त । चार अभंग लेहोन देत । कारकून परतोनिया जात । तुका बोलत काय त्यासी ॥ ९८ ॥ घोडा पाठविला आम्हांतें । याजवरी तुम्हीं बैसा त्वरित । तो म्हणे हा जहाल बहुत । बैसो न देत कोणासी ॥ ९८ ॥ ऐसी गोष्टी ऐकोनि त्याची । पाठ थापटिली अश्वाची । घोडा सौम्य जाहला तेव्हांची । लीला संताची अद्भुत ॥ ९९ ॥ कारकून सांगतां वर्तमान । राजा आश्चर्य करीत मनें । चार अभंग दीधले लेहोन । तेही वाचोन पाहिले ॥ १०० ॥ निरपेक्ष देखोनि स्थिति । काय म्हणतसे भूँपती । आपण तेथवर जाऊनि प्रीतीं । तुकोबासि निश्चिंतीं भेटावें ॥ १ ॥ वस्त्रें भूषणें अळंकार । आणिक पूजा उपचार । मोहरा होन बरोबर । घेऊनि नृपवर निघाला ॥ २ ॥ सर्वे प्रधान थोर थोर लोक । लोहगांवांत आले देख । तों तेथिंचे जन अवघे भाविक । सप्रेम सुख भोगिती ॥ ३ ॥ मथुरेंसि कृष्ण जन्मला पाहीं । परी गोकुळींच्या सुखास पार नाहीं । तैसा तुकयाचा प्रेमा सर्वही । लोहगांवीं लुटिला ॥ ४ ॥ रात्रीं ऐकती श्रीहरीलीला । दिवस उगवतां गोपाळ आला । पार नसेचि त्या सुखाला । प्रेम कळवळा जे ठायीं ॥ ५ ॥ असो शिवाजी नृपनाथ । तुकयाच्या भेटीसि आला त्वरीत । साष्टांग घातले दंडवत । प्रधानां समवेत तेधवां ॥ ६ ॥ बुका तुळसी सुमनहार । राजा वाहतसे आपुल्याकरें । सुवर्ण मुद्रा तबकभर । पुढें नृपवर ठेवितसे ॥ ७ ॥ तें राज्यद्रव्य देखोनि नयनी । तुकां कंटाळे तये क्षणीं । मग काय बोले प्रसादवाणी । ते सादर कर्णी ऐकिजे ॥ ८ ॥ कासया पाहीजे द्रव्य ठेवा । एक विठ्ठलचि आम्हां व्हावा । त्याजवांचोनि आमुच्या जीवां । आणिक हे वासनेची ॥ ९ ॥ तुमची बहुत ऐकिली कीर्ती । आज उदारत्व कळलें नृपती । आम्हां वैष्णवा नावडे चित्तीं । तें देसी प्रीतीं कासया ॥ ११० ॥ जरी भास्कराच्या जावें भेटीं । तेथें कासया पाहिजे दिवटि । समुद्रावरी मेघ करितां वृष्टी । परी आर्तपोटीं त्या नाहीं ॥ ११ ॥ हिमाचळासि विंजणवारा । कासया पाहिजे नृपवरा । चंदनचर्चि जे रोहिणीवरा । तरी त्याच्या अंतरां आर्त नाहीं ॥ १२ ॥ क्षीरसागरासि दुधाळ गाय । देतां संतोष वाटेल काय । कनकाद्रीसि कांचन वाहिलें पाहे । तरी संतुष्ट काय होईल तो ॥ १३ ॥ तुवां भेटीसि आणिलें धन । हें आम्हां गोमांस समान । आतां तुमचें जेणें समाधान । तरी तेंही कारण

१ हेतु. २ पश्चात्ताप. ३ डुकर. ४ राजा. ५ चंद्र.

सांगतों ॥ १४ ॥ तुम्हीं कंठीं मिरवा तुळसी । व्रत करावें एकादशी । या विरहित धनवित्त देशी । तें मृतिका ऐसी मज भासे ॥१५॥ आमुचें चित्तीं इतुकीच आस । म्हणवा विठोबाचा दास । ऐकोनि तुकयाच्या वचनास । राजा संतोष पावला ॥१६॥ तुकयासि द्यावया आणिलें धन । तें ब्राह्मणांसि वांटी नृपनंदन । रात्रीं ऐकिलें हरिकीर्तन । प्रसादिक वचन तुकयाचें ॥१७॥ प्रथमारंभीं मंगळाचरणीं । हरिस्मरणें गर्जवी वाणी । टाळ विणे मृदंगध्वनी । नाद गगनीं कोंदला ॥१८॥ आवडीचेनि सुखें निश्चित । परमानंदें गात नाचत । टाळ्या चुटक्या वाजती बहुत । रंग अद्भुत वोडवला ॥ १९ ॥ कीर्तन रंगीं हेचि वार्ता । विठ्ठल आमुची मातापिता । विठ्ठल बंधु सखा चुलता । त्याजविण ममता मज नाहीं ॥१२०॥ विठ्ठल मित्र सखा सज्जन । विठ्ठल माझें संपत्ति धन । विठ्ठल माझें गुप्त ठेवणें । जिवलग प्राणविसांवा ॥ २१ ॥ विठ्ठल माझा एकांत जाण । विठ्ठल माझा लोकांत पूर्ण । विठ्ठलावांचोनि देखे न आन । तरी जातील फुटोन नेत्र माझे ॥ २२ ॥ विठ्ठलावांचोनि आणिकाच्या स्तवना । करितां तत्काळ झडेल रसना[1] । त्याजविण आणिक आवडे मना । तरी मानखंडना हो माझी ॥ २३ ॥ पंढरीच्या मार्गीं न चालतां पाहे । तरी तत्काळ पांगुळ होतील पाय । विठ्ठलपायीं अर्पिला देह । संसार सोय सांडिली ॥२४॥ विठ्ठलावांचोनि ब्रह्मज्ञानी । वायांच शब्द वेंचिती वाणी । तरी ते बोल संतसज्जनीं । न ऐकावे कानीं सर्वथा ॥२५॥ श्रोतयांसि म्हणे ते अवसरा । नाशवंत संसार जाईल खरा । तुम्हीं विठोबाचें भजन करा । तरीच भवतरा बापानों ॥ २६ ॥ ऐसें म्हणवोनी ते अवसरीं । नामघोषें गर्जना करी । गुप्तरूपें सुरवर अंबरीं । कौतुक नेत्रीं पाहताती ॥ २७ ॥ विठ्ठल श्रोतावक्ता निश्चितीं । म्हणवोनि सर्वत्र गाती ऐकती । ऐसें कीर्तन ऐकोनि भूपती । चित्तीं विरक्ती बाणली त्या ॥ २८ ॥ म्हणे राज्य टाकोनि येच क्षणीं । वनांत बैसावें श्रीहरि भजनीं । मग नृपवर शिरस्त्र काढोनी । ठेवित धरणी तत्काळ ॥ २९ ॥ अरुणोदय होतांचि निश्चितीं । मग उजळिली मंगळारती । तुकयासि नमस्कार करोनि भूपती । अरण्यांत एकांतीं बैसला ॥ १३० ॥ मग सांगत प्रधानादिकां । मजजवळ सर्वथा येऊं नका । राजा विरक्त होऊनि देखा । सप्रेम सुखा तो भोगी ॥ ३१ ॥ दिवसां बैसोनि अरण्यांत । रात्रीं कीर्तनासि गांवांत येत । मग प्रधान साकल्य वृत्तांत । लेहोन पाठवित मातेसी ॥३२॥ जिजाबाई ऐकोनि तत्त्वतां । धाय मोकली सर्वां देखतां । तुकयानें राज्य बुडविलें आतां । उत्तम वार्ता हे नव्हे ॥३३ ॥ मग शिबिकेंत बैसोनि ते अवसरीं । लोहगांवासि येत सत्वरी । तुकयासि देखोनि धरणीवरी । नमस्कार करी साष्टांग ॥३४॥ मग पदर पसरोनियां जाण । अश्रुपातें भरले लोचन[2] । म्हणे एक पुत्र तो तुझ्या कीर्तनें । विदेही होऊन बैसला ॥ ३५ ॥ त्याच्याही पोटीं नाहीं पुत्र । कोण चालवील राज्यभार । ऐकोनि जिजाईचें उत्तर । वैष्णववीर काय म्हणे ॥३६॥ शिवाजी येईल कीर्तनासी । मग चार गोष्टी सांगूं त्यासी । तुम्ही स्वस्थ राहावें मानसीं । विठोबासी भजावें ॥ ३७ ॥ ऐकोनि तुकयाचें वचन । जिजाबाई पुढती करी

---

१ जीभ. २ डोळे.

नमन । म्हणे मज देशील पुत्रदान । तरी होऊं उत्तीर्ण कैसेनी ॥ ३८ ॥ रात्रीं मांडितां हरिकीर्तन । श्रवणासि आला नृपनंदन । मग कर्मकांडींचें निरूपण । प्रसंग पाहून लावितसे ॥ ३९ ॥ म्हणे भवाब्धि तरावया कारणें । एक सत्कर्मचि प्रधान । ज्याचा स्वधर्म आचरावा त्यानें । उपाय आन असेना ॥ १४० ॥ दुसरियाचा धर्म उत्तम होय । म्हणवोनि आचरे लवलाहें । तरि तेणें न होयचि तरणोपाय । धर्मशास्त्रीं आहे निर्णय हा ॥ ४१ ॥ पाणी सांडोनियां मासा । तुपांत निघतां वांचेल कैसा । पक्षियांनीं सोडूनि आकाशा । बिळांत सहसा रिघों नये ॥ ४२ ॥ घुसी उंदीर धांवा आंत । बाहेर निघतां न वाचती सत्य । सर्प भक्षितां अन्नातें । तरी प्राणांत त्यातें तोच कीं ॥ ४३ ॥ तरुवरासि तों चालतां नये । उगवल्या ठायीं वाढताहे । तैसाचि मानव राहील काय । चंचल देह तयाचा ॥ ४४ ॥ आरबी घोडा असला जर । तरी तयासि वोढितां नये नांगर । शिपायी बैसला वैलावर । तरी युद्ध साचार नोहेच कीं ॥ ४५ ॥ नाना-परीचीं दृष्टांत वचनें । बोलावयासि काय कारण । कीं आपुला स्वधर्म टाकिला ज्यानें । दुस्तर मरण तेंच कीं ॥ ४६ ॥ ईश्वरें सृष्टि निर्मूनियां । ज्याचें कर्म सांगीतले तया । उत्पत्ति सांगितले ब्रह्मया । पालन आपुलियाकडे लावी ॥ ४७ ॥ शेषानें उचलोनि धरावी धरणी । वसुकीनें हालो न द्यावी मेदिनी । समुद्रे पृथ्वीसि वेढा घालोनी । मर्यादा धरोनि असावें ॥ ४८ ॥ भास्करें तीव्र तपोनि थोर । प्रकाश पाडावा जनावर । शीतळत्वासि नेमिला चंद्र । वर्ते साचार त्या रीती ॥४९॥ शीत उष्ण पर्जन्यकाळ । आपुलाल्या समयीं होती प्रबळ । आयुष्य सरतांचि तत्काळ । दंडितसे काळ देहासी ॥१५०॥ हे ईश्वराची आज्ञा निश्चिती । नेमिल्या ऐसेंच अवघे वर्तती । श्रुतिवचन जे उल्लंघिती । ते तत्काळ जाती अधःपाता ॥५१॥ विप्राचें हे कर्म साचार । ब्रह्मचर्यें घोकावें अक्षर । गृहस्थाश्रम केलियावर । षट्कर्म विचार तयासि ॥ ५२ ॥ वानप्रस्थ तो जाणा साचार । विषय जिंतावे दिवसरात्र । संकल्प त्यागे संन्यास थोर । शास्त्रीं विचार बोलिला ॥ ५३ ॥ कुळधर्म याति नाठवे निःशेष । तोचि जाणावा परमहंस । हे श्रुतिवाक्य ब्राह्मणास । आज्ञा असे श्रीहरीची ॥ ५४ ॥ आतां क्षत्रियाचे आचरण । तेंही सांगतों करा श्रवण । शत्रूंसि संमुख जिंतोन । स्वधर्म पालन प्रजांचे ॥ ५५ ॥ जैसें आपुले अवयव पोशितां पाहे । विलासी परसुखी होय । कां कुटुंबवत्सला घरासि जाय । मग परिवार पाहे प्रीतीनें ॥ ५६ ॥ तशाच परी प्रजेच्या सुखें देख । राय चित्तीं मानी हरिखे । त्याहूनि पुण्य नसेचि अधिक । सद्विवेक ज्या अंतरीं ॥ ५७ ॥ ईश्वर प्राप्तीस्तव जाण । क्षत्रियांनीं करावीं दानें । काया वाचा आणि मनें । न वंचणें सर्वथा ॥ ५८ ॥ मुख्य आदि करूनि द्विजवर । क्षत्रिय वैश्य चौथा शूद्र । आणिक नाना याति इतर । तिहीं स्वधर्मी तत्पर असावें ॥ ५९ ॥ समस्तां धरोनि चित्तांत । भूतीं पाहिजे भगवंत । न करावा कोणाचा घात । आणि भजनीं प्रीत असावी ॥ १६० ॥ आपुलाला करिती व्यापार । परी असत्य बोलों नये उत्तर ।

१ आनंद.

असत्यापरीस पाप थोर । नसे साचार दुसरें ॥ ६१ ॥ सर्वांभूतीं दया असावी पूर्ण । क्षुधार्तांसि द्यावें अन्न । असत्य न बोलावें वचन । आणि हरिस्मरण सर्वदा ॥ ६२ ॥ ऐसी स्थिती धरोनि बरी । मग सुखें असावें संसारीं । कासया जावें वनांतरीं । घरींच श्रीहरी भेटे तया ॥ ६३ ॥ ऐसी तुकयाची उपदेशवाणी । सकळ श्रोते ऐकती श्रवणीं । राजा तटस्थ जाहला मनीं । अश्रुपात नयनीं वाहतीं ॥ ६४ ॥ मग हरिनामें गर्जोनि प्रीतीं । उजळिली मंगळारती । ओंवाळूनि रुक्मिणीपती । दंडवत प्रीतीं घातलें ॥ ६५ ॥ सकळ श्रोतयांसि निश्चितीं । प्रसाद वांटिला खिरापती । जाणोनि तुकयाची मनोवृत्ती । वस्त्रें भूपतीं घे तेव्हां ॥ ६६ ॥ मग शिवाजीराजयाची आजी । तुकोबाच्या लागतसे पायीं । म्हणे तुमचें उतरायी व्हावें कायी । तो पदार्थ कांहीं दिसेना ॥ ६७ ॥ आणिक चार दिवसपर्यंत जाण । तेथें राहिला नृपनंदन । तों आणिक चारित्र वर्तलें गहन । तें ऐका सज्जन भाविकहो ॥ ६८ ॥ एक नावजी माळी तये ठायीं । परम भाविक होता पाहीं । कीर्तन होतां एके समयीं । तुकयासि कायीं बोलतसे ॥ ६९ ॥ क्षणएक उभे राहतों आम्ही । तुम्हीं विसांवा घ्यावा स्वामी । मग प्रेमभरित होऊनि नामीं । मनोधर्मी नाचतसे ॥ १७० ॥ विठ्ठल नामाचे छंदें । नाचत तेव्हां परमानंदें । टाळ्या वाजवितसे आनंदें । वेधलें गोविंदें मन तेव्हां ॥ ७१ ॥ चार घटिकापर्यंत पूर्ण । कीर्तनीं नृत्य केलें त्याणें । स्वेद निथळत आंगातून । मग निःशक्त होऊन बैसला ॥ ७२ ॥ मग तुकाराम उठती कीर्तनीं । रंग वोडवे अनंतगुणी । नावजी माळी तेंपासुनी । दिवसां जाऊनी काय करी ॥ ७३ ॥ सूत कांतोनि गोवरीवर । पुष्पाच्या माळा करितसे फार । कीर्तनीं बैसती द्विजवर । तयांसि हार ते घाली ॥ ७४ ॥ नावजी कीर्तनासि येतसे जेव्हां । म्हणे आला आमुचा प्राणविसांवा । ऐसें बोलतां भक्त वैष्णवा । आश्चर्य तेव्हां लोक करिती ॥ ७५ ॥ सेवकानें चवाळें करोनि सत्वर । तुकयाचे हातीं देतसें पदर । पचंग घालोनियां सत्वर । वैष्णवासमोर नाचतसे ॥ ७६ ॥ द्वारकेचे केणें निश्चित । पंढरीसि आलें चोजवित । ऐसें अवघड नयेचि त्यातें । मग चोजवित म्हणत तेधवां ॥ ७७ ॥ ऐकोनि नावजीचें वचन । गदगदां हांसती सर्वत्र जन । नावजी अधिक संतोषमान । प्रेमें करोन नाचतसे ॥ ७८ ॥ तंव तेथील सुज्ञ होता ब्राह्मण । तो तळ्यांत गेला करावया स्नान । नावजीस फजीत केलें त्याणें । म्हणे अबद्ध वचन बोलसी तूं ॥ ७९ ॥ द्वारकेचें केणें चोदवित । पंढरीसि आलें म्हणसी नित्य । येणें दोषें अधोगत । होईल निश्चित तुजलागीं ॥ १८० ॥ ऐसें ऐकोनि ते अवसरीं । नावजी काढीतसे नाक दुरी । म्हणे आजपासोनि हें न करीं । दीधली बरी शिकवण ॥ ८१ ॥ ऐसा विकल्प घालोनि अंतरीं । ब्राह्मण गेला आपुलें घरीं । तों त्याची वाचा खुंटली सत्वरी । कांहींच वैखरी न बोलवे ॥ ८२ ॥ जाहलें वर्तमान ते अवसरीं । लेहोनि दीधलें पाटीवरी । आश्चर्य करोनि रामेश्वरीं । तुकयासि सत्वरी सांगीतलें ॥ ८३ ॥ तो इतुकियांत एका कुणबीयानें । कोंवळें वाळुक आणिलें जाण । मनांत इच्छा धरिली

त्याणें । कीं हें तुकयानें भक्षावें ॥ ८४ ॥ जाणोनि तयाचें अंतर । निजांगें चिरीत वैष्णववीर । चार फाक करोनि निजकरें । तीन सत्वर भक्षिल्या ॥ ८५ ॥ एक खालीं राहिली जाण । मग रामेश्वर भट बोलती वचन । सर्वत्रांसि प्रसाद कांहीं देणें । मग काय म्हणे विष्णुदास ॥ ८६ ॥ हें तुम्हां योग्य नसेचि देख । यास्तव भक्षिलें सकळिक । वाचा गेली त्यासि अर्ध फांक । देतांचि कौतुक काय झालें ॥ ८७ ॥ तुकयाचा प्रसाद भक्षितां वदनीं । बोलों लागला तयेक्षणीं । राहिले फाकेचे भाग करोनि । सर्वां लागोनी दीधले ॥ ८८ ॥ मुखासि लावितां निश्चित । कुसमुसिती आंतच्या आंत । आड लपोनि थुंकोनि टाकित । कडू बहुत म्हणोनि ॥८९॥ असो रात्रीं कीर्तन मांडत । तों नावजी माळी आला तेथ । तुकयापासीं सांगीतली मात । कीर्तन निश्चित न करीं मी ॥ ९० ॥ तुका तयासि बोले वचन । हें आम्हीच चुकलों होतों जाण । तुझें शुद्ध प्रेमाचें बोलणें । देवा कारणें आवडे ॥ ९१ ॥ ऐकोनि तुकयाची वाणी । नावजी हर्षला बहु मनीं । मग चार घटिका टाकोनि कीर्तनीं । प्रेमें करोनी नाचला ॥ ९२ ॥ असो चार दिवसपर्यंत । शिवाजी राजा राहिला तेथ । कीर्तनघोष श्रवण करित । प्रेमयुक्त नित्य काळीं ॥ ९३ ॥ स्वस्थाना जावया निश्चिती । आज्ञा मागावया येतसे [1]भूपती । मनकामना धरोनि चित्तीं । प्रसाद इच्छिती काय तेव्हां ॥ ९४ ॥ आमुचें राज्य सुटेल जर । तरी स्वामी देतील आजि भाकर । पोटीं संतान असेल होणार । तरी देतील नारळ मजलागीं ॥९५॥ जाणोनि तयाचें मनोगत । भाकर नारळही तयासि देत । घालोनि साष्टांग दंडवत । निघे नृपनाथ ते समयीं ॥ ९६ ॥ कोंडभट पुराणीक सर्वकाळ । राहे तेव्हां तुकयाजवळ । आणि रामेश्वर पहिले होते खळ । भक्त प्रेमळ ते झाले ॥ ९७ ॥ हे उभयतां दोघे ब्राह्मण । वेदांतवक्ते असती पूर्ण । आणिक चौदा वैष्णवजन । संसार त्यजून राहिले ॥ ९८ ॥ कोणासि न पुसतां निश्चिती । तुकाराम ज्या गांवासि जाती । तिकडे अवघे धुंडीत येती । श्रवणीं निजप्रीती लावोनियां ॥ ९९ ॥ श्रीभक्तलीलामृत ग्रंथ सुंदर । हाचि क्षीराब्धिपूर्ण सागर । शेषशयनीं लक्ष्मीवर । ये स्थळीं निरंतर पहुडला ॥ २०० ॥ सभाग्य श्रोते प्रेमळ निश्चिती । तेचि विबुध दर्शनासि येती । संतचरित्रें सुधारस । नित्य सेविती प्रीतीनें ॥ २०१ ॥ त्याच्या योगें करोनि निश्चित । जन्ममरणांपासूनि मुक्त । सर्वथा नाहीं [2]पुनरावृत्त । सायुज्य भोगित पद जें कां ॥ २ ॥ जो अनाथबंधु करुणाकर । भक्तवत्सल कृपासागर । तो महीपतीसि देऊनि अभय वर । वदवीत अक्षरें ग्रंथार्थी ॥ ३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । छत्तिसावा अ० गो० ॥ २०४ अ० ॥ ३६ ॥ ओ० ॥ २०४ ॥

१ शिवाजीराजा. २ पुनर्जन्म.

अध्याय ३७



श्रीगणेशाय नमः । नभीं नीळिमा दिसती जया रीतीं । तैसी श्रीहरी तुझी सुंदर कांती । मुक्त[1] रत्नें मुगुटी झळकती । जैसे बाळ गभस्ती[2]
उगवले ॥ १ ॥ शोधीं वसुधारसाचे कवळ । ओतिलें मंडित मुखकमळ । अजिनी पत्रां ऐसें निर्मळ । नेत्र विशाल तळपती ॥ २ ॥
माणिकें बैसोनि हेमँ[3] कोंदणीं । त्यांचीं कुंडलें वळिलीं दोन्हीं । मकराकार तळपती कर्णीं । स्थिर गमनीं डोल देती ॥ ३ ॥
जैसी महा रत्नें बैसविलीं पंक्ती । तैसें दंत वदनी झळकती । कौस्तुभाची सतेज दीप्ती[5] । जेवीं कां निशापती[4] उगवला ॥ ४ ॥
श्याम तनु घनाकृती । चंदन पातळ चर्चिला निगुती । विद्युल्लता चमके जैशारीतीं । पीतांबर दीप्ती तेवीं दिसे ॥ ५ ॥ मनगटीं वीरकंकणें
घातलीं । उदरीं सुंदर शोभे त्रिवळी । भ्रमर पडला रोमावळी । श्रीवत्स नव्हाळी तेचि पैं ॥ ६ ॥ ठाण साजिरें सुकुमार । कंठीं कोमळ
तुळसीचे हार । जघनीं ठेविले दोन्ही कर । आणि पाउलें सुकुमार विटेवरी ॥ ७ ॥ जें योगियांचें निजध्यान । नीलग्रीवाचें देवतार्चन ।
तो तूं निज भक्तांचा रक्षावयासि मान । साकार सगुण पैं होसी ॥ ८ ॥ हृदयीं रूप आठवलें सुंदर । तेंचि पत्रीं लिहीलीं अक्षरें । आतां
मज देऊनि अभयवर । वदवीं चरित्रें संतांचीं ॥ ९ ॥ मागिले अध्यायीं कथा गोमटी । तुकयाची सत्कीर्ति ऐकोनि मोठी । शिवाजी राजा
घेऊनि भेटी । संतोष पोटीं पावला ॥१०॥ चार मास लोटतां तये ठायीं । मागुती आले देहुगावीं । चरित्र वर्तलें तेथें कांहीं । तेचि नवायी
अवधारा ॥ ११ ॥ भीमा शंकरासि जावें पाहीं । पुण्याची यात्रा धेऊनि कांहीं । चिंतामणि देव देहुगांवीं । एके समयीं पातले ॥ १२ ॥
तयांसि देखोनि वैष्णवभक्त । सद्भावें घालीत दंडवत । परस्परे भेटतां निश्चित । संतोष होत मानसी ॥ १३ ॥ यात्रेकरी बाहेर आले ।
यास्तव वाणियांनी दीधलीं पालें । सर्व साहित्य घेऊनि बैसले । तेव्हां तुकयासि बोले चिंतामणी ॥ १४ ॥ तूं प्रेमळ वैष्णवभक्त । कांहीं
प्रसाद द्यावा येथें । जरी साहित्य द्याल आम्हांपुरतें । तरी मनोरथ पूर्ण होती ॥१५॥ ऐसी ऐकोनियां वाणी । तुकयासि संतोष झाला मनीं ।
मग सत्वर जावोनि आपुलें सदनीं । साहित्य घेऊनी पातले ॥ १६ ॥ कणीक डाळ तांदुळ घृतें[6] । तुकयानें आणिलें एकापुरतें । तों
सकळ यात्रा येऊनि तेथें । म्हणे प्रसाद आम्हांते कांहीं द्या ॥१७॥ ऐसी देखोनि त्यांची आस्था । संकट पडिलें प्रेमळ भक्ता । म्हणे
देवाधिदेवा रुक्मिणीकांता । साहित्य समस्ता पुरवावें ॥१८॥ ऐसें चिंतिता वैष्णवभक्त । गुप्तरूपें येत पंढरीनाथ । एकाचें साहित्य पदरीं
होतें । तें वाटितां पुरे सकळांसी ॥१९॥ ऐसी देखोनि अघटित करणी । चिंतामणी देव विस्मित मनीं । म्हणे सिद्धि न येतां ये ठिकाणीं ।
कैसी पुरवणी हे झाली ॥ २० ॥ ऐसें म्हणोनि आपुलें चित्तीं । तुकयासि आलिंगन दीधलें प्रीतीं । मग स्वयंपाक करोनि यथास्थितीं ।
तुकयासि पंक्तीं बैसविलें ॥२१॥ एक राहोनि जाण ॥ तुकयाचें कीर्तन करी श्रवण । अरुणोदय होतांचि पूर्ण । यात्रा येथून चालिली ॥२२॥
तों आणिक एक दुसरा ब्राह्मण । ज्ञानदेवीं जावोनि घेतलें धरणें । देखोनि तयाचें निर्वाण । दाखवी स्वप्न सद्गुरु ॥ २३ ॥ तुकयाजवळ

१ मोती. २ सूर्य. ३ सोन्याच्या कोंदणात. ४ चंद्र. ५ तेज. ६ तूप.

जावोनि पाहीं । जें देईल तें घेऊनि येयी । दृष्टांत होतांचि ते समयीं । मग देहुगांवीं तो आला ॥ २४ ॥ स्वप्नींचा सांगतांचि वृत्तांत । तुकयाचें कंटाळलें चित्त । म्हणे हे उपाधि पंढरीनाथें । कासया जनांत वाढविली ॥ २५ ॥ मी तरी अनाथ दुबळा । नेणें सिद्धीची दाखवूं कळा । धरणें येतसे वेळोवेळां । त्यांची लीला जाणती ते ॥ २६ ॥ मग धरणेकरियासि म्हणती पाहीं । तूं लोहगांवासि सत्वर जायी । शिवजी कांसार तये ठायीं । तो देईल तें घेयी उगाची ॥ २७ ॥ अवश्य म्हणवोनि तो द्विजवर । लोहगांवासि गेला सत्वर । वृत्तांत ऐकोनि तो कांसार । विस्मित अंतर तयाचें ॥ २८ ॥ शिवजी कांसाराचें सदनीं । समाराधना तये दिनीं । विडे दाक्षिणा देऊनी । सकळां लागोनी तृप्त केलें ॥ २९ ॥ भोजन जाहलिया सत्वर । घरांत नेला तो द्विजवर । मग लोहाच्या पासा उचलोनि चार । डोईवर दे तयाच्या ॥ ३० ॥ म्हणे देहूसि जावोनि लवलाहीं । तुकयाच्या दृष्टीसि दाखवीं । ब्राह्मण चिंतातुर जीवीं । म्हणे करावें कायी याजला ॥ ३१ ॥ दरिद्र विच्छिन्न व्हावया पाहीं । अनुष्ठान केलें ज्ञानदेवीं । परी संपत्ति माझे प्राक्तनीं नाहीं । करितील कायी त्याजला ॥ ३२ ॥ मस्तकीं वोझें घेतलें जाण । यास्तव दुखोनि आली मान । मग कन्हेरे पर्वत दोन । तेथें पासा तीन टाकिल्या ॥३३॥ एक घेऊनि मस्तकावर । देहूसि आला तो द्विजवर । एकांतीं तुका वैष्णव वीर । तया समोर उभा ठाके ॥३४॥ प्रेमळभक्त पुसतसे पाहीं । तुम्हांसि दीधली दक्षिणा कांहीं । पास दाखवितां लवलाहीं । तों कांचन सर्वही तें झालें ॥३५॥ मग तुकाराम बोलती वाचे । हें तुज देणें ज्ञानदेवाचें । कोणासि न सांगतां सांचें । संसाराचें कार्य साधीं ॥३६॥ ऐसें बोलतां वैष्णववीर । घेऊनि चालिला तो द्विजवर । तीन पासा टाकिल्या मार्गावर । जाऊनि सत्वर पाहे तेथें ॥ ३७ ॥ जेथें मनुष्यांचें आगमन नाहीं । ठेविल्या होत्या तये ठायीं । पाहूं जातां कांहींच नाहीं । मग विस्मित जीवीं होय तो ॥३८॥ मग म्हणे आपुलें प्राक्तनीं । होते तेचि आलें घडोनी । ऐसें समजोनि आपुलें मनीं । गेला सदनीं ब्राह्मण तो ॥३९॥ आणिक चरित्र रसाळ गहन । मुळाभिंवरा संगमीं जाण । तये तीर्थी करावया स्नान । देहूग्रामींहून चालिले ॥ ४० ॥ तों मार्गी ओसाड अरण्य पाहीं । मेंढ्यांचे खिल्लार होतें तये ठायीं । श्वानें माजला नावरे कोणाही । मारीत लवलाहीं मनुष्यां ॥४१॥ वाटेसि मनुष्य आले जर । नरडी फोडोनी पीतसे रुधिरें । त्याचा बोभाट जाहला फार । परी श्वान नावरे कोणातें ॥४२॥ तुकयासि लागतां तेचि वाट । तों श्वान धांवोनि आला नीट । परी चिंता भय कांहीं न वाटे । तंव कुतरा निकट पातला ॥ ४३ ॥ नरडी धरितां लवलाहीं । तो प्रेमळभक्त बोले ते समयीं । आम्हांपासीं गुरगुर नाहीं । तूं आपुले देहीं धरिसी कां ॥ ४४ ॥ ऐसें बोलतां तुका त्याप्रती । श्वानासि तत्काळ आली शांती । उगाच निचिंत पडिला क्षितीं । तों मेंढकेही येती तये ठायीं ॥ ४५ ॥ पाहती तों कुतरा धरणीवर । दिसे जैसा पाळीव मांजर । सर्वथा न भुंके कोणावर । नवल थोर वाटले त्यां ॥ ४६ ॥ मग तुकाराम ते अवसरीं । भजन करीत सप्रेम गजरीं । मार्गी क्रमोनियां

१ कुत्रा. २ रक्त.

सत्वरी । भीमातीरीं स्नान केलें ॥ ४७ ॥ शिवालयीं बेटावर । एकांतीं बैसले वैष्णववीर । ध्यानांत आणोनि रुक्मिणीवर । सगुण चरित्र गातसे ॥ ४८ ॥ मध्यान्ह समय होतांचि पाहीं । भिक्षेसि गेले रांजणगांवी । तो एका ब्राह्मणचें गृहीं । वैश्वदेव समयीं पातले ॥ ४९ ॥ विष्णुभक्तासि देखोनि नयनी । चित्ती संतोषे घरधनी । तुकयासि भोजन घालोनि । विनित वचनीं काय बोले ॥ ५० ॥ म्हणे हा पुत्र आठ वर्षांचा । परी अझूनि मुका न बोले वाचा । म्हणोनि व्रतबंध राहिला याचा । गायत्री मंत्राचा शब्द न ये ॥ ५१ ॥ मग समीप मूल आणूनि त्याचा । म्हणे विठ्ठल विठ्ठल म्हणे कीं वाचा । अनुग्रह होतांचि संताचा । पुत्र ब्राह्मणाचा बोलतसे ॥ ५२ ॥ मग तुकयासि राहवोनि त्यांनीं । व्रतबंध केला दुसरे दिनीं । म्हणती अघटित संताची करणी । मुक्यास वदनीं बोलवितसे ॥ ५३ ॥ परतोनि मार्गीं येतां जाण । तों मेंडके बोलती तुक्या कारणे । कुतरा गेला कामांतून । यासि घेऊनि ना वेगीं ॥५४॥ पुढें चालतां लागला श्वान । एकादशीस न खाय अन्न । ऐके कीर्तन सर्वदा ॥५५॥ यावरी येलवडकर जांवयी । तुकयासि पुसे ऐके समयी । मज नित्य नेम सांगा कांहीं । म्हणोनि पायी लागला ॥५६॥ भावार्थ देखोनि तत्त्वतां । मग वाचावयासि दीधली गीता । नित्य नेम पारायणकरितां । तें पंढरीनाथा आवडलें ॥५७॥ त्याचें घरीं खेडकर जोशी । आकस्मात आला एके दिवशी । म्हणे तूं अशुद्ध गीता वाचितोसी । परी नरकासी जाशी निश्चित ॥५८॥ मालजी गाड्यास मानलें वचन । म्हणे मी न वाचीं आजपासुन । ऐसा विकल्प घालोनि पूर्ण । मग गेला ब्राह्मण तो घरां ॥५९॥ तंव स्वप्नी येऊनि पंढरीनाथ । जोसियासी शिक्षा काय करित । आमुचें चित्त रंजत होतें तेथ । आणि विकल्प व्यर्थ घातला त्वां ॥ ६० ॥ तरी आतां जावोनि त्याच्या घरासी । लावीं गीता वाचावयासी । तरीच कल्याण होईल तुजसी । मग शब्द आम्हांसी असेना ॥ ६१ ॥ ऐसा दृष्टांत देखोन । परम भय पावला तो ब्राह्मण । सकाळीं येलवाडीस जाऊन । म्हणे पारायण करीत जा ॥ ६२ ॥ मालजी तयासि उत्तर देत । मी अवद्ध न वाचीं निश्चित । मग चार महिने राहोनि तेथ । घोकूं सांगत तयासी ॥६३॥ भावाचा भुकेला रुक्मिणीपती । शहाणपणें शिणल्या श्रुती । भाविक अवद्ध वांकुडें म्हणती । त्यांची प्रीती बहु देवा ॥ ६४ ॥ यावरी बाळक्रीडेंत शब्दरत्नें जाण । श्रीकृष्णाचें मुख मलिन । कडिये घेतला यशोदेनें । ऐसें वचन तुकयाचें ॥ ६५ ॥ हें देखोनि रामेश्वरभटीं । आपुल्या हातें अक्षरें पालटी । मुख म्लान जगजेठी । गीर्वाण गोष्टी मोडली ॥ ६६ ॥ मग स्वप्नीं येऊनि पंढरीनाथ । रामेश्वरभटासि काय बोलत । तुवां तुकयांचें वचन मोडोनि निश्चित । आपलें मत स्थापिलें ॥ ६७ ॥ तरी म्लानमुख व्हावयासि तत्वतां । आम्हासि कायसी होती चिंता । बाळपणीं माती खादली असतां । यास्तव मालिनता सहजची ॥ ६८ ॥ अवतारा अवतारींच निश्चिती । तुका जिवलग सांगाती । जैसें पाहिलें आम्हींप्रती । तैशाच रीतीं वदला तो ॥ ६९ ॥ इतुका चमत्कार दाखवून । मग देव पावले अंतर्धान । रामेश्वर जागृतीस येऊन ।

विस्मित मन होय तेव्हां ॥ ७० ॥ जैसी तुकयाची वचनोक्ती । तैसें स्वहते करी पुढती । कीर्तनीं बैसल्या संतमूर्ती । साकल्य त्यांप्रती सांगीतलें ॥ ७१ ॥ यावरी एकदां चैत्रमासीं । तुकाराम चालिले यात्रेसी । शंभुचें शिखर पाहावयासी । हेत मानसीं धरियेला ॥ ७२ ॥ सवें सोबती दोघेजण । गंगाजी मवाळ ब्राह्मण । दुसरा संताजी तेली जाण । वैष्णव जन घेतले ॥ ७३ ॥ पंथ क्रमितां भजन करित । रात्रीं मुकामीं कीर्तन होत । सातवे मजलीस शिखर दिसत । मग सद्भावें दंडवत घालिती ॥ ७४ ॥ कोथळेश्वर पर्वत थोर । त्यावरी वसे पार्वतीवर । तळवटीं क्षेत्र सिंगणापुर । तेथें सरोवर एक असे ॥ ७५ ॥ पर्वती उदक नसेचि जाण । यास्तव तळ्यांत केलीं स्नानें । सोबती म्हणती तुकया कारणें । आतां घ्यावें दर्शन शंभूचें ॥ ७६ ॥ यावरी म्हणे वैष्णवजन । आधीं शंभूसि घालोनि भोजन । मग घाल्या पोटीं घेऊं दर्शन । गुंताकरणें ये ठायीं ॥७७॥ जाणोनि तुकयाचें मनोगत । चौघांचा स्वयंपाक केला तेथ । तों नग्न दिगंबराच्या रूपें तेथ । कैलासनाथ पातले ॥ ७८ ॥ जटा मुगुट मस्तकीं शोभत । सर्वांगासि चर्चिली विभूत । आंगावरी तेज नसे मात । तुंबा हातांत एक असे ॥ ७९ ॥ तुकयाप्रती बोले वचन । आम्हांसि येथें घाली भोजन । बहुत दिवस क्षुधित जाण । तुझें दर्शन इच्छितसें ॥ ८० ॥ ऐसें बोलतां तो अतीत[1] । अवश्य म्हणे वैष्णव भक्त । बैसावयासि देऊनि त्वरित । सद्भावें दंडवत घातलें ॥ ८१ ॥ पाकसिद्ध होताचि जाण । चार पात्रें मांडिलीं गंगाजीनें । आधीं अतीताचें होऊंद्या भोजन । जेवूं मागून आपण तिघे ॥ ८२ ॥ ऐकोनि तुकयाची वचनोक्ती । मग एकेच पात्रीं अन्न वाढिती । देखोनि तुकयाची सप्रेमभक्ती । कैलासपती जेवितसे ॥ ८३ ॥ चौघांचें रांधिलें अन्न ॥ तितुकेंही भक्षिलें अतीतानें । मग ढेंकर दीधला जाण । आशीर्वचन बोलतसे ॥ ८४ ॥ भोंपळाभर पिवोनि जीवन । करशुद्धि घेतली त्यानें । मुखशुद्धि विडा भक्षून । म्हणे होईल कल्याण तुकया तुझें ॥ ८५ ॥ ऐसें वचन बोलोनि निश्चित । कोथळ पर्वतीं गेला अतीत । गंगाजी मवाळ विस्मित होत । तुकयासि बोलत काय तेव्हां ॥ ८६ ॥ तुम्हीं बरी सांगितली युक्ती । नाहींतरीं क्षुधित राहता अतिथी[2] । सामग्री आणावयासि सत्वरगती । संताजीस धाडिती गांवांत ॥८७॥ माशा वोंगती भांड्यावर । म्हणोनि वस्त्र झांकिलें तयांवर । गांवांतून साहित्य आणिलें सत्वर । तों अद्भुत चरित्र वर्तलें ॥ ८८ ॥ स्वयंपाक करावा लवलाहें । गंगाजी भांडीं उघडोनि पाहे । तों अन्न तयांत भरलें आहे । अवघेचि ठाय परिपूर्ण ॥ ८९ ॥ मग उभयतांसि खूण बाणली चित्तीं । कीं अतीतरूपें जेविला कैलासपती । साक्षात दर्शन निश्चिती । धरितां संगती संताची ॥ ९० ॥ मग तो प्रसाद पात्रीं वाढुन । तिघे जेविले निजप्रीतीनें । तेव्हां पर्वतावर सत्वर जाऊन । घेतलें दर्शन शंभूचें ॥ ९१ ॥ प्रेमभरित ते अवसरीं । कीर्तन केलें महाद्वारीं । कावडीचे अभंग सप्रेमभरीं । नानापरी बोलिले ॥ ९२ ॥ पंचरात्री क्रमोनि पाहीं । परतोनि गेले देहुगांवीं । देहींच तुका जो विदेही । हेचि नवायी अगाध ॥ ९३ ॥ एके दिवसीं वैष्णवभक्त । अभंग

1 श्रीशंकर. 2 भिक्षेकरी, अतिथी.

बोलिला कीर्तनांत । कीं नामस्मरणें क्रमितां पंथ । त्यासि यज्ञ घडत पदोपदीं ॥ ९४ ॥ तों कीर्तनामाजी भाविक पूर्ण । लोहगांवकर होता ब्राह्मण । त्यानें चित्तीं विश्वास धरोन । म्हणे अन्यथा वचन हें नव्हे ॥ ९५ ॥ एक पाऊल टाकितां निश्चित । सुतळीस स्वहस्तें गांठी देत । एक संवत्सर लोटतां यातें । तों चरित्र अद्भुत वर्तलें ॥ ९६ ॥ एक गृहस्थ नामांकित असे । परी ब्राह्मण समंध लागला त्यांस । मग जावोनि हरीहरेश्वरास । सेवा विशेष पैं केली ॥ ९७ ॥ मग समंध सांगे आंगासि येऊन । म्हणे एका यज्ञाचें देशील पुण्य । तेव्हां सोडीन तुजकारण । मुक्त होईन तत्काळ ॥ ९८ ॥ ऐसा निवाडा ऐकोनि कानीं । ब्राह्मण चिंताक्रांत मनीं । म्हणे यज्ञ करावया लागोनी । सामर्थ्य ये क्षणीं असेना ॥ ९९ ॥ मग देशोदेशीं फिरे द्विजवर । स्वमुखें लोकांसि बोले उत्तर । यज्ञ घडला असेल जर । ते सुकृत सत्वर मज द्यावें ॥ १०० ॥ थोर थोर क्षेत्रें पाहिलीं बहुत । परी कोठें न साधे कार्यार्थ । तों लोहगांवास अकस्मात । फिरत फिरत पावला ॥ १ ॥ एका यज्ञाचें सुकृत । घडलें असेल जरी कोणातें । तरी तें सत्वर द्यावें मातें । परोपकारार्थ ये समयीं ॥ २ ॥ नाम घेऊनि क्रमितां पंथ । पाउला पाउलीं यज्ञ होत । गांठीं दीधल्या असती बहुत । त्यानें हे मात ऐकिली ॥ ३ ॥ मग सबंध्यांसि घरीं बोलावून । एक गांठ कापिली त्यानें । तें पाणियांत धुवोनि जाण । त्याजकारणें पाजित ॥४॥ नामप्रताप अद्भुत भला । समंधें सोडोनि दीधलें त्याला । मग ब्राह्मण अचेतन पडिला । प्रेतवत झाला एक प्रहर ॥५॥ सकळ ग्रामवासी जन । कौतुक पाहती निज दृष्टीनें । म्हणती तुकयाचें यथार्थ वचन । दृष्टीनें देखिलें ॥६॥ समंधें पीडिलें ज्यासि थोर । तो सुख पावला द्विजवर । बहुतांनीं देखिला चमत्कार । द्रवलें अंतर तयांचें ॥७॥ तुकयाची ऐसी स्थिती । ज्ञान वैराग्य सात्विक वृत्ती । त्याहीवरी सप्रेम भक्ती । भजन एकांतीं करीतसे ॥८॥ आषाढी कार्तिकी पंढरीसी । नेम न टळेचि यात्रेसी । तों अकस्मात एकेचि दिवशीं । व्यथा शरीरासी उद्भवली ॥९॥ शीत ज्वरें करोनि जाण । देह परम जाहला क्षीण । म्हणे यात्रेसि आलें महाविघ्न । उपाय कोणता करावा ॥११०॥ गाय देखतां वत्स हुंबरे । कां चंद्राविण तळमळी चकोर । चातक न देखतां जळधर । तेवीं चित्तीं झुरे सर्वदा ॥ ११ ॥ मत्स्य तळमळी जळाविण । कीं माते वांचोनि आक्रंदे तान्हें । कां कृपणाचें हरपतां धन । न पडे चैन तयासी ॥ १२ ॥ तैसी पंढरीची अंतरता वारी । तुकयासि खेद वाटे अंतरीं । मार्गी चले पाउल भरी । यास्तव अंतरीं झुरतसे ॥ १३ ॥ तुकयाचें सप्रेम कीर्तन । ऐकोनि भक्तीसि लागले जन । ते चौदाशें पताका घेऊन । पंढरीस जाण चालिले ॥ १४ ॥ तुकया समागमें जावया पाहीं । वारकरी आले देहु गांवीं । मग चोवीस अभंग लवलाहीं । पत्र ते समयीं पाठविलें ॥१५॥ यात्रेकऱ्यांसि बोळवावया देखा । बाहेर येतसे प्रेमळ तुका । मग कंठ सद्गदित होऊनि देखा । लिहितसे पत्रिका ते समयीं ॥ १६ ॥ तुज विनवावें विठाबाई । ऐसें सामर्थ्य नसेचि देहीं । परी धीट होऊनि लवलाहीं । सलगी पायीं करीतसें ॥ १७ ॥ वेदशास्त्रांसि न कळे पार ।

१ भूत लागलेल्यास.

पुराणीं वदले महर्षि थोर। परी तुझ्या चरित्राचा नेणती निर्धार। तेथें मी पामर काय वाणूं ॥ १८ ॥ जैसीं तैसीं अरुप उत्तरें। अंगीकारावीं रुक्मिणीवरें। विटेवरी पाउलें सुकुमार। मस्तक त्याजवर ठेविला ॥ १९ ॥ अनंत जडजीव शक्तिहीन। पांडुरंगा तूं तयांचें जीवन। आणि माझा विसर तुजकारणें। कवण्या गुणें पडियेला ॥ १२० ॥ कशास्तव पाठविसी मूळ। म्हणवोनि वाटतसे तळमळ। चित्तीं झुरतों सर्वकाळ। दीनदयाळ विठाबायी ॥ २१ ॥ येव्हडें संकोची तुझें अंतर। तरी मग कशास व्यालासि पोर। ज्याचा जार त्यासीच भार। आणिकासि जो जार तान्हयाचा ॥२२॥ हरिणी दृष्टीसि न पडे पाडसा। तें टुकटुकां पाहे दाहीदिशा। मजही तैशीच जाहली दशा। पंढरीशा तुज ठावें ॥ २३ ॥ चातकासि मेघ ओळखतां देख। तृषेनें न पुरे त्याचा शोक। मजही तैसें वाटे दुःख। प्रकार अनेक काय सांगों ॥ २४ ॥ कां मातेनें टाकोनि दीधलें तान्हें। तें जनांत दिसे केविलवाणें। तैशीच दशा मज कारणें। रुक्मिणी-रमण जाणसी तूं ॥ २५ ॥ कां कृपणाचें धन हरपतां सकळ। त्यासि रात्रंदिवस लागतो चळ। तैसा तळमळीं सर्वकाळ। हें तूं घननीळ जाणसी ॥ २६ ॥ मत्स्य तळमळी तुटतां जीवनें। प्राणांत वोडवे त्याजमागून। तैसी दशा मजकारणें। संत सज्जन सांगती तुज ॥ २७ ॥ पायाखालील पायरी। उठूं नेणे चित्तांतरीं। तैसें दंडवत श्रीहरी। ये अवसरीं तुज पावो ॥ २८ ॥ नातरी दंडकाठी देतां सोडुनी। निचेष्टितपणें पडतसे धरणीं। तैसें दंडवत चक्रपाणी। तुझिये चरणीं करीतसें ॥ २९ ॥ कां माता न पुरवितां आळ। बाळक धरणीं गडबडां लोळे। तैसें दंडवत तुझिया जवळ। सांगती सकळ वारकरी ॥१३०॥ संतांसि सांगे त्वलाह्या। तुम्हीं विनवा पंढरीराया। काय अन्याय आचरला तुकया। म्हणोनि पायां अंतरला ॥ ३१ ॥ कृपा करील रुक्मिणीरमण। तरी मी येईन धांवोन। भेटतील संतसज्जन। हर्षे नाचेन कीर्तनीं ॥३२॥ ऐशा रीतीं लेहोनि ग्लांत। संतांसि घातलें दंडवत। कंठ जाहला सद्गदित। नेत्रीं अश्रुपात वाहती ॥ ३३ ॥ एकमेकांसि नमस्कार। घालिती तेव्हां वैष्णववीर। विठ्ठलनामें करोनि गजर। यात्रा सत्वर चालिली ॥ ३४ ॥ चौदाशें पताका घेऊनि करीं। पंढरीसि चालिले वारकरी। परी तुकयाचा वियोग अंतरीं। म्हणोनि सत्वरी न चालवे ॥ ३५ ॥ तुका प्रेमळ अंतरंग ॥ हळहळू येत मागें मागें। म्हणे माझाचि कां आला उबग। श्रीपांडुरंगा तुजलागीं ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां तें अवसरीं। सद्गदित जाहले वारकरी ॥ मग तुकयासि पुसोनि सत्वरी। क्षेत्र पंढरी पावले ॥ ३७ ॥ टाळ विणे मृदंग घोष। नादब्रह्माचि आलें मुसे। कीर्तनीं नाचती विष्णुदास। सप्रेमरसें करोनियां ॥ ३८ ॥ दृष्टीसीं देखतां पंढरपुर। चित्तीं संतोष जाहला फार। एकमेकांसि नमस्कार। वैष्णववीर कारिताती ॥ ३९ ॥ एकमेकांसि आलिंगून। मग ओवाळिला रुक्मिणीरमण। करोनि चंद्रभागेसि स्नान। पुंडलीकदर्शन मग घेती ॥ १४० ॥ प्रेमभरित नाचत। क्षेत्र प्रदक्षिणा केली समस्त। मग महाद्वारीं जावोनि त्वरित। सद्भावें दंडवत घालिती ॥ ४१ ॥ चोवीस

१ पाणी.

अभंग तुकयानें । पत्र दीधलें होतें लेहून । तें गरुडपारीं करितां कीर्तन । देवासि वाचून दाखविती ॥ ४२ ॥ आर्धींच तुकयाचीं सप्रेम उत्तरें । आदरें गाताति वैष्णववीर । भाविक ऐकोनि श्रवणद्वारें । नेत्रीं नीर वाहे त्यांच्या ॥ ४३ ॥ कीर्तन करोनि ऐशा रीतीं । मग ओवाळिला रुक्मिणीपती । लोटांगणें घालोनि प्रीतीं । दर्शना जाती विठोबाच्या ॥ ४४ ॥ पत्र घेऊनि आले कोण । परिसा त्यांचीं नामाभिधानें । रामेश्वरभट्ट थोर ब्राह्मण । जो अनन्य शरण तुकयासी ॥ ४५ ॥ गंगाधर मवाळ कडुसकर । आणि संततेली वैष्णववीर । आणिक वारकरी असती फार । ते ग्रंथीं कोठवर ल्याहावे ॥ ४६ ॥ तुकयाचें पत्र घेऊनि हातीं । अंतर गाभारा प्रवेशती । तों विटेवरी देखिला रुक्मिणीपती । जघनीं शोभती करकमळें ॥ ४७ ॥ जे का परब्रह्ममूर्ति सगुण । पाहतांचि देती आलिंगन । चरणावरी मस्तक ठेवून । मागुतीं वदन विलोकिती ॥ ४८ ॥ पुढें पत्र ठेवोनि सत्वरी । निरोप सांगती ते अवसरीं । तुकयासि अवकाश नाहीं श्रीहरी । म्हणोनि येथवरी न चालवे ॥ ४९ ॥ भक्तवत्सला करुणामूर्तीं । पत्र लिहिलें तुजप्रती । अंतरसाक्ष तूं चैतन्यमूर्ती । सांगणें तुजप्रती नलगेची ॥१५०॥ ऐसा निरोप ऐकोनि कानीं । सद्गदित जाहले चक्रपाणी । जवळ बोलावूनि रुक्मिणी । कैवल्यदानी काय म्हणे ॥५१॥ तुका माझा निजभक्त जाण । अवकाश नाहीं त्याजकारणें । यास्तव पंढरीस न होय येणें । पत्र लेहोन पाठविलें ॥ ५२ ॥ आतां आपण निजांगें तेथवर । जावोनि घ्यावा समाचार । ऐसें पुसतां सारंगधर । रुक्मिणी उत्तर काय बोले ॥ ५३ ॥ तुम्हांसि पाहावया जगजेठी । भाविक भक्त पातले भेटी । सगुणरूप न पडतां दृष्टीं । होतील कष्टी भक्तराज ॥ ५४ ॥ तरी गरुडासि पाठवूनिया अवसरीं । तुका आणावा येथवरीं । ऐसें ऐकोनि श्रीहरी । मग आज्ञा करी खगेंद्रा ॥ ५५ ॥ विनतासुतासि सारंगधर । म्हणे आतां देहूसि जाय सत्वर । तुकयासि बैसवूनि पाठीवर । आणि येथवर भेटावया ॥ ५६ ॥ ऐसें सांगतांचि श्रीहरी । गरुडें आज्ञा वंदिली शिरीं । नमस्कार करोनि सत्वरी । मग फडत्कारीं चालिला ॥ ५७ ॥ निमिष न लोटतांचि सत्वर । खगेंद्र पातला देहु क्षेत्र । तों तुका प्रेमळ वैष्णववीर । गांवा बाहेर उभा असे ॥ ५८ ॥ वारकरियांसि बोळविलें जेथें । तेथेंचि उभा वैष्णवभक्त । देहभान तों नाहीं किंचित । वाट पहात पंढरीची ॥ ५९ ॥ सप्रेम आठवितां पंढरीराया । ब्रह्मरूपची जाहली काया । तरी अद्वैत बोध नावडेचि तया । प्रेमळ तुकया भक्तराज ॥ १६० ॥ जैसा वृक्षाचा खुंट साचार । न चाले न हाले आणुमात्र । तैसें तुकयाचें शरीर । मार्गावर[1] दिसतसे ॥ ६१ ॥ हें खगपतीनें[2] देखोनि नयनीं । मग विस्मित होय अंतःकरणीं । मग हळूच उतरोनि मेदिनीं । मधुर वचनीं बोलतसे ॥६२॥ सावध करोनि तुकयाप्रती । देवाचें पत्र दीधलें हातीं । म्हणे तुझ्या वियोगें रुक्मिणीपती । करीतसे खंती मनांत ॥६३॥ तुझें शरीर शक्तिहीन । म्हणोनि पंढरीसि न झालें येणें । मज आज्ञा केली रुक्मिणीरमणें । तुजकारणें आणावया ॥ ६४ ॥ ऐसें

१ नांवें. २ गरुडास.


बोलतां विनतासुत । तों तुकया जाहला सद्गदित । देवाचें पत्र वाचोनि पाहत । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥६५॥ वैकुंठ कैलास आहे जोंवरी । चिरंजीव तुका असे तोंवरी । आणि माझें ऐश्वर्य चराचरीं । तूंचि अधिकारी तयाचा ॥ ६६ ॥ माझा वियोग न साहे तुज । तैसेंच येथें जाहलें मज । म्हणोनि येथें आणावया तुज । गरुडासि आज पाठविलें ॥ ६७ ॥ तरी बैसोनि याच्या पाठीवरी । दृष्टींसी पाहे क्षेत्र पंढरी । तेणें सर्वथा होय अंतरीं । अनमान न करीं संतोष ॥ ६८ ॥ पत्र वाचोनि वैष्णवभक्त । नेत्रीं वाहती अश्रुपात । मग गरुडासि काय बोलत । हें मी अनुचित केंवि करूं ॥ ६९ ॥ तूं तरी स्वामीचें वहान थोर । मी तरी सेवक पादुकाधर । सोन्याचा पोल्हारा जाहला जर । तो मस्तकावर घेऊं नये ॥ १७० ॥ माझी अवस्था सांगूनि तया । येथें आणावें पंढरीराया । म्हणोनि गरुडाचिये पायां । प्रेमळ तुकया लागतसे ॥ ७१ ॥ निजभक्ताचें जाणोनि अंतर । तेथूनि निघाला खगेश्वर । मग पंढरीसि येऊनि सत्वर । केला नमस्कार देवासी ॥ ७२ ॥ सकळ वृत्तांत सांगितला हरी । तुका न बैसे मजवरी । परी तुमची वाट पाहतसे बरी । उभा बाहेरी तिष्ठत ॥ ७३ ॥ ऐसें ऐकोनि जगजेठी । सद्गदित जाहले कंठीं । तेव्हां रुक्मिणीसीं बोले गोष्टी । आतां जावें भेटी तुकयाच्या ॥ ७४ ॥ असो चार दिवस लोटलियावरी । वैष्णव गेले गोपाळपुरीं । काला करोनि सप्रेम गजरीं । स्वानंद भरीं डुल्लती ॥ ७५ ॥ ऐसा महोत्सव जाहलिया पाहे । फुटला यात्रेचा समुदाय । देवासि पुसोनि लवलाहें । बोलती काय वारकरी ॥ ७६ ॥ देवाधिदेवा रुक्मिणीवरा । जावें तुकयाच्या समाचारा । ऐसें म्हणवोनि त्या अवसरा । आपुल्या घरा चालिले ॥ ७७ ॥ पंथ क्रमितां नित्य नित्य । देहूसि वारकरी आले समस्त । तों तुका बोळवीत आला पंथ । उभाचि तेथें असे कीं ॥ ७८ ॥ निढळावरी ठेवूनि कर । वाट पाहत निरंतर । देखोनि विस्मित वैष्णववीर । म्हणती ऐसा निर्धार नव्हे कोणा ॥ ७९ ॥ श्रीहरी कीर्तन करितां स्वयमेव । काया ब्रह्मचि जाहली सर्व । तरी न सोडीच सप्रेमभाव । ऐसा वैष्णव कोण असे ॥ ८० ॥ राजा घालोनि लोटांगण । गांवा मोकासे घ्याजी म्हणे । परी घेतले नाहीं तुकयानें । निष्काम मनें सर्वदा ॥ ८१ ॥ लोहपासा पाहतां नयनीं । कांचन जाहलें ततक्षणीं । परी कांतेवरी नाहीं फुटका मणी । विटाळ मानि सोनियाचा ॥ ८२ ॥ चालता पाऊल पडे जेथें । अष्टसिद्धि ओळंगती तेथें । परी एका दिवसाचें धान्य किंचित । घरीं निश्चित न ठेवीं ॥ ८३ ॥ असो आतां पंढरीहून । वारकरी आले परतून । तें तुकयानें दृष्टींसीं देखोन । लोटांगण घाली तयां ॥ ८४ ॥ रामेश्वरा ऐसा ब्राह्मण पाहीं । म्हणवी तुकयाचा संप्रदायी । त्यासि लोटांगण घालितसे विदेही । महती नाहीं किंचित ॥ ८५ ॥ आपुला शिष्य देखोनि । तयासि देवासमान मानी । तोचि जगद्गुरु पूर्ण ज्ञानी । अद्वैत भजनीं निघाला ॥ ८६ ॥ जैसें अंमळ मिळतां पाणी । तें समुद्र आपुलया समान मानी । कां हिंगण चंदन काष्ठें दोन्हीं । पडतां कृशानीं सारिखीं त्या ॥ ८७ ॥ तैसा

१ अग्नीत.

तुकयाचा सप्रेम भाव । अपूज्य पूज्य नाठवे सर्व । सेवक म्हणविती जीवें भावें । तेही देवाचि भासती ॥ ८८ ॥ असो तयाचा भक्ति प्रेमा । निरुपमासि कैंची उपमा । ज्याणें वाढवोनि भक्ति महिमा । पुरुषोत्तमा वश्य केलें ॥ ८९ ॥ वारकरी आलिया परतोन । तयांसि घाली लोटांगण । परस्परें देती आलिंगन । निजप्रीतीनें तेधवां ॥ १९० ॥ प्रसाद देती वारकरी । तो आवडीनें सेवित ते अवसरीं । म्हणे सुखी आहेत कीं श्रीहरी । टाकिलें दुरी मज येथें ॥९१॥ उत्साह जाहला कैशा रीतीं । तो साकल्य वृत्तांत भक्त सांगती । तुम्हांसि भेटावया रुक्मिणीपती । सत्वरची येती आज येथें ॥ ९२ ॥ इतुका निरोप कर्ण संपुटीं । ऐकतां बांधिली शकुन गांठी । भेटीचें आर्त बहुत पोटीं । म्हणे चाल जगजेठी सत्वर ॥ ९३ ॥ ऐसें म्हणवोनि वैष्णववीर । निढळावरी ठेविला कर । वाट पाहे धरोनि धीर । करुणा स्वरें आळवोनी ॥ ९४ ॥ तुकयाचा निश्चय देखोनि अंतरीं । मग गांवांत प्रवेशले यात्रेकरी । जावोनियां आपुल्या घरीं । प्रपंच व्यापारीं गुंतलें ॥ ९५ ॥ पत्र पाठवितां पंढरीस । तुका तेथेंच उभा असे । मागें अभंग एकुणवीस । वैष्णवदास बोलिला ॥ ९६ ॥ त्याचा प्रयत्न करोनि समस्तीं । वचन ध्यानासि आणिजे संतीं । पुढेंही वाट पहातसे प्रीतीं । म्हणे रुक्मिणीपती कां न ये ॥९७॥ कोणत्या निजभक्ताची पूजा । घेत बैसलासि गरुडध्वजा । तेथेंचि प्रेमा गुंतला तुझा । आणि विसर माझा पडिला कीं ॥ ९८ ॥ का आणिक संकट घातले कोणी । तेथें गुंतलासे चक्रपाणी । आणि माझा विसर पडिला मनीं । टाकिलें वनीं एकटें ॥ ९९ ॥ ऐशा रीतीं प्रेमळ तुका । चित्तीं आठवी वैकुंठनायका । तों गगनीं झळके गरुडटका । निजभक्त सखा येतसे ॥ २०० ॥ खग[1] वहनीं वैकुंठपती । अकस्मात उतरले क्षितीं[2] । पीतांबराची झळके दीप्ती । तेणें गभस्ती[3] लोपला ॥ १ ॥ ठाण साजिरें सुकुमार । जघनीं शोभती दोन्ही कर । दिव्य कुंडलें मकराकार । श्रीमुख मनोहर हरीचें ॥ २ ॥ दिव्य कौस्तुभ वैजयंती । मयूर पिच्छे शिरीं असती । तुळसी हार गळा मिरविती । देखितां विश्रांती होय जीवा ॥ ३ ॥ रुक्मिणीसहित सारंगधर । उभा तुकयाचे समोर । चहूं भुजीं करुणाकर । आलिंगन सत्वर दे तया ॥ ४ ॥ मग सावध होऊनि उठाउठी । उघडोनि पाहे दृष्टी । सगुणस्वरूप पाहता दृष्टीं । चरणीं मिठी घातली ॥ ५॥ जैसी माता तान्हयाकारणें । हृदयीं धरीत निजप्रीतीनें । तैशाच रीतीं जगज्जीवन । तुकयाकारणें संबोखी ॥६॥ पुढिले अध्यायीं रसोत्पत्ती । वदविता श्रीरुक्मिणीपती । श्रोतयांसि विनवी महीपती । श्रवणीं सद्भक्ती असों द्या ॥७॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । सदतिसावा अध्याय गोड हा ॥ २०८ ॥ अध्याय ३७ ॥ ओव्या ॥ २०८ ॥

१ पक्षी. २ पृथ्वीवर. ३ सूर्य.

अध्याय ३८



श्रीगणेशाय नमः । भीमातीरवासी रुक्मिणीपती । सच्चिदानंदा करुणामूर्ती । जगविख्यात तुझी कीर्ती । पंवाडे गर्जती पुराणीं ॥ १ ॥ श्रुतिशास्त्रे वर्णिती गुण । त्यांसि न कळेचि तुझें महिमान । तेथें मी मूढमती अज्ञान । प्राकृत मतीनें काय वाणूं ॥ २ ॥ नाहीं अंगीं चातुर्य कुशळता । नव्हे बहुश्रुत व्युत्पन्नता । वायांच उपजला धिंवसा चित्ता । तरी शेवटासी ग्रंथा पाववीं ॥ ३ ॥ तुझ्या आधारें चक्रपाणी । म्यां हातीं धरिलीं असे लेखणी । तरी सर्वदा हृदयस्थ राहोनी । आठव मनीं देयिजे ॥ ४ ॥ संत चरित्रें वदतां आतां । तरी सर्वथा हा भार तुझिया माथां । न्यून वचन पडिलें अवचितां । तरी संपूर्ण अनंता तूं करी ॥ ५ ॥ त्रितापाचें आवर्त पूर्ण । पुढें आलिया अनंत विघ्न । त्यावरी धाडोनि सुदर्शन । ग्रंथ निर्विघ्न सिद्धी न्यावा ॥ ६ ॥ हे अघटित आळ निश्चिती । घेतली असे म्यां रुक्मिणीपती । परी शेवट करणें तुझ्या हातीं । म्हणोनि महीपती विनवीतसे ॥७॥ मागील अध्यायीं कथा सुरस । तुकयासि नवतें सावकाश । मग लिखित पाठवितां देवास । पंढरीनिवास पातले ॥ ८ ॥ सगुण स्वरूपें देऊनि भेटी । तुकयासि आलिंगूनि धरिलें पोटीं । येरें चरणीं घातली मिठी । आनंद सृष्टीं न समाये ॥ ९ ॥ मग तुकयाचा घरोनियां करा । घरासि आलें सारंगधर । मोडकें खोपट असे जर्जर । प्रभंजन भरे दशदिशा ॥ १० ॥ तुकयासि म्हणे वैकुंठ विहारी । मी क्षुधातुर अंतरीं । भोजन इच्छितों पोटभरी । तरी साहित्य लवकरी करावें ॥ ११ ॥ अवलोकि विचारी त्या अवसरीं । देवाधिदेव आले घरीं । भाजी भोजन घाली सत्वरी । शुद्ध अंतर करोनी ॥ १२ ॥ मग कण्या रांधोनि सत्वरी । आणिक कांहीं भाकरी । वाढोनियां पात्रावरी । बैसले हरी जेवावया ॥ १३ ॥ महर्षियाग करितां जाण । तेथें न घे जो अवदान । तो निजभक्ताचें घरींचें कदन्न । अति आदरें जेवितसे ॥ १४ ॥ यज्ञमुखीं काढीतसे खोडी । तो भिल्लटीची देखोनि आवडी । उच्छिष्ट बोरें अति तांतडी । लवड सवडी भक्षीतसे ॥ १५ ॥ दुर्योधनें पक्वानें निर्मिलीं फार । तेथें न जायचि सारंगधर । धुंडोनि विदुराचें घर । कण्या सत्वर भक्षीतसे ॥ १६ ॥ ऐसा भक्तीचा बांधिला देव । जाणती सर्वज्ञ भक्त वैष्णव । तो तुकयाचा देखोनि निष्काम भाव । कदान्नें पाहाहो जेवितसे ॥ १७ ॥ भावाच्या उपचारें करून । तृप्त जाहला जगज्जीवन । मग मुखशुद्धि तुळसी पान । निजप्रीतीनें अर्पिलें ॥ १८ ॥ यापरी तुकयासि तोषवून । देव पावले अंतर्धान । कीं भक्त हृदय कमळ पूर्ण । तेथें मिलिंद¹ होऊन बैसले ॥ १९ ॥ आणिक कथा ऐका रसिक । एक ब्राह्मण होता आध्यात्मिक । तेणे विवेकसिंधु लेहोनि पुस्तक । वाचितसे देख निजप्रीतीं ॥ २० ॥ त्यानें तुकयाची कीर्ति ऐकोनि कानीं । धिक्कारूं लागे आपुले मनीं । मग म्हणे हृदयस्थ देव असोनी । रानोरानीं कां जावें ॥ २१ ॥ ऐसे म्हणवोनी द्विजवर । चित्तीं करीतसे विचार । म्हणे विवेकसिंधु ऐकिलियावर । समजले अंतर तुकयाचें ॥ २२ ॥ मग देहुग्रामीं येऊन । तुकयासि पाहे तो ब्राह्मण । तो इंद्रायणीचे तीरीं वैष्णव जन । नामस्मरण करीतसे

१ मोठेपण. २ वारा. ३ भ्रमर.

॥ २३ ॥ होतां तुकयाचें दर्शन । मग परस्परें केलें नमन । ब्राह्मण बोले विनीत वचन । निज प्रीतीनें तेधवां ॥ २४ ॥ श्रीमुकुंदराज विरचित । विवेकसिंधु अध्याय ग्रंथ । मी पारायण करितों येथ । करा श्रवणार्थ निजप्रीतीं ॥ २५ ॥ त्याचा रक्षावयास मान । प्रेमळ भक्त अवश्य म्हणे । मग गोदडी आंगावर घेऊन । सर्वांग तेणें झांकिलें ॥ २६ ॥ ब्राह्मणाप्रती बोले वचन । चराचर पाहतां फांके मन । यास्तव आम्हीं झांकिले नयन । तुम्हीं पारायण करावें ॥ २७ ॥ ऐकोनि तुक्याचें उत्तर । ग्रंथासि आरंभ करी तो द्विजवर । अर्थही सांगे नानाप्रकारें । परी कांहींच उत्तर न बोलती ॥ २८ ॥ एक प्रहर लोटतां निश्चित । तोंपर्यंत वाचिला ग्रंथ । परी तुका न हाले न बोले मात । मग ब्राह्मण करित काय तेव्हां ॥१९॥ गोदडी उचलोनि पाहे नयनीं । तों तुकयानें विपरीत केली करणी । दोन्हीं बोटें घातलीं कानीं । नामस्मरणीं डुल्लत ॥ ३० ॥ ब्राह्मण विरस चित्तांत । म्हणे दुरी आलों क्रमूनि पंथ । एक प्रहर वाचिला ग्रंथ । श्रम व्यर्थ म्यां केले ॥ ३१ ॥ तुमची संगती करोनि पाहीं । अर्थ अन्वय कळेल कांहीं । तों कान बुजोनि जाहला विदेही । आर्त नाहीं श्रवणार्थी ॥३२॥ ऐसें ऐकोनि वैष्णववीर । स्वमुखें बोले अभंग सत्वर । याजसाठीं त्यजूनि घर । वनांतर सेवितों ॥ ३३ ॥ नामरूपीं धरिला नेम । माझें दिठावेल प्रेम । बुद्धि होईल कीं निष्काम । अहंब्रह्म सम तोची ॥ ३४ ॥ याजकारणें अद्वैत वार्ता । कानीं न ऐकें मी सर्वथा । विक्षेप होईल देवभक्तां । तो श्रम वृथा करूं नये ॥ ३५ ॥ मुखें सांगती आत्मज्ञान । कीं ब्रह्मरूप अवघे जन । आणि कवडीसाठीं देती प्राण । करिती भांडण बाजारीं ॥ ३६ ॥ अवघे ब्रह्मरूप भासलें आहे । तरी गेल्या आल्याची हळहळ काय । निर्गुणीं कांहींच बोलूं नये । शब्द ठाय खुंटला ॥ ३७ ॥ यालागीं देव भक्तपण । खंडित होय अधःपतन । देवें मर्यादा लाविली जाण । त्याप्रमाणें चालिजे ॥ ३८ ॥ उदंड ब्रह्मनिष्ठ जाहला जर । तरी ईश्वरी सत्ता अनिवार । सृष्टि उत्पति आणि संहार । याचेनी साचार नव्हे कीं ॥ ३९ ॥ तिन्ही देव आपुलाल्या गुणें । जोंवरी असती कां सगुण । तोंवरी असावें मर्यादेनें । अद्वैत वचन बोलूं नये ॥ ४० ॥ ऐसें सांगतां वैष्णवभक्त । ब्राह्मणा अनुभवें आली प्रचीत । सगुण भजनीं त्याचें चित्त । जडलें निश्चित ते समयीं ॥ ४१ ॥ करुणापर जें का भाषण । संत बोलिले पुरातन । तें गात ऐकत आवडी करून । मग सर्वांगीं पूर्ण निवाला ॥ ४२ ॥ एके दिवसीं लोहगांवकर । गृहस्थ येऊनि थोर थोर । तुकयासि घेऊनि गेले सत्वर । कीर्तनगजर । ऐकावया ॥४३॥ पक्कानें निर्मोनियां नाना । घालिती विप्रांच्या समाराधना । रात्रीं प्रारंभ करिती कीर्तना । भवाब्धि तारणा लागोनी ॥ ४४ ॥ तों हुताशनीची लोटतां राती । तो उदयासि पातला गभस्ती । तेथें क्षार उदकाची वापिका[1] होती । जीवन न घेती कोणी तिचें ॥ ४५ ॥ त्यामाजी येऊनि तुकयानें । अकस्मात केलें सचैल स्नान । तत्काळ गोड जाहलें जीवन । चमत्कार दारुण अद्यापि हा ॥ ४६ ॥

१ विहीर.

कांसारविहीर नाम तीस । लोहगांवी अद्यापि असे । निजभक्तांचा कीर्ति घोष । पंढरीनिवास वाढवी ॥ ४७ ॥ तेथें एक ब्राह्मण भक्त-वैष्णव । तुकयाचे ठायीं त्याचा भाव । कीर्तनघोष ऐकतां अपूर्व । प्रपंच सर्व टाकूं पाहे ॥ ४८ ॥ स्वरूपें सुंदर त्याची कांता । द्वेष उपजला तिच्या चित्ता । म्हणे वेडा केला माझा भर्ता । कसूनि आतां यासि पाहूं ॥ ४९ ॥ भ्रतार गांवासि गेलिया जाण । कडू भोंपळे रांधिले तिणें । मग तुकयासि मंदिरीं आणून । म्हणे करावें भोजन ये ठायीं ॥ ५० ॥ रसना जिंतोनि वैष्णव भक्त । इंद्रिय नेम केला निश्चित । कडू गोड न कळेचि त्यातें । विदेह स्थित म्हणवोनी ॥ ५१ ॥ बहुत गोड जाहली शाक । ऐसें म्हणतां वाढी आणिक । तुकयासि जेवूनि जातां देख । तों वैकुंठनायका क्षोभला ॥ ५२ ॥ तिच्या सर्वांगासि भर्लीं । आवळ्या ऐसीं गुल्में आलीं । तींन जातीच औषधें केली । गति फळली कर्माची ॥ ५३ ॥ देवाचा द्वेष करितां सदा । तेणें पावले मोक्षपदा । परी भक्तद्वेषियासि रौरव[1] सदा । न चुके आपदा[2] तयाची ॥५४॥ लोहगांवीं एक ब्राह्मण । परमभाविक असे पूर्ण । सोमवारव्रत त्याजकारणें । तुकयासि आमंत्रण दीधलें ॥ ५५ ॥ स्त्रीपुरुष दोघे उभयतां । तिसरें सात्यहि नसेचि देता । तों दिव्यांतील तेल सरलें जेवितां । म्हणवोनि चिंताक्रांत मनीं ॥ ५६ ॥ कोरडी पडली असे वात । आतां कोण जाईल बाजारांत । देखोनि तुका प्रेमळ भक्त । काय बोलत तयासी ॥ ५७ ॥ रिता बुधला घरांत । म्हणे तेल असेल पहा त्यांत । मग घरस्वामीण विलोकित । तों स्नेह आंत बहु दिसे ॥५८॥ तें दिव्यास आणूनि तत्काळ घालितां । हर्षे आनंदलीं उभयतां । जेथें देवभक्तांची आस्था । तरी सिद्धि समस्ता आंदण्या ॥ ५९ ॥ तीं उभयतां होतीं जोंवर । स्नेह सरलें नाहीं तोंवर । आणिक एक चमत्कार । ऐका सादर भाविकहो ॥ ६० ॥ शिरळ होती पाटलाचें द्वारीं । तुकाराम बैसती तिजवरी । तों तुंबडीवाला घालितसे फेरी । तो नृत्य करी त्याजपुढें ॥६१॥ एक मासपर्यंत जाण । गांवांत फेरी घातली त्याणें । खात्याची घरें फिरोन । लोखंड घेऊन तो आला ॥ ६२ ॥ मग येऊनि तुक्या समोर । म्हणतसे माझी तुंबडी भर । तयासि म्हणे वैष्णववीर । मिळालें साचार काय आजी ॥ ६३ ॥ लोहाचे तुकडे होते जाण । ते शिळेवरी रिचविले त्याणें । त्यांचें तत्काळ जाहलें कांचन । म्हणती नेंयी भरोन तत्वर ॥ ६४ ॥ याचक संतोष पावोनि चित्तीं । कनक केलें सत्वरगतीं । कामनिक लोक आश्चर्य करिती । लोखंड घांसिती शिळेवरी ॥ ६५ ॥ परी तें सर्वथा न पालटे जाण । म्हणती परीस नव्हे हा पाषाण । तुंबडीवाला सभाग्य पूर्ण । लाधलें धन त्यालागीं ॥ ६६ ॥ तुकयाचे जे लागले पाय । ते शीळ अद्यापि तेथेंचि आहे । आणि चरित्र वर्तलें काय । ऐकतां तन्मय संतसाधु ॥ ६७ ॥ एके दिवशीं वैष्णवभक्त । लोहगांवांत कीर्तन करित । मंडप उभारिले बहुत । पताका फडकत सभोंवत्या ॥ ६८ ॥ तुकयाची सत्कीर्ति ऐकोनि थोर । यात्रा मिळाली दोन सहस्र । गांवींचे सकळ लहान थोर । श्रवणासि सादर

१ नरक. २ संकटे.

बैसले ॥ ६९ ॥ तेथील जोशी भाविक पूर्ण । नित्य ऐके हरिकीर्तन । त्याच्या पुत्रासि व्यथा दारुण । होताति प्राण कासाविस ॥ ७० ॥ घरीं टाकोनि त्याजकारणें । श्रवणासि आला तो ब्राह्मण । म्हणे होणार तें न चुके जाण । उदास होऊन बैसला ॥ ७१ ॥ एक प्रहर लोटतां रात । मुलासि नेती यमदूत । कांतेनें उचलोनि तें प्रेत । हरिकिर्तनांत आणिले ॥ ७२ ॥ तुकायासि म्हणे ते अवसरीं । यासि सत्वरी उठविशील जरी । तरीच विष्णुभक्त निर्धारीं । नाहीं तरी दांभिक ॥ ७३ ॥ भ्रतार लागला तुझे ध्यानीं । तें पासोनि होतसे हानी । आपुल्या संसारासि घातलें पाणी । तैशाच वाणी आम्हां केलें ॥ ७४ ॥ हें कीर्तनामाजी येतांचि विघ्न । विक्षेप पावलें सकळांचें मन । जैसें पात्रीं जेवितां पक्वान्न । त्यांत विष आणून कालविलें ॥ ७५ ॥ ऐसें संकट देखोनि जाण । नेत्र झांकिले तुकयानें । मांडिलें पांडुरंगाचें ध्यान । एकाग्र मन करूनियां ॥ ७६ ॥ म्हणे जयजयाजी पुराणपुरुषा । भक्तवत्सला वैकुंठाधीशा । विश्वव्यापका सर्वसाक्षा । पंढरीनिवासा श्रीविठ्ठला ॥ ७७ ॥ तुवां मागें पंवाडे केलें बहुत । ते सत्कीर्ति गाती वैष्णव भक्त । ते सत्य करोनि दाखवीं येथ । अनुभवें प्रचीत दाखवूनी ॥ ७८ ॥ भजनांत विक्षेप जाहला पूर्ण । याहूनि आम्हांसि कोणतें मरण । हातीं घेऊनि आतां सुदर्शन । निवारीं विघ्न विठोबा ॥७९॥ जरी तूं न येशील येथ । तरी प्राण मी न ठेवींच सत्य। ऐसें म्हणवोनि प्रेमळ भक्त अश्रू वाहत नेत्रांतुनी ॥ ८० ॥ ऐसा धांवा करितांचि तेथ । तत्काळ आले पंढरीनाथ । तुकयासि सावध करोनि म्हणत । तूं चिंताक्रांत कासया ॥ ८१ ॥ तुजपासीं भक्त शिरोमणी । असे अमृत संजीवनी । ते उच्चारितां हरिकीर्तनीं । प्राण परतोनी येताल ॥ ८२ ॥ ऐसें अश्वासन देतां श्रीहरी । तुकयासि संतोष झाला अंतरीं । मग नेत्र उघडोनि ते अवसरीं । सावध करी श्रोतयां ॥ ८३ ॥ म्हणे टाळ्या चुटक्या वाजवोनि हातें । विठ्ठलनामें गर्जा समस्त । तेणें महा विघ्ने निवारत । संशय चित्तांत न धरावा ॥ ८४ ॥ आज्ञापितांचि वैष्णवभक्त । सकळ श्रोते भजन करित । नाद ब्रह्मचि मूर्तिमंत । अवतरलें निश्चित तें समयीं ॥ ८५ ॥ टाळविणे मृदंग सुस्वर । विठ्ठलनामे, होतसे गजर । टाळ्या चुटक्या वाजती थोर । रंग अपार वोडवला ॥ ८६ ॥ एक प्रहर ऐशारीती । सकळ श्रोते भजन करिती । तेणेंचि विसरोनि देहभ्रांती । विदेह स्थिती तुकयाची ॥ ८७ ॥ कौतुक करी पंढरीनाथ । श्रोते पारिसा भाग्यवंत । कीर्तनामाजी टाकिलें प्रेत । परतले निश्चित प्राण त्याचे ॥ ८८ ॥ उठोनि बैसे हरिकीर्तनीं । भजन करी प्रेमें करोनि । सन्निध होती त्याची जननी । ते लागली चरणीं तुकयाच्या ॥ ८९ ॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । हरिस्मरणीं वृत्ति वेधली । अधिकोत्तर तेधवां ॥ ९० ॥ इतुकें चरित्र वर्तलियावर । रात्र जाहली दोन प्रहर । तों श्रीपाद संन्यासी येऊनि थोर । कीर्तनांत समोर बैसले ॥ ९१ ॥ नाम महिमा भक्तिपर । स्थापीत तेव्हां वैष्णववीर । नाम सकळ साधनांत

सार । नाम परात्पर परब्रह्म ॥ ९२ ॥ कर्माप्रारंभ करितांचि पूर्ण । आधीं केशव नारायण । व्यंग पडतां ब्रह्मकर्म । विष्णुस्मरणें पूर्ण होय ॥ ९३ ॥ करितां वधूवरांचें लग्न । घटित पाहती छत्तीस गुण । शेवटीं लक्ष्मीकांताचें स्मरण । केल्या वांचोन सरेना ॥ ९५ ॥ पितृश्राद्धें सांग आचरती । शेवटीं जनार्दन स्वरूपीं अर्पिती । हरिनामावांचोनि निश्चिती । सत्कर्मासि गती असेना ॥ ९५ ॥ ऐसें वदोनि प्रेमळ भक्त । विठ्ठल नामें गर्जना करित । तेथें संन्यासी खळ दोघे होते । ते बोलती कुत्सित एकमेकां ॥ ९६ ॥ शूद्र मुखींचें नामस्मरण । हें सर्वथा नायकावें आपण । ऐसें म्हणवोनि ते दुर्जन । गेले उठोन सत्वर ॥ ९७ ॥ शिखा टाकिली बोडुनि । परी अहंता वाढली दशगुणी । भक्ताचा द्वेष धरितां मनीं । तरी अधःपतनीं ते जाती ॥९८॥ दादु कोंडदेव मोकासी । पुणियांत होता ते दिवसीं । फिर्याद गेले तयापासीं । दोघे संन्यासी श्रीपाद ॥ ९९ ॥ सक्रोध होऊनि तये क्षणीं । दंड कमंडलु टाकिला धरणीं । मस्तक पिटोनि तये क्षणीं । सांगती गाऱ्हाणीं तीं ऐका ॥ १०० ॥ तुका शूद्र जातीचा वाणी । त्याणें विपरीत मांडिली करणी । भाविक जनांसि घालोनि मोहनी । नामस्मरणीं लाविलें ॥ १ ॥ भक्ति महिमा वाढविला थोर । कर्म मार्ग बुडाविला समग्र । जातीचा असोनियां शूद्र । करिती नमस्कार ब्राह्मण ॥ २ ॥ तूं तरी देशींचा अधिकारी । यास्तव सांगावया आलों सत्वरी । तुम्हां वांचोनि निर्धारीं । आमुचा कैवारी कोण असे ॥ ३ ॥ तरी तुक्यासि बोलावूनि येथवर । शिक्षा करावी सत्वर । जरी आमुचें नायकशील उत्तर । तरी प्राण सत्वर त्यजूं आम्ही ॥ ४ ॥ ऐसा निग्रह देखोनि थोर । दादु कोंडदेव बोले उत्तर । तुम्हीं स्वस्थ असों द्या अंतर । तुक्यासि येथवर बोलवितों ॥ ५ ॥ तुमचा त्याचा प्रतिवाद झालिया । जो हरेल शिक्षा करीन तया । ऐसें श्रीपादासि बोलोनियां । दूत लवलाह्या पाठवित ॥६॥ लोहगांवच्या ब्राह्मणांला । पन्नास रुपये लिहिला मसाला । कीं संन्यासी आले सांगावयाला । पत्रीं लिहिला वृत्तांत ॥ ७ ॥ दादु कोंडदेवाचे भृत्य । लोहगांवासि आले त्वरित । ब्राह्मण गोळा करूनि समस्त । मग पत्र देत त्यां हातीं ॥ ८ ॥ ऐसें अरिष्ट देखोनि निश्चिती । अधीरासि भय उपजलें चित्तीं । म्हणती कैसी होईल गती । म्हणवोन कांपती थरथरां ॥ ९ ॥ हा तुक्यासि कळतां वृत्तांत । सकळ ब्राह्मणासि अभय देत । शिरीं असतां पंढरीनाथ । चिंता किमर्थ करावी ॥ ११० ॥ विप्रांसि म्हणती किंकर । मसाला भरोनि द्यावा शीघ्र । तेथेंचि जाऊं चला सत्वर । अवघे द्विजवर बोलती ॥ ११ ॥ निग्रह करावा जरी त्याणीं । तरी तुक्याची प्रतिष्ठा बहुत जनीं । राजा येतसे लोटांगणीं । हें सकळां लागुनी विदित ॥ १२ ॥ मग टाळ विणें मृदंग दोन । सवें धृपदी चौघेजण । दिंड्या पताका उभारून । करीत कीर्तन चालिले ॥ १३ ॥ गांवींचे ब्राह्मण सकळ लोक । पाहावयासि आले कौतुक । मग येऊनि पुणियाच्या सम्यक । संगमीं सकाळिक उतरले ॥ १४ ॥ स्नानें करूनि सकाळिकांनीं । नित्य नेम सारिले कोणी । मग बैसोनि तुक्याचें कीर्तनीं । सादर श्रवणीं ऐकती ॥ १५ ॥ घ्यावया तुक्याचें दर्शन । आणिक यात्रा

आली दुरोन । समुदाय एकवट होतां जाण । दिसतसे सैन्य उतरलें ॥ १६ ॥ कीर्तनगजर ऐकती प्रीती । गांवींचे लोक दर्शनासि येती । पूजेचें साहित्य नानारीतीं । भाविक आणिती तवकांत ॥ १७ ॥ केळें नारिकेळें[1] खर्जुर । बुका तुळसी सुमनहार । पुढें ठेवूनियां सत्वर । करिती नमस्कार सद्भावें ॥ १८ ॥ मोकासी जाऊनि उपरीवरी । बाहेर विलोकोनी पाहे सत्वरी । म्हणे कोणाचें सैन्य दिसतें दूरी । म्हणवोनि विचारी भृत्यातें[2] ॥ १९ ॥ ते म्हणती लोहगांवकरी तुका विष्णुभक्त । संगमी येऊनि कीर्तन करित । गांवींचे लोक मिळोनि समस्त । दर्शना जात तयाच्या ॥ १२० ॥ ऐसा वृत्तांत ऐकोनि । दादु कोंडदेव द्रवला मने । म्हणे आपणही पूजा घेऊनि त्वरेनें । घ्यावें दर्शन तुकयाचें ॥ २१ ॥ ऐसें म्हणवोनि चित्तासी । चालिला गांवींचा मोकाशी । तों आडवे येऊनि संन्यासी । म्हणती हें काय करिसी अधिकारिया ॥ २२ ॥ तूं सर्वस्व आमुचा कुंबसा । हा धरिला होता भरंवसा । आणि त्याच्या दर्शना जातोसि कैसा । तरी आमुची आशा व्यर्थ गेली ॥ २३ ॥ ऐसें बोलतां संन्यासी । प्रतिउत्तर देत मोकाशी । जनांबरोबर दर्शनासी । जाणे आम्हांसी असत्य ॥ २४ ॥ तुकयासि भेटोनि ये अवसरी । गांवांत घेऊनि येतों सत्वरी । तुम्हीं तयासी जिंतिलें जरी । तरी शिक्षा बरी त्यासि लावूं ॥२५॥ अथवा त्याणें तुम्हांसि जिंतिलें जरी । तरी मर्यादा न धरीं अणुमात्र । स्वस्थ असों आपुलें अंतर । बळकट विचार करोनि ॥ २६ ॥ इतुकें श्रीपदासी बोलोनि उत्तर । पूजेचें साहित्य घेतलें सत्वर । सर्वे गृहस्थ थोर थोर । तुकयासि सत्वर भेटले ॥ २७ ॥ टाळ विणे मृदंगघोष । कीर्तनीं ओतला प्रेमरस । नृत्य करिती विष्णुदास । परी त्या सुखास पार नाहीं ॥ २८ ॥ श्रीहरि चरित्र नाना लीला । गातां सद्गदित होतसे गळा । आनंदें अश्रु येती गळा । पाझर खळा तत्काळ ॥ २९ ॥ तों कौतुक वर्तलें ते अवसरीं । सादर ऐकिजे भक्त चतुरीं । एक नग्न दिगंबर जटाधारी । कीर्तनाभीतरी प्रगटला ॥ १३० ॥ तेजें लखलखीत दिव्य कांती । त्यावरी चर्चिली दिव्य विभूती । तुक्यासि आलिंगन देवोनि प्रीतीं । घातलें क्षितीं दंडवत ॥ ३१ ॥ तुक्याप्रती बोले उत्तर । दर्शनाची आस्था फार । मनोरथ पुरले समग्र । इतुकें उत्तर बोलिला ॥ ३२ ॥ ऐसें म्हणवोनि तुक्यासि । निराळ मार्गे जाय तापसी । लोक बैसले कीर्तनासी । ते कौतुक दृष्टीसीं पाहती ॥ ३३ ॥ एकमेकासीं बोलती काय । हा तरी कैलासवासी होय । एक म्हणती दत्तात्रेय । परी प्रत्यया न ये सर्वथा ॥ ३४ ॥ संन्यासी होते ते समयीं । त्यांणीं पुसावें जों कांहीं । हें चरित्र देखोनियां तिहीं । कुंठित सर्वही ते झाले ॥ ३५ ॥ ब्रह्मरस ओतला निखळ । राहिली सकळांची तळमळ । म्हणती धन्य तुका वैष्णव प्रेमळ । वैकुंठपाळ साह्य यासी ॥ ३६ ॥ विठ्ठलनामें गर्जोनि प्रीतीं । मग उजळिली मंगळारती । ओवाळूनि रुक्मिणीपती । खिरापती वांटिल्या ॥ ३७ ॥ खर्जूर केळें आणि साखर । वांटिल्या नानाप्रकार । म्हणती आजि धन्य सुदिन थोर । जाहला उद्धार सकळांचा ॥ ३८ ॥ दादु कोंडदेव सन्निध येऊन । तुक्यासि विनीत

१ नारळ. २ सेवकाला.

बोले वचन । आतां नगरामाजी येऊन । सनाथ करणें मजलागीं ॥ ३९ ॥ देखोनि तयाचें आर्त । मान्य करीत वैष्णवभक्त । संन्यासी मनीं चिंताक्रांत । म्हणती प्रांत बरा नाहीं ॥ १४० ॥ तुक्याचा व्हावया अपमान । यास्तव सांगीतलें गाऱ्हाणें । तों अधिकचि कीर्ति वाढली जाण । उपाय कोण करावा ॥ ४१ ॥ असो आतां ते अवसरीं । तुक्यासि नेलें नगरांतरीं । हवेली थोर पाहूनि बरी । ठाव सत्वरी दीधला ॥ ४२ ॥ लोहगांवकर ब्राह्मण । मसाला करोनि आणिले जाण । त्यांस बहुत सन्मानें । साहित्य आणून दीधलें ॥४३॥ नगरवासी सावकार । त्यानें साहित्य केलें फार । तुक्याच्या पंक्तीसि दोन सहस्त्र । जेविले द्विजवर ते दिवसीं ॥ ४४ ॥ तृतिय प्रहर येतां निश्चित । मग कीर्तनासि प्रारंभ करित । दादु कें.डदेव संन्याशांसि म्हणत । आतां घालिजे वादार्थ तुक्यासी ॥ ४५ ॥ जो हरीस येईल दोघांतुन । त्यासि मी रासभावरी बैसवीन । संन्यासी म्हणती न लागतां क्षण । त्याजकारणें जिंतूं आम्ही ॥ ४६ ॥ आणिक खळ कुटिल कोणी । त्यांसी आणिलें बोलावून । कावळ्याचा शब्द ऐकोनि कानीं । स्वयात धांवोनी येतसे ॥ ४७ ॥ कीं सारमेय शब्द करितां जाण । भुकों लागती गांवींचे श्वान । कां कीं विष्णु द्रोही दशानन । त्यासि कुंभकर्ण पाठिराखा ॥ ४८ ॥ कां दुर्योधनाचे प्राणसखे । शकुनि शिशुपाळ पाठिराखे । तैसे संन्याशांनीं साह्य देख । पंडित वादक मेळविले ॥ ४९ ॥ एक्याचि मतें ते समयीं । कीर्तनांत येऊनि बैसले पाहीं । परी द्वेष वार्ता तुक्यासि नाहीं । नमन सर्वांही करितसे ॥ १५० ॥ वक्त्यांच्या संमुख जाण । श्रीपाद बैसती प्रतिष्ठेनें । विष्णु भक्ताच्या द्वेषें जाण । पदरींचें पुण्य वेंचिती ॥ ५१ ॥ विठ्ठलनामें गर्जोनि हाका । कीर्तनासि प्रारंभ करी तुका । सावध करीत सकळ लोकां । वैकुंठ नायका भजावें ॥ ५२ ॥ प्रहर घटिका पळापळ । आयुष्य भक्षितो महाकाळ । जैसा उंदीर सांडोनि निघतां बिळ । बोका तत्काळ भक्षी तयां ॥५३॥ कां व्रतस्थ करितां एकादशी । राताळें घातलीं शिजावयासी । पाकासि येतां क्षुधित यासी । देहासी काळ जपे ॥ ५४ ॥ कां असावध जाळीं असतां मीन । परी बक सन्निध करितो ध्यान । केव्हां गिळील न कळे जाण । आकळ विंदानें काळाचें ॥ ५५ ॥ जेंजें भासतें सृष्टीसी । परिणामीं नाश असे त्यासी । याचें निवारण व्हावयासी । तरी श्रीहरीसी शरण जावें ॥ ५६ ॥ न करितां श्रीहरींची भक्ती । तरी सर्वथा जन्म मृत्यु न चुकती । साधनें केली नानारीतीं । परी पुनरावृत्ती चुकेना ॥ ५७ ॥ सकाम अथवा निष्काम । वाचेसि जपतां श्रीहरिचें नाम । तयासि गांजूं न शकेचि यम । पुरुषोत्तम पाठिराखा ॥ ५८ ॥ अजामिळ ब्राह्मणसुत । तो वृषलींसी जाहला रत । तेणें पापाचें पर्वत । जोडले बहुत संसारीं ॥ ५९ ॥ त्याचा स्पर्श व्हावया निश्चिती । महातीर्थें कांपती । सप्त नरक तेहीं भिती । प्रायश्चित्तीं मोकलिला ॥ १६० ॥ तो अकस्मात ऋषि समर्थ । तयासि भेटले अवचित । मग अनुताप धरोनि मनांत । तयांसि वृत्तांत सांगितला ॥ ६१ ॥

१ गाढवावर. २ मासा. ३ बगळा. ४ नवल.

ऐकोनि म्हणती साधुजन । पुत्रावरी ममता तुझी पूर्ण । याचें नाम नारायण । आळवीं ठेवून निजप्रीती ॥ ६२ ॥ ऐसें सांगोनि तयासी । साधु गेले तीर्थवासी । अंतकाळ येतांचि देहासी । अजामिळ पुत्रासी पाचारी ॥ ६३ ॥ नारायणा जवळ ये म्हणतां । करुणा आली वैकुंठनाथा । दिव्य विमान पाठवूनि तत्त्वतां । मुक्ति सायुज्यता भोगवी ॥ ६४ ॥ शुकमिषें राघो म्हणतां होंटीं । गणिकेसी नेलें वैकुंठीं । नक्रें गजेंद्र करितां कष्टी । त्यासि सोडवी जगजेठी निजांगें ॥ ६५ ॥ कढयींत घातलें मंडुक सान । तळीं पेटविला कृशान । मग संस्कारें स्मरे कृष्ण । तेणें उदक उष्ण नव्हेची ॥ ६६ ॥ अशरीरिणी वदतसे ते वेळ । कढयींतूनि काढा मंडूकबाळ । उदक तापेल तत्काळ । लोक सकळ ऐकती ॥ ६७ ॥ विष्णु विमान येऊनि सत्वर । दिव्यदेही केला दर्दुर । वैकुंठीं ठेविला निरंतर । विश्वोद्धारें तेधवां ॥६८॥ कळिकाळ हा दुर्धर देख । तेथें श्रीहरीचें नाम तारक । यावीण साधन श्रेष्ठ आणिक । म्हणे तो मूर्ख नाडला ॥६०॥ ऐसें म्हणवोनि भक्त प्रेमळ । हांसोनि गर्जतसे वेळोवेळ । विठ्ठलनामें घोष प्रबळ । श्रोते सकळ करिताती ॥१७०॥ टाळ्या चुटक्यांच्या नादें । घोष होतसे ब्रह्मानंदें । विसरोनि भेदाभेद द्वंद्व । दिसे गोविंद सर्वत्र ॥ ७१ ॥ तैसा आनंद कीर्तनीं होतां । तों अद्भुत नवल वर्तली कथा । संन्यासी उठोनि उभयतां । तुक्यासि तत्त्वतां नमस्कारिती ॥ ७२ ॥ दादु कोंडदेव म्हणतसे त्यांस । स्वामी हें अनुचित करितां कैसें । नमस्कार केला तुक्यास । शब्द ब्राह्मणांस ठेविता ॥ ७३ ॥ आणि तुम्हींच कैसे पाया पडता । तरी मी शिक्षा लावीन आतां । खोटेपण आलें तुमच्या माथां । न्याय विचारितां आम्हांसी ॥ ७४ ॥ संन्यासी तयासि उत्तर देती । नारायणस्वरूप तुक्याची कांती । प्रत्यक्ष देखिली चतुर्भुज मूर्ती । म्हणवोनि प्रीतीं नमस्कारिलें ॥ ७५ ॥ मोकासीस क्रोध अंतरीं । म्हणे तुझी दुर्बुद्धि वेषधारी । मसाला लेहविला माझे करीं । किमर्थ निर्धारीं मज सांगा ॥ ७६ ॥ म्हणवोनि दुराग्रह मांडिला त्यानें । बैसावयासि खर आणविले दोन । म्हणे शिरीं पांच पाट काढोन । यांसि हिंडवणें नगरांत ॥ ७७ ॥ ऐसा प्रसंग पाहोनियां । तुकयारामें वर्जिलें तया । म्हणे वेष विटंबूं नये वायां । हें पंढरीराया न माने ॥ ७८ ॥ ऐसें सांगतां तुका तयासी । मग निवांत राहिला मोकासी । येऱ्हवीं निग्रह करितां त्यासी । वर्जावयासी कोणी नसे ॥ ७९ ॥ येच विषयीं एक आतां । दृष्टांतीं आली आड कथा । दादु कोंडदेव उपाहार करितां । गेली निजकांता बाहेरी ॥ १८० ॥ लवणशाक सन्निध होती जाण । ती आपुल्या हातें घेतली त्यानें । कांता विनोदें येऊन म्हणे । अनुचित करणें हें केलें ॥ ८१ ॥ माझा अधिकार असतां येथ । तरी तुम्हीं कैसा घातला हात । आणिकांसि सांगत राजनीत । आणि तुम्हीं विपरीत का केलें ॥८२॥ ऐकोनि कांतेचिया बोला । पाईक तात्काळ पाचारिला । म्हणे हात तोडून टाका वहिला । अपराध केला थोर याणें ॥८३॥ तेव्हां श्रेष्ठ ब्राह्मण येऊनि पाहे । शास्त्रयुक्त सांगती काय । आंखूड करावी आंगड्याची बाहे । तरी तोडिला होय कर जाणा ॥८४॥ त्यांची आज्ञा वंदोनि

१ मगर. २ अग्नी. ३ बेडूक. ४ गाढवे. ५ हात.

शिरीं । तैसेंच केलें जन्मवरी । उणें पीठ भरतां एके अवसरीं । मोलकरीण सत्वरी आणविली ॥ ८५ ॥ ते म्हणे म्यां चोरिलें नाहीं । मग जातें उपाडिलें ते समयीं । पावशेर दाणे निघतां धांवीं । शूळावर पाहीं देतसे ॥८६॥ खालील तळी आणूनि सत्वर । म्हणे सांपडला अन्यायी चोर । जातें घातलें शूळावर । लोक सर्वत्र पहाती ॥ ८७ ॥ ऐसा न्याय निडर करी सदा । तरी यासि नावडे खोटा धंदा । परी तुकयाच्या वचनासि मर्यादा । यास्तव आपदान केली ॥ ८८ ॥ असो संत चरित्रें वर्णितां । मध्येंच लागली आड कथा । यास्तव उबग न मानिजे श्रोता । नावेक दृष्टांता बोलिलों ॥ ८९ ॥ मग जयजयकार करूनी तेथ । कीर्तनीं गर्जती वैष्णव भक्त । आरत्या उजळोनि त्वरित । रुक्मिणीकांत ओवाळीला ॥ १९० ॥ नृत्य करितां तये क्षणीं । विठ्ठल नामाच्या उमटती ध्वनी । घागरीया मंजुळ वाजती चरणीं । नाद गगनीं कोंदला ॥९१॥ तुका श्रोतयांसि विलोकूनी पाहत । तों विठ्ठलरूपचि दिसती समस्त । भेदा भेद मावळला तेथ । श्रीहरि सर्वत्र जगीं भासे ॥ ९२ ॥ ऐसी होतां विदेह स्थिती । ध्यानांत आणिली सगुण मूर्ती । साष्टांग दंडवत घातलें प्रीतीं । मग खिरापती वांटिल्या ॥ ९३ ॥ संतांचें रज लागलें क्षितीं । पायधुळी वंदीत महीपतीं । खिरापती वाटितां सांडिली क्षिती । ते वेंचोंनि प्रीतीं सेवितसे ॥ ९४ ॥ स्वतिश्री भक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत संत भक्त । अडतिसावा अध्याय गोड हा ॥ १९५ ॥ ॥ अ० ३८ ॥ ओव्या १९५ ॥



अध्याय ३९



श्रीगणेशाय नमः । अनंत जडजीव पांडुरंगे । भवपार उतरिले तुवां अंगें । मी एक राहिलों सकळां मागें । तारूं तूं होईं ॥ १ ॥ स्नान संध्या पितृतर्पण । जपतप कळा अनुष्ठान । यथाविधी तुझें अर्चन । नये घडोन सर्वथा ॥ २ ॥ योगयाग न घडेचि कांहीं । शरीर जाहलें पाहीं । तिर्थाटण घडलें नाहीं । विठाबायी जाणसी तूं ॥ ३ ॥ सत्पात्रीं दानें द्यावीं जरी । तरी धनधान्य बहु नाहीं पदरीं । सत्वहीन मी बहुतांपरी । बुद्धि अगोरी असे माझी ॥ ४ ॥ सद्गुरु दास्यत्व संतसेवा । कांहीं न घडेच मज देवा । सर्वप्रकारें पांगुळ बरवा । असें केशवा तुज ठावें ॥५॥ सकळ दुरितें जाहली गोळा । त्याचा मीं निर्माण जाहलों पुतळा । अविधि विषय बहुत भोगिला । निवेदन तुजला करीतसे ॥ ६ ॥ पतित सर्वांगीं परिपूर्ण । साक्ष देतसे माझे मन । आतां आपुली विरुदावळी पाहोन । भवाब्धि उतरणें श्रीहरी ॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा ऐसी । नारायण स्वरूप तुकयासी । देखोनि दोघे संन्यासी । सद्भावेसी नमस्कारिती ॥ ८ ॥ जाहले आद्यंत वर्तमान । शिवाजीस लिहिलें अधिकारियानें । मग पुणीयासी येऊनि नृपनंदनें । घेतलें दर्शन तुकयाचें ॥ ९ ॥ नाना उपचारें पूजोनि पाहीं । शिवाजी राजा लागला पायीं । मग कीर्तनासी प्रारंभ ते समयीं । भक्त विदेही करीतसे ॥ १० ॥ टाळ विणे मृदंग घोष । मागें ध्रुपदी पन्नास । विठ्ठल नाम घेतां सुरस । कोंदलें आकाश त्या नादें ॥ ११ ॥ आधींच हरिदिनीं[1] पर्वकाळ सुदिन । श्रवणासि सावध नृपनंदन । आणि प्रेमळाचें वक्तृत्व जाण । रंगासि उणें काय तेथें ॥ १२ ॥ तों अविंध अधिकारी चाकणेंत । तयासि कळला वृत्तांत । मग दोनसहस्र पठाण धाडित । शिवाजी नृपनाथ धरावया ॥ १३ ॥ विस्तीर्ण वाडा पुणियांत जाण । त्यांत होतसे हरिकीर्तन । श्रवणासि बैसला नृपनंदन । तों परचक्र दारुण पातलें ॥ १४ ॥ रायासि कळतां हा वृत्तांत । तुकयासि जावया आज्ञा मागत । गजबजिले लोक समस्त । रंग अतिशयित वितुळला ॥ १५ ॥ ऐसें अरिष्ट जाणोनि तेव्हां । मग विठोबाचा करीतसे धांवा । चार अभंग वदले तेव्हां । अर्थ पहावा सज्जनीं ॥ १६ ॥ तुका देवासि भाकीतसें करुणा । भीत नाहीं मी आपुल्या मरणा । परी दुःख कांहीं होता जनां । हें माझ्या नयना न पाहावें ॥ १७ ॥ भजनासि विक्षेप झाला जाण । याहूनि आम्हासि मरण तें कोण । तरी आपुल्या माया लाघवें करून । निवारीं विघ्न विठोबा ॥ १८ ॥ ऐसें ऐकोनि करुणाघन । तुकयासि देतसे आश्वासन । तुवां सुखें करावें कीर्तन । रक्षिता जगज्जीवन मी यासी ॥ १९ ॥ इकडे बाहेर अविंध उन्मत्त । म्हणती शिवाजी राजा न ओळखूंच यांत । तरी श्रोते वक्ते मारावे समस्त । मग सहजचि नृपनाथ सांपडेल ॥२०॥ ऐसा विचार करितां दुर्मती । तों लाघव करितसे रुक्मिणीपती । आपण होऊनि शिवाजी नृपती । सत्वरगतीं पळतसे ॥ २१ ॥ अविंधसेनेंत होते हेर । त्यांणीं ओळखिला नृपवर । म्हणती हाचि दावेदार । धरा लवलाहें ॥ २२ ॥ ऐसें म्हणवोनि

1 एकादशीस.

उठाउठीं । सकळ पठाण लागले पाठीं । तों मायालाघवी जगजेठी । क्षण एक दृष्टीं पडतसे ॥ २३ ॥ आटोपितां संनिध येती पाही । धरूं जातां कांहींच नाहीं । म्हणतां संन्निध भासे । धरूं जातां कांहींच नसे । प्रहरांत जाता वीस कोस । नेलें तयांस काटवणीं ॥२५॥ श्रीकृष्ण अवतारीं जगज्जीवन । पळाला काळयवनाचे भेणे । मग मुचुकुंद विवरीं जगज्जीवन । बैसे लपोन ज्यारीतीं ॥ २६ ॥ तैशाच रीतीं चक्रपाणी । अदृश्य जाहले तये रानीं । तों चंद्र गेला मावळोनी । काहूर गगनीं कोंदलें ॥ २७ ॥ अविंधासि मार्ग न दिसे कोठें । वस्त्रें फांटलीं लागतां कांटे । अश्वही पळोनि गेले गोमटें । जाहले करंटे भिकारी ॥ २८ ॥ इकडे तुका प्रेमळ भक्त । श्रीहरिकीर्तनीं गात नाचत । श्रोते तटस्थ जाहले समस्त । रंग अद्भुत ओडवला ॥ २९ ॥ कृष्णाविष्णु हरि गोविंदा । अच्युता आनंता आनंदकंदा । परमपुरुषा सच्चिदानंदा । श्रीमुकुंदा जगद्गुरु ॥ ३० ॥ ऐसी नामें गावोनि नाना । सप्रेम रसें भाकीतसे करुणा । प्रेमें सद्गदित कंठ जाणा । अश्रु नयना लोटती ॥ ३१ ॥ ऐशा रीतीं सप्रेम गजरें । रात्र लोटली चार प्रहर । उदयासि येतां दिनकर । मग रुक्मिणीवर ओवाळिला ॥ ३२ ॥ परचक्र गेलें आपुले मतीं । म्हणवोनि विस्मित जाहला भूपती । म्हणे मरण चुकविलें आजिचे रात्रीं । बैसतां संगतीं संतांचे ॥ ३३ ॥ तुकयासि पुसोनि सत्वर । सिंहगडी चालिला नृपवर । मग प्रसाद मागतां ओंजळभर । लीद निज करें दीधली ॥ ३४ ॥ ती पदरी घेऊनि नृपनाथें । नेऊनि ठेविली दुकानांत । चित्ती संतोष जाहला बहुत । म्हणे भाग्य उदित पैं माझें ॥ ३५ ॥ इतुकें चरित्र पुण्यात पाही । वर्तलें असे ते समयीं । मग तुकयासि लोहगांवीं । घेवोनि सर्वही लोक गेले ॥ ३६ ॥ तों कोंडोबा लोहकऱ्या आडनांव । तुकयापासी त्याचा भाव । ध्रुपद धरितसे अपूर्व । जेणें वैष्णव संतोषती ॥ ३७ ॥ तो तुकयासि म्हणतसे नित्य । महायात्रेसि जावयाचा आहे हेत । तुमचें वचन मानिती गृहस्थ । तरी देशावर मातें करूनि द्या ॥ ३८ ॥ खर्चासि कांहीं नसे जाण । कार्य होईल तुमच्या वचनें । ऐसें नित्य म्हणतां ब्राह्मण । वैष्णव जन काय करी ॥ ३९ ॥ आसनाखालीं घालोनि हात । एक होन काढोनि देत । कोंडोबा जाहला संकोचित । म्हणे इतुक्यांत कार्यार्थ न होय ॥ ४० ॥ मग तुकया तयासि सांगतसे कायी । हा नित्य मोडित जायी । त्यांतूनि एक पैसा ते समयीं । पदरीं ठेवी आपुल्या ॥ ४१ ॥ दुसरे दिवशीं परतोन । त्याचा मागुती होईल होन । चारदां मोडितां विळांतून । परि पैसा जतन एक करी ॥ ४२ ॥ सत्पात्रीं वेंचूनि धन । यात्रा करावी संपूर्ण । मागुतीं येशील परतोन । मग देई होन आमुचा आम्हां ॥ ४३ ॥ कोंडोबा ब्राह्मण विस्मित मनीं । चमत्कार पाहूं आजिचे दिनीं । होन मोडोनि तये क्षणीं । पैसा त्यांतुनी ठेविला ॥ ४४ ॥ सामग्री आणोनि तांतडी । केलें लाही पीठ गूळ पापडी । तूप गूळ घेतला सवडसवडी । जिव्हेसि गोडी लागावया ॥ ४५ ॥ ऐसें साहित्य करोनि फार । तुकयासि पुसावया आला विप्र । म्हणे होन मोडोनि सत्वर । पाहिला चमत्कार म्यां

स्वामी ॥४६॥ ऐकोनि म्हणे वैष्णव भक्त । कोणासि कळों नेदी मात । आपुला साधूनि कार्यार्थ । मागुतीं आम्हासि दे आणून ॥४७॥ मग तीन अभंग वैष्णव वीरें । तया हातीं पाठविलें पत्र । त्याचा अर्थ संकळित सार । ऐका चतुर भाविकहो ॥ ४८ ॥ विश्वेश्वर जो कैलासपती । तयासि एक लिहिली विनंती । एक तें पत्र भागीरथी । विष्णुपदासि विनंति एक असे ॥ ४९ ॥ विश्वरचना दिसती अपूर्व । तें विराट स्वरूप तूं महादेव । म्हणवोनि विश्वनाथ हें नांव । भक्तगौरव तुज देती ॥ ५० ॥ दीन रंक अनाथावरी । कृपा करावी ये अवसरीं । वारंवार पायांवरी । मस्तक निर्धारीं तुमच्या ॥ ५१ ॥ अल्प संतोषी माझें मन । तुम्हांपासीं तों काय उणें । तुका भातुकें इच्छितो मनें । तरी तें पाठवणें धूर्जटी ॥ ५२ ॥ आतां भागीरथीसि लिहिलें काय । म्हणे माझी विनंति परिसा माय । सकळ तीर्थांचें स्वामित्व पाहे । अंगीं तुझिये असे कीं ॥ ५३ ॥ महादोषांचें निवारण । दर्शनमात्रें करिशील जाण । म्हणोनि तुझें चरणीं नमन । निजप्रीतीनें करितसें ॥ ५४ ॥ सद्भावें तुझिया जळीं न्हाती । तयासि प्राप्त भुक्ति मुक्ती । संतांच्या पोसणा तुका म्हणती । वैष्णववीर प्रीतीं धाडितसे ॥५५॥ विष्णुपद रायेसि थोर । तयासि विनवीत वैष्णववीर । पिंड दीधला पदावर । आपुल्या निजकरें करोनी ॥५६॥ माझेंहीं गया वर्जन झालें । पितरांचेंही ऋण फिटलें । कर्मांतरही सांग घडलें । ओझें उतरलें मीपणाचें ॥ ५७ ॥ एक हरिहरनाम देखा जनांत । बोंब ठोकितसे तुका । हे तिन्ही अभंग लिहिली पत्रिका । अनुभव सुखाचेनि बळें ॥५८॥ तें कोंडोबा लोहकन्या घेऊनि हातीं । तुकयासि नमस्कार करीतसे प्रीतीं । मग महायात्रेसि निश्चिती । सत्वर गतीं चालिला ॥ ५९ ॥ वाटेसि होन मोडोनि देख । पदरीं पैसा बांधीतसे एक । खर्च करीतसे अधिक अधिक । आश्चर्य लोक ते करिती ॥ ६० ॥ म्हणतीं पदरीं नसतां धन । खर्च करीतसे कोठून । जैसा वाळूंतील विहिरा जाण । त्यांतील जीवन न सरे ॥६१॥ लहानचि दिसतो त्याचा सांठा । परी जीवन काढितां नये तोटा । तैसीच कोंडोबाची निष्ठा । न सांगे बोभाटा कोणासी ॥ ६२ ॥ ऐशारीतीं क्रमितां पंथ । वाराणसीसि गेला त्वरित । स्नान केलें भागीरथींत । मग निरोप सांगत निजप्रीतीं ॥ ६३ ॥ सकळ तीर्थांची स्वामिनी मायें । तुकयानें तुज पत्र दीधलें आहे । ऐसें बोलतांचि लवलाहें । तों कौतुक काय वर्तलें ॥ ६४ ॥ महा पात्रांतून भागीरथी । बाहेर काढीतसे प्रीतीं । रत्नजडित कंकण हातीं । जैसा गभस्तीं उगवला ॥ ६५ ॥ तीरीं यात्रा बहुत होती । देखोनि लोक आश्चर्य करिती । म्हणती साक्षात आली भागीरथी । म्हणोनि स्नानें करिती लवलाहें ॥ ६६ ॥ एक घेऊनि मोहरहोन । हातावर ठेविती प्रीतीनें । कोणी तोडगर चोळी चोळखण । सौभाग्यवायन पैं देती ॥ ६७ ॥ ऐशा रीतीं पूजा करितां । परी हातीं न घेचि विश्वमाता । तेव्हां कोंडभटाचिया चित्ता । स्मरण अवचितां जाहलें ॥ ६८ ॥ मग तुकयाचें पत्र घेऊन त्वरित । पुढें शिरला पाण्यांत । तें हातीं देखताचि त्वरित । तों सूठ वळित

भागीरथी ॥ ६९ ॥ ऐसें कौतुक दाखवूनि त्वरित । मग हात गेला जळांत । देखोनि क्षेत्रवासी समस्त । जाहले विस्मित मानसीं ॥ ७० ॥ म्हणती तुकयाची वाक्पुष्पें येथें । भागीरथीस आवडलीं निश्चित । ज्याच्या वह्या उदकांत । रुक्मिणी-कांतें रक्षिल्या ॥ ७१ ॥ असो कोंडभटें चार मास । आवडीनें केला काशीवास । तुकयाचा अभंग पाठ असे । तो विश्वेश्वरास निवेदिला ॥ ७२ ॥ शब्दरत्नांची विनवणी । ऐकोनि डोले शूलपाणी । बेलपुष्पें पडती ते क्षणीं । लोक नयनीं पाहती ॥ ७३ ॥ भागीरथीं आणि विश्वेश्वर । दोघांनीं दाखविला चमत्कार । यात्रेकरियांसि आश्चर्य थोर । वाटलें साचार तेधवां ॥ ७४ ॥ मग गयेसि जाऊनियां त्यानें । जाहला वडिलांचा उत्तीर्ण । तुकयाच्या प्रसादें करोन । वेचिलें धन सत्पात्रीं ॥ ७५ ॥ ऐसीं यात्रा करोनि निश्चित । माघारें चालिलें क्रमित पंथ । चित्तीं बहुत हर्षयुक्त । काय बोलत मानसीं ॥ ७६ ॥ तुकयासि मागतां देशावर । तों महासिद्धी लाधली थोर । औषधवल्ली पाहतां साचार । तों अमृततुषार जोडला ॥ ७७ ॥ कां इच्छितां थिल्लरींचें पाणी । तों पुढें समुद्र देखिला नयनीं । शेळीचें दुभतें इच्छित मनीं । तों घरीं नंदिनी आली कीं ॥७८॥ पाठांतर व्हावें मनीं धरितां । तों जिव्हेसि आली प्रसादिक कविता । कां उष्णकाळीं उबारा होतां । तों हिमनग अवचितां देखिला ॥ ७९ ॥ दीपकाचा प्रकाश इच्छितां थोर । तों अंधारीं प्रगटला भास्कर । स्वप्नीं दृष्टांत व्हावा सत्वर । तों साक्षात श्रीधर भेटला ॥८०॥ तेवीं महायात्रा व्हावया कारणें । देशावरचे इच्छिलें धन । तों महासिद्धी तुकयानें । निजप्रीतीनें दीधली ॥ ८१ ॥ आतां होन मागती परतोन । तरी सर्वथा देऊं नये त्याजकारण । ऐसा अभिलाष धरोन । घेतलें दर्शन तुकयाचें ॥८२॥ गांवाबाहेर लोहगांवीं । एकांतीं बैसे तुका विदेही । कोंडोबा लोहकऱ्या लवलाहीं । येऊनि पायीं लागला ॥८३॥ म्हणे आपुल्या प्रसादें सत्वरा । सकळ जाहली असे यात्रा । स्मरण जाहले वैष्णववीरा । होन माघारा मागती ॥८४॥ कोंडभट बोले प्रत्युत्तर । होन हारपला साचार । बरें म्हणोनि वैष्णव वीर । तयासि उत्तर बोलतसे ॥८५॥ कोंडभट घरासि लवलाहीं । जाऊनि पाही ते समयीं । तों ग्रंथिकेमाजी कांहींच नाहीं । विस्मित जीवीं मग होय ॥८६॥ म्हणे आज दोन प्रहरां केलें स्नान । तेव्हां पदरीं होता होन । ग्रंथिका तैसीच आहे जाण । गेला निघोन कैशा रीतीं ॥ ८७ ॥ जरी आतां सांगावें तुकयासी । तरी हारपला म्हणोनि वदलों त्यासी । माझें कपट फळलें मजसी । म्हणोनि कुसमुसती अंतरी ॥ ८८ ॥ एक सद्गुरुद्रोह पडला पाहीं । संसारीं स्वार्थ दाटला नाहीं । अपयश आलें दोहीं ठायीं । यास्तव जीवीं झुरतसे ॥ ८९ ॥ असो आतां हा विचार । आशापाशें नाडले फार । एकीं हार केला वर । पंचाग्नि धूर एक घेती ॥९०॥ एक करिती दुग्धपान । एकीं सेविलें महारण्य । एकीं जटा वाढवून । आत्मोद्धुलन सर्वांगीं ॥ ९१ ॥ एकीं झाडासि झोला बघून । घालिती चौऱ्याशीं आसना । एक मौनी न बोलती वचन । मग देती लिहुन पाटीवरी ॥ ९२ ॥ एकीं करोनि वेदाध्ययन । करिती

गृहस्थांचें उपार्जन । एक पंडित होऊनि जाण । वाद घालणें पुढिलासी ॥ ९३ ॥ एक होऊनि हरिदास । ज्ञान सांगती बहुवस । एकीं घेतला संन्यास । एक विष्णुदास म्हणविती ॥ ९४ ॥ जंगम शेवडे आणि फकीर । कानफडे आणि दिगंबर । एक अघोर पंथ म्हणविती थोर । किती विस्तार सांगावा ॥९५॥ हे पाहिले असती बहुवस । परी देखिला नाहीं निराश पुरुष । तैसें तुकयाचें नव्हे मानस । चित्तीं उदास सर्वस्वें ॥ ९६ ॥ सर्व सिद्धि अनुकूळ असतां । तयांसि हाणितल्या कीं लाता । षड्वैरी जिंतोनि तत्त्वतां । रुक्मिणीकांता भजतसे ॥ ९७ ॥ ग्लांती करितांही नृपवर । नाहीं मोकासा घेतला थोर । नाहीं वाडा बांधविलें घर । वस्त्रें अळंकार न घेचि ॥ ९८ ॥ अल्प आहार सेवितां जाण । ग्रासोग्रासीं हरिस्मरण । रात्रंदिवस हरिकीर्तन । नाहीं खंडण तयासी ॥ ९९ ॥ संसारपाश टाकोनि निश्चित । आणि चौदा वैष्णव भक्त । धरोनि तुकयाची संगत । धरिती ध्रुपद कीर्तनीं ॥ १०० ॥ तयासि न पुसतां पाहीं । उठोनि जाती आणिके गांवीं । मग ते धुंडीत लवलाहीं । मागूनि सर्वही येताती ॥ १ ॥ जरी कोणी पुसिलें वैष्णववीरा । कोठें जातां ये अवसरा । म्हणे आम्ही जातो वैकुंठपुरा घातला धारा ऐशा रीतीं ॥२॥ कोणी उत्तर पुसिलें जाण । तरी तें न बोले अभंगावीण । जिव्हा रंगली नामस्मरणें करून । काया परिपूर्ण ब्रह्म झाली ॥ ३ ॥ एके दिवसीं वैष्णवभक्त । लोहेगांवीं कीर्तन करित । नामरूपीं जडलें चित्त । देहभाव समस्त विसरला ॥ ४ ॥ टाळ विणे मृदंग घोष । नाद ब्रह्माचि आलें मुसे । विठ्ठलनामाचा होतसे घोष । तेणें आकाश कोंदलें ॥ ५ ॥ जैसी वक्तयाची स्थिति पाहीं । तैसेच श्रोते जाहले विदेही । जो हिलालासि तेल घालीतसे पाहीं । देहभाव नाहीं तयासी ॥ ६ ॥ तटस्थ मुद्रा सर्वांकारणें । स्नेह न घालितां विझाला अग्न । तों अद्भुत कौतुक वर्तलें जाण । तें ऐका सज्जन भाविक हो ॥ ७ ॥ तुकयाच्या अंगाचा प्रकाश । पडिला तेव्हां बहुवस । माझ्या मतीनें ऐसें भासे निःशेष । दृष्टांत सुरस अवधारा ॥ ८ ॥ गर्भ असतां मातेच्या उदरीं । तें तेज उमटे अंगावरी । कां जैसा चाकवी अनुभव अंतरीं । तो उद्गार बाहेरी वदे वचा ॥ ९ ॥ ना तरी बिलोराच्या मंदिरांत । दीप उजळोनि ठेविला निश्चित । त्याचा बाहेर प्रकाश पडत । द्वारा किंचित नसतांहीं ॥११०॥ तैसें तुकयाच्या उदरीं सहज । सुरवाडें बैसे गरुडध्वज । त्याचें बाहेर फांकले तेज । ऐसेंच मज वाटतसे ॥११॥ महाकवीची काव्य गोष्टी । कीं कोटि सूर्य विष्णूचे मुगुटीं । तो भक्तवत्सल जगजेठी । तुकयाचें पोटीं सांठविला ॥१२॥ म्हणोनि अंगीचा प्रकाश । कीर्तनीं पडिला बहुवस । अनुभवें देखिलें दृष्टीस । भाग्य विशेष पैं त्याचें ॥१३॥ असो आतां जगदुद्धार । व्हावया भक्ताचा अवतार । कीर्तन जाहले तीन प्रहर । मग रुक्मिणीवर ओवाळिता ॥१४॥ खालीं बैसतां वैष्णववीर । तो मागुतीं पडिला अंधकार । श्रोते आले देहावर । तों हिलाल समग्र लाविले ॥१५॥ स्नेह आणिलें होतें समग्र । तें वेचिलें नाहीं आणुमात्र । तेलाचें तैसेंच भरलें पात्र । आश्चर्य थोर लोक करिती ॥ १६ ॥ लोहगांवींचे भाविक

नर । त्यांसि तुकयाची सेवा घडली फार । त्यांनींच प्रेमा लुटिला समग्र । कीर्तन गजर ऐकतां ॥१७॥ जैसा कृष्णअवतार मथुरेसि झाला । परी गोकुळीं क्रीडला घनसांवळा । तो व्रजवासी भोगिती सोहळा । तैसेंच मजला भासतसे ॥ १८ ॥ जगविख्यात वैष्णव वीर । जनांत मान्यता वाढली फार । मग कोणासी न बोलतां उत्तर । देहुसि सत्वर पातला ॥ १९ ॥ राउळासि जातां उठाउठी । पांडुरंग मूर्ति देखिली दृष्टीं । नमस्कार घाली सद्गद कंठी । जैसी दंड काठी पडतसे ॥ १२० ॥ जें ध्यान ठसावलें हृदयांतरी । ते सगुण मूर्ति देखिली बाहेरी । प्रेम न समावेचि अंतरीं । मग तें बाहेरी ओसंडे ॥ २१ ॥ देवासि म्हणे करुण स्वरें । तुम्ही करावा अंगीकार । हा माझे ठायी विचार । नाहीं आन साचार विठोबा ॥ २२ ॥ आतां दोहीं पक्षी जाण । म्यां लावोनि घेतलें लांछन । लाजविलें देव भक्त पण । साक्ष मन देतसे ॥ २३ ॥ महत्वाची शृंखला पायीं । पडली असे विठोबायी । ममता वाढली जनाचे ठायीं । आतां मज सोडवी दयाळा ॥ २४ ॥ नानापरीची पक्वान्नें देख । करोनि भोजन घालिती लोक । तेंच शरीरीं मानिलें सुख । तूं चैतन्यनायक साक्ष यासी ॥२५॥ अवगुणाचा थारा बहुवस । देहीं वाढवली निद्रा आळस । आतां तुज संतांची आण असे । तरी वैकुंठास मज नेयी ॥२६॥ ऐसी करुणा भाकितां चित्तीं । तों हांसोनि बोले पांडुरंग मूर्ति । म्हणे तुझे मनोरथ पूर्ण होती । मी श्रीपती रक्षिता ॥ २७ ॥ तुझिया देहासि शेवटीं । काळाची पडो नेदीच दृष्टी । ऐसें बोलतांचि जगजेठी । सद्गदित कंठीं होय तुका ॥ २८ ॥ यावरी आतां एके दिवशीं । तुकाराम गेले आळंदीसी । सभापंडपीं सद्भावेंसी । दंडवत देवासी घालितसे ॥ २९ ॥ तों आजान वृक्षातळीं जाण । पक्षी वेंचीत होते कण । मग ते तुकयासि देखोन । गेले उडोन सत्वर ॥ १३० ॥ हें देखोनि प्रेमळ भक्त । अंग जाहलें रोमांचित । म्हणे माझें अभेद असतें चित्त । तरी पक्षी उडत कासया ॥ ३१ ॥ षड्वैरी जिंतोनि साचार । शूरत्वें जाहलों वैष्णववीर । आत्मवत भासे जगत्र । तो व्यर्थच विचार गेला कीं ॥ ३२ ॥ शरीर जाहलें प्रेतवत । देहभाव नसेचि किंचित । ऐसी जाहली माझी स्थित । ते व्यर्थचि दिसत मजलागीं ॥ ३३ ॥ वैराग्याच्या शेणी शरीरा । लावोनि ब्रह्माग्नि चेतविला बरा । जाहलों संसारासि पाठमोरा । तें व्यर्थचि अंतरा मज भासे ॥ ३४ ॥ हा देह हाचि घट पाहीं । फोडिला विठोबाचे पायीं । वासनेचा क्षय केला जीवीं । तें व्यर्थचि सर्वही आज गेलें ॥ ३५ ॥ तिळांजळी कुळ नाम रूपांसी । ज्याचें शरीर अर्पिलें त्यासीं । स्थिति बाणली आहे ऐसी । तें व्यर्थचि मजसी दिसतसे ॥ ३६ ॥ आयुष्याचे न सरतां माप । रक्षा जाहली आपेआप । देहींच उजळला दीप । पांडुरंग बाप विश्वाचा ॥ ३७ ॥ हें आपुल्या अनुभवें वदलो स्थिति । परी माझ्या भयें पक्षी उडती । तरी व्यर्थचि वाणी वेचिलीं मती । म्हणवोनि चित्तीं खेद करी ॥ ३८ ॥ मग एकाग्र करोनियां चित्त । हृदयीं चिंतिला पंढरीनाथ । म्हणे दीनदयाळ कृपावंत । अनाथनाथ विठायी ॥ ३९ ॥ डोळसाचा धरोनि हात । आंधळा क्रमीत जाय पंथ ।

१ देवळांत.

परी न दिसेचि अणुमात्र । ईश्वरी भार घालोनिया ॥ १४० ॥ परमार्थ पंथ क्रमितां सांग । पाऊल पडलें आड मार्ग । दीन दयाळे पांडुरंग । तूं निजांगे सांभाळी ॥४१॥ ऐसें म्हणोनि प्रेमळ भक्त । तटस्थ उभा मग निवांत । सर्वथा अंग न हालवी किंचित । पात्यास पातें लागेना ॥ ४२ ॥ म्हणे माझ्या अंगावर नेऊन । पक्षी बैसतील निर्भय मनें । तेव्हांच होईल समाधान । नाहीं तरी जिणें व्यर्थचि हें ॥४३॥ ऐसा निश्चय करोनि थोर । तटस्थ उभा घटिका चार । श्वास न टाकीच अणुमात्र । हें जाणे अंतर विश्वात्मा ॥ ४४ ॥ तुकयाचा निश्चय देखोनि ऐसा । संकट पडिलें पंढरीशा । म्हणे याचा लळा पुरेल जैसा । ती युक्ति सहज करावी ॥ ४५ ॥ मी भक्ताची लळे पुरवीन श्रीपती । ऐसें बोलिलों श्रीभागवतीं । ती असत्य होईल वचनोक्ती । तुकयाची आर्ती न पुरवितां ॥ ४६ ॥ आत्मा व्यापक सर्वांभूतीं । तो हृदयस्थ जाहला करुणामूर्ती । तेव्हां पक्षी निर्भय होऊनि चित्तीं । अंगावर बैसती तुकयाच्या ॥ ४७ ॥ मग अंग हालवितां प्रेमळ भक्त । तरी विहंगम पळोनि न जात । जैसें प्रभंजनें झाड हालत । तेणें पक्षी न भीत सर्वथा ॥४८ ॥ मग परमहर्ष मानूनि चित्तीं । एक अभंग रचिला प्रीतीं । त्याचा पहिला चरण निश्चिती । लिहितों ग्रंथीं ऐकिजे ॥ ४९ ॥ अवघींच भूतें साम्या आलीं । ही म्यां कधीं नव्हतीं देखिली । ती त्वां माझी आळ पुरवली । जेवीं समजवी माउली बाळकांते ॥ १५० ॥ ऐसें म्हणवोनि तेव्हां । सांष्टांग दंडवत ज्ञानदेवा । घालोनियां सप्रेम भावा । तुकयाच्या जीवा आनंद ॥ ५१ ॥ असो सिंहावलोकनें निश्चित । मागील चरित्र आठविजे श्रोतीं । कोणासि न पुसतां निश्चिती । अळंकावतीं पातले ॥ ५२ ॥ मागें चौदा वैष्णव भक्त । तुकयाचा शोध घेत घेत । धुंडीत आलें कीं समस्त । तों नवल अघटित देखिलें ॥ ५३ ॥ आजान वृक्षातळीं साचार । एकट तुका वैष्णववीर । पक्षी बैसती अंगावर । वारंवार ते समयीं ॥ ५४ ॥ हें कौतुक पाहोनि ते वेळे । अवघे जन पातले जवळ । तो पक्षी उडोनि गेले सकळ । धन्य काळ सुदिन तो ॥५५॥ असो आतां ते अवसरीं । पुण्य क्षेत्र अळंकापुरी । तेथें ज्ञानदेवाचें द्वारीं । तुका करी हरिकीर्तन ॥ ५६ ॥ टाळ विणे उपसाहित्य । तेंहीं मागूनि आलें समस्त । नाद ब्रह्म घवघवीत । श्रवणीं पडत श्रोतयांच्या ॥५७॥ कृष्णा विष्णु मेघश्यामा । अच्युता नरहरि पुरुषोत्तमा । भक्तकैवारी गुणधामा । भजनी प्रेमा मज देयीं ॥ ५८ ॥ जोवरी देह अवसान । तोंवरी करीन हरिकीर्तन । एक वेळ आयुष्य करी उणें । परी गात्रें क्षीण होऊं नेदीं ॥ ५९ ॥ तुझे नामी पडे विसर । याहुनि घात कोणता थोर । हाळाहळें पोळला श्रीशंकर । तो नामेंचि सत्वर निवाला ॥ १६० ॥ गमन करितां त्रिभुवनी । नाम गातसे नारदमुनी । ब्रह्म विणा खांदा घेऊनि । सप्रेम मनीं सर्वदा ॥६१॥ हरि पाठाचे अभंग थोर । स्वमुखे वदले ज्ञानेश्वर । तेचि तुका वैष्णववीर । सप्रेमादरें गातसे ॥६२॥ टाळ्या चुटकियाची घायी । घागऱ्या नेपुरें वाजती पायीं । मृदंग विण्यांच्या स्वरांत कांहीं । भेद नाहीं अणुमात्र ॥ ६३ ॥ ऐशाच परी स्वानंदरसीं । नाद ब्रह्म


१ इच्छा. २ वाऱ्याने.

कोंदलें आकाशीं । तेथें सुरवर येऊनि उल्हासीं । कौतुक दृष्टीसीं पाहती ॥६४॥ गुप्त रूपें करोनि देव । पुष्पें वर्षती वृंदारक । अवघाचि विश्वंभर भासे एक । सप्रेम सुख श्रोतयां ॥ ६५ ॥ असो वाणितां तुकयाची स्थिती । कुंठित होय कवीची मती । चार प्रहर लोटतां राती । मग रुक्मिणीपती ओंवाळिला ॥६६॥ द्वादशीस पारणे करोनि तेथें । देहु ग्रामासि चालिले त्वरित । मग ज्ञानदेवासि पुसोनि येत । देहु क्षेत्रांत मागुती ॥६७॥ तुकयाचि स्थिति ऐसी पाहे । सर्वांभूती निर्वैर होय । म्हणोनि पक्षीं न धरोनि भय । बैसत जाय अंगावरी ॥६८॥ हें बहुतांच्या मुखें करोनी । चिंचवडी देव ऐकती कानीं । म्हणती तुकयासि येथवर बोलावूनी । चमत्कार नयनीं पाहावा ॥६९॥ म्हणवोनी देहु क्षेत्रासि त्यांणीं । मनुष्य पाठविलें प्रीती करोनि । म्हणती तुकयासि विनीत होऊनि । येई घेऊनि येथवरी ॥१७०॥ अवश्य म्हणवोनि त्यांतें । येवोनि तुकयाचे दर्शन घेत । तेथें वैष्णव कीर्तन करीत । ऐकोनि विश्रांत जीवासी ॥ ७१ ॥ देवांचा निरोप सांगावा तेणें । तरी सर्वथा नाहीं देह भान । रात्रंदिवस ऐके कीर्तन । सप्रेम मनें सर्वदा ॥७२॥ दिवस तीन लोटतां जाण । तरी मनुष्य नयेचि परतोनि । देव म्हणती जावोनि आपण । घ्यावें दर्शन तुकयाचे ॥ ७३ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । मग निघालें सत्वरी । हें तुकयासि कळतां अंतरीं । म्हणें आपण सामोरी त्यांसि जावें ॥ ७४ ॥ मग कोणासि न पुसतां सत्वर । तेथुनि निघाला वैष्णववीर । अर्धपंथ क्रमितां सत्वर । भेटले द्विजवर तुकयासि ॥ ७५ ॥ तुकयासि देतां आलिंगन । देवांचें संतोषित झालें मन । म्हणती धन्य धन्य आजिचा सुदिन ॥ जाहलें दर्शन वैष्णवाचें ॥७६॥ मग स्वस्थ बैसोनि तेथ । म्हणती बरा फावला एकांत । सर्वे भूतें साम्यासि येत । पक्षी बैसत आंगावरी ॥ ७७ ॥ तृणाचें बुजावणें हालतां निश्चिती । तयांसि विहंगम¹ देखोनि पळती । आणि तुमच्या आंगावरी निर्भय बैसती । ही अद्भुत स्थिति बाणली ॥७८॥ मनुष्याकृति दिसती आम्हां । तरी येथें सर्वथा नाहींच उपमा । अद्भुत बोलोनि भाक्ति प्रेमा । पुरुषोत्तमा वश्य केलें ॥ ७९ ॥ तरी तुकया तूं कोण निश्चित । हें आम्हांसि सांगें सत्य । अनुभवें आणोनि प्रचीत । संशय निवृत्त करावा ॥१८०॥ ऐसें पुसतांचि उपासका । तयासि चमत्कार दाखवी तुका । मांडीचे कातडे चिरिलें देखा । तों कापूस निका त्यामाजी ॥ ८१ ॥ हाड मांस रुधिर नाहीं । कापूस पिंजला दिसतसे पाहीं । देखोनि देव विस्मित जीवीं । म्हणती मानवी कांहीं नव्हे तुका ॥ ८२ ॥ करावया जगदुद्धार । मृत्युलोकीं जाहला अवतार । मनुष्याकृति दिसती वर । परी हा ईश्वर म्हणावा ॥ ८३ ॥ ऐशा रीतीं करोनि स्तवन । देवीं केलें साष्टांग नमन । तुका तयाचे धरितसे चरण । म्हणे अनुचित करणें हें स्वामी ॥८४॥ मी तरी शूद्र जातीचा पाहें । सकळ संतांचा सेवक आहें । ऐसें म्हणवोनि लवलाहें । सप्रेम पाय धरीतसे ॥ ८५ ॥ श्रीकृष्णें जैसी भक्षिता माती । विश्वरूप पद दाखविलें मातें पती । मग नमस्कार करी यशोदा सती । तेव्हां रडे श्रीपती बाळलीलें ॥८६॥ म्हणे मी तुझें बाळक निश्चित । माझ्या पायां कां पडसी माते । तैसीच तुकयाची

१ पक्षी.

स्थित । अमानित्व चित्ती सर्वदां ॥ ८७ ॥ चर्म चिरोनि आपुल्या हातें । कापूस दाखविला देवातें । तें नमस्कार करितां तयातें । म्हणे अनुचित करीतसां ॥ ८८ ॥ जैसीं विष्णु चरित्रें अघटित । तैशाच रीतीं दाविती संत । देव आणि निजभक्तां । भेद किंचित असेना ॥ ८९ ॥ वायु आणि चंचळपण । कां सूर्य आणि त्याचे किरण । समुद्र आणि कल्लोळ पूर्ण । नव्हती दोन सर्वथा ॥ १९० ॥ ऐशा रीतीं करोनि स्तुती । देवांनीं तुकयासि धरोनि हातीं । चिंचवड क्षेत्रीं नेऊनि रात्रीं । कीर्तन ऐकती निजप्रेमें ॥९१॥ चारी प्रहर कीर्तन गजर । करोनि तोषविले द्विजवर । मग उदयासि येतांचि दिनकर । रुक्मिणीवर ओवाळिला ॥ ९२ ॥ असो यापरी गाणपत । तुकयाचे ठायीं धरोनि प्रीत । तीन रात्रीं राहोनि तेथ । श्रवण करित हरिकथा ॥ ९३ ॥ पक्कानें करोनि नानारीतीं । ब्राह्मण संपतर्ण केलें प्रीतीं । मग तुकयासि घेऊनिया पंक्ती । भोजन करिती प्रीतीनें ॥ ९४ ॥ असो यापरी जाहलीं भोजनें । तांबूल बुका आणि सुमनें । पुष्पपहार गळ्यांत घालोन । विष्णुभक्त प्रीतीनें पूजिला ॥ ९५ ॥ मग देवासि पूसोनि देखा । देहूसि वैष्णव येतसे तुका । जो लीला विग्रहीं अवतार निका । वैकुंठनायका प्रिय जो ॥ ९६ ॥ भजन करितां सप्रेम रंग । स्वयें आपणाचि जाहला पांडुरंग । मग त्याचे केले दोन भाग । भक्ति सुख निजांगें भोगीतसे ॥ ९७ ॥ एकचि देव असतां निश्चित । मग कोणाची धरावी आर्ती । फळांच्या राशी पडिल्या क्षितीं । परी सेवणारा त्यांजप्रती एक व्हावा ॥ ९८ ॥ आरसा निर्मळ असतां जाणा । परी तयासि दुसरा पाहिजे देखणा । कां पुष्पाचें मकरंद नाना । एक घ्राणाविण व्यर्थ ॥ ९९ ॥ तैशाच रीतीं भक्ताविण । देवाचें ऐश्वर्य जाणेल कोण । म्हणवोनि आपुलेंच भजन करिती आपण । विभाग दोन करूनियां ॥ २०० ॥ मुक्तीवरील चौथी भक्ती । बोलिली असे श्रीभागवतीं । तें साच दाखवावया निश्चिती । तुकाराम क्षितीं[1] अवतरला ॥१॥ ज्याणें करोनि कीर्तन गजर । कळिकाळ हा जिंतीला दुर्धर । म्हणवोनि काया जाहली अमर । ब्रह्मरूप समग्र अंग झालें ॥ २ ॥ उदंड सत्पुरुष जाहले महीं । परी शरीर येथेंचि ठेविलें तिहीं । तुका ब्रह्मरूप असोनि देहीं । हेचि नवायीं अगाध ॥ ३ ॥ पुढिले अध्यायीं कथा गोमटी । जो दीन दयाळ जगजेठी । तो तुकयासि येऊनि उठाउठी । नेईल वैकुंठी निजलीले ॥ ४ ॥ जो अच्युतानंद आनंद कंद । लीलाविग्रही सच्चिदानंद । तो महीपतीसि देऊनि अभय वरद । वदवी स्वच्छंदें भक्तकथा ॥ ५ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । एकोणचाळिसावा अध्याय गोड हा ॥ २०६ ॥ ॥ ओ० ॥ २०६ ॥

१ पृथ्वीवर.



अध्याय ४०
तुकाराम

श्रीगणेशाय नमः ॥ सरितां कोरड्या करोनि समस्त । त्याही भरिजेतील अमृतें । परी देवभक्तांचीं चरित्रें । यांचा अंत कळेना ॥ १ ॥ पृथ्वीवरील तृणांचे मोड । यांची गणती होईल कोडें । परी वैकुंठपतीचे गुण अवघड । वर्णितां वेडें मन होय ॥ २ ॥ सांगडी वांचोनि पोह्णार । पावेल उदधीचा पैलपार । परी क्षीराब्धिजावराची सत्कीर्ति थोर । नये साचार वर्णिता ॥३॥ का प्रभंजनाची मोट वांधोनी । तेही ठेविजेल आपुलें सदनीं । परी तुझे पवाडे सारंगपाणी । वर्णितां वाणी कुंठित ॥ ४ ॥ अठराही भार वनस्पती । यांच्या पत्रांची होईल गणती । परी तुझे पंवाडे वैकुंठपती । वर्णितां मती पुरेना ॥ ५ ॥ हव्यास धरोनि महाकवी । कीर्ति वर्णिती शेषशायी । परी तुझी महिमा जे आघवी । कळलीच नाहीं तयांस ॥ ६ ॥ वेद शास्त्रें आणि पुराणें । अखंडीत गाती तुझे गुण । परी ऐसाचि आहेसि म्हणवोन । निश्चय कोणें न केला ॥ ७ ॥ अवघेच आपुलालिया मतीं । तुझी अखंड करिती स्तुती । त्यांत एक मूढ महीपती । असोंदे श्रीपती तुज ठावे ॥८॥ रान पाल्याच्या करोनि माळा । गोपाळ घालिती तुझिया गळा । त्यांची देखोन सप्रेमकळा । मिरविशी घननीळा तें लेणें ॥ ९ ॥ तैशाच रीतीं श्रीहरी । हीं आरुष वचनें अंगीकारी । तेणें श्रोतयांचे अंतरीं । प्रेम लहरी कोंदाटे ॥१०॥ तुवां अघटित केलें पंढरीराया । सप्रेम भाव देऊनि तुकया । कळिकाळ त्याचा निवारुनियां । केली काया ब्रह्मरूप ॥११॥ जगदुद्धार व्हावयासि देखा । मृत्युलोकीं पाठविला भक्त सखा । त्यासि आपुले साम्यतेसि आणूनि देखा । देवा भक्तसुखा भोगिसी तूं ॥ १२ ॥ मागील अध्यायीं चरित्रें बरी । तुकयासि जातां अळंकापुरीं । पक्षी बैसले अंगावरी । अघटित परी हें दिसे ॥ १३ ॥ मग चिंचवडी देवांसि होता श्रुत । त्याणीं तुकयासि पाचारिलें त्वरित । तेव्हां मांडी चिरोनि वैष्णव भक्तें । कापूस आंत दाखविला ॥ १४ ॥ अस्थिमांस रुधिर जाण । हें कांहींच न दिसे त्यांजकारणें । म्हणती मनुष्य न म्हणावें याजकारणें । परब्रह्म सगुण दिसताहे ॥१५॥ मग परम विस्मित होऊनि पाहे । तुकयासि पुसिलें लवलाहे । म्हणती पंच भूतांचा तों झाला लय । तरी दिसतसे काय दृष्टीसीं ॥१६॥ ऐसा संशय वाटतसे चित्तां । तरी कृपा करोनि सांगिजे आतां । मग एक अभंग बोलिले तत्वतां । तों ग्रंथ आतां लिहितों मी ॥१७॥ अभंग ॥ अणुरेणुहूनी थोकडा । तुका आकाशा येव्हडा ॥१॥ गिळूनि सांडिले कलेवर । भव भ्रमाचा आकार ॥२॥ गिळूनि सांडीली त्रिपुटी । दीप उजाळिला घटीं ॥३॥ तुका म्हणे आतां । उरलों उपकारा पुरता ॥४॥ ओव्या ऐसें म्हणतां वैष्णव भक्त । देव समजले चित्तांत । म्हणती मनुष्य न म्हणावें यातें । परब्रह्म साक्षात दिसताहे ॥ १८ ॥ अनंत जन्मींचे सुकृत । पदरीं होतें सुनिश्चित । यास्तव तुकयाचें साक्षात । दर्शन होत आपणासी ॥१९॥ ऐशापरी करोनि स्तुती । वैष्णवभक्तासि नमस्कार करिती । ते स्थळीं क्रमोनि एक राती । देहुग्रामा प्रती मग आले ॥२०॥ यावरी वैकुंठवासी श्रीहरी । निजभक्तासी विचार करी । तुकया वांचोनियां अवसरीं । मज निर्धारी कंठेना ॥२१॥ विश्वोद्धार करावया निश्चित । मृत्यलोकीं

१ नद्या.

पाठविलें त्यातें । कीर्तन करितो दिवसरात । सगुणीं प्रीत लावोनियां ॥ २२ ॥ माझ्या नामाच्या प्रतापें निश्चित । कळीकाळ जाहले त्याचें अंकित । आतां कोण आणील त्यातें । ऐसें पुसत जगदात्मा ॥ २३ ॥ काळाची सत्ता अणुमात्र । न चलेच कांहीं तयावर । मृत्युलोकीं राहावें निरंतर । ऐसेंचि अंतर तुकयाचें ॥ २४ ॥ आपुल्या निजधामासि यावया पाहीं । ऐसें मनोगत तयाचें नाहीं । काळाची सत्ता त्याजवर नाहीं । तरी उपाय कांहीं योजावा ॥ २५ ॥ ऐसें पुसतां लक्ष्मीपती । तेव्हां सकळ भक्त पायीं लागती । हात जोडोनियां निश्चिती । विचार सांगती श्रीहरीतें ॥२६॥ म्हणती मृत्युलोकापासूनि जाण । जेणें तुकयाचें विटेल मन। ऐसा उपद्रव कांहीं दाखवून । घेऊन येणें ये स्थळीं ॥ २७ ॥ ऐसा विचार सांगतां भक्ती । अवश्य म्हणतसे वैकुंठपती । म्हणे जेथें तुकयाची जडली प्रीती । तेथें उपद्रव निश्चितीं करावा ॥ २८ ॥ लोहगांवींचे द्विजवर । स्त्रिया शूद्र लहान थोर ।कीर्तन ऐकती दिवसरात्र। सप्रेम अंतर करूनियां॥२९॥ तरी काळांतरें करूनि त्यांसी । अवघेच करावें वैकुंठवासी । मन विटवावें प्रपंचासी । तेव्हां माझिया पदासि पावतील ॥ ३० ॥ तुकयाची सेवा करितां जाण । अवघेचि जाहले संपत्तिवान । प्रपंचीं विटवावें त्याचें मन । जगज्जीवन चिंतित असे ॥ ३१ ॥ तों इकडे देहुगावींहूनि लोहगावकर । तुकयासि घेऊनि गेले सत्वर । एकमास पर्यंत जाण साचार । कीर्तन गजर होतसे ॥३२॥ तो श्रीहरि इच्छेनें तत्त्वतां । परचक्रें लुटोनि नेली संपदा । जयांसि बोध ठसावला होता । ते हळहळ सर्वथा न करिती ॥ ३३ ॥ प्रपंच परमार्थी ज्यांचें चित्त । ते तरी उद्विग्न दिवसरात । म्हणती परचक्रें हरिली संपत । कैसी मात करावी ॥३४॥ तये समयीं वैष्णवभक्त । स्वमुखें तयांसि उपदेशीत । त्रितापांचें आवर्त । यांची खंत न करावी ॥ ३५ ॥ होणारे तेंचि झालें आतां । याची हळहळ कासया वृथा । आपुला देह नव्हे तत्त्वतां । धन संपदा धरूं कोणाची ॥ ३६ ॥ ॥ अभंग ॥ गेलियाची हळहळ कोणी । नका मनीं धरूं कांहीं ॥ १ ॥ पावलें तें म्हणों देवा । सहज सेवाया नाव ॥ २ ॥ जळतां आंगीं पडतां खाण । नारायण भोगिता ॥ ३ ॥ तुका म्हणे नलगे मोल । देवा बोले आवडती ॥ ४ ॥ ॥ ओव्या ॥ ऐशा परी वैष्णवभक्त । स्वमुखें अभंग बोलिले तेथे । सवेंचि म्हणे पांडुरंगातें । आतां वैकुंठाप्रती मज नेयीं ॥ ३७ ॥ मृत्यूलोकीं ठेविशील मजकारणें । तरी असो निजक्ताची आण । ऐसें उदास बोलोनि वचन । आले परतोन देहूसी ॥ ३८ ॥ लोहगांवींच्या लोकांप्रती । आधींच तुकयाची होती आर्ती । परचक्रें नेतां धन संपत्ती । मग वैराग चित्तीं उपजलें ॥ ३९ ॥ म्हणती गेली तरी संपदा जावो । नश्वर संसार अवघा वावो । कीर्तनाचा घ्यावया लाहो । देहूगांवीं पाहावो ते येती ॥ ४० ॥ आणिक गांवोगांवींचे जन । दुरोनि येती घ्यावया दर्शन । तुकयाचें ऐकतांचि कीर्तन । तटस्थ होऊन राहती ॥ ४१ ॥ दिंडयापताका नानारीतीं । टाळ विणें मृदुंग वाजती । चौदा ध्रुपदी मागें असती । गाऊं लागती निजप्रेमें ॥ ४२ ॥ प्रासादिक अभंग

नित्य नूतन । ऐशारीतीं होतसे कीर्तन । काय निघेल मुखातून । इच्छिती श्रवण सर्वांचे ॥ ४३ ॥ इकडे वैकुंठपती श्रीहरी । लक्ष्मीपती विचार करी । आतां मृत्यूलोकासि जाऊनि निर्धारीं । तुकयासि सत्वरी आणावें ॥ ४४ ॥ तों इंदिरा म्हणे देवाधिदेवा । पार्षदां हातीं विमान पाठवा । तुका दिव्य देही करोनि बरवा । येथें आणावावा त्यां हातीं ॥ ४५ ॥ समुद्रतनया सांगतां ऐसें । काय म्हणतसे आदि पुरुष । देहासहित तुकयास । आणावें ऐसें मजवाटे ॥४६॥ येच विषयीं तुज आतां । एक सांगतों पुरातन कथा । कृष्ण अवतारीं निजधामासि येतां । तेव्हां उद्धव परता न होय ॥ ४७ ॥ त्याचीं सगुणीं जडली प्रीती । यास्तव बहुत करीतसे खंती । मग म्यां उपदेशुनियां भागवतीं । बदरिकाश्रमाप्रती पाठविलें ॥ ४८ ॥ मग निजधामासि येतां आम्हांतें । मागें कलीनें लोक पीडिले बहुत । दुरितें आचरती समस्त । भक्ति पंथ लोपला ॥४९॥ राहिले सत्कर्म आचार । राहिले यज्ञयाग साचार । भागवत धर्म लोपले समग्र । कोणीच परत्र न साधिती ॥ ५० ॥ मग आम्हीं आज्ञापिलें उद्धवा प्रतीं । तूं अवतार धरावा क्षितीं । गावोनि माझी सगुण कीर्ती । जगदुद्धार निश्चिती करावा ॥ ५१ ॥ तेव्हां तो बोलिला स्वमुखें मात । आतां गर्भवासासि कंटाळलें चित्त । मी न जाय मृत्युलोकांत । वैकुंठा प्रत सांडुनी ॥५२॥ ऐसी आळ घेतांचि जाण । ते म्यां पुरविलीं जगज्जीवनें । अयोनि संभव शिंपल्यांत घालोन । भीमरथी नेऊन सोडिला ॥ ५३ ॥ दामशेट शिंपी गोणाई कांता । ही पंढरीसि होती उभयतां । तेथें आमुची सेवा करितां । प्रसन्न तत्वतां त्यांसि झालों ॥ ५४ ॥ पुत्र मागतां मजकारण । मग दृष्टांतीं सांगीतलें जाऊन । उद्धव अवतार जाण । दीधला सगुण पुत्र तुम्हां ॥ ५५ ॥ स्नानासि जातां चंद्रभागेंत । वाहात येईल शिंपला निश्चित । त्यांत बाळतें घेऊनिवो सांगत । पाळावें त्वरित निजलोभें ॥ ५६ ॥ ऐसें स्वप्न देखोनीं दृष्टीं । चित्तीं हर्षला दामशेटीं । मज आठवोनी हृदय संपुटीं । चंद्रभागेतटीं बैसला ॥ ५७ ॥ तो उद्धव अवतार साक्षात । वाहात आला शिंपल्यांत । वोटींत घेऊनि त्वरित । निजमंदिरांत प्रवेशला ॥ ५८ ॥ कांतेसि म्हणे ते समयीं । प्रसन्न होऊनि शेषशायी । सगुण पुत्र दीधला पाहीं । तरी वोसंगा घेई आपुल्या ॥ ५९ ॥ दामशेटीची ऐकोनि वाणी । गोणाईस पान्हा दाटला स्तनीं । निजपुत्रासि आडवें घेऊनि । पाजीत जननी तेधवां ॥ ६० ॥ बारा दिवस लोटतां निश्चित । नामदेव नाम ठेविलें त्यांतें । सातवें वर्ष लागतां त्वरित । नैवेद्य देवळांत आणिला ॥ ६१ ॥ मी पुंडलीकाची देखोनि प्रीती । पांडुरंग अवतार घेतला क्षितीं । लोकांसि दिसे पाषाण मूर्ती । परी नामयासी प्रीती जडली असे ॥ ६२ ॥ नैवेद्य जेवीं म्हणतां जाण । अश्रुपातें भरलें लोचन । मग आम्हीं जेविलों निजप्रीतीनें । नैवेद्यासि अन्न आणिलें ॥६३॥ साता वरुषांत येतां निश्चिती । नामयानें बोलविली पाषाण मूर्ती । आणिक चरित्रें नानारीतीं । तीं संकळित तुजप्रती सांगतों ॥ ६४ ॥ ज्ञानदेवें

१ सेवक. २ लक्ष्मी.

मागोनि मजपासीं । तीर्थासि नेलें नामयासी । माझा वियोग न साहवे तयासि । उकसा बुकसीं स्फुदंत ॥ ६५ ॥ अविंधें उपद्रव केला फार । गाय वधिली नामयासमोर । मग सप्रेमें धांवा करितां थोर । तेव्हां पावलों सत्वर तयासी ॥ ६६ ॥ धेनु जीववोनि क्षणमात्रें । नामयासि आश्वासि लेंकरें । परतोनि येतां वैष्णववीर । मारवाडांत चरित्र एक झालें ॥ ६७ ॥ नामा ज्ञानदेव निश्चित । उभयतां जाहलें तृषाक्रांत । मग घुंगुरुट होऊनि योगिनाथ । जीवन सेवितां तेधवां ॥ ६८ ॥ नामयासि नयेचि ते युक्ती । मग माझा धांवा करितसे प्रीती । तेव्हां कौतुक दाविलें कैशारीतीं । तेही तुजप्रती सांगतो ॥६९॥ कूपांतील खोल होते पाणी । तें उचंबळोनि आलें तये क्षणीं । हें ज्ञानदेवें दृष्टीसी देखोनि । लागला चरणीं नामयाच्या ॥ ७० ॥ आंवढ्या नागनाथीं नामयानें । शिवरात्रीं मांडिलें हरिकीर्तन । श्रवणासि मिळाले बहुतजन । म्हणवोनि ब्राह्मण शोभले ॥७१॥ नामयासि म्हणती तत्त्वतां । देवालया मागें करावी कथा । ऐसी ऐकोनि विप्रवार्ता। विक्षेप चित्ता वाटला ॥७२॥ विष्णुदास उद्विग्न होऊनि पाहे । शिवालया मागें उभा राहे । म्यां पाषाण देऊळ फिरविलें पाहें । अद्यापि आहे तैसेचि तें ॥७३॥ घरीं नसतां अन्नवस्त्र । राजाई कष्टी होतसे थोर । मग म्यां होन दीधले गोणीभर । ते लुटविलें सत्वर नामयानें ॥७४॥ एकदा नामा करितां कीर्तन । संतां देखतां बोलिला पण । कीं शतकोटि अभंग प्राकृत करीन । मग प्रासादिक वचन बोलत ॥ ७५ ॥ ज्या ज्या देशीं जातसे तीर्था । तिकडे तैशीच केली कविता । ज्याच्या शब्दांची गणती घेता । नाहीं सर्वथा मजविण ॥ ७६ ॥ चाळीस लक्ष चौऱ्हयांणव कोटि । नवलक्ष ललित असे शेवटीं । परी आणिलाच नाहीं वैकुंठीं । काळाची दृष्टीं न पडतां ॥७७॥ शत कोटीचा पण राहिला निका । यास्तव नामयाचा अवतार तुका । त्याणें ब्रह्मरूपकाया केली देखा । नामसंकीर्तन सुखा भोगितसे॥७८॥ मी पूर्वीं उद्धवासि बोलिलों निश्चित । कीं अवतार घेयीं मृत्युलोकांत । जन्म मरण सर्वथा नसेचि तूतें । तो सत्यवचनार्थ करावा ॥७९॥ पहिल्या अवतारीं शिंपल्यांत । अयोनिसंभव नामा होत । आतां तुकयासि आणावें देहासहित । काळाचा आघात चुकवोनि ॥८०॥ ऐसें निजभक्तां सन्निध निश्चितीं । लक्ष्मीसि सांगे वैकुंठपती । मग जयजयकारें वैष्णव गर्जती । आनंद चित्तीं न समाये ॥८१॥ दिव्य विमानीं तये वेळीं । बैसोनि उतरले भूमंडळी । निजभक्तांसहित वनमाळी । देहु क्षेत्राजवळी पातले ॥ ८२ ॥ तुकयासि भेटोनि जगज्जीवन । हृदयीं धरिलें निजप्रीतीनें । म्हणती तुजवाचोनि आम्हां कारणें । वैकुंठभुवन वोस दिसे ॥ ८२ ॥ तुवां कीर्तन घोष करूनि बरवा । सत्कीर्ति केली भक्त वैष्णवा । हाच तरणोपाय सकळ जीवा । साधनारंभ करावा नलगेची ॥ ८४ ॥ फाल्गुन शुद्ध एकादशी । न्यावयासि आले वैकुंठवासी । तंव रुक्मिणी लागतसे चरणासी । म्हणे विनंती पायांसी एक असे ॥ ८५ ॥ इंद्रायणीचे तीरीं जाण । आणावी वैकुंठींची रचना । तुकयासि येथें द्यावें भोजन । निजभक्त जनां समवेत ॥ ८६ ॥ जेवीं ज्ञानदेवाचे समाधि बळें । नामयानें अघटित घेतली आळ । मग दाखविले

अभिनव सोहळे । तैसेंचि ये वेळे करावे ॥८७॥ हें इंदिरेचें मनोगत जाणोन । अवश्य म्हणे जगज्जीवन । मग योगमायेचें करोनि चिंतन । अद्भुत विंदानं दाखविलें ॥८८॥ विश्वकर्मा येऊनि सत्वर । मायेचें निर्मिलें वैकुंठपुर । अष्टसिद्धि जोडोनि कर । साहित्यासि निरंतर तिष्ठती ॥८९॥ मोतियांचे चौरंगमाळा । अभिनव तेथें मांडिला सोहळा । सुरवर येऊनि तयेवेळां । कौतुक डोळां पाहती ॥९०॥ गोपाळ नाचती बागडी । आनंद करिती कडोविकडी । त्यास प्रेमसुखाची गोडी । अनुभवें फुडी कळों येत ॥ ९१ ॥ हें सुखदृष्टीसी देखोन । राहिलें योगियांचे ध्यान । आंवरूनिया मुद्रासन । रूप सगुण विलोकिती ॥९२॥ म्हणती धन्य तुकयाचा प्रेमा । स्वाधीन केलें पुरुषोत्तमा । त्याचा पार न कळेचि निगमा । त्या आत्मयारामा भुलविलें ॥९३॥ उद्धव अक्रूर अंबऋषी । जे दिव्यदेही वैकुंठवासी । तेही आले त्या स्थळासी । तुकयाचे पंक्ती बैसावया ॥९४॥ सिद्ध सनकादिक थोर । नारद तुंबरु शुक योगींद्र । एके पंक्तीसि सारंगधरें । बैसविलें साचार तयांसि ॥९५॥ निजभक्तांची करावया पूजा । उल्हास वाटे गरुडध्वजा । सर्वोपचारें आणोनि वोजा । भक्ताचिया काजा सादर ॥ ९६ ॥ गंधाक्षता दिव्य सुमनें । भक्तांसि पूजीत जगज्जीवन । लक्ष्मी वाढितसे दिव्य अन्न । जें ब्रह्मादि सुरगण इच्छिती ॥ ९७ ॥ संकल्प सोडितां जगन्नाथ । ब्रह्मरसें तृप्त जाहलें संत । करशुद्धि घेतांचि निश्चित । तांबूल अर्पित निजहस्तें ॥९८॥ विबुध येऊनि कौतुकें । पुष्प वर्षाव करिती देख । म्हणती धन्य हा मृत्युलोक । येथें वैकुंठनायक उतरला ॥९९॥ एकादशी पासोनि निश्चित । ऐसा पांच दिवस सोहळा होत । परी हें एक तुकयावांचोनि सत्य । नाहीं श्रुत कवणासी ॥ १०० ॥ अवघे होऊनि एकाग्र चित्त । तुकयाचें कीर्तन ऐकती नित्य । परी देवाच्या लीला अघटित । नाहीं विदित तयांसी ॥१॥ शिमागियाचा वरिष्ठ सण म्हणती । परी कोणी न खेळे धूळमाती । नटनाट्य सोंगें न आणिती । वैराग्य चित्तीं बाणलें ॥२॥ चित्तीं सत्य भासलें एक ॥ तयासि असत्य नावडेचि देख । अवघेच भाविक प्रेमळ लोक । कीर्तन सुखें ऐकती ॥३॥ शांति विरक्ति बाणली तयां । सार्वभूतीं करिती दया । सप्रेम भजती पंढरीराया । जगद्गुरु तुकयाचे नियोगें ॥४॥ तुका नामयाचा अवतार । प्रख्यात जाहला पृथ्वीवर । दर्शनासि येती नारी नर । यात्रा फार भरे तेथें ॥५॥ जगदुद्धार व्हावया लागोनी । अवतरला भक्त शिरोमणी । धन्य तें तीर इंद्रायणी । देहु धरणी पुण्य क्षेत्र ॥ ६ ॥ भक्तां पासीं वसतसे देव । देवाचे पायीं तीर्थें सर्व । तीर्थांपासीं भक्त वैष्णव । सर्वदा पाहाहो नांदती ॥ ७ ॥ याहूनि पुण्यक्षेत्र थोर नाहीं । ऐसाचि निश्चय माझे जीवीं । तेथें तुकयाचे भक्तीस्तव पाहीं । शेषशायी पातले ॥८॥ असो हुताशनी जाहलिया निश्चिती । फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या रातीं । तुकयासि म्हणे वैकुंठपती । माझी वचनोक्ती ऐक एक ॥ ९ ॥ आजचे रात्रीं चारीप्रहर । आनंदें करावा कीर्तनगजर । मग चलावें आम्हाबरोबर । वैकुंठपुर पाहावया ॥११०॥ ऐसें बोलोनि भक्तसखा । निज लोभें हृदयीं धरिला तुका । म्हणे तुझी सत्कीर्ति ऐकतां देखा । उद्धार लोकां होईल ॥ ११ ॥ अनंत अवतार थोर विभूती ।

१ आश्चर्य.

असंख्य आहेति त्रिजगतीं । परी माझे साम्यतेसि यावया क्षितीं । तुजवांण निश्चिती दिसेना ॥ १२ ॥ तुवां शरीर प्राणांचें जाण । मजलागीं दीधलें बळीदान । कामक्रोध बंदीं घालोन । चंचळ मन आवरिलें ॥ १३ ॥ आत्मपद प्राप्त झालियावरी । तेही स्थिती सांडिली दुरी । राखोनि देव भक्तपणाची उरी । भजनीं बरीं प्रीति धरिसी ॥ १४ ॥ तूं अवतार अवतारींचा निश्चिती । जिवलग मित्र सांगाती । उतरायी व्हावें कवणें रीतीं । तो पदार्थ मजप्रती दिसेना ॥ १५ ॥ आम्हीं महासिद्धि पुढें करितां । तुवां तयासि हाणितल्या लाता । मुक्ति न घेसी सायुज्यता । यासि मी आतां काय करूं ॥ १६ ॥ मागें भक्त जाहले थोर । पुढेंहीं भविष्य होणार । परी तुजऐसें निरपेक्ष अंतर । न दिसे साचार कवणाचें ॥ १७ ॥ आतां देहासहित वैकुंठभुवनीं । उदईक नेतों तुजलागुनी । ऐसें बोलतां चक्रपाणी । तुका चरणीं लोळतसे ॥ १८ ॥ म्हणे देवा एक मात । वैकुंठीं एकदेशी करिशील निश्चित । कीर्तन करावें दिवसरात । ऐसा हेत चित्तांतरीं ॥ १९ ॥ एथें भूवैकुंठ महीवर । विख्यात असतां पंढरपुर । कासया नेतोसि दुरिच्यादुर । मी नयें साचार तयेठायीं ॥ १२० ॥ जाणोनि तुक्याचें अंतर । पुढती बोले करुणाकर । एकदा चलावे तेथवर । तेणेंचि सत्कीर्ति थोर प्रगटेल ॥ २१ ॥ माझें ऐश्वर्य क्षीरसागरीं । तेंही दाखवितों ये अवसरीं । जैसा मी व्यापक चराचरीं । तैसीच परी तुझी असे ॥ २२ ॥ ये लोकीं निरंतर असतां । तरी लोकांची पूर्ण न बैसेल आस्था । यालागीं आग्रह सांडूनि तत्त्वतां । चाल भक्तनाथा सत्वर ॥ २३ ॥ ऐसें विनवितां पांडुरंग । तुकयासि वचन मानलें मग । कीर्तनासि प्रारंभ केला आंगें । टाळ मृदंग वाजती ॥ २४ ॥ विठ्ठल नाम तये वेळीं । जयजयकारें पिटिली टाळी । घोष न समाये निराळीं । कीर्तन कल्लोळीं गर्जतां ॥२५॥ सप्रेम भजनाचेनि रसें । देहभान नाठवे कोणास । नाद ब्रह्मचि वोतलें मुसें । एकाग्र मानस श्रोतयांचें ॥ २६ ॥ मग स्वमुखें अभंग ते समयीं । तुकाराम वदले कांहीं । ते ग्रंथीं साहित्यासि लिहितों पाहीं । संशय कांहीं न धरावा ॥ २७ ॥ अभंग ॥ ॥ घोंटवीन लाळ ब्रह्मज्ञान्या हातीं । मुक्तां आत्मास्थिती सांडवीन ॥ १ ॥ ब्रह्मरूप काया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देव केला ॥ २ ॥ सांडवीन तपोनिधी अभिमान । यज्ञ आणि दानें लाजवीन ॥ ३ ॥ तीर्थ भ्रामकांसी आणीन आळस । कडु स्वर्गवास करीन भोगें ॥ ४ ॥ धन्य म्हणवीन इहलोकींच्या लोकां । भाग्यें आम्हीं तुका देखीयेला ॥ ५ ॥ ॥ १ ॥ मरणा हातीं सुटली काया । विचारेया निश्चयें ॥ १ ॥ नासोनीयां गेली खंती । सहज स्थिती भोगाची ॥ २ ॥ न देखेसे झाले श्रम । आलें वर्म हातासी ॥ ३ ॥ तुका म्हणे कैंची कींव । कोठें जीव निराळा ॥ ४ ॥ ॥ २ ॥ प्रेतरूप झाला शरीराचा भाव । लक्षीयेला ठाव स्मशानींचा ॥ १ ॥ रडती रात्रंदिवस काम क्रोध माया । म्हणती हाया हाया नेम धर्म ॥ २ ॥ वैराग्याच्या शेणी शरीरीं लाविल्या । ब्रह्माग्न चेतविला ब्रह्मत्वासी ॥ ३ ॥ फिरविला घट फोडीला चरणी । महावाक्यध्वनी बोंब झाली ॥ ४ ॥

तिळांजळी दीली कुळनामरूपांसी । ज्याचें शरीर अर्पियेलें ॥ ५ ॥ तुका म्हणे रक्षा झाली आपोआप । उजळला दीप पांडुरंगा ॥ ६ ॥ आपुलें मरण म्यां पाहिलें डोळा । तों जाहला सोहळा अनूपम ॥ १ ॥ आनंद भरला तिन्ही त्रिभुवनीं । सर्वातमकपणीं भोग झाला ॥ २ ॥ एक देशीं होतों अहंकारें आधीला । त्याच्या त्यागें झाला सुकाळ हा ॥ ३ ॥ फीटले सूतक या जन्ममरणांचें । मी माझ्या संकोचें दुरीं झालों ॥ ४ ॥ नारायणें दीला वस्तीसी पैं ठाव । धरोनीयां भाव ठेलोंपायीं ॥ ५ ॥ तुका म्हणे दीलें ऊमटलें जगीं । घेतलें तें अंगीं लाऊनीयां ॥ ६ ॥ ॥ ४ ॥ ॥ ओव्या ॥ ऐसें तुकयाचे सिद्धांत वचन । ऐकोनि श्रोते विस्मित मन । विमानारूढ विवुध होऊन । सप्रेम कीर्तन ऐकती ॥२८॥ कपिल मुनि ऐसें केवळ । ब्रह्मज्ञानाचेनि खळ पुतळे । तुक्याचें कीर्तन ऐकतां प्रेमळ । तेही लाळ घोंटिती ॥ २९ ॥ म्हणे शब्दजाळ सांडोनि जाण । निश्चळ एकाग्र आसिजे मन । सर्वदा ऐकावें हेंचि कीर्तन । तरीच धन्य संसारीं ॥ १३० ॥ जो तिहीं देवांचा अवतार आहे । जीवनमुक्त जगद्गुरु दत्तात्रेय । तोहीं आत्मस्थिति सांडोनि पाहे । कीर्तनीं राहे सादर ॥ ३१ ॥ तपोनिधियांत श्रेष्ठ पाहीं । शंकरावांचूनि दुसरा नाहीं । तोही शिवपण विसरोनि सर्वही । कीर्तन लवलाही ऐकत ॥ ३२ ॥ जे यज्ञ दानें करोनि भले । स्वर्ग सुख भोगीत बैसले । तैही कीर्तन ऐकतां समजले । मग लज्जित जाहलें अंतरीं ॥ ३३ ॥ गुरूसि पुरंदर म्हणतसे । मन विटलें स्वर्ग सुखास । मृत्युलोकी राहूनि बहुत दिवस । कीर्तनरस सेवावा ॥ ३४ ॥ वायुवेग भ्रमणा ज्याचीं । तीर्थे पाहिलीं तिहीं लोकींची । तेही तुकयाचे कीर्तनाची । सेविती रुची प्रीतीनें ॥३५॥ म्हणती नामसंकीर्तन करोनियां । त्याणें ब्रह्मरूप केली काया । धन्य धन्य वैष्णव तुकया । पंढरीराया वश्य केलें ॥३६॥ स्वर्गस्थ सनकादि निश्चिती । ऐशा वचनें करिती स्तुती । श्रोतयांची सकळ वेधली वृत्ती । धन्य भाग्य म्हणती आमुचें ॥ ३७ ॥ अनंतां जन्मींचें सात्विक पुण्य । आपुले गांठीसि होतें जाण । यास्तव तुकयाचें झालें दर्शन । बोलती सज्जन मृत्युलोकीं ॥३८॥ धन्य आमुचें भाग्य निश्चित । यास्तव देखिला वैष्णवभक्त । जो श्रुतिशास्त्रांचा मथितार्थ । तो प्रांजळ गुह्यार्थ ऐकतों ॥ ३९ ॥ श्रोतयांचें एकाग्र मन । सर्वांगाचे केलें कान । काय निघेल मुखांतून । तेथेंचि मन वेधलें ॥१४०॥ तुकाराम ते अवसरीं । सप्रेम गजरें कीर्तन करी । अभंग बोलिले कैशापरी । तो सादर चतुरीं परिसिजे ॥ ४१ ॥ अभंग । डोळे भरिलें रूपें । चित्त पायांच्या संकल्पें ॥१॥ अवघी घातली वांटणीं । प्रेम राहिलें कीर्तनीं ॥२॥ वाचा केली माप । राशी हरिनाम अमुप ॥ ३ ॥ भरोनियां घ्यावा भाग । तुका झाला पांडुरंग ॥ ४ ॥ ओव्या ॥ ऐशापरी किर्तन गजर । जाहला तेव्हां चारी प्रहर । उदयासि येतांचि दिनकर । मग रुक्मिणीवर ओवाळिला ॥ ४२ ॥ विठ्ठल नामाचेनि गजरें देखा । सप्रेम भावें नाचतसे तुका । देहभान नसे सकळ लोकां । नृत्य करितां सुखा भोगिती ॥ ४३ ॥ शेवटील अनुग्रह केला थोर । जयाचेनि होय जगदुद्धार । तेंही प्रासादिक ग्रंथीं लिहितों

अक्षर । तरी पाठांतर करावीं ॥ ४४ ॥ अभंग ॥ ऐका हो भाविक जन । कोण कोण व्हाल तें ॥ १ ॥ तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरावा ॥ २ ॥ नका पाहूं मतांतरें । बुडाल खरें येणेंची ॥ ३ ॥ कलीमाजी दास तुका । जातो लोकां सांगोनी ॥ ४ ॥ ॥ ओव्या ॥ इतुकीं अक्षरें बोलूनि जाण । विठ्ठल नामे केली गर्जना । मग तुकयासि म्हणे वैकुंठराणा । वैकुंठभुवना चाल आतां ॥ ४५ ॥ तुवां अवतार घेऊनि साचार । केला अवघा जगदुद्धार । आतां पाहावें वैकुंठपुर । पुष्पक थोर आणिलें ॥ ४६ ॥ ऐसें बोलतां जगजेठी । तुक्यानें चरणीं घातली मिठी । मग तेथूनि चालिले उठाउठी । सत्कीर्ति सृष्टी ठेवुनी ॥४७॥ तुकारामें ते अवसरीं । कांतेसि सांगोनि पाठविलें घरीं । आम्हीं जातसों वैकुंठपुरीं । परी बरोबरी तुम्हीं यावे ॥ ४८ ॥ मागे तुकयानें निज कांतेला । अकरा अभंग उपदेश केला । तयांमाजी शद्ध दिधला । तो सत्य केला पाहिजे ॥ ४९ ॥ यास्तव परलोकीं जातां निश्चितीं । बोलाविलें अवलीप्रती । उत्तर दिधलें कैशारीती । तें सादर संतीं ऐकीजे ॥ १५० ॥ मी पांचा महिन्यांची गरोदर । घरीं म्हैस दुभती थोर । पोरवाडा लहान लेंकुरें । मागें संसार कोण करी ॥ ५१ ॥ इतुका निरोप येतांचि तत्त्वतां । आश्चर्य वाटले वैष्णवभक्ता । म्हणे अझून घरची ममता । मायेची कथा अनिवार ॥ ५२ ॥ वैकुंठ बोला वैष्णवभक्त । परी जिजायी नयेचि सांगातें । तरी तिचाही अन्याय नसे यांत । पूर्वील प्रघात अवधारा ॥ ५३ ॥ मागें स्वच्छेनें वैष्णवभक्त । कोणत्याही क्षेत्रीं गमन करीत । जरी पुसिलें कोणी अकस्मात । तरी म्हणती आम्हीं वैकुंठाप्रत जातो ॥ ५४ ॥ यास्तव अवलीचा अन्याय नाहीं । म्हणे पिसा जातसेल कोणे गांवीं । यालागीं सांगूनि पाठविलें पाहीं । रिकामपण नाहीं यावया ॥ ५५ ॥ मग सभाग्य श्रोते हरी कीर्तनीं । तयांसि बोलिले निर्वाण वचनीं । आतां आम्हीं चालिलों वैकुंठभुवनीं । न येऊं परतोनी सर्वथा ॥ ५६ ॥ अभंग ॥ ॥ घरीची दारीची भजा पांडुरंगा । वडिलांसी सांगा दंडवत ॥ १ ॥ मधाचीया गोडी माशी घाली उडी । गेलीया ती घडी पुन्हां नये ॥ २ ॥ गंगेचा हा ओघ सागरासी गेला । मागें नाहीं आला कदाकाळीं ॥ ३ ॥ ऐसी या गोष्टीची वरी राखा सोय । गेला तुका नये परतोनी ॥ ४ ॥ ओव्या ॥ ऐशारीतीं बोलोनि उत्तर । देवासि केला नमस्कार । नामघोषे करोनि गजर । चालिले बाहेर ते समयीं ॥ ५७ ॥ सकळ श्रोतयांसि ते अवसरीं । प्रेम अवस्था दाटली अंतरीं । उदास वचन ऐकोनि सत्वरी । अश्रुपात नेत्रीं वाहाताती ॥ ५८ ॥ परी देहासीं जाती वैकुंठभुवन । ऐसा निश्चिय न कळेचि कवणा । गमन करिती तीर्थाटणा । ऐसी भावना सकळांची ॥ ५९ ॥ एकमेकांसी लोक बोलती । आमुचा उबग आला चित्तीं । चालिले हिमाचळ पर्वती । कैसी गती करावी ॥ १६० ॥ एक म्हणती तुकाराम । पाहावया चालिला बदरिकाश्रम । आपुले खोटें कर्म । भक्तीचें वर्म कळेना ॥ ६१ ॥ एक म्हणती तुकयाकारणें । वैराग्य जाहलें जैंपासुन । सकळ

गांवांसि नामाभिधान । वैकुंठभुवन एक म्हणे ॥ ६२ ॥ कोणी विचार करिती मानसीं । तुका जातसे वाराणसीं । आग्रह करोनि राहवावें त्यासी । सद्भावें पायांसी लागोनियां ॥ ६३ ॥ एक म्हणती रामेश्वर ब्राह्मण । पंडितां माजी वक्ता निपुण । तुकयासि तो राहवील विनीत होऊन । इतरांचें वचन न ऐकती ॥ ६४ ॥ कीर्तनांत बैसले नारीनर । ते ऐसेंचि बोलती परस्पर । तों तुकाराम करी कीर्तन गजर । देउळा बाहेर निघाले ॥ ६५ ॥ इंद्रायणी तीरीं येऊन । अभंग वदले प्रिती करून । तेही ग्रंथीं लिहितों जाण । करा श्रवण भाविकहो ॥ ६६ ॥ ॥ अभंग ॥ सर्व सुख आम्हीं सर्वकाळ । तोडियेलें जाळ मोहपाश ॥ १ ॥ याजसाठीं आम्हीं सांडिले भ्रतार । रतलों या पर पुरुषासीं ॥ २ ॥ तुका म्हणे आतां गर्भ नये धरूं । औषध करूं फळ नोहे ॥ ३ ॥ ॥ १ ॥ ॥ बहुतांच्या आम्ही न मीळों मतासी । कोण कैसी यासी भावनेच्या ॥ १ ॥ विचार करीतां वायां जाय वेळ । लटिकें तें मूळ फजीतीचें ॥ २ ॥ तुका म्हणें तुम्ही करा खटपट । नका जाऊं वाटे आमुचीया ॥ ३ ॥ ॥२॥ ॥ त्याचे सुख नाहीं आलें अनुभवा । कठीण हें जीवा तोंवरीच ॥ १ ॥ मागील्याचे दुःख लागों नेदी अंगा । अंतरही संगा होऊं नेंदी ॥ २ ॥ तुका म्हणे सर्व विर्ष्यी संपन्न । जाणती महिमान श्रुती ऐसें ॥ ३ ॥ वाळोजन मज म्हणोत सिंदळी । परी हा वनमाळी न विसंबे ॥ १ ॥ सांडोनि लौकीक जालीये उदास । नाहीं भय आस जीवित्वाची ॥ २ ॥ नायके वचन बोलतां या लोका । म्हणे झाले तुका हरिरत ॥ ३ ॥ ॥ ४ ॥ आधील्या भ्रतारा काम नोहे पुरा । मग व्यभिचारा टेंकलीसे ॥१॥ रात्रंदिवस मज पाहिजे जवळी । क्षण त्या वेगळी न गमे घडी ॥ २ ॥ नाम गोष्टी माझी सोय सांडा आतां । रतलें अनंत तुका म्हणे ॥ ३ ॥ ॥ ५ ॥ हाचि नेम आतां न फिरे माघारीं । बैसलें शेजारीं गोविंदाच्या ॥ १ ॥ घर रीघी झालें पट्टराणी बळें । वरीले सांवळें परब्रह्म ॥ २ ॥ बळीयाचा अंग संग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥ ३ ॥ हाचि नेम आतां माघारीं । बैसले शेजारी गोविंदाच्या ॥ १ ॥ घर रिघी झालें पट्टराणी बळे । वरीलें सांवळे परमब्रह्म ॥ २ ॥ बळीयाचा अंग संग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका म्हणे ॥३॥ ॥६॥ नाहीं माझें काम आतां तुम्हांसवें । होतें गुप्त ठावें केलें आतां। व्यभिचार माझा पडीला ठाऊका । न सरत लोकांमाजी झालों ॥२॥ न धरावा लोभ कांहीं माझेवीशीं । झालें देव पीसी तुका म्हणे ॥ ३ ॥ ॥ ७ ॥ विसरलें कूळ आपुला आचार । पति भावे दीर वरसोय ॥ १ ॥ सांडीला लौकीक लाज भय चिंता । रतलें अनंता चित्त माझें ॥२॥ मज आतां वायां आळवाल झणी ।तुकां म्हणे कांनी बहिरी झालें ॥ ३ ॥ ॥ ८ ॥ न देखें बोले नाईकें आणीक । बैसला तो एक हरीचित्तीं ॥ १ ॥ सासुरें माहेर मज आतां नाहीं । केलें एक दोहीं मिळोनियां ॥ २ ॥ आळ आला होता आम्ही भांडखोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥ ३ ॥ ॥ ९ ॥

दुजा असा बळी कोण आहे आतां । हरि या अनंता पासोनियां ॥ १ ॥ बळीयाचे आम्हीं झालो बळीवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हां जीवींच्या उदारा । झालों प्रीतीकरा गोविंदाच्या ॥ ३ ॥ ॥ १० ॥ क्षणभरही आम्हीं सोशिलें वाईट । साधीले अवीट निजसुख ॥ १ ॥ सांडी मांडी मागें केल्या भरोवरी । अधिकची परी दुःखाचिया ॥ २ ॥ तुका म्हणे जाणें येणें नाहीं आतां । राहिलें अनंताचिया पायीं ॥ ३ ॥ ॥ ११ ॥ आम्हीं आम्हां आतां वडील वाकुटीं । नाहीं पाठीं पोटीं कोणी दुजें ॥ १ ॥ फावला एकांत एकविध भाव । हरी आम्हा सवें सर्व भोगी ॥ २ ॥ तुका म्हणे अंग संग एके ठायीं । असो जेथें नाहीं कोणी दुजें ॥ ३ ॥ ॥ १२ ॥ एका जीवें आतां जिणें झालें देहीं । वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥ १ ॥ नारायणा आम्हां नाहीं वेगळीक । पूर्वील हे भाक सांभाळीली ॥ २ ॥ तुका म्हणे झालें सायासाचें फळ । टळलीं हे वेळ काळ दोन्हीं ॥ ३ ॥ ॥ १३ ॥ हसूं रुसूं आतां वाढवूं आवडी । अंतरींची गोडी अवीट ते ॥१॥ सेवा सुखें करूं आनंद वचन । आम्हीं नारायण एकाएकी ॥ २ ॥ तुका म्हणे आतां झालें उदासीन । आपुल्या आधीन केला पती ॥ ३ ॥ ॥ १४ ॥ मजसवें आतां येऊं नका कोणी । सासुरवासीणी बाईयानों ॥ १ ॥ न साहवे तुम्हां याजनाची कुट । बोलती वाईट वोखटें तें ॥ २ ॥ तुका म्हणे झालों उदास मोकळ्या । विचरों गोवळ्या सवें आम्हीं ॥ ३ ॥ ॥ १५ ॥ शिकविलें तुम्हीं तें राहे तोंवरी । मज आणि हरी वियोग जों ॥ १ ॥ प्रसंगें नाहीं या देहाची भावना । तेथें या वचना कोण मानी ॥ २ ॥ तुका म्हणे चित्तीं बैसला अनंत । दिसों नेदी नित्य अनित्य तें ॥ ३ ॥ ॥ १६ ॥ सांगतों तें तुम्हीं ऐकावें हें कानीं । आमुचें नाचणीं नाचूं नका ॥ जोंवरी तुम्हां मागिल्याची आस । तोंवरी उदास होऊं नये ॥ २ ॥ तुका म्हणे काय वायावीण धिग । पतीना गोविंद दोन्ही ठाय ॥ ३ ॥ ॥ १७ ॥ आज वरी तुम्हां आम्हां नेणतपणें । कौतुक खेळणें संग होता ॥ १ ॥ आतां अनावर झालें अवगुणाची । करूं नये तेंची करीं सुखें ॥ २ ॥ तुका म्हणे कूळां बुडविलीं दोन्हीं । कुळें एक मनीं नारायण ॥ ३ ॥ ॥ १८ ॥ सासुरीया वीट आलासे अंतरा । इकडे माहेरा स्वभावेंची ॥ १ ॥ सांडवर कोणी न धरीती हातीं । प्रारब्धाची गती भोगूं आतां ॥ २ ॥ न व्हावी ते झाली आमची भंडायी । तुका म्हणे कायी झालें आतां ॥ ३ ॥ ॥ १९ ॥ मरणाही आधीं राहीलों मरूनी । मग केलें मनीं होतें तैसें ॥ १ ॥ आता तुम्हीं पाहा आमुचें नवल । नका वेंचूं बोलवाया वीण ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्हीं भयाभीत नारी । कैसी सांग सरी तुम्हां आम्हां ॥ ३ ॥ ॥ २० ॥ परपुरुषाचें सुख व्हावें जरीं । उतरोनि करीं घ्यावें शीर ॥ १ ॥ संसारासि आग लाविजेल हातें । फिरोनि मागूतें पाहूं नये ॥ २ ॥ तुका म्हणे व्हावें तयापरी धीट । पतंग कां नीट दीपसोई ॥ ३ ॥

॥ २१ ॥ आयिकावें परी ऐसें नव्हे बायी । न सांडावी सोयी भ्रताराची ॥ १ ॥ नव्हे अराणुक लौकिकापासून । आपल्या आपुण गोविलें तें ॥ २ ॥ तुका म्हणे मन कराल कठीण । त्या या निवडून मजपासीं ॥ ३ ॥ ॥ २२ ॥ आहाच वाहाच अंतवर दोन्ही । न लगती गडणी ऐशा आम्हां ॥ १ ॥ भिऊं नये तेची भेडसावी कोणा । आवरोनि मना बंद द्यावा ॥ २ ॥ तुका म्हणे कांहीं अभ्यासा-वांचोनी । नव्हे ते करणी भलतीची ॥ ३ ॥ ॥ २३ ॥ न राहे रसनां[1] बोलतां आवडीं । पायीं दिली बूडी माझ्या मनें ॥ १ ॥ मानेल त्या तुम्हीं ऐकावें स्वभावें । मी तों माझ्या भावें अनुसरलें ॥ २ ॥ तुका म्हणे तुम्हीं फिरावें बहूती । माझी तो हे गती झाली आतां ॥ ३ ॥ ॥ २४ ॥ न बोलतां तुम्हां कळो नये गुज । म्हणवोनी लाज सांडियेली ॥ १ ॥ आतां तुम्हां पुढें जोडितसें हात । नका कोणी अंत पाहूं माझा ॥ २ ॥ तुका म्हणे आम्हीं बैसलों शेजारी । करील ते हरी पाहूं आतां ॥ ३ ॥ ॥ २५ ॥ सकळही माझी बोळवण करा । परतोनि घरां जावें तुम्हीं ॥ १ ॥ कर्म धर्म तुम्हां असावें कल्याण । घ्या माझें वचन आशीर्वाद ॥२॥ वाढवोनीं दीलें एकाचिये हातीं । सकळ विश्रांती झाली तेथें ॥ ३ ॥ आतां मज जाणें प्राणनाथासवें । मी तों माझ्या भावें निरवोनीयां ॥ ४ ॥ वाढवितां लोभ होईल उशीर । अवघींच स्थीर असा ठायीं ॥ ५ ॥ धर्म अर्थ काम झाला एके ठायीं । मेळविलें तेंही हातोहातीं ॥ ६ ॥ तुका म्हणे आतां झाली हेचि भेटी । उरलीया गोष्टी बोलावया ॥ ७ ॥ ॥ २६ ॥ आम्ही जातों आतां कृपा असों द्यावी । सकळां सांगावी विनंति माझी ॥ १ ॥ वाडवेळ झाला उभा पांडुरंग । वैकुंठीं श्रीरंग बोलावितो ॥ २ ॥ अंतकाळीं विठो आम्हासी पावला । कुडी सहित झाला गुप्त तुका ॥ ३ ॥ ॥ २७ ॥ ओव्या ॥ इतुकें अभंग बोलतां उत्तर । तो अद्भुत कौतुक वर्तलें थोर । विमानारूढ होऊनि सुर । जयजयकार ते करिती ॥ ६७ ॥ परमानंद मानूनि चित्तीं । नारद तुंबर गायन करीती । सर्वे घेऊनियां पार्वती । कैलास-पती तो आला ॥ ६८ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र तिन्ही । कौतुक पाहताति विमानीं । अप्सरा गंधर्व गाती गाणीं । नाद गगनीं न समाये ॥ ६९ ॥ सिद्ध सनकादिक थोर । दत्तात्रेय कपिलादि ऋषीश्वर । यक्ष गुह्यक आणि किन्नर । पाहावया साचार ते आले ॥ १७० ॥ मागिले युगींचे थोर थोर भक्त । आणि कलियुगींचे अवघे संत । दिव्यदेही बैसूनि विमानांत । तुक्यातें लक्षित निजदृष्टीं ॥ ७१ ॥ तो चिंतनीं चिंतिता पंढरीराया । ब्रह्मरूप तुक्याची भासे काया । चैतन्य पुतळा दिसतसे तयां । निरसलें माया ओडंबर ॥ ७२ ॥ म्हणती नामधारक हा वैष्णववीर । घेऊनि मृत्युलोकीं अवतार । कीर्तन करूनि साचार । विश्वोद्धार पैं केला ॥ ७३ ॥ तंव पुरंदरासहित सुर । नामघोषें गर्जती थोर । पुष्पक प्रकाशें कोंदलें अंबर । तेजें दिनकर उणा दिसे ॥ ७४ ॥ तुक्या समागमे होते जन । प्रकाशें त्यांचे झांकले नयन । जैसी गगनीं दिसे सौदामिनं[2] । तेव्हां झांकती नयन सर्वांचे ॥ ७५ ॥ तेवीं विमानाप्रती । सकळांची लागलीं नेत्रपातीं ।

१ जीभ. २ वीज.

तेव्हां तुका बैसोनि विमानाप्रती । वैकुंठाप्रती चालिला ॥७६॥ भाविक प्रेमळ वैष्णव संत । तयासि निराळा पंथ दिसत । घंटानाद कोंदला गगनांत । गंधर्व गात नामघोषें ॥७७॥ पुष्पक होताचि दूर । लोक उघडोनि पाहती नेत्र । तों तुका न दिसे क्षितीवरं । तेव्हां शोक फार मग करिती ॥७८॥ म्हणती आमुच्या हातींचें भलें । देखत देखताचि रत्न गेलें । जिजाईसि सांगती मुलें । मग पिटीत वक्षस्थळ ते आली ॥ ७९ ॥ यात्रा मिळाली होती फार । आणि गावींचे नारीनर । इतुक्याचा उसळला शोक सागर । तो ग्रंथीं कोठवर ल्याहावा ॥१८०॥ जेवीं गोकुळांतूनि जातां कृष्णासी । शोक करिती व्रजवासी । तैसीच गति झाली त्यांसी । तुका दृष्टीसीं न पडतां ॥ ८१ ॥ दृष्टीसीं पाहावें सगुण रूपडें । सकळांच्या नेत्रांसि लागली चाड । भिरभिरा पाहती चहूंकडे । परि तुका न पडे दृष्टींसीं ॥ ८२ ॥ शके पंधराशें एकाहत्तर जाण । विरोधी संवत्सर नामाभिधान । फाल्गुन वद्य द्वितीया इंदुपूर्ण । आलासे दिन चार घटिका ॥८३॥ जगद्गुरु तुका वैष्णव भक्त । तये समयीं होतसे गुप्त । भाविक प्रेमळ वैष्णव भक्त । शोक बहुत ते करिती ॥ ८४ ॥ प्रयाण समयींचे अभंग निश्चित । गंगाजी मवाळे वाचितसे पोथी । अश्रुपातें शिंपिली क्षिती । प्रेम त्रिजगतीं न समाये ॥ ८५ ॥ अवली रडतसे ते समयीं । मजही बोलावूं पाठविले बायी । परी असत्य भासलें तें समयीं । यास्तव गृहीं राहिलें ॥८६॥ त्याच्या वैराग्य ज्वाळांच्या आहया । लागतां जळाली माझी काया । देखत देखताचि लवलाह्या । टाकोनियां गेला कीं ॥८७॥ निदान कळलें असतें जर । तरी धरोनि जातें त्याचा पदर । मी तरी गर्भिणी अज्ञान पोर । कुटुंब संसार कैशारीतीं ॥८८॥ ऐसें म्हणवोनि तयेक्षणी । मूर्च्छा येऊनि पडलीं धरणीं । महादेव विठोबा कुमर दोन्ही । रुदन ते क्षणीं करीताती ॥८९॥ परतोनि येईल वैष्णव भक्त । यास्तव लोक वाट पाहत । बैसले आस्तमान पर्यंत । मग गेले सदनांत आपुल्या ॥१९०॥ तुक्याच्या दर्शना लागोनी । यात्रा आली होती दुरोनी । तेही वोसरली तये क्षणीं । फांकली त्रिभुवनीं सत्कीर्ति ॥ ९१ ॥ देशोदेशीं फांकली मात । तुक्यासीं पावला पंढरीनाथ । वैकुंठासि नेलें देहासहित । नवल अद्भुत हें वाटे ॥ ९२ ॥ ज्यांनीं देखिलें ते यथार्थ म्हणती । विकल्पी ते असत्य मानिती । वैष्णवी मायेची अनिवार भ्रांती । सर्वांप्रती अनावर ॥ ९३ ॥ असो इकडे देहुग्रामात जाण । तुका पावला वैकुंठ भुवन । ते स्थळीं वैष्णव चौदाजण । निश्चयी धरून बैसले ॥ ९४ ॥ षट्शास्त्री ब्राह्मण रामेश्वर । आणि कान्हया तुक्याचा सहोदर । गंगाजी मावाळ कडुसकर । कोंडोबा विप्र लोहकऱ्या ॥ ९५ ॥ संताजी तेली जगनाड्या देख । जो तुक्यापासीं होता लेखक । नवजण वैष्णव होते आणिक । ज्यांणीं सद्विवेक गाजविला ॥ ९६ ॥ ऐसे असती चौदाजण । ते घरासि न जाती परतोन । म्हणती एकदां सद्गुरु दाखवी चरण । तरीच प्राण रक्षूं हा ॥ ९७ ॥ कान्हया तुक्याचा सहोदर । त्याणेंही शोक केला फार । अभंग बोलिला करुणास्वरें । ते ऐका सादर भाविक हो ॥ ९८ ॥ अभंग ॥ दुःखें दुभागलें हृदय संपुट । गंहीवरे

१ जमिनीवर.


कंठ दाटताहे ॥ १ ॥ ऐसें काय केलें सुमित्रा सखा या । दीधलें टाकूनियां वनामाजी ॥ २ ॥ आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनीं उलों पाहे ॥ ३ ॥ काय तें सामर्थ्य नव्हतें तुजपासीं । संगें न्यावयासी अंगभूतें ॥ ४ ॥ तुज ठावें आम्हां नाहीं कोणी सखा । उभयलोकीं तुका तुजवीण ॥ ५ ॥ कान्हा म्हणे तुझ्या वियोगें पोरटीं । झालों देरे भेटी बंधुराया ॥ ६ ॥ ॥ १ ॥ भुक्ति मुक्ति तुझें जळो ब्रह्मज्ञान । दे माझ्या आणून भावा वेगीं ॥ १ ॥ ऋद्धिसिद्धि मोक्ष ठेवि गुंडाळोनी । दे माझ्या आणून भावावेगीं ॥ २ ॥ नको आपुलिया नेऊं वैकुंठासीं । दे माझ्या भावासी आणूनियां ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे न देसील जरी । हत्या होईल शिरीं पांडुरंगा ॥४॥ ॥ २ ॥ सख्यत्वाने गेलों करीत सलगी । नेणेंचि अभागी महिमा तुझा ॥ १ ॥ पावलों आपलें केलेला हो ऱ्हास । निदैवापरीस काय करी ॥ २ ॥ कष्टविलासी म्यां चांडाळें संसारीं । अझुनियां तरी उपदेशीं ॥ ३ ॥ उचित अनुचित सांभाळीलें नाहीं । कान्हा म्हणे कायीं बोलों आतां ॥ ४ ॥ ॥ ३ ॥ असो आतां काय करोनियां ग्लांतीं । कोणा काकुळती येईल येथें ॥ १ ॥ करूं कांहीं दिवस आहे तों सायास । झोंबुं त्या लागास भावाचिया ॥ २ ॥ रडतां रडती बापुडें म्हणती । परी ते न येती कामा कोणी ॥ ३ ॥ तुका बंधु म्हणे पडिली यावनीं । विचारतो मनीं बोलीलाहो ॥ ४ ॥ ॥ ४ ॥ चरफडें चरफड शोकें शोक होय । कार्य मूळ आहे धीरापासीं ॥ १ ॥ कळतसे ऐसें मजहो पाहतां । करावी तें चिंता मिथ्या खोटी ॥२॥ न चूके होणार सांडितां शरत्वा । फुकटाचि होईल सत्वा होईल हानी ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे दिला बंद मना । वांचोनी निधाना न पाविजे ॥ ४ ॥ ॥ ५ ॥ नलगे चिंतां आतां अनुमान पाहतां । आलें मूळ भ्राता गेला जेथें ॥१॥ घरभेद्या जेथें आहेत सुकान । धरितों कवळून पाय दोन्ही ॥२॥ त्याचे त्याच्या मुखें पडियलें ठावें । नलगे सांगावें मागें पुढें ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे करील भेटी भावा । सोडिन तेधवां विठोबासी ॥ ४ ॥ ॥ ६ ॥ धींद धींद तुझ्या करीन धींदळ्या । ऐसें काय वेळ्या जाणीतलें ॥ १ ॥ केली तरी भेटी माझीया भावास । नाहीं तरी नास आरंभिला । मरावें मरावें आलें या प्रसंगा । बरें पांडुरंगा कळे साचें ॥ ३ ॥ तुकया बंधु म्हणे तुझी माझी उरी । उडाली न धरी भीड कांहीं ॥ ४ ॥ ॥ ७ ॥ ओव्या ॥ कान्हया तुकयाचा सहोदर । ऐसी करुणा भाकितसे फार । आणिक तेरा वैष्णव वीर । बैसले साचार ते ठायीं ॥ ९९ ॥ तीन अहोरात्र पर्यंत वरी । बैसले इंद्रायणीचे तीरीं । तुकयाचें ध्यान लागलें अंतरीं । जीव संसारीं त्रासला ॥ २०० ॥ कोणी दशदिशा विलोकित । कोणी पाहती आकाश पंथ । तों पंचमीच्या प्रातःकाळीं निश्चित । वर्तलें चरित्र तें ऐका ॥ १ ॥ तुक्याचें हातीं साचार । टाळ असे निरंतर । आणि गोदडी होती अंगावर । ते पडिली सत्वर ऊर्ध्वपंथें ॥ २ ॥ तेव्हां निश्चय कळला त्यांसी । कीं सद्गुरु झालें वैकुंठवासी । मग स्नान करोनि इंद्रायणीसी । देवालया पासीं पातले ॥ ३ ॥ टाळ गोदडी पाहावयासि जाण । दुरोनि दुरोनि येती भाविक जन ।

म्हणे हेंचि तुक्याचें दर्शन । सजळ नयन अश्रुपातें ॥ ४ ॥ रामेश्वर ब्राह्मण निश्चित । तयासि कान्हया विचारित । आतां कोणती नेमावी पुण्यतीथ । असेल शास्त्रार्थ तो सांगा ॥ ५ ॥ रामेश्वर म्हणे वचन ऐका । क्रिया कर्मा विरहित तुका । देह निर्वाह न होतां देखा । श्रीविष्णु लोका प्रती गेला ॥ ६ ॥ फाल्गुन वद्य द्वितीयेसी । सद्गुरु जाहले वैकुंठवासी । परी टाळ गोदडी पंचमीसी । निरोप आपुल्यासि हा आला ॥ ७ ॥ या करितां आज पंचमी सुदिन । करावें ब्राह्मण संतर्पण । मेळवोनियां वैष्णव जन । हरिकीर्तन आरंभा ॥ ८ ॥ देहनिर्वाह झाला असता । तरी क्रियाकर्मासि अधिकार होता । त्या जगद्गुरुची लीला सर्वथा । नये बोलतां मज लागीं ॥ ९ ॥
॥ अभंग ॥ पंडित वैदिक अथवा दशग्रंथी । सरी न पावती तुक्याची ॥ १ ॥ शास्त्रेंही पुराणें गीता नित्य नेम । वाचितां तें वर्म न कळे तयां ॥ २ ॥ मागें कवीश्वर झालें थोर थोर । कोणें कलेवर नेलें सांगा ॥ ३ ॥ म्हणे रामेश्वर सकळिकां पूसोनी । गेला तो विमानीं बैसोनीयां ॥ ४ ॥ ॥ ओव्या ॥ जे कां अनावर वैष्णवी माया । ते सर्वथा बाधूं न शके तुक्या । देहींच विदेहत्व पावोनियां । केली काया ब्रह्मरूप ॥२१०॥ जो मृत्यु लोकांत साचार । तुका नामयाचा अवतार । जनासि दाखवोनि लीला सत्वर । केला जीर्णोद्धार भक्ति पंथ ॥ ११ ॥ ऐसें बोलतां रामेश्वर । संत गर्जती जयजयकार ॥ फाल्गुन वद्य पंचमीस साचार । उत्साह थोर आरंभिला ॥१२॥ मिष्टांन्ने करोनि नाना रीतीं । देवळीं बैसविल्या द्विज पंक्ती । पूजा उपचार करोनि प्रीतीं । भोजनें त्यांप्रती घातलीं ॥१३॥ पंचमी षष्टीपर्यंत । कीर्तन करिती वैष्णव भक्त । मग सप्तमीस झालें लळित । आनंदयुक्त ते समयीं ॥ १४ ॥ महादेव विठोबा नामाभिधान । हे तुक्यासि पुत्र दोघेजण । कांता गरोदर होती जाण । नवमास पूर्ण ते झाले ॥ १५ ॥ मग भक्तिज्ञान वैराग्य पुतळा । अवलीसि सगुण पुत्र झाला । नारायण नाम ठेविलें त्याला । आनंद वाटला संतांसी ॥ १६ ॥ तो दिवसें दिवस झाला थोर । दर्शनासि आला शिवाजी नृपवर[1] । गांव मोकासे दीधले चार । मग बांधिलें शिखर विठोबाचें ॥ १७ ॥ धन संपदा येतां बरी । वैराग्य जाहलें ते अवसरीं । घर लुटवी विप्रांकरीं । द्वारकापुरी मग गेले ॥ १८ ॥ कांता पुत्रांचा करोनि त्याग । महायात्रेसि गेले मग । अकरा कावडी आणूनि निजांगें । रामेश्वर सांग पूजिला ॥ १९ ॥ तुक्याचे अभंग साचार । बहुत केलें पाठांतर । नारायण बावा वैष्णव वीर । कीर्तन गजर करीतसे ॥ १२० ॥ महादेव विठोबा वडील निश्चिती । परी ते तयाचे आज्ञेत असती । परी तुक्याचे बरें निश्चिती । पडली महंती यांजकडे ॥ २१ ॥ तुकाराम तों स्वदेहासीं । झाले असती वैकुंठवासी । परी अद्यापि दर्शन सायासीं । देती भाविकांसी निजकृपें ॥ २२ ॥ प्रथमारंभा माजी जाण । करुणा भाकिली कान्हयानें । तयासि स्वप्नीं दीधलें दर्शन । निजकृपेनें आपुल्या ॥ २३ ॥ आणिक कानडा वाणी लिंगाईत । सुदउंबऱ्यामाजी होता राहात । त्याणे तुक्याची सेवा केली बहुत । संसारीं विरक्त होऊनियां ॥ २४ ॥ गवासेट त्याचें नामाभिधान । परम

[1] राजा.

सुशील असे जाण । प्रपंच व्यवहार सर्व टाकून । सत्संग तेणें धरियेला ॥ २५ ॥ मग एकांत समयीं एके दिनीं । तुकयासि विनवी कर जोडोनी । म्हणे माझ्या अंतसमयीं कृपें करोनी । दर्शन स्वामींनीं देईजे ॥२६॥ देखोनि तयाचा सप्रेम भावार्थ । अवश्य म्हणे वैष्णव भक्त । मग वैकुंठासि गेलिया देहासहित । निदिध्यास वाणियातें लागला ॥ २७ ॥ एकांतीं संतांसि सांगे गुज । कीं तुकारामानें नेम केला मज । कीं अंतःकाळीं भेट देईन तुज । सन्निध काज तें आलें ॥ २८ ॥ कांहीं दिवस लोटतां पाहे । तयाचा आला अंतसमय । मग देहासि मनुष्य लवलाहें । पाठवित आहे सत्वर ॥ २९ ॥ रामेश्वर भट थोर ब्राह्मण । तुक्याचा सहोदर कान्हया जाण । धाकटा पुत्र नारायण । इतुक्यांस घेऊन येतसे ॥ १३० ॥ आसनीं बैसवोनि वैष्णववीर । पूजा केली सर्वोपचारें । तों तुकाराम तेथें आले सत्वर । वाणी नमस्कार करितसे ॥ ३१ ॥ बुका लावूनि आपुल्या करें । कंठीं पुष्पाचा घातला हार । म्हणें कृपा करोनि पतितावर । दर्शन साचार दीधलें ॥ ३२ ॥ ऐशा स्वमुखें बोलतां गोष्टीं । ऐकोनि लोकास आश्चर्य पोटीं । परी वाणियानें हार घातला कंठीं । तो सकळांचे दृष्टीं दिसतसे ॥ ३३ ॥ भिंती काष्ठाचा आधार । सर्वथा नसतां अधांत्रीं दिसतो हार । वैष्णवीं केला जयजयकार । नामघोष गजर तेधवां ॥ ३४ ॥ विठ्ठल स्मरण करितां जाण । मग देह सोडिला तयानें । अवघेचि म्हणती धन धन्य । लाधले दर्शन तुक्याचें ॥ ३५॥ जैसे रामकृष्णादि अवतार जाण । संपले ऐसें पुराणीं वचन । परी भक्तांसि साक्षात देती दर्शन । रूप सगुण धरोनियां ॥ ३६ ॥ तेवीं तुकाराम गेलें वैकुंठासीं । हे लीला दाखविली जनासी । परी दर्शन होतसे भाविकांसी । साक्षी बहुतांसी हे आली ॥ ३७ ॥ निळोबा गोसांवी पिंपळनेरकर । आणिक बहिणाबाई गंगाधर । यांसि स्वप्नी येऊनि वैष्णववीर । अनुग्रह साचार दीधला ॥३८॥ तो लीलावतारी विश्वसखा । सद्गुरु आम्हांसि जोडला तुका । हृदस्थ सर्वदा राहोनि देखा । ग्रंथ पीठिका उभारिली ॥ ३९ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ सुंदर । हाचि पूर्णिमेचा निशाकर । भाविक चकोर लक्षूनि सत्वर । अमृत तुषार सेविती ॥ ४० ॥ कुबुद्धि विकल्पि तस्करांस । नावडे याचा दिव्य प्रकाश । म्हणवोनि द्वेषें निंदिती यास । नाहीं विश्वास अंतरीं ॥ ४१ ॥ दुरिताचा अंकुर विकल्प जाण । तेणें नाडिलें बहुताकारणें । जरी पदरी सांचलें असले पुण्य । तरी विश्वास तेणें ठसावें ॥ ४२ ॥ भक्तलीलामृताचे भोक्ते । संतसज्जन प्रेमळ भक्त । जो अनाथ बंधु रुक्मिणीकांत । त्यांजवळ तिष्ठत सर्वदा ॥ ४२ ॥ बुद्धिमतीसि उन्मेष लहरी । हृदयस्थ बैसोनि देतसे हरी । महीपतीसि करोनि निमित्तधारी । ग्रंथ विस्तारी वाढविला ॥ ४४ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । चाळिसावा अध्याय रसाळ हा ॥ २४५ ॥ ॥ अ० ४० ॥ ओ० २४५ ॥ अभंग ५४ ॥ एवंसंख्या २९९ ॥

अध्याय ४१



श्रीगणेशाय नमः । बहुत साधनें ऐकीलीं श्रवणीं । परी तीं न होती मजलागुनी । मग संतांचिये निजस्तवनीं । रंगली वाणी सद्भावें
॥१॥ एक योगयाग करिती पाठ । व्रतें आचरती कोणी श्रेष्ठ । मी विष्णुभक्तांचा होऊनि भाट। सत्कीर्ति उत्कृष्ट गातसें ॥२॥ ते आपुले
कृपेनें निश्चित । चरित्रें लिहविती मज हातीं । येऱ्हवीं मी अज्ञान मंदमती । हें लोक जाणती सर्वत्र ॥ ३ ॥ जो देवाधिदेव रुक्मिणीवर ।
त्याचें हातीं असे सूत्र । तो आपुल्या दासांचीं चरित्रें । राजीवनेत्र वदवीतसे ॥ ४ ॥ कळा हीन चातुर्य हीन । अक्षर वटिका मेळवूंच
नेणें । बुद्धीचा चालक जगज्जीवन । त्याचें कारण तोचि जाणें ॥ ५ ॥ मागिलें अध्यायीं कथा सुंदर । श्रीतुकाराम वैष्णव वीर । त्याचें
चरित्र सविस्तर । ऐकिलें साचार सज्जनीं ॥ ६ ॥ आतां विजापूरामाजी साचार । केशव स्वामी भक्त थोर । जो भक्तिज्ञानासि आगर ।
वैराग्य भरतो अंगीं ॥ ७ ॥ श्रीपांडुरंगाचें उपासन । यथाविधि करिती अर्चन । आणि सर्वकाळ नामस्मरण । सगुण ध्यान अहर्निशी
॥ ८ ॥ आत्मज्ञान असोनि अंतरीं । जो साकार मूर्तीसी प्रेम धरी । ऐसें दुर्लभ चराचरीं । धुंडितां धरित्रीं नाढळती ॥ ९ ॥ स्वरूपें
सुंदर लावण्यासरिता । त्याहीवरी पतिव्रता । विरळा दृष्टींसी धूंडोनि पाहतां । नसती बहुता या रीती ॥ १० ॥ भक्तिज्ञान वैराग्यपूर्ण ।
हें केशव स्वामीचे अंगीं भूषण । कवित्व बोलती प्रसाद वचन । ऐकतांचि श्रवण सुखावती ॥ ११ ॥ दया परिपूर्ण सर्वांभूतीं । आत्मवत
विश्व आली प्रचीती । त्या अनुभवाचे उद्गार येती । कीर्तनीं बोलती तेंचि वचन ॥ १२ ॥ आषाढी आणि कार्तिकमासीं । येत असती
पंढरीसी । नेमें वारी चालविती ऐसी । सप्रेम मानसीं सर्वदा ॥ १३ ॥ कीर्तन करिता वैष्णव वीर । तेथें रंग येतसे फार । जनांत
प्रतिष्ठा वाढली थोर । मानिती सर्वत्र तयासी ॥१४॥ कृपेनें पाहतां जगज्जीवन । तयासि मानिती सर्वत्र जन । विश्वोद्धार करावया पूर्ण ।
अवतार सगुण धरियेला ॥ १५ ॥ जनांत प्रशंसा वाढली बहुत । तेणेंचि कंटाळलें चित्त । मग कोणासि पुसतां निश्चित । अर्ध रात्रीं
निघत तेथोनियां ॥ १६ ॥ चित्तीं हेत धरिला पूर्ण । आतां श्रीकृष्णातीरीं करावें स्नान । ऐसें म्हणवोनि वैष्णव जन । करितसे गमन
तेधवां ॥ १७ ॥ मार्गीं चालतां अति त्वरित । भजन करित प्रेमयुक्त । तों बाळकरूपें पंढरीनाथ । खांद्यावर बैसत तयाच्या ॥ १८ ॥
नानापरीचीं पदांतरें । विष्णुभक्त गातसे चरित्रें । देव बैसोनि खांद्यावर । सप्रेमभरें ऐकती ॥ १९ ॥ मार्गीं चालतां साचार । तों
शेतकरी बैसला माळ्यावर । त्याणें देखिलें बाळक सुंदर । खांद्यावर बैसलें ॥ २० ॥ सगुण रूप पाहतांचि जाण । त्याचें तत्काळ वेधलें
मन । रूपीं गुंतले असती लोचन । ते स्वामी निघोन दूर गेले ॥ २१ ॥ जीवीं चटपट लागली पाहीं । म्हणे ऐसें बाळक देखिलें नाहीं ।
उचलोनि धरीलें असतें हृदयीं । तरी संतोष जीवीं वाटता ॥ २२ ॥ कुणबियासी दर्शन झालें रोकडें । तें रूप आठवी दृष्टीपुढें । अन्न
उदक न लगेचि गोड । निज निवाडें लक्षीतसे ॥ २३ ॥ इकडे केशवभक्त ते अवसरीं । सत्वर गेले कृष्णातीरीं । अनुताप धरोनि निजांतरीं ।

स्नान करीतसे ते ठायीं ॥ २४ ॥ तीन रात्री क्रमोनि तेथ । परतोनि येतसे विष्णुभक्त । तों कुणबी मार्गीं वाट पाहत । वेधलें चित्त तयाचें ॥ २५ ॥ केशवभक्तासि देखोनि नयनीं । नमस्कार केला जोडोनि पाणी । मग हात जोडोनि तये क्षणीं । अमृतवचनीं बोलत ॥२६॥ म्हणे स्वामी गेलेति याचि पंथे । तेव्हां खांद्यावर बाळक होतें । तें स्वरूपें सुंदर असे बहुत । वेधलें चित्त देखता ॥२७॥ तें कोठें टाकूनि आलेति आतां । नेत्र शीणले वाट पाहतां । ऐकोनि कुणबियाची वार्ता । विस्मित चित्तांत मग होती ॥ २८ ॥ म्हणती आम्हीं खांदीं बाळक पाहीं । कोणाचें कधीं घेतलें नाहीं । कृषीवळ सांगतसे कायी । विस्मित जीवीं जाहले ॥ २९ ॥ पुढें अरण्यांत जाऊनि सत्वर । एकांती बैसे वैष्णववीर । मग एकाग्र मन करोनि स्थिर । झांकिले नेत्र तयानें ॥ ३० ॥ म्हणे पंढरीनाथा देवाधिदेवा । मी निरंतर करितों तुझी सेवा । ऐसें असतां कमळाधवा । दर्शन केव्हां न देसी ॥ ३१ ॥ आणि बाळक रूप धरूनि साकार । बैसलासि माझ्या खांद्यावर । रानवट कुणबी माळ्यावर । भेटलासि साचार त्यालागीं ॥ ३२ ॥ तुजसी भाव धरितां श्रीहरी । तया पासोनि पळतोसि दुरी । आणि अभक्त द्वेषी जे अंतरीं । तयां समोरी तिष्ठसी तूं ॥३३॥ रांगतां काच बद्धभूमीवर । यशोदेसि न दिससी राजीव नेत्र । आणि कंस द्वेषी दुराचार । तयाच्या समोर सर्वदा ॥ ३४ ॥ ऐसा तुझा स्वाभाविक गुण । आर्तवंताच्या पुढें लपणें । आता टाकोनि निर्गुणपण । देयीं दर्शन मज देखा ॥३५॥ जरी तूं न येशील आतां । तरी मी प्राण त्यागीन सर्वथा । ऐसा सप्रेम धांवा करितां । हें रुक्मिणीकांता जाणवलें ॥ ३६ ॥ मग सगुणरूपें साक्षात श्रीहरी । प्रगट झाले ते अवसरीं । केशव पाहे उघडोनि नेत्रीं । तों वैकुंठ विहारी देखिला ॥ ३७ ॥ सांवळा सुकुमार रुक्मिणीरमण । कानीं कुंडलें दैदीप्यमान । दिव्य पीतांबर झळके पूर्ण । त्या तेजें नयन झांकती ॥ ३८ ॥ जें योगियाचें निज ध्यान । नीलग्रीवाचें देवतार्चन । तो केशव स्वामीसि हृदयीं धरोन । अमृत वचन बोलतसे ॥ ३९ ॥ म्हणे तूं कृष्णातीरासि जात असतां सत्वरी । तेव्हां मीच बैसलों खांद्यावरी । परी तुज देहभान नाहीं अंतरीं । यास्तव नेत्रीं न पाहिलें ॥ ४० ॥ आतां विजापुरासि येऊन सत्वर । कीर्तन करावें निरंतर । तीच माझी पूजा साचार । आन विचार करूं नको ॥ ४१ ॥ इतुकें तयासि बोलोनि वचन । देव पावलें अंतर्धान । कीं निजभक्ताचें हृदयभुवन । वस्तिस्थान तें केलें ॥ ४२ ॥ श्रीहरीच्या वचनानि देऊनि मान । विजापुरासि आले परतोन ॥ भाविक प्रेमळ तेथीचे जन ॥ संतोष मनें त्यांसि झाला ॥ ४३ ॥ तों चरित्र वर्तलें एक अघटित । तें श्रवण करावें देऊनि चित्त । एक सावकार होतां नगरांत । तो असे धनवंत सदा सुखी ॥ ४४ ॥ रौप्य मुद्रा पन्नास सहस्र । खर्चोनि त्याणें बांधिलें मंदिर । ग्रह शांति करोनि सत्वर । दानें द्विजवर तोषविले ॥ ४५ ॥ परी त्या हवेलीमाजी जाण । ब्रह्मराक्षस शिरले दोन । घरधनी निद्रित होतांचि पूर्ण । त्यासि बाहेर उचलोन टाकिती ॥ ४६ ॥ पिशाचाचें भय फार । सावकारें

१ हात.

त्यजिलें तें घर । पूर्वस्थळीं राहिला सत्वर । मुलें लेंकरें घेऊनी ॥ ४७ ॥ ब्रह्मराक्षस निघावया कारणे । करविलीं तीव्र अनुष्ठानें । परी कांहींच उपाय न चले जाण । मंत्रज्ञ ब्राह्मण पीडिती ॥४८॥ पंचाक्षरी घेऊनि विभूती । द्वारा बाहेरूनि फुंकिती । सदनीं प्रवेशतां तयांप्रती । बांधोनि टाकिती राक्षस ॥४९॥ ऐसे उपाय केले फार । परी अवघ्यांचे वोढ्द जाहले मंत्र । तंव कोणी जाऊनि भाविक नर । सांगती विचार सावकारा ॥ ५० ॥ म्हणती केशवस्वामी वैष्णव पूर्ण । त्यासि विनवावें कर जोडून । हवेलींत करावे कीर्तन । तेणें पिशाच पळोनि जाताले ॥ ५१ ॥ ऐसी सांगतां विवेक नीती । सावकारासि मानली वचनोक्ती । मग केशवस्वामीसि करोनि विनंती । कीर्तनासि आणिती ते ठायीं ॥ ५२ ॥ समुदायेंसी वैष्णव वीर । ते स्थळीं चालिले सत्वर । टाळ मृदंग वाजती सुस्वर । नादें अंबर कोंदलें ॥ ५३ ॥ दिंड्या पताका बहुवस । करील चालिले कीर्तन घोष । नादब्रह्माचि आलें मुसें । नामघोषें गर्जती ॥ ५४ ॥ रामकृष्ण हरी गोविंदा । अच्युता अनंता आनंदकंदा । परमपुरुषा सच्चिदानंदा । श्रीमुकुंदा जगद्गुरु ॥ ५५ ॥ ऐसीं नामें बहुवस । प्रेमें गातसे केशवदास । मंदिरीं प्रवेशतांचि त्यास । तों ब्रह्मराक्षस पुढें आले ॥ ५६ ॥ हात जोडोनि मधुरोत्तर । बोलते जाहले पिशाचनर । तुझ्या दर्शनमात्रें साचार । जाहला उद्धार आमुचा ॥ ५७ ॥ ऐशा रीतीं बोलोनि वचन । मग पावते झाले अंतर्धान । आश्चर्य करिती सकळ जन । कौतुक दृष्टींसीं देखोनी ॥ ५८ ॥ हें सकळ क्षेत्रांत जाहलें श्रुत । कीर्तनासि आले लोक बहुत । मनुष्य न माय वाडियांत । दाटी बहुत जाहली ॥ ५९ ॥ केशव स्वामीचीं प्रसाद वचनें । श्रवण करिती सभाग्य जन । नाम रूपीं जडलें मन । तन्मय होऊन राहिले ॥ ६० ॥ श्रीरामकृष्ण चरित्र जाण । हेंचि लाविलें अनुसंधान । श्रोतयांसि नाहीं देहभान । तटस्थ मन सकळांचें ॥ ६१ ॥ कीर्तन झालें चारी प्रहर । तों उदयासि पातला दिनकर[1] । मग पंचारती उजळोनि सत्वर । श्रीरुक्मिणीवरें[2] ओवाळिला ॥ ६२ ॥ सावकारें निपजवोनि मिष्टान्नें । मंदिरीं घातलीं सहस्त्र भोजनें । मग मुलांलेंकरासहित जाण । त्या घरीं येवोन राहिला ॥६३॥ आणिक चरित्र ऐका भाविक । बाजीद पठाण होता एक । तो पादशाई सुभा असे देख । सेनानायक रायाचा ॥ ६४ ॥ पंचवीस सहस्त्र सैन्य निश्चिती । त्याच्या स्वाधीन होती संपत्ती । सदा यशस्वी पूण्यमुर्ती । समोर न ठाकती शत्रु त्याच्या ॥ ६५ ॥ हिंदुस्थान देशांत जाऊनि त्याणें । बहुत मेळविले संपत्तिधन । सवें पंचवीस सहस्त्र सैन्य । आला परतोन स्वदेशा ॥ ६६ ॥ विजापुरासि येतां साचार तों । मार्गी वर्तलें एक चरित्र । खजिना घातला उंटावर । झालासे भार बहु त्यासी ॥ ६७ ॥ उरी फुटोनियां जाण । उंट जाहला गतप्राण । त्याजवरील द्रव्य काढोन । रक्षित सारवान बैसला ॥ ६८ ॥ तों खाशी स्वारी मागून येत । हत्ती घोडे शिबिका[3] रथ । बाजीद पठाण देखोनि त्यातें । सारवानातें काय म्हणे ॥ ६९ ॥ मार्गावर कां तुम्ही बैसलां । मग ते म्हणती उंट मेला । सरदार म्हणे आहे बैसला । उठवा त्याजला सत्वर

१ सूर्य. २ पांडुरंग. ३ पालखी.

॥७०॥ सकळ गात्रें दिसती पाहे । यांत मरोनि गेलें काय । स्वामीचें चित्तीं वागवोनि भय । मग त्यांणीं उपाय केला ॥ ७१ ॥ चार मेडी रोऊनि तेथें । आडोळ्यावरी बैसविलें प्रेत । द्रव्य उचलोनि तया वरुतें । सारवान ठेवित ते समया ॥७२॥ मनुष्य मृत्यु पावते कैसें । हें बाजीदास विदित नसे । घरचें कुटुंब सर्व असे । कानीं मृत्यूस न ऐकिले ॥७३॥ आजा आजी माता पिता । बंधु पुत्र आणि कांता । अवघींच होतीं तयादेखतां । मरणाचीं वार्ता तो नेणें ॥७४॥ आणिकांचे दुःख ऐकोनि कानीं । हेंही नावडे त्याचें मनीं । यास्तव दैन्य दुःख स्वप्नीं । नाहींच त्याणी देखिलें ॥ ७५ ॥ मृत्युलोकीं जीवासि मरण असे । हे तों तयासि विदित नसे । पूर्व पुण्याचेनि लेशें । विषयींच असे निमग्न तो ॥ ७६ ॥ यास्तव सारवानासि म्हणे । उंट हाक चला त्वरेनें । ते म्हणती चालवितें चैतन्य । तें गेलें निघोन सत्वर ॥७७॥ तुमचें भय वागवोनि फार । खाजिना घातला प्रेतावर । परी निघोनि गेला चालविणार । यासि विचार कोणता ॥७८॥ चौऱ्याशीं लक्ष देह निश्चिती । तितुक्यांचीही ऐशीच गती । बाजीद ऐकोनि वचनोक्ती । अनुताप चित्तीं जाहला ॥ ७९ ॥ म्हणे नाशवंत हा देह निश्चिती । शेवटीं आपुल्यासही ऐसीच गती । सात्विक वैराग्य ठसलें चित्तीं । मग काय युक्ती करितसे ॥ ८० ॥ स्वार शिपायी होते जवळ । त्यांची तलब वारिली सकळ । उरलें धन तें तत्काळ । वांटीत ते वेळ याचकां ॥ ८१ ॥ वस्त्रें अळंकार भूषणें । तींहीं दीधलीं द्विजांकारणें । शुद्ध सात्विक वैराग्य लक्षण । निस्पृह होऊन राहिला ॥ ८२ ॥ मग यवन भाषेनें निश्चित । साक्या बोलिले पंचाशत । त्यांतील दोन साक्या लिहितों येथ । पाहिजे संमत सज्जनीं ॥ ८३ ॥ साकी ॥ भज मन तों रामकें बैठता कामो । दिनो चारका रंग मिलेगा खाकमो ॥ १ ॥ गले तुलसीकी माल सुमरन शामको । एकहि बरे भोजन आपके हातकों ॥ २ ॥ ओव्या । ऐसा विवेक करोनि मनीं । निस्पृह झाला तये क्षणीं । षड्वैरियांसि जिंतोनि । शुद्ध सत्वगुणी तो झाला ॥ ८४ ॥ मग विजापुरांत जावोनि आपण । केशव स्वामीसि गेला शरण । त्याचा अनुग्रह संपादून । श्रीराम भजन करीतसे ॥ ८५ ॥ सद्गुरु कृपा होतांचि निश्चिती । तत्काळ जाहली कवित्व स्फूर्ती । कीर्तन करीत सप्रेम युक्ती । ऐकतां विश्रांती श्रोतयां ॥ ८६ ॥ पद पदांतरें रचिलीं फार । परी स्वामीचा अभंग घातला वर । जनांत प्रशंसा वाढली फार । साक्षात्कार जाहला ॥ ८७ ॥ आणिक संतचरित्रें अद्भुत । सादर ऐका भाविक भक्त । संतोबा पवार जगविख्यात । रांजणगांवांत राहतसे ॥ ८८ ॥ त्याजसारिखी आणिकांसी पाहीं । सद्गुरु सेवा घडली नाहीं । कैशा रीतीं वाटेल जीवीं । चरित्र तेंही ऐकावें ॥ ८९ ॥ शिवाजी पुण्यवंत नृपवर । जयापासील हा सरदार । दोन शतें वागवित स्वार । वेतन जाहगीर गांव असती ॥ ९० ॥ सांडसाचें रांजण गांव । तेथें मुलें माणसें असती सर्व । मान मान्यता वैभव । परी संतती नसे पोटीं ॥ ९१ ॥ त्याची पत्नी सुलक्षण । येसूबायी नामाभिधान । स्त्रीपुरुष दोघेजण । निजप्रतीनें ते असती ॥ ९२ ॥ मग कांता म्हणे त्या अवसरा । दुसरें लग्न आपुलें करा । तेणें वंश वाढेल बरा । माझिया

अंतरा हें आलें ॥ ९३ ॥ ऐसें सांगतां येसूबायी । संतोबा उत्तर देतसे कायी । आतां तुझी प्रीति जीवीं । मग विक्षेप दोहींत होईल ॥ ९४ ॥ बंधूसि दोन असती कुमर । परी ते जाणावे आपुलेच पुत्र । वस्त्रें अलंकार मुलांवर । लोभ अपार करितसे ॥ ९५ ॥ साता पांचा वर्षांत जाण । बंधुचे पुत्र जाहले दोन । संतोबा पंतोजीसि बोले वचन । लिहूं शिकवणें कुमारांसी ॥९६॥ रौप्यमुद्रा एक शत । वेतन नेमोनि दीधलें त्यातें । मग पंत राहवोनि वाडियांत । लिहूं शिकवित त्या दोघां ॥ ९७ ॥ तों मुलांचा समाचार घ्यावयासी । संतोबा येत पंतोजीपासीं । तों स्नान करोनि त्या समयासी । मानस पूजेसी बैसला ॥ ९८ ॥ धावळीचा घुंगट घेऊन । जप करीत निजप्रीतीनें । संतोबा तयासि बोलती वचन । काय गुणगुण करितसां ॥ ९९ ॥ तो म्हणे सद्गुरूनें सांगितलें कांहीं । तें जपत बैसलों ये समयीं । संतोबा त्याच्या लागतसे पायीं । म्हणे तो मंत्र लवलाहीं मज द्यावा ॥ १०० ॥ तो म्हणे आपणा योग्य पाहोनि समर्थ । त्याचा अनुग्रह घ्यावा निश्चित । मी तरी तुमचा चाकर सत्य । उदर निमित्तार्थें राहिलों ॥१॥ ऐकोनि म्हणे सद्गुरुभक्त । माझा आतांचि उपजला हेत । क्षणक्षणां पालटेल चित्त । आणि अशाश्वत शरीर हें ॥ २ ॥ ऐसें म्हणवोनि ते समयीं । पूजेचें साहित्य आणविलें पाहीं । सद्गुरूचे लागूनि पायीं । अनुग्रह तिहीं संपादिला ॥ ३ ॥ मुलांसि लिहूं सांगावया देख । दुसरा पंतोजी ठेविला आणिक । सद्गुरु सेवा करितसे हरिखें[1] । साहित्य आणिक कांहीं दिलें ॥ ४ ॥ वस्त्रें भूषणें अलंकार । पूजा केली सर्वोपचारें । ब्राह्मण जेवूं घातले सहस्र । कीर्तन गजर करविला ॥ ५ ॥ मग नूतन मंदिर बांधोन । ते स्थळीं राहविलें स्वामीकारणें । पाक निष्पत्तीसि ब्राह्मण । तोही नेमून ठेविला ॥६॥ सद्गुरुचे खिजमतीसी । दीधले दास आणि दासी । सहस्र मुद्रा खर्चावयासी । दिवाणासी सांगीतलें ॥ ७ ॥ मग कांतेप्रती बोलती उत्तर । आम्हीं सैन्यांत जातों दूर । स्वामिसेवेसी पडेल अंतर । समाचार घेत जावा ॥ ८ ॥ ऐसें सांगतां ते समयीं । अवश्य म्हणे येसूबायी । मस्तक ठेवूनि सद्गुरुपायीं । सैन्यांत लवलाही मग गेले ॥ ९ ॥ सेना संपत्ती घेऊनि समग्र । संतोबा पवार गेले दूर । त्याच्या आज्ञेनें साचार । होती उपचार सद्गुरूचे ॥ ११० ॥ वस्त्रें अलंकार भूषणें । भोजन मिळतसे मिष्टान्न । कुटुंब नसे त्याजकारणें । उद्विग्न मन सर्वदा ॥ ११ ॥ आधींच तरुण होतें शरीर । आणि होऊं लागले उपचार । तेणें विकारें साचार । विषयांवर मन धांवे ॥ १२ ॥ सेवेसी दीधली होती दासी । संभोग करूं लागले तिसीं । कानोकानीं गोष्ट ऐसी । कारभारियासी श्रुत झाली ॥ १३ ॥ ते आधींच कुटिळ होते जाण । याहीवरी क्षुद्र सांपडलें उणें । जैसें मर्कटासि मदिरापान । तैसेंचि दिसोन आलें कीं ॥ १४ ॥ मागें पुढें बोलती एक । संतोबा केवळ भोळा भाविक । सद्गुरू पाहिला असता आणिक । तेणें लौकिक थोर होता ॥ १५ ॥ पंतोजीचें लागत होतें ऋण । तें या जन्मीं फेडित उसणें । आतां रक्षा राखिली त्याणें । विषयीं निमग्न जाहला ॥ १६ ॥ संतोबाची निज

---

१ आनंदानें.

कांता । येसूबायी पतिव्रता । तिजपासी सांगती वार्ता । धीर सर्वथा त्यांसि नाहीं ॥ १७ ॥ म्हणती सैन्यांत गेलिया सुभेदार । गुरूनें मांडिला अनाचार । दासीचे मस्तकीं ठेवूनि कर । निरंतर भोगित ॥ १८ ॥ येसूबाई उत्तर देत । त्याची निंदा करितां व्यर्थ । घरधणी गांवास आलिया निश्चित । मग व्हाल फजीत यायोगें ॥ १९ ॥ गोष्टी ऐकोनि ते वेळे । उगेचि राहिले निंदक खळ । आपुल्या चित्तीं करिती तळमळ । परी कांहींच बळ चालेना ॥१२०॥ येसूबाई वारंवार । घेत सद्गुरूचा समाचार । सेवेंत कांहीं न पडे अंतर । सद्भावें नमस्कार करी तया ॥ २१ ॥ ऐसें एक वर्ष लोटलियावरी । संतोबा परतोनि आले घरीं । सामोरे जाऊनि कारभारी । निज मंदिरीं आणिताती ॥ २२ ॥ आधीं सद्गुरूचे जावोनि सदनीं । साष्टांग नमस्कार घातला धरणीं । आलिंगन देतां प्रीती करोनि । विश्रांति मनीं पावले ॥ २३ ॥ दुसरे दिवसीं सद्गुरुभक्त । महापूजेचें साहित्य करीत । तों कुटिळ येऊनियां दुर्मत । कानीं सांगत तयाच्या ॥२४॥ म्हणती तुम्हीं करूं इच्छितां पूजन । परी दासीसी रतलें त्याचें मन । संतोबा करोनि हास्यवदन । अमृत वचन बोलत ॥ १५ ॥ म्हणे संसारीं आलिया तत्त्वतां । आम्हीं सद्गुरु जोडला पिता । परी पूजावयासि नव्हती माता । तरी उत्तम आतां घडलें कीं ॥ २६ ॥ ऐसा सद्भाव धरोनि अंतरीं । आनंदें उत्सव मांडिला घरीं । मंगळ तुरे लावोनि गजरीं । पूजन करी तयांचें ॥ २७ ॥ वस्त्रें अलंकार भूषणें । सद्गुरुसि अर्पीत निजप्रीतीनें । धूप दीप निरांजनें । यथाविधीनें करीतसे ॥ २८ ॥ आपुले कांतेचे अलंकार जैसे । गुरुपत्नीसि दीधले तैसे । नमस्कार घालोनि उभयतांस । म्हणे धन्य सुदिन हा ॥ २९ ॥ यापरी जाहलें सद्गुरु पूजन । मग केलें ब्राह्मण संतर्पण । कोणी क्षुद्र न बोलती वचन । भयें करून तयाच्या ॥ १३० ॥ निंदा करीत होते दुर्मत । ते लज्जित झाले आंतच्या आंत । जैसा दिनकर उदयासि येत । मग तमाचाच होत प्रकाश पैं ॥ ३१ ॥ आपुलें चित्त शुद्ध होतां जाण । शत्रु ते होती मित्रासमान । तेवीं सद्भाव धरितां संतोबानें । दुरिताचें पुण्य थोर झालें ॥ ३२ ॥ ऐसी त्याची निःसीम भक्ती । सद्गुरुसेवेची पूर्ण आर्ती । देखोनि विश्वात्मा वैकुंठपती । संतोष चित्तीं मानीतसे ॥ ३३ ॥ म्हणोनि संतोबा भक्त थोर । सद्गुरु सेवेसि न पडे अंतर । दिवसें दिवस अधिकोत्तर । सद्भाव थोर वाढला ॥३४॥ म्हणे सद्गुरु रूप हें मीच निश्चिती । याणें पूजिलें यथास्थिती । तरी वैराग्ययुक्त निःसीम भक्ती । उचित याप्रती अर्पावी ॥ ३५ ॥ ऐसें इच्छितां जगज्जीवन । तों झालें निमित्तासि कारण । तुकोबाचे अभंग ऐकिले दोन । हरिकीर्तन होतांची ॥ ३६ ॥ तेणेंचि अनुताप जाहला चित्ता । म्हणे संसारत्याग करावा आतां । सांडूनि देह गेहं ममता । पंढरीनाथा भजावें ॥ ३७ ॥ मग वस्त्रें भूषणें अलंकार । वांटोनि तोषविले द्विजवर । फाटकें नेसोनि अंगवस्त्र । बेटावर बैसले ॥ ३८ ॥ कांताही परम पतिव्रता । धुंडित गेली प्राणनाथा । म्हणे कासया येथें आली आतां । प्रपंच ममता टाकोनी ॥ ३९ ॥ ते म्हणे जैसी शरीरच्छाया । कां ब्रह्मीं संलग्न असे माया । तेवीं मी जडलें

१ अंधाराचा. २ घर.

तुमच्या पायां । ठाव जावया नसेची ॥ १४० ॥ अंतरसाक्ष संतोबा पूर्ण । जाणे भक्ति वैराग्य लक्षण । म्हणे झाड पाला खावोनि राहणें । आम्ही न सेवूं अन्न सर्वथा ॥ ४१ ॥ ऐसें ऐकोनि ती सुजाण । त्यागिलीं वस्त्रें आणि भूषणें । तीन दिवस करितां उपोषण । मग दर्शन सगुण त्यांसि जाहलें ॥४२॥ साक्षात येऊनी पांडुरंग मूर्ती । क्षेम आलिंगन देतसे प्रीतीं । म्हणे मी तुमच्या हृदयीं असें श्रीपती । वियोगें खंती न करावी ॥ ४३ ॥ आतां भिक्षा मागोनि सेविजे अन्न । प्रेमें करावें माझें भजन । ऐसें सांगोनि रुक्मिणीरमण । अंतर्धान पावले ॥ ४४ ॥ संतोबाची अनुपम स्थिती । देहींच जाहली विदेह स्थिती । सद्‌गुरूची निःसीम भक्ती । यास्तव श्रीपतीं तुष्टले ॥ ४५ ॥ आणिक ही चरित्रें नाना रीतीं । चमत्कार दाविले लोकांप्रती । बहुतां जनांसि लाविली भक्ती । निष्काम स्थिती धरोनियां ॥ ४६ ॥ आतां मालोपंत प्रेमळ भक्त । तयासि पावले पंढरीनाथ । त्याचें चरित्र अति अद्भुत । तें ऐका निजभक्त भाविक हो ॥ ४७ ॥ वराड देशामाजी निश्चिती । तयासि होती पूर्व वस्ती । परम सुशील पुण्यमूर्ती । करीतसे भक्ती विठोबाची ॥४८॥ गृहस्थ व्यापारी नामांकित भला । कर्नाटकांत रोजगार केला । कुटुंबासहित तेथें राहिला । चित्तीं विठ्ठला आठवोनी ॥ ४९ ॥ तयासि पुत्र सुलक्षणिक । नरहरी नाम तयासि देख । पुत्र पिता बहु सात्विक । चित्तीं विवेक सर्वदा ॥ १५० ॥ आत्मवत मानी विश्वजन । सर्वभूतीं दया पूर्ण । दीन अतिथी यांजकारणें । अन्न दान करीतसे ॥ ५१ ॥ विष्णु अर्चन निरंतर । श्रीहरि कीर्तनीं प्रीति फार । संत सेवेसि असे सादर । असत्य उत्तर न बोले ॥ ५२ ॥ कांहीं एक दिवस लोटतां । तों निवर्तली तयाची कांता । तेणेंचि दुःख झालें चित्ता । म्हणती कैसे आतां करावें ॥५३॥ पुढती विवेक करोनि अंतरा । म्हणती भव पाश तुटला बरा । चित्तीं आठवोनि रुक्मिणीवरा । तोडिला थारा अविद्येचा ॥ ५४ ॥ परी लोकीं आग्रह करोनि देख । हेडीची नोवरी पाहिली एक । लग्न लाविलें तत्काळिक । पुढें दुःखदायक तें झालें ॥ ५५ ॥ कांहीं दिवस लोटतां । तों पातला नोवरीचा पिता । तो तरी जातीचा अनामिक होता । त्याणें दुहिता ओळखिली ॥ ५६ ॥ मग मालोपंतापासीं जावोनि त्याणें । सांगितलें आद्यंत वर्तमान । गांव नांव ठावठिकाण । अंत्यज म्हणे यातीचा मी ॥ ५७ ॥ माझी कन्या तस्करीं[1] । उचलोनि आणिली अर्धरात्रीं । तीच तुम्हीं केली नोवरी । अनाचर निर्धारीं हा दिसे ॥ ५८ ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती । परम अनुताप जाहला चित्तीं । म्हणे त्राहे त्राहे वैकुंठपती । पतित त्रिजगतीं मी एक ॥ ५९ ॥ सकळ दुरितें करोनि गोळा । त्याचा मी निर्माण जाहलों पुतळा । पतितपावना दीनदयाळा । निवेदन तुला असों दे ॥ १६० ॥ मग कांतेसि बोलावूनि तत्वतां । म्हणे तुवां ओळखिला आपुला पिता । तीहि समजोनि आपुल्या चित्ता । न बोले वार्ता तयासी ॥ ६१ ॥ अनामिकासि मालोपंत म्हणे । आपुले कन्येसि घेऊनि जाणें । मग आम्हांसि जैसें सांगती ब्राह्मण । तें कारण विचारूं ॥६२॥ अनामिक तयासि म्हणताहे । विटाळलें

1 चोरांनी.


भांडें नेऊनि काय । स्वयातें ठेवील प्रत्यवाय । मग म्यां काय करावें ॥६३॥ ऐसें तयासि वदोनि पाही । अनामिका गेला आपुले गांवीं । जघन्य जाहलें सर्वांठायीं । भ्रष्टविलें इहीं लोक म्हणती ॥ ६४ ॥ हेडीची नोवरी दीधली ज्याणें । तो तरी रात्रीं गेला पळोन । मुलां-लेंकरासमवेत जाण । केला दुर्जनें देशत्याग ॥ ६५ ॥ मालोपंत संसारीं होते सधन । यास्तव घरीं मिळाले पिशुन । अरिष्ट येतांचि महादारुण । देही टाकोन पळाले ॥ ६६ ॥ नरहरि पुत्र सुलक्षणिक । तो एक जवळ राहिला देख । भोजनभाऊ सकळिक । तात्काळिक ते गेले ॥ ६७ ॥ द्विजीं¹ वाळीत घातलें जाण । आप्तवर्ग गेले टाकोन । आणि पश्चात्तापें करून । दुरित संपूर्ण नासलें ॥ ६८ ॥ मग विप्र बोलावूनि ते वेळे । धन संपत्ति लुटविली सकळ । श्रीहरि भजन सर्वकाळ । भक्त प्रेमळ करीतसे ॥ ६९ ॥ मग ब्रह्मसभा करोनि थोर । घातले साष्टांग नमस्कार । मालोपंतीं जोडोनि कर । म्हणे प्रायश्चित सत्वर मज सांगा ॥१७०॥ ग्रंथ भाष्य पाहती ब्राह्मण । वैदिक पंडित शास्त्री निपुण । तों देहांत प्रायश्चित्त निघालें जाण । उपाय आण असेना ॥७१॥ ऐकोनि द्विजांची वचनोक्ती । मालोपंत उत्तर देती । हेंचि वाटतें माझे चित्तीं । तरी कोणती युक्ती ते सांगा ॥ ७२ ॥ यावरी सांगती धरामर² । चिंचेचें ढोल पहावें थोर । त्यामाजी घालोनि आपुलें शरीर । आंत गोवर भरावा ॥ ७३ ॥ आपुल्या हातें घेऊनि अग्नि । तयासि द्यावें चेतवून । हें देहांत प्रायश्चित्त घेतां जाण । दुरित नासोन जाईल ॥ ७४ ॥ ऐसें ऐकोनि विप्रवचन । मालोपंत अवश्य म्हणे । जें जें कर्तृत्व तैसें भोगणें । न चुकेचि जाण सर्वथा ॥ ७५ ॥ आपण ढोलांत बैसोनि प्रीतीं । गोंवर घालोनि अग्नि लाविती । हृदयीं चित्तीं पांडुरंग मूर्ती । धांवा करी अट्टहास्यें ॥ ७६ ॥ म्हणे पंढरपुरनिवासिनी । विठाबायी कुळस्वामिणी । आतां सत्वर तुवां येउनी । कर्मापासोनी सोडवावें ॥७७॥ संपत्तीचे सखे निश्चित । तें म्यां मानिले जिवलग आप्त । अंतःकाळ येतांचि त्वरित । टाकोनि समस्त ते गेले ॥ ७८ ॥ लोक प्रतिष्ठा मानापमान । पुत्र कांता संपत्ति धन । निर्धूत झालों सर्वांपासून । आतां देहाचें बंधन तूं तोडीं ॥७९॥ याहूनि संकट नानापरी । आकाश तुटोनि पडो देहावरी । परी तुझा आठव असोंदे अंतरीं । हेंचि श्रीहरी मागतसें ॥१८०॥ ऐसा निश्चय करोनि चित्तीं । लाविलीं दोन्ही नेत्रपातीं । हृदयीं चिंतिली विठ्ठलमूर्ती । जे सुख विश्रांती योगियां ॥८१॥ हृदयीं एकाग्र करोनि ध्यान । मुखें करीत नामस्मरण । केशव नारायण मधुसूदन । पतितपावन करुणाब्धी ॥ ८२ ॥ अच्युतानंद गोविंदा । परमपुरुषा सच्चिदानंदा । जगदुद्धारा आनंदकंदा । श्रीमुकुंदा जद्गुरु ॥ ८३ ॥ श्रीराम रघुपति रावणांतका । निशाचरमर्दना धर्मस्थापका । महा प्रतापें जगन्नायका । वृंदारकां सोडविलें ॥ ८४ ॥ कृष्ण विष्णु मेघश्यामा । भक्तरक्षका पुरुषोत्तमा । तुज हेंचि मागतो आत्मारामा । भजनीं प्रेमा असों दे ॥ ८५ ॥ मालोपंत ऐशा रीती । भजन करित सप्रेम-युक्ती । प्रेमे नेत्रीं अश्रु वाहती । तों वैकुंठपती पावला ॥ ८६ ॥ अग्निप्रदीप्त तये वेळे । जाहला असे प्रभंजन प्रबळ । परी कृशानु

१ ब्राह्मणांनी. २ ब्राह्मण,


शरीरासि लागे शतिळ । आंग न पोळे सर्वथा ॥८७॥ एकमेकासी बोलती ब्राह्मण । नामप्रताप अद्भुत गहन । त्यासि जाळूं न शकेचि अग्न । जगज्जीवन रक्षिता ॥८८॥ मागें हिरण्यकशिपें प्रल्हादभक्त । अग्नींत जाळितां न जळेचि सत्य । तैसेंचि जाहलें यातें । विप्र बोलती एकमेकां ॥ ८९ ॥ ढोल जळोनि तये वेळे । खालीं पडिले विझोनि विंगळ । दिव्य उतरोनि भक्त प्रेमळ । बाहेर तात्काळ ये तेव्हां ॥ १९० ॥ सकळ लोक आश्चर्य करिती । म्हणती धन्य याची सप्रेम भक्ती । संकटीं पावला लक्ष्मीपती । अघटित ख्याती हे झाली ॥ ९१ ॥ मालोपंतासि ब्राह्मण म्हणत । तूंचि पवित्र पुण्यवंत । संकटीं पावला पंढरीनाथ । दोष किंचित तुज नाहीं ॥ ९२ ॥ रोजगार धंदा सर्व टाकून । मालोपंत करीत हरिकीर्तन । करुणारसें त्याचें बोलणें । प्रसादिक वचनें संतांचीं ॥ ९३ अनामिकाची कन्या निश्चिती । न कळत तयानें पर्णिली[1] होती । तिसी लाधली सत्संगती । अनुताप चित्तीं जाहला ॥ ९४ ॥ मालोपंतासि म्हणे ते समयीं । मज तरणोपाय सांगा कांहीं । जैसें जन्मांतर होतें पाहीं । तरी घडोनि सर्वही तें आलें ॥ ९५ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । तुझा अन्याय नसे किंचित । पिता टाकोनि गेला सत्य । आतां अन्नवस्त्र तूतें आम्हीं देऊं ॥ ९६ ॥ तरणोपाय पुसतेस जरी । तरी सांगीतली गोष्टी जिवीं धरीं । सर्वदा श्रीहरीचें स्मरण करीं । गोष्ट दुसरी बोलों नये ॥ ९७ ॥ अवश्य म्हणवोनि ते भामिनी । नमस्कार करीतसे दुरूनी । दूर कोपट दीधलें बांधोनी । राहे जाउनी ते स्थळीं ॥ ९८ ॥ वस्त्रें पात्रें शुचिर्भूत । स्नान करीतसे नित्य नित्य । नामस्मरणीं लागली प्रीत । सर्वदा चित्त फांकेना ॥ ९९ ॥ पात्रीं अन्न वाढोनि निश्चिती । मनुष्या हातीं तिसीं पाठविती । तितुकें मात्र भक्षूनि सती । स्मरणीं निजप्रीती लावितसे ॥ २०० ॥ सत्समागमाचेनि गुणें । तिसीं आलें सात्विक लक्षणें । साक्षात्कार देतसे नारायण । निज कृपादानें आपुल्या ॥ १ ॥ कांहीं दिवस लोटतां निश्चित । तिचें आयुष्य सरलें समस्त । विष्णुदूत प्राण आकर्षित । वैकुंठाप्रत ते नेली ॥ २ ॥ मालोपंतासि कळलें वर्तमान । ती तों देहांत पावली मरण । प्रेतासि सद्गतीस लावील कोण । ऐसें वचन बोलती ॥ ३ ॥ अंत्यज अथवा शूद्र याती । हे कोणीच स्पर्श न करिती । मालोपंत विचार करिती । तरी आपण सद्गती तिची करूं ॥ ४ ॥ आम्हांनिमित्त साचार । तिची दुर्दशा जाहली फार । आतां ती तों पावली परत्र । तरी प्रेत संस्कार करावा ॥ ५ ॥ ऐसा चित्तीं विचार करून । कोपटांत प्रवेशती आपण । प्रेत पाहतां उघडोन । तों झालीं सुमनें तयाचीं ॥ ६ ॥ म्हणे विष्णुभजनाचा महिमा थोर । जनासि दाविला साक्षात्कार । आपुल्या दासाची सारंगधर । सत्कीर्ति साचार वाढवी ॥ ७ ॥ मालोपंतासि तै पासून । मानूं लागले सर्वत्र जन । म्हणती यासि साह्य रुक्मिणीरमण । महाविघ्नांतें निरसिती ॥८॥ मालोपंत तै पासुनी । करुणारसें गाय कीर्तनीं । भाविक श्रोते ऐकोनि श्रवणीं । सद्गदित मनीं ते होती ॥ ९ ॥ कीर्तनामाजी नवरस । गाती ऐकती विष्णुदास । परी भगवत्प्राप्तीचें कारण असे । करुणारस श्रेष्ठ तो

[1] विवाह करणे.

॥ २१० ॥ भवसिंधु पैलपार व्हावा । ऐसा चित्तीं उपजला हेवा । तरी करुणारसें आळवावें देवा । होईल जीवा सोडवण ॥ ११ ॥ देव भेटवा आपणास । ऐसें वाटलें निज भक्तास । परी जावोनियां वनास । करुणा देवास भाकावी ॥ १२ ॥ धांवा ऐकोनि वैकुंठपती । तेथें येतसे सत्वरगती । ऐसें त्याचे स्वभाव असती । वर्णिली सत्कीर्ती श्रीव्यासें ॥ १३ ॥ एकांतींही न बैसवेल जर । तरी सुखें करावा संसार । मग स्वस्थ बैसोनि एक प्रहर । संत चरित्रें ऐकावीं ॥ १४ ॥ नवविध श्रीहरीची भक्ति होय । त्यामाजी श्रवण वरिष्ठ आहे । येणें तरला परीक्षिती राय । आला प्रत्यय बहुतांसी ॥ १५ ॥ पुढिले अध्यायीं कथा सुंदर । वदविता श्रीरुक्मिणीवर । महीपति त्याच्या अभयवरें । प्रसाद उत्तरें बोलतसे ॥ १६ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । परिसोत प्रेमळ संतभक्त । एकेचाळिसावा अध्याय रसाळ हा ॥ २१७ ॥ ॥ अध्याय ४१ ॥ ॥ ओव्या २१७ ॥



अध्याय ४२



श्रीगणेशाय नमः ॥ एक श्रीहरीचे कृपेविण । व्यर्थ दिसती सकळ साधनें । चौदाविद्या अभ्यासिल्या त्याणें । जैसी ज्योतीवांचून ठाण दिवी ॥ १ ॥ श्रीहरिकृपेवीण साचार । चौसष्टीकळा साधिल्या जर । जैसें दोरीवांचोनि खांब सूत्र । बाहुलें अणुमात्र हलेना ॥ २ ॥ वेदशास्त्रें आणि पुराणें । व्यर्थचि भगवत्कृपेविण । जैसें पोटीं नसतां संतान । विवाह करणें पोसण्याचा ॥ ३ ॥ करुणारसें करोनि घननीळा । न आळविलें वेळोवेळां । तरी व्यर्थचि त्याची कवित्व कळा । शीणच उरला वैखरीसी ॥४॥ कांहींच सामर्थ्य नसोनि अंगीं । जे सद्भावें भीनले पांडुरंगीं । कीर्तनीं डुल्लती सप्रेमरंगीं । तरी सत्कीर्ति अंगीं पावले ते ॥ ५ ॥ भक्तवत्सल दीनदयाळ । न विचारीच याति कुळ । शुद्ध भावाचें देखोनि बळ । पावे तत्काळ तयासी ॥ ६ ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । केशव स्वामी भक्त थोर । आणि बाजीद यवन साचार । वैष्णव वीर तो झाला ॥ ७ ॥ आणि संतोबा पवारें गुरुभक्ती । करितां जाहली वैराग्य प्राप्ती । त्यावरी मालोपंताचे संकटीं निश्चिती । वैकुंठपती पावला ॥ ८ ॥ आतां ऐका प्रेमळसज्जन । कथा रसिक निरूपण । एक प्रेमावायी म्हणवोन । श्री भागवत श्रवण करीतसे ॥९॥ ती भ्रतारहीन असे पाहीं । ज्ञानवैराग्य नेणेचि कांहीं । परी भक्तिभावें करोनि तिहीं । शेषशायी जोडला ॥ १० ॥ नाठवे आपुलें आणि पैरावें ॥ सम विषम नाहींच ठावें । सर्वांभूतीं सारिखाचि भाव । एकचि जीव मानीतसे ॥ ११ ॥ दया परम सर्वांभूतीं । श्रवणीं कीर्तनीं असे आर्ती । याचक क्षुधितां यथाशक्ती । करितसे तृप्ती तयांची ॥ १२ ॥ संत साधु वैष्णव प्रेमळ । आलिया मंदिरीं देतसे स्थळ । नामस्मरण सर्वकाळ । सप्रेम मेळें करीतसे ॥ १३ ॥ नित्य करोनि गंगास्नान । गोपाळ मूर्तीचें करी अर्चन । पंडित भागवत वाचिती जाण । जातसे श्रवण करावया ॥ १४ ॥ ऐकतां श्रीहरीचें चरित्र । अश्रुपात्रें भरले नेत्र । गलित होती सकळ गात्रें । भान अणुमात्र असेना ॥ १५ ॥ हरिकीर्तनीं बैसतां पाहीं । सर्वकाळ ती विदेही । म्हणवोनि नांव भक्तवैष्णवी । प्रेमावायी ठेविलें ॥ १६ ॥ तंव कोणे एके अवसरीं । साधुसंत पातले घरीं । ते क्षुधित असती उदरीं । मग विचार करी मनांत ॥ १७॥ म्हणे पुराणश्रवणासि गेलें जर । तरी संतसेवेसि पडेल अंतर । तेणेंचि सर्व सुकृत हरे । कैसा विचार करावा ॥ १८ ॥ विष्णुपूजन करितां निश्चित । घरासि आले वैष्णवभक्त । तरी देवपूजा सांडोनि त्वरित । तयांसि प्रणिपात करावा ॥ १९ ॥ बाहेर आले वैष्णव जन । त्यांचा करोनि सन्मान । करीत बैसला देवतार्चन । तरी तें न माने हरीसी ॥ २० ॥ वेदोक्त मंत्र यथास्थित । ऐकोनियां वैकुंठनाथ । म्हणे अपशब्द बोलतो मातें । कैसें यातें करावें ॥ २१ ॥ सुमन पुष्पें वाहतो वरीं । तरी ते दगड येती देवावरी । ताडना समान श्रीहरी । पूजा अंतरीं भावीतसे ॥ २२ ॥ एक्या वस्त्रें मस्तक झांकिलें । तंव तळवटीं नग्न झालें । जैसें घर मोडोनियां भलें । मांडव केले अंगणांत ॥ २३ ॥ तैसा देवपूजेसि गुंतला । आणि ब्राह्मण अतिथीसीं विमुख झाला । तरी तें न मानेचि देवाला । धर्मशास्त्रीं झाला निर्णय ॥२४॥

१ दुसरे. २ पूजन. ३ पुण्य.

ऐसें बोलोनि प्रेमाबायी । पुराणश्रवणासि न जाय पाहीं । साधुसेवेसि कोणी नाहीं । म्हणवोनि गृहीं राहिली ॥ २५ ॥ आपुल्या घरीं धंदा करीत । परी पुराणापासीं लागलें चित्त । म्हणे मंदिरीं भागवत । असेल वाचित ये समयीं ॥ २६ ॥ मग दाहा वर्षांचा होता बाळ । तयासि सांगे तये वेळ । त्वां पुराणासि जाऊनि तत्काळ । कथा सकळ ऐकावी ॥ २७ ॥ यथाविधि करोनि नमन । मग मजपासीं सांगे येऊन । ऐकोनि प्रेमाबायीचें वचन । अवश्य म्हणे पुत्र तिचा ॥ २८ ॥ श्रवणालागीं पाठविला बाळ । प्रपंच धंदा सारीत सकळ । परी श्रीहरीच्या चरित्राजवळ । वृत्ति तत्काळ वेधली ॥ २९ ॥ जैसी गाय डोंगरीं चरे तृणें । परी वत्सापासीं तिचें मन । क्षण क्षणां टंवकारून । हंबरडा हाणून पाहत ॥ ३० ॥ नातरी पक्षिणी पडे आकाशीं । परी तिचें मन पिलियांपासीं । कां माता गुंतली कामासी । परी लोभ मानसीं तान्हयाचा ॥ ३१ ॥ तैशाच परी प्रेमाबायी । प्रपंच धंदा सारीतसे गृहीं । परी श्रीहरि चरित्रीं मन ठेवी । देहभाव जीवीं असेना ॥ ३२ ॥ पाकनिष्पत्ति झालियावरी । वैष्णवभक्त गंगातीरीं । स्नानें करोनि सत्वरी । निज मंदिरीं पातले ॥ ३३ ॥ करोनि त्यांचें चरण क्षाळण । तें तीर्थ केलें प्राशन । गंधाक्षता सुमन चंदन । निज प्रीतीनें अर्पिलीं ॥ ३४ ॥ स्वहस्तें पात्रीं वाढोनि अन्न । संकल्प सोडिला कृष्णार्पण । तृप्त झालिया वैष्णवजन । तुळसी पान मुखशुद्धी ॥ ३५ ॥ तों निजपुत्र श्रवणासि गेला पाहीं । तोही पातला ते समयीं । उभयतां पंक्तीसि लवलाहीं । भोजन तिहीं सारिलें ॥ ३६ ॥ दिवस राहिला एक प्रहर । मग संनिध बोलावूनि निज पुत्र । म्हणे तुवां पुराणीं ऐकिलें चरित्र । । तें सविस्तर मज सांग ॥ ३७ ॥ ऐकोनि प्रेमाबायीचें वचन । पुत्र संनिध बैसे येऊन । म्हणे माते म्यां ऐकिलें पुराण । तें सादर श्रवण करीं कां ॥३८॥ नंदयशोदेचें घरीं । श्रीकृष्ण अवतरला गोकुळीं । यशोदा स्वयें दधि[2] घुसळी । तों जवळ वनमाळी पातला ॥३९॥ फुंदफुंदों रडे जगज्जीवन । म्हणे मज देयीं स्तनपान । यशोदेनें ठेवूनि घुसळण । आडवा श्रीकृष्ण घेतला ॥४०॥ मुखीं घालोनि एक स्तन । आवडीनें चोंखीत जगज्जीवन । दुसरा हातीं धरोनि जाण । मातेचें वदन पाहत ॥ ४१ ॥ यशोदेचें भाग्य परम । मायातीत परब्रह्म । तो सगुणरूपें पुरुषोत्तम । प्रेमें स्तनपान करीतसे ॥ ४२ ॥ ऐसे समयीं ते अवसरीं । मनांत विचार करी श्रीहरी । म्हणे मातेची प्रीत मजवरी । किंवा संसारीं हें पाहूं ॥ ४३ ॥ ऐसें चित्तीं विचारून । अग्नीसि आज्ञा केली कृष्णें । म्हणे तुवां प्रदीप्त होऊन । दूध उतवणें सत्वर ॥४४॥ ऐसें इच्छितां जगन्निवास । तों जातवेद[3] चेतला विशेष । दूध उतलें निःशेष । घ्राणासि वास पातला ॥४५॥ कर्पट दुधाची येतां घाणी । तों यशोदेसि कळलें मनीं । मग स्तन काढितां मुखांतूनी । चक्रपाणी रडतसे ॥ ४६ ॥ तैसाचि टाकोनि घननीळ । यशोदा गेली चुलीजवळ । तों दूध उतोनि गेलें सकळ । म्हणवोनि तळमळ करीतसे ॥ ४७ ॥ गांठींचा परीस टाकोनि पाहे । किमया करूं गेली माय । तों तेथें नास्तिक वाद होय । तैसेंचि सोय ते झाली ॥ ४८ ॥ क्षीरसमुद्र सांडोनि जाण । शेळीसि घातलें

१ गवत. २ दही. ३ अग्नि.

मेळवण । स्तनासि हात घालितां जाण । तों दुहोनि नेली आणिकेंची ॥ ४९ ॥ जवळी सुरतरु सांडुनी । सिंदीसि घालूं गेली पाणी । तों तिचीं पत्रें नेलीं कोणी । केरसुणी करावया ॥ ५० ॥ मुक्ताफळांचा सांडोनि हार । रानांत वेंचूं गेली गार । तों तेथें हीन दिसती साचार । व्यर्थचि वेरझार पडियेली ॥ ५१ ॥ तैसें श्रीकृष्ण परब्रह्म टाकोनी । प्रपंचाकडे गेली जननी । तों दुधाणें रितें देखोनी । तळमळ मनीं करीतसे ॥ ५२ ॥ असो इकडे श्रीकृष्ण । चित्तीं जाहला कोपायमान । म्हणे मजपरीस जननीचें मन । प्रपंचीं निमग्न असे कीं ॥ ५३ ॥ प्रेमपान्हा पाजितां पाहे । प्रपंचाकडे गेली माय । तरी ईस जेणें शिक्षा होय । तैसा उपाय करावा ॥ ५४ ॥ ऐसें म्हणवोनि त्या अवसरा । कृष्णें लवंडिला घुसळण डेरा । शिशु बाळकें आणीत सत्वरा । आपुल्या घरा श्रीहरी ॥ ५५ ॥ संचित लोणी होतें कांहीं । तें गडियांसि वांटिलें सर्वही । आपुल्या हातें शेषशायी । भाजनें सर्वही फोडित ॥ ५६ ॥ इतुका अन्याय केला कृष्णें । तों यशोदा आली घरांतून । तों दहीं लवंडिलें जगज्जीवनें । वांटिलें माखण पोरांसी ॥ ५७ ॥ हें यशोदेनें देखोनि नयनीं । परम संताप वाटला मनीं । म्हणे याजऐसा अगोचर कोण । त्रिभुवनींही दिसेना ॥५८॥ लेंकुरें आहेत घरोघरीं । परी हा अनिवार सर्वांपरी । सांगती गाऱ्हाणीं गांविंच्या नारी । तीं यथार्थ अंतरीं मज वाटे ॥ ५९ ॥ ऐसें म्हणोनि यशोमती । हातीं घेतली वेताटी । देखोनि पळतसे जगजेठी । माता पाठी धांवतसे ॥ ६० ॥ क्षण एक हरि दिसे नयनीं । तयासि धरूं पाहे जननी । तो अदृश्य होय चक्रपाणी । सवेंचि ते क्षणीं दिसत ॥ ६१ ॥ यशोदा पाहे लवड सवड । तो हरी लपे भिंती आड । गवळणी म्हणती दीधला लाड । तेव्हां कोड वाटलें ॥ ६२ ॥ आम्ही नित्य सांगूं गाऱ्हाणीं । कीं खोडी करितो चक्रपाणी । ते असत्य वाटे तुजलागोनी । आतां अनुभव मनीं आला कीं ॥ ६३ ॥ यशोदा पाहे विदोविदीं । तंव कृष्ण लपे सांदोसांदीं । गौळणींचीं मिळाली मांदी । परी कृष्ण त्रिशुद्धी नातुडे ॥ ६४ ॥ मातेचें भय वागवोनि थोर । भयें पळतसे सारंगधर । दोन प्रहर आला दिनकर । उष्ण तीव्र जाहलें ॥ ६५ ॥ धावतां पळतां साचार । जननीसि श्रम जाहला फार । धर्में करूनि निथळे सुंदर । कैसा विचार करावा ॥ ६६ ॥ म्हणे एकदा लागता माझ्या हातीं । मग त्यासि न सोडीं कल्पांतीं । हृदयमंदिरीं निश्चिती । बांधोनि श्रीपती ठाकितें ॥ ६७ ॥ ऐसें मातेचें अंतर । जाणोनियां करुणाकर । म्हणे जननीसि श्रम झाला फार । आतां स्थिर असावें ॥६८॥ यशोदा पाहे चपळ दृष्टीं । तों पुढें देखिला जगजेठी । मग सत्वर धरितसे मनगटीं । क्रोध पोटीं न समाये ॥ ६९ ॥ मग फरफरा वोढीत चक्रपाणी । यशोदा घेऊनि आली सदनीं । मंदिरीं मिळोनि सकळ गौळणी । नंदराणी गोफाटिती ॥ ७० ॥ मग होऊनि यशोदे-समोर । म्हणती तुझा कृष्ण चोर जार । आम्ही सागों निरंतर । तें असत्य उत्तर तुज वाटे ॥ ७१ ॥ आज घरीं लवंडिला गोरस ।

१ भांडी (मडकी) २ लोणी.

यास्तव धरिलें कृष्णास । आतां उखळीं बांधोनि टाकी यास । शिक्षा नसे आन कांहीं ॥ ७२ ॥ ऐसें बोलतां व्रजनारी । तों फुंदफुंदों रडे मुरारी । अश्रुपात वाहती नेत्रीं । परी मातेसि अंतरीं कींव नये ॥ ७३ ॥ दावें सोडोनि लवलाहें । यशोदा कृष्णासि बांधों जाय । तंव तें वीतभर उणें राहे । गांठ नये सर्वथा ॥ ७४ ॥ मग दुसरें दावें ते अवसरीं । यशोदा आणोनि लावी सत्वरी । तों आणिक पाहिजे वीतभरी । म्हणे कैशा परी करावी ॥ ७५ ॥ एकमेकांसीं लावितां दोर । परी कदा न पुरती साचार । दावीं लाविली नवलक्ष वर । परी उणें वीतभर येतसे ॥ ७६ ॥ गौळणी आपुलाल्या सदनीं जाउनी । चऱ्हाटें देताति आणोनी । म्हणती कृष्णासि उखळीं बांधोनी । शिक्षा जननी लावी वो ॥ ७७ ॥ घरची नवलक्ष असतां दावीं । आणि घरोघरचीं आणिलीं सर्वही । एकएकासी यशोदा लावी । परी तीं कदाही न पुरती ॥ ७८ ॥ वैष्णवी मायेनें भुलविल्या गौळणी । तैशाच रीतीं यशोदा जननी । जो का विश्वंभर चक्रपाणी । अवतरे सदनीं नंदाच्या ॥ ७९ ॥ ज्याच्या रोमरंध्रीं ब्रह्मांडें । मातील येव्हडें प्रचंड धेंड । तयासि यशोदा बांधूं पाहे कोडें । नवल चोखडें हेंच कीं ॥ ८० ॥ अरूप अनाम साचार । ब्रह्मादिकांसि नकळे पार । त्यासि बांधावया न पुरे दोर । हें साचार कळेना ॥ ८१ ॥ आकाश थोरवाडपणीं । गोचर सर्वांसि दिसतसे नयनीं । त्यासि घालावया गवसणी । आणावी कोठुनी कळेना ॥ ८२ ॥ क्षीरसागरासि सांडवा । कोणत्या पाषाणें मांडावा । अमृतासि पाहुणेर करावा । कोणत्या पदार्थें कळेना ॥ ८३ ॥ पृथ्वीचें वजन करावें कोडें । तरी येव्हडें विस्तीर्ण नाहीं पारडें । समीर कोणते ठायी कोंडे । ऐसें रोकडें कळेना ॥ ८४ ॥ तैशाच रीतीं यशोदा माय । कृष्णासि दोर बांधो जाय । परी तो अनंत आपर आहे । यालागीं न समाये चऱ्हाटीं ॥८५॥ परी यशोदा म्हणे माझा कुमर । गौळणीं भविती नंदकिशोर । म्हणवोनि नवलक्ष लागोनि दोर । सारंगधर बांधिती ॥८६॥ परी वीतभर उणें दिसतसे दिठी । पदरीं सर्वथा नये गांठी । म्हणोनि यशोद होतते कष्टी । म्हणे कैसी गोष्टी करूं आतां ॥ ८७ ॥ एकदां बंधनामाजी येता । मग मी न सोडितें कृष्णनाथा । जाणोनि मातेच्या मनोगता । कृपा भगवंता उपजली ॥ ८८ ॥ म्हणे मज बांधावया निश्चिती । कष्टी होतसे यशोदा सती । आतां यांची जी मनोवृत्ती । तैसीच निश्चिती होय सुखें ॥ ८९ ॥ ऐसें चिंतितां चक्रपाणी । तों दोर पुरला तेच क्षणीं । सत्वरी गांठ देतसे जननी । हांसती गौळणी सर्वत्र ॥ ९० ॥ उखळीं बांधितां जगज्जीवन । मातेसि विलोकी दीनपणें । म्हणे खोडी न करीं मी आजपासुन । मुक्त बंधन करी ॥ ९१ ॥ ऐसे म्हणवोनि पूतनारी । टपटपां आसवें गाळीत नेत्रीं । माता टाकोनि तैसेच परी । लागे मंदिरीं निजकार्या ॥ ९२ ॥ पूर्वअनुसंधानी साचार । श्रोतीं धरिजे मागील मोहर । कीं प्रेमाबायीस निजपुत्रें । ऐसें चरित्र सांगीतलें ॥ ९३ ॥ ही कथा ऐकतां तये वेळा । गंहिवरें करोनि कंठ दाटला । टपटपां आसुवें वाहती डोळा । म्हणे कोण सांवळा सोडवील ॥ ९४ ॥ एकदां

१ वारा.

लवंडिला गोरस। यास्तव बांधिला कृष्णास। माय नव्हे ते आहे लाल। मजला भासे साजणी॥९५॥ मग प्रेमयाबायी पुत्रासि म्हणे। संसार निरविला तुजकारणें। मी सत्वर गोकुळीं जाऊन। सोडवीन कृष्ण स्वहस्तें॥ ९६॥ ऐसा रीतीं बोलोनि वचन। कुडींतूनि तत्काळ सोडिला प्राण। घरीं उतरले वैष्णवजन। ते निजदृष्टीनें पाहती॥ ९७॥ एकमेकांसि काय बोलती। धन्य प्रेमाबायीची भक्ती। हृदयी चिंतोनि कृष्णमूर्ती। झाली पावती निजधामा॥ ९८॥ परिमळ तुळशीं सुमनें बरीं। आकस्मात वर्षली तिजवरी। हे आश्चर्य देखोनि नेत्रीं। जयजयकारी गर्जती॥९९॥ देह निर्वाह झालिया निश्चिती। पुत्रानें घातली पुण्यतिथी। झाली सत्कीर्ती जनांत॥१००॥ आणिक चरित्र रसाळ गहन। सादर ऐका भाविक जन। एक शिळाबायी म्हणवोन। सुलक्षणा राजकन्या॥ १॥ लहान वय असतां जाण। लेहूं घातली पितयानें। पंडित ब्राह्मण घरीं ठेवून। म्हणे अभ्यासी लावणें कन्येसी॥ २॥ पितया सांगतां ऐशा रीतीं। लेहूं शिकविली ते गुणवती। शाळग्राम विष्णुमूर्ती। सद्गुरु पूजिती नित्य काळीं॥ ३॥ अर्चन करितां एके दिनीं। शिळाबायी पाहतसे नयनीं। पंतोजीस म्हणे तेच क्षणीं। माझी विनवणी अवधारा॥ ४॥ मज नित्य पूजावयाकारणें। शाळग्राम शिळा एक देणें। म्हणोनि सद्भावें करी नमन। निजप्रीतीनें तेधवां॥५॥ कन्येचा अतिशय देखोनि बहुत। पंतोजीनें केली युक्त। चोपडा गोटा पाषाण पाहत। म्हणे शाळग्राम निश्चित हा पूजीं॥ ६॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती। परम संतोष जाहला चित्तीं। आसन गवाळें उपकरणें निश्चिती। पाहूनि करिती तैसेंची॥ ७॥ प्रातःकाळीं करोनि स्नान। मांडीतसे देवार्चन। पंतोजी कैसें करितो अर्चन। त्याजप्रमाणें आपण करी॥ ८॥ मंत्र तों नये तिजप्रती। परी भावविश्वास दृढ चित्तीं। देखोनि तिची सप्रेम भक्ती। तेथेंचि श्रीपती प्रगटला॥ ९॥ भक्तीची आवडी वैकुंठराया। शहाणपण नावडेचि तया। भक्तीवांचोनि जे जे क्रिया। तरी साक्षात्कार तया नयेची॥ ११०॥ शिळाबायीचा सप्रेम भाव। पाषाणांताचि प्रगटला देव। आवडीची पूजा घेत माधव। प्रीती अपूर्व देखोनी॥ ११॥ हा मातापितयांसि भाव न कळे। म्हणती लेंकरूं खेळतसे खेळ। दिवसंदिवस तये वेळ। उपवर तत्काळ ते झाली॥ १२॥ मग वर पाहूनि मांडळिक भूपती। लग्न केलें सत्वर गती। चार दिवस सोहळा झालिया निश्चिती। सासुऱ्यां पाठविती कन्येतें॥ १३॥ देवपुजेची पेटारी। सवें घेतली बरोबरी। प्रथम दिवसीं वाटेकरी। आरती करी निजभावें॥ १४॥ तिचा भ्रतार परम खळ[१]। त्याणें दृष्टीसी पाहिलें सकळ। देवपूजेची पेटारी आहे जवळ। हा वृत्तांत कळे त्यालागीं॥१५॥ मग शिळाबायीसि न कळत। पेटारी बाहेर घेऊनि जात। अवघीं उपकरणीं विखरोनि त्वरित। डोहांत टाकित नदीच्या॥ १६॥ चित्तीं धरोनि कुबुद्धि। नाश केला तये संधीं। म्हणे कांतेची परमार्थ उपाधी। तोडिली व्याधी हे बरें॥ १७॥ मग उदयासि येतां तमारी[२]। स्नान करितसे सुंदरी। तों देव पूजेची पेटी। पाहतां सत्वरीं दिसेना॥ १८॥

१ दुष्ट. २ सूर्य.

म्हणोनि चिंताक्रांत होय । म्हणे शाळग्राम झाला काय । हा जीव त्यजीन लवलाहें । चित्तीं निश्चय दृढ केला ॥ १९ ॥ म्हणे देवाधिदेवा वैकुंठपती । कांहीं अंतर पडिलें भक्तीं । टाकूनि गेलासि मजप्रती । वाटती खंती बहु तुझी ॥ १२० ॥ कंठ जाहला सद्गदित । नेत्रीं वाहती अश्रुपात । म्हणे देवपूजा न सांपडतां सत्य । व्यर्थचि जीवित न ठेवीं ॥ २१ ॥ सासुसासरा बहुत सांगती । भ्रतार संबोखीत नाना रीतीं । परी अन्न उदक न सेवीच सती । निश्चय चित्तीं दृढ केला ॥ २२ ॥ ऐसें चार दिवस लोटतां निर्धारीं । शिळाबायीसि पावला श्रीहरी । तिच्या पंतोजीचें रूप धरी । मग दीधली पेटारी स्वप्नांत ॥२३॥ शिळाबाई सावध होय । तों देवपूजा सन्निध आहे । मग स्नान करोनि लवलाहें । अर्चन पाहे करीतसे ॥ २४ ॥ ते भ्रतारानें देखोनि नयनीं । परम आश्चर्य करीतसे मनीं । म्हणे एक एक वस्तु एके ठिकाणीं । भिरकावूनि दीधली म्यां ॥२५॥ बुडी देऊनि उदकांत जाण । गोळा करोनि आणिलें कोणें । मग परम अनुतापला मनें । म्हणे व्यर्थचि छळण म्यां केलें ॥ २६ ॥ कांतेचा निश्चय अपूर्व । तत्काळ पावला देवाधिदेव । भ्रतारासि येतांचि हा अनुभव । मग भक्त वैष्णव तोही झाला ॥ २७ ॥ आणिक चरित्र रसाळ वाणी । श्रोतीं सादर ऐकिजे कानीं । मांडलिक राजा हिंदुस्थानीं । कांता सुलक्षणी तयाची ॥ २८ ॥ मत्स्य कच्छ वराह व्यक्ती । नरसिंह वामन भार्गवमूर्ती । रामकृष्णादि येतां जयंती । उत्सव प्रीती करीतसे ॥ २९ ॥ मखरें करोनि नानारीतीं । अर्चनीं पूजीत विष्णुमूर्ती । अन्न देतसे सर्वांभूतीं । कीर्तन करिती वैष्णव ॥ १३० ॥ एकादशीस हरिजागर । विष्णुभक्ति वाढविली थोर । नामस्मरण सप्रेमभर । दिवसरात्र करीतसे ॥ ३१ ॥ नरपाळ मांडलिक नृपवर । तो असे तिचा निजभ्रतार । अंतरनिष्ठ वैष्णववीर । बाह्यात्कार नावडे त्यासी ॥ ३२ ॥ न करीच विष्णु अर्चन । श्रवणीं नायके हरिकीर्तन । वाचेसि न करी नामस्मरण । यास्तव जन निंदी तया ॥ ३३ ॥ म्हणती कांता भाविक परम सुशीळ । परी भ्रतार इचा असे खळ । व्यर्थ आयुष्य दवडिलें सकळ । चित्तीं घननीळ आठवीना ॥३४॥ ऐशा रीतीं निंदीती जन । परी अंतरनिष्ठ नृपनंदन । चित्तीं देवाची आठवण । एकही क्षण न विसंबे ॥३५॥ तंव कोणे एके दिवसीं । राणी म्हणे भ्रतारासि । कांहीं विष्णु भक्ति घडावी तुम्हांसी । ऐसें मजसी वाटतें ॥३६॥ ऐकोनि म्हणे नृपनाथ । माझा देह विषयासक्त । यास्तव न रुचे भक्तिपंथ । ऐसें बोलत तिजलागीं ॥ ३७ ॥ परी अंतरीं प्रेमाचा ओलावा । एकही क्षण न विसरेचि देवा । लोकांसि संसारि दिसे बरवा । परी अंतरभावा न जाणती ॥३८॥ एके दिवशीं नृपनाथ । निजला होता मंदिरांत । शरीर कानवडें करितां निश्चित । तों राम अवचित वाचेसि ते ॥३९॥ यें कांतेनें ऐकोनि ते अवसरीं । परम संतोष मानीत अंतरीं । मग उदयासि येतांचि तमारी । उत्सव मंदिरीं आरंभिला ॥ १४० ॥ विष्णुपूजन हरिकीर्तन । ब्राह्मणांसि सत्पात्रीं देतसे दान । तों राजा पुसे तिजकारण । आज उत्सव पूर्ण कां करिसी ॥४१॥ राणी तयासि उत्तर देत । तुम्ही निद्रित होतां यामिनींत[1] ।

---

१ रात्री.

तों मुखांतूनि राम निघत । तें म्यां सावचित्त ऐकिलें ॥ ४२ ॥ मग परमसंतोष जाहला अंतरीं । म्हणोनि उत्सव मांडिला घरीं । ऐसें सांगतांचि सुंदरी । नरपाळ करी काय तेव्हां ॥ ४३ ॥ म्हणे राम निघाला देहांतून । तरी आतां ठेवावें कासया जिणें । ऐसें म्हणोनि नृपनंदनें । सोडिला प्राण तत्काळ ॥ ४४ ॥ ऐसें कौतुक होतांचि पूर्ण । सकळ पाहती वैष्णव जन । अंतरनिष्ठ राजा म्हणून । कळली खूण सकळासी ॥ ४५ ॥ भ्रताराची निष्ठा गाढी । देखोनि राणी प्राण सोडी । उभयतांनीं साधूनि घडी । जोडिली जोडी देवाची ॥ ४६ ॥ ऐसा भक्तीचा निश्चय देख । एका परीस आगळे एक । अंतरीं धरोनि वैकुंठनायक । सप्रेम सुख भोगिती ॥४७॥ आणिक कथा रसाळ गोमटी । सादर ऐकतां कर्णसंपुटीं । त्यावरी करोनि कृपादृष्टी । पावे संकटीं जगदात्मा ॥ ४८ ॥ एक पिलाबायी प्रधान कुमरी । नित्य विष्णूचें अर्चन करी । तों भ्रतार स्मरोनि गेला सत्वरी । मग पितयाचें घरीं ते राहे ॥ ४९ ॥ पिताही काळें निमोनि गेला । परी दोघे बंधु होते तिजला । त्यांणींच तिचा प्रतिपाळ केला । तों कलह वाढला दोघांत ॥१५०॥ दोघांनींही दोन गांव भले । बळकावोनि विभक्त झाले । तों धाकट्या बंधूनें काय केलें । सैन्य ठेविलें झुंजावया ॥ ५१ ॥ मग वडील बंधूचा गांव निश्चित । त्याणें लुटूनि केला फस्त । पिलाबायीचें देवतार्चन समस्त । वाताहत जाहलें ॥ ५२ ॥ नित्य नेम सारिल्याविण । पिलाबायी न घेचि अन्न । बंधूसि सांगूनि पाठविलें तिणें । कीं शोध करणें म्हणोनियां ॥ ५३ ॥ त्याणेंही तल्लासं केला बहुत । परी देवतार्चन न सांपडेचि सत्य । मग पिलाबायीस सांगूनि पाठवित । येथें येऊनी त्वरित पाहें तूं ॥ ५४ ॥ मग जाऊनि त्याच्या गांवांस । शोध केला बहु वस । परी विष्णुमूर्ति कोठेंही नसे । पांच उपवास जाहले ॥ ५५ ॥ तिचा निश्चय देखोनि मनीं । तत्काळ पावले चक्रपाणी । विप्रवेषें स्वप्नीं येउनी । देवतार्चन आणूनी दीधलें ॥ ५६ ॥ ऐसा चमत्कार दृष्टीसि देखिला । मग धाकुट्या बंधूसि अनुताप झाला । म्हणे म्यां व्यर्थ कलह केला । मग शरण गेला बंधूसी ॥ ५७ ॥ म्हणे मी अपराधी पूर्ण । तुम्हांवरी आलों सैन्य घेऊन । वाताहत झालें देवतार्चन । जगज्जीवन शिणविला ॥ ५८ ॥ ऐसा पश्चात्ताप धरोनि चित्तीं । सख्यत्वें उभयतां भेटती । पिलाबायीचे शिष्य होती । अनुग्रह घेती सद्भावें ॥ ५९ ॥ नित्य सद्भावें सेवा करितां । साक्षात्कार पावले उभयतां । आणिक चरित्र रसाळ कथा । सादर श्रोतां परिसिजे ॥ १६० ॥ संत राजा नृपवर । साधुसेवेसि अति तत्पर । त्याची कन्या होती उपवर । लग्न सत्वर नेमिलें ॥६१॥ लग्न तों जाहलें सत्वर । परी कन्येसि मिळाला अभक्तवर । विष्णुमहिमा भक्तिपर । त्यासि अणुमात्र कळेना ॥ ६२ ॥ रमाबायी वैष्णव कुमरी । दीधली अभक्ताचें घरीं । ज्याच्या भक्ति लवलेश निर्धारीं । सर्वथा अंतरीं असेना ॥ ६३ ॥ श्रीविष्णुचें अर्चन पूजन । कोणी न करिती नामस्मरण । मग संतसेवन घडेल कोठून । विषयांध परिपूर्ण सर्वही ॥ ६४ ॥ तेणें रमाबायीचें चित्त । सर्वकाळ चिंताक्रांत । म्हणे अभक्ताची लाधली संगत । कैसी मात करावी ॥ ६५ ॥ पितयानें

१ तपास.

शोध न करोनि अंतरीं । मज दीधलें अभक्ताचें घरीं । पूर्वजन्मींचा ठेवा निर्धारीं । बळात्कारीं तो आला ॥ ६६ ॥ ऐसे लोटता दिवस फार । तंव ते जाहली गरोदर । नवमास भरतांचि साचार । सगुण पुत्र जाहला ॥६७॥ पुत्र भ्रतार धन धान्य घरीं । परी सर्वथा चिंतातुर अंतरीं । म्हणे कृपावंता वैकुंठविहारी । तुजवीण क्षणभरी कंठेना ॥६८॥ हृदयीं ध्यातें तुझे पाय । आणिक कोणाचा नाहीं आश्रय । कधीं करिशील माझी सोय । अभक्तासि प्रत्यय दाखवोनी ॥ ६९ ॥ ऐसी इच्छा धरिली मनीं । तों एकदा पातली हरिदिनी । पशु मारावया लागोनी । भ्रतार सदनीं आणितसे ॥ १७० ॥ रमाबायी वर्जीतसे त्यासी । म्हणे आजि विष्णुव्रत एकादशी । हिंसा कर्म घडतां प्राणियासी । तरी नरकवासी होतसे ॥ ७१ ॥ ऐसें शिकविलें नानापरी । परी तो नाइके दुराचारी । मांस खाइरियासि निर्धारीं । दया अंतरीं उपजेना ॥७२॥ हरिदिनी एकादशी व्रत । तो दिवसीं पशु मारिला हातें । रमाबायी चिंताक्रांत । म्हणे कैसी मात करावी ॥७३॥ एक भाविक एक कुटिल । एक प्रेमळ एक तो खळ । जैसा राहु आणि चंद्र शीतळ । मिळणी मिळे अवचितां ॥७४॥ रमाबायीस तैसी परी । झाली असे ते अवसरीं । मग मनुष्य पाठवूनि नगरांतरीं । म्हणे समाचार सत्वरि एक आणा ॥ ७५ ॥ आपुल्या नगरांत साधुसंत । आज आले असतील निश्चित । तरी मज येऊनि सांग त्वरित । ऐसें सांगत तयांसी ॥ ७६ ॥ भृत्यें सांगतसे पाहून । नगरीं उतरले वैष्णव जन । मग रमाबायी विष घेऊन । पुत्राकारणें देतसे ॥ ७७ ॥ ऐसें विपरीत करूनि तिणें । पाळणियांत निजविलें तान्हें । त्याचे तों तात्काळ गेले प्राण । कळलें वर्तमान सकळांसी ॥ ७८ ॥ घरचीं सकळ मनुष्यें जाण । अट्टहासें करिती रुदन । परी लेंकुराची माता संतोष मनें । नामस्मरण करीतसे ॥ ७९ ॥ तंव राजा राणीसि वचन बोलत । परम कठीण तुझें चित्त । रुदन न करिसीच किंचित । आश्चर्य वाटत मजलागीं ॥ १८० ॥ रमा उत्तर देतसे तया । नाशवंताचा शोक कासया । शेवटीं जाय नासोनिया । दिसती माया ओडंबर ॥ ८१ ॥ कृपेनें अवलोकितां श्रीहरी । विघ्ने निरखती नानापरी । जरी संत येतील आपुले घरीं । तरी उपाय सत्वरी सांगतें ॥ ८२ ॥ राजा पुसे राणीकारणें । कोणता उपाय सांग त्वरेनें । ती म्हणे संताचे चरण धुवोन । तीर्थ पाजणें लेंकुरासी ॥८३॥ तेणेंच बाळक उठेल त्वरित । राजा पुसे कोठे आहेत संत । रमा म्हणे देउळांत । उतरले आहेत जाणपां ॥८४॥ राजा विस्मित चित्तांत । घरासि आणिले वैष्णव भक्त । मग भाव धरोनि चित्तांत । संतांसि पूजित स्वहस्तें ॥ ८५ ॥ घेऊनि त्यांचें चरणामृत । घातलें लेंकुराच्या मुखांत । त्याचे प्राण परतले त्वरित । निद्रित जागृत होय ॥ ८६ ॥ हा चमत्कार देखतांचि अपूर्व । रायाचा बैसला भक्तिभाव । दुर्बुद्धि टाकोनियां सर्व । मग भक्तवैष्णव जाहला तो ॥ ८७ ॥ नित्य करीत विष्णु अर्चन । वैष्णव भक्तांचें पूजन । श्रवण करीत हरिकीर्तन । नामस्मरण सर्वदा ॥ ८८ ॥ रमाबायीचा निश्चय थोर । विष देऊनि मारिला कुमर । संकटीं पावला रुक्मिणीवर । चमत्कार थोर दाखविला ॥ ८९ ॥

१ सेवक.

आणिक कथा महारसिक । एक रामराजा परम भाविक । तो श्रीरामाचा उपासक । सप्रेम सुख भोगीतसे ॥१९०॥ ध्यानीं मनीं तयासी । चित्तीं वसे अयोध्यावासी । रामनाम दिवसनिशी । छंद वाचेसी सर्वदा ॥९१॥ रामाचा प्रताप ज्या ठिकाणी । तेंचि कथा ऐकतसे श्रवणीं । परी सीताहरण नायकेचि कानीं । दुःखित वनीं राम जेथें ॥९२॥ यजमानाचें मनोगत । जाणोनि पुराणिक तेंचि सांगत । तों पंडित झालिया व्यथित । मग निजपुत्रातें काय सांगे ॥९३॥ सीताहरण नावडेचि राया । तरी आणिक कथा सांगावी तया । पितयासीं आवश्य म्हणोनियां । राजद्वार ठाया तो गेला ॥९४॥ पितयानें दिधली शिकवण । त्या गोष्टीचें नसेचि स्मरण । पुस्तक सोडोनि रामायण । सीताहरण वाचीतसे ॥९५॥ श्रीराम असतां पंचवटी । तों राक्षस भाव दाखवीत कपटी । कांचनमृग उठाउठी । होऊनि दृष्टीं पडतसे ॥ ९६ ॥ तों हात जोडोनि सीतासती । श्रीरामासि करीत विनंती । हा मृग वधोनि सत्वर गती । कंचुकी मजप्रती करावी ॥ ९७ ॥ जाणोनि पुढील भविष्योत्तर । धनुष्य बाण घेतलें करें । मृग वधावया सत्वर । गेला रघुवीर वनासी ॥ ९८ ॥ मग रावण होऊनि संन्यासी । पातला भिक्षा घ्यावयासी । हिरोनि नेलें जानकीसी । ऐकोनि रायासी क्रोध आला ॥ ९९ ॥ पुराणिकें सांगतां सीताहरण । रायासी आवेश आला दारुण । मग प्रधानासी काय म्हणे । सकळ सैन्य सिद्ध करा ॥ २०० ॥ ऐसी आज्ञा होतांचि त्वरीत । रायाचें सैन्य आलें तेथ । शस्त्रास्त्रें घेऊनि समस्त । आले त्वरित ते ठायीं ॥ १ ॥ रामराय म्हणे ते समयीं । रावणें[1] हरिली सीतादेवी । लंकेसि गेला लवलाहीं । तरी चला सर्वही त्यामागें ॥ २ ॥ ऐसें सांगूनि सकळ शूरां । राजा पातला समुद्रतीरा । वधावयासि दश शिरा । जळांत सत्वर प्रवेशला ॥ ३ ॥ त्याचा भावार्थ पाहूनि थोर । संकटीं पडिले रघुवीर । मग सीता घेऊनि कडियेवर । प्रगटले सत्वर तें ठायीं ॥ ४ ॥ रामरायासि म्हणे रघुपती[2] । ही सीता रावणें नेली होती । मग आम्ही घेवोनि सत्वरगती । सोडवोनि निश्चिती आणिली ॥ ५ ॥ बाण लावोनि दशानन । वधोनि टाकिला आपण । आतां लंकेसि कासया करितोसि गमन । कांहींच कारण असेना ॥६॥ ऐसें बोलती रघुनंदन । चित्तीं पावला समाधान । मग समुद्रा बाहेर येऊन । जानकीजीवनें पूजिला ॥ ८ ॥ भगवत्प्राप्तीचें लक्षण । येथें मुख्य निश्चय कारण । येचविषयीं अनुसंधान । ऐका सज्जन भाविकहो ॥ ९ ॥ एक नर हरिदास निश्चिती । होता वाढे जगन्नाथी । भजन करीत सप्रेमयुक्ती । स्वरूपीं वृत्ती लावोनियां ॥ २१० ॥ तयाचे अंगीं निश्चित । चौसष्टी कळा मूर्तिमंत । श्रीहरीचे अवतार बहुत । सोंगें आणित निजप्रीती ॥११॥ ईश्वरकृपेचेनि पडिभारें । तयासि होतसे साक्षात्कार । सोंगाचे मुखोटे करोनि फार । अवतार चरित्र दाखवी ॥१२॥ इष्टमित्र वैष्णवभक्त गीत वाद्यें असती संगीत । ऐशारीतीं करीतसे ललित । तों चरित्र अद्भुत काय झालें ॥१३॥ नरसिंह अवतार सोंग जाण । निजांगें घेतसे तो आपण । दुसरा हिरण्यकशिपु करून । स्तंभ फोडून निघाला ॥ १४ ॥ प्रल्हादानें करितां स्मरण । निघाला कागदाचा स्तंभ फोडून । मग

[1] रावण. [2] राम.

हिरण्यकशिपु आडवा घेऊन । तयासि मारून टाकिलें ॥१५॥ नखें विदारूनि तये वेळां । स्वहस्तें आंतडीं घातलीं गळा । ऐसें सकळांनीं देखोनि डोळां । हाहाकार झाला ते समयीं ॥ १६ ॥ आज मृगजळाच्या पुरांत निश्चिती । कैसा बुडाला ऐरावती । नातरी स्वप्नींचीच सैन्यसंपत्ती । तेणें जिंतिली भूपती प्रत्यक्ष ॥ १७ ॥ कां अगस्त्यमुनीच्या सोंगें निश्चित । कैसा प्राशिला सरितानाथ । कां लांकडाच्या वज्रें त्वरित । भंगला पर्वत कैशारीतीं ॥ १८ ॥ नातरी दोरीच्या सर्पे निश्चिती । कैसा डंखिला परीक्षिती । पाषाणाचा उडोनि मारुती । कैसा गभस्ती गिळियेला ॥ १९ ॥ नातरी चित्रींच्या हुताशनें । कैसें जाळिलें खांडववन । तैसेंचि आज आलें घडोन । सकळ जन बोलती ॥२२०॥ एक म्हणती जन्मांतर । उभयतांचें होतें वैर । यास्तव सोंग आणूनि थोर । प्राण सत्वर घेतला ॥ २१ ॥ प्रेतवत नि-माला प्राणी । तयासि आप्त होती कोणी । ते रायासि सांगती जावोनी । आद्यंत करणी जे झाली ॥ २२ ॥ यावरी म्हणे नृपवर । प्रेतासि द्या अग्निसंस्कार । मग त्याणें साधिलें वैर । तो न्याय साचार विचारूं ॥ २३ ॥ ऐसें सांगतांचि भूपती । मग केली तयाची सद्गती । नरहरीसि त्याचे बंधु जपती । सूड म्हणती घेऊं आम्ही ॥ २४ ॥ मग युक्ति करितसे नृपनाथ । नरहरीसि मागुती सोंग देत । तयासि करूनि दशरथ । म्हणे चमत्कार येथ पाहावा ॥ २५ ॥ आणिक सुंदर मुलें पाहोनियां । राम लक्ष्मण केलें तयां । एक स्त्री रागीट पाहावोनियां । ती केली कैकया दुर्मती ॥ २६ ॥ गीत वाद्य लावोनि संगीत । हरिदास गाती कीर्तनांत । बाळकांड वाल्मीकिकृत । तें अनुसंधान निश्चित लाविलें ॥ २७ ॥ भद्रासनीं बैसतां रघुनाथ । तों कैकया म्हणे दशरथातें । त्वां दीधलें भाक वचनातें । आठवण चित्तांत करी राया ॥ २८ ॥ इतुकेंच मागतें तुज लागोनी । कीं रामलक्ष्मण पाठवावें वनीं । आणि माझा भरत सुलक्षणी । राज्यासनीं बैसवावा ॥ २९ ॥ जाणोनि कैकयीचें मनोगत । वनवासा चालिला रघुनाथ । तों दशरथाचें सोंग दीधलें ज्यातें । त्याणें आकांत मांडिला ॥ २३० ॥ कैकयीप्रती काय बोलत । तूं आपुलें राज्य घेई समस्त । परंतु माझा रघुनाथ । नको वनांत पाठवूं ॥ ३१ ॥ ऐशी ऐकोनियां वार्ता । श्रीराम नमस्कारी दशरथा । सवें घेवोनि लक्ष्मण सीता । होय निघता वनासी ॥ ३२ ॥ ऐसें देखोनि ते अवसरीं । शोक करीतसे वेषधारी । गडबड लोळे धरणीवरी । म्हणे जातोसि दुरी रघुनाथा ॥ ३३ ॥ श्रीराम माझा जिव्हलग प्राण । श्रीराम माझें गुप्त ठेवण । श्रीराम माझा विसावण । जातसे टाकून याकाळीं ॥ ३४ ॥ श्रीराम माझा परब्रह्ममूर्ती । श्रीरामावांचोनि मजप्रती । शून्य दिसती दशादिशा ॥ ३५ ॥ श्रीराम माझें आत्मस्वरूप । त्यावरी कैकयी धरिला कोप । आणिला अभिशाप मजवरी ॥ ३६ ॥ श्रीरामचंद्र तुजवांचुनी । मज तों संसारीं नसेचि कोणी । मायबाप बंधुबहिणी । श्रीरामावांचोनी मज नाहीं ॥ ३७ ॥ कैकयीची ऐकोनि

१ समुद्र. २ सूर्य. ३ अग्नीने.

दुर्बुद्धी । श्रीराम वनासि गेला आधीं । आतां परतोनि येईल कधी । हे मज त्रिशुद्धी कळेना ॥ ३८ ॥ श्रीराम प्राणाचाही प्राण । वनासि गेला मज टाकून । आतां काय वागवूं जिणें । म्हणोनि प्राण सोडिला ॥ ३९ ॥ ऐशी सोंग संपादणी । केली असे तये क्षणीं । लोक जवळ पाहतीं येउनी । तों श्वास परतोनी न येची ॥ २४० ॥ अंगासि हात लावोनि पाहत । तों उष्णता नसे किंचित । म्हणती श्रीरामस्वरूपी ठेवूनि चित्त । सायुज्य मुक्ती पावला ॥ ४१ ॥ सोंगा सारिखी संपादणी । ते आज साक्षात देखिली नयनीं । म्हणवोनि वैष्णव मुनी । पुष्पें सुमनें वर्षती ॥४२॥ संत साक्षात जेव्हां असती । तेव्हां विकल्पीं द्वेषी निंदितीं । निमोनि गेलिया करिती स्तुती । ऐसीच रीती जनाची ॥ ४३ ॥ अहो भक्तलीलामृत ग्रंथ । हाचि क्षीराब्धि जाणावा निश्चित । तो देवाधिदेव लक्ष्मीकांत । वास्तव्य येथ करीतसे ॥ ४४॥ जो अनंतशायी जगज्जीवन । असंख्य अपार त्याचे गुण । महीपति त्याचा बंदीजन । गातसे सद्गुण कीर्तनी ॥ ४५ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । बेचाळिसावा अध्याय रसाळ हा ॥ २४६ ॥ ॥ ओव्या ॥ ॥ २४६ ॥



अध्याय ४३





श्रीगणेशाय नमः । अफाट वारा नभाचे ठायीं । तोही कोंडवेल एके समयीं । परी श्रीहरीच्या चरित्रांस पाहीं । अंत पार नाहीं सर्वथा ॥ १ ॥ किती घागरी समुद्राचे पाणी । त्याचीही संख्या करील कोणी । परी भक्तचरित्रांची मांडणी । साकल्य होउनी नयेची ॥ २ ॥ नातरी पृथ्वी वरील तृणांकुर । यांची ही टोप धेववेल सत्वर । परी संत चरित्रांचा न कळेचि पार । साक्ष अंतर देतसे ॥ ३ ॥ मागल्या कवींच्या आधारें जाण । मी मूढमति करितों वल्गना । आत्मबुद्धीची नसे धारणा । साक्ष निजमना येतसे ॥ ४ ॥ जैसा डोळसाचा सांचोळ ऐकोनि । आंधळा चाले चांचपडोनी । तैसी या ग्रंथाची मांडणी । सभाग्य सज्जनीं परिसिजे ॥५॥ श्रीभीमातीरवासी विठ्ठलवर । तयासि आवडती संत चरित्रें । मज पुढें करोनि निमित्त मात्र । तो राजीवनेत्र स्वयें वदे ॥६॥ त्याणीं नखीं धरोनि गोवर्धन । गोपाळांसि दीधलें थोरपण । तैसेंच या ग्रंथांचें कारण । चतुर सर्वज्ञ जाणती ॥ ७ ॥ मागील अध्यायीं कथा गहन । श्रीकृष्ण बांधिला यशोदेनें । मग प्रेमाबायीने सोडले प्राण । रूप सगुण आठवूनी ॥ ८ ॥ आणि शिळाबायी पिलाबायी । प्रेमळ बहुत रमाबायी । यांचा निश्चय देखोनि जीवीं । शेषशायी पावला ॥ ९ ॥ सीता नेली ऐकोनि रोकडी । रामरायें समुद्रीं घातली उडी । दशरथाच्या सोंगास्तव तांतडी । सांडिली कुडी नरहरीनें ॥ १० ॥ आतां बोगरासा वाणी एक । होता सज्ञान परम भाविक । भजन करीत सप्रेम सुख । गुण तात्विक तयाचा ॥ ११ ॥ कांताही परम पतिव्रता । जाणे पतीच्या मनोगता । सद्भावें भजतां साधुसंता । माया ममता टाकूनी ॥१२॥ सर्वांभूतीं आत्मा एक । ऐसा तयाचा निश्चय देख । आत्मवत विश्व सकळिक । ऐसा विवेक तयाचा ॥१३॥ श्री रामकृष्ण हरिगोविंदा । नामस्मरण करिती सदा । अन्नवस्त्रांची घरीं आपदा । परी सत्व कदा न सांडिती ॥ १४ ॥ दुर्बळ संसार बहुता रीतीं । परी नित्य दाहा मनुष्यांसि अन्न घालिती । धरोनियां सात्विक वृत्ती । सुकृत संपत्ती जोडली ॥ १५ ॥ त्याचें सत्व पाहावया निश्चित । घरासि आलें वैकुंठनाथ । साधु रूपें येऊनि अंगणांत । घरस्वामीणीसि पुसत निजमुखें ॥ १६ ॥ म्हणे कोठें गेला असे बोगरा । आम्हीं भेटीसि आलों घरा । ऐसें पुसतां जगदुद्धार । ते म्हणे बाजारा गेला असे ॥ १७ ॥ मग बैसावयासि देऊनि सत्वर । सद्भावें केला नमस्कार । म्हणे उदयीक येईल निज भ्रतार । तुम्हीं स्वस्थ अंतर असों द्यावें ॥ १८ ॥ तिचें ऐकोनि उत्तर । काय बोलती सारंगधर । आम्हांसि क्षुधा लागली फार । आलों सत्वर म्हणोनि ॥ १९ ॥ तुमची ऐकली सत्कीर्ति । क्षुधितासि अन्न देतसां प्रीतीं । आतां करोनियां पाक निष्पत्ती । करावी तृप्ती जननिये ॥ २० ॥ ऐसें बोलतां चक्रपाणी । अवश्य म्हणे घरस्वामिनी । धनधान्य तों नव्हतें सदनीं । मग विचार मनीं करीतसे ॥२१॥ म्हणे उपवासी ठेवितां याजकारण । तरी निजसत्वासि होई लहान । मग नाकिंची नथ वालभर सोनें । बाजारांत घेऊन ते गेली ॥ २२ ॥ ते सराफापासीं देऊनि पाहीं । सामग्री आणोनि लवलाहीं । स्वयंपाक गृहीं करीतसे ॥ २३ ॥ पाकसिद्धि झालिया

निश्चितीं । पात्रीं अन्न वाढीतसे सती । मग पाचारूनि वैष्णव अतिथी । भोजन त्याप्रती घातलें ॥ २४ ॥ महापियाग करितां जाण । तेथें न घेच जो अवदान । तो वैष्णव वेष घरोनि सगुण । करितसे भोजन जगदात्मा ॥ २५ ॥ म्हणे बहुत दिवस क्षुधित उदरीं । म्हणोनि आलों तुमचें घरीं । आजि अन्न मिळालें पोटभरी । ऐसें श्रीहरी म्हणतसे ॥ २६ ॥ जितकी झाली पाक निष्पत्ती । तितुकेही जेविले रुक्मिणीपती । ढेंकर देऊनि यथास्थिती । करशुद्धि घेती मग तेव्हां ॥२७॥ घरस्वामीण संतोष मनें । मुखशुद्धि देतसे तुळसीपानें । आपुल्या उरलें नाहीं अन्न । परी समाधान चित्तासी ॥ २८ ॥ जाणोनि तियेचें मनोगत । मग प्रसन्न झाले लक्ष्मीकांत । जावोनि तिच्या माजघरांत । मडके रोवित स्वहस्तें ॥ २९ ॥ म्हणती या माजी द्रव्य बहुतसी पाही । लागेल तें नित्य घेत जायी । साधुसंत आलिया गृहीं । खर्चीत जायी सर्वदा ॥ ३० ॥ ऐसें बोलोनि हरिश्री । अदृश्य झालें त्या अवसरीं । वोगरासा आलिया घरीं । वर्तमान सत्वरी सांगितलें ॥ ३१ ॥ म्हणे तुह्मी गेलिया बाजारा । एक साधु पातला घरा । मग नथ विकूनी त्या अवसरा । भोजन सत्वरा घातलें ॥ ३२ ॥ जाते समयीं त्या वैष्णवानें । घरांत मडकें रोविलें जाण । म्हणे द्रव्य लागेल तुम्हांकारणें । तें यांतून घेणें नित्यकाळीं ॥ ३३ ॥ ऐसें बोलोनि मजप्रती । आपण गेला सत्वरगती । वोगरासा ऐकोनि वचनोक्ती । विस्मित चित्तीं होतसे ॥३४॥ विष्णुभक्त निरपेक्ष मनीं । मडक्यांत न पाहेच ते क्षणीं । तंव एके दिनीं वैष्णव मुनी । पातले सदनीं बहु फ.र ॥ ३५ ॥ घरीं ख्रचासि नव्हतें कांहीं । संकट पडलें ते समयीं । मडकें रोविलें मज गृहीं । त्यांत लवलाहीं पाहतसे ॥३६॥ घरस्वामीण कर घालितां । तों मोहरा होन लागले हाता । परम आश्चर्य वाटलें चित्ता । मग साधुसंतां तृप्त केलें ॥ ३७ ॥ वोगरासा म्हणे कांतेप्रती । वैष्णव नव्हे तो वैकुंठपती । तुजला कशी पडली भ्रांती । नाहीं श्रीपती पूजिला ॥ ३८ ॥ मज आधींच तुजकारणें । श्रीहरीनें दीधलें दर्शन । आतां व्यर्थ न ठेवीं जिणें । म्हणून रुदन करीतसे ॥ ३९ ॥ मग सद्गदित होऊनियां चित्तीं । सप्रेम भावें मांडिली स्तुती । जयजयाजी वैकुंठपती । व्यापक त्रिजगतीं तूं एक ॥ ४० ॥ निज भक्ताच्या कैवारें । घेतले नाना अवतार । मजही भेट त्याच प्रकारें । क्षुधातुर लोचनं हे ॥ ४१ ॥ निज भक्ताची देखोनि प्रीती । तत्काळ प्रगटले वैकुंठपती । चतुर्भुज सांवळी मूर्ती । शंख चक्रें हातीं मंडित ॥ ४२ ॥ कांसेसि[2] दिव्य पीतांबर । कानी कुंडलें मकराकार । गळा तुळसी मंजुरियांचे हार । श्रीमुख मनोहर शोभत ॥ ४३ ॥ ऐसें रूप देखोनि सुंदर । वोगरास करीतसे नमस्कार । पूजोनि भावाच्या उपचारें । रुक्मिणीवर जेवविला ॥ ४४ ॥ निज भक्ताच्या हृदयमंदिरीं । अंतर्धान पावले श्रीहरी । वैष्णव जेविती नित्य मंदिरीं । सहस्त्ररी तयाच्या ॥ ४५ ॥ आणि चरित्र रसाळ गहन । एक हरि आनंद वैष्णवजन । रामानंद संप्रदायी पूर्ण । श्रीहरी भजन करीतसे ॥ ४६ ॥ चराचर जें जें दिसे नयनीं । तें आत्मरूप अवघेचि मानी ।

१ डोले. २ कमरेस.

द्वैतभाव नसेचि स्वप्नीं । सप्रेम मनीं सर्वदा ॥४७॥ त्याचा अनुग्रह घेतां निश्चिती । बहुतां जनासि लागली भक्ती । अर्चन पूजा यथास्थिती । सप्रेम गती करीतसे ॥४८॥ अनुग्रह देऊनि एकासी । नगरांत पाठविती भिक्षेसी । शेरभर पीठ येतसे त्यासी । तें सद्गुरुपासीं ठेवितसे ॥ ४९ ॥ ईश्वरी कृपेकरोनि जाण । तितुक्यांत जेविती शत ब्राह्मण । ऐसे लोटतां बहुत दिन । वृत्ति संपूर्ण मुराल्या ॥ ५० ॥ तो कोणे एके दिवसी । रामानंद स्वामी संन्यासी । घेऊनि सकळ संप्रदायांसी । तया नगरासि पातले ॥ ५१ ॥ हरि आनंदाचा शिष्य जाण । नगरांत करी भिक्षाटण । रामानंदाच्या बिऱ्हाडास येऊन । सद्भावे नमन करी तया ॥ ५२ ॥ देखोनि म्हणे यतीश्वर । हा हरि आनंदाचा शिष्य थोर । सद्गुरु भक्तीसी असे तत्पर । परी आल्पायुषी साचार जाहला ॥ ५३ ॥ उदयीक तृतीय प्रहरी जाण । निश्चित असे याचें मरण । ऐकोनि रामानंदाचें वचन । चिंता मनीं उद्भवली ॥ ५४ ॥ मग सद्गुरूपाशीं जाऊनी । वर्तमान सांगे तये क्षणीं । म्हणे रामानंद उतरले ये ठिकाणीं । तयांसि नमस्कार जाऊनी म्यां केला ॥५५॥ मग त्यांणि पाहूनि सामुद्रिक लक्षण । स्वमुखें बोलिले लोकांकारणें । उदयीक तृतीय प्रहरीं जाण । पावले मरण निश्चित ॥ ५६ ॥ म्हणवोनि चिंता उपजली मानसीं । मी तों अभागी अल्पायुषी । सेवा घडली नाहीं मजसीं । ऐसियासी काय करावें ॥ ५७ ॥ सेवेची आस्था बहुत मनीं । अश्रुपात वाहती नयनीं । ऐसी अवस्था पाहोनि त्यांणीं । अभय पाणी दे गुरु ॥ ५८ ॥ म्हणे श्रीहरी कृपेनें निश्चित । चुकेल काळाचा आघात । कासया होसी चिंताक्रांत । ऐसें बोलत त्यालागीं ॥५९॥ एक रात्र लोटतांचि जाण । तो उदयासि पातला दिन । मग हरि आनंदें करोनि स्नान । नित्य नेम तेणें सारिला ॥ ६० ॥ सच्छिष्य बैसवोनि आपुले पाठीं । मग ध्यानांत आणिला जगजेठी । सगुण मूर्ति हृदयसंपुटीं । तो गोचर दृष्टीं पाहतसे ॥ ६१ ॥ सांवळा सुकुमार राजीवनेत्र । कांसेसि दिव्य पीतांबर । चतुर्भुज वैकुंठविहार । देखतांचि विरे देहभान ॥ ८२ ॥ दिव्य कुंडलें वैजयंती । शंख चक्र आयुधें हातीं । कौस्तुभाची झळके दीप्ती । जैसा गभस्ती[2] उगवला ॥ ६३ ॥ हृदयीं श्रीवत्सलांछन । आजानुबाहु लक्ष्मीरमण । समचरणीं उभा जगज्जीवन । सुकुमार ठाण साजिरें ॥ ६४ ॥ हरि आनंदें सप्रेम युक्ती । ध्यानांत आठविला वैकुंठपती । तैसीच बाहेर प्रकटली मूर्ती । सबाह्य स्थिती सारिखी ॥ ६५ ॥ सगुण स्वरूपीं जडलें चित्त । देहभान नसे किंचित । तों शिष्यांसि न्यावया काळदूत । आले अकस्मात तें ठायीं ॥ ६६ ॥ जेथें देवभक्तांची ऐक्यता । तेथें काळासि रीघ नव्हे सर्वथा । सुदर्शन घरटी घालितां । परी सर्वथा श्रम होयची ॥ ६७ ॥ एक प्रहरपर्यंत । काळ तयासि न्यावया पाहत । परी सर्वथा रीघ न होयचि तेथ । मग परतोनि दूत ते गेले ॥ ६८ ॥ मग शिष्य म्हणतसे करोनि विनंती । मरणाची वेळ चुकली निश्चिती । अस्तमानासि चालिला गभस्ती । आतां होईजे चित्तीं सावध ॥ ६९ ॥ हरि आनंदाचें एकाग्र मन ।

१ हान. २ सूर्य.

सर्वथा नसेचि देहमान । मग सगुणमूर्ती हृदयीं साठवून । नेत्र तेणें उघडिलें ॥ ७० ॥ सावध होतांचि तयेक्षणीं । शिष्य सद्भावें लागला चरणीं । मग झोळी घेऊनि दुसरें दिनीं । भिक्षेलागुनी तो गेला ॥ ७१ ॥ त्यासि रामानंद देखतांचि दृष्टी । परम विस्मय वाटला पोटीं । म्हणती कैसा वाचला ये संकटीं । साकल्य गोष्टी सांगितली ॥ ७२ ॥ मग हरि आनंदाच्या आश्रमासी । पातला रामानंद संन्यासी । नमस्कार करोनि सद्भावेंसी । निजप्रीतीसीं भेटले ॥ ७३ ॥ म्हणती योगधारणेंचेनि बळें । आम्ही चुकवूं आपुला काळ । परी दुसरियासि वांचवावया येवेळ । सामर्थ्य प्रबळ मज नाहीं ॥ ७४ ॥ तेव्हां हरि आनंदें धरोनि प्रेमा । म्हणे हा स्वामीच्या कृपेचा महिमा । मग रामानंद गेलिया आश्रमा । श्रीपुरुषोत्तमा भजतसे ॥ ७५ ॥ योगी यापरी साचार । सगुण भक्तीचा महिमा थोर । भावाचा भुकेला रुक्मिणीवर । उणें अणुमात्र पडो नेदी ॥ ७६ ॥ आणिक भक्त चरित्र अपूर्व । सादर ऐका भाविक सर्व । तापीच्या तटीं अमळाळ गांव । तेथें भक्तवैष्णव एक झाला ॥७७॥ रामचंद्र भट नाम त्यास । श्रीहरि भजन करीतसे । वेदशास्त्रीं निपुण नसे । परी निरपेक्षता असे मानसीं ॥ ७८ ॥ सोनें आणि दगड मातीं । ज्याच्या दृष्टीसि सारिखीं दिसती । हिरे रत्नें खडे भासती । दुराशा चित्तीं उपजेना ॥ ७९ ॥ घरीं अग्निहोत्र देवतार्चन । भिक्षा मागोनि सेवितसें अन्न । रायाचा उपाध्याय असे जाण । परी न पाहेचि सदन तयाचें ॥ ८० ॥ राजकांतेचा हेत उपजला जीवीं । म्हणे यासि द्रव्य अर्पावें कांहीं । मग रामचंद्र भटाच्या स्त्रियेसि गृहीं । बोलावूनी पाही ते नेत ॥ ८१ ॥ आपुले रत्नजडित अलंकार । तिजला अर्पण केले समग्र । मग सद्भावें करित नमस्कार । म्हणे याचा अव्हेर न करावा ॥ ८२ ॥ रामचंद्र भटाची पत्नि । घरासि आली भूषणें लेउनी । ते भ्रताराने देखोनि नयनीं । निर्भर्त्सुनि काय बोले ॥ ८३ ॥ कांतेसि म्हणे तें अवसरीं । कासया उपाधि आणिली घरीं । याची आशा धरिलीयावरी । तरी श्रीहरी अंतरेल ॥ ८४ ॥ भ्रतार वचन ऐकोनि त्वरित । भूषणें काढिली रत्नजडित । अग्नीचें कुंड प्रदीप्त होतें । तया आंत टाकिलीं ॥ ८५ ॥ उपाधि रहित होतां पत्नी । रामचंद्र भटासि संतोष मनीं । अघटित झाली असे करणी । ते रायासी कोणी सांगती ॥ ८६ ॥ ऐसें ऐकोनि नृपनाथ । कुळगुरूच्या गृहासि येत । म्हणे अलंकार जे दीधले तुम्हातें । ते परतोनि त्वरित द्या स्वामी ॥ ८७॥ मग परमसंकट जाणोनि थोर । यज्ञ नारायण स्तविला फार । मग रत्न जडित अलंकार । त्यांतून समग्र निघाले ॥ ८८ ॥ रत्नकीळा मुक्ताफळें । पहिल्यापरीस देती ढाळ । हें कौतुक देखोनि तयेवेळ । चरणीं भूपाळ लागला ॥ ८९ ॥ यावरी कुळगुरु बोले वचन । हे अलंकार घेई संपूर्ण । राजा म्हणे दीधलें दान । न घें परतोन सर्वथा ॥ ९० ॥ चमत्कार पहावयासि देख । स्वामींसि छळिलें नावेक । मग रामचंद्रभटें मेळवुनि याचक । मग ते सकळिक वांटिले ॥ ९१ ॥ धरोनि निरपेक्षता शांति विरक्ती । श्रीहरि भजन करितसे प्रीती । ऐशी संताची अनुपम

स्थिती । वर्णीतां मती कुंठित ॥ ९२ ॥ आतां अमदाबादेमाजी चोखडा । सुहागशाहा भक्त निधडा । तो तरी जातीचा असे हिजडा । परी हरिरूपीं चोखडा मीनला तो ॥ ९३ ॥ स्त्री पुरुष नपुंसक । चौथा तो स्त्रेण आणिक । तो पुरुष रत्न पाहुनि देख । मग विषयसुख भोगीतसे ॥ ९४ ॥ सुहागशाहाची स्त्रेण राहाटी । परी आणिक पुरुष न पाहे दृष्टी । ध्यानांत आणोनि जगजेठी । हृदयसंपुटीं धरितसे ॥ ९५ ॥ चतुर्भुज पितांबर धारी । शंखचक्र मंडित करीं । श्रीमुख साजिरें नेत्रद्वारीं । पाहतांचि अंतरीं निवतसे ॥ ९६ ॥ जो सकळ जीवांचा विश्रांम । जगद्गुरु आत्माराम । त्याचें मुखीं स्मरतांचि नाम । तत्काळ भवश्रम निरसे ॥ ९७ ॥ जे स्त्रीपुरुष नपुंसक । चौथा तो स्त्रेण आणिक । या सर्वांचे अंतरीं असे एक । वैकुंठनायक जगद्गुरु ॥ ९८ ॥ जो व्यापक असोनि सर्व देहीं । कोणाच्या कर्मासि लिप्त नाहीं । तो लक्ष्मीकांत शेषशायीं । सुहागशा जीवीं ध्यातसे ॥ ९९ ॥ स्त्रयाती नगरांत घालिती फेरी । परी न जाय तयांच्या बरोबरी । सर्वदा राहे आपुलें घरीं । स्मरण अंतरीं श्रीहरीचें ॥ १०० ॥ म्हणे बाहेर हिंडतां साचार । दृष्टीसि पुरुष पडतील फार । मग चित्त धांवेल तयांवर । कामातुर होऊनियां ॥ १ ॥ म्हणवोनि एकाग्र होवोनि मनें । सर्वदा करी नामस्मरण । काम कल्पनें करोनि जाण । श्रीविष्णूचें ध्यान आठवी ॥ २ ॥ कामें अथवा वैराकारें । चित्तीं निदिध्यास लागतसे फार । जाणोनि तयाचा सद्भाव थोर । मग सात्क्षाकार जाहला ॥ ३ ॥ सगुणरूपें जगजेठी । तयासि सर्वदा देतसे भेटी । ध्यान सांठवोनि हृदयसंपुटी । सप्रेम पोटीं निवाला ॥ ४ ॥ तंव कोणे एके दिवसीं जाण । तद्देशी पडिलें अवर्षण । प्राणी पावती मृत्युसदन । न मिळेचि अन्न म्हणोनियां ॥ ५ ॥ कधीं होईल मेघवृष्टी । सकळ जीवांची वरतीच दृष्टी । चातकासि तृषा लागतांची मोठी । आर्त पोटीं जेविं वाटे ॥ ६ ॥ तंव तया नगरींचा नृपनाथ । पर्जन्यासाठीं अनुष्ठान करित । तयासि उपवास घडले सात । मग दृष्टांतीं सांगत जगदात्मा ॥ ७ ॥ जो देवाधिदेव लक्ष्मीरमण । अधिकारियासि दाखवीत स्वप्न । ब्राह्मणाच्या रूपें जगज्जीवन । निद्रेंत येऊन सांगती ॥ ८ ॥ म्हणे सुहागशा भक्त निर्धारीं । राहिला असे हिजडियांचे घरीं । त्याणें भक्तिभाव धरोनि निर्धारीं । वैकुंठविहारी वश्य केला ॥ ९ ॥ तरी तुवा सांडोनि थोरपण । निरभिमान होईजे मनें । सुहागशहासि जावोनि शरण । साष्टांग नमन करावे ॥ ११० ॥ जो का विश्वाचा प्रतिपाळ करी । तो संतुष्ट होऊनि श्रीहरी । पर्जन्य पाडील पृथ्वीवरी । निश्चय अंतरी असोंदे ॥ ११ ॥ कांहीं अहंता धरिशीस जर । तरी मेघ न वर्षे अणुमात्र । ऐसा दृष्टांत देखोनि थोर । मग जागृतीसि सत्वर तो आला ॥ १२ ॥ स्वप्नींचा अभिप्राय करोनि निका । स्वमुखें सांगतसे लोकां । आम्हीं अनुष्ठान करितां देखा । हें वैकुंठनायका जाणवलें ॥ १३ ॥ विप्रवेषें येऊनि श्रीहरी । स्वमुखें सांगे स्वप्नांतरी । सुहागशा हिजडा नगरांतरी । नमस्कार करीं त्याजला ॥ १४ ॥

१ विश्रांतिस्थान.

कांहीं अनमान धरितां पोटीं । सर्वथा न होय मेघवृष्टी । ऐसें स्वप्न देखिलें दृष्टी । कैसी गोष्टी करावी ॥ १५ ॥ ऐसें पुसतां सुभेदार । लोक बोलती थोर थोर । अवर्षणें विश्व गांजिलें फार । तरी करावा नमस्कार तयासी ॥ १६ ॥ मग सहपरिवारें अधिकारी । पातले हिजडियाचे घरीं । सुहागशासि म्हणे ते अवसरीं । आम्हीं स्वप्न रात्रीं देखिलें ॥ १७ ॥ कीं तुझ्या आज्ञेनें उठाउठी । तत्काळ होईल मेघवृष्टी । तरी जनाची दया धरोनि पोटीं । आमुची गोष्टी ऐकावी ॥ १८ ॥ ऐशारीतीं विनवित उत्तर । बोलोनि सद्भावें जोडिती कर । निरभिमान होऊनि सत्वर । साष्टांग नमस्कार घातला ॥ १९ ॥ शरण येतांचि अधिकारिया । चित्तीं अनुताप जाहला तया । सुहागशा म्हणे देवराया । हे उपाधि कासया वाढली ॥ १२० ॥ सर्व जीवांत कुलक्षण । तो मी जातीचा असे हीन । कृपा करशील कवण्या गुणें । हे मजकारणें नेणवे ॥ २१ ॥ ऐसें म्हणवोनि चित्तांत । मग तो उतरला अंगणांत । वरतें मुख करोनि पाहत । परी मेघ निश्चित वर्षेना ॥२२॥ मग लावोनियां नेत्रपातीं । हृदयीं चिंतली श्रीविष्णुमूर्ती । जयजय करुणासागर वैकुंठपती । व्यापक त्रिजगती तूं एक ॥ २३ ॥ जयजयाजी करुणाकरा । भक्तवत्सला कृपासागरा । अनाथबंधु दीनोद्धारा । सर्वेश्वरा आदिपुरुषा ॥ २४ ॥ तुवां अधिकारियासि दृष्टांत देऊनियां । माझी उपाधि वाढविली कासया । आतां कां न पावसी देवराया । सांग लवलाह्या ये समयीं ॥ २५ ॥ ऐशा परी केली स्तुत । परी न पावेचि वैकुंठनाथ । मग राग धरोनि चित्तांत । काय बोलत देवासि ॥ २६ ॥ म्हणे आजपासोनि तुझी प्रीत । मी न करीच सर्वथा जाण निश्चित । नारींची काढोनि घेतली नथ । आणि फोडूं पहात कांकणें ॥ २६ ॥ ऐसा देखोनि तयाचा निकर । तत्काळ पावले जगदुद्धार । मेघ वर्षो लागला थोर । जयजयकार लोक करिती ॥ २८ ॥ बहुत दिवसांचे अवर्षण । घातलें पृथ्वीसि पालाण । चौदा दिवसपर्यंत जाण । अहोरात्र घन वर्षला ॥ २९ ॥ देशाधिकारी येऊनि पुढती । सुहागशासि स्वमुखें करिती विनंती । कांहीं मागावें मजप्रती । म्हणवोनि ग्लांती करीतसे ॥ १३० ॥ ऐकोनि म्हणे विष्णुभक्त । कांहीं इच्छा नसेचि मनांत । सोनें आणि माती निश्चित । सारिखी भासत मजलागीं ॥ ३१ ॥ श्रीहरि चिंतन करीतसें मानसीं । सकळ सिद्धि आंदण्या दासी । मानवियानें काय द्यावें मजसी । उत्तर तयासि दीधलें ॥ ३२ ॥ तुजसी दृष्टांत होऊनियां । जनांत उपाधि वाढविली वायां । तरी आतां समाधि घेऊनियां । नाशवंत काया सांडावी ॥ ३३ ॥ अधिकारियासि आज्ञा करितां पाहीं । गर्ता खणविली ते समयीं । हृदयीं चिंतोनि शेषशायी । करीतसे कायी तें ऐका ॥ ३४ ॥ गर्तेमाजी उभा राहोनि प्रीती । हृदयीं चिंतिलीं श्रीविष्णुमूर्ती । सांवळा चतुर्भुज श्रीपती । येऊनी त्याप्रती भेटत ॥ ३५ ॥ सुहागशहा समाधिस्थ होत । नगरामाजी प्रगटलीं मात । सुमनें बुका आणुनि उधळीत । लोक बहुत मिळाले ॥३६॥ टाळ विणे मृदंग घेऊन । वैष्णव गाती भगवद्गुण । तों सुहागशाहा लोकांसि म्हणे । माझें वचन अवधारा ॥ ३७ ॥ माझें दीक्षेसि अंगीकार करितां । तेणें नासेल भवव्यथा । ऐसें सांगे

१ खड्डा.

लोकां समस्ता । परी कोणाच्या चित्तां न ये कीं ॥ ३८ ॥ निंद्य वेष भासतसे जनीं । म्हणवोनि तयासि न घेती कोणी । तों एक अनाथ दुर्बळ ते क्षणी । येऊनि चरणी लागला ॥ ३९ ॥ तो म्हणे कृपा करोनि मजवर । निरसावा दुस्तर संसार । जाणोनि तयाचें अंतर । उपासना मंत्र सांगितला ॥ ४० ॥ मग कांकणे काढोनि त्वरित । घातलीं तयाच्या हातांत । नाक टोचोनि नथ घालित । संप्रदाय चालत अद्यापि तो ॥ ४१ ॥ श्रीहरीचें रूप आणोनि ध्यानीं । समाधिस्थ जाहला तये क्षणीं । आपल्या दासाची चक्रपाणी । सत्कीर्ति जनी वाढवित ॥ ४२ ॥ तो जगद्गुरु दीनदयाळ । न पाहेचि याती कुळ । न विचारी काळ वेळ । पावे तात्काळ भक्तासि ॥४३॥ आणिक चरित्र रसाळ बहुत । सादर ऐका भाविक भक्त । गुर्जर देशात जाहला संत । पन्हाजी रजपूत नाम त्याचें ॥ ४४ ॥ डोंगरपूर वासावडे जाण । तेथील असे नृपनंदन । खुमानासिंग असे त्याचें नामाभिधान । चमत्कार तेणें देखिला ॥ ४५ ॥ पन्हाजी रजपुत तयापासि । होता आवडता विश्वासी । नित्य रायाचे शेजेपाशी । दिवसनिशी वसतसे ॥ ४६ ॥ कुटुंब रक्षणार्थ संसारीं । विश्वासें रायाची सेवा करी । द्वारकेचीं मूर्ति पाहोनि बरी । ते ध्यान अंतरीं आठवितसे ॥४७॥ सर्वकाळ नामस्मरण । असत्य सर्वदा न बोले वचन । ऐसें लोटतां बहुत दिन । साक्षात्कार तेणें पाहिला॥४८॥ तों दिपवाळीचे अमावास्येसि जाण । दीपोत्सव करितसे नृपनंदन । अर्धरात्र लोटतांचि जाण । निद्रे कारणें गृहा येत ॥ ४९ ॥ सन्निध देखोनि भूपती । तों पन्हाजी उठे सत्वर गती । आंगब्याची दावण धरोनि हातीं । सत्वर गती चोळीतसे ॥ ५० ॥ ऐसें विपरीत देखोनि तेथ । पन्हाजीस पुसे नृपनाथ । दावण चोळिला त्वां किमर्थ । सत्य वृत्तांत सांगावा ॥ ५१ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । द्वारकेसि दीपोत्सव होत । तों अरिष्ट जाहले असे अद्भुत । तोही वृत्तांत अवधारा ॥ ५२ ॥ श्रीकृष्ण मूर्तींसि पुजारियाणें । बहुत घातलीं वस्त्रें भूषणें । तों देवाच्या आंगब्या कारणें । कापुराचा अग्न लागला ॥ ५३ ॥ तें येथून दृष्टीसि देखिलें आतां । म्हणवोनि स्वहस्ते विझविला नृपनाथा । ऐशी ऐकोनियां वार्ता । विस्मित चित्तां होतसे ॥५४॥ मग पन्हाजीसि पुसतसे भूपती । देवांचीं वस्त्रें कैशा रीतीं । हें सत्वर सांगावें मजप्रती । आणवूं प्रचीती उदईक ॥ ५५ ॥ म्हणे हिरवा साज ये अवसरीं । घातला आहे देवावरी । माझे दृष्टीसि मूर्ति साजिरी । ऐशा परी दिसतसे ॥ ५६ ॥ तों राबब्याचा नृपवर । साडू त्याचा परम मित्र । त्यासि खुमानसिंगें लिहिलें पत्र । आपुल्या निजकरें तेधवां ॥ ५७ ॥ म्हणे दिपवाळीचे रात्रीं द्वारकेसि पाहे । विष्णु मंदिरीं वर्तलें काय । कोणतें अरिष्ट जाहलें आहे । तो धाडिजे प्रत्यय आम्हांसी ॥ ५८ ॥ पुजारीयांणीं कैसी केली सेवा । कोणत्या रंगाचीं वस्त्रें देवा । साकल्य वृत्तांत बरवा । लेहोनि पाठवा आम्हांसी ॥ ५९ ॥ ऐशारीतीं तीं लेहोनि पत्र । खुमानासिंग पाठवी वार्तिकार । राबब्याचा राजा ऐकोनि सत्वर । लिहितसे उत्तर काय त्यासी ॥ १६० ॥ दिपवाळीचे दिवसीं निश्चिती । दीप उत्सव नानारीतीं । करितां लोटली अर्ध


रात्रीं । मग कापुर आरती उजळली ॥ ६१ ॥ हिरवा साज देवावर । वस्त्रें होती अतिसपूर । खालीं आंगड्याचा होता फेर । तयासि कापुर लागला ॥६२॥ पन्हाजी रजपूत तये वेळीं । सन्निध होता देवा जवळी । तो आपुल्या हस्तें करोनि चोळी । अग्नि तत्काळीं विझवला ॥ ६३ ॥ ऐसें येतां पत्राचें उत्तर । रायें मानिला चमत्कार । मग पन्हाजी पासीं येऊनि सत्वर । करितसे नमस्कार सद्भावें ॥ ६४ ॥ म्हणे तूं साक्षात्कारी विष्णुभक्त । ऐसी अनुभवें आली प्रचीत । आमुचे सेवेसि असावें नित्य । तरी हें अनुचित दिसतसे ॥ ६५ ॥ सच्चिदानंद द्वारकावासी । तुम्हीं सर्व भावें भजावें त्यासी । दोन गांव घरखर्चासी । दीधले त्यासी नृपनाथें ॥ ६६ ॥ पन्हाजी भक्त निरंतर । अनन्य-भावें भजन करी । सांडोनि रायाची चाकरी । द्वारकापुरीं राहतसे ॥ ६७ ॥ आणिक जयमल्ल नामें नृपवर । मेडत्यांत होता वैष्णववीर । त्यासि विष्णुअर्चनीं आर्त थोर । सर्वोपचारें पूजितसे ॥ ६८ ॥ एक प्रहरपर्यंत जाण । एकांतीं बैसे नृपनंदन । आज्ञा केली सकळांकारण । विक्षेप कोणी न करावा ॥ ६९ ॥ रायाच्या भयें निर्धारीं । कोणी न जाती देवघरीं । मूर्ति पूजोनि सर्वोपचारीं । मग बाहेरी येतसे ॥ १७० ॥ मुखीं नामाचा उच्चार । सांवळा म्हणे वारंवार । रायाचा धाकटा सहोदर । तो वांटा बरोबर घेईन म्हणे ॥ ७१ ॥ एकवट न राहे साचार । रुसोनि गेला असे दूर । तेथें सैन्य ठेऊनियां फार । मेडत्यावर तो आला ॥ ७२ ॥ विष्णुअर्चनाची जाणुनियां वेळ । झुंजावयासि तो पातला खळे[1] । जयमल्लाच्या प्रधानें प्रबळ । धरोनि तुंबळ युद्ध केलें ॥ ७३ ॥ परी तो सर्वथा नाटोपेचि जाण । प्रधानें केलें पलायन । रायाच्या मातेपासीं येऊन । वर्तमान सांगीतलें ॥ ७४ ॥ म्हणे वैरियाचें बळ बहुत । आतां कैसी करावी युक्त ॥ रायासि सांगतां वृत्तांत । तरी अर्चन करीत विष्णूचें ॥ ७५ ॥ ऐसें प्रधानें सांगतां । मग देवघरांत गेली माता । जयमल्लासि सांगितली वार्ता । म्हणे कैसें आतां करावें ॥ ७६ ॥ श्रीहरीचें करितां अर्चन । उत्तर नेदीच माते कारण । सांवळा म्हणोनि बोलिला वचन । तो जगज्जीवन काय करी ॥ ७७ ॥ म्हणे हा लागला माझें ध्यानीं । तरी आपण यावें कार्य साधुनी । मग सगुणरूप धरोनि चक्रपाणी । अश्वारूढ होऊनि चालिले ॥ ७८ ॥ नगरद्वार उघडोनि सत्वर । बाहेर गेले सारंगधर । युद्ध केलें घोरांदरें[2] । तेणें सैन्य समग्र पळालें ॥ ७९ ॥ गांवकुसावरूनि जाण । पाहती नगरवासी जन । म्हणती हा तरी असे कोण । शत्रु संपूर्ण पळविले ॥ १८० ॥ जयमल्लाच्या शत्रूसि बांधुनी । पागेंत आणी चक्रपाणी । मग आपण अदृश्य तेच क्षणीं । कैवल्यदानीं होतसे ॥ ८१ ॥ विष्णुअर्चन करोनि सांग । जयमल्ल येतसे मग । प्रधान साकल्य वृत्तांत सांगे । म्हणे पुरुष निजांगें एक आला ॥ ८२ ॥ त्याणें युद्ध करोनि थोर । सैन्य पळविलें समग्र । तुमच्या बंधूसि सत्वर । बांधोनि साचार आणिलें ॥ ८३ ॥ राजा विस्मित जाहला मनीं । म्हणे हे तों सांवळ्याची करणी । मज निमित्त आजिचे दिनीं । चक्रपाणी शिणलासे ॥ ८४ ॥ स्वमुखें स्तविला जगज्जीवन । म्हणे त्वां बंधूसि साक्षात दीधलें


१ दुष्ट. २ घनघोर.

दर्शन । माझा अपराध काय म्हणोन । मग उपोषण पांच करी ॥ ८५ ॥ निश्चय देखोनि वैकुंठवासी । सगुण साक्षात भेटले त्यासी । पश्चात्ताप जाहला बंधूसी । म्हणे वैर तुम्हांसी व्यर्थ केलें ॥ ८६ ॥ जयमल्लें सोडिलें बंधूसी । वस्त्रें देऊन गौरवी त्यासी । म्हणे तुज भेटला हृषीकेशी । पार भाग्यासी असेना ॥ ८७ ॥ त्याणें वैरभाव टाकोनि सर्वही । विष्णुभक्तीसि लागला पाही । आंच बैसल्यावीण कांहीं । अनुताप नाहीं जीवासी ॥ ८८ ॥ संतचरित्र रसाळ आणिक । सादर ऐका भक्त भाविक । श्रीधरपंत ब्राह्मण एक । परम विश्वासिक मानसीं ॥ ८९ ॥ भोळा भाविक असे प्रेमळ । भजन करीत सर्वकाळ । कांतेचेंही चित्त निर्मळ । तयासि घननीळ पावला ॥ ९० ॥ विनोदें हास्य करीतसे कोणी । तरी सत्यचि भासे तयालागुनी । एकदा कांतेसि सवें घेउनी । यात्रेलागुनी चालिला ॥ ९१ ॥ स्त्रीसि बैसवोनि अश्वावरी । आपण हांकीतसे सत्वरी । वस्तभाव खर्ची असे पदरीं । तों अरण्य भारी लागलें ॥ ९२ ॥ तंव सवेचि चोरें गाठिलें तये ठायीं । बरोबरी चालती लवलाहीं । परम भय वाटलें जीवीं । मग कांता कायी बोलतसे ॥ ९३ ॥ अस्तमानासि चालिला तमारी । आणि वोसाड अरण्य लागलें तरी । मजला भय वाटलें भारी । परतोनि माघारीं जाऊं आतां ॥ ९४ ॥ तस्कारासि मैंदाचा वेष । काय बोलती श्रीधरास । आमुची संगत असतां तुम्हांस । भय कां चित्तास वाटतें ॥ ९५ ॥ येरू म्हणे विश्वास नाहीं । कांहीं प्रमाण करा ये समयीं । तरीच भय निरसेल सर्वही । मग तस्कर कायी बोलती ॥ ९६ ॥ तुम्हां आम्हांमाजी परम । मध्यस्थ असे आत्माराम । तो देवाधिदेव पुरुषोत्तम । हरितसे श्रम भक्ताचे ॥ ९७ ॥ ऐसी क्रिया करितांचि त्याणीं । स्त्रीपुरुषें विश्वासलीं मनीं । मार्ग क्रमितां ते ठिकाणीं । तों दुर्बुद्धींनीं काय केलें ॥ ९८ ॥ परमार्थ गोष्टी बोलोनि त्याणीं । श्रीधरासि घातली मोहनी । मग प्राण घेतले तये क्षणीं । शिरच्छेद करोनी तयाचा ॥९९॥ वस्तभाव कांतेसहित । दुर्बुद्धिते हिरोनि नेत । तिजला समजला वृत्तांत । मग मागें पाहत क्षणक्षणां ॥ २०० ॥ तस्कर म्हणती तुझा भ्रतार । आम्हीं मारिला साचार । आतां काय पाहतेसि माघारें । सांग सत्वर आम्हांसी ॥ १ ॥ ऐसें बोलतांचि ते दुर्मती । काय उत्तर देतसे सती । तुम्हां आम्हांमध्यें निश्चिती । अयोध्यापती राम होता ॥ २ ॥ ज्याचा विश्वास धरितांचि मनें । पति पावला मृत्युसदन । तो राम आला कीं नाहीं म्हणोन । मागें परतोन पाहतसें ॥ ३ ॥ जो अंतरसाक्ष चैतन्यमूर्ती । व्यापक असे सर्वांभूतीं । तो आयोध्याधीश जानकीपती । त्याची वाट निश्चिती पाहतसें ॥ ४ ॥ ज्याणें दशाननासि निवटूनी । देव सोडविले बंदीहूनी । तो भक्तकैवारी कैवल्यदानी । येईल म्हणोनी पाहतसें ॥ ५ ॥ ज्याणें निजभक्तांच्या कैवारें । घेतले नाना अवतार । तो कोठें गुंतला रघुवीर । पडिला विसर कां माझा ॥ ६ ॥ ऐसें बोलतांचि ते भामिनी । श्रीराम प्रगटला ते ठिकाणीं । धनुष्यबाण हातीं घेउनी । तस्करें मारूनी टाकिले ॥ ७ ॥ तिच्या भ्रताराचें पडिलें प्रेत । ते स्थळीं जातसे रघुनाथ । अमृतदृष्टीं विलोकूनि त्यात । स्वहस्तें उठवीत जगदात्मा ॥ ८ ॥ सुगम मार्ग लागे

१ सूर्य. २ चोर.

जेंवर । जातसे त्यांच्या बरोबर । सुसंगत लागतां वाटेवर । अदृश्य रघुवीर मग झाला ॥ ९ ॥ निज भक्ताच्या कैवारें । धरीतसे नाना अवतार । करावया दुष्टांचा संहार । गदा चक्र वागवित ॥ २१० ॥ जो अच्युतानंत श्रीहरी । चरित्रें दाखवीत नानापरी । महीपति त्याच्या अभयवरीं । सत्कीर्ति पत्रीं लिहीतसे ॥ ११ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । त्रेचाळिसावा अध्याय गोड हा ॥ २१२ ॥ ॥ अ० ४३ ॥ ॥ ओंव्या २१२ ॥




अध्याय ४४
श्री विठ्ठल
हरिपाळ
पुजारी

श्रीगणेशाय नमः । गोदा यमुना सरस्वती । कृष्णा तुंगभद्रा भागीरथी । चंद्रभागा आणि भीमरथी । कीर्तनांत येती निजप्रेमें ॥ १ ॥ तापी मही आणि प्रहरा । नर्मदा गोमती वेण्या निरा । ककुद्मी तीर्थ पुष्करा । कुशावर्त शंकरा प्रिय असे ॥ २ ॥ स्वर्गींचें तीर्थ मंदाकिनी । भोगावती पाताळ वाहिनी । पर्वकाळासहित येउनी । सुस्नात कीर्तनीं त्या होती ॥ ३ ॥ आणिक ही पृथ्वीचीं बहुतीर्थे । पुराण प्रसिद्ध नामांकित । भक्त कथा वाचितां निश्चित । येती त्वरित त्या ठायां ॥ ४ ॥ चित्तीं धरोनि बहुत आर्त । श्रवणासि बैसती साधुसंत । तयांसि सकळ तीर्थांचें स्नान घडत । अनुतापयुक्त ते काळीं ॥ ५ ॥ मागिले अध्यायाचे शेवटीं कथा । सर्व चोरें श्रीधरासि मारितां । परतोनि पाहतांचि त्याची कांता । तों आले अवचितां रामचंद्र ॥ ६ ॥ धनुष्यबाण घेऊनि हातीं । तस्कर मारिले दुर्मती । श्रीधरासि श्रीजानकीपती । सजीव करिती निजकृपें ॥ ७ ॥ आणिक कथा बहु रसाळ । सादर ऐका भक्त प्रेमळ । एक धनवंत वैष्णव केवळ । असे हरिपाळ नाम त्याचें ॥ ८ ॥ संतांच्या चरणीं त्याचा भाव । सप्रेमें पूजी हरिभक्त वैष्णव । सामान्य मानी इतर जीव । संत तेचि देव साक्षात ॥ ९ ॥ वैष्णवभक्त येतांचि नगरा । तयांसि जातसे सामोरा । नमस्करोनि त्या अवसरा । निज मंदिरा नेतसे ॥ १० ॥ सर्वोपचारें करोनि पूजन । मग देतसे इच्छा भोजन । वस्त्रें अलंकार भूषणें । यथा शक्तीनें अर्पितसे ॥ ११ ॥ ऐसी सेवा करितांचि प्रीती । पदरींची वेंचिली धनसंपत्ती । कोठें हात नचलें निश्चिती । म्हणे कैसी युक्ती करावी ॥ १२ ॥ मागील सत्कीर्ति ऐकोनी कानीं । वरासि येती वैष्णव मुनी । विमुख होतां त्यांजलागोनी । तरी सत्वासि हानी येईल ॥ १३ ॥ ऐसा विचार करोनि मनें । मग काय युक्ति योजिली त्याणें । तस्कराचें रूप धरोन । पांथस्थाचें धन हरितसे ॥ १४ ॥ भय दाखवोनि बहुवस । वाटसरांचे वित्त हरीतसे । परी जीवें न मारी कोणास । करुणा वसतसे अंतरीं ॥ १५ ॥ संतांचा वेष देखोनि पाहीं । तयांसि उपद्रव न देच कांहीं । इतर जनांचे लवलाहीं । वित्त सर्वही हरीतसे ॥ १६ ॥ ऐशा रीतीं करोनि जाण । करीतसे संतसेवन । म्हणे मी हरितों ज्यांचें धन । तयांसीच पुण्य हें घडो ॥ १७ ॥ ऐसा चित्तीं निरभिमान । लोटोनि गेले बहुत दिन । तों अद्भुत चरित्र वर्तलें गहन । तें ऐका सज्जन भाविक हो ॥ १८ ॥ घरीं संतजन आले बहुत । अन्न तों मंदिरांत नसे किंचित । मग होऊनि चिंताक्रांत । अरण्यांत तो गेला ॥ १९ ॥ धनुष्यबाण घेऊनि तेथ । पांथस्थांची वाट पाहत । परी सर्वथा कोणी नयेचि तेथ । मग चिंताक्रांत मानसीं ॥ २० ॥ म्हणे गति करावी कैसी । साधु राहती उपवासी । तों देवाधिदेव वैकुंठवासी । कौतुक तयासी दाखवितसे ॥ २१ ॥ सावकाराच्या रूपें सारंगधर । आपण बैसले गाडीवर । जवळ रुक्मिणी असे सुंदर । प्रगटले सत्वर ते ठायीं ॥ २२ ॥ तें हरिपाळें देखोनि नयनीं । परम संतोष वाटला मनीं । मग धनुष्यासि बाण लावोनी । आडवा होऊनी काय

बोले ॥ २३ ॥ धनवित्त आतां सांडोनि देणें । नाहींतरी तत्काळ घेईन प्राण । करुणा भाकीत जगज्जीवन । परी नायकेचि वचन सर्वथा ॥ २४ ॥ निजभक्ताचें भय बहुत । चित्तीं वागवूनि वैकुंठनाथ । वस्त्रें अळंकार द्रव्य समस्त । तयासि अर्पित जगदात्मा ॥ २५ ॥ रुक्मिणीचे अलंकार सकळ । उतरोनि घेतसे हरिपाळ । देवासि नागवोनि ते वेळ । आला तत्काळ मंदिरा ॥ २६ ॥ वैष्णवजनांसि बरव्यापरी । भोजन घातलें ते अवसरीं । इकडे रुक्मिणी म्हणतसे श्रीहरी । आतां कैसीपरी करावी ॥ २७ ॥ वस्त्रें अलंकार निश्चित । हिरोनि नेलीं तुमच्या भक्तें । हरी म्हणे जीवें रक्षिलें आम्हातें । हा उपकार चित्तीं न मानिसी ॥ २८ ॥ संतसेवेचेनि निमित्तें । हरितसे पांथस्थांचें वित्त । तव रुक्मिणी म्हणे त्याची स्थित । मजसी त्वरित दाखवा ॥ २९ ॥ संतचरणीं त्याची आर्ती । कैशी पूजा कैसी भक्ती । जावोनि पाहावें सत्वर गती । मग वैकुंठपती अवश्य म्हणे ॥ ३० ॥ मग संताचा वेष जगज्जीवन । धरीतसे निजप्रीतीनें । तुळसीमाळा गळा घालून । गोपीचंदन लाविलें ॥ ३१ ॥ ऐसें नटतां चक्रपाणी । तों वैरागीण जाहली रुक्मिणी । हरिपाळाच्या घरासी जावोनि । सीताराम ध्वनी बोलती ॥ ३२ ॥ हें दृष्टीसी देखतांचि त्याणें । साष्टांग घातलें लोटांगण । बैसावयासि देऊनि आसन । करीतसे पूजन सद्भावें ॥३३॥ पात्रें वाढोनि तये क्षणीं । उभयतांसि बैसविलें भोजनीं । तृप्त होतांचि चक्रपाणी । मुखशुद्धि आणुनी देतसे ॥ ३४ ॥ म्हणे धन्य आजीचा सुदिन । जाहलें स्वामीचें आगमन । कृपादृष्टीं विलोकून । दीधलें दर्शन निजदासा ॥ ३५ ॥ आणिक इच्छा असेल कांहीं । तरी ती सांगावी येसमयीं । ऐसें पुसतां लवलाहीं । मग शेषशायी बोलत ॥ ३६ ॥ आम्ही तुझे भेटीसि येतां सत्वर ॥ तों वाटेसि आडवा झाला तस्कर । मी होतों धनवंत सावकार । लुटिलें समग्र मज त्याणें ॥ ३७ ॥ अळंकार वस्त्रें होतीं अंगीं । तीं हिरोनि नेलीं वेगी । मग चित्तीं होऊनि वीतरागी । जाहलों वैरागी उभयतां ॥ ३८ ॥ यावरी हरिपाळ बोले वचन । तुम्हां संतांसि लुटिलें तस्करानें । तरी धुंडोनि सर्व अरण्य । घेईन प्राण तयाचा ॥ ३९ ॥ ऐसें बोलतां ते अवसरीं । लाघव दाखवितसे श्रीहरी । तत्काळ सावकाराचें रूप धरी । हरिपाळ अंतरीं लज्जित ॥ ४० ॥ परम अनुताप जाहला चित्तीं । सप्रेम अश्रु नेत्रीं वाहती । म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती । म्यां तुजप्रती लुटिलें ॥ ४१ ॥ तूं कळिकाळाचा शास्ता पूर्ण । हें नेणेंचि मी अज्ञान । सितासि चढविला होता बाण । घ्यावया प्राण पैं तुझे ॥ ४२ ॥ तूं जगद्गुरु इंदिरावर । निजांगें झालासि सावकार । हें नेणेंचि मी मूढमति पामर । लुटिलें साचार तुजलागीं ॥ ४३ ॥ मी अनंत अपराधाचा पुरा । ऐसी साक्ष येतसे अंतरा । दीनबंधु करुणाकरा । जगदुद्धारा क्षमा करी ॥ ४४ ॥ ऐकोनि हरिपाळाची ग्लांती । हांसोनि बोले रुक्मिणीपती । तुझी संतसेवेसि जडली वृत्ती । तेणें संतुष्ट चित्तीं मी असें ॥ ४५ ॥ अलंकार हरिले होते सकळ । ते हरिपाळ आणीत तत्काळ । रुक्मिणीसि लेवविले तये वेळ । म्हणे अपराधीं बाळ मी

तुझा ॥ ४६ ॥ मग प्रसन्न होऊनि चक्रपाणी । सावकार-वेष पालटित तये क्षणीं । चतुर्भुज रूप धरोनि । हरिपाळालागोनि भेटले ॥ ४७ ॥ निष्काम भक्ति देखोनि अंतरीं । काय वर देतसे श्रीहरी । आजपासोनि सिद्धि राबतील घरीं । तरी सुखें करी संतसेवा ॥ ४८ ॥ ऐसें बोलोनि त्याजकारण । देव पावले अंतर्धान । हरिपाळ करीत संतसेवन । पदार्थ संपूर्ण सर्व घरीं ॥ ४९ ॥ आणिक जसू कुणबी ऐक । होता प्रेमळ वैष्णव भाविक । श्रीहरीचें भजन करीतसे मुखें । नावडे आणिक या परतें ॥ ५० ॥ कृषिकर्म करितसे जाण । योगक्षेम चालवीत तेणें । क्षुधितासि देतसे अन्न । यथा शक्तीनें आपुल्या ॥ ५१ ॥ दोन वृषभ होते निश्चिती । ते तस्करीं सोडोनि नेले रातीं[1] । संकटीं पडिले वैकुंठपती । बैल निर्मिती आणिक ॥ ५२ ॥ हें देवाचें कर्तृत्व नाहीं विदित । वृषभ नेले शेता आंत । आऊत हाकितां तस्कर पाहत । मग ते विस्मित जाहले ॥ ५३ ॥ नेले बैल पाहती जाउनी । तों ते तैसेच बांधिले तये स्थानीं । दुसरें रात्रीं मागुती येऊनि । नेले चोरोनी वृषभ त्याचे ॥ ५४ ॥ मागुती निर्माण करी श्रीपती । तस्कर विस्मित जाहले चित्तीं । चार वेळ ऐशा रीतीं । चोरोनि नेती तस्कर ते ॥ ५५ ॥ मग परम अनुताप जाहला मना । म्हणती यासि साह्य वैकुंठराणा । आपण व्यर्थचि केली छळणा । नरक साधना लागोनि ॥ ५६ ॥ ऐसें म्हणवोनि ते समयीं । जसू स्वामीचे लागती पायीं । वर्तमान सांगीतलें सर्वही । अनुताप जीवीं धरोनियां ॥ ५७ ॥ मग अनन्यभावें शरण येउनि । त्याचा अनुग्रह घेतला त्यांणीं । सेवेसि तिष्ठत दिवस यामिनी[1] । विष्णुस्मरणीं लागलें ॥ ५८ ॥ भक्त कथा परम रसिक । आणिक ऐका भक्त भाविक । धनाजाट कुणबी एक । ज्यासि वैकुंठनायक भेटले ॥ ५९ ॥ लहान वयांत होता जाण । तों घरासि आले वैष्णवजन । त्यांचें देवतार्चन देखोन । साष्टांग नमन करीतसे ॥ ६० ॥ हात जोडोनि भक्तवैष्णवा । म्हणे मज शाळग्राम पूजेसि द्यावा । त्यांणीं काळा गोटा पाहोनि बरवा । दीधला तेव्हां त्यालागीं ॥ ६१ ॥ परमविश्वास धरोनि अंतरीं । धनाजाट त्याची पूजा करी । भक्तिभाव देखोनि श्रीहरी । तेथेंचि निर्धारीं प्रगटले ॥ ६२ ॥ गाई राखावया निर्धारीं । नित्य जातसे वनांतरीं । शाळग्राम घेतले बरोबरी । मग स्नान करी उदकांत ॥ ६३ ॥ रानफुलें वाहोनि देवासी । पूजा करीतसे सद्भावेंसी । सिदोरीचा नैवेद्य दाखवी तयासी । म्हणे हृषीकेशी जेवीं आतां ॥ ६४ ॥ भक्तिभाव देखोनि श्रीहरी । आवडीनें रुखी[2] खात भाकरी । संतोषें धनाजाट अंतरीं । मग उरली सिदोरी भक्षीतसे ॥ ६५ ॥ बाळपणापासूनि देखा । देवाधिदेव जोडला सखा । न विसंबतीच एकमेकां । सप्रेम सुखा भोगिती ॥ ६६ ॥ धनाजाट वैष्णववीर । दिवसंदिवस जाहला थोर । वैष्णव साधु असतां क्षुधातुर । तरी भोजन साचार दे त्यांसी ॥ ६७ ॥ तंव एके दिवशीं घेऊनि आउत । पेरावयासि जातसे शेत । तों बैरागी वाटेसि भेटले बहुत । सीताराम बोलती निज मुखें ॥ ६८ ॥ धनाजाटासि बोलती उत्तर । वैष्णव मंडळी क्षुधातुर । तूं अन्नदान करितोसि फार । सत्कीर्ती साचार ऐकिली ॥ ६९ ॥

१ रात्री. २ कोरडी.

दुष्काळ पडिला असे भारी । आणिक दाता नसेचि नगरीं । तरी आम्हांसि भोजन देऊनि सत्वरीं । तृप्ति करी विष्णुदासा ॥ ७० ॥ ऐसी ऐकोनियां मात । धनाजाट विचार करित । घरीं तों धान्य नसे किंचित । मग उपाय योजित तेधवां ॥ ७१ ॥ बीज दळोनियां सत्वरी । संतांसि घालावें ये अवसरीं । ऐसा निश्चय करोनि अंतरीं । जातसे माघारी मंदिरा ॥ ७२ ॥ मग गहूं दळोनियां जाण । वैष्णवांसि घातलें भोजन । तृप्त जाहलिया साधुसज्जन । आशीर्वचन बोलती ॥ ७३ ॥ जो देवाधिदेव रुक्मिणीवर । तो तुज साह्य असो निरंतर । सत्वासि कदा न पडो अंतर । सत्कीर्ति गजर हो तेणें ॥ ७४ ॥ ऐसें बोलोनि तयासि । साधु गेले तीर्थवासी । धना जाटाच्या चित्तासी । संतोष मानसी वाटला ॥ ७५ ॥ गांवींचे सकळ निंदिती जन । म्हणती हें तों अघटित केलें याणें । प्रपंच साधूनि परमार्थ करणें । तरीच धन्य संसारीं ॥ ७६ ॥ मुदलचि बुडवोनियां पाहे । त्याणें केला व्यवसाय । त्याचा परिणाम उत्तम न होय । आला प्रत्यय आम्हांसी ॥ ७७ ॥ ऐसे जननिंदेचे येतां लोट । शांतीसागरीं भरीतसे घोट । म्हणे निरसली प्रपंच खटपट । वैकुंठ पीठ जोडला ॥ ७८ ॥ घरचीं मनुष्यें चिंता करीती । म्हणती अतां पेरावें काय शेतीं । प्रपंच चालेल कैशा रीतीं । उत्तम गती दिसेना ॥ ७९ ॥ धनाजाटाचा भाव सात्विक । म्हणे निर्जीव भूमी देतसे पीक । सजीव वैष्णवसंत सकळिक । ते कायएक न करिती ॥ ८० ॥ ऐसा निश्चय धरोनि अंतरीं । भजन करितसे सप्रेम गजरी । तों अघटित चरित्र वर्तलें परी । तें सादर चतुरीं परिसिजे ॥ ८१ ॥ जो भक्तवत्सल वैकुंठनाथ । निजांगें आपण पेरितसे शेत । दुसरे दिवसीं लोक पाहत । तों गहूं शेतांत उगवला ॥ ८२ ॥ देखोनि लोक आश्चर्य करिती । म्हणती धनाजटाची सप्रेम भक्ती । संकटीं पावला रुक्मिणीपती । जाहली सत्कीर्ती जनांत ॥ ८३ ॥ पुढें पीक अद्भुत आलें । तेंही त्याणें सत्कारणीं लाविलें । वैष्णव बैरागी मेळवूनि भले । भोजन घातलें तयासी ॥ ८४ ॥ आणिक चरित्र अति अद्भुत । सादर ऐका भाविक भक्त । एक सुखानंद ब्राह्मण निश्चित । भजन करित श्रीहरींचें ॥ ८५ ॥ वैष्णव घरासि येतां जाण । त्याचें सद्भावें करी पूजन । भोळा भाविक प्रेमळ जन । आणिक साधन नेणेची ॥ ८६ ॥ विष्णुनैवेद्य महाप्रसाद सार । त्याचे ठायीं प्रीति थोर । कोणी आणूनि दीधलें जर । तरी भक्षीत सत्वर ते समयीं ॥ ८७ ॥ परम भाविक त्याची कांता । सुरसुरी नांवें पतिव्रता । जाणोनि पतीच्या मनोगतां । साधुसंतां पूजीतसे ॥ ८८ ॥ सुखानंद असतां अस्नात । जरी महाप्रसाद कोणी देत । तरी तत्काळ घालीतसे मुखांत । संशय चित्तांत न धरितां ॥ ८९ ॥ हरि प्रसादा वरिष्ठ[1] कांहीं । आणिक लोभ सर्वथा नाहीं । ऐसा निश्चय दंपतींहीं । केलासे जीवीं आपुल्या ॥ ९० ॥ तंव कुटिळ निंदक मिळोनि नर । त्याणीं मांडिला अविचार । म्हणती याचा विश्वास हरिप्रसादावर । तरी साक्षात्कार पहावा ॥ ९१ ॥ मग जाऊनि बाजारांत । जिलिब्या वडे घेतले विकत । सुखानंदापासीं निश्चित । येऊनि बोलत काय

१ श्रेष्ठ.

तेव्हां ॥ ९२ ॥ आम्हीं जाऊनि हरिमंदिरासी । हरिप्रसाद आणिला तुम्हांसी । तो सुखानंद संतोष मानसी । निजप्रीतीसीं भक्षितसे ॥ ९३ ॥ ऐसें देखोनि ते अवसरीं । गदगदां हांसती दुराचारी । म्हणती जिलिब्या घेऊनि बाजारीं । ये अवसरीं आणिल्या ॥ ९४ ॥ तुम्हीं ब्राह्मण सज्ञान निश्चित । हें तरी केलें अनुचित । आतां घेणें लागेल प्रायश्चित । नाहीं तरी वाळीत घालितों ॥ ९५ ॥ हरिप्रसादासि विटाळ नसे । परी बाजारींचें अन्न भक्षिलें कैसें । ऐसें बोलतां निंदकांस । मग विष्णुदास काय करी ॥ ९६ ॥ मुखापासीं नेऊनि हात । जिलिब्या वडे सगळेचि काढित । कुटिलाचें हातीं देत । देखोनि विस्मित ते होती ॥ ९७ ॥ नवल वाटे सकळ लोकां । म्हणे वडे जिलिब्या भक्षितां देखा । लोटोनि गेली एक घटिका । चमत्कार निका दाखविला ॥ ९८ ॥ ऐसें बोलोनि परस्पर । सद्भावें करिती नमस्कार । म्हणती तुम्हांसि साह्य रुक्मिणीवर । छळिलें साचार व्यर्थ आम्हीं ॥ ९९ ॥ सुखानंदाची सप्रेम स्थिती । सुरसुरीचीही तैसीच वृत्ती । एकाचित्तें स्त्रीपुरुषें असती । सेवा करिती संतांची ॥ १०० ॥ तंव कोणे एके दिवसीं । यात्रेसि गेले मथुरेसी । स्वमुखें सांगोनि कांतेसी । तुवां संतसेवेसी असावें ॥ १ ॥ घरासि येती वैष्णवजन । तुवां करावें त्याचें सेवन । काया वाचा आणि मन । कांहीं न वंचणें सर्वथा ॥ २ ॥ ऐसें सांगोनि सुरसुरीप्रती । आपण गेले सत्वरगती । मागें वृत्तांत कैशा रीतीं । जाहला तो श्रोतीं ऐकिजे ॥ ३ ॥ एक बैरागी वेषधारी । आला सुखानंदाचे घरीं । घरस्वामी त्यासि नमस्कारी । पूजाही करी निज प्रेमें ॥ ४ ॥ स्वरूप सुंदर देखोन । कामातुर जाहला मनें । सुरसुरीसि म्हणे भोगदान । मजकारणें आज देयी ॥ ५ ॥ ऐकोनि म्हणे पतिव्रता । तुम्हीं भोजन करावें आतां । रात्रिसमयीं तुमच्या आर्ता । पुरवीन तत्वतां निश्चित ॥ ६ ॥ ऐसें वचन देऊनि त्यासी । भोजन घातलें षड्रसीं । वेषधारी संतोष मानसीं । म्हणे भोगीत इसी रात्रिसमयीं ॥ ७ ॥ अस्तमानासि जातां दिनकर । लोटोनि गेली प्रहररात्र । मग एकांतीं शेज घालोनि सुंदर । केलें एकाग्र मन तेव्हां ॥ ८ ॥ स्वपतीचे पाय हृदयांत । चिंतोनि त्यासि बोलावी आंत । दीपक जळतसे मंदिरांत । तों कामिक त्वरित पातला ॥ ९ ॥ द्वारापासीं मग येऊनी । हृदयीं भेदला कामबाणीं । सुरसुरीस पाहे आपुले नयनीं । तों महावाघिणी ते दिसे ॥ ११० ॥ मग परम भय वाटलें चित्तां । म्हणे हे तों विपरीत जाहली वार्ता । अमृत म्हणुनी सेवूं जातां । तो विषचि हातां आलें कीं ॥ ११ ॥ धनाची मांदुस साचार । यास्तव अभिलाषें घातला कर । तों दृष्टीसि दिसे खदिरांगार । तैसाच विचार हा जाहला ॥ १२ ॥ रत्नहार म्हणवोनि उठाउठी । बाळूं गेलों आपुले कंठीं । तों महाभुजंग देखिला दृष्टीं । तैसीच गोष्टी हे झाली ॥ १३ ॥ कां द्रौपदी सतीसी आलिंगन । द्यावयासि कीचकें केले प्रयत्न । तो एकांतीं पाहतां भिमसेन । मजकारणें तेविं दिसे ॥ १४ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । परम भयभीत जाहला अंतरीं । वाघीण आंतून गर्जना करी । नेत्र वटारी सक्रोधें ॥ १५ ॥ लज्जित जाहला रतिनाथ । धातु जिराली

तेथीच्या तेथ । पंच विषयांचा मथितार्थ । गेलें चित्त विरोनी ॥ १६ ॥ मग भीत भीत वचन बोलत । म्हणे मज अन्याय घडला माते । तुज म्यां छळिलें धैर्यवंते । हा अपराध चित्तांत न गणी तूं ॥ १७ ॥ ऐसें विनीत बोलोनि उत्तर । मग साष्टांग घातला नमस्कार । मग दूर जावोनि निजे बाहेर । तों पातला दिनकर उदयासी ॥ १८ ॥ सुरसुरी होऊनि पूर्ववत । सडासंमार्जन मंदिरीं करित । वैरागी तिजला नमस्कारित । म्हणे अन्याय माते क्षमा करी ॥ १९ ॥ परम अनुताप होऊनि अंतरीं । निरंतर राहिला त्याचें घरीं । सकळ जिंतोनि षड्वैरी[1] । सेवा करी ते ठायीं ॥ १२० ॥ चार मास लोटतां निश्चित । तों सुखानंद यात्रा करोनि येत । अन्याय घडला जो आपणातें । तो बैरागी सांगत त्यापासी ॥ २१ ॥ अंतर साक्ष वैष्णवपूर्ण । त्याजवरी केलें कृपादान । नित्य करीत सप्रेम भजन । साक्षात्कार तेणें पावला ॥२२॥ आणिक चरित्र रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । एक माधवदासनामें ब्राह्मण । असे निपूण वेदशास्त्रीं ॥२३॥ तो महापंडित असे निश्चित । परी कदापि नोहे विषयासक्त । सर्वकाळ असे विरक्त । प्रपंच मात आवडेना ॥ २४ ॥ ऐसें लोटतां बहुत दिन । तों कांता जाहली गतप्राण । चित्तीं मानीत समाधान । म्हणे संसारबंधन सुटलें ॥ २५ ॥ घरीं धनधान्य होतें कांहीं । भांडीं आणि वस्तभाव सर्वही । ती ब्राह्मणांसि वांटोनि पाहीं । संतोष जीवीं पावला ॥ २६ ॥ आशापाश तोडोनि ऐशारीतीं । यात्रेसि चालिला जगन्नाथीं । जैसा शुक[2] पिंजऱ्यांतून निघे निश्चिती । संतोष चित्तीं तेवीं झाला ॥ २७ ॥ महातीर्थासि येऊनि जाण । समुद्रतीरीं केलें स्नान । मग विष्णुमंदिरीं येतसे त्वरेनें । लोटांगण घालित ॥ २८ ॥ दृष्टीसीं देखोनि सगुण मूर्ती । अनुतापयुक्त करितसे ग्लांती । म्हणे देवाधिदेवा वैकुंठपती । उगविली गुंती सर्व माझी ॥ २९ ॥ मायबाप बंधु सज्जन । पुत्र कलत्र आणि धन । आतां कांहींच नसे तुजवांचुन । एकाग्र मन जाहलें ॥ १३० ॥ ऐसें बोलोनि ते समयीं । सप्रेम माथा ठेविला पायीं । श्रीहरि भजनावांचूनि पाहीं । साधन कांहीं नावडे ॥ ३१ ॥ वेदशास्त्रीं निपुण पंडित । परी विद्याभिमान नसें किंचित । सर्वदा प्रेमळ आणि विरक्त । सगुणीं प्रीत बहु तया ॥ ३२ ॥ तंव पुढें पूजारें येऊनि येथ । माधवदासासि काय बोलत । देवासि उपद्रव न करीं येथ । होय त्वरित बाहेरी ॥ ३३ ॥ रित्या हातें नमस्कार । देवासि करिसी वारंवार । ऐसें बोलोनियां उत्तर । घातलें बाहेर तयासि ॥ ३४ ॥ माधवदास सद्गदित चित्तीं । जावोनि बैसे एकांतीं । ऐसी इच्छा धरिली चित्तीं । म्हणे सगुण श्रीपती भेटवा ॥३५॥ बहुत ग्लांती केली तेणें । म्हणें मी सेवाहीन भक्तीहीन । पदरीं किंचित्त नसेचि धन । करावें पूजन कैशा रीतीं ॥ ३६ ॥ कैसी करावी मानस पूजा । हें सर्वथा नेणें अधोक्षजा । बाह्यात्कारें गरुडध्वजा । दास मी तुझा म्हणवितों ॥ ३७ ॥ ऐशा रीतीं बोलोनि वचन । नघे फळ मूळ किंवा अन्न । अहोरात्र नामस्मरण । तीन उपोषणें जाहलीं ॥ ३८ ॥ सोडोनि देहगेहआस्था । आवडीनें भजतसे जगन्नाथा । संकट पडिलें रुक्मिणीकांता । म्हणें सांभाळ आतां

१ काम, क्रोध, मद, मोह, लोभ आणि मत्सर. २ पोपट.

करावा ॥ ३९ ॥ तों जगन्नाथ रुक्मिणीसि म्हणे । सगुण रूप सत्वर धरून । माधवदासासि घाली भोजन । उपोषणें तीन घडलीं तया ॥ १४० ॥ आज्ञा होताचि तये क्षणीं । काय करीतसे विश्वजननी । सुरस अन्न ताटीं भरोनी । आली घेउनी त्यापासी ॥ ४१ ॥ तों समूळ सांडोनि देहभान । माधवदासें केलें शयन । त्यासि निजलोभें उठवीत रुक्मिण । म्हणे भोजन करीं आतां ॥ ४२ ॥ सुंदर स्वरूप देखोनि निश्चित । माधवदास जाहला विस्मित । म्हणें तूं कोण आहेस मातें । सांग त्वरित ये समयीं ॥४३॥ रुक्मिणी बोले प्रतिवचन । तूं सर्वकाळ ज्याचें करितोसि ध्यान । त्याचें अर्धांगीं असतें जाण । नांव रुक्मिण पैं माझें ॥ ४४ ॥ भोजन घालावयासि तूंतें । मज आज्ञा केली वैकुंठनाथें । आतां आग्रह न करावा किंचित । जेवीं त्वरित ये समयीं ॥ ४५ ॥ स्वल्प काळें तुजकारणें । देवही देतील साक्षात दर्शन । ऐसें देतांचि आश्वासन । धरितसे चरण जननीचे ॥ ४६ ॥ मातेच्या वचनासि देऊनि मान । माधवदासें केलें भोजन । तयासि मुखशुद्धि देऊन । अदृश्य रुक्मिण जाहली ॥ ४७ ॥ सुवर्णताट रत्नजडित झारी । तेथेंच राहिली ते अवसरीं । माधवदासें धुवोनि सत्वरी । आंथरुणाशेजारीं ठेवितसे ॥ ४८ ॥ तों प्रभात समय होतां निश्चिती । पूजारे कांकड आरती करिती । सर्वोपचारें वैकुंठपती । पंडे पूजिती तेधवां ॥ ४९ ॥ तों सुवर्णताट रत्नजडित झारी । दृष्टीसि न दिसे ते अवसरीं । म्हणती देउळीं जाहली चोरी । तो तस्कर सत्वरी पहावा ॥१५०॥ हरिमंदिरीं शोध करिती । सकळांपासीं झाडा घेती । परी ठिकाण न लागे निश्चिती । म्हणती कैसी गती करावी ॥ ५१ ॥ मग माधवदासापासीं येउनी । पाहते जाहले तये क्षणीं । तों झारी ताट देखिलें नयनीं । म्हणती तस्कर ठिकाणीं लागला ॥ ५२ ॥ एक म्हणती हा मैंद पूर्ण । कैसें धरिलें बकध्यान । चार दिवस येथें राहून । वस्ता चोरून घेतल्या ॥५३॥ अंतरभाव नेणोनि चित्तीं । नाना दुरुत्तरें बोलती । मग कोठडींत घालोनि तयाप्रती । बंधन करिती सभोंवतें ॥ ५४ ॥ तंव स्वप्नीं येऊनि जगन्नाथ । पूजारियाप्रती काय सांगत । माधवदास प्रेमळ भक्त । गांजिलें व्यर्थ तुम्ही त्यासी ॥ ५५ ॥ येथें येऊनिया त्याणें । केली तीन उपोषणें । मग आम्हीं रुक्मिणींसि आज्ञा करोन । घातलें भोजन तयासि ॥ ५६ ॥ झारी ताट विसरोनि तेथ । रुक्मिणी आली देऊळांत । तुम्हीं तयासी कोंडिलें व्यर्थ । ऐसा दृष्टांत देखिला ॥५७॥ पंड्यांसि अनुताप जाहला थोर । मग माधवदासापासीं आले सत्वर । सद्भावें करिती नमस्कार । म्हणती छळिलें साचार व्यर्थ आम्हीं ॥ ५८ ॥ मग नेउनि देऊळांतरीं । घातला देवाच्या पायांवरी । हरिप्रसाद ते अवसरीं । आपुले करीं तिहीं दिला ॥ ५९ ॥ तैंपासूनि माधवदासासी । सकळ मानिती क्षेत्रवासी । देवाचा नैवेद्य येतसे त्यासी । क्षुधित उपवासी न राहे ॥१६०॥ ऐसे दिवस लोटले कांहीं । तों काय करित शेषशायी । आणिक चमत्कार दाखविला कांहीं । तो ऐका सर्वही भाविकहो ॥ ६१ ॥ पाखळ पूजा होतां सत्वरी । तों लोटोनि गेली अर्धरात्री । मग माधवदासासि पुजारी । म्हणती सत्वरी बाहेर या ॥६२॥ ऐसें पंडे बोलती वचन ।

परी तयासि नाहीं देहभान । सगुण स्वरूपीं जडलें मन । नाहीं देहभान सर्वथा ॥ ६३ ॥ मागील चमत्कार आठवोनि चित्तीं । पूजारे सकळ बाहेर येती । आपुले हातें द्वाराप्रती । कुलुपें घालिती तेधवां ॥ ६४ ॥ तों माधवदास शेजार मंडपांत । आधींच होता ध्यानस्थ । किंचित होता सावचित्त । मग शीत वाजत तयासी ॥ ६५ ॥ हें जाणूनि जगन्नाथ । तयापासी आले त्वरित । हातें कुरवाळोनि त्यातें । मग सकलाद घाली अंगावरी ॥ ६६ ॥ प्रातःकाळ होतांचि ते अवसरीं । पूजारे येऊनि पाहती सत्वरी । तों सकलाद नाहीं पलंगावरी । विस्मित अंतरीं मग होती ॥ ६७ ॥ मग बाहेर येऊनि पाहती सत्वर । तों देवाचें सुवासिक वस्त्र । माधवदासाच्या अंगावर । त्यांणीं साचार ओळखिलें ॥ ६८ ॥ म्हणती देवाच्या खोलीत निर्धारीं । कुलुपें तैसींच होतीं रात्रीं । आणि सकलाद घातली याजवरी । लाघवी श्रीहरी कृपाळू ॥ ६९ ॥ ऐसाच चमत्कार देखोन । मग मानूं लागले सर्वत्र जन । राजा येऊनि लोटांगण । निजप्रीतीनें घालीतसे ॥१७०॥ मानमान्यता वाढतां बहुत । तेथोनि उदास जाहलें चित्त । मग मथुरेसि चालिला असे त्वरित । श्रीकृष्णनाथ पहावया ॥७१॥ आधीं निस्पृह उदास अंतरीं । मार्ग क्रमितसे ते अवसरीं । तों वैष्णव भक्त एके नगरीं । मार्गावरी राहत होता ॥ ७२ ॥ त्याची सत्कीर्ति ऐकोनि श्रवणीं । यास्तव पातला त्याचें सदनीं । तों गांवास गेला असे घरधणी । घर स्वामिणी पुढें येत ॥ ७३ ॥ तिनें सद्भावें करोनि नमन । म्हणे शिधा देतें करा भोजन । आम्हीं क्षत्रिय जातीचे हीन । तुमचें सेवन घडेना ॥ ७४ ॥ मग माधवदास उत्तर देत । तुम्ही विष्णुस्मरणी सर्वदा रत । पवित्र कुळ केलें निश्चित । उंचासि निश्चित वंद्य तुम्ही ॥७५॥ मग घरधणीन जावोनि बाजारांत । दूध पेढे आणिले बहुत । उपाहार घालोनि त्यात । केलें तृप्त सद्भावें ॥७६॥ तेथूनि निघतांचि सत्वरी । तों संत भेटले वाटेवरी । परतोनि घरासि ने ते अवसरीं । मधुरोत्तरीं सांगतसे ॥७७॥ घरधणीन होती मंदिरांत । तिणे आमुचा आदर केला बहुत । पोटभर पेढे भक्षिले तेथ । आतां इच्छा किंचित असेना ॥७८॥ ऐशा रीतीं समजावून। परस्परें केलें नमन । पुढें यमुनातीरीं करोनि स्नान । मथुरा पट्टण प्रवेशला ॥७९॥ मग जावोनि देवळांतरी । नमस्कार घालितसे महाद्वारीं । प्रवेशतां अंतर मंदिरीं । तों आडवे पुजारी पातले ॥१८०॥ दर्शनासि जावया अडथळा । पंडे करिती तये वेळां । धक्के देवोनि वेळोवेळा । भक्त प्रेमळा भवंडिती ॥ ८१ ॥ मनोमय देवासि नमस्कार । करोनि निघे वैष्णववीर । मग चीर घाटीं जाऊनि सत्वर । एकाग्र स्थिर मन केलें ॥८२॥ ध्यानांत आणोनि श्रीकृष्णनाथ । भजन करीत प्रेमयुक्त । तों एक कणवाळू येऊनि तेथ । साहित्य देत स्वयंपाका ॥८३॥ पाकनिष्पत्ति झालियावरी । देवाचा आठव जाहला अंतरीं । तों तेथें पातलें श्रीहरी । कैशापरीं ते ऐका ॥ ८४ ॥ चतुर्भुज सांवळी मूर्ती । झळके पितांबराची दीप्ती[1] । दिव्य कुंडलें कानीं तळपती । मकराकृती सुढाळ ॥ ८५ ॥ श्रीमुख साजिरें मनोहर । दृष्टींसि पाहतां देहभान विरे । ऐशा रूपें सारंगधर । प्रगटले साचार ते ठायीं ॥ ८६ ॥ दृष्टींसीं देखून सगुण मूर्ती । चरणीं सत्वर


[1] तेज.

घातली मिठीं । मग माधवदासासि धरोनि पोटीं । बोलतसे गोष्टी जगदात्मा ॥ ८७ ॥ म्हणे तूं माझा जिवलग प्राण । हें पूजारियांसि न कळे खूण । भवंडोनि बाहेर घातले जाण । मग आलासि रुसोनि ये ठायीं ॥८८॥ मग मज चैन न पडेचि देउळीं । आपुलें चित्तीं बहु तळमळी । मग धुंडीत आलों ये स्थळीं । ऐसें वनमाळी बोलिले ॥ ८९ ॥ तेव्हां देवभक्तांचे नयन । अश्रुपातें भरलें जाण । जैसी माता समजावितांचि तान्हें । वाढे द्विगुण लोभ त्याचा ॥१९० ॥ मग वरण पानगे आणि मिठ । सांगातें जेवीं वैकुंठपीठ । सप्रेम भक्ती देखोनि चट । भरितसे पोट ते ठायीं ॥ ९१ ॥ प्रार्थना करितां पाकशासन । जो सर्वथा न करीच अमृतपान । तों भाविकांच्या संगातें कदन्न । निजप्रीतीनें जेवीतसे ॥ ९२ ॥ तृप्त झालियां जगज्जीवन । माधवदासासि समाधान । मुखशुद्धीसि तुळसी पान । निज प्रीतीने देतसे ॥ ९३ ॥ मग देउळीं जावोनि श्रीकृष्णनाथ । पूजारीयासि दृष्टांतीं सांगत । मी माधवदासाच्या सांगाते । जेविलों निश्चित पोटभरी ॥ ९४ ॥ तुह्मीं त्यासि दीधले भवंडून । यास्तव चीरघाटीं बैसला रुसून । आतां तयासि आणा समजावून । नैवेद्य सेवीन तरीच मी ॥ ९५ ॥ ऐसें सांगतां चक्रपाणी । पंडे विस्मित झाले मनीं । मग माधवदासासि समजावुनी । आले घेउनि देउळां ॥ ९६ ॥ देवें दाखविला साक्षात्कार । मग मानूं लागले सर्वत्र । ज्याचा सखा रुक्मिणीवर । तरी विश्व त्यावर कृपा करी ॥ ९७ ॥ मग ह्मणे आपुल्या चित्ता । जगन्नाथीं वाढली मान्यता । यास्तव मथुरेसि आलों आतां । परी पालट संचिता न करवे ॥ ९८ ॥ चार मास मथुरेसि राहोनि । मग गेलें गोकुळ वृंदावनी । जगन्नाथासि भक्त शिरोमणी । येतसे परतोनि सत्वर ॥ ९९ ॥ घेऊनियां देवदर्शन । क्षेत्रवासी भेटले सज्जन । तव माधवदासाकारणे । लागली हगवण ते समयीं ॥ २०० ॥ वेरझारा करावयासि सत्वरी । कांहीं शक्ति नसेचि शरीरीं । मग जाऊनि बैसले समुद्रतीरीं । उपद्रव भारी ह्मणवोनियां ॥ १ ॥ तेव्हां सगुणरूपे चक्रपाणी । शौचासि उदक देती नेउनि । वस्त्र भरतांचि तये क्षणीं । आणितसे धुवोनि जगदात्मा ॥ २ ॥ हें माधवदासें देखोनि दृष्टीं । मग स्वमुखें देवासि पुसें गोष्टी । ह्मणे व्यथा दूर करावयासि जगजेठी । सामर्थ्य पोटीं तुज नाहीं ॥ ३ ॥ ऐकोनि निजभक्ताचें वचन । काय म्हणतसे जगज्जीवन । शरीर भोग नेमिला जाण । तो लागे भोगणें निश्चित ॥ ४ ॥ व्यथा दूर करावयासि आज । कांहीं संकट नसेचि मज । परी शरीर भोग भोगावया तुज । जन्म सहज घेणें लागे ॥ ५ ॥ बहुत दिवस सोशीला भोग । आणिक चार दिवस राहिला रोग । मग पुढती होसील अरोग । ऐसें श्रीरंग बोलिले । तेव्हां आराम जाहला देहास । तों कांहीं एक लोटले दिवस । कांहीं चरित्र वर्तलें विशेष । तें ऐका सावकाश भाविकहो ॥ ७ ॥ एक थोर पंडित वादक निश्चिती । आला असे जगन्नाथीं । तो माधवदासासि बोले वचनोक्ती । तुह्मी तों वेदांतीं प्रवीण ॥ ८ ॥ कांही करावें संभाषण । ऐसी इच्छा धरिली मने । माधवदास अवश्य म्हणे । शौचाहून मी येतों ॥ ९ ॥

मग तांब्यापीतांबर घेऊनि बरोबरी । जाऊनि बैसले समुद्र तीरी । म्हणे ब्राह्मणासि वाद निर्धारीं । कैशापरीं घालावा ॥ २१० ॥ अहंकार हा मोठा दुर्गुण । धरितां नाडिले बहुत जन । मग ब्रह्मराक्षस लागे होणें । करितां अपमान ब्राह्मणाचा ॥ ११ ॥ म्हणे देवाधिदेवा श्रीहरी । हें संकट निवारी कैशापरी । ऐसी चिंतातुर होऊनि अंतरीं । मग समुद्रतीरी बैसले ॥ १२ ॥ मग देवाधिदेव श्रीहरी । माधवदासाचें रूप धरी । पंडितापासीं जाऊनि सत्वरी । वचनेंचि करीं कुंठित ॥ १३ ॥ जो चहूं वेदांची खाणी । निघाली ज्याच्या श्वासापासूनी । त्यासीं बोलतां पुरवेल कोणी । ऐसा त्रिभुवनी दिसेना ॥ १४ ॥ इतुकें कार्य करोनि जाण । मग अदृश्य जाहले जगज्जीवन । तों माधवदास शौचाहून । आले परतोन स्वस्थाना ॥ १५ ॥ मग पंडित देखोनि तयाप्रती । नमस्कार करीती सत्वरगती । तंव क्षेत्रवासी वैष्णव सांगती । तुम्ही जिंतले याप्रती निश्चित ॥ १६ ॥ म्हणवोनि सांडोनि अभिमान । आतां सद्भावें आलों शरण । तंव पंडित माधवदासासि म्हणे । आबाधित ज्ञान तुमचें ॥ १७ ॥ मी पृथ्वी हिंडोनि समग्र । पंडित जिंतलें थोर थोर । तुम्हीं एकाचे वचनें साचार । कुंठित अंतर केलें कीं ॥ १८ ॥ माधवदासासि समजलें आपुलें मनीं । म्हणे हे तो श्रीहरीची करणी । तो पंडित म्हणे मज ये क्षणीं । अनुग्रह स्वामीनी देईजे ॥ १९ ॥ काया मनें आणि वाचा । संप्रदायी जाहला माधवाचा । भक्तीमार्ग करोनि साचा । केला देहाचा उद्धार ॥ २२० ॥ पुढिलें अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीपंढरीनाथ । महीपति त्याचा मुद्रांकित । गुण वर्णित संताचे ॥ १२१ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेचि पुरती मनोरथ । परिसोत भाविक भक्त । चव्वेचाळिसावा अध्याय रसाळ हा ॥२२२॥ अध्याय ॥ ४४ ॥ २२२ ॥



अध्याय ४५



श्रीगणेशाय नमः । ऐका सभाग्य श्रोते सज्जन । देव भक्त नव्हेचि भिन्न । एकमेकांत असती संलग्न । दृष्टांत वचन अवधरा ॥ १ ॥ जैसे शीतळत्व आणि निशीपती । अभेदपणें एकत्र असती । तैसे निजभक्त आणि वैकुंठपती । अभिन्न असती सर्वदा ॥ २ ॥ कीं सूर्य आणि रथींचा अरुण । हीं नामाभिधानें असती भिन्न । परी तेज दोहींचे समसमान । मंडळे दोन न दिसती ॥ ३ ॥ पंख नसलें जरी निश्चिती । तरी कैसा उडेल खगपतीं । तेवीं भक्तावांचोनि देवाची कीर्ती । नव्हेचि जगती सर्वदा ॥ ४ ॥ तारा निर्माण नसत्या जाणा । तरी कैसेनि वाजता ब्रह्मविणा । तेवीं देव भक्तांच्या नामाभिधाना । अद्वैतता जाणा या रीतीं ॥ ५ ॥ मागिलें अध्यायीं कथा सुरस । प्रेमळ भक्त माधवदास । त्याचें रूप धरोनि जगन्निवासें । महापंडितास जिंकलें ॥ ६ ॥ त्यानें सांडोनि विद्याभिमान । माधवदासासि आला शरण । त्याचा संप्रदायी होऊन । सप्रेम भजन करीतसें ॥ ७ ॥ जेवीं तिचें जाहले भक्त वैष्णव । त्यांचा अभिमान धरीतसे देव । लाघव दाखवोनि अपूर्व । भक्त वैष्णव तो केला ॥ ८ ॥ आतां हरीव्यास तो प्रेमळ भक्त । राहत होता मथुरेंत । भजन करीत प्रेमयुक्त । सगुण मूर्ती उपासी ॥ ९ ॥ ज्यासि सर्वभूतीं दया पूर्ण । आत्मवत मानी अवघे जन । परम खळ त्याच्या दर्शनें । द्रवतसे मन तयाचें ॥ १० ॥ कांहीं दिवस लोटतां तेथ । यात्रेसि निघाले अकस्मात । दृष्टींसी पहावया जगन्नाथ । चित्तीं हेत धरियेला ॥११॥ मार्गीं चालतां नित्य नित्य । एक स्थळ रम्य देखिलें अद्भुत । उपवनीं वृक्ष लागले बहुत । निर्मळ दिसत जीवन तेथें ॥१२॥ मग संप्रदायांसि बोलती काय । अपूर्व स्थळ हें दिसत आहे । तेथें स्नान संध्या करूनि पाहे । गमन लवलाहीं करावें ॥ १३ ॥ ऐसी आज्ञा होतांचि पाहीं । बिऱ्हाड उतरलें ये ठायीं । ते स्थळीं जागृत होती देवी । दर्शनासि सर्वही लोक येती ॥१४॥ तंव एक शूद्रें येऊनियां तेथ । पशु मारिला अकस्मात । हरि व्यासासि कळतां वृत्तांत । कंटाळलें चित्त तयाचें ॥ १५ ॥ म्हणे कांहीं दुरित होतें पदरीं । यास्तव उतरलों ये अवसरीं । देशींचे लोक दुराचारी । भूतदया अंतरीं असेना ॥ १६ ॥ दोष आचरतां दृष्टींसि पाहत । त्यासीही दुरिताचा विभाग लागत । ऐसें म्हणवोनि वैष्णव भक्त । येथूनि त्वरित निघाले ॥ १७ ॥ स्वयंपाकाचें साहित्य सकळीं । अग्नि टाकोनि पेटविल्या थाळी । कणीक मळोनि सिजल्या डाळी । अवघें ते स्थळीं टाकिलें ॥ १८ ॥ उदास होऊनि वैष्णव भक्त । उपवासी चालिले अनुताप युक्त । हा देवीसीं कळतां वृत्तांत । मग भयभीत ते झाली ॥ १९ ॥ म्हणे मज ऐशाची महाविष्णूसी । अनंत शक्ती असती दासी । हरिव्यास परम आवडता त्यासी । तो जातसे उपवासी तेथूनियां ॥ २० ॥ तयासि समजावोनि आणावें आतां । तरीच आपुली चालेल सत्ता । ऐसा विचार करोनि चित्ता । निघे आदिमाता सत्वर ॥ २१ ॥ मार्गीं हरिव्यास उदास मन । करीत चालिला हरिभजन । तों महाशक्ति आडवी येऊन । साष्टांग नमस्कार करीतसे

---

१ चंद्र.

॥ २२ ॥ म्हणे माझ्या आश्रमाहूनि । तुम्हीं जातसां उपवासी । तरी महाविष्णु कोपेल मजसी । भय मानसीं तयाचें ॥ २३ ॥ तूं साक्षात्कारी वैष्णवभक्त । ऐसें निश्चित कळलें मातें । परी आतां परतोनि चलावें त्वरित । करितसे ग्लांत भवानी ॥ २४ ॥ हरिव्यास म्हणतसे ते अवसरीं । पशु मारिला तुझे द्वारीं । तेथें अन्न घेतां निर्धारीं । नरक अघोरी भोगणें ॥ २५ ॥ आम्हीं निधडे वैष्णववीर । तरीच तुझें ऐकों उत्तर । हिंसा कर्म वर्जिसील जर । तरी भोजन साचार करूं तेथें ॥ २६ ॥ नाहींतरी उदास होऊन । जातसों तुझ्या आश्रमांतूनि । ऐकोनि विष्णुभक्ताची वाणी । अवश्य भवानी म्हणतसे ॥ २७ ॥ मग हरिव्यासासि धरोनि हातीं । आश्रमासि घेऊनि येतसे शक्ती । देशाधिकारी राजा निश्चिती । तयासि स्वप्न रात्रीं दाखविलें ॥ २८ ॥ तूं सर्व देशांत ताकीद करी । हिंसा न करावी माझें द्वारीं । हरिव्यास वैष्णव निर्धारीं । शरण सत्वरी यासि यावें ॥ २९ ॥ यासि अन्यथा करिशील जर । तरी तुझें राज्य बुडेल समग्र । देवीचा दृष्टांत होतांचि थोर । भय नृपवर पावला ॥ ३० ॥ प्रातःकाळ होतांचि त्याणें । मग प्रधानासि सांगितलें स्वप्न । मग शक्तीच्या देउळासि येऊन । वैष्णवासि नमन कतरीसे ॥ ३१ ॥ हरिव्यासासि कर जोडून । म्हणे मी अनन्यभावें स्वामीसि शरण । अनुग्रह द्यावा मज कारणें । म्हणवोनि चरण धरियेले ॥ ३२ ॥ सद्गुरु म्हणती ते अवसरीं । तूं आज पासोनि हिंसा न करीं । आणि आपुल्या राज्यांत आज्ञा करी । कीं पशु निर्धारीं न मारावा ॥ ३३ ॥ अवश्य म्हणोनि नृपनंदन । देशांतरा उत्तर पाठविलें त्यानें । मग स्वामीचा अनुग्रह घेऊन । वैष्णव परिपूर्ण तो झाला ॥३४॥ षण्मास पर्यंत पाहीं । हरिव्यास राहिले तये ठायीं । करोनि बहुत संप्रदायी । विष्णुभक्त सर्वही ते केले ॥३५॥ एकादशी हरिजागर । हरिकीर्तनाचा घोष थोर । नामस्मरण करोनि सर्वत्र । प्रेमभरें करोनियां ॥ ३६ ॥ देवीसि यात्रा येतसे दुरोनी । परी तेथें पशु न मारिती कोणी । रात्रीमाजी येऊनि स्वप्नीं । दृष्टांत भवानी सांगे तयां ॥३७॥ निर्दय लोक होतें खळ । ते अवघेचि जाहले भक्त प्रेमळ । ऐसें संतसज्जन कृपाळ । विश्वसकळ उद्धरिलें ॥३८॥ लोक अर्चित होते शक्ती । तयांसि लाविली विष्णुभक्ती । मठ स्थापूनि तये क्षितीं । शिष्य ठेविती ते ठायीं ॥ ३९ ॥ ऐसा करोनि जगदुद्धार । मग जगन्नाथासि गेले सत्वर । भवसिंधु हा सखोल थोर । परी संत पैलपार पावती ॥ ४० ॥ आणिक चरित्र रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । एक त्रिपुरदास म्हणवोन । होता प्रधान रायाचा ॥ ४१ ॥ सद्गुरु कृपा होतांचि निश्चिती । तयासि चित्तीं बाणली विरक्ती । मग लुटवोनि सर्व धनसंपत्ती । उदास वृत्ती धरियेली ॥ ४२ ॥ कांताही परम सुलक्षणी । तत्पर असें विष्णुस्मरणीं । उभयतां दंपती येवोनि । वृंदावनीं राहिलीं ॥४३॥ त्रिकाळ पूजा होतांचि जाणा । येती श्रीहरीच्या दर्शना । भक्तीचा भुकेला वैकुंठ राणा । साक्षात्कार नाना देतसे ॥४४॥ येथें येऊनि नृपवर । त्याणें धन वांटिलें फार । वैष्णव अयाचित द्विजवर । पूजिलें समग्र क्षेत्रवासी ॥४५॥ ऐसा सर्व खर्च करोनि त्याणें । मग स्वस्थानासि गेला त्वरेनें । परी महापूजा न केली त्याणें ।

१ दुष्ट.

पडिलें विस्मरण देवाचें ॥ ४६ ॥ हा त्रिपुरदासासि समाचार । कळतां क्षीत वाटली फार । म्हणती तो अज्ञान नृपवर । इंदिरावर न पूजिला ॥ ४७ ॥ जैसें वृक्षाचें मूळ सांडोनी । डाहाळियावरींच लाविलें पाणी । तैसीच रायें केली करणी । मजलागोनी वाटतें ॥४८॥ मातेसि जेववितां पोटभर । तान्हयास दूध येतसे फार । जननी उपवासीं ठेविली जर । तरी पोट न भरे बाळकाचें ॥ ४९ ॥ ऐसें म्हणवोनि त्रिपुरदास । काय बोले निजकांतेस । मज इच्छा ऐसीं वाटतसे । वस्त्रें श्रीहरीस करावी ॥ ५० ॥ मग कांता म्हणे ते समयीं । घरीं तो ऐवज किंचित नाहीं । अयाचित वृतीनें येतां कांहीं । अव्हेरून तेहीं टाकितसां ॥ ५१ ॥ ऐसें असतां प्राणनाथा । वस्त्रें कशाची करावीं आतां । त्या देवाधिदेवा वैकुंठनाथा । उणें सर्वथा नसेची ॥ ५२ ॥ सपूर वस्त्रें भरजरी । उदंड असती देवावरी । तुम्हीं कासया ये अवसरीं । चिंता अंतरीं वाहतसां ॥ ५३ ॥ त्रिपुरदास म्हणे यथार्थ । परी माझे चित्तीं उपजला हेत । मग घरीं होती दौत । ती बाजारांत विकियेली ॥ ५४ ॥ मोल मागतांचि तियेचें । सोळा आणे आले साचें । घोंगडेसें छीट घेतलें त्याचें । पूजन श्रीहरीचें करावया ॥ ५५ ॥ मग पुजारियांसि सांगतसे तेव्हां । हें वस्त्र घेतलें असे दावा । हें पांघरवोनि केशवा । हेत पुरवा दीनाचा ॥ ५६ ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती । मग पंडे तयासि उत्तर देती । हें देवा योग्य वस्त्र नाहीं म्हणती । लज्जा चित्तीं तुज नये ॥ ५७ ॥ महावस्त्रपाटां वास । रकट्यांचें थिगळ साजेल कैसें । काय उणें आमुच्या देवास । ऐसें तयासि बोलिले ॥५८॥ त्रिपुरदास म्हणे मागुती । देवासि सांगा माझी विनंती । हें अनाथाचें वस्त्र निश्चिती । तरी अंगीकार प्रीतीं करावा ॥ ५९ ॥ ऐसें बोलोनि तये वेळे । देउळी छीट धाडिलें बळें । पुजारी होता परम खळ । त्याणें तत्काळ आंथरिले ॥ ६० ॥ पाखळ पूजा होतांचि सत्वर । आश्चर्य देखिलें त्या अवसरा । हींव वाजतसे इंदिरावर । मूर्ती थरथरां कांपत ॥ ६१ ॥ ऐसे विपरीत देखोनि तेथें । देवळीं मिळाले वैष्णवभक्त । देवासि वस्त्रें पांघरली बहुत । सगडी ठेवित पेटवूनि पुढे ॥ ६२ ॥ परी मूर्ती कांपतां ते न राहे । म्हणे उपाय करावा काय । तों छिटावरी भांडारी निजला आहे । त्याणें दृष्टांत काय देखिला ॥ ६३ ॥ त्रिपुरदासानें भक्तिभावें । आम्हांसि छीट दीधलें नवें । तरी तें सत्वर पांघरावें । राहील हींव तरीच ॥ ६४ ॥ ऐसा दृष्टांत चक्रपाणी । देताचि विस्मित जाहले मनीं । मग छिट पांघरवितां ते क्षणीं । चमत्कार नयनीं देखिला ॥ ६५ ॥ शीतें कांपत होता घननीळ । तो तत्काळचि राहे निश्चळ । आपुल्या दासाची दीनदयाळ । सत्कीर्ति प्रबळ वाढवित ॥ ६६ ॥ सकळ वैष्णव आश्चर्य करिती । म्हणती भक्तीचा भुकेला वैकुंठपती । त्रिपुरदासासि वृत्तांत सांगती । नमस्कार करिती सद्भावें ॥ ६७ ॥ ऐकोनि द्रवला वैष्णववीर । गहिंवरें करोनि कंठभरे । नेत्रीं प्रेमाचे आले नीर । म्हणे तो दीनोद्धार जगद्गुरु ॥ ६८ ॥ तो अनाथबंधु करुणाघन । द्रौपदीनें वाढिलें भाजीपान । तें प्रीतीनें भक्षितांचि श्रीकृष्ण । तृतीनें त्रिभुवन भरलें

कीं ॥६९॥ त्रिपुरदासें ऐशारीतीं । स्वमुखें केली श्रीहरीची स्तुती । चढती वाढती देवेभक्ती । सप्रेम चित्तीं सर्वदा ॥७०॥ आणिक कथा असे गोमटी । सादर ऐकतां कर्णसंपुटीं । दुरित पळे उठाउठी । वैराग्य पोटीं ठसावे ॥७१॥ एकला लहान खोजी भक्त चतुर । सद्गुरु-भक्तीसि असे तत्पर । संत साधु वैष्णववीर । त्यांचाही आदर करीतसे ॥७२॥ अनुताप युक्त करोनि निश्चित । श्रीहरिस्मरणीं सावचित्त । त्याचा गुरु तो भोळा भक्त । एकदा बोलत लोकांसी ॥७३॥ आमुच्या अंतसमयीं प्रसिद्ध । आकाशीं होईल घंटानाद । मग तुम्हां समस्तांसि होईल बोध । सप्रेम छंद भक्तीचा ॥७४॥ ऐसा पण बोलिला पाहीं । परी जनासि सर्वथा विश्वास नाहीं । विकल्पें करोनि नाडिले कांहीं । स्वहित जीवीं न विचारिती ॥७५॥ तंव लाल्हानखोजी एके दिवशीं । जातसे कोण्या गांवासी । चार दिवस जाहले त्यासि । सद्गुरु मानसीं चिंतातुर ॥ ७६ ॥ म्हणे सच्छिष्य माझा नसे जवळ । सन्निध पातला अंतकाळ । ऐसें म्हणोनि ते वेळ । प्राण तत्काळ सोडिले ॥ ७७ ॥ तेव्हां गांवींचे लोक मिळोनी । देहनिर्वाह केला त्याणीं । तो लाल्हानखोजी सद्गुरु स्थानि । तिसरें दिनीं पातला ॥ ७८ ॥ सद्गुरु गेले निजधामासि । हें श्रुत होतांचि खोजीयासीं । परम खेद वाटला मानसीं । म्हणे मी सेवेसी अंतरलों ॥ ७९ ॥ अंतकाळामाजी निश्चित । स्वामींसि लागले नाहींत हात । मग ज्ञानें करोनि स्वस्थ चित्त । असे करीत तेधवां ॥ ८० ॥ गावींचे लोक कुटिळ पाहीं । सद्गुरूसि निंदिती ते समयीं । म्हणती पण केला होता तिहीं । तो घंटानाद नाहीं ऐकिला ॥ ८१ ॥ खोजी म्हणतसे ते अवसरीं । मजला दृष्टांत जाहला रात्रीं । सद्गुरु बोलिले स्वप्नांतरीं । कीं वैकुंठपुरीं आम्ही जातों ॥ ८२ ॥ घंटानाद तुजकारणें । मागें ठेविला असे जाण । ऐसें स्वामींनीं मज सांगोन । मग वैकुंठभुवन पावले ॥८३॥ इतुकें बोलिले ते अवसरीं । परी कोणासि विश्वास नये अंतरीं । मग लाल्हानखोजी स्नान करी । आसनावरी बैसला ॥ ८४ ॥ ध्यानांत आणूनि सद्गुरुमूर्ती । लाविलीं दोन्ही नेत्रपातीं । तेव्हं घंटानाद आकाशीं होती । लोक ऐकती सर्वत्र ॥ ८५ ॥ रामनाम ध्वनि मुखांतून । निघतां तत्काळ सोडिले प्राण । देखोनि आश्चर्यी करिती जन । धन्य धन्य म्हणताती ॥ ८६ ॥ सद्गुरुवचन करूनि साचें । सार्थक केलें निजदेहाचें । येणे केलें वैकुंठींचें । राम राम वाचे बोलोनि ॥ ८७ ॥ आणिक लाडू म्हणवोनि वैष्णवभक्त । जोतपुरांत होते राहत । आत्मवत अवघें विश्व पाहत । चित्तीं विरक्त सर्वदा ॥ ८८ ॥ नाहीं आपुलें आणि परावें । सर्वभूतीं सारिखा भाव । जयासि रंक आणि राव । एकत्र जीव सारिखे ॥ ८९ ॥ सर्वदा नैराश्य असे चित्तीं । भजन करीतसे प्रेमयुक्ती । ध्यानासि आणूनि विष्णुमूर्ती । बैसे एकांतीं निरंतर ॥९०॥ तयासि वैराग्य जाहलिया जाणा । एकटा चालिला तीर्थाटणा । श्रीहरीची जे विश्वरचना । कौतुकें नाना पाहतसे ॥ ९१ ॥ क्षेत्रें तीर्थे आणि दैवतें । पुराणप्रसिद्ध नामांकित । तये ठायीं असती संत । दृष्टीसीं पहात नीज प्रीतीं ॥ ९२ ॥ ऐसीं स्थळें पाहूनि बहुत । मग काउर देशासि आला त्वरित । तेथिंचे

लोक निर्दय बहुत । अर्चन करीत शक्तीचें ॥ ९३ ॥ मद्य मांस नानारीतीं । देवीसि नैवेद्य अर्पिती । तेथें पुरुषाची बळी देती । उन्मत्त चित्तीं विषयांध ॥ ९४ ॥ लाडू प्रेमळ विष्णुभक्त । तेथें पातला अकस्मात । तंव ते बळीसि मनुष्य पाहत । तों वैष्णव भक्त सांपडला ॥ ९५ ॥ मग चवध्यांनीं धरोनि ते वेळीं । नेला अंबिकेचें देउळीं । देह लोभ सांडोनि ते वेळीं । चित्तीं वनमाळी आठविला ॥ ९६ ॥ विश्वात्मा एक जगज्जीवन । मारिता तारिता नसेचि आन । श्रीविष्णुमूर्ति ध्यानांत आणून । निश्चय मनीं दृढ केला ॥ ९७ ॥ तंव त्याणीं देउळांत आणूनि सत्वर । तिघांनीं धरिला साचार । एकानें उपसिली तरवार । तों काय चरित्र वर्तलें ॥ ९८ ॥ विक्राळरूप धरोनि देवी । चौघासि मारिलें ते समयीं । मग वैष्णव भक्ताचे लागतसे पायीं । म्हणे अपराध सर्वही क्षमा कीजे ॥ ९९ ॥ ऐशापरी करोनि ग्लांती । मग सान रूप धरीत भगवती । अष्टभुजा सगुण मूर्ती । पोत खेळती तयापुढें ॥ १०० ॥ मन प्रसन्न होऊनि वैष्णवभक्ता । म्हणे इच्छित वर माग आतां । कांहीं संकोच न धरोनि चित्ता । ऐसें आदिमाता बोलतसे ॥१॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । तूं मनुष्याची बळी मागसी सत्य । तें आज पासोनि वर्जावें निश्चित । हिंसा येथ न करावी ॥ २ ॥ तुझे देशींचे लोक सर्वही । व्हावे वैष्णवाचे संप्रदायी । ऐसें बोलतां ते समयीं । अवश्य देवी म्हणतसे ॥ ३ ॥ तये देशींचा भूपती । तयासि दृष्टांत सांगितला रात्रीं । दैवयोगें वैष्णव पातला क्षितीं[1] । तरी शरण याप्रती तूं होई ॥ ४ ॥ आजपासोनि माझिये द्वारीं । हिंसा कर्म सर्वथा न करी । नाहीं तरी क्षोभेन तुजवरी । आपदा संसारीं मग होय ॥ ५ ॥ ऐसा दृष्टांत देखोनि त्वरित । मग चमत्कारला नृपनाथ । येऊनि अंबिकेच्या देवळांत । विष्णुभक्तातें नमस्कारी ॥ ६ ॥ लाडु वैष्णव प्रेमळभक्त । यासि धरूनि जे मारीत होते । त्यांचींहि देऊळीं पडिलीं प्रेतें । राजा विस्मित जाहला ॥ ७ ॥ चित्तीं अनुताप धरूनि साचा । अनुग्रह घेतला संताचा । मग सकळ देशचि लाडणाचा । संप्रदायी साचा होतसे ॥ ८ ॥ विष्णुस्मरण हरिकीर्तन । एकादशी व्रताचरण । सर्वभुतीं दया पूर्ण । संत सेवन लोक करिती ॥९॥ करावया विश्वोद्धार । क्षितीं अवतरले वैष्णववीर । आणिक संत चरित्र थोर । ऐका सादर भाविकहो ॥ ११० ॥ एक त्रिलोक नामें सोनार निश्चित । होता परम भाविक भक्त । तो संतसेवा सद्भावें करीत । असे विरक्त संसारीं ॥ ११ ॥ नगांचें घडीत करितसे जाण । तरी कष्टार्जित द्रव्य मागूनि येणें । न चोरी रुपें आणि सोनें । निश्चय पूर्ण तयाचा ॥ १२ ॥ तंव कोणे एके अवसरीं । लग्न मांडिलें रायाचें घरीं । त्रिलोकासि बोलावूनि सत्वरी । आज्ञा करी नृपनाथ ॥ १३ ॥ म्हणे जेहगीर जोडा रत्नजडित । सत्वर करोनि देयीं आम्हातें । तुज ऐसा सोनार निश्चित । चतुर नगरांत नसे कीं ॥ १४ ॥ ऐसें बोलोनि नरनायक । आणूनि देत सुवर्ण माणिकें । तीं त्रिलोकें घेऊनियां देख । तात्काळिक घरासि ये ॥ १५ ॥ मंदिरीं प्रवेशतां तये वेळां । तों दृष्टीसीं देखिला वैष्णव मेळा । चित्तीं परमहर्ष वाटला । म्हणे उदय जाहला भाग्यासी ॥१६॥ मग सुंदर स्वयंपाक

१ पृथ्वीवर.

करवून । केलें संतांचें पूजन । पात्रीं वाढोनियां अन्न । करवीत भोजन सकळांसी ॥ १७ ॥ दोन दिवस त्याचे घरीं । वैष्णव राहिले ते अवसरीं । जेहगीर जोडा करावया सत्वरी । तों विसर अंतरीं पडियेला ॥ १८ ॥ तिसरे दिवसीं राजयानें । बोलावूनि नेलें त्याज कारणें । म्हणे अलंकार देयी त्वरेनें । मग भयभीत मनी होतसे ॥ १९ ॥ हात जोडोनि ते अवसरीं । म्हणे उदईक आणूनि देईन सत्वरी । राजा म्हणे चुकसील जरी । तरी शिक्षा निर्धारीं पावसी ॥१२०॥ मग घरासि येऊनि वैष्णववीर । मनांत जाहला चिंतातुर । म्हणे हें अवघड काम साचार । यासि दिवस चार लागती ॥२१॥ उदईक देईन म्हणवोन । राजासी करार केला जाण । तरी जवळीच आले मरण । संत सेवन अंतरलें ॥ २२ ॥ ऐसें म्हणोनि चित्तांत । मग पळोनि गेला अरण्यांत । तेथें एकाग्र करूनि चित्त । श्रीरुक्मिणीकांत आठविला ॥ २३ ॥ ऐशापरी क्रमिली राती । तों उदयासि पातला गभस्ती । संकट जाणूनि वैकुंठपती । कौतुक करिती काय तेव्हां ॥ २४ ॥ त्रिलोकाचें रूप धरोनि सत्वर । घडीत बैसले दुकानावर । जेहगीर जोडा केला सत्वर । तो बोलावी नृपवर तयासी ॥ २५ ॥ मग तेथें सत्वर जाऊनियां । मुजरा करीत असे राया । अलंकार दाखवितांचि तया । म्हणे तुझ्या चातुर्या अंत नाहीं ॥ २६ ॥ बैसविलें रत्नाचें कोंदण । त्याच्या प्रकाशें झांकती नयन । मग संतुष्ट होऊनि नृपनंदन । बहुत धन देत असे ॥ २७ ॥ तें पदरीं घेऊनि श्रीहरी । पातलें निजभक्ताचें घरीं । घरस्वामीनी पासीं देत सत्वरीं । मग आज्ञा करी तिजलागीं ॥ २८ ॥ आज उत्साह आहे आपुलें मंदिरीं । साधु संत येतील घरीं । तरी सत्वर मिष्टान्नें निर्माण करी । ते आज्ञा शिरीं वंदितसे ॥ २९ ॥ स्वयंपाक जाहलिया निश्चित । घरासि आले वैष्णवभक्त । त्रिलोकाच्या रूपें निश्चित । तयांशि पूजित जगदात्मा ॥ १३० ॥ साधु तृप्त जाहलिया पाहीं । आपणही जेविले त्या ठायीं । पदरीं प्रसाद बांधोनि पाहीं । मग अरण्यांत लवलाहीं जातसे ॥ ३१ ॥ साधुरूप धरूनि निश्चिती । त्रिलोकासि काय बोलती । मज तो बहुत पडिली भ्रांती । तरी सांग मजप्रती मार्ग कोठें ॥ ३२ ॥ बैरागी देखोनि समोर । नमस्कारितसे वैष्णववीर । म्हणे स्वामी कां अरण्यांत आलां दूर । वाट समग्र चुकलां ॥ ३३ ॥ ऐसें पुसतां भक्त चतुरा । काय म्हणती सारंगधर । या गांवांत त्रिलोक सोनार । मी जेविलों पोटभर त्याचें घरी ॥ ३४ ॥ त्याणें वैष्णव बोलावूनि मंदिरीं । उत्साह केला आपुलें घरीं । बहुत पक्वानें वाढिलीं पात्रीं । तेणें सुस्त अंतरीं जाहलों ॥ ३५ ॥ निद्रा येतसे क्षण क्षण । यास्तव पंथ चुकला जाण । प्रसाद आणिला तुजकारणें । हा भक्षी त्वरेनें ये समयीं ॥ ३६ ॥ ऐसी संपादणी करूनियां । मग भोजनासि बैसविलें तया । पूर्ण कृपेची केली छाया । येतसे दया दीनाची ॥ ३७ ॥ महाप्रसाद सेविलिया जाण । त्रिलोक पुसे साधू कारणें । त्याणें कशास्तव उत्साह केला जाण । खर्चिलें धन कोठूनी ॥ ३८ ॥ यावरी म्हणे रुक्मिणीकांत । त्याणें जेहगीर जोडा रत्न जडित । नेऊनि दीधला

राजयातें । तेणें नृपनाथ संतोषला ॥ ३९ ॥ धन वित्त दीधलें ते अवसरा । यास्तव उत्साह केला वरा । ऐकोनि साधूच्या उत्तरा । मग विस्मित अंतरीं होतसे ॥ १४० ॥ तयासि घेऊनि वैष्णव भक्त । घरासि आला भीत भीत । कांतेसि पुसतां वृत्तांत । तों बैरागी तेथे गुप्त झाला ॥ ४१ ॥ तो कांता तयासि म्हणताहे । वेड घेऊनि पुसतां काय । तुम्हीं जेहगीर जोडा घडिता पाहे । दीधलें रायें धन वित्त ॥ ४२ ॥ मग वैष्णव बोलावूनि निजमंदिरीं । तुम्हींच उत्साह केला घरीं । त्रिलोकासि समजलें अंतरीं । म्हणे शिणला हरी मजसाठीं ॥ ४३ ॥ जो ब्रह्मयाचा तात सुंदर । वैकुंठवासी जगदुद्धार । तो निजांगें होऊनि सोनार । तोषविला नृपवर वाटतें ॥ ४४ ॥ जनासि कळतांचि हे मात । प्रतिष्ठा महंती वाढेल बहूत । मग आपुलें चित्तीं होऊनि विस्मित । राहे पूर्ववत उगाची ॥ ४५ ॥ श्रीहरी कृपेनें निर्धारीं । सर्व सिद्धि अनुकूळ झाल्या घरीं । मग उत्साह धरोनि निजअंतरीं । सद्भावें करी संतसेवा ॥ ४६ ॥ आतां सजण कसाई वैष्णव भक्त । संसारीं असे परम विरक्त । प्रपंच धंदा करितां निश्चित । भजन करित श्रीहरीचें ॥ ४७ ॥ स्वयातीपासीं बाजारांत । आयतेंच मांस विकत घेत । त्याचा विक्रय करोनि निश्चित । काळक्षेप करित आपुला ॥ ४७ ॥ परी हिंसाकर्म न करीच जाण । असत्य सर्वथा न बोले वचन । वैष्णव भक्त दृष्टीसीं देखोन । तयासि नमन करीतसे ॥ ४९ ॥ शिधा साहित्य यथास्थिती । देऊनि तृप्त करी अतिथी । दया संपूर्ण सर्वांभूतीं । शुचिर्भूत वृत्ती सबाह्य ॥ १५० ॥ वस्त्रें पात्रें शुचिर्भूत । तुळसी वृंदावन लखलखीत । स्नान करी नित्य नित्य । वैकुंठनाथ आठवी ॥ ५१ ॥ कांताही परम पतिव्रता । अनुकूळ असे परमार्थ हिता । जाणोनि पतीच्या मनोगता । साधु–संतां भजतसे ॥ ५२ ॥ तों मांस विकावया कारणें । शाळग्रामाचें केलें वजन । त्याचा भक्तिभाव देखोन । जगज्जीवन सुरवाडलें ॥ ५३ ॥ एके दिवसीं वैष्णव भक्त । दुकानीं बैसें बाजारांत । तों एक ब्राह्मण येऊनि तेथ । त्याणें शाळग्राम निश्चित ओळखिला ॥ ५४ ॥ मग सजणासि येतसे काकुलती । म्हणे हे तों आहे विष्णुमूर्ती । तुझे घरीं ठेवूं नये निश्चिती । तरी देई मजप्रती सत्वर ॥ ५५ ॥ याचें कांहीं मोल मागसील जर । तरी तें तुझ्या हातीं देतो सत्वर । ऐसें विनवितांचि द्विजवर । मग शाळग्राम सत्वर दिधला ॥ ५६ ॥ घरासि नेऊनि त्या ब्राह्मणें । महा उत्साह मांडिला त्याणें । वैदिक ब्राह्मण बोलावून । करीतसे पूजन विष्णुचें ॥ ५७ ॥ अभिषेक करोनियां ओजा । षोडशोपचारें केली पूजा । परी ते न मानें अधोक्षजा । म्हणे निजभक्त काजा अंतरलों ॥ ५८ ॥ ब्राह्मणें शाळग्रामासि पूजून । केलें ब्राह्मण संतर्पण । तों रात्रीं येऊनि जगज्जीवन । दाविलें स्वप्न काय त्यासी ॥ ५९ ॥ मी सजण कसयाचे घरीं । सुरवाडें राहिलों होतों नरहरी । तूं कां घेऊनि आलासि सत्वरी । मज निर्धारीं कंठेना ॥ १६० ॥ आतां प्रातःकाळीं उठोनि निश्चित । नेऊन घाली जेथील तेथ । नाइकशील जरी त्वरित । तरी होईल घात क्षणमात्रें ॥ ६१ ॥ ब्राह्मण भयभीत होउनी । जागृतीसि आला तये क्षणीं । तो कसाई


न घेचि अन्नपाणी । शाळग्रामावांचोनी सर्वथा ॥ ६२ ॥ एक रात्र एक दिवस । सजणासि घडला उपवास । दिनकर येतांचि उदयास । तों ब्राह्मण घरास पातला ॥६३॥ स्वप्नींचा वृत्तांत सांगूनि सर्व । म्हणे तूं तरी परम भक्तवैष्णव । सुखें पूजावा आपुला देव । सप्रेमभाव धरोनियां ॥ ६४ ॥ ऐकोनि द्विजवराची वाणी । सजण कसाई संतोषे मनीं । मग विष्णुमूर्तीची पूजा करोनि । तेव्हां अन्न पाणी घेतलें ॥ ६५ ॥ सप्रेम भक्तीचा भुकेला हरी । याती कुळ न विचारी । नीच काम अंगें करी । ऐश्वर्य अंतरीं नाठवितां ॥ ६६ ॥ कसायाची देखोनि भक्ती । सुरवाडें राहे श्रीविष्णुमूर्ती । मग जगन्नाथासि जावया निश्चित । हेत चित्तीं उपजला ॥ ६७ ॥ देशिंची यात्रा निघाली फार । त्यासवें चालिला वैष्णववीर । शाळग्राम घेतला बरोबर । पूजितसे आदरें तयासि ॥ ६८ ॥ नित्य स्नान करोनि जाण । द्वादश टिळे गोपीचंदन । कंठीं तुळसी भूषणें । वैष्णव पूर्ण शोभतसें ॥ ६९ ॥ नित्य नेम सारोनि ऐशा रीतीं । मग पूजितसे शाळाग्राममूर्ती । यात्रेंत भिक्षा मागोनि निश्चिती । उदरवृत्ती चालवित ॥ १७० ॥ रात्रिसमयीं साचार । यात्रेपासोनि उतरतसे दूर । ऐसा पंथ क्रमितां साचार । तों वाटेसि नगर लागलें ॥७१॥ भिक्षा मागावया लागोनि । गांवांत प्रवेशे एके सदनीं । तों घरस्वामिण होती व्यभिचारिणी । कामातुर देखोनि ते झाली ॥ ७२ ॥ भोग इच्छा धरोनि अंतरीं । तयासि राहविलें आपुलें घरीं । शिधा साहित्य देऊनि सत्वरीं । आदर करी बहु त्याचा ॥७३॥ अंतरीचा कपटभाव । सर्वथा नेणें भक्तवैष्णव। बाहेर आदरासि भुलोनि भावें । वस्तीसि ठाव तो धरिला ॥७४॥ अर्ध रात्र लोटतां सत्वर । घरस्वामीण सन्निध येतसे त्वरें । सजाणासि बोले मधुरोत्तर । म्हणे तुझ्यावरोबर मी येतें ॥७५॥ ऐसे बोलतां व्यभिचारिणी । उत्तर देतसे तिजलागुनी । तुझा भ्रतार निजला सदनीं । त्याजला टाकुनीं जाऊं नये ॥ ७६ ॥ ऐसें सांगतां वैष्णववीर । मग घरांत गेली ते सुंदर । निजपतीचें कापोनि शिर । आणिलें सत्वर बाहेरी ॥ ७७ ॥ मग सजाणासि काय बोलत । पति मारिला म्यां आपुल्या हातें । आतां मज भोग देई त्वरित । परी नायकेंचि विष्णुभक्त सर्वथा ॥ ७८ ॥ व्यभिचारीण म्हणे तयाप्रती । तुजसाठीं म्यां मारिला पती । आतां नायकसी माझी वचनोक्ती । तरी करीन फजिती जनांत ॥ ७९ ॥ ऐसे म्हणवोनि ते भामिनी । बाहेर गेली तये क्षणी । बाजारीं करीत शंखध्वनी । तों लोक सदनीं मिळालें ॥ १८० ॥ तयासि सांगतसे वृत्तांत । हा तस्कर शिरला मंदिरांत । याणेंच माझा प्राणनाथ । मारिला निश्चित ये समयीं ॥ ८१ ॥ माळा मुद्रा घातल्यावरी । हा वैष्णव दिसतो दुराचारी । म्हणवोनि ठाव दीधला घरीं । घातक निर्धारीं मी नेणें ॥ ८२ ॥ ऐसें बोलतां ते जारिणी । लोक विस्मित झाले मनीं । मग वैष्णव भक्तासि घेउनी । दिवाणांत त्यांणीं त्यास नेलें ॥ ८३ ॥ वैष्णवासि पुसे ग्रामाधिकारी । हें तुवां अघटित केली परी । अन्न खावोनि याचे घरीं । घातावरीं टेंकसी ॥ ८४ ॥ मग आद्यंत यथार्थ वर्तमान । सजण सांगतसे त्याजलागुन । परीं सत्य न वाटे

कोणाकारणें । दृष्टीसी खूण देखूनी ॥ ८५ ॥ एक म्हणती मैंदाचिया गळा । घातल्या उदंड तुळसी माळा । आणि घरधणीचा घात केला । हा कैसा भला म्हणावा ॥ ८६ ॥ एक बोलती यथार्थ वाणी । व्यर्थ कां निंदितां त्याजलागोनी । हेठायींची असे व्यभिचारिणी । भ्रतार मारोनी टाकिला ॥ ८७ ॥ इचें तों वचन न ऐकावें । ऐसाचि निश्चय वाटतो जीवें । यात्रेकरियासि सोडूनि द्यावें । सुकृत बरवें तरी घडे ॥ ८८ ॥ ऐसी धार्मिकाची वचनोक्ती । अधिकारियासि मानली चित्तीं । मग सजण कसाई सोडोनि देती । तंव जारिणी बोलत काय तेव्हां ॥ ८९ ॥ याणें मारिला माझा भ्रतार । तरी तोडोनि टाकावा याचा कर । जरी तुम्ही नायकाल माझें उत्तर । तरी रायासि सत्वर सांगेन मी ॥ १९० ॥ ऐसा तिचा निग्रह थोर । मग तिज हातीं सजणाचा तोडविला कर । खेद करीतसे वैष्णववीर । म्हणें कर्म दुस्तर पै माझें ॥ ९१ ॥ यात्रा निघोनि गेली दुरी । ते आटोपून गेला सत्वरीं । लोक पुसती ते अवसरीं । केली चोरी कोणे ठायीं ॥ ९२ ॥ यास्तव हात तोडिला जाण । ऐसा तर्क करिती मनें । सजण कसाई संतोषानें । श्रीहरी भजन करीतसे ॥ ९३ ॥ ऐसी त्याची असतां स्थित । पंथ क्रमीत नित्य । संनिध उरला जगन्नाथ । तों चरित्र अद्भुत वर्तलें ॥ ९४ ॥ पंड्यासि दृष्टांत सांगितला देवें । शिबिका घेऊनि तुह्मी जावें । सज्जण कसाई भक्त या नावें । बैसोनि आणावें तयासी ॥ ९५ ॥ ऐसें स्वप्न ते अवसरीं । देखोनि विस्मित झाले ते पुजारी । पालखी घेऊनि सत्वरी । यात्रेभीतरी प्रवेशलें ॥ ९६ ॥ मग स्वमुखें लोकांकारणें पुसत । सजन कसाब वैष्णव भक्त । कोणता आहे यात्रेंत । तरी तो आम्हातें दाखवा ॥ ९७ ॥ जगन्नाथें आज्ञापिलें आम्हांसि । शिबिकेंत बैसवोनि आणावें त्यासी । ऐसें पुसतां पुजारीयासी । मग यात्रेकरी तयांसि दाखविती ॥९७॥ पंडे म्हणती वैष्णव भक्ता । तूं बहुत आवडसीं जगन्नाथा । तरी शिबिकेंत बैसोनि चाल आतां । मान वचनार्थ देउनि ॥ ९९ ॥ ऐसे सांगतां पुजारी । आश्चर्य करिती यात्रेकरी । म्हणती याणें वाटेवर करोनि चोरी । हात निर्धारीं तोडविला ॥ २०० ॥ पतिताचा पावन श्रीहरी । हा साचचि प्रत्यय आला अंतरी । तस्करासि न्यावया निर्धारीं । शिबिका सत्वरी पाठविली ॥ १ ॥ सज्ञान बोलती प्रतीवचन । ज्याचें अंतर तोचि जाणें । व्यर्थ कां निंदितां त्याजकारणें । नामस्मरण टाकोनियां ॥ २ ॥ अंतरभाव शुद्ध जाणूनिया । देवें पालखी पाठविली तया । ऐसी साक्ष पाहोनियां । निंदितसां वायां व्यर्थ त्यासी ॥ ३ ॥ असो त्रिविध जन नानापरी । करीत असती निंदा स्तुती । अनुभवें येतां कांही प्रचीती । संतासि मानिती मग तेव्हां ॥ ४ ॥ तंव पुजारी म्हणती वैष्णव भक्त । शिबिकेंत बैसोनि चाल आतां । तुझी खंती वाटते जगन्नाथा । सामोरा आतां आम्ही आलों ॥ ५ ॥ ऐकोनि म्हणे प्रेमळभक्त । मी सुखासनीं[1] न बैसे निश्चित । कांहीं अपराध न होता किंचित । जगन्नाथें हात तोडविला ॥ ६ ॥ आधी नाक कापूनि जाण । मग ते पुसिलें पाटांवानें । तैसेंच देवाचे


[1] पालखी.

समजावणे । मजकारणे दिसतसे ॥ ७ ॥ ऐसें बोलोनि तें वेळां । पटापटा आसुवें आलीं डोळा । म्हणे हा अनाथबंधु घनसांवळा । काशस्तव कोपला मजवरीं ॥ ८ ॥ संकटीं पावतो भक्ताकारणें । हें तीं पुराणप्रसिद्ध वचनें । तें असत्य वाटे मजकारणें । अनुभवे करून आपुल्या ॥ ९ ॥ ऐसेंच करणे होते तया । तरी पायी विरुद बांधिले कासया । मनें वाचा आणि काया । मी त्याच्या पायां अनुसरलो ॥२१०॥ सजण कसाइ ऐशापरी । क्षीत मानितसे नानापरी । तों सगुणरूपें ते अवसरी । तयासि श्रीहरी भेटले ॥११॥ चतुर्भुज सांवळी मूर्ती । दिव्य कुंडले कानी तळपती । शंख चक्र आयुधें हाती । पीतांबर दीप्ती झळकतसे ॥ १२ ॥ लपवोनिया जनांचि दृष्टी । कसायासि भेटले जगजेठी । मग दृढपायीं घालोनि मिठी । आलिंगूनि भेटी घेतसे ॥ १३ ॥ मग श्रीहरीसि पुसे प्रेमळ-भक्त । माझा कशास्तव तोडविला हात । कोणतें जन्मांतर होतें निश्चित । ते मज त्वरित सांग देवा ॥१४॥ यावरी म्हणे जगज्जीवन । तूं पूर्वजन्मीचा होतास ब्राह्मण । गंगातीरीं करोनि स्नान । मांडिलें ध्यान विष्णूचे ॥१५॥ तों कसायापासूनि सुटली गाय । तें पळोनि गेली लवलाहें । मग हिंसक येऊनियां पाहे । पुसता होय तुजलागीं ॥ १६ ॥ परी बोलिला नाहींस त्याजकारणें । हातें करोनि सांगीतली खूण । मग कसायानें धरोनि जाण । घेतले प्राण धेनूचे ॥ १७ ॥ ऋण वैर हत्या जाण । तें तरी न सुटे दीधल्या विण । कसायाचें ध्यावया उणे । जन्म गाईनें घेतला ॥ १८ ॥ हिंसक आणि गाय तत्त्वतां । तीं स्त्रीपुरुषें झाली उभयतां । खडाष्टक दोघांत असतां । गांजीतसें कांता नित्य त्यासी ॥ १९ ॥ तुझें जन्मांतर होतें कांहीं । यास्तव गेलासि तिचें गृहीं । मग जवळ येऊनि रात्रि समयीं । तुज ते विषयी गोवूं पाहे ॥२२०॥ भ्रताराचें आयुष्य सरे । मग तिणें साधिलें पूर्ववैर । आपुल्या हाते कापून शिर । बालंट तुजवर घातलें ॥ २१ ॥ ज्याहातें दाखविलें गाईप्रती । तो तिणे तोडविला सत्वरगती । ऐसी जन्मांतराची रीती । सजणासि श्रीपती सांगतसे ॥ २२ ॥ तूं विष्णु अर्चन करितां मानसीं । दृष्टींसीं पाहिलें कसायासी । म्हणवोनि जन्म याचे वंशीं । जाहला तुजसीं निश्चित ॥ २३ ॥ आणि ब्राह्मण जन्मींचा आचार पाहीं । तुज तोचि आवडे ये समयीं । परी भक्ति भजनासि पालट नाहीं । मी शेषयायी भुललों ॥ २४ ॥ मग प्रसन्न होऊनि जगन्नाथ । अघटित चरित्र काय करीत । तत्काळ फाटला त्याचा हात । लोक समस्त पाहाती ॥ २५ ॥ जयजयकारें पिटोनि टाळी । आनंदली भक्त मंडळी । म्हणती भक्तासि पावला वनमाळी । हेतों नव्हाळी अनुपम ॥ २६ ॥ अद्भुत चरित्र देखोनि थोर । मग सकळ करिती नमस्कार । म्हणती धन्य हा वैष्णववीर । वैकुंठ-विहार वश्य केला ॥ २७ ॥ नाना चरित्रें दाखवोनि श्रीपती । आपुल्या दासाची वाढवीत कीर्ती । सजण कसाई संतोषे चित्तीं । जगन्नाथीं मग जाय ॥ २८ ॥ समुद्र तीरीं करोनि स्नान । घेतलें श्रीहरीचें दर्शन । चातुर्मास तेथें राहोन । त्रिकाळ घे दर्शन देवाचें

॥ २९ ॥ विष्णुस्मरण हरिकीर्तन । सर्वदा आनंदयुक्त मन । जगन्नाथाची आज्ञा घेऊन । आपुलें स्वस्थान पावला ॥ ३० ॥ अनेक संतांच्या अनेक स्थिती । यांचीं एकविध सप्रेम भक्ती । देखोनि भुलला रुक्मिणीपती । जगीं सत्कीर्ती वाढवित ॥ ३२ ॥ पुढिले अध्यायीं कथा सुंदर । वद्विता श्रीरुक्मिणीवर । महीपतीसि देऊनि अभयवर । वसविलें अंतर निजकृपें ॥३३॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परीसोत भाविक भक्त । पंचेचाळिसावा अध्याय गोड हा ॥ २३४ ॥ ॥ अ० ॥ ४५ ॥ ओव्या ॥ २३४ ॥



अध्याय ४६



श्रीगणेशाय नमः ॥ जें सकळ मंगळांचें सार । कीं महा सिद्धींचें भांडार । कीं सायुज्य मुक्तीचें निज मंदिर । पावन चरित्र संतांचें ॥१॥ कीं पूर्णतेचीही आत्मस्थिती । मुक्तीवरील चौथी भक्ती । कीं प्रेमळाचीही अंतर्ज्योती । धैर्य वृत्ती सात्विक ते ॥२॥ कीं अमृताचा चमत्कार । नातरी वासरेमणीचा प्रकाश थोर । कां नभाचा अवकाश साचार । सांठवे चराचर त्यामाजी ॥३॥ कां वैष्णवी मायेचें विसावणें । कां भागीरथीचें अधिष्ठान । नातरी वैकुंठीचें पेणें । कीं सगुण ध्यान श्रीहरीचें ॥ ४ ॥ कां अवर्षणें गांजिली सृष्टी । मग त्याही वरील मेघवृष्टी । कीं सत्वधीराची प्रपंच रहाटी । पावन गोष्टी संतांची ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथा अद्भुत । सजण कसाई प्रेमळ भक्त । त्यासि कृपा करितां जगन्नाथ । तत्काळ हात फूटला ॥६॥ आतां नर वाहन वैष्णवभक्त । संत सेवा असे करित । राधाकृष्ण स्मरण सत्य । वाचेसीं जपत सर्वदा ॥७॥ महानदीचिये तीरीं । नावेवरी लोकांस उतरी । तेणें काळक्षेप आपुला करी । उदास अंतरीं सर्वदा ॥८॥ साधुसंत वैष्णववीर । तयांसि न मागे उतार । दीन अनाथांसि करितसे पार । परी द्रव्य साचार न मागे ॥९॥ धनवंत व्यवसायी देख । द्रव्य देतील आपुल्या सुखें । तें आपल्या संतोषें मानीत हरिखें । सात्विक विवेक त्यामाजी ॥१०॥ तंव कोणे एके अवसरीं । अवघे मिळोनि दुराचारी । रायापासीं नानापरी । भरीउभरी घातल्या ॥ ११ ॥ म्हणती नरवाहन गंगातीरीं । तुम्हीं ठेविला नावेवरी । तो द्रव्य नेदीच राजद्वारीं । ठेवितो मंदिरीं आपुल्या ॥ १२ ॥ ऐकोनि दुर्जनांचें वचन । राजा जाहला क्रोधायमान । म्हणे ऐसा उन्मत्त नरवाहन । तरी घर लुटणें तयाचें ॥ १३ ॥ ऐसी आज्ञा होतांचि सत्वरी । मग भृत्य गेले त्याच्या घरीं । तों कांहीं द्रव्य न दिसे मंदिरीं । मग खणती सत्वरीं लाविली ॥ १४ ॥ परी वस्तभाव अळंकार । द्रव्य न दिसे अणुमात्र । मग नरवाहनासि धरोनि सत्वर । राज किंकर ते नेती ॥ १५ ॥ दुर्जन रायासि म्हणती पाहीं । याणें द्रव्य ठेविलें आणिके ठायीं । ऐकोनि नृपवर ते समयीं । बंदिखानीं ठेवि तयासी ॥ १६ ॥ म्हणे कोठें लपविलें आपुलें धन । तें सत्वर आम्हांसि सांगणें । तरीच सोडूं तुज कारणें । नाहीं तरी प्राण घेऊं आतां ॥ १७ ॥ अस्तमानापर्यंत ते दिवशीं । विष्णु भक्त राहिला उपवासी । तों अन्न घेऊनि त्याची दासी । बंदिशाळेसी पातली ॥१८॥ दासीसि पुसे तये क्षणीं । मी तरी पडिलों बंदिखानीं । सुटका होईल कैसेनी । उपाय मनीं सुचेना ॥१९॥ संतसेवेसि निश्चित । द्रव्य खर्चिलें नित्यनित्य । घरीं ऐवज नाहीं किंचित । काय रायातें दाखवूं ॥२०॥ दासी म्हणतसे ते अवसरीं । तुम्हीं चिंतातुर कासया अंतरीं । आपुल्यास संकट पडिलें जरी । चित्तीं श्रीहरी आठवावा ॥२१॥ दुष्काळीं उपवासी मरतां । मग ओळंगावा मिष्टान्न दाता । कीं तारक कवळिजे पूरीं बुडतां । तेवीं संकटीं अनंता आळवावें ॥२२॥ कां देह व्यापिला रोगें करोनी । तरी मंत्र उच्चारावा संजीवनी । तेवीं संकट पडतां भक्तालागोनी । तरी श्रीहरि चिंतनी बैसावें ॥ २३ ॥ ऐसी दासीची वचनोक्ती । नर वाहनासि मानली चित्तीं । मग तुळसी माळा घेऊनि हातीं । भजन एकांतीं करितसे ॥२४॥ राधा कृष्णाची

१ सूर्याचा. २ सेवक.

उपासना । तें सगुणस्वरूप आणीतसे ध्याना । अहोरात्र नामस्मरणा । एकाग्र मनें करितसे ॥ २५ ॥ झांकोनियां नेत्रपातीं । हृदयीं चिंतिला वैकुंठपती । चतुर्भुज सांवळी मूर्ती । शंख चक्र हातीं मंडित ॥ २६ ॥ ऐसें रूप आणोनि ध्यानीं । काय करितसे विनवणी । म्हणे देवाधिदेवा कैवल्यदानी । सोडवी भवभ्रमा पासूनियां ॥ २७ ॥ ऐसा धांवा ऐकोनि कानीं । तत्काळ पावले चक्रपाणी । बेडी तोडोनि तिसरे दिनीं । रायासि स्वप्नीं काय सांगे ॥ २८ ॥ म्हणे नरवाहन माझा निजभक्त । साधु सेवेसि सर्वदा रत । तयासि तुवां छळिलें व्यर्थ । हरिल सुकृत तेणेंची ॥ २९ ॥ तूं राजमदें उन्मत्त चित्तीं । न विचारिसीच राजनीती । ऐकोनि दुर्जनांची कुमती । वैष्णवाप्रती छळियेलें ॥ ३० ॥ तरी आतां सावध होऊनि सत्वर । नरवाहनासि करी नमस्कार । इतुका दृष्टांत देखोनि सत्वर । जागृत नृपवर जाहला ॥ ३१ ॥ मग परम भय पावोनि चित्तीं । बंदिशाळेसि आला नृपती । नरवाहनासि बोलावोनि प्रीतीं । करीतसे ग्लांती तेधवां ॥ ३२ ॥ म्हणे माझा अपराध न गणोनि कांहीं । आतां आपुल्या मंदिरासि जायीं । दुर्जनांची कुबुद्धि ऐकोनि पाहीं । तुज ये समयीं छळियेलें ॥ ३३ ॥ ऐकोनि रायाची विनवणी । नरवाहन संतोषला मनीं । म्हणे अनाथनाथा चक्रपाणी । तयाची करणी हे दिसे ॥ ३४ ॥ मग घरासि जातां तयाप्रती । कुटुंबासि आनंद झाला चित्तीं । संतसेवा करीतसे प्रीतीं । सिद्धि राबती सर्व घरीं ॥ ३५ ॥ आणिक चरित्र रसाळ पुढती । सादर ऐकिजे सभाग्य श्रोतीं । रायसिंग आणि अंगद भूपती । बंधु असती उभयतां ॥ ३६ ॥ धाकट्या अंगदाची कांता । परम भाविक पतिव्रता । विष्णु अर्चन श्रीहरिकथा । आवडी चित्ता हे बहू ॥ ३७ ॥ एक विष्णुभक्त सत्पुरुष पाहून । त्याचा अनुग्रह घेतला तिणें । सर्वदा करीत नामस्मरण । सप्रेम मन सर्वदा ॥ ३८ ॥ तंव एके दिवशीं नगरांत । अवचित आले सद्गुरुनाथ । अंगदाचे स्त्रीस आनंद बहुत । मग मंदिरीं तयातें आणिलें ॥ ३९ ॥ मग सर्व उपचार आणोनि पूजेसी । बैसतसे सद्गुरु सेवेसी । वृत्तांत कळला अंगदासी । वर्जितसे तिसीं सक्रोध ॥ ४० ॥ म्हणे गुरु द्रुमिथ्या विचार । कांतेचा देव तो भ्रतार । या विरहित दैवत थोर । असेल तर मज दावी ॥ ४१ ॥ ऐसें म्हणवोनि उन्मत्तपणें । करूं नेदी सद्गुरु पूजन । त्याच्या स्त्रीनें वर्जिलें अन्न । दिवस तीन लोटले ॥४२॥ तिच्या भक्तीस्तव श्रीहरी । अंगदासि भेटले स्वप्नांतरीं । चतुर्भुज मूर्ति साजिरी । शंख चक्र करीं मंडित ॥ ४३ ॥ सांवळें श्रीमुख मनोहर । कांसेसि दिव्य पीतांबर । पायीं नेपुरें वांक्या तोडर । आणि मकराकार कुंडलें ॥ ४४ ॥ ऐसी मूर्ति भव्य वाणी । अंगदें साक्षात देखिली स्वप्नीं । मग सद्भावें माथा ठेविला चरणीं । सप्रेम मनीं निवाला ॥ ४५ ॥ प्रातःकाळीं येऊनि जागृती । मग समजावीतसे कांतेप्रती । म्हणे तुझ्या प्रसादें निश्चिती । मज वैकुंठपती भेटले ॥ ४६ ॥ मग तिच्या सद्गुरूसि आणोनि घरीं । पूजा केली सर्वोपचारीं । परम सद्भाव धरोनि अंतरीं । अनुग्रह सत्वरी घेतला

॥ ४७ ॥ कांता भ्रतार दोघे निश्चित । श्रीविष्णु भक्तीसी जाहली रत । सद्भावें साधु सेवा करीत । द्रव्य वेंचित सत्पात्रीं ॥ ४८ ॥ तंव
वडील बंधु रायसिंग जाण । देशांतरा पाठवित अंगदाकारणें । सवें घेऊनि कांहीं सैन्य । एक राजा तेणें लुटिला ॥ ४९ ॥ तेथें शत
हिरे सांपडले त्यासी । ते अवघे वांटिले वैष्णवांसी । एक ठेवित आपणापासी । म्हणे हा जगन्नाथासीं अर्पावा ॥ ५० ॥ घरासि आलिया
वैष्णव जन । द्रव्य दीधलें बंधू कारणें । परी अमुल्य हिरा ठेविला चोरून । तो सेवक जन सांगती ॥ ५१ ॥ रायसिंग मागतां आपण ।
परी अंगद सर्वथा नेदीच जाण । तेणें विकल्पें विटाळले मन । मग क्रोधायमान तो झाला ॥ ५२ ॥ मग स्वमुखें सांगे भगिनीसी ।
विष घालावें अंगदासी । अवश्य म्हणवोनि तयासी । मग भोजनासी पाचारिलें ॥ ५३ ॥ कृत्रिम भाव मनांत । हें अंगदासि नसेचि
श्रुत । विष कालवोनि अन्नांत । भगिनी वाढित त्यालागीं ॥ ५४ ॥ मग ध्यानांत आणोनि वैकुंठपती । अंगदें नैवेद्य दाखविला प्रीतीं ।
मग निश्चय पाहोनि श्रीपती । कौतुक करिती काय तेव्हां ॥ ५५ ॥ भगिनीच्या हृदयस्थ होऊनि आपण । म्हणे त्वां सर्वथा न खावें
अन्न । विष कालवोनि रांधिलें जाण । तुझ्या बंधूने सांगितलें ॥ ५६ ॥ वैष्णव भक्त म्हणतसे तेव्हां । म्यां नैवेद्य दाखविला असे देवा ।
तरी महा प्रसाद न टाकावा । अगत्य सेवावा प्रीतीनें ॥ ५७ ॥ श्रीहरी भोक्ता म्हणवोन । अंगद जेविला अवघेंचि अन्न । परी विष न
बाधी तयाकारणें । जगज्जीवन रक्षिता ॥ ५८ ॥ जो प्रल्हादाचिया बोला । विषासगट आपण झाला । मिराबाईचा जीव रक्षिला । संकटीं
पावला श्रीहरी ॥ ५९ ॥ अंगदें समजोनि ऐशा रीतीं । वृत्तांत सांगितला कांतेप्रती । म्हणे आतां न राहावें ये क्षितीं । उदासवृत्ती
धरियेली ॥ ६० ॥ कांतेसि घेऊनि बरोबरी । जगन्नाथासि चालिले सत्वरीं । तों रायसिंगासि क्रोध आला भारी । सैन्य वरी पाठविलें
॥ ६१ ॥ म्हणे अंगदासि धरोनि सत्वरीं । हिरा घेऊनि येइजे त्वरें । प्रधानें सैन्य घेवोनि फार । वेढिलें साचार त्यालागीं ॥ ६२ ॥
मग अंगदे हिरा घेऊनि हातीं । दाखविला सकळांप्रती । मग डोहांत टाकिला सत्वर गती । म्हणे पावो तुज प्रती जगन्नाथा ॥ ६३ ॥
देखोनि रायसिंगाचे भृत्य । शोध करिती जळांत । तों अंगद म्हणतसे तयातें । शिणतां व्यर्थ कां तुम्हीं ॥ ६४ ॥ हिरा नेऊनि उठाउठी ।
जगन्नाथें घातला कंठीं । तुम्हांसि असत्य वाटेल पोटीं । तरी चला दृष्टीं दाखवितो ॥६६॥ ऐसें म्हणतां वैष्णवभक्त । प्रधान लोक आश्चर्य
करीत । मग अंगदाच्या समागमें निश्चित । आले समस्त जगन्नाथी ॥ ६७ ॥ देवदर्शनासि जातांचि त्याणीं । हिरा ओळखिला आपुलें
नयनीं । मग पुजारियांसि पुसती तये क्षणीं । हा कोणी आणोनि वाहिला ॥ ६८ ॥ पंडे बोलतीं साच उत्तर । दोन प्रहर येतां दिनकर ।
हिरा पडिला देवासमोर । यासि दिवस चार लोटले ॥ ६९ ॥ मग आम्हीं ठेविला उचलोनी । तंव दृष्टांती सांगे चक्रपाणी । हिरा पदकांसि
घालोनि । मजलागोनि समर्पी ॥७०॥ माझा निजभक्त अंगद नृपती । त्याणें समर्पिला मजप्रती । ऐसा दृष्टांत देखतां रातीं । मग पदकीं

निश्चित जडियेला ॥७१॥ ऐसें ऐकोनि प्रधान जन । विस्मित जाहले आपुल्या मनें । मग रायसिंगासि वर्तमान । साकल्य लेहून पाठविलें
॥ ७२ ॥ ऐकोनि अनुताप जाहला तया । म्हणे म्यां वंधूसि छळिलें वायां । मग पत्रीं लेहोनि भापक्रिया । म्हणे आपुल्या ठायां तुम्हीं यावें
॥ ७३ ॥ तूं साक्षात्कारी विष्णुदास । हे नेणेंचि मी वहुवस । नाशवंताची धरोनि आस । म्यां धरिला द्वेष अंतरीं ॥ ७४ ॥ आतां मागील
चित्तीं न धरोनि कुन्हें । ममता धरोनि भेटीस येणें । नायकसील तरी तुज आण । श्रीजगन्नाथाची जाणपां ॥ ७५ ॥ पत्र लेहोनि ऐशा
रीतीं । पाठविलें वार्तिकाचे हातीं । तें आनंदानें ऐकोनि प्रीतीं । विस्मित चित्तीं होतसे ॥७६॥ म्हणे श्रीहरी कृपेनें तत्त्वतां । पाषाणासि
फुटल्या गुल्मलता । कीं लोहासि आली सोज्ज्वळता । परीस नलगतां अंगासीं ॥ ७७ ॥ ऐसें बोलोनि उत्तर । जगन्नाथासि विनवी
जोडोनि कर । म्हणे तुझी कृपा जाहलियावर । लोभापर शत्रु होती ॥ ७८ ॥ अनाथ बंधु करुणाघन । हा प्रत्यय आला मजकारणें ।
माझें तुळसीदळ अंगीकारून । आपुलें महिमान वाढविसी ॥ ७९ ॥ मग देवासि पुसोनि अंगद नृपती । घरासि आला सत्वर गती ।
रायसिंगासि लागली विष्णुभक्ती । सत्संगतीचेनि गुणें ॥ ८० ॥ आणिक माधोसिंग म्हणवोनि नृपती । त्याची पत्नी परम गुणवंती । ती
पृथुरायाची कन्या निश्चिती । तीस वैकुंठपती पावला ॥८१॥ तों असतां आपुल्या भ्रतारापासी । तों सगुण पुत्र जाहला तिसी । भ्रतारानें
एक दासी । दीधली सेवेसी तिजलागीं ॥८२॥ ती सर्वदा होंट हालविती । नामस्मरणीं लागली प्रीती । तंव ती राणी पुसतसे दासीप्रती ।
तूं काय जपतीस मज सांग ॥ ८३ ॥ तंव ती बोले प्रतिवचन । मी करितसें श्रीहरीचें स्मरण । नाशवंत देह जाईल जाण। लोटतां क्षण
नासेल कीं ॥ ८४ ॥ गुणवंती तिजला करितसे ग्लांत । तरी मजला भजन सांगिजे त्वरित । देखोनि तिचा भावार्थ । अवश्य म्हणत ती
दासी ॥ ८५ ॥ तिसी स्नान करवोनियां जाण । मग करविलें विष्णुपूजन । म्हणे व्रजवासी जो श्रीकृष्ण । त्याचें ध्यान करीत जा
॥ ८६ ॥ ऐकोनि दासीची वचनोक्ती । राणीसि बोध ठसावे चित्तीं । श्रीहरी कृष्णचरणीं जडली वृत्ती । अश्रुपात वाहती नेत्रांतून
॥ ८७ ॥ सकळ कामांचा पडिला विसर । नाठवे पुत्र आणि भ्रतार । तंव राजा जाहला चिंतातुर । म्हणे इसी संचार काय जाहला
॥ ८८ ॥ एके दिवसीं मांडलिक भूपती । स्वमुखें पुसे कांतेप्रती । तुझी कां जाहली विदेहवृत्ती । तें मजप्रती सांगावें ॥ ८९ ॥ कांता
भ्रतारासि म्हणताहे । वृथा तुम्हांसि सांगोनि काय । मज श्रीकृष्ण ध्यान लागलें आहे । परी दर्शन न होय तयाचें ॥ ९० ॥ ऐसें म्हणोनि
ते सुंदरी । अश्रुपात वाहती नेत्रीं । तंव राजा कोपला तिजवरी । क्रूर नेत्रीं पाहतसे ॥ ९१ ॥ ऐसे देखोनि गुणवंती । भयभीत जाहली
चित्तीं । नेत्र झांकितांचि ती सती । तों सगुणमूर्ती दिसे पुढें ॥ ९२ ॥ चतुर्भुज घनसांवळा । दिव्यपीतांबर कांसे पिवळा । मुगुट
कुंडलें वनमाळा । पाहतांचि डोळां विश्रांती ॥९३॥ ऐसें रूप देखतांचि साचार । सद्भावें केला नमस्कार । तव देवें तिच्या मस्तकीं ठेवोनि

कर । अभय उत्तर देतसे ॥ ९४ ॥ म्हणे मी साह्य असतां साचार । तूं भय न धरी अणुमात्र । ऐसें बोलिले रुक्मिणीवर । तों उघडीत नेत्र गुणवंती ॥ ९५ ॥ देवें दीधला साक्षात्कार । हें तों न जाणेचि नृपवर । मग कांतेसि क्रोधें बोले उत्तर । आतां वेडेचार न करावे ॥ ९६ ॥ आजपासोनि निर्धारीं । साधुसंत न आणावे घरीं । दासीसि भूपति आज्ञा करी । आठव अंतरीं असोंदे ॥ ९७ ॥ संती येऊनि मंदिरास । कांतेसी केला उपदेश । भजनीं लाविलें रात्रंदिवस । संसार नाश केला कीं ॥ ९८ ॥ तरी आजपासोनि तया चोरा । येऊं न द्यावें निजमंदिरा । ऐसें सांगोनि देशावरा । जाय सत्वर नृपनाथ ॥ ९९ ॥ मग दासी हातीं ते कामिनी । चोरूनि संताचें तीर्थ आणी । तें नित्य नेमें प्राशन करोनी । विष्णुस्मरणीं तत्पर ॥ १०० ॥ रायाचा दिवाण अभक्त थोर । तयासि कळता समाचार । मग माधोसिंगासि सविस्तर । लिहून साचार पाठविलें ॥ १ ॥ म्हणे तुम्हीं सांगीतलें निश्चित । परी ही विष्णुस्मरण न टाकींच सत्य । चोरून संताचें तीर्थ घेत । आपुल्यासि विदित असावें ॥ २ ॥ भ्रतार क्षोभला परम चित्तीं । मग काय करीतसे गुणवंती । केश उतरविले नापिका हातीं । वैराग्य चित्तीं ठसावलें ॥ ३ ॥ कांकणें कांढोनियां जाण । त्याली तुळसी मण्यांचीं भूषणें । ऊर्ध्वतिलक गोपीचंदन । बैरागीण ते झाली ॥ ४ ॥ साधुसंत आणोनि घरी । पूजा करीतसे सर्वोपचारीं । उदास होऊनि सर्वोपरी । चित्तीं श्रीहरी आठवित ॥ ५ ॥ हेंही वर्तमान प्रधानानें । मागून पाठविलें लेहून । मग गुणवंतीच्या पुत्राकारणें । राजा निवेदन करीतसे ॥ ६ ॥ तो पितयासारिखा ते अवसरीं । शब्द बोलतसे वरवरी । परी संतोष मानीत निजअंतरी । म्हणे सार्थक संसारीं जाहलें ॥ ७ ॥ कांतेचें वैराग्य ऐकोन । परम क्षोभला नृपनंदन । मग चार भृत्य पाठविले त्याणें । म्हणे जीवें मारून तिसीं टाका ॥ ८ ॥ इकडे विष्णुमंदिरीं ती गुणवंती । अर्चन करीतसे निजप्रीतीं । मारेकरी येऊनी दुर्मती । जपत बैसती ते ठायीं ॥ ९ ॥ बाहेर जाहलें हें कृत्य । गुणवंतीस नाहीं श्रुत । मग देवाधिदेव वैकुंठनाथ । वेष धरित व्याघ्राचा ॥ ११० ॥ महाव्याघ्र पंचानन । देऊळीं प्रगटला नलगतां क्षण । गुणवंती देखोनि विस्मित मन । मग करितसे पूजन तयाचें ॥ ११ ॥ गंधाक्षता सुमनहार । निजप्रीतीनें वाहे सुंदर । म्हणे कशास्तव देवा जाहलासि व्याघ्र । हें मज साचार कळेना ॥१२॥ विष्णुअर्चन जाहलिया समस्त । मग संतसेवेसि बाहेर येत । मारेकरी तिसी धरूं पाहत । तों व्याघ्र अवचित धांवला ॥१३॥ महा भयानक पंचानन । चौघा जणांसि टाकिलें मारून । इतरांसि डांस केलें त्याणें । मग ते भिवून पळताती ॥ १४ ॥ व्याघ्र येऊनि हरिमंदिरीं । अदृश्य जाहला ते अवसरीं । भक्त गर्जती जयजयकारीं । आश्चर्य अंतरीं त्या वाटे ॥ १५ ॥ म्हणती निजभक्ताच्या संकटास्तव । आजि व्याघ्ररूप धरिलें देवें । जे मारावयासि आले होते जीवें । त्यांचाहि ठाव पूसिला ॥ १६ ॥ ऐसा साकल्य वृत्तांत । माधोसिंगासि जाहला श्रुत । कीं व्याघ्ररूप धरोनि भगवंतें । चौघा जणांतें

मारिलें ॥ १७ ॥ मग परम अनुताप जाहला चित्तीं । म्हणती आम्हीच पापिष्ठ दुर्मती । मारेकरी पाठविले निश्चिती । परी तिम्सीं श्रीपती पावला ॥ १८ ॥ मग प्रधानासि लिहोनि पाठविलें तेव्हां । गुणवंती करीतसे संतसेवा । तुम्ही खर्च लागेल तितुका द्यावा । अनमान न करावा चित्तांत ॥ १९ ॥ मग सैन्य घेऊनि समस्त । उभयतां बंधु घरासि येत । वाटेसि महानदी भरोनि जात । मग ते नावेंत बैसले ॥ १२० ॥ मध्यभागीं नौका येत । बुडों लागली जळांत । घाबरले लोक समस्त । उपाय तेथ सुचेना ॥ २१ ॥ गुणवंतीचें करितां स्मरण । नाव कडेस लागली जाण । मग आपुलें नगरीं प्रवेशोन । हरिमंदिरासि त्वरेनें पातले ॥ २२ ॥ माधोसिंगाचा ज्येष्ठ सहोदर । गुणवंतीसि करी नमस्कार । म्हणे तुझें नाम घेतां साचार । नदी पार पावलों ॥ २३ ॥ सत्संगाच्या योगें देख । उभयतां बंधु जाहले भाविक । संत सेवा करिती देख । वृत्ति सात्त्विक ठसावली ॥ २४ ॥ आणिक कथा रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । एक राज उपाध्य.य ब्राह्मण । कन्यारत्न त्यासि झालें ॥ २५ ॥ तें लहानपणासूनि निश्चिती । श्रीहरिभजनीं लावितसे प्रीती । कुंवराबाई नांव तिजप्रती । परीं विरक्त चित्तीं सर्वदा ॥ २६ ॥ ती दिवसंदिवस जाहली थोर । मग न्यावयासि आला तिचा भ्रतार । तयासि देखोनि ते सुकुमार । चिंतातुर जाहली ॥ २७ ॥ म्हणे अशाश्वत हें विषय सुख । भोगितां पुढें अनेक दुःखें । पुढें भोगणें त्रिविध नरक । मग आत्मसुख अंतरे ॥ २८ ॥ भ्रतार संग करितां निश्चिती । पुढें पोटीं होईल संतती । मग मोहमपतेनें पडेल भ्रांती । नव्हेचि प्राप्ती देवाची ॥ २९ ॥ ऐसा विवेकें साचार । रात्र लोटली दोनप्रहर । मग उतरोनि सर्व अळंकार । गांवाबाहेर चालिली ॥ १३० ॥ नंतर वेशी आडकिल्या देखोन । मग केलें श्रीकृष्ण चिंतन । तों कपाटें मोकळीं करून । देवें काढोन दीधली ॥ ३१ ॥ तंव गरीब अनाथ वाटेवर । तैसेंचि रूप धरीं कुंवर । नगाची गांठोडी होती थोर । ते पोटीं साचार खोंविली ॥ ३२ ॥ अनाथ रूप धरोनि जाणा । मग ते गेली वृंदावना । चीरघाटीं करोनि स्नाना । श्रीकृष्ण दर्शन घेतलें ॥ ३३ ॥ हात जोडोनि कुंवराबायी । देवासि विनवी ते समयीं । आतां भवबंधनापासूनि सोडवी । म्हणवोनि पायीं लागली ॥३४॥ अळंकार होते जवळ । ते वैष्णवासी वांटिले तत्काळ । चित्तीं करीत हळहळ। ते वेल्हाळ बैसली ॥ ३५ ॥ म्हणे देवाधिदेवा जगजेठी । मज पहावें कृपादृष्टीं । सगुणरूपें देवोनि भेटी । तोडी फांसाटी भवबंध ॥ ३६ ॥ ऐशा रीतीं करितां चिंतन । जाहली तीन उपोषणें । मग सगुण रूपें जगज्जीवन । तिज कारणें भेटले ॥ ३७ ॥ अभयहस्त ठेवोनि शिरीं । म्हणे आतां सर्वथा चिंता न करी । मी सुदर्शन घेऊनि श्रीहरी । नानापरी रक्षीन ॥ ३८ ॥ कुंवरीसि म्हणे जगज्जीवन । अतां राधाकुंडी बैस जाऊन । इतुकें दृष्टीसि देखोन । मग समाधान पावली ॥ ३९ ॥ राधाकुंडी बैसली जाऊन । मग देवें तीस घातलें भोजन । तों पिता धुंडित आला त्वरेनें । मग संतोष मन देखतां

॥ १४० ॥ कन्येसि तेव्हां उपदेशित । कैसी पळोनि आलीस येथ । कुळास बोल लाविला सत्य । लज्जा वाटत आम्हांसी ॥ ४१ ॥
तंव कुंवरी म्हणतसे पितयासी । अझून संसाराची अपोसि । साठी वर्षे जाहलीं तुजसी । परी वैराग्य मानसीं उपजेना ॥ ४२ ॥
नाशवंत देह मिथ्या माया । जैसी वोडंबरीची छाया । येथें आठवावें श्रीकृष्णराया । तरीच सत्क्रिया तयाची ॥ ४३ ॥ ऐसी
कन्येची उपदेशवाणी । पितयासि मानली तयेक्षणी । मग कुंवरीसि बोले वचनीं । आपुलें सदनीं चाल आतां ॥ ४४ ॥ कांही संकोच न
धरी चित्तीं । सुखें करी श्रीहरीची भक्ती। नको जाऊं सासऱ्याप्रती । मानी वचनोक्ती आमुची ॥४५॥ ऐसा पिता नानापरी । विनवितसे ते
अवसरीं । तंव दृष्टांतीं सांगतसे श्रीहरी । याच्याबरोबरी जाय आतां ॥४६॥ माझा चित्तीं करितां आठव । महा संकटें निवारीन सर्व ।
आज्ञा करितां देवाधिदेव । पितयासवें ते आली ॥ ४७ ॥ घरीं करोनि ठाकुरद्वारा । विष्णु मूर्ति मांडीतसे देव्हारा । नित्य सर्वोपचारा ।
प्रेम अंतरा धरोनियां ॥ ४८ ॥ साधुसंत वैष्णवजन । यांचेंही सद्भावें करीतसे पूजन । रात्री होतसे हरीकीर्तन । वेधतसे मन ऐकतां
॥ ४९ ॥ कुंवराबाईचे संगती । बहुता जनासि लागली भक्ती । तंव सेखावत तेथील नृपती । त्यानें सत्कीर्ती ऐकिली ॥ १५० ॥
पुरोहितासि म्हणे तये क्षणीं । तुमची कन्या सुलक्षणी । लागली श्रीहरीचें भजनीं । ऐसें श्रवणीं ऐकिलें ॥ ५१ ॥ ते
अपूर्व गायन करीतसे । परस्परें ऐकतों ऐसें । ऐसें म्हणवोनि धराधीश । आला घरास ते दिवसीं ॥ ५२ ॥ देव्हारीं विष्णुमूर्ती सुंदर
वस्त्रें भूषणें अलंकार । कुंवराबाई त्या समोर । कीर्तन गजर करीतसे ॥ ५३ ॥ हाळविणे मृदंग घोष । नादब्रह्मचि आलें मुसे । पायीं
नेपुरें बांधूनि सुरस । नाचत असे निजप्रेमें ॥ ५४ ॥ गीतप्रबंध नृत्यकळा । दावोनि आळवीत घननीळा । प्रेमें अश्रु वाहती डोळां ॥
सद्गदित गळा होतसे ॥ ५५ ॥ भाविक लोक असती फार । मध्यें बैसला नृपवर । तंव राजा जाहला कामातुर । रूप सुंदर देखोनियां
॥ ५६ ॥ हृदयीं भेदला कामबाण । भगवद्गुणीं नसेचि मन । तेणें घूर्णित जाहले नयन । निद्रा क्षणक्षणा येतसे ॥ ५७ ॥ तंव स्वप्न-
अवस्थेमाजी जाण । कौतुक देखिलें काय त्याणें । एक महानदी जातसे भरोन । अगणित जीवनें करोनियां ॥ ५८ ॥ त्याच्या पैलतीरीं
पाहीं । उभी असे कुंवराबायी । राजासि म्हणे ते समयीं । पापिष्ठा येयी मजपासी ॥ ५९ ॥ इतुका दृष्टांत देखोनि तेथ । सावध जाहला
नृपनाथ । याचा अर्थ विचारी मनांत । मग पश्चात्तापातें पावला ॥ १६० ॥ म्हणे भवनदीच्या पैलपार । कुंवराबाई असे साचार । मी तरी
परम पापिष्ठ नर । उतरें भवपार कैशा रीतीं ॥ ६१ ॥ ऐसा अनुताप धरोनि चित्तीं । मग सद्भावें नमस्कार करी नृपती । मग तिचा
अनुग्रह घेवोनि निश्चिती । श्रीविष्णूची भक्ती करीतसे ॥ ६२ ॥ आतां गिरिधरलाल वृंदावनीं । परमभाविक सुलक्षणी । भक्तीज्ञान
वैराग्यें करोनि । चक्रपाणी वश्य केला ॥ ६३ ॥ सर्वभूतीं दया पूर्ण । वाचेसि अखंड हरिस्मरण । संतसेवेसि असे लीन । देवा समान ते

मानी ॥ ६४ ॥ पायीं नेपुरें बांधोनि निश्चित । कीर्तन करीतसे संगीत । राधाकृष्णांची सोंगें आणित । प्रेमभरीत सर्वदा ॥ ६५ ॥ एके दिवशीं करावया रास । पातला विष्णुमंदिरास । लोक मिळाले पाहावयास । म्हणती कीर्तनास उठावें ॥ ६६ ॥ मग श्रीकृष्णमूर्तीपासीं सत्वर । येऊनि केला नमस्कार । चित्तीं संकट पडिलें थोर । मग देवासि उत्तर बोलतसे ॥६७॥ म्हणे सोंगाचीं वस्त्रें निर्धारीं । विसरोनि आलों आपुलें घरीं । आतां आणावयासि गेलों जरी । तरी विलंब निर्धारीं होईल ॥ ६८ ॥ ऐसें म्हणवेनि निजनिवाडें । पाहे देवाच्या मुखाकडे । तों भरजरी वस्त्रें पडिलीं पुढें । नवल रोकडें लोक पाहती ॥६९॥ म्हणती श्रीहरीसि रास आवडे याचा । म्हणोनि चमत्कार दाविला साचा । अंकित होऊनि निजदासाचा । महिमा संतांचा वाढवी ॥ १७० ॥ ऐसें म्हणवोनि सत्वर । गिरिधरासि करिती नमस्कार । ते दिवसीं रंग आला अपार । तटस्थ सर्वत्र लोक झाले ॥ ७१ ॥ म्हणती कृष्णअवतारींची लीला । ते आम्ही साक्षात पाहतों डोळां । विदेहवृत्तीं पातली सकळां । धन्य सोहळा सुदिन तो ॥ ७२ ॥ गिरिधराचीं प्रतिष्ठा फार । मानूं लागले थोर थोर । तों आणिक एक वर्तलें चरित्र । तें ऐका सादर भाविकहो ॥ ७३ ॥ कोण्या यातीचा वैष्णवभक्त । वेषधारी अथवा विरक्त । गिरिधर तयाचें घेत तीर्थ । चित्तीं निजप्रीत लावोनि ॥ ७४ ॥ संतसेवे परतें कांहीं । आणिक साधन श्रेष्ठ नाहीं । ऐसा निश्चय करोनि जीवीं । स्थिती विदेही धरीतसे ॥ ७५ ॥ तंव एक बैरागी वैष्णव भक्त । तों अकस्मात पावला मृत्य । गिरिधर तयाच्या शवातें । स्वहस्तें पूजित तेधवां ॥ ७६ ॥ तुळसीमाळा गोपीचंदन । तया लावीत निज प्रीतीनें । मग तयाचे धुवोनिया चरण । तें तीर्थ प्राशन करीतसे ॥ ७७ ॥ हें ब्राह्मणीं देखोनि निश्चित । स्वमुखें तयासि निर्भर्त्सित । म्हणती प्रेताचें तीर्थ साक्षात । घातलें मुखांत कर्मभ्रष्टा ॥ ७८ ॥ सांडोनि वेदविधि आचार । तुवां मांडिला भ्रष्टाकार । तुझेनि योगें साचार । वर्णसंकर होईल कीं ॥ ७९ ॥ मृतप्रेत हीन याती । त्याचें तीर्थ घेतलें प्रीतीं । ऐकोनि ब्राह्मणांची वचनोक्ती । गिरिधर त्यांजप्रती बोलतसे ॥ १८० ॥ विश्वोद्धारार्थ अवतरले संत । हे तों जन्ममृत्य विरहित । चैतन्य व्यापक सर्वगत । नाहीं द्वैत सर्वथा ॥ ८१ ॥ ऐकोनि म्हणती द्विजवर । तूं ब्रह्मज्ञान सांगतोसि फार । कांहीं दाखविसी चमत्कार । साच उत्तर तें मानूं ॥ ८२ ॥ संतांसि नाहीं जन्म मृत्य । तरी हें सजीव करावें प्रेत । नाहींतरी तुम्हांसि घालूं वाळींत । करूं अपंक्त ये समयीं ॥ ८३ ॥ ऐसें बोलतां धरामर[1] । गिरिधरासि संकट पडिलें थोर । मग एकाग्र मन करोनि स्थिर । झांकिले नेत्र तयानें ॥ ८४ ॥ हृदयीं चिंतितां श्रीकृष्णमूर्ती । त्यासि संकटीं पावला वैकुंठपती । प्रेत उठोनि बैसे अवचिती । विप्र पाहती समस्त ॥ ८५ ॥ गिरिधर भक्तासि नमस्कार । करिती सकळ धरामर । म्हणती तुम्हांसि साह्य रुक्मिणीवर । अघटित चरित्र दाखविलें ॥ ८६ ॥ निजभक्ताची सत्कीर्ती । स्वयें वाढवीतसे वैकुंठपती । श्रवणमात्रें करोनि निश्चिती । भाविक तरती भवसिंधु

1 ब्राह्मण.

॥ ८७ ॥ आणिक चरित्र ऐका सुरस । एक नारायणस्वामी महापुरुष । त्याणीं आधीं घेऊनि संन्यास । षड् वैरियांस जिंतिलें ॥८८॥ भक्तिज्ञान वैराग्य पूर्ण । त्याचे अंगीं बाणली भूषणें । विदेह स्थितीं येतांचि जाण । मग परमहंस विचारतां ॥ ८९ ॥ ब्रह्मस्थिति बाणली कैसी । आत्मवत विश्व भासे त्यासी । द्वैतकल्पना न ये मानसीं । देहभावासी विसरला ॥१९०॥ राव रंक अणुरेणुवत । एकचि भासे चैतन्य नाथ । सकळ वर्णांची दीक्षा घेत । तों चरित्र अघटित वर्तलें ॥ ९१ ॥ नाशिक त्र्यंबकी साचार । सिंहस्थीं यात्रा मिळाली फार । आपणही नग्न दिगंबर । आले बरोबर तियेच्या ॥ ९२ ॥ तो गिरिपुरी भारती संन्यासी । मेळा जाहला त्र्यंबकासी । नारायणस्वामी त्यांच्या मठासीं । सहज भिक्षेसीं पातले ॥ ९३ ॥ परमहंस देखोनि महंतानें । चित्तीं वाटलें समाधान । जवळ बैसवोनि निजप्रीतीनें । म्हणे स्वामी भोजन करावें ॥ ९४ ॥ शिष्यासि म्हणतसे गोसावी । पात्र विस्तारा लवलाहीं । त्याणीं वाढितां अन्न सर्वही । भोजनास विदेही बैसला ॥ ९५ ॥ नग्न दिगंबर अवधूत । दिसे जैसा कैलासनाथ । स्वमुखें अन्न भक्षिलें बहुत । परी पुरे न म्हणतसे सर्वथा ॥ ९६ ॥ भंडाऱ्याचा पाक सिद्ध झाला । तितकेंही अन्न वाढिलें त्याला । अवघेंचि भक्षूनि ढेंकर दिला । आश्चर्य त्यांजला वाटलें ॥ ९७ ॥ नारायण स्वामींची विदेहवृत्ती । उदक घ्यावयाची नाहीं आर्ती । गोसावी जीवन आणोनि देती । परी तें घेती सर्वथा ॥ ९८ ॥ मग सत्वर जावोनि अरण्यांत । वृक्षछायेसी जाहले निद्रित । महंत शिष्यांसि आज्ञा करीत । तुम्हीं रक्षणा तेथ बैसावें ॥ ९९ ॥ उदकाचा रांजण भरोनि निगुतीं । गोसावी सान्निध येवोनि बैसती । तीन दिवस तीन राती । नये जागृती समर्था ॥ २०० ॥ चौथे दिवसीं होतां जागृत । उदक देतां पितां किंचित । मग जाऊनि क्षेत्रांत । काय कौतुक दाखविलें ॥ १ ॥ एक्या हवेलीची मोरी थोर । त्यांतील दुर्गंध येतसे नीर । ते पाणी प्राशिलें पखालभर । लोक सर्वत्र पाहती ॥ २ ॥ तों लघुरुद्र करावया साचार । देउळी पातले द्विजवर । स्वमुखें बोलती वेदोक्त मंत्र । श्रीत्र्यंबकेश्वर पूजिती ॥ ३ ॥ तों नारायणस्वामी लवलाही । देउळीं पातले ते समर्थी । ब्राह्मणांसि पुसती करितां कायी । ऐसे विदेही बोलिले ॥ ४ ॥ ऐकोनि म्हणती धरामर । अभिषेक करितो देवावर । नारायणस्वामी बोलिले उत्तर । तरी अभिषेकपात्र धरितों मी ॥५॥ मग शिश्न धरोनि निजकरें । पिंडींवरी सोडली धार । ऐसे आश्चर्य देखोनि थोर । लोक सर्वत्र हांसती ॥ ६ ॥ तंव क्रोधें बोलती धरामर । आमचा होईल लघुरुद्र । खंडणा न पडावी तोंवर । नाहींतर शिश्न कापूं ॥७॥ इतुका पण करूनि ते वेळ । बोलोनि मंत्र म्हणती निश्चळ । परि धार न खंडेचि अळुमाळ । लघुरुद्र सकळ सांग झाला ॥ ८ ॥ मग ब्राह्मण स्वमुखें करिती स्तुत । हा तरी साक्षात कैलासनाथ । देहभान नसेचि किंचित । विदेहस्थित सर्वदा ॥ ९ ॥ तों एक नाशिककर गृहस्थ सत्वरी । यात्रेसि आला त्र्यंबकेश्वरी । रोडकें अश्व बरोबरी । वाटेवरी तें मेलें

१ थंडीसुद्धां. २ पूर्ण.

॥ २१० ॥ मुलें लेकरें सहपरिवारीं । गृहस्थ बैसला वाटेवरी । यात्रा निघोनि गेली दुरी । तस्कराचें अंतरीं भय वाटे ॥ ११ ॥ संकट पडिलें असे बहुत । ब्राह्मण देवाचें चिंतन करित । तों नारायणस्वामी आले तेथ । वृत्तांत सांगत विप्र तेव्हां ॥ १२ ॥ म्हणे अश्व तों मेलें वाटेवरी । रानांत पडिलों सहपरिवारीं । तंव कौतुक केलें ते अवसरीं । तें सादर चतुरीं परिसावें ॥ १३ ॥ नारायणस्वामी ते अवसरीं । अश्वास म्हणती ऊठ सत्वरी । यासि पोंहचवीं निजमंदिरीं । तों सजीव सत्वरी तें झालें ॥ १४ ॥ कान झाडोनि उठे सत्वर । ब्राह्मण खोगीर घाली वर । ओझें लादोनि समग्र । निजमंदिर पावला ॥ १५ ॥ ओझें उतरोनि ठेवितांचि जाण । अश्वानें तत्काळ सोडिले प्राण । ऐसें संतांचें माहिमान । देवासी भिन्न नसती ते ॥ १६ ॥ जो देवाधिदेव रुक्मिणीकांत । पुढें वदवील ग्रंथार्थ । महिपति त्याचा मुद्रांकित । शरणागत संतांचा ॥ १७ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । शेहेचाळिसावा अध्याय गोड हा ॥ २१८ ॥ ॥ अध्याय ॥ ॥ ४६ ॥ ओव्या ॥ २१८ ॥ ॥ ६ ॥




अध्याय ४७

श्रीगणेशाय नमः । जय अनाथबंधु करुणाकरा । भक्तवत्सला कृपासागरा । लीलावतारी परमेश्वरा । विश्वोद्धारा पांडुरंगा ॥ १ ॥ भक्तवत्सला रुक्मिणीपती । अनंत अपार तुझी कीर्ती । लेखा नव्हेचि कोणाप्रती । कुंठित मती सकळांच्या ॥ २ ॥ तूं तरी निर्गुण निराकार । निष्कर्मी निरुपचार । परी ध्यावया भक्तांचा कैवार । सगुण साकार रूप धरिसी ॥ ३ ॥ आधीं अभक्तांसि दुर्बुद्धि देऊन । निज भक्तांचें करविसी छळण । भा॥विकीं तुझें करितां चिंतन । संकट दारुण निवारिसी ॥४॥ ते कानीं एकतांचि सत्कीर्ती । तेणें खळाची तत्काळ पालटे वृत्ती । अनुतापें करोनि दुरितें नासती । सात्विक वृत्ती मग होय ॥ ५ ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । अश्व मेलें वाटेवर । तें नारायणस्वामींनीं उठविलें सत्वर । आश्चर्य द्विजवर मग करिती ॥ ६ ॥ साधूची तों अघटित चर्या । ओडंबर दाखविती वैष्णवीमाया । मनुष्य रूप दिसती काया । परी परब्रह्म तया म्हणावें ॥७॥ एक रामकृष्ण ब्राह्मण म्हणोनी । साधुपुरुष परमज्ञानी । षड्वैरी जिंतोनि त्यानी । सेवा ॠणी देव केला ॥८॥ विष्णुपूजन हरिकीर्तन । वाचेसि अखंड नामस्मरण । सर्वांभूतीं दयापूर्ण । आत्मवत जन मानितसे ॥९॥ सांडोनियां आशापाश । जनास देतसे उपदेश । विश्वोद्धार करावयास । अवतार असे कलियुगीं ॥१०॥ बडोदें नगरांत येऊन । शिष्य संप्रदायी केले त्याणें । तों उपदेश घेतला एक्या स्त्रीनें । भ्रतारा चोरून आपुल्या ॥११॥ तों तिच्या पतीसि वृत्तांत । परस्परें जाहला श्रुत । मग त्याणें कृत्रिमें केली युक्त । कांतेसि बोलत आपुल्या ॥ १२ ॥ मी गांवास जातों सत्वर । तिकडे दिवस लागतील चार । मंदिरांत होतें तळघर । तेथें लपोन बैसला ॥ १३ ॥ कृत्रिमभाव धरिला मनीं । म्हणे हे आपुल्या गुरूसि आणील सदनीं । उभयतांची चर्या नयनीं । दृष्टीसीं पाहूनी शिक्षा करूं ॥ १४ ॥ याची कांता परम भा॥विक । तिसीं चित्तीं वाटला हरिखे । म्हणे घरासि आणोनि भवतारक । सेवा सुखें करीन मी ॥ १५ ॥ मग शेजारीं होती मैत्रिण । तीस सांगितलें वर्तमान । उभयतां स्वामीसि जाऊन । आमंत्रण त्या देती ॥ १६ ॥ सद्गुरु म्हणतीं त्या अवसरीं । तुझा भ्रतार नाहीं घरीं । त्यासि अकस्मात कळलें जरीं । तरी नानापरी गांजील ॥ १७ ॥ आम्हीं तुझेंचि जेवितों माते । कासया उगीच श्रमसी व्यर्थ । ऐसी ऐकतांचि मात । नेत्रीं अश्रुपात वाहती ॥ १८ ॥ म्हणे आम्हां स्त्रियांचें पराधीन जिणें । कधीं घडावें स्वामींचें सेवन । माझा आश्रम पवित्र करणें । म्हणोनि चरण धरियेलें ॥ १९ ॥ तिचा सद्भाव देखोनि प्रीतीं । सद्गुरु तेव्हां अवश्य म्हणती । मग तिणें करोनि पाकनिष्पत्ती । पूजेची आयती सिद्ध केली ॥ २० ॥ मग सद्गुरुसि आणूनि मंदिरात । आसनावरी बैसवी त्यातें । भ्रतार होता तळघरांत । तो आला अवचित बाहेरी ॥२१॥ क्रोधें शस्त्र घेवोनि करीं । त्याणे उगारिलें कांतेवरी । सद्गुरुसि पाहे नेत्रद्वारीं । तों स्त्रीरूप निर्धारीं दिसती ते ॥ २२ ॥ ऐसा चमत्कार देखोनि नयनीं । पश्चात्ताप जाहला त्याचें मनीं । मग द्वेष-वार्ता सर्व टाकूनी । सद्भावें चरणीं लागला ॥ २३ ॥ त्याचा निग्रह देखोनि समस्त । रूप धरिलें पूर्ववंत । त्यानेंहीं स्वामीसि होऊनि

---

१ आनंद.

विनीत । अनुग्रह निश्चित घेतला ॥२४॥ स्त्री पुरुष दोघेजण । मद्रावें करिती संतसेवन । परम खळ तोही जाहला लीन । ऐसें महिमान संतांचें ॥ २५ ॥ आणिक रामचंद्र भट्ट म्हणवोन । महापंडित होता ब्राह्मण । वेद वेदांतीं असे निपुण । परी किंचित अभिमान असेना ॥२६॥ सर्वशास्त्रीं निपुण असे । परी प्रवृत्ति वाद न करीच कोणता । करोनि अहंतेचा नाश । श्रीहरिभजनास लागला ॥ २७ ॥ न करी कोणाचें उपार्जन । राव रंक समसमान । अयाचित वृत्ती करून । कुटुंबरक्षण करीतसे ॥ २८ ॥ स्नानसंध्या करोनि नित्य । पंचमहायज्ञ करीत । समयीं आलिया अभ्यागत । विमुख त्यातें न होय ॥२९॥ त्याचा निश्चय देखोनि थोर । देव देतसे साक्षात्कार । दिल्लींत राहातसे वैष्णववीर । तों काय चरित्र वर्तलें ॥ ३० ॥ अविंध राजा ते अवसरीं । विस्तीर्ण वाडा बांधितसे नगरीं । दुर्बळाचीं मंदिरें मोडोनि सत्वरी । द्रव्य त्यांकरी देतसे ॥ ३१ ॥ दुसरी जागा धरावयासि । दुप्पट द्रव्य देतसे त्यासी । तों रामचंद्रभटाच्या घरासी । भिंत अनायासी पातली ॥ ३२ ॥ रायाचा कारभारी दिवाण । सांगोनि पाठवी त्याजकारणें । तुम्हांसि दुसरें मंदिर देतों बांधोन । त्यामाजी राहणें सत्वर ॥३३॥ रामचंद्रभट्ट त्रासूनि अंतरीं । जाऊनि राहिले काशीपुरीं । तों काजीच्या रूपें स्वप्नांतरीं । अविंधासि श्रीहरि काय मांगे ॥ ३४ ॥ रामचंद्रभट्ट माझा प्राण । तयासि आणावें समजावून । तरीच तुझें कल्याण । अन्यथा वचन नव्हे हें ॥३५॥ ऐसें स्वप्न देखतां निश्चित । पादशाह जाहला भयभीत । मग दिवाणासि सांगूनि पाठवित । शीघ्र तयातें घेऊनि या ॥३६॥ मग तो जाऊनि काशीपुरीं । विष्णुभक्तासि नमस्कारी । म्हणे कृपा करोनि मजवरी । आपुलें मंदिरीं तुम्हीं चला ॥ ३७ ॥ ग्लांती करोनि बहुतारीतीं । दिल्लीस नेलें तयाप्रती । त्याचें मंदिर राहविलें निश्चिती । म्हणती साह्य श्रीपती यासि असे ॥३८॥ सत्समागमाचेनिगुणें निश्चिती । सकळ लोकांसि लागली भक्ती । दर्शनासि येऊनि अविंध भूपती । नमस्कार प्रीतीं करितसे ॥ ३९ ॥ आपुल्या दासाची सत्कीर्ती । स्वयें वाढवितसे रुक्मिणीपती । आणिक चरित्र रसाळ पुढती । सादर श्रोतीं परिसिजे ॥४०॥ एक काजी महंमद म्हणवोन । होता जातीचा यवन । तो अखंड करी नामस्मरण । आणि असत्य वचन न बोले ॥ ४१ ॥ पादशाह द्रव्य देतां निश्चिती । परीं तें न घेचि आपुले हातीं । कष्टार्जित अन्न भक्षिती । कैशरीतीं तें ऐका ॥ ४२ ॥ त्याचीं कांता चतुर बहुत । कशिदा काढीत आपुले हातीं । तें स्वस्त विकोनि बाजारांत । अन्न भक्षित तयाचें ॥४३॥ न्याय इनसाफ तयापासी । पादशाह धाडीत अहर्निशीं । तें यथार्थ आणोनि ध्यानासी । पंचाइतीसी मग करी ॥ ४४ ॥ हिंदु अथवा यवनाचा । पक्ष न धरीच कोणाचा । अभिलाष नाहीं द्रव्याचा । लेश असत्याचा स्पर्शेना ॥ ४५ ॥ जयासि सोनें आणि माती । सम समान सारिखीं दिसती । द्रव्य आशा धरितां चित्तीं । पातकें वसती ते ठायीं ॥४६॥ आशा तृष्णा धरितां सहज । तरी हेंच अपमानाचें बीज । हें चित्तापासोनि टाकितां सहज । तरी तो पूज्य तिहीं लोकीं ॥४७॥ काजी महंमदें हें जाणोनी । शेण सोनें सारिखेंचि मानी ।

१ दुष्ट, २ मुसलमान.

यथास्थित न्याय करोनी। उभयतां लागोनी समजावी ॥ ४८ ॥ परी पोटीं नसेचि पुत्रसंतती। एकचि कन्या तयासि होती। तिचे घरीं धनसंपत्ती। क्षत्रवृत्ती जामाता ॥ ४९ ॥ हस्ती घोडे शिबिका रथ। सैन्य वागवीत पांच शत। रायापासी त्याचा जामात। सेवेसि असे सर्वदा ॥ ५० ॥ ऐसे लोटतां बहुत दिवस। एक पुत्र होता कन्येस। तों जामाताचें सरलें आयुष्य। मृत्युसदनास तो गेला ॥ ५१ ॥ हिंदू दिवाण त्याचा जाण। कृत्रिम भाव रचिला त्याणें। अवघें द्रव्य आच्छादून। कर्ज लेहोन ठेविलें ॥ ५२ ॥ कांता पुत्रांसि तये संधीं। काय म्हणतसे दुर्बुद्धी। कर्जाची वाट करावी आधीं। मग त्रिशुद्धीयासि पुरा ॥ ५३ ॥ ते म्हणती जिवंत होता धनी। तेव्हां कर्ज ऐकिलें नाहीं कानीं। तरी आतां कर्ज निघालें कोठोनी। असत्य करणी हे दिसे ॥ ५४ ॥ तों पादशहा म्हणे ते अवसरीं। काजी महंमद न्याय करी। मग प्रेताचीं आंतडीं काढोनि सत्वरी। केशर कस्तूरी आंत भरिली ॥५५॥ जामाताचें उचलोनि प्रेत। श्वशुरापासी आणिलें त्वरित। कन्या आणि तिचा सुत। रुदन करींत अट्टहासें ॥ ५६ ॥ दिवाण नष्ट जो दुर्बुद्धी। काय म्हणतसे तये संधीं। कर्जाची वाट करा आधीं। मग त्रिशुद्धीयासि पुरा ॥ ५७ ॥ इतर सैनिकें त्याजकारणें। लांच दीधला त्या दुर्जनें। त्याज ऐसेंच सर्वत्र जन। असत्य वचन बोलती ॥ ५८ ॥ काजी महंमदासीं तेव्हां म्हणत। आतां याची करावी पंचाईत। गवगवा केला त्याणीं बहुत। कन्या रडत अट्टहासें ॥ ५९ ॥ सत्य असत्य कळलें मनीं। परी बोलतां नये प्रगट वाणीं। म्हणतील पक्षपात केला यांणीं। कन्या म्हणवोनी आपुली ॥ ६० ॥ परम संकट पडिलें पाहे। मग श्रीहरीचे आठविले पाय। म्हणे जनअपवाद मजला नये। तैसा उपाय करीं देवा ॥ ६१ ॥ मग काजी महंमद ते समयीं। प्रेतासि म्हणे ऊठ लवलाहीं। दिवाणासि हिशोब समजावी। मग तूं जाई मृत्युपुरा ॥ ६२ ॥ ऐसीं अक्षरें मुखांतून। निघतांचि चरित्र वर्तलें गहन। अद्भुत संतांचें महिमान। ऐकतां श्रवण सुखावती ॥ ६३ ॥ जैसा प्राणी असतां निद्रित। जागृतीस येतां उठोनि बैसत। तैशाच रीतीं उठोनि प्रेत। वस्त्रें आणवित आपुलीं ॥ ६४ ॥ श्मश्रु पिळोनियां करीं। नेत्र आरक्त वटारी। शस्त्र उगारी दिवाणावरी। म्हणे हिशेब सत्वरीं दे माझा ॥ ६५ ॥ ऐसें कौतुके देखोन। थरथरां कांपे तो दुर्जन। कांजी महंमदाचे धरिलें चरण। म्हणे वांचवी प्राण तूं माझा ॥ ६६ ॥ म्यां पहिले कागद लपवोनि सत्वर। कर्ज काढिलें धन्यावर[1]। लेहोनि दीधलें खोटें पत्र। आपुल्या निजकरें तेधवां ॥ ६७ ॥ ठेवरेव जे होती कांहीं। तेही सांगीतली लवलाही। मग श्वशुरासि आज्ञा मागोनि पाहीं। प्राण जांवयीं सोडितसे ॥ ६८ ॥ ऐसें कौतुक देखोन। आश्चर्य करिती अवघे जन। काजी महंमदाचे वंदिती चरण। म्हणती न कळे महिमान संतांचें ॥ ६९ ॥ तंव कन्या म्हणे पित्याप्रती। माझा भ्रतार वांचवावा पुढती। नातूहीं पायीं लागला प्रीतीं। मग उत्तर देती काय तयां ॥ ७० ॥ यासि आम्हीं वांचविलें आज। तरी आणिकही संकट घालतील मज। मग लोभ

[1] हत्ती. २ कान.

दिसोन येईल सहज । तो कलंक मज न साहे ॥ ७१ ॥ ऐसें बोलोनि कन्येप्रती । जामातासि दीधली मूठमाती । जनांत प्रगटली सत्कीर्ती । दर्शनासि येती लोक तेव्हां॥ ७२॥ या चरित्रास षण्मास होतां । निजधाम पावली त्याची कांता । काजी महंमद म्हणती सर्वथा । मृत्युलोकीं आतां न रहावें ॥७३॥ बडा सोमोरी माजी जाण । समाधिस्थ झाले आपण । अद्यापि पुण्यवंताकारणें । साक्षात दर्शन होय त्याचें ॥७४॥ महा व्याघ्र येवोनि नित्य । पुच्छें करोनि कबर झाडित । सुगंध पुष्पें समाधीवरी पडत । नित्य नित्य ते ठायीं ॥७५॥ तो तरी जातीचा यवन जाणा । परी हिंसा करूं नेदीच कोणा । सर्वभूतीं जयासि करुणा । आत्मवत जना मानितसे ॥७६॥ आणिक राजा जातीचा यवन । बलखबुखारी नामाभिधान । राज्य करीतसे धर्मनीतीनें । आणि प्रजेकारणें सुख दे ॥७७॥ त्याच्या राज्यामाजी पाहीं । दुबळे याचक सर्वथा नाहीं । उपद्रव न करी कोणासही । परी असे विषयीं निमग्न ॥७८॥ आपुले पूर्वसुकृताचेनि बळें । भोगीत नाना विलास सोहळे । ऐसा लोटतां कांहीं काळ । तों प्राप्तीची वेळ पातली ॥७९॥ मग अष्टप्रधान बोलावून । विचार पुसे त्यांजकारण । आतां कोणत्या सद्गुरूसि जाऊं शरण । हें मजकारणें सांगिजे ॥ ८० ॥ ऐसें पुसतांचि तयांसी । वजीर उत्तर देतसे त्यासी । कबीर भक्त वाराणसीं । जो भक्तीज्ञानासि आगर ॥८१॥ हिंदु आणि मुसलमान । या दोहीं मार्गीं असे निपुण । त्याची सत्कीर्ति ऐकिली गहन । तरी जावें शरण त्यालागीं ॥८२॥ मग बलखबुखार एके दिवसीं । स्वयें जावोनि वाराणसीं । नमस्कार करोनि कबीरासी । अनुग्रहासी घेतलें ॥८३॥ कबीरें तया रायाकारणें । सांगीतलें श्रीराम उपासन । पुढें वैराग्य व्हावयासि जाण । तेंही कारण अवधारा ॥ ८४ ॥ सोळाशें राण्या लावण्यखाणी । त्यां विरहित एक पट्टराणी । विषयीं लंपट होऊनि । राज्यासनीं निमग्न तो ॥ ८५ ॥ तंव एके दिवसीं नृपनाथ । बैसला होता सभे आंत । सुमन शेज मंदिरांत । दासी रचित स्वहस्तें ॥८६॥ एकांतीं बोलतां प्रधानातें । रायासि उशीर लागला बहुत । मंदिरीं दासी वाट पाहत । निद्रा बहुत तिसीं आली ॥८७॥ बैसोनि मंचकाशेजारीं । मस्तक ठेविला पलंगावरी । तों निद्रा आली ते अवसरीं । देहभान अंतरीं असेना ॥८८॥ तों बलखबुखारी मंदिरांत । येतसे तेव्हां अकस्मात । दासी निद्रित देखोनि तेथ । क्रोधयुक्त तो झाला ॥८९॥ मग सेवका हातीं सत्वर । तिसीं कमच्या मारिल्या चार । परी गदगदा हांसे ते सुंदर । खेद अणुमात्र असेना ॥ ९० ॥ राजा विस्मित जाहला अंतरीं । दासीस पुसे ते अवसरीं । तूं कशास्तव हांससी सुंदरी । सांग सत्वरीं मजपासी ॥ ९१ ॥ दासी निर्भीड बोले उत्तर । म्यां मस्तक ठेविला पलंगावर । त्यास्तव इतुका बैसला मार । वाहतसे रुधिर अंगांतुनी ॥ ९२ ॥ सुमने अंथरलीं सवामण । त्याजवरी नित्य करितसां शयन । पुढें दंड कोणता होईल जाण । मी हांसलें म्हणवोन यासाठीं ॥ ९३ ॥ निर्जीव पिठाची उंडी जाण । गिळितांचि मासा पावला मरण । सजीव मारूनि करिती उदरपोषण । तरी गती कोण तयांची

॥ ९४ ॥ ऐकोनि दासीचें उत्तर । अनुतापें द्रवला नृपवर । राज्यभार टाकोनि समग्र । नगरा बाहेर निघाला ॥ ९५ ॥ तरुण शरीर अरोग्य कांती । सोळाशें राण्या तयासि असती । अठरा लक्ष घोडे निश्चिती । टाकोनि भूपती निघाला ॥९६॥ म्हणे तारुण्य शरीर राज्य अशाश्वत पाहीं । म्यातरी सार्थक न केलें कांहीं । आतां श्रीहरीची प्राप्ति व्हावी । तो उपाय कांहीं योजावा ॥ ९७ ॥ साखी ॥ सोलासो सहेली और तुरंग आठरा लाख । सोहीतेरे कारण छोडा बडो शहर बलाख ॥ १ ॥ । ओवी । ऐसें म्हणोनि बलखबुखारी । अनुतापें निघे ते अवसरीं । कोणासि येऊं नेदीच बरोबरी । म्हणे परतूनि माघारीं जावें तुम्हीं ॥ ९८ ॥ जेवीं पृथ्वीवलयांकित राज्य टाकूनी । भरत राजा चालिला वनीं । तैसीच याची दिसती करणी । मजलागोनि वाटतें ॥ ९९ ॥ कां ऐकोनि कांतेचा व्यभिचार । भर्तृहरीसि वैराग्य संचरे । तेवीं दासीचा उपदेश होतांचि थोर । बलखबुखार निघाला ॥१००॥ क्षुधा तृषा शीत उष्ण । सर्वथा न बाधी त्याजकारणें । नैराश्य होऊनि सर्वगुणें । श्रीरामभजन करीतसे ॥ १ ॥ वैष्णवभक्त कबीर जाणा । त्याणें सांगीतली उपासना । तेंचि रूप आणोनि ध्याना । मानसपूजना नित्य करी ॥२॥ ऐसें लोटतां दिवस चार । देवें दिधला साक्षात्कार । सगुणरूपें लक्ष्मीवर । भेटले साचार तयासि ॥ ३ ॥ कोणी सत्पुरुष पडतां दृष्टीसी । रात्रीं राहे तयापासीं । तों एक फकीर देखिला उदासी । तयाच्या स्थळासी राहिले ॥ ४ ॥ तो भिक्षा न मागेची साचार । आणि कोणासि न घाली जोजार । देवासि संकट पडिलें थोर । मग तयासि भाकर पाठवी ॥ ५ ॥ ऐसी स्थिति असतां पाहीं । बलखबुखार आले ते ठायीं । फकीर म्हणतसे ते समयीं । येथें स्थळ नाहीं तुजलागीं ॥ ६ ॥ तुवां वैराग्य घेतल्यास । जाहले असती किती दिवस । येरू उत्तर देतसे त्यास । नूतनचि असे जोग झाला ॥ ७ ॥ सद्गुरुकृपेनें निश्चिती । उगविली सर्व प्रपंचगुंती । आठ दिवस लोटले निश्चितीं । सत्य वचनोक्ती हे जाण ॥ ८ ॥ मठपतीस भय अंतरीं । म्हणे मज देव पाठवितो दोन भाकरी । हा त्यांसि होईल वांटेकरी । तरी सत्वर बाहेरीं घालावा ॥ ९ ॥ बलखबुखारासि म्हणताहे । तुवां नूतन जोग घेतला आहे । तरी मठावाहेर जावोनि राहे । तोचि ठाय तुजलागीं ॥ ११० ॥ अवश्य म्हणवोनि वैराग्यशीळ । वाहेर राहतसे ते वेळ । तो कौतुक केलें घननीळें । ते ऐका सकळ भाविकहो ॥ ११ ॥ तेथील स्थायिक जो फकीर । तयासि पाठविली भाजीभाकर । बलखबुखार क्षुधातुर । परी इच्छा अणुमात्र त्यास नाहीं ॥ १२ ॥ ऐसें जाणोनि लक्ष्मीपती । सांभाळ करीतसे कवणें रीतीं । रत्नजडित ताट उतरलें क्षितीं । त्यांत पदार्थ असती मिष्टान्नें ॥ १३ ॥ कांचनाची सुंदर झारी । लक्ष्मीनें घेतली करीं । लोभ करोनि तयाघरी । भोजन सत्वरीं घातलें ॥ १४ ॥ हें मठपती दृष्टीं भरीं । दुरोनि पाहिले ते अवसरीं । म्हणे याची आठ दिवसां फकीरी । आणि मी जन्मवरी कष्टतों ॥ १५ ॥ न्याय नाहीं ईश्वरा घरीं । म्हणवोनि न खायी भाकरी । उपवासी निजे ते अवसरीं । तंव स्वप्न

१ घोडे.

रात्रीं देखिलें ॥ १६ ॥ फकीराच्या रूपें साचार । तयासि म्हणे विश्वंभर । बाहेर उतरला बलखबुखार । त्याणें राज्य समग्र टाकिलें ॥ १७ ॥ निष्काम होऊनियां मनीं । विनटला असे भजनीं । यास्तव सांभाळ प्रतिदिनी । मी चक्रपाणी करीतसें ॥ १८ ॥ आणि तूं पुढें राज्य इच्छितोसि थोर । यास्तव पाठवितों भाजीभाकर । आपुलें नाठवोनि जन्मांतर । कोणावर रुसतोसि ॥ १९ ॥ जैसें बिज पेरावें भोईंचे पोटीं । तैसेंच येतसे शेवटीं । ज्याची जैसी सत्कर्म राहटी । मी होय जगजेठी त्यासारिखा ॥ १२० ॥ ऐसा दृष्टांत देखतां राती । विस्मित जाहला तो मठपती । मग येऊनि बलखबुखारा प्रती । नमन निश्चिती करीतसे ॥२१॥ पुढें चालिला बलखबुखार । तों एक नगर देखिलें दृष्टीस थोर । तेथें मठांत असती वहुत फकीर । तयां समोर पातला ॥ २२ ॥ सैली तसबी कंथा पाहीं । मणका बाणा जवळ नाहीं । म्हणवोनि जवळ येऊंन देती कोणीही । बाहेर तिहीं भवांडिला ॥२३॥ मग सकळ फकीरांचा होऊनि महंत । तेथें प्रगटलें वैकुंठनाथ । म्हणे आज ऐसा निष्ठावंत । नाहीं दिसत त्रिभुवनीं ॥ २४ ॥ सैली तसबी कंथा पाहीं । याचे अंतरीं असती सर्वही । ऐसें सांगोनि ते समयीं । अदृश्य ते ठायीं जाहले ॥ २५ ॥ फकीर विस्मित जाहले अंतरीं । म्हणती हा परम साक्षात्कारी । मग सन्मान करोनि ते अवसरीं । मठा भीतरी आणिला ॥ २६ ॥ जयासि साह्य असतां श्रीहरी । तरी विश्व त्यावरी कृपा करी । सुदर्शन घेवोनियां करी । नानापरी रक्षितसे ॥ २७ ॥ न विचारीच याती कुळ । सप्रेम भक्तीचें पाहिजे बळ । बलबुखारासि सर्वकाळ दीनदयाळ भेटती ॥ २८ ॥ आणिक भक्त नैष्ठिक थोर । त्याचें चरित्र ऐका सादर । तयासि कासवटीं लावोनि फार । सारंगधर भेटले ॥ २९ ॥ शेख फरीद जातीचा यवन । रांडकीचा मूल होता जाण । तो आपुले मातेसि काय म्हणे । देवाचे दर्शन मज करी ॥ १३० ॥ माता म्हणतसे ते अवसरी । देव काय पडिला वाटेवरी । त्याची प्राप्ति व्हावया निर्धारीं । नानापरी कष्टती ॥ ३१ ॥ व्हावया श्रीहरी प्राप्त । सकळ विषय टाकिती संत । एक ते होवोनि विरक्त । फिरती वनात सर्वदा ॥ ३२ ॥ एक ते ब्रह्मचर्य साचार । एक तपें आचरती मुनीश्वर । एक शोधोनि आपुलें अंतर । साक्षात्कार पाहती ॥ ३३ ॥ एक टाकोनि संसारासी । अरण्यांत बैसती उपवासी । एक ते वर्णिती सत्कीर्तीसी । एक श्रवणासी बैसले ॥ ३४ ॥ एक सत्कर्म आचरती फार । परी फळाशा न धरिती अणुमात्र । एक विष्णुव्रतें आचरती थोर । हरिजागर ते करिती ॥ ३५ ॥ मग आत्मवत दुसऱ्यासि मानुनी । क्षुधितासी देती अन्नपाणी । एक ते तरले साधुसेवनीं । सत्वासि हानी न करिती ॥ ३६ ॥ एक वाचा तप आचरती जाण । असत्य कदा न बोलती वचन । वाचेसि करिती हरिस्मरण । एकहीं क्षण न विसंबती ॥ ३७ ॥ एक परोपकारी पुत्र राया । आपुली झिजविती सर्व काया । एक वज्रासनीं बैसोनियां । योगक्रिया आरंभिती ॥ ३८ ॥ एक मेळवूनि कष्टार्जित धन । एक सत्पात्रीं

करिती दान । एक करिती सद्गुरुसेवन । तन मन धन आर्पोनियां ॥ ३९ ॥ श्रीहरी प्राप्तीलागीं पाहें । असती इतुके साधन उपाय । यांत तुज कोणतें अनुकूळ होय । तेंचि लवलाहे करी कां ॥ १४० ॥ सेखफरीद म्हणे वो जननी । मी अन्न त्यजुनि फिरतों वनीं । तरीच भेटेल चक्रपाणी । परी भाकर आणोनि एक देईं ॥४१॥ माता म्हणे त्यजितोसि अन्न । तरी भाकर कासया मागतोसि जाण । येरू म्हणे आश्रय मनें । समाधान व्हावया ॥ ४२ ॥ मातेपासोनि घेवोनि भाकरी । पोटीं बांधीन आपुले करीं । मग जावोनि अरण्याभीतरीं । पर्वतावरी बैसला ॥ ४३ ॥ मातेनें दीधले होतें अन्न । तें सर्वथा सोडोनि न पाहेच जाण । झाडपाला[1] बरबडून । क्षुधाहरण मग करी ॥ ४४ ॥ सगुणरूपें भेटावा हरी । हेचि इच्छा असे अंतरीं । परी साक्षात्कार नव्हेचि सत्वरीं । उद्विग्न अंतरीं सर्वदा ॥४५॥ गुप्तरूपें करोनि जाण । तयासि रक्षित जगज्जीवन । असत्य होऊं नेदी वचन । तों वर्तलें विंदान अघटित ॥ ४६ ॥ गोण्यांत भरोनियां साखर । वाणी घालिती वृषावर । मार्गी चालतां त्यांसि सत्वर । पुसिलें उत्तर काय नेतां ॥ ४७ ॥ सेखफरीद पुसतां ऐशा रीतीं । उर्मट वाणी उत्तर देती । गोण्यांत भरली असे माती । ऐसी वचनोक्तीं बोलिलें ॥ ४८ ॥ उत्तम म्हणवोनि बोलिला त्यांसीं । तैसीच कल्पना फळे त्यासी । व्यवसायी गेले शहरासीं । तों मृत्तिके ऐसी साखर दिसे ॥ ४९ ॥ देखोनि घर बुडालें म्हणती । नेणो कर्मांची विचित्र गती । असत्य बोललों सत्पुरुषाप्रती । यास्तव गती हे झाली ॥ १५० ॥ ऐसा पश्चात्ताप येतां मनीं । मग परतोनि आले त्या ठिकाणीं । विष्णु भक्त पुढती बोले वचनीं । काय घेऊनि जातसां । ॥ ५२ ॥ वाणी बोलती प्रत्युत्तर । बैलावरी भरिली साखर । ऐसें ऐकोनि तपस्वी नर । उत्तम बरें म्हणे तेव्हां ॥ ५२ ॥ व्यवसायी उसवोनि पाहती गोणी । तों पूर्ववत शर्करा देखिली नयनीं । ऐसा चमत्कार देखोनी । मग सद्भावें चरणी लागले ॥ ५३ ॥ साखर घेऊनी परातभर । पुढें आणोनि ठेविली सत्वर । तें देखोनियां वैष्णववीर । जातसे दूर पळोनी ॥ ५४ ॥ म्हणे माझी भ्रंशावया बुद्धी । देव पुढें दाखवितो सिद्धी । परी मज नलगे हे त्रिशुद्धी । दांभिक उपाधी कासया ॥ ५५ ॥ मातेनें भाकर दीधली जाण । ते पोटीं तैशीच बांधिली त्याणें । क्षुधेनें व्याकुळ होतां प्राण । पाला तोडून खातसे ॥ ५६ ॥ ऐशा रीतीं त्या अवसरा । वर्षे लोटोनी गेलीं बारा । तरी भेट नव्हेचि विश्वोद्धारा । मग परतोनि घरा येतसे ॥५७॥ घरासि येऊनियां सत्वरी । आपुले मातेसि नमस्कारी । म्हणे माझेनि न भेटेचि श्रीहरी । उपाय लौकरी मज सांग ॥ ५८ ॥ भाकर नेली बरोबर । तेही मातेसि दाखवीत सत्वर । काष्ठवत जाहलें शरीर । जटाभार मस्तकीं ॥५९॥ म्हणे इतुके कष्ट केले जननी । परी अजून न भेटे चक्रपाणी । मग केंसाची बट हातीं धरोनी । माता ते क्षणीं उपडीत ॥१६०॥ तों किंचित अंग चोरिलें त्याणें । माता हांसोनि बोले वचन । ऐसेंच दुःख तरुवरांकोरणें । दीधलें जाण निजपुत्रा ॥६१॥ त्या दोषास्तव श्रीहरी । भेटला नाहीं ये अवसरीं । मग पुढती मातेसि नमस्कारी । म्हणे आतां हिंसा न करीं सर्वथा ॥६२॥

[1] झाडे वगैरेना.

मग महारण्यांत जाऊन । भक्षितसे गळित पानें । एके दिवसीं वृक्षाकारणें । शरीर टांगोनी घेतसे ॥ ६३ ॥ एकाग्र करोनियां चित्त । महाविष्णूचा धांवा करित । म्हणे पतितपावना कृपावंत । मज दीनातें सांभाळी ॥ ६४ ॥ महावृक्षाचे खांदीवर । काष्ठवत लोंबतसे शरीर । तों कावळा येवोनि टोंचित सत्वर । तयासि उत्तर काय वदे ॥ ६५ ॥ बापा सर्वांग तोडोनि खायी । परी दोन्ही नेत्र तैसेचि ठेवी । श्रीहरि दर्शनाची पाहीं । आस जीवीं धरिली असे ॥ ६६ ॥ ऐसें म्हणवोनि ते वेळां । टपटपा आसवें आलीं डोळां । प्रेमें सद्गदित जाहला गळा । घनसांवळा पहातसे ॥६७॥ गुप्तरूपें सन्निध होते हरी । ते प्रकट जाहले ते अवसरीं । आपुल्या हातें सोडोनि दोरी । म्हणे श्रमलासि भारी निजभक्ता ॥६८॥ माझी प्राप्ति व्हावयाकारणें । दोन तपें केलीं अनुष्ठानें । ऐसें म्हणवोनि जगज्जीवन । देत आलिंगन तयासि ॥ ६९ ॥ कृपेनें पाहतांचि विश्वंभर । त्याचें जाहलें दिव्य शरीर । शेखफरीद पाहे उघडोनि नेत्र । तो वैकुंठविहार पुढें असती ॥ १७० ॥ चतुर्भुज घनसांवळा । दिव्य पीतांबर कांसे पिवळा । मुकुट कुंडलें वनमाळा । पाहतांचि डोळां विश्रांती ॥ ७१ ॥ साजिरें श्रीमुख मनोहर । कंठीं कौस्तुभ झळके सुंदर । गळां वैजयंती हार । पायीं तोडर मिरवतसे ॥ ७२ ॥ ऐसें रूप देखतां नयनीं । सद्भावें मिठी घातली चरणीं । मग भावाच्या उपचारें करोनि । चक्रपाणी पूजिला ॥ ७३ ॥ साक्षात् रूप देखिलें नयनीं । मग तेंच सांठविलें हृदय भुवनीं । शेखफरीद अरण्यांतूनि । आला परतोनि मंदिरां ॥ ७४ ॥ आपुले मातेसि नमस्कारी । म्हणे तुझ्या प्रसादें भेटला हरी । जननीसि संतोष झाला अंतरीं । म्हणे चिन्ह निर्धारीं पालटलें ॥ ७५ ॥ तेंपासोनि तो वैष्णवभक्त । जनांत जाहला प्रख्यात । आपुल्या दासाची भगवंत । सत्कीर्ती वाढवित भूमंडळीं ॥ ७६ ॥ आणिक चरित्र रसाळ गहन । सादर ऐका भाविक जन । श्रवणमात्रें तत्काळ जाण । दुरितें संपूर्ण नासती ॥ ७७ ॥ तापी तीरीं थारनेर जाण । तेथें नारायणभट्ट राहे ब्राह्मण । परम सुशील भाविक पूर्ण । श्रीहरी चिंतन करीतसे ॥ ७८ ॥ निराश होवोनि सर्वोपरी । स्नानसंध्या अनुष्ठान करी । अन्नवस्त्रांची वाण घरीं । परी संतोष अंतरीं सर्वदा ॥ ७९ ॥ न करी कोणाचें उपार्जन । रावरंक सारिखें त्याजकारणें । जयासि मृत्तिका आणि धन । समसमान सारिखीं ॥१८०॥ नामरूपीं जडलें चित्त । सर्वकाळ विदेही स्थित । जो जो पदार्थ नाशवंत । विषतुल्य मानित तयासी ॥८१॥ सर्वकाळ श्रीहरीभजन । स्नानसंध्या अनुष्ठान । समयीं अतिथी आलिया जाण । तरी विष्णुसमान त्यासि मानी ॥ ८२ ॥ अन्नवस्त्रांची अडचण घरीं । परी सत्वासि हानि कदा न करी । त्याचें चित्त पाहावया निर्धारीं । द्विजरूपें श्रीहरी पातले ॥ ८३ ॥ नारायणभट्ट तापीतीरीं । स्नानसंध्येसि गेला सत्वरी । घरीं कांता धंदा सारी । तों भक्तकैवारी पातले ॥ ८४ ॥ ब्राह्मणाच्या रूपें जगज्जीवन । घरीं बैसले येऊन । त्याच्या कांतेसि काय म्हणे । आम्हांसि जाणें महायात्रे ॥ ८५ ॥ एक परीस आहे मजजवळ । तो ठेवावयासि नाहीं स्थळ । तुम्ही निरपेक्ष सर्वकाळ । यास्तव जवळ

१ फांदीवर.

पातलों ॥ ८६ ॥ ऐसें म्हणवोनि वैकुंठपती । लोखंड आणवीत तिज हातीं । तें परिसासि घांसितांचि निश्चितीं । कांचन अवचितीं तें झालें ॥ ८७ ॥ इतुका चमत्कार दाखवोनि श्रीहरी । काय बोलती ते अवसरीं । तुम्ही सुवर्णसांठा करोनि घरीं । दरिद्र दुरी दवडावें ॥८८॥ नारायणभट्ट आलियावर । आमुचा सांगावा नमस्कार । परतोनि यावया साचार । दोन संवत्सर लागती ॥८९॥ यात्रा करोनि आलियावर । परीस मागेन मी साचार । जतन ठेवावा तोंवर । बोभाटा बाहेर न करावा ॥१९०॥ इतुकें सांगोनि रुक्मिणीपती । आपण गेले सत्वरगती । घरस्वामीण संतोषे चित्तीं । म्हणे देवें निश्चिंती केली माझी ॥ ९१ ॥ प्रतार विदेही देवळासी । भजन करीत अहर्निशीं । पदार्थ पाहिजे संसारासी । तरी देव मजसी पावला ॥ ९२ ॥ ऐसे म्हणवोनि ते समयीं । परिसासि लाविलीं दाभणसुयी । सुवर्ण होतांचि लवलाहीं । सामग्री सर्वही आणितसे ॥ ९३ ॥ दोन प्रहर होतांचि सत्वरी । नारायणभट्ट पातले घरीं । कांता हर्षयुक्त अंतरीं । स्वयंपाक करी पक्वान्नें ॥ ९४ ॥ मग कांतेसि पुसे तयेक्षणीं । सामग्री आणिली कोठूनी । पतीचा प्रश्न ऐकोनि कानीं । यथार्थ कामिनी ते सांगे ॥ ९५ ॥ म्हणे एक ब्राह्मण आजिचे दिवसीं । येथोनि गेला वाराणसीं । तो घरीं येऊनि सांगे मजपासी । तुम्हीं एक विश्वासी दिसतां ॥ ९६ ॥ त्याजवळ परीस होता जाण । लोखंड लावूनि केलें कांचन । ऐसा चमत्कार दाखवोन । म्हणे जतन करणें निजवस्तू ॥ ९७ ॥ तुम्हीं सुवर्णसांठा करोनि घरीं । दैन्य दुःख दवडावें दुरी । दोन संवत्सर लोटलियावर । परतोनि माघारीं आम्ही येऊं ॥ ९८ ॥ तुम्हीं साधोनि आपुलें काज । परतोनि परीस द्यावा मज । ऐसें बोलोनि गेला आज । हें नवलचीच मज वाटे ॥ ९९ ॥ किंचित सुवर्ण करोनि घरीं । मग घेऊनि गेलें बाजारीं । उत्तम आणोनि सामग्री । स्वयंपाक मंदिरीं केला असे ॥ २०० ॥ तुम्हीं आजपासोनि तत्वतां । न करावी कांहीं संसारचिंता । हृदयीं आठवोनि भगवंता । भजन आतां करावें ॥ १ ॥ ऐकोनि कांतेचें उत्तर । अनुतापें द्रवला वैष्णववीर । म्हणे उपाधींत पडतां साचार । तरी रुक्मिणीवर अंतरला ॥ २ ॥ ऐसें म्हणवोनि ते समयीं । परीस मागितला लवलाहीं । कांचन केलें होतें तेंही । तापींत लवलाही टाकिलें ॥ ३ ॥ उपाधिरहित होवोनि त्वरित । घरासि आला विष्णुभक्त । मग पंक्तिसि घेऊनि अभ्यागत । भोजन सारित निजप्रीती ॥ ४ ॥ कांता म्हणतसे तयास । गृहस्थ परतोनि येईल घरास । तो मज मागेल आपुला परीस । मग मी तयास काय देऊं ॥ ५ ॥ नारायणभट्ट बोलती उत्तर । त्यासि आम्हापाशीं पाठवीं सत्वर । एकाचे परतोनि देईन चार । चिंतातुर तुवां न व्हावें ॥ ६ ॥ ऐसें करोनि समाधान । भजन करीत निजप्रीतीनें । नामरूपीं लाविलें मन । प्रपंच भान असेना ॥ ७ ॥ विष्णुपूजन हरीकीर्तन । वांचोनि भागवत करी मनन । दोन संवत्सर लोटतां जाण । परतोनि ब्राह्मण तो आला ॥ ८ ॥ नारायणभटाचें मंदिरीं । घरस्वामिनीसि भेटे सत्वरीं । म्हणे आमुची वस्तु ठेविलीं घरीं । परतोनि

माघारीं तें द्यावी ॥ ९ ॥ कांता तयासि उत्तर देती । स्नानासि गेले आमुचे पती । त्यांजपाशीं परीस निश्चितीं । घरासि येती मग मागा ॥ १० ॥ ऐकोनि म्हणे जगज्जीवन । परीस दीधला तुजलागून । त्यासि कां सांगीतली जीवींची खूण । कांहीं कारण नसतांचि ॥ ११ ॥ जैसा पांढरा स्फटिक मणी । तैसीच दिसती त्याची करणीं । ऐकोनि ब्राह्मणाची वाणी । घरस्वामिनी काय बोले ॥ १२ ॥ प्राणनाथासि गोष्ट वंचितां । तरी तिसीं न म्हणावें पतिव्रता । म्हणवोनि त्यांसि सांगीतली वार्ता । येतील आतां घरासी ॥ १३ ॥ ब्राह्मण म्हणे ते अवसरी । माझी संगत गेली दुरी । आतां चलावे तापीतीरीं । परीस सत्वरीं दे माझा ॥ १४ ॥ ऐसें बोलतांहि द्विजवर । कांता जाहली चिंतातुर । म्हणे उत्तम न दिसे विचार । मग तापीतीर पावली ॥ १५ ॥ तों नारायणभट्ट एकांतस्थानीं । जप करीत बैसले आसनीं । तों कांता येऊनि सुलक्षणी । मृदुवचनीं बोलत ॥ १७ ॥ गृहस्थ ठेवोनि गेला परीस । तो परतोनि आला मागावयास । तरी काय उत्तर द्यावें तयास । पहा दृष्टीस याजकडे ॥ १७ ॥ ॥ नारायणभट्ट मानसपूजनीं । ध्यानास आणि चक्रपाणी । तों ब्राह्मणरूपें दिसे नयनी । विस्मित मनीं होतसे ॥ १८ ॥ नेत्र उघडोनि जंव पाहे । तो द्विजवर पुढें उभा आहे । म्हणे परीस द्यावा त्वरांहें । ध्यानस्थ काय बैसला ॥ १९ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णवभक्त । परीस टाकिला जळांत । आम्हांसि उपाधि कासया व्यर्थ । अंतरें भगवंत त्या साठीं ॥ २० ॥ देव म्हणती ते समयीं । आम्ही तुज ऐसे उदास नाहीं । परीस घेतल्याविण पाहीं । जाणार नाहीं सर्वथा ॥ २१ ॥ ऐसा देखोनि त्याचा निकरं । उदकांत जाय भक्त चतुर । हातीं गोटे घेऊनि चार । नदीबाहेर पातले ॥ २२ ॥ म्हणें यातून आपुला घ्या ओळखून । लोखंड लावीत जगज्जीवन । तों अवघेचि परीस असती जाण । लावितां कांचन होतसे ॥ २३ ॥ मग प्रसन्न होऊनि श्रीहरि । ब्राह्मण वेष टाकिला सत्वरी । चतुर्भुज पितांबरधारी । दृष्टि समोरि दिसतसे ॥ २४ ॥ श्रीमुखसाजिरें मनोहर । कानीं कुंडलें मकराकार । समपदीं उभा रुक्मिणीवर । देखतांचि अंतर निवालें ॥ २५ ॥ कांता भ्रतार दोघे जण । नमस्कार करिती निजप्रीतीनें । सप्रेमभावें करोनि पूजन । जगज्जीवन आलिंगिला ॥ २६ ॥ सगुणरूप देखिलें दृष्टी । तें ठेविलें हृदयसंपुटीं । देवें पाहतांचि कृपादृष्टीं । तुटे फांसटी भववंधाची ॥ २७ ॥ पुढिले अध्यायीं कथासुंदर । वदविता श्रीरुक्मिणीवर । महीपति त्याच्या अभयवरें । आर्ष उत्तर बोलतसे ॥ २८ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । सत्तेचाळिसावा अध्याय रसाळ हा ॥ २२९ ॥ ॥ अ० ॥ ४७ ॥ ॥ ओ० ॥ ॥ २२९ ॥

१ निश्चय.

अध्याय ४८



श्रीगणेशाय नमः ॥ कलीचा प्रारंभ होता निश्चित । तेव्हां अद्भुत वाढलें दुरित । मग महर्षि होवोनि भयभीत । बदरिकाश्रमातें पातलें ॥ १ ॥ भूमंडळीं दैवतें फार । त्यांणीं टाकिले चमत्कार । पाषाणांत लपोनि सत्वर । सोशिती मार अविंधांचा ॥ २ ॥ महातीर्थें जीं समस्त । तींही जाहलीं उदकवत । तरणोपाय नसेचि जनांत । मग अवतरले संत भूमंडळीं ॥ ३ ॥ नामसंकीर्तन देखा । भवसागरीं घातलीं नौका । श्रवणमात्रें सकळ लोकां । सायुज्यसुखा भोगविती ॥ ४ ॥ योग याग जपहवनें । कलियुगीं न होती ही साधनें । अर्चनपूजा यथाविधिनें । कोणाकारणें घडेना ॥ ५ ॥ मग अवतार घेवोनि वैष्णववीर । भक्तीसि लाविती नारीनर । त्यांचीं श्रवण करितांचि चरित्रें । तरी भवरोग परिहरे तयांचा ॥ ६ ॥ संतचरित्रें गाता ऐकतां । संतोष वाटे रुक्मिणीकांता । तयासि न विसंबेचि सर्वथा । बाळकासि माता ज्यापरी ॥ ७ ॥ मागिले अध्यायाचे शेवटीं जाण । नारायणभट्ट निराश ब्राह्मण । त्यासि परीस देतां जगज्जीवन । मग उदकांत तेणें टाकिला ॥ ८ ॥ कसोनि पाहतां जगन्निवास । मग प्रसन्न जाहले कीं तयास । टाकोनियां ब्राह्मण वेष । दर्शन तयास दीधलें ॥ ९ ॥ यावरी ऐका भाविकजन । कथा रसिक अति पावन । श्रवणेंचि श्रोतयांचें मन । तन्मय होऊन राहातसे ॥ १० ॥ एक रत्नाकर म्हणोनि व्यवसायीं । बागलाण देशांत असे पाहीं । कष्ट करितां नाना उपायीं । पुरवठा कांहीं पडेना ॥ ११ ॥ घरीं खावयासि नाहीं अन्न । वस्त्रपात्र न मिळेचि जाण । लोकांचें बहूत जाहलें ऋण । न मिळेचि धन उदमीं ते ॥१२॥ संसारीं विपत्ति देखोनि । मग रत्नाकर बैसले अनुष्ठानीं । अहोरात्र नामस्मरणीं । उपोषणीं निराहार ॥ १३ ॥ चौदा दिवस लोटतां ऐसें । तों दृष्टांतीं देव सांगती त्यास । तूं व्यवसाय टाकोनि सर्वस्व । माझ्या भजनास लाग आतां ॥ १४ ॥ आणि प्रपंच हातवटीं करिसील कांहीं । तरी सर्वथा पुरवठा येणार नाहीं । ऐसें सांगतां शेषशायी । जागृतीसि पाहीं मग आला ॥ १५ ॥ मग आपुल्या घरीं येवोनि त्याणें । कांतेसि सांगितलें वर्तमान । म्हणे देवें मजला दाखविलें स्वप्न । कीं व्यवसाय न करणें सर्वथा ॥ १६ ॥ वैराग्य घेतांचि सात्वार । मी प्रसन्न होईन रुक्मिणीवर । ऐसा दृष्टांत दीधला थोर । कैसा विचार करावा ॥ १७ ॥ म्हणे आपुला व्यवसाय टाकितां जाण । सोयरे हांसतील आपणाकारणें । भिक्षा मागोनि उदरपोषण । तरी लाजीरवाणें लोकांत ॥ १८ ॥ ऐकोनि कांतेचें उत्तर । पारणें करीत रत्नाकर । व्यवसाय करीत निरंतर । परी पोट न भरेचि सर्वथा ॥ १९ ॥ देशीं दुष्काळ पडिला पाहीं । धान्यासि जाहली महागायी । स्वस्त धारण जयेठायीं । खेपेसि लवलाही जातसे ॥ २० ॥ चार बैल बरोबर । घेवोनि गेला रत्नाकर । तेथें धान्य मिळालें गोणीभर । तें घेवोनि सत्वर येतसे ॥ २१ ॥ एकला येकट वैष्णवभक्त । वृषभ हाकीत अरण्यांत । तों देवें कसवटी लाविली बहुत । ते ऐका निजभक्त भाविकहो ॥ २२ ॥ श्वापदरूप दाखवोनि श्रीहरी । बैल बुजोनि पळाले चारी । वाट विसरोनियां सत्वरीं । रानभरी ते झाले ॥ २३ ॥ गोणी होती

१ मुसलमानांचा. २ व्यापारासाठी. ३ बैल. ४ कसोटी. ५ जनावर.

एकावर । तेही खालीं पडिली सत्वर । संकटीं पडिले रत्नाकर । म्हणे कैसा विचार करूं आतां ॥ २४ ॥ संमार चोंडाळें केलें कष्टी । अधिक अधिक येतसे तुटी । करुणासागर जगजेठी । पाव संकटीं मज आतां ॥ २५ ॥ ऐसें म्हणवोनि प्रेमळ भक्त । नेत्रीं वाहती अश्रुपात । तों वाटसराच्या रूपें त्वरीत । रुक्मिणीकांत पातले ॥ २६ ॥ चारी बैल आणिले वळोनी । एकावर सत्वर घातली गोणी । रत्नाकरासि मार्गी लाऊनि । अदृश्य तेक्षणीं जाहले ॥ २७ ॥ मागें पाहतां सभोवतें । तों वाटसरू न दिसेचि तेथें । मग अनुताप जाहला मनांत । म्हणे द्वारकानाथ कष्टविला ॥२८॥ मग घरासि येऊनि ते अवसरीं । ब्राह्मण बोलावूनि आणित सत्वरी । वस्तभाव होती जें मंदिरीं । ती द्विजांसि सत्वरीं वांटिली ॥ २९ ॥ वृषभ गोण ताटमूठ जाण । वस्त्रपात्र आणि धनधान्य । अवघेंचि घेवोनि गेलें ब्राह्मण । उपाधि संपूर्ण निरसिली ॥ ३० ॥ शुद्ध सात्विक वैराग्यलक्षण । करूं लागला श्रीहरीभजन । अयाचित वृत्ती करून । उदरपोषण होतसे ॥ ३१ ॥ न करी कोणाचें उपार्जन । राव रंक समसमान । सप्रेम गातसे भगवद्गुण । लोक श्रवण करिताती ॥ ३२ ॥ निष्काम बुद्धि वैष्णववीर । कीर्ति प्रगटली दूरच्या दूर । मानूं लागले थोर थोर । प्रतिष्ठा फार वाढली ॥ ३३ ॥ रत्नाकराचा अनुग्रह घेती । बहुतां जनांसि लागली भक्ती । थोर थोर राजे तेही मानिती । प्रगट सत्कीर्ती जाहली ॥ ३४ ॥ निरपेक्ष देखोनि वैष्णववीर । धनसंपत्ति देताति फार । नित्य पंक्तीसि सहस्र पात्र । अन्न व्यवहार क्षुधितांसी ॥ ३५ ॥ दृष्टीसीं पाहतां रत्नाकर । खळासि तत्काळ फुटे पाझर । दाखविले नाना चमत्कार । निजकृपावरें श्रीहरीच्या ॥३६॥ चित्तीं विचारी वैष्णवभक्त । पृथ्वीचीं तीर्थें पाहावीं समस्त । तेथें असती साधुसंत । दर्शनेंचि मुक्ती होय जीवां ॥ ३७ ॥ ऐसी इच्छा धरोनि मानसीं । मग चालिले वाराणसीं । स्नान करोनि भागीरथीसी । मग विश्वेश्वरासी वंदिलें ॥ ३८ ॥ गया प्रयाग पाहोनि सत्वर । दानें तोषविले द्विजवर । सर्व यात्रा सहस्रवर । जयजयकार होतसे ॥३९॥ विष्णुजन हरिकीर्तनीं । बहुतांसि भक्ति लाविली त्याणीं । मग कुरुक्षेत्रासि आले तेथूनीं । सुस्रा नमनीं अनुतापें ॥४०॥ दिंड्या पताका निशाणभेरी । वाद्यें वाजती मंगल तुरीं । तैसेच आले हस्तनापुरीं । सप्रेम अंतरीं सर्वदा ॥ ४१ ॥ लोक बोलती परस्परें । रत्नाकर ईश्वरी अवतार । करावया जगदुद्धार । जाहला साचार मृत्युलोकीं ॥ ४२ ॥ ऐसें बोलोनि परस्परें । दर्शनासि येती नारीनर । महाक्षेत्र हस्तनापुर । तेथें उत्सव थोर मांडिला ॥ ४३ ॥ जन्मअष्टमी पुण्यातिथी । मखरीं स्थापिली श्रीविष्णुमूर्ती । त्यापुढें कीर्तन आपण करिती । ऐकतांचि वृत्ती वेधतसे ॥ ४४ ॥ निपजोनि नाना पक्वान्नें । होतसे ब्राह्मण संतर्पण । शहरांत काढिली मिरवण । धन्य सुदिन लोक म्हणती ॥ ४५ ॥ सप्तरंगी पताका भरजरी । गरुडटके निशाणभेरी । यंत्रें सुटती नानापरी । तों कौतुक सत्वरी काय झालें ॥ ४६ ॥ अमर वासेच्या वरूनि जाण । ऐसी चालिली मिरवण । अविंध राजा तें देखोन । समाधान पावला ॥४७॥ सुवर्णमुद्रा पांच शत । देवापुढें आणोनि ठेवित । वर्षासन

नेमोनि देत । खर्च बहुत म्हणवोनीं ॥४८॥ श्रीहरीच्या कृपेंकरून । भक्तीसि लागले सर्वजन । मग द्वारकसि चालिले तेथून । श्रीकृष्ण दर्शन घ्यावया ॥४९॥ मार्गीं चालतां सुपंथीं । पदोपदीं गातसे कीर्तीं । कोणी देती अथवा न देती । परी हर्ष खंती ते नाहीं ॥ ५० ॥ ऐशारीती क्रमितां पंथ । तों भडोच नगरासि आले त्वरित । तेथील अधिकारी अविंध उन्मत्त । देखोनि मनांत संतापला ॥५१॥ म्हणे हा तों जातीचा हिंदु फकीर । गफुर मांडिला असे फार । मग मांस पाठविलें तबकभर । म्हणे प्रसाद साखर घ्या तुम्हीं ॥५२॥ रत्नाकरासि म्हणती दूत । रायें मिठाई पाठविलें तुम्हांतें । रितें पात्र करोनि त्वरित । द्यावें निश्चित आम्हांसी ॥ ५३ ॥ ऐसी ऐकतांचि मात । चिंताक्रांत वैष्णवभक्त । मग श्रीहरीचा धांवा करित । म्हणे संकटीं त्वरित पाव देवा ॥ ५४ ॥ दांभिक अथवा निष्काम चित्तीं । मी तुझा म्हणवित असें श्रीपती । संकटनिवारी भलत्यारीतीं । करीतसे ग्लांती निजप्रेमें ॥ ५५ ॥ मग रुमाल काढितां तबकावरूनी । तों मोगऱ्याचीं पुष्पें देखिलीं नयनीं । सकळांसि वांटोनि तये क्षणीं । संतोष मनीं पावला ॥५६॥ कांहीं तबकांत राहिलीं सुमनें । तीं रायासि पाठवूनि दिधलीं त्याणें । ऐसा चमत्कार पाहोन । अनुतापला यवन मानसीं ॥५७॥ म्हणे हा साक्षात्कारी विष्णुभक्त । उगीच छळणा केली व्यर्थ । मग सद्भावें येऊनि पायीं लागत । म्हणे अपराध समस्त क्षमा करी ॥५८॥ रौप्यमुद्रा सहस्रवरी । आणोनि ठेविल्या चरणावरी । म्हणे शिबिकेचा खर्च निर्धारीं । हा निरंतरी घेत जावा ॥ ५९ ॥ बडोद्याचा अधिकारी जाण । त्यासि वरात दीधली लेहून । कृपा करितां जगज्जीवन । तरी महाविघ्नें निरसती ॥६०॥ मग समुदायासि वैष्णववीर । द्वारकापुरासि गेले सत्वर । तेथेंही अद्भुत वर्तलें चरित्र । तें ऐका सादर भाविकहो ॥६१॥ गोमती समुद्र संगम होत । मध्यें वाळूचा[1] सांचला पर्वत । न वाहात म्हणवोनि प्रवाह । तेणें उदक समस्त नासलें ॥६२॥ गोमतीचें हिरवें पाणी । किडे पडिले त्या ठिकाणी । मुखामाजी घालितां कोणी । तरी दुर्गंध घाणी येतसे ॥६३॥ क्षेत्रवासी चिंताक्रांत । कांहीं उपाय नचलेचि तेथ । रत्नाकराची कीर्ती अद्भुत । जाहलीसे श्रुत त्यांलागीं ॥६४॥ पुजारी विनविती त्या अवसरीं । तूं तरी विष्णुभक्त साक्षात्कारी । समुद्र गोमतीचा प्रवाह करी । सत्कीर्ती चराचरीं प्रगटेल ॥६५॥ ऐसें संकट घालितांचि त्याणीं । रत्नाकर संकोचित जाहले मनीं । मग देवासन्मुख उभे राहुनी । सप्रेम विनवणी करीतसे ॥६६॥ म्हणे द्वारकापति यादवराया । उपाधि जनांत वाढविली वायां । मी नेणेंचि भूतभविष्यक्रिया । तुझिया पायां चिंतितसे ॥६७॥ ऐसी ऐकोनियां ग्लांती । मग प्रसन्न जाहलें रुक्मिणीपती । म्हणे तूं गोमतीत स्नान करितां निश्चिती । मग प्रवाहें वाहती होईल ॥६८॥ ऐसा दृष्टांत होतां त्यासी । संतोष जाहला निजमानसीं । मग प्रहररात्रीं गोमतीसी । रत्नाकर स्नानासि चालिले ॥६९॥ दृष्टी पहावया चमत्कार । क्षेत्रवासी चालिले बरोबर । स्नानासि निघतां वैष्णववीर । तों तीर्थें समग्र तेथें आलीं ॥७०॥ गोमतीसि चढतांचि पाणी । सिकता ते गेली निघोनी । ऐसें कौतुक देखोनि नयनीं । विस्मित मनीं लोक झाले ॥ ७१ ॥ स्नान करितांचि भक्तप्रेमळ । अक्षयी पाणी

१ वाळू.

जाहलें निर्मळ । प्रवाह चालिला सर्वकाळ । कृपेनें घननीळ तुष्टला ॥ ७२ ॥ हें देखोनि क्षेत्रवासी नर । म्हणती हा ईश्वरी अवतार । ऐसे बोलोनियां उत्तर । सद्भावें नमस्कार घालिती ॥ ७३ ॥ मग देउळीं जाऊनि वैष्णवदास । श्रीहरीसि विनवितसे । म्हणे सर्व कर्ता तूं द्वारकाधीश । आज दीधलें यश अनाथासी ॥ ७४ ॥ एक पक्ष राहोनि तये ठायीं । मग स्वस्थळासि चालिले पाहीं । आपुल्या दासाचें शेषशायी । न्यून कदाहीं पडों नेदी ॥ ७५ ॥ आणिक माधवदास वैष्णवभक्त । सुरतेमाजी होते राहत । भजन करीत सप्रेमयुक्त । सगुण मूर्तीतें आठवोनी ॥ ७६ ॥ जयासि आपुलें आणि परावें । समविषम नाहीं ठावें । सर्वभूतीं सारिखा भाव । आत्मवत जीव मानितसे ॥ ७७ ॥ राजा रंक आणि दीन । यांसि लेखीं समसमान । जैसी मृत्तिका तैसें धन । निराश मनें सर्वदा ॥ ७८ ॥ एकादशी हरिजागर । विष्णुअर्चन निरंतर । भक्तीसि लाविले बहुत नर । जगदुद्धार मांडिला ॥ ७९ ॥ दर्शनासि येती भाविकजन । साखर ठेविती पुढें आणून । ते मूठमूठ सकळांकारणें । प्रसाद वांटून देतसे ॥ ८० ॥ शेर आदशेर पावशेर । अदमण अथवा मणभर । जे समयीं जैसी येईल साखर । ते वाटितां मूठभर पुरे सकळां ॥ ८१ ॥ ऐसा चमत्कार पाहोनि नयनीं । लोक आश्चर्य करिती मनीं । म्हणती सर्व सिद्धियाजलागोनी । कर जोडोनी तिष्ठती ॥ ८२ ॥ एक म्हणती सावरीमंत्र । शिकोनि सर्वांसि पुरवितो साखर । एक म्हणती मिथ्याचार । त्याचा ईश्वर साह्यकारी ॥ ८३ ॥ त्रिविध लोक नानारीतीं । कोणी निंदिती कोणी स्तविती । परी माधवदासासि हर्ष खंती । नयेचि चित्तीं सर्वथा ॥ ८४ ॥ म्हणे जनीं जनार्दन भरला हरी । याचा खेद कासया अंतरीं । ऐसें चित्तासि समाधान करी । सप्रेम अंतरी सर्वदा ॥ ८५ ॥ तंव एक कुटाळ होता दुर्मत । त्याणें राख भरिली मडक्यांत । तोंड बांधोनि आपुल्या हातें । हरिमंदिरांत आणितसे ॥ ८६ ॥ माधवदासासि म्हणे तये क्षणीं । साखर आणिली त्यांत भरोनी । हे आपुल्या हातें सोडोनी । सकळां लागोनी वांटावी ॥ ८७ ॥ अवश्य म्हणवोनि वैष्णवभक्त । नैवेद्य दाखवित आपुल्या हातें । साखर काढोनि सर्वांसि देत । तों कुटिळ मनांत अनुतापला ॥ ८८ ॥ लोकांसि सांगतसे स्वमुखें । म्यां मडक्यांत भरोनि आणिली राख । त्याची साखर जाहली देख । हेंचि कौतुक वाटतें ॥ ८९ ॥ मग पश्चात्तापें करोनि मनीं । नमस्कार घालीत प्रीतीं करूनी । म्हणे । माझा अपराध क्षमा करोनी । निरंतर चरणीं ठेविजे ॥९०॥ ऐसी ग्लांती करोनि पाहीं । झाला स्वामीचा संप्रदायी । प्रपंचभान टाकोनि सर्वही । भक्तीसि पाहीं लागला ॥९१॥ ऐसें कौतुक देखोनी । आश्चर्य करिती अवघे जन । मग गांवींचा राजा त्याजलागुन । वर्तमान जाऊन सांगती ॥ ९२ ॥ तोही परम होता खळदुर्जन । सत्य न भासे त्याजकारणें । मग डेऱ्यांत महासर्प घालोन । तोंड बांधोन ठेवितसे ॥ ९३ ॥ माधवदासासि पाठवूनि भृत्य[१] । बोलावूनि आणिला मंदिरांत । भुजंग घातला डेरियांत । तो पुढें ठेवित

१ सेवक.

आणोनियां ॥ ९४ ॥ म्हणे तुमचे हातची घ्यावी साखर । ऐसी इच्छा वाटती फार । तरी आपुल्या हातें वांटा सत्वर । इतुकें नृपवर बोलिला ॥ ९५ ॥ कृत्रिमभाव रचिला याणी । हें विष्णुभक्त नेणेचि स्वप्नीं । मडकें सोडीत तये क्षणीं । तों साखर नयनीं दिसतसे ॥ ९६ ॥ श्रीहरीसि नैवेद्य दाखवून । मूठ मूठ वांटीत सकळांकारणें । ऐसा चमत्कार देखोन । राजा मनीं अनुतापला[1] ॥ ९७ ॥ विष्णुभक्तासि नमस्कार । सद्भावें घालीत नृपवर । पूजा करोनि सर्वोपचार । वस्त्रें अळंकार लेववी ॥ ९८ ॥ शिबिकेंत बैसवोनि माधवासी । नेऊनि घालीत विष्णुमंदिरासी । म्हणे कांहीं इच्छा असेल मानसीं । तरी ते मजपासीं सांगिजे ॥ ९९ ॥ ऐकोनि म्हणे वैष्णव भक्त । कांहींच इच्छा नसे मनांत । सकळ पदार्थ नाशवंत । संग्रह व्यर्थ कासया ॥ १०० ॥ निष्काम देखोनि मन । मग घरासि गेला नृपनंदन । प्रतिष्ठा बहुत वाढली जाण । मग द्वारकेसि गमन करीतसे ॥ १ ॥ परी दैव न सोडिच निश्चिती । सवें यात्रा निघाली बहुत । भजन करीत प्रेमयुक्त । पंथ क्रमित तेधवां ॥ २ ॥ पुढें महाअरण्य देखिलें दृष्टीं । तेथें महावृक्षांची जाहली दाटी । तों व्याघ्राच्या रूपें जगजेठी । प्रकट दृष्टीं दिसतसे ॥३॥ दृष्टीसि देखोनियां पंचानन । भयें कांपती सकळ जन । जीवाचें भय वागवून । गेले पळोन तेधवां ॥ ४ ॥ माधवदासाचा सप्रेमभाव । सर्वांभूतीं एकचि देव । व्याघ्रा सन्मुख घेतली धांव । भक्त वैष्णव चालिला ॥ ५ ॥ जीवाचें भय धरोनि अंतरीं । आड लपाले यात्रेकरी । एकांत देखोनि ते अवसरीं । मग काय करी जगदात्मा ॥ ६ ॥ व्याघ्राचा वेष टाकोनि निश्चितीं । चतुर्भुज रूप धरीत श्रीपती । दिव्य कुंडलें कानीं तळपती । पीतांबराची दीप्ती पडतसे ॥ ७ ॥ विष्णुचें ध्यान श्रीभागवतीं । व्यासें वर्णिलें जैशा रीतीं । माधवदास सगुण मूर्ती । तैशाच रीतीं पाहतसे ॥ ८ ॥ निजभक्तासी हृदयकमळीं । आलिंगूनि धरितसे वनमाळी । मग मिठी घातली चरण कमळीं । आनंद मेळीं बैसले ॥९॥ ब्रह्मानंद न समाये अंतरीं । म्हणे व्याघ्ररूप कां धरिलें हरी । तामस सोंग त्वां धरिलें वरी । मग यात्रेकरी पळाले ॥ ११० ॥ मग देव तयासि उत्तर देत । भेटीसि पाहिजे एकांत । यास्तव व्याघ्ररूप धरोनि निश्चित । अधीर जनांतें पळविलें ॥ ११ ॥ तूं तरी निधडा वैष्णववीर । प्रेमें भजसी निरंतर । मग मी सांडोनि द्वारकापुर । मार्गावर भेटलों ॥ १२ ॥ तरी आतां ऐक निजभक्तराया । परतोनि जावें आपुल्या ठाया । आज्ञा नाहीं द्वारकेसि यावया । पाळी माझिया वचनास ॥ १३ ॥ तुझा सद्भाव देखोनि अंतरीं । येथेंचि प्रगट जाहलों मी हरी । भेट दीधली मार्गावरी । आतां जा माघारीं परतोनियां ॥ १४ ॥ ऐसें वदोनि रुक्मिणीरमण । तत्काळ पावले अंतर्धान । कीं निजभक्ताचें हृदयभुवन । ते स्थळीं जावोन सुरवाडले ॥ १५ ॥ इकडे देह लोभ धरोनि अंतरीं । पळोनि गेले यात्रेकरी । दूर लपाले पर्वतावरी । त्यांसि श्रीहरी अंतरला ॥ १६ ॥ सोडितां वैष्णवाची संगती । तयासि भेटे रुक्मिणीपती । परम भय पावोनि चित्तीं । मग काय बोलती परस्परें ॥ १७ ॥ व्याघ्रें मारिला

१ पश्चात्ताप पावला.

माधवदास । देवें रक्षिलें आपणास । एक म्हणती पाहवें त्यास । तरी मृत्यु आपणास येईल ॥११८॥ तों माधवदास ते अवसरीं । यात्रेकऱ्यांसि
हाका मारी । म्हणे व्याघ्र पळोनि गेला दुरी । तुम्ही सत्वरी या आतां ॥ १९ ॥ ऐकोनि विस्मित सकळजन । म्हणती कैसा वांचला
त्यापासून । एक म्हणती त्याजकारणें । साह्य श्रीकृष्ण असे कीं ॥ १२० ॥ डेरियांत सर्प घातला थोर । त्याची त्याणें केली साखर ।
त्याचें काय करील व्याघ्र । परस्परें बोलती ॥ २१ ॥ ऐसें म्हणवोनि तये वेळ । पातले माधव दासाजवळ । व्याघ्र नव्हेचि तो घननीळ ।
भक्त प्रेमळ सांगतसे ॥ २२ ॥ संगती म्हणती जोडुनि कर । वृत्तांत सांगावा सविस्तर । ऐकोनि म्हणे भक्त चतुर । तें नये साचार
बोलतां ॥ २३ ॥ कासव पिलियांसि तत्त्वतां । कृपेनें पाहे तयांची माता । तयासि अनुभव आणिकें पुसतां । परी मुखें सांगतां नये
कीं ॥ २४ ॥ कां बाळकासि साखर चारितां बरवी । अंतरीं तयासि कळतसे चवी । परी मुखें सांगतां नये कांहीं । जाणे अनुभवी
चित्तांत ॥ २५ ॥ चातक चंद्रामृत सेविती । तेणेंचि तयांसि होतसे तृप्ती । त्यासि इतर पक्षी अनुभव पुसती । तरी सांगतां रीती ते
नये ॥ २६ ॥ तेवीं श्रीहरीकृपेचें महिमान । जाणती भाविक प्रेमळ जन । आजि श्रीहरीनें दिधलें दर्शन । अनुभव जाणें मीच माझा
॥ २७ ॥ पुढें द्वारकेसि जावया पाहीं । मज श्रीहरीची आज्ञा नाहीं । ऐसें सांगोनि ते समयीं । सुरतेसि लवलाहीं चालिले ॥ २८ ॥
यात्रा गेली द्वारकापुरा । माधवदास सत्वर पातले घरा । भजनीं प्रेमा लावोनि बरा । जगदुद्धारा आठविती ॥ २९ ॥ विष्णुपूजन
हरिकीर्तन । भक्तीसि लाविले बहुतजन । विश्वोद्धार करावया पूर्ण । वैष्णवजन अवतरले ॥ १३० ॥ आतां विठ्ठल पुरंदर निष्ठावंत ।
बेदर प्रांतांत होते राहत । त्यांचें चरित्र अतिअद्भुत । ऐका निजभक्त भाविकहो ॥३१॥ पुत्रकलत्र असती त्यास । परी संसारीं असोनि
उदास । पांडुरंगाची उपासना असे । तोचि निदिध्यास लागला ॥ ३२ ॥ संसार धंदा करितां जाण । सर्वकाळ विठ्ठलाचें चिंतन । असत्य
सर्वथा न बोले वचन । दया परिपूर्ण सर्वांभूतीं ॥ ३३ ॥ समयीं आलिया अतिथी । अन्न देतसे यथाशक्ती । दुर्बळ संसार बहुतांरीतीं ।
परी सत्वशींळ चित्तीं सर्वदा ॥ ३४ ॥ आषाढी कार्तिकी यात्रेसीं । जात असे पंढरीसी । नेमें वारी धरिली ऐसी । निश्चय मानसीं दृढ
त्याचा ॥ ३५ ॥ तंव कोणे एके अवसरीं । पातली कार्तिकीची वारी । विठ्ठल पुरंदरासि शरीरीं । नवज्वर सत्वरी जाहला ॥ ३६ ॥
तेणें जर्जर जाहली काया । शक्ति नाहींच चालावया । म्हणवोनि आठवीत पंढरीराया । म्हणे कोणत्या उपाया करूं आतां ॥ ३७ ॥
पंढरीसि जावोनि एकवेळे । देहाचें पडावें मोटळें । यास्तव करीतसे तळमळ । त्रितापें जळे शरीर हें ॥ ३८ ॥ निद्रा न लागे करितां
शयन । पंढरीसि लागले पंचप्राण । म्हणे यात्रेसि उदेलें महाविघ्न । दुरितें करून आपल्या ॥ ३९ ॥ तीन दिवस तीन राती ।
तळमळ केली ऐशा रीतीं । परी सर्वथा अरोग्य नव्हे कांती । मग विचार चित्तीं दृढ केला ॥ १४० ॥ म्हणे हें नाशिवंत

शरीर आहे । याचा भरंवसा मानितां पाहे । अंतरतील विठोबाचे पाय । मग जीवित्व काय ठेवोनी ॥ ४१ ॥ मरणचि आलें असेल जर । तरी घरीं निजतां न होय अमर । आतां येवोनि निघावें सत्वर । मग जे होणार तें हो सुखें ॥ ४२ ॥ ऐसा निश्चिय करोनि थोर । चालिला विठ्ठल पुरंदर । सवें कोणीच नसे दुसरें । मग कांता बरोबर निघाली ॥ ४३ ॥ अश्व पाठाळ नसोचि कांहीं । ज्वरही बहुत वाढला देहीं । पाऊल टाकितां ते समयीं । प्राणांत जीवीं होतसे ॥ ४४ ॥ ऐशा रीतीं पंथ क्रमितां । दोन मजली आलीं उभयतां । मग रात्रीं जवळ बैसोनि कांता । प्राणनाथा पाहतसे ॥ ४५ ॥ तों शरीरीं जाळ बहुत असे । परी उत्तर न बोलवेचि तयास । प्राण होतसे कासाविस । देहभान नसे सर्वथा ॥ ४६ ॥ ऐसी अवस्था देखोनि तिनें । मग अट्टाहासें करीत रुदन । म्हणे याचें उत्तम न दिसे चिन्ह । रुक्मिणीरमण कोपला ॥ ४७ ॥ तंव भ्रतार सावध होऊनि किंचित । कांतेलागीं उत्तर बोलत । मज बाजेवरी घालोनि त्वरित । पंढरीनाथ दाखवी ॥ ४८ ॥ चार मोलकरी पाहोनि सत्वर । शरीर घालावें खाटेवर । दृष्टीसीं पाहतां पंढरपुर । मग पडेल उतार शरीरासी ॥ ४९ ॥ ऐकोनि पतीचें उत्तर । कांता जाहली चिंतातुर । पदरीं ऐवज नसे तिळभर । कैसा विचार करावा ॥ १५० ॥ वाटखर्चीस ऐवज नाहीं । आणि मोलकऱ्यांसि द्यावें कायी । ऐसें म्हणवोनि ते समयीं । चिंता जीवीं करीतसे ॥ ५१ ॥ कांहीं उपाय न सुचेचि तेव्हां । मग पांडुरंगाचा मांडिला धावा । म्हणे पंढरीनाथा देवाधिदेवा । पाव केशवा मज आता ॥ ५२ ॥ तूं अनाथबंधु करुणाघन । ऐसें बोलती संतसज्जन । नाममात्रें निरसिसी विघ्न । तें असत्य वचन होईल ॥ ५३ ॥ मागें राहिलें निजमंदिर । आणि चार मजली पंढरपुर । ज्वरें व्यापिला निजभ्रतार । कैसा विचार करूं देवा ॥ ५४ ॥ हे ना तैसी जाहलीपरी । रुक्मिणीकांता धांव श्रीहरी । विठ्ठल पुरंदर तुझा निर्धारीं । वारकरी म्हणवितो ॥५५॥ ऐशा रीतीं तें भामिनी । रुदन करीतसे तये क्षणीं । तिचा धांवा ऐकोनि कानीं । चक्रपाणी पावले ॥ ५६ ॥ ऐवट कुणबी होऊनि श्रीहरी । तिच्या बिऱ्हाडासि येतसे सत्वरीं । म्हणे बाई कथीं कां होतीस अंतरीं । सांग लवकरी मजपाशीं ॥ ५७ ॥ ती म्हणे बापा ऐक वचन । भ्रतार व्यथित होता जाण । दोन मजली आला चालोन । परी आतां निदान मांडिलें ॥५८॥ ज्वरें शरीर व्यापिलें भारी । पुढें न चाले पाऊलभरी । यात्रा निघोनि गेली दुरी । उपाय तरी सांग आतां ॥५९॥ ऐसा वृत्तांत ऐकोनि सत्वर । काय म्हणती सारंगधर । आमुचें गांव पंढरपुर । जाणें सत्वर मज तेथें ॥१६०॥ आणिक तिघे सांगाती जाण । बाहेर उतरले ते आपण । आम्हीं तुझा शब्द ऐकोन । आलों धांवोन पाहावया ॥ ६१ ॥ तुझा भ्रतार बैसवोनि डोलींत । नेवोनि घालूं पंढरींत । आतां न होवोनि चिंताक्रांत । स्वस्थ मनांत असावें ॥ ६२ ॥ ऐसें बोलतां करुणाकर । चित्तीं आश्चर्य वाटला फार । म्हणे एवढा करिसील परोपकार । तरी पुण्य अपार घडे लोकीं ॥ ६३ ॥ प्रातःकाळ होतांचि

जाण । लाघव करीतसे जगज्जीवन । आपणाचि चार रूपें धरून । डोली घेवोन पातलें ॥ ६४ ॥ विठ्ठल पुरंदरासि बैसवोनि आंत । खांदा घेतसे रुक्मिणीकांत । निज भक्ताचा भार समस्त । मस्तकीं धरीत जगदात्मा ॥ ६५ ॥ अष्टांग योग साधितां हटीं । परी लोकरी न पडेचि त्यांच्या दृष्टीं । तों भक्ताचा भार घेतसे जगजेठी । नवल पोटीं मज वाटे ॥ ६६ ॥ नाना याग तपें व्रतें । करितां नातुडे जगन्नाथ । तो भाविकाचें काम अंगें करित । अनाथनाथ दीनबंधु ॥ ६७ ॥ जो कां निर्गुण निर्विकार । श्रुतिशास्त्रांसि नकळेचि पार । तो सगुणरूप धरोनि साकार । वागवितसे भार भक्ताचा ॥ ६८ ॥ सृष्टींकर्ता जो विधाता । श्रीहरी तयाचा जनिता । तो मनुष्यरूपें विश्वपिता । बैसवीत निजभक्ता खांद्यावरी ॥ ६९ ॥ योगमाया स्मरोनि चित्तीं । लाघव दाखवितसे श्रीपती । ऐक्याचि वेळे पंढरीसि येती । जातां गभस्ती अस्तमाना ॥ १७० ॥ तो चंद्रभागेच्या तीरीं निश्चित । यात्रा उतरली असे बहुत । विठ्ठलनामें गर्जती संत । कीर्तनीं डुलत निजप्रेमें ॥ ७१ ॥ तो घोष ऐकोनियां श्रवणीं । विठ्ठल पुरंदर संतोषे मनीं । जेवीं आयुष्य हीनाचिये श्रवणीं । संजीवनी मंत्र जोडे ॥ ७२ ॥ प्रेमळ भाविक वैष्णवजन । करितां नामसंकीर्तन । दिंड्या पताका उभारून । संभ्रमें करून मिरवती ॥ ७३ ॥ ऐशा क्षेत्रामाजि निश्चित । डोली उतरली वैकुंठनाथें । मग पालकांच्या आणोनि देत । सर्व साहित्य तें केलें ॥ ७४ ॥ मग देउळीं जावोनि रुक्मिणाकांत । आपुलें तीर्थ आणोनि देत । विठ्ठल पुरंदराच्या मुखीं घालित । तों उतार किंचित पडियेला ॥ ७५ ॥ मग उभयतां स्त्रीपुरुषां धरोनि करीं । देउळीं नेतसे ते अवसरीं । आपुलें दर्शन करवीतसे हरी । नारळ करीं देवोनियां ॥ ७६ ॥ दृष्टीमीं देखतां घनसांवळा । अश्रुपात वाहती डोळां । प्रेमें सद्गदित जाहला गळा । मग आलिंगून धरिला दोहीं बाहीं ॥ ७७ ॥ चरणीं मस्तक ठेवोनि पाहे । म्हणें दैवयोगें देखिले पाय । चित्तीं आनंद न समाये । सद्गदित होय निजप्रेमें ॥ ७८ ॥ मग राही सत्यभामा रुक्मिण । यांचेंही घेतलें दर्शन । कीर्तन करिती संतसज्जन । त्यांचेही दर्शन करविलें ॥ ७९ ॥ बिऱ्हाडासि आणोनि तत्वतां । बैसविलीं पुरुषकांतां । म्हणें घरानि जावोनि आतां । प्रातःकाळ होता येईन ॥ १८० ॥ ते म्हणती तुझें नांव कायी । तें सांगोनि द्यावें लवलाहीं । तुझें व्हावया उतरायी । पदार्थ कांहीं दिसेना ॥ ८१ ॥ यावरी म्हणे वनमाळी । माझें नाम पांडुरंगकोळी । मुलें माणसें आहेत सकळीं । येच स्थळीं राहतसें ॥ ८२ ॥ विठ्ठल पुरंदर म्हणे त्यातें । आम्ही आषाढीकार्तिकीस येतसों येथें । तेव्हां स्मरण धरोनि चित्तांत । भेटी आम्हातें देईजे ॥ ८३ ॥ ऐसें ऐकोनि जगन्निवास । काय म्हणतसे तयांस । मी तुमच्या सन्निध सर्वदा असें । परी ओळख तुम्हास नसे माझी ॥ ८४ ॥ जेव्हां स्मरण कराल अंतरीं । मी सत्वर येईन ते अवसरीं । ऐसें म्हणवोनि श्रीहरी । गेले सत्वर तेथवां ॥ ८५ ॥ ऐसा सात दिवस उत्साह जाहला । पौर्णिमेस पाहिला गोपाळ काला । शक्ति आली शरीराला । अरोग जाहला निजभक्त

॥ ८६ ॥ उभयतां देउळीं जाऊन । घेतलें पांडुरंगाचें दर्शन । सजळ अश्रु भरलें लोचन । देवासि पुसोनि चाललीं ॥ ८७ ॥ पुंडलिकासि पुसोनि जाणा । घातलीं क्षेत्रप्रदक्षिणा । पांडु कोळियाचा उपकार जाणा । क्षणक्षणा आठवे ॥ ८८ ॥ स्मरण करितां निजअंतरीं । त्याचरूपें प्रगट जाहले श्रीहरी । बोळवीत जातसे ते अवसरीं । वैकुंठविहारी जगदात्मा ॥ ८९ ॥ मग विठ्ठल पुरंदर म्हणे त्यासी । आम्हांसि भेटावें आषाढ मासीं । अवश्य म्हणे हृषीकेशी । अगत्य पंढरीसी तुम्ही यावें ॥ १९० ॥ ऐशा रीतीं बोलोनि त्यातें । परतोनि आले राउळांत । निजभक्ताचा होऊनि अंकित । कौतुक दावित नानारीतीं ॥ ९१ ॥ मग विठ्ठल पुरंदर ते अवसरी । कांतेसहित पातलें घरीं । ध्यानींमनीं बैसला श्रीहरी । आठवे पंढरी क्षणक्षणा ॥ ९२ ॥ खातांपितां गमन करितां । निजतां बैसतां विश्रांति घेतां । प्रपंच धंदा काम करितां । पंढरीनाथा भजतसें ॥ ९३ ॥ विठ्ठलस्मरण करितांचि प्रीतीं । तदाकारचि जाहली वृत्ती । आषाढमासी पंढरीसि मागुतीं । आनंदयुक्त येतसे ॥ ९४ ॥ पंढरीसि येवोनि तयेवेळीं । उभयतां धुंडिती पांडुरंग कोळी । ठावठिकाण पाहतां सकळीं । तया काळीं दिसेना ॥९५॥ म्हणे माझे जीवींचा प्राणमित्र । वागवोनि आणिलें खांद्यांवर । तो पंढरी टाकोनि गेला दूर । म्हणवोनि साचार न भेटे ॥ ९६ ॥ स्त्रीपुरुष दोघेजण । क्षेत्रांत पाहती धुंडोन । परी कोठें नलगेचि ठिकाण । तों गेलासे दिन अस्तमान ॥ ९७ ॥ प्रहर रात्र लोटून जातां । तोंवरी उपवासी उभयतां । संकट पडिलें पंढरीनाथा । म्हणे दर्शन आतां यांसि द्यावें ॥ ९८ ॥ मग साक्षात रूप धरोनि सगुण । तयासि दीधलें दर्शन । म्हणे पांडुरंग कोळी मीच होऊन । आणिलें उचलोनि तुजलागीं ॥ ९९ ॥ दृष्टींसीं देखोनि कैवल्यदानी । परम संतोष जाहला मनीं । देवासि आलिंगन देऊनी । मिठी चरणीं घातली ॥ २०० ॥ मग विठ्ठल पुरंदर देवासि म्हणे । नाशवंत शरीर हें जाय जेणें । तुवां खांद्यावरीं आणिलें वागवून । काय उत्तीर्ण तुझें होऊ ॥ १ ॥ ऐकोनि म्हणती पांडुरंग । नाशवंताचा करितां त्याग । तरी अविनाश कैसें जोडेल मग । ऐसें सांग मजलागीं ॥ २ ॥ तुवां काया वाचा आणि मनें । मजसीं लाविलें अनुसंधान । तरी आतां पाकनिष्पत्ती करून । भोजन करणें सत्वर ॥ ३ ॥ साधुसंतांचें माहेर पंढरी । तीर्थ उपवास नसे ये क्षेत्रीं । ऐसें सांगोनि श्रीहरी । राउळांतरीं[1] मग गेले ॥ ४ ॥ जयाचें चित्तीं जैसा भाव । तैसा होतसे देवाधिदेव । निजभक्ताच्या संकटास्तव । अपूर्व लाघव दाखविलें ॥ ५ ॥ जीवासि पडतां जड भारी । जो नेमासि न टळे निर्धारीं । तयासि दर्शन देतसे हरी । इतरांसि नेत्रीं दिसेना ॥ ६ ॥ दुर्योधन छळितां पांडवांस । तयासि पातला वनवास । परी ते न सांडिती सत्वास । चित्तीं कृष्णपरेश आठविती ॥ ७ ॥ दरिद्रें सुदामा ब्राह्मण । बहुत पीडिला असे जाण । परी तो आठवी श्रीहरीचे चरण । दरिद्र विच्छिन्न मग झालें ॥ ८ ॥ प्रल्हादासि पिता नानाप्रकारें । गांजितां भजनासि न पडे अंतर । निश्चय देखोनि सारंगधर । खांबांत सत्वर प्रगटले ॥ ९ ॥ असोत आतां भाषणें फार । ज्वरें तापलें असतां

[1] देवळांत.

शरीर । यात्रेसि निघाला पुरंदर । म्हणवोनि रुक्मिणीवर भेटले ॥ २१० ॥ पुढिले अध्यायीं चरित्र गहन । श्रोतीं देइजे अवधान । महीपतीचीं आर्प वचनें । सज्जनीं मान्य करावीं ॥ ११ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । अठ्ठेचाळिसावा अध्याय रसाळ हा ॥ २१२ ॥ अध्याय ॥ ४८ ॥ ओव्या ॥ २१२ ॥



अध्याय ४९



श्रीगणेशाय नमः । अनंत अपार घनसांवळा । असंख्यात असती त्याच्या लीला । ज्याच्या रोमरंध्रीं सकळा । ब्रह्मांड माळा सांठती ॥ १ ॥ चंद्र आणि रविमंडळ । हें जयाचें नेत्र युगुळ । एकवीस स्वर्ग सप्त पाताळ । यांहोनि विशाळ जगदात्मा ॥ २ ॥ वेदत्रयांचा घोर जाण । विधाता बाळक निपजलें सान । चराचर अवघेंचि निर्मिलें त्याणें । परीपार नेणें श्रीहरीचा ॥ ३ ॥ हें विराटस्वरूप आणितां ध्यानीं । तरी निजभक्तासि नकळेचि मनीं । मग पंढरीसि सगुणरूप धरोनी । कैवल्यदानी उभा असे ॥ ४ ॥ ठाण साजिरें सुकुमार । समपद ठेविले विटेवर । जघनीं शोभती दोन्हीकर । श्रीमुख मनोहर जयाचें ॥ ५ ॥ भाविक प्रेमळ देखोनी दृष्टीं । तयांसि तत्काळ देतसे भेटी । तुळसी माळा शोभती कंठीं । नासाग्रीं दृष्टी धरियेली ॥ ६ ॥ हा पुंडलीकें थोर उपकार केला । भूतळामाजी देव आणिला । विठ्ठल नाम ठेविलें त्याला । विश्वोद्धार जाहला यास्तव ॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा सुंदर । परमभक्त विठ्ठल पुरंदर । देवें त्यासि घेवोनि खांद्यावर । पंढरपुर दाखविलें ॥ ८ ॥ आतां नरसिंह सरस्वती महासंत । तो दत्तात्रेय अंश मूर्तिमंत । विश्वोद्धार करावया सत्य । अवतरे निश्चित नररूपें ॥ ९ ॥ साक्षर एक होता ब्राह्मण । तयासि नव्हतें पुत्रसंतान । त्याच्या पोटीं अत्रिनंदन । पूर्वपुण्यें अवतरले ॥ १० ॥ पुत्रमुख पाहतां नयनीं । विप्रसंतोष पावला मनीं । स्वरूपें सुंदर सुलक्षणी । देखोनि जननी सुखावे ॥ ११ ॥ बारा दिवस लोटतां जाण । नरसिंह ठेविलें नामाभिधान । पांचवे वर्षीं व्रतबंध करून । तयासि अध्ययन सांगती ॥ १२ ॥ एकदा ग्रंथ विलोकित । तो तयासि होय मुखोद्गत । देखोनि ब्राह्मण आश्चर्य करित । विशाळ म्हणत बुद्धि याची ॥ १३ ॥ एक म्हणती अंगिरानंदन । लीलावतारी जाहला सगुण । एक म्हणती द्वैपायन । आम्हां कारणें भासत ॥ १४ ॥ त्याच्या साम्यतेसि निश्चितीं । दुसरा ब्राह्मण न दिसेचि क्षितीं । जिव्हाग्रीं बैसली सरस्वती । नांव ठेविती तेंचि मग ॥ १५ ॥ नरसिंह सरस्वती म्हणवोनी । नामाभिधान बोलती जनीं । पितयासि संतोष वाटे मनीं । प्रज्ञा देखोनी पुत्राची ॥ १६ ॥ आठा वरुषांत येतांचि जाण । वेदवेदांतीं दिसे निपुण । मुखोद्गत सकळ पुराणें । जैसा अपसूर्य ब्राह्मण दिसतसे ॥ १७ ॥ मातापितयांची नधरीच आर्ती । सर्वकाळ विदेहस्थिती । भजन करी एकांतीं । अरण्यपंथीं जावोनियां ॥ १८ ॥ हास्यविनोद कोणाप्रती । मुखें न बोले वचनोक्ती । क्षुधातृषेची करी न आर्ती । निर्विषय मती तयाची ॥ १९ ॥ ऐसीं चिन्हें त्याचीं उमटतां । चिंतातुर मातापिता । म्हणती पुत्र जाहला नवस करितां । परी विदेही अवस्था तयाची ॥ २० ॥ अरण्यांत जावोनि एकांतीं । बैसत असे अहोरात्रीं । लग्न करावें कैशा रीतीं । विपरीत स्थिती दिसतसे ॥ २१ ॥ नवस सायास करितां फार । देवें आपणासि दीधला पुत्र । त्याचें विपरीत दिसे चरित्र । कैसा विचार करावा ॥ २२ ॥ तंव कोणें एके दिवसीं जाण । स्वमुखें पितापुत्रासि म्हणे । तूं एकांतीं बैसतोसि जाऊन । न घालिसी मन संसारीं ॥ २३ ॥

तों पुत्र उत्तर देतसे देखा । संसार शब्द हाचि लटिका । जेवीं वांझेचिया लेकां । जन्मपत्रिका ते कैंची ॥ २४ ॥ का मृगजळाचा दिसे समुद्र । तयावरुतें जहाज फिरे । स्वप्नींचें धन साचार । सांठविलें त्यामाजी ॥ २५ ॥ तेवीं संसारशब्द मिथ्यामय । याची क्षीत मानितोसि काय । तूं आत्मस्वरूप विचारूनि पाहे । तेणें सार्थक होय जन्माचें ॥ २६ ॥ ऐसी नरसिंहसरस्वती । पितयासि बोले वचनोक्ती । परी तें नये त्याच्या चित्तीं । पडिली भ्रांती देहलोभें ॥२७॥ आंधळ्यासि आरसा दाखवितां देख । तयासि न दिसे आपुलें मुख । कां बधिरासि गायनाचें सुख । वाटेल नावेक कैसेनी ॥२८॥ तेवीं योगमायेचें पडळ जाण । जयाच्या नेत्रासि बैसलें ढांपण । तयासि नावडे आत्मसाधन । प्रपंचीं निमग्न सर्वदा ॥ २९ ॥ याची स्थिति देखोनी ऐसी । मग पुत्र म्हणतसे पितयासी । आतां आज्ञा द्यावी मजसी । वाराणसीसी जावया ॥३०॥ ऐकोनि पुत्राचें उदास वचन । अश्रुपातें भरले लोचन । म्हणे आम्हांसि नसतां संतान । जातोसि टाकोन कैशारीतीं ॥ ३१ ॥ दुसरा पुत्र असता जर । तरी तुज आज्ञा देतों सत्वर । वार्धकदशा आली फार । कंठूं संसार कैशा रीतीं ॥ ३२ ॥ ऐकोनि पितयाचें उत्तर । काय बोले योगेश्वर । तुम्हांसि दोन होतील पुत्र । चिंता अणुमात्र करूं नका ॥ ३३ ॥ आणिक एक कन्या सुलक्षणी थोर । सुशीळ आणि परमपवित्र । करील वंशाचा उद्धार । सत्य उत्तर हें माझें ॥३४॥ ऐसा वर वदोनि त्यांसी । नमस्कारी मातापितयासी । मग तो जावोनि वाराणसीं । झाला संन्यासी श्रीपाद ॥ ३५ ॥ सांडोनि दंडकमंडलूस । तत्काळ जाहला परमहंस । क्षेत्रवासी मान्य करिती त्यास । प्रज्ञा विशेष देखोनी ॥ ३६ ॥ त्याचें दर्शन होतांचि देख । भक्तीसि लागती संसारिक । दैवी संपत्तीनें वर्तती लोक । गुण सात्विक होय त्यांचा ॥ ३७ ॥ आणिक वैराग्यशीळ ज्ञानी विरक्त । शिष्य जाहले तीन शत । एक संवत्सर राहिले तेथ । प्रतिष्ठा बहुत वाढली ॥ ३८ ॥ यास्तव उदास होऊनि मनें । मग स्वदेशासि येती परतोन । जो अनन्यभावें येतसे शरण । तरी अनुग्रह देणें तयासीं ॥ ३९ ॥ ऐसे संप्रदायी जाहले बहुत । गणती पाहतां शतें सात । सर्व धेवोनि तितुकियांत । स्वदेशांत मग आले ॥ ४० ॥ थोर बंड माजलें निश्चिती । दर्शनासि लोक दुरून येती । बहुतांजनांसि लाविली भक्ती । पुण्यमूर्ती ते झाले ॥४१॥ अष्टसिद्धि सकळ दासी । इच्छिले पदार्थ अनुकूळ त्यासी । परी दुर्बळें पाचारितां भिक्षेसी । त्याच्या आर्तीसी पुरवीतसे ॥ ४२ ॥ ऐशा रीतीं क्रमितां पंथ । गाणगापुरासि आले त्वरित । मग सकळ शिष्यांसमवेत । वास्तव्य तेथें पैं केलें ॥४३॥ तेथें अमरजा गंगा वाहे जाण । तिच्या तीरीं करिती स्नान । दर्शनासि दुरूनि येती जन । अद्भुत महिमान वाढलें ॥ ४४ ॥ तंव क्षेत्रवासी धरामर[1] । महापंडित वैदिक विप्र । स्वामीचा महिमा ऐकोनि थोर । वारंवार निंदिती ॥४५॥ म्हणती गृहस्थाश्रम केलियाविण । त्यानें घेतलें संन्यासग्रहण । आणि दंड बहिर्वासही टाकून । जनांत नग्न फिरताती ॥ ४६ ॥ सकळ धर्म त्यजिला पर । अन्न लागतें

[1] ब्राह्मण.

गोळाभर । अवघे मिळोनि धरामरं । म्हणती पुसावें सत्वर तयासी ॥ ४७ ॥ स्वामींचें करावया छळण । चालिले पांचशत ब्राह्मण । तों देवें कौतुक मांडिलें पूर्ण । अद्भुत प्रभंजनें सोडिला ॥ ४८ ॥ धुळी उडतांचि निराळीं । कोणासि शुद्धि नाहीं राहिली । अवघींच वस्त्रें उडोनि गेली । नग्न जाहले दिगंबर ॥ ४९ ॥ पांचशत होते ब्राह्मण । तितुकेही अवघे दिसती नग्न । एकाकडे एक पाहून । लज्जायमान ते होती ॥ ५० ॥ वृद्ध तरुणवय निश्चितीं । आपुल्या हातें लिंगें झांकिती । कोणी न हांसे कोणाप्रती । एकचि गती सकळांची ॥ ५१ ॥ ऐसा चमत्कार देखोन । मग पश्चात्ताप जाहला सकळांकारणें । म्हणे स्वामींसि निंदिलें आपण । त्याचें कारण हें दिसे ॥५२॥ आतां परतोनि जातां घरासी । तरी आपुल्यास हांसती क्षेत्रवासी । म्हणतील कोणें नागविलें तुम्हांसी । तरी काय तयांसी सांगावें ॥ ५३ ॥ कर्मांची विचित्र गति जाण । लोकांत जाहलें लाजिरवाणें । एक म्हणती सांडोनि अभिमान । स्वामींसि शरण जाऊं आतां ॥ ५४ ॥ जेथें नरसिंह सरस्वती । तेथें पातले सत्वर गती । परम सद्भाव धरोनि चित्तीं । स्वमुखें स्तुती करिताती ॥५५॥ जयजयाजी परब्रह्म मूर्ती । अवधूतरूपें अवतार क्षिती[3] । तुझा महिमा वदतां निश्चितीं । कुंठित श्रुती जाहल्या ॥५६॥ मध्यान्हीं थुंकतां भानूंवरी । तों शिंतोडे पडती आपुलेचि शिरीं । तैसी आम्हासि जाहली परी । तरी क्षमा करीं अपराध ॥ ५७ ॥ ऐकोनि ब्राह्मणांची ग्लांती । स्वामींसि दया उपजली चित्तीं । मग सिद्धींसि आज्ञा सत्वर करिती । नूतन वस्त्रें देती तयां ॥ ५८ ॥ ऐसा चमत्कार देखोन । नमस्कार करिती सकळ ब्राह्मण । मग स्वामींसि आज्ञा मागोन । आपुलालें स्थान पावले ॥५९॥ तैं पासोनि ते धरामर । द्वेष न करिती अनुमात्र । तों आणिक एक वर्तलें चरित्र । तें ऐका सादर भाविकहो ॥ ६० ॥ शिष्यसंप्रदायासि न कळत । स्वामी उठोनि गेले त्वरित । अमरजा तीरीं पाहोनि एकांत । स्नानासि जळांत प्रवेशले ॥ ६१ ॥ बुडी देतांचि साचार । लोटोनि गेल्या घटिका चार । हें कोळियानें देखिलें नेत्रद्वारें । विस्मित अंतर तयाचें ॥ ६२ ॥ म्हणे स्वामींसि उशीर लागला आहे । तरीं जळीं सुसरीनें गिळिलें काय । म्हणोनि जळीं पाहों जाय । तों नवल काय देखिलें ॥ ६३ ॥ जळांत नेत्र उघडोनि पाहत । तों सात अप्सरा असती तेथ । दिव्य मंदिर देखिलें तेथ । पाहतां झांकती नेत्र पातीं ॥ ६४ ॥ त्याणीं स्वामींसि नेऊनि घरीं । पूजा केली सर्वोपचारीं । कोळी पाहतसे नेत्रद्वारीं । उभा बाहेरी राहोनियां ॥ ६५ ॥ षोडशोपचारें झालिया पूजन । स्वामींसि घातलें मिष्टान्न भोजन । मुखशुद्धि विडा घेऊन । मग तयासि पुसोन चालिले ॥ ६६ ॥ मंदिराबाहेर तये वेळीं । येतां दृष्टीसि देखिला कोळी । वर्तमान पुसतांचि सकळी । त्याणें तात्काळीं सांगीतलें ॥ ६७ ॥ मग स्वामी कोळियासि शिकविती । कौतुक देखिलें जे निश्चिती । हा वृत्तांत न सांगावा कोणाप्रति । धन तुज प्रती दाखवितों ॥ ६८ ॥ एक हांडाभर मोहरा होन । दीधले तेव्हां त्याजकारण । मग बाहेर पातले जळांतून । हें कोणाकारणें श्रुत नाहीं ॥ ६९ ॥ धन लाधलें

१ ब्राह्मण. २ वारा. ३ पृथ्वीवर. ४ सूर्यावर.

कोळियासि । परी गोष्ट न टिकेचि तयापासी । म्हणें स्वामींनीं प्रसन्न होऊनि मजसीं । दरिद्र दुःखासी नाशिलें ॥ ७० ॥ आणिक एक दुर्बळ ब्राह्मण । दरिद्रदुःखें पीडिला जाण । घरीं कुटुंबासि न मिळेचि अन्न । परी स्वधीर मन तयाचें ॥ ७१ ॥ तो स्वामीपासीं एकदां येउनी । विनये मस्तक ठेविला चरणीं । हात जोडोनि तयेक्षणीं । अमृतवचनीं बोलत ॥ ७२ ॥ म्हणें कृपाकरोनि अनाथावरी । भिक्षेसि यावें माझे घरीं । अनुकूळ पडेल ते अवसरीं । प्रतिउत्तरीं बोलिले ॥ ७३ ॥ ऐसें ऐकोनि अभयवचन । ब्राह्मण घरासि आला जाण । मग कांतेसि सांगे वर्तमान । स्वामींनीं मान्य केलें असें ॥ ७४ ॥ परी दिवस तिथी नेम कांहीं । ऐसा नेम केला नाहीं । एके दिवसीं वैश्वदेव समयीं । अकस्मात विदेही पातला ॥ ७५ ॥ ब्राह्मणें देखोनि तयाप्रती । परम हर्ष वाटला चित्तीं । सप्रेम नमस्कार करोनि प्रीतीं । पाट देती बैसावया ॥ ७६ ॥ चिंचवणी कण्या ते अवसरीं । पाकनिष्पत्ती जाहली घरीं । म्हणवोनि चिंतातुर अंतरीं । म्हणे कैसी परी करूं आतां ॥ ७७ ॥ अगोदर सूचना असती पाहीं । तरी पदार्थ मेळविला असता कांहीं । स्त्रीपुरुष संकोच करिती जीवीं । मग तयासि विदेही काय म्हणें ॥ ७८ ॥ दूध[1] कण्या भक्षाव्या येथ । ऐसा चित्तीं उपजला हेत । तुहीं म्हैस बांधिली अंगणांत । ते दोहुनि त्वरित आणावी ॥ ७९ ॥ ब्राह्मण म्हणे त्या अवसरा । ती वंध्या म्हैस योगेश्वरा । वर्षे लोटोनि गेलीं बारा । परी गर्भोदरा न धरीच ॥ ८० ॥ स्वामी म्हणती ते अवसरीं । ते आजपासोनि दुभेल घरीं । कधीं न अटेल जन्मवरी । निश्चय अंतरीं असों द्या ॥ ८१ ॥ ब्राह्मण दोहोनि पाहतां सत्वर । दूध निघालें आठ शेर । आश्चर्य करीतसे धरामर । म्हणे हा ईश्वर साक्षात ॥८२॥ बैसोनि नरसिंव्ह सरस्वती । दूधकण्या भक्षिल्या प्रीतीं । मुख शुद्धि तुळसी पत्र देती । मग आज्ञा करिती स्वामी तया ॥ ८३ ॥ उदईक भिक्षेसि येऊं येथ । शिष्य घेऊनि सात शत । आणि क्षेत्रवासी ब्राह्मण समस्त । आमंत्रणें त्यातें देईजे ॥ ८४ ॥ आणि पंचविसां माणसांचें मिष्टान्न । तुवां सत्वर निपजवणें । तितुकें पुरेल सकळांकारणें । उद्वेग मनें न करावा ॥८५॥ ऐसें सांगोनि त्याजकारणें । तेथूनि सत्वर केलें गमन । दुसरे दिवसीं आमंत्रणें । देत ब्राह्मण घरोघरीं ॥ ८६ ॥ ब्राह्मण आश्चर्य करिती सकळ । याच्या कुटुंबासि अन्न न मिळे । आजि कां मांडिले पोर खेळ । ऐसें न कळे सर्वथा ॥ ८७ ॥ असो विविध लोक नानापरी । बोलत असती ते अवसरीं । दोन प्रहर होतांचि सत्वरी । समुदावो घरीं मिळाला ॥ ८८ ॥ सातशें शिष्यां समवेत । स्वामी येवोनि बैसले तेथ । आणि गांवींचे ब्राह्मण पांचशत । अन्न सर्वांतें वाढिलें ॥८९॥ पंचविसांचें वाढिलें अन्न । तितुकेंचि पुरे सकळां कारणें । हें स्वामीचें कर्तृत्व म्हणवोन । सकळ ब्राह्मण बोलती ॥ ९० ॥ पंक्ति उठतांचि ते वेळां । विडे दाक्षिणा दीधली सकळां । म्हणती योगेश्वराची अगाध लीला । कौतुक डोळां दाखविती ॥ ९१ ॥ घरीं उरलें होतें अन्न । तें इतर यातींस[2] वांटिलें त्याणें । त्याचें दरिद्र जाहलें विच्छिन्न[3] । झालासे धन संसारी ॥ ९२ ॥ आणखी एक रजक होता तेथें । तो स्वामींच्या

१ दूध काढून. २ जातीना. ३ परीट.

दर्शनासि नित्य येत । मूर्ति आणोनि ध्यानांत । मानसीं पूजित आपुल्या ॥ ९३ ॥ ऐसे लोटतां दिवस बहुत । तों कल्पना आली मनांत । विजापुरीचे राज्य निश्चित । हें आपणातें असावें ॥ ९४ ॥ ऐसी कल्पना येतांचि मनीं । तो स्वामी प्रगटले तेच क्षणीं । म्हणती इच्छा असेल तुजलागुनी । ते सांग ये क्षणीं लवलाहें ॥ ९५ ॥ तुझ्या मनींची कल्पना जाण । ते श्रुत जाहली मजकारणें । कांहीं संकोच न धरोनि मनें । मनोरथ सांगणें सत्वर ॥ ९६ ॥ रजक म्हणे ते अवसरीं । ऐसी इच्छा वाटते अंतरीं । राज्य करावें विजापुरीं । तरी कैशापरी प्राप्त होय ॥ ९७ ॥ मग प्रसन्न होऊनि अवधूत । म्हणती आतांच पुरवीन मनोरथ । रजक मागुती विनावित । जर्जर बहुत शरीर हें ॥ ९८ ॥ वार्धकदशा आली निश्चितीं । विषय भोगावे कैशा रीतीं । तरी दुसरे जन्मीं पुरविजे आर्ती । म्हणवोनि विनंती करीतसे ॥ ९९ ॥ स्वामी म्हणती त्या अवसरा । तुझे मनोरथ पुरतील नरा । आणि आमुचा आठव करितां अंतरा । दर्शन सत्वरा देऊं आम्ही ॥ १०० ॥ ऐसें वदोनि त्याजकारणें । आपण पावले अंतर्धान । रजक तेथेंचि पावला मरण । देहापासोन मुक्त झाला ॥ १ ॥ विजापुरींचा राजा यवन । त्याच्या उदरासि गेला आपण । पुत्र होतांचि त्याजकारणें । समाधान नृपनाथा ॥ २ ॥ सुख सोहळे निरंतर । दिवसं-दिवस जाहले थोर । सोळावे वर्षीं साचार । राज्यावर बैसला ॥ ३ ॥ परी विषयीं लंपट होऊनि निश्चिती । स्वामीचा आठव न होय चित्तीं । यास्तव पायांस अवचितीं । व्यथा होती निर्माण ॥ ४ ॥ आरोग्य व्हावया साचार । वैद्य वाणी केली फार । परी न होय रोगाचा परिहार । चिंतातुर म्हणवोनी ॥ ५ ॥ एके दिवशीं नृपवरं । निद्रित असतां साचार । तों स्वप्नी आठवलें जन्मांतर । सविस्तर ते समयीं ॥ ६ ॥ तेव्हां स्वामींचें होतां स्मरण । तत्काळ दीधलें दर्शन । म्हणती उदयीक परमहंस येईल जाण । तो रोग दारूण निरसील ॥ ७ ॥ राजा होऊनियां जागृत । प्रधानासी सांगीतला वृत्तांत । म्हणती उदयीक येईल जो अतीत । त्याचा सन्मान बहुत करावा ॥ ८ ॥ दुसरे दिवसीं मध्यान समयीं । स्वामी प्रगटले ते ठायीं । रायें मस्तक ठेवितांचि पायीं । रोग सर्वही परिहरे ॥ ९ ॥ मग अवधूत तयासि नीति सांगत । राज्यमदें न व्हावें उन्मत्त । दीन गरीब जे अनाथ । पीडण तयांतें न करावें ॥ ११० ॥ गाई ब्राह्मणांचा प्रतिपाळ । करीत जावा सर्वकाळ । प्रतापें दंडावे दुष्ट खळ । तरीच सुफळ संसार हा ॥ ११ ॥ श्रीहरी स्मरण सप्रेमयुक्ती । करीत जावें दिवसरातीं । वैष्णवभक्त ब्राह्मण अतिथी । शरण यांप्रती असावें ॥ १२ ॥ ऐसें सांगतां सिद्धमूर्ती । अवश्य तयासि म्हणे भूपती । म्हणे आतां दर्शन होईल मागुतीं । तो नियम मजप्रती करावा ॥ १३ ॥ अवधूत म्हणती ते अवसरीं । तुवां चलावें काशीपुरीं । तेथें भेट देऊं सत्वरी । निश्चय अंतरीं असोंदें ॥ १४ ॥ ऐसें वदोनि त्याजकारणें । आपण पावले अंतर्धान । राजा अनुताप धरोनि मनें । यात्रेसि गमन करीतसे ॥१५॥ आनंदवनासि जावोनि त्याणें । भागीरथीचें केलें स्नान ।

१ राजा. २ भिक्षेकरी.

स्वामीचें चित्तीं होतांचि स्मरण । साक्षात दर्शन ते देती ॥ १६ ॥ मग आज्ञा करिती ते अवमरीं । चतुर्मास राहे काशीपुरीं । आम्ही जातों अमरजा तीरीं । दर्शना माघारीं ये तेथें ॥ १७ ॥ माझ्या पादुका स्थापूनि येथें । त्याचें पूजन कराव नित्य । ऐसें सांगोनियां त्यातें । अंतर्धानातें पावले ॥ १८ ॥ स्वामीच्या आज्ञेनें साचार । चतुर्मास राहिला नृपवर । मग धुंडित आला गाणगापुर । अमरजा तीर ते ठायीं ॥ १९ ॥ तेथें स्वामीच्या घेऊनि दर्शना । मग तो गेला आपुल्या स्थाना । सत्वगुणें करोनि जाणा । राज्यासना भोगीतसे ॥ १२० ॥ मागिले जन्मीं निजप्रीतीनें । घेतलें संतांचें दर्शन । इतुकें फळ लाधलें तेणें । नृपनंदन जाहला ॥ २१ ॥ गाणगापुरीं स्वामी असती । ते सकळ शिष्यांसि काय बोलती । आतां दर्शन दुर्लभ तुम्हांप्रती । तरी सांगतों युक्ती ते ऐका ॥ २२ ॥ येथें करोनि पादुका स्थापना । करीत जावें त्यांचें पूजन । ऐसें सांगोनि त्यांजकारणें । अंतर्धान पावलें ॥ २३ ॥ कृष्णातीरीं एक ग्राम जाण । कुरुंदवाड नामाभिधान । ते स्थळीं प्रकट जाहले आपण । अघटित विंदानें दावावया ॥ २४ ॥ सत्पुरुष देखोनि साचार । दर्शनासि येती नारीनर । नवस कल्पि[1]नांचि सत्वर । तरी मनोरथ पुरे तयाचा ॥ २५ ॥ एक वंध्या कांता होती जाण । म्हणे मज पुत्र होईल निधान । तरी स्वामींच्या दर्शनासि आणीन । कल्पना मनें हें केली ॥ २६ ॥ तंव तें जाहली गरोदर । सुलक्षणिक जाहला पुत्र । घरीं उत्सव केला थोर । तों काय चरित्र वर्तलें ॥ २७ ॥ षण्मास लोटतांचि जाण । लेंकरूं जाहलें गतप्राण । मातेनें प्रेत उचलोन । म्हणे स्वामी कारणें दाखवितें ॥ २८ ॥ स्वामीच्या सन्मुख आणितां । तो जीवंत जाहलें तें अवचितां । चित्तीं आनंद पावोनि माता । मग अवधूता नमस्कारी ॥ २९ ॥ आणिक एक सावकार होता । तो मृत्यु पावला अवचिता । शय्या गमनीं निघे कांता । माया ममता टाकोनि ॥ १३० ॥ मिरवत आली कृष्णातीरीं । तों स्वामीसि दुरोनि देखिलें नेत्रीं । सद्भावे येवोनि नमस्कारी । तों आशीर्वाद सत्वरीं बोलिले ॥३१॥ तों सती म्हणतसे अवधूता । शांत जाहला माझा भर्ता । चालिलें शय्या गमनार्था । माया ममता टाकोनि ॥ ३२ ॥ अष्टपुत्रा सौभाग्यवती । आशीर्वाद दीधला मजप्रती । स्वामी प्रसन्न होऊनि म्हणती । भ्रतार निश्चिती उठेल तुझा ॥ ३३ ॥ प्रेतापासीं येतांचि जाण । तों भ्रतार बसला उठोन । जैसें दीधलें आशीर्वचन । तैसें आलें घडोन अनायासें ॥ ३४ ॥ कृष्णातीरींचे बहुत जन । भक्तीसि लाविले अवधूतानें । मग ते स्थळीं अदृश्य जाहले आपण । कोणासी दर्शन न देती ॥ ३५ ॥ करावया विश्वोद्धार । घेतला सगुण अवतार । ऐसा संतांचा महिमा थोर । प्राकृत नर नेणती ॥ ३६ ॥ आणीक चरित्र ऐका सादर । एक महा मुद्गल भट्टद्विजवर । वेदशास्त्रीं निपुण फार । परी चित्तीं अहंकार असेना ॥ ३७ ॥ महापांडित आला थोर । तरी कुंठित होय त्याच्या समोर । इतुकी विद्या असतां फार । परी वाद अणुमात्र न घाली ॥ ३८ ॥ सर्वांभूतीं दया पूर्ण । आत्मवत भासे विश्वजन । असत्य सर्वथा न बोले वचन । वृत्ति संपूर्ण मुराल्या ॥ ३९ ॥ न करी

१ नवल.

कोणाचें उपार्जन । रावरंक सम समान । आशापाशीं न गुंतेचि मन । नैराश्य परिपूर्ण सर्वथा ॥ १४० ॥ स्नानसंध्या करोनि नित्य ।
पंचमहायज्ञ सारित । समयीं आलिया अभ्यागेत । तयासि पूजित सद्भावें ॥ ४१ ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । ह्या
मूर्ति घरीं पुरातन । करीतसे अर्चन सद्भावें ॥ ४२ ॥ श्रीराम मनीं श्रीराम ध्यानीं । श्रीराम दिसे जागृतीं स्वप्नीं । श्रीराम भरला जनीं
वनीं । व्यापक त्रिभुवनीं श्रीराम ॥४३॥ पुत्रमित्र आणि भार्या । श्रीरामरूप दिसती तया । श्रीराम राहाटवी सकळ इंद्रियां । पूर्णस्थिती
तया बाणली ॥ ४४ ॥ अयाचित वृत्ती करून । जितुकें मिळेल वस्त्रअन्न । तेणेंचि होय कुटुंब रक्षण । संतोष मन सर्वदा ॥४५॥ श्रीराम
जयंती माझारी । महा उत्सव करिती घरीं । दाहा दिवस अन्न शांति करी । मिष्टान्नें वरीं ब्राह्मणां ॥४६॥ मुद्गल भट्ट प्रतिष्ठित द्विजवर ।
साहित्य करिती भाविक नर । संत महंत वैष्णववीर । कीर्तनगजर ते करिती ॥४७॥ दहावे दिवसीं करोनि ललित । मग गौरविती वैष्णव-
भक्त । ऐसें लोटतां दिवस बहुत । तों चरित्र अद्भुत वर्तलें ॥४८॥ एकदां कुटुंबासह वर्तमान । महा यात्रेसि चालिले आपण । एक पुत्र घरी
ठेविला जाण । देवतार्चन करावया ॥ ४९ ॥ दारा पुत्र आणि सुनेसी । अश्व मनुष्य घेवोनि ऐशीं । मुद्गलभट्ट जावोनि काशीसी ।
भागीरथीसी स्नान केलें ॥ १५० ॥ विश्वेश्वर ज्योतिर्लिंग पूर्ण । त्याचें सद्भावें केलें पूजन । मग नित्य यात्रा सर्व करून । समाधान
पावले ॥ ५१ ॥ रामनवमीसि परतोनि जावें घरीं । यास्तव निघाले सत्वरीं । गया प्रयाग अयोध्यापुरी । पाहोनि अंतरीं संतोष ॥५२॥
स्नान दान गया वर्जन । यथाविधि देवतार्चन । जे जे क्षेत्रीं जें आचरण । तितुकें कारण संपादिलें ॥ ५३ ॥ ऐसी यात्रा करोनि
त्वरित । परतोनि येतसे विष्णुभक्त । तों मार्गीं कोणी सज्ञान गृहस्थ । तो आदरें राहवी तयांसी ॥ ५४ ॥ म्हणती विष्णु भक्ताचें
आगमन । जाहलें असे दैवें करून । पूजा करोनि यथाविधीनें । वस्त्रें भूषणें अर्पिती ॥ ५५ ॥ रामजयंती उत्सव सदनीं । यास्तव
द्रव्य देती आणोनी । मुद्गलभट्ट तें अंगीकारुनी । चालिले परतोनी सत्वर ॥ ५६ ॥ आणिकही कोणी भाविक प्रेमळ । सद्भावें अर्पिती
तुळसीदळ । द्रव्य बहुत सांचलें जवळ । हें तस्करांसि कळलें तें समयीं ॥ ५७ ॥ गमन करितांचि मुद्गल भट्टीं । सवें चोर चालिले
त्याचे पाठीं । म्हणती अरण्यांत पाडोनि गांठीं । द्रव्य शेवटीं हरावें ॥ ५८ ॥ ऐसी दुर्बुद्धि धरोनि थोर । मागें चालिलें ते तस्कर । हें
सर्वथा नेणे भक्त चतुर । एक जाणे रघुवीर अंतरात्मा ॥ ५९ ॥ मुद्गलभट्टाची स्थिति ऐसी । चोर साव सारिखेचि त्यासी । रक्षण करावें
निज द्रव्यासी । हें कल्पना मानसीं त्यास नाहीं ॥ १६० ॥ कोणी देती अथवा नेती । कोणी निंदिती कोणी स्तविती । हें समान
मानूनियां प्रीतीं । चित्तीं रघुपती धरियेला ॥ ६१ ॥ निरसोनि सकळ क्रोध काम । हृदयीं सांठविला मेघश्याम । चित्तीं ठसावें हेंचि प्रेम ।
कीं सर्वत्र राम एक असे ॥ ६२ ॥ ऐसी मुद्गल भट्टाची स्थिति । परी निर्दय तस्कर महा दुर्मती । चित्तीं घात करूं इच्छिती । हरोनि

१ अतिथी, पाहुणा. २ चोर.

संपत्ती न्यावया ॥ ६३ ॥ शस्त्रें घेऊनि साचार । चालत असती मार्गावर । हें जाणोनियां श्रीरघुवीर । सगुण साकार रूप धरी ॥ ६४॥
भक्तासि संकट पडतांचि पाहीं । काळ वेळ न विचारी कांहीं । सगुण होऊनि शेषशायी । विघ्नें सर्वही निरसित ॥ ६५ ॥ श्रीराम
आणि लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । धनुर्धरांचीं रूपें धरून । मार्गी त्वरें प्रगटले ॥ ६६ ॥ कुटुंबासहित प्रेमळभक्त । भजन करीत
जातसे पंथ । चौघे धनुर्धर तयासि रक्षित । तस्करही जपत चालती ॥ ६७ ॥ धनुष्यबाण घेऊनि हातीं । भरत शत्रुघ्न पुढें जाती । श्रीराम
लक्ष्मण मागूनि येती । भक्तासि रक्षिती प्रीतीनें ॥ ६८ ॥ हे चौघेही दिसती तस्करांकारणें । उग्ररूपें भासती जाण । अंतरीं होवोनि
क्रोधायमान । आरक्त नयन वटारिती ॥ ६९ ॥ ऐसें स्वरूप देखतां दृष्टी । चोरांसि भय उपजलें पोटीं । म्हणती याणें कां पुरविली पाठी ।
बोलती गोष्टी परस्परें ॥ १७० ॥ मागें पुढें राहती दूर । मग द्रव्य हिरोनि घेऊं समग्र । ते न विसंबती क्षणभर । दिवस रात्र रक्षिती ॥७१॥
निद्रित होतां वैष्णववीर । जागत बैसती चारी प्रहर । चित्तीं आश्चर्य करिती चोर । म्हणती कैसा विचार करावा ॥ ७२ ॥ तंव एके दिवसीं
साचार । धनुर्धरांसि पुसती तस्कर । तुम्हा जाणें कोठवर । ऐकोनि रघुवीर काय म्हणे ॥ ७३ ॥ मुद्गलभट्ट हा यात्रेकरी । आम्ही करितों
याची चाकरी । तयासि पोंहचवूनियां घरीं । मग आयोध्यापुरीं आम्हीं जाऊं ॥ ७४ ॥ ऐसें बोलोनि श्रीरघुवीर । परी ते सर्वथा न ओळखती
चोर । जो अंतरात्मा जगदुद्धार । म्हणवितो चाकर भक्तांचा ॥ ७५ ॥ ज्याची मूर्ति हृदयसंपुटीं । एकांतीं पूजीतो धूर्जटी । तो भक्ताचा
सेवक होय जगजेठी । हें नवल पोटीं मजवाटे ॥ ७६ ॥ आज उद्यां राहतील दूर । मग द्रव्य हिरोनि घेऊं सत्वर । ऐसी आशा धरोनि चोर
गंगातीर पातले ॥ ७७ ॥ मुद्गलभट्ट प्रवेशले मंदिरांत । कंठाळ उतरोनि नेली आत । मग चौघे धनुर्धर अदृश्य होत । तस्कर विस्मित
जाहले ॥ ७८ ॥ अस्तमानासि गेला दिनकरें । यास्तव बाहेर उतरले चोर । मुद्गलभट्टाच्या भेटीसि सत्वर । भाविक नर पातले
॥ ७९ ॥ यात्रा जाहली कीं सुखरूप । उत्तर देती रघुवीर कृपे । तों तस्करांसि जाहला अनुतांप । आपेआप ते समयीं ॥ १८० ॥
म्हणती हा विष्णुभक्त आहे । म्हणोनि देवें रक्षिलें काय । आपण केलें नाना उपाय । परी हातास न ये त्याचें ॥ ८१ ॥ असो मुद्गलभट्ट
तें अवसरी । सत्वर जावोनि देव घरीं । सद्भावें साष्टांग नमस्कारी । मूर्ति साजिरी पाहोनि ॥ ८२ ॥ उपाहार करावया सत्वर । तों
द्वारापासीं देखिलें तस्कर । म्हणती संगतीनें आलां येथवर । वरी भाजी भाकर खा आतां ॥ ८३ ॥ ऐसें बोलोनि त्यांजकारणें । मग
घरांतूनि देवविलें अन्न । भक्षितांचि त्याचा जाहला गुण । गेली निघोनि दुर्बुद्धी ॥८४॥ मुद्गलभट्टासि नमस्कार । करोनि स्वमुखें बोलती उत्तर ।
तुम्हीं चौघे ठेविले होते चाकर । तें कां साकार न दिसती ॥८५॥ रूपें सुंदर त्यांचीं असती । धनुष्य बाण घेवोनि हातीं । रात्रंदिवस तुम्हांसि
रक्षिती । ते कां न दिसती ते ठायीं ॥ ८६ ॥ मुद्गलभट्ट देती उत्तर । आम्हीं ठेविलें नाहींत चाकर । तुम्हीं कोण अहांत साचार । तरी

१ श्रीशंकर, २ सूर्य. ३ पश्चात्ताप.

हें सत्वर सांगावें ॥ ८७ ॥ ते म्हणती आम्हीं सर्व चोर जाण । पाळत लावोनि आलों दुरून । कीं तुमचें हिरोनि घ्यावें धन । परी ते चौघेजण रक्षिती ॥ ८८ ॥ एकदां पुसिलें साचार । तुम्हांसि जाणें कोठवर । तें म्हणती आम्हीं याचें चाकर । अयोध्यापुर गांव आमुचें ॥ ८९ ॥ तुम्हीं वाडियांत प्रवेशतां सदनीं । आम्हीं येथवर देखिलें नयनीं । ऐकोनि तस्करांचीं वाणी । म्हणे कैवल्यदानी शिणविला ॥१९०॥ मग मुद्गलभट्ट ते समयीं । तस्करांच्या लागतसे पायीं । म्हणे तुम्हांसि भेटले शेषशायीं । अंतपार नाहीं भाग्यासि ॥ ९१ ॥ तुम्हीं केवळ वैष्णव भक्त । यास्तव भेटले रघुनाथ । मीतरी पतित त्रिवाचा सत्य । म्हणवोनि लपत मजपुढें ॥९२॥ द्रव्याची गांठोडीं सत्वरा । आपुल्या हातें देतसे चोरां । म्हणती रित्याहातें न जावें घरा । अंगींकार करा स्वामी याचा ॥ ९३ ॥ श्रीराम सखा लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । यांहीं धनुर्धरांचीं रूपें धरोन । तुम्हांसि दर्शन दीधलें ॥ ९४ ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती । तस्करांसि अनुताप जाहला चित्तीं । म्हणती आम्ही पापिष्ठ दुर्मती । तुझ्या संगती उद्धरलों ॥ ९५ ॥ आणिकासि छळितां साचार । तरी भोगणें लागता नरक घोर । तुझें संगतीनें साचार । श्रीजानकीवर देखिला ॥ ९६ ॥ द्रव्य नलगेचि आम्हांकारणें । तुझ्या संगतीं जाहलों पावन । मग मुद्गलभट्टें नेत्र झांकोन । मांडिलें स्तवन रामाचें ॥ ९७ ॥ जयजयाजी रघुवीरा । सायुज्यदानी अति उदारा । नीलग्रीव शंकराच्या प्रियकरा । येवोनि सत्वरा भेटी द्यावी ॥९८॥ धनुष्यबाण घेऊनि हातीं । नित्य भेटसी तस्करांप्रती । माझी विचित्र कर्मगती । जानकीपती ते सांगा ॥ ९९ ॥ करुणारसें प्रीती करोनी । गीर्वाण भाषा वदले वाणी । शत आर्या केल्या त्याणीं । मग कैवल्यदानी भेटले ॥ २०० ॥ श्रीराम सीता लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । देव घरीं एकांतीं प्रगट होऊन । दीधलें दर्शन तयासी ॥ १ ॥ सगुणरूप देखिलें दृष्टीं । तेंचि ठेविलें हृदय संपुटीं । निजभक्त पडतां संकटीं । पावे जगजेठी तत्काळ ॥ २ ॥ तों श्रीरामजयंती माझारी । संत महंत पातले घरीं । महाउत्सव होतसे मंदिरीं । मंगळतुरीं नामघोष ॥ ३ ॥ नित्य ब्राह्मण संतर्पण । रात्रिसमयीं हरिकीर्तन । तों स्नेह[1] सरोनि गेलें जाण । उपाय आन नसेचि ॥ ४ ॥ बाजारांतूनि आणावें जर । तरी दिवाणाचें भय थोर । रात्रीं वागतांना नारीनर । तरी घरटीकार धरी त्यांसी ॥ ५ ॥ कीर्तनासि कोणी येती जर । ते येथेंचि राहती चारी प्रहर । दिवस उगवतां साचार । घरोघर मग जाती ॥ ६ ॥ ऐसें असतां ये ठायीं । कीर्तनांत तेल सरलें पाही । संकटीं पडिले शेषशायी । मग लाघवें कायी करीतसे ॥ ७ ॥ मुद्गलभट्टाचा विद्यार्थी । त्याचें रूप धरी सीतापती । तेलियाचें घरीं जावोनि प्रीतीं । गहाण ठेविती मुद्रिका ॥ ८ ॥ तेलणीसि सांगती ते समयीं । प्रातःकाळी आणोनि देयीं । आपुलें द्रव्य घेऊनि जायीं । ऐसें ते समयीं बोलिले ॥ ९ ॥ तेल आणोनि घागरभर । पात्रांत रिचवी सारंगधर । ऐकत बैसले कीर्तन गजर । दीनोद्धार तेधवां[2] ॥ २१० ॥ हरीदास कीर्तनीं उभे असती । चारी

1 तेल. 2 आश्चर्य, नवल.

प्रहर जाहली जागृतीं । मग उजळोनि मंगळारती । सीतापती ओवाळिला ॥ ११ ॥ तेव्हां सकळ श्रोतयांप्रती । प्रसाद वांटिला खिरापती । आपुलाल्या घरासि लोक जाती । तों उदयासि गभस्ती पातला ॥१२॥ मुद्रिका घेवोनि आली तेलिण । मुद्गलभट्टासि बोले वचन । रात्रीं तुमच्या विद्यार्थियाणें । ठेविलें गाहाण मजपाशीं ॥ १३ ॥ तेल आणिलें घागरभर । माझें द्रव्य द्या सत्वर । ऐसें ऐकोनियां उत्तर । विस्मित अंतर तयाचें ॥ १४ ॥ विद्यार्थियांसि पुसतां पाहीं । ते म्हणती आम्हांसि विदित नाहीं । तेल मात्र दिसतें गृहीं । विस्मित जीवीं तें होती ॥ १५ ॥ मुद्गलभट्टासि समजलें मनीं । म्हणती हे श्रीरामाची करणी । मुद्रिका देव्हाऱ्यांत ठेवोनी । प्रीती करोनी पूजित ॥ १६ ॥ पुढिले अध्यायीं रस अद्भुत । वदविता श्रीगुरु रुक्मिणाकांत । महीपति त्याचा मुद्रांकित । शरणागत संतांचा ॥ १७ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविकभक्त । एकुणपन्नासावा अध्याय रसाळ हा ॥ २१८ ॥ अध्याय ॥ ४९ ॥ ओव्या ॥ २१८ ॥




अध्याय ५०
तापी नदी
हनुमान
जसवंत

श्रीगणेशाय नमः । जय अनाथबंधु पंढरीराया । अनिवार वैष्णवी तुझी माया । ते नाममात्रेंचि निरसोनिया । करिसी छाया कृपेनें ॥१॥ तुज न येतां अनन्यशरण । साधकीं केलें नाना प्रयत्न । तीं साधनेंचि त्यांसी होती बंधनें । तुझ्या स्मरणाविण पांडुरंगा ॥२॥ कैसाही पतित मूढपती । आणि तुझें नाम जपे अवचितीं । तयासि लावोनि आपुली भक्ती । करिशील मुक्ती त्या स्वाधीन ॥३॥ तुझे ऐश्वर्य देखोनि नयनीं । इंदिरा लज्जित जाहली मनीं । मग ते निरंतर राहिली चरणीं । स्वरूप ध्यानीं लक्षूनियां ॥ ४ ॥ महिमा वर्णितां देवाधिदेव । जिव्हांगे शीणला चक्षुःश्रवा । ठक पडिलें कमळोद्भवा[1] । आमुचा हेवा तो किती ॥ ५ ॥ तुझ्या प्राप्तीस्तव जगजेठी । शंकरें आर्ती धरिली पोटीं । मग नामस्मरतांचि उठाउठी । चित्तीं धूर्जटी निवाला ॥ ६ ॥ अष्टांग योग साधितां हटीं । परी लवकर न पडसी त्याच्या दृष्टीं । तो तूं करद्वय ठेवूनि कटीं । भीमातटीं उभा अससी ॥ ७ ॥ भोळीं भोळीं जीं अज्ञान । त्यांसि साक्षात देतो दर्शन । पुंडलीकें मागितलें वरदान । जगदुद्धार तेणें होतसे ॥ ८ ॥ तूं आपुल्या दासांची सत्कीर्ती । स्वयें वदविसी रुक्मिणीपती । येन्हवीं तरी मी मंदमती । हे साक्ष चित्तीं येतसे ॥ ९ ॥ तुझा आश्रय जाणोनि साचा । प्रारंभ केला ग्रंथाचा । आतां शेवट करणें याचा । हा अभिमान साचा असोंदे ॥ १० ॥ मागिले अध्यायीं अनुसंधान । महामुद्गलभट्ट सात्विक ब्राह्मण । त्यासि तस्कर आडवे येतांचि पूर्ण । श्रीराम लक्ष्मणें रक्षिलें ॥ ११ ॥ यावरी आतां ऐका सज्जन । एकजन जसवंत वैष्णवपूर्ण । त्याणें भक्तिभावें करूनि जाण । श्रीरघुनंदन वश्य केला ॥ १२ ॥ तापी तीरामाजी साचार । बरेट नाम पुण्यनगर । तेथें राहोनि वैष्णववीर । भजन साचार करितसे ॥ १३ ॥ माध्यंदिन ब्राह्मण निश्चिती । परम सुशीळ पुण्यमूर्ती । नामस्मरण अहोरात्रीं । सप्रेमयुक्ती करितसे ॥ १४ ॥ गृहस्थाश्रमीं असोनि त्यास । चित्तीं नसे आशापाश । अखंड विरक्त आणि उदास । सगुण भक्तीस विनटला ॥ १५ ॥ अमानित्वादि सकळ लक्षणें । हीं त्याच्या अंगीं असती चिन्हें । श्रीराम सीता लक्ष्मण । या मूर्तीचें अर्चन नित्यकरी ॥ १६ ॥ अयाचित वृत्ती करून । कांहीं येतसे वस्त्रअन्न । त्यांतही अतिथि संतोषवून । कुटुंब रक्षण करावें ॥ १७ ॥ सर्वभूतीं दया केवळ । भजनशीळ आणि प्रेमळ । जिव्हेसि असत्याचा मळ । याचा विटाळ स्पर्शेना ॥ १८ ॥ रात्रि समय येतांचि जाण । नित्य करीत हरिकीर्तन । ऐकावयासी येती भाविकजन । करिती श्रवण निजप्रीतीं ॥ १९ ॥ करावया विश्वोद्धार । संतीं घेतलें अवतार । येन्हवीं तरीं तें निर्विकार । त्रिगुण विकार तो नाहीं ॥ २० ॥ जैसा जगदात्मा चैतन्यघन । तैशाच रीतीं भगवज्जन । परी पतितासि करावया पावन । मनुष्यपणे अवतार ॥२१॥ संत आणि देव जाण । दोघांत नाहीं भेदभान । सूर्य आणि त्याचे किरण । नामाभिधानें भिन्न जैसीं ॥ २२ ॥ आपुली आपण पाहावी स्थिती । आपली आपण वाणावी कीर्ती । आपुली आपण करावी भक्ती । इच्छित

1 ब्रह्मदेव.

श्रीपती चित्तांत ॥ २३ ॥ यास्तव देवभक्त होऊनि अनंत । आपुलीच सत्कीर्ती आपण गात । ती श्रवणीं ऐकतां जड मूढ समस्त । तरी जीवन्मुक्त ते होती ॥ २४ ॥ असो मागील अनुसंधान । जन जसवंत भाविक ब्राह्मण । नित्य करीतसे हरिकीर्तन । भक्तिसगुण वाखाणी ॥ २५ ॥ गांवींचे भाविक प्रेमळभक्त । ब्राह्मण स्त्रिया शूद्र निश्चित । रात्रीं नित्य श्रवणासि येत । एकाग्र चित्तें ऐकती ॥२६॥ दिवसां प्रपंच धंदा करिती । रात्रीं हरी चरित्रें ऐकती । तेणें विसरोनि मोहभ्रांती । जीवासि विश्रांति होतसे ॥ २७ ॥ ऐसें लोटतां दिवस बहुत । तों चरित्र वर्तलें एक अघटित । पर्जन्य लागला दिवस सात । अहोरात्र वर्षतसे ॥ २८ ॥ तेणें पृथ्वी नित्रवोनि समग्र । सरितेसि पातला महापूर । बरेट गांवींचे लोकसमग्र । हाहाकार करिताती ॥ २९ ॥ गांवांत पाणी शिरलें पाहीं । मंदिरें पडलीं ठायीं ठायीं । लोक म्हणती ते समयीं । उपाय कांहीं चालेना ॥ ३० ॥ एक म्हणती भाविक नर । जन जसवंत वैष्णववीर । तयासि प्रसन्न जानकीवर । असे साचार जाणपां ॥ ३१ ॥ श्रीरघुनाथ चरित्रें नित्य । गात असे कीर्तनांत । कीं संकट पडतां निजभक्तातें । वैकुंठनाथ रक्षी तया ॥ ३२ ॥ तरी आपण मिळोनि अवघे जण । तयासि ऐसें बोलें वचन । कीं आतां प्रार्थूनि रघुनंदन । अरिष्ट दारुण निरसावें ॥ ३३ ॥ ऐसें सांगता कोणी । हे मानलें सकळांचिये मनीं । मग अवघे ग्रामस्थ मिळोनी । पातले सदनीं तयाच्या ॥ ३४ ॥ श्रीराम भक्त तये दिनीं । बैसला असे सहजासनीं । हातीं घेऊनियां स्मरणी । सप्रेम भजनीं डुल्लत ॥३५॥ तंव ग्रामवासी घेऊनियां सद्भावें । अवघे लागती पाया । एक कुबुद्धि धरोनियां । शब्द शस्त्रें तया ताडिती ॥३६॥ म्हणती जनजसवंत वैष्णववीर । ग्रामांत असोनि निरंतर । नदीस[1] पातलां महापूर । क्षेत्रांत नीर प्रवेशले ॥ ३७ ॥ तेणें भयें साचार । गांवांत जाहला हाहाकार । तरी आतां प्रार्थूनि श्रीरघुवीर । विघ्न साचार निरसावें ॥ ३८ ॥ देवाची कीर्ति गातसां नित्य । हे तेव्हांस आम्हीं मानूं सत्य । निंदक कुटिळ दुर्मत । ऐसें वदत तयासी ॥ ३९ ॥ ऐसें तयाचें ऐकोनि वचन । दुखवलें तेव्हां अंतःकरण । जन जसवंत सत्वर उठोन । देवघरीं जाण प्रवेशले ॥ ४० ॥ कवाड आडकोनि सत्वरगती । लाविली दोन्ही नेत्रपातीं । मग एकाग्र होऊनियां चित्तीं । रघुनाथस्तुती करीतसे ॥ ४१ ॥ जयजयाजी अयोध्याधीशा । लीलावतारी जगन्निवासा । तूं निजभक्तांचा होसी कुंवसा । ऐसा ठसा त्रिभुवनीं ॥ ४२ ॥ देव बंदि पडिले जाण समग्र । यास्तव सूर्यवंशीं अवतार । घेऊनि वधिला दशकंधर । मग विबुध सत्वर सोडविले ॥४३॥ तुझ्या नामें करूनि साचार । पाषाण तरले समुद्रावर । आणि आतां तापीसि आलें नीर । तेणें ग्राम समग्र बुडतो हा ॥ ४४ ॥ देवाधिदेवा जगज्जीवना । भीत नाहीं मी आपुल्या मरणा । परी दुःख होतांचि या जना । हें माझिया नयना न पाहवे ॥ ४५ ॥ ऐसें म्हणवोनि भक्तप्रेमळ । अश्रुपातें भरले डोळे । तंव ध्यानीं प्रगटोनि दीनदयाळ । म्हणे चिंता अणुमात्र न करावी ॥ ४६ ॥ तापीसि महापूर आला निश्चित । तरी तो

१ नदीला.

प्राशील वायुसुत । सरितेचे कांठीं हा हनुमंत । नेऊनि त्वरित बैसवि ॥ ४७ ॥ ऐसें जसवंतासि बोलून वचन । अदृश्य जाहला रघुनंदन । कीं निजभक्ताचे हृदयभुवन । तेथेंच लपोन बैसले ॥ ४८ ॥ धातूची मूर्ति साचार । आदगज उंच असे थोर । ते जसवंतें उचलोनि सत्वर । तापी तीर पातले ॥ ४९ ॥ जेथवर पाणी चढलें पाहीं । मारुती मांडिला तये ठायीं । ग्रामवासी लोक सर्वही । येती लवलाहीं पाहावया ॥ ५० ॥ मग काय केलें वायुसुतें । भुभुकार दीधला नेटें । तेणें शब्द आचाटें । कर्ण संपुटें बैसलीं ॥ ५१ ॥ विक्राळ रूप वायुसुतें । धरोनि सरिता प्राशिली समस्त । तत्काळ पोटीं जीवन येत । लोक समस्त देखती ॥ ५२ ॥ पात्र टाकोनियां सकळ । रानांत पसरलें होते जळ । एकाएकीं वोसरलें सकळ । लोक ते वेळे पाहती ॥ ५३ ॥ जयजयकारें ते वेळीं । आनंदली भक्त मंडळी । म्हणती धन्य वैष्णव कळिकाळीं । भूमंडळी अवतरला ॥ ५४ ॥ बरेट गांवींचे नारीनर । येऊनि जसवंताच्या समोर । भावें करिती नमस्कार । म्हणती प्रसन्न रघुवीर तुज असे ॥ ५५ ॥ देखत देखत हनुमंतानें । नदीचें प्राशिलें जीवन । धन्य संताचें महिमान । किती म्हणून वाखाणूं ॥ ५६ ॥ ऐशारीती भाविक बोलती । जसवंतासि वाखाणिती । म्हणती विप्रवेषें निश्चिती । साक्षात रघुपती अवतरला ॥ ५७ ॥ परी विकल्पी दुर्बुद्धि होते कोणी । सत्य न वाटे त्यांजलागुनी म्हणती पाणी चढलें त्रयदिनी । सहज ओहोटोनि मग गेलें ॥ ५८ ॥ धातूची मूर्ती साचार । कैसे प्राशील इतुकें नीर । होणार तैसें भविष्य पुरे । यश त्यावर कां देतां ॥ ५९ ॥ धातूचीं दैवते अपार । उदंड आहे घरोघर । तीं काय प्राशीत नीर । चित्तीं विचार करावा ॥ ६० ॥ एक म्हणती टाणींटोणीं । जसवंत जाणे मंत्रमोहिनी । त्याणें भाविकांसि अनुग्रह करोनी । आपुले घ्यानीं लाविलें ॥ ६१ ॥ नदीचें प्राशन करावया नीर । त्यासी सामर्थ्य असते जर । तरी भिक्षा मागावया साचार । दारोदार हिंडता कां ॥ ३२ ॥ ऐसें विकल्पीत त्या अवसरा । बोलत असती येरयेरां । चित्तीं संशय वाणला पुरा । तें श्रीरामचंद्रा न साहे ॥ ६३ ॥ आधीं दुर्जनांसि पुढें करून । निजभक्ताचे करवीत छळण । मग अघटित चरित्र दाखवून । संत महिमानें वाढवी ॥ ६४ ॥ प्रल्हाद भक्त प्रेमळ दास । सप्रेम भजन करीत विशेष । हिरण्यकशिपें छळितां त्यास । स्तंभीं हृषीकेश प्रगटला ॥ ६५ ॥ दुर्योधन राजा महादुर्मती । त्याणें छळिता द्रौपदी सती । वस्त्रें हरितां सत्वर गती । मग रुक्मिणीपती पावला ॥ ६६ ॥ असो मागील अनुसंधान । मारुतीनें प्राशितां तापीचें जीवन । विकल्पी असत्य मानिती जन । मग काय विंदानें दाखवी ॥ ६७ ॥ हनुमंताची मूर्ति साजिरी । मांडिली होती तापी तीरीं । लोक पाहती ते अवसरीं । कौतुक नेत्रीं आपुल्या ॥ ६८ ॥ मूर्तीच्या नाभिस्थानीं साचार । लागली अखंड उदकाची धार । आणिकही छिद्रें पडिलीं चार । त्याजवाटे नीर वाहतसे ॥ ६९ ॥ चार दिवस अहोरात्र जाण । अखंड वाहों लागलें जीवन । गांवोंगांवींचे बहुत जन ।

१ मोठेपण. २ नवल.

कौतुक येवोन पाहतीं ॥ ७० ॥ विकल्पी निंदक जे दुर्जन । त्यांचें द्रवलें अंतःकरण । मग जन जसवंताचे चरण । निजप्रीतीनें वंदिती ॥ ७१ ॥ म्हणती तूं निधडा वैष्णववीर । साक्षात ईश्वरी अवतार । तुमच्या योगें साचार । गांव समग्र वांचला ॥ ७२ ॥ मारुतीची मूर्ति सगुण । तिणें साक्षात प्राशिलें जीवन । अद्भुत दाखविलें विंदान । म्हणवोनि लोटांगण घालिती ॥ ७३ ॥ श्रीराम भजन करिती नित्य । रामरूप जाहला जसवंत । सत्कीर्ति प्रगटली जनांत । चरित्रें वर्णित संत साधु ॥ ७४ ॥ ज्या मूर्तीनें प्राशिलें नीर । तें स्थळ आहे अद्यापि वर । पोटासि तैसेंचि आहे छिद्र । लोक सर्वत्र पाहती ॥ ७५ ॥ नंदुरबार परगण्यामाजी पाहीं । त्याचे वंशिक आहेत संप्रदायीं । आतां निझव्यांत राहती । तये ठायीं मूर्ति असे ॥ ७६ ॥ आणिक चरित्र रसाळ फार । सादर ऐका भाविक नर । एक निरंजन स्वामी भक्त थोर । त्याणें लंबोदरें[1] आराधिला ॥ ७७ ॥ नारद बिंदु सुराकर्पूरा तीर । यांच्या संगमीं साचार । नामल ग्राम क्षेत्र थोर । वास्तव्य निरंतर तेथें असे ॥ ७८ ॥ निरंजन स्वामीची ऐसी स्थिती । अखंड उदास विरक्त चित्तीं । करुणा धरोनि सर्वांभूतीं । आत्मवत जगती मानीत ॥ ७९ ॥ स्नान संध्या करोनि नित्य । श्रीगणपतीची मूर्ति पूजित । त्याजवांचोनि आणिक दैवत । दृष्टीसीं निश्चित न पाहे ॥ ८० ॥ चातक न घे भूमीचें जीवन । कां मातेवांचोनि न समजे तान्हें । चकोरासि चंद्रचि प्रमाण । इतर तारांगण नावडती ॥८१॥ कृपणासि काया वाचा मनें । चित्तातूनि आवडे धन । तैशाच रीतीं निरंजनें । गजानन आराधिला ॥ ८२ ॥ त्याची निष्ठा देखूनि बहुत । साक्षात्कार दीधला एकदंतें । तों विद्वान ब्राह्मण अकस्मात । आले त्वरित भेटीसी ॥ ८३ ॥ तेही स्नान करोनि सत्वरी । अर्चनासि बैसले ते अवसरीं । गणपतीची मूर्ति साजिरी । सर्वोपचारी पूजितसे ॥ ८४ ॥ तों ब्राह्मण म्हणती निरंजनास । एक शास्त्र विरुद्ध आम्हांसि दिसे । अर्चनीं पूजिसी गणपतीस । परी शाळग्राम न दिसे ये ठायीं ॥ ८५ ॥ विष्णुमूर्तीविण थोर । आणिक दैवतें पूजिलीं फार । परी त्यांचें तीर्थ घ्यावया साचार । नसे अधिकार सर्वथा ॥८६॥ ऐसें म्हणवोनि त्याजकारणें । काय करिते जाहले ब्राह्मण । एक शाळग्राम शिळा काढोन । म्हणती याचें पूजन करावें ॥ ८७ ॥ मग निरंजनें शाळग्राम घेतला हातीं । परम संकोच वाटला चित्तीं । म्हणे एकनिष्ठ उपासना होती । आतां व्यभिचार निश्चितीं दीसतो ॥ ८८ ॥ ते वेळीं स्वमुखें करून । एक अभंग बोलिले वचन । तो ग्रंथीं लिहितों प्रीतीं करून । करा श्रवण भाविकहो ॥ ८९ ॥ अभंग ॥ देहपात घडो तुज उपासीतां । तरी न सोडीं सर्वथा भक्ती तुझी ॥ १ ॥ जितुकें जाचसील तितुके सोसीन । परी राहे माझें मन तुझे ठायीं ॥ २ ॥ निष्ठुर मानस करिशील जरी । परी न सोडी अंतरीं ध्यान तुझें ॥ ३ ॥ ध्यानीं तुझें रूप न दिसे संपूर्ण । परी नामाचें चिंतन न सोडींगा ॥ ४ ॥ निरंजन स्वामी प्रभु एकदंता । न सोडी सर्वथा भक्ती तुझी ॥ ५ ॥ ओव्या ॥ इतुका अभंग म्हणवोन । आणिक

१ श्रीगणेश.

श्लोक बोलिले दोन । त्यांचा अभिप्राय संपूर्ण । करा श्रवण निजप्रीती ॥ ९० ॥ ऋषी तापसी थोर ब्राह्मण । आणिक तेहतीस कोटी गण । मजवर क्षोभलें संपूर्ण । परी न सोडीं ध्यान तुझें ॥९१॥ आकाश कडकडोनि पडो मजवरी । विरोनि जाय सकळ धरित्री¹ । तरी भक्तीसि व्यभिचार मी न करीं । निश्चय अंतरीं दृढ केला ॥ ९२ ॥ निरंजनाची उपासना भक्ती । देखोनि तुष्टलें वैकुंठपती । शाळग्राम विष्णुमूर्ति होती । सोंड अवचितीं फुटली तया ॥ ९३ ॥ सन्निध साधु वैष्णवभक्त । आणि विद्वान विप्र जवळ होते । चरित्र देखोनि अत्यद्भुत । आश्चर्य वाटत तयांसि ॥ ९४ ॥ जयजयकारें पिटिली टाळी । आनंदली भक्त मंडळीं । निरंजन स्वामीसि ते वेळीं । नमस्कार सकळीं घातला ॥ ९५ ॥ म्हणती तुमची उपासना भक्ती । देखोनि तुष्टला लक्ष्मीपती । शाळग्रामाची शिळा होती । ते दिसे अवचितीं गजवदन ॥ ९६ ॥ जैसा एकनिष्ठ नरहरी । त्याणें आराधिला श्रीशंकर । मग पांडुरंगें मस्तकावर । लिंग साचार धरियेलें ॥ ९७ ॥ विश्वात्मा हा जगत्पती । जया चित्तीं जैसी आर्ती । रूप नटोनि तैशाच रीतीं । आपुल्या भक्तीसी लावितसे ॥९८॥ जाणोनि यशोदेची भावना । श्रीकृष्ण जाहला तिचा तान्हा । आणि अर्जुनाची होऊनि अंगना । इच्छा भोगदाना देतसे ॥ ९९ ॥ तो निज भक्ताची देखोनि आर्ती । धरीतसे गजानन आकृति । मग निरंजनस्वामी धरोनि प्रीतीं । शाळग्राम मूर्ती पूजितसे ॥ १०० ॥ उदंड आत्मज्ञानी पुरुष । देखिले ऐकिले बहुवस । परी नामदेवें फिरविलें देउळास । हे कळा नसेचि ते ठायीं ॥ १ ॥, ब्रह्मज्ञान कथिती फार । करतळामळ विद्या सर्वत्र । परी धातूच्या हनुमंतें प्राशिलें नीर । अघटित विचार हा दिसे ॥ २ ॥ एक उपासना भक्तीविण । साक्षात्कार न ये कोणाकारणें । जैसें बहुतां घरींचे पाहुणें । उपासी जाण मरतसे ॥ ३ ॥ म्हणवोनि उपासना सगुणभक्ती । स्थापिली असे सभाग्यसंतीं । चित्तीं धरितां उपपत्ती । साक्षात्कार पावती साधक ॥ ४ ॥ आणिक चारित्र रसाळ थोर । सादर परिसा भाविक चतुर । जयरामस्वामी वडगांवकर । त्यासि रुक्मिणीवर भेटले ॥ ५ ॥ ते म्हणाल जरी कैशारीतीं । कोण उपासना कैशी भक्ती । ते सांगतों यथामती । तरी सादर श्रोतीं परिसिजे ॥ ६ ॥ एक कृष्णदास म्हणवोनि ब्राह्मण । परम सुशीळ पुण्यपावन । नित्य करीत विष्णुअर्चन । सप्रेम भजन सर्वदा ॥ ७ ॥ गृहस्थाश्रम तयासि असतां । तों अपूर्व वर्तली कर्मकथा । पहिली निवर्तोनि गेली कांता । म्हणे विवाह आतां करावा ॥ ८ ॥ व्यापार करावया निमित्त । कृष्ण दास सैन्यांत गेले होते । तों एक ग्राम लुटिला तेथें । थोर आकांत जाहला ॥ ९ ॥ नरनारी गुढेकरी ते समयीं । पळोनि गेले होते कांहीं । ते एक्या ब्राह्मणाच्या गृहीं । कुमारी त्यांहीं देखिली ॥ ११० ॥ उपवर नोवरी सुंदरजाण । ब्राह्मणासि पुसोनि लाविलें लग्न । कृष्णदास नोवरी घेऊन । आले परतोन निजग्रामा ॥ ११ ॥ कांहीं दिवस लोटल्यावर । दिवसंदिवस जाहली थोर । ऋतु प्राप्त झालियावर । सर्व संस्कार घडेल

१ पृथ्वी.

कीं ॥ १२ ॥ कांहीं दिवस लोटलियावरी । घागर घेतली खांद्यावरी । पाणवथा जातांचि ते नारी । तेथें मातुळ नेत्रीं देखिला ॥ १३ ॥ तो तरी जातीचा नापिकें । दृष्टी पडतां पुरली ओळख । न्याहाळून पाहे त्याचें मुख । गांहिवर सुखें पातला ॥ १४ ॥ तों तयासिही बाणली खूण । अश्रुपातें भरले नयन । म्हणे तुज शोधितां बहुतादिन । वर्षे दोन लोटलीं ॥ १५ ॥ आजि अकस्मात दृष्टादृष्टीं । उभयतांचि जाहली भेटी । माता रडतसे तुजसाठीं । प्राणकंठीं धरिला असे ॥ १६ ॥ भाची म्हणे ते अवसरीं । परचक्र आलें गांवावरी । मग मी लपोनियां शेजारीं । ब्राह्मण मंदिरीं बैसलें ॥ १७ ॥ तेथें एक विप्र आला जाण । त्याणें आणिलें मजलागून । ब्राह्मण बोलावूनि त्याणें । लाविलें लग्न आपणासि ॥ १८ ॥ ऐसी कर्मांची विचित्र गती । विधात्यानें लिहिली संचिती । ऐसें सांगतां मातुळाप्रती । अश्रु वाहती नेत्रांतूनि ॥ १९ ॥ इतुकें शब्द परस्परीं । उभयतां बोलिलें तें अवसरीं । तों डोईवर घेऊनि घागरी । ऐकती नारी पाणवथा ॥ १२० ॥ गोष्ट ऐकोनि अघटित । गावांत जाऊनि कोणी सांगत । मात प्रगटली नगरांत । म्हणती विपरीत हें झालें ॥ २१ ॥ नानापरींचे त्रिविध जन । अपशब्दें निंदिती बहुगुण । म्हणती कलियुगींचें ब्राह्मण । विषयांध जाण सर्वस्वें ॥ २२ ॥ सैन्यांत जाऊनि दुराचारी । नापिकाची केली नोवरी । वर्ण संकर मांडिला घरीं । नरक अघोरी भोगावया ॥ २३ ॥ आणिक यातीची असती जर । तरी शब्द ठेविते धरामर । वर्णामाजी छत्र चामर । भलतांचि विचार हे करिती ॥ २४ ॥ ब्राह्मण मिळोनि विद्यावंत । कृष्णदासासि काय बोलत । तुज तरी आम्हीं घातलें वाळींत । तरी देहांत प्रायश्चित घे आतां ॥ २५ ॥ नूतन व्यवहार असतां जर । तरी चालतां कांहीं शास्त्रविचार । त्यांसि दिवस लोटले फार । सोळा संस्कार घडले कीं ॥ २६ ॥ ऐसें बोलतां धरामर । पिशुन हांसती सर्वत्र । कोणीच तयांसि न म्हणे बरें । धरिलें दूर सर्वत्रीं ॥ २७ ॥ इतुका अपवाद होतांचि जाण । अनुतापें द्रवलें अंतःकरण । अश्रुपातें भरलें लोचन । मग श्रीहरिस्मरण करीतसे ॥ २८ ॥ म्हणे चौऱ्यासी लक्ष योनी हिंडतां । नरदेह लाधला अवचितां । तेथें देहांत प्रायश्चित घेतां । तरी आत्महत्या घडेल कीं ॥ २९ ॥ अनंत जन्मांच्या भोगिल्या कोटी । आतां नरदेह लाधला शेवटीं । आतां अनुताप धरोनि पोटीं । चित्तीं जगजेठी स्मरावा ॥ १३० ॥ ऐसा मानसीं करूनि विचार । ब्राह्मणांसि केला नमस्कार । म्हणे मी तुमचा सेवागार । होईन निरंतर सर्वस्वें ॥ ३१ ॥ विद्या वय कुळ याती । यांतूनि भ्रष्टलों निश्चितीं । आतां पतितपावन वैकुंठपती । तो उद्धरील निश्चिती मजलागीं ॥ ३२ ॥ इतुकें विप्रांसि बोलोनि वचन । प्रेमें करीत नामस्मरण । रात्रीं करावें हरीकीर्तन । पुस्तक पारायण ज्ञानेश्वरी ॥ ३३ ॥ आषाढीं कार्तिकी पंढरीसी । नेमें येतसे यात्रेसी । संत प्रेमळ महंत ऋषीं । सद्भावें तयांसी नमस्कारी ॥ ३४ ॥ भूतदया निरंतर । शरीरें करीत परोपकार । परी स्वयातीनें धरिलें दूर । हा खेद अणुमात्र असेना ॥ ३५ ॥ रात्रीं होतां कीर्तनगजर । श्रवणासि येतीं भाविक नर । स्त्रिया शुद्रयाती

१ न्हावी.

इतर । वेधलें अंतर तयाचें ॥ ३६ ॥ परी कृष्णदासासि धरामर । देखोनि बोलती दुरुत्तर । कृष्णा न्हावी हे साचार । नाम सर्वत्र बोलती ॥ ३७ ॥ एक कुचेष्टा करूनि निश्चित । कृष्णदासाच्या गृहासि येत । म्हणे आमुची करावी हजामत । मग अवश्य म्हणती तयांसीं ॥ ३८ ॥ मग वस्तरा कातर ठेवूनि घरीं । मुखें ब्राह्मणाची सेवा करी । स्वयातीनें धरिलें दुरी । हा खेद अंतरीं त्या वाटे ॥ ३९ ॥ द्विजीं घातलें वाळीत । आप्तवर्गें सोडिलें निश्चित । म्हणे पूर्वजन्मींचें सुकृत । अभिमानाविरहित झालें कीं ॥१४०॥ टाळ विणा मृदुंग सत्वर । नित्य होतसे कीर्तनगजर । स्नानसंध्या ब्राह्मण साचार । पूर्ववत साचार करीतसे ॥ ४१ ॥ ऐसी असतां तयाची स्थिती । तों पुढें बहुत जाहली सत्कीर्ती । ते म्हणाल जरी कैशारीतीं । तरी सादर श्रोतीं परिसिजे ॥ ४२ ॥ कांतेसहित एक ब्राह्मण । पंढरीसि आला निजप्रीतीनें । जयराम पुत्राचें नामाभिधान । तो परम सगुण सुलक्षणी ॥ ४३ ॥ चंद्रभागेसि करूनि स्नाना । घेतले पुंडलिकाचे दर्शना । मग करोनि क्षेत्रप्रदक्षिणा । माहाद्वारीं जाणा ती आलीं ॥ ४४ ॥ गरुडपारीं लोटांगण । घातलें तेव्हां निजप्रीतीनें । विठ्ठल-रुक्मिणींचे घेतां दर्शन । रमले मन ते ठायीं ॥ ४५ ॥ संसारीं होऊनि उदास । आवडीनें केला क्षेत्रवास । कांहींएक लोटतां दिवस । सायुज्यपदास ते गेले ॥४६॥ मातापिता क्रमतां निश्चिती । जयरामासि बाणली विरक्ती । श्रीपांडुरंगाच्या चरणीं ठेवूनि प्रीती । पंढरीसि निश्चिती राहिला ॥ ४७ ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणी कांता । तूंचि माझी मातापिता । तुजविण कोणी बंधुचुलता । कुळदेवता आन नसे ॥४८॥ तूंचि माझें गणगोत । तूंचि माझा जिवलग आप्त । दुजा कैवारी त्रिभुवनांत । नाहीं निश्चित मज कोणी ॥ ४९ ॥ ऐसी करुणा भाकोनि जाण । त्रिकाळ घेतसे देवदर्शन । वैष्णव करिती हरिकीर्तन । तेथें श्रवण करीत निजप्रीतीं ॥ १५० ॥ तंव कोणे एकें दिवसीं जाण । ऐकत बैसला पुराणश्रवण । तेथें सद्गुरुसेवेचें माहिमान । ऐकतांचि मन वेधलें ॥ ५१ ॥ म्हणे गुरुगीतेमाजी निश्चिती । जैसी बोलली सद्गुरुभक्ती । ते मज घडावी यथास्थिती । धिंवसा चित्तीं उपजला ॥ ५२ ॥ मग सद्गुरुप्राप्तीस्तव जाण । तेणें मांडिलें अनुष्ठान । चंद्रभागेचें करोनि स्नान । पुंडलीक पूजन करीतसे ॥५३॥ यामिनी[1] उरतां घटिका चार । तों क्षेत्रप्रदक्षिणा करी सत्वर । मग महाद्वारासि वैष्णववीर । येऊनि नमस्कार घालीतसे ॥५४॥ सांवळा सुकुमार कैवल्यदानी । पाहतांचि संतोष पावे मनीं । मस्तक ठेवूनियां चरणीं । स्वरूप ध्यानीं सांठवित ॥ ५५ ॥ एकादशीस उपोषण सार । रात्रीं करीतसे हरिजागर । कीर्तन ऐकतां चारी प्रहर । सप्रेम अंतर तयाचें ॥ ५६ ॥ साधुसंत वैष्णव जन । तयांसि सद्भावें करीत नमन । वाचेसि सर्वदा नामस्मरण । एकही क्षण न राहे ॥ ५७ ॥ अनुष्ठान करितां ऐशारीतीं । मनकामना धरिली चित्तीं । कीं सद्गुरु भेटावा मजप्रती । आणिक आर्ती असेना ॥५८॥ कांहीं दिवस लोटतां निश्चित । सात्विक पुण्य सांचलें बहुत । सद्भक्ति देखोनि पंढरीनाथ । स्वप्नीं सांगत येऊनियां ॥ ५९ ॥ विप्रवेषें रुक्मिणीकांत । दृष्टांतीं

[1] रात्र.

तयासि काय बोलत । कृष्णदास आहे वडगांवांत । शरण तयातें जा वेगीं ॥ १६० ॥ सद्भावें करितां त्याची भक्ती । तेणेंचि होईल माझी प्राप्ती । ऐसा दृष्टांत होताचि रातीं । जयराम जागृती येतसे ॥ ६१ ॥ देखोनि स्वप्नींचा चमत्कारु । चित्तीं उल्हास वाटला थोरु । म्हणे श्रीपांडुरंगें दाखविला तारु । पाहीन सद्‌गुरु दृष्टीसीं ॥ ६२ ॥ ऐसा संतोष मानूनि मनें । मग चंद्रभागेसि केलें स्नान । घेऊनि विठोबाचें दर्शन । सद्भावे चरण वंदिले ॥ ६३ ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीकांता । आतां असोंदें लोभ ममता । योगक्षेम तुझिया माथा । निर्विघ्न आतां तूं नेयीं ॥ ६४ ॥ ऐसें म्हणवोनि ते अवसरीं । प्रेमें अश्रुपात आले नेत्रीं । पुनः पुन्हा दंडवत करी । महाद्वारीं येतसे ॥ ६५ ॥ सव्य घेऊनि क्षेत्रपंढरी । पंथ क्रमीत ते अवसरीं । वडगांवासि येऊनि सत्वरी । सद्‌गुरु मंदिरीं प्रवेशत ॥६६॥ कृष्णदासासि देखोनि नयनीं । साष्टांग नमस्कार घातला धरणीं । परम उल्हास वाटला मनीं । दृष्टांत कानीं अवधारा ॥ ६७ ॥ जैसा श्रीहरि प्राप्तीस्तव निश्चित । ध्रुवबाळ रुसोनि जात । तों ब्राह्मणसुत भेटला अकस्मात । मग आनंद होत तयासी ॥ ६८ ॥ कां संशयीं पडतां द्वैपायन । तों जाहलें नारदाचें दर्शन । तैसाचि उल्हास धरोनि मनें । सद्गुरुकारणें भेटतसे ॥ ६९ ॥ वृत्तांत सांगे निजप्रीतीसी । म्यां अनुष्ठान केलें पंढरीसी । देवें आज्ञा केली मजसी । कीं शरण स्वामीसी जाय आतां ॥ १७० ॥ तरी मस्तकीं ठेवूनि अभयपाणी । अनुग्रह द्यावा मजलागुनी । ऐकोनि जयरामाची वाणी । कृष्णदास मनीं विस्मित ॥ ७१ ॥ म्हणे हे उपाधि पंढरीनाथें । व्यर्थ कासया पाठविली येथें । ऐसें म्हणवोनि चित्तांत । उत्तर देत काय तया ॥ ७२ ॥ म्हणे निजकर्मे करोनि तत्त्वतां । यातिभ्रष्ट जाहलों आतां । देहांत प्रायश्चित विप्र सांगतां । धरिली ममता शरीराची ॥ ७३ ॥ यास्तव राग धरोनि निश्चित । ब्राह्मणीं घातलें असे वाळींत । वेगळी गुंफा बांधोनि येथ । भजन करीत बैसलों ॥ ७४ ॥ कुळवंत गुरू पाहोनि ब्राह्मण । तयासि तुवां जावें शरण । मज बहिष्कार पडला असे जाण । यातिवर्ण तो नाहीं ॥ ७५ ॥ ऐकोनि कृष्णदासाची वाणी । जयरामें मिठी घातली चरणीं । म्हणे बाळकांसि उपेक्षितां जननीं । तरी अपंगिता कोणी नसे कीं ॥ ७६ ॥ काया वाचा आणि मनें । तन मन धनेंसि आलों शरण । आतां कृपादृष्टीं विलोकून । करावें पावन मज स्वामी ॥ ७७ ॥ सद्भावें ओळखोनियां मनीं । मस्तकीं ठेविला अभयपाणी । मग दीक्षा अनुग्रह देखोनि । श्रीकृष्ण भजनीं लाविला ॥ ७८ ॥ काया वाचा मनें निश्चित । सद्‌गुरूची सेवा करीत । अनन्यभावें लाविली प्रीत । कल्पना द्वैत टाकोनीं ॥ ७९ ॥ परस्परें गांवांत जाहलें श्रुत । ऐकोनि ब्राह्मण निर्भर्सित । म्हणती नापिकाचा उपदेश घेतला निश्चित । तरी विपरीतार्थ हा दिसे ॥ १८० ॥ आणिक सद्‌गुरु ज्ञानी चतुर । उदंड आहेत पृथ्वीवर । तयासि टाकूनि साचार । भ्रष्टास शरण कां गेला ॥ ८१ ॥ नासल्या उदकासि मिळ‌ां पाणी । तरी तें पवित्र होईल कैसेनी । तयासि न सेविती कोणी । तैसीच करणी ही दिसे ॥ ८२ ॥ पवित्र

ब्राह्मणाचा नंदन । आणि नापिकाचा उपदेश घेतला याणें । तयासी भाषण न करणें । ऐसें ब्राह्मण बोलती ॥ ८३ ॥ परी जयरामस्वामीचा दृढभाव । कीं सद्गुरु हाचि देवाधिदेव । सेवा करीतसे अति अपूर्व । द्वैतभाव टाकोनियां ॥ ८४ ॥ विप्रीं घातलें वाळींत । आप्तवर्गीं सांडिलें निश्चित । परी चित्तीं वाणला आत्मस्वार्थ । यास्तव क्षीत न मानी ॥ ८५ ॥ त्रिकाळस्वामीचें दर्शन । घेऊनि शुश्रषा करीतसे जाण । मंदिरीं सडासंमार्जन । निजप्रीतीनें घालीतसे ॥ ८६ ॥ प्रातःकाळीं करोनि स्नान । सोज्ज्वळ धूतसे उपकरण । अनसूट उदकपात्रीं भरोन । स्वामीस जाण ठेवित ॥८७॥ स्नान घालोनि आपुल्या हातें । देवपूजेचें साहित्य देत । कोठें न्यून न पडे किंचित । सप्रेम भावार्थ तयाचा ॥ ८८ ॥ योगियाच्या मतें निश्चिती । जैसी बोलिली सद्गुरु भक्ती । सेवा करीत तैशा रीतीं । अनन्य प्रीती लावोनियां ॥ ८९ ॥ आपुल्या स्वामींचें चरणतीर्थ । आवडी करोनि नित्य सेवित । तेणें कविताशक्ति जाहली निश्चित । कीर्तनीं गात गुणनाम ॥ १९० ॥ कृष्णदास जयराम म्हणवोनी । अभंगीं बोलत तयेक्षणीं । ऐकोनि तयाची सप्रेम वाणी । श्रोतयासि मनीं आनंद ॥ ९१ ॥ भोळे भाविक भक्तप्रेमळ । ते तरी वंदिती सर्वकाळ । सांडोनि चित्ताची तळमळ । कीर्तन रसाळ ऐकती ॥९२॥ वैदिकशास्त्रज्ञ पंडित जन । ते तयाचें न घेती दर्शन । तों अघटित चरित्र वर्तलें गहन । तें ऐका सज्जन भाविकहो ॥९३॥ शंकराचार्य एके दिनीं । अकस्मात आले त्या ठिकाणीं । मग सकळ ब्राह्मण मिळोनि । दर्शना लागोनी ते गेले ॥ ९४ ॥ करोनियां साष्टांग नमन । गांवांत आणिलें प्रीतीकरून । पूजाअर्चा जाहलिया जाण । मग भोजनें सारिली ॥९५॥ स्वस्थानीं बैसतांचि महंत । मग सकळ ब्राह्मण मिळोनि येत । म्हणती स्वामी एक अनुचित । जाहलें निश्चित ये ठायीं ॥ ९६ ॥ ब्राह्मण पुत्र एक जयराम असे । याणें घेतला नापिकाचा उपदेश । सेवा करीत रात्रंदिवस । प्रीति उल्हास धरोनियां ॥ ९७ ॥ धर्माधिकारी सांगतां ऐसें । क्रोध पातला आचार्यास । म्हणती धरोनि आणारे तयास । गुरुशिष्यांस उभयतां ॥ ९८ ॥ स्वामींची आज्ञा होतांचि ऐसी । संतोष वाटला ब्राह्मणांसी । म्हणती बहुत प्रतिष्ठा वाढली त्यासी । शिक्षा अनायासीं होईल ॥ ९९ ॥ मग कृष्णदासाच्या मठांत । पातले शंकराचार्यांचे भृत्य[1] । जयरामासि ओढुनि त्वरित । सत्वर आणित तेधवां ॥ २०० ॥ आचार्य क्षोभोनियां निश्चिती । काय म्हणती तयाप्रती । तुवां नापिकांचा अनुग्रह प्रीतीं । कैशा रीतीं घेतला ॥ १ ॥ सकळ वर्णांत श्रेष्ठ जाण । ते सर्वज्ञ टाकोनि ब्राह्मण । त्या भ्रष्टासि गेलासी शरण । तरी तुजकारणें शिक्षा करूं ॥ २ ॥ ऐसी ऐकोनियां वचनोक्ती । सद्भावें नमस्कार घातला प्रीतीं । सद्गुरु माझा श्रीकृष्णमूर्ती । जाणोनि निश्चिती शरण गेलों ॥ ३ ॥ स्वामीनीं कृपा करोनि जाण । ते स्थळीं पाहावें येऊन । जरी तो नापिक[2] असला जाण । तरी शिक्षा करणें मजलागीं ॥ ४ ॥ ऐसी ऐकोनियां वाणी । महंत विस्मित होतसे मनीं । म्हणती कैसा श्रीकृष्ण पाहूं नयनीं । मग तेथूनियां

१ सेवक. २ न्हावी.

ऊठिले ॥ ५ ॥ कृष्णदासाच्या मठांत । शंकराचार्य प्रवेशत । तंव ते स्नान सारोनि त्वरित । अर्चन करीत विष्णूचें ॥ ६ ॥ जयरामाची देखोनि भक्ती । कृष्णरूप धरीत सद्गुरुमूर्ती । जैसा चतुर्भुज वैकुंठपती । आचार्य पाहती तेधवां ॥ ७ ॥ मग अष्टही भाव दाटोनि जाण । निज प्रीतीनें करीत नमन । देखोनि आश्चर्य करिती ब्राह्मण । तयांसि हें खूण कळेना ॥ ८ ॥ जयरामासि शंकराचार्य बोलती । धन्य तुझी सप्रेम भक्ती । कृष्णदास हा पांडुरंग मूर्ती । आम्हांसि निश्चितीं दिसतसे ॥ ९ ॥ आतां काया वाचा आणि मनें । सुखें करावें याचें सेवन । बहिष्कार घालोनि गेले ब्राह्मण । तो आज पासोन मुक्त असे ॥ २१० ॥ ऐकोनि स्वामींचीं वचनोक्ती । सकळ ब्राह्मण मान्य करिती । तेणें प्रतिष्ठा वाढली महंतीं । अद्भुत सत्कीर्ति प्रगटली ॥ ११ ॥ पुढीलें अध्यायीं आरुषवाणी । ग्रंथ वदविला कैवल्यदानी । महीपती त्याचा आश्रय करोनी । प्रसादवाणी बोलत ॥ १२ ॥ स्वति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । प्रेमळ परिसोत भाविक भक्त । पन्नासावा अध्याय रसाळ हा ॥ २१३ ॥ अध्याय ॥ ५० ॥ ओव्या ॥२१३॥ अभंग ॥ १ ॥



अध्याय ५१



श्रीगणेशाय नमः ॥ । जय अनाथबंधु पंढरीनाथा । कृपासागरा रुक्मिणीकांता । विश्वव्यापका कमळोद्भव ताता । तूं निजभक्त कथा वदविसी ॥ १ ॥ तुवां अघटित केलें रुक्मिणीपती । ग्रंथ लिहविला मूढा हातीं । आपल्या दासांची सत्कीर्ती । प्रगट त्रिजगतीं व्हावया ॥ २ ॥ वारियाच्या स्वमतें करोन । हाले तृणाचें बुजावणें । तेवीं मी बोलिलों पुरें उणें । हें तुझे सत्तेनें पांडुरंगा ॥ ३ ॥ दातियाच्या आश्रयें साचार । याचक कंठिती संसार । कां डोळसा धरोनियां कर । आंधळे सत्वर चालती ॥ ४ ॥ तेवीं तुझ्या कृपेनें श्रीहरी । मी बोलिलों आरुष उत्तरीं । आतां हीं वचनें सरतीं करी । सत्कीर्ति चराचरीं विख्यात ॥५॥ आतां सावधान असावें श्रोता । कळसाध्यायासि आली कथा । जैसें दधि[1] मंथनें[2] करितां । मग नवनीतें[3] हातां येतसे ॥ ६ ॥ कां कृषीवळें[4] कष्ट करी फार । अंबुधर वर्षला अपार । मग अठरा धान्यें पिकलियावर । रास थोर पूजिती ॥ ७ ॥ तेवीं पांडुरंगकृपेनें साचार । पिकलें भक्तलीलामृत क्षेत्र । हें तुमचे दैव असे थोर । यासि अंतर असेना ॥८॥ मागिले अध्यायीं चरित्रें निश्चिती । जन जसवंतासि पावला मारुती । आणि निरंजन स्वामीची देखोनि भक्ती । शाळग्रामासि अवचितीं सोंड फुटे ॥ ९ ॥ आणि कृष्णदास जयराम थोर । यानें सद्गुरुसेवा केली आदरें । शंकराचार्यांसि चमत्कार । दाखविला साचार तयानें ॥ १० ॥ आतां धामणगांवामाजी निश्चित । माणकोजी पाटील प्रेमळ भक्त । प्रेमें पांडुरंगाचें भजन करीत । चित्तीं विरक्त होऊनियां ॥ ११ ॥ ममतायी त्याची निजकांता । परम भाविक पतिव्रता । वैराग्य होतांचि प्राणनाथा । अनुकूळ परमार्थी ते असे ॥ १२ ॥ ते प्रथम पुत्र प्रसवली जाण । लखमोजी पाटील नामाभिधान । परी पितयाचें सप्रेम भजन । त्याजकारणें नावडे ॥१३॥ म्हणे संसारासि घालोनि पाणी । पिता लागला नामस्मरणीं । पिशुन हांसती आम्हां लागूनि । लज्जा मनीं वाटतसे ॥ १४ ॥ लखमोजीं धाकुटा सुलक्षण । यमाजी तयाचें नामाभिधान । तिसरा पुत्र विठोबा जाण । असे लहान बालत्वें ॥ १५ ॥ परी मधील यमाजी सर्वकाळ । असे बोधल्यासि अनुकूळ । कीर्तन करितां भक्तप्रेमळ । वाजवीत टाळ्या त्यामागें ॥ १६ ॥ सांडोनि लज्जा मान लौकिक । सोडोनि आशापाश देख । ध्रुपद धरी सप्रेम सुखें । अति हरिखें निजप्रीतीं ॥ १७ ॥ बोधल्याची स्थिति उदार । परम सुशीळ सत्वधीर । याचकासि न वंची अणुमात्र । लुटविलें समग्र शेत त्याणें ॥ १८ ॥ मग प्रसन्न होऊनि हृषीकेशें । थोड्यां ताटासि आणिलीं कणसें । रितीं पेवें तीं बहुवसें । धान्य विशेषें त्यांत भरलें ॥ १९ ॥ तन मन आणि धन । पांडुरंगासि केलें अर्पण । तेणें सत्कीर्ती प्रकटली जाण । म्हणती श्रीहरी प्रसन्न यासि असे ॥२०॥ क्षुधितांसि घालीत अन्न । तृषाक्रांतासि पाजीत जीवनें[5] । कांता पुत्र अनुकूळ म्हणवून । सत्वासि हानी करीना ॥ २१ ॥ यमाजी पुत्र त्याची पत्नी । परम भाविक सुलक्षणी । भागीरथी नाव तिजलागुनी । लावण्यखाणी पतिव्रता ॥२२॥ सासू सासऱ्यांचें मनोगत । राखोनि संसारीं वर्तत । जे जे काळीं याचक इच्छित । तें अनुकूळ करीत नसतांही ॥ २३ ॥ सप्रेमभावें तये

१ दही. २ घुसळणे. ३ लोणी. ४ शेतकरी. ५ आनंदाने. ६ पाणी.

क्षणीं । नामस्मरणी रंगली वाणी । बोधराज उभे राहतां कीर्तनीं । एकाग्र श्रवणीं बैसत ॥ २४ ॥ बोधल्याची सप्रेम स्थिती । आधीं देवासि करोनि आरती । ओवाळुनियां रुक्मिणीपती । मग कीर्तनासि करिती प्रारंभ ॥ २५॥ आधींचें पाठांतर नसेचि जाण । प्रासादिक कविता बोले आपण । म्हणे पांडुरंग रुक्मिणीरमण । टाळ धरोनि उभा असे ॥२६॥ जें सकळ रंगाचें दैवत । कीर्तनामाजी धरी ध्रुपद । श्रोते मिळती असंख्यात । प्रेमभरित मग होती ॥२७॥ टाळविणा मृदंग सुस्वरें । नादब्रह्में कोंदाटलें अंबर । त्यावरी टाळियांचा गजर । ऐकतांचि विरे देहभान ॥ २८ ॥ भागवत धर्म जे निश्चित । नाम माहिमा अति अद्भुत । कीर्तन स्थापित भक्तीपंथ । सप्रेम संत ऐकती ॥ २९ ॥ बोधल्याची सत्कीर्ती ऐकोनि श्रवणीं । अविंध राजा संतोषे मनीं । मग तत्काळ भृत्य पाठवोनि । गेला घेऊनि तयासीं ॥३०॥ बोधराजासि बोले उत्तर । तुवां कुफराणा वाढविला असे थोर । कैसा आहे तुझा पितर । तरी कांहीं चमत्कार दाखवीं ॥ ३१ ॥ मग मांसान्न रांधोनि जाण । झांकोनि आणिलें त्या दुर्जनें । म्हणे हें आतां भक्षूनि जाण । मुसलमान तूं होई ॥ ३२ ॥ ऐसें संकट पडतांचि तेव्हां । मग पांडुरंगाचा मांडिला धांवा । म्हणे पंढरीनाथा देवाधिदेवा । पाव केशवा सत्वरी ॥३३॥ माता पिता बंधु चुलता । तुजवीण नसे पंढरीनाथा । तुवां जरी उपेक्षिलें आतां । तरी मज अनाथा कोण असे ॥३४॥ ऐसा धावां करितां निश्चित । नेत्रीं लोटले अश्रुपात । तों बोधल्यासि पावले रुक्मिणीकांत । तें ऐका निजभक्त भाविकहो ॥ ३५ ॥ मांस आणिलें भक्षावयासी । रुमाल उघडोनि दाखविती तयासी । तों गुलाबाचीं फुलें जैसीं । जाहलीं दृष्टीसीं दिसती ॥ ३६ ॥ ऐसें आश्चर्य देखोनि तेथें । रायासि नेऊनि दाखविती भृत्य । मांसाचीं पुष्पें जाहलीं म्हणत । धन्य धन्य बोलत बोधल्यासी ॥ ३७ ॥ पादशाह स्वमुखें काय बोलत । तूं तरी निधडा वैष्णवभक्त । संकटीं पावला रुक्मिणीकांत । चमत्कार अद्भुत दाखविला॥३८॥ गांव इनाम मागशील कांहीं । तरी तो देतो ये समयीं । परी विष्णुदास निराश सर्वदाही । न घेचि कांहीं धनवित्त ॥ ३९ ॥ सप्रेम भजन करीत पाहीं । परतोनि येतसे धामणगांवीं । तों सत्व पाहावया एके समयीं । शेषशायीं पातले ॥ ५० ॥ मलंग फकीर पंढरीनाथ । होऊनि पातले मंदिरात । बोधला पुढें होऊनि त्वरित । म्हणे काय इच्छित तें मागा ॥ ४१ ॥ अन्न वस्त्र धनवित्त । काय अपेक्षित माग त्वरित । देखोनि बोधल्याचा भावार्थ । कसवटी लावित जगदात्मा ॥ ४२ ॥ तुझी सूनही भागीरथी । स्वरूपें सुंदर लावण्यवती । हे आज अर्पावी मजप्रती । ऐसें श्रीपती बोलिले ॥ ४३ ॥ ऐसें ऐकतांचि उत्तर । संकटीं पडिला सत्वधीर । मग जवळीं बोलावूनि निजपुत्र । तयासि विचार पुसतसे ॥ ४४ ॥ म्हणे अतिथि जातां विमुख ये क्षणीं । तरी निजसत्वासि होईल हानी । काय आहे तुझें मनीं । तें त्वरें करोनि सांग आतां ॥ ४५ ॥ यमाजी परम सत्पुत्र जाण । ऐसें ऐकोनि पितयाचें वचन । चरणावरी मस्तक ठेवून । अमृतवचन बोलतसे ॥ ४६ ॥ म्हणे जे वडिलांचें

१ आकाश.

मनोगत । तेंचि आमुचें परम स्वहित । ते दासीदास मी निश्चित । असो विक्रीत सर्वस्वें ॥ ४७ ॥ ऐकोनि पुत्राची वचनोक्ती । बोधराज संतोषले चित्तीं । मग सूनेसि पुसती निजप्रीतीं । फकीरासि निश्चितीं तुज देतों ॥ ४८ ॥ ऐसीं ऐकोनियां वार्ता । भागीरथी चरणीं ठेवी माथा । म्हणे दासीस उजूर नसे सर्वथा । पुसणें वृथा कामयासी ॥ ४९ ॥ ऐकोनि सकळांचें मनोगत । फकीर बोधल्यासि काय बोलत । इसीं मंगलस्नान घालोनि त्वरित । पंचामृत भोजन दे आतां ॥ ५० ॥ मी दूर घेऊनि जाईन मठीं । मग मोह उपजेल तुझ्या पोटीं । तरी मग विमुख जाईन शेवटीं । ऐसें जगजेठी बोलिले ॥ ५१ ॥ ऐकोनि फकीराचें उत्तर । बोधला सत्वाचा पूर्ण सागर । विकल्प न येचि अणुमात्र । म्हणे स्वस्थ अंतर असों द्या ॥ ५२ ॥ भागीरथीसि मंगळ स्नान । नूतन वस्त्रें परिधान । हळदी कुंकुम देऊन । घातलें भोजन तेधवां ॥ ५३ ॥ फकीर उभा अंगणात । तयाच्या हातीं आणूनि देत । तुझें कल्याण हो ऐसें म्हणत । आशीर्वाद देत निजमुखें ॥ ५४ ॥ स्कंधीं बैसवोनि भागीरथी । फकीर चालिला सत्वरगती । बोधला आनंदयुक्त चित्तीं । अणुमात्र क्षिती असेना ॥ ५५ ॥ गांवांतूनि जातां फकीर । पाहती गांवींचे नारीनर । म्हणती बोधल्यासि वेड लागलें फार । मंत्रसाचार चळला कीं ॥ ५६ ॥ अतीतासि दान देणें जर । तरी अर्पावें अन्नवस्त्र । घरचें मनुष्य दीधलें सत्वर । निष्ठुर अंतर तयाचें ॥ ५७ ॥ ताटिची भाजी न देववे जाण । त्याणें तरी साक्षात दीधली सून । विठोबासि लावूनियां ध्यान । संसार हानी केली कीं ॥ ५८ ॥ ऐशा रीतीं नारीनर । निंदा करिती सर्वत्र । गांवांत कोणी न म्हणती बरें । तों पुढें चरित्र काय झालें ॥ ५९ ॥ फकीराच्या रूपें जगज्जीवनें । भागीरथीचें घेतलें दान । ग्रामशिवेसि जाऊनि त्याणें । काय विंदान करीतसे ॥ ६० ॥ खांद्या खालतीं उतरोनि सत्वरीं । तत्काळ चतुर्भुजरूप धरी । शंखचक्र पितांबरधारी । पहातां नेत्रीं सुख वाटे ॥ ६१ ॥ भागीरथी सप्रेम मेळें । श्रीहरीच्या चरणावरी लोळे । हृदयीं धरोनि घननीळ । परब्रह्म सांवळें पाहातसे ॥ ६२ ॥ ऐशा रीतीं देऊनि भेटी । काय वदतसे जगजेठी । मी आतां येईन तुझिया पोटीं । अन्यथा गोष्टी नसें हे ॥ ६३ ॥ आतां एकदा परतोनि गांवाकडे । पाहे आपुल्या निजनिवाडें । लोकांसि तो फकीर दृष्टीपुढें । दुरोनि रोकडें विलोकिती ॥ ६४ ॥ बोधल्याचे चित्तीं आठवूनि पाय । भागीरथी गांवाकडे पाहे । तों फकीर तेथेंचि अदृश्यगती होय । मग मोकलोनि धाय रडतसे ॥ ६५ ॥ म्हणे स्वामींनीं दीधलें ज्याच्या हातीं । तोही जाहला अदृश्यगती । आतां मज जावया न दिसे क्षिती । म्हणवोनि चित्तीं खेद करी ॥६६॥ आतां परतोनि जरी गेलें घरा । तरी मजवर कोपेल भ्रतारसासरा । काय करावें या अवसरा । जगदुद्धारा पाव आतां ॥ ६७ ॥ प्रपंच परमार्थ हिता । दोंहींकडे अंतरलें आतां । ऐशा रीतीं खेद करितां । तों लोकवार्ता ऐकती ॥ ६८ ॥ मग गावांत येऊनियां त्वरित । बोधल्यासि जन सांगती मात । तुझी सून दीधली फकीरातें । तो तरी गुप्त जाहला ॥६९॥

ग्रामशिंवेपासीं निश्चिती । शोक करीतसे भागीरथी । ऐसी ऐकोनियां वचनोक्ती । आनंद चित्तीं दाटला ॥ ७० ॥ पुत्रासि म्हणे बोधराज । फकीररूपें गरुडध्वज । येतां सत्व राखिलें आज । तरी धर्मराज नाम तुझें ॥ ७१ ॥ यमाजी नाम पहिलें होतें । त्याचा पालट केला त्वरित । धर्मराज सर्वत्र वाहती त्यातें । सत्वधीर निश्चित जाणोनि ॥ ७२ ॥ मग टाळ मृदंग बरोबर । सवें घेऊनि वैष्णववीर । सप्रेम करीत कीर्तन गजर । चालिलें सत्वर ते समयीं ॥७३॥ विठ्ठल नामाचा घोष । जन मिळाले बहुवस । आनंद वाटला सकळांस । म्हणती धन्य दिवस सुदिन हा ॥ ७४ ॥ कीर्तन करिती तये दिवसीं । बोधराज आले शिंवेपासी । भागीरथीनें देखोनि त्यांसी । सद्भावें चरणासी लागली ॥ ७५ ॥ तिजला उठवोनि वैष्णववीर । मस्तकीं ठेविला अभयकर । म्हणे धन्य माते तूं सत्वधीर । सारंगधर जोडला ॥ ७६ ॥ फकीर होवोनि पंढरीनाथ । सत्व पाहावयासी आले होते । तुज खांदा बैसवोनि आणिलें येथें । हें भाग्य अद्भुत वदवेना ॥ ७७ ॥ ऐसीं तिजला बोलोनि वचनें । स्थळीं केलें हरिकीर्तन । मग भागीरथीसि सवें घेऊन । आले परतोनि मंदिरा ॥ ७८ ॥ अरण्यामाजी एकांती । प्रसन्न होऊनि पांडुरंगमूर्ती । आश्वासुनी भागीरथी । वर तिजप्रती दीधला ॥ ७९ ॥ तिच्या पोटाशी जगज्जीवन । आले तेव्हां निजप्रीतीनें । भगवंत बावा नामाभिधान । त्याजकारणें ठेविलें ॥८०॥ त्या भगवंतबावाचा पुत्र पाहे । भोजबावा धामणगांवांत आहे । आषाढासि यात्रा भरत आहे । संत समुदाय मिळे तेथें ॥ ८१ ॥ आपुल्या दासाची सत्कीर्ती । स्वयें वाढवी रुक्मिणीपती । ते युगानुयुगांमाजी निश्चिती । भाविक ऐकती आदरें ॥ ८२ ॥ आणिक चरित्र रसाळ गहन । रसाळ ऐका भाविक जन । एक मध्वनाथ म्हणवोनि ब्राह्मण । जन स्थानामाजी तो होता ॥ ८३ ॥ गंगास्नान करोनि नित्य । नामस्मरणीं लाविली प्रीत । श्रीपांडुरंगातें उपासित । एकाग्र चित्त होऊनियां ॥ ८४ ॥ नामरूपीं जडतां वृत्ती । मग साक्षात भेटले वैकुंठपती । दृष्टांतीं आज्ञा करिती । माझी सत्कीर्ती वाखाणी ॥ ८५ ॥ तुझ्या जिव्हाग्रीं जाण । सरस्वतीचें बैसेल ठाणें । प्रेमें करावें माझें कीर्तन । जगज्जीवन आज्ञापी ॥ ८६ ॥ ऐसा वर देतांचि श्रीपती । तत्काळ जाहली कवित्व स्फूर्ती । आणिक ग्रंथ विलोकितांचि प्रीतीं । तें सत्वरगती पाठ होय ॥ ८७ ॥ टाळ विणा मृदंग निश्चिती । संगीत वाद्यें अनुकूळ होती । कीर्तन करितां सप्रेमयुक्ती । वेधतसे वृत्ती श्रोतयांची ॥ ८८ ॥ वरदवाणी पडतांचि श्रवणीं । श्रोतयांसि आनंद वाटे मनीं । देहभान जाती विसरोनि । नामस्मरणीं निमग्न ते ॥ ८९ ॥ तंव आज्ञा केली पंढरीनाथें । आतां देशावर जाईजे त्वरित । जे भागवतधर्म बोलिले सत्य । तरी स्वमुखें भक्तिपंथ स्थापावा ॥ ९० ॥ पाखंडी कुतर्की छळितां पाहीं । मी तेथें रक्षिता शेषशायी । ऐसी आज्ञा होतांचि पाहीं । प्रयाण तिहीं आरंभिलें ॥ ९१ ॥ फिरत फिरत देशावर । मार्गीं करिती कीर्तनगजर । सवें संप्रदायी दोनचार । मग शहरासि सत्वर ते आले ॥९२॥ औरंगाबादेंत भाविक

प्रेमळ थोर । आणिक धनवंत सावकार । मध्वनाथाचा कीर्तन गजर । सप्रेम आदरें ऐकती ॥ ९३ ॥ बहुत सन्मानें करोनी। श्रीनाथजीसि राहविलें त्यांणीं । कुटुंब आणवावें या ठिकाणीं । ऐसा हेत मनीं सर्वांच्या ॥ ९४ ॥ त्यांचा सद्भाव देखोनि निश्चित । तये ठिकाणीं रमलें चित्त । मग अश्व मनुष्य पाठवोनि त्वरित । निज कांतेतें आणविलें ॥ ९५ ॥ अयाचित वृत्तीनें निर्धारीं । योगक्षेम चाले बरव्यापरी । शिष्यसंप्रदायी नानापरी । सेवेसि निरंतरी सादर ॥ ९६ ॥ जे घरीं करिती हरिकीर्तन । होतसे तेथें ब्राह्मण संतर्पण । नाना-परीचीं मिष्टान्नें । द्विजांकारणें घालिती ॥ ९७ ॥ ऐसा आनंदें बहुवस । नित्य होतसे कीर्तनघोष । प्रसादिक कविता सुरस । लोक सायासें ऐकती ॥ ९८ ॥ मध्वनाथाची सत्कीर्ति जय । देशोदेशीं प्रख्यात होय । म्हणती ऐसें वक्तृत्व कोणासि नये । श्रीहरि साह्य असे तया ॥ ९९ ॥ तों कान्होजी अंगऱ्या मुंबईत । धर्मशीळ उदार बहुत । त्याजपासीं सज्ञानपंडित । चौदा शत मिळाले ॥ १०० ॥ त्यांमाजी श्रेष्ठ मुख्य जाण । वादकांत श्रेष्ठ निपुण । भास्करराय नामाभिधान । पंडिताकारणें बोलती ॥ १ ॥ त्याणें यजमानासि सांगीतलें जाण । कीं प्राकृत न ऐकावें हरिकीर्तन । ऐसें मत स्थापितांचि पूर्ण । मग तयासि यजमान बोलत ॥ २ ॥ हरिदास वक्ते चतुरबहुत । उत्सवासि येती येथ । तयांसी वाद घालूनि निश्चिती । जिंता त्वरीत ये ठायीं ॥ ३ ॥ पंडित प्रतिज्ञा करोनि म्हणे । प्राकृत ग्रंथ आणि कीर्तन । आम्हीं वर्ज्य आजपासून । हरिदास जिंतोन ये ठायीं ॥ ४ ॥ ऐसी प्रतिज्ञा करोनि तेथें । तों हरिदासही पातले बहुत । नित्य वादप्रतिवाद होत । परी तो नाटोपे पंडित तयांसी ॥ ५ ॥ इकडे स्वप्नीं येऊनि पंढरीनाथ । मध्वनाथासि आज्ञा करित । तुवां जावें त्या ठायांत । पुढील कार्यार्थ सांगितला ॥ ६ ॥ ऐसा दृष्टांत होताचि सत्वरा । नाथ चालिले देशावरा । कुटुंबासहित त्या अवसरा । समुदाय बरा घेऊनियां ॥ ७ ॥ टाळ विणे मृदुंग सुस्वर । धृपदही घेतले बरोबर । स्वइच्छा क्रमितां पंथ साचार । आले सत्वर त्या ठायां ॥ ८ ॥ मध्वनाथाची सत्कीर्ती । जनांत आधींच प्रख्यात होती । यजमानासि कळतां निश्चिती । सामोरा प्रीती येतसे ॥९॥ सद्भावें साष्टांग करोनि नमन । प्रीतीनें दिधलें अलिंगन । मग बिऱ्हाडीं स्वयंपाक करोन । जाहलीं भोजनें यथास्थित ॥ ११० ॥ भास्करराय पंडिताकारणें । वृत्तांत श्रुत जाहला पूर्ण । कीं मध्वनाथ आले शहराहून । हरिकीर्तन करावया ॥ ११ ॥ तो सकळ वक्तयांत श्रेष्ठपूर्ण । प्रसादिक कविता करितसे जाण । ऐसें कळतांचि वर्तमान । अहंतां[1] शतगुणें वाढे तया ॥ १२ ॥ म्हणे येवढा जिंतिला जरी आतां । तरी अवध्याच राहती प्राकृत कथा । ऐसी चित्तीं धरोनि अहंता । वैष्णववक्ता द्वेषित ॥ १३ ॥ रात्रि समयीं यजमानें । सदरेसि घातलीं दिव्यासनें । हरिदास आणि पंडित ब्राह्मण । श्रवणासि येऊन बैसले ॥ १४ ॥ भास्कर पंडित मुख्यासनीं । क्रोधें फुरफुरीत तयेक्षणीं । जैसा कां दुसरा जमदग्नी । तैसाच नयनीं दिसतसे ॥ १५ ॥ मध्वनाथ वैष्णव निर्धारीं । कीर्तनासि आले ते अवसरीं । मग ब्रह्मसभेसि नमस्कार करी । सद्भाव अंतरीं धरोनी ॥१६॥ दृष्टीसीं देखोनियां महंत ।

१ अभिमान.

सभानायक अभ्युत्थान देत । मग वाद्यें लावोनिया संगीत । कीर्तन मध्वनाथ आरंभिती ॥ १७ ॥ प्रथमारंभीं मंगळाचरणीं । ज्ञानेशो भगवान म्हणतां वाणी । पंडितासि क्रोध उपजला मनीं । अधर चावोनी कांपत ॥ १८ ॥ जैसें श्रीरामाचें करितां स्मरण । मनांत संतापे रावण । तैसेंच वाटलें त्याज कारणें । मग वादासि जाण प्रवर्तला ॥ १९ ॥ म्हणे हे संन्याश्याचे पुत्र । यांसि म्हणसी विष्णु अवतार । यासि कोणत्या शास्त्रीं आधार । सांग सत्वर ये समयीं ॥ १२० ॥ मध्वनाथ तयासि उत्तर देत । लीला विग्रही वैकुंठनाथ । तयासि कासया उत्तम यात । निजभक्त स्वहितार्थ अवतरे ॥२१॥ मत्स्य कच्छ वराह जाण । स्वयेंचि जाहला जगज्जीवन । परी प्रतापांत कांहीं नसे उणें । वर्णिलें द्वैपायनें भागवतीं ॥ २२ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान । मुक्ताबाई गुणनिधान । हे यतीच्या पोटीं अवतरोन । अघटित विंदान दाविलें ॥ २३ ॥ प्रतिष्ठानींचे द्विजवर । त्यांणीं छळणा केली फार । मग रेडिया हातीं साचार । श्रुति अपार बोलविल्या ॥ २४ ॥ देव आणि भक्तांप्रती । या दोहींस नाहीं कुळयाती । विश्व हितार्थ निश्चिती । अवतार घेती निजलीले ॥ २५ ॥ नाम येवढें श्रेष्ठ साधन । कलियुगीं आणिक नसेचि जाण । यासि भागवत प्रमाण । द्वैपायन साच बोलिले ॥ २६ ॥ गीर्वाण श्लोक म्हणवोनि साचा । अर्थ बिंबवी अंतरींचा । त्यावरी अभंग तुकयाचा । उपनिषद्भागाचा अन्वय ॥ २७ ॥ नाम प्रताप अति निर्मळ । यासि नसेचि काळवेळ । पुत्रामिषें जपतां अजामिळ । मुक्त तत्काळ तो झाला ॥ २८ ॥ गणिका केवळ दुरित खाणी । शुक मिषें राघव वदली वाणी । तिजला नेलें वैकुंठभुवनीं । हे ख्याती पुराणीं अद्भुत ॥ २९ ॥ इतुका संवाद करोनि त्यास । विठ्ठलनामाचा मांडिला घोष । नादब्रह्मचि आलें मुसें । त्या सुखास पार नाहीं ॥ १३० ॥ ऐसें कीर्तन ऐकतां निश्चित । पंडित जाहले गर्व रहित । म्हणती हा तरी नोहे मध्वनाथ । ईश्वर साक्षात दिसतसे ॥ ३१ ॥ भास्करराय जो श्रेष्ठ पंडित । उभा ठाकोनि सद्भावें नमित । प्रेमें हृदयीं धरोनि नाथ । आलिंगन न देत निजप्रीतीं ॥ ३२ ॥ म्हणे नामाविरहित श्रेष्ठ साधन । सर्वथा आणिक नसेचि जाण । सुखें करावें हरिकीर्तन । तरणोपाय येणें होतसे ॥ ३३ ॥ आम्ही पुराणें सांगतों संस्कृत । परी अर्थ प्राकृत बोलणें लागत । तैशाच रीतीं बोलिले संत । समजलें चित्तांत आमुच्या ॥ ३४ ॥ शब्द बोलोनि ऐशा रीतीं । मग परस्परें आलिंगन देती । नामघोषें हरिदास गर्जती । नाथासि म्हणती धन्य धन्य ॥ ३५ ॥ मग उजळोनि मंगळारती । ओवाळिला श्रीरुक्मिणीपती । नामघोषें वैष्णव नाचती । खिरापती वांटिल्या ॥ ३६ ॥ तेव्हां वस्त्र अलंकार आणि धन । यजमानासि देत प्रीतीनें । परी तें कांहीं न केलें मान्य । म्हणती निराशमनें आम्हीं आलों ॥ ३७ ॥ पंडित आणि हरिदास ब्राह्मण । यांसि गौरवीं निजप्रीतीनें । तेणेंचि आमुचें संतोषें मन । सुख संपन्न असो कीं ॥ ३८ ॥ ऐसें बोलोनि ते अवसरीं । तेथोनि निघाले सहपरिवारीं । भक्तीपंथ स्थापोनि माघारीं । आले शहरीं

परतोनियां ॥ ३९ ॥ तंव अवरंगपुरामजी निश्चित । एक लक्ष्मणपंत नामें गृहस्थ । तो नाथासि होऊनि शरणागत । अनुग्रह त्वरित संपादिला ॥ १४० ॥ कुटुंब रक्षणा कारणें । चावडीवर रोजगार केला त्याणें । दिवसा प्रपंच धंदा सारून । मग स्वामीचें दर्शन घेतसे ॥ ४१ ॥ कीर्तन करितां मध्वनाथ । लक्ष्मणपंत धरी ध्रुपद । टाळ वाजवित आपुल्या हातें । न्यून किंचित पडेना ॥ ४२ ॥ स्वर अवसान यथास्थित । उभयतांचें एकचित्त । कीर्तनीं रंग येतसे अद्भुत । आश्चर्य समस्त लोक करिती ॥ ४३ ॥ लक्ष्मण सन्निध नसतां जाण । ते दिवसीं न होय हरिकीर्तन । तोही सहस्र कामें टाकून । समयीं धांवोनि येतसे ॥ ४४ ॥ प्रपंच धंदा सारोनि सत्वर । ध्रुपद धरितसे प्रेमादरें । सेवा घ्हणी रुक्मिणीवर । जाहला साचार त्या पुण्यें ॥ ४५ ॥ तंव कोणे एके अवसरीं । मध्वनाथाच्या निजमंदिरीं । महाउत्साह आला सत्वरी । साहित्य लवकरी तें झालें ॥ ४६ ॥ तों लक्ष्मणपंताचा यजमान । विसाजीपंत नामाभिधान । त्याणें हिशोब पहातांचि जाण । अंतर दिसोन येतसे ॥ ४७ ॥ आणिक लेखकांच्या स्वमतें । द्रव्य निघालें सोळाशत । न देचि म्हणोनि कोपूनि त्यातें । बंदिखानियांत ठेविलें ॥४८॥ हाजी महंमद खान थोर । कोतवाल होता चावडीवर । तयासि सांगोनि तो द्विजवर । कारागृहीं सत्वर घातला ॥४९॥ बहुत उद्विग्न होऊनि अंतरीं । रात्रंदिवस चिंता करी । म्हणे उत्सव मांडिला सद्गुरुवरीं । माझी तों परी हे झाली ॥१५०॥ कृपासागरा पंढरीनाथा । तूं मज सोडवोनि नेई आतां । तुजवांचोनि अनाथनाथा । दीनासि रक्षिता कोण असे ॥ ५१ ॥ इकडे मध्वनाथासि ते समयीं । येऊनि सांगती संप्रदायी । म्हणती लक्ष्मणासि यजमानानेंही । कारागृही घातलें ॥५२॥ घरीं उत्साह मांडिला असे । कीर्तनाचें साहित्य होय कैसें । मग विसोजीपंताच्या मंदिरास । विष्णुदास चालिला ॥५३॥ कचेरीस बैसले थोर थोर । उभे राहिले त्यांसमोर । म्हणती लक्ष्मणपंतासि दिवस चार । करा साचार मज स्वाधीन ॥५४॥ महोत्सव झालिया निश्चिती । आणूनि देऊं तुमच्या हातीं । मग जैसी असेल धर्मनीती । तैशाच रीतीं वर्तावें ॥५५॥ ऐसें सांगतां विष्णुभक्त । परी ते सर्वथा नायकती मात । म्हणती रुपये देऊनि सोळा शत । आपुल्या शिष्यातें घेऊनि जा ॥ ५६ ॥ मध्वनाथ म्हणती ते समयीं । उत्साहासि येतील संप्रदायी । तयांसि आज्ञा करोनि पाहीं । द्रव्य ते समयीं देववीन ॥५७॥ ऐसें स्वमुखें सांगतां जाण । परी विश्वास नये त्याजकारणें । नेणोनि विष्णुभक्तांचें महिमान । धनांधपणें वर्तती ॥ ५८ ॥ मान्य न करितां विष्णुभक्तास । मग परतोनि आले मंदिरास । तों कौतुक दाखविलें हृषीकेशें । तें सज्जनीं सावकाश ऐकिजे ॥ ५९ ॥ उत्साहासि प्रारंभ दुसरे दिनीं । वैष्णव पूजिले प्रीती करूनी । विप्रांसि मिष्टान्नें जेववोनी । दक्षिणा देऊनि तृप्त केलें ॥१६०॥ गरुडटके निशाण भेरी । वाद्यें वाजती अति गजरीं । कीर्तनासि प्रारंभ जाहला रात्रीं । श्रवणासि सत्वरी लोक आले ॥ ६१ ॥ आणिक हरिदास होते इतर । त्याणीं कीर्तन केलें एक प्रहर । परी सर्वांचें मनोगत साचार । कीं नाथाची उत्तरें ऐकावीं ॥ ६२ ॥ तयांसि म्हणे

प्रेमळ भक्त । माझें साहित्य नसेचि किंचित । तेव्हां लक्ष्मण आठवला मनांत । सद्गदित कंठ जाहला ॥ ६३ ॥ ऐसी अवस्था देखोनि तेथें । सदय हृदय कोणी होते । तयांच्या नेत्री अश्रुपात । प्रेम भरित पातले ॥ ६४ ॥ प्रेमळासि संकट पडतां भारी । काय लाघव करीत श्रीहरी । तें म्हणाल जरी कैशापरी । तरी सादर चतुरीं परिसिजे ॥६५॥ मध्वनाथाचें वचन निश्चित । ऐकिलें नाहीं त्या उन्मत्तें । मग फकीर वेष धरोनि त्यातें । शिक्षा करीत जगदात्मा ॥ ६६ ॥ आपुल्या दासाची करितां छळणा । ते सर्वथा न साहे जगज्जीवना । कोतवाल निद्रित असतां जाणा । तों वैकुंठ राणा काय करी ॥ ६७ ॥ काजीच्या रूपें श्रीकरधरें । तयासि स्वहस्तें दीधला मार । वळ उमटले पाठीवर । आंतून रुधिरें वाहतसे ॥ ६८ ॥ सक्रोध उत्तर बोलतसे कायी । लक्ष्मण रक्षिला कारागृहीं । तरी मध्वनाथ राहती जये ठायीं । नेऊनि लवलाहीं यासि घालीं ॥ ६९ ॥ अनमान करिशील साचार । तरी आणिक शिक्षा पावसील थोर । इतुका दाखवोनि चमत्कार । मग सारंगधर काय करी ॥ १७० ॥ विसाजीपंत निद्रित मंदिरीं । तों फकिराच्या रुपें पातलें हरी । तयासि शिक्षा लावोनि बरी । ऊठ लवकरी म्हणतसे ॥ ७१ ॥ इकडे हाजीमहंमद कोतवाल जाण । परम भयभीत होतसे मनें । लक्ष्मणपंतासि सवें घेऊन । सत्वर गमन करीतसे ॥ ७२ ॥ मशाल प्यादा बरोबरी । घेऊनि बैसला आश्वावरी । विसाजीपंताचिया मंदिरी । जुन्या बाजारी पातला ॥ ७३ ॥ रात्र जाहली दोन प्रहर । निद्रित अवघे असती चाकर । मग हांक मारोनि थोर । धन्यासि सत्वर उठविलें ॥ ७४ ॥ बाहेर येवोनि पाहे सत्वरीं । तों कोतवाल उभा असे द्वारीं । वळ उमटले पाठीवरी । ते दाखवित लवकरी तेधवां ॥ ७५ ॥ म्हणे तुम्हीं लक्ष्मण राखिला साचार । यास्तव खुदाने दीधला मार । तरी मी आतां न करी संसार । होतों फकीर ये समयीं ॥ ७६ ॥ वस्त्रें भूषणें टाकूनि जाण । गळ्यांत कफनी घातली त्याणें । उदंड बुझाविला धनियानें । परी नायकें वचन सर्वथा ॥ ७७ ॥ जे कां केवळ तामसी नर । त्यांचें एक वेळ पालटे अंतर । रजोगुणियांसि घडतां चमत्कार । परी संसार न सोडिती ॥ ७८ ॥ हाजी महंमद खान थोर । बैसोनि आला ज्या अश्वावर । लक्ष्मणासि बैसवोनि त्यावर । उत्साहासि सत्वर पाठविलें ॥ ७९ ॥ इकडे मध्वनाथ कीर्तनीं बैसतांचि देख । हांसोनि सांगती सकळ लोकां । आणिक लोटतां दोन घटिका । लक्ष्मण सखा येईल ॥ १८० ॥ शिष्य संप्रदायी ते समयीं । ऐकोनि आश्चर्य करिती जीवीं । तो तरी घातला कारागृहीं । यथार्थ कोणाही न वाटे ॥ ८१ ॥ तों दोन घटिका लोटतां सत्वर । बैसोनि आले अश्वावर । मशाल मनुष्य बरोबर । लोक सर्वत्र पाहती ॥ ८२ ॥ सद्भावें येवोनि लवलाहीं । मस्तक ठेविला सद्गुरु पायीं । वृत्तांत निवेदन केला सर्वही । आश्चर्य जीवीं लोक करिती ॥ ८३ ॥ मग मध्वनाथ त्या समयासी । उभे राहिले कीर्तनासी । आनंद वाटला सकळांसी । एकाग्र श्रवणासि ते झाले ॥ ८४ ॥ जयजयकार तये वेळी । आनंदली भक्तमंडळी । विठ्ठल

१ रक्त. २ देवाने.

नामें करटाळी । कीर्तन कल्लोळीं होतसे ॥ ८५ ॥ अरुणोदय होय तोंवर । कीर्तन जाहलें चार प्रहर । मग मंगळारती करोनि सत्वर । रुक्मिणीवर ओवाळिला ॥ ८६ ॥ क्षेत्रवासी लोक संपूर्ण । मध्वनाथाचें करिती स्तवन । अवघे म्हणती धन्य धन्य । चमत्कार दारुण दाखविला ॥ ८७ ॥ कोतवाल हाजीमहंमद खान । अनुतापें फकीरी घेतली त्याणें । मग मध्वनाथाचें दर्शन घेऊन । रोजांत जाऊन बैसला ॥ ८८ ॥ कीर्तन गजरीं प्रेमभरित । नित्य नित्य अखंड होत । गोपाळ काला आणि ललित । महोत्साहांत नाथ करिती ॥ ८९ ॥ तों सेंदुरवाडे गृहस्थ कोणी । नाथासि विनंति केली त्याणी । आतां आमुच्या गांवास येउनी । वास्तव्य ते स्थानीं करावें ॥ १९० ॥ पुढील भविष्य जाणोनि निश्चिती । त्याच्या वचनासि मान देती । मग कुटुंबासहित निज प्रीतीं । केली वस्ती तये ठायीं ॥ ९१ ॥ गांवासमोर नालियांत । म्हसोबा म्हणोनि दैवत होतें । गणपती नांव ठेविलें त्यातें । महोत्सव बहुत मग केला ॥ ९२ ॥ मध्वनाथाची देखोनि भक्ती । तेथे पातली भागीरथी । तिचें कुंड बांधिलें निश्चिती । स्नान करिती जन लोक ॥ ९३ ॥ ऐसी महंती वाढतां निश्चित । दर्शनासि लोक दुरोनि येत । वृद्धत्व अंगासि आलिया बहुत । शरीर अशक्त जाहलें ॥९४॥ मनांत चिंता उद्भवली ऐसी । आतां न जावें पंढरीसी । विठोबा सगुण दर्शन देसी । सुख जीवासि तैं होय ॥ ९५ ॥ ऐसी अवस्था पाहतां मनीं । तों दृष्टांति सांगे चक्रपाणी । उद्धवभट जोशियाच्या अंगणीं । तये ठिकाणी मी आहें ॥९६॥ तरी तुवां जाऊनि तया ठायास । भूमींत उकरी दीड पुरुष । ते स्थळीं माझी मूर्ति असे । संशय मनास न धरावा ॥ ९७॥ तुझा भक्ती प्रेमा देखोनि । यास्तव आलें कैवल्यदानी । ऐसा दृष्टांत देखतां स्वप्नीं । आनंद मनीं वाटला ॥ ९८ ॥ दुसरें दिवशीं मध्वनाथ । प्रातःस्मरण करोनि त्वरित । उद्धवभटाच्या वाडियांत येत । तयासि वृत्तांत सांगीतला ॥ ९९ ॥ म्हणती तुझें अंगणीं भूमी आंत । पांडुरंग मूर्ति असे निश्चित । खोरें कुदळी आपुल्या हातें । घेउनि उकरी तेधवां ॥ २०० ॥ प्रथम हात लावला पाहीं । मग उदंड मिळाले संप्रदायी । माती उकरितां ते समयीं । उल्हास जीवीं सकळांच्या ॥ १ ॥ दीड पुरुष उकरितां जाण । देखिली पांडुरंग मूर्ति आणि रुक्मिण । सुंदर आकृती सुहास्य वदन । सुकुमार ठाण साजिरें ॥२॥ कौतुक देखोनि तये वेळीं । जयजयकारें पिटिली टाळी । आनंदली भक्तमंडळी । नामघोषें निराळी कोंदली ॥ ३ ॥ मग उद्धवभटाच्या वाडियांत । देवालय केलें मध्वनाथें । मूर्ति स्थापना केली तेथें । सुदिन मुहूर्त पाहूनियां ॥ ४ ॥ वेदोक्त मंत्रें करोनि जाण । अभिषेक करिताति ब्राह्मण । पंचामृत घालोनि स्नान । वस्त्रें भुषणें लेवविली ॥ ५ ॥ बुक्कासुमनें तुळसी हार । धूप दीप निरांजन कापूर । पक्वान्नांचें वाढोनि पात्र । नैवेद्य सत्वर आणिला ॥ ६ ॥ मंगळवाद्यें द्वारीं वाजती । टाळ मृदंग घोष होती । मग उजळोनि मंगळारती । रुक्मिणीपती ओंवाळिला ॥ ७ ॥ नानापरींचीं करोनि अन्नें । केलें ब्राह्मण संतर्पण । रात्रीं होतसे

हरिकीर्तन । ऐकतां श्रवण सुखावती ॥ ८ ॥ गोपाळकाला आणि ललित । श्रीमध्वनाथें केलें निश्चित । अद्यापि उत्सव मार्गेश्वरांत । अद्भुत ते ठायीं ठायीं ॥ ९ ॥ मध्वनाथाचा शिष्य निश्चित । लक्ष्मणपंतानें धरिलें ध्रुपद । तयासि सोडविलें पंढरीनाथें । तें चरित्र समस्त ऐकिलें ॥२१०॥ दुसरें कावोपंत नगरकर । त्यांसही सेवा घडली थोर । द्रव्य खर्चोनियां फार । उत्सव थोर तिहीं केला ॥ ११ ॥ सद्गुरुकृपें करोनि निश्चिती । आत्मवत भासे त्रिजगती । श्रवण कीर्तनीं धरोनि आर्ती । मग पंढरीसि निश्चिती राहिला ॥ १२ ॥ चतुर्थाश्रम घेऊनि पाहें । चंद्रभागेंत ठेविला देह । तिसरा शिष्य अमृतराय । प्रख्यात आहे जनांत ॥ १३ ॥ तयासि लाधतां कविता शक्ती । अद्भुत वर्णिली भगवत् कीर्ती । ऐसी संतांची अद्भुत स्थिती । मी मंदमती काय वार्णू ॥ १४ ॥ जैसीं तैसीं अरुष उत्तरें । ग्रंथीं लिहिलीं साचार । केव्हां कैसें जाहलें चरित्र । हा आठव अणुमात्र मज नाहीं ॥ १५ ॥ हृदयीं बैसोनि रुक्मिणीपती । क्षणक्षणां आठव देतसे चित्तीं । अक्षरें लेहवीत माझ्या हातीं । तयासि आवडी भक्तकथा ॥ १६ ॥ श्रीपांडुरंगाच्या कृपादानें । ग्रंथीं लिहिलीं प्रसादवचनें । त्यांचें पुढतीं का मनन । मग विसर तेणें पडेना ॥ १७ ॥ प्रथम अध्यायामाजी जाण । गणेश सरस्वती संतस्तवन । मग सद्गुरु तुकारामाचें पूजन । वाक्पुष्पें जाण अर्पिलीं ॥ १८ ॥ अग्रदासाच्या कृपें करोन । नाभाजीसि जाहलें पूर्ण ज्ञान । मग संतचरित्रें वर्णिलीं तेणें । हेंचि निरूपण प्रथमांत ॥ १९ ॥ पुरंदरें शापितां मरुद्गणास । चांगदेव अवतार झाला असे । वाटीचा ईश्वर केला प्रत्यक्ष । द्वितीयांत सुरस हे कथा ॥ २२० ॥ वेद बोलविले रेडिया हातीं । ज्ञानदेवाची ऐकिली कीर्ती । चांगदेव भेटीसि जाऊं म्हणती । तृतीयांत निश्चिती हे कथा ॥ २१ ॥ सर्पांचे चाबुक व्याघ्रांचीं वाहनें । भेटीसि येतां मरुद्गण । ज्ञानदेवें भिंती चालविली जाण । चतुर्थांत निरूपण हें असे ॥ २२ ॥ पंचमाध्यायीं कथा निश्चित । लिखित पांसष्टीचा पुसतां अर्थ । शिष्यां मागतां बळिदानातें । मग चौदाशत पळाले ॥ २३ ॥ षष्ठाध्यायीं कथा पाहीं । पुढती अवतार नारायण डोहीं । मग पंढरीसि येऊनि लवलाहीं । श्रीपांडुरंग पायीं लागले ॥ २४ ॥ अस्थि धुवोनि पाजितां निश्चित । विधवेसि जाहला तत्काळ सुत । भातवंच्या नांव ठेविलें त्यातें । हें सविस्तर सातव्यांत असे ॥ २५ ॥ अष्टमाध्यायीं कथा जाण । कृष्णबाई होऊनि जगज्जीवन । यादवाच्या स्त्रीचें बाळंतपण । महीतीरीं संपूर्ण सारिलें ॥ २६ ॥ नवमाध्यायीं कथा साजिरी । चांगदेव सत्वर गेले बेदरीं । यवनरायाची उठवोनि नारी । पंढरीसि सत्वरी मग आले ॥ २७ ॥ पांडुरंगाचें देऊळ करोनि त्वरित । चांगदेव जाहले समाधिस्थ । द्वादशवर्षी पुत्रांसि भेटत । चरित्र दशमांत हें झालें ॥ २८ ॥ एकादशांत अनुसंधान । नानक सिद्धाचें निरूपण । कबीर रोहिदासाचें भांडण । द्वादशांत हें असें ॥ २९ ॥ त्रयोदशांत कथासार । श्रीएकनाथ चरित्र लागलें थोर । जनार्दनासि शरण जातां सत्वर । दीधला वर दत्तात्रेयें ॥ २३० ॥

चौदाव्यांत कथा अद्भुत। तीर्थांसि धाडिले एकनाथ। आजा आजी करिती खंत। मग जनार्दन तयांतें आश्वासी ॥ ३१ ॥ सद्गुरु आज्ञेनें निश्चित। प्रतिष्ठानीं राहिले एकनाथ। विठ्ठलरूप धरिले ध्रुपद। चरित्र पंधराव्यांत तें झालें ॥ ३२ ॥ सोळाव्यांत अनुसंधान। देवें उद्धवाचें रूप धरून। एकनाथाचें वारिलें ऋण। निश्चिय परिपूर्ण देखोनियां ॥ ३३ ॥ श्रीनाथाची देखोनि भक्ती। द्विजासि स्वप्न दर्शविलें रातीं। आली पांडुरंगाची सगुणमूर्ती। सतराव्यांत ख्याती हे झाली ॥ ३४ ॥ अठराव्यांत कथा निश्चित। पंढरीसि गेले एकनाथ। भानुदासाचें चरित्र समस्त। गाइलें कीर्तनांत निजप्रीतीं ॥ ३५ ॥ दंडवत्यासि समाधीं बैसविलें सत्वर। यास्तव ब्राह्मणीं छळिलें फार। नंदिनें कडबा भक्षिला सत्वर। एकुणिसाव्यात चरित्र हें झालें ॥ ३६ ॥ श्रीखंड्या ब्राह्मण होऊनि हरी। विसाव्यात पाणी वाहिलें घरीं। आणि बंदिवान महार येतां मंदिरीं। संरक्षण करी तयाचें ॥ ३७ ॥ दोन रूपें धरोनि एकनाथें। अनामिकाचें पुरविलें आर्त। आणि पंडितीं बुडविलें भागवत। एकविसाव्यांत मात हे झाली ॥ ३८ ॥ बेविसाव्यांत कथा निश्चित। एकनाथ वाचितां भागवत। स्त्रीचें रूप धरोनि तेथ। श्रवणासि येत विष्णुकन्या ॥३९॥ ब्राह्मणीचें घरीं वैष्णववीर। जेवितां निघालीं सहस्त्रपात्रें। पुत्रासि दाविला चमत्कार। तेविसाव्यात चरित्र हें झालें ॥२४०॥ गावजी मुका जन्मवर जाण। त्याहातीं करविलें रामायण। मग एकनाथ समाधिस्थ झाले आपण। चोविसाव्यांत निरुपण हें असे ॥४१॥ विश्वंभर आणि आमाबायी। त्यांची भक्तीं देखोनि पाहीं। पंढरीहून शेषशायी। पंचविसाव्यांत देहुगांवीं पातलें ॥ ४२ ॥ बोल्होबाची भक्ती देखोनि गोमटी। नामदेव अवतरलें त्याच्या पोटीं। तुका नाम ठेविलें शेवटीं। सव्विसाव्यांत गोष्टी हे झाली ॥ ४३ ॥ मिरच्या विकितां वैष्णवभक्त। देवें उधार उकळिला समस्त। खळाच्या द्वारीं गळफास देत। सत्ताविसाव्यांत मात हे असे ॥४४॥ तुक्याची कांता अन्नाविण। अठ्ठाविसाव्यांत पावली मरण। मग संसाराचा त्याग करोन। पर्वतीं जाऊन बैसले ॥४५॥ एकुणतिसाव्यांत कथा निश्चित। तुका राखित बैसला शेत। तें पक्षियांनीं भक्षितां समस्त। मग पंढरीनाथ पावले ॥४६॥ आवलीसि कांटा मोडतां निश्चित। पांडुरंगें काढिला स्वहस्तें। देऊळही सिद्ध झालें त्वरित। तिसाव्यांत मात हे झाली ॥ ४७ ॥ आवलीसि स्नान करितां सत्वर। देवें नेसविला पितांबर। साहित्य करोनि जेवविले पितर। एकतिसाव्यांत चरित्र हें झालें ॥ ४८ ॥ बत्तिसाव्यांत कथा निश्चिती। तुक्यासि जाहली कवित्वस्फूर्ती। म्हैस तस्करीं[१] नेली अवचितीं। ते वैकुंठपती आणितसे ॥ ४९ ॥ तेहतिसाव्यांत अनुसंधानीं। तुकयासि उपदेश झाला स्वप्नीं। देवावर लेंकरूं आपटितां राणी। तेव्हांच चक्रपाणी पावला ॥ २५० ॥ चवतिसाव्यांत कथा सुंदर। कांतेसि उपदेश केला सत्वर। मग द्विजांहातीं लुटविलें घर। उदास अंतर होऊनियां ॥ ५१ ॥ पस्तिसाव्यांत ऐसी मात। अभंग बुडविले उदकांत। ते निजांगें रक्षितां पंढरीनाथ। मग रामेश्वर येतसे

१ चोरांनी.

शरण तेव्हां ॥५२॥ तुकयाची स्थिति देखोनि जाण । अनगड पावला समाधान । शिवाजीराजा आला शरण । छत्तिसाव्यांत कथन हें असे ॥ ५३ ॥ महादेवासि जातां भक्त वैष्णव । संन्याशाच्या रूपें जेविला शिव । पंढरीसि पत्र धाडिलें अपूर्व । सदतिसाव्यांत लाघव हें असे ॥ ५४ ॥ श्रीपाद दोघे संन्यासी । फिर्याद गेले पुणियासी । देवें चमत्कार दाखविला त्यांसी । अडतिसाव्यांत ऐसी कथा असे ॥ ५५ ॥ चर्म चिरोनि आपुल्या हातें । कापूस दाविला देवातें । अंगावर तुक्याच्या पक्षी बैसत । एकुणचाळिसाव्यांत हे कथा ॥५६॥ चाळिसाव्यांत लीला दाधविली जनीं । देहासहित गेले वैकुंठभुवनीं । देव वर्पले दिव्य सुमनें । देखती नयनीं संतसाधु ॥ ५७ ॥ एकेचाळिसाव्या पासूनि साचार । अध्यांत चरित्रें आहेति फार । त्या संतांचीं नावें सविस्तर । ऐका सादर भाविकहो ॥ ५८ ॥ एकेचाळिसाव्यांत चरित्रें जाण । केशवस्वामी बाजीद पठाण । संतोबा पंवार मालोपंताकारणें । जगज्जीवन भेटले ॥५९॥ नरपाळ राजा प्रेमाबायी । रामराय राजा शिळाबायी । रमाबाई पिलाबायी । बेचाळिसाव्यांत पाहीं वर्णिलीं ॥ २६० ॥ बोगरासा रामचंद्र भक्त । रामानुज सुहागशा निश्चित । जयमल्ल पन्हाजी रजपूत । त्रेचाळिसाव्यांत कथा यांची ॥ ६१ ॥ हरिपाळ जसु कुणबी निर्धारीं । धनाजाटांचें शेत पेरिलें भारी । सुखानंद माधवदासा रक्षी हरी । चव्वेचाळिसाव्यांत परी हें असे ॥ ६२ ॥ लाल्हन खोजी त्रिपुरदास । त्रिलोचन सोनार हरिव्यास । सजणकसाई भक्त विशेष । पंचेचाळिसाव्यांत हे कथा ॥६३॥ नरवाहन अगंदमाधौसिंग पाहीं । सेखावत राजा कुंवराबाई । गिरधरलालासि शेषशायी । शेचाळिसाव्या अध्यायीं भेटले ॥ ६४ ॥ काजीमहंमद शेखरीद जाण । बलखबुखारी राजा यवन । जयरामबाबा रामचंद्रभट्ट ब्राह्मण । सत्तेचाळिसाव्यांत निरुपण हें असे ॥ ६५ ॥ रत्नाकर ब्राह्मणें बोळली गोमती । सुरतेंत माधवदासें केली ख्याती । विठ्ठल पुरंदराची देखोनि भक्ती । अठ्ठेचाळिसाव्यांत रुक्मिणीपती पावला ॥ ६६ ॥ नरसिंहसरवतीचें चरित्र थोर । मंहा मुद्गलभट्ट वैष्णववीर । तयासि भेटले श्रीरामचंद्र । एकुणपन्नासाव्यांत चरित्र हें असे ॥ ६७ ॥ पन्नासाव्यांत चरित्रें तीन । जनसवंत आणि निरंजन । कृष्णदास जयराम आख्यान । अद्भुत विंदान हें झालें ॥ ६८ ॥ एकावन्नाव्यांत हेचि ख्याती । बोधल्याचा निश्चय पाहतां श्रीपती । दानासि सून दीघली निश्चिती । भागीरथी सत्वधीर ॥ ६९ ॥ मध्वनाथाची देखोनि भक्ती । सेंदुरवाड्यांत आलें वैकुंठपती । हा शेवटी अध्याय निश्चिती । सांप्रत संतीं ऐकिला ॥ २७० ॥ ऐसीं एकावन्न अध्यायांत सविस्तर । संतचरित्रें वर्णिलीं फार । शेवटील अध्यायांत साचार । अन्वय अणुमात्र सांगीतला ॥ ७१ ॥ आणिक निजभक्त उदंड असती । ते वर्णिले श्रीभक्तविजयग्रंथीं । कांहीं संतलीलामृतीं । त्यांची नावें निश्चिती अवधारा ॥७२॥ सकळ भक्तांत श्रेष्ठ थोर । नामदेव उद्धवाचा अवतार । सांवतामाळी नरहरि सोनार । कुबा कुंभार आणि गोरा ॥ ७३ ॥ जगमित्र नागाखेचरविसा । साळ्या रसाळ भागवत परसा । सुरदास आणि बहिरापिसा । वैकुंठधीशा आवडती ॥७४॥ जयदेव स्वामी कर्माबायी ।

नरसीमहंत मिराबायी । आणि राजायी गोणायी । इहीं शेषशायी वश्य केला ॥ ७५ ॥ कमाल भक्त तुळसीदास । पिपाजी आणि सूरदास । मथुरेमाजी गोविंददास । जो खेळे श्रीहरीसी सर्वदा ॥ ७६ ॥ परमानंद जोगा विसोबाखेचर । पद्मनाभ ब्राह्मण चोखा महार । सुमती आणि कमळाकर । पद्माकर पुत्र त्याचा ॥ ७७ ॥ नारायण महादेव गोविंद जाण । धाकुटा विठ्ठल नामाभिधान । हें नामयाचे पुत्र चौघेजण । यांसि जगज्जीवन न विसंबे ॥ ७८ ॥ नरहरि आणि श्रीधरपंत । लाडुभक्त जोतिपुरांत । नारायणस्वामी परमहंस निश्चित । लीला अद्भुत जयांची ॥७९॥ निंबराज आणि रामदास । मदनमोहन सुरदास । गणेशनाथाचा कीर्तिघोष। आवडे देवास निजप्रीतीं ॥२८०॥ उद्धवचिद्घन भक्त थोर । ज्यांणें संतचरित्रें वर्णिलीं फार । रंगास्वामी निगडीकर । वैष्णववीर पूर्णज्ञानी ॥८१॥ श्रीधर स्वामी सज्ञान देखा । ज्यांणीं भागवतावरी केली टिका । शंकराचार्य अवतार देखा । जो कर्ममार्ग निका प्रतिपादी ॥८२॥ हरी आनंद हस्तामळ । राघवनंद भक्त-प्रेमळ । राघवनंदासीं सर्वकाळ । खेळे घननीळ सर्वदा ॥८३॥ विष्णुश्याम चतुराचार्य जाण । सनकादिक आनंदानंदन । निमानुज माधवनंदन । यांणीं जगज्जीवन आराधिला ॥ ८४ ॥ मत्स्येंद्र गोरक्षगैनी जे योगियांमाजी शिरोमणी । गोपीचंद मैनावती राणी । जालंधरमुनी सिद्धपुरुष ॥ ८५ ॥ चर्पटी आणि चौरंगी । हाळसी अवघड प्रसिद्ध जगीं । मृत्युंजय तो महायोगी । मुध्यासंगीं देव वसे ॥ ८६ ॥ सेनन न्हावी त्रिलोचन । ज्ञानदेव निवृत्ति सोपान । मुक्ताबाई गुणनिधान । ज्यांसि रुक्मिणीरमण न विसंबे ॥ ८७ ॥ धांगोचांभार कुंभार राका । बाका त्याचीं पत्नी देखा । कन्येचें नांव वंका । ज्याणीं वैकुंठनायका वश्य केलें ॥ ८८ ॥ मुकुंदराज जगविख्यात । ज्यांणीं विवेकसिंधु रचिला ग्रंथ । मुधोपंत दामाजीपंत । हे भक्त देवातें आवडती ॥ ८९ ॥ कान्होपात्रा पिंपळा बाळा । मिरा गिरधर दास भोळा । आलह योगानंदाची प्रेमळ । घननीळा जवळ तिष्ठतसे ॥ २९० ॥ कर्मचंद सारी रामदास । श्रीरंग आणि कीलकदास । भुवन आणि हरिव्यास । भक्त देवास आवडती ॥ ९१ ॥ कृष्णचैतन्य बनसीधर । कमळाकर्माळी भक्त थोर । नाम पाठक वैष्णववीर । मुक्तेश्वर महाकवी ॥ ९२ ॥ वल्लभाचार्य बाळकराम । उद्धवराज भक्त निःसीम । विमळानंदाचें देखोनि प्रेम । पुरुषोत्तम तेथें वसे ॥ ९३ ॥ चतुरा नागा लक्ष्मण । चिंतामणि चतुर्भुज नृपनंदन । सुखानंद आणि नारायण । करिती भजन सर्वदा ॥ ९४ ॥ दामोदर गंगा कवीश्वर जाण । प्रयागदास आनंद नंदन । माधवदास मधुसूदन । यांसि जगज्जीवन न विसंबे ॥ ९५ ॥ रमाबाई लासा गोमती । वेणूबाई गिरिजा सती । कूर्मदासाची देखोनि भक्ती । पांडुरंमूर्ती येतसे ॥ ९६ ॥ केशव चैतन्य महाभक्त । राघव चैतन्य जगविख्यात । बावा चैतन्य प्रसिद्ध संत । ज्यांणीं भक्तिपंथ स्थापिला ॥ ९७ ॥ हरिदास कान्हया निर्धारीं । ज्याचें वास्तव्य पंढरपुरीं । प्रल्हाद बडावियाच्या बरोबरी । वागे श्रीहरी सर्वदा ॥ ९८ ॥ विसोबा सराफ निंबसोडकर । जो परम उदार सत्वधीर । तयाचें ऋण साचार ।

रुक्मिणीवरें वारिलें ॥ ९९ ॥ रघुपति शेष कृपाज्ञानी । कृष्णदास लोल्याप्रसिद्ध जनीं । उद्धोध प्रेमरसाची खाणी । रुद्राई योगिनी महापुरुष ॥ ३०० ॥ शिवराम गोसावी पैठणकर । नारायण निंबयाचा कुमर । निळोबा गोसावी वैष्णववीर । ज्यांणीं पिंपळनेर वसविलें ॥ १ ॥ ऐसी भक्त रत्नमाळा । गुंफोनि पांडुरंगें घातली गळा । तो ब्रह्मानंद परब्रह्म पुतळा । सुख सोहळा भोगीतसे ॥ २ ॥ आणिकही संत बहुतारीतीं । गुप्त प्रगट आहेत क्षितीं । त्यांच्या चरणीं महीपती । मस्तक निजप्रीतीं ठेवितसे ॥ ३ ॥ एकनिष्ठा धरोनि अंतरीं । जाहले पंढरीचें वारकरी । सप्रेम गर्जती कीर्तनगजरीं । नमस्कार निर्धारीं त्यांसि माझा ॥ ४ ॥ वैष्णवभक्त तों असंख्यांत । भविष्यमाण होणार बहुत । जाहले त्यांची नव्हेचि गणित । ऐका ते मात निजकर्णीं ॥ ५ ॥ श्रीराम अवतार घेतला देवें । तेव्हांही निजभक्त होते सर्वें । अठरा पद्में संख्या वैभवें । कोठवर नांवें सांगावीं ॥ ६ ॥ मग कृष्ण अवतार धरी घननीळ । तेव्हां तेवि भक्त जाहले गोपाळ । गाई वत्स ते ऋषि गोपाळ । केला प्रतिपाळ तयांचा ॥ ७ ॥ छप्पन्न कोटी यादव देखा । नवलक्ष गोपाळ आणि गोपिका । यांच्या नांवांचा व्यासादिकां । नव्हेचि लेखा निजमुखें ॥ ८ ॥ तेथें मी मशक महीपती । अल्पबुद्धि मंदमती । कोठवर नांवांची घेऊं गणती । हा अपराध निश्चिती दिसतसे ॥ ९ ॥ प्रपंच धंदा नये निश्चित । काळ कंठावा कैशी रीतीं । म्हणवोनि संतचरित्रें निश्चितीं । अल्पमती वाखाणी ॥ ३१० ॥ सत्समागम नसेचि थोर । कुग्रामींचा वस्तीकर । अचूक लेखकाचा आधार । तोही साचार असेना ॥ ११ ॥ नाहीं अक्षर कळलें शुद्ध । छप्पन्न भाषा नानाविध । बोलतां नये गीर्वाणशब्द । लोकप्रसिद्ध जाणती ॥ १२ ॥ परी हृदयस्थ होऊनि रुक्मिणीपती । ग्रंथ लेहविला मूढाहातीं । आतां तुम्हीं तुष्टोनि संतीं । वचनें सरतीं करावीं ॥ १३ ॥ जैसा कोरांटयाचा तरुवर । त्यासि सर्वांगीं कांटे असती फार । परी त्याचीं पुष्पें मृडानीवर । प्रीति पडिभारें भोगीतसे ॥१४॥ कां कस्तूरीचें काळें पान । ध्यानासि आणितां श्रीमंतजन । मुख्य सुगंधासी कारण । धरोनि जाण संरक्षिती ॥ १५ ॥ तैसे आरुषशब्द म्हणवोनी । अव्हेर न करावा विचक्षणीं । जे बाळक बोले बोल बोबड्यावचनीं । तेंचि पडताळोनि पुसे माता ॥ १६ ॥ या ग्रंथामाजी इतुकाचि अर्थ । कीं भक्तासि पावला भगवंत । श्रोतया वक्तयांचे मनोरथ । रुक्मिणीकांत पुरवील ॥ १७ ॥ ग्रंथसंग्रह करितां घरीं । त्याचीं विघ्नें पळतील दुरी । सुदर्शन घरटी करी । निश्चय अंतरीं असों द्या ॥ १८ ॥ संतचरित्रें वाचितां आधी । तत्काळ होईल चित्त शुद्धी । कदापि न राहे द्वेषबुद्धी । तेणेंचि भवाब्धी पार होय ॥ १९ ॥ ऐशा रीतीं ग्रंथासि वर । दीधला असे करुणाकरें । भीतरी निमित्तासि आधार । निरोप साचार सांगतो ॥ १२० ॥ आधील मागील कोणते संत । हें तरी मी नेणेंचि सत्य । जैसीं सागरीं मुक्ताफळें निपजत । तीं ओंवितां निश्चित न कळती ॥ २१ ॥ कीं चंपकहार ओवितां जाण । आधी कोणती उपजलीं

१ श्रीशंकर.

सुमनें । हें गुंफणार नोळखतीच पूर्ण । दिसती दृष्टीनें सारिखीं ॥ २२ ॥ तेवीं वाग्देवीचें घालोनि सत्र । संत ओंविलें तुळसीपत्रें ।
सद्भावें पूजिला रुक्मिणीवर । पंढरपुर निवासी जो ॥ २३ ॥ शके सोळाशें शाहाण्णव वर्षी । जय नाम संवत्सरासी । फाल्गुन कृष्ण
चतुर्थीसी । ग्रंथ सिद्धीसी पावला ॥ २४ ॥ प्रवरेपासूनि दाक्षिणेस । ताहाराबाद गांव पांच कोस । भक्तलीलामृत अति सुरस । जाहला
असे ते ठायीं ॥ २५ ॥ जय देवाधिदेवा गरुडध्वजा । तुझी वाक्पुष्पें केली पूजा । आतां मनोरथ पुरेल माझा । तो अधोक्षजा वर देईं
॥ २६ ॥ नलगे भुक्ति नलगे मुक्ती । मागत नाहीं धन संपत्ती । तुझ्या दासांची वर्णीन कीर्ती । ऐसें श्रीपती करावें ॥२७॥ म्हणशील
संतचरित्रें झाली पूर्ण । आतां न करीं कवित्व लेखन । ऐसें बोलशील मजकारणें । तरी तें वचन नायकें मी ॥ २८ ॥ हीं चरित्रें
पडताळोनी । वारंवार गाईन कीर्तन । यावीण इच्छा असेल मनीं । तरी हे वाणी झडो माझी ॥ २९ ॥ नावडेचि तुझें ब्रह्मज्ञान । नलगे
तुझें योगसाधन । रूप दृष्टीसीं पाहीन सगुण । यावीण मागणें आन नसे ॥ ३३० ॥ संतचरित्रें वर्णीन फार । सेवकपणें असावें दूर ।
तुजसी मिश्रित जाहलों जर । तरी अधिकार मग कैंचा ॥ ३१ ॥ रायाचे प्रधान पुत्र निश्चिती । यांची उदंड वाणिली कीर्ती । तरी
तया भाटासि भूपती । सन्निध निजप्रीती बैसवीना ॥ ३२ ॥ म्हणवोनि मोक्ष घ्यावयासि पाहीं । मज सर्वथा अधिकार नाहीं । वाचेसि
तुझी सत्कीर्ति द्यावी । आणि रूप हृदयीं सांठवीं ॥ ३३ ॥ भक्तीं वाणिलें तुज प्रीतीं । मी गाईन संतांची कीर्ती । ऐसा मनोरथ धरी
महीपती । तरी पुरवी आर्ती पांडुरंगा ॥ ३४ ॥ इति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ । श्रवणेंचि पुरती मनोरथ । परिसोत प्रेमळ भाविक भक्त ।
एकावन्नावा अध्याय रसाळ हा ॥ ३३५ ॥ अध्याय ॥ ५१ ॥ ओंव्या ॥ ३३ ॥ एकंदर ओंव्या संख्या ॥ १०७९४ ॥

समाप्त